# जुने मराठी

# अर्थशास्त्रीय ग्रंथ

(१८४३-१८५५)

रामकृष्ण विश्वनाथ
लोकहितवादी
हरि केशवजी
कृष्णशास्त्री चिपळोणकर

चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ

[१८४३-१८५५]

# चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ

[१८४३ - १८५५]

संपादक

दि. के. बेडेकर

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन १४ वे

© १९६९, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

किंमत २० रुपये

प्रकाशक : पुरुषोत्तम नारायण माथुर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

# पुरस्कार

शंभर वर्षांपूर्वी मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रविषयक चार ग्रंथांचा संग्रह गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे प्रकाशित होत आहे, याचा मला आनंद वाटतो. ब्रिटिश सत्तेच्या प्रस्थापनेनंतर एतद्देशीय लोकांना त्यांच्या त्यांच्या भाषांतून आधुनिक ज्ञानविज्ञान देण्याचे जे प्रयत्न झाले त्यांची कल्पना या ग्रंथसंग्रहावरून तर येतेच, शिवाय, परकीय भाषांतील ज्ञान भारतीय भाषांत आणताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, याचाही अंदाज या संग्रहावरून येतो. या संग्रहातील ग्रंथ प्रामुख्याने भाषांतरांच्या किंवा रूपांतरांच्या स्वरूपातील आहेत.

ज्ञानविषयक ग्रंथांची भाषांतरे मुख्यतः दोन उद्दिष्टे समोर ठेवून केली जातात. एकतर त्यांचा उपयोग विद्वानांना व्हावा म्हणून किंवा ती विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडावीत म्हणून. जेव्हा ही भाषांतरे विद्वानांसाठी केली जातात तेव्हा दुसऱ्या भाषेत प्रसिद्ध झालेल्या विशिष्ट अभिजात ग्रंथांचे ऐतिहासिक वैशिष्ट्य समजावे हा हेतू त्यामागे असतो. उदाहरणार्थ आज कोणी टर्गॉट, ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, मिल, वॉलरस यांसारख्या अभिजात अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथांची भाषांतरे केल्यास त्यांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र शिकविणे हा असणार नाही, तर ज्या विद्वानांना भाषेच्या अडचणीमुळे हे प्रमाणभूत अभिजात ग्रंथ वाचता येत नाहीत त्यांना ते त्यांच्या भाषेत उपलब्ध करून देणे हा असेल. याच्या उलट चालू घडीला प्रमाणभूत समजल्या जाणाऱ्या एखाद्या ग्रंथाचे भाषांतर करावयाचे असेल तर सध्या जे विद्यार्थी तो विषय शिकत असतील त्यांच्यासाठीच ते करावे लागेल. या दोन प्रकारच्या भाषांतरांची घाटणी आमूलाग्र भिन्न असावी लागेल. विद्वानांसाठी अभिजात ग्रंथाचे जे भाषांतर करावयाचे ते अगदी काटेकोर व मुळाबरहुकूम असले पाहिजे, आणि मूळ भाषेतील शक्य तितके सर्व बारकावे अनुवाद-भाषेत उतरतील असा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला पाहिजे. अशा भाषांतरामध्ये स्थानिक भाषेची घाटणी येईलच असे नाही, आणि म्हणून त्यात परभाषेची झलक तर असेलच, शिवाय, ते बरेचसे क्लिष्ट व काहीसे कंटाळवाणेही होईल. याच्या उलट विद्यार्थ्यांसाठी करावयाचे भाषांतर या वर सांगितलेल्या भाषांतरापेक्षा मूलतःच वेगळ्या प्रकारचे असावे लागेल. त्याचा मुख्य उद्देश मूळ ग्रंथाचे शब्दशः भाषांतर करणे हा असणार नाही, तर त्या ग्रंथातील महत्त्वाचे मुद्दे आपल्या भावी जीवनाची तयारी करण्यासाठी त्या विषयाचे ज्ञानसंपादन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सुलभपणे समजावेत हा असेल. त्यासाठी हे भाषांतर असे असले पाहिजे की ते वाचताना जणू आपण भाषांतर वाचीत नसून मौलिक ग्रंथच वाचीत आहोत असे वाचकाला वाटावे. त्यात स्थानिक भाषेतील वाक्प्रचार, त्या भाषेची खास शैली आणि स्थानिक परिस्थितीतील उदाहरणे यांचा मुक्तहस्ताने वापर करण्यात आला पाहिजे. तरच स्थानिक विद्यार्थ्यांना त्या विषयाचे यथार्थ आकलन होऊ शकेल. ज्या मूळ भाषेत ते पुस्तक लिहिले गेले असेल त्या भाषेच्या देशातील त्या विषयाशी संबंधित असणारी परिस्थिती जशी मूळ पुस्तकाच्या वाचनाने ध्यानात येते तशी भाषांतराच्या वाचनाने अनुवाद-भाषेच्या देशातील परिस्थितीही ध्यानात आली पाहिजे. अशा स्थितीत ते भाषांतर म्हणजे वस्तुतः मूळ ग्रंथाच्या आधारे लिहिलेले नवे स्वतंत्र पुस्तकच बनते. असे घडले नाही तर त्या भाषांतराचा हेतूच साध्य होणार नाही. केवळ एका विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावयाचे आहे, पण त्यासाठी

मूळ ग्रंथाच्या देशातील भौतिक, परिस्थितिविषयक व सामाजिक वातावरणाची विद्यार्थ्याला ओळख आहे असे यात गृहीत धरले जाईल. मुलांसाठी उपलब्ध असलेल्या भाषांतरांवरून हा मुद्दा उत्तम प्रकारे विशद करिता येईल. युनायटेड किंग्डमसारख्या देशातील हिमवृष्टी, समुद्रपर्यटन, आणि तेथील वनस्पती व प्राणी यांच्याशी येथील मुले परिचित असल्याचे गृहीत धरण्यात येईल. अर्थात अशा प्रकारच्या भाषांतराने मूळ उद्देश सफल होणार नाही हे उघड आहे.

हीच गोष्ट अर्थशास्त्राच्या बाबतीतही लागू पडते. आता आपल्याला या विषयासंबंधी भारतीय भाषांमध्ये अनुवादांच्या द्वारे पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावयाची आहेत, ही गोष्ट नजरेआड करिता येणार नाही. पाठ्यपुस्तकांची भाषांतरे भाषाशास्त्रज्ञ किंवा त्या विषयाची पोपटपंची करणारे तज्ज्ञ यांच्याकडून होऊ शकणार नाहीत. त्यांच्या पद्धतीने भाषांतरे झाल्यास गोंधळ माजेल आणि विद्यार्थ्यांना तो विषय सुलभपणे समजण्याऐवजी अधिकच अवघड होईल. अशी भाषांतरे करणारी मंडळी अध्यापनाची योग्य कल्पना असणारे चांगले अर्थशास्त्रज्ञ असावे लागतील, आणि त्यांना स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात भारतातील आर्थिक प्रश्नांचे चांगले ज्ञान असावे लागेल. एखाद्या सिद्धांतविषयक पुस्तकाचे भाषांतर करावयाचे असले तरी त्यांना नवी परिस्थिती ध्यानात घेऊन स्थानिक वाक्प्रचार व स्थानिक माहिती यांच्या साह्याने त्या पुस्तकाचे रूपांतरच करावे लागेल.

आजकाल जी भाषांतरे प्रसिद्ध होत आहेत त्यांमध्ये भाषांतराच्या उद्दिष्टांतील या महत्त्वाच्या फरकाकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे आवर्जून सांगितले पाहिजे असे नाही. पाठ्यपुस्तके या दृष्टीने ही पुस्तके अवाचनीय असतात आणि अध्यापनशास्त्रदृष्टीनेही त्यांचे मूल्य जवळजवळ शून्य असते. या संदर्भामध्ये सुमारे शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रात भाषांतरांच्या द्वारे अर्थशास्त्राची पाठ्यपुस्तके तयार करण्याचा प्रयत्न झाला होता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. विद्यार्थ्याला त्या विषयाची भरपूर माहिती मिळावी हा त्या भाषांतरांचा उद्देश होता ही मोठी आनंदाची बाब आहे. त्यामुळे या पुस्तकांमध्ये मूळ लेखकाच्या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणाचा केवळ मथितार्थच दिलेला होता असे नव्हे तर त्या काळी भारतात राहाणाऱ्या लोकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीवर भरपूर प्रकाशही पाडण्यात आलेला होता. एवढेच नव्हे तर, आपल्या सामाजिक-आर्थिक व राजकीय इतिहासासंबंधीच्या त्यांच्या समजुतींची पुसट कल्पनाही त्या पुस्तकांवरून येते. ज्या पद्धतीने ही भाषांतरे करण्यात आलेली होती तिच्यावरून गहन विषयाची पुस्तके तो विषय शिकविण्याच्या हेतूने तयार करावयाची असतील तर त्यांची भाषांतरे कशी केली पाहिजेत याविषयी आपल्याला मार्गदर्शनही मिळू शकते. ही पुस्तके म्हणजे अनुकरण करण्यासारखे नमुने आहेत. अर्थात ते फक्त नमुनेच आहेत. आज त्यांचा पाठ्यपुस्तके म्हणून वापर करिता येणे शक्य नाही व योग्यही नाही, कारण ही पुस्तके ज्या ग्रंथांवर आधारलेली आहेत ते शंभर वर्षांपूर्वीचे आहेत आणि अभिजात ग्रंथ म्हणूनच त्यांचे महत्त्व आहे, विद्वानांच्या वाचनासाठीही या भाषांतरांचा फारसा उपयोग होण्यासारखा नाही. कारण, वर सांगितल्याप्रमाणे, अभिजात ग्रंथांचे भाषांतर विद्वानांसाठी करावयाचे तर ते शब्दशः करण्यात आले पाहिजे. या ग्रंथांमध्ये ज्या पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे ती अगदी वेगळी आहे. तथापि त्यांचा उपयोग विद्वानांनाही वेगळ्या प्रकारे होण्यासारखा आहे. केवळ भाषांतराचा आदर्श नमुना म्हणूनच नव्हे तर त्या काळातील सामाजिक-आर्थिक स्थितीचे चित्रण करणारी आणि त्या काळातील भारतीय विद्वानांचे सामाजिक-आर्थिक स्थितीसंबंधीचे विचार व्यक्त करणारी पुस्तके म्हणूनही त्यांचे महत्त्व आहे.

या पुस्तकांवरून त्या प्रारंभिक काळातील लेखकांच्या ग्रंथरचनापद्धतीतील काही वैशिष्ट्येही दिसून येतात. उदाहरणार्थ, या पुस्तकांपैकी एकाही पुस्तकात त्याच्या लेखकाने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या या विषयासंबंधीच्या अन्य ग्रंथांचा किंवा ग्रंथकारांचा कोठेही उल्लेख केलेला नाही. आजच्या

पद्धतीनुसार हे थोडे चमत्कारिक वाटते. त्या लेखकांना इतरांच्या ग्रंथांची माहिती नसेल हे संभवत नाही. मग त्यांनी त्यांचा उल्लेख का केला नसावा, हे समजत नाही. शिवाय प्रत्येकाने आपापली स्वतंत्र परिभाषा वापरलेली आहे. त्यामुळे 'कॅपिटल' या इंग्रजी शब्दाला पुंजी, मांडवल, मुद्दल, असे तीन शब्द वापरण्यात आलेले आढळतात, तर 'डॉक्युमेंट्स' या शब्दासाठी पुर्जे, खते, खतपत्रे असे शब्द वापरलेले दिसतात. पुष्कळदा एकच लेखक एका मूळ शब्दासाठी दोन वेगवेगळे शब्द वापरतो उदाहरणार्थ, 'कन्सेशन इन एक्स्पोर्ट ड्यूटी' या शब्दसमुच्चयाचा अर्थ व्यक्त करण्यासाठी 'माफी मजुरा' व 'ऐवज मुजरा' असे दोन शब्द हरिकेशवजींनी एकाच पानावर वापरले आहेत. यावरून पारिभाषिक शब्दांची निश्चिती त्या काळी झालेली नव्हती हे उघड आहे. ते स्वाभाविकही म्हटले पाहिजे. परंतु इतर ग्रंथकारांच्या अनुभवाचा लाभ घेतला गेला असता तर कदाचित अर्थशास्त्राची परिभाषा निश्चित होण्यास मदत झाली असती.

अर्थात आजही या परिस्थितीत फार फरक पडला आहे असे म्हणता येत नाही. भारतीय बुद्धिमंतांचे जे अध्ययन प्रा. शिल्स यांनी प्रस्तुत केले आहे त्यामध्ये त्यांनी या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला आहे की, भारतीय विद्वानांचे डोळे अजूनही पश्चिमेकडे लागलेले असतात. पाश्चात्य भाषांमध्ये, विशेषतः इंग्रजीत जे साहित्य प्रसिद्ध होते त्याची माहिती त्यांना भरपूर असते, परंतु आपल्या देशात, आपल्या भाषांमध्ये जे साहित्य प्रसिद्ध होत असते त्याची मात्र त्यांना गंधवार्ता नसते. मराठीत प्रसिद्ध होणारे अलीकडील काळातील अर्थशास्त्रविषयक साहित्य नजरेखाली घातल्यास ही गोष्ट आपल्यालाही सहज पटते. बहुधा एक लेखक दुसऱ्या लेखकाच्या लिखाणाची मुळीच दखल घेत नाही, आणि त्यामुळे एकाच ग्रंथाची अनेक भाषांतरे अथवा रूपांतरे प्रसिद्ध होतात. शिवाय प्रत्येकजण आपले वतःचेच परिभाषिक शब्द वापरतो. यामुळे अर्थशास्त्रीय पारिभाषेतही अजून निश्चितता आलेली नाही. या प्रश्नाचा आमच्या विद्वानांनी गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता आली आहे, असे मला वाटते.

शास्त्रीय विषयासंबंधी विधाने करिताना केवढी खबरदारी घ्यावी लागते, याचेही भान त्या काळी त्या विषयांसंबंधी लिहिणाऱ्यांना पुरेसे झाले नसावे असे वाटते. श्री. रामकृष्ण विश्वनाथ यांच्या पुस्तकात ही गोष्ट प्रकर्षाने दिसून येते. इतिहासविषयक जी विधाने त्यांनी केली आहेत ती फारच सैल व शास्त्राच्या कसोटीस न उतरणारी आहेत. उदाहरणार्थ शिवाजी महाराजांसंबंधी जे विवेचन त्यांनी पृष्ठ २०-२१ वर केले आहे त्याला इतिहासाचा आधार नाही. 'हा १७ वर्षांचा असता त्याणे माळवी लोकांची एक टोळी जमवून आपले लूट मिळविण्याचे उद्योग चालू केले.' हे त्यांचे विधान किंवा शिवाजी-अफझुलखान भेटीचे त्यांनी केलेले वर्णन विपर्यस्त आहे. भारतीय इतिहासातील अनेक घटनांबद्दलची त्यांची विधाने बरोबर नाहीत. एक उदाहरण द्यावयाचे तर चिनी फौजेने केलेल्या एका स्वारीचा उल्लेख पाहा. पृष्ठ ११ वर ते म्हणतात, "ते लोक आपली मोठी बळकट फौज बरोबर घेऊन गंगा नदीचे काठावर जे देश आहेत, तेथे चालून आले, व आसाम, टिबेट, आणि निपाळ आणि लाहोर या देशांचा त्यांणीं फार विध्वंस केला. मग दक्षिणेंत मद्रासपर्यंत राज्य जिंकत येऊन व त्यास चिनापटम् असें नाव देऊन त्याहीं शेवटीं तांजोरचे राज्यावर आपली खंडणी बसविली. चिनी लोकांची अशी इच्छा होती कीं सर्व इंडियांतला व्यापार आपण आपले हस्तगत करून घ्यावा, आणि त्याकरितां त्यांहीं नागपटम् शहरांत एक आपली मोठी वखार स्थापिली. आणि येथें आपले बांधणीचे रूढीप्रमाणे त्यांहीं एक देवालय बांधलें, व हें देऊळ अद्यापपर्यंत आहे, परंतु तें दिवसानुदिवस जीर्ण होऊन धुळीस मिळत आहे."

चिनी फौजेच्या उत्तर-दक्षिण स्वारीचे वर्णन या लेखकाने कोणत्या ग्रंथाच्या आधारे केलेले आहे ते कळत नाही. नागपटम् शहरातील वखार व चिनी पद्धतीचे देवालय (पगोडा) याबद्दलही

संदर्भ दिलेला नाही. परंतु भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरात चिनी वखार व पगोडा असण्याची शक्यता मात्र आहे. सुंग साम्राज्याच्या काळात (९६०-१२७९) कॅन्टन या चिनी बंदरात भारतीय व्यापाऱ्यांची वखार व देवालय होते असा उल्लेख सापडतो. तसेच चेंग हो या विख्यात चिनी दर्यासारंगाने १४०३ ते १४१५ या काळात सात आरमारी सफरी केल्या, पहिली सफर भारताला भेट देण्यासाठी होती व नंतर तो आफ्रिकेच्या व अरबस्तानच्या किनाऱ्यांना पोहोचला होता, अशी माहिती उपलब्ध आहे. बंगालच्या भारमाराने चेंग हो ला सोबत केल्याचाही पुरावा आहे. तेव्हा चीन व भारत यांच्यामधील जलमार्गी दळणवळण आणि व्यापार दहाव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत तरी चांगला चालू होता. आणि कॅन्टनमधील भारतीय वखारीप्रमाणे पूर्व किनाऱ्यावरील बंदरात चिनी वखार व पगोडा असणे साहजिक आहे. तसा एक उल्लेखही आढळतो. पण नागपट्टम्च्या वखारीचा उल्लेख रामकृष्णांनी कोणत्या आधाराने केला आहे, ते समजत नाही.

शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी मराठी पुस्तकांची मुखपृष्ठे, अक्षरांचे वळण व छपाई कशी असे याची कल्पना यावी, म्हणून या संग्रहातील पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे ठसेही देण्यात आलेले आहेत.

अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारा हा संग्रह प्रसिद्ध करण्याचे श्रेय प्रामुख्याने संस्थेचे माजी संचालक प्रा. वि. म. दांडेकर यांना आहे. हे जुने ग्रंथ मिळवून त्यांचे संपादन करून प्रसिद्धी-साठी तयार करण्याचे कार्य प्रा. दि. के. बेडेकर यांनी केले. या कामात श्री. श्रीपाद जोशी यांनी त्यांना साह्य केले. याबद्दल मी या तिघांचे मनःपूर्वक आभार मानतो. पुस्तकाच्या सुबक छपाईबद्दल मौज मुद्रणालयाचाही मी आभारी आहे.

१२-१२-६९
गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

पुरुषोत्तम नारायण माथुर
संचालक

# अनुक्रमणिका

प्रस्तावना : दि. के. बेडकर ७

हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढें
काय त्याचा परिणाम होणार, याविषयीं, विचार :
रामकृष्ण विश्वनाथ १–४२

लक्ष्मीज्ञान : लोकहितवादी ४३–७१

देशव्यवहारव्यवस्था : हरि केशवजी पाठारे ७३–२५९

अर्थशास्त्रपरिभाषा : कृष्णशास्त्री चिपळोणकर २६१–३८०

परिशिष्टे

१. लेखकांविषयी माहिती ३८३

२. अपरिचित आणि पारिभाषिक शब्दांचे अर्थ [मराठी-इंग्रजी] ३९८

३. पारिभाषिक शब्द [इंग्रजी-मराठी] ४०४

सूची ४०९

शुद्धिपत्र ४१५

# प्रस्तावना

प्रस्तुत संग्रहामध्ये चार जुनी पुस्तके छापून एकत्रित केली आहेत. ही पुस्तके १८४३ ते १८५५ या काळातली आहेत व दुर्मिळ आहेत. मुंबई विद्यापीठ १८५७ साली स्थापन झाले. त्या पूर्वी मराठीतून ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी निसर्गविज्ञानाची व मानवविज्ञानाची पुस्तके लिहिणारे लेखक त्यांच्या काळातले ज्ञान मराठीतून लोकांना देत होते. अर्थशास्त्र ह्या विषयावर अशा लेखकांनी लिहिलेल्या चार पुस्तकांचा समावेश या संग्रहात आहे.

या ग्रंथांमध्ये अर्थशास्त्राविषयी मांडलेले विचार त्या काळात मराठी वाचकांना फार नवे होते. या विचारांचा उगम युरोपात, विशेषतः इंग्लंडात झाला. तेथेही हे विचार जुने झालेले नव्हते. १८४८ मध्ये जॉन स्टुअर्ट मिल यांचा 'प्रिन्सिपल्स् ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेली दोन पुस्तके प्रस्तुत संग्रहात आहेत. म्हणजे इंग्लंड-मधील त्या वेळच्या नव्या अर्थशास्त्रीय विचारांचा परिचय मराठीतून करून देण्याचे कार्य हे मराठी लेखक लगोलग तत्परतेने करीत होते. या विचारांचा आपल्या देशातील परिस्थितीशी संबंध दाखविण्याचा प्रयत्नही ह्या सर्व लेखकांनी केलेला दिसतो.

त्या वेळच्या अर्थशास्त्रीय विचारांना 'क्लासिकल' पंथाचे विचार असे नांव आहे. ॲडम स्मिथ (१७२३-१७९०) हे या पंथाचे प्रणेते होते. त्यांच्या पूर्वी 'मर्कन्टालिस्ट' व 'फिजिओक्रॅट' हे दोन पंथ युरोपात प्रभावी होते. त्या पंथांच्या विचारांवर टीका करून स्मिथ यांनी आपले नवे विचार मांडले. १७७६ मध्ये स्मिथ यांनी 'वेल्थ ऑफ नेशन्स' हा ग्रंथ प्रसिद्ध केला व त्यामुळे अर्थशास्त्रीय विचारांत मोठे परिवर्तन घडले. 'वेल्थ' म्हणजे संपत्ती. ती व्यापारातून, मुख्यतः परदेशांशी होणाऱ्या विनिमयांतून, निर्माण होते असे मर्कन्टालिस्ट पंथाचे मत होते. उलट, संपत्तीचा उगम व्यापारातून होत नसून तो देशातच निर्माण होणाऱ्या उत्पादनांतून होतो असे मत फिजिओक्रॅट पंथाचे होते. उत्पादनात प्रत्यक्ष भाग घेणारे वर्ग आणि अनुत्पादक वर्ग असा भेद त्यांनी केला. देशाचे एकूण उत्पन्नातून खर्चवेच वजा जाता काही वरकड (surplus) उत्पन्न शिल्लक उरते. हे वरकड उत्पन्न समाजातील उत्पादक व अनुत्पादक अशा दोन्ही वर्गांत वाटले जाते. हे उत्पन्न निर्माण करण्याची शक्ती फक्त शेतकी व्यवसायातच आहे असे या पंथाच्या लोकांचे मत होते. व्यापारातून व उद्योगधंद्यांतून संपत्ती उत्पन्न होत नाही असे ते मानीत.

## रामकृष्ण विश्वनाथ

स्मिथ यांच्या आधीचे विचार आणि स्मिथ यांनी 'वेल्थ ऑफ नेशन्स' या १७७६ साली लिहिलेल्या ग्रंथातील विचार यांची थोडी ओळख प्रस्तुत संग्रहातील पहिले लेखक रामकृष्ण विश्वनाथ यांना झालेली दिसते. ते म्हणतात, "हिंदु लोकांचे कोणतेही पुस्तकात 'पोलिटिकल एकॉनमी' म्हणजे राज्यव्यवस्था, हे शास्त्र जसे आडम् स्मिथचे 'वेल्थ ऑफ नेशन्स' नामक पुस्तकात आहे, त्याप्रमाणे स्पष्ट लिहिलेले नाही. याकरिता आम्हास त्या लोकांना राज्यव्यवस्था शास्त्राचे काही नियम सांगणे

अवश्य आहेत. ते हे की 'श्रम हेच मोठे द्रव्यसाधन होय' आणि जर मनापासून श्रम केले तर द्रव्य साध्य होईल यात तिळमात्र शंका नाही." (पृष्ठ ९)

या ठिकाणी स्मिथ यांच्या ग्रंथाचा उल्लेख लेखक करतो व 'श्रमाने मूल्याची निर्मिती होते' हा स्मिथ यांचा सिद्धान्त मांडतो, पण पुढे अर्थशास्त्रीय विचारांचे स्पष्ट विवेचन त्यांनी ग्रंथात कोठे केलेले नाही. रामकृष्णांच्या पुस्तकाचा उद्देश अशा शास्त्रीय मांडणीचा नसून वाचकांना हिंदुस्थानच्या 'सांप्रतच्या' स्थितीचे भान करून देऊन त्यांना उद्योगाला प्रवृत्त करावे असा आहे. त्यांच्या एकंदर विवेचनात 'मर्कन्टालिस्ट', 'फिजिओक्रॅट' व 'क्लासिकल' विचारांचे धागे इतस्ततः मिसळलेले दिसतात. त्यांची थोडीशी कल्पना देणे उपयुक्त ठरेल.

हिंदुस्थानातले तेव्हाचे इंग्रजी राज्य व्यापारी पद्धतीने येथील द्रव्य शोषून नेणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होते. शेतीवर जबर कर वसूल करणे, अफू, मीठ वगैरे पदार्थांचा मक्तेदारी व्यापार करून नफा मिळविणे, येथील हातमागासारख्या कारागिरीला बुडवून इंग्लिश कारखानदारीच्या मालाला येथे बाजारपेठ तयार करणे, आणि तेथील कारखानदारीसाठी कापूस नीळ वगैरे शेतकीमालाची येथे स्वस्त खरेदी करून तो माल इंग्लंडात पाठविणे. या मार्गांनी हे द्रव्यशोषण चालू होते. साम्राज्याच्या रक्षणासाठी व वाढीसाठी लागणारा फौजेचा व लढायांचा खर्च व येथील ब्रिटिश नोकरवर्गाच्या पगाराचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीतून करणे ही शोषणाची एक शिवाय बाब होती. रामकृष्ण यांच्या विवेचनात या बाबींचा स्पष्ट व परखड शब्दांत निषेध आढळतो.

कंपनीने येथे राजकीय व लष्करी सत्ता स्थापन केली तिचे स्वरूप काय आहे याचे आकलन रामकृष्ण यांना झालेले होते, असे म्हणण्याइतका पुरावा त्यांच्या ग्रंथात इतस्ततः पसरलेला पण स्पष्ट आहे. इंग्रजांच्या पूर्वीचे परकीय मुसलमान राज्यकर्ते येथील हिंदु प्रजेला बाटविण्याच्या किंवा धर्मप्रसाराच्या दृष्टीने जुलूम करीत होते, तरी त्यांचा मुख्य उद्देश केवळ येथील संचित धन लुटण्याचा होता असे ते सांगतात. या राज्यकर्त्यांपेक्षा इंग्रजांच्या जुलमाचे स्वरूप व्यापारी पद्धतीचे व वेगळे आहे व जास्त पद्धतशीर व मोठ्या लुटीचे आहे ही गोष्ट त्यांनी ठळकपणे नजरेस आणली आहे. "हिंदुस्थानात राज्य नव्हे, लष्करी अंमल व दिवाणी जुलूम आहे" हे एडमंड बर्कचे वाक्य त्यांनी उद्धृत केले आहे आणि 'दिवाणी' जुलमामुळे येथील संपत्तीची लूट कोणकोणत्या नव्या मार्गांनी होत आहे याची माहिती त्यांनी दिलेली आहे. १८७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'दारिद्र्य आणि हिंदुस्थानावर ब्रिटिशांचा अन्यायी अंमल' ह्या दादाभाई नवरोजी यांच्या प्रसिद्ध ग्रंथात परतंत्र भारतातून ब्रिटनकडे शोषित होणाऱ्या संपत्तीची व हिंदुस्थानच्या उत्पन्नाची व दारिद्र्याची आंकडेवारीने माहिती दिली आहे, तशी रामकृष्णांनी दिलेली नाही व ती अपेक्षित करणेच योग्य होणार नाही. परंतु या संपत्ति-शोषणाची नुसती ढोबळ कल्पनाच नाही तर शोषणमार्गांचा तपशीलही त्यांच्या पुस्तकात आढळतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. या संपत्ति-शोषणाचा निषेधही त्यांच्या लेखनात स्पष्ट जळजळीत शब्दांत आढळतो, हे विशेष आहे.

नुसता निषेध करून रामकृष्ण थांबत नाहीत, तर या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी भारतीयांनी काय करावयास हवे, त्याचाही विचार ते मांडतात. रामकृष्णांच्या समोर औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या भारताचे मनोमय चित्र आहे. ते म्हणतात, "येथील लोकांचे हाती यंत्रे असल्यास हे लोक कलाकौशल्याचे कामात आणि त्यास ज्या वस्तूंचा खप आहे त्या विलायतेप्रमाणे करण्यांत कुशल आहेत, असे ज्याही हिंदुस्थानात पाहिले आहे ते सर्व कबूल करतात. परंतु दुसऱ्या विलायतेतल्या लोकांबरोबर या कामात टक्कर द्यावी, किंबहुना सर्व त्या जिनसांचा मक्ता आपणच घ्यावा असे करण्यास ते डचकतात. जर इंग्लंड देशाने दुष्टपणाने हिंदुस्थानचे सर्व जिनसांचा मक्ता घेऊन त्या लोकांची उमेद

खचविली नसती, आणि हिंदुस्थानचा जिन्नस दुसऱ्या कोणत्या मुलखांत जाऊ नये असा प्रतिबंध केला नसता, तर येथे मजुरी कमी, तेणेकरून त्या लोकांही आपला केलेला जिन्नस सर्व पृथ्वीभर पुरविला असता. या प्रतिबंधामुळे हिंदुस्थानचे व काही इंग्लंडाचेही अनहित आहे, परंतु हिंदुस्थानचे लोकांही आता आपला पैका व श्रम आपल्या हिताकडेच लावून त्यांही विलायती मालाची गरज ठेऊ नये. हे कसे होईल हे त्यांचेसारिखे जाणते लोकांस सांगावयास नको." (पृष्ठ ७).

येथे विलायती मालावर बहिष्कार घालून स्वदेशी माल उत्पन्न करून तोच फक्त लोकांनी वापरावा अशी सूचना रामकृष्ण देत आहेत. आणखी ते असे मांडीत आहेत की जर आंतरदेशीय खुल्या व्यापाराचे तत्त्व अंमलात आले तर हिंदुस्थानचा स्वस्त माल साऱ्या जगाच्या बाजारपेठेत स्पर्धा करून टिकू शकेल. पारतंत्र्यामुळे हे होण्याला इंग्लंडचा प्रतिबंध राहील हे ओळखून निदान हिंदुस्थानची बाजारपेठ स्वदेशीच्या भावनेचा आधार घेऊन हिंदुस्थानातील पैदा झालेल्या मालाला राहावी असे त्यांचे प्रतिपादन आहे. हा प्रश्न केवळ आर्थिक नाही याची स्पष्ट जाणीव त्यांना आहे. 'ब्रिटिश इंडियन सोसैटी'सारख्या मंडळ्या 'हिंदुस्थानचे कल्याण करावे' या हेतूने इंग्लंडात जमतात, पण त्यांच्याकडून खरे हित होणार नाही असे सांगून ते म्हणतात, "हिंदुस्थानचे लोकांही जर त्यास आपले कल्याण करावयाचे असेल, तर त्यांस आपल्याला **स्वतंत्रता** मिळवायची असेल, आणि आपला व्यापार हितावह करून घ्यावयाचा असेल, तर त्यांही स्वतःच कमर बांधावी, आणि आपल्या सामर्थ्येकरून व गुणेकरून दुसऱ्याचे साहाय्याची गरज नाहीशी करावी, आणि जी दुःखे त्यांनी आपल्या आळसामुळे आपणावर ओढून घेतली आहेत, ती दूर करावी", (पृष्ठ ७; जाड टाइप मुळात नाही —दि. के. बे.)

हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासासाठी यंत्रकौशल्याचा स्वीकार तातडीने व तत्परतेने आपण करायला हवा असे सांगताना रामकृष्णांच्या समोर आपली रूढ समाजव्यवस्था आहे. तिच्यामध्ये खूपच सुधारणा केल्याशिवाय आपण आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य मिळवून विकास करू शकणार नाही असे त्यांनी सांगितले आहे. "हिंदु लोकांचा दैवावर आणि ग्रहदशेवर फार भरंवसा आहे, तेणेकरून ते मोठाले कारखाने घालण्यास आणि व्यापार करण्यास नालायक जाहले आहेत", असे ते म्हणतात. परंतु, 'इंग्लंडात पूर्वी टॉमस मुअर स्टामफर्डचा पंचांग करणारा' याला विचारून लोक आपले व्यवहार करीत ही माहिती देऊन इंग्लंडातही वाईट रूढी होत्या व त्या मुद्दाम नाहीशा कराव्या लागल्या असे ते सुचवितात, आणि पुढे सांगतात की हिंदु लोकांत "जसजशी यंत्राची व मजुरीची गरज अधिक होत जाईल, तसतसे सण आणि उपवास कमी होत जातील", "ब्राह्मणाचाही मान कमी होत चालला आहे, याणेकरून असें दिसून येतें की हा देश कांहीं चांगले दशेस येईल." येथे रामकृष्ण यांचा रोख जातीवर नसून परंपरेने लोकांना अज्ञानात ठेवणाऱ्या रूढींविरुद्ध आणि रूढी टिकविणाऱ्या भिक्षुकवर्गाविरुद्ध आहे, व हीच भूमिका पुढे लोकहितवादींनी आग्रहाने मांडलेली आपल्याला आढळते.

रामकृष्णांच्या पुस्तकातील अर्थशास्त्रीय आशयाची ढोबळ कल्पना संक्षेपाने वर दिली आहे. येथे त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारामागील एका आधारतत्त्वाचा उल्लेख करणे इष्ट होईल. ते तत्त्व थोडक्यात असे सांगता येईल : प्रत्येक मनुष्य आणि प्रत्येक देश स्वतंत्र असणे हे निसर्गाला धरून आहे, निसर्गाचे अटळ नियम आहेत व ते माहित करून घेणे मनुष्यमात्राला शक्य आहे. निसर्गनियमांचे ज्ञान हेच खरे ज्ञान व त्यामुळे मनुष्य सुख संपादू शकतो. सुखसंपादनासाठी माणसे श्रम करतात व सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवहार करतात. हे सर्व व्यवहारही अटळ स्वाभाविक निसर्गनियमांसारख्या सामाजिक नियमांनी होणे योग्य आहे. तसे होण्यातच सर्वांचे हित व सुख आहे.

सुखाची वाढ करणे व प्राप्त परिस्थितीत त्याची पराकाष्ठा साधणे हे व्यक्तिमात्राचे व राष्ट्राचे ईप्सित असते व तेच श्रेय मानले पाहिजे.

समाजाची किंवा व्यक्तीची प्राप्त परिस्थिती 'नैसर्गिक' किंवा 'स्वाभाविक' नियमांना धरून असली तरच ती सुखावह होईल, हे तत्त्व भारतीयांना तसे नवे होते. जर प्राप्त परिस्थिती दुःखाची असेल तर ती कृत्रिम आहे, ती बदलून टाकणे हा पुरुषार्थ आहे, अशी प्रेरणा या तत्त्वामुळे नव्याने मिळत होती. ही प्रेरणा अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या मागे (१७७६) व फ्रेंच समाजक्रांतीच्या मागे (१७८९) प्रभावी होती व यशस्वी ठरली. तीच प्रेरणा हिंदुस्थानातही उदयोन्मुख राष्ट्रवाद आणि समाजसुधारणावाद यांना आधारभूत ठरली. आर्थिक व धार्मिक परिवर्तनाच्या कल्पनांचा उगमही 'नैसर्गिकता' (Natural Law) या तत्त्वाच्या आधाराने झाला. 'स्वातंत्र्य', 'ज्ञान', 'श्रम', 'संपत्ती' व 'सुख' या कल्पना तशा भारतीय परंपरेत होत्याच, पण 'नैसर्गिकते'च्या नव्या प्रमेयामुळे या जुन्या कल्पनांचा आशय बदलला. प्राप्त परिस्थितीतच रहावे, जन्माने लाभलेल्या जातीप्रमाणे वर्तन करावे, परमार्थज्ञानाला किंवा पढिक पठणात्मक ज्ञानालाच पवित्र व श्रेष्ठ मानावे, एकाने दुसऱ्याची हिरावून घ्यावी किंवा नुसती साठवून ठेवावी, अशी संपत्ती ही बाब आहे, अशा कल्पना मागे पडल्या. उद्योग आणि श्रम यांनीच संपत्ती निर्माण होते व ती वाढविण्यात सुख, पुरुषार्थ व सर्वहित आहे ही नवी कल्पना श्रेयस्कर मानली गेली.

माणसाने 'स्वाभाविक' स्थिती प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावा हा ईश्वरी संकेत आहे, असे रामकृष्णांनी, लोकहितवादींनी व नंतर न्या. रानडे व टिळक प्रभृतींनी मोठ्या दृढ श्रद्धेने मानले. लोकहितवादी म्हणतात, की "मनुष्याने या जन्मामध्ये वर्तणूक कशी करावी याचा नेम काही ईश्वराने **त्यांचे स्वभावातच** दिला आहे." (जाड टाइप मुळात नाही.) मनुष्यमात्राची ईश्वरदत्त स्वाभाविक प्रवृत्ती श्रमाकडे, सुखाकडे, ज्ञानाकडे व स्वातंत्र्याकडे आहे, पण खोट्या भ्रष्ट रूढींमुळे व अज्ञानामुळे हिंदुस्थानातले लोक आळशी व राष्ट्राभिमानाला पारखे झाले आहेत. त्यांना स्वाभाविक प्रवृत्तीकडे वळविण्यासाठी ईश्वरी संकेतामुळेच येथे इंग्रजी राज्य व विद्या आली आहेत, असा न्या. रानडे प्रभृति लोकांचा विश्वास होता. हे राज्य नाहीसे होण्यालाही ईश्वरी साहाय्य होईल, कारण ते टिकून राहणे अस्वाभाविक आहे अशीही त्यांची श्रद्धा होती. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे उद्गार टिळकांनी काढले. यात 'जन्मसिद्ध' या विशेषणाला या श्रद्धेचा संदर्भ आहे ईश्वराने माणसाला, स्वभावतःच स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे, व स्वतंत्रता ही जन्मसिद्ध म्हणजे नैसर्गिक, स्वाभाविक हक्काची बाब आहे असे या उद्गारातील मर्म आहे.

'नैसर्गिकतेचे' तत्त्व आणि सुखवृद्धीचे तत्त्व यांना स्वीकारून आधुनिक युरोपमध्ये यंत्रयुगीन अर्थव्यवस्थेचा, खुल्या स्पर्धेचा व भांडवलदारी औद्योगिक विकासाचा पाया घातला गेला. खुल्या स्पर्धेच्या तत्त्वाचा खरोखर अवलंब केल्यास प्रत्येक व्यक्ती व प्रत्येक राष्ट्र जास्तजास्त सुखी होत जाईल अशी रिकार्डो प्रभृति क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांची शिकवण होती. मजुरांच्या संघटना 'स्वाभाविक' नाहीत व आयातनिर्यात मालावरील जकाती व निर्बंध 'कृत्रिम बंधने' आहेत, म्हणून या गोष्टी नसाव्यात असे त्यांचे प्रतिपादन होते. त्यांनाच जेव्हा असे दिसून आले की, 'खुल्या स्पर्धे'मुळे मजुरांची, त्यांतून अल्पवयीन मुलांची व स्त्रियांची अमानुष पिळवणूक होत आहे, तेव्हा मिलप्रभृति अर्थशास्त्रज्ञांना मजुरांबद्दल सहानुभूती वाटून सरकारने मजूरविषयक कायदे करावेत असे त्यांनी प्रतिपादन केले. फॉसेट (१८३३-१८८४) प्रभृति कित्येक ब्रिटिश विचारवंतांनी हिंदुस्थानात इंग्रजांनी चालविलेल्या

१. 'लोकहितवादी निबंधसंग्रह' सं. भ. का. प्रियोळकर, पृष्ठ १३३.

व्यापारी शोषणाचा निषेध केला व हिंदी जनतेच्या वाढत्या दारिद्र्याबद्दल चिंता प्रकट केली. रामकृष्णांच्या विवेचनामध्ये बर्कप्रभृती उदारमतवादी ब्रिटिश लेखकांच्या या सहानुभूतीची जाणीव दिसून येते. तसेच, खुल्या स्पर्धेच्या तत्त्वाला मुरड घालून हिंदी लोकांनी स्वदेशीच्या व्रताचे व संरक्षक जकातींचे साहाय्य घेऊन आपले उद्योगधंदे वाढवावेत अशी भूमिका रामकृष्णांनी घेतलेली आढळते. केवळ क्लासिकल स्पर्धावादी अर्थशास्त्राचा आंधळेपणाने स्वीकार न करता आपले आर्थिक धोरण आपण स्वतःचे हित पाहून ठरविले पाहिजे, व तसे ठरविण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळविले पाहिजे, ही गोष्ट रामकृष्णांनी १८४३ मध्ये प्रतिपादन केली, ही गोष्ट गौरवाने उल्लेखिण्यासारखी आहे.

रामकृष्ण यांच्या पुस्तकाचे या संग्रहात समग्र पुनर्मुद्रण केले आहे. त्यातील हिंदुस्थानच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा भाग अर्थशास्त्रीय दृष्टीने उपयोगाचा नाही व त्यात पुष्कळ चुकीची माहिती आहे, हे खरे. पण १८४३ मध्ये त्या इतिहासाबद्दल रामकृष्णांनी काय लिहिले आहे ते वाचण्याचे मराठी वाचकाला कुतूहल वाटेल. इंग्रज लेखकांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनादराने लिहिलेले वृत्तांत रामकृष्णांच्यासमोर होते, त्यांचा परामर्श घेऊन छत्रपतींच्या कर्तृत्वाचा गौरव रामकृष्णांनी केलेला आहे. यावरून त्यांची एकंदर स्वतंत्र व स्वाभिमानी वृत्ती या बाबतीतही चांगली निदर्शनास येते. त्यांनी भारतीय इतिहासाबद्दल जे एकंदर विवेचन केले आहे त्यात बराच भाग आज चुकीचा असा वाटेल, पण गुजराथमधील निंबोरी व सातारा या ठिकाणच्या राजांच्या विरुद्ध ब्रिटिश पोलिटिकल एजंटांनी केलेल्या कारवायांचा जो तपशील त्यांनी दिलेला आहे तो इतिहासाच्या अभ्यासकांनी मुळातच अभ्यासिण्यासारखा आहे. इतर माहितीदेखील त्या काळच्या इतिहासज्ञानाबद्दल संशोधकांची जिज्ञासा जागृत करणारी आहे.

## लोकहितवादी

गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) यांचा 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ रामकृष्णांच्या ग्रंथाप्रमाणे अगदी स्वतंत्रपणे लिहिलेला नाही, व देशबांधवांना नव्या विचारांसाठी व कृतींसाठी केवळ आवाहन देण्यासाठीही तो लिहिलेला नाही. हा ग्रंथ क्लिफ्ट[१] यांच्या ग्रंथाच्या आधारे रचला असे लोकहितवादींनी म्हटले आहे. क्लिफ्ट ह्यांच्या ग्रंथाचे नाव मात्र त्यांनी दिले नाही आणि एकंदर विवेचन

१. परिशिष्ट १ मध्ये क्लिफ्ट यांच्या ग्रंथाचे नाव आणि अनुक्रमणिका आम्ही देऊ शकलो याचे श्रेय ब्रिटिश कौन्सिल या संस्थेच्या मुंबई येथील कार्यालयातील ग्रंथपाल श्री. डी. के. देवनल्ली यांना आहे. London Bibliography of Social Sciences या संदर्भग्रंथात त्या ग्रंथाचा नुसता उल्लेख मिळाला व तो १८४६ मधील आवृत्तीचा आहे. परंतु कौन्सिलच्या लंडन येथील कार्यालयातील ग्रंथपालांकडे श्री. देवनल्ली यांनी चौकशी केली. त्यांनी कळविले की होरेस विल्यम क्लिफ्ट या ग्रंथकाराची चरित्रात्मक माहिती मिळत नाही व त्याच्या नावे एकच ग्रंथ आहे व तो ब्रिटिश म्यूझियममध्ये आहे. या ग्रंथावर 'कलकत्ता १८३५' असे छापलेले आहे. म्यूझियममधील प्रतीवरून ग्रंथाची विषयानुक्रमणिकाही लंडनच्या ग्रंथपालांनी पाठवून दिली. मिसेस मार्सेट यांच्याबद्दल चरित्रात्मक माहिती आणि त्यांच्या ग्रंथाबद्दल माहिती हीदेखील आम्हाला श्री. देवनल्ली यांच्या मदतीने Dictionary of National Biography, London या संदर्भग्रंथाच्या संपादकांकडून मिळाली. त्या माहितीचा उपयोग करण्याची परवानगी या संपादकांनी आम्हाला दिली. इतक्या तत्परतेने व कसोशीने आम्हाला या परदेशस्थ ग्रंथपालांनी व संपादकांनी मदत केल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत, व श्री. देवनल्ली यांच्या मदतीबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.—संपादक

पाहता हा ग्रंथ लिहितांना लेखकाने स्वतंत्रपणे तो लिहिला, फक्त क्लिफ्टच्या ग्रंथाप्रमाणे प्रकरणांचा व प्रतिपादनाचा क्रम राखला, असे अनुमान करावेसे वाटते, शेवटचे प्रकरण हिंदुस्थानबद्दलचे आहे व ते लेखकाचे स्वतःचेच आहे. (क्लिफ्टच्या ग्रंथाबद्दलची माहिती परिशिष्टात पाहावी.)

लोकहितवादींच्या ग्रंथाचे नाव पाहता 'पोलिटिकल एकॉनमी' या इंग्रजी संज्ञेला सार्थ प्रतिशब्द त्यांना सुचलेला दिसत नाही. १८४८-४९ मध्ये त्यांनी लिहलेले आर्थिक विषयावरील निबंध वाचून पाहिले तर त्यांतही 'अर्थशास्त्र' हा पारिभाषिक शब्द आढळत नाही. आज 'आर्थिक', 'अर्थशास्त्रीय' इत्यादि शब्द आपण सहज वापरतो, पण हे शब्द रामकृष्ण, लोकहितवादी व तिसरे लेखक हरि केशवजी यांच्याही लिखणांत आढळत नाहीत. यावरून असे अनुमान करता येते, की, 'अर्थशास्त्र' हा शब्द प्रथम चौथे लेखक कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी उपयोगात आणला व तो मग मराठीत रूढ झाला. याबद्दलचे जास्त विवेचन आम्ही पुढे करणार आहोत.

लोकहितवादींनी 'लक्ष्मीज्ञान' हे नाव ग्रंथाला देताना 'लक्ष्मी' म्हणजे 'वेल्थ' किंवा संपत्ती हा अर्थ मनात घेतलेला दिसतो. ग्रंथाच्या प्रारंभीच संपत्ती म्हणजे काय याचे विवरण त्यांनी केलेले आहे. संपत्ती म्हणजे पैसा, द्रव्य, सोने किंवा जडजवाहीर नाही, तर श्रमाने पैदा केलेल्या आणि मनुष्यांच्या गरजा भागविणाऱ्या वस्तू आणि या वस्तू निर्माण करण्यासाठी लागणारे भांडवल, कच्चा माल व उपकरणे, असा खुलासा ते करतात. समुद्रमंथनाचे विराट श्रम देवांनी व दानवांनी मिळून केले तेव्हा लक्ष्मी प्राप्त झाली, असा पुराणकथेचा अर्थ, नव्या संदर्भात आपल्या प्रमेयाला पोषक म्हणून त्यांनी लावला आहे. पुढील प्रकरणांतून, संपत्ती उत्पन्न करणारे वर्ग आणि नुसते संपत्तीचा व्यय करणारे अनुत्पादक वर्ग यांतील फरक त्यांनी विशद केला आहे. मध्ययुगीन वर्गरचनेवर आणि अनुत्पादक वर्गांवर क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांनीं धार धरली व भांडवलदारी अर्थव्यवस्थेला व नव्या वर्गरचनेला 'स्वाभाविक' आणि श्रेयस्कर उत्पादक व्यवस्था मानली. तीच भूमिका लोकहितवादींनी स्वीकारलेली दिसते. 'श्रम हेच संपत्तीच्या उत्पादनाचे एकमेव कारण आहे' हे क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांचे मत त्यांनी ग्राह्य धरले, त्यामुळे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडून होणारे द्रव्यशोषण म्हणजे या सत्ताधारी अनुत्पादक वर्गाने केलेले शोषण आहे असे त्यांच्या दृष्टीला वाटले. या शोषणाचा निषेध त्यांनी केलेला आहे व हिंदुस्थानची अर्थव्यवस्था या शोषणापासून मुक्त झाली पाहिजे असे या ग्रंथात व इतरत्र लिहिलेल्या निबंधांतून त्यांनी म्हटलेले आहे.

श्रम हेच संपत्तीचे मूळ व वस्तूंच्या मूल्याचे मोजमाप करण्याचे साधन आहे, हा सिद्धान्त ॲडाम स्मिथ, रिकार्डो प्रभृती अर्थशास्त्रज्ञांनी मांडला, कारण संपत्ती केवळ व्यापारी देवघेवीतून निर्माण होत नाही तर ती उत्पादन करावी लागते असे त्यांना आढळले. विनिमयाऐवजी उत्पादनावर त्यांनी लक्ष केंद्रित केले व उत्पादनाचे नियम हे निसर्गनियमांसारखे अटळ आहेत असेही त्यांनी मानले. संपत्तीच्या उत्पादनाप्रमाणेच तिची निरनिराळ्या वर्गांत वाटणी कशी होते हा प्रश्न महत्त्वाचा असतो. संपत्तीच्या वाटणीचे नियम नैसर्गिक नसून माणसांनी केलेले आहेत, कारण वाटणी ही वर्गरचनेप्रमाणे होते. आणि वर्गरचना ही नैसर्गिक आहे असे म्हणणे कठीण आहे. या गोष्टीची जाणीव क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांमधील मिलसारख्या उदारमतवाद्यांना १८४८च्या सुमारास स्पष्ट झालेली होती. उत्पादन आणि वाटणी यांचा विचार करताना उत्पादनापुरते 'नैसर्गिकतेचे' तत्त्व मानावयाचे आणि वांटणीपुरता विचार करताना वर्गव्यवस्थेची जाणीव आधाराला घ्यावयाची, अशी द्विधा वृत्ती मिलप्रभृतींच्या विवेचनात दिसू लागलेली होती.

ब्रिटनमध्ये व इतर युरोपीय देशांतही या काळामध्ये प्रत्यक्ष वर्गसंघर्ष चालू होता व क्लासिकल अर्थशास्त्रीय मताचा आधार घेऊन, विशेषतः श्रमाचा मूल्य-सिद्धान्त स्वीकारून, समाजवादी अर्थ-

शास्त्राला चालना मिळत होती. श्रम करणाऱ्या बहुजनसमाजाचे शोषण होत आहे, असा आक्षेप सेंट सायमनप्रभृती फ्रेंच समाजवादी, रॉबर्ट ओवेनप्रभृती ब्रिटिश समाजवादी व इतर विचारवंत यांच्याकडून रूढ भांडवलदारी अर्थव्यवस्थेवर घेतला जात होता. रामकृष्ण व लोकहितवादी यांनीही श्रमाचा मूल्यसिद्धान्त स्वीकारला व शोषणाची कल्पनाही स्वीकारली, पण हे शोषण देशातल्या श्रमिकांचेही होत आहे ही गोष्ट नजरेस येण्याइतकी स्वदेशी भांडवलदारी व्यवस्था येथे विकसित नव्हती. त्याऐवजी सर्व भारतीय जनतेचे इंग्रज राज्यकर्त्यांकडून साम्राज्यवादी पद्धतीने शोषण होत आहे एवढीच गोष्ट त्यांच्या ठळकपणे नजरेस आली व ती त्यांनी स्पष्टपणे मांडली.

अर्थशास्त्रीय प्रमेयांचे आकलन करून त्यांचे समग्र समाजव्यवस्थेच्या दृष्टीने उपयोजन करणे ही गोष्ट प्राप्त परिस्थितीमुळे कशी मर्यादित व सापेक्ष तऱ्हेने घडते, हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. श्रमानेच संपत्ती निर्माण होते हे तत्त्व मानणारे युरोपीय समाजवादी अर्थशास्त्रज्ञ भांडवलदारी विकासाच्या वास्तवाकडे पाहून मजूरवर्गाच्या शोषणाविरुद्ध भूमिका घेऊन समाजवादी शोषणरहित अर्थव्यस्थेचा आदर्श समाजापुढे मांडीत होते. पण परतंत्र वसाहतींच्या शोषणाकडे त्यांचे नीट लक्ष गेले नाही. समाजवादी असूनही साम्राज्यवादाचे शोषक स्वरूप अनेकांना दिसले नाही. मार्क्सने असे म्हटले आहे की साम्राज्यवादी शोषणाचे भान आहे की नाही ही कसोटी लावून तो खऱ्या समाजवादाची पारख करीत असे व या कसोटीला पुष्कळ समाजवादी उतरत नसत.

दुसरीकडे परतंत्र वसाहतीमधील रामकृष्ण विश्वनाथांसारखे लोक श्रमानेच संपत्ती निर्माण होते ही गोष्ट मान्य करूनदेखील मजूरवर्गाच्या शोषणाबद्दल उदासीन होते. कारण येथील इंग्रजी राज्यामार्फत होणारे शोषणच त्यांना ठळकपणे दिसत होते. एकंदर प्राप्त परिस्थितीचा परिणाम होऊन एकांगी व मर्यादित विचार कसा होत राहतो, याची वरील दोन्ही उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत. अर्थशास्त्रीय तत्त्वांची मांडणी, आकलन आणि उपयोजन यांच्यावर राजकीय परिस्थितीचा कसा महत्त्वाचा परिणाम होतो याचे विवेचन मिर्डाल यांनी आपल्या एका ग्रंथात केले आहे व ते या संदर्भात उद्बोधक ठरणारे आहे. (मिर्डाल, गुनार; 'दि पोलिटिकल एलेमेंट इन दि डेव्हलपमेंट ऑफ इकॉनॉमिक थिअरी'; रूटलेज ॲण्ड केगन पॉल, लंडन; इंग्रजी भाषांतर १९५३, मूळ ग्रंथ १९२९. विशेषतः पृष्ठे ५६–७९ पाहा.)

लोकहितवादी यांच्या 'लक्ष्मीज्ञान' या ग्रंथात 'उद्योगाचे विभाग' (म्हणजे आजच्या परिभाषेत 'श्रम-विभाग'), 'क्रयविक्रय', 'भांडवल', 'निर्भयपणा', (म्हणजे आजच्या परिभाषेत 'भांडवल-गुंतवणुकीचे धाडस'), 'किंमत', 'धारा, नफा व मजूरी' अशी प्रकरणे असून शेवटचे प्रकरण 'हिंदुस्थानाविषयी विचार' असे आहे. क्लासिकल मताचा स्वीकार करून आर्थिक व्यवहारांतील गुंतागुंतींचे मराठी वाचकांना सुबोध होईल अशा तऱ्हेचे विवेचन त्यांनी केलेले आढळते. रामकृष्णांच्या ग्रंथाशी लोकहितवादींच्या ग्रंथाची तुलना करता असे दिसते की, रामकृष्णांना त्या वेळच्या परदेशी व्यापाराचे व त्या मार्गाने होणाऱ्या शोषणाचे साक्षात ज्ञान होते. आणि हिंदुस्थानातील साधनसंपत्तीची त्यांना बरीच माहिती होती. निलगिरी पर्वतात सोन्याच्या खाणींचा शोध घेण्यासाठी ते स्वतः फिरले होते. कापडाची गिरणी काढण्यासाठी भांडवल जमा करून कंपनी काढण्याची कल्पना लोकांपुढे त्यांनी मांडली व एकंदरीत मुंबईच्या उदयोन्मुख उद्योगधंद्याच्या वातावरणात त्यांचे विचार बनलेले दिसतात. उलट, लोकहितवादींचे विचार अशा वातावरणाचा साक्षात परिणाम होऊन घडलेले दिसत नाहीत. महाराष्ट्रात व गुजरातेत न्यायखात्यातील नोकरी व त्या निमित्ताने सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आलेला अनुभव त्यांना फार खोल व विस्तृत होता. या अनुभवांचाच आधार घेऊन त्यांनी आपले विचार बनविले होते. पण व्यापारी व कारखानदारी उलाढालींपासून ते दुरावलेले दिसतात. ग्रामव्यवस्थेची त्यांना चांगली माहिती आहे. आधुनिक ज्ञानाची सामाजिक व आर्थिक

पुनर्रचनेसाठी केवढी गरज आहे, हे त्यांनी ओळखले आहे; या ज्ञानालाच ते 'पराक्रम' म्हणतात. क्लिफ्टच्या ग्रंथावरून अर्थशास्त्रीय प्रमेये समजावून घेऊन ती त्यांनी 'लक्ष्मीज्ञान'मध्ये मांडलेली आहेत. रामकृष्णांप्रमाणेच त्यांनीही यंत्रयुगीन, औद्योगिक मांडवलदारी विकासाचा मार्ग पुरस्कारिला आहे, हे त्यांच्या शेवटच्या प्रकरणावरून दिसते.

## हरि केशवजी

हरि केशवजी यांनी आपला 'देशव्यवहारव्यवस्था' हा ग्रंथ लिहिताना मिसेस मार्सेट[1] या इंग्रज लेखिकेच्या ग्रंथाचा 'कोठे भाषांतर, कोठे भावार्थ' असा उपयोग केला आहे, तसेच जॉन स्टुअर्ट मिलच्या 'पद्धतीस बहुत्येक प्रकरणी अनुसरून' आपला ग्रंथ लिहिला आहे. मिलचा 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ १८४८ मध्ये प्रसिद्ध झाला, त्याचा प्रत्यक्ष उल्लेख लेखक करीत नाही, परंतु त्याचाच आधार त्याने घेतलेला दिसतो.

मिसेस मार्सेट[1] (१७६९–१८५८) ही मूळची स्वित्झर्लंडमधली. ती इंग्लंडमध्ये आली व तिने मार्सेट या इंग्रज डॉक्टरशी लग्न केले. तिने निसर्गविज्ञान व समाजविज्ञान या क्षेत्रांतील विषयांवर ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने सोपी पुस्तके लिहिली. ही पुस्तके फार लोकप्रिय झाली. तिने १८१६ साली 'कॉन्व्हर्सेशन्स ऑन पोलिटिकल एकॉनमी' हे पुस्तक लिहिले व त्याची मेकॉले यांनी प्रशंसा केली. हिंदुस्थानात हे पुस्तक मान्यता पावण्याचे हे एक कारण असावे. गुरु व शिष्य (गोपाळ) या दोघांतील संवादरूपाने अर्थशास्त्राचे सुलभ निरूपण हरि केशवजींनी केले आहे, त्यात मार्सेटचीच संवादपद्धती अनुसरलेली आहे. या पुस्तकाचे काम हरि केशवजींनी काही काळ केल्यानंतर त्यांना विश्वनाथ नारायण मंडलिक (८ मार्च १८३३-९ मे १८८९) यांची मदत देण्यात आली. मंडलिक हे त्या वेळी एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्ये 'पहिल्या प्रतीचे विद्यार्थी' होते. त्यांचे वय त्यावेळी एकवीस, आणि हरि केशवजींचे वय पन्नाशीचे होते. वयात एवढा फरक असून या दोघांनी सहकार्याने हे ग्रंथलेखनाचे काम केलेले दिसते. ज्ञानप्रसाराच्या कार्यात विद्यापीठीय शिक्षण नसलेली व्यक्ती आणि नवीन पद्धतीने शिकत असलेली तरुण व्यक्ती यांच्यातील सहकार्य तेव्हा कसे होऊ शकत होते, याचे हे उदाहरण म्हणून सांगता येईल. (मंडलिक यांनी पुढे 'लक्ष्मीशास्त्र' हा ग्रंथ आणि 'व्यवहार-शास्त्राचे उद्देश आणि लाभ' इत्यादि अर्थशास्त्रीय लेख लिहिले आहेत. परंतु धर्मशास्त्र व कायदा यांकडे त्यांनी आपले मुख्य लक्ष वळविलेले दिसते).

हरि केशवजींच्या ग्रंथाची एकंदर २८० पृष्ठे असून, त्यात मिलच्या ग्रंथाच्या सर्व प्रकरणांतील विषय आलेले आहेत. मिलच्या ग्रंथाची शब्दसंख्या सुमारे १,६६,००० आहे, तर हरि केशवजींच्या ग्रंथाची सुमारे ८०,६०० आहे. तेव्हा त्यांनी सुमारे निम्मा संक्षेप केलेला दिसतो. हा संक्षेप करून, त्यांनी आपला संवादरूप ग्रंथ रचलेला आहे. या पुस्तकातील संवादांमध्ये शिष्य गोपाळ याचे प्रश्न व एकंदर बोलणे जिव्हाळ्याचे तर आहेच, शिवाय चौकसपणाबरोबर त्यात धीटपणा व स्वतंत्रपणे विचार करण्याची धडपड दिसते. उत्तरे देताना गोपाळाच्या प्रश्नांची आणि विधानांची पुस्तकी पांडित्याने वासलात लावताना गुरु मुळीच आढळत नाहीत. शिष्याच्या धिटाईचेही ते कौतुक करतात व त्याची चूक परखडपणे त्याला समजावून देतात. गुरुशिष्य संवादाला बेंगरूळ रूप येऊ शकते, पण या ग्रंथामधील संवादात ज्ञान देणारा व घेणारा यांची खरी समरसता आहे, व विषयज्ञानाचा ओघ जिवंतपणे पुढे जात आहे, असा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य या संवादांत आहे.

---

१. परिशिष्ट १ मध्ये मार्सेटवरील टीप पाहा.

'देशव्यवहारव्यवस्था' हे नाव ग्रंथाला देण्यात हरि केशवजी यांनी काय व कसा विचार केला असावा ? 'पोलिटिकल एकॉनमी' हे शास्त्र त्या वेळी आपल्याला नवे होते व नव्या ज्ञानाबद्दल वाटणाऱ्या उत्साहाने हरि केशवजी व इतर लेखक याबद्दल लिहीत होते. ब्रिटिश ग्रंथकर्त्यांच्या पावलांवर पाऊल टाकताना नव्या शोधाचा आनंद त्यांना होत होता. 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ वाचताना लोकहित-वादींच्या प्रतिपादनातही हा उत्साह व आनंद जाणवतो. यात भरीला या ग्रंथलेखकांच्या मनात ही एक जाणीव नांदताना दिसते की आपण मराठी भाषेत नव्या कल्पना नव्या शब्दांमध्ये मांडीत आहोत. नव्या शब्दांचा शोध या लेखकांनी मोठ्या तत्परतेने व कसोशीने केलेला दिसतो. या दृष्टीने 'देशव्यवहार-व्यवस्था' या संज्ञेकडे पाहणे लाभदायक ठरेल. 'लक्ष्मी', 'संपत्ति', 'द्रव्य', 'धन' वगैरे शब्दांनी आर्थिक व्यवहारांचा व घडामोडींचा निर्देश त्या काळी होत असला पाहिजे. 'आर्थिक' ही संज्ञा मात्र त्या वेळच्या लिखाणात कोठे आढळत नाही. तेव्हा प्रचारातील 'धन', 'द्रव्य' इत्यादि शब्द घेऊन 'पोलिटिकल एकॉनमी' या संज्ञेसाठी पर्यायी शब्द बनविणे हरि केशवजींना शक्य होते. तसे त्यांनी केलेले मात्र दिसत नाही.

याचे कारण ॲडाम स्मिथ यांच्या 'वेल्थ ऑफ नेशन्स' या प्रख्यात ग्रंथाच्या नावापासून त्यांनी स्फूर्ती घेतलेली दिसते, तसेच 'पोलिटिकल एकॉनमी' या संज्ञेतील 'पोलिटिकल' या शब्दावर त्यांनी विचार केलेला दिसतो. हिंदुस्थान देश पूर्वी श्रीमंत होता व आता दरिद्री झाला आहे, एखादा देश सधन का होतो व दरिद्री कसा होतो ? असा प्रश्न गोपाळ विचारतो व त्याला गुरू उत्तर देतात, असा प्रसंग त्यांनी आपल्या प्रस्तावनेत प्रारंभीच घेतला आहे. तुझ्यासारख्या 'स्वदेशहितेच्छु' मुलाला हे नवे शास्त्र अवगत करून घेतले पाहिजे, असे गुरू म्हणतात. हरि केशवजींच्या ज्ञानप्रसाराच्या इच्छेमागे ही देशहिताची प्रबळ भावना आहे. त्या दृष्टीने 'देशांच्या संपत्तीचे' शास्त्र आपण सांगत आहोत अशा भावनेने त्यांनी शास्त्राचे नाव शोधले. त्याकाळी 'नेशन' या अर्थी 'राष्ट्र' हा शब्द फारसा प्रचारात नसून 'देश' हाच शब्द रूढ होता, व संस्कृत परंपरेतही 'राष्ट्र' हा शब्द राजाचे 'राज्य' या अर्थीच जास्त उपयोगात आणला जाई. तेव्हा 'देश' शब्दापासून हरि केशवजींनी प्रारंभ केला.

दुसरा शब्द 'व्यवहार', आजच्याप्रमाणे त्या काळीही 'व्यवहार' शब्दाचा अर्थ व्यापक होता. माणसामाणसांतल्या सर्व प्रकारच्या संबंधांतून होणाऱ्या वर्तनाला व्यवहार म्हणत. परंतु आज तितकीशी न जाणवणारी व न उमगणारी एक मर्यादा 'व्यवहार' शब्दाला होती. ती पारंपरिक संस्कृतभाषिक विवेचनांमधून मराठीत आलेली दिसते. 'व्यवहारा'मध्ये धार्मिक विधिनिषेधांना संभाळून केलेले वर्तन आणि पारमार्थिक साधना यांचा सहसा अंतर्भाव होत नसे; नैतिक वर्तनालाही 'आचरण' असा शब्द वापरीत. धर्म व अध्यात्म व नीती यांचे प्रांत सोडून ऐहिक बाबतींपुरते वागणे म्हणजे 'व्यवहार' असा त्या शब्दाचा वापर होई. यामध्ये सोन्याचांदीचे, गहाणखरेदीचे, पैशाअडक्याचे व्यवहार सामावले जात. या दृष्टीने, 'देशव्यवहार' या जोडशब्दाची योजना हरि केशवजींनी नव्याने केलेली दिसते. 'देश' हा राजकीय घटक घेऊन देशातील उद्योग, व्यापार, संपत्ति यांच्यासंबंधीचा विचार ॲडाम स्मिथच्या ग्रंथात आहे व त्याला अनुसरून 'देशव्यवहारा'चे शास्त्र म्हणजे 'पोलिटिकल एकॉनमी' असे त्यांनी मानले, ते योग्यच होते.

हरि केशवजी यांच्या काळी 'व्यवस्था' हा शब्द 'शास्त्र' या अर्थी वापरला जाई. शिवाय व्यवहारातील नियमबद्धतेची कल्पना येण्यासाठी 'व्यवस्था' शब्दाची योजना त्यांनी केली असावी. मानवी व्यवहारांमागे 'नैसर्गिकते'चे तत्त्व गृहीत धरण्याची कल्पना युरोपात रूढ झालेली होती व ती आपल्याकडेही स्वीकारली जात होती. हरि केशवजींच्या ह्या नैसर्गिकतेच्या गृहीत तत्त्वाची जाणीव

अनेक ठिकाणी प्रकट होते. उदाहरणार्थ, पूर्वभागसंवाद ३ यामध्ये एक ठिकाणी गोपाळा म्हणतो की मेहनतीवांचून "अन्न मिळते तर केवढा आनंद होता!" ईश्वराने रचलेल्या सृष्टीतील "चमत्कारांचा विचार करावा, ते पाहून आनंद करावा याच कामाचे पाठीस सारेजण लागते." यावर गुरू म्हणतात, "असे व्यापार व्यवहार करायास प्रकृतिसिद्ध अनुकूलता उपयोगी असता तिचा विपरीत अर्थ करतोस. असे आहे, सृष्टीचा जो क्रम चालत आला आहे तो लक्षात ठेऊन विचार करावा. त्याहून वेगळ्या विचाराकडे बुद्धि जाऊ लागली असता त्यापासून भय आहे. असे आहे की सर्वज्ञ जो ईश्वर त्याकडून जीवांचे पालनाकरिता जी जी नेमणूक घडली आहे तीच नीट व चांगली, कळले ........ मेहनत केल्यावाचून अन्न मिळू लागले तर कसे काय होईल हे स्पष्ट समजण्यासारखे दिसते. अरे अन्नाकरिता जर मेहनत करावी लागत नसती तर ज्ञानी होणे दूरच राहते, अवघे लोक रानटी पशूसारखे होते." (जाड टाइप मुळात नाही.—दि. के. बे.)

प्रकृतिसिद्ध अशी काही व्यवस्था साऱ्याच सृष्टीच्या बुडाशी आहे व म्हणून माणसाला मेहनत करावी लागल्यामुळे त्याच्या स्वाभाविक गुणांचा विकास सतत होत आहे, अशीही नवीन श्रद्धा हरि केशवजींच्या काळी सुशिक्षितांच्या मतांत रुजत होती. ईश्वरानेच ही व्यवस्था केली आहे, असाही भाव त्यांच्या मनात होता व त्यामुळे पारंपरिक आस्तिक श्रद्धेशी ही नवी श्रद्धा बेमालूम सांधली जात होती. यामुळे 'व्यवस्था' शब्दाला एक जुने आणि नवेही वजन प्राप्त झालेले होते. तो शब्द शेवटी जोडून हरि केशवजींनी 'देशव्यवहारव्यवस्था' ही संज्ञा तयार केली.

त्यांच्या ग्रंथात मिलच्या ग्रंथातील सर्व प्रकरणे आलेली आहेत, पण त्यांना निम्म्याहून अधिक संक्षेप करावा लागला आहे, हे वर सांगितलेच. संवादपद्धतीसाठी विवेचन सोपे व प्रवाही करताना, व ठिकठिकाणी उदाहरणे देताना, तात्त्विक विषयाला अधिकच संक्षेप द्यावा लागला आहे. असे असूनही हिंदुस्थानच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असे जे विषय आढळतील त्यांचा ऊहापोह लेखकाने आवर्जून केलेला दिसतो. उदाहरणार्थ, उपजीविकेच्या साधनांच्या मानाने व भांडवलाच्या मानाने लोकसंख्या वाढण्याचे भय त्यांनी लक्षात घेतले आहे. मिलच्या आधाराने त्यांनी या विषयाचे चांगले विवेचन केलेले आढळते. त्या काळी माहीत असलेला कुटुंबनियोजनाचा उपाय म्हणजे लग्न उशीरा करणे एवढाच. त्याचा त्यांनी पुरस्कार केलेला आहे. कृष्णशास्त्रींच्या ग्रंथातही हा लोकसंख्येचा प्रश्न आला आहे, पण हरि केशवजींचे विवेचन तुलनेने जास्त जिव्हाळ्याने केलेले वाटते. या प्रश्नावर 'ज्ञानप्रसारक' या नियतकालिकात न्यायमूर्ती रानडे यांनी 'प्रजावृद्धि व तिजपासून होणारे परिणाम' हा मराठी लेख १८६५ साली लिहिला व त्याच्या आधीच 'थिअरी ऑफ पॉप्युलेशन' यावर 'ज्ञानप्रसारक' सभेत इंग्रजीत व्याख्यान दिले. आज कुटुंबनियोजनाच्या प्रश्नावर लोकांचे लक्ष वेधले गेले आहे, अशा वेळी हरि केशवजी, चिपळूणकर व रानडे यांनी या विषयासंबंधी केलेल्या लिखाणांचा तुलनात्मक व ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

## कृष्णशास्त्री चिपळूणकर

'अर्थशास्त्रपरिभाषा' हा प्रस्तुत संग्रहातील शेवटचा, चौथा ग्रंथ. १८४३ मध्ये रामकृष्णांनी लिहिलेल्या ग्रंथानंतर १८५५ साली म्हणजे बारा वर्षांनी हा ग्रंथ कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी लिहिला. या अवधीत, आर्थिक प्रश्नांकडे व प्रमेयांकडे पाहण्याच्या दृष्टीत मूलतः फरक झालेला नव्हता. हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या परतंत्र आहे, म्हणून त्याच्या आर्थिक विकासाचा मार्ग बंद झालेला असून देशाच्या संपत्तीचे इंग्रजांकडून तीव्र शोषण होत आहे, आर्थिक विकासाचे शास्त्र व तंत्र आपण शिकले पाहिजे आणि देशाचे दारिद्र्य व पारतंत्र्य यांचा नाश केला पाहिजे—ही मूलभूत धारणा रामकृष्णांची होती

तशीच चिपळूणकरांची होती. या दृष्टीनेच ज्ञानप्रसाराचे व्रत या सर्व लेखकांनी अंगिकारले होते. मराठी भाषेतून ज्ञानाचा प्रसार करणे अवघड आहे किंवा अशक्य आहे अशी पुसट शंकाही त्यांच्यापैकी कोणाच्या मनात आलेली दिसत नाही. हे जरी खरे तरी या बारा वर्षांत काही फरक झालेले दिसतात. त्यांना फरक न म्हणता प्रगतीही म्हणता येईल. प्रगती या दृष्टीने झाली की रामकृष्णांच्या लेखनात प्रत्यक्ष घडामोडींचे निवेदन, शोषणाबद्दलचा संताप व उपाययोजनेबाबत पोटतिडीक दिसून येते. मुंबईसारख्या शहरातील व्यापारी व कारखानदारी घटनांचा साक्षात परिचय दिसतो. पुढील ग्रंथकारांमध्ये प्रत्यक्षाकडून तात्त्विक प्रमेयांकडे वाटचाल दिसतो. या क्रमात चिपळूणकर हे शास्त्रीय प्रमेयांच्या मांडणीतच पुरते लक्ष घालताना दिसतात. त्यांनी हरि केशवजींची संवादपद्धती स्वीकारली नाही व सरळ शास्त्रीय प्रतिपादन केले आहे,

न्यायवैशेषिकादि पारंपरिक संस्कृत शास्त्रे शिकून त्यांची भाषा व शैली जुन्या शास्त्रांतील विवेचनपद्धतीनुसार बनली होती, आणि 'अर्थशास्त्रा'ची मांडणी करताना त्यांना संस्कृत शास्त्रपरंपरा व आधुनिक ज्ञानपरंपरा यांचा समन्वय करावा लागला. ग्रंथाचा प्रारंभ करताना त्यांनी म्हटले आहे की 'अर्थशास्त्राचा विषय धन होय'. परंतु 'धन' शब्दाचा फार व्यापक अर्थ ते घेतात व उपोद्घाताच्या शेवटी म्हणतात, "—ह्याप्रमाणे सर्वांशी (म्हणजे पूर्णतः—दि. के. बे.) इहलोकच्या व काही अंशी परलोकच्या, सौख्यास कारणीभूत जे धन, तत्प्रतिपादक शास्त्राचा विचार करून त्यांतील मुख्य सिद्धांतांचे ज्ञान करून घेणे हे सर्वांस थोडेबहुत आवश्यक आहे." येथे 'धन' या शब्दाचा अभिप्राय 'सर्वांशी इहलोकाच्या सौख्यास कारणीभूत होण्याच्या गोष्टी' असा ते घेतात. 'अर्थशास्त्र' ही परंपरेमध्ये 'राजनीती'साठी वापरलेली संस्कृत संज्ञा ते या नव्या शास्त्राला (म्हणजे 'पोलिटिकल इकॉनमी'ला) वापरतात.

हे नवे शास्त्र 'एम्पिरिकल' आहे याची जाणीव ठेवून हरि केशवजींनी ठिकठिकाणी म्हटले आहे की 'अनुभवसहित ज्ञान व लक्षपूर्वक अवलोकन' यांच्या आधारे ह्या शास्त्रातील प्रमेये मांडलेली आहेत. ही जाणीव चिपळूणकरांनाही पुरतेपणी आहे. ते म्हणतात की 'अर्थशास्त्रात ज्या गोष्टींचें निरूपण केले आहे त्या गोष्टी नेहमीच्या व्यवहारातील आहेत', आणि 'व्यवहारातल्या गोष्टींची यथार्थ उपपत्ति' समजणे आवश्यक आहे. या शास्त्राच्या रचनेत व प्रतिपादनात अनुभवाचा आधार आवश्यक आहे याची जाणीव ठेवून ते नम्रतेने स्वतःबद्दल म्हणतात की "प्रकृत ग्रंथ लिहिणारास ह्या देशातील व्यापाराची, शेतकीची व राज्यव्यवस्थेची, विशेष तपशीलवार माहिती असती, तर ह्या ग्रंथाचे ठायी व्यावहारिक उपयोगिता विशेष येती, हे ग्रंथ करणारा संतोषाने कबूल करतो." (प्रस्तावना)

नव्या स्वरूपाच्या आर्थिक घडामोडींच्या केंद्रांशी साक्षात संबंध दुरावून पंडिती सिद्धांतप्रवणतेकडे झालेली बारा वर्षांतील ही वाटचाल म्हणजे प्रगती होय असे वर म्हटले आहे. ते एका दृष्टीने खरे असले तरी अर्थशास्त्रासारख्या व्यावहारिक शास्त्राच्या बाबतीत तिला निखालस प्रगती म्हणता येणार नाही. ॲडाम स्मिथ, रिकार्डो, मार्क्स व अलीकडच्या काळात कीन्स यांच्या उदाहरणांवरून म्हणता येईल की अर्थशास्त्राच्या प्रगतीला अर्थशास्त्रीय घडामोडींशी नव्हे, एकंदर समाजाच्या राजकीय स्थित्यंतरांशी, प्रत्यक्ष व कार्यप्रवण संबंध असणाऱ्या विचारवंतांची कामगिरी मोलाची ठरते. दादाभाई नवरोजी व न्यायमूर्ती रानडे यांची उदाहरणेही या बाबतीत अशीच लक्षात येणारी आहेत. तेव्हा केवळ सैद्धांतिक शास्त्रीय विचारांकडे होणारी वाटचाल ही प्रगतीला नेहमी उपकारकच ठरते असे म्हणता येत नाही. १८४३ ते १८५५ या काळात अर्थशास्त्रीय विचारांचा नव्याने येथे परिचय होत होता, आणि मराठी भाषेतून हा परिचय करून देण्याचे मोलाचे कार्य रामकृष्णांपासून चिपळूणकरांपर्यंत सर्वांनी केले. या दृष्टीने ह्यांच्या कार्यांमध्ये एक सातत्य व विकास दिसतो एवढेच मर्यादित अर्थाने

आपण म्हणू शकतो. सन १८५५ च्या पुढे न्यायमूर्तींच्या काळापर्यंत अर्थशास्त्राच्या क्षेत्रात मराठीमध्ये मोलाचे लेखन झालेले दिसत नाही, हे या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे.

चिपळूणकरांनी आपला ग्रंथ मिलच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी' या ग्रंथाच्या आधाराने लिहिला आहे, ह्या ग्रंथात मिलच्या ग्रंथातील फक्त 'प्रॉडक्शन' या पहिल्या भागातील विषयाचे विवेचन आहे. सुमारे ४०,००० शब्दांत, मिलच्या १९४ पृष्ठांचा (सुमारे ७७,६०० शब्दांचा) संक्षेप त्यांनी केलेला आहे. हा संक्षेप करताना त्यांनी पुढील धोरण ठेवलेले दिसते : "मूळ ग्रंथात कितीएक असे विचार आहेत की ते केवळ युरोप खंडास लागू आहेत." ते विचार त्यांनी घेतलेले नाहीत आणि "इंग्लंडच्याच संबंधीची उदाहरणे होती ती बदलून मराठी वाचणारास सहज समजण्याजोगी इकडील उदाहरणे योजिली आहेत." शास्त्रीय शब्दांसाठी "पुष्कळ ठिकाणी कठीण कठीण संस्कृत शब्दांचा प्रयोग करणे ग्रंथकारास भाग पडले" व त्यामुळे "काही ठिकाणी दुर्बोधता" आली असेल हे जाणवून वाचकांनी दोष देऊ नये अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

आर्थिक आणि राजकीय व्यवहारांची क्षेत्रे एकमेकात गुंतलेली आहेत, परंतु तरी त्या दोन क्षेत्रांचा वेगवेगळा विचार करावयास हवा, ही कल्पना आपल्या भारतीय परंपरागत विचारांत तशी स्पष्ट नव्हती. किंबहुना 'वार्ता' (म्हणजे शेती, गोरक्षण व व्यापार) हे एक राजनीतीचे अंग, केवळ एक राजविद्या, म्हणून मानले गेले होते. शेतकरी, गोपालन करणारे आणि व्यापारी यांना धनोत्पादनाच्या दृष्टीने महत्त्व होते खरे, पण समाजात क्षत्रिय व ब्राह्मण यांनाच खरे श्रेष्ठत्व होते, राजा व त्याचा पुरोहित किंवा मंत्री यांच्याभोवती साऱ्या समाजाचे राजकीय जीवन फिरत होते. युरोपातदेखील राजसत्तेच्या व सरंजामदारीच्या युगात ही परिस्थिती होतीच. व्यापारी वर्गाला व्हेनिससारख्या व्यापारी नगरांतून सत्ता मिळाल्यानंतरच आर्थिक व्यवहारांना हळूहळू स्वायत्त महत्त्व प्राप्त झाले, व रेनायसाँ व रिफॉर्मेशन यांच्या काळानंतर आर्थिक व्यवहाराच्या स्वतंत्र शास्त्राच्या उदयाला अनुकूल स्थिती प्राप्त झाली.

हिंदुस्थानात इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यानंतर देशी राजेरजवाडे नाममात्र झाले. राज्य इंग्रजांचे आणि आर्थिक सत्ताही त्यांच्याच हाती, हे दृश्य आपल्या डोळ्यांपुढे उभे राहिले. यामुळे असे दिसते की रामकृष्णांनी 'पोलिटिकल एकॉनमी' म्हणजेच 'राज्यव्यवस्थेचे शास्त्र' असे मानले. पुढे हरि केशवजींच्या वेळेपर्यंत राजकीय व आर्थिक क्षेत्रांतील भिन्नपणा लक्षात आलेला दिसतो. हरि केशवजी आपल्या ग्रंथात म्हणतात की, "एकटे द्रव्यापासून लोकांस सुख होत नाही", व म्हणून "चांगला धर्म, मार्ग, चांगले आचरण, शहाणे राज्यकर्ते, चहूकडे ज्ञान झालेले, असे जेव्हा होते तेव्हा लोक सुखी होतात. हे लाभ जर झाले नाहीत तर एकट्या संपत्तीपासून सुख होणार नाही. असो. या गोष्टी प्रसंगी मात्र काढाव्या. हे प्रकरण, ज्या शास्त्रात **राज्यव्यवस्था व नियमरचना** सांगितली आहे त्या शास्त्रात आहे. आता आपले लक्ष देशव्यवहारव्यवस्थेकडे लागले आहे. हा त्या शास्त्राचा एक भाग होय." (जाड टाइप मुळात नाहीत.—दि. के. बे.)

वरील उताऱ्यावरून असे दिसते की 'पोलिटिकल एकॉनमी' (म्हणजे 'देशव्यवहारव्यवस्था') हा 'पोलिटिकल फिलॉसफी' (म्हणजे आजचे 'पॉलिटिकल सायन्स') या शास्त्राचा एक भाग आहे असे हरि केशवजी मानीत होते. 'राज्यव्यवस्था व नियमरचना' हे संयुक्त शास्त्र जास्त व्यापक व सर्वंकष आहे असे हरि केशवजींनी मानलेले दिसते.

कृष्णशास्त्रींनी 'अर्थशास्त्र' ही नवीच संज्ञा 'पोलिटिकल एकॉनमी' या अर्थाने वापरली; आणि 'राज्यव्यवस्था', 'लक्ष्मीज्ञान' आणि 'देशव्यवहारव्यवस्था' या पूर्वीच्या संज्ञा वापरल्या नाहीत. ही नवी संज्ञा त्यांनी का वापरली असावी याचे विवेचन यापुढे केलेले आहे. चिपळूणकरांनी ग्रंथाच्या प्रस्तावनेत

आपल्या ग्रंथाला 'अर्थशास्त्र-परिभाषा'[1] हे नाव का दिले याची कारणे दिलेली नाहीत. परंतु या नावाकडे आपण विशेष लक्ष पुरविणे इष्ट होईल. 'अर्थशास्त्र' हा शब्द गेल्या शंभर वर्षांत मराठीत इतका अंगवळणी पडला आहे की फार पूर्वीपासून वापरात असलेला शब्द चिपळूणकरांनी उचलला अशी कल्पना सहज होते. पण त्यांच्यापूर्वी हा शब्द या अर्थाने कोणी मराठीत वापरलेला दिसत नाही. अव्वल इंग्रजीच्या काळातील त्यांच्या पूर्वीचे लेखक 'लक्ष्मीज्ञान', 'देशव्यवहारव्यवस्था', 'संपत्ति-विवेचन' इत्यादि शब्द वापरतात. 'ज्ञानप्रसारक'मधील अर्थशास्त्रीय लेखांच्या मथळ्यांतून 'अर्थशास्त्र', 'आर्थिक स्थिति', आर्थिक व्यवहार' असे शब्द आढळत नाहीत. इंग्रजपूर्व काळातील दोनशे वर्षांतही, असे शब्द वापरले गेले नसावेत असा कयास करता येतो, कारण य. न. केळकरांनी[2] तयार केलेल्या 'ऐतिहासिक शब्दकोशांत' ते शब्द दिलेले नाहीत. संस्कृतमध्ये 'धन' 'संपत्ति', 'द्रव्य' इत्यादि शब्द येतात, व 'अर्थ' शब्दाचाही संपत्ती या अर्थाने कोठेकोठे वापर झालेला आढळतो. पण 'अर्थशास्त्र' या संस्कृत संज्ञेचा अर्थ मात्र अगदी वेगळा आहे. 'अर्थशास्त्र' म्हणजे 'राजनीति' किंवा 'दंडनीति' असा निश्चित परंपरागत अर्थ आहे, व तो कौटिल्याच्याही पूर्वीपासून रूढ झालेला आहे. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचा उल्लेख एक तर 'राजनीति' सांगणाऱ्या ग्रंथातून येतो, किंवा दशकुमारचरितासारख्या वाङ्मयीन ग्रंथात आला तरी तो 'राजनीति' याच अर्थाने येतो. (दशकुमारचरित, उच्छ्वास ८ पाहा.) पुढे, अमात्यांनीही मराठीमध्ये राजाच्या उपयोगासाठी लिहिलेल्या ग्रंथाला 'राजनीति' ही संज्ञा वापरलेली आढळते.

यावरून असे अनुमान करता येते की 'पोलिटिकल एकॉनमी' या शास्त्राला 'अर्थशास्त्र' ही संज्ञा चिपळूणकरांनी दिली तेव्हा त्यांना त्या शब्दाचा 'राजनीति' हा परंपरागत अर्थ नीट माहित होता. व तरी त्यांनी तो शब्द नवा आशय लक्षात घेऊन वापरला. असे करताना, जुना संस्कृत शब्द घेऊन त्याला अगदी वेगळ्याच अर्थाने मराठीत रूढ करण्याचा प्रयोग त्यांनी केला असे म्हणता येईल, पण चिपळूणकरांसारखा साक्षेपी विद्वान असे करील हे अनुमान अयोग्य होईल. याबाबतीत असे घडलेले दिसते की, पुढील दोन पोषक बाबी नीट विचारात घेऊन चिपळूणकरांनी 'अर्थशास्त्र' शब्दाची योजना रास्त मानलेली असावी :

(१) कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'त 'राजनीति'चा व्यापक विचार आहे. राज्यातील प्रजेचा आर्थिक योगक्षेम, सामाजिक स्थैर्य व राज्याविषयी आस्था यांवरच राजाचे सामर्थ्य व संपन्नता अवलंबून असते, ही दृष्टी ठेवून राजाने कसे वागावे, आणि इतर राज्यांशी संबंध कसे ठेवावे, हे सांगणारे शास्त्र म्हणजे 'अर्थशास्त्र' असे ढोबळमानाने म्हणता येईल. त्या काळच्या केवळ आर्थिक व्यवहारांचा विचार 'वार्ता' या राजविद्येत कौटिल्याने केलेला आहे, व ही विद्या 'अर्थशास्त्रा'चे केवळ एक अंग मानले आहे.

चार पुरुषार्थांच्या कल्पनेत 'धर्म', 'अर्थ', 'काम' आणि 'मोक्ष' असे चार 'अर्थ' म्हणजे मनुष्याला उचित अशी उद्दिष्टे मानलेली आहेत. 'मोक्ष' हा परमार्थ आहे, तो ऐहिकाच्या पलिकडचा व विरळा असा 'अर्थ' आहे. 'स्वर्ग', 'पापपुण्य', अशा कल्पनांशी 'धर्म' निगडित आहे, तसेच 'विवाह', 'दायभाग' इत्यादि बाबतीत नियम सांगण्याचा अधिकारही 'धर्मशास्त्रा'कडे आहे. 'कामशास्त्रा'कडे सुरतविषयक उद्दिष्टांचे व नियमांचे क्षेत्र आहे. तेव्हा 'धर्मशास्त्र' व 'कामशास्त्र'

---

१. 'परिभाषा' म्हणजे एखाद्या शास्त्रातील विशिष्ट पारिभाषिक शब्दांचा संग्रह, असे आपण मानतो. पण चिपळूणकरांच्या काळी, 'परिभाषा' या शब्दाचा वापर 'मूलतत्त्वे' या पारंपरिक अर्थाने केला जात होता.

२. 'ऐतिहासिक शब्दकोश', तीन खंड, य. न. केळकर, १९६२.

या दोहींच्या क्षेत्रांतून वगळलेले सर्व ऐहिक जीवन 'अर्थशास्त्रा'त समाविष्ट आहे. म्हणूनच केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक व राज्यविषयक व्यवहारांचे विवेचन कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रांत' येते. राजाच्या मार्गदर्शनासाठी ते प्रामुख्याने विवेचिले गेल्यामुळे त्याला 'राजनीति' ही संज्ञाही रास्त ठरते. हा सारा विचार चिपळूणकरांच्या मनात आल्यामुळे 'अर्थशास्त्र' संज्ञेची ही परंपरागत सढळ व्याप्ति त्यांनी गृहीत धरली असावी.

(२) ही व्याप्ति मनात धरून त्यांनी मिल्चा 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ पाहिला, तेव्हा मिलनी लिहिलेल्या प्रस्तावनेतच त्यांना एक महत्त्वाची बाब जाणवली असावी. मिल यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे की पोलिटिकल एकॉनमीचा विषय म्हणजे विलगपणे केवळ आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण हा नाही. अॅडाम स्मिथ यांनी 'आपल्या शतकाच्या तत्त्वविचारांशी सुसंगत अशा तऱ्हेने' समकालीन आर्थिक घटनांची मीमांसा केली. 'समकालीन सामाजिक ध्येयांशी आर्थिक घटनांचा समन्वय करूनच' कोणत्याही काळी 'पोलिटिकल एकॉनमी'चा अभ्यास करावयास हवा, असे मत मिल यांनी मांडले आहे.

पूर्वीच्या काळात, राजा आणि प्रजा यांचे मिळून राज्य होत होते. (राष्ट्र हा शब्द राज्य या अर्थीच तेव्हा वापरला जात होता.) आता, नवीन काळात 'देश' (नेशन) ही संज्ञा 'राज्या'च्या जागी आली व राजाचे महत्त्व कमी होऊन प्रजेला प्राधान्य आले. 'वेल्थ ऑफ नेशन्स' या नांवाचा ग्रंथ अॅडाम स्मिथनी १७७६ मध्ये लिहिला, त्यात 'नेशन' हा शब्द आहे. 'देश' हा शब्द त्याच अर्थाने अव्वल इंग्रजीत मराठीत रूढ झालेला दिसतो. देशातील राजकीय, आर्थिक व सामाजिक 'व्यवहार' आणि त्यांची 'व्यवस्था' हा 'पोलिटिकल एकॉनमी'चा विषय मानून हरि केशवजींनी आपल्या ग्रंथाला 'देशव्यवहारव्यवस्था' असे नाव दिले, हे आपण मागेच पाहिले. चिपळूणकरांनी 'देशव्यवहारांची' व्याप्ति लक्षात घेतली तेव्हा त्यांना आढळले की पारंपरिक 'अर्थशास्त्रा'ची व्याप्ति तशीच आहे. राजा हा 'अर्थशास्त्रा'चे केंद्र आहे असे पूर्वी मानले होते, आता आधुनिक काळात 'नेशन' किंवा प्रजा हे केंद्र मानावे. पण व्याप्ति तीच राहू शकेल. 'राजनीति' हा 'अर्थशास्त्रा'चा जुना पर्यायशब्द होता. तो मात्र तसा ठरणार नाही. पण 'अर्थशास्त्रा'चे देशव्यवहारात्मक पारंपरिक क्षेत्रच पोलिटिकल एकॉनमीचे क्षेत्र आहे असे मिलला अनुसरून मानता येईल. सारांश, 'धर्मशास्त्र', 'कामशास्त्र' व 'मोक्षशास्त्र' यांच्या कक्षा वगळून उरलेले मानवी व्यवहारांचे सारे क्षेत्र हा आधुनिक 'अर्थशास्त्रा'चा विषय राहील ही चिपळूणकरांची कल्पना असावी. परंपरेतील एक अर्थवाही व समर्थ शास्त्रीय संज्ञा अशा रीतीने नव्या काळातही वापरणे शास्त्रीय दृष्टीने उचित ठरेल, ही गोष्ट 'अर्थशास्त्र' या संज्ञेच्या बाबतीत शक्य झालेली दिसते, व या संज्ञेचा तसा उपयोग करण्याचे श्रेय चिपळूणकरांना द्यावयास हवे.

पाश्चात्य देशात पुढे 'पोलिटिकल एकॉनमी' या संज्ञेतील 'पोलिटिकल' हा शब्द गळून पडला व 'एकॉनॉमिक्स' ही नवी संज्ञा रूढ झाली, आणि या शास्त्रात आर्थिक व्यवहारांना स्वायत्त विलगपणे अभ्यासण्यात येऊ लागले. 'अर्थशास्त्र' ही मराठी संज्ञा मात्र १८५५ पासून पुढे तशीच चालू राहिली, पण तिचा व्यापक पारंपरिक अर्थ आणि त्यालाच अनुलक्षून चिपळूणकरांनी दिलेला नवा अर्थ हे दोन्ही झिजत गेले. 'केवळ आर्थिक व्यवहारांचे' शास्त्र असा विशिष्ट अर्थ त्या संज्ञेला आता आलेला आहे. त्यामुळे, कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'ला 'राजनीति' का म्हणत होते, आणि 'धर्म', 'अर्थ', 'काम' व 'मोक्ष' यांना 'पुरुषार्थ' का म्हटले आहे, अशासारखे प्रश्न मराठी वाचकाला आज दुर्बोध झाले आहेत.

चिपळूणकरांच्या या ग्रंथात मिलच्या 'प्रॉडक्शन' या विभागाचेच तेवढे भाषांतर आहे. पुढील 'डिस्ट्रिब्यूशन' या विभागाचे, म्हणजे १९४ ते ४१६ या २२२ पृष्ठांचे भाषांतर, चिपळूणकरांनी

१८५६ मध्ये संपविले असा निश्चित उल्लेख सांपडतो. दुर्दैवाने हे भाषांतर प्रसिद्ध झालेले नाही. भाषांतराचे हस्तलिखित डायरेक्टर ऑफ एज्युकेशनकडे सादर झाले असावे, पण ते छापण्याच्या बाबतीत काय अडचण आली असावी ते सांगणे कठीण आहे. दुसऱ्या प्रकरणाचे हस्तलिखित सरकारने प्रसिद्ध का केले नाही, किंवा सरकारकडून मिळवून ते त्यानंतर कोणी प्रसिद्ध करणे का शक्य झाले नाही, याबद्दल आज नुसते कुतूहल व हळहळ वाटणे, यापेक्षा जास्त काही शक्य दिसत नाही. सरकारी आर्काइव्हज, किंवा एज्युकेशन खात्याचे जुने कागदपत्र यांत त्या हस्तलिखितांचा पुढे मागे आढळ होणे अशक्य नाही, पण ते एक सुदैव व चमत्कार मानावा लागेल[१].

## पुनर्मुद्रित ग्रंथांच्या अभ्यासाचे महत्त्व

सन १८४३ ते १८५५ पर्यंतची बारा वर्षे मराठी माणसाचे मन घडण्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. सन १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठ स्थापन झाले आणि इंग्रजी भाषेतून पाश्चात्य ज्ञानाचा लाभ घेण्याची प्रथा सुरू झाली. या प्रथेचा फायदा असा होता की इंग्रजी भाषेत असलेले ज्ञानभांडार सुशिक्षित मराठी माणसाला खुले झाले, परंतु तोटा असा होता की मराठी भाषेतून शास्त्रीय ज्ञान घेण्याचे व देण्याचे थांबले. इंग्रजी भाषेतून शिकलेला मनुष्य जास्त ज्ञानासाठी इंग्रजीकडेच ओढला गेला. मराठी भाषेच्या विकासाचा मार्ग त्यामुळे खुंटला. अर्थात शास्त्रीय ज्ञानापुरतेच हे घडले, आणि ललित वाङ्मय आणि वृत्तपत्रीय लेखन या क्षेत्रात मराठीचा विकास खुंटला नाही. पण शास्त्रीय ज्ञानाचे वाहन होण्याचा मार्ग बंद झाल्यामुळे मराठी भाषेच्या एकंदर विकासात एक महत्त्वाचे अंग अधू राहिले.

हा अधूपणा मराठीच्या बाबतीत जास्तच घातक ठरला. कारण जुन्या भारतीय ज्ञानपरंपरेतही शास्त्रीय ज्ञान संस्कृतातून दिले जात होते. अध्यात्मविद्येपुरतेच असे म्हणता येईल की मराठीतून ह्या विद्येचे थोडेफार विवेचन व निरूपण झाले, पण दर्शनांची किंवा बौद्धजैनादि मतांची ओळख मराठी सामान्य माणसाला व्हावयाची तर संस्कृत भाषेची ओळख असणे पूर्वीही आवश्यक होते. मराठी राज्ये स्थापन झाली, पण राजदरबारी संस्कृत भाषेतून ज्ञान घेणारे व देणारे पंडितच राजाश्रयाला पात्र ठरत होते. शिवछत्रपतींनी राज्यव्यवहारकोश करवून घेतला, त्यात फारशी शब्दांना संस्कृत पर्याय दिलेले आहेत. रामचंद्रपंतांची 'राजनीति' हा एकच शास्त्रीय ग्रंथ त्या काळी मराठीत लिहिलेला आढळतो. एकंदरीत, अगदी प्राचीन काळापासून इंग्रजी राज्यापर्यंत शास्त्रीय ज्ञानाची भाषा म्हणून मराठीचा विकास होऊ शकलेला नव्हताच. पुढे १८५७ पासून पुन्हा हीच दुर्दशा चालू राहिली. या दृष्टीने, १८२० ते १८५७ एवढाच तुटपुंजा काळ मराठीच्या भाग्याचा होता. त्या काळामध्ये निसर्ग-विज्ञाने व अर्थशास्त्रादि समाजविज्ञाने यांच्या बाबतीत मराठी लोकांनी भगीरथ प्रयत्न केलेले आढळतात. कँडीसारखे इंग्रजही या प्रयत्नांत मनापासून सामील झालेले दिसतात. बेकन, मिल, स्पेन्सर, बर्क, गिबन प्रभृतींच्या लेखनाची या प्रयत्नांत मोठीच मदत झालेली दिसते. मिसेस मार्सेटसारख्या स्त्रीने इंग्लंडमध्ये ज्ञानप्रसारासाठी जे बहुमोल कार्य केले त्याचाही फायदा या मराठी लेखकांना झालेला दिसतो.

---

१. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या "मिसलेनियस", व्हॉल्यूम १३, १८५६, च्या रिपोर्टात चिपळूणकरांना "दोन्ही प्रकरणांच्या भाषांतरासाठी बाराशे रुपये बक्षिसादाखल मिळाल्याचा उल्लेख आहे" (रिपोर्ट. पृष्ठ. १५७). ही डॉ. कृ. भि. कुलकर्णी यांनी 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति', (मराठी संशोधन मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला, ग्रंथ पहिला, १९५६) या ग्रंथात पृष्ठ. २६५ वर दिली आहे.

या लेखकांमध्ये आधुनिक ज्ञानाबद्दल आदर तर आहेच, शिवाय मराठीतून ज्ञानप्रसार करण्याची जिद्द व हौस आहे. त्यामुळे नव्या कल्पनांची मांडणी करताना त्या नीट समजावून घेणे, आणि त्यांना आपल्या वातावरणाशी मिळवून घेऊन मांडणे, ह्या गोष्टी या लेखकांनी मोठ्या परिश्रमाने व कौशल्याने केलेल्या दिसतात. शास्त्रीय इंग्रजी शब्दांना पर्याय शोधताना केवळ इंग्रजी शब्दाचे बाह्यरूप पाहून इंग्रजी-मराठी शब्दकोशात आढळेल तो मराठी पर्याय शब्द वापरणे असा प्रकार ते करीत नाहीत. इंग्रजी शब्दाच्या मागे असलेली कल्पना लक्षात आणून तिला अन्वर्थक असा मराठी शब्द योजण्याचा ते प्रयत्न करतात. असे करताना शक्य तर मराठी रूढ शब्दच ते वापरतात, अगदी अडेल तर संस्कृत शब्द नव्याने तयार करतात. चिपळूणकरांनी वापरलेल्या 'मंडळी' या शब्दाचे उदाहरण येथे पाहण्यासारखे आहे. अनेकांनी आपआपले भांडवल एकवटून जॉइंट स्टॉक कंपनी काढली तर मराठीत तिला काय म्हणावयाचे? मनुस्मृतीमध्ये अशा संयुक्त भांडवलाच्या व्यापारी समूहाला 'संभूय समुत्थान' असा शब्द वापरला आहे, ही माहिती चिपळूणकर देतात. परंतु या नव्या समाईक-भांडवली कंपन्यांना 'मंडळी' हा शब्द चांगला रूढ झालेला पाहून तोच शब्द त्यांनी प्रत्यक्षात वापरला आहे. रामकृष्ण विश्वनाथांच्या पुस्तकातही 'मंडळी' हाच शब्द आहे व तो १८४३च्या आधीच रूढ झालेला दिसतो. मागणी आणि पुरवठा हे शब्द आज आपण वापरतो. या शब्दांचा वापर रामकृष्णांच्या वेळी नव्हता असे दिसते, त्या ऐवजी 'खप' व 'भरती' असे त्यांचे शब्द दिसतात. 'खप' व 'आमदनी', 'मागणी' व 'पुरावा' असे शब्दप्रयोग नंतर सन १८५५ पर्यंत विकसित झालेले दिसतात व अशा क्रमाने शेवटी 'मागणी' व 'पुरवठा' हे शब्द आज स्थिरावलेले आढळतात. पारिभाषिक शब्दांची जडणघडण अशी अडखळत, प्रायोगिक पद्धतीने होत जाणे भाषाविकासाच्या दृष्टीने नैसर्गिक आहे व फायद्याचेही आहे. कारण बोलभाषेशी असे नाते राखीतच ग्रांथिक किंवा शास्त्रीय भाषेचा विकास होणे श्रेयस्कर ठरते. कोठेतरी व कोणीतरी पारिभाषिक शब्दकोश करावयाचा व मग तो मराठी लेखकांनी फक्त वापरावयाचा, ही पद्धत व्यवहारात सोपी वाटली तरी कृत्रिम आहे. चुकतमाकत आणि प्रत्यक्ष लेखनाच्या ओघात व अर्थप्रवाहात शब्दांची घडण होत जाणे कसे उपयुक्त असते याचे उत्तम प्रात्यक्षिक प्रस्तुत चार ग्रंथांतील पारिभाषिक शब्दांच्या बदलत्या विकसनशील रूपांवरून दिसून येते.

प्रस्तुत पुनर्मुद्रित ग्रंथांचे मोल परिभाषेच्या विकासाचे रूप पाहण्याच्या दृष्टीने आहेच, शिवाय कल्पनांच्या विकासाचे चित्रही येथे पाहावयास मिळते, हे महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्रापुरतेच पाहावयाचे तर या ग्रंथांतून 'संपत्ती' या कल्पनेचे विकसनशील रूप पाहावयास मिळते. संपत्तीची पूर्वापार चालत आलेली केवळ संचयात्मक किंवा उपभोगात्मक कल्पना येथे प्रथम बदललेली दिसते. मानवी श्रमाने संपत्ती निर्माण होते, हे नवे तत्त्व गवसल्याचा अभिमान व आनंद या लेखांमध्ये दिसतो. पण, 'संपत्ती ही भांडवल बनून नव्या संपत्तीचे उत्पादन करते' ही कल्पना त्यांना आणखीच कुतूहलाची व क्रांतिकारक वाटते. या उत्पादनशील संपत्तीचे तत्त्व ते मोठ्या उत्साहाने प्रतिपादन करतात. सर्जनशील भांडवलाच्या भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे एक मोठे भव्य चित्र ते डोळ्यांपुढे पाहतात व भारताला अशी ऊर्जितावस्था येईल अशी त्यांना आशा वाटते. पण, संपत्तीच्या वाढीनेच केवळ लोक सुखी होतील का हा प्रश्नही त्यांना जाचतो. चांगला धर्म, चांगली नीती, शहाणे राज्यकर्ते, चांगले शिक्षण यांच्या अभावी केवळ संपत्तीने सुख होणार नाही, याची स्पष्ट जाणीव या लेखकांनी प्रकट केली आहे. याच प्रकारे, श्रमविभागामुळे उद्भवणारे प्रश्न, लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न, परदेशी व्यापार आणि स्वावलंबन यांचा प्रश्न, प्रत्येक धडधाकट माणसाला उपजीविका मिळण्याचा प्रश्न, यांचाही विचार या ग्रंथांतून आलेला दिसतो.

### भाषाशास्त्रदृष्टीने उपयुक्तता

आणखी एका दृष्टीने या पुनर्मुद्रित ग्रंथांचा अभ्यासकांना उपयोग होईल. तो म्हणजे मराठी गद्याच्या मोडणीचा, शैलीमधील बदलांचा आणि लेखनपद्धतीतील बदलांचा विचार करताना या ग्रंथांतील भाषापद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करता येईल. या दृष्टीने पुनर्मुद्रण करताना मुळाप्रमाणेच छापण्याचा श्री. प्रियोळकरांनी घालून दिलेला दंडक आम्ही पाळला आहे. (मुळाप्रमाणे छापण्याबाबत झालेल्या चुका शुद्धिपत्रात दिल्या आहेत). उदाहरणार्थ, पृष्ठ ५९ वर 'असतू' हा शब्द दुर्बोध आहे, पण तो मुळात तसाच आहे. हा दंडक आम्ही क्वचित उल्लंघिला आहे. तो असा : पृष्ठ ५७ वर 'म्हणजे' एवढाच शब्द मुळात आहे व त्यापुढे कंसात 'म्हणावे' हा शब्द आम्ही पदरचा घातला आहे, मूळ लेखकाने एका व्याख्येच्या शेवटी 'म्हणजे' हे क्रियापद 'म्हणावे' या अर्थाने वापरले आहे, हे लक्षात येण्यासाठी हे उल्लंघन केले आहे. पण असे करणेही योग्य नव्हे म्हणून ही पद्धती आम्ही पृष्ठ ५७ नंतर सोडली आहे.

पृष्ठ ४० वर 'कांचनाचा' या शब्दानंतरचा मजकूर मुळातच नाही. तसेच पृष्ठ ४८ वर मध्येमध्ये रेघा दिल्या आहेत. त्या जागचा मजकूरही पान फाटले असल्याने वाचता आलेला नाही. 'लक्ष्मीज्ञान'ची बिनफाटकी प्रत कधी उपलब्ध झाल्यास तो मजकूर तेथे घालता येईल, पण ती प्रयत्न करूनही आम्हास मिळाली नाही.

शुद्धलेखनाच्या बाबतीतही मुळाप्रमाणे आम्ही छापले आहे. पण त्याबाबतीत फारशी नियमबद्धता नव्हती हे पहिल्या ग्रंथावरून स्पष्टच होईल. लेखकांना लेखनपद्धतीबद्दल आस्था होती, पण नियम काटेकोरपणे तयार झालेले नव्हते. हरि केशवजी यांनी म्हटले आहे की "ग्रंथाचे शेवटी शुद्धिपत्र आहे. त्यातही जरी ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, कामा, सिमिकोलन, इत्यादि सर्व अशुद्धे दाखविली नसली तरी तिकडे लक्ष न देता ग्रंथतात्पर्यानेच सज्जन संतोषतील." (पृ. ७९) हीच दृष्टी ठेवून ग्रंथतात्पर्याकडे लक्ष वेधून त्या वेळचे लेखक लिहीत होते.

### समारोप

मराठी भाषेतून अर्थशास्त्र हा विषय शिकविण्याची आता निकड आहे व त्या दृष्टीने एखादे चांगले पाठ्यपुस्तक तयार करण्याची योजना गोखले अर्थशास्त्र संस्थेने संकल्पिली. तसेच स्मिथ, रिकार्डो प्रभृतींच्या प्रमाणग्रंथांच्या मराठी भाषांतरांची योजनाही संस्थेने विचारात घेतली. या निमित्ताने परिभाषेचा विचार करीत असताना 'अर्थशास्त्रपरिभाषा' या ग्रंथाकडे लक्ष गेले. तो ग्रंथ पारिभाषिक शब्द देणारा नसून मूलतत्त्वांचे विवेचन करणारा आहे असे दिसून आल्यावर अशा इतर मराठी ग्रंथांचा शोध घेतला व प्रस्तुत चार ग्रंथ आम्हांला उपलब्ध झाले. संस्थेचे त्यावेळचे संचालक प्रा. वि. म. दांडेकर यांनी या चार ग्रंथांच्या पुनर्मुद्रणाची योजना स्वीकारली. प्रस्तुत संग्रहग्रंथ तयार होण्याचे श्रेय मुख्यतः त्यांना द्यावे लागेल.

श्री. हरिभाऊ मोटे यांनी आजवर थोडेच पण अत्यंत मोलाचे प्रमाणग्रंथ संपादित व प्रकाशित केले आहेत. त्यांच्या संपादकीय अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ या संग्रहग्रंथाच्या बाबतीत त्यांनी आम्हांला दिला, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य प्रादेशिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. वा. पु. कोल्हटकर यांनी दुर्मिळ पुस्तकांचा लाभ आम्हाला करून दिला, तसेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे श्री. वा. वि. भट, श्री. अच्युत तारी प्रभृतींनीही या बाबतीत आम्हाला सतत बहुमोल मदत केली. मार्लेट प्रभृती इंग्रज

लेखकांची माहिती आम्हांला ब्रिटिश कौन्सिलचे श्री. देवनळी यांनी मिळवून दिली. या सर्वांच्या मदतीमुळेच हा ग्रंथ प्रसिद्ध करणे शक्य झाले. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

या ग्रंथाची सूची पारिभाषिक शब्दसंग्रह करण्याचे अवघड काम श्री. श्रीपाद जोशी यांनी केले, याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. 'मौजे'चे श्री. राम पटवर्धन यांनी या ग्रंथाच्या छपाईबाबत जातीने लक्ष घातले व म्हणून ते काम इतके निर्दोष व सुबक होऊ शकले. त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे ४

दि. के. बेडेकर

१० सप्टेंबर १९६९

# हिंदुस्थानची भावी !

व

# सांप्रतची स्थिति

व

# पुढें काय त्याचा परिणाम होणार, याविषयीं, विचार.

१०२००

रामकृष्ण विश्वनाथ याणें हें पुस्तक

केलें.

32e.eu
श. वि.

मुकाम मुंबई.

प्रभाकर छापखान्यांत छापिलें.

माहे मे.

सन १८४३

## हिंदुस्थानांतील रहवासी लोक यांस.

यापुढील विचाराचा लिहिणारा याणें मोठ्या साहसमय त्नानें या पुस्तकांत सुळभपणा राखण्याविषयीं आणि मोठ्या विश्वासानें एतद्देशीय लोकांस त्यांची सांप्रतची स्थिति व कोणत्या उपायानें ते सुधारले जातील, हें दाखविण्याविषयीं केला आहे. या ग्रंथाचा लिहिणारास असें पक्कें माहित आहे कीं त्याणें संक्षेपाकडे विशेष लक्ष दिल्यामुळें ज्या गोष्टीचा त्याणें पुढें मोठा विस्तार करावा त्या सोडून दिल्या आहेत, तथापि तो आपले एतद्देशीय स्नेही यांस व भाऊबंदांसही हीच प्रार्थना करितो कीं त्यांहीं हा जो त्याणें अल्पमतीकरून त्यांस त्यांचा प्राचीन इतिहास, सांप्रतची स्थिती व पुढें काय परिणाम होणार हे दाखविण्यास प्रयत्न केला आहे. त्यास आश्रय देऊन तो मान्य करावा.

ता: २८ रामकृष्ण ८७

# Political Economy

# लक्ष्मीज्ञान

महाराष्ट्रदेशांतील

"कामदारलोकांशीसंभाषण"

याग्रंथाचेकर्त्यांने. हाग्रंथ

श्रीफट्साहेबाच्याइंग्रजीग्रंथाचे

आधारानेंकेला.

ज्ञानप्रकाशछापखान्यांत

पुणेंयेथें

छापिलें.


सन् १८४९

किंमत [illegible]

## विल्हेवारी


| | |
|---|---|
| शाहाणपणहीचलक्ष्मी | ९-७३ |
| श्रीमंतलोक | १८-४०-४२-७७-८२ |
| सर्कार | ४६ |
| समाईकी | ७२ |
| स्त्रिया | ७१ |
| हिंदूलोकविद्येसतुच्छमा-नितात. | २० |
| हिंदूलोकांचीस्थिती | ८३-८६ |
| हिंदूनीविद्याशिरवावी | ७ |
| ज्ञान | १८-२५ |

दक्षणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी.



मुंबई.

# ELEMENTS

OF

# POLITICAL ECONOMY

AN IMITATION OF, AND PARTLY TRANSLATED FROM,

**Mrs Marcet's Conversations**

COMPRISING ALSO A PARAPHRASE INTO POPULAR MARATHI DIALOGUE OF MANY OF THE MOST IMPORTANT PORTIONS

OF

# MILL'S PRINCIPLES

COMPILED UNDER THE SUPERINTENDENCE OF

THE LATE


**H. GREEN ESQR.**

PROFESSOR OF LITERATURE IN THE POONAH COLLEGE

BY

HARI KESHOWAJI

TRANSLATOR IN THE SADDAR ADALAT

AND

VISHWANATH NÁRAYAN MANDLIK

FIRST NORMAL SCHOLAR ELPHINSTONE INSTITUTION



**BOMBAY.**

PRINTED FOR THE DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY,

BY APPA RAMJEE AT GUNPUT CRISHNAJEE'S PRESS.

1854



80
96

# देशव्यवहारव्यवस्था

या शास्त्राचीं मूलतत्वें.

१०२४३

८० / १८

मिसेसमार्सेट ह्मणून एक ग्रंथकर्त्री झाली, तिच्या ग्रंथाचे कोठे भाषांतर कोठे भावार्थ असी योजना करून तसेंच, मेस्तर जान्स्टुअर्टमिल्ल, ह्मणून, जो याशास्त्रावर उत्कृष्ट अर्वाचीन ग्रंथकर्त्ता झाला, त्याचे पद्धतीस बहुत्येक प्रकरणीं अनुसरून,

330.8

हा संवादरूप ग्रंथ.

महाराष्ट्र भाषेंत,

अजम हेन्रीपीनूएसक्वायर पुणें एथील मुख्यशाळेचे

प्रोफेसर

यांच्या सूचनपूर्वक

हरिकेशवजी सोमवंशी क्षत्रीपाठारे सदरअदालतीचेत्रांसलेटर

यांच्या हातून आरंभून

विश्वनाथनारायण मंडलिक एल्फिनूस्टनूइंस्टीट्युशनामधील

पहिल्या प्रतीचेविद्यार्थी यांजकडून सिद्धीस जाऊन

दक्षिणी भाषेंत पुस्तकें

प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आश्रयानें

---

मुंबईंत

आपारामजी याने गणपतकृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिला असे

इसवी सन १८५४

# अर्थशास्त्रपरिभाषा.

## प्रकरणपहिलें.

ह्या ग्रंथ मिल्साहेबांच्या इंग्रेजी ग्रंथाच्या आधारानें असिस्तंत प्रोफेसर कृष्णशास्त्री चिपळोणकर निसबत पुणे पाठशाळा ह्यांनीं केला तो

मेहेरबान बोर्ड आव् एद्युकेशन ह्यांच्या हुकुमा वरून

पुणे पाठशाळे कडील छापखान्यांत छापिला.

छापणार नारोरामचंद्र ठकार सु० छापखाना.

शके १७७७

संन १८५५

# ARTH SHASTRA PARIBHASHA;

OR

## The Principles of Political Economy From the work of

JOHN STUART MILL,

by

Krishna Shástri Chiplonkar,
Assistant Professor of Vernacular Literature in the Poona College.

VOL.I.

Lithographed for the Board of Educatio
at the Press of the Poona College.

1855

# हिंदुस्थानची प्राचीन
# व
# सांप्रतची स्थिति
# व
# पुढें काय त्याचा परिणाम होणार, याविषयीं विचार.

रामकृष्ण विश्वनाथ याणें हें पुस्तक
केलें.

मुकाम मुंबई.
प्रभाकर छापखान्यांत छापिलें.
माहे मे.
सन १८४३

# हिंदुस्थानांतील रहवासीलोक यांस.

या पुढील विचाराचा लिहिणारा याणें मोठ्या साहस प्रयत्नानें या पुस्तकांत सुलभपणा राखण्याविषयीं आणि मोठ्या विश्वासानें एतद्देशीय लोकांस त्यांची सांप्रतची स्थिति व कोणत्या उपायानें ते सुधारले जातील, हें दाखविण्याविषयीं यत्न केला आहे. या ग्रंथाचा लिहिणारास असें पक्कें माहित आहे कीं त्याणें संक्षेपाकडे विशेष लक्ष दिल्यामुळें ज्या गोष्टीचा त्याणें पुढें मोठा विस्तार करावा त्या सोडून दिल्या आहेत, तथापि तो आपले एतद्देशीय स्नेही यांस व भावाबंदांसही हीच प्रार्थना करितो कीं त्यांहीं ह्या जो त्याणें अल्पमती करून त्यांस त्याचा प्राचीन इतिहास, सांप्रतची स्थिती व पुढें काय परिणाम होणार हे दाखविण्यास प्रयत्न केला आहे, त्यास आश्रय देऊन तो मान्य करावा.

# हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति, आणि तिचा पुढें काय परिणाम होणार, याविषयींचा विचार

हरएक मुलखाची प्राचीन स्थिति कशी होती, व सांप्रत कशी आहे, या गोष्टीचा विचार करणें, हें काम सर्वदां स्वाभाविक किंवा राजकीय अडचणीकरून परिपूर्ण असतें. ज्या मुलखाचा आपणास विचार करणें आहे, तेथील लोकांखेरीज इतर देशचे लोक यांचा त्या देशाविषयीं नाना प्रकारचा मतलब असतो, कित्येकांची भलतेच प्रकारें समजूत पडून गेली असती, व त्यांचे विचार कांहीं निराळे प्रकारचेच असतात, ही एक गोष्ट. दुसरी गोष्ट अशी कीं कोणी मोठा विद्वानही जरी असला. तथापि लाहानपणापासून त्याचे मनांत एकादे गोष्टीविषयी जी कल्पना एकदां भरून गेली असती, ती पुढें जों जों मोठा होत जातो, तों तों ती त्याचे मनांत अधिकाधिक ठसून जाती. याजमुळें अशेले लोक त्या देशाविषयीं विचार करायास लागले असतां बाळपणासून जें त्यांचे मनांत भरून गेलें असतें, तिकडेस त्याचा कल जातो, मग त्यास कांहीं सयुक्तिक कारणच पाहिजे असा अर्थ नाहीं. या अशे गोष्टीमुळें या स्वाभावीक व राजकीय अडचणी प्राप्त होतात. असा प्रकार आहे. त्यापेक्षां जो कोणी पृथ्वीवर किंवा हरएक मुलखांत आजपर्यंत जी हकीगत जाहली. तिचा विचार करूं लागतो. त्यास नाना प्रकारचीं विघ्नें प्राप्त होतात, यांत कांहीं आश्चर्य नाहीं, व आजपर्यंत ज्या गोष्टी घडून आल्या, त्याविषयीं व सांप्रत जो रंग दिसत आहे, याचा बहुधा परिणाम काय होईल, याविषयीं फार विस्तारें करून विचार करण्याचे खटपटींत न पडतां या अडचणी, दुरभिमान वगैरे समज दूर करण्याचे उद्देशानें नवीन प्रयत्न केले. आणि ते जरी सिद्धीस गेले नाहींत, तथापि त्यांत कांहीं फारसें आश्चर्य आहे, अशी गोष्ट नाहीं, व निराशेपासून जें दुःख प्राप्त होणार, तें फुकट अधिक वाढविण्याचें प्रयोजन नाहीं, किंवा कदाचित् दैवयोगेंकरून असें घडून आलें कीं या अडचणीतून दुसरे जे कोणी पार पडायास इछीत असतील, त्यांची इछा सफळ जाहाली नाहीं, असें विद्वज्जन समाजाचे ध्यानीं आलें, तथापि ग्रंथ लिहिणारांस त्या कामापासून पराङ्मुख करणें, किंवा त्याचे स्वतांचे जे कांहीं विचार असतील, त्यांजवर लक्ष न देणें हें योग्य नाहीं.

जीं राज्यें एके काळीं अबादानी, सत्ता, सामर्थ्य व पराक्रम यांहीं करून प्रख्यात होऊन गेलीं व ज्या राज्यांतील लोक इतर मुलखांत जाऊन ते मुलुख बसविले, व ज्यांचें अनुपम व अप्रतिहत शौर्य व माहान् माहान् अघटित कामें यांहीं करून ज्यांस पुढील लोक अवतारी पुरुष असें समजत असत, असे जे लोक ते काळेंकरून अति दरिद्री व नीच होऊन जातात, अशेले राज्यांचा उगम व बढती व मोड होण्यास कोणतीं मुख्य कारणें होतात, या विषयीं कांहीं नियम व सिद्धांत करण्याविषयीं "गिबन" व "वालनि" यांहीं बहुत श्रम केला, त्याजवरून सर्व प्रकार ध्यानांत येईल, म्हणजे आमचे बोलण्याचा असा अर्थ कीं गिबन व वालनि या ग्रंथकारांहीं प्राचीन इतिहास लिहिले, त्यांजवरून पाहातां इतिहास लिहिणारास बहुत अडचणी प्राप्त होतात. ही गोष्ट साफ प्रत्ययास येती, व राज्यरीतींत कोणता दोष आहे याचें मूळ शोधून काढणें व काळेंकरून राज्यरीतींतील दोषाचा योगेंकरून मोठमोठालीं राज्यें बुडालीं, यांचें वर्णन करणें किंवा असे वाईट परिणाम न व्हावे, एतदर्थ इतर मुलखांतील लोकांहीं कोणती तजवीज योजावी, व कोणत्या दोषाचा त्याग करावा, हें दाखवून देणें इत्यादि ज्या इतिहास

लिहिणाराचे उद्देश आहेत, त्यांस लिहित्ये वेळेस फार सावधगिरी व धूर्तता ठेवली पाहिजे. मिसर देशांतील राज्य रीति व नीति सांप्रत अगदीं बिघडून गेल्या आहेत, याचा—व सन इशवीचे पूर्वी १६१५ वर्षांवर त्याच देशांतील संपदा व शोभा, येणेंकरून एथीओपियन लोक मोहित होत्साते त्या देशांतील राज्यांत व व्यापारांत आपणास अंश प्राप्त व्हावा, या इछेनें त्यांहीं सिंधुनदी सोडून पूर्व देशांतील सर्व मुलुखांचें नाक, असा जो मिसर देश तेथें वस्ती करण्यास जाते झाले, त्यासमयीं त्या देशाची कोणते प्रकारची स्थिति होती, याचा—विचार करूं गेलें असतां, व आज सन १८४२ त रोम शहरची जी स्थिति आहे, तिचा व सिझरचे अमलांत त्या शहराकडे सर्व भूमंडळाचें आधिपत्य होतें, व तें शहर सर्व लोकांचें मुख्य व्यापारस्थान होतें, त्या वेळेस त्या शहरची जी थोरवी होती, तिचा विचार केला असतां व आरंभीं तें शहर एक लाहनसें संस्थान होतें. पुढें तेथें नामांकित प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली. पुढें राज्यसत्ताक राज्याची स्थापना झाली. पुढें धर्माधिकारी पोप याचें माहात्म्य वाढलें, याचा पायरी पायरीनें विचार करूं गेलें असतां, तसेंच शालडिया, फिनिशिया आणि जुडिया या देशांची ज्या समयीं अबादानी होती. त्यांचे जय, संपदा व शोभा हीं पाहून ज्यावेळेस सर्व चकित होत होतें, त्या समयीं या देशाची कोणत्या प्रकारची स्थिति होती याचें मनन केलें असतां त्यावेळचा प्रकार व या देशाची सांप्रत जी स्थिति झाली आहे. तीमध्यें तारतम्य करूं गेलें असतां त्यांचा जो हा मोड झाला, हा या पुढील गोष्टीस केवढा मोठा दाखला झाला आहे, व त्याजवरून आपणास केवढा मोठा बोध होण्यास योग्य आहे, कीं हरएक मुलखांतील प्रजा यांस अन्नवस्त्राची सोई, व दुसऱ्या साधारण प्रकारच्या सोई असल्या व विद्येचा उत्कर्ष करण्याची सोई असली, म्हणजे ती प्रजा प्रथम दोन गोष्टी म्हणजे अन्नवस्त्र वगैरे सोई करण्याचा उपाय याविषयीं ती उद्युक्त असती, व विद्यावृद्धीविषयीं त्यांस अगदीं काळजी नसती, व ती प्रजा कांहीं जो महत् नाश होणार, ती दूर करण्याविषयीं कांहीं श्रम न करितां ख्याली खुशाली व आलस्य यांहीं करून त्याची सर्वत्र उदास वृत्ति होऊन जो नाश सहज दूर करितां आला असता. व दूर करणें योग्य होता, तो लवकरच घडून येण्यास कारण होतात. असे प्रकारची लोकांची स्थिति झाली असतां त्या लोकांचें शौर्य, संपदा, विद्या, व राज्याची दृढता, यांतून कोणत्याही कारणानें राज्याचा उत्तरोतर नाश व्हावयाचा तो टळला जात नाहीं.

इतिहास लिहिण्याचा उद्देश जी हकीगत झाली, तिचा खरा वृतांत लिहावा, इतकाच नाहीं, परंतु त्या विषयाचा सर्वसाधारणपणें विचार करणें, व त्या वृतांतापासून जो निर्णय निष्पन्न होईल, तो इतिहास या हेतूनें सर्वांस समजावा, इतकेंच नाहीं, परंतु व्यवहारांत त्यापासून सर्वांस उपयोग होई, व सर्वांचे कल्याण होई, अशा प्रकारें त्या निर्णयाचा उपयोग करणें हाच मुख्य उद्देश होय. इतिहास लिहिणाराचे ग्रंथांत एक पक्ष किंवा कांहीं हलके हेतु न धरितां सर्वांचे कल्याणाचा हेतु जों जों अधिक असतो, तों तों ग्रंथ लिहिण्यास अडचणी गणित श्रेढीनें वाढत जातात, व या अडचणींतून पार पडण्याविषयींची सूक्ष्म आशा भूमिति श्रेढीनें अधिकाधिक सूक्ष्म होत जाती. सांगायास तात्पर्य केवळ लोककल्याण व्हावें, या हेतूनें इतिहास लिहिण्यास फार अडचणी असतात. साधारणपणें पाहिलें असतां हरएक मुलखाचा इतिहास म्हटला म्हणजे त्यात अपूर्ण व एकपक्षी वृतांत असतो, व अशाही स्वार्थबुद्धीमुळें ज्या वास्तविक गोष्टी घडल्या असतील, त्यांहून केवळ विपरीत अर्थाचें प्रतिपादन असतें, आणि असे असत्य वृतांत फार स्वार्थबुद्धीनें लिहिण्यास कांहीं हरकत नसती, किंवा कोठें कोठें खरे वृतांताचा शोध लावण्यास पुरेंपणीं साधन नसतें, किंवा त्या गोष्टी खऱ्या आहेत, किंवा खोट्या आहेत, याचा निर्णय करण्यास कांहींच साधन नसतें. अशी जर गोष्ट असली, तर सर्व विद्येपेक्षांही इतिहास विद्या लोकांचे अंतःकरणांत नानाप्रकारचे कुतर्क, व गैरसमजुती भरऊन देण्यास फारच समर्थ आहे. जे कुतर्क पुढें आपण प्रौढ वयांत आलों असतां व मोठा गंभीर विचार केला असतांही कांहीं कमी होत नाहींत,

व अगदीं नाशही पावत नाहींत. या शिवाय जे कुतर्क व गैरसमजुती एकदां बाल्यवयापासून मनांत ठसून गेल्या, त्या ज्याचा जसजसा स्वार्थ असतो, तसतसा त्याचा रोंख फिरत जातो. या प्रकारेंकरून अशा गैरसमजुती सहजावृत्या आपले अंतःकरणांत प्रतिबिंबून जातात, व इतिहासाचें पृथकरण केल्याविना त्या सर्व गोष्टी खऱ्याच आहेत, असें आपणांस वाटतें, कारण कीं तसल्या गोष्टीचें आपणास कारण असतें, किंवा ज्यांच्या हितेकरून आपणास कांहीं लाभाची आशा असती, त्यांचे सहवासेंकरून त्या इतिहास गोष्टी आपणास खऱ्याशा वाटतात. हरएक प्रजेची किंवा त्यांतील प्रतिव्यक्तीची कसकशी योग्यता आहे, याचें विवेचन मित्रासारखा भाव धरून किंवा स्वार्थाचा त्याग करून आजपर्यंत क्वचित कोणी केला असेल, म्हणजे त्राय शहराची आद्यरचना करणारा जो होमर त्याची जन्मभूमि किंवा बंदुकीचे दारूची युक्ति, इत्यादिकांविषयींचे निर्णय याचप्रकारें ठरण्यांत आले आहेत, सबब त्या विषयीं जे निरनिराळे शोध कारणारांहीं सिद्धांत केले आहेत, त्यांचे मतलब व समजुती जसजश्या निराळ्या असतात, तस तसे ते सिद्धांतही निरनिराळे प्रकारचे करतात.—इंग्लंड देशांत प्रजासताक अंमल झाला होता, त्याविषयीं ग्रंथकाराची नानाप्रकारचीं अनुमतें पडलीं आहेत. हें दुरभिमानाचें वजन मनावर फार असतें, याविषयीं मोठें प्रमाण आहे. त्या राज्यांतील दिवाणी अधिकार व व्यापाराची स्थिति ही अगदीं उतरते स्थितींत आली आहे, हें प्रमाण राजा असावा, असें ज्यांचें मत आहे, ते लोक स्वमत प्रतिपादनार्थ आणितात, परंतु त्यावेळेची वास्तविक स्थिति पाहिली असतां त्यावेळेस व्यापाराची स्थिति फार उत्तम होती, व त्यावेळेप्रमाणें इंग्लंड देशचे झेंड्यास लोक कधींही मानीत नव्हते—राजपक्षी लोक यांस त्यांचे पक्षापासून किती तोटे आहेत, हें माहीत होतें, व त्या तोट्यांचा त्यांस स्वतः इतका अनुभव आला होता, कीं प्रजासत्ताक राज्य हें फार चांगलें, असा त्यांस मोह यद्यपि झाला होता, तथापि त्याचा परिणाम त्यांचे लक्षांत आला नसावा. याचप्रमाणें इतर इतिहासाविषयींही हींच वाक्यें लागू होतात.
—याजवरून हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान व इंग्रेज या तीन्हीं सरकाराविषयीं नानाप्रकारचीं मतें पडलीं आहेत. जिंकलेली व करभार देणारी प्रजा यास बहुत करून अशी आशा असती, कीं जे लोक आपणावर अमल करितात, ते जिंकणारे लोक ज्या उद्देशानें आपले अमलांत प्रजा यावी, व आपण बसविलेले कर ती प्रजा बिनहरकत देईं, अश्या प्रकारचे प्रयत्न करतात, त्याचप्रमाणें ते अमलदार तशे उद्देशानें आपणा बरोबर पुढें वर्तणुक करतील, व त्या जिंकलेले राज्यांतील आणि दुसरीं त्याचे आश्रयाखालचीं किंवा करभार देणारीं संस्थानें एथील व्यापार व दिवाणी अधिकार याबाबद जे कायदे होतील, त्यांतही हाच उद्देश त्यांचा असेल, अशी आशा असणें हा बहुधा सर्वसाधारण नियम आहे, असें म्हटल्यास चिंता नाहीं—ही मोठी इंग्रेज सरकारची प्रजा इचा आपण श्रीमंत होऊन पुनः आपले राज्याची बळकटी राही, असें करण्याचा मतलब आहे. हा वर जो सर्वसाधारण नियम लिहिला हा खरा आहे, असें मानलें असतां अशे स्थितीमध्यें इतिहास लिहिणारे स्वदेशांत जे कायदे ठरले, ते त्यांस बरे वाटतात, त्यास त्याचा निष्पक्षपणें विचार होत नाहीं. पूर्वी जे राजे झाले, त्यांस तुच्छ करून आपले राज्याची तारीफ करतात, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हिंदुस्थान तसेच दुसरे मुलुख जे परसरकारचे अमलांत आले आहेत, त्याचें त्या योगेंकरून आजपर्यंत बहुत अकल्याण झालें आहे, व अजूनही मुसलमान बादशाहाचे अमलांतले प्रमाणें त्यांची हेळणा व अकल्याण चाललें आहे. ही गोष्ट नाकबूल करणें म्हणजे हिंदुस्थानांत जो इंग्रेज सरकारचा अंमल झाला आहे, त्यापासून इंग्रेजास कांहीं फायदा नाहीं, असें म्हणण्याप्रमाणें आहे, असा अर्थ होतो, परंतु हें म्हणणें इतकें खोटें, व गैरसिस्त आहे कीं हिंदु व मुसलमान मिळून १२,००,००,००० प्रजेस इंग्रेज सरकार कोणते प्रकारें स्वतंत्रता देतें, याविषयीं नीट माहितगारी त्यांस नाहीं, यांत कांहीं आश्चर्य मानायाजोगें नाहीं. पूर्वीचीं दुसरीं कित्येक सरकारें व इंग्रेज सरकार या उभयतांचें क्रौर्य, व दांडगेपणा यांत किती तफावत आहे, याचा

निष्पक्षपातपणें तपास करून मग योग्य दिसेल त्याप्रमाणें तारीफ करावी. परंतु त्या सरकारची तारीफ करण्यास त्यांचा केवढा हक्क आहे, याचा निर्णय करण्याकरितां नीट चित देऊन सर्वसाधारणपणें तपास करावा, आणि समग्र वृतांत अंतःकरणांत बरोबर येईपर्यंत याबाबद कोणी आपलें मत देऊं नये. म्हणजे मग असें जें अनुमोदन दिलें असतें; तें शांतपणें तपास व विचार करून दिलें आहे, असें होईल, व त्यांत एकाएकीं जी मल्तीच एकादी गोष्ट मनांत भरून गेल्री असती, तिचे योगानें कांहीं व्यत्यय नसतो, व त्यांत रास्त धोरण असतें —हिंदुस्थानाविषयीं ज्या सहस्रावधि ग्रंथकारानी लेख लिहिले आहेत, ते इंग्रज सरकारचे राज्याचें जें धोरण आहे, तें रास्त आहे, असें प्रतिपादन करण्याजोगते आहेत, व कन्याकुमारीपासून हिंदुकुशपर्यंत मुलुखांत जे कोट्यावधि लोक रहातात, त्याबाबद जें जें लिहिलें आहे, तें सर्व पक्षपातपणें लिहिलें आहे, असें स्थापतील, असे प्रकारचे ते ग्रंथकार नव्हत. बहुतेक ग्रंथकार ज्यांहीं हिंदुस्थानावर मोठमोठाले ग्रंथ लिहिले आहेत, व ज्यांचे लेख लक्ष देण्यास सुपात्र आहेत, ते बहुत करून कंपनीचे चाकर किंवा पाद्री लोकांचे मंडळींतील आहेत, तेव्हां अर्थातच त्यांचे त्यांचे भाषणाचा जो मुख्य विषय असतो, व त्यांचा मतलब असतो, तदनुसार त्या सर्वांहीं पक्षपातेंकरून ग्रंथ लिहिले आहेत. हे दिवाणी व लष्करी खात्यांतील कामदारसाहेबलोक यांस ग्रंथ लिहिते वेळेस आपल्यावरील श्रेष्ठ जे इंग्रेज व कंपनी सरकार यांचा त्यांस आश्रय मिळावा, व त्याची तारीफ व्हावी. या दोन गोष्टी जरूर लक्षांत ठेवाव्या लागतात. व पुष्कळ ठिकाणीं तर स्वार्थ साधण्याकरितां खऱ्या गोष्टी सोडून भलत्याच खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत. आतां पाद्रीलोक जे असतात, ते जर ग्रंथ लिहूं लागले, तर अर्थातच या लोकांच्या नीति फार वाईट आहेत, व हे लोक अगदीं धर्मशून्य आहेत. इत्यादि दूषणें द्यावयास लागतात—व या लोकांची दिवाणी व राजकीय स्थिति, या विषयांवर लिहिणें हें आपले मतलबास अयोग्य किंवा विरुद्ध आहे, असें समजतात. आतां ज्या युरोपियन ग्रंथकारांस एथील लोकांची साक्षात् माहीतगारी नाहीं, त्यांस तर हिंदुस्थानांतील लोकांच्या चाली, भाषा, नीति व त्यांचे विचार यांविषयीं हरवख्त अडचणी प्राप्त होतात, त्या दूर करण्यास ते समर्थ नाहींत, तेव्हां अर्थातच अशेले ग्रंथकारांचे योगानें फार तर संक्षिप्त किंवा एकपक्षी वृतांत आपणास काय तो प्राप्त होणार. प्राचीन हिंदूंत जे ग्रंथकार जाहाले, त्यांहीं ज्या गोष्टी लिहिल्या, त्या केवळ कल्पित, असें पाहून त्यांजवर कोणाचा विश्वास बसत नाहीं. आणि सांप्रतचें हिंदु ग्रंथकार हेही तसेच असतील, असें जाणून त्यांजवरही युरोपियन लोक सहसा विश्वास ठेवीत नाहींत. हिंदुलोकांस कसेंही करा, जुलूम करा किंवा यथान्याय त्यांचे संरक्षण करा तथापि तें त्यांस समजत नाहीं, आणि पूर्वीचें राज्य बरें किंवा आतांचें याचें तारतम्य करतां येत नाहीं, असें क्षणभरही मानतां येत नाहीं. असें जर आहे, तर ते आपला अभिप्राय लिहून ठेवणार नाहींत, असेंही कोणाच्यानें म्हणवणार नाहीं. मग त्यांहीं जो आपला अभिप्राय इंग्रेज लोकांचे अथवा दुसरे जे राजे झाले, त्यांचे राज्यनीतीवर लिहिला आणि त्यांस जें दुःख आहे, त्याविषयीं आक्रोश केला, त्याजवर जरी इंग्रेज लोकांही लक्ष दिलें नाहीं, तथापि त्यांचा वृतांत काय आहे, आणि त्यांचे हक्क कोणते आहेत, यांचा तपास जे धार्मिक आहेत, ते करतील, आणि आम्हास खचित वाटतें कीं दाहा कोटी मनुष्यांचें जें म्हणणें आहे, तें मान्य आहे, यांत संशय नाहीं. ते आपणापाशीं कांहीं देणगी मागतात, किंवा आपण त्यांची उगीच अयोग्य स्तुति करावी, किंवा आपण आपले इतिहासांत त्यांचीं दुःखें अतिशयें करून दाखवावीं असें सांगत नाहींत, परंतु ते इतकेंच म्हणतात, कीं आपण त्यांचा वृतांत निष्पक्षपातानें लक्ष देऊन त्यांचे जे हक्क आहेत, ते त्यांस द्यावे.

त्यांच्या पूर्वीच्या राज्यनीतींत जे फेरफार जाहाले, त्यांजविषयीं आणि त्यांची पूर्वीची स्थिति कसी होती, आणि आतांची कसी आहे, याजविषयीं हिंदुलोक विचार करीत असतील, यांत संशय नाहीं, आणि त्यांचा देश दिवसानुदिवस बुडून चालला आहे, आणि दरिद्र आणि दुःख यानेंकरून

व्याप्त होत आहे, असें त्यांस वाटतें, यांत संशय नाहीं. त्यास अश्या प्रसंगीं ईश्वरच जर त्यांस अनुकूळ होईल, तरच हें विघ्न दूर होईल. आणि त्यांस त्यांचे देशांत जो जिन्नस त्यांचेच श्रमानें उत्पन्न होतो, त्याचा उपभोग प्राप्त होईल. हिंदुस्थानच्या लोकांनीं आतां तरी सावध व्हावें, आणि आळस सोडून आपल्या देशाचें चांगलें करण्यास उद्युक्त व्हावें, असें केलें असतां अद्यापि काळ आहे. हिंदुस्थानच्या लोकाचें आणि युरोपांतील लोकांचें हिताहित एकमेकापासून जसें तीनशें वर्षोमागें भिन्न होतें, तसेंच आतां आहे, याविषयीं किती तर्कशास्त्र खर्च केलें, तरी ही गोष्ट सिद्धच आहे, यांत संशय नाहीं. इंग्लंड देशांतून वस्त्रें वगैरे हिंदुस्थानांत येऊन त्यापासून त्या देशाची संपदा वाढत चालली आहे, आणि हिंदुस्थानांतून हमेशा पैका जात आहे, असी गोष्ट आहे, तेव्हां हिंदुस्थानचें हित करणें जाहालें तर इंग्लंडचा नाश जाहाल्याशिवाय, म्हणजे जा युक्तीनें तो देश मातब्बर होत चालला आहे तीच युक्ति हिंदुस्थानांत चालल्या शिवाय होईल, असें कोणताही ग्रंथकार लिहूं सकणार नाहीं. हें म्हणणें कदाचित् आश्चर्य मानायाजोगें वाटेल, परंतु हें खरें आहे, असें या ग्रंथाचे शेवटील भागांत प्रतिपादन करूं—

एथील लोकांचे हातीं यंत्रें असल्यास हे लोक कळा कौशल्याचे कामांत आणि त्यांस ज्या वस्तूचा खप आहे, त्या विलायतेप्रमाणें करण्यांत कुशळ आहेत, असें ज्यांहीं हिंदुस्थानांत पाहिलें आहे, तें सर्व कबूल करतात, परंतु दुसऱ्या विलायतेतल्या लोकांबरोबर या कामांत टक्कर द्यावी, किंबहुना सर्व त्या जिनसांचा मक्ता आपणच घ्यावा, असें करण्यास ते इच्छतात. जर इंग्लंड देशानें दुष्टपणानें हिंदुस्थानचे सर्व जिनसांचा मक्ता घेऊन त्या लोकांची उमेद खचविली नसती, आणि हिंदुस्थानचा जिन्नस दुसऱ्या कोणत्या मुलुखांत जाऊं नये, असा प्रतिबंध केला नसता, तर एथें मजूरी कमी, तेणें-करून त्या लोकांहीं आपण केलेला जिन्नस सर्व पृथ्वीभर पुरविला असता. या प्रतिबंधामुळें हिंदुस्थानचें आणि कांहीं इंग्लंडाचेंही अनहित आहे, परंतु हिंदुस्थानचे लोकांहीं आतां आपला पैका व श्रम आपल्या हिताकडेस लावून त्यांहीं विलायती मालाची गरज ठेवूं नये. हें कसें होईल, हें त्यांचेसारिखे जाणते लोकांस सांगायास नको. इंग्लंड देशानें आपलेंच हित व्हावें, म्हणून दुसरे सर्व युरोपांतील लोकांस हिंदुस्थानचा व्यापार कमी केला आहे, आणि त्या लोकांस त्यांहीं आपले मालापासून आपलें हित करावें त्यासही हरकत केली आहे, तीही न चालतां जर वर सांगीतल्याप्रमाणें प्रवृत्त जाहाले, तर हिंदुस्थानचा व्यापार कायम राहून त्या देशाची संपदा, बढती, अबादानी आणि सुख या सर्व गोष्टी अनुकूळ होऊन तेथील लोकांस जें सुख कोणत्याही अमलाखालीं मिळालें नव्हतें, तें मिळेल.

हिंदुस्थानचें कल्याण करावें या हेतूनें इंग्लंडांत मंडळ्या जमतात, परंतु जर त्यांहीं तेथील लोकांचे बाहेरील दुःखाकडेस दृष्टि दिली, आणि त्यांचे आंतील दुःखाकडेस न दिली, तर त्यांचे मनांतील तो हेतु सिद्धीस जाईल, असें आम्हास वाटत नाहीं. हिंदुस्थानचे लोकांहीं जर त्यांस आपलें कल्याण करावयाचें असेल, तर त्यांस आपल्याला स्वतंत्रता मिळवायची असेल, आणि आपला व्यापार हितावह करून घ्यावयाचा असेल, तर त्यांहीं स्वतांच कमर बांधावी, आणि आपल्या सामर्थ्येंकरून व गुणेंकरून दुसऱ्यांचे साह्याची गरज नाहींशी करावी, आणि जीं दुःखें त्यांहीं आपल्या आळसामुळें आपणावर ओढून घेतलीं आहेत, तीं दूर करावीं. त्यांहीं जर मनावर घेतलें, तर ते युरोपांतले मालापेक्षां आपला माल स्वस्त विके, असें करतील, कां कीं ते लोक फार आहेत, आणि या हिंदुस्थानांत मजुरी स्वस्त आहे. ही हिंदुस्थानाची जी इतकी खराबी जाहाली, तिचें तसेंच एथें ज्यांहीं त्यांहीं हल्ले करावे, तेणेकरून तो देश दरिद्री होऊन लोक दुःखेंकरून व्याप्त जाहाले, या सर्वांचें कारण हिंदूच होत, कारण त्यांजमध्यें देशाभिमान आणि एकी नाहीं, तेव्हां सहज दुसरे लोकांपासून पराजय पावतात, त्यांस अश्या प्रसंगीं ब्रिटिश इंडियन सोसैटीसारख्या मंडळ्या जमल्या, तथापि त्याजपासून किंवा इंग्रजांचे

राजनीतीवरून या लोकांचें कल्याण कदापि होणार नाहीं, तेव्हां या लोकांचे जे खरे हितेच्छु आहेत, त्यांसच त्यांहीं साह्य करावें, हे उचित आहे. ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांचे जे भक्त आहेत, त्यांजवर बलात्कार करून ते एकादी त्यांचे बऱ्याची गोष्ट करितील, असें नाहीं, परंतु ते आपलें बरें कोणत्या रीतीनें होईल, याचा विचार करून त्यांहीं तें आत्मसंतोषाने केलें तरच होईल. हिंदुलोकांमध्यें सण आणि उपवासाचे दिवस बहुत येतात, त्यांत त्यांचा काळ उगीच व्यर्थ जातो, आणि तेणेंकरून त्यांचे सुधारण्यास विलंब लागेल, परंतु जसजशी त्यांजमध्ये यंत्राची आणि मजुरीची गरज अधिक होत जाईल, तसतसे सण आणि उपवास कमी होत जातील. सांप्रतचें सणाचें माहात्म्य दिवसानुदिवस कमी होत चाललें आहे, त्याचप्रमाणें ब्राह्मणाचाही मान कमी होत चालला आहे, याणेंकरून असें दिसोन येतें कीं हा देश कांहीं चांगले दशेस येईल. हिंदुलोकांचा दैवावर आणि ग्रहदशेवर फार भरवंसा आहे, तेणेकरून ते मोठमोठाले कारखाने घालण्यास आणि व्यापार करण्यास नालायक जाहाले आहेत, जर एकादे हिंदूस कांहीं कारण जाहालें तर तें काम सुरू करण्यास पहिल्यानें त्यांस चांगला दिवस पाहावा लागतो, आणि घरांतून बाहेर पडते वेळेस म्हणतो कीं हें माझें काम सिद्धीस जावो. नंतर पायरी खालीं उतरल्यावर त्यास मार्गांत पहिल्यानें कोण कोण भेटतात हें मोठें चित देऊन त्यास पाहावें लागतें. कोणी इतक्यांत जर शिंकला तर शिंकल्यापासून काय होईल, याचा शोध करितो, त्याचप्रमाणें कावळा ओरडला असतां, आंधळा मनुष्य ब्राह्मण किंवा परीट भेटला असतां तो वाईट शकुन असें मानतात. तसेंच जर एकादा मनुष्य रिकामें भांडे घेऊन समोर आला, किंवा बोडका आला, अथवा कुतरा जर उजवे बाजूस गेला, तर ते सर्व वाईट शकुन असें मानतात. अशी हीं अज्ञान समजूत आणि अस्थिरता हीं व्यापाराच्या कामास केवळ अयोग्य आणि असला वेडेपणा त्यांजमध्यें आहे, म्हणूनच इंग्रेज व्यापाऱ्यांची त्यांजवर वरचढ होती. परंतु अशे शकुनाकडेस लक्ष आतां मुख्य राजधानींत कमी होत चालले आहे, आणि तेथील राहाणारे भलभलते धर्मासंबंधीं विचार टांकून देत चालले आहेत, परंतु कलकता, मद्रास आणि मुंबई यांजपासून अमळ दूर गेलें म्हणजे घरगुती खटल्याविषयीं, व्यापारा विषयीं किंवा राजकार्याविषयीं जसें इंग्लंडांत पूर्वी टामस मुअर स्टामफोर्डचा पंचाग करणारा यास जसें कांहीं नक्षत्राविषयीं किंवा हवेविषयीं किंवा यंदा पीक कसें होईल, याविषयीं पुसत होते, त्याप्रमाणें तेथील लोक पंचांगें पाहात असतात, असें ज्या पेक्षां आहे, त्यापेक्षां अर्थातच जरी या लोकांहीं अधिक उद्योग करावा, असी गोष्ट आहे, तथापि तसें न होतां या असल्या नादान चाली, व सण यांहींकरून त्यांचा व्यापार, शेतकी आणि कारखाने यांची बढती कदापि होणार नाहीं. लोकांचा आळस दिवसानुदिवस वाढत जाईल, आणि त्यांचे सुधारण्याविषयीं जी थोडीशी आशा आहे, तिचाही अगदीं भंग होईल. ईंग्रेजीत अशी म्हण आहे, कीं काळाचे गतीचा व समुद्राचे भर्तीचा समय मनुष्यांचे इच्छेप्रमाणें खोळंबून राहात नाहीं, असें जरी आहे, तथापि कोणी हिंदु किंवा मुसलमान व्यापारी ग्रहबल किंवा मुहूर्त पाहिल्याशिवाय आपले तारवाचा नांगर ओढून तें हाकरणार नाहींत, आणि जावत्कालपर्यंत, या अशा गैरसमजुती हिंदु लोकांत आहेत, तावत्कालपर्यंत त्यांहीं कोणताही साधारण कारभार करण्यास आपणास नालायक करून ठेवले आहेत, आणि याजमुळें व्यापार संबंधी जे लाभ आहेत, ते त्यांस कधींही प्राप्त होणार नाहींत, आणि जे जे चांगले प्रसंग घडून येतात, व जे युरोपियन व्यापारी आपलें हित करून घेतात, तें सर्व हिंदु लोक व्यर्थ घालवितात. ही शकून पाहाण्याची गैरसमजूत नुसते व्यापार संबंधीच किंवा घरगुती कारभारांत आहे, असें नाहीं, परंतु राजकीय प्रकरणांतही तिचा अम्मल फार आहे. आपले राज्यावर कसेंही मोठें संकट येऊन पडो, परंतु विघ्न नाशार्थ जे उपाय योजायाचे, त्यांविषयीं किंवा लढाई सुरू करण्याविषयीं शकून पाहिल्याविना चालतच नाहीं. परमुलखी लोकांस हिंदु लोकांस जिंकणें म्हटलें म्हणजे फार आयास पडत नसत, ते जरी त्यांस स्वच्छंदपणे लुट्न

नेत, व त्यांचा वारंवार पराजय करीत, तरी ते हें सर्व मोठ्या सौम्यपणानें सोशीत, आणि अद्यापि कांहीं उपाय नेमणें जे त्यांच्या स्वाधीन आहेत, त्यांजकडेस ते अगदीं दुर्लक्ष करितात, यांत या वरल्या गोष्टी पाहिल्या म्हणजे फारसें आश्चर्य वाटवयाजोगें नाहीं. यास्तव जे लोक या इंग्लंडाचे सर्व राज्यांतले उत्कृष्ट भागांत राहतात, त्यांचे गुप्त गुण आणि शक्ति उजेडास आणण्यांस त्यामध्यें राजकीय फेरफार होण्याचे पूर्वी त्याचे सर्व चाली नीती इत्यादिकांमध्यें मोठा फेरफार अवश्य झाला पाहिजे. जमाबंदी व राजकीय कारभार चालविण्याचें एतद्देशीय लोकांस फार चांगलें ज्ञान आहे, यांत संशय नाहीं, कारण कीं त्यांचे धूर्तपणामुळें व शाहाणपणामुळें कित्येक हिंदु राजानीं आपलें राज्य मोठ्या प्रतिष्ठितपणें, व त्यांचे रयतेस सुखकारक होण्याजोगें केलें आहे. जो धंदा व रोजगार आपण पुढें चालविणार त्यांत लहानपणापासून पडलें असतां आपण त्यांत पुढें फार कुशळ होतों, आणि कोणतेही एतद्देशीय राज्यांत दिवाणास किंवा वजीरास जरी त्या राजानें आपला सर्व कारभार सोंपला असला, तरी तो दिवाण कोणाचेही मसलतीची मदत न घेतां त्या राज्यांतला राजकीय किंवा जमाबंदी किंवा फौजदारी कारभार इतका चांगला चालवितो कीं जरी त्यांचें राज्य ग्रेट ब्रिटन अथवा फ्रान्स देशाइतकें विस्तीर्ण असलें, तरी इंग्लंडांतले जामदार किंवा राज्यांतले दोघे चिटनीस जितके कारभारांत हुशार असतात, त्यापेक्षां तो सर्व आपले राज्यप्रकरणांत अधिक दक्ष असतो. आम्हीं जें आतां वर लिहिलें त्याचा सत्यपणा स्थापन करण्यास एतद्देशीय संस्थानांत हाल्लीं उदाहरणाचा तोटा आहे, असें नाहीं. त्रावणकोर राजाचा दिवाण सुबराव, अयोध्येचे राजाचा वजीर, आणि निजामाचा सरदार, अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत, परंतु इतकेंच नाहीं, कंपनी सरकारचे राज्यांतही देश प्रकरणीं व जमाबंदी खात्यांतला इंग्लिश कलेक्टरचे कचेरीचा कारभार बहुधा एतद्देशीय लोक चालवीत असतात, व कांहीं लबाडी इत्यादिक न होऊं देण्याकरितां एक इंग्लिश कलेक्टर मात्र त्यांजवर असला पाहिजे.

इंग्रेजी अमलांत या विस्तीर्ण देशाप्रकरणीं लहान कारभारापासुन तर मोठमोठाले कारभारापर्यंत सर्व कामें एतद्देशीय लोकांनीं चालविलीं आहेत. याची नूतन उदाहरणें प्रत्यक्ष नाहींत, अशी गोष्ट नाहीं. यास उदाहरण. गायकवाड सरकारचें राज्य १८००० मैल विस्तीर्ण असतां व त्याची दरसाल जमाबंदी एक कोटीची असतां या राज्याचा कारभार १८२०साचे सालांत धाकजी दादाजी यांहीं इतके मोठे प्रमाणिकपणानें व हुशारीनें चालविला होता कीं त्याजवर गायकवाड व इंग्रेज सरकार या दोघांचीही बाहाल मर्जी झाली. म्हैसूरचे राज्याची लांबी व रुंदी मिळून २७००० मैल क्षेत्र, हें व त्याचें दरसाल उत्पन्न २७०००००० रुपयांचें आहे. हें राज्य इतकें जरी विशाळ आहे, तरी त्याचा सर्व कारभार एकटा व्यंकटराव म्हणून जो मुख्य नेटिव कमिशनर आहे, व जो पूर्वी त्रावनकोरचा राजाचा दिवाण होता, तो चालवीत आहे. या व्यंकटरायाचा दक्षपणा, हुशारी व अनुभव यामुळें म्हैसुरांत जे इंग्रेज कमिशनर आहेत, ते फुकट दरमहा खाऊ मात्र आहेत, त्यांस कांहीं काम पाहावें लागत नाहीं. हिंदुलोकांचे कोणतेही पुस्तकांत "पोलिटिकाल इकानमि" म्हणजे राज्यव्यवस्था, हें शास्त्र जसें आडम् स्मिस्थचें "वेल्थ आफ नेशनस्" नामक पुस्तकांत आहे, त्याप्रमाणें स्पष्ट लिहिलेलें नाहीं. याकरितां आम्हास त्या लोकाना राज्यव्यवस्था शास्त्राचे कांहीं नियम सांगणें अवश्य आहेत. ते हे कीं "श्रम हेंच मोठें द्रव्यसाधन होय" आणि जर मनापासून श्रम केले तर द्रव्य साध्य होईल, यांत तिळमात्र संशय नाहीं. हिंदुस्थानांतील बहुतेक प्रजा मजुरी करीत आहे. व यावरून असें दिसतें कीं त्यांचे श्रम कोणत्याही अश्या उद्योगाकडेस लावावे, कीं जेणेंकरून हिंदुस्थानांत जा जा मालाचा खप आहे, तो त्यांचे योगें एथेंच उत्पन्न होईल. सध्या एथील सर्व कापुस वगैरे जिन्नस विलायतेस जाऊन तेथें त्याचीं वस्त्रें वगैरे माल होऊन एथें येतो तेणेंकरून या देशास ज्या जिनसाचा खप आहे, तो पुरला जातो. या विषयाचा आपण आतां पुढें विचार करूं. हिंदुस्थानांत हातानें मजूरी करणारे लोक अधिक आहेत, व

याजवरून ते युरोपियन लोकांशी प्रति स्पर्धा करण्यास विशेष योग्य आहेत, ही गोष्ट सिद्ध करण्यास आम्हीं असें म्हणतों कीं हिंदुस्थानांतील सर्व प्रजेपैकीं किंवा त्याच्या ३४ जाति आहेत, त्यांपैकीं, ६ कोटि व ८० लक्ष लोक म्हणजे सर्व प्रजेंतील दोन तृतीयांश नुसते मोलमजुरी करण्याच्या उद्योगांत लागले आहेत.* इंग्रेजात मजूरदार लोक सर्व प्रजेचा तिसरा भाग आहेत. फ्रान्स देशामध्यें २/५, अमेरिकेमध्यें ३/९ याप्रमाणे आहेत. हिंदुस्थानांतले उत्पन्न केलेले उत्कृष्ट सामानाकडेस सर्व लोकांचे डोळे लागतील, व त्यांविषयीं अर्थातच खपही वाढेल, आणि या देशांत पुष्कळ मजूर लोक आहेत, व अन्नही पुष्कळ उत्पन्न होतें, व फार स्वस्त मिळतें, म्हणोन अर्थातच मग त्यांस मजूरीही थोडी द्यावी लागती, तेणेकरून या देशाची या बाबे कोणाचानेंही प्रतिस्पर्धा करवणार नाहीं. हिंदुस्थानाची स्थिति दुसऱ्या देशापेक्षां फारच विशेषेंकरून चांगली आहे. व या देशांतील सर्व साधनाचा जर उपयोग केला, व जर त्यांतील मजूर लोकानीं यथास्थित श्रम केला, तर त्यांस सर्वांस मिळून दरसाल ५० कोटि रुपये उत्पन्न होतील. म्हणजे सरासरी इंग्लंड देशाची व्यापार संबंधी जितकी जमा आहे, त्याचे दुप्पट एथें उत्पन्न होईल.

ज्या लोकांची बखर व त्यांचा आशा या विषयावर विचार करण्याचा आमचा बेत आहे, त्या बाबे आम्ही साधारण वृतांत वर लिहिला आहे. त्यांचे गुण, व फायदे आणि त्यांचे दोष, अशक्तपणा, व विलक्षण समजुती कोणकोणत्या प्रकारच्या आहेत, हेंही आपणास स्पष्ट दिसोन आलें आहे. आतां आमच्या पुढील विचारांत आम्ही त्यांची स्थिति निरनिराळे राज्यांत कोणकोणत्या प्रकारची होती, याचा शोध करूं. व हें इतकें करण्यांत आमचा निदानीं मतलब ह्यात्र आहे कीं त्यांचे मनांत उत्साह उत्पन्न करून यांहींच आपआपणास सुधारण्याचा व आपणास सुखी करण्याचा उद्योग चालवावा, व त्यांचे अंतःकरणांत आणखी असें आणून द्यावें कीं त्या सर्वांनीं एकत्र होऊन एक मसलतीनें आपले देशाचा प्राचीन व्यापार व संपदा पुनः साध्य करावी, व आपणास व आपले पुढील होणारे लोकांस उद्योगापासून काय फल प्राप्ति आहे, व श्रमापासून काय उत्पन्न आहे, व एकचितानें व मसलतीनें वागलें असतां त्यापासून काय फायदा आहे, या सर्वांचे स्मरणार्थ कांहीं तरी चिन्ह ठेवावें म्हणून त्यांहीं उद्योगास लागावें, असाच आमचा मनोरथ आहे.

गिझनीचे महामुदानें हिंदुस्थानावर हल्ला केला, त्यापूर्वींची या देशाची बखर लिहिणें हें कृत्य फार अवघड व निष्फळ आहे. प्राचीन हिंदुलोकांचे बखर लिहिणारे उघड खुशामती होते, खुशामत करण्याची प्रीती त्यांस इतकी होती कीं त्यामुळें त्यांहीं जे हिंदु राजे झाले, त्यांचा कृत्याचा मसलतीचा व विचाराचा वृतांत लिहून ठेवला आहे, तो अर्थातच खोटा व आत्मस्वार्थानें लिहिला आहे. याकरितां जो कोणी विचारी युरोपियन किंवा नेटिव ग्रंथकार असेल, त्यास या वृतांतांत गुणदोष कोणते आहेत, याचा निर्णय करणें म्हटलें म्हणजे फार अडचणी प्राप्त होतात.

खिस्ती शकाचे पूर्वी २२० वर्षांवर जे सिरियन् खिस्ती धर्म चालविणारे व दुसरे अनेक ज्युस लोकांचे कुटुंबानें त्रावणकोरांत व कोचिन शहरामध्यें येऊन वस्ती केली, त्यावरून हिंदुलोक किती नम्र, उपकारी, धार्मिक व उपद्रव न करणारे होते हें स्पष्ट दिसोन येतें—आणि याच समयास पारशी लोकांनीं

*असें पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं सरासरी पाहिलें असतां या लोकांस पुष्कळ दरमांहा मजुरी मिळती तेणेंकरून किंवा अन्न स्वस्त आहे म्हणोन ते नेहमी एकच उद्योग करितात, असें नाहीं. जर एकाद्या हिंदु मजूरकरास एक महिना रोजगार मिळाला तर त्यास तीन महिनेपर्यंत आपली उपजीविका चालेल इतकें मिळतें. जर हिंदुस्थानांतील सर्व साधनें शोधून काढलीं तर लोकांस जिनसाचा खप वाढेल व मजुरी नेहमी मिळेल असें होईल.

या सदर्हु शहरापासून १००० मैलांचे अंतरावर गुजराथेंत येऊन आपणास तिळप्राय उपद्रव न होता वस्ती केली, व तेथें पुढें त्या स्वदेशांतून पळून आलेले पारशांस हिंदु लोकांनीं जीं पुष्कळ इनामें दिलीं, व त्यांस आपला स्वधर्म चालविण्यास जी मोठी मोकळीक दिली या सर्व गोष्टींवरून असें पक्कें सिद्ध होतें कीं हिंदु राज्यांत मागें धर्मसंबंधी फारच चांगली मोकळीक होती, आणि सध्या जी हिंदुस्थानाची स्थिति आहे, त्यापेक्षां त्यासमयीं त्यांची स्थिति फारच विशेषेंकरून स्वस्थतेंत व अबादानींत होती. ज्या स्थितींत गिझनीचे महमुदास हिंदुलोक आढळले, त्यावरून असें दिसतें कीं सध्या जसे हिंदुलोक आपले स्वधर्माकडे अतिशय लक्ष देतात, त्याचप्रमाणें ते प्राचीन काळांतही देत असत. जें अनिवार द्रव्य हिंदुलोकांजवळ त्या काळीं होतें व ज्यामुळें त्यांवर परकी लोकांचे वारंवार हल्ले येत असत, हें केवळ त्यांचे उद्योगाचें आणि त्यांचे सर्व हिंदुस्थानांतील राज्यांत स्वस्थता होती, याचें चांगलें उदाहरण आहे. प्लिनि म्हणून एक ग्रंथकार होता, त्याचे बखरेचा व आलेक्झांडरचा जाणें वृतांत लिहिला आहे, त्याचे आधारावरून असें पक्कें सिद्ध होतें कीं हिंदुस्थानांतील प्रजा इजमध्यें विद्या, द्रव्य आणि शक्ति फार होती, आणि जापेक्षां या सदर्हु सांगीतलेले ग्रंथकारांतून प्रथम ग्रंथकारानें या देशाचे दक्षिण भागाचा वृतांत लिहिला आहे, आणि द्वितीय ग्रंथकारानें पश्चिम आणि उत्तर भागाविषयीं लिहून ठेवलें आहे, त्यापेक्षां असा सिद्धांत केल्यास कांहीं चिंता नाहीं, कीं या देशांतील मध्यम भागांत त्याकाळीं जे रहवासी लोक होते, तेही त्याचप्रमाणें स्तुती करण्यास योग्य होते. खिस्ती शकाचे ६४८ सांचे सालापासून किंवा इतके प्राचीन काळापासून हिंदुलोकांचा अनिवार द्रव्यामुळें त्यांवर वारंवार हल्ले येत असत, व त्यांची सर्व दौलत परराज्यांतील लोक येऊन लुटून नेत होते. याचप्रमाणें चीन लोकांनीं याविषयीं निश्चय केला, व तो सिद्धीसही नेला, तो असा कीं ते लोक आपली मोठी बळकट फौज बरोबर घेऊन गंगा नदीचे काठावर जे देश आहेत, तेथें चालून आले; व आसाम, टिबेट, आणि निपाळ, आणि लाहोर या देशांचा त्यांणीं फार विध्वंस केला. मग दक्षिणेंत मद्रासपर्यंत राज्य जिंकत येऊन व त्यास चिनापटम असें नाव देऊन त्यांहीं शेवटीं तांजोरचे राज्यावर आपली खंडणी बसविली. चिनी लोकांची अशी इच्छा होती कीं सर्व इंडियांतला व्यापार आपण आपले हस्तगत करून घ्यावा, आणि याकरितां त्यांहीं नागपटम शहरांत एक आपली मोठी वखार स्थापिली. आणि येथें आपले बांधणीचे रूढीप्रमाणें त्यांहीं एक देवालय बांधलें, व हें देऊळ अद्यापपर्यंत आहे, परंतु तें दिवसानुदिवस जीर्ण होऊन धुळीस मिळत आहे. हिंदुलोक व चिनीलोक यांचे बखरेवरून असें दिसतें कीं हा त्या चीन लोकांनीं जो इंडियावर हल्ला केला, त्यापासून लोकांचें फार अनहित झालें नाहीं, किंवा त्यापासून मग वारंवार हल्ला करण्याचा प्रकार चालला असें नाहीं, व धर्मासही किंचित देखील उपद्रव झाला नाहीं—त्या चिनी लोकांनीं या देशांतील लोकांवर फार दिवस राज्य केलें नाहीं, त्यांस शेवटीं आपली व्यापाराची वखार सोडून व त्यांचे जे पुढें व्यापार आणि राज्य संपादन करण्याचे बेत होते, ते टांकून आपले स्वदेशास जाण्याची त्यांस गरज पडली. असें वाटतें कीं हिंदुस्थानास परराजांचे हल्ले येऊन फार उपद्रव झाला होता, आणि आम्हालाही ही गोष्ट शक्य वाटती, कीं हिंदुस्थानांतील प्राचीन स्वदेशी लोक यांस ब्राह्मणानीं लवकरच आपले ताबेंत आणिले, हे ब्राह्मण मोठे बुद्धिवान् व शक्तिमान असे उत्तरेपासून या देशांत आले, व त्यांहीं आपले कुशळतेवरून व मोठे श्रमानें ग्रीक लोकांत मागें मोठे वक्ते होते, त्यांप्रमाणें आपणच शिपायाचें, व प्रधानाचें आणि धर्माध्यक्षाचें काम स्वतः एकटेच चालवीत असत. आणि त्यांहींच आपले युक्तीनें हिंदु लोकांत जाति उत्पन्न केल्या, व यावरून असें स्पष्ट दिसतें कीं हें जाति प्रकरण लोकांनीच उत्पन्न केलेलें आहे, आणि तें धर्मापासून नाहीं, यास उदाहरण हेंच कीं याविषयीं वेदांत देखील कांहीं लिहिलेलें नाहीं—याप्रमाणें जर विस्तारें करून आम्ही या देशाची बखर लिहूं लागलों, तर हें पुस्तक अतिशयच वाटेल, आणि दुसरें हे कीं

असें करण्यास आम्हांपाशीं साहित्य देखील यथास्थित नाहीं. यास्तव आम्ही जेव्हांपासून हिंदुस्थानांतले राज्यांशीं आणि इतर राज्यांशीं संबंधास प्रारंभ झाला. आणि जेव्हांपासून सत्यवादी ग्रंथकार जा जा हकीगती व गोष्टी घडल्या, त्या त्या धर्मभेद जरी होता, तरी तो मनांत न आणितां निःपक्षपातानें आणि विशेष किंवा कमी न करितां आपले दोष स्वच्छ मनानें लिहूं लागले तेव्हांपासून आम्हीं हिंदुस्थानाचा इतिहास लिहावयास प्रारंभ करूं.

महमुदाचे मागून जे गादीवर झालेले खलिफा यांणीं हल्ला करण्याचा प्रकार व जुलमानें बाटिवण्याची रूढी जी त्याचे धर्मस्थापनकर्त्यानें चालविली होती, ती लागलीच चालू केली—ते जिंकत जिंकत तार्तारी म्हणून जो मावरूलनहराजवळ देश आहे, तेथपर्यंत जिंकत गेले. हा देश लवकरच खलिफेट म्हणजे खलिफ सरदाराचें राज्य यापासून भ्रष्ट केला, आणि नंतर थोड्या वेळानेंच इस्माईल सानानी याणें तेथें एक राज्य उत्पन्न केलें, आणि त्यांणीं ८७३ यांचे सालांत बोखारा देशाचा राजा असा आपणास किताब घेतला. सुमारें शंभर वर्षांनंतर आल्पतगी म्हणून जो खोरासनचा गवर्नर होता, त्याणें राज्यावर कोणी बसावें याविषयीं तंटा पडला आहे, हें पाहून अशे संधींत आपणास स्वतंत्र संस्थानी केलें, आणि आपले राज्यास काबुल आणि कंदाहार हे प्रांत जोडले, आणि आपले राज्याची राजधानी असें जें गिझनी शहर हल्लीं ब्रिटिश सरकारचें स्थान आहे, तें ठरविलें व तें त्यांणीं फार सुशोभित केलें. ९७७ रांत आल्पतगीचे मागून सबक्तगी या नावाचा एक पुरुष जो त्याचा एक सरदार होता, तो झाला. याचा मुलगा महामुद ९९७ त गादीवर चढला. बोखाऱ्याचे राजानें माहामुदावर हल्ला केला, परंतु माहामुदानें उझबेग लोकांबरोबर मिळून बोखाऱ्याचें राज्य नाशाप्रत पावविलें; आणि नंतर माहामुद आपण मोठ्या विस्तीर्ण देशाचा राजा झाला. त्याचें राज्य सिंधुनदीपासून तर पूर्व समुद्र आणि हिमालय पर्वतापर्यंत विस्तीर्ण होतें. आपले प्रतिस्पर्धी यांचा पराजय करून हिंदुस्थानाचे देवालयांत जें द्रव्य ब्राह्मणांहीं सांचविलें होतें, तेणेंकरून आपणास मातब्बर करण्याची व आपलें राज्य सुशोभित करण्याची इच्छा जी महामुदाचे मनांत निरंतर पूर्वीपासूनच होती, ती जागृत होऊन त्याणें असा निश्चय केला कीं आपण सर्व हिंदुलोकांस जिंकावें, व हिंदूचे धर्माधिकारी यांणीं जें द्रव्य सांचविलें होतें, तें सर्व आपण हरण करावें—महामुदाचे गुणही हे बेत पार पाडण्याजोगे होते. इसलाम धर्मावर आपली फार भक्ति आहे, असें व न्याय ह्मणून काय पदार्थ आहे हें आपणास पक्कें समजतें, असें तो लोकांस दाखवीत होता, परंतु त्याचे वर्तणुकेवरून असें स्पष्ट दिसतें कीं त्यास इतकें उद्युक्त करण्यास कारण त्याचा आत्महिताचा व क्रूर रीतीनें जुलूम करण्याचा मसलतीच होत्या, आणि हिंदु लोकांस आपले मुसलमानाचें धर्मांत बाटवणें व दुसरी कोणतीही गोष्ट करणें याकडे त्याचें अगदींच लक्ष नव्हते. परंतु तें सर्व द्रव्यसाधनाकडे लागलें होतें, आणि ह्मणूनच कोणत्या साधनानें तें साध्य करावें, याकडे त्याचें अगदीं दुर्लक्ष होतें. माहामुदानें हिंदुस्थानांत ज्या बारा खेपा केल्या, त्यांतून एकांत देखील त्याणें एक हिंदु बाटविला, अशी गोष्ट झाली नाहीं, आणि "तुम्ही बाटा नाहींतर तरवारीनें आम्ही तुमचा वध करूं" अशीं जीं खलीफचे सरदार हजारो लोकांजवळ बोलणी करीत तींही त्याणें कधीं केलीं नाहींत, त्यांचा सर्व खेपा लूट नेण्याकरितां मात्र त्याणें केल्या, व माहामुद आपल्या राजधानीस परत विजयी होऊन जात असतां दर खेपेस एक मोठा उंटांचा व घोड्यांचा द्रव्यानें भरलेला जमाव व हजारों स्त्रिया बंदिवान धरून जात असे, आणि त्यास गिझनीचे भर रस्त्यांत जसें मनास येईल, त्याप्रमाणें गुलामासारिखें विकून टाकीत असे—द्रव्यवान् व सुंदर असें जें लाहोरचें राज्य त्यावर सबक्तगी याणें एकदां हल्ला केला होता. जांत लाहोरचा राजा जयपाळ याचा पराजय झाला होता, परंतु या मागील विपत्तींतून जरा सुटल्यामुळें त्याणें पुनः एकदां स्वतंत्रपणाचा झेंडा उभारिला, त्याचा बेविश्वासामुळें त्यास शासन करावें, असा महमुदानें निश्चय करून लाहोरांत एक मोठी फौज घेऊन आला, आणि

जयपाळाचा पराजय केला, आणि त्यास व त्याचे बरोबरीच गळ्यांत मोठ्या हिऱ्यांच्या कंठ्या घातलेले असे १५ सरदार यांस बंदिवान केले. रानटी तथापि शौर्यवान् असा जो जयपाळ याणें आपला दोनदां पराजय झाला, व आपली फौज गिझनी लोकांबरोबर लढण्यास अशक्त आहे, त्यामुळें झाला, व शत्रूंचा जय आहे, असें पाहून आणि आपले कीर्तीस बट्टा न लागावा, म्हणून एक मोठी चिता तयार केली, व तिच्या ज्वाळांत आपण उडी घेतली, कीं जेणेंकरून आपणास शत्रूंपासून अपमान प्राप्त होणार नाहीं, अथवा आपले फौजेचा पराजय झाला, असें आपल्ये दृष्टीस पुनः पडणार नाहीं. जयपाळचा मुलगा आनंदपाळ याणें आपले बापाचे नाश झाले होते, ते पुनः नीट करण्याकरितां व आपले फौजेस नीट कवाईत शिकविण्याकरितां गिझनीचे ताब्याखालीं लाहोरचें राज्य चालविलें—आनंदपाळानें दिल्ली, ग्वालेर, कनोज, अजमीर, व दुसरे शहरचे राजे यांशीं स्नेह करून आपला स्वतंत्रपणा पुनः साध्य करण्याकरतां आणि गिझनीचे महमुदानें जें आपलें धन हिंदुस्थानांतले पवित्र देवालयांतून नेलें होतें, तें पुनः परत आणण्याकरितां निश्चय केला. पूर्वी हिंदुस्थानांत कोणतीही मार्गे फौज जमविली होती, तिजपेक्षां अतिशय मोठी फौज मिळवून आनंदपाळानें आपणच पहिल्यानें शत्रूंवर हल्ला करावा, असा निश्चय केला. तो सिंधुनदी उतरून जाऊन पेशावराचे मैदानांत येऊन पोंचला. ही अशी मोठी फौज पाहून गिझनीचे लोकांचे मनांत भय उत्पन्न झालें, परंतु शेवटीं त्यांहीं आपली फौज जमवून असा भयंकर शत्रु यास मैदानांत जाऊन गाठण्यास तयारी केली. चाळीस दिवसांनंतर लढाई मोठे निकरानें चालू झाली, आणि जरी लाहोरचे राजाचे शिपायानीं आपले बाणेंकरून पुष्कळ शत्रूंचा नाश केला, तथापि गिझनीचे लोकांनीं मोठ्या धैर्यानें सामोरे होऊन महामुदाचा शेवटीं त्या आनंदपाळास एक विलक्षण गोष्ट घडून आल्यामुळें जय जाहाला. ज्या हतीवर लाहोरचा राजा होता, त्यास एक तोफेचा गोळा लागल्यामुळें तो बुजला, व पळत सुटून त्या सरदारास लढाईचे समरंगणातून दूर घेऊन गेला. हें पराजय झाल्याचें लक्षण असें लोकांनीं मानिलें, व त्याची सर्व फौज आपधाकल्याप्रमाणें होऊन मोठ्या धांदलीनें पळूं लागली. त्या गिझनी लोकांनी त्याची पाठलाग करून त्यांतून २०००० मनुष्यांस ठार मारिलें, व त्यांहीं पुष्कळ हत्ती कैद करून आपण मीमगडाकडेस चाल केली. या शहरांत कांही योडेसे ब्राह्मण आपले देवालयाचें संरक्षण करीत होते, व यावरून ते देवालयाचें संरक्षण करीत होते, व यावरून तें आपणास अनायासें मिळालें, असें जाणून त्या लोभी माहामुदानें तेथें चाल केली, व त्या शहरांतून एक कोटि रुपये घेऊन गेला. इंडियांतील द्रव्यास्तव तृषाक्रांत होत्साता माहामुदानें ठाणेश्वरास वेढा घालण्याचा निश्चय केला. हें शहर त्यावेळेस मोठें पवित्र स्थान व द्रव्यवान् असें होतें. त्याणें सर्व देवालयांतल्या मूर्ती फोडून टाकल्या व त्यांतलें सर्व द्रव्य व जवाहीर हरण करून घेऊन जाता जाहाला. त्याणें दिल्लीचे राजास, आपणास ठाणेश्वर जिंकण्यास कांहीं प्रतिबंध केला होता, म्हणून शासन केलें, आणि दिल्लीचें राज्य घेऊन त्यांतील सर्व हिराऊन नेलें, आणि त्याणें ते राज्यही आपले गादीस मिळविलें असतें, परंतु लाहोर सरकारामुळें तो तें करूं सकला नाहीं, का झणाल तर तो लाहोरचा राजा आपले देशाचे शत्रूस मोठ्या निकारानें अडथळा करण्यास आपले मदतींत नेहमी तत्परच होता, व याकरितां तिचा आपण थोडा विचार करावा असें नाहीं. आनंदपाळ याचा धूर्तपणा आणि त्याचा लढाईचा कामांत व सरकारी कामांत कुशळपणा यांमुळें माहामुदाचा ईंडिया जिंकण्याचा जो बेत होता त्यांत यास एक मोठा प्रतिबंध झाला. नंतर महामुदानें मथुरा शहर जें मोठें द्रव्यवान् व विशाळ होतें, तें लुटण्याकरितां व त्याचा नाश करण्याकरितां जी स्वारी केली, तिजपासून एक मोठा या काबुलचे लुटारू लोकांचे बखरेंत शक उत्पन्न झाला, असें म्हटल्यास कांहीं चिंता नाहीं. याचें जें शहर होतें त्यांत जे मोठाले वाडे होते त्यांची शोभा पाहून तो आश्चर्ययुक्त होत्साता (विष्णूचा अवतार कृष्ण) आपण मागें

जाते समयीं त्याणें असा निश्चय केला कीं ज्या मोठाले वाड्यानीं ठाणेश्वर व मथुरा हीं शोभायमान झालीं होतीं, त्याप्रमाणें आपली राजधानी आपण बांधावी, आणि सुमारें पांच वर्षांनंतर गिझनी शहर सर्व पूर्व दिशेकडले शहरापेक्षां आणि खलिफाची जी राजधानी बगदाद शहर यांहीपेक्षां मोठें सुशोभित जाहालें. सुमारें १०२० वे सालांत आणि आनंदपाळाचे मरणानंतर लाहोरचा पराजय होऊन तें गिझनीचे राज्यास मिळविलें, आणि माहामुदास नंतर आपले हिंदुस्थान जिंकण्याचा प्रयत्नांत कोणी प्रतिबंध करील असा राहिला नाहीं, यास्तव महामुदानें १०२४ त गुजराथ व कोंकण जिंकण्याचा बेत केला. हा मुसल्मान सोमनाथापर्यंत चाल करीत आला. या शहरांत एक अतिशय मोठें देवालय व सर्वांपेक्षां विशेष द्रव्यवान असें होतें. या ठिकाणीं त्या हल्ले करणाराचा अगदी नाश झाला असता, परंतु हिंदु लोकांचा अशक्तपणामुळें व त्यांणीं यहुदी लोकांसारखे आपले खोटे धर्माचा आपणावर अंमल चालूं दिला त्यामुळें आणि आपले स्वतांचे आळसामुळें व त्यांस सूज्ञपणाचें धैर्य नसल्यानें ही अशी गोष्ट न होतां ते आपणच नाशाप्रत पावते झाले. गुजराथेंतून निघण्याचे पूर्वी महमुदानें एका गरीब ब्राह्मणास तेथें राज्यावर बसविलें. परंतु लोकांनीं लवकरच एक बंड उत्पन्न करून मागल्या राज-वंशांतील एकास गादीवर बसविला. १०३० वे सालीं महमुद खोरासानाहून परत आल्यावर दुखणाईत पडून ६३ वर्षांचें वय असतां व ३३ वर्षे राज्य करून मरण पावला. महमुदाचे मागून जो मसाउद गादीवर चढला, त्याणें किंवा त्याचेही मागून जो झाला, त्याणें इंडिया जिंकून ती सर्व लुटून नेली असती, परंतु एशियांतले उत्तर देशांतून वारंवार दक्षिणेस हजारो ज्याना घरें नाहींत, व रानांत भटकणारे अशा लोकांच्या टोळ्या येत. (यास उदाहरण तुर्की लोक इत्यादि) तेणेंकरून तें त्याचानें होऊं सकलें नाहीं. याशि गिझिनींतले लोक लढण्यास अशक्त होते त्यांणीं शेवटीं गिझनीचा वंश केवळ लहान सरदाराप्रमाणें करून टाकिला. आणि दोनशें वर्षेपर्यंत जय मिळवित त्या लोकांनीं आपले शस्त्राचें भय हिंदुस्थानांतले देखील पुष्कळ भागांत पसरिलें. गिझनीचा वंश नंतर याप्रमाणें नम्र व त्यांचा असा मोड झाल्यामुळें आपआपल्यांतच तंटे होऊन लवकरच ११५२ ना मध्यें तें राज्य लयाप्रत पावतें झालें. घोरी लोक यांणीं दिल्लीवर चाल करून येऊन आपणास जे गिझनीचे लोकानीं उपद्रव केले होते, त्यांचा यथास्थित सूड उगविला, आणि गाथ लोकांनीं जसें रोम शहर लुटलें, त्याप्रमाणें तें शहर लुटून तें त्यांणीं सात दिवसांनीं जमीनदोस्त केलें.

गिझनीचा वंश नाशाप्रत पाववून घोरी लोकांनीं हिंदुस्थान हस्तगत करून घेण्याचा निश्चय केला. महमद म्हणून एक या लोकांत होता, त्याणें एक मोठी फौज जमा करून अजमीर प्रांतावर स्वारी केली, व तो लवकरच हस्तगत करून घेतला. दिल्लीचा राजा जो नेहमी हिंदु लोकांचे संकटनिवारणार्थ पुढें असे, याणें आपले आसमंतांतले राजांसी स्नेह करून एक मोठी फौज जमा केली, आणि अजमीरचे राजास सोडिवण्यास मोठे त्वरेनें धांवत आला. ही इतकी मोठी फौज पाहून मुसल्मानाचे स्वारांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि भयाभीत होऊन त्यांतून पुष्कळ सरदार पळून गेले, आणि तो घोरी लोकांचा राजा दिल्लीचे राजाशीं द्वंद्व युद्ध करीत असतां त्याचे भुजेस एक जखम लागली, व त्यास त्याचे एका विश्वासु चाकरानें मोठ्या प्रयत्नानें त्यास समरंगणांतून उचलून नेलें. आपला जो नाश झाला, तो पुनः साध्य करण्याकरितां एक वर्ष गेल्यानंतर आपली पुनः सर्व फौज मिळवून पहिल्यासारिखा शक्तिमान झाला. त्या समयीं हिंदु लोक म्हणजे आळसानें बसलेले होतें, असें नाहीं, त्यांहीं नवे पुष्कळ स्नेह करून एक मोठी फौज जमा केली, व त्यांतून सर्व मनुष्यांस आपला धर्म संरक्षण करण्याची बुद्धी होती, आणि त्या सर्वांही गंगेचें उदक हातांत घेऊन शपथ घेतली होती कीं एक जय कीर्ति किंवा प्रतिष्ठा मिळवावी, अथवा मृत्यूचे तोंडांत पडावें, या अशा लोकांचे फौजेचे साहित्यानें हिंदु लोकांनीं सर्व मुसल्मान लोकांचे जमावाचा नाश करून टाकला असतां, परंतु

रक्ताचा प्रवाह लढाई करून जितका आपल्याचानें चुकवेल तितका चुकवावा, या बुद्धीनें हिंदु राजा यार्णे एक आपले शत्रूस पत्र पाठविलें, व त्यांत असें लिहिलें होतें कीं तुम्हीं सर्वांहीं आतां मार्गे हटून हिंदुस्थानांतून निघून जावें, व हें न ऐकून जर पुढें चाल करीत आलेत, तर आमचे स्वारानीं व फौजेंतले लोकांनीं जी शपथ घेतली होती, ती आम्ही सिद्धीस नेऊं. त्या पत्रांतील हें असें धीटपणाचें वाक्य पाहून मुसलमान लोकांस कांहीं भय वाटलें, आणि त्यांतील जो मुख्य होता, त्यार्णे असें उत्तर दिलें कीं जापेक्षां मी आपले भावाचे आज्ञेवरून लढाई करण्यास आलों आहें, त्यापेक्षां त्याचे हुकुमा-वांचून माझानें मागें जाववत नाहीं, आणि याकरितां तो हुकूम घेऊन पोंचेतोंपर्यंत तुमचा व आमचा सल्ला असावा. हिंदु लोक मूर्खपणानें आपणावर आतां सल्ला आहे, तोपर्यंत कोणी हल्ला करणार नाहीं, असें समजून ख्यालीखुशालींत पडले, आणि यावरूनच मुसलमान लोकांनीं त्यांवर एकाएकीं हल्ला करून त्यांणीं त्या सर्वांस पळविलें. दिल्लीचा राजास आपला देश संरक्षण करण्याचा पराक्रम व सक्त उद्योग यावरून चांगला परिणाम व्हावा, असें असतांही त्यास आपले ख्यालीखुशालींतच असतां शत्रूनें ठार मारिला, व त्यांणीं कांहींसें पुढें जाऊन त्याची राजधानी लुटली, व तेथें एक बळकट फौज ठेवून त्याचा सरदार जो कुतब या नावाचा होता, त्यास तेथला सुभेदार केला. कुतबानें एक मोठी फौज जमा करून दिल्लीचें राज्य हस्तगत करून घेतलें, आणि या हिंदुस्थानांतले मातबर गादीवर हा पहिलाच मुसलमान बसला—महामुदानें देवालयांतील द्रव्य नेण्याकरितां पुनः एकदां प्रयत्न केला, तो असा कीं आपण हिंदुस्थानांत येत असतां आपला जो सरदार याची फौज बरोबर घेऊन काशीस चाल करीत गेला. आणि चार हजार उंटें त्या पवित्र देवालयांतील द्रव्यानें भरून तो आपले देशास परत गेला. हा त्याचा जय झाल्यामुळें त्यास हिंदुस्थानांत नऊ खेपा येऊन सर्व देवळांचा नाश करून तेथील द्रव्य घेऊन जाण्यास हिमत आली. त्याची शेवटली खेप त्याचे नाशास कारण जाहाली. तो गिझनीस परत जात असतां त्यार्णे सिंधु नदीचे कांठीं डेरा दिला. डोंगरांत वास करणारे असे कांहीं लोक होते, त्यांणीं आपले जे सोयरे धायरे महमुदाचे लढाईत मरण पावले होते, त्यांचा सूड उगविण्याकरितां एक शपथ घेतली होती, त्यांतून वीस मोठे शूर व धीट मनाचे असे सरदारानीं इतकी मोठी शपथ घेतली होती कीं, आपण या मनुष्यांचे स्वस्थपणाचा व उद्योगाचा शत्रु यास त्याचे कापांत शिरून निलाजस ठार मारूं. ते लोकांचे दृष्टीस न पडतां राजाचे डेऱ्यापर्यंत आले, व जो शिपाई तेथें पाहारा करीत होता, त्यास ठार मारून महमद जा पलंगावर निजला होता, तेथे गेले, आणि त्यांणीं त्या निजलेले राजाचे छातींत सतरा व कोणी म्हणतात बावीस घाय आपले कटारीनें केले.

दिल्लीचा सरदार कुतब यार्णे महमदाचे मृत्यूनंतर आपणाशीं व गिझनी दरबाराशीं कांहीं संबंध नाहीं, असें म्हटलें असतें, परंतु त्यालाच गिझनीचे गादीवर बसविल्यामुळें हिंदुस्थानांत त्यार्णे एक मुसलमानाची राजावळी अथवा जीस पठाणाचें कूळ असें म्हणतात, ती पहिल्यानें स्थापन केली. हलक्या कुळांतला होत्साता महमुदाने त्यास आपले फौजेचे सरदाराचें पदवीस आणल्यामुळें, आणि महमुदानें आपले क्रूर कर्मोत त्यास ल्हानपणापासून पटविल्यामुळें जी लूट करण्याचे बेत आपल्या धन्यानें चालविले होते, ती लूट केल्यावांचून त्याचानें राहवेना. त्यार्णे शेजारचीं लाहानशीं राज्यें जिंकण्यास पहिल्यानें उद्योग चालविला, आणि जर यांचा रजपूत लोकांशीं लढत असतां तर एक मोठा पराजय झाला नसता, तर बहुतकरून त्यार्णे तीं सर्व जिंकलीं असतीं. यामुळें त्यार्णे आपले सर्व प्रयत्न करण्याचे टांकून दिले, आणि नंतर आळसांत पडून व आपले दरबारचे विषयाचे छंदांत निमग्न होऊन तो १२१० चे सालांत मरण पावला. कुतब याचे मरणानंतर त्याचा जांवई आल्तमीश हा जरी आराम म्हणून एक पुत्र होता, व त्याचा जरी राज्यास दावा होता, तथापि बळानें आपण गादीवर बसता झाला. आणि जें कुतबाचे हयगयीनें राज्यास नुकसान झालें होतें, तें त्यानें कांहींसें सुधारलें. त्यानें इदल्कश आपले

सासऱ्याचा प्रतिस्पर्द्धी, व ज्याणें गिझनी शहर हस्तगत करून घेतलें होतें, त्याचा पराजय केला आणि बंगाल व बाहार देश त्याणें आपले ताब्यांत आणिले, आपले दोघे पुत्रांस या दोन प्रांताचें राज्य दिलें. हा जय झाल्यामुळें आणखी देश जिंकावा, अशी त्यास आशा झाली. ग्वालेर शहर त्याणें फार दिवस वेढा घालून घेतलें. ज्या शहरास आज दिवसपर्यंत असें मानीत होते कीं तें केवळ हिंदु धर्माचें व त्या लोकांचे संरक्षणाचें मोठें स्थानच होय. याचप्रमाणें त्याणें माळवा देश घेतला व तेथें विक्रमादित्य याची जी मोठी मूर्ती होती, ती फोडून टांकली. नंतर तो १२३६ वे वर्षांत मरण पावला. त्याची मुलगी रझिया बेगम इचे राज्यांत हिंदुस्थानास फार उपद्रव झाला. तो कसा म्हणाल तर तिचा जो प्रिय एक हपसाण देशचा जमाल्या या नावाचा एक चाकर होता, त्याचे विलक्षण व क्रूर उपदेश ऐकून त्याप्रमाणें ती चालत असे, आणि तिचा भाऊ बैराम याणें एक मोठें बंड उत्पन्न करून तिचा पराजय केला, व तिला कैद करून शेवटीं तिला त्याणें ठार मारिलें.

मागून पुष्कळ मुसलमान राजे झाले, त्यांचे राज्यांत हिंदु लोकांवर त्या मोंगलांहीं जुलूम व लूट पुष्कळ केली, आणि सर्वांकडून त्यांचा देवांचा मूर्ती त्यांणीं फोडून टांकिल्या. हें कृत्य त्यांहीं धर्म द्वेषानें केलें असें नाहीं, त्याचें कारण हेंच कीं त्या मूर्तींचे आंत जें द्रव्य ठेवलेलें होतें, तें लुटून न्यावें. १२९५ त अल्ला जास "भयंकर" असें लोक ह्मणत. त्याणें आपले चुलत्याचा वध करून त्याचे मागून आपण गादीवर बसला. आरंभींच ज्या गृहस्थानें रक्तस्राव केला. त्याचें सर्व राज्य त्याणें हिंदु लोकांवर व आपले मुसलमान लोकांवरही जुलूम व क्रूर कर्मे करून घालविलें. तो नेहमी ख्यालीखुशालींत निमग्न असे, व आपले दरबारी लोकांस मनास वाटेल त्याप्रमाणें आपला लोभ परिपूर्ण करून घेण्यास वागूं देत असे. आणि तो जेव्हां आत्मस्तुती अनिवार करीत असे, त्यावेळेस तो असें म्हणत असे कीं मी सर्व हिंदुस्थान द्वीपाचें केपकुमारीपर्यंत जितकें द्रव्य असेल तितकें मिळवीन. त्याचे दरबारांत ही त्याचे अशे लोभीपणाचे व क्रूर बोलण्यास मान डुलविणारे पुष्कळ होते. त्याणें आपला वजीर म्हैसूर व कर्नाटक प्रांत हस्तगत करण्याकरितां पाठविला. या प्रसंगीं त्याचा बराच जय झाला, आणि त्याणें हिरे जवाहीर मिळून एक कोटि विलायती चलनी पौंड अथवा कोटि रुपये तेथून नेले.

याच वेळेस मोगल ह्मणून जे लोक होते, हे चंगेझखानाचे मागून झाले, आणि मुसलमानाचें जे मावरूल नहरांत राज्य होतें, याच ठिकाणीं आपलें एक राज्य स्थापिलें, आणि त्यांहींनंतर हिंदुस्थानचें राज्य घ्यावें, व तेथलें पठाणाचें कूळ नाहींसें करावें, अशी मसलत केली, परंतु मुसलमानानीं त्यास मोठा निकराचा अडथळा केला, त्यामुळें त्याचें अगदीं चाललें नाहीं, नंतर त्यांचा मोठा नाश होऊन ते मागें हटलें.

अल्लानें अद्यापि आपला हिंदु लोकांवर जुलूम करण्याचा प्रकार टांकला नाहीं, त्यांचा राजकन्या त्याणें बलात्कारानें नेल्या, आणि तो फार विषयांध आणि व्यभिचारी होता, ह्मणून त्याणें त्यांतून ज्या फार सुंदर होत्या त्यांस आपले राजमंदिरांत नेऊन ठेविल्या. त्याचा अनिवार व्यभिचार मध्यें कांहींसा कमी झाला होता, परंतु पुनः त्याणें दुष्कर्माचा कळस लाविला. शेवटीं त्यास त्याचे स्नेही यांतून एकानें विष घालून मारिलें. अल्लाचे मागून जे गादीवर आले त्यांची तर एकमेकांमध्यें व्यभिचार कर्मांत विशेष कोण होतो, याविषयी जशी काय पैजच लागली होती. तेही आपली दुष्ट इच्छा कोणावर परिपूर्ण करीत म्हणाल तर त्यांस जी गरीब हिंदु रयत व आश्रित सांपडले होते, त्यांचे जीवावर व मालमत्तेवर करीत. मुबारीक बादशाहा इतका व्यभिचारी होता कीं तो हिंदूचे स्त्रियांची जात, कूळ, प्रतिष्ठा आणि गुण, व पातिव्रत्य यांजकडे अगदीं लक्ष देत नव्हता—त्या सुंदर असल्या म्हणजे झालें, मग त्यांस नेऊन आपल्या दासी करण्यास मोकळीकच होती. आणि तिसऱ्या माहामुदाचा क्रूरपणा व जुलूम असा होता, कीं शतशः आणि हजारो देखील लोक त्याचे मनास द्रव येईल, असी प्रार्थना

करीत असतां तें सर्व ऐकून त्याणें त्यांचे डोळे काढून त्यांचीं शिरें आपला अघोर पराक्रम दाखविण्या-करितां भिंतीवर एका ओळीनें टांगून ठेवीत असे. पशुपक्षी इत्यादिकांवर शिकार करणें त्याणें टाकून मनुष्य जातीवरच त्यास शिकार करणें आवडत असे, आणि जर यदाकदाचित् हिंदु रयतेनें आपणावर फार जुलूम होतो, याविषयीं त्यास अर्जी केली, अथवा आम्हाजवळ शेतकी करण्यास पैका नाहीं, असें जर त्याजपाशीं म्हटलें, तर तो फार रागें भरून आपले दरबारी लोकांस बरोबर घेऊन त्या गरीब हतभाग्य हिंदूवर शिकार करण्यास निघत असे, आणि परत येऊन आपण दिल्ली शहराचा भिंती मनुष्य मस्तकांनीं सुशोभीत करीत असे.

हिंदु लोकांचे देवालयांतून बहुतेक द्रव्य नाहींसें झालें होतें, म्हणून या जुलमी राजास त्यांस आपले ताबेंत आणण्यास कांहीं उद्योग करण्यास कारण राहिलें नव्हतें. याकरितां त्याणें आतां आपलें लक्ष चीन देशाकडे लाविलें, आणि मोठी फौज हिमालय पर्वतावरून तेथें जाण्यास पाठविली. परंतु ती त्या पर्वताचे खेंडींतून जात असतां शत्रूनें त्यावर एकाएकीं हल्ला केला, आणि त्याचे फौजेचा तेथें इतका नाश झाला, कीं त्यांतून थोडेसे मात्र दिल्लीस आले. त्यांची नंतर मसलत खोरासन व बोखारा जिंकण्याची जें हिंदु लोकांपासून द्रव्य तेथें नेलें होतें, तें आपले स्वाधीन करून घेण्याची होती, परंतु आपल्या राज्यांत बंड उत्पन्न झालें आहे, असें त्यास समजल्यामुळें त्यास परत यावें लागलें. तें बंड त्याणें मोडून त्यास दक्षिण देश जो अल्लानें जिंकला होता, तो आपले ताबेंत राखावा, अशी इच्छा उत्पन्न झाली—आणि या अर्थानें त्याणें आपले राजदरबार दक्षिणेची राजधानी जें देवगड म्हणून शहर होतें, तेथें दिल्हीहून नेलें. आणि त्यास दौलताबाद असें नाव दिलें. शेवटीं जो दक्षिण प्रांत आपले हस्तगत असावा अशी त्याची इच्छा होती, त्या प्रांताचें एक स्वतंत्र राज्य झालें, आणि महमुदानें पाहिलें कीं हासन काउ या नावाचा एक उमराव होता, तो आपला प्रतिस्पर्द्धी होऊन "प्रथम अल्ला" असें त्याणें नाव धारण करून आपलें एक नवें कूळ तेथें स्थापन केलें.

सन १३५१ त महमुद मरण पावल्यानंतर पुष्कळ राजे झाले, व तिसरा फिरोझ शिवाय करून बाकीचानीं थोडी मुदत राज्य केलें, व आपले राज्यांत फार अघोर कर्मे करून जो रक्तस्राव नेहमी राजकुटुंबांत आणि राज्यांतले वजीरांत अथवा दुसरे कोणी राज्यास आपला दावा करणारे यांत तंटा होऊन होत असे, तो त्यांणीं पुष्कळ केला.

या पठाण कुळांतले राजाचे हाताखालीं मुसलमानाचा राज्याची अशी अव्यवस्था झाल्यामुळें त्यांस जिंकून आपलें नवें कूळ तेथें स्थापन करण्यास दुसरे लोकांस चांगली संधी मिळाली, आणि यावरून आपले ऐकण्यांत असें आलें कीं तैमूर म्हणून एक सरदार होता, त्याणें सिथियन लोकांची एक मोठी टोळी जमवून त्यांचा आपण मुख्य होऊन १३९७ वांत समरकंद प्रांतांतून तो बाकत्रिया देशांतले मैदानांतून चाल करीत आला. हिंदुस्थानांतला मोठा पर्वत ओलांडून व सिंधु नदी उतरून तो आपल्या पुतण्या पिरमहमेद याचे फौजेसुद्धां त्यास मिळून बातमीरचे किल्यास वेढा घालण्यात आला—त्या तैमूरानें त्या किल्याचा शस्त्रखाना शिवाय करून बहुतेक भाग घेतल्यानंतर आंत जे ५०० हिंदु लोक धरलेले सांपडले, त्यांस ठार मारण्यास हुकूम दिला. या अघोर व रानटी कर्मामुळें आंत जे शस्त्र-खान्यांत होते, त्यांस मोठा क्रोध येऊन त्यांणीं त्या रागाचे आवेशानें आपल्या बायका, पोरें यांचा वध केला, आणि त्या शस्त्रखान्यास आग लावून देऊन आपण शत्रूंचे अंगावर एकाएकीं जाऊन पडले—या सर्व अशा शूर व धीट सरदारांचा अगदीं वध होण्याचे पूर्वी त्यांहीं शत्रूंतून हजारों असामींस ठार मारिलें, यामुळें तैमुरास इतका खेद झाला कीं त्याणें आपल्या नेहमीचा रानटीपणानें जे बंदिवान सांपडले होते, त्या सर्वांस भिन्नाभिन्न कांहीं न पाहतां ठार मारावें, असा हुकूम दिला. नंतर तैमुरानें आपला मार्ग दिल्लीकडेस चालविला, आणि जा प्रांतांतून तो जात असे, तो तो प्रांत अगदीं ओस पाडून

व हजारों हिंदु लोक बंदिवान करून बरोबर घेऊन जात असे. हे बंदिवान लोक कांहीं कारण पाहून आपल्यावर फिरतील, असें भय वाटून त्याणें त्या सर्वांस मारून टाकण्याचा उपाय नेमला व आपले फौजेचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां अथवा शत्रूंचे हृदयांत आपणाविषयीं भय उत्पन्न करण्याकरितां त्या बंदिवानांस त्याणें हाल हाल करून मारिलें; आणि याप्रमाणें त्याणें एक लक्ष मनुष्यें खाटक्यासारिखीं निर्दयपणानें मारिलीं.

दिल्लीचा राजानें घोडेस्वार आणि पायदळ मिळून ६०००० चांगली कवाईत शिकलेली फौज घेऊन आपले राजधानींत शहराचे दरवाजे लावून स्वस्थ बसला, आणि तैमुरानें त्या शहरास फार दिवस वेढा घालून ते आपले हस्तगत करून घेणें ही गोष्ट अशक्य आहे, असें समजून त्या राजाचे फौजेस शहराबाहेर काढण्यास प्रयत्न केला, व तो प्रयत्न सफळही झाला, तें असें कीं महमुद आपले फौजेसुद्धां शहराबाहेर एकाएकीं निघाला, परंतु त्या बळकट आणि कुशल सिथियन लोकांनीं त्या सर्वांचे लागलेच तुकडे तुकडे केले. महमुद नंतर गुजराथेस पळून गेला, आणि तैमूर याचे राजधानींत शिरला, व हिंदु लोकांनीं आपले फौजेस फार उपद्रव केला, म्हणून त्याणें त्या शहरास आग लाऊन दिली. यावरून तेथले हिंदु लोकांनीं एक मोठा जमाव करून आपल्या बायका पोरांचा पुढें अपमान न व्हावा, याकरितां अथवा आपल्या मुलग्यांचा पातिव्रत्याचा भंग न व्हावा, याकरितां त्या सर्वांचा त्यांणीं वध केला. आणि एकाएकीं शत्रूंचे आंगावर पडून मोगल लोकांचा पुष्कळ नाश केला, परंतु हे लोक मोठे शूर व बळकट होते, यामुळें त्यांनीं आपले शत्रूचा पराजय केला. या प्रसंगीं दिल्ली शहराचे सर्व रस्त्यावर रक्ताचा केवळ पूर आला, आणि शतशः धरलेले हिंदुस शहराबाहेर काढून शत्रूने त्यांचा लागलाच रानटीपणानें वध केला. याप्रमाणें पुष्कळ अघोर कर्मे हिंदुस्थानाचे दुसरे भागांत करून तैमूर याचें लक्ष शेवटीं सिंधुनदीचे पश्चिमेकडेस लागलें—नंतर महमुद मरण पावल्यानंतर सन १४१३ त मुल्तान शहराचा सरदार होता. त्याणें दिल्ली शहर जें आतां पुनः बांधलें होतें, त्याचा गादीवर आपणास बसविलें, आणि तेथलें राज्य त्याणें तैमुराचा जसा काय आपण वकीलच या प्रमाणें चालविलें. हा मुलतानचा सरदार याचें नाव चिझन असें होतें. याचा राज्यांत बंगाल व गुजराथ देश आपले हिंदु राजाचेच हाताखालीं होते, आणि दक्षिण देशही पहिल्या प्रमाणेंच स्वतंत्र होता, आणि मोगल लोकांचे राज्यांत नुसतें दिल्ली, आग्रा, आणि उत्तर हिंदुस्थानांतले दुसरे कांहीं प्रांत होते.

बाल्य वयांत तो लढाईचे कवाइतींत फार कुशळ झाला होता, व त्यास पुढें नाना प्रकारची विपति प्राप्त झाल्यामुळें तो फार अनुभवीक पुरुष झाला होता. त्याचा त्याचे स्वदेशचे लोकांनीं फार अनादर केला. तो असा कीं त्यास त्यांहीं त्याचे राज्यांतून देखील हांकलून दिला, परंतु पुढें त्याणें काबूल जिंकून व पक्का निश्चय करून दिल्लीवर चाल करून आला. बादशाहा इब्राहीम याचे फौजेचेपेक्षां दसपट अधिक फौज घेऊन त्यास सामोरा झाला, परंतु बाबरचा मोगल लोकाचा फौजेनें आपली एक हार चोळ उभी करून राजाचे फौजेचा पराभव केला, व या लढाईत इब्राहीम मरण पावला. मग त्याची फौज दुर्मुख होऊन पळून गेली. नंतर बाबरास सन १५२६ वे सालीं दिल्लीचें राज्य मिळालें, व यापासून पठाणाचे कूळ नाहींसें झालें. परंतु अद्यापीही पठाण कुळांतील कांहींसे राजाचें प्राबल्य होतें—या सदरहू इब्राहीम बादशाहाचा माहमुद या नामेंकरून कोणी एक बंधु होता, त्याणें कित्येक रजपूत सरदार व ठाकूर यांची स्नेहकरून व त्याप्रमाणें १००००० मनुष्ये जमा करून आपण त्याचा प्रमुख झाला, आणि त्याणें बाबरावर हल्ला करण्याचा निश्चय केला. जरी या प्रसंगीं बाबराची फौज फार थोडी होती, तरी त्याणें या लढाईत मरावें किंवा विजयी व्हावें, असा निश्चय केला, आणि महमुदाचे फौजेंत बहुतेक हिंदु होते, म्हणून बाबरानें आपले मुसलमान फौजेंत सर्वांसमक्ष असें सांगीतलें कीं त्यांहीं या प्रसंगीं आपले मोठे धर्मोत्साहानें व कुराण पुस्तकाचे आज्ञेप्रमाणें या कामास झटावें. त्याचे सांगण्याप्रमाणें

त्याचे धर्मिष्ठ फौजेनें आपलें काम बजावलें, व बाबरानें याप्रमाणें आपलें शत्रूचे फौजेचा पराभव केला. बाबरानें ५ वर्षे राज्य केलें. व त्याचे राज्यांत तो असताना अगदीं स्वस्थता नव्हती, व हिंदु लोकांनींही फुकट आपले नुकसाना बाबे पुष्कळ प्रयत्न केले. हुमायूं या नामेंकरून बाबराचा पुत्र आपले बापामागून गादीवर बसला. परंतु या दुर्भाग्यानें त्यास लवकरच राज्य सोडून जाण्यास केलें, व तो जवपर्यंत इराण देशास जात होता, इतक्यांत राणीस एक पुत्र झाला. जो अकबर इतका प्रख्यात आहे, तो हा. हुमायू पुनः आपले राज्य स्वाधीन करून घेऊन आपल्या बापाचे दिलीचा तक्तावर एक वर्षपर्यंत राज्य केलें, परंतु यानंतर त्यास एकाएकीं मृत्यु प्राप्त झाल्यामुळें १५५६ चे सालीं त्याचा मुलगा अकबर राजा झाला.

अकबर पाच्छा याचे राज्यांत हिंदुस्यानचे लोकांस कांहींसे सौख्य प्राप्त जाहालें, आणि त्यांस जुलमानें बाटविण्याचा प्रकार कांहींसा कमी झाला. मागील राजाचे जुलमानें मनस्वी बसविलेले करही कांहींसे काढून टाकले, प्रति मनुष्यावर जो कर होता, तो व झाडें, गुरें, जमीन इत्यादिकांवर जे कर बसविलेले होते, ते काढून टाकले. एकावन्न वर्षे राज्य केल्यावर अकबराचे मागून त्याचा मुलगा सलेम या नावाचा झाला, व राजतक्त मिळावें या हेतूनें जे पुढें या राजामध्यें आणि त्याचा मुलगा खसरू यांमध्यें मोठे तंटे व लढाया झाल्या, त्यामुळें पुनः पूर्ववत् हिंदुस्थानाची दुर्दशा झाली. शेवटीं खसरूचा पराजय होऊन त्यास सक्त कैद केलें, व अंतीं त्याचा वध त्याचा बंधु शाजिहान याणें केला. सलेमानें पुढें मोठ्या बढाईनें आपले नामास जिहांगीर असे किताब लाविलें, या शब्दांचे अर्थ सार्वभौम असे होते. आपले लोभयुक्त अर्थ सिद्धीस जावे, याकडे त्याचें लक्ष होतें त्यामुळें त्याणें आपले हिंदु रयतेची स्वस्थता अगदीं मोडली, व त्यांचें फार अनहित केलें, शेवटीं आपलें शरीर सुशोभित करण्याकरितां त्याणें त्यांची सर्व हिरे जवाहीर इत्यादि संपदा लुटून नेली. या जिहांगीर पाच्छा याचें राज्यांत दोघे इंग्रेजी कामदार जशी पोर्टुगीस लोकांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मोकळीक होती, तशी आपणास मिळावी म्हणोन आले होते. क्यापटेन हाकिन्सचा जिहांगीरानें मोठ्या डौलानें आदरसत्कार केला, परंतु राजास त्याचे वजीरानें व तेथें जे यहुदि पाद्री होते, त्यांहीं असें सांगितलें कीं त्या इंग्रेज लोकांस अगदीं मदत करूं नये, व त्यांस पुनः हिंदुस्थानांत येऊं देऊं नये. जरी याप्रमाणें राजानें कबूल करून पुढें कोणास या देशांत येऊं देऊं नये, असा पक्का निश्चय केला, तरी सर-टामसूरो या नावाचे साहेबानें रजपूतस्थानांतून अजमीरास राजाचे दरबारांत जाण्याचा निश्चय केला. याचा उद्योग कांहींसा सफळ जाहाला, परंतु जाहांगिराचा मुलगा व त्याचा वजीर या दोघांनीं असा निश्चय केला कीं जी त्या साहेबास सनद मिळाली होती, ती रद्द करावी. या गर्विष्ट बादशाहाचा मृत्यु फार समीप आला, तो राजा फार गर्विष्ट होता व आपली स्त्री नुरजहान इचे मताप्रमाणें चालत होता, हेंच पुढें याचे नाशास कारण जाहालें. आपलें बापास पदच्यूत करून आपण गादीवर बसावें म्हणून शाहाजिहानानें याविषयीं एक प्रयत्न केला, परंतु राजाचे सरदाराचा मोठा शूरत्वानें व कुशळतेनें हा याचा प्रयत्न निष्फळ झाला. आपले संकट समयीं उपयोगी पडला हें न जाणून राजानें आपले उपकार करणारास मारून टांकण्याचा बेत केला, परंतु त्या सरदाराचे शाहाणपणामुळें त्याणेंच राजास कैद केला, परंतु शेवटीं त्याणें कृपाळू होऊन राजास पुनः आपले गादीवर बसविला. आतां नुरजहान इणें या सरदारास मारून टांकण्याची राजांस मसलत देऊन त्याविषयीं मोठा आग्रह धरिला. या सरदारानें शेवटीं कंटाळून व जुलुमापासून देशाचें संरक्षण करावें म्हणून असें ठरविलें कीं शाहाजिहानानें आपले बापास पदच्यूत करावें. त्या राजास खिस्ती शकाचे १६२७ चे सालांत मृत्यु प्राप्त झाल्यामुळें त्यांस हा ठरवलेला उद्योग पार पाडण्याची गरजच पडली नाहीं. जिहांगिराचे मागून त्याचा मुलगा शाहाजिहान बादशाहा झाला. या राजानें जी आपले भावबंदांस मोठी इजा दिली, यावरून जात मोठाले पुढें रक्ताचे पूर वाहतील, अशा लढाया होऊन याचा राज्याचा फार मोड होईल. हें हिंदु लोकांस

लवकरच दिसोन आलें. लोदी म्हणून जो पठाणाचे कुळांतला एक उमराव होता, त्याचा हिंदु लोकांनीं पक्ष धरिला, आणि या उमरावानें गोवळकोंडें आणि विजापूरचे राजाशी स्नेह करून बादशाहा याचे फौजेवर चाल केली, परंतु त्याचा पराजय झाल्यामुळें तो माळव्यांतून पळत जात असतां त्याचा वध यानंतर लवकरच झाला. हा आपली गादी घेईल, म्हणोन या उमरावानें जो प्रयत्न केला त्याचा मोड केल्यानंतर शाहाजिहानानें शांतपणें पुष्कळ वर्षे राज्य केलें; परंतु त्याचे चार मुलगे बापास पदच्यूत करून आपणास गादी मिळावी, म्हणून प्रयत्न करीत होते, तेणेंकरून त्याचे स्वस्थपणाचे सौख्यास विघ्न झालें. आज दिवसापर्यंत मोंगल कुळांतील बादशाहानीं आपला धर्म हा मोठा गंभीर शास्त्रविषय होय म्हणून त्याचें त्यांहीं फारसें अगत्य दृष्टोत्पतीस आणिलें नव्हतें — परंतु शाहाजिहानाचा एक मुलगा औरंगजेब म्हणून होता, त्याणें आपल्या फौजेंत बहुतकरून मुसलमान लोक होते, असें पाहून मी एकफकीर आहें, असें आपणास म्हणवूं लागला, आणि तो लोकांस असें सांगूं लागला कीं जा ख्याली-खुशालींत राजदरबार निमग्न असतें, त्यापेक्षां मला ईश्वर भक्ति फार आवडती, व अशा दांभीकपणाचे भाषणानें त्याणें राजाची सर्व मुसलमान फौज आपले तर्फेची करून घेतली, यावरून तो हिंदु प्रजेस फार अप्रिय झाला, व याजमुळें हिंदु लोकांनीं शाहाजिहानाचा दारा नामक वडील पुत्र होता, त्याचा पक्ष धरिला. याप्रमाणें धर्मसंबंधी दोन विरुद्ध पक्ष झाल्यामुळें देशाची पुढें लढाया होऊन फार खराबी झाली. शेवटीं औरंगजेबानें सर्व प्रतिबंध मोठ्या जंगलीपणाचे क्रौर्यानें व फितुरीनें दूर करून राजछत्र आपले डोकीवर असण्याकरितां आपणास जय मिळविला.

औरंगजेब बादशाहा याचें राज्य फार सौम्य व सिद्धदायक होतें, असें मुसलमान ग्रंथकारानीं व या ग्रंथावरून इंग्रेजी नकल करणारानीं पुष्कळ तऱ्हेनें वर्णन केलें आहे, परंतु वास्तवीक पाहतां तें फार क्रूर व नाशकारक होतें. त्याचा राज्यांत हिंदु रयतेस फार उपद्रव व यांवर अनिवार जुलूम या निर्दय राजानें केला, व मुसलमानाचे धर्माकडे तो उगीच दांभीक भक्ति दाखवीत असे, म्हणून व आपलेकडे आपले मुसलमान फौजेची बाहाल मर्जी व्हावी म्हणून त्याणें जुलमानें बाटविण्याचा प्रकार उघड चालविला होता, यामुळें शेवटीं नवेच कुळांतील राजे उत्पन्न होऊन त्यांहीं या अशेले राजकुळांतल्या पापास व सर्व मनुष्य जनाचे निंदेचे पात्रास यथायोग्य शिक्षा केली.

माळवा, खानदेश व विजापूर मिळून जें माहाराष्ट्र लोकांचें राज्य झालें होतें, तें उतर कोंकण घांटापासून विंध्याद्री पर्वतापर्यंत भिन्न भिन्न जागेचे सोईनें व सौख्यानें भरपूर होतें, आणि या अशेले राज्यभोक्ते माहाराष्ट्र लोकांनीं मोठ्या शौर्यानें मोंगलाचे फौजेनें जे त्यांस जिंकण्यास प्रयत्न केले होते, त्या सर्वांचेंही यथायोग्य निवारण केलें, व या देशांत डोंगरामुळें खाडे, खाची पुष्कळ होत्या, म्हणून मोगलाचानीं या लोकांची पाठलाग करून त्यांस डोंगर, गुहा इत्यादिकांकडे पळवून लाववलें नाहीं. यावरून हे डोंगरांतले राहाणारे लोक मोगलांची फौज आपले देशांतून कांहीं नाश करून गेल्यावर पुनः पूर्ववत् मोठ्या शौर्यानें लढण्यास उभे राहात. मोगल लोकांचें राज्यांत जी अव्यवस्था चालली होती, ती पाहून तेथे एकादें नवेंच राजकुळ स्थापन करण्यास या मराठे लोकांस, जातीनेंच मोठे बळकट, शूर, व धर्म संबंधाविषयीं म्हणाल तर मोठे धर्माभिमानी होते, म्हणून एका नुसते सरदाराचीच गरज होती, ती अशी कीं ज्यामध्यें लढाईचे कौशल्य व शौर्य हीं दोन्ही असावी. उदेपूरचा राजाचे कुळांतला एक शिवाजी नामक पुरुष होता. त्यामध्यें हे सर्व गुण विशेषेंकरून होते. हा १७ वर्षांचा असतां त्याणें माळवी लोकांची एक टोळी जमवून आपले लूट मिळविण्याचे उद्योग चालू केले. हा लुटण्याचा प्रकार एशिया खंडातले सर्व डोंगरी लोक मार्गे चालवीत होते. शिवाजी हा मोठा बंडखोर असें जाणून त्याचा मोड करावा, या हेतूनें विजापूरचे राजाची फौज समरंगणांत जमा झाली, यामुळें शिवाजीस कांहींसें नम्र होऊन सल्ला मागण्याची गरज पडली. नंतर विजापूरचे फौजेचा

सरदार अफझुलखान त्याची भेट घेण्यास आपण इच्छितों, असें शिवाजीनें सांगून पाठविलें. हें बोलणें त्या सरदारानें मान्य केलें. मग शिवाजीनें आपले विश्वासु लोकांस किल्ल्याचे समोरचे रानांतले एके झाडींत लपवून ठेवून आपण स्वतः एक शिपासी बरोबर घेऊन त्या सरदारास भेटण्यास गेला. शिवाजीनें आपलें रुवाचे आंगरख्याचे आंत बाहेरून न दिसे असे कवच घातलेलें होतें. आणि डोक्यांतही पागोठ्याचे आंत एक कवच होतें. ज्याणें त्याचे डोक्याचे संरक्षण पुढें फार केलें. त्याणें आपले हातांत वाघनखें अशा रीतीनें घातलीं होतीं, कीं जेव्हां त्याणें आपले हात लांब करावे, तेव्हां त्याची सर्व नखें ताठ समोर उभीं राहावी, व याणें आपले आंगरख्याचें आंत एक कटार लपवून ठेवली होती—शिवाजीची व अफझुलखानाची भेट होतांच शिवाजीनें आपले पूर्ववत चालीप्रमाणें त्यांस आलिंगन केलें, आणि तत्काल त्याणें जसें एकादें आस्वल मनुष्यास झोंबतें त्याप्रमाणें त्यास झोंबून त्याणें त्याचे मांसाचे आपले वाघनखेंकरून तुकडे तुकडे केले. आफझुलखानानें त्या वेळेस मोठ्या प्रयत्नानें त्याची मिठी सोडवून मराठ्यानें त्या सरदाराचे डोकीवर आपले तरवारीनें एक मोठा प्रहार केला, परंतु त्याचे शिरावर कवच होतें तेणेंकरून तो वार चुकला. नंतर शिवाजीनें लागलेंच आपले आंगरख्याचे आंतून कटार काढून व विजापूरचे सरदारावर धावून पडून त्या दुष्टाचे पोटांत तें शस्त्र भोंसकलें, आणि याप्रमाणें त्यास आपले पायांजवळ त्यास मेलेला पाडला. हा पराक्रम केल्यावर शिवाजीनें आपलें शिंग वाजविलें, त्याचा नादें करून जी त्याची फौज झाडींत लपून होती, ती बाहेर धांवत आली, आणि त्यांणीं आफझुलखानाचे बरोबर जी मंडळी होती, तिला पळविली. नंतर शिवाजीनें आपले फौजेसुद्धां पुढें धावून कोंकण आपले हस्तगत करून घेतलें. विजापूरचे राजानें आपला मराठे सरदारास जिंकण्याचा प्रयत्न व्यर्थ गेला, असें पाहून त्याणें त्याशीं सल्ला केला, व या तहाबरहुकूम शिवाजीचें अमलांत ७००० घोडेस्वार व ५०००० पायदळ राहिलें. हिंदुस्थानाचा पुष्कळ भाग आपले अमलांत आणिल्यानंतर औरंगजेबानें शिवाजीचा मोड करण्याचा निश्चय केला, परंतु या त्याचे उद्योगांत मराठे सरदाराचे शूरत्वामुळें याचा पराजय झाला. शिवाजी औरंगजेब बादशाहा याचे फौजेस जिंकून आपण स्वतः पुढें चाल करून गेला, आणि सुरत शहर जें या काळीं केवळ व्यापाराचें मुख्य स्थान होतें, तें लुटून त्यांतून नानाप्रकारचे अमोलिक धातुंचा लगडी व हिरे, जवाहीर इत्यादिक दहा लक्ष विलायती चलनी पौंडांचे किमतीचें द्रव्य घेऊन गेला. हा त्याचा विलक्षण जय झाल्यामुळें औरंगजेब याची हिंमत खचली, व त्याणें याकरितां एक मोठी बळकट बहूत जींत रजपूत लोक होते, अशी फौज शिवाजीवर पाठविली. या प्रसंगीं शिवाजीचा पराजय झाल्यामुळें तो त्या औरंगजेबास शरण गेला. शिवाजीस दिल्लीस घेऊन गेले, व तेथें त्यास कैद केलें. परंतु पुढें वेड्याचें सोंग घेऊन व मिठाईचे टोपलींत बसून तो मोठ्या युक्तीनें दिल्ली शहराबहेर निघून आला. नंतर पुनः एकदां आपले जन्म झालेले डोंगरांत येऊन पोचला. एथून मग त्याणें लूट मिळिवण्याचे उद्योगास आरंभ केला. थोडासा काळ गेल्यावर शिवाजीनें आपण मराठ्यांचा राजा, असा किताब मिळविला, व त्याणें आपलें राज्य मुंबईपासून मद्रासपर्यंत विस्तीर्ण केलें होतें, व तो खिस्ती शकाचे १६८० चे सालांत मरण पावला. या सरदाराचे मृत्यूबरोबर मराठ्यांचे राज्य नाहींसें झालें, असें नाहीं. मराठ्याची फौज दिवसानुदिवस अशी वाढत गेली, कीं ती शेवटीं अजिंक्य झाली. हा प्रकार एथें चालला आहे, इतक्यांत औरंगजेबानें आपले हिंदुस्थानांतले लोकांविषयीं वैमनस्याचा कळस केला, तो असा कीं त्याणें काशी व मथुरा क्षेत्रांतलीं देवालयें फोडून सर्व जमीनदोस्त करून टाकिलीं, व अहमदाबादेच्या देवाल्याजवळ गोहत्या करून तें देवालय त्याणें भ्रष्ट करून टाकिलें. औरंगजेब १७०७ तांत मरण पावला, त्यामुळें हिंदु लोक त्याचे राज्यांतले जुलमाचे तोंडांतून सुटले. पुढें शाहा आलम व त्याचे भावाबंदांत राज्याविषयीं लढाया झाल्या, त्याजमुळें हिंदुस्थान पुनः एकदां रक्तगंगेचें पात्र झालें, परंतु मुसलमानांत याप्रमाणें तंटेबखेडे

होऊं लागल्यामुळें मराठ्यांचे राज्याची वृद्धि होत चालली, व शाहा आलम जो औरंगजेबाचे मागून गादीवर बसला, त्याणें मराठ्यांचे राज्याची ताबेदारी कबूल केली, व दरवर्षास तो आपले जमाबंदीतून एक चतुर्थांश (जास चौथ असें म्हणत) ती त्यांस देत असे. मोगलांचा अमल नादरशाहानें त्यांजवर हल्ला केल्यानंतर दिवसानुदिवस कमी होत गेला. हा नादरशाहा एक नवाच लढाऊ होता. त्याणें सर्व राज्य आपले ताब्यांत आणिलें, व त्यावर आपली खंडणी बसविली, आणि त्याणें हिंदु लोकांचें अनिवार द्रव्य लुटून नेलें. या नव्या सरदाराचें, व त्यानंतर जो झाला, त्याचे व मराठे लोकांचें हिंदुस्थानाचे राज्याविषयी पुष्कळ भांडण चाललें होतें—परंतु या दोहों पक्षांमध्यें राज्याविषयीं असे तंटे चालले होते, तो इतक्यांत तिसरेच अमलदारास जें राज्य, संपदा, व लाभ आपणास मिळावे, म्हणून जें भांडण चाललें होतें तें मिटवून ते बळकावून बसण्यास चांगली संधि सांपडली.

कंपनी सरकारचे मूळ पुरुष आणि जाहाजांतून येणारे इंग्रज हे पोर्तुगीज सरकारनें घेतलेल्या हिंदुस्थानांतील ठिकाणाचीं जाहाजें लुटीत व त्यांत त्यांची कार्यसिद्धि होई. यावरून ते पुढें हिंदुस्थानांत प्रसिद्धीस आले. त्यांणीं या हिंदुस्थानांतील राजांचे तंटे व निर्बळपणा पाहून या मुलखांत लूट व मुलख मिळविण्याची संधि त्यांणी पाहून बेत केला. ते इंग्रेज पहिल्यानें व्यापार करावयास लागले, आणि आपला एथें थोडासा पाय शिरला, असें पाहून राजकीय प्रकरणांत आपलें प्राबल्य व्हावें, एतदर्थ बेत करूं लागले. इंग्रेजांनीं हिंदुस्थानांत अधिकार मिळवल्याचा प्रकार सन १६८९ मध्यें समजण्यांत आला, तेव्हां कंपनी सरकारनें हिंदुस्थानांतील आपण एक प्रजा असें सर्वांहीं ओळखावें, अशी आपली इच्छा प्रकट केली.

या प्रसंगीं हिंदुस्थानांतील उत्पन्न इंग्रेज लोकांस माहीत झालें, व त्यांस एथें प्रवास करण्याची इछा उत्पन्न झाली, असें हाकिन्स व रोस यांणीं स्वतः पाहून लिहिलेलीं वृत्तें वाचल्यावरून वाटतें, बेर्नीयर व दुसरे कित्येक फ्रेंच लोक हे एथील राजांचे चाकरीस राहिले. हें पाहून इंग्रेजासही आपण एथें आल्यानें आपल्यास त्यासारिखे रोजगार मिळतील, अशी उमेद वाटली. पहिल्यानें त्यांचा उपाय चालला नाहीं, आणि त्यांणीं नागापटन हें विकत घेण्याचें कबूल केलें, व तें ठिकाण त्यांणीं चांगलें मजबूत बांधलें, आणि त्यास सेंट डेविड हें नांव दिलें. त्यानंतर कलता, गोविंदपूर, व दुसऱ्या कित्येक जमीदाऱ्या त्यांणीं विकत घेतल्या. असें जाहाल्यानंतर पुढें दिल्लीचा बादशाहा फिरोकशहर यास कांहीं दुखणें लागलें, त्यास कांहीं औषधउपाय करण्यास हा मिल्टन साहेब यास नेला. ती संधी यास साधल्यामुळें तो बादशाहा बरा होतांच त्याणें कंपनी सरकारास कलकत्याचे व मद्रासचे आसपास कित्येक गांवें इनाम दिलीं. याप्रमाणें हळूहळू बढती होऊन इंग्रेज लोकांचा व्यापार फारच वाढला, आणि कंपनी सरकारास जे अनंत लाभ जाहाले, ते पाहून फ्रेंच लोकांस आपले युरोप खंडांतील प्रतिस्पर्द्धी इंग्लिश, डच आणि पोर्तुगीस यांची आपण बरोबरी करावी, असें वाटून तेही जाहाजांतून बसून या उद्देशानें निघाले. फ्रेंच लोकांनी पांडिचरी हें आपलें व्यापाराचें व पुढील उद्योगाचें नाटकस्थान केलें, परंतु ही मोठी प्रतिस्पर्द्धा हिंदु लोकांतील संस्थानांस नाशकारक होण्यास बळकट झाली, आणि फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें लढाई उठतांच त्या युद्धप्रसंगीं हिंदुस्थानांतील लोकांस त्यांत हिस्सेदार व्हावें लागलें. यावेळेपासून हिंदुस्थानचे लोक युरोप खंडांतील सरकाराचे ताबेदार होऊं लागले, परंतु डुप्ले याचा प्रतिस्पर्द्धी मारसीयर लाबरडोने यांजमध्यें द्वेष उत्पन्न जाहाला तो जर झाला नसता तर इंग्रेजांस नुसते हिंदुस्थानांतून हांकलून दिलें असतें, इतकेच नाहीं, परंतु हालींचें हिंग्रेज सरकारचें हिंदुस्थानांतील राज्य फ्रेंच कंपनी सरकारचे हातीं बहुत करून लागलें असतें. मोठमोठाल्या पुष्कळ लढाया होऊन व त्यांत पुष्कळ हिंदु लोक व त्यांची मालमत्ता नाश पावून नंतर इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें तह झाला, त्यांत उभयपक्ष पूर्वी होते तसे राहिले, परंतु तेणेंकरून इतकें मात्र झालें कीं हिंदुस्थानांतील प्रजा अगदीं खराबीस व

मोडकळीस आली, या प्रतिस्पर्द्धी लोकांस त्याजवर हल्ला करण्यास मार्ग खुला झाला. त्यांचें लक्ष सर्वकाळ हिंदुस्थानांतील राजांस मोडून आपला अमल बसविण्याकडे हाल्लीं लागलें आहे.

आमचे मागील विचारांत मुसलमान आणि हिंदु यांचीं हितें निराळी आहेत, असें आम्हीं लिहिलें, परंतु मुसलमान लोकांचें हिंदुस्थानांत फार दिवसांचे राहाण्यापासून आणि युरोप खंडांतील प्रतिस्पर्द्धी हे हिंदुस्थानांत उदय पावल्यापासून हिंदु व मुसलमान यांचें हित हें कांहीं गोष्टीनीं एका कारणांत मिळालें होतें, त्याविषयीं आम्ही पुढें विचार करूं. त्या उभयतांचें हित हें होतें कीं युरोप खंडांतील लोकांचे हिंदुस्थानांतील राजांस मोडण्याचे यत्न चालूं देऊं नये व ते अगदीं मोडून टांकावें, आणि त्या परस्परांचे प्रतिस्पर्द्धी याचा संचारामुळें व लढायांपासून पुष्कळ नुकसान झालें—

आतां हिंदुस्थानची राजकीय स्थिति अगदीं बदलली, आणि विलायतेस जो इंग्लिशांचा आणि फ्रेंचांचा कारभार चालला होता, त्या धोरणावरून हिंदुस्थानांत स्वस्थता व लढाई हीं चालण्याचा निश्चय दिसून आल्यावरून अथवा या प्रतिस्पर्द्धी कंपनी सरकारची आपापला अंमल वाढविण्याचीं चिन्हें दिसून आलीं. हिंदुस्थानांत नेहमी लढाया चालल्यामुळें युरोप खंडांतील फ्रेंच आणि इंग्लिश दरबारांत व त्या उभयतांचे व्यापारी मंडळींत बंडें अथवा फितूर उत्पन्न जाहाले, आणि या प्रतिस्पर्द्धी सरकारानीं आश्रय दिल्यामुळें हिंदुस्थानांतील संस्थानी एकमेकांचें वाईट व्हावयाची इछा फार धरूं लागले. यानंतर पुढें लवकरच तांजोरचा राजा शाही याणें कंपनी बरोबर बोलणें केलें कीं मला आपल्या गादीवर बसविण्यास तुम्हीं मदत करावी, व या कुमकेबद्दल देवी कोठ्याचा किल्ला व परगणा हा मी देईन, याप्रमाणें कबूल केलें. पुढें कंपनीसरकारनें हें बोलणें लागलेंच कबूल केलें, व शाहाजीचा जयाविषयीं उगीच बाह्यतः इच्छा दाखविली, परंतु देवी कोठा आपल्ये हातीं येतांच कंपनीनें लागलाच त्या राजास विश्वासघातानें कैद केला. इंग्लिशांचा या अशा विश्वासघातामुळें हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा मनांत त्यांविषयीं भय उत्पन्न झालें, व इंग्रेज लोक हे विश्वास ठेवण्यास अगदीं अयोग्य आणि त्यांजवर भरंवसा ठेवण्याजोगा गुण त्यांजमध्यें अगदीं नाहीं, असें त्यांस आतां स्पष्टपणे दिसों लागले. याप्रमाणें इंग्रेजास देवी कोठ्याचा किल्ला व प्रांत मिळाल्यावर त्यांणीं शाहाजीचा पक्ष सोडला, इतकेंच नाहीं, परंतु त्यांहीं तांजोरचा राजास गादीवरून काढण्याचा निश्चय केला होता. या राजानें शेवटीं आपला बचाव होण्याकरितां या अविश्वासी इंग्रेजांबरोबर व्यापार संबंधें तह केला. हें इंग्रेजांचें चरित पाहून त्यांचे प्रतिस्पर्द्धी फ्रेंच यांणीं लांच व फितूर करून दक्षिणेंत आपला पाय शिरवून तेथें अंमल मिळविण्याचा प्रयत्न चालविला. या राजकीय प्रकरणीं इंग्रेज व फ्रेंच यांचा ज्या लढाया चालल्या त्यांपासून असा परिणाम झाला कीं सर्व हिंदुस्थानांत नाशकारक लढाया व अनेक तंटे यांची अतिव्याप्ति झाली. ती अशी कीं जिकडे तिकडे फितूर चालले. बंडें करण्याची बुद्धी लोकांस झाली; आणि साहा महिन्याचे आंत मुसलमान व हिंदु आणि इंग्रेज व फ्रेंच याचा फळ्या पडून लढाया चालल्या आणि दक्षिण व कर्नाटक या ठिकाणचा दोन गाद्या मिळविण्याविषयीं तंटे चालले. या गाद्या फार बळकट व धनाढ्य होत्या, ज्या फार वर्षांपासून स्वतंत्र, ज्यांजवर दिल्लीचे बादशाहाचा अगदीं अखत्यार नव्हता. बंड करणारे यांजवर जवपर्यंत क्लैव याणें आपलें बुद्धिकौशल्य चालविलें, तेथपर्यंत फ्रेंच लोक सर्वत्र विजयी होते, आणि त्या क्लैवनें फ्रेंचांचे प्रयत्न व्यर्थ घालविण्याविषयीं इंग्रेजांस शक्तिमान केले. त्याणें इंग्रेजांचा अंमल कर्नाटकांत बसविला. पांडिचरीचा फ्रेंच गवर्नर डुप्ले याणें फ्रेंच कंपनीकरितां कर्नाटकाचे उतरेकडेस एक मोठें राज्य स्थापिलें, व कांहीं मुलुख मिळविला, त्या मुलखाची विस्तीर्णता व उत्पन्न हें पाहिलें असतां फ्रान्सचा पेक्षांही जास्त होती, परंतु युरोपांतील फ्रेंच आणि इंग्लिश सरकारांस आपण उभयतां या कामांत अवश्य पडावें, असें वाटलें. मुलुख मिळविण्याचें काम पुढें त्यांणीं तहकूब पाडलें, आणि इंग्रेज कंपनी व फ्रेंच कंपनी यांहीं तह केला, त्यांत असें ठरविलें, कीं यापुढें उभयतांनीं नवा

मुलूख मिळवावा, आणि जें उत्पन्न आपण जुलुमानें घेत होतों, व ज्याचा व्यय करीत होतों, तें प्राचीन राजे हिंदू यांस न देतां मुसलमान राजांस मात्र द्यावें, आणखी दुसरें असें ठरविले कीं समुद्र कांठावरील ठिकाणें उभयतां कंपनीनें अशा रीतीनें वांटून घ्यावीं, कीं जेणेंकरून उभयतांस त्यापासून उभयांस त्यापासून सारखा फायदा होईल, परंतु हा तह लवकरच इंग्रेजांनीं मोडला, तो असा कीं कर्नाटकचे नवाबाचा त्यांहीं क्षप धरून नव्या लढाया उत्पन्न केल्या, त्यावरून पुष्कळ मनुष्यांचा व मालमतेचा नाश झाला. युरोप खंडांतून आलेले या इंग्रेज व फ्रेंच सरकारांचा द्वेष व लढाया या वारंवार जाहाल्यानें गरीब बिचारे हिंदु लोकांचें फार नुकसान जाहालें तें असें कीं त्यांची देवालयें मोडलीं व छिन्नभिन्न केलीं. त्यांची दौलत लुटून नेली, त्यांचा स्त्रियांस बाटविलें आणि पुष्कळ मनुष्यांचा नाश झाला. या लढाया फ्रेंचांचा मुख्य सरदार साली याच्या मूर्खत्वामुळें बंद जाहाल्या, आणि फ्रेंचांचा हिंदुस्थानांत जो मोठा अमल होता, तो नाहींसा जाहाला. परंतु इंग्रेज सरकारनें जो नवीन व अन्यायानें मिळविलेला मुलूख होता, त्यांत त्यांची चांगली दृढता अद्यापि जाहाली नव्हती, याचें कारण हें होतें कीं हिंदुस्थानांतील सर्व दौलत आपणास मिळावी याविषयीं इंग्रेजांची फार आतुरता होती, व ते नेहमी लढाया करण्यांत गुंतलेले असत. कोणे काणे समयीं ते आपला दोस्त राजा किंवा राजे यांचे संरक्षणार्थ किंवा नाशार्थ उद्युक्त असत, व कधींकधीं ते कोणी एकादा हिंदु राजा दुसऱ्ये राज्याची प्रतिस्पर्द्धा करूं लागल्यास व त्याणें आपले चाकरीबद्दल आपणास चांगलें बक्षीस देऊं केल्यास त्याचा पक्ष धरीत असत.

इंग्रेजांचा व दुसरे कित्येक प्रतिस्पर्द्धी यांचा लोभ व विश्वासघात त्याणें करून बंगालच्या नबाबावर जीं पुष्कळ संकटें येऊन पडलीं व त्याचे इमानी चाकरांनीं त्यास या प्रसंगीं फसविलें, तेणेंकरून त्याची इतकी अव्यवस्था जाहाली कीं बंगालची दिवाणगिरी इंग्रेजांस देण्याचें त्यास जरूर पडलें. ती दिवाणगिरी त्यांहीं मोठे लोभीपणानें पत्कारिली, कारण त्याणीं असें पाहिलें कीं बंगाल, बहार व उडिया हे चांगले श्रीमंत मुलूख घेण्यास आपणास हें मोठें साधन झालें. इंग्रेजांहीं हा आपणास मोठा राजकीय अंमल मिळतांच जमाबंदींत जुलमाची रीति चालू केली. या रीतीपासून हिंदु लोकांचें तर अनहित जाहालें खरें, परंतु इंग्रेजांची जमाबंदी वाढल्यामुळें शिलक पुष्कळ राही. ती त्यांस नवा मुलूख मिळविण्याच्या कामांत खर्चाचे उपयोगी पडे. सरकार देण्याची रकम इतकी वाढली कीं ती लोकांचानें सोसवेना. मोंगल सरकार जो धारा लोकांपासून घेत असे, त्याचे सुमारें दुप्पट इंग्रेज लोक घेऊं लागले, त्यामुळें हिंदु रयतेस असें जाहालें कीं सरकार देणें देऊन उपजीविका देखील चालण्याचें कठीण पडूं लागलें, एणेंकरून असें जाहालें कीं त्याचा जमिनी कलकता सरकारचे हुकुमानें जप्त होत व लिलांवें करून विकीत. इंग्रजांचे या जमाबंदीचे दुष्ट आणि निर्दय रीतीनें एतद्देशीय व्यापाऱ्यांचाही पुष्कळ नाश जाहाला. ते व्यापारी देशांतले देशांत व्यापार करीत असत व त्यांजपाशीं दिल्लीचे बादशाहाचा सनदा संरक्षणार्थ असत, त्यामुळें त्यांस जकात माफ असे. त्या व्यापाऱ्यांनीं आपला मालमुदल किमतीनें त्यास विकावा, अशी त्यांस इंग्रेज लोक ताकीद आपले फौजेचे बळानें देऊन* विकवीत. या रीतीनें कंपनी सरकारचे चाकरानीं बहुत करून आपल्ये नामदार धन्याचे आज्ञेविरुद्ध एतद्देशीय लोकांवर जुलूम चालविला, आणि मोठ्या दवलती केल्या, आणि आपला नाशकारक प्रताप वाढविला, आणि आपल्या सर्व नीति, उपकार हे एकीकडेस ठेवले. हा असा प्रकार त्याणीं खरोखर पर्यंत चालविला. शेवटी कोर्टडरेक्टर यांचा त्याजवर मोठा धक्का आला व त्याचें भय त्यांस पडलें. कारण कीं कोर्टडरेक्टर याणीं असें पाहिलें

* इंग्रेज कंपनीचा सरकारचा मुख्य उद्देश असा होता कीं कोष्टी याचे मेहनतीचा उपयोग आणि त्या मेहनतीवर आपला अंमल बसवावा कीं जेणेंकरून व्यापाराकडील कामदाराहीं कंपनी सरकारास जो माल लागेल, तो नीट भाव बरोबर ठरऊन त्या भावानें पुरवाना. मारक्विस वेलस्ली यांचें कोर्टडरेकटर यांस पत्र.

कीं आपले चाकर श्रीमंत होत चालले व अखत्यारी अंमल बसवितात, असें असून आणि आपण तर अधिकाधिक कर्जात बुडत चाललों, व आपले बहुतेक किंवा यत्किंचित् ही हुकूम त्या आपले चाकरानीं मानावे, असें आपल्यांत सामर्थ्य नाहीं.

याप्रमाणे गोष्ट चालल्या पासून हिंदुस्थानांतील लोकांचा नाश झाला, व त्यांचे स्थितीचा अमल मिळविण्याकरितां लढाया होत, त्यामुळें उलटा पालट होत जाई. इंग्रेज सरकारचा अंमल बक्सरची लढाई जाहाली तेथपर्यंत पुरतेपणें बसला नव्हता, परंतु त्या लढाईत तो बादशाहा इंग्रेज सरकारचे ताबेंत आला, तेणेंकरून ते इंग्रेज हिंदुस्थानचे मोठे भागाचे धणी होऊन राहिले, व या दुसरे कित्येक कृत्यांत कंपनी सरकारची व त्याचे चाकरांची वर्तणूक अगदीं निर्मळ किंवा दिकती खेरीज नव्हती, त्यामुळें पार्लमेंट सभेस त्या कामांत पडणें जरूर झालें, आणि दैवयोगेंकरून सन १७६७ सालीं व्यापारी राजे यांस असें शिकविलें, कीं त्याचे वर्तणुकीची या पुढें इंग्रेज दिवाणानीं फार बारीक चौकशी ठेवावी. यानंतर थोडके वर्षांनीं पार्लमेंट सभेस त्यांचे कामांत इतकें पडण्याचें जरूर जाहालें कीं कंपनी सरकारचा कारभाराची चौकशी ठेवण्यास त्या सभेनें बोर्ड आफ कंत्रोल अशी सभा नेमली. या नवे सभेस फार फार दिवस लोटले नाहींत, इतक्यांत, इंग्रेज लोकांनीं म्हैसूरचे राजाबरोबर लढाया सुरू केल्या. या लढायांत त्यांणीं मराठ्यांबरोबर आपण होऊन अगदीं हलके कारणावरून प्रथम लढाई सुरू केली, व रोहिले लोकांस अगदीं खणून काढलें, आणि या लढायांचे अगोदर व नंतर कंपनी सरकारचे चाकरांनीं कोणाचे समजुतींत न येई, अशा धोरणानें गरीब बिचारे हिंदु लोकांपासून सर्व सौख्योपभोगाची साधनें होतीं, तीं ग्रहण करण्याचे उद्योग चालविले. एतद्देशीय लोकांचा प्रमाणिकपणा प्रतिष्ठा ही नेहमी दिसून येई, व इंग्रेजांचे स्वतांचे कल्याण करण्याचे धोरणामुळें त्यांचे पोकळ गूण दिसून येत आणि कर्नाटकचा दाव्याबाबत ब्रिटिश पार्लमेंटानें चौकशी केली, आणि कंपनी सरकारनें एक विसांश त्या दाव्याबाबत घ्यावा, असें ठरविलें, यावरून इंग्रेज सरकारची किती वाईट वर्तणूक होती, हें लक्षांत येईल, आणि न्युकुमार यास घात करून वारन हास्टिंग याणें सर इलिज व इंपे याचे हातानें मारविला, असा एडवर्ड याणें त्यावर आरोप घेतला, आणि ही दुष्ट वर्तणुक झाली असतां ब्रिटिश लोकांनीं त्यास आश्रय दिला, व उघडकीस आणिली नाही—अथवा अयोध्येचा नायब, व सुभेदारीवर मनिविक्विन यास नेमला, व रोहिले लोकांपासून चाळीस लाख रुपये वसूल करून घेण्याबद्दल त्यांस काढून टांकलें, आणि या अशे उघडिकीस आलेल्या कृत्यांचे वर्तणुकीचा विचार करून पाहिलें तर जा ब्रिटिश पार्लमेंटानें आजपर्यंत कंपनी सरकारास मोठा अंमल दिला होता, त्या पार्लमेंटास या अशे कंपनी सरकाराचे हलके आणि वाईट कृत्यांवरून आपला कंपनी सरकाराविषयीं तिरस्कार दर्शित करणें प्राप्त जाहालें, यावरून हें मोठें आश्चर्य मानण्याजोगें नाहीं. हीं कंपनी सरकाराचीं कृत्यें हिंदुस्थानांत अशा प्रकारानें चाललीं होतीं कीं त्या सरकारावर पार्लमेंटाचा ठपका आला, यावरून एतद्देशीय राजांस देखील वाटूं लगलें कीं उपद्रव न दिला असतां हें कंपनी सरकार आझाशीं लढाई करतें, आणि आपणास देश मिळावा, एतदर्थ जे बेत त्या कंपनी सरकारानें चालविलें आहेत, हें सर्व इंग्लंडचे कंपनी सरकाराचे प्रतिष्ठेस, इछेस, व नीतीस अगदीं विरुद्ध आहे, आणि याजकरितां ब्रिटिश प्रजेचा प्रामाणिकपणा, इनसाफ, तृप्ति यां विषयीं जा कृत्यांवरून लोकांत अगदीं गैरविश्वास होईल, तीं कृत्यें जे आचरण करीत असतील, त्यांजवर पार्लमेंटाची अगदी बेमर्जी व्हावी, व ठपका यावा, असा लोकांनीं अर्ज केला. ईश्वराजवळ आमची हीच प्रार्थना आहे, कीं दोनशें वर्षे अगोदर जर हा पार्लमेंटाचा ठपका येऊन तो जर अंमलांत आला असता, तर हिंदुस्थानांत स्वस्थता आणि स्थैर्य यांचें सौख्य एतद्देशीय लोकांनीं भोगिलें असतें, आणि युरोप खंडांतील संस्थानचे व्यापाऱ्यांप्रमाणें फायदे एतद्देशीय लोकांस प्राप्त जाहाले असते.

हिंदुस्थानांतील कंपनी सरकारचे कारभारावर मारक्विस कार्नवालीस हा गवर्नर जनरल झाला, त्याणें युरोपांतील आपल्येवरील मुख्यांची जी इछा होती, ती एकीकडे ठेऊन कंपनी सरकाराचा वर्चस्वपणा स्थापण्यास उद्योग केला, इतकेंच नाहीं, परंतु आपल्ये चांगल्ये व सयुक्तिक उपायानीं एतद्देशीय संस्थान्यांत लढाया होण्याचें मना करण्याविषयीं आणि टिपु सुल्तानाचें प्राबल्य मोडून हिंदुस्थानांत कोठेही प्रतिस्पर्द्धी राजाचा अगदीं मोडून टांकण्याविषयीं त्याणें निश्चय केला. टिपू सुल्तानानें त्रावणकोरचा राजास उपद्रव करूं लागला. हा राजा इंग्रेज सरकारचा दोस्त होता, याकरितां इंग्रेजांनीं टिपूचे त्या कृत्यावरून गवर्नर जनरल याणें टिपूबरोबर लढाई करण्याचा ठराव केला, आणि इंग्रेजांनीं निजाम व पेशवे याजबरोबर दोस्ती करून घेऊन मारक्विस याणें म्हैसूरचें राज्य मोडण्याचा निश्चय केला. या लढाईंत कर्नाटकचा नवाब यास हिसा देण्याचें कबूल करून इंग्रेजांनीं त्यास मद्दतीस बोलावला होता, त्यास कर्नाटक प्रांतांत जी बाकी होती, ती व लढाईस जो खर्च लागला, त्याचा भाग देण्याचें सामर्थ्य नाहीं, अशा कारणावरून त्याचेंही राज्य इंग्रेजांनीं हरण करून घेतलें. हिंदुस्थानांत इंग्रेज लोक राज्य करीत असतां त्यांची टिपूबरोबर जी लढाई जाहाली, ती फार वर्णनीय जाहाली, आणि ती लढाई संपल्यानंतर इंग्रेज लोकांस मलबार व दुसरे श्रीमंत प्रांत मिळाले, आणि त्यांणीं जिंकून अथवा फितूर करून पुष्कळ मुलूख मिळविला. या लढायांचा खर्च भागण्याकरितां कंपनी सरकारानें नवे व अगदीं गैरशिस्त असे कर लोकांवर बसविले. हिंदु लोकांची त्याप्रसंगीं दशा पाहिली तर नेहमी लढाया चालल्यामुळें त्यांची इतकी खराबी व नाश जाहाला होता, कीं तो अगदीं वर्णन करितां येत नाहीं—तेणेंकरून उद्योग करणारे रयतेचे अंतःकरणांत त्रास उत्पन्न जाहाला, व त्या लोकांनीं जरी वर्षांचीं वर्षे मेहनत केली, तरी त्यांस आपल्या जमिनी आपणाकडेस ठेवण्यास व मजूर लोक लाऊन आपली शेतकी चांगली राखण्यास त्यांस सामर्थ्य राहिलें नाहीं. पुणें व हैदराबाद सरकार म्हणजे पेशवे आणि निजाम यांस इंग्रेज सरकाराशीं दोस्ती केल्यापासून अंतीं कांहीं फायदा झाला नाही, कारण इंग्रेज सरकारानें टिपू सुल्तानाचें राज्य मोडल्यावर लागलेंच तें सरकार पेशवे, निजाम या सरकाराशीं कलह उत्पन्न करण्यास कांहीं कारण शोधूं लागले. याचा परिणाम शेवटीं असा जाहाला कीं मराठ्याचें राज्य बुडालें, पेशवे सरकारचा दोस्त शिंदा याचाही मोड केला. शेवटीं निजाम सरकारचेही डोळे उघडले कीं आपण जो पूर्ण विश्वास ठेवला तो चांगले ठिकाणीं ठेवला नाहीं. हिंदुस्थानचा कारभार जवपर्येत मारक्विस वेलस्ली याणें चालविला, तोंपर्येत त्याचा राज्य लोभानें त्यास अशी बुद्धी झाली कीं हिंदुस्थानांतील सर्व राज्यें कंपनी सरकारचे घरांत यावीं. गवर्नर जनरलची या कामांत बहुतेक ठिकाणीं फत्ते जाहाली, आणि मागें जे एतद्देशीय राजांबरोबर तह झाले होते, त्यांकडे दुर्लक्ष करून ब्रिटिश पार्लमेंटानें जें स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें, त्याचें स्मरण न धरून म्हैसूर, अयोध्या, तांजोर आणि सुरत इत्यादि राज्यें व उंच लोकांचीं कित्येक ठिकाणें कंपनी सरकारानें आटोपिलीं—एतद्देशीय राजांचे अमलांत जरी रयतेवर फार कर होते, तरी त्यांजवर कंपनी सरकारचा अमल जाहाल्यामुळें त्यापासून कांहीं लोकांवरचा जुलूम थोडा बहुत झाला असला तरी फारसा कमी झाला नाहीं, आणि कंपनी सरकारानें जिंकलेल्या व त्या सरकारास प्राप्त जाहालेल्या मुलखांतील उत्पन्न उत्तरोत्तर कमी झालें. यावरून असें उघड दिसतें कीं ब्रिटिश सरकारचा अमल त्यांचे स्वतांचे फायद्यास व त्यामुळें त्यांचे राजकीय बढतीस शत्रुवत् झाला, परंतु त्यापासून इतकें मात्र जाहालें कीं एथें जीं मांडलीक राज्यें फार होती, व त्यांहीं करून जा रयतेची इर्षा मोडे त्यांचा नाश केल्यामुळें कंपनी सरकारचे देशांतले लोकांस सौख्य प्राप्त जाहालें.

गेल्या चाळीस वर्षांपासून कंपनी सरकारनें देश प्राप्ती करण्याचा लोभ गुप्तपणें चालविला नसतां आतां उघडपणें देश बळकाविण्याचा प्रकार चालविला, आणि सर्व एतद्देशीय संस्थानांत आपले सत्तेंत कांहीं कमीपणा नसावा, म्हणोन एकदां त्या संस्थानांत आपला पाय घुसवून कंपनी सरकार हाल्लीं

खरोखर हिंदुस्थानांतील बारा कोट प्रजेवर आपली एकट्याचीच सता करीत आहे. खेरीज त्या कंपनी सरकारानें आसपासचे संस्थानांचे दरबारांत आपलें गुप्तपणानें प्राबल्य चालविलें आहे. एतद्देशीय संस्थानाचा मोड होण्यास व इंग्रेज सरकाराची बढती होण्यास पुष्कळ कारणें झालीं, व त्यांजविषयीं पुष्कळ लिहिणें अवश्य आहे खरें, परंतु या लाहानशा ग्रंथांत त्याविषयीं विस्तारें लिहितां येत नाहीं, अस्तु, एथें इतकेंच म्हणणें अवश्य आहे, कीं इंग्रेज लोकांस जें हिंदुस्थानांत राज्य प्राप्त जाहालें, तें चांगल्या मार्गानें जाहालें असें हिंदु लोकांस वाटण्याजोगी इंग्रेज सरकाराची वर्तणूक नव्हती, अथवा पार्लमेंटानें शाहाणपणानें व दयार्द्र बुद्धीनें जें कंपनी सरकारास सांगीतलें, त्याचा विरुद्ध चालण्यास कंपनी सरकारास कोणतीं मजबूद व खात्री होण्याजोगीं कारणें होतीं हेंहीं वृत लिहिणाराचे देखील नीट लक्षांत येत नाहीं. पार्लमेंटाचें कंपनी सरकारास असें सांगणें होते कीं वास्तवीक व पुरीं कारणें असल्या-वांचून हिंदुस्थानांतील राजांशीं युद्ध करणें अथवा देश जिंकण्याचे बेत करणें हे इंग्लंडांतील प्रजेचे इच्छेस, प्रतिष्ठेस आणि नीतीस अगदीं विरुद्ध आहे. मुलूख घेण्याचे कामांत व हिंदुस्थानांत संपति मिळवण्यांत कंपनी सरकारचे कामदारानीं जी वर्तणूक केली, त्याचे वास्तवीक प्रमाण दाखविण्यास हीं पुढील दोन उदाहरणें देण्यास अप्रयोजक आहेत असें नाहीं, व त्याखेरीज जीं दुसरीं पुष्कळ द्यावयाचीं त्याचा हा उघड प्रत्यय आहे, असें दिसून येईल, आणखी दुसरें हें कीं त्यांवरून जा गोष्टी उघडिकीस आल्या आहेत, त्या कंपनी सरकारचे कामदारांशिवाय दुसरे फार लोकांस माहीत नाहींत यामुळें त्यापासून लोकांस फायदा होईल.

जें पहिलें उदाहरण आम्ही देणार आहों, तें फार अगत्याचें आहे, कारण कीं त्याविषयीं जें लोक म्हणतात, तें जर वास्तवीक खरें असलें, तर त्यावरून कंपनी सरकारानें आपले निबोरी संस्थानांतले कारभारांत जे वकील आहेत, त्यांचे वाईट व दुष्ट वर्तणुकीस पक्का आश्रय द्यावा असा दृढनिश्चय केला आहे, हें स्पष्ट दिसोन येतें. या विषयींची गोष्ट अशी आहे कीं सुमारें सत्रा वर्षांमागें निबोरी संस्थानाचा राजा हरिशिंगजी मरण पावला. त्याचा मागें त्याचा चार बायका व एक मुलगा होता, या मुलग्याचें नाव भावराझजी असें होतें. त्याचे बापाचे मरण समयीं तो पांच वर्षांचा होता, या राजपुत्राचे बाल्यवयांत नथुजीवनराम म्हणोन जो मयत राजाचा प्रधान होता त्याणें व या मुलाची वक्तुबाई म्हणून आई होती, या दोघांनीं राज्याचा कारभार चालविला होता. भावराझजीचे मरणापूर्वी (जें त्यास तो ७ वर्षांचा होता, तेव्हां प्राप्त झालें) त्याणें आपले आसपासचे जे ठाकूर व सरदार होते त्यांस असें सांगून पाठविलें कीं माझे आईचा आणि नथु प्रधानाचा फार स्नेह जमला आहे; व त्याचें कारण हें दिसतें कीं त्याचे मनांत संस्थानाची सर्व जमाबंदी लुटून घ्यावी—याकरितां त्याणें आपले मातोश्रीस मोठ्या आग्रहानें सांगीतलें कीं राजा हरिशिंगजी मरण पावल्यापासून नथु जीवनराम मेहता याणें जी संस्थानाची जमाबंदी एकत्र केली आहे, त्याचा त्याणें हिशोब द्यावा. या प्रधानानें कांहीं हिशोब न देतां वक्तुबाईसी मिळून राजास विष घालून मारण्याचा उद्योग केला. थोडे दिवसांनंतर १८३७ साचे सालांत जून महिन्याचे २६ वे तारिखेस भावराझजी कांहीं संतान नसतां मृत्यु पावला. त्याचा मागें त्याचा तीन बायका होत्या. त्यांची नांवें. आनंदीबाई, भाजीबाई, व बाजीबाई. कोणी एकादा राजा गुजराथेंत जर संतान नसतां मरण पावला तर तेथें अशी चाल आहे कीं आसपासचे सर्व राजे यांस बोलाऊन आणून त्यांची एक सभा जमवून त्यास मयत राजाचा पुढें वारीस कोण करावा. याचा विचार करितात, व जो त्यांचा विचारानें ठरतो; त्यास मग ते गादीवर बसवितात. या चालीप्रमाणें त्या मयत राजपुत्राचा सदहू सांगीतलेल्या तिघीं बायकांनीं एक सभा जमविली, आणि त्यांणीं असें सांगितलें कीं त्यांचा फार जवळचा नातलग, झाला आखाभाई, म्हणून तालस नावाचा राजा आहे, यास्तव त्यास गादीवर बसवावें. नथूचा मनांत हा बेत मोडावा असें होतें व हें सिद्धीस नेण्याकरितां त्याणें राजकोटचा

पोलिटिकल एजेंट, मिस्तर अर्स्किन याजवळ जाऊन त्यास असें सांगितलें कीं त्या मयत राजाचा तिघी बायकांतून एक बायको गरोदर आहे, यास्तव त्याणें मध्यस्थ पडून, झाला आखाभाई यास गादीवर बसूं देऊं नये—त्या पोलिटिकल एजेंटानें हें मान्य करून एक मनुष्य या सभेची मसलत बंद पाडण्यास पाठविला. झाला आखाभाई याचे आप्तस्नेही यांहीं त्या पोलिटिकल एजेंटाकडेस जाऊन अर्ज केला कीं राणी गरोदर आहे, असें जें त्यास सांगीतलें होतें त्याची त्याणें यथायोग्य चौकशी करावी. हें मान्य करून त्या एजेंटानें मंगलजी रूपजी यास याविषयीं शोध करण्यास हुकूम केला. त्याणें मिस्तर अरस्किन साहेबास असें येऊन सांगीतलें कीं तिघी राण्यांतून कोणीही गरोदर नाहीं. परंतु राजाचे महालांत एक स्त्री साहा महिन्यांची गरोदर आहे, तिला मी प्रश्न केला कीं, तूं या घरांत कां राहात आहेस? तेव्हां तिणें उत्तर केलें कीं मला या घरांत नथूनें आणून ठेवली आहे, आणि बजाबाई राणीनें तिला असें सांगितलें होतें कीं तूं माझे माहालांत बाळंत होसपर्यंत राहा. यावरून असें म्हणतात कीं त्या पोलिटिकल एजेंटाची ह्या सांगीतलेला गर्भ खोटा व उगीच निर्मित केलें आहे, अशी पक्की खात्री जाहाली असेलव, परंतु लोकांत अशी वदंता आहे कीं नथूनें स्वतः किंवा हरएक दुसरे कोणत्ये द्वारें त्या एजेंटास पांसष्ट हजार रुपये पोंचिवले. ही गोष्ट वास्तविक नाहीं, असेंही आम्ही आतां सिद्ध करण्याचा पत्कर घेत नाहीं, असो. शेवटी त्या पोलिटिकल एजेंटानें झाला आखाभाईस असा हुकूम पाठविला कीं या संस्थानाचे राज्यकारभारांत त्याणें अगदीं पडूं नये, आणि याप्रमाणें करार लिहून द्यावा. या झाला आखाभाईनें पुनः असा आग्रह धरिला कीं या राणीचा गरोदरपणा पहिल्यानें सिद्ध करावा, आणि याजविषयीं त्या राणीची नीट चौकशी करावी. हें बोलणें त्या पोलिटिकल एजेंटानें मान्य केलें, व हें तपास करण्याचें काम ढांगढाचे राजाकडेस नेमलें. याणें आपली मातोश्री व एक सुईण या कामास पाठविली. यांहीं माघारा येऊन मिस्तर आरस्किन आणि कप्तान जेकब (जो या वेळेस निबोरी एथें होता) यांस असें सांगीतलें कीं बजाबाई गरोदर नाहीं. या त्याचे सांगण्यानें खात्री न होऊन ह्मणजे हें पसंत न करून मिस्तर अरस्किन व जेकब यांहीं आपणाबरोबर एक वैद्य व एक सुईण घेऊन बजाबाईचा त्या पोलिटिकल एजेंटाचे तंबूंत चांगला तपास केला. तेव्हां त्या सुईणीनें असें सांगितलें कीं बजाबाई गरोदर नाहीं, परंतु त्या पोलिटिकल एजेंटानें व त्याचा आसिस्टेंट जेकब साहेबानें असा आग्रह धरिला कीं ती गरोदर आहे, व हें असे कां त्यांहीं म्हटलें याचें कारणही उघडच आहे—जानुआरीचे ३० वे तारिखेस नथूनें जाऊन जो जेकब साहेब हाली निंबोरीस आहे, त्यास असें सांगीतलें कीं बजाबाई पुत्र प्रसवली, परंतु जेव्हां आखाभाईनें व त्यांचे स्नेही यांणीं तें मूल पाहावें असा अर्ज केला, तेव्हां असें स्पष्ट दिसोन आलें कीं तें मूल सात किंवा आठ दिवसांचे वयाचें होतें व लाहान व नीच आईपासून उत्पन्न जाहालेलें होतें. नंतर लागलाच अर्ज केला कीं या पुत्राचे वास्तवीक जन्माविषयीं खात्री करण्यास बजाबाईचे स्तनापासून दूध निघतें कीं नाहीं, हें पाहावें, परंतु हें बोलणें नंतर कप्तान जेकब व नथू जीवनराम यांहीं मोठा आग्रह धरून मान्य केलें नाहीं, हें कां मान्य केलें नाहीं याचें कारण उघडच आहे. दुसरे दिवशीं कप्तान जेकब साहेबाचें अनुमत घेऊन नथूनें आपले कारभारी व दरबारांतले दुसरे लोक यांची सभा जमवून त्यास असें सांगितलें कीं राणीस पुत्र झाला आणि लोकांत अशी वदंता आहे–कीं त्याणें आणखी त्यांस असें स्पष्ट सांगितलें कीं जो कोणी तुम्हामधून या राजपुत्राचा जन्म कबूल करणार नाहीं, व जो कोणी याविषयीं संशय धरील, त्यास मोठी नशयत मिळेल. ती अशी कीं त्याची बेअबरु करून त्यापासून दंड घेऊन त्यास आणखीं तुरुंगांत जावें लागेल. याप्रमाणें ७० असामीस तुरुंग व श्रृंखळा प्राप्त झाल्या. या रीतीनें त्या नथूनें राजपुत्राचा राजा लाहान आहे, तों त्याचा आपण मुकत्यार होऊन कारभार चालविण्याची जागा मिळविली व राजाचे खजिन्यांतले द्राह्य

लक्ष रुपये आपले तोंडांत टाकिले व जा जा कोणी त्या पुत्राचा जन्म खोटा, असें म्हटलें, त्यापासून त्याणें पुष्कळ दंड घेतले. आम्हावर जुलूम फार होत आहे, व आम्हास विनापराधी बंदींत घालितात, व यास्तव याचा बंदोबस्त व्हावा, असा जेव्हां या पिडलेल्या लोकांनीं कपतान जेकब साहेबाला अर्ज केला, तेव्हां त्या आसिस्टंट पोलिटिकल एजेंटानें मेहेरबान होऊन त्या सर्वास धरून नथुजवळ पाठवून दिलें. कपतान जेकबानें आलामाई यास धरून राजकोटांत कैद केलें होतें, आणि नथूनें त्या मयत राजाचा आई व बायका जा जा घरांत होत्या त्या त्या घराचे दाराशीं त्याणें चौकी पाहारे ठेवले. आलामाईने आपणावर जो जुलूम केला आहे, या बाबे मिस्तर अरस्किन साहेबाशीं अर्ज केला, आणि त्यास असें सांगितलें कीं बजाबाईचें वय तेरा वर्षांचें आहे, व तिला किंवा दुसरे कोणतेही त्या मयत राजाचे राणींतून एकीला देखील त्यावर राजाचे मरणानंतर साहा महिन्यांचे अगोदर नाहाण आलें नव्हतें. त्या आलाभाईचा अर्ज कांहीं चालेना. नंतर त्याणें खुद्द मुंबई सरकारास अर्ज केल्याविना आपला न्याय होणार नाहीं, असा विचार करून त्याणें मुंबई कौंसलांत आपली अर्जी दिली. तेथें या विषयीं तपास न व्हावा या हेतूनें कपतान जेकब याणें एक उपाय नेमला. तो असा कीं आसपासचे राजांजवळून त्या राजपुत्राचा जन्म वास्तविक खरा आहे, असा एक कागद त्यांचे सहीसुद्धां मिळविण्याकरितां त्याणें स्वतः प्रयत्न केला म्हणा किंवा जे प्रयत्न करीत होते, त्यांस आपण फार मदत केली. ही गोष्ट सिद्धीस नेण्याकरितां तो साहेब वडवासि शहराचे राजाजवळ गेला, परंतु त्या राजानें याविषयीं आपलें अनुमोदन देण्यास नकारिलें व त्याणें त्या साहेबास असें सांगीतलें कीं त्या पुत्राचे खोटे जन्माविषयीं त्याची पक्की खात्री आहे. मिस्तर अरस्किन साहेबाने डांगडा शहराचे राजास व दुसरे कित्येक राजांस राजकोटास धरून आणिले, परंतु त्यांहीं त्याचें बोलणें मान्य केलें नाहीं. अर्जीवर अर्जी मुंबई सरकारास या बाबे तपास करावा म्हणून पाठविल्या. परंतु कांहींसा विलंब लावल्यावर मुंबई सरकारानेंही याविषयीं मिस्तर अरस्किन साहेबानें तपास करावा असी आपली इच्छा प्रकट केली, व हें मुंबई सरकारानें कां केलें याचें ही कारण उघडच आहे. अस्तु या कामदारांस हें काम सोंपलें, म्हणून त्या अर्ज करणारानें स्वाभाविकपणेंच असें करूं नये म्हणून आग्रह धरिला. तो पोलिटिकल एजेंट असें म्हणतो कीं तो राजपुत्र या बजाबाईचा वास्तवीक पुत्र आहे. परंतु जर याविषयीं तपास केला आता, तर त्याचा खोटेपणा सहजच उघडकीस आला असता. मुंबई सरकारानें जो कांही या बाबे त्या पोलिटिकाल एजेंटानें निश्चय केला होता तो पसंत केला. सरकारनें या गोष्टीचा न्यायानें तपास करावा, म्हणोन वारंवार त्यांत जाचें अनहित झालें होतें तो अर्ज करीत असे, आणि त्याणें सरकारास असें सांगीतलें कीं मिस्तर अरस्किन व कपतान जेकब हे दोघे शिवाय करून दुसरा कोणीही या बाबे तपास करण्यास नेमावा, कारण कीं या दोघांचा या बाबे तपास करण्यास किंवा त्याचा बंदोबस्त करण्यास नालायकपणा हा उघडच दिसोन येत आहे. सरकारानें आपले मागील इनसाफाप्रमाणें चालण्याचा अगदीं दृढनिश्चय केला आहे, आणि हा वेळपर्यंत म्हणजे १८४२ चे सालापर्यंत मुंबई सरकारानें हा कज्जा सुप्रिम गवर्नरमेंटास किंवा कोर्ट आफ डरेक्टरांस पाठविण्यास नकारिलें आहे, आणि तो विचारा अर्ज करणारा हा वेळपर्यंत राजकोटाचे तुरुंगांत कुजत आहे, परंतु नथूची गोष्ट म्हणाल तर त्यास मुंबई सरकार आपला यथास्थित आश्रय देऊन त्याचे सर्व वर्तणुकी फार स्तुती करीत आहे—बजाबाईचा नुसता म्हटलेला पुत्र यदाकदाचित मरेल म्हणून दुसरा एक त्या मयत राजाचे दुसरे एके बायकोपासून उत्पन्न झाला आहे, असें म्हणतात, तो त्याचे गादीवर बसण्यास उभा केलेलाच आहे, आणि हा दुसराही पुत्र वास्तवीक आहे, असें मुंबई सरकारानें मान्य केलें आहे, आणि जरी या दोघां पुत्रांचे वास्तविक आईबाप अद्यापि निबोरीस जीवंत आहेत, व त्यांची साक्ष देण्यास ते आणविले जातील, असें आहे, तथापि मुंबई सरकारानें नथूकरितां किंवा मिस्तर अरस्किन साहेबाकरितां या कज्जाचा वास्तविक

इनसाफ करणें किंवा तों आपले वरचे अमलदारांस पाठविणें हें अगदीं गैरशिस्त किंवा अयोग्य आहे, असें धारिलें आहे. याविषयीं गैर इनसाफ व सरकारचा दुष्टपणा इतका स्पष्ट आहे, कीं त्याविषयी आणखी आह्माकडून कांहीं लिहिणें याची अगदीं गरज नाहीं. दुसरा कज्जा, ज्यामध्यें कंपनी सरकारची राज्यनीतीची वर्तणूक उघड दिसती, तो सातारचे राजाचा आहे. या राजास पदच्युत करून त्याचा इनसाफ न करितां, व त्याचे अपराधाचा कांहीं दाखला नसतां व जरी याचा निरपराधीपणा स्थापन करण्यास पुष्कळ आधार होता, तरी त्यास कैद करून काशीस पाठविला, त्याची बाब या प्रमाणे आहे. इंग्रेज सरकारानें पेशवे सरकाराचे राज्याचा व अमलाचा मोड केल्यावर त्याणें प्रतापसिंहास सातारचे गादीवर बसविलें. हा राजा असा होता कीं कंपनी सरकार व त्याची रयत त्यास मोठा शाहाणा व उदार असें म्हणत असे. त्या वेळेस जो करार केला होता, त्यांत राजास कित्येक जाहागिरीवर आपला अंमल चालविण्यास मोकळीक होती. शेवटीं मुंबई सरकार याचे हकास प्रतिबंध करूं लागलें, परंतु राजाचा कोर्ट आफ् डरेकटरास या बाबे अर्ज करण्याचा पक्का निश्चय पाहून मुंबईचा गवर्नर सर राबर्ट ग्यांट याणें या राजाचा बेविश्वास दाखविण्यास उगीच खोटेच त्यावर आरोप शोधून काढण्यास प्रारंभ केला. हिंदुस्थानांतील मुख्य सरकार (म्हणजे कलकत्यातें सरकार) याणें राजाचे निरपराधीपणाविषयीं आपली खात्री केला आहे, परंतु मुंबई सरकारानें तो अपराधी आहेस असा आग्रह धरिला. आपण अगदी निरापराणी असें पक्कें समजून राजानें आपला यथास्थित तपास करावा असा अर्ज केला, परंतु हा त्याचा अर्ज मान्य केला नाहीं. राजास मोहित करण्यास मुंबई सरकारनें मिसेस लाडर या नावाचे स्त्रीस राजाकडे गुप्तपणें जाण्यास सांगीतलें. ही कोणत्या प्रतीची होती म्हणाल तर ती आपला व्यभिचार व ख्यालीखुशाली यांहीं करून प्रख्यात होती. असो, हें मुंबई सरकाराचें सांगणें तिणें मान्य केलें. मग मुंबई सरकारचा एके अम्मलदारानें तिला सातारचे रसिडेंटाकडेस शिफारस पत्रें देऊन पाठविलें, आणि तिला नंतर राजाजवळ ही मोठी पतिव्रता, गुणवान व चतुर असें म्हणून सामोरा केली. राजाचा मुंबईत कोणी एक स्नेही होता त्याणें राजास असें सूचना पत्र पाठविलें कीं ही जी सुंदर स्त्री शिफारस घेऊन आली आहे, ती शंभरां पुरुषांची स्त्री आहे, व तिला मुंबई सरकारानें पाठविलें आहे. यावरून राजानें तिचें तोंड देखील पाहाण्यास मान्य केलें नाहीं. मग अर्थातच मुंबई सरकारास, राजानें अशेली लुच्ची स्त्री आपले दरबारांत ठेवली आहे, असा अपराध राजावर आणण्यास अगदीं आधारच राहिला नाहीं.* हा असा जो राजास मोहित करण्यास मुंबई सरकारानें उद्योग केला, यावरून असें पक्केपणीं दिसोन येतें कीं राजाचा कोणतेही प्रकारें नाश करावा, मग अर्थातच आपली प्रतिष्ठाही बुडवावी, असा मुंबई सरकारानें पक्का निश्चय केला होता. ब्रिटिश एजेंटानें राजास भुलथाप घालून व त्यास कळूं न देतां कोऱ्या कागदावर राजाकडून सह्या घालविल्या, नंतर त्यावर पाहिजे तशीं खोटीं कागदपत्रें लिहिलीं, व असें म्हणतात, कीं तीं पत्रें गोव्याचा गव्हर्नर, नागपूरचे माजी राजे, यांस लिहिलीं होतीं. अहो परंतु इतकेंच नाहीं, त्यांतून कित्येक पत्रें इराणचे, मिश्र देशाचे, आरबी याचे, ब्रह्मींचे, पोर्टुगलचे, व फ्रान्सचे राजांसही लिहिलीं होतीं असें ह्मणतात—कलकत्यांतील गवर्नर जनरल याणें असें स्पष्ट ह्मणोन दाखविलें होतें

* पहिल्या अकटोबर १८४१ सना मुंबई टैम्स पत्राचा ओवरल्यांड समरीमध्यें एक मोठा व निरर्थक वृत्तांत मुंबई सरकारच्या पक्षानें लिहिला आहे, व तो एके सरकार कामदारानें लिहिला आहे, असें ह्मणतात. त्यांत तो निरर्थकपणें असें म्हणतो कीं मिसेस लाडर ही स्त्री सध्या मुंबईत नाहीं, व तिचा सातारा प्रकरणांत जो संबंध होता त्याविषयीं बोलतांना, ती एक प्रतिस्पर्द्धी होती असें म्हणतो. परंतु लोकांस असें सांगत नाहीं कीं सरकारनें तिला आपले शस्त्र नेमिलें होतें, व ही गोष्ट तो सांगता असा संभवही नव्हता.

कीं या पत्रांतून बहुतकांस असें काहीं नव्हते कीं जेणेंकरून राजास अपराधी ठरवावें, आणि असें कीं बाकीचीं जीं पत्रें राहिलीं, तीं तर सर्व खोटीं केलेलीं आहेत. सर जेम्स करन्याकनें हिंदुस्थानांत गवर्नर होऊन येते समयीं त्याणें असें बोलून दाखविलें कीं मी या राजाचा तंटा सलगीने रीतीनें तोडावा, असा निश्चय केला आहे—परंतु असें नाहीं, त्याचा मतलब हा होता कीं राजास कांहीं त्यावर गुन्हा शाबूत करण्यास आधार नसतां पदच्युत करावा, आणि त्यास पदच्युत करण्यास त्याचा अपराध हाच होता, कीं आपण निर्दोष असें स्थापन करण्याचा फार आग्रह धरिला. प्रतापसिंहास गादीवरून च्युत केल्यानें व त्याचा बंधु आपासाहेब जो जर राजा अपराधि असें खरें आहे, तर तोही तितकाच दोषी असतां त्यास गादीवर बसविल्यानें आपणास बक्षीस मिळेल असा सर जेम्सचा मनोरथ होता, हें तर जगप्रसिद्धच आहे. नाहींतर त्याणें लोक म्हणतात, त्याप्रमाणें आपले संगाती साताऱ्यास जाण्यास एके मोठे नेटिव एजेंटास तीन लक्ष रुपये दिले नसते. आपासाहेबापासून मुंबईचा गवर्नरानें दाहा लक्ष रुपये घेतले, किंवा घेतले नाहीं या विषयीं निर्णय करायास आम्हीं बसत नाहीं, परंतु राजास पदच्युत केला, आपासाहेबास त्याचे गादीवर बसविला, व पदभ्रष्ट केलेले राजाचे दौलतीचा कांहींचा अंशाची विलायतेस रवानगी झाली. या गोष्टी बाळापंत नातु दिवाणजी, व पोलिटिकाल कमिशनर यां व्यतिरिक्त इतरांसही माहीत आहेत. एथें ही गोष्ट सांगणें नीट आहे कीं आपासाहेबास गादीवर बसविते समयीं त्यांशीं असा करार केला होता कीं त्याणें पुष्कळ बायका करूं नयेत, आणि जर त्यास पुत्र संतान न झालें, ता तो देश इंग्लिशांचे हस्तगत करावा. आपासाहेबांस कांहीं पुत्र संतान नाहीं– व दुसरी बायको केल्याशिवाय होणारही नाहीं, असा संभव दिसतो, गादीस मालक होण्याचें ठिकाण एक राजाचे पुतण्याचें कुटुंब होतें, आणि कंपनी सरकारानें असंभाव्य वारस्यापासून आपली सुटका करण्यास जो उपाय केला, तो तर मोठा अघोर व हृदयास द्रव आणण्याजोगा होय. हा पुतण्या जाचें नांव बाळासाहेब होतें, त्याणें माजी राजाचे एके बहिणीशीं विवाह केला होता, व त्याचा प्रतापसिंहाबरोबर काशीस जाण्याचा इरादा होता. बाळासाहेबाचा पत्नीचा प्रसूत होण्याचा समय समीप आला, म्हणून राजानें मुकाम करण्याची परमाणगी मागीतली, परंतु लेफ्टनेंट × × × जो स्वारी बरोबर होता, त्याणें हें बोलणें मुदाम कबुल केलें नाहीं. पुढें जेव्हां राजभगिनी प्रसवली तेव्हां देखील मुकाम करण्याचा अर्ज मान्य केला नाहीं. बाळासाहेबास या गोष्टीचा मोठा संताप येऊन त्यास एकाएकीं दुखणें झालें, तरी मुकाम करणें कबूल केलें नाहीं, व औषध उपायही केले नाहीं. आणि थोड्याच घटिका नंतर राजाचा पुतण्या आपले पालखींत विलक्षण वर्णे करून युक्त झालेला दिसला. सारांश तो मरण पावला. त्याप्रमाणें जेथून साताऱ्चे गादीस कोणी मालक होईल, हा संभव होता, तें स्थान अगोदर इंग्लिश कामदाराचे दुष्ट वर्तणुकेनें भग्न करून टांकिलें. आणि आपासाहेबाचे मरणानंतर साताऱ्चें मातब्बर संस्थान इंग्लिश इस्ट इंडिया कंपनीचे स्वाधीन होईल, अशी आम्ही ईश्वराकडे मागणी मागतों कीं ज्या साधनेंकरून तें मिळविलें आहे, त्यामुळे ईश्वराचा कोप त्या दुर्दैवी देशावर न होवो.

या वरील भागांत आम्ही संक्षेपेंकरून नेटिव मुसलमान आणि इंग्लिश अमलांतली हिंदुस्थानाची बखर लिहिली आहे. आतां फार परिश्रम व शोध न करितां असें साफ दिसोन येतें कीं मुसलमान लोक लुटीच धर्मोत्साहाचें मिष करून लूट मिळवीत होते, व इंग्लिशानीं राज्य व व्यापार व राहावयाबद्दल राज्यसंग्रह व वृद्धि चालविली आहे. मुसलमानाचा हिंदु लोकांस आपले धर्मांत बाटवून आणण्याविषयींचा फारसा आग्रह नव्हता, जरी हेंच त्यांस हिंदुस्थानांत दर खेपेस आणण्यास कारण होतें, असें म्हणत. हिंदु लोकांचीं देवाल्यें, जांत द्रव्य लपवून ठेवलें आहे, असें ते मानीत, तीं आपले हस्तगत व्हावीं, हाच हेतु त्याचे फौजेस हिंमत आणण्यास कारण होय, व हें द्रव्य त्यांस मिळालें म्हणजे ते तृप्त

असत. मोठमोठाले कर ते एथील लोकांवर समयानुसार बसवीत असत, परंतु जसे ब्रिटिशांनीं या देशावर मोठाले कर बसविले आहेत, तसे त्यांहीं कधींही बसविले नव्हते. मुसल्मानाचे राज्यांत हिंदुस्थानांतील उत्पन्न केलेलें सामानही बरेंच पूर्णतेस आलें होतें, व त्याचा सर्व लोकांत चाहाही झाला होता. परंतु ब्रिटिशांचा बेत व वर्तणुक असी आहे कीं हिंदुस्थानाची सामान इत्यादि उत्पन्न करण्याची शक्ति अगदीं मोडून टांकावी कीं जेणेंकरून युरोपांतील उत्पन्न केलेले सामानाचा खप व्हावा. जेव्हां आपण मुसल्मानाचे व इंग्रजाचे राज्य नीतीविषयीं विचार करितों, तेव्हां असें पक्केपणीं ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं मुसल्मान लोक हे रानटी व हिंदु लोकांपेक्षां देखील कमी सुधारले होते, परंतु इंग्लिशांची गोष्ट पाहिली तर ते तर काय सुधारलेपणाचा तर आपण कळसच अशी आपण बढाई करितात, आणि ते आपली राज्यकारभार करण्याची युक्ति सर्वोत्कृष्ट असा गर्व करितात. म्हणून मुसल्मानाचे राज्यांत तो सुधारलेपणा जो सध्याचे युरोपियन राजांत आहे, किंवा जी राज्यकारभार करण्याची चाल कीं जिला म्हणजे जुलुमाचा कलंक देखील नाहीं, ती असावी, असें आमचानें म्हणवत नाहीं. असो ही एक गोष्ट सिद्धच आहे कीं इंग्लियांची जमाबंदी. दुसरे पहिले हिंदुस्थानांत राजे होऊन गेले, त्यापेक्षां फार जुल्माची आहे, व लोकांजवळ मालमत्ताही फार कमी झाली आहे. या अश्याप्रकारें या देशांतील सर्व उत्पन्न नेहमी धुवून जात आहे, व त्यामुळें हा देश दारिद्र अवस्थेस आला आहे, आणि जरी अद्यापि पुष्कळ द्रव्य उत्पन्न करण्याचीं साधनें या एथील लोकांचा स्वाधीन आहेत, व हे आम्हीं लागलेंच पुढें सिद्ध करून दाखविणार आहों, तरी आपल्या वडिलांचा चाली जा पुरातन पासून चालत आल्या आहेत, त्या विरुद्ध कोणतीही गोष्ट करण्यास यांचा सर्व पृथ्वीतले लोकांपेक्षा मोठा दुराग्रह आहे.

हिंदुस्थान देश जा रीतीनें सध्या आहे, त्याकडे आपण अवलोकन करून पाहूं लागलों असतां, व त्यांचा सांप्रतचे स्थितीचा नीटपणें विचार करूं गेलों असतां असें आपणास खास दिसोन येईल, कीं जा सर्व लोकांची या विस्तीर्ण देशांत वस्ती आहे, त्याचें कल्याण होण्यास व ब्रिटिशांचे राज्याची स्वस्थता व स्थिरता असण्यास एक राज्यकारभार करण्याचे रीतींत मोठा फेरफार झाला पाहिजे, नाहींतर या लोकांचे उद्योगांत व वर्तणुकेंत कांहीं नवीन रचना झाली पाहिजे. इंडियाचे कोणतेही भागांत गेलों असतां सांप्रतचें जमाबंदी, शिबंदी अथवा न्याय खातें, यांचा कारभारांत जे लोकांवर मोठमोठाले कर, अंदाधुंदी, आणि जुलूम आहे, याविषयीं आणि हिंदुस्थानांतील उत्पन्न केलेलें सामान यावर अनिवार मोठी जकात बसविलेली आहे, कीं जेणेंकरून त्या जिनसांस विलायतचे बाजारांत जाण्यास मार्ग न मिळावा याविषयीं व या काम करणारे लोकांनीं यामुळें आपआपले धंदे सोडून दिले, व भिकेस लागले याविषयीं चहूंकडून लोक गाऱ्हाणीं करितात, असें आपले आढळण्यांत येईल. हीं असलीं गाऱ्हाणीं ऐकून आम्हास फार दुःख वाटतें, लोकांचे उद्योगास प्रतिबंध करणारे असे जे मोटमोठाले कर आहेत, तेही पाहून आम्हास खेद वाटतो.

चांगलीं प्रमाणें समोर असताना आमचानें कधींही नाहीं म्हणववत नाहीं, कीं जेव्हां दिवाणींत अथवा फौजदारींत युरापियन लोकांवर कज्जा आणलेला असतो, अथवा कंपनीचे कोडतांत त्यांवर फियाद असती, तेव्हां जो बिचारा नेटिव कज्जा चालणारा असतो, तो गरादींत गुन्हेगाराप्रमाणें उभा असतो, आणि हा शुभ्र तोंडाचा गुन्हेगार न्यायाधीशाचे शेजारीं खुर्ची बेऊन बसतो, अथवा कधीं कधीं जो अधिक पैका देऊं सकेल, त्याचे तर्फेचा न्याय होतो. आणखी आमचानें नाहीं म्हणवत नाहीं कीं गरीबास बहुत करून शासन होतें, कारण कीं तो दरिद्री पडला व मातब्बर पेंचांतून सुटतो, कारण कीं तो श्रीमंत पडला, व दैवयोगेंकरून असेंही घडतें कीं तो न्याय करणारा या गृहस्थाचा बऱ्याच पैक्याचा ऋणकरी असतो. या सर्व गोष्टी एथील लोकांचा इतक्या माहितींतल्या आहेत, कीं जेथजेथें त्या नाहींत तेथतेथें त्या लोकांस आश्चर्य वाटतें, व त्याविषयीं गवगवा उत्पन्न होतो, व जेथें त्या आहेत, तेथें

आश्चर्य वाटण्याचें काय प्रयोजन ! वाः काय ही न्याय करण्याची उत्कृष्ट चाल ! मग बर्क साहेबानें जो दोष ठेविला आहे, त्याचें आपण कां बरें आश्चर्य मानावें ! कीं "हिंदुस्थानांत राज्य नव्हे, लष्करी अमल, व दिवाणी जुलूम आहे."

शाहुजी जो तांजोर गादीवर आपला दावा करीत होता, त्याचे प्रकरणांत आपणास असें पक्कें दिसोन आलें कीं इंग्रेजांचे आश्वासनावर नेटिव लोकांचा विश्वास अगदीं बुडाला, आणि इंग्रेजांनीं जी या बाबे पुढें वर्तणुक केली, त्यावरून हें आमचे म्हणणें खास सिद्ध होतें. कलकत्त्यांतील वमिचंद अथवा नबाब आली रिझाखान यां बाबे ज्या प्रकारें इंग्लिशांहीं वर्तणूक केली, व त्यामुळें जी आपली बेअब्रु झाली, तिजकडे अगदींच आपलें लक्ष दिलें नाहीं. तोच प्रकार हाल्लीं कमजास्त रीतीनें व नानाप्रकारचे संबोधनानें व मिषानें चालला आहे. काबुलांत हल्लीं जी मोठी धामधूम झाली होती, त्यांत इंग्रजांस बेविश्वास करण्यानें जे परिणाम होतात, याविषयीं बराच चांगला धडा मिळाला.* अफगाणिस्थानांत जाऊं येऊं देण्याकरितां तेथल्या घांटांतील रस्ता खुला ठेवण्यासाठीं तेथील वेलुची लोकांचे कित्येक सरदारांस दर साल ४०००० रुपये देण्याचा ठराव केला होता. १८३८ आणि १८३९ चे सालीं ही रक्कम त्यांस बरोबर पोंहचली, परंतु १८४१ चे सालीं ती पगार करण्यास सर उलियम मेकनाटननें कबूल केलें नाहीं. हा उघड बेविश्वास झाला. या शिवाय आणखी असें झालें कीं एके गोरे पलटणींतील कित्येक लोकांनीं अफगाण लोकांचा बायकांवर जुलूम केला, म्हणून याविषयीं बंदोबस्त व्हावा, यासाठीं ते लोक सर अलेक्झांडर बरनिस जवळ फिर्याद गेले. परंतु याविषयीं कांहींच केलें गेलें नाहीं. मग पुढे याचा परिणाम काय झाला म्हणाल, तर त्या सर्वांहीं अशी उघड जाहिरात लाविली कीं, ब्रिटिश लोक अगदीं आपला न्याय करीत नाहींत. त्या सर्वांनीं कट करून एकदांच त्यांची संख्या उठली, व बरनिस आणि कित्येक यांस ठार मारिलें व मोठ्ये शौर्यानें लढूं लागले. हा प्रसंग घडून येण्याचे कांहींसे पूर्वी, जसे काय हा वरील सांगीतलेला काबुचे लोकांवर जुलूम पुरता झाला नाहीं, म्हणून त्याचे एके सरदारास, जास बंदिवान करून इंग्रेजांचे छावणींत व अमलांत आणिला होता, त्यास त्याचा कांहीं तपास किंवा विचार न करितां फाशीं दिलें. हें कदाचित सुधारलेपणाचें उदाहरण असावें. हिंदुस्थानचं लोक आपले शरीरावर किंवा आपले प्रतिष्ठेवर किंवा आपले मालमतेवर जुलूम होतो, म्हणून त्याचा सूड उगवितात, किंवा तो भरून मागतात, म्हणून त्यास बंडखोर व रानटी असें म्हणावें कीं काय ? आम्हास असें वाटतें कीं त्यांस असें कधींही म्हणूं नये. इंग्लिशांपासून अफगाण लोकांवर फार जुलूम झाला आहे. त्यांहीं पसंत केलेला राजा दोस्त महमद यास गादीवरून पदच्यूत केलें, आणि ज्या पुरुषाचा तेथील रयत अगदीं तिरस्कार करिती, त्यास लोकांवर जुलूम करण्यास व पुढें रक्ताचा प्रवाह उत्पन्न करण्यास ब्रिटिशांचे फौजेनें गादीवर बसविला. सुप्रीम गवर्न्मेंटानें जी या अफगाण प्रकरणांत वर्तणूक केली आहे, त्यावरून हिंदुस्थानांतले ब्रिटिश राज्यास बराच धोका लागेल, आणि हा आम्हास मोठा खेद वाटतो कीं आमचे राज्यकर्त्यांचें डोळे अद्यापि उघडत नाहींत कीं हे ४०००० रुपये पगार न केल्यानें त्याचे राज्यास विघ्न होईल, व त्याचा नुसता जमिनीचा अखत्यार मातीचे किमतीस मिळेल.

मिठाचा व अफिणीचा प्रतिबंधकारक व्यापार चालविला आहे, त्यापासून हिंदुस्थानांतले लोकांचा फार नाश झाला, व जरी कंपनीचे सनदेंत कोणताही व्यापार करण्याची बंदि आहे, तरी कंपनीनें लोकांस बंदी करून हा असला दुष्ट व जुलमी व्यापार चालविला आहे, हा कोणत्या जिनसाचा म्हणाल तर चंदन, वेलदोडे, व तंबाखू याचा होय. रयतेस, व जमीनदारांस, इतर लोकांस या जिनसा विकल्यानें अधिक

* सर उलियम मेकनाटनचे मरणाची खबर व दुसऱ्या कित्येक सांप्रतचा गोष्टी येवून पोंचण्याचे पूर्वी हे विचार आम्हीं लिहिले होते.

किंमत येती, असें जरी आहे, तथापि कंपनी सरकारचे कलेक्टरानीं असा कायदा केला आहे कीं हा व्यापार मधलेमध्यें लोकांत केल्यास मोठा दंड होईल. समुद्र कांठापासून थोड्याशा अंतरावर चंदन व वेलदोडे इत्यादि जिनसा कंपनी खरेदी करिती, व त्याचे जे गुमास्ते आहेत, ते मग समुद्र काठीं खरीद केलेल्या किमतीवर २५ टक्याचे नफ्यानें विकतात. या गोष्टीमुळें मलबार, कानडा, इत्यादि देशांतले लोकांमध्यें फार असंतुष्टपणा उत्पन्न झाला आहे, व जमिनीवर सरकार देणें फार पडतें म्हणून जा जमिनींत पेरणीपूर्वी करीत ती सर्व सध्या ओसाड व रानासारिखी पडली आहे. लागवड जमिनीवर जें सध्या सरकार देणें पडत आहे, तें उर्वं जमिनीचा उत्पन्नाचा ७/८ हा किंवा आधिक आहे, म्हणून सावकारांस खास तोटा आहे असें समजल्यानें योतभातास आपला पैका लावण्यास अगदीं उमेद वाटत नाहीं, या अशा मोठमोठ्या करांमुळें शेतकी अगदीं बुडाली, आणि सरकारचे जमाबंदी खात्यांत जी तूट सध्या दिसती, याचेही हेंच कारण असें आम्हास दिसतें. जसी हिंदुस्थानांतले कारभारांत सध्या फेरफार होण्याची आवश्यकता आपणास दिसोन येती, तसी कोणत्याही देशांत आपले ऐकण्यांत आली नाहीं, आणि असा संभव दिसतो कीं जी सध्या जुल्माची रीत हिंदुस्थानांत चालली आहे, तिचे जोडीस कोठेही दुसरी आढळणार नाहीं. ही जी आम्ही व्यापारसंबंधी गोष्ट सांगीतली ही अतिशयोक्ति नव्हे—हौस् आफ् कामन्सचा पुष्कळ सभा झाल्या होत्या, त्यांत जे लेख लिहून ठेविले आहेत, त्यावरून व जें आम्हीं प्रत्यक्ष आमचे डोळ्यानें पाहिलें त्यावरून या वर सांगीतलेल्या गोष्टींचा सत्यपणा स्थापन होतें. हा असला कारभार हिंदुस्थानांत किती दिवस चालेल बरे? जेव्हां आपण या देशाचे स्थितीकडे अवलोकन करूं लागलों, तेव्हां हा प्रश्न आपले मनांत साहजिक उत्पन्न होतो कीं ही इतकी मोठी लोकांची संख्या इचा उदर निर्वाह कोणत्या प्रकारें चालेल, व जें अनिवार द्रव्य सध्या हिंदुस्थानांतून दरवर्षांस जात आहे, त्याचप्रमाणें पुढें हे असले दुःखदायक कर व सरकार देणगी असीच असतांना कसें चालूं सकेल? आणि असी गोष्ट आहे कीं जवपर्यंत कंमनी सरकार मोठमोठ्या खर्चांचे लढायांत गुंतलें आहे, तवपर्यंत हें रयतेवरलें ओझें कमी होईलसें दिसत नाहीं, आणि असा बहुतकरून संभव दिसतो कीं सांप्रतचे सनदेची मुदत भरल्या नंतर व हा देश मग इंग्लंडचे बादशाचे अमलांत गेल्यानंतर हिंदुस्थानांतले लोकांवर अधिक कर बसवितील व त्यांस अधिक सरकार देणग्या द्याव्या लागतील, कीं, जेणेंकरून पुढें पार्लमेंटानें कंपनीचें ऋण फेडावें, यास्तव इंग्लिशांचे मदतीनें हिंदुस्थानची स्थिती सुधारेल, हे म्हणणें निरर्थक होय. तर मग हिंदुस्थानास सौख्य व अबादानी प्राप्त होण्यास कोणतीं साधनें असावीं? ही गोष्ट वास्तवीक आहे, कीं हें होणें इतर व परलोकांचे मदतीवर नाहीं—तर हिंदुस्थानांतले लोकांची स्थिती सुधारणें हें त्यांचे स्वाधीन आहे. तें कसें म्हणाल तर जी कांहीं सौख्य प्राप्त होण्याचीं अद्यापि या देशांत साधनें राहिलीं आहेत, त्याविषयीं प्रयत्न केल्यानें व धंदा रोजगार मिळण्याचीं नवीं नवीं ठिकाणें काढल्यानें, व जांजवळ द्रव्य आहे, त्याहीं ते माल उत्पन्न करण्यांत लावल्यानें या लोकांची स्थिति सुधारली जाईल, आणि जो माल एथील लोक आपल्या मेहनतीनें सांप्रतचे यंत्रयुक्तीचे व इतर गोष्टींचे साधनें करून उत्पन्न करितील, तर तो आजदिवसपर्यंत जाहीं माल उत्पन्न केला आहे, त्यापेक्षां विशेषेंकरून चांगला व नफेदायक होईल. या देशांत तो चांगले पूर्णतेसही आणवेल.

हिंदुस्थानांत कापूस वगैरे जिनस जावत्कालपर्यंत पिकत आहे, तावत्कालपर्यंत हा मुलुख कधींही निष्कांचन होणार नाहीं, परंतु जो जिनस विलायत चीन आदिकरून परमुलखांत पाठवून त्याचीं वस्त्रें वगैरे झाल्यावरतीं पुनः या देशांत आणण्यापासून तो अर्थात् नेहमी दरिद्री होत जाईल, आणि एथील राहणारे दिवसानुदिवस अधिक आळशी होतील, याजकरितां एथल्या लोकांहीं जो जिनस एथें पिकतो, त्याचे पदार्थ उत्पन्न करण्याचे उद्योगास लागावें, असें केलें असतां त्यांचे लक्षांत येईल, कीं

उद्योग हीच द्रव्याची खाण आहे—इंग्लंड देश एकदा धनाढ्य आणि सत्ताधारी कशानें झाला? तेथल्या लोकांस पुरे इतकें अन्न वस्त्र देखील ग्रेट ब्रिटन एथें उत्पन्न होत नाहीं, असें असतां ते लोक आपले उद्योगाचे आणि मेहनतीचे बळानें सर्व पृथ्वींतील द्रव्याचा आणि सुखाचा अनुभव घेताहेत. त्या लोकांस अन्नवस्त्राची जो अतिशय गरज तीणें करूनच त्यांचे उद्योगाची बढती होऊन ते राज्य प्रकरणांतही उदयास आले. हिंदुस्थानांत अन्नाची समृद्धी आणि एथें ऊर्णावस्त्राची अगदीं गरज नाहीं, तेणेंकरून हे लोक आळशी आणि दरिद्री होऊन त्यांजमध्यें इंग्रेज लोकांचा परिश्रम आणि सौख्य हीं राहिलीं नाहींत. तेव्हां या देशास सर्व पदार्थांची समृद्धि हा जो ईश्वराचा उपकार या लोकांवर होता, तोच त्याचे नाशाविषयीं कारण झाला, तेव्हां इंग्रेजांस जशी धान्यादिकांची गरज पडून ते उद्योगी जाहाले, तशी गरज जर या देशाचे लोकांस असती, तर त्यांचा आळशीपणा न राहतां ते उद्योगास लागले असते, तेणेंकरून ते सर्व कळाकौशल्यांत अधिक शाहाणे जाहाले असते. इंग्लंड देश दुर्भिक्ष आणि दरिद्री होता, हेंच तेथल्या लोकांचे संपत्तीस, सुखास, आणि बळास कारण जाहलें, आणि हिंदुस्थानांत सर्व पदार्थांची समृद्धी होती, तेणेंकरूनच हे लोक दरिद्री जाहले. हें भाषण यद्यपि विसंगत भासतें, तथापि हे यथार्थ आहे, यांत कांहीं संशय नाहीं.

विद्याभ्यासानें मनःशुद्धी करण्याचीं जीं साधनें करून ठेविलीं आहेत, त्यांकडे हिंदु लोक दुर्लक्ष करितात, असें नाहीं, परंतु नीट करून त्याचा पुढल्या परिणामाचा विचार करीत नाहींत. इंग्रेजी भाषेचा अभ्यास करण्यास फार आतुर म्हणून जेथें जेथें शाळा घातलेल्या आहेत, तेथें तेथें शाळा मुलें करून भरलेल्या असतात, व तेथें ते बराच विद्याभ्यासही करितात, परंतु या अशा लोक कल्याणार्थ शाळा घालणाराचे लक्षांत असें कधींच आलें नाहीं कीं या मुलांनीं पुढें आपला उदर निर्वाह कोणत्या प्रकारें चालवावा? कंपनी सरकार मोठमोठ्या पगाराचा व विश्वासाचा जागा नेटिव लोकांस अगदीं देत नाहीं. विद्येंकरून त्यांचीं मनें मोठीं होतील, व त्यांस सृष्टींत कोणत्या रीतीनें वागावें हें ज्ञान प्राप्त होईल, परंतु या ज्ञानाचा उपयोग करण्यास त्यांस कोणताही मार्ग करून ठेवला नाहीं, अथवा जा प्रकारें त्यांस सध्या विद्याभ्यास शिकवितात, तो प्रकार त्यांस पुढे ज्या धंद्यांत ते पडणार, त्यांत वाकब करण्यास उपयोगी आहे काय? इंग्लंड देशांत ज्याप्रमाणें तरुण मुलांस विद्याभ्यास करवितात, त्याचप्रमाणें कलकत्यांतील हिंदु पाठशाळेंत, किंवा मद्रासेंतील युनिवरसिटींत किंवा मुंबईचे एल्फिन्स्टन कालेजांत मुलांकरवीं करवितात, परंतु विलायतेंतील मुलांचे आईबापांस एथल्यापेक्षां अधिक स्वतंत्रता आहे, हें कोणीच मनांत आणीत नाहीं. एथील लोक मुख्यत्वें करून शाळा सोडल्यावर कारकुनाचा धंदा करितात. त्यांहीं जी विद्या संपादन केली असती, त्याप्रमाणें त्याचा पगार किंवा त्यांचें लोकांत वजन नसतें, आणि या शाळांत जातिभेद अगदीं ठेविला नाहीं, व हलके लोकांची जात अधिक पडली, व त्यांस लिहिण्याचे कामापेक्षां त्यांची स्वतांची हस्तमजुरी सांप्रतचे हिंदु रीतीप्रमाणें फार कठीण वाटते, म्हणून या शाळांत बहुत करून हलके जातीचीं मुलें फार असतात, यास्तव व्यापाऱ्यांस किंवा पेटीदारांस, अथवा कंपनीचे कचेरीस जितके एकंदर कारकुन पाहिजेत, किंवा जितक्यांची गरज आहे, त्यापेक्षां त्यांची संख्या सध्या अनिवार आहे, तरी दरवर्षास सहस्रावधि दुसरे तयार होतच आहेत, मग अर्थातच ते थोड्या पगारावरही राहतात. एणेंकरून चाकरीचा व पगार अधिक मिळण्याचा प्रसंग कमी होत आला आहे. सरासरी पाहिलें असतां मागें नेटिव कारकुनास दरमाहां ५० रुपये मिळत, परंतु सध्या म्हणाल तर त्यांचा बारा रुपये दर झाला आहे, आणि जर सरकारांतील मोठमोठाल्या जागा हालींप्रमाणें त्यांस दिल्या नाहींत, व जर त्यांहीं यंत्रयुक्ति इत्यादि रोजगार आपणास काढिले नाहींत, तर कारकुनास पुढें कांहीं वर्षांनीं दरमाहां ५ रुपयांपेक्षां अधिक मिळणार नाहीं असें होईल. यावरून असें सिद्ध होतें कीं सध्या जा रीतीनें मुलांस विद्याभ्यास करवितात, ती रीत त्यांचे सांप्रतचे स्थितीस अगदीं अनुसरून नाहीं, परंतु त्यापासून त्यांचें

अनहित मात्र होतें. आमचें म्हणणें असें नाहीं कीं नेटिव लोकांत ज्ञानाचा प्रसार होऊं नये, परंतु आमचे असें वारंवार पहाण्यांत येतें कीं शाळेंतून बहुतेक मुलें आपला उदर निर्वाह चालविण्याचीं साधनें नसतां तयार होऊन निघतात. ही गोष्ट त्याचे मोठे विश्रेस अगदीं अनुसरून नाहीं.

असें कोणी मानूं नये कीं आम्ही कोणत्येही गोष्टीचे दोष मात्र दाखवितों, व गुणाकडे अगदीं लक्ष देत नाहीं, किंवा आम्ही लोकांचा गान्हाण्याकडे विशेष मन देतों. जीं कारणें आम्ही वर लिहिलीं आहेत, त्यांपासून पुष्कळ लोकांचें अनहित झालें आहे, आणि हिंदुस्थानांतले लोकांची वरील स्थिती अशी दया येण्या जोगी आहे कीं तिचें वर्णन आमचानें करवत नाहीं, आणि यास दृष्टांत देण्यास आम्हीं जें बोलणें मिस्तर मेकालि जो पूर्वी बंगाल खात्यांत होता, त्याणें हौस आफ कामन्सचे सभेंत केलें होतें तें आम्ही उतरून घेतों, तो म्हणाला कीं "हिंदुस्थानांतले रहवासी लोक इतके निराश्रित व विपतींत आहेत कीं गवर्नर जनरल (लार्ड आकलंड) यास जे शेतकरी लोक रस्त्यांत किंवा रस्त्याचे बाजूचे खाचींत क्षुधेनें मरत, त्यांस हांकलून देण्याची गरज पडली, कीं जेणेंकरून त्यांची विपति आपले दृष्टीस पडूं नये." जर हें अवलोकन केल्यानें इंग्रेजाचे मनास दुःख व द्रव उत्पन्न होतो, तर आपले स्वजातीय लोकांची अशी कठिण अवस्था पाहून नेटीव लोकांचे मनास कांहींच दुःख वाटत नसेल काय? व मुसलमान राजांहीं जें त्यांजवर मोठमोठाले जुलूम केले होते, त्या बाबे त्यांचे मनांत कांहीं येत नसेल काय? इंग्रेजांची वर्तणूक म्हटली म्हणजे मुसलमानानीं जो पाया घातला होता, त्याबर्हुकूमच चालली आहे, त्यांत व यांत भेद कोणता म्हणाल, तर इंग्रेज लोक तोच प्रकार पूर्णतेस आणितात.

जर इंग्लंड हा माल उत्पन्न करण्याचा देश होय, व त्याचें सर्व धोरण त्याचे दुरचे राज्यांत त्यांचा माल खपतो यावर आहे. हिंदुस्थान हेंही यांमधलें एक राज्य होय, आणि जर इंग्लंडचा मतलब असा आहे कीं आपल्या मालाचा खप व्हावा, म्हणून हिंदुस्थानांत उत्पन्न केलेले मालास प्रतिबंध व त्याजवर मोठमोठाले कर बसविले आहेत, विलायतेंतला माल उगीच नावापुरती जकात देऊन हिंदुस्थानांतले बंदरांत येऊं देतात. तर हिंदु लोकांचे उद्योगास व उपजीविका मिळवण्यास यापेक्षां दुसरा कोणता बरें प्रतिबंधकारक जुलूम आहे? विलायतेंतील उत्पन्न केलेला माल हिंदुस्थानांत आणून नेटिव लोकांत विकतात, व हिंदुस्थानांत उत्पन्न केलेला माल विलायतेंत जाण्यास प्रतिबंध आहे. यास्तव जो प्रकार सध्या इंग्रेजांहीं चालविला आहे, तो असा कीं आपला माल हरहुन्नेर करून विकवावा, तोच प्रकार हिंदु लोकांहीं चालविला पाहिजे, आणि जर इंग्लंड देश आपले राज्यांत एथला माल येऊं देणार नाहीं तर नेटिव लोकांहीं माल उत्पन्न करण्यास लागावें, व यंत्रादि युक्तींचा उपयोग करावा, व एथें मजूरी सस्ती आहे, व एथें उत्पन्न केलेला माल सर्व प्रकारें चांगला होईल, यामुळें हिंदुस्थानांतले बाजारांत एथील उत्पन्न केलेल्या मालाचा खप होऊं लागेल, व युरोप आणि एशिया खंडांतले इतर मुलखांतही इंग्लिशांचे मालास एकीकडे करून हिंदुस्थानचा मालाची जिकडे तिकडे वाहावा होईल.

यंत्रादि युक्तीपासून काय फायदा आहे, व तिचा उपयोग किती विस्तारें करून करितां येईल, हें दाखविण्यासही गोष्ट सांगणें अप्रयोजक नाहीं, कीं इंग्लंडांत व स्काटलंडांत जी यंत्र युक्ति तेथील कामदार लोक चालवितात, ती एक अर्बुद मनुष्यांचे हस्तमजुरी बरोबर आहे, म्हणून यंत्रादि युक्तीचे मदतीशिवाय हिंदुस्थानांतले किंवा सर्व पृथ्वीवरले लोकांस इंग्लिशांबरोबर माल उत्पन्न करण्यांत प्रतिस्पर्द्धा करवणार नाहीं, परंतु यंत्रादि युक्तीचे साहाय्यानें जो हिंदुस्थानांत माल उत्पन्न होईल, त्याची बरोबरी कोणाचानेंही करवणार नाहीं, कारण कीं हिंदुस्थानांत माल उत्पन्न करण्याचे सामानाची पुष्कळ समृद्धि आहे. ग्रेट ब्रिटन देशास माल उत्पन्न करण्याचें सामान परदेशांतून आणण्यास फार खर्च पडतो.

ही गोष्ट सांगणें आम्ही राहूं देऊं नये कीं सध्या हिंदुस्थान देशांत पिकलेलें सर्व सामान ग्रेट ब्रिटन किंवा चीन एथें माल होण्यास जातें व नंतर तोच माल एथील नेटिव लोक पुष्कळ पैका खर्चून

विकत घेतात. हें असें कां होतें याचें कारण उघड आहे. हिंदुस्थानातले हस्तमेहनत करणाराचानें विलायतचे यंत्र युक्तीची किंवा चीनचे सस्ते मजुरीची बरोबरी कावत नाहीं. यास्तव विलायतेंतील यंत्रादि युक्ति हिंदुस्थानांत आणल्यानें असें खास होईल, कीं हा देश मग आपल्यास व इतर देशास जितक्या मालाचा खप आहे; तितका माल एथें पिकलेल्या सामानापासून उत्पन्न होऊं सकेल, व एणेंकरून हिंदुस्थानास आपला प्राचीन द्रव्य संपादन करण्याचा मार्ग प्राप्त होईल.

एथें यंत्रादि युक्ति आणण्यानें या दुर्दैवी देशास नानाप्रकारचे लाभ होतील. सर्व लोक कबूल करितील कीं, कळाकौशल्य हें लोकांचे स्वतंत्रपणाचें मुख्य कारण होय. कारण कीं कोणतेही देशांत कारागिरांस आपला धंदा करण्यास स्वतंत्रता असती, मग त्याचा धंदा कसाही मेहनतीचा असो. यास्तव कोणतेही लोकांत सुधारलेपणा वाढण्यास, व जी सुधारलेले लोकांत आपआपल्यांत प्रीति असती, ती त्यांत उत्पन्न करण्यास कळाकौशल्य हें मोठें साधन होय, हे व दुसरे पुष्कळ फायदे यंत्रादि युक्तींचा उपयोग केल्यानें प्राप्त होतात.

यंत्रादि युक्तींचा हिंदुस्थानांत उपयोग करण्याचे पुष्कळ प्रकार आहेत, परंतु या सर्वांत कापुसाचा माल व ताके तयार करण्यानें पुष्कळ नफा आहे, व त्याचा पुष्कळ उपयोगही आहे, व कोणी आपलें मुद्दल या कामांत लावण्यानें त्यास यापासून त्वरित व चांगला फायदा होईल, हो गोष्ट उघड आहे. हिंदुस्थानांतले सर्व लोकांत व जवळचे देशांत जो या मालाचा खप आहे, व एथील सामान विलायतेस पाठविण्यास जो पुष्कळ खर्च पडतो, तो वांचेल. कापूस झाडावरून काढिल्यानंतर फार दिवस लागण्यानें खराब होतो, व नेटिव लोकांची परीक्षा करण्याची बुद्धि वाढेल, व त्यापासून ते उद्योगी होऊन मेहनत करूं लागतील, या सर्व गोष्टी फार उघड आहेत, व हा प्रयत्न सिद्धीस जाईल, याविषयीं मोठ्या दुराग्रही मनुष्यांची देखील खात्री करण्यास या वरील गोष्टी नुसत्या अनुक्रमानें लिहिण्यापेक्षां दुसरें कांहीं विशेष लिहिण्याची आम्हास गरज दिसत नाहीं. लोकर व रेशीम यांचा माल करणें व साकर इत्यादि उत्पन्न करणें हेंही यंत्रादि युक्तीचे साहाय्यानें बरेंच सिद्धीस जाईल.

सध्या कापूस पिकविण्याकडे लोकांचें फारसें लक्ष नाहीं, यामुळें एथें कापूस फारसा उत्पन्न होत नाहीं, व दुसऱ्या कित्येक कारणाहीं तो उत्तम प्रतीचा होत नाही. परंतु हाय जिनस मुख्यत्वेंकरून माल करण्यास* इंग्लंडांत आणावा लागतो, म्हणून इंग्लंड देशाचें कापुसाविषयीं सर्व धोरण अमेरिका द्वीपावर आहे, परंतु इतकेंच नाहीं, जो सध्या कापुसाचा माल अमेरिकेंत उत्पन्न होतो, तो इंग्लंडापेक्षां विशेष चांगला होतो, व याचें कारण हें आहे कीं कापूस झाडावरून काढल्यावर इंग्लंडास जाऊन पोचण्यास फार काळ लागतो. एणेंकरून थोडासा बिघडून जातो.

हिंदुस्थानांतला कापूस झाडावरून काढल्यापासून त्याचा माल होऊन एथल्या किंवा दुसऱ्या देशांतल्या बाजारांत येऊंन पोंचे तोंपर्यंत जो काळ जातो, त्यामध्यें जे मोठमोठाले त्याजवर खर्च होतात, त्यापासून हिंदु लोकांचे दुहेरी नुकसान होतें, तें असें कीं प्रथमतः असा नाना प्रकारचा खर्च एथल्या कापुसावर पडतो, त्यामुळें विलायतेमध्यें त्याची जी किमत येती, तींत व्यापाऱ्यांस कांहीं नफा नाहीं, तेणेंकरून तो अधिक उत्पन्न करण्यास उमेद राहात नाहीं. दुसरें, हे सर्व खर्च ज्या लोकांमध्यें त्या वस्त्राचा खप होतो, त्याजवर पडतात, तेव्हां अर्थातच त्या कापुसाचें वस्त्र एथें केलें असतां हिंदुस्थानचे लोकांस जी किमत द्यावी लागेल; त्यापेक्षां अतिशय अधिक द्यावी लागती. गुजराथेंत कापसाचा भाव दर रतलास एक आणा किंवा सव्वा पेनि असतो; आणि इंग्लंडांत सहा पेन्स असतो, आणि वस्त्र

* इंग्लंडांत दर वर्षास कापुसाचा माल यावर एक कोटि विलायती चलनी पौंड उत्पन्न होतात. या विषयावर मुंबईतील चेंबर आफ कामर्सचें सरकारास १८४१ सालचें पत्र पाहावें.

केलेले कापुसाची किमत दर रतलास तीन शिलिंग असती. तेव्हां विलायतेंत कापुसाची किमत शेंकडा पांचशें टक्के वाढती, आणि हिंदुस्थानांतल्या वस्त्र घेणारांस कापुसाचे मूळ किमतीवर शेंकडा अडीच हजार टक्के द्यावे लागतात. जर आपण खर्चांचे रकमांचा विचार केला तर ही किमत फार होती, म्हणून आश्चर्य मानूं नये. त्या येणेप्रमाणें, वखार भाडें, पारखणावळ, गट्ठे बांधणावळ, आणि मुंबईस आणण्याकरितां तारवावर चढविणावळ, इतका खर्च इंग्लंडांत होतो. आतां मुंबईस काय फायदा होतो तो पहा. धक्क्यावर आणणावळ, पारखणावळ, स्क्रमध्यें गट्ठे बांधणावळ, तारवावर चढणावळ, नोर, विमा, तदनंतर विलायतेंत तो माल आल्यावर पुनः बंदरांत आणणावळ, वखार भाडें, साफ करणावळ, पिंजणावळ, सूत कांतणावळ वगैरे. तसेंच पुनः तारवावर चढिवणावळ, नोर विमा, अडत्याची दस्तुरी इत्यादि अनेक खर्च आहेत, हिंदुस्थानांतून दरवर्षास ८ कोटि रतल कापूस इंग्लंडांत जातो, त्यापैकीं दोन कोटि रतल कापुसाचीं वस्त्रें हिंदुस्थानांत खपतात, हे लोक दरिद्री आहेत, म्हणून इतका वस्त्राचा खर्च त्यांजमध्यें थोडा आहे, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ते जर वस्त्रें करण्याचे कारखाने सुरत, घोघा, अथवा भडोच एथें घातले, तर अर्थात् हे सर्व खर्च टळतील. जसा पाहिजे तसा नामी कापूस घेण्यास हरकत पडणार नाहीं, आणि त्याची खराबीही होणार नाहीं. इतकें जाहाल्यानें अर्थात् इंग्रेजी किंवा चिनई माल त्यापेक्षां अधिक स्वस्त विकणार नाहीं. याप्रमाणें गुजराथचा कारखानदार शेंकडा दोनशें टक्के नफा मिळवील, तेणेंकरून तो कापूस आणि वस्त्रें आज जी किमत आहे, तिजपेक्षां शेंकडा दोन हजार टक्के कमती किमतीने विकूं सकेल, असा तो कारखानदार स्वतां मोठा धनाढ्य होऊन त्याणें सर्व हिंदुस्थानावर मोठा उपकार केल्यासारिखा होईल.

जर ही गोष्ट घडून आली, तर त्यांत इंग्रेज व्यापाऱ्यांचा नाश आहे, तेव्हां ती सिद्धीस न जाण्याविषयीं ते प्रयत्न करितील, ते म्हणतील कीं एथून कापूस विलायतेस जातो ही जी सफर त्यास होती, तेणेंकरून तो चांगला होतो, परंतु ही गोष्ट खरी किंवा खोटी याचा अनुभव नवीन आणायास नको, कां कीं अमेरिकन लोकांचे कारखाने कसे चालले आहेत, त्यावरून हें त्यांचें म्हणणें व्यर्थ आहे, असें स्पष्ट ध्यानांत येईल. गुजराथचे लोकांस पहिल्यानें युरोपियन लोकांचें साहाय्य मिळाल्यानें ते वस्त्रें करण्यांत लवकर कुशळ होतील. पांडिचरी एथें एका कारखान्यांत सुमारें ६०० मनुष्यें काम करितात. एथल्या लोकांस कापुसाची लागवड करण्यास आश्रय देणें हे उचीत आहे, परंतु हें कृत्य विना एथें वस्त्रें करण्याचे कारखाने घातल्याशिवाय होणार नाहीं. असें केलें असतां कारखानदार कापुसाची अधिक किमत देण्यास शक्तिमान होईल, तेणेंकरून चांगला माल त्यासच मिळेल.

हें कृत्य करण्यास एथल्या लोकांहीं प्रथम एक मंडळी करावी, आणि दाहा लक्षांचें भांडवल काढावें, दोन हजार रुपयांचा एक भाग असे पांचशें भाग करावे, जर एक सगळा भाग घेववेना, तर हजार रुपयांचा अर्धा भाग घ्यावा, किंवा पाचशें रुपयांचा एक चतुर्थांश भाग घ्यावा. कापुसाचें सूत कांतण्याचें व वस्त्रें करण्याचें यंत्र आणिवण्याचा खर्च चार लक्ष रुपये होतील. कारखाना बांधण्यास दीड लाख रुपये लागतील, आणि बाकीचे साडेचार लक्षांचा कापूस हातांत राहील, त्यावर कांहीं नाहीं तरी शेंकडा दोनशें टक्के नफा होईल, आणि तीन हजार मनुष्यांची रोजी चालेल. इंग्लंडापेक्षां युरोपांत इतर ठिकाणीं यंत्र किफायतवार आणि चांगलें, तें यंत्र युरोपांतील चार मनुष्यें यांचे साहाय्यानें लागलेंच चालू करतां येईल. या सर्व कृत्यास एक वर्षावर अधिक काळ लागणार नाहीं — हें कृत्य फार चांगलें आहे, याविषयीं आणखी पाल्हाळ केला असतां अतिशयोक्ति मात्र होईल, याजकरितां तसें करीत नाहीं. आपली संपति आणि सौख्य हीं वाढविण्याचें जर त्यांचे मनांत आहे, तर एतद्देशीय लोकांहीं ज्या गोष्टी करून हिंदुस्थानाची पूर्वीची संपदा आणि व्यापार पुनः पूर्व स्थितीवर येतील, ती करण्यास त्यांहीं आपली उत्कंठा प्रकट करावी. जर त्यांचे मनांत तसें करण्याचेंच नसलें, तर आमचा उपाय नाहीं.

यांत जी त्यांचे कन्याची गोष्ट सांगीतली आहे, ती त्यांचे मनांत ठसावी, आणि ठसली असतां कार्यसिद्धि होईल, यांत संशय नाहीं.

या देशांत यंत्रें आणविलीं असतां तें एक द्रव्य मिळविण्याचें साधन होईल, आणि एकदां तीं या लोकांचे वहिवाटींत पडलीं म्हणजे अर्थात एशिया खंडांतले सर्व लोकांपेक्षां श्रेष्ठ होतील, आणि इतर एकादे राजकीय प्रकरणांत फेरफार केला असतां त्यापासून या लोकांचे सुखाची जी वृद्धी होईल, त्यापेक्षां एणेंकरून अधिक होईल, कळाकौशल्यांत त्यांस अभिरुची उत्पन्न होईल, नानाप्रकारचे ह्यातेरांची गरज लागेल, तेणेंकरून नवे नवे उद्योग निघत जातील, आणि आज या लोकांस देशकल्याण करण्याचे वगैरे विचार जे अगदीं माहीत, ते सुचूं लागतील. कोणतीही कळा म्हटली तरी तिचा दुसरे एकादे कलेशीं संबंध असतोच असतो, तेव्हां व्यापारापासून लोक कळाकौशल्यांत हुशार अधिक होतात. कारखाने आणि सर्वांचे उद्योगाचे ऐक्य असणें हेंच सुधारलेले लोकांत राज्याचें बळ आहे. जर लढाईमुळें किंवा दुसरे कांहीं कारणामुळें लोक दरिद्री जाहाले असले, तर त्यांस आपले उद्योगाचे बळानें पुनः पूर्ववत व्हावयास आयास लागत नाहीं. याजकरितां उद्योग वाढविण्यास आश्रय देत असावा, म्हणजे त्यांत असंख्य सुखें आहेत, असें जेथें नाहीं, तेथें दरिद्र असणें हें आहेच आहे.

आम्हीं वर सांगीतलें त्याशिवाय एथल्या लोकांस संपत्तिवान होण्यास दुसरे उपाय आहेत, ते हे कीं हिंदुस्थानांत सोन्या रुप्याचा खाणी पुष्कळ आहेत, परंतु त्याविषयीं सरकारनें किंवा रयतेनें आजता-गाईत शोध केला नाहीं, कोणताही शोध करणें ह्मटलें ह्मणजे या लोकांचा त्याविषयीं आळस आहेच, आणि सरकार तर शोध करण्यांत पहिल्यानें खर्च करण्यास खुशी नाहीं, ते एथल्या लोकांवर जुलूम करून जें द्रव्य मिळवितात, त्यांतच खुशी आहेत, आणि शोध करण्याचे किंवा दुसरे कोणतेही भरीस पडत नाहीं. पृथ्वीचा पोटांत काय खाणी आहेत हा शोध युरोपांत किंवा हिंदुस्थानांत म्हणा बहुतकरून सरकारचे मदतीशिवाय आणि सरकारानें हरकत केली असतांही रयत लोकच करितात. खाणीचा शोध करणें यास एक मोठी हरकत आहे, ती ही कीं जा ठिकाणी खाणी आहेत, त्या जागा बहुधा रोगी असतात. पर्वताचे बाजूस निबिड जंगल अशी जागा युरोपियन लोकांस अगदीं मानत नाहीं, व तेथल्या लोकांस त्यापेक्षां कांहीं बरीं. तीं जंगलें जाळून टांकलीं तर बरें पडेल. त्या पर्वतांचे आसपास जें द्रव्य आहे, त्याचा शोध करीत असतां आम्हास तीन वेळ ज्वरानें हैराण केलें. आम्ही जो शोध केला आहे, तो खालीं लिहितों. तो करते वेळेस तेथल्या सरकारनें म्हटलें असतां आम्हास आश्रय द्यावा, तसें न करितां उलटी आम्हास हरकत केली, तेणेंकरून आम्हास फार संकटें आणि दुःखें भोगावीं लागली.

सर्व धातूंमध्यें उंच धातु असें जें सुवर्ण तें घांटाचे पश्चिमेस ९ पासून वर १३ उत्तर अक्षांशांत ज्या नद्या आहेत, त्यांत सांपडतें, हें आम्ही आपल्या नेत्रानें पाहिलें. या नद्यांचा उगम वैनाड आणि निळगिरी पर्वतापासून आहे, आणि त्या सांगीतल्या अक्षांशावर समुद्र किन्याऱ्यावरही सुवर्णाचे कण सांपडतात. देवील, निल्ग्रम, पोवरी, चीरंकोट यांचे नजीक दक्षिणेस वैनाड एथल्या पर्वतांवर सुवर्ण पुष्कळ आहे. कुंनाद एथें पुनूर आणि मलीपुरंम या नद्यांत सुवर्ण सांपडतें. कालीकोट या परगण्यांत सिरंपाडी आणि इरिपोनी या नद्यांत सांपडतें. शिरूअद परगण्यांत कुकुलांडी आणि परपिनगडी एथें समुद्र काठीं सोनें सांपडतें. हिंदुस्थानांत सोन्याच्या खाणीं आहेत, हें कांहीं नवीन सांगणें आहे असें नाहीं. मिस्तर शिफीलड याणें १८११ त सरकारांत रपोट केला, त्यांत त्याणें अरनाड एथल्या सोन्याचा १४०८ रुपयांचाम क्ता दिला, असें लिहिलें आहे. सन* १७७५-७६ त हैदर अली याणें जमाबंदीचा

* वैनाडचे दक्षिण भागास पिरकमतल एथें जो सोन्याचा खाणी आहेत, त्यांचा आकार टिपु सुलतानाचे वक्तस ६००० होन होता, तें सोनें ९४ चे कसाचें असे.

कायदा केला, त्याचे पूर्वी तेथें सर्वांस माहीत होतें, असें दिसोन येतें. मलबार प्रांतांत सोन्याची माती आहे, हें प्राचीनपासून माहीत आहे, आणि त्या जाग्यावर तेथले राजाचा अकत्यार असे. (ही राडोट रथालीया या ग्रंथाचे ९५ वे अध्यायांत याचा दाखला आहे.) यावर सांगीतलेल्या मुलखांत पृथ्वीचे पोटांत सहा फुटीचे आंत सोन्याची माती सांपडती, सहा फुटीचे आंत जाण्याचें काम नाहीं. नद्यांमध्यें वर तर रेती असती, तिचे खालीं दगडासारिख्या गारा असतात, त्याचे खालीं पुनः रेतीचा पडदा असतो, त्या रेतीच्या कणांत सुवर्णकण असतात, तेव्हां पानतीयर म्हणून एक पात्र असतें, त्या पात्रामध्यें ती रेती घालून धुवून सोन्याचे कण निराळे करितात. सर्व सोन्याचे किमतीचा आकार सुमारें एक लक्ष रुपये केला आहे, परंतु जे युरोपियन खाणीचे कामांत कुशल आहेत, त्यांचे हातीं जर या खाणीं दिल्या, आणि यंत्रानें हें सोनें काढलें, तर दसपट अधिक उत्पन्न होईल. आजतागाईत या कामांत यंत्राचा उपयोग केला नाहीं. एथले लोक जमिनींतलें सोनें काढण्याचे भरीस फारसें न पडतां ते नदींतले कण मात्र गोळा करितात.

जा पर्वतांवरून या नद्यांचे प्रवाह येतात, त्यांमध्यें सुवर्ण सांपडेल, यांत संशय नाहीं, परंतु अप्रील पासून अक्टोबरपर्यंत साहा महिने त्या देशांत कांहीं हवेचे संयोगामुळें हवा बिघडून भयंकर ज्वराची सांथी निघती, तेणेंकरून युरोपियन लोक तर तत्काळ मरतात, आणि तेथले नेटिव लोक तर असे शोध करण्यास विद्यार्थ्यांस जेवढे भितात, तेवढे त्या रानास भीत नाहींत. आम्हीं त्या लोकांचा तीन वेळा पर्वतात कांचनाचा

त्यास पुष्कळ नेटिव लोक शाहाणे आणि संपतिवान् आहेत, तेव्हां त्यांहीं आपलें लक्ष पृथ्वींतील द्रव्यें काढण्याकडेस द्यावें, आणि सकल लोकांची माहितगारी वाढविण्याचा मार्ग दाखवावा. असें केलें असतां ज्या मुलखांत खाणी आहेत, तेथें उद्योग वाढेल, आणि त्या उद्योगाचे बळानें तेथील द्रव्यें हातास लागतील. हजारों हिंदु लोकांस या सुवर्णाचे खाणीमुळें उद्योग मिळेल, आणि जे लोक सांप्रत केवळ दुर्भिक्ष आणि केवळ निराळे आहेत, आणि ज्यांस ज्ञानापासून काय सुख म्हणून ठाऊक नाहिं, ते दिवसानुदिवस सुधारतील, आणि शाहाणे होतील.

एथील लोकांहीं उद्योग केला असतां ५० कोटि रुपये त्यांस उत्पन्न होतील. असें वर लिहिलें आहे. हा इतका पैका हिंदुस्थानांतील इंग्रेजांचे राज्याची जी जमाबंदी प्रस्तुत आहे, तिचे दुप्पट होतो. तेव्हां या पैक्यानें माझे देशचे लोकांची झांकलेली बुद्धि उजेडास येऊन ते उद्योग करावयास लागतील, व आमचे व्यावहारिक स्थितीमध्यें चांगला व मोठा अभिलाष करावयास आपले लोक जे प्रस्तुत अगदीं दरिद्री जाहालेले आहेत, ते या अशे उत्तेजनें करून श्रीमंत आणि सुखी होतील, मोठाले गांव व गांवढी गांवें हीं उद्योग व अचाट कर्में यांहीं करून उत्पन्न केलेले जिनसांहीं सुशोभित होऊं लागतील, ओसाड जमिनी व जंगलें हीं तृण व धान्यें यांहीं करून प्रफुल्लित होऊन जातील, नद्यांतून मालानें भरलेल्या नौका फिरूं लागतील, रस्त्याचे योगें हिंदुस्थानांतील सर्व भागांत रहदारी चालू होईल; लक्षावधि लोकांस कामें मिळतील, व नवनवीं सुखें प्राप्त होतील, उद्योगाविषयीं प्रेरणा, सुधारणूक करण्याविषयीं उत्तेजन ही प्राप्त होतील, व त्यांचे प्रयत्न अबादानी व सौख्य एणेंकरून सफळ होतील. याप्रमाणें फेरफार घडून आल्यावर या देशांतून कापूस इंग्लंड किंवा चीन एथें जाहाजांत भरून जाऊन तेथून त्याचीं वस्त्रें होऊन परत या देशांत आलीं, किंवा नीळ व इतर रंग युरोपास पाठवून ते रंग रेशिम किंवा कापुसाचे वस्त्रांस लाऊन व बुटे काढून शेंकडा कित्येक हजार टक्के किम्मत साधे मालावर चढून तो रंगित माल या देशांत परत आला, ही आपली अप्रतिष्ठा आपले नजरेस पडणार नाहीं. आपला कापूस वगैरे जिनसांचीं वस्त्रें वगैरे पदार्थ आपलेच लोकांहीं उत्पन्न करावे, हें योग्य आहे. लोखंड तिखे, रंग वगैरे हिंदुस्थानांत पिकणारे पदार्थ यांच्या जिनसा एथील कारागिरांचे हातून उत्पन्न व्हाव्या,

हें योग्य आहे. आपले नदींतील सिलिका म्हणजे ज्यापासून काच उत्पन्न होती ती व्यर्थ जाऊं देऊं नये, व अग्नीनें दग्ध जाहालेले जंगलांची राख मूल्यरहित मानूं नये, परंतु त्या दोहां पदार्थांपासून काच उत्पन्न करून व्यवहारांत तिचा नानाप्रकारें उपयोग पडे असें करावें.

हिंदुस्थानांत हवा अति उष्णापासून अतिशीत नानाप्रकारची आहे. सर्व वस्तु समृद्धीनें पिकण्याजागी जमीन आहे, या जमिनींत पीक येतें असें दुसरे देशांत कोठेंही येत नसेल. हवा प्रकृतीस हितकारक नद्या फार मोठाल्या व जंगलांतून वाईट वाफा निघतात, त्यांचा दुर्गुण नष्ट होई सारिखी सूर्याची उष्णता या देशांत आहे, व या उष्णतेंकरून जमिनीपासून त्या नाशकारक वाफा लवकर नाहींशा होतात, परंतु थंड देशामध्यें या अशेले वाफेचे योगानें जमिनीचा सुपीकपणा नाहींसा होतो. सारांश हिंदुस्थान देश मोठा फल्युक्त, व उत्पन्नेंकरून परिपूर्ण आहे, व परमेश्वरानें मोठे औदार्येंकरून या देशावर आपली कृपा पसरली आहे, तेव्हां या परमेश्वराची कृपा बाहेर आणण्यास जर लोकांहीं उद्योग केला व आपलें सामर्थ्य खर्चलें तर किती चमत्कार होईल अरे? आपली स्थिती चांगली करण्याकरितां युद्ध किंवा राजकीय वादविवाद व उगीच खंती करणें याचें प्रयोजन नाहीं, कारण यापासून कांहीं फायदा नाहीं. आपले देशाचें काय सामर्थ्य आहे, तें आपल्यास बरोबर समजल्यानें त्याचा उपयोग करण्यास ते प्रवृत होतील, व तेणेंकरून सौख्य हा त्याचा आपोआप परिणाम होईल.

ही गोष्ट खरी आहे, कीं सर्व हिंदु लोक लाहान लाहान कारागिरीचीं कामें व मेहनतीचीं, मजूरीची कामें करणें, यांत अप्रतिष्ठा आहे, असें समजत व शास्त्रांत जो धंदा लिहिला नाहीं, त्याविषयीं त्याचे मनांत बहुत दुराग्रह व तिरस्कार असतो, परंतु ही केवळ अज्ञान समजूत मूर्खत्व आहे, हें काळेंकरून व दुसऱ्याचें आचरण पाहून समूळ नाहिंसें होईल. ज्या वेळेस हे धंदे प्रतिजातीस ज्याचे त्यास लावून दिले त्या वेळेस व त्या वेळचे स्थितीस ते भेद कितीही माफक असोत, परंतु हालीं आपले स्थितींत जो फेरफार जाहाला आहे तो असतां ते भेद, व दुरभिमान आतां धरून उपयोग नाहीं. हिंदु लोकांमध्यें या अशा ज्या चाली पडल्या आहेत हें आपली सुधारणूक होण्यास मोठें प्रतिबंधक कारण जाहलें आहे. अचल स्थिती, ही गणित शास्त्रांत सत्यता आहे, परंतु या चर सृष्टीमध्यें असें एकही उदाहरण मिळावयाचें नाहीं. याशिवाय या चराचर सृष्टीमध्यें फेरफार होत असावे, असा तिचा विशेष स्वभावच आहे. राजकीय, दिवाणी व घरगुती संबंधामध्यें याप्रमाणें फेरफार घडत आले आहेत, हे उघड आहे. याजकरितां हे ज्या जातीचे धंदे त्यांहीं करावे, या भेदामुळें बहुत नाश आहे, याजमुळें कित्येक धंदे जे वस्तुतः मोठे फायद्याचे व प्रतिष्ठित आहेत, ते युरोपियन लोक या देशांत येऊन त्यांचे विचार आणि चाली एतद्देशीय लोकांत प्रसृत जाहाल्यापासून मुसल्मान, पारसी व इस्तइंदियन लोक करूं लागले आहेत. दैवयोगेंकरून अमूक प्रकारचा धंदा करूं नये, असे जे त्यांचे अभिमान होते ते, विगलित होत चालले आहेत, व सर्व हिंदुस्थानभर जे धंदे शास्त्रांत लिहिले नाहींत व जे आपले पूर्वजांस माहीत नव्हते ते धंदे आतां नानाप्रकारचे जातीचे लोक करायास लागले आहेत.

हे फेरफार हळूहळू होत चालले आहेत, व हे फेरफार होत आहेत ते पूर्वी ज्या गोष्टीचा अव्हेर व तिरस्कार करीत असत, त्यांचे सुखकारक परिणाक त्यास न समजतां प्राप्त होत आहेत. असें युक्तीनें सर्व मनुष्य फेरफारास खुशी होतात, तेव्हां मनुष्याचे अंतःकरणाचा हा असाच चमत्कार आहे. युरोपियन आणि नेटिव या लोकांमध्यें व्यवहार आणि संबंध फार वाढला आहे, व उत्तरोत्तर वाढत चालला आहे, तेणेंकरून हा फेर घडण्यांत आला आहे, व ज्या पूर्वी युरोपियन लोकांस मात्र अवश्य गोष्टी हाव्या होत्या, त्यांची गरज त्यांस आतां पडूं लागली आहे, ती गरज पडण्याची एकदां सवय लागली असतां वाचून चालत नाहींसें होतें. परस्परांचे विचार परस्परांस समजणें, आणि परस्परांचा व्यवहार होणें हें जसजसें वाढत जाईल, व युरोपियन लोक नेटिव लोकांपासून ज्या अंतरावर दूर राहिले

आहेत, तें अंतर जसजसें कमी कमी होत जाईल, व परस्पर आपआपले नीतीप्रमाणें वागावयास लागतील, तसतश्या नेटिव लोकांस ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, अश्या वाटत जातील, दोहों जातींमध्यें अशे प्रकारचा संबंध मोठे उत्साहानें परस्परांहीं वृद्धिंगत करावा, कारण एणेंकरून सुधारणुकेचा प्रसार होऊन उतम नीती या लोकांस प्राप्त होईल.

अशा हिंदुस्थानचा आंतला व्यापार वाढला आणि कारखाने वाढले म्हणजे हे लोक फार सुखी होतील आणि बाहेरचा व्यापार जो सध्या परमुल्कांतले लोक चालवितात तो एथल्याच लोकांचे हातीं येईल. असें झालें असतां नवे नवे उद्योग निघतील आणि उद्योग करण्यास लोक अधिक झटतील. याप्रमाणें ते अधिक शाहाणे जाहाले ह्मणजे त्यांस पश्चिमेकडील लोक अधिक चाहतील, आणि हिंदुस्थान जें आज दरिद्री आहे, तें पुढें मोठें धनाढ्य होईल. नेटिव लोकांहीं आपल्या ज्ञानाची व परस्परांचे सुखात्री जेणेंकरून वृद्धी होईल, तें करावें, म्हणजे जो परमेश्वर आपले सर्व जीवांस सारखें सुख देतों तो त्यांस सहाय होईल, आणि त्यांचे सर्व प्रयत्न सफळ होतील, आणि याप्रमाणें होवो असें आम्ही म्हणतों.

**समाप्त**

# Political Economy

# लक्ष्मीज्ञान

महाराष्ट्रदेशांतील
"कामदार लोकाशी संभाषण"
या ग्रंथाचे कर्त्यानें हा ग्रंथ
क्लीफ्ट्साहेबाच्या इंग्रजी ग्रंथाचे
आधारानें केला.

ज्ञानप्रकाश छापखान्यांत
पुणें येथें
छापिलें

सन् १८४९

किंमत १० आणे

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठापासून | पृष्ठापर्यंत |
|---|---|---|---|---|
| प्रस्तावना | | ग्रंथाचे हेतु | १ | ७ |
| प्रकरण | १ | ज्ञान | ७ | २० |
| प्रकरण | २ | उद्योगाचे विभाग | २० | २८ |
| प्रकरण | ३ | क्रयविक्रय | २८ | ३६ |
| प्रकरण | ४ | भांडवल | ३६ | ४६ |
| प्रकरण | ५ | निर्भयपणा | ४६ | ५३ |
| प्रकरण | ६ | किंमत | ५३ | ६० |
| प्रकरण | ७ | धारा, नफा, व मजूरी | ६० | ७६ |
| | | हिंदुस्थानाविषयीं विचार | ७६ | ८७ |

# विल्हेवारी


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| आश्रित | ७२ | राजधर्म | ४५–७३ |
| इंग्रजाची स्थिती | १३ | राजा विष्णूचा अंश | ६ |
| इंग्रजी युक्ती | १५ | लग्ने | ७० |
| इंग्रजी राज्य | ४४ | लक्ष्मीज्ञान | १–८७ |
| उद्योग | ६ | लक्ष्मीची व्याख्या | १ |
| उद्योगाचे प्रकार | ८–२७ | लोकहिताची कामे | २३ |
| उपयोगी लक्ष्मी | ३६ | लोकदृष्टी | २३–१८ |
| ऐश्वर्याचें फळ | ६ | लक्ष्मीची वृद्धी | ८ |
| कागदाचा पैसा | ३५ | विलायतेतील व्यापार | २१ |
| गरज | १० | व्यापाराचे मूळ | ३१ |
| जमीन | २–६२ | विद्वानाचा धर्म | ८२ |
| जात | १८–२५ | विद्या सर्वांनी करणे | १७ |
| टंकसाळ | ३२ | वेतनें | ६५–७४ |
| दरदाम | ५३–६२ | शाहाणपण हीच लक्ष्मी | ९–७३ |
| धातू | ३३ | श्रीमंत लोक | १८–४०–४२–७७–८२ |
| पैसा | १–३३ | सर्कार | ४६ |
| फौज | २७ | समाईकी | ७२ |
| मट | ७८–८० | स्त्रिया | ७९ |
| मेहनतीचा संक्षेप | ३–२५ | हिंदू लोक विद्येस तुच्छ मानितात | २० |
| मनुष्यास सुख | ५ | हिंदू लोकांची स्थिती | ८३–८६ |
| मनुष्याची स्थिती | १० | हिंदूंनी विद्या शिकावी | ७ |
| मनुष्याचे शाहाणपणाचा अनुक्रम | १३ | ज्ञान | १८–२५ |

# प्रस्तावना

लक्ष्मीज्ञान ही येक विद्या आहे. यामध्यें लक्ष्मी म्हणजे काय व तीची उत्पती वृद्धी व तीची वाटणी लोकामध्यें कशी होत्ये याचा विचार केला आहे. या विद्येची उत्पत्ती युरप खंडांत जाहली आहे यास्तव तिकडील देशांत या विद्येचे ग्रंथ फार आहेत. त्यांतील विषय स्वदेशीय लोकांस कळले असतां फार हित आहे. यास्तव हा लाहानसा ग्रंथ केला आहे. लक्ष्मीची आशा सर्व लोकांस आहे व लक्ष्मी-करितां सर्व माणसें प्रयत्न करितात. परंतु वास्तविक लक्ष्मी कोणती हें कळत नाहीं. सामान्यतः बोलण्यांत पैक्यास लक्ष्मी समजतात. परंतु हें अज्ञान आहे कारण कीं मी जर सुखेंकरून निर्वाह व्हावयाचे पदार्थ धान्य वस्त्र इत्यादि नसतील आणि फक्त पैका असेल तर त्याचें मोल मृत्तिकेप्रमाणेंहि होणार नाहीं. यास्तव पैका ही लक्ष्मी नव्हे व जे पदार्थ निर्वाहास जरूर आहेत परंतु त्यांस किंमत न पडेल तरि तोहि पैका नव्हे. कारण कीं वायु, उदक, जमीन हे जिन्नस अवश्य पाहिजेत, परंतु ईश्वराने ते विपुळ निर्माण केले आहेत. सबब त्यांस किंमत नाहीं. यास्तव असले पदार्थंही लक्ष्मी नव्हे. कोणी म्हणतात की जमीन सर्वांस पोसत्ये यास्तव हीच लक्ष्मी आहे परंतु हें बरोबर नाहीं. तुर्कस्थानांत जमीन चांगली आहे. परंतु राज्य वाईट व लोक अडाणी याजमुळें सुखी नाहीत व लक्ष्मीवान नाहींत. तसेंच अमेरिकाखंडांत कितीएक देश आहेत तेथें जमीन अशी आहे कीं येक बिघाभर जमीन पेरली तर पन्नास मनुष्यांस पुरे असें धान्य सापडेल. परंतु तेथील लोक क्षुधेने व थंडीनें मरतात व युरोप खंडात कितीएक देशांत बिघाभर जमीन पिकविली तर दोन माणसास पुरे इतकें धान्य निघते तथापि लोक सुखी आहेत, व कितीएक देश पहिले लक्ष्मीवान होते आणि तेच देश आतां दरिद्रानें पीडलेले आहेत. तेव्हां जर जमीनीत लक्ष्मी असती तर असें न होतें. हिंदुस्थान देश पांडवाचे वेळेस सुखी होता व आलीकडे तसा सुखी नाहीं, तेव्हां तेथील जमीन बदलली असें म्हणवत नाहीं परंतु दुसरें कांहींतरी कारण असावें.

यास्तव लक्ष्मी या शब्दाचा अर्थ असा आहे कीं मनुष्याचा उपजीविकार्थ व सुखार्थ जे जिन्नस पाहिजेत व असल्या ज्या जिनसाची किंमत होत्ये ते पदार्थ. तेव्हा या प्रकारची लक्ष्मी ईचा शिवाय मनुष्याचें जीवन होणार नाहीं हा ईश्वरी नेम आहेच, व दुसरा ईश्वरी नेम आहे कीं लक्ष्मीची प्राप्ती उद्योगाचेविना होणार नाहीं. तेव्हां उद्योगशिवाय मनुष्याचें जीवन होत नाहीं हा निर्णय जाहला.

इतर प्राणी यांचा निर्वाह उद्योगाशिवाय होतो. त्यांस वस्त्राची वगैरे गरज नाहीं. तसेंच वृक्षादिकांस पानें ईश्वर देतो परंतु मनुष्यास घोंगडी विणुन करावी लागत्ये व अन्न पिकऊन खावें लागतें. तस्मात लक्ष्मी मेहेनतीने उत्पन्न होत्ये हें सिद्ध होतें. परंतु मेहेनतीचा पर्याय असा आहे कीं कितीएक रानटे लोकांचे देश व बेटें येथील लोक पराकाष्टेची मेहेनत करितात व लाहान पोरापासून स्त्रिया, वृद्ध इत्यादि सर्व खपतात परंतु पुरतें अन्न मिळत नाहीं व कितीएक शाहणे लोकांचे देश आहेत तेथें मुलें बाळें व स्त्रिया काम करीत नाहीत. काम करणारे लोक थोडे असतात तत्रापि सर्वजण पुरतेपणी सुख भोगितात याचे कारण असें आहे कीं शाहणे बुध्दिपुरस्सर मेहेनत करितात, म्हणून नानाप्रकारचा युक्ती काढून बहुतांचें काम थोडेजण करितात आणि सुखाची वृध्धी करितात. जर जातें करावयाची युक्ती मनुष्यास ठाऊक नसेल तर दाहा माणसांचे पायली भर धान्य बारीक करावयास दाहाजण मनुष्यें येक दिवस बसली पाहिजेत तेव्हां पीठ कदाचित होईल. जर खलबत्ता केला तर त्याहून थोडका वेळ लागेल,

जर जातें केलें तर त्याहून थोडका वेळ लागेल, जर पवनचक्की केली तर त्याहून थाडका वेळ लागेल. त्याप्रमाणे टपाल टंकसाळ गाड्या यत्रें यांची व्यवस्था आहे. तेव्हा जितका बुद्धीचा व्यय करून मनुष्य मेहेनत करील तितकी लक्ष्मी वाढेल यांत संशय नाहीं. यास्तव जे लोक बुद्धीचा उपयोग करीत नाहींत ते लक्ष्मीवान नसतात.

किती एक नीतिज्ञानविद्येविषयीं बोलणारे म्हणतात कीं लक्ष्मी पापाचें मूळ आहे. परंतु त्याणी लक्ष्मीचा दुरुपयोगमात्र जाणून असें लिहिलें आहे. लक्ष्मीचा उपयोग चांगला होईल तर त्यापासून फायदा सर्व लोकांचा होईल.

लक्ष्मीचा बाप उद्योग आहे आणि पुराणांत समुद्रमंथनापासून लक्ष्मी निघाली याचेंहि तात्पर्य हेंच असेल कीं सर्वांनी जेव्हां मेहेनत केली तेव्हां लक्ष्मी प्राप्त जाहली. लक्ष्मी देशांत किती आहे याची बेरीज त्या देशांतील लोकांचे मेहेनतीची बेरीज काढली म्हणजे त्याजवरून समजते. मेहेनत हीच मूळ लक्ष्मी आहे, सोनेंरूपें ही लक्ष्मी नव्हे. जें सुख मनुष्यास होतें व जें मनुष्यें खातात पितात हें सर्व मेहेनतीनें उत्पन्न होतें.

मनुष्यास सुख व्हावयास दोन गोष्टी पाहिजेत. येक लक्ष्मी पुष्कळ उत्पन्न केली पाहिजे. आणि लक्ष्मीची वाटणी लोकामध्यें बरोबर केली पाहिजे. या दोनीं गोष्टी होण्यास सर्कार——आहे आणि सर्कार कायदे करितात.——हेच आहे कीं लक्ष्मी पुष्कळ होऊन——लोकामध्ये व्हावी. ज्याप्रमाणें सर्कार——त्याप्रमाणें लक्ष्मीची व्यवस्था होईल.

पुराणांत असा लेख आहे कीं——स्त्री आणि राजा विष्णूचा अंश. यांचें तात्पर्य असे दिसतें कीं राजाचे हातीं लक्ष्मीची व्यवस्था करणें आहे. म्हणून तीचें भर्तृत्व राजास कल्पिले आहे.

कोणते येका देशांत ऐश्वर्यवृद्धी होत्ये याचें कारण असें आहे कीं त्या देशांतील लोकांची वृध्धी जाहली पाहिजे, व लोकांची अवस्था चांगली पाहिजे. लोकांस निर्वाहाकरितां पाहिजे त्याहून अधीक उत्पन्न जाहलें पाहिजे म्हणजे लोकांची वृध्धी होत्ये व लोक कळा कौशल्यादिक पाहूं लागतात. जर त्यांस निर्वाहापुरते पदार्थ नसतील तर लोक वृध्धी पावत नाहीं किंवा पदार्थ असून त्याची लोकामध्यें चांगली वाटणी झाली नाहीं तरही लोक दरिद्री राहतात. जसे को——कांस घोंगडी नसेल तर ते शालजोडी करण्याची विद्या ते शिखणार नाहीत. प्रथम घोंगडी——नंतर अवकाशानें चित्तस्थीर आणि——त्यास ते पाहतील.

असा विचार या विद्येत केला आहे याजकरितां ही विद्या जाणणें हें सर्वांचें हित आहे. लक्ष्मीची उत्पती व लक्ष्मीची वाटणी ही कोणत्या नियमाप्रमाणें घडतात याचा विचार या ग्रंथांत संक्षेपेकरून करू. व ज्ञानापासून कितीयेक वाकड्या समजुती दूर होतात व राज्यकर्ते यांस व लोकांस या ज्ञानाचे लाभ बहुत आहेत आणि या ग्रंथाचा उपयोग लोकांस होऊन त्यांची सुधारणा जाहली म्हणजे ग्रंथ करणाराचे श्रम सफल होतील. स्वदेशीय लोकांस हा विषय नवीन वाटेल, यास्तव त्याणी लक्ष पुरऊन या ग्रंथाचे अध्ययन केलें पाहिजे.

"लोकहितवादी."

## प्रकर्ण १

लक्ष्मीचे वृद्धीचें मुख्य कारण शाहाणपण. लक्ष्मीची उत्पत्ती मेहेनतीनें होते व ज्या योगानें मेहेनतीची वृद्धी होत्ये त्याच योगानें लक्ष्मीची वृद्धी होत्ये. मेहेनत दोन प्रकारची आहे, येक शरीरेंकडून व येक मनेंकडून. परंतु मन हें शरीराकडून कर्म करविण्यास साधन आहे. यास्तवही दोनीं हात आणि कुऱ्हाड या दोहोंचे संगमानें लाकूड तोडतात. त्याप्रमाणें मेहेनत करतात. तत्रापि कितीयेकांचे कामात मनाचा व्यापार फार होतो व कितीयेकांचे कामांत शरीराचा व्यापार होतो. जसें न्यायकर्ते व ग्रंथकर्ते यांस मनाची मेहेनत फार असत्ये आणि मजूरदार वगैरे यांस शरीराची मेहेनत फार असत्ये.

मेहेनतीची वृद्धी होण्याची चार कारणें आहेत, येक शाहाणपण १ दुसरें येकयेकानें वेगळा वेगळा व्यापार करणें २ तिसरें लक्ष्मी जमिवणें व त्याचा उपयोग करणें ३ व लक्ष्मी जास प्राप्त होईल त्याणें निर्भयपणानें भोगणें. या चोहों कारणाचा तपशील पुढें लिहिला आहे.

शाहाणपण पाहिजे याचें कारण असें आहे कीं जर मनुष्यानें चाती व राहाट सूत काढावयास केला नाहीं आणि हातानें कापूस विणीत बसला तर वस्त्र कसें होईल. विहिरीतून पाणी मोटेनें कादावें ही युक्ती जर अकल चालऊन काढली नसती, येक बिघाभर जमीनीस पाणी शिंपायास किती माणसें खपवावी लागतीं ? व्यापार वेगळा वेगळा पाहिजे याचें कारण असें आहे कीं येक मनुष्यास दोन हात आहेत. आणी जर वस्त्र करणें, नांगर धरणें, लिहिणें, दागीनें करणें इतके रोजगार येकटा मी करीन असें जर कोणी म्हणेल तर होऊ सकणार नाहीं, कारण की येक मनुष्य साळी, कुळंबी, कारकुन, सोनार होईल कसा ? यास्तव ही चारी कामें चौघांनी पृथक करून येकामेंकास जिनसा पुरिवल्या म्हणजे ठीक होईल. लक्ष्मी जमिवली पाहिजे याचें कारण जास नाव करावयाची असेल त्याणें लाकडें तोडून आणिली पाहिजेत, लोखंड आटऊन खिळे केले पाहिजेत, व नाव घडण्यास साहा महिने लागतील, तितके दिवस खाण्याची बेगमी घरांत पाहिजे. तेव्हां इतकें भांडवल जवळ केल्याशिवाय नाव घडली जाणार नाहीं, याजकरितां लक्ष्मी संपादन पाहिजे. लक्ष्मीस निर्भयता पाहिजे याचें कारण असें आहे कीं माळी याणे बागेंत पुष्कळ फळें व फुलें यांची झाडें लाविली, त्याचें उत्पन्न त्याचे हाती येणार नाहीं असें जर असेल तर तो झाडें लावील कशाला ? सराफ दुकानात खुर्दा घेऊन बसला आणि तेथुन त्याचा माल कोणी उचलून नेईल असे असलें तर तो बसेल कशाला. यास्तव संपादन केलेले पदार्थ हे माझे आहेत यांजवर कोणाची जबरदस्ती चालणार नाहीं असें असल्या शिवाय लक्ष्मी वृद्धी होणार नाही.

मनुष्यें आतां आहेत तशीं पहिल्यापासून नवती. असें हल्ली समुद्रांत बेटे आहेत तेथील मनुष्यें रानटी आहेत व कितीयेक ठिकाणची सुधारत चालली याजवरून असें ठरतें कीं या देशांतही पूर्वी रानटी माणसें असतील व त्यांचा अंश भील वगैरे अद्यापि आहेत.

मनुष्यांची प्रथम अवस्था असी आहे की त्यास कांहीं शाहाणपण नाहीं. अन्नाचा पाक नाहीं, केस वाढलेले आणि नग्न रानात फिरतात व ज्या वनस्पत्या खाण्याजोग्या आहेत त्या भक्षण करून निर्वाह करितात.

मनुष्यांची दुसरी अवस्था असी आहे कीं रानांतील जनावरें मारून खातात व तीरकमठा किंवा सोटा बाळगतात व जनावरांची कातडीं नेसतात. परंतु ही स्थिती पहिल्या स्थितीहून शाहाणपण आल्याशिवाय प्राप्त होत नाहीं कारण कीं जनावरें मारावयास शस्त्रें करावी लागतात जनावरें मारावी

कसी व षिकार (शिकार) कशी करावी या युक्ती ध्यानांत ठेवाव्या लागतात व मांस शिजविण्यास विस्तव करावा व त्यास लाकडें पानें घालून पेटवावा हें समजलें पाहिजे.

मनुष्याची तिसरी स्थिती असी आहे कीं जनावरें बाळगतात आणि रानांत चारतात आणि त्यांजवर निर्वाह करितात. घर नसतें, परंतु ही स्थिती शाहाणपणाची पाहिरी चढल्याशिवाय प्राप्त होत नाहीं, कारण कीं त्यास इतके समजलें पाहिजे कीं जनावरें मारुन नफा नाहीं परंतु चारून वाढवावी व त्यास बांधावी कसी, चारावी कसी व चारणीचे दिवस कोणते हें समजलें पाहिजे.

मनुष्यांची चौथी स्थिती शेत करण्याची आहे, ही फार शाहाणपणा आल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. कारण कीं खाण्यास योग्य दाणे कोणते हें लक्षांत ठेऊन ऋतु जाणून पेरून त्याची कणसें वेचुन दाणे करून दळून शिजऊन खावे हें समजलें पाहिजे, व घर बांधून राहण्याचे समजले पाहिजे. व या स्थितींत मनुष्य आल्यावर राजा असला पाहिजे, कारण कीं दाणे जो पिकवितो त्याचे कोणी घेऊन न जावें याजकरितां येक रक्षक पाहिजे. परंतु पूर्वीचा तीन स्थितीस राजा नको, सर्दार नको व त्या स्थितीत लोक आहेत तेथे राज्य नाहीं. लक्ष्मी संपादन होऊ लागली म्हणजे राज्याचा आरंभ होतो. राज्याची प्रथम स्थिती असी आहे कीं शेत केले असतां पिकतें हें लोकांस कळूं लागलें म्हणजे पिकवितात, परंतु अराजिकामुळें दुसरे बळकट लोक असतात ते घेऊन जातात. याजमुळें लोक त्रासले म्हणजे आपल्यामध्यें जो बळवान असेल त्यास प्रमुख करितात आणि त्याचें सांगितल्याप्रमाणें वागतात. अश स्थितीतल्या राज्यांस फौज वगैरे कांहीं नसत्ये व सिंव्हासन मुकुटही नसतो. हे डौल मनुष्ये जशीं शाहाणीं होतात तसतसे होतात. प्रथम स्थितीतले राज्यांत, राज्यास कांहीं कायदा नसतो. तो म्हणेल तो कायदा. त्यानंतर राजाहि भ्रष्ट होऊन अन्याय करू लागतो तेंव्हां कायदे व शास्त्र त्याचे प्रतिबंधाकरितां होतात. परंतु तितक्यानेंहि प्रतिबंध पुरता होत नाही याजकरितां आणखी तजवीज करावी लागत्ये.

मनुष्याची पांचवी स्थिती व्यापाराची आहे. या स्थितींत मनुष्य केवळ शेतकीपासून सुटत नाहीं, परंतु बहुत युक्ती काढुन विद्या शिखुन, तारवें करून देशांतरास जाणें इत्यादि करू लागतात व राज्य बहुधा लोकसत्तात्मक करितात, म्हणजे स्वतां लोक राज्याचे अधिकाराचे भागीदार होतात.

या पांच स्थितीवर गेलेले लोक अजून जगांत नाहीत, परंतु या पांच स्थितींत लोक आढळतात. आमचा देश चौथे स्थितींत आहे व इंग्लंड देश पांचवे स्थितीत येक पाहिरी वरती आहे हें लक्षांत वागवावें.

परंतु येका स्थितींतून दुसरें स्थितींत मनुष्यें जातात याचें कारण काय? हा विचार पाहिला तर असें दिसतें कीं मनुष्यास ईश्वरानें बुद्धी दिल्ही आहे व मनुष्यास नाना प्रकारचा अडचणी प्राप्त होतात, येणेंकरून मनुष्याचें नेहमीं पुढें पाऊल टाकण्याचे धोरण असतें व येकमेकांची वर्तणुक पाहून सुधारणा करितात.

कोणत्ये जमीनीवर कोणतें पीक होईल हें ध्यानांत ठेवितात आणि त्या प्रमाणें पेरणी करतात व दुसरे देशांत पदार्थ आढळतील ते आणून स्वदेशांत लावितात. हेमाडपंतानें लंकेहून बाजरी आणिली अशी दंत कथा आहे आणि खरी असेल. सांप्रत बटाटे व पांढरा ऊस इकडे आला आहे व छापण्याची विद्या आली आहे. परंतु या सर्व गोष्टी मनुष्यानीं बुद्धीचा उपयोग केल्याशिवाय होत नाहींत. जनावराला बुद्धी नाहीं, याज करितां तीं जशीं पांच हजार वर्षांमागें होती त्याच स्थितींत अजुन आहेत, व पुढेहि कधीं सुधारतील असें वाटत नाहीं, परंतु मनुष्य दिवसेदिवस दर रोजचे माहितगारीनें शाहाणा होतो. प्रथम कापुसाचें वस्त्र होईल हें ठाऊक नसेल. परंतु पाहातां पाहातां या झाडाचे फळांस कापुस आहे, याचें सुत होईल त्याला विणतां येईल असें कितीयेक दिवस विचार करता व पाहतां ठाऊक झालें असेल. याचप्रमाणें सर्व गोष्टींचें आहे.

विश्वामित्री दृष्टी पुराणांत आहे त्याचा अर्थ मला असा दिसतो कीं, त्याणें कांहीं पदार्थ नवीन झाडें वगैरे आणली असतील.

ज्या देशांत माणसें फार असतात तेथें बुद्धीहि फार असल्ये. जर मनुष्याची बुद्धी नसती तर मनुष्यें आजपर्यंत सुधारली नसती. परंतु बुद्धी आहे म्हणून गरज वाढल्ये व मी आपल्या च्यार पोरांस काय खाण्यास घालूं असें संकट पडतें. त्याचे अंतीं उद्योग अधीक होतो आणि लक्ष्मी वाढल्ये.

बुद्धिकौशल्य आमचे देशांत अजून फारसें प्रगट जाहलें नाहीं याजकरितां बुद्धीनें लक्ष्मी किती वाढते हें दाखविण्याकरितां दुसरे देशाचें उदाहरण घेतलें पाहिजे.

इंग्रजलोकांचा देश पाहा. तेथें लोखंडाचे पदार्थ सुलभपणानें करितात. ही धातु प्राचीन काळापासून लोकांनीं सोधुन काढली व त्याचे पदार्थ करूं लागले. परंतु इंग्लंडांतील लोक याणी कल्पना बसऊन जें काम हजार माणसांच्यानें व्हावयाचें नाहीं तें दोन माणसांकडून करतात आणि ते पदार्थ बाहेरील देशांत नेऊन स्वस्त विकतात आणि पांचशे माणसांचे मजूरीची किंमत घेतात व लोक हजार माणसांची मेहेनत म्हणून संतोषानें घेतात.

लोखंडाचें पोलाद चांगलें करितात व खाणीत कोळसा सापडतो त्याचा विस्तव फार तीक्ष्ण होतो. तो या कामास लावतात. परंतु त्या खाणी खणल्ये वेळेस अकस्मात आंतून ज्वाळा निघते आणि माणसें मरतात. त्याजवर, सर देवी साहेबाने, कल्पना बसऊन त्या ज्वाळांनी माणसें मरेनात असें केलें. व त्या ज्वाला धरून नहर बांधून त्यांत सोडून देऊन घरोघर दिवे तेला खेरीज लागावे असी तजवीज केली. कितीएक विद्वानानी कल्पना बसऊन चिंध्याची साखर करण्याची युक्ती काढली व वाळलेलीं झाडें व लाकडांचे पीठ याची भाकरी युक्तीनें करता येते त्याजवर निर्वाह होतो. तेव्हा काळ कशाला पडेल, याचप्रमाणें जमीन नांगरण्याची युक्ती व कोणचा जिन्नस कोठें पेरावयाची युक्ती, दाणे दळण्याची युक्ती व पाण्याचे योगाने वोझें उचलणें व वाफेचा योगानें गाड्या व नाव चालविणें व वस्त्रें विणणें, रंगिवणें, ऐंशी ऐंशी कोस धागे लांब काढतात, व सुलभ रीतीनें विस्तवातून ओढून घेतात त्याणें त्याचें वरचेवर फुलमात्र जळतें पण सुत जळत नाहीं. हा केवढा चमत्कार. पूर्वी कापसाची वस्त्रें इंग्रजलोक हिंदुस्थानांतून नेत होते, व गरीबास मिळत नव्हतीं, श्रीमंतमात्र पांघरत, तीं वस्त्रें आतां मजूरदारदेखील नेसतात व हिंदुस्थानचा व्यापार वस्त्राचा अगदी बुडाला. अशा मोटाल्या युक्ती बहुत विचार केल्याशिवाय निघाल्या नसतील, हे सहज लक्षांत येईल.

मनुष्यास गरज पडल्या शिवाय ज्ञानवृद्धी होत नाहीं, कारण कीं स्वभावानें मनुष्यास काम करण्यास नको. परंतु इलाज नाहीं म्हणून मेहेनत करतात, मुख्य पोट भरण्याची गरज, नंतर मुलें बाळें याचे निर्वाहाची गरज, इत्यादि गरजा असतात, याचा दाखला असा आहे की जे लोक समुद्राचे तीरचे आहेत, त्यांस नौका करणें व मासे धरणें याचा युक्ती अधीक ठाउक असतात.

कोणत्या मनुष्याची कोठें बुद्धी चालल्ये याचा ठिकाण नाहीं. विलायतेत ज्याणी मोटाल्या युक्ती काढल्या ते कोणी, गवई, कोणी साळी, कोणी न्हावी, कोणी सोनार, असे असून त्याणी आपल्या व्यापाराबाहेरचा कल्पना काढल्या. याजकरितां सिद्ध असें आहे, की ज्ञानाचा प्रतिबंध कोणास असू नये. ज्ञान शिकण्याची सर्वांस पर्वानगी असावी. नाहीं तर ज्या देशांत दोन लाख मनुष्यें आहेत, परंतु त्यातील दोनसे मात्र विद्या शिकण्याजोगे आहेत, तर दोनसे माणसांचा देश तो समजला पाहिजे आणि तितकीच त्या देशाची लक्ष्मी होईल. कारण कीं जितकीं अधिक माणसें विचारांत असतात तितकी अधिक कल्पना व युक्ती निघतात. याजकरितां विद्येचा दर्वाजा सर्वांस खुला असावा.

या विचारावरून शास्त्रांत जातीचा भेद व ब्राह्मणाशिवाय विद्या कोणी शिकु नये असें ठरविलें आहे तें निर्फळ दिसतें व तेणेकरून सुधारणा होणार नाहीं, अटकाऊन पडेल. याच कारणानें आज

३००० वर्षांत हिंदुस्थानची स्थिती बदलली नाहीं, पूर्वी होतें तसेंच आहे. सुतार, तांबट, लोहार, कासार, वगैरे जाती अडाणी सबब त्यांचे हातून कांहीं सुधारणा जाहली नाहीं व ब्राह्मणास तीं कसबें येत नाहींत म्हणून यांचे हातून जाहलीं नाहींत. सरासरी कांहीं नाहीं.

दुसरे असे आहे कीं, हिंदुस्थानातील लक्ष्मीचा व्यय असतू फार होतो. जे लक्ष्मीवान आहेत ते गरीबाची स्थिती सुधारण्याकरितां द्रव्येंकरून अनुकूल होत नाहींत, परंतु नाच लग्नें वगैरे यांत पैसा उडवितात. तो अळसाचे वृद्धीकडे जातो आणि विद्या आणि गरीब तसतसेच राहतात.

हिंदू लोकांचा विद्या व युक्तीपासून दुसरे देशचे लोक शाहणे होतील असे कांहीं नाही. परंतु दुसरे देशाचा युक्ती याणी शिकल्या पाहिजेत. जरी बाहेर त्या जुन्या आहेत तरी यांस नव्याच आहेत, व साळीपणा किंवा सुतारपणात हे रोजगार अगदी नादान असे या देशांत मानितात, परंतु दुसरे देशांत या रोजगारावर लक्षावधी रुपये मिळवितात व त्या रोजगाराची कोणास लाज वाटत नाहीं. या देशात शिपाई वगैरे म्हणतात कीं अम्ही त्याहावयास कशास शिकावें ? परंतु हा मूर्खपणा आहे. विद्येशिवाय शिपाईगिरी व कोणताहि व्यापार कच्चाच होईल.

यास्तव हिंदु लोकांनीं विद्या वृद्धी केली पाहिजे. सर्व लोक कोणत्याहि जातीचे कसबाचे असोत त्यांस विद्या कळविली पाहिजे व यास श्रीमंतानी मुख्यत्वेकरून मदत दिल्ही पाहिजे. परंतु या देशाचें केवढें दुर्भाग्य आहे कीं छापखान्यासारखी युक्ती विद्यावृद्धीचें साधन असून लोकांस अजून त्याचें फल समजत नाहीं. हिंदू लोकांमध्यें जे छापखाने चालवितात त्यांस या लोकांची विद्येविषयींची आर्तता पुसावी.

विचार पुष्कळ केला तर उपयोग नाहीं. परंतु विचार करून त्याप्रमाणें वर्तणुक जाहली पाहिजे.

हिंदुलोकांतील शास्त्रीपंडीत विद्वान बहुत आहेत. परंतु अजुन कोणीं असा नाहीं कीं आपली विद्या लोकांचे उपयोगांत व व्यापारांत सफळ केली आहे.

## प्रकर्ण २

# उद्योगाची वाटणी

लोक शाहाणपणाचे स्थितींत जितके अधीक येतात तितकी उद्योगाची वाटणी अधीक होत्ये यास्तव जे देश फार शाहाणपणाचे स्थितीस आले आहेत तेथे बहुत प्रकारचे व्यापार असतात.

सुया करण्याचा कारखाना विलायतेत असतो तेथे दहाबारा माणसें असतात. प्रत्येक माणसाचा व्यापार भिन्न. कोणी तार करतो, कोणी तुकडे पाडतो, कोणी टोक करितो, कोणी भोके पाडतो, इत्यादि विभाग करून घेऊन कामें चालवितात. तसेंच कापडें करण्याचे कारखान्यांत लोकर पिंजणारे, धुणारे, निवडणारे, वळणारे, विणणारे, छापणारे इत्यादिक सरासरी पन्नास असामीचे हातातून येक कापड जातें. पत्रें छापणारे यांचे कामाची वाटणी असते. दाहा बारा असामी पार्लिमेंटांत बोलणें ऐकावयास पाळीपाळीनें जाऊन बोलणें कागदावर टिपुन घेतात. येकाचा जाहला कीं तो जातो दुसरा त्याहावयास लागतो. छापखान्यांत कागद येतांच अक्षरें जुळणारे असतात ते जुळुन तयार करितात. इतक्यांत दुसरा कागद येतो. याप्रमाणें तीन लाख अक्षरें जुळतात आणि बारा हजार पत्रें छापून रवाना करितात. इतकें करण्यास साहा तासांचा अवकाश आणि शंभर माणसे लागतात. छापखाना हातानें फिरवीत नाहीं परंतु वायूचा जोरानें फिरवितात त्याजमुळें फारच त्वरा होते.

उद्योगाची वाटणी जाहल्याशिवाय लोकांचा परिणाम नाहीं कारण कीं येकास सगळी कसबें येत नाहींत याजकरितां कोणी सुतार, कोणी न्हावी जाहला पाहिजे. आणि येकामेकास आपला उद्योग

अदलाबदल करतात. तसें घड्याळ करणारा आपला उद्योग कपडे करणारास देतो. कपडे करणारा शेतकऱ्यापासून दाणे घेऊन कपडे देतो, जोडा करणारा दाणे घेऊन जोडा देतो. असे अनेक उद्योग अनेकानी करून एकामेकांस जे जिन्नस पाहिजेत ते पुरवावे.

उद्योगाची वाटणी करण्याचें तात्पर्य असें आहे कीं सर्वांस सारखी बुद्धी नसत्ये. मुळीं ईश्वरानें स्त्रिया आणि पुरुष केले. पुरुष घराबाहेरचे कामास योग्य आहेत आणि बायका घरांतील कामास योग्य आहेत. तसेंच ईश्वरानें नानाविध बुद्धी दिल्ह्या आहेत, त्याजमुळें वाटणी होणे जरूर आहे. प्रधान राज्य चालवितो त्यास त्याची बुद्धी असते, त्यास लोहाराचे कामांत वाकब नसते व बुद्धीही नसते. आणखी लोहाराचें काम करतो त्यास सुताराचे काम येत नाहीं. उद्योगाची वाटणी हीच व्यापाराची माता आहे. जर प्रत्येक मनुष्य आपलीं सर्व कामें करू सकेल तर व्यापार नको.

उद्योगाची वाटणी गिऱ्हाईकांवर आहे. गावांत येक वाणी असतो, तोच सराफ. वाणी असतो तोच लकडवाला, सावकार तोच, पीठ विकणारा तोच, याचे कारण जर इतके व्यापार पृथक पृथक लोकांनीं केले तर गिऱ्हाईक नसतें. परंतु शहरांत पाहा. हे व्यापार वेगळे असतात. सराफ वाणी नसतो. लकडवाला सावकार नसतो. याचे कारण लोक फार. गिऱ्हाईक फार याजमुळें इतकी वाटणी अधीक होत्ये.

जितके लोक वाढतात तितका व्यापार वाढतो, कारण कीं तितकी गिऱ्हाईकें फार होतात. व दुसरे व्यापार वाढविण्यास असें कारण आहे कीं लोकांस येकामेकांस समीप आणण्याची तजवीज करावी म्हणजे रस्ते, पूल, नावा वगैरे येऊन इकडील माल तिकडे जाऊन लौकर पोचे असें करावें. विलायतेंत लोखंडी रस्ते आहेत याजमुळें विलायतेची लांबी ३०० कोस क्षेत्र आहे. तरी येका गांवचे लोक जरी दुसऱ्या गांवापासून शंभर कोस असले तरी दोन कोसावर असल्याप्रमाणें आहे. याजकरितां सर्वांचे हातीं व्यापाराचा जिनस पोहोचतो, तितकी गिऱ्हाईकें अधीक होतात, आणि व्यापार वाढतो, तसेंच येका देशांत दुसऱ्या देशांतील लोक येऊ जाऊ लागले म्हणजे तितकी गिऱ्हाइकें अधीक वाढतात. याजकरितां तारवें करणें हें येक मोठें लोकहिताचें कारण आहे.

कांहीं वर्षांपूर्वी विलायतेंतून नावेंत बसून फरासिसाच्या मुलुखांत येण्यास बहुत दिवस लागत होते, व जो परत येईल त्यास राजा मोटी पदवी देत असे. आतां सात आठ तासांत जातात व हजारो लोक जातात व येतात इतकें सुलभ जाहलें आहे, कारण कीं तारवें चालविण्याची विद्या व वायूचें यंत्र करण्याची विद्या निघाली, तेंव्हा अर्थातच व्यापार अधिक वाढला.

हिंदू लोकांस असें वाटतें, कीं जलदीनें कांहीं उद्योग व्हावयाचें काम असेल तें वाईट, कारण कीं बहुतांची पोटें बुडतात. परंतु ही समजूत याजवरून खोटी आहे. जितका उद्योग अधीक निघेल तें चांगलें व पन्नास मनुष्यें काम करीत होतीं तें येकस्थानें करावें अशी विद्या असेल ती चांगली, कारण कीं कांहीं दिवस हें वाईट असें दिसेल, परंतु पुढें उद्योग वाढून, पन्नास असामी जें काम करतील तें पांच हजाराचें काम जाहलें तेव्हां अर्थातच तितकी लक्ष्मी अधीक वाढली.

हिंदू लोकांमध्यें प्राचीन काळीं च्यार वाटण्या म्हणजे, चार जाती होत्या. त्या नंतर लोक अधीक अधीक शाहणे जाहले तसतसे च्यार जातींच्या हजारो जाती जाहल्या व अणखी कितीएक होणार कारण कीं इंग्रज इकडे आल्यामुळे छापणें व तारू करणें हे व्यापार अधीक निघाले आहेत. तस्मात जातीचे पर्यवसान व्यापारावर आहे, दुसरें कांहीं नाहीं.

जितका व्यापार वाढतो तितक्या लोकांच्या इच्छा वाढतात. छापण्याची विद्या निघाली म्हणून बुकें पुष्कळ जाहलीं, परंतु वाचणारेही पुष्कळ निघाले. याजकरितां कोणताहि पदार्थ नवीन व्यापारांचा जाहला, म्हणजे जाला, त्याला, द्यावा असें वाटून तो उद्योग करून पैसा मिळवितो आणि घेतो, तेव्हां

उद्योग वाढतो हा निश्चय. इंग्रजांनीं टपाल बसविलें आहे, परंतु याजमुळें लोकांचें अनहित नाहीं. लोकांस कागद थोडे खर्चात जातात म्हणून पुष्कळ पाठविण्याची इच्छा होत्ये. जितका जिन्नस तितकें गिऱ्हाइक होतें, परंतु जिनस स्वस्त करून विकण्याची युक्ती निघेल तितके चांगलें.

देशांतील लोक वाढले नाहींत व त्यांणीं परदेशांत व्यापार करणें व उद्योग सुलभ होण्याची युक्ती काढल्या नाहीत तर व्यापार आहे तसा राहतो, व शाहाणपणही आहे तितके राहतें, व सुखही आहे तितकेंच राहतें, कांहींच वाढत नाहीं. याजमुळें दुसरे देशांतील लोक येऊन जिंकितात, कारण कीं अधीक शाहण्यानें श्रेष्ठत्व करावें हा ईश्वरी संकेत आहे.

परदेशांतील लोक लोभानें किंवा हेव्यानें उपद्रव करितात म्हणून फौज बाळगण्याचें प्रयोजन पडतें, फौजेत जे लोक आहेत ते कांहीं उद्योग करीत नाहींत, परंतु त्यांचें पोषण सर्वांस रक्षणाकरितां करणें जरूर होतें, यास्तव युद्ध, कला, जितकी सुलभ होईल तितकी चांगली, कारण कीं परदेशांतील दोनशे लोकांस चार माणसें जिंकितील असें जाहलें असतां या देशांतील तितकें ओझें कमी होतें, व ते लोक उद्योगास लागतात याचप्रमाणें सर्व विद्येचा उपयोग आहे.

उद्योगाची वाटणी केल्याचें फळ असें आहे, कीं उद्योग पुष्कळ होतो, व जो येका कामांत प्रवीण असतो तें काम तो लौकर करितो, याजमुळें थोडा वेळ लागतो. आणखी कितीएक कामें असी आहेत, कीं येक काम सोपऊन दुसरे कामास लागण्यास हत्यारें बदलावी लागतात, जागा बदलावी लागत्ये व येकाचें चित्त येका कामाकडे असलें म्हणजे त्यांत त्याला सुधारणा करावयास सापडते, तो नवी हत्यारे व नव्या युक्ती करून सुलभ काम करीतो, तसे येकाकडे सर्व कामें असल्यानें होत नाहीं. पूर्वी सुईचा दाखला लिहिला आहे. तेंच काम चौघांनी केलें तर येके तासांत हजार सुया करितात आणि येकटा करणार कसबीही असला तरी येक तासांत शंभराहून अधीक करींत नाहीं. जसे सैपाक करणार, व वाढणार, गंध लावणार, पाट मांडणार वेगळाले असले तरी काम किती लौकर होतें, व तीं सर्व कामें येकट्याकडे असल्यानें तशी होणार नाहींत व सर्व बिघडतील. तसें हें आहे.

## प्रकर्ण ३

## क्रयविक्रय

क्रयविक्रय करण्यास समर्थ मनुष्य आहे, दुसरें जनावर नाहीं. जरी मधमाशा सर्व मिळून येक मोहोळ करितात, हें त्यांस ज्ञान आहे, तरी क्रयविक्रय त्यांचाने होत नाहीं. ती शक्ती मनुष्यासच आहे. उद्योगाची वाटणी जाहली म्हणजे त्या पासून अर्थातच क्रयविक्रय होऊ लागतो. येकजणाने शंभर सुया केल्या तर त्यास दोनचार पाहिजेत त्या तो घेईल बाकीच्या दुसरीकडे ज्यास पाहिजे त्याचे घरी जाऊन तेथला दुसरा माल याचे घरीं आला पाहिजे, तर त्याचा निर्वाह लागेल. ही मनुष्याची अवस्था आहे. तशीच देशांची अवस्था आहे. क्रयविक्रय व्हावा ही ईश्वरी इच्छा आहे, कारण कीं येका देशाचे भागांत कोणे येका जिनसाचें पीक फार होतें, दुसरे प्रदेशी दुसऱ्या जिनसांचें पीक होतें, येका देशांत येक जिन्नस पुष्कळ स्वस्त असतो, तोच जिन्नस दुसरे देशांत माहाग असतो. यास्तव सर्व लोकांस सारखे पोचण्याकरिता या प्रदेशाहून, त्या प्रदेशांत, व या देशांतून त्या देशांत नेणें आणणें अवश्य आहे. जसे शालजोड्या, कस्तूरी काश्मीराकडे होतात, दुसऱ्या कोठे होत नाहीं. तेव्हां तिकडून इकडे तो जिन्नस आणावा लागतो, व मीठ समुद्राचें काठीं पिकतें, परंतु तेथून जर तें मध्यदेशीं, न आणलें तर कसें होईल. असे हजारों जिन्नस आहेत. जर लोक आपले देशावरच

भरवसा ठेवितील तर सुखी होणार नाहींत यास्तव दार्थांचा शोध लाऊन जेणेकरून सुखवृद्धी होईल तें केलें पाहिजे.

बहुधा व्यापार करणारे दुकानदार लोक पृथक असतात. जे जिन्नस उत्पन्न करतात तेच व्यापार करीत नाहींत, याचें कारण असें आहे कीं त्यांस उत्पन्न करणेंमात्र ठाऊक असतें, परंतु गिऱ्हाईक व देशावरची माहितीगारी नसते, व कोठें माहागाई आहे व कोठें स्वस्ताई आहे ही बातमीही त्यांस नसत्ये, व कोण गिऱ्हाईक कोणता जिन्नस घेईल हें ठाऊक नसते, याकरितां उत्पन्न करणें आणि विकणे या उद्योगाचे दोन हिस्से होतात, जे लोक क्रयविक्रय करितात ते उत्पन्न करीत नाहींत, म्हणोन उत्पन्न करणारे यांजपासून घेऊन विकतात. ही उद्योगाची वाटणी ठीक आहे. नाहींतर अडचण पडेल, असें कितीएक ल्हान गांवांत ज्याचे घरी गुरें असतात तेथें तूप घ्यावयास जावें लागतें.

जो मनुष्य व्यापार करितो, तो आपल्या हिताकरितां करितो, पाहा, पाणबुड्या मोत्यें श्रमानें काढतो तो आम्हांवर दया करीत नाहीं. केवळ आपल्या पोटास पाहिजे म्हणून करितो. तसेच येके देशाचे लोक दुसऱ्या देशांत व्यापार करितात, तोहि आपल्या हिताकरितां करितात, त्यांत येकामेकाचें हित सहज होतें. तात्पर्य मनुष्यांस येकमेकांचा आधार असला तरच सुख होतें आणि असा कोणताहि मनुष्य स्वतंत्र नाहीं. जें आपण खातो, पितो, पांघरतो, त्यास हजाराचे हात व उद्योग लागले आहेत व अणखीं जितक्याचे लागतील तितके अधीक सुखी होऊं व मनुष्यानीं येकत्र होऊन वागावें हा इश्वरी संकेत आहे.

आपले सर्व लोक व जवळचे दुसरे देश जितके शाहणे असतील तितकें आपल्यास चांगले. कारण कीं युक्ती वाढतात आणि ज्ञान वाढतें, येका देशांतून माल दुसरे देशांत गेला तर त्यांत तोटा नाहीं, कारण कीं दुसरे देशांतील माल इकडे येतो तत्रापि मालाचें स्थळांतर होण्यावर व परदेशांत जाण्यावर जकाती वगैरे सर्कार बसविते हें कांहीं व्यापारवृद्धीस चांगलें नाहीं, अडथळे मात्र आहेत.

प्राचीन काळीं माणसें व्यापार करूं लागली तेव्हां त्यांस येक अडचण पडू लागली कीं न्हावी याणें हजामत सुताराची केली तर त्यांस द्यावें काय. सुताराजवळ लाकडें तासलेलीं आहेत तीं न्हावी यास नकोत. असेच येकामेकापासून जिन्नस घेऊन वागविण्यास खर्च फार पडतो. तेव्हां उद्योग सर्वांचे चालावे व क्रयविक्रय अडचणीशिवाय व्हावा यास्तव मोबदल्याचा जिनसा पुष्कळ प्रकारचा देशोदेशी आहेत. कोठे कवड्या, कोठे बदाम, कोठे शिंप्या. या जिनसा फुटल्या म्हणजे व्यर्थ जातात व लवकर नासतात. दुसरी कांहींतरी असी जिन्नस पाहिजे होती कीं ती नासेना व फोडली तरी उतरू नये व सुलभ व वजन थोडी, सर्व देशांत सारखी चालणारी असावी. अशी माणसें अडचणींत असतात (असतां) त्यांस खाणी सापडल्या. त्यांतील धातू काढून सोन्यारुप्याचे तुकडे व्यावहारिक द्रव्य केलें. अद्यापि शाईपैसा वगैरे नाण्यावर शिका नाहीं, फक्त तांब्याचा तुकडा आहे, परंतु असे नाण्यातून लोक तुकडे कापून घेतात आणि ठकवितात. म्हणून पुढे शिके करू लागले व कडावरती देखील रेघा मारूं लागले. या प्रमाणें हल्लीचा सुर्ती रुपया आहे.

सर्कार लोभानें आपल्याकडे शिका करण्याचे काम ठेवितात, परंतु याचें कारण कांहीं दिसत नाहीं. सबब अन्याय व लोभिष्टपणा आहे. नाणें पाडण्याची परवानगी सर्वांस असती तर त्यापासून कांहीं तोटा जाहला नसता. सर्कारचे रुपये पाहिजेत तर मग सरकारचें धोतरें पागोटी त्याचे कोष्ट्यांनी केलेलीं कां नसावी? याशिवाय कितीएक ठिकाणीं सर्कारानें लोकांस ठकविण्याकरितां धातूंत हीण मिसळ करून खराब नाणीं पाडलीं आहेत व वजनें कमी करून आपला खजिना भरतात. येणेकरून लोक फसतात आणि जो गुन्हा रयतेने केला तर सर्कार शासन करतात तोच गुन्हा आपण करितात. हा अन्याय आहे.

व्यावहारिक द्रव्य हें व्यापार खेळिवण्यास मुख्य कारण आहे. व क्रयविक्रय सुलभपणानें होतो. याजकरितां सोने रुपें जरीं लक्ष्मी नव्हे, तरी लक्ष्मी उत्पन्न करणारा पदार्थ आहे व उद्योग वृद्धीस कारणरूप

आहे. सोने रुपें जर व्यापारांत नसेल तर त्याचा उपयोग व्हावयाचा नाहीं. घरांत सोनें तें मातीचे ढिगाप्रमाणेंच आहे. तें जर व्यवहारांत खेळेल तरच त्याचा उपयोग वर्ती सांगितला आहे तो होईल. यास्तव जें सोनें रुप्यांचा संग्रह त्यास लक्ष्मी समजून करितात त्यांची चूक आहे. जर देशांत सोनें रुपें फार असेल, येकाचे हातांतून दुसरेयाचें हातीं असें व्यापारांत खेळत नसेल, तर तो देश दरिद्रीच म्हटला पाहिजे. परंतु बहुधा सोनें रुपें व्यापारांत येतें, सबब ज्या देशांत तें फार आहे तेथें व्यापार फार आहे असें जाणावें. कारण कीं त्याशिवाय क्रयविक्रय होत नाहीं. जो देश आपलें सोनें रुपें दुसऱ्या देशांस देऊन त्याचे दुसेरे पदार्थ खरेदी करितो त्या देशाचें नुकसान आहे, कारण कीं, सोनें रुपें चिरकाल राहण्याचें धन हें त्याचे हातीं जातें, त्याजमुळे उद्योगची चौपट वृद्धी होत्ये, परंतु याणी जे जिन्नस घेतले ते खाऊन जातात. सबब याचा तोटा आहे. जा देशांत पैसा फार आहे तो देश सुखी असें समजावें, कारण कीं पैसा व्यापाराचा दर्शक आहे.

ज्या देशांत पैसा कमी आहे तेथे सावकार लोक बहुधा पैसा पाठवितात आणि, तेथला जिन्नस थोडे पैशांत खरेदी करितात व पुढे त्या लोकामध्ये पैसा जमला म्हणजे पैसा पाठवावयाचा बंद करितात आणि माल पाठवितात, आणि माहाग विकून पैसा काढतात. अशीं सावकारांची धोरणें असतात. पैसा हा जिन्नस खरेदी करण्याचा उपयोगाचा मात्र आहे, दुसरें कांहीं याचें कर्तव्य नाहीं, व त्याचा दुसरा काहीं उपयोग नाहीं. फक्त मोबदल्याचा मात्र रस्ता आहे.

सावकार लोक आपले सोईकरितां भलावणपत्रें, हुंड्या, चिट्या वगैरे देतात ते कागदाचे पुर्जे असतात परंतु देशावर खेपा चालतात. कितीयेक देशांत सर्कारानीही चिटया पैशाबद्दल देण्याची चाल घातली आहे. कांहीं राजानीं हिंदुस्थानातही कागदाचे तुकडे चालविले. परंतु कागदास व्यावहारिक द्रव्य करण्यात नफा आहे खरा, परंतु पत व विश्वास पाहिजे. धातूचा येकपट उपयोग आहे तर कागदाचा दसपट आहे, कारण कीं धातू भरून नेण्यास कांहींतरी श्रम आहेत परंतु कागद नेण्यास श्रम नाहींत, शिवाय दूर देशाचे व्यापारास सोय अशी आहे की येकानें लाख रूपयाचा माल काशीस विकला आणि तेथुन हिकडे पैसा आणावयाचा आहे तर ज्याला काशीस माल विकला त्याचे लाख रुपये पुण्याचे सावकाराकडे येणे असतात त्याजवर हुंडी दिल्ही म्हणजे हरकतीशिवाय पैसा पुण्यांस पदरी पडतो. याप्रमाणे सावकारांचा, तोड जोडी, पुष्कळ आहेत. धातूचे तुकडयावर व्यापार चालू जाहल्यापासून फार उपयोग जाहला, व त्याजवर सर्व देववेव होऊ लागली, याजमुळें कितीयेक लोक फक्त पैसा द्यावा घ्यावा, इतकाच व्यापार करितात. व्यापाराचें व लोकसुखाचे धोरण पैशावर फार येऊन ठेपलें आहे. पैसा कमी होईल तर उद्योग कमी होईल. अधीक असला तर अधिक होईल परंतु पैसा चालता पाहिजे.

## प्रकर्ण ४

# भांडवल म्हणजे लक्ष्मी जमविण्याविषयीं व तीचा उपयोग करण्याविषई.

उपयोगी लक्ष्मी म्हणजे देशांत लक्ष्मीचा जो भाग वृद्धिंगत होण्याकरितां कामास लाविला असतो, त्यास म्हणावे. देशांतील सर्व लोक जो पैसा व्यापारांत घालतात व जिन्नस खरेदीकडे लावितात व कुळंबी बैल, नांगर घेण्याकरितां जो पैसा खर्च करितो, व चाकर ठेविले त्यास वेतन देण्याकरितां जो पैसा लागतो तो सर्व उपयोगी लक्ष्मीचे पोटी आहे.

उपयोगी लक्ष्मीपासून जो नफा होतो त्यास उत्पन्न म्हणावें व उत्पन्नापैकीं खर्च जाऊन राहतें तें पुन्हा उपयोगी लक्ष्मीत पडतें. उपयोगी लक्ष्मी दोन प्रकारची आहे. येक स्थावर व दुसरी जंगम. स्थावरांत खाली लिहिलेले पदार्थ येतात.

उद्योग थोडक्या वेळांत होण्याची यंत्रें व हत्यारें. म्हणजे माग, पवनचक्की, तारवें, लोखंडी हत्यारें वगैरे, याशिवाय भाड्यानें लागणारीं घरें, म्हणजे दुकानें, गोदी, लैब्ररी, घरें वगैरे. अणखी जमीन नीट होण्याकरितां जें लागतें तें म्हणजे मोटा, नांगर, गाडे, बैल, मजूरदार, रस्ते, पूल, पाट, तळीं, विहिरी ही जमीनीत असतात सबब तींहि यातच समजावी.

## जंगमात खालीं लिहिलेले पदार्थ येतात.

जे पदार्थ जवळ असल्यानें उपयोग होत नाहीं, परंतु ज्या वेळेस त्याचा खर्च होईल किंवा विकतील तेव्हां त्यापासून उत्पन्न होईल असे पदार्थ. नाणें, दुकानदाराचे दुकानांत जो माल विकावयाचा असतो तो, मजूरदाराकरितां दाणेवगैरे बेगमी करावी ती, व जी हत्यारें व जिन्नस कामात नासतात म्हणजे तेल, कोळसे, कापूस, लोकर, बी, खत व मोठ्या इमारतींचे व पुलाचे वगैरे दागदोजीस जे पदार्थ चुना वगैरे लागतात तें सर्व यांत समजावें.

देशांत जितकी येकंदर लक्ष्मी आहे त्यापैकीं जितकी उत्पन्न होण्याकडे लाविली आहे, तितक्यास भांडवल म्हणजे (म्हणावें). भाड्याची गाडी हें भांडवल आहे परंतु श्रीमंताचे घरचे गाडीपासून कांहीं उत्पन्न नाहीं, सबब तें भांडवल नव्हे. तसेंच जव्हाईर विकणाऱ्याचे घरीं मोत्यें भांडवल आहे. कारण कीं तो त्यापासून तो उत्पन्न करून विकणार, परंतु तीच मोत्यें श्रीमंताचे घरीं आलीं म्हणजे शोभेचा उपयोग, त्यापासून उत्पन्न नाहीं. याजकरितां ती निरुपयोगी लक्ष्मी होती. याचप्रमाणें सर्व पदार्थाविषयीं विचार आहे.

पूर्वीं एक मनुष्य तारूं फुटून येका बेटावर लागला तेव्हा त्याजवळ येक चाकू व येक बंदूक व दारू राहिली, तेव्हां त्या भांडवलावर त्यानें दोन वर्षे आपला निर्वाह केला. बंदुकीचे पोलादानें विस्तव पाडला व मासे पाखरें वगैरे मारून खाई व चाकूनें लाकडें तोडून लहानशीं झोपडी बांधून व तेथे कांहीं भाजा वगैरे शिजऊन खाऊन हाल काढीत राहिला. बेटावर दुसरा कोणी माणूस नव्हता व लोखंड नव्हतें म्हणून लाकडाचे सोटे वगैरे त्याणें हत्यारें केलीं व कातडीं नेशी. पुढें काहीं दिवसानीं येक इंग्रज तेथें आला. तो त्यास हा मनुष्य तेथे भेटला. त्यास पुसलें त्याजवरून त्याणें सर्व हकीकत सांगितली. नंतर त्यास विलायतेंत आणला.

तेव्हां सदरहू मनुष्याचें भांडवल ती बंदूक व सुरी. त्याजवर त्याणें संसार केला. तद्वत भांडवल असल्यावाचून निर्वाह होणार नाहीं. परंतु श्रीमंत देश आहेत त्यांचे भांडवल मोटें असते व गरीब देशाचें भांडवल लाहान असते. भांडवल फार आहे तेथे मोटाली कामें इमारती पूल वगैरे फार असतात कारण कीं जर भांडवल नसेल तर ही कोणी बांधणार नाहीं. मोटें काम करावयास दोनशें चारशें माणसें लागतात तितक्यांस खाण्याकरितां बेगमी असल्याशिवाय काम होणार नाहीं. तेव्हां जें अन्न देशांत पिकतें त्यांतील खर्च होऊन इतकें अन्न कोठारांत पडेल तेव्हां कोणीं मोटीं कामें करील. याप्रमाणें सर्व मोटाले कामाचा व ज्या कामास बहुत माणसें व द्रव्य लागते त्याचा न्याय आहे. देशांत खर्चापेक्षां उत्पन्न अधीक होईल तेंव्हां शिल्क राहील त्या शिलकेवर मोटें काम व्हावयाचें येरवीं जर खाण्यापुरतें उत्पन्न जाहलें तर मोटे काम होणार नाहीं मोटे काम आरंभीं कांहीं लाभ देत नाहीं तयार जाहल्यावर लाभ देतें तेथपर्यंत खाण्याची व द्रव्याची वगैरे तयारी पाहिजे तेव्हां भांडवल शिल्क दरसाल पडून जमलें तेव्हां त्याची उपयोगी लक्ष्मी कोणी करील.

श्रीमंत म्हणजे इतकेंच कीं लोकांचे मेहेनतीचा संग्रह त्यांजवळ फार असतो. लोकांनीं खपून

सोनें काढलें प्रयत्नानें शालजोड्या केल्या प्रयत्नानें मोत्यें काढली तीं सर्व श्रीमंताजवळ असतात म्हणजे काय कीं इतक्या लोकांनीं मेहेनत केली त्याचें फळ त्यांचे हातात असतें. जे श्रीमंत आहेत ते आपलें भांडवल ज्यास मांडवल नाहीं त्यास देतात आणि त्याचें उत्पन्न आपण घेतात याचें नांव मजूरदार. मजूरदार म्हणजे त्यांजवळ भांडवल नाहीं म्हणून लोकांचें मांडवल घेऊन आपला निर्वाह करितात. मजूरी चाकर वगैरे ज्या देशांत अधीक असतो तो देश धन्य असें समजावें. कारण कीं बिनमांडवली लोक थोडे आहेत असा निर्णय होतो व दर फार असल्यानें मजूरदाराचा नफा आहे. त्यांस खाऊन पिऊन शिल्लक ठेवावयास येत्ये मग कांहीं दिवसानें तेंच मांडवल होतें आणि तो मजूरदार मजूरी सोडून स्वतां आपलें भांडवलावर निर्वाह करितो. याजकरितां दर मोठे असणें चांगले आहे.

आजचे काळीं इंग्रजांचें देशचें भांडवल किंवा उपयोगी लक्ष्मी सर्व देशांहून फार आहे याजमुळें त्याचे उत्पन्नही फार आहे. पाहा कीं, ते जिन्नस उत्पन्न करितात तो त्यांचे देशास पुरून जगांत कितीयेक दुसरे देशांस राहिला तो पाठवितात. तसेंच इमारती वगैरे विलायतेस मोटाल्या व कारखाने मोटाले व ज्ञानाची पराकाष्टा जाहली आहे तसीच तारवें कोणत्याही ठिकाणी नाहींत असें नाहीं सर्व देशांत इंग्रजांचा माल आहे याचें कारण काय कीं त्याचें भांडवल मोठें आहे व भांडवलाचा उपयोग कसा करावा हें त्यांस चांगलें कळतें.

देशांत खर्च होऊन जरी लक्ष्मी पुष्कळ शिल्लक राहिली तरी विना लोकांस त्या लक्ष्मीचा चांगला व लाभदायक उपयोग करावयाचें समजल्याखेरीज ती लक्ष्मी वाढणार नाहीं. अमेरिकेंत इंग्लंडांत जमीन आहे तितक्या जमीनीनें इंग्लंडांतील लोकांचे हजाराचा हिस्सा लोक देखील सुखानें निर्वाह करीत नाहींत कारण कीं जमीनीचें उत्पन्न कसें करावें हें त्यांस कळत नाहीं. अडाणी लोक आहेत. तसेंच हिंदुस्थानांत कापूस पिकतो पण लोकांस उद्योगाचें ज्ञान नाहीं याजमुळें विलायतेंतील वस्त्रें पांघरतात.

देशाची आणि येक मनुष्याची वाट येकच आहे. जसा येक मनुष्य आपलें उत्पन्न व आपला खर्च व शिल्लक पाहतो तद्वत देशाची स्थिती पाहिली असतां आहे. देशांत उत्पन्न दरसाल होतें त्यापैकीं देशांतील लोक खातात व खर्चतात व बाकी राहतें तें भांडवल सुधारणेचा उपयोगी पडतें परंतु शिलकेचा उपयोग करावयाचें ज्ञान लोकांस पाहिजे.

हिंदुस्थानातील लोक तर आपले शिलकेस मातीत टाकितात. इंग्रज लोक आपली शिल्लक उत्पन्नांत लावितात. संपूर्ण गृहस्थांचा पैसा सावकारांचा हातीं असतो याजमुळें उत्पन्न होतें व देशाची सुधारणा होत्ये परंतु हिंदुस्थानचे श्रीमंत मूर्ख याजमुळें सावकारीत पैसा ठेवीत नाहीं व्यापार वाढवीत नाहींत ज्ञान वाढवित नाहींत. परंतु श्रीमंती आली म्हणजे प्रथम लाख रुपयाचे तोडे दोन लाख रुपयाचे जसे याप्रमाणें व्यवस्था श्रीमंताचे भांडवलाची असते सबब ती लक्ष्मी व्यर्थ होत्ये. उद्योगाची शिल्लक राहते त्याजवर अणखी उद्योग जाहला पाहिजे परंतु तसें होत नाहीं.

भांडवल भयात घालावयाचें असलें म्हणजे सावकार नफा फार पाहातात कारण कीं बुडिताची व नफ्याची बेरीज मिळाली पाहिजे. याजकरिता व्यापारात विश्वास जरूर पाहिजे. जितकी भयवृद्धी होईल तितके सावकार हात आखूड करतात आणि व्यापार नीट चालत नाहीं.

या देशांत भांडवल फार कमी. तथापि लक्ष्मी पुष्कळ आहे. परंतु त्याची शिल्लक रक्षण करणें आणि त्याची वृद्धी करणें व उपयोगांत लक्ष्मी घालणें याचें ज्ञान कमी आहे. परंतु येक हे बरें आहे कीं इंग्रज लोकांजवळ भांडवल पुष्कळ आहे त्यांचा समागम आहे. कारण कीं आपण गरीब असलो तरी आपला शेजारी तरी श्रीमंत असावा मांडवलाला हात न लागतां त्याचें उत्पन्न होईल तें खर्चावें. आणि त्या उत्पन्नातील कांहीं शिल्लक ठेवावी. हिंदुस्थानचे लोक मेहेनत करितात खरे परंतु यांस मेहेनत वाढिवता येत नाहीं, व दुसरें उत्पन्न जें होतें, त्यापेक्षां खर्च फार वाढला. कारण कीं इंग्रज

लोक आपले देशांत इकडील द्रव्याचें मांडवल करितात याजमुळें जें इकडे मांडवल व्हावयाचें, तें तिकडे गेलें, आणि अर्थातच या देशातलें उत्पन्न, खर्चास कमी होऊं लागलें. याजमुळे उत्पन्नाची शिलक येकीकडे राहून, मांडवल मोडू लागलें, पहिले काळचे राज्यात जें मांडवल जमलें, त्यास हात लागू लागला म्हणजे इनामदार गाव विकू लागले, जमीनी, वाडे, सोन्यारुप्याचे दागिने, सर्व लोक विकावयास लागले, व आम्ही कितीही मेहनत करून उत्पन्न केलें तरी त्यास दुसरी वाटणी लागून आम्हास अबादी नाहिसी जाहली, व या देशांतील मांडवल वाढावयाचें बंद जाहलें. मांडवल बंद होतांच उद्योगही बंद जाहला, कारण कीं मांडवल उद्योगाचें मूळ आहे, लक्ष्मीजवळ, लक्ष्मी जाते. याजमुळें सर्व लोक बर्कत नाहीं म्हणून हाका मारतात. लोकांस आम्ही विचार करून जो निर्णय काढला, तो लोकांस दिसतो पण त्यास इतकीं कारणें सांगतां येत नाहींत. तत्रापि अशा प्रसंगी लोकांस योग्य आहे कीं आपला उद्योग वाढवावा व ज्ञान वाढवावें.

उत्पन्न फार जाहलें म्हणजे खर्चही वाढतो कारण कीं खर्चानें उत्पन्न वाढतें, जर कोणीं खर्च करणार नाहीं तर मग शिलक ठेवल्याचा उपयोग नाहीं, खर्चावर शिलकेची प्रतिष्ठा आहे. जो शिलक ठेवितो त्याची आशा खर्चाची असत्ये याजकरितां देशाचे आबादीस जमा वाढली पाहिजे व खर्चही वाढला पाहिजे. परंतु व्यवस्था पाहिजे. जर खर्च वाढेल तर जमा वाढली पाहिजे. जमा न वाढेल तर देशांतील मांडवल जाऊ लागतें व किती मेहेनत केली तरी लोकांस बर्कत नाहिशी होत्ये.

राजाचा धर्म असा आहे कीं मांडवल देशांत वाढवावें व व्यापार वाढवावा, परंतु कितीएक राजे आपला स्वता खर्च फार वाढवितात, व लोकांस व्यापाराचें अटकाव, गाद्या, जकाती वगैरे करितात. व लोकांस आबाद करण्याचें निमित्तानें त्यांस खराब करितात व किती एक देशांत निरुपयोगी लोकांचे पोषणार्थ लक्ष्मीचा व्यय होतो, याजकरितां जे लोक देशाचे उपयोगी पडतील त्यांस मात्र लक्ष्मीचा हिस्सा पोचावा व सर्कारानें गैरवाजवी खर्च करू नये, व लोकांनी, व श्रीमंतांनी रिकामे लोकांस डौलाकरिता बाळगूं नये. या कारणानी लक्ष्मी जमत नाहीं उपयोगास लागत नाहीं शेवटी देश खराब होतो.

## प्रकर्ण ५

## निर्भयपणाविषयीं

लक्ष्मी वाढण्यास मिळकतीस निर्भय असणें जरूर आहे. मागील प्रकरणांत लिहिलेल्या गोष्टी विशेषेकरून सर्काराचानें होऊ सकत नाहीं त्या लोकांनीच बहुधा केल्या पाहिजेत. परंतु मिळकत निर्भयपणानें राखणें हें काम केवळ सर्कारचें आहे. मनुष्यास जरी कळतें कीं लोकांचे घेऊ नये व दुसऱ्यानें मेहेनत करून संपादन केलें तें हरण करूं नये तत्रापि मनुष्याची बुद्धीस दुष्ट वासनानीं भ्रंश होतो याजकरितां लोकांस सरकार नेमावें लागतें व सर्कारचे कायदे असतात तदनुसार लोकांचे मिळकतीचें संरक्षण होतें. मिळकतीचे रक्षणापासून असें होतें कीं येक श्रीमंत वाढतो आणि बहुत गरीबांचे श्रम तो येकटा आपले सुखाकरितां घेऊन लक्ष्मी उधळतो आणि गरीब लोक उपाशी मरतात याकरितां श्रीमंतांचें घेऊन गरीब लोकांमध्यें वाटणी करून दिल्ही तरच काय चिंता? परंतु हें बरोबर नाहीं. त्याची कारणें खाली लिहिली आहेत.

लोक जेव्हां अगदी रानट होते तेव्हां त्यांजजवळ मिळकत नवती परंतु जों जों लोक शाहणे जाहले, तों तों मिळकतीचा संग्रह करू लागले, परंतु मनुष्यें स्वतां आळशी आहेत, गरजेशिवाय मेहेनत अगदी करीत नाहींत याजमुळें दुसऱ्यानें जमिवलें, तें पाहून त्याचा लोभ धरितील आणि जो बळकट असेल

त्याची सर्व मिळकत होईल आणि जे निर्बळ व भले असतील त्याचे सर्व हरण होईल आणि सामर्थ्यवान लोक गरीबास खाऊ देणार नाहीं, याजकरितां सर्कार पाहिजे नाहींतर लोक फळ पिकण्याचा देखील अवकाश करीत नाहींत. रानांत बिनवारस झाडें असतात ती पाहा. त्यांजवर फळें पिकत नाहीं तोंच पाडतात तीच अवस्था सर्कार नसलें तर गांवांत होईल. आणि पुढें जरीं पुष्कळ लाभ होईल असें असलें तरी नाश करतील.

जर मेहेनत करून पिकविलें तें खावयास कोणी बसू देणार नाहीं, असे असलें तर कोण नांगरील, कोण पाणी घालील, कोण राखण करील. जर पदरीं पडेल अशी आशा राहिली नाहीं तर कोण मेहेनत करील. मेहनतीचें कारण भोगेच्छा आहे याजकरितां जमीन वाटून देतात मिरास करितात वतनदारी करितात याचें कारण हेंच आहे कीं ही जमीन इतकी अमक्याची आहे असें ठरलें आणि त्यांत घालमेल होणार नाहीं असें असलें म्हणजे तो मनुष्य ती सुधारून उपजन्यास आणून उत्पन्नास आणील. नाहींतर इमारती जमीनी बागा कोण करितो. याजकरितां लोकांचे आबादीचें प्रथम कारण हें आहे कीं जें जाणें मिळविलें तें त्याजपासून कोणी अन्यायानें घेणार नाहीं असा निश्चय पाहिजे. अमेरिकेंतील लोक याजमध्यें जमीनीची वाटणी व मिळकतीस निर्भय नाहीं. याजमुळे मोटाल्या जमीनी येक येकाकडे आहेत तरी तेथें कांहीं पिकत नाहीं व लोक दरिद्री आहेत. तुर्कस्थान, सिरिया, व आर्बस्थान येथें राज्यें फार वाईट आहेत सबब शेतकऱ्यास देखील लढाईची तयारी करावी लागते नाहींतर कोणी दांडगा येऊन सर्व हिसकाऊन नेईल. प्रत्येक मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं सर्व मला असावें दुसऱ्यास कांहीं नसावें याजकरितां हा स्वभाव त्याचा दमन करण्याकरितां जबरदस्त सरकार पाहिजे.

विश्वासही मुख्य पाहिजे. व्यापार विश्वासाखेरीज व पतीखेरीज चालत नाहीं. जर प्रत्येक मनुष्यानें आपले स्त्रियेचा चाकराचा यजमानाचा अविश्वास केला तर जगणे होणार नाहीं. मोटाले व्यापार तर दूरच आहेत. याजकरितां लोकांनीं इतबारानें वागणें जरूर आहे. कोणी कोणाचे मिळकतीवर जबरीनें हात घालू नये जो घालील त्यास शासन करिवण्यास सर्कारानें मदत करावी नाहींतर सावकार भयानें पैसा बाहेर काढीत नाहींत व व्यापार उघडे मनानें चालत नाहीं सर्व काम बंद होते.

याकरितां सर्कारास आपले मेहेनतीचा हिस्सा घेऊन राखावें लागतें व ते जो कायदा हिताकरितां करितील तो लीनतेने मानणें योग्य आहे. कारण कीं सर्वांचे चांगल्याकरितां जे करितात त्यास सर्वांनी मानण्यास असा मान देण्यांत अपमान नाहीं. लोकांचे सर्कार चाकर आहे व सर्कारचे लोक रयत आहेत. येकमेकांचा निर्वाह येकमेकांशिवाय चालणार नाहीं. सर्कार म्हणजे काय कीं लोकांतून जे चांगले लोक विश्वासू आहेत त्यांस या कामावर मुकरर केले म्हणजे त्या सर्वांचे नाव सर्कार असें पडते. जशा कमीट्या, पंचायती, सभा वगैरे आहेत तद्वत सर्कार ही येक मोटी कमेटी आहे. परंतु पुष्कळ ठिकाणी सर्कार आपला धर्म सोडून लोकांची मिळकत खावयाची व त्यांची लक्ष्मी वाढवायाची सोडून त्यांचे मिळकतीचा नाश करितात. अंमल हाती आला आहे तो लोक अज्ञाणी म्हणून जाणार नाहीं. याजकरितां पाहिजे तशी वर्तणूक करितात. नाना प्रकारचा लढायांत पैका व माणसे खर्च विनाकारण करितात. याजमुळें लोकांचें नुकसान फार होतें परंतु सर्कारास असें समजत नाहीं की सर्कार ही किती माणसें व रयत ही किती माणसे आहेत ? तेव्हां लोकांचे सत्व घ्यावें हें नीट नाहीं.

जो मिळकत मिळवतो ती त्यास व त्याचे वंशाकडे चालेल हेहि सर्कारास ठरविणे जरूर आहे. कारण कीं जर मरणापाठीमागे तें जाईल असें ठाऊक असलें तर त्याचें चित्त लागणार नाहीं. याजकरितां निरंतराची आशा त्यांची असली म्हणजे सुधारणा ठीक होत्ये, याच कारणावरून ज्याणी मोटाली कामें केलीं त्यांस बक्षीस व इनामें देतात.

श्रीमंताचे घरचें वर्णन पुष्कळ लोक करितात, कीं त्याचे येथे काय वाडे, वस्त्रे काय, जर काय,

सुवास काय, सोनें, परंतु हें उपयोग नाहीं, देशांत येकाचे घरी श्रीमंती असली म्हणून फळ काय? त्याणें सर्वांचे लुटून आणलें असते तें तो उधळतो व वाईट राज्यांत बहुधा श्रीमंत लोक माहान अपराधी असतात व लोकांस अन्याये करून लुटल्याशिवाय श्रीमंत होण्याचा मार्ग विदित नसतो. आणि इकडील देशांत मागें राजे जाहले त्यांची कर्मे ऐकिली तर अंगास शाहरे येतात. होळकरांची लूट, गोखल्याची लूट, टिपूचा जुलूम इत्यादि फार अवघड स्मरणास देखिल आहेत. मग त्या देशांची गती काय पुसावी. राजा मूर्ख असला म्हणजे देश खराब होतो. याजकरितां राज्यावर नेमणें त्यास चांगला, विद्वान, सुशील, योग्य, पृथ्वीचा मोलाचा, माणूस पाहून नेमावा म्हणजे वाकडें होत नाहीं.

सर्व मिळकतीपेक्षां मुख्य मिळकत मनुष्याचे हातपाय. ही प्रथम मिळकत जन्मतः प्राप्त होत्ये कोणापासून आणावी लागत नाहीं, परंतु ईश्वर पुरवितो. तीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची परवानगी असली पाहिजे. परंतु याचा प्रतिबंध सर्कार करितात अशी सर्कारें फार वाईट व जे मिळकतीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची पर्वानगी देत नाहीत आणि गाद्या, मक्ते, देतात तेंहि ठीक नाहीं. परंतु इंग्लंडांतील चाल येक चांगली आहे कीं नवीन युक्ती किंवा बुक कोणी केलें तर त्याजवर कांहीं दिवसपर्यंत त्याचे हक्क ठेवीतात ती युक्ती किंवा ग्रंथकर्त्यांचे इछेशिवाय प्रगट करण्याचे सर्कार मना करितात. हें बरोबर आहे.

जसे आपले शरीराचा व मिळकतीचा तसाच आपले बुद्धीचा उपयोग करण्यास सर्वांस सारखी आज्ञा असावी. येविषयी हिंदू लोकांच्या चाली व शास्त्रें कांहीं विपरीत आहेत. येणेकरून त्यांचें असें जाहलें आहे कीं जसा येक हात बांधून येका हातानें खुषीनें येकादा मनुष्य काम करितो आणि हाल विनाकारण सोसतो. तद्वत इतर जातीनें ज्ञान मिळविण्याची बंदी व कितीयेक पृथ्वींत उत्पन्न पदार्थ होत असतां भक्षण्याचा निषेध व व्रतें, यात्रा, उपास, तपें वगैरे यांत काल कितीयेक जातो. याचा उपयोग व लाभ लोकांस काय होतो याचा विचार पाहिला पाहिजे. दिसण्यांत तर कांहीं नाहीं.

जर निर्भयपणा देशांत नसेल तर कोणाचा परिणाम लागणार नाहीं. श्रीमंताचा नाश प्रथम होईल. परंतु गरीबाचे श्रीमंत होणार नाहींत व जे ते आजचा विचार पाहूं लागेल. उद्याचा पाहणार नाहीं व संग्रह करणार नाहीं. उद्योग खुंटेल याजकरितां निर्भयपणा हा देशाचे अबादीचें लक्षण आहे व सर्कारचें मुख्य काम आहे.

## प्रकर्ण ६

# किमतीविषयीं

लक्ष्मी देशांत जमत चालली म्हणजे ती घरोघर प्रवेश करिते. कोणाचे हातीं फार कोणाचे हा कमी जाते व याची कारणे काय आहेत त्याचा विचार करण्यास चार गोष्टींचा प्रथम विचार केला पाहिजे.

१ मोल्य २ किंमत ३ खप ४ अमदानी ५ खर्च

मोल्य म्हणजे येक पदार्थ दुसऱ्या पदार्थास खरेदी करितो, तो गुण. जसें पांचशे शेर कापूस बाजारांत दिल्हा, तर येक तेल किंवा गूळ मिळतो, तेव्हां कापसाचे मोल गुळाचे दुपट जाहलें याप्रमाणें सर्व पदार्थांचें मोल जाणावें परंतु बहुधा सोने, रुपें, तांबे यांचें नाणे मोलाचा अजमास करण्याकरितां काढलें आहे. कारण कीं सोनें रुपें यांचें मोल जरी बदलतें, तरी इतर पदार्थांसारखे वरचेवर बदलत नाहीं. यास्तव बहूत करून मोल ठरविण्यात किंमत करितात.

किंमत म्हणजे पदार्थांबद्दल जितके रुपये येतात ती त्याची किंमत. वरती उदाहरण लिहिलें आहे,

त्याचा अकार रुपये.

५०० कापूस रुपये १००=१००० तेल रुपये १००

दोहो जिनसाची किंमत सारखी आहे. तत्रापि किमतींवरून जुने काळचे किंवा पुढचे मोल्य समजत नाहीं व दुसरे देशांतीलही समजत नाहीं. याचें कारण असें आहे कीं शेपन्नास वर्षांनी सोनें रुपें देखील किमतीत कल खातें व नवीन धातूची खाण सापडली म्हणजे धातूचा दर कमी होतो व दूर देशांत दोन प्रकारचे दर असतात. जसे येका देशांत पाचशे शेर कापूस पन्नास रुपयास मिळतो. परंतु १००० शेर तेलाला शंभर रुपये पडतात. तर

५०० कापूस रुपये ५०=५०० तेल रुपये ५०

कापूस व तेल समान आहेत असें जाणावें. मागे पेरू म्हणून अमेरिकेंत येक देश आहे. तेथे पहिल्यानें युरोपियन लोक गेले आणि मजूरदार ठेऊ लागले तों दर मनुष्यास रोज तीन रुपये द्यावे तरी त्याचें पोट भरेना. कारण कीं रुपें फार स्वस्थ होतें. परंतु लोक कांहीं श्रीमंत व सुखी नवते. याजवरून किंमतीचा दरावरून जिनसाचें मोल्य सांप्रतकाळचे जेथीलतेथे काढता येतें. परंतु स्थळांतर किंवा काळांतर जाहलें म्हणजे निघणार नाहीं. कारण कीं रुपें सोन्याची अुत्पत्तीवर न्यूनाधिक्य होतें.

मोल्य दोन पदार्थांचें सारखे किंमतीनें असते. त्याजवरून असें समजावें कीं सदरी लिहिलेप्रमाणें पांचशें शेर कापूस करण्यास जी मेहेनत व जो खर्च लागतो तितक्याच खर्चांत व मेहेनतीत हजार शेर तेल निघतें. म्हणून त्या दोहो पदार्थांचें शंभर रुपये किंमत सारखे आहेत. मोल्याचे मूळ जे कापुसात आहे तेंच तेलात आहे. दोघांचे ढीग मात्र लाहान मोटे परंतु मोल्य फिरवणारी वस्तु दोहोमध्ये सारखीच आहे. म्हणून ते दोनी ढीग येकामेकाशी बांदले जातात. आणखी असें आहे कीं पांचशे शेर कापुसास जी मेहेनत लागली तीच पन्नास रुपये भार चांदीस लागली आहे. म्हणून तींत कापूस पन्नास रुपयाचा मोबादला होतो.

सोनें रुपें मातींतून काढण्यास मेहेनत फार लागत्ये. म्हणून त्या मेहनती अन्वये दर आहेत. तोळाभर सोनें काढावयास जितकी मेहेनत लागत्ये तितक्या मेहेनतीने १८ तोळे रुपें निघते. व येक तोळाभर रुप्याच्या मेहेनतीत ८० तोळे तांबें निघते. हे येक कारण व दुसरें कारण असें आहे कीं सोन्याच्या खाणी थोड्या आहेत. रुप्याच्या त्याहून पुष्कळ आहेत. याजमुळें सर्वांस सोन्याचे खाणीशी पोचायास रुप्यापेक्षा आठपट अधिक श्रम पडतात.

याजवरून सोनें रुपें हा निरुपयोगी पदार्थ आहे तरी इतर पदार्थांची अदलाबदल करण्याच्या उपयोगी आहे व जसे इतर जिन्नस तसाच हा येक जिन्नस आहे. या जिनसाचा उपयोग इतकाच कीं इतर जिन्नस येकापासून दुसऱ्याचे हातीं जलद पोचवितो. जसें बोलणें सर्व लोकांस येतें परंतु प्रत्येक मनुष्य बोलून निर्वाह करू लागला तर किती अडचण पडेल बरें ? आणि लिहिणें आहे याजमुळें कोठेले कोठे किती दूर बोलणें होतें. येथून पत्र पाठविलें म्हणजे त्या मनुष्याचे कानांत तितका मजकूर बोलल्याप्रमाणेंच आहे. तद्वत इतर जिन्नस येकामेकाशी बदलू सकतो. परंतु पैशाविना अडचण फार पडेल आणि दूर देशांत जिन्नस पोचवणें वगैरे कांहीं होणार नाहीं.

कांहीं पदार्थ असे आहेत कीं त्यांची किंमत त्याचे दुर्मिळपणानें असत्ये कितीही मेहेनत केली तरी त्यास अधीक पिकविता येत नाहीं. परंतु असे पदार्थ थोडे आहेत.

खप म्हणजे मनुष्यास घेण्याची इच्छा आणि शक्ति दोन असलीं म्हणजे खप कोणतेहि पदार्थांचा होतो.

अमदानी म्हणजे पदार्थ पिकून बाजारांत विकावयास येणे

खप आणि अमदानी या दोहोंकडून किंमत कमिफार होत्ये. जर खप आहे तितकाच आहे आणि अमदानी फार झाली तर किंमत कमी होत्ये. आणि जर अमदानी आहे तितकीच आहे आणि खप फार असेल तर किंमत फार होत्ये याचमुळें येके ठिकाणी लष्कर जमलें म्हणजे किंमती चढतात. पाऊस पडला म्हणजे दाण्यांच्या किंमती उतरतात याचें कारण हें आहे. किंमतीत फरक खप आणि अमदानीसारखी असेल तर पडणार नाहीं. दोनी अधीक जाहली तरी पडणार नाही. दोनी उणी जाहली तरी पडणारी नाहीं. परंतु त्यांत जसें न्यूनाधिक्य होईल तसें किमतीतही होईल.

पुण्यांत जर सालाबाद खप आहे तितक्याहून येकदंम फार माणसें आली तर खप वाढेल. मग जे पैसेकरी असतील ते माल घेण्यास किंमती फार लवतील. म्हणून तेजी होईल. परंतु जर येथील दाहाहजार माणसें येकदंम कोठे जातील तर किमती कमी होतील. कारण कीं विकणारे यांस भय पडून जो तो आपला माल लौकर विकील म्हणून मंदी होईल. यास्तव तेजीचे व मंदीचे कारण विकत घेणार व घेणाऱ्याचे चढाओढीत आहे.

खर्च म्हणजे माल पिकविण्यास जो खर्च लागतो तो. हेंहि येक मुख्य कारण बाजारांतील किंमतींत फरक पडण्याचें आहे. कांहींयेक पदार्थ बाजारांत आणला म्हणजे तो उत्पन्न करावयास जो खर्च लागला असेल तो मागून कांहीं नफा सावकारास होईल तर तो आणील. जर येक वस्त्रे करावयाचें किंवा कागद करावयाचें यंत्र आणलें त्याणे इतर लोकापेक्षां आपण माल थोडे खर्चात लौकर तयार केला आणि तो बाजारांत आणला तर आपल्याला फार नफा होईल. कारण कीं नेहेमीची किंमत येईल. परंतु ही गोष्ट प्रसिद्ध जाहल्यावर दुसरे लोक तें यंत्र करितील आणि माल करून आणितील. तेव्हां खपापेक्षां माल फार आला म्हणजे अर्थातच किंमती उतरतील. परंतु किंमत कोठपर्यंत उतरेल कीं जोपर्यंत खर्च मागून थोडा नफा राहील तेथपर्यंत, कारण कीं कोणी तोट्यानें विकीत नाहीं तेव्हां किंमत उतरतां उतरतां येका धान्यावर बसेल.

खप व अमदानीनें किंमतीत फरक पडण्यास शेकडो कारणें आहेत. परंतु नेहेमी किंमत उतरण्यास कारण खर्च आहे. जर खप आणि अमदानी सारखी राहील तर खर्च कमी जाहला तरीं किंमतींत फरक पडणार नाहीं. जसें जर पावसाबरोबर धान्य पिकतें तितेकें आकाशांतून पडले आणि कांहीं मेहेनत लागलीं नाहीं तर त्याची किंमत उतरणार नाहीं कारण कीं जितका खप तितकीच अमदानी परंतु जर पिकविण्यास खर्च खंडीस दाहा रुपये लागत होता तो कांहीं युक्तीनें पांच रुपये लागावा अशी तजवीज निघाली आणि जर खपाइतकाच दाणा पिकविला तर किंमत उतरणार नाहीं. परंतु अशी स्थिती राहात नाहीं खर्च कमी जाहला म्हणजे सगळेजण धान्य पिकऊ लागतात. कारण कीं खर्च कमी आणि नफा होतो. परंतु सर्व धान्य पिकऊ लागलें म्हणजे अमदानी फार होत्ये आणि खप वाढत नाहीं तेव्हां अर्थातच किंमती उतरतात.

कोणचाहि जिन्नस पिकऊन बाजारांत येण्यास दोन गोष्टी पाहिजेत. येक मेहेनत लागली त्याची मजूरी मिळाली पाहिजे. व दुसरें जें मांडवल घातलें तें नफ्यानें परत आलें पाहिजे. कारण कीं नफ्याशिवाय मांडवल व वेतनाशिवाय चाकरी कोणी करणार नाहीं या कारणावरून पदार्थांच्या किमती ठरतात.

प्रकर्ण ७

## धारा मजूरी व नफ्याविषयीं

मांडवल व मेहेनत याजवरून किंमत होत्ये व किमतीनें धारा होतो. जशी किंमत बाजारांत येईल तसा धारा कुणबी देईल. लक्ष्मीची मुख्य दोन कारणें आहेत. येक मांडवल व दुसरें मेहेनत. यास्तव

सर्व लक्ष्मी प्रथम तिघांचे हातात असत्ये. सर्कार मजूरदार सावकार या तिघांपासून सर्व उत्पन्न होत्ये. याजकरितां धारा, मजूरी, नफा याविषयीं विचार केला पाहिजे. कोणचे कोणचे देशांत जमीनीचें मालक सर्कार नसतें. परंतु सर्व जमीन लोकांची असत्ये. व सर्कारचा वसूल सर्व जकाती व छापी कागद वगैरेपासून होतो. याप्रमाणे विलायतेत आहे. जमीन वाटून लोकांस माल (मालक) करण्याचें कारण असें आहे कीं ज्याची जमीन मिळकत जाहली तो तिला उपजयास आणितो व पैसा खर्च करून लागवड करितो. आपले मिळकतीची त्यास काळजी लागत्ये. परंतु हिंदुस्थानात जमीनीचे मालक सर्कार आहे. जमीन पिकविणारे त्याचे भाडेकरी आहेत. तत्रापि इकडे मिरास व जमीन करून देण्याची चाल आहे. मिरास इनाम जमीन त्याची मिळकत जाहली त्याजवर सर्कारचा जोर चालत नाही. तत्रापि जमीन सुधारणें हें मुख्यत्वेकरून सर्कारांकडे आलें. कारण कीं जो धारा देऊन जमीन वाहतो, तो फार पैसा खर्च करणार नाहीं. याजकरितां तगाई वगैरे देण्याची चाल आहे. परंतु पडीत जमीन पुष्कळ पडत्ये त्याची लागवड सर्कारही करीत नाहीं.

ईश्वरानें उत्पन्न केलेल्या पदार्थांचें भाडें द्यावे लागतें असा पदार्थ काय तो जमीन आहे. बाकी वारा पाऊस उजेड हे बिनभाड्यानें चाकरी करितात. मनुष्याचें जीवनाचें धान्यवगैरे सर्व पृथ्वींत उत्पन्न होते. परंतु जर ईश्वरानें असा नेम केला असता कीं जितकें माणसास पाहिजे तितकेंच जमीनीनें पुरवावें. तर सर्व लोक येक धंदा करिते. सर्व नांगर धरतें व येक जातच पृथ्वीवर होतीं व मनुष्याची स्थिती येकसारखी राहिती. कोणी शाहाणा होताना विद्या वाढतीना व कोणास वस्त्रे करावयास व घड्याळे करावयास व विद्या करावयास बनतेना आणि लोक रानटी राहते. परंतु भगवंतानें कृपेनें करून जमीनीचे अंगी शक्ती अशी ठेविली आहे कीं मेहेनत दोघानी केली तर पाचाचे पोट भरावें. याजमुळें बिनमेहेनतीनें खाणारे तीन असामी कांहींतरी नांगराशिवाय दुसरा उद्योग करितात आणि ज्ञानसुख आणि शरीरसुख दुसरे प्रकारानें वाढवितात.

जमीनीचे वसुलावरा सर्कारचा निर्वाह होतो. याचे कारण असें कीं हा देश सुधारलेला नाहीं. जमीन सोडावी तर दुसरें कांहीं नाहीं. यास्तव प्राचीनकाळीं जेव्हा लोक मध्यम शाहणे होते तेव्हा-पासून चाल चालत आली आहे. परंतु विलायतेंत असें नाहीं. सर्कार श्रीमंतावर कर बसवितें. गरीबावर बसवित नाहीं व जमीनीचे लोक इनामदार आहेत. कोणाकडे किति कोणाकडे किती असी जमीन सर्वांस प्राचीन काळापासून वाटून दिल्ही आहे. त्याची लागवड व वसूल आपण भाडेकरी ठेउन इनामदाराप्रमाणें करावी. जमीन कधी सर्कार घेत नाहीं. सर्कारचा कर बहुधा श्रीमंती भोगणारे गाड्याघोडीं बाळगणारे यांजवर असतो. कारण कीं सर्कार श्रीमंताचें संरक्षण गरीबाप्रमाणेंच किंबहुना श्रीमंताचें अधिक करितें. तेव्हां सर्कारचा चरितार्थ होण्यास त्याणी पैसा द्यावा हे योग्य परंतु या देशांत असें नाहीं. सर्कार गरीबापसून घेतात आणि लक्षाधीशावर कांहीं कर नसतो. जरी सर्कारचा लाभ त्यांस सारखाच आहे.

कांहीं देश असे आहेत कीं तेथें माणसें फार कमी व जमीन फार आहे. तेथें जमीनीचा धारा नाहीं. कारण कीं जमीनीस कोण पुसतो. चांगली पुष्कळ जमीन पडली असत्ये. जमीन जर येकसारखे प्रतीची व बहुत असेल तर कोणी धारा देणार नाहीं. परंतु असें नाहीं. जमीन पुष्कळ प्रतीची असते. व जमीन थोडी आहे. याजकरितां देशांत जितकी माणसे असतात त्यांचा निर्वाह होण्यापुरती चांगली जमीन असते. तितकीच पहिल्याने पेरतात. परंतु पुढें माणसें वृद्धिंगत जाहली म्हणजे तितकें उत्पन्न पुरत नाहीं. मग मध्यम प्रतीची जमीन असती ही पेरू लागतात. मग धारा चालू होतो. चांगली जमीन पाहून सर्कार म्हणते की याबदल कांहीं नफा दिल्हा तर देऊ नाहींतर ती वाईट घ्या तेव्हां शेत करणारा कबूल करितो आणि धारा देऊ लागतो. याप्रमाणें धाऱ्याची चाल पडते.

यास्तव धारा म्हणजे जमीनीचा जो उत्पत्तीचा अविनाश गुण आहे त्याचे उपभोगार्थ मालक जो ठरविला आहे त्यास स्वामित्व देणें याचें नांव धारा. जमीन ईश्वरानें केली याचें स्वामित्व येकास असावें व दुसऱ्यास नसावें हें कशाकरितां याचें कारण पूर्वी निर्भयाचे प्रकर्णांत लिहिलें आहे.

कितियेक जमीनी अगदी खडकाळ आहेत. त्यांचा उगेच नांवाला धारा देतात. कितियेक जमीनी वाईट चांगली येकाखाली येक देतात. परंतु धारा देण्यास इतकें जरूर पाहिजे कीं तो जमीनींत वर्षभर खपेल. त्याचें वेतंन त्यास मिळावे आणि धारा देण्यास कांहीं वरती मिळालें पाहिजे. पडीत पडतें याचें कारण असें आहे कीं त्यास पिकविण्यास जो खर्च लागतो तितकें उत्पन्न होत नाहीं. याजकरितां पडित पडतें व त्याचा धारा कोणी देत नाहीं. परंतु जर माणसें देशांत वाढतील तर त्या जमीनीसही पिकवावें लागेल. आणि धाराहि देतील. परंतु माणसांपुरेतें अन्न पिकत असल्यास मग वाईट जमीनीस कोण पेरतो. यास्तव जमीन जितकी कमी लागवड होईल तितका धारा कमी होईल. आणि जितकी जमीन अधीक लागवड होईल तितका धारा फार होईल कारण कीं फार जमीन लागवड जाहली म्हणजे वाईट जमीनदेखील लागवडीत येते व त्यांस मेहेनत व पैसा फार लागतो. याजकरितां सर्कारास तगाई वगैरे फार द्यावी लागेल. व कौल कितीएक सालचें द्यावे लागतील. मग तितक्याबद्दल धारा अधीक दरानें सर्कार घेईल.

वाजवी रीतीनें धारा याप्रमाणें चढतो, उतरतो, परंतु याखेरीज सर्कारचा जुलूम व हरण करण्याची इच्छा व रयत लोकांचा गरीबपणा व अज्ञानपणा याजमुळेंही चढउतार होतो. परंतु या कारणानी चढउतार जाहल्यास लोकांची दुर्दशा होत्ये.

मजूरी म्हणजे वेतनेहि नाना प्रकारचें लोकांस नाना प्रकारची असतात. याचें आश्चर्य लोकांस वाटेल. परंतु विचार केला असतां सहज समजेल कीं दर वेगळालाले असणें जरूर आहे. मजूरीचे दराची पांच कारणें आहेत. प्रथम कामाचा योग्यायोग्यपणा, दुसरें तें काम शिखण्याचा खर्च, तिसरें काम सदोदित राहील किंवा नाहीं, चौथें विश्वासाची कामें पांचवें जोखीम.

पहिलें कारण असें आहे कीं कामाचा घाणेरेपणा व अब्रू व शरीरास पीडा यामुळें असें काम करणाराची मजूरी अधीक पडते कारण कीं अशी कामें इतरासारखी मजूरी मिळाली तर कोणी करणार नाहीं. याप्रकारची कामें खाटीक अपराध्यास फाशी देणारा याची आहेत. तशीच ज्या कामामुळें बेअब्रू नाहीं व फार बुद्धी नको त्यास वेतनें कमी आहेत. अशी कामें शेतकी, मासे धरणें वगैरे आहेत अणखी विद्या शिखणें म्हणजे ज्योतिषी वैद्य वकील कारागीर यांची वेतनें मोटी आहेत कारण कीं हीं कामें अवघड आहेत बुद्धी फार पाहिजे फार काळ शिखण्यांत घालवावा लागतो. सिपायाचें कामास वेतन फार आहे कारण कीं ते दुःखदायक आहे जरी शिपाईगिरी पुष्कळ लोकांस करावी असें वाटतें याचें कारण शिपाई बहुधा निकामी ढोलदार असतात. परंतु वास्तवीक पाहिलें तर त्यांस दुःख फार जीवाचें भय फार आहे. तसेंच तारवावरचे लोक यांची वेतनें शिपायापेक्षां फार आहेत कारण कीं जमीनीवरच्या फौजेपेक्षां तारवांतील फौजेचे हाल फार आहेत. तमासगीर व गाणारे वगैरे यांची वेतनें फार आहेत. कारण कीं त्यांस बुद्धी विशेष पाहिजे असें नाहीं तत्रापि त्यांत लज्जा आहे याजकरितां बहुतलोक त्यांत पडत नाहींत. परंतु हा चमत्कार आहे कीं जी कामें लज्जायुक्त आहेत असे लोक जाणतात परंतु त्यांचे पोषण पैसा देऊन करतात.

दुसरें कारण असें आहे कीं चित्र काढणारे, वैद्य, वगैरे ज्यांस तें काम शिखण्यास मेहेनत पडते कितीयेक वर्षे शिखतात तेव्हां येतें अशा कामास वेतन इतरापेक्षां फार आहे.

तिसरें कारण असें आहे कीं चामार, सिंपी वगैरे यांस नेहेमी कामें आहेत परंतु कुंभार हे बारा महिने विटा करूं सकत नाहींत, कितीयेक दिवस रिकामे बसतात. यास्तव त्यांचे वेतन अधीक आहे, कारण कीं दोन महिने काम करून चार महिने त्यांस निर्वाह करावा लागतो.

चौथें विश्वासाची कामें म्हणजे सोनार, मोत्यें छेदणार, हिरे कापणार, वकील, वैद्य, हीं कामें या प्रकारची आहेत.

पांचवें कितीयेक कामें अशी जोखिमाची आहेत कीं तीं दहाजण शिखत असले तर येकास येतें अशा प्रकारची विद्या शिखण्याची भाषा शिखण्याची वगैरे कामें आहेत. यास्तव त्यांस वेतन अधीक पडतें.

या प्रमाणे वेतन अधीकउणें असण्याची कारणें. शिवाय दुसरें कारण असे आहे कीं लोक फार व रोजगार कमी असले म्हणजे दर कमी होतात व रोजगार वाढलें आणि लोक थोडे असले म्हणजे वेतन फार होतें. जर लोक फार जाहले तर त्यांस रोजगार वाढिवणें जरूर आहे. नाहींतर त्यांची दुर्दशा होईल. रोजगार वाढणें लक्ष्मी वाढल्याशिवाय होत नाहीं किंवा लोकांची वृद्धी न व्हावी असी तजवीज केली तर येक लोक सुखी राहतील.

मनुष्यांची वृद्धी होत्ये याचा हिशेब पाहण्यास मनुष्यासारखीं दूसरीं जनावरें आहेत त्यांची वृद्धी पाहिली. त्याजवरून असें दिसतें कीं स्त्रिया दर वर्षास प्रसवतात. परंतु ज्यांची मुलें अंगावर पितात त्यांस गर्भसंभव लवकर होत नाहीं. याजकरितां सरासरी दोन वर्षास एक मूल धरलें तर स्त्रीचा प्रसवकाळ विसापासून पंचेचाळीसपर्यंत अजमासें आहे. तेव्हां वीस वर्षांत दहा मुलें सरासरी पडतात. परंतु गरीब वगैरे यांची मुलें ददातीनें, रोगानें, वगैरे कारणांनी मरतात यास्तव सरासरी येके दंपत्यास पांच मुलें धरली म्हणजे त्यांत सर्व वजाबाकी आली. याप्रमाणें हिसेब धरला तर वीस वर्षांत सरासरी दुपट लोक व्हावे. परंतु असें होत नाहीं. लोकवृद्धीस अटकाव फार पडतात. तथापि अमेरिकेंत इंग्रज लोक गेले तेव्हां जितके गेले त्याचे दुपट पंचवीस वर्षांत जाहले. त्याचे दुपट पन्नास वर्षांत जाहले. याप्रमाणें दीडशे वर्षेपर्यंत वृद्धी पावले. परंतु असे नेहमी वृद्धी पावत नाहींत. जर असे वृद्धी पावतील तर इतक्यांस अन्न पाहिजे. परंतु जमीनीपासून किती उत्पन्न होईल याचाही अजून अंत नाहीं व लोक किती वाढतील याचाही अंत नाहीं. यास्तव या गोष्टीचें भय नाहीं. तत्रापि इतके खरें कीं जमीनींत अन्न उत्पन्न होईल तेथपर्यंत पराकाष्ठा लोक वाढतील, अधीक होत नाहींत. जर लोक मनस्वी वाढले तर सर्वांस पोटापुरतें अन्न मिळतें इतकें वाढतील, अन्न संपले म्हणजे लोकाची वृद्धी आटोपली हा अखेर नियम आहे.

लोकवृद्धीस नेहेमी अटकाव पडतात. याजमुळें जितके लोक वाढावे असें आहे तितके वाढत नाहींत. ते अटकाव असे कीं लोकांचे दुर्गुण, दरिद्र, आयुष्य कमी होणारी कामें, रोग, साती, लढाया, दुष्काळ, व्यसनें, पाणी वाऱ्यात खपणें इत्यादि. यांतील जितकी कमी होतील तितकी करावी हा धर्म प्रत्येक दयालू माणसाचा आहे.

लोकांचे जन्म सुखांत व्हावयास मुख्य कारण लग्न आहे. जे पुरुष लग्नावाचून किंवा लग्न करून व्यसनग्रस्त होतात ते फार निंद्य. त्यांस फळेंही तशीच प्राप्त होतात, व ज्या स्त्रिया लग्न टाकून उनाड फिरतात त्याहि निंद्य व जनावरें होत व त्यास फळे फजीती, रोग, पाप, दरिद्र, हींच प्राप्त होतात. यास्तव येक स्त्री करणें पुरुषास योग्य आहे आणि त्यांत सुख आहे. येकाहून अधीक स्त्रिया करितात ते मूर्ख व फजीतखोर आहेत. ईश्वराची इच्छा काय आहे हें कळण्याचा मार्ग असा आहे कीं सर्वांस जें चांगलें तीच ईश्वराची आज्ञा. यास्तव सर्वांनी जर पुष्कळ स्त्रिया करूं म्हटलें तर जगांत स्त्रिया व पुरुष सारखे आहेत. तेव्हां ही गोष्ट सर्वांस चांगली नाहीं. तस्मात ईश्वरआज्ञेस विरुद्ध. दुसरें असें आहे कीं लग्न करणें तेंहि बहुत विचारानें केले पाहिजे. लहानपणी लग्न हें सर्वथैव विचारास व शास्त्रास व ईश्वरआज्ञेस विरुद्ध आहे. जेव्हा मनुष्यास असी शक्ती येईल कीं आपले मुलांस व स्त्रीस सुखें करून पोशील तेव्हा त्याणें लग्न करावें. लाहानपणी लग्न केल्यानें आपल्यासही खाण्यास नाहीं आणि स्त्री

व मुलें यांसही खाण्यास नाहीं अशा प्रसंगास आपण आणलेसें होतें, व तेणेंकरून दुःखवृद्धी होत्ये व रोग, आयुष्यहीनता, होते आणि असा लौकर लग्न करणारा मनुष्य महान दोषी होतो. आणि लहानपणीं पोर मेलें म्हणजे त्यास जितकें खाण्यास घातलें तें सर्व व्यर्थ गेलें, तें पुनः परत येत नाहीं. पोरास वाचिवणें हें आईबापाचे दुःख खेरीज देशांतील लक्ष्मी वाढिवणें आहे. असें असतां जे लौकर लग्ने करितात व लोकांस क्षीणायु व रोगी उत्पन्न करितात ते केवढे मूर्ख, आणिक मूर्खपणा किती हिंदुस्थानात आहे याचा अंत नाहीं.

जे लोक म्हणतात कीं जन्मास येतो त्यास ईश्वर निर्वाहाची सोय करतो. ते वेडे आहेत. कारण कीं जर शाहाणपणानें वागलें तर ईश्वर सोय करील, परंतु मूर्खपणा केला तर आपला दोष आहे. सद्गुणावांचून सुख नाहीं आणि व्यभिचाराचा त्याग हा येक मोठा सद्गुण आहे आणि सावधान हाहि सद्गुण आहे. याजकरितां लग्नाचे कामांत दोन्ही पाहिजेत. आईबाप लौकर लग्नें करून पोरास दुःखी करितात, तसेंच जे गरीबास लग्नास पैसा देतात तेहि दोषी आहेत. लग्न कोणी स्वतंत्रपणानें संसार करण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज करू नये. यास्तव लोक सुखी होण्यास नीतिमान असले पाहिजेत.

लोकांमध्यें स्वतंत्रता असली पाहिजे म्हणजे व्यंग लोकाखेरीज प्रत्येकानें आपले उद्योगानें मिळऊन खाल्लें पाहिजे. कारण कीं स्वतंत्रता नसली म्हणजे लोकांचा खरेपणा, आपले गुणाचा अहंभाव व आपली स्वता किंमत व गुण व उद्योगाची थोरवी परतंत्री लोकांत नसतात. परंतु परतंत्र हा गुण हिंदु लोकांचा फार आहे. आणि ही केवढी लज्जा व बेषरमपणाची गोष्ट आहे कीं येकस्याचे पदरी अजंवांत व नातें जडऊन खुषामतीनें काळ घालवावा. परंतु श्रीमंतांचें घरीं असे कितीक असतात. असे लोक जगांत नसतील. ते आपल्यास बेकिंमत करून दुसऱ्यास नासतांत. येकत्र कुटुंब राहाण्याची चाल फार आहे. परंतु ही चांगली नाहीं. येक मिळवितो आणि पन्नासजण त्याचे पदरी निरुद्योगी राहून खातात. या लोकांची निंदा कितीहि केली तरी ते पात्र आहेत. परंतु जर हें श्रीमंत लोक शाहणें होतील तर लोक आपले सुखास जो पैसा लागेल तितकाच खर्च करून बाकी कांहींतरी उपयोगास लावितील आणि आळशी रिकामें मूर्ख लोकांस पंक्तीस न बाळगतां त्यांस उद्योग करून पोट भरा असें सांगून हाकून देतील तर बरें होईल, तेव्हां हा देश सुधारेल आणि त्वरित लग्नाची चाल मोडली पाहिजे.

ज्ञान हें सर्व रोगाचें औषध आहे. आणि ज्यास ज्ञान आहे त्यांस आपली स्थिती सुधारण्यास पुष्कळ वाटा सापडतात. यास्तव जे गरीब लोकांची स्थिती चांगली व्हावी अशी इच्छा करितात त्याणीं गरीब लोकामध्ये ज्ञानप्रसृती करावी. व सर्कारचा हा मुख्य धर्म आहे. पोलिसाचे फार लोक ठेऊन अपराध कमी होत नाहीत. परंतु लोकांची सुधारणा केल्यानें कमी होतात. गरीबास ज्ञान नाहीं म्हणून असें वाटतें कीं श्रीमंताचे येथे चोरी जाहली तर म्हणतात कीं त्याजवळ पुष्कळ आहे. चोर किती नेईल. याचें कारण ते श्रीमंताचा हेवा करितात परंतु शहाणपण आल्यावर असें करणार नाहींत. सर्कारानें अपराधाचें मूळ तोडलें पाहिजे. कैदखाने व शिपाई मूळ तोडित नाहींत.

कोण म्हणतात कीं यंत्रें व युक्ती निघून लोक उपाशी मरातत. परंतु ही चूक आहे. यंत्रें व युक्ती निघाल्यानें इच्छा वाढते व खप अधीक होतो. आणि उद्योगाचा संक्षेप होऊन लोक दुसरे कामास लागतात. देशांत जितकें अन्न वगैरे लक्ष्मी आहे तितकें लोकांचें पोषण होतें. यंत्र व युक्ती निघाली तर त्या लक्ष्मीस क्षीण करीत नाहीं परंतु लोकांस मात्र सुखवृद्धी करिते. पाहा कीं छापण्याची विद्या कापुसाची वस्त्रे वगैरे करण्याची विद्या याणी काय अवस्था केली आहे. कांहीं वाईट केलें नाहीं. परंतु इच्छा वाढविली खप अधीक केला ज्ञानवृद्धी जाहली.

मजूरीचे दराचें आणखी येक कारण आहे कीं जोंपर्यंत मजूरदाराचें पोट भरेतोंपर्यंत त्याचा दर कमी होईल, त्याखाली होणार नाहीं. परंतु कांहीं देशांत गरीब लोक सुखांत आहेत व खाण्यापिण्याचे

हाल करीत नाहीत. परंतु हिंदुस्थानातील गरीब लोक फार वाईट झोपड्यांतून नुस्ती भाकर खाऊन राहतात. अशा स्थितींत राहिल्यामुळें त्यांची मजूरीही कमी आहे. विलायतेंत मजूरी कनिष्ठ पक्ष पंधरा रुपये महिनाभर माणसी पडतात आणि या देशात दोन रुपये महिना आहे. मजूरदार लोक बाहेरदेशी वगैरे जाऊं लागले म्हणजे त्यांस सुखाची गोडी लागते आणि ते लौकर लग्नें करीत नाहींत, कारण कीं त्यांस बाहेर जाण्याची वगैरे अडचण पडत नाहीं. परंतु इकडील मजूरदार लोक यांची वेतनें फार कमी याजमुळें त्यांस सुखाची गोडीं नाहीं व फक्त भाकरी खातात. जरा पाऊस कमी पडला तर लागलाच काळ पडतो. कारण कीं वेतनें कमी म्हणून पैसा नाहीं. यास्तव मजूरदारांची वेतनें मोटीं असावी म्हणजे जरी काळ पडला तरीं ते मोजीत नाहींत, निर्वाह करितात.

धारा व मजूरी सदरी लिहिली गेली. आतां नफा मात्र राहिला. नफा म्हणजे जो भांडवलाचा मालक असतो त्यास भांडवल व्यापारांत घालून तें परत येते समयीं अधीक होऊन येतें, त्या अधिकाचें नांव नफा. जसा व्यापार असेल तसा नफा अधीककमी होतो. दारूचा व्यापार आहे तर त्याजवर येक विस्तवाची फुणगी पडली तर हजारो बुडतात म्हणून त्या व्यापारांत भांडवलाचा नफा फार घेतात.

या प्रमाणें देशांतील लक्ष्मीचें तीन मार्गांचें निरूपण जाहलें. याजवरून वाचणाराचे लक्षांत देशाची व्यवस्था चांगली वाईट व उपाय काय योजावे हे समजण्यांत येतील. आणि या शास्त्राचें ज्ञान सर्वांस जरूर पाहिजे.

## लक्ष्मीज्ञानातील गोष्टी हिंदुस्थानास लाऊन पाहिल्या असतां काय वाटतें ?

पृथ्वीवर जे सुधारलेले व शाहणे देश आहेत त्यांचे बरोबरीस हा देश नाहीं व येथील लोक अनुपयोगी व अधीर फार आहेत व कितीयेक गैरसमजुतींनी त्यांस नाना प्रकारचे अटकाव पडून त्यांचे पाऊल पुढें पडत नाहीं.

मागील राज्यांत नीच जातीचे लोक सुखी होते असें नाहीं. त्याची स्थिती हल्ली पहिल्याप्रमाणेंच आहे. परंतु जे रोजगाराने पोट भरणारे आहेत व आळसांत राहून खाणारे यांची स्थिती सांप्रत बदलली आहे. कारण कीं शेतकीचा धंदा मागील राज्यासारिखाच दुःखदायक आहे. तत्रापि मागील राज्यांत आशा होती कीं दुसरा रोजगार करू आणि मिळतही होता. तें आतां नाहीं.

भांडवल होतें तेव्हां उद्योग केला नाहीं, भांडवल गेलें तेव्हां उद्योग सुचून उपयोग नाहीं.

सांप्रत जें भांडवल आहे तितकें विलायतेंत आहे, व हिंदू लोकांस शेतकीमात्र राहिली आहे. तत्रापि इंग्रज इकडेस शेत करण्यास येत नाहीं म्हणून बरें. नाहींतर तो रोजगार जाऊन शेतकीयाचे घरचे गड्याची कामें मात्र या लोकांस राहती. यास्तव सर्कारास योग्य आहे कीं दिवसेंदिवस या लोकांस जागा मोठ्या दिल्या पाहिजेत. तरच कांहीं भांडवल इकडे राहील.

आज श्रीमंत कितीयेक लोक आहेत त्याणी आपला व्यापार वाढीवला तर व विलायती यंत्रें व युक्ती इकडे आणल्या तर होईल. परंतु त्यांचे डोळे उघडून हें त्यांस सुचें तों ते दरिद्री होतील म्हणून त्यांची आशा नकोच.

श्रीमंत लोक हे साधारण हिंदू लोकांचा गुण अधैर्याचा आहे त्यांत श्रेष्ठ असतात आणि ते पैसा उपयोगी किंवा देशहिताचे व्यापारांत घालीत नाहीत. परंतु गहाण वगैरे व्याजबट्टा गांवांत होईल तितका मात्र करितात. हा स्वभाव अज्ञानमूलक आहे.

हिंदु लोक प्राचीनकाळीं विद्या व ज्ञानाचे धौकी होते. परंतु तो काळ गेल्याला ३००० वर्षें सुमारीं जाहली. या तीन हजार वर्षांत याणी कांहीं केलें नाहीं. विद्यावृद्धीचा भाग मूर्ख भट खाऊ

लागले. व इतर लोक अज्ञाणी राहिले. याजमुळें इतके वर्षांत त्यांची स्थिती सारखी राहिली आणि आतांचा चाली बदलल्याशिवाय ही स्थिती बदलेल अशी आशा नाहीं. भटानी विद्यावृद्धी व ज्ञानवृद्धीचें काम केलें पाहिजे. नाहींतर कांहीं दुसरा धंदा केला पाहिजे.

हिंदू लोकांचे शहर म्हणजे आळशी लोकांचा समुदाय असतो. त्याणी गरीब लोकांस मिळून अन्न घ्यावें आणि रिकामें बसून खावें. परंतु हीच शहरें जर उद्योगी लोकांची होतील तर लक्ष्मी वाढेल.

मागील राज्यांत गरीब लोकांचे स्थितीकडे कोणी पाहिले नाहीं. जबरदस्त लुटून खात असत. परंतु आतां सर्कारास योग्य आहे कीं गरीबाची स्थिती व जमीनीचें मालक सर्कार आहे तीची स्थिती सुधारली पाहिजे. याजकरितां तळीं, विहिरी, वगैरेसाठी कौल तगाई सर्कारानें अधीक दिल्ही पाहिजे.

हिंदूलोक अविचारी आहेत यांस विचार करण्याची व वाचण्याची गोडी नाहीं. हे लोक साधारण गोष्टी सांगत बसले तर कोणी म्हणतो कीं वांगी खाऊ नयेत कोणी म्हणतो शनिवारचा उपास केला तर मोठें फळ आहे. द्वैत अद्वैतवाद व बसावें कसें स्नान करावें कसें इत्यादि पोकळ वाद करितात. कोणी बायका मासपाळण कोणी तिथीपाळण करितात. परंतु विचार आणि राज्यकीय प्रकरणें कोणी बोलतदेखिल नाहीं व त्यांस कळतही नाहीं. यास्तव चांगल्या बुद्धी निरुपयोगी कामांत व्यर्थ खर्च होतात. म्हणून आजपर्यंत त्यांची मनें अज्ञानमार्गांत पडली आहेत, तीं फिरऊन ज्ञानाचे ओघात घातली पाहिजेत. म्हणजे अर्थातच शुष्क गोष्टी सोडून देतील व बायकांची स्थिती अवश्य सुधारली पाहिजे.

लोकांमध्यें ऐक्यता, खरेपणा विश्वास अधीक आला पाहिजे. सांप्रतची नीती ठीक नाहीं व भट कमी जाहले पाहिजेत. व दुसरें जे आळशी लोक आहेत त्याचे ओझे कमी जाहलें पाहिजे. आजपर्यंत मागील राज्यांत लक्षावधी अप्रयोजक व निरुपयोगी प्राणी असे हे भट जेवले. यांजपासून इतकेंच जाहलें कीं गरीबांची दुर्दशा जाहली आणि जी लोकांची लक्ष्मी त्यांचे जवळ राहावी किंवा ज्ञानवृद्धीकडे लावावी ती नदीत पडली असें जाहलें. भटानी खाऊन कांहीं सार्थक केलें नाहीं. कोणतीही विद्या व विचार केला नाहीं. याजकरितां हे लोक ताळ्यावर आणले म्हणजे त्यांस त्यांचें कर्तव्य समजेल.

हिंदुस्थानासारिखा देश उत्पत्तीस कोठे नाहीं व येथील लोक स्वभावें करून बुद्धिवान आहेत. परंतु त्यांस अटकाव फार आहेत. सबब येथील लोकांसारखे मूर्खही थोडेच ठिकाणी आहेत. असे हे लोक आहेत तोंपर्यंत यास परतंत्र राहिलें पाहिजे. मुसलमान जाहलें इंग्रज आले. इंग्रज गेले तर दुसरे कोणी येतील. परंतु या लोकांस आज कांहीं सामर्थ्य स्वतंत्र भोगण्याचें नाहीं. जसा अर्धांगवायू जाहलेला मनुष्य उठत नाहीं त्यास हाती धरणारा पाहिजे. जर येक गेला तर दुसरा पाहिजे. परंतु येक गेला तर त्याचा वायू गेला असें होत नाहीं. ज्या काळीं वायू जाईल तेव्हा त्यास कोणी नको.

कोणी म्हणतील कीं आजपर्यंत अम्ही सुखाचे होतो. आतां इंग्रज आले म्हणून भिकारी जाहलो. तर आजपर्यंत सुख होते तें सुख नव्हें परिणामी तें विष जाहलें. तुम्ही ज्यास सुख म्हणता त्यास अम्ही सुख म्हणत नाहीं परंतु मूर्खपणा म्हणतो. तुम्ही आजपर्यंत सुखांत खाण्यापिण्याच्या होतेत, परंतु शाहाणपण मिळविलें नाहीं. म्हणून त्या सुखानें तुम्हांस इतकें मूर्ख केलें कीं कांहींयेक शुद्धी नाहीशी जाहली. जसें रोगाच्या उद्‌भवाच्या प्राक् कुपथ्यें करून सुख होतें परंतु तें नाशाचें कारण. तसें तुम्ही शेवटी मूर्ख जाहलेत कीं तुम्हास कोणीही यावें आणि जिंकावे. त्यांत कांहीं अवघड नाहीं असें जाहलें, तुम्ही लाख येकीकडे आणि परकी पांचहजार येकीकडे तरी तुमची दुर्दशा व्हावी अशा स्थितीप्रत पोचविणारे सुखास सुख म्हणू नये.

विद्या व ज्ञान याशिवाय दुसरे औषध या लोकांस मानावर आणण्यास नाहीं. यास्तव सारांश हाच कीं यामध्ये ज्ञान वाढून शाहणे होतील तो प्रयत्न करण्याचा ज्यांस हे मूर्ख आहेत असें वाटतें त्या सर्वांचा धर्म आहे.

हिंदुस्थानांत पूर्वीपेक्षां आतां लोक अधीक वाढू लागले कारण कीं लढाया दंगे वगैरे कमी आहेत. परंतु लग्न करण्याची व्यवस्था नाहीं. भिकारी लग्नें करितात आणि म्हणतात, कीं अह्मी कुटुंबवत्सल आहों. ह्या मूर्खपणा मोडला असतां दरिद्र अर्थांत कमी होईल.

सर्व देशांत असें आहे कीं श्रीमंतांस मुलें फार होतात व गरीबास कमी मुलें होतात व मरतात फार. परंतु येथे उलटें आहे. याचें कारण येथील श्रीमंत नीतिभ्रष्ट असतात.

श्रीमंतांनी द्रव्य खर्च करून मोटाली कामें पतकरून लोकांस मार्ग दाखविले पाहिजेत किंवा सर्कारानें तरी दाखविले पाहिजेत.

बहुत देशांत असे लोक जाहले आहेत कीं त्याणी लोकांचे कल्याणार्थ प्राण अर्पण केले. त्याची नांवे मार्टरस् इंग्रजीत, पारसीत शिया म्हणतात. तसे लोक हिंदुस्थानांत जाहल्याच्या गोष्टी कदाचित पुराणांत आहेत, परंतु अलीकडे कोणी नाही.

आणखी हिंदू लोकांनी मागील ग्रंथ लिहिले ते देव होते ही समजूत सोडली पाहिजे, याजमुळें त्यांस फार भावारेपणा आला आहे.

लक्ष्मीचा उपयोग संयुक्त जाहला पाहिजे. याजकरितां फार कलाबतूची पांघुरणें व अत्तरें वगैरे निरुपयोगी पण बहुत किमतीचे पदार्थ याचा खप थोडा होई आणि उपयोगी पदार्थ फार व्हावे याजवर राजानें लक्ष ठेवावें. बहुधा श्रीमंत लोक लक्ष्मीचा उपयोग वाईट कामाकडे करितात. याजकरितां लोक सुख पावत नाहींत. बाजीरायानें बहूत पैसा व्यर्थ खर्च केला. यामुळें लोक भ्रष्ट जाहले व नीतीन्याय इत्यादि चांगलेपणाचा नाश जाहला.

कोणी म्हणतील कीं विद्या करणें ही श्रीमंतीच आहे. कारण कीं पैसा खर्च केल्याशिवाय विद्या होत नाहीं. सर्वांस विद्या करणें शक्य नाहीं याजकरितां जे श्रीमंत असतात तेच मात्र पैका खर्च करून विद्या शिखतात. ही गोष्ट खरी आहे. परंतु विद्येकडे खर्च होईल तो उपयोगी कामाकडे खर्च जाहला असें समजावें. तेणेंकरून लक्ष्मी व वास्तविक सुख अधीक होईल. याजकरितां जे श्रीमंत व ज्यांस अनुकूळ असेल त्याणी विद्या शिखावी व लोकांस पढवावी याज येवढा धर्म नाहीं. याजकरितां विद्यावृद्धीस लक्ष्मी पाहिजे.

लोकांच्या स्थिती वरचेवर बदलतात. बहुधा देशांतराचे इतिहासावरून पाहण्यांत आलें आहे कीं प्रथम लोक रानटी असतात. त्याजमध्यें कांहीं विशेष ज्ञान व बंदोबस्त नसतो. परंतु भोळसरपणा व प्रामाणिकपणा असतो. त्यांस विलास ठाऊक नसतात व लक्ष्मी खर्च करून निरुपयोगी पदार्थांवर प्रीती नसते असे असतात. परंतु नंतर अशा लोकांस द्रव्य किंवा शक्ती जर प्राप्त होईल तर त्यांस ओझें पडलेसें होतें, कारण कीं त्यांस माहिती नसल्यें. परंतु असें असतां असतां ते सुखाची ओळख पडतांच मनस्वीं सुखास लुब्ध होतात आणि पहिला आपला सरळपणा वगैरे रानटी अवस्थेमध्यें जे गुण दर्शविले असतात ते सोडून भ्रष्ट, मारामारी करणारे व अन्याय करणारे होतात. त्यांचे चित विद्येवरून निघतें व निर्बळ व रोगी, असंपत्तीवान, असंततीवान, निःशौर्य, निस्तेज, होतात कलहास प्रवर्तक धैर्यभग्न होतात. ही लक्षणें लोकांचें राज्य बुडण्याची आहेत व असे लोक जाहले म्हणजे त्यांजवर कोणीतरी येऊन पडून या बेवारशी लोकांवर सत्ता चालवितो.

याप्रमाणें रूमचे लोक, ग्रीक देशाचे लोक व हिंदुस्थानचे लोक आहेत व त्यांची अशी दशा जाहली. व कितीयेक देशचे मध्यावस्थेंत कितीयेक देशचे प्रथमावस्थेंत व कितीयेक देशाचे उत्तमावस्थेंत आहेत. मराठे लोक नीचावस्थेंत आहेत. प्रथम हे लोक सरळ भले प्रामाणीक असे होते. पुढें त्यांस सुखानुभव जाहला, परंतु त्याजमुळें ते इतकें माजले कीं त्याणी सर्व भान सोडलें व बाजिरावाचे वेळेस तर मराठे लोक भ्रष्ट होऊन गेले. म्हणून लागलेंच राज्य बुडालें. तसेंच शिक लोक आलीकडे

असेच जाहले म्हणून बुडाले. याप्रमाणें सर्वांची अवस्था आहे. इंग्रज लोक अजून मध्यावस्थेंत आहेत, परंतु त्याणी अत्यावस्थेंत यावें म्हणून फार यत्न केला आहे व ज्ञानास प्रमुख ठेवले आहेत. असी सावधगिरी ठेविली तर बुडावयास उशीर लागेल यांत संशय नाहीं.

मुख्य आमचे लोकांस विचार करता येत नाहीं व देशांतील रीतिस्थिती कांहीं पाहात नाहींत. सर्व आपुल्पोटे आहेत. विलायतेंतून इकडे माल विकावयास येतो किती व इकडून जातो कीति हें पाहावे, व अणखी जाईल व तिकडचा कमी होईल असें करावें. या देशांत पैसा राखण्याकरितां लायखी संपादन केली पाहिजे. नंतर ते न देतील असें नाहीं. उद्योग करावा म्हणजे सर्व प्राप्त होईल. परंतु जर जेवणाऱ्या गोष्टी सर्वांनीं सर्व काळ सांगितल्या तर कोणचे रीतीनें हे मोठाले विचार घडून येतील हें लक्षांत आणावें. उद्योग व शाहाणपणा याचा लोप जाहला म्हणजे तीच अवदशा व त्याची वृद्धी जाहली म्हणजे तीच लक्ष्मी.

हिंदू लोक मुख्यत्वेंकरून मराठे लोक यांची सांप्रत अवस्था आहे त्याहून चांगली स्थिती होण्यास याणी शोध बहुत केले पाहिजेत व विद्या वाढिवली पाहिजे व इल्लीच्या रीती व समजुती सोडल्या पाहिजेत. जोपर्यंत या कायम आहेत तोंपर्यंत बरें होण्याचें चिन्ह नाहीं. जसें रोगी पथ्य करीत नाहीं तोंपर्यंत रोग जाणार नाहीं तद्वत या देशचे लोकांची अवस्था आहे. सर्वांस लक्ष्मी पाहिजे, परंतु तिला प्राप्त करण्याचे मार्ग थोडे लोकांस ठाऊक असतात. उद्योग, विद्या, सुनीती हे लक्ष्मीस आणणारे आहेत म्हणून यांची वृद्धी होईल ते यत्न करावे. खरेपणा वाढला पाहिजे, बुद्धी सुधारली पाहिजे, भाषा सुधारली पाहिजे. ही जितकी व्यंगें आहेत तितकीं नीट ज्या काळीं होतील त्या काळीं हे लोक लक्ष्मीवान होतील.

लक्ष्मीज्ञान आम्ही मुळापासून संक्षेपाने निवेदन केलें हें आपले देशाची मिळऊन पाहिलें म्हणजे दुर्दशेचें कारण व त्याचे उपाय समजतील, व आम्ही लिहिण्याचे तितकें पराकाष्ठा करून लिहिलें आहे. बाकी जें करणें तें या पुस्तकाचे वाचणारे असतील त्याणी करावें. किती एक वाचणारे असे असतील कीं त्यांस यातील विषय कांहीं समजणार नाहींत. परंतु त्याणी अवघड पुस्तक आहे असें म्हणून टाकू नये श्रम करून बुद्धी मोठी करून सर्व समजेल व त्यांतील सर्व तर्क समजतील असें करावें म्हणजे आमचे श्रमाचें सार्थक आहे.

समाप्त

दक्षणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी

मुंबई

# देशव्यवहारव्यवस्था

## या शास्त्राचीं मूलतत्त्वें.

मिस्रेस मार्सेट ह्मणून एक ग्रंथकर्त्री झाली, तिच्या ग्रंथाचें कोठे भाषांतर
कोठे भावार्थ असी योजना करुन तसेंच, मेस्तर जान् स्टुअर्ट मिल,
ह्मणून, जो या शास्त्रावर उत्कृष्ट अर्वाचीन ग्रंथकर्ता झाला, त्याचे
पद्धतीस बहुत्येक प्रकरणीं अनुसरुन,

**हा संवादरूप ग्रंथ**

**महाराष्ट्र भाषेंत,**

**अजम हेन्‌रि ग्रीन् एस्‌कायर पुणें एथील मुख्यशाळेचे**

**प्रोफेसर**

यांच्या सूचनपूर्वक

**हरि केशवजी सोमवंशी क्षत्रीपाठारे सदर अदालतीचे त्रांसलेटर**

**यांच्या हातून आरंभून**

**विश्वनाथ नारायण मंडलिक एल्‌फिन्‌स्टन् इन्स्टीटयुशनामधील**

पहिल्या प्रतीचे विद्यार्थी यांजकडून सिद्धीस जाऊन

**दक्षिणी भाषेंत पुस्तकें**

**प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आश्रयानें**

**मुंबईंत**

आपारामजी याने गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिला असे

इसवी सन १८५४

# देशव्यवहारव्यवस्था

## प्रस्तावना

### देशव्यवहारव्यवस्थाप्रारंभ.

गोपाळ या नामेंकरून कोणीएक स्वदेशहिताची इच्छा धरुन गुरुस नम्रतेने पुसतो. महाराज, सांप्रत कित्येक देश संपत्तिमान् होऊन नांदत आहेत, तसा हा देश भरतखंड आपली जन्मभूमि सुखानें नांदण्याविषयीं काय उपाय करावा. त्याजवरून गुरु बोलतात, देश सुखानें नांदू लागणें यास संपत्ति कारण होय. म्हणून संपत्तिविषयक जें शास्त्र, ज्यास देशव्यवहारव्यवस्था म्हणतात, तें पढावें म्हणजे देश संपत्तिमान् होण्याचें साधन काय तें समजूं लागेल. अरे, ईश्वराने ही सृष्टी केली आहे, एथें मनुष्यासारिखा बुध्यादिकेंकरून थोर प्राणी दुसरा कोणी नाहीं. याजवर उदार प्रभूने असी कृपा केली आहे कीं याने चांगला झटून उद्योग करीत जावा म्हणजे फलप्राप्तीविषयीं संशय नाहीं. जसा उद्योग व्हायाचा तसा झाला असतां दरिद्राचें राज्य कोठें राहील? गोपाळ बोलतो. दरिद्र म्हटलें असतां ती अमूर्त वस्तू असें असून जर दरिद्र राज्य करीत असलें तर मग ऐश्वर्यानें कां राज्य करूं नये. बरें हीं जर राज्यें करीत असलीं, तर कोठे करीत असतील, यांचे प्रधानादिक कोण कोण इतकें थोडक्यांतच सांगावें.

गुरु सांगतात, तुझ्या प्रश्नाचें उत्तर सांगणें हें जसें काय देशव्यवहारव्यवस्था शास्त्राचें सामान्यतः स्वरूप कथन करणें असें आहे. अरे दरिद्र व ऐश्वर्य यांच्या लढाया, जय, पराजय इत्यादि कोणा एका गृहस्थाच्याच घरीं होत आहेत असें नाहीं, तर हीं खटलीं गांवो गावीं, देशो देशीं चाललीं आहेत. पूर्वी आपल्या भरतखंडांत ऐश्वर्याचें राज्य चाललें होतें, त्याकाळीं या देशाची चढती कळा होती. अलिकडे दरिद्र नांदूं लागल्यामुळें याची उतरती कळा पाहून तुझ्यासारिखे स्वदेशहितेच्छू फार खिन्न होतात, असो. या एकएका राजाचे पदरी पांच पांच प्रधान, एकएका प्रधानाचे तंत्रानें वागणारे पांच पांच सरदार, आणि प्रधान आणि सरदार यांच्या कृतीने झालेले चित्रविचित्र आकारते शिपाई समजावे. ऐश्वर्याचे प्रधान सांगतों.—

१ सुदेश, २ ज्ञान, ३ व्यवस्था, ४ सत्य, ५ व्यापार. १ सुदेशाखालीं. १ चांगलीं बंदरें इत्यादि. २ सुपीक भूमी. ३ धातु इत्यादि. ४ उत्तम वृक्षादि. ५ उपयोगी पश्वादि. २ ज्ञानाखालीं. १ शिल्प. २ व्यवहारोपयोगी विद्या, ३ भूगोल खगोल विद्या. ४ सिद्धपदार्थविज्ञान, ५ नौका गमनविद्या ३ व्यवस्थारूप प्रधानाखालीं राहणारे, १ मालाचें रक्षण, २ प्रजापालन. ३ नीति. ४ उद्योग, ५ विद्याव्यासंग. ४ सत्याखालीं. १ प्रामाणिकपणा. २ ईश्वरभीति. ३ भूतदया. ४ उत्तम आचरण. ५ मितव्यय. ५ व्यापाराखालीं, १ स्वदेश परदेश ज्ञान. २ अनेक भाषाज्ञान. ३ लोकव्यवहार ज्ञान. ४ उलीढाली करण्याचा स्वभाव. ५ लक्षपूर्वक अवलोकन असे २५ सरदार समजावे. आतां दरिद्राचे प्रधानादिक ऐक. १ कुदेश. २ अज्ञान, ३ अव्यवस्था, ४ असत्य, ५ अव्यापार. १ कुदेशाखालीं.

१ गैर्सोयची बंदरे इत्यादि. २ खरतड जमीन. ३ मृत्तिका पाषाण. ४ निरोपयोगी झाडें, ५ उपयोगी पश्वादिकांचा अभाव. २ अज्ञाना खालीं, १ शिल्पादिकांची अवगणना. २ शब्दपांडित्य. ३ नाच तमाशाची भरभर, ४ भविष्य सांगणारी फल ज्योतिषादिक. ५ कल्पित विधीनिषेध. ३ अन्यवस्था. १ परद्रव्य हरण. २ प्रजा पीडन. ३ अनीति. ४ आळस, ५ ख्याली खुशालीची हौस. ४ असत्याखालीं, १ वंचना, २ पिशाच भक्ति, ३ द्रोह, ४ कुकर्म, ५ उथळेपणा. ५ अन्यापाराखालीं, १ परदेश द्वेष, २ परगुण निंदा. ३ कपट, ४ कुयुक्तिव्यवहार. ५ दुर्व्यसन-प्रीती. असे २५ सरदार असतात. सैन्याविषयीं तर पूर्वीच सांगितले आहे. हे राजे आपआपली फौज घेऊन एकजण सुधारणूक आणि संपत्ति म्हणून ज्या दोघी बहिणी असून राजकन्या त्यांचा बचाव करितो, आणि एकजण त्यां कन्याचा मोड करूं पाहतो.

**गोपाळ**—एका राजाच्या समयीं लोकांत एकी स्नेहभाव, स्वदेशाभिमान, कला, विद्या, व्यापार, अशीं प्रवृत्त होत असतील, आणि एकाच्या समयीं सद्गुणांचा ऱ्हास होऊन विद्यादिकांची अनास्था, विषयभोग, असत्य, ज्ञातिवैषम्य, परस्पर द्रोह हीं सर्वत्र प्रगट होत असतील. बरें त्यां दोन्ही राजांचें समान बल असतां, तशांत या भरतखंडा सारिखा देश जेथें भूम्यादिक नदी समुद्रादिक हीं कृषि शिल्प व्यापारादिकांस केवळ अनकूल. व सांप्रतकाळींचे राज्यकर्त्ते तर सुधारणुकीचे मोठे साह्यकर्त्ते असें असतां दरिद्रास राज्य करायास कसें साधलें.

**गुरु**—ज्ञान, व्यवस्था, सत्य असे जे ऐश्वर्यांचे प्रधान त्यानी एकनिष्ठेने आपल्या स्वामीची सेवा करणें सोडून दिलें, अशा संधीस अज्ञानादि जे दरिद्राचे प्रधान त्यांचें साधलें; अर्थात ऐश्वर्यांचा पराभव झाल्यासारिखें झालें. असो पण जरी ऐश्वर्य पराजित राजासारिखें दोन दिवस लपून राहिलें होतें, तरी त्यानें आतां स्वराज्य घेण्याविषयीं कंबर बांधिली आहे, आणि जे जे प्रधान व जे जे शिल्पादिक सरदार फितले होते तेही अनुकूल होऊं लागले आहेत, याच संधीस देशव्यवहारव्यवस्यासूचक असा त्वां प्रश्न केला. त्यास कृषि शिल्प व्यापार इत्यादिकांचा आश्रय करून देशव्यवहार-व्यवस्था शास्त्रांतील युक्ति घेऊन दरिद्राचा उच्छेद करावा, म्हणजे ऐश्वर्य संपत्तिसहित या देशीं चिरकाळ नांदूं लागेल.

# अनुक्रमणिका

ग्रंथाचे शेवटीं शुद्धिपत्र आहे, त्यांत ही जरी ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, कामा. सिमिकोल्न इत्यादि सर्व अशुद्धें दाखविलीं नसलीं तरी तिकडे लक्ष न देतां ग्रंथ तात्पर्यानेंच सज्जन संतोषतील.

## पूर्वभाग


पृष्ठ

१ **संवाद १ उपोद्घात**—पृष्ठ ४ देशव्यवहारव्यवस्था अगदींच माहीत नसली तर धोरण न राहतां हानी होईल—६ देशव्यवहारव्यवस्थेचीं मूलतत्त्वें माहीत असलीं तर लाभ होतील.—९ ही विद्या शिकणारास अवघड दिसती पण सोपी आहे.

१४ **संवाद २ संपत्तीचें लक्षण**—१४ देशव्यवहारव्यवस्थेचें लक्षण—१५ लोक चांगले रूपास कसे येऊं लागले व व्यवहार कसे करूं लागले तो प्रकार—१७ देशव्यवहारव्यवस्थेचा नीतीसी संबंध—२० संपत्तीचें लक्षणें.

२६ **संवाद ३ संपत्तीचीं मुख्य कारणें**—२६ संपत्तीचे उत्पत्तीचीं मुख्यकारणें—३० उपकारणें—३१ अनुभवसहीत ज्ञान इत्यादिकांची आवश्यकता—३३ मालाचें रक्षण, व मालाविषयीं कायदा—४३ अनुभवसहित ज्ञान, लक्षपूर्वक अवलोकन यांविषयीं मेंढर पाळून पोट भरणाऱ्या लोकांनी देशरचना केली तो प्रकार उदाहरणार्थ सांगितला—४४ शेतकीची चाल व धान्याची लागवड—४७ उलींढालीं, शाहणपण, सचोटी यांविषयीं उदाहरणें.

५० **संवाद ४ मालाचें रक्षण**—५०. मालाचे रक्षण झालें नाहीं तर कसें होतें. याप्रकरणीं वोल्नी साहेबानें देश फिरुन आल्याचें वर्तमान दृष्टांताविषयीं घेतलें आहे.—५३ अमुक माल अमुक्याचा असा कायदा होऊन मालाचें रक्षण झालें असतां काय लाभ होतात.—५७ या देशीं कुणब्याची जमीनीवर सत्ता किती व सरकाराची किती—५७ जमाबंदी.

५९ **संवाद ५ उद्योगाची वांटणी** ५९ मालास माल देण्याचा व्यवहार कसा चालू झाला—६१ उद्योगाची वांटणी कसी होऊं लागली—६१ या प्रकरणी आडमस्मिथ् साहेबाचा अभिप्राय—६२ यंत्रसाहित्यापासून कसे काय लाभ होतात ७३ उद्योगाचे वांटणीमुळें लोकांचें आचरण, व बुद्धि सुधारतात—७५ सर्वांची एकुणांत.

७६ **संवाद ६ भांडवल**—७७ मातबर व गरीब, कसा होतो, संपत्तिसंचय कसा होतो.—७७ संपत्तीची वहिवाट कसी होती—७८ संपत्तीविषयीं गरीबलोक मेहनत करितात.—७९ मांडवलाचा धनी अथवा पुंजीदार व मजूर यांत कामाविषयीं कसा करार ठरतो ७९ गरिबाला चाकरीस ठेवणें मातबरास कसें अगत्य आहे—८० भांडवलाचें अथवा पुंजीचें लक्षण.—८० पुंजीपासून उत्पन्न कसें होतें—८० मजुरांस चाकरी ठेविल्याने काय नफा होतो—८३ उपज करणारे मजूर—८३ पुंजीदार मनुष्य फार्चे सुखी असतात—८३ पुंजीच्या माना प्रमाणें उद्योगाची मर्यादा—८५ पुंजी वाढती त्या प्रमाणें उद्योग वाढतो—

पृष्ठ
८५ उत्पन्नांतून रक्षण करून पुंजीत घातल्याने पुंजी वाढती — ८७ संपत्ति क्रमेकरून मेळविल्यानें जसें सुख होतें तसें संपत्ति आपल्या संग्रहीं ठेविल्याने कां होत नाहीं.
८८ संवाद ७ भांडवल — ८९ स्थिर भांडवल अथवा पुंजी — ९० स्थिर पुंजी आणि फिरती पुंजी निराळ्या होण्याचें कारण — ९० पुंजीचे वेगळाले प्रकार — ९० गुलाम. ९२ स्थिर पुंजी आणि फिरती पुंजी ह्या मजूर लोकांस एकसारिख्या हितकारक कशा होतात — ९६ यंत्रसाहित्यापासून जे लाभ होतात त्यांविषयीं म्याकूफर्सन् साहेबाचा अभिप्राय — ९८ से साहेबाचा देशव्यवहारव्यवस्थेवर ग्रंथ त्यांतील प्रकरण.

## उत्तरभाग

१०० संवाद ८ रोजमुरा व लोकसंख्या. १०१ रोजमुऱ्याचें सर्वांहून मोठें मान — १०३ लोकसंख्येपेक्षां भांडवल कोठे कमी असतें, कोठे अधिक असतें त्याप्रमाणे रोजमुऱ्याचें मान असतें — १०४ थोडकी पुंजी असली ह्मणजे मजुरीचें थोडकें अगत्य असतें, रोजमुरा कमी होतो आणि पुंजीदारांचा मोठा फायदा होतो — १०५ पुंजी वाढली ह्मणजे मजुरीचें अगत्य अधिक होतें, रोजमुरा वाढतो व पुंजीदारास कमी फायदा होतो — १०६ दुसऱ्या कामाच्या अगोदर अन्नवस्त्रादिक पोटगी संग्रहीं करून ठेवणें अगत्य आहे — १०७ पुंजी न वाढतां लोकसंख्या वाढली असतां रोजमुरा कमी होतो — १०७ अन्नादिकांचें दुर्भिक्ष्य झालें असतां रोजमुऱ्यास कसें काय होतें — ११० अन्नादिकांची अत्यंत मोठी किंमत ती कसी — ११० रोगामुळें लोकांची कमती झाली असतां रोजमुऱ्याचे दरास कसें काय होतें — १११ कामकरी लोकांस कामावर ठेवणे हे पुंजीच्या आधीन असतें, जें काम करावयाचें त्या आधीन असत नाहीं — ११२ ऐर्लंड देशीं रोजमुऱ्याचा दर कसा असतो — ११२ शहर व गांवढीं गांवें एथील रोजमुरा — ११६ अद्रव्यमय पुंजी.
११६ संवाद ९ रोजमुरा आणि लोकसंख्या — ११७ भांडवल मोठें असलें ह्मणजे रोजमुरा नेहमी मोठा असत नाहीं — ११७ चीन देशीं भांडवल मोठें असून रोजमुरा ल्हान असतो — ११७ अमेरीकेंत भांडवल ल्हान असून रोजमुरा मोठा असतो — ११८ नवीन वसाहतीचे मुलखास फायदे होत आहेत. १२० लोकसंख्येचे वृद्धीस दरिद्र हा एक स्वाभाविक प्रतिबंध आहे — १२२ संमृद्धि असून लोकसंख्या मोठी झाली तर मात्र हितावह होय — १२७ कोणते एक भांडवल असेंचें तसेंच असणें त्यापेक्षां तें संपत्ति वाढती राही असें ठेवणें बरें आहे. — १२४ लोकसंख्येचे वृद्धीस उत्तेजन देणें ही चुकी आहे — उद्योग — खंडकाम इत्यादि.
१२८ संवाद १० मजुरांची स्थिती — १२९ गोपचारांची व ओसाड जमीनीची लागवड करणें — १३० परमुलखीं वसाहत करायास जाणें — १३२ कनिष्ठ स्थितीचे लोकांस विद्या शिकविणें — १३४ उपयोगी मंडळ्या जमणें — १३५ ऐवज सांचऊन ठेवायाच्या पेढ्या मांडणें — १३६ गांवखात्यांतील ऐवजाने गरिबांचें साह्य करणें — १३९ भीक घालणें व गृहस्थांकडून धर्मादाय — १४१ बक्षीस देणें इत्यादि.

पृष्ठ


१४३ **संवाद ११ मोल, किंमत, खप, भरती,** — १४३ मालाचें मोल — १४४ मोल हा सांबंधिक शब्द — १४४ किंमत, मोबदला मोल, उपयोगरूप मोल — १४६ मालाचें आंगमोल — १४६ भरती व खप यांचा पदार्थांच्या मोलावर परिणाम — १४६ वस्तूचा उपयोग व ती सिद्ध करण्याचे श्रम हीं मोलाचीं दोन कारणें — १४७ सर्व वस्तूंचे तीन वर्ग कल्पिले, नियमित प्रमाणानें होणाऱ्या ज्या वस्तू तो पहिला वर्ग, त्यांच्या मोलाविषयीं नियम — १४८ भरती व खप यांचे समीकरण — १४८ आंगमोल न वाढवितां जे पदार्थ पाहिजेत तितके उत्पन्न करितां येतात, त्यांच्या मोलाचा नियम — १४९ आंगमोल वाढवून पाहिजे तितके उत्पन्न करितां येतात ते जिन्नस, त्यांच्या मोलाचा नियम — १५० निकृष्टरितीनें तो जिन्नस उत्पन्न करायास जें मोल लागतें तें — १५० माळ्याचा मोलाशीं संबंध.

१५१ **संवाद १२ उत्पन्न** — १५१ भांडवलाची योजणूक करण्याच्या अनेक रिति — १५१ त्यांतून चांगली लाभकारक रीती कोणती त्याचा विचार — १५५ देशांचे स्थितीं प्रमाणें भांडवलाची योजणूक करण्याच्या निरनिराळ्या रीति — १५७ व्यवहारांत पुंजीची योजणूक करण्याचा प्रकार — १५९ समसमान नफा होऊं लागला म्हणजे समजावें कीं लोकांत पुंजीची वाटणी बरोबर होत आहे. — १०६ देशाचे स्वाभाविक स्थितीस अनुसरून पुंजीची व्यवहारांत वाटणी होत असतां कसें काय होतें — १६१ कृषि, व शिल्प, व व्यापार यांजपासून समसमान नफा होतो — १६१ कृष्यादि व्यापारांत समसमान प्राप्ति होत नाहीं असें दृष्टीस पडतें त्याचें कारण.

१६४ **संवाद १३ धारा व भाडें** — १६५ कृषिकर्मापासून जें उत्पन्न होतें, त्याची मोठी किंमत झाल्यामुळें लोक जमिनीचा धारा घेऊं लागले — १६६ धाऱ्यामुळें जमीनीचे उत्पन्नाची किंमत वाढली नाहीं — १६८ जमीनीचा सुपीकपणा — १७१ जमिनीच्या नाना प्रती — १७२ त्यांची लागवड करायास त्यांची सोई गैरसोईमुळें अधिक उणा खर्च लागणे इत्यादि कारणावरून धारा घेण्याची चाल चालू झाली — १८६ धारा घेण्याचें उत्पत्तिकारण — १८७ धारा वाढतो कसा आणि उतरतो कसा तो प्रकार — १८८ कच्चा जिन्नस उत्पन्न होतो, त्याचे कमी अधिक भरती प्रमाणें त्याची किंमत अधिक उणी होती.

१८९ **संवाद १४ स्थावर मालाचें उत्पन्न** — १८९ पुंजीचे दोन प्रकार — १८९ उत्पन्नाचे दोन प्रकार — १९१ शेतकऱ्यास पुंजीवर नफा होतो तो — १९२ जमीनीचे कौल करार — १९४ धातूंच्या खाणी खणण्याचा उद्योग — १९६ मासे मारण्याचा उद्योग.

१९७ **संवाद १५ सारा आणि व्याजबट्टा** — १९७ पुंजीची स्वतां वहिवाट न करितां त्या पुंजीपासून जें उत्पन्न होतें त्याविषयीं — २०० साऱ्यानें अथवा माळ्यानें दिलेले जमीनीचें उत्पन्न — २०२ पैक्याचें व्याज, जमीनीचें भाडें व पैक्याचें उणें अधिक व्याज होण्याचें कारण — २०२ नाना देशींचे व्याजाचा दर — २०६ सरकारी नोटी — २०८ अलाभकारी मजूर म्हणजे दुसऱ्याचे उत्पन्नावर आपली उपजीविका करणारे लोक.

२११ **संवाद १६ पैका** — २११ विकत घेण्या देण्याचें पैका साधन आहे — २१३ नाणें पाडणें — २१३ पैका किंमत ठरविण्यास उपयोगी पडतो — २१४ मोलाचा निर्णय करण्यास पैका प्रमाण आहे — २१५ सोन्यारुप्याचें मोबदला मोल यांत उणें अधिक झालें असतां वस्तूंचे भावांत अंतर पडतें — २१६ दिसायाजोगा सवंगपणा आणि वास्तविक सवंगपणा — २१९ पैक्याचा भाव अधिक उणा झाला असतां कोण कोणास नुकसान होतें —

पृष्ठ
२२१ नाणें व्यापाराकरितां परमुलकीं पाठविणें — २२४ वेगळालें देशीं सोन्यारुप्याचें समसमान चलन.
२२४ **संवाद १७ पैका** — २२५ सोनें रुपें यांचा भाव उतरत आल्याचा प्रकार — २२६ नाण्यामध्यें हीण घातल्यानें त्याचें मोल कमी होतें — २२७ सरकारी व सावकारी पेढ्या — २२७ कागदाचा पैका — २३० कागदाच्या नाण्याबद्दल सरकाराने पाहिजे तेव्हां धातूरूप पैका न देण्यापासून होणारे परिणाम — २३० पैका व त्याचे साह्याने इतर वस्तूंचा होणारा जो फैलावा त्या उभयतांचा परस्पर संबंध.
२३१ **संवाद १८ व्यापार** — २३१ एकथोक व्यापार व फुटकळ व्यापार — २३२ व्यापारापासून होणारे लाभ — २३५ व्यापारेंकरून देश संपत्तिमान होतो — २३६ फुटकळ व्यापाराचा उपयोग — २३६ लहान पुंजीपासून मोठा नफा — २३७ शेतकी व कसबें करणारांस गिन्हाइकापासून लौकर ऐवज मिळाला असतां उपयोग होतो — २३८ रस्ते कालवे वगैरे यांपासून व्यापारास कसी सोय होती — २४० हिंदुस्थानांतील रुकी गांवी कालवा बांधितात तो प्रकार — २४३ स्वदेश, परदेश, बाह्यदेश व्यापार — २४३ स्वदेश व्यापार करणाऱ्यांचे हातीं लौकर ऐवज येतो.
२४४ **संवाद १९ परदेशव्यापार** — २४५ परदेश व्यापारापासून काय काय लाभ होतात — २४५ अधिक झालेले पुंजीची परदेश व्यापारांत कसी योजणूक होती व अधिक झालेला जिनस कसा वहिवाटला जातो — २४७ परदेशव्यापार करायास लोकांस उमेद यावी ह्मणून सरकारांतून काय माफी केली असती — २५१ परदेश व्यापाराची मनाई केली असतां कसें काय होतें.
२५४ **संवाद २० परदेशव्यापार** — २५४ धान्याचा व्यापार — २५५ मोठे पुंजीचे व मोठे वस्तीचे जे देश, ते परमुलकी धान्याच्या आशेवर राहिल्यामुळें होणारे परिणाम — २५६ धान्य कमीअधिक झाल्यामुळें महागाई सवंगाई — २५९ व्यापारास कांहीं अटकाव असावा — २५९ विचार न करितां एकाएकी नवीन उद्योग चालू केल्यापासून होणारे परिणाम — २६० व्यापारास मोकळीक असल्यामुळें होणारे लाभ.
२६१ **संवाद २१ परदेशव्यापार** — २६२ हुंड्यांचा प्रकार — २६३ समसमान व्यापार — २६४ हुंड्यांचे पाडांत चढ उतार — २६५ इकडून परमुलकांत, परमुलकी इकडे पाठविलेला माल कमी अधिक असल्यामुळें होणारे परिणाम — २६७ हुंड्यांचे पाडांत उगीच दिसायारिखा फेरफार होतो तो प्रकार — २६७ कोणी एके देशाचे नाण्याचा भाव उतरण्याचा प्रकार.
२६९ **संवाद २२ संपत्तिव्यय ह्मणजे खर्च** — २६९ उत्पन्नाची वहिवाट कसी होती — २७० लोक कसा खर्च करितात — २७१ पुंजीचा खर्च केल्यापासून कसेंकाय होतें — २७४ देशाची पुंजी वाढली असतां तेथील अवघ्यां लोकांचें हित कसें होतें — २७५ पुंजीचे वहिवाटीविषयीं सरकारने कांहीं कायदा केल्यास कसें काय होतें — २७५ ज्यांपासून अनेक सुखांचा उपभोग घडतो त्या पदार्थांकडे मनुष्याचा भर असावा किंवा कसें — २७६ त्या पदार्थांचा उपभोग उद्योग वाढविण्याविषयीं कसा कारण होतो — २७७ मजूर लोकांकडे संपत्तीची अकस्मात् वृद्धि झाली असतां तेणेकरून त्यांचा बिघाड कसा होतो — २७८ अतिशय ख्यालीखुशालीपासून काय अनहित होतें.

# पूर्वभागसंवाद १

## उपोद्घात.

यांत, देशव्यवहारव्यवस्था अगदीच माहीत नसली तर धोरण न राहतां हानी होईल. देशव्यवहारव्यवस्थेचीं मूलतत्त्वें जर माहीत असलीं तर लाभ होतील. ही विद्या शिकणारास अवघड दिसती पण सोपी आहे, इत्यादी सांगितलीं आहेत.

गुरु : आज सकाळीं त्वां जें प्रकरण काढिलें होतें, त्याविषयीं तुझें बोलणें वेगळें पडलें, आणि माझें बोलणें वेगळें पडलें. मला वाटतें त्या प्रकरणांत कांहीं चूक असावी.

गोपाळ : तर तें मी आपणास वाचून दाखवितों. कृष्णरावजी पाटण शहरास आले आणि पाहतात, तों तें शहर पूर्वी पाहिलें होतें तसें नाहीं, त्यावरून आश्चर्य करून माधवरावजीस बोलतात, असें या त्यांच्या ग्रंथांत* आहे, याच्या पुढेंच तें प्रकरण आहे तें हें असें, "अहो माझ्या मागें यास कांहीं विघ्न झालें काय? मी येथून गेलों तेव्हां जी संपत्ति होती ती दिसत नाहीं; रत्नें, सोनें, रुपें यांतून एक ही दिसत नाहीं. लोकांची वस्त्रें साधीं झालीं, घरें तरी ल्हान ल्हान व साधीं झालीं, कळा कौशल्यें मोडलीं आणि हें शहर ओस होऊन गेलें." माधवरावजीनें जरा हांसून पुसिलें कीं "या शहराबाहेर कसें काय झालें आहे तें आपण पाहिलें काय?" त्यावरून कृष्णरावजीनें उत्तर दिलें. "शहराबाहेर तर शेतकीच मोठा रोजगार झाला आहे, आणि एकही शेत पडीत राहिलें नाहीं." तेव्हां माधवरावजी बोलले कीं मी दोन शहरें सांगतों, एक असें कीं ज्या शहरांत संगमरवरी दगडांच्या हवेल्या आहेत व सोनें रुपेंही भरपूर आहे, पण बाहेर जमीन पडीत आहे. दुसरें शहर असें कीं, बाहेर फार चांगली लागवड झाली आहे, बागबगीचेही पुष्कळ आहेत पण शहरांत डौलदिमाख कोठें दिसत नाहीं, लोक साध्या रीतीनें वागतात. या दोन शहरांतून कोणतें शहर चांगलें, पहिलें किंवा दुसरें? मला असें वाटतें कीं ज्या शहरांत कारागीर कसबी फार असतात, ते ख्याली खुशालीचे जिंनस पुष्कळ उत्पन्न करितात, तेणेकरून लोक पोस्ती होतात; आणि ज्या शहराबाहेर लागवड होत नाहीं, जमीन पडीत राहिली आहे, तें शहर राक्षसासारिखें दिसतें, ज्याचें डोकें मनस्वी मोठें, शरीर रोडलेलें, शक्ति गेलेली, जो अगदीं कुरूप, त्या सारिखें समजावें. ज्या राज्यांत लोक पुष्कळ, व धान्य पुष्कळ, त्याच राज्याची शक्ति व संपत्ति खरी. असेंच विजयसिंगाच्या राज्यांत आतां आहे, याच्या या अवघ्या देशांत वस्ती पुष्कळ आहे आणि लोक एक सारिखी मेहेनत करून जमिनीची लागवड करितात; असें समजावें कीं हा अवघा देश एक मोठें शहर आणि पाटण हा मध्यभाग; मध्यभागीं लोक पुष्कळ झाले आणि प्रांतीं

* टेलि माकस ह्मणून इंग्रजींत एक ग्रंथ आहे त्यास कृष्णरावजीचा ग्रंथ असें एथें नाव ठेविलें आहे.

लागवड करायाची राहिली, तेव्हां पुष्कळ झालेले लोक शहरांतून काढून बाहेर प्रांती लागवड करावयास पाठविले आहेत."

कसें, पुढें चालवूं काय किंवा म्या वाचिलें तितकें पुरे ? माधवरावजींचें बोलणें खरें असी आपली खात्री झाली ना ?

गुरु : नाहीं, त्या बोलण्यांत काहीं काहीं खरें आहे पण शहराचा मोड होऊन, बाहेरचा प्रांत नांदूं लागतो, अथवा बाहेरच्या प्रांताचा मोड होऊन शहर नांदूं लागतें, असें जें, त्या बोलण्यांतून निघतें, तें अगदीं खोटें. असें आहे, शहर चांगलें नांदतें असतें त्यामुळें त्याच्या सभोंवते जमिनीची लागवड चांगली होती. मुंबई शहरालगत जमीनींत अलिकडेस बागबगीच्यांची कमती आहे काय ? चांगल्या नांदत्या देशीं तरी, मोठीं मोठीं मातबर, चांगलीं वसलेलीं अशां शहरांचीं कमती आहे काय ? बहुतकरून असें पाहण्यांत येतें कीं शहराचा मोड झाला ह्मणजे त्याच्या बाहेरचे जमिनीची चांगली लागवड होत नाहीं. ती जमीन जसी काय नापीक होऊन जाती. फिनीशिया ह्मणून जो एशिया खंडांतील देश, टायर ह्मणून ज्याच्या मुख्य शहराचें नाव, ज्याची पूर्वी चढती दशा असतां, जेथें बहुत मोठी किम्मत देणारा असा एक रंग पिके, सोने ही पुष्कळ असे, तेथले लोकांनीही शेतकी सोडून दिली नव्हती; ते लागवड चांगली करीत. पुष्कळ झालेली प्रजा दुसऱ्या मुलकीं पाठवीत, आणि तेथें नवी वसाहत करून त्यांचा सांभाळ करीत.

गोपाळ : ही तर मागील गोष्ट, अलीकडे तो देश कसा आहे.

गुरु : तो देश होता काय, आणि झाला आहे कसा, हें वर्तमान देशोदेशीं फिरणारा वोल्नी ह्मणून एक साहेब झाला, त्यानें सांगितलें आहे. तें वाचिलें असतां मनास द्रवच यावा असें आहे.

गोपाळ : जुलूम व राज्याची उलटापालट असें वारंवार होऊं लागलें; तशांत राज्यकर्ते चांगले नीट राज्य करीत नसले ह्मणजे त्या देशाची दुर्दशाच होती. असो पण राज्य सुरळीत चाललें आहे, शहरांत मेहनती लोक पुष्कळ झाले आहेत, आणि प्रांतीं तर जमिनीची लागवड करणें आहे, त्यास जसें विजयसिंगजीनें केलें, तसें त्या लोकांस शहरांतून काढून, प्रांतांत पाठऊं नये काय ?

गुरु : मला वाटतें पाठऊं नये; कारण बाहेर प्रांतीं त्या लोकांस काम मिळणार नाहीं.

गोपाळ : कां बरें मिळणार नाहीं ?

गुरु : लागवड करणारे जितके पाहिजेत, तितके त्या प्रांतींच असतात ह्मणून.

गोपाळ : जेथे बहुधा अवघा मुलूख चांगला लागवडीखालीं आला आहे, असे युरोप खंडाच्या इंग्लंडासारिखे जे देश, तेथें शहरांतील लोकांस प्रांतीं जमिनीची लागवड करण्याचें काम कदाचित् मिळणार नाहीं. पण जेथें पडीत जमीन पुष्कळ, त्या देशीं ही तसेंच होईल काय ?

गुरु : तसेंच होईलसें वाटतें.

गोपाळ : तर मग लागवड करायाजोगी जमीन ज्या मुलकांत आहे तेथे लागवड करायास पुष्कळ लोक गेले तरी, लागवडच होऊं नये असें होईल, हें तर मला नकळे.

गुरु : देशव्यवहारव्यवस्था ज्या शास्त्रांत सांगितली आहे, त्याचे मुख्य नियम समजून घेतल्यावांचून हें तुला समजणार नाहीं.

गोपाळ : पण तें शास्त्र मला मुळींच आवडत नाहीं.

गुरु : देशव्यवहारव्यवस्था सांगणारें शास्त्र असें कशास ह्मणतात हें तुला ठाऊक आहे काय ?

गोपाळ : आहे असें वाटतें. आमचेकडे त्या शास्त्राप्रकरणीं गोष्टी बोलतात; पण त्या मला गोड लागत नाहीं. मांडवी, जकात, सरकार देणीं, व्यापार, धर्मादाव, माल छपवून उतरविणें, नोटी (ह्मणजे पैक्याच्या बदल चालू केलेल्या चिटया) यांचा व्यवहार करणें, असल्याच गोष्टी त्या शास्त्रांत

सांगितल्या आहेत ना ? त्या मी ऐकूं लागलों ह्मणजे मला तर डुकल्या येऊं लागतात. थोडक्या दिवसांवर एका साहेबाने मला एक इंग्रेजीत ग्रंथ दाखवून सांगितलें कीं ही देशव्यवहाराची व्यवस्था, या प्रकरणीं आडम स्मिथ साहेबाने चांगले ग्रंथ केले आहेत; त्यांतून काहीं वाचून दाखविलें, तों दुसऱ्याच्या अगोदरच साटें मारून ठेवणें, जकात घेणें, सूट देणें निरख ठरविणें, असलेच शब्द कानीं पडूं लागले. त्यांत माझी तर काहीं समजूत पडेना, तेव्हां ती कथा कधीं आटपेल असें झालें. असी त्या शास्त्राविषयीं मला आवड नाहीं. ह्मणून शहर प्रांत यांजविषयीं जें आतां आपलें भाषण होत आहे, यांत तें शास्त्र येऊं लागलें तर मी आपला पक्ष सोडून देईन; त्याविषयीं मला न समजलें तर न समजो.

गुरु : देशव्यवहाराची व्यवस्था समजून न घेता, तूं समाधान मानितोस; देशांत संपत्ति उत्पन्न करावी कसी, त्या संपत्तीचा विनियोग करावा कसा, असा व्यवहार जें सांगतें त्या शास्त्राची गोष्ट निघाली असतां त्वां बोलूं नये. कारण तुला जें समजत नाहीं त्याविषयीं बोलून तरी फळ काय ?

गोपाळ : तर मग मी नाहीं बोलणार; इतकेंच मात्र व्हावें कीं त्या शास्त्राची गोष्ट माझे कानीं पडूं नये.

गुरु : नाहीं बोलणार असें ह्मणतोस, पण त्या महादु सारिखें होऊं नये. बोल ह्मणून काय पदार्थ आहे हें न समजतां तो बोलत असें. शेवटीं त्यास समजलें कीं बोल ह्मणून काहीं दुसरी वस्तु नाहीं. जें मी जन्मवर बोलत आलों तोच बोल. हें असें त्याचें अज्ञान पाहून तूं ही हांसलास. तसें तुला देशव्यवहाराची व्यवस्था न समजतां तूंही बोलत असतोस. परव्हां तूं दाण्या गल्याचे प्रकरणीं बेधडक बोलत होतास, पण त्या विषयीं तुला माहितगारीच नाहीं तेव्हां तुझें बोलणे ही तसेंच पडलें.

गोपाळ : च्यार शाहाण्या माणसांच्या तोंडीं जें ऐकिलें होतें, त्याशिवाय आणखीं मी कांहीं बोलिलों नाहीं. माझें बोलणें असें पडलें कीं, दाण्या गल्याचा व्यवहार करणारांस सरकाराने हुकूम करून अवघा दाणा बाजारांत आणवावा, ह्मणजे दाण्याची कमती पडणार नाहीं. दाणा बाहेर काढला नाहीं, ह्मणजे त्याची किंमत वाढेल असा त्यांचा मतलब असतो. पण दाणे तर अगोदर पाहिजेत, मग दुसऱ्या गोष्टी; नाहीं तर माणूस खाईल काय आणि वांचेल कसें ? ही असी, साधी, सर्वांच्या बऱ्याची गोष्ट बोलायास काय अवघड आहे; याला देशव्यवहाराची व्यवस्था हो कशास समजून घेतली पाहिजे ?

गुरु : गल्लयाविषयीं जरी बोलणें असलें, तरी या शास्त्राचें ज्ञान पाहिजे. या शास्त्राचे जे मोठे मोठे विषय त्यांतलाच धान्य हा एक विषय होय; कारण अन्नाचा सर्वांस उपयोग आहे. थोर बुद्धिमान लोक बहुधा या शास्त्राला धरूनच भाषण करितात. हें शास्त्र सोडून, बोलणें निघालें असतां नीट पडणार नाहीं. कालच्या दिवसीं तूं बोललास कीं अमुक्या शहरचे कारखानेदार आपल्याकडील मजूर लोकांसीं नीट वागत नाहींत. दाण्याचा भाव चढला असतां, गरीब मजुरांस उच्यापत काढावी लागती, ह्मणून दाण्याचा भाव जसा चढेल तसा मजुरीचा जो पैका त्यांस द्यावयाचा त्याचा ही दर वाढवावा. असा कायदा झाला पाहिजे, असें तूं बोललास ही तुला चांगली विचाराची गोष्ट वाटली असेल.

गोपाळ : तर मी चुकून बोललों काय ? हां ! हां, मला कळलें; कोणेकडून तरी, म्या हें शास्त्र शिकायास लागावें, असें आपण करूं पाहातां, पण याकडेस माझें मन वळेल काय ?

गुरु : कोणास कळे, पण मी इतकें तुला कळवून देईन कीं, या शास्त्राचें ज्ञान नसलें तर, तुला नित्याच्या व्यवहाराविषयीं देखील चांगलें भाषण करतां येणार नाहीं; तूं कितीही जरी जपून बोलिलास तरी तुझें अज्ञान बाहेर पडेल. तुला विद्वान लोक हांसूं लागतील. तुला स्मरण आहे, काहीं दिवसांवर तूं बोलत होतास कीं, मुंबई मुकामी माहिमचे खाडींतून सर जमशेठजी जिजीभाई यांनी मोटा खर्च करून नामी रस्ता बांधिला; पण त्या खाडींत तरीचे कामावर जीं माणसें होतीं, त्यांचा धंदा बुडाला;

आणि ईंग्लंड देशीं तरी नवीन कल्पना काढून यंत्रें करितात, तेणेंकरून असें होतें खरें कीं, जें मोठे मेहनतीनें व्हायाचें तें थोडक्या मेहनतीनें होऊं लागतें, पण त्यामुळें किती एक गरीब दुबळ्यांस काम मिळत नाहीं; या तुझे बोलण्यावरून असें दिसतें कीं तुला त्या लोकांचा कळवळा आला. पण परोपकार कशास ह्मणावें हें तुला बराबर समजत नाहीं. सारांश जें ह्मणसील त्यासीं देशव्यवहाराचे व्यवस्थेचा थोडा बहुत तरी संबंध असतो. याजकरितां मी या शास्त्रावर बोलणार नाहीं, असा जो त्वां पण केला आहे तो, अगदीं मौन धरसील तरच सिद्धीस जाईल.

गोपाळ : महाराज अगदीच मौन हो कसें धरितां येईल? इतकें तरी व्हावें कीं, चांगला पोशाक, करमणूक, मुलांबाइकांस अवडत्या गोष्टी, यां विषयीं बोलायास मोकळीक असावी.

गुरु : एका दिवसीं पोशाकाच्या गोष्टी चालल्या होत्या तेव्हां या शास्त्राविषयींचें अज्ञान बरेंच बाहेर पडलें. एक स्त्री बोलूं लागली चोळ्यांचे अमदाबादी खण, साडया, किनखाप, हें कापड फार माहाग झालें. त्याजवर काहीं जकात वाढविली असेल. तो माल छपवून कां उतरीत नाहीं? जकातदारांस फसविलें तर फार चांगलें. तें ऐकून दुसरी जी होती ती ह्मणाली, हें काय बोलतां? चोरून माल उतरविणें, हें बरें काम काय? परमुलकी कोणताही जिन्नस असो तो इकडे येऊं देऊंच नये; आणि तो जरी फार चांगला असला तरी वापरूं ही नये त्या वाटचा गोरगरिबांस धर्म करावा; आपल्या देशींचे लोक भुकेनें मरतात हें डोळ्यानें पाहावें, आणि परक्या देशींचा व्यापार वाढवावा, हें बरें नव्हे.

गोपाळ : हें असें जें ती दुसरी स्त्री बोलली तें खोटें काय? त्या बोलण्यांत तर दया व स्वदेशाविषयीं प्रीति, हेंच दिसतें. आपल्याकडे तरी विलायती कापड फार घेतात तसें न घेतां, कापडें तयार करण्याचीं यंत्रें इंग्लंड देशीं असतात, तीं आपल्या देशीं आणून चालू करावीं, यांत आपल्या देशाचें हित आहे.

गुरु : त्या प्रकरणीं विचार करूं लागलास तर, काहींच सुचेनासें होईल. देशव्यवहारव्यवस्था माहित असली तरच तो विचार करितां येईल. तूं ह्मणसील, कीं तें शास्त्र कठीण, तर असें आहे कीं कोणती गोष्ट करायास बसलें असतां काहीं अवघड वाटल्यास कंटाळून सोडून देऊं नये. एक सारिखें नेटानें बसावें; परंतु लोकांस कांहीं कठीण वाटलें म्हणजे, ते तें प्रकरण सोडून देतात. अलीकडे बहुधा लोकांचे ह्मणणे असें आहे कीं आपणा गरीबांस यंत्रादिकांचे विचार कशास व्हावेत? आपण आपल्या पोटाची सोय पाहावी. वाचायास, लिहायास शिकून काईद्याचा विचार केला तर, शिरस्तेदारी, मुनसफी, न मिळाली तरी, वकिलाची अथवा कारकुनाची तरी जागा मिळेल.

गोपाळ : मला वाटतें आपण सांगतां तसा लोक विचार करितात तें नीट आहे; कारण शिरस्तेदारी, मुनसफी यापुढे यंत्रादि शिल्प विद्या तुछ आहे.

गुरु : बरें पण आतां जर सर्व तुजसारिखेच शिल्पादिकांचा कंटाळा करूं लागले, तर मग विचार तरी पुढें काय? आपल्या देशांत संपत्ति, शिल्प, कला कौसल्यें यांचा ऱ्हास होत चालला आहे. त्या विषयीं कोणी चिंता न वागविली, सर्व जण आपआपल्या पोटाकडेसच पाहूं लागले, तर मग आपल्या या देशाच्या कल्याणाची वाट काय? अरे वाफेचीं यंत्रें, त्या यंत्रांत जाळायाचे कोळसे, लोखंडी रस्ते, हीं कशीं काय आहेत; तसीच इकडील शेतकी कसी होत आहे, व जमीनीवर सरकारी कर बसले आहेत त्यांपासून रयतेस काय होत आहे; देशाचें कल्याण व्हायाजोगी जमिनीची वहिवाट करण्याची कोणती रीति आहे, या सर्व गोष्टींचा विचार करणें हें स्वदेशाचें कल्याण इछिणारांस आवश्यक होय. या गोष्टींचा विचार न करणें यांत आपलें फार अनहित आहे.

गोपाळ : महाराज! आपण सांगतां ती गोष्ट खरी, व त्या गोष्टीचा विचार होऊन, काहीं तरी स्वदेशाच्या कल्याणार्थ झालें पाहिजे. त्या दिवशीं आपलें आणि पंडिताचें बोलणें चाललें होतें,

त्यांत देशव्यवहारव्यवस्था शास्त्र निघालें होतें. त्यावरून परमुलखी लोकांबरोबर व्यापार केल्यापासून काय काय लाभ होतात; व देशाचें कल्याण कोण कोणत्या गोष्टींनीं होतें तो प्रकार सांगितला. त्यास आपल्या मतें तर त्या शास्त्राचा अभ्यास केला असतां, देशकल्याणाचे उपाय सहज दृष्टीस पडतील.

गुरु : खरें देश कल्याणाचे उपाय समजण्यास त्याच शास्त्राचा अभ्यास करावा, ह्मणजे कोणावर दया कसी करावी; स्वदेशाविषयीं प्रीति कसी करावी तें समजूं लागेल; कारण जें करणें तें ज्ञानानें व विचारानें झालें पाहिजे; असें जर नाहीं तर मनांत फार चांगल्या कल्पना येऊन फळ काय ? संसारांचीं रोजची खटलीं तीं देशव्यवहाराचे व्यवस्थेस सोडून नाहींत. ह्मणून हें शास्त्र वेगळें आणि रसायन, ज्योतिष, सिद्ध पदार्थविज्ञान, असीं जी शास्त्रें तीं वेगळीं. ती शास्त्रें चुकून पाऊल पडलें तरी, फारसें कोणाच्या लक्षांत येणार नाहीं, पण हें शास्त्र सोडून वागलें तर, व्यवहारांत मोठमोठ्या चुका पडतील. राज्याच्या खबरी, वृत्तांत, नाना देश व समुद्र फिरून आल्याचीं वर्तमानें असे जे लेख ते तरी या शास्त्रास सोडून नसतात. यांचे मुख्य नियम माहित नसले तर त्यां लेखांचा भाव तादृश समजणार नाहीं. हें शास्त्र मुळींच आपल्यास ठाऊक नसलें, तर मग ज्याचा ग्रंथ आपण पाहावा त्यास हें शास्त्र माहित होतें किंवा नव्हतें, हें आपल्यास कोठून कळणार ? तेव्हां असें होईल कीं, त्या ग्रंथांत जरी खोटें सांगितलें असलें, तरी तें आपल्यास खरेंसें वाटेल. असेंच तुला तो कृष्णरावजींचा ग्रंथ वाचितां वाटलें. कित्येक चांगले काव्यकर्ते त्यांस देखील हें शास्त्र नीट समजलेंसें दिसत नाहीं. या शास्त्रास न अनुसरून झालेले ग्रंथ लोकांत वागतात, त्यामुळें असें होतें कीं, अज्ञान्यांची भलतीच समजूत पडून जाती.

गोपाळ : काव्यांत हा दोष असतो हें ऐकायास बरें वाटत नाहीं; काव्यावर तर आमची फार भक्ति.

गुरु : देशव्यवहाराचे व्यवस्थेकडे लक्ष न ठेवितां, काव्यादिक करणारे कोठें घसरले असले, तरी तो दोष त्या काव्याचे सरस रचनेपुढें नाहींसा होऊन जातो. आणखी असें आहे, चांगली कविता व रचना अथांत जे रस अलंकारादि आढळतात, ते उभे करावयास, केवळ खरीच गोष्ट असली पाहिजे असें नाहीं, नवी रचली तरी चालती. पण हें खरें आहे, किंवा हें ठोंच कल्पित आहे, असा आपला समज पोहोंचे असें करून घेतलें पाहिजे.

गोपाळ : असो पण महाराज म्या ऐकिलें कीं देशव्यवहारव्यवस्थेवर एके स्त्रीनें इंग्रेजींत एक ग्रंथ केला. तेव्हां असलीं शास्त्रें बायका शिकायास लागल्या असें झालें. पण बायकांस देशव्यवहाराची व्यवस्था जरी समजली नाहीं, तरी चालेल; त्यांस शिकून काय करायाचें आहे ? लोकांस व्यवहारव्यवस्था कळत नसली तर तें अज्ञान काढून टाकणें हें सरकारचें काम आहे. बायकांमध्यें कोणी शास्त्रकर्त्या अथवा कानूनकायदा करणाऱ्या होतील, असेंही नाहीं. तेव्हां बायकांनीं शिकून उपयोग काय ? शिकूं नये हें बरें.

गुरु : बायकांनीं शिकूं नये ही अगदी खोटी समजूत; बायका विद्या शिकून, देशव्यवहाराची व्यवस्था समजूं लागल्या, तर फारच चांगलें होईल. त्यांस आपआपल्या मुलांस शिकवितां येईल; तेणेंकरून तीं मुलें पुढें व्यवस्थेनें चालूं लागतील. असें आहे, मुलें ल्हानपणीं, जें जें पहातात, ऐकतात, तें तें मनांत घरीत जातात; मोठीं होतात, तेव्हां, हें खरें, हें खोटें, असें त्यांस कळूं लागतें, मग जें खोटें तें सोडून देतात, पण आई जर चांगली शिकली असली, तर, बहुत करून तिच्याच जवळ असणारें जें मूल, त्यास मुळापासूनच खऱ्या गोष्टी शिकवूं लागेल. याप्रमाणें मुलांस शिकवायास बायकांकडून साह्य झालें तर मोठेंच काम होईल.

गोपाळ : माझ्या पेक्षां जीं ल्हान मुलें त्यांनी देखील देशव्यवहारव्यवस्था शिकावी काय ?

गुरु : होय, शिकानी ती त्यांला पुढे उपयोगींच पडेल; आई चांगली शिकलेली, शाहाणी असली; आणि मुलांची समजूत पडे असें केवळ सोपे युक्तीने ती सांगूं लागली, तर या शास्त्राच्या गोष्टी मुलांनीही कां शिकूं नयेत ? असीं शिकलेली जीं मुलें त्यांचें ज्ञान मोठ्या माणसापेक्षांही, अधिक असतें.

गोपाळ : मला वाटतें मुलांस शिकवायाकरितां, अगदीं सोप्या अशा काहीं गोष्टी या शास्त्रास धरून रचीत असतील.

गुरु : होय असी एक गोष्ट म्या पाहिली, तींत या शास्त्राचें कोठें नावही न काढितां, यांतील, एक मुख्य गोष्ट अगदीं सोप्या रीतीने सांगितली आहे. ती असी, एकच काम वेगळाल्या माणसांनीं वांटून घेऊन केलें असतां, किती लवकर होतें, याविषयीं ती गोष्ट आहे. ती या शास्त्राच्या आधारानें तुला समजली असतां फार चांगली वाटेल. अणखीं एक गोष्ट मुलांकरितां केली आहे. ती असी कीं, कोणी एक राजा होता तो ज्या वस्तूस हात लावी, त्याचें सोनें होई. त्या राजास सोनें ही संपत्ति असें वाटून, त्यानें सर्व वस्तूंस हात लावून त्यां सर्वांचें सोनें केलें; तेणेंकरून असें झालें कीं त्यास व त्याच्या प्रजेस खायास मिळेनासें झालें; यामुळें, ते मेले.

गोपाळ : तेव्हां या गोष्टीने देशव्यवहाराची व्यवस्थाच सांगितली काय ? महाराज मला तर असें वाटतें कीं, त्या राजाचा हात ज्यास लागे, त्याचें जसें सोनें होई, तसें आपलें मुख ज्या गोष्टीस लागलें, त्या गोष्टीची देशव्यवहारव्यवस्थाच होती.

गुरु : तो माझ्या मुखाचा गुण नव्हे कळलें; त्या गोष्टीच देशव्यवहारव्यवस्थेचे जातीच्या ह्मणून त्या तें रूप पावतात. ज्यास राजा हात लावी त्याचें सोनें होई; या गोष्टींत असें सुचविलें कीं, धान्यादिक जीं जमिनींतून, उत्पन्न होतात; त्यांची मनुष्यास फार गरज आहे. ते धान्यादि पदार्थ पुरतेपणी असले तरच, तें सोनें संपत्ति. सोनें जवळ असून, त्या मानाने दुसऱ्या वस्तु नाहींत, तर एकटें सोनें असून काय उपयोग ? एकटें सोनेंच संपत्ति होत नाहीं.

गोपाळ : अशा ज्या गोष्टी देशव्यवहारव्यवस्थेवर असतात त्या गोष्टींचें तात्पर्य मुलांस सांगितल्यावांचून कळणार नाहीं. गोष्टी जशा सांगितल्या असतात तशाच समजून उपयोग नाहीं. त्याचें तात्पर्य काय तें समजलें पाहिजे.

गुरु : तात्पर्याकडे कोणाचें लक्ष्य आहे ? गोष्टीच ऐकून खुश होतात. मुलांचें तिकडेस लक्ष्य नसतें हें नीट आहे; कां तर त्यांची बुद्धि तात्पर्याकडे पोंहचत नाहीं. बाळपणीं जें ऐकिलें असेल त्याचें तात्पर्य मोठेपणीं समजूं लागतें. बीज पेरून लगलेंच फल पाहूं नये; फळ यावयाचा वेळ येई तोंपर्यंत थांबलें पाहिजे, बाळपण हा पेरणीचा वेळ, सांठवणीचा वेळ नव्हे.

गोपाळ : बरें तर महाराज शिकावें असें माझ्या मनांतून आहे. आणि मेहनतीस मी भीत नाहीं, हें आपण जाणतच अहां. सिद्धपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, हीं मी आपल्यापासीं किति हौसेने शिकलों. त्या शास्त्रांसारिखेंच हें देशव्यवहारव्यवस्थेचें शास्त्र गोड व सोपें असलें तर हें ही शिकूं लागेन; पण हें शिकावें कसें इतकें मात्र आपण कृपा करून सांगावें. बरें हें शिकायास तरी कोणाकडे जावें; अहो मंडळी जमून त्यांत उभे राहून नाना पदार्थ व यंत्रें जवळ घेऊन त्यांचे प्रयोग करून जसे शिक्षक या मुंबई मुक्कामीं सिद्ध पदार्थादि शास्त्रें सांगतात त्या प्रमाणें हें शास्त्र कोठे सांगतात काय ? आपण ह्मणाल कीं, या शास्त्राचे ग्रंथ घेऊन पाहावे तर तसें करायास मन होत नाहीं, त्यांत फार कठीण कठीण शब्द असतात. विषय नवा आणि भाषाही नवी, मग नवीन शिकणारास किती अडचण पडेल.

गुरु : शास्त्राची परिभाषा समजायास बहुतकरून कठीणच असती; पण देशव्यवहाराचे व्यवस्थेंत परिभाषेचे शब्द थोडकेच आहेत. इतकेंच कीं, काहीं बराबर कळलें आहे व काहीं गैर समजुतीने

कळलें आहे, त्यांत खरें कोणतें व खोटें कोणतें याचा निवाडा करून, खऱ्या गोष्टी एकामागें एक अशा पद्धतवार समजून घ्यायाच्या राहिल्या आहेत; नव्या गोष्टी समजून घ्यायाच्या फारशा राहिल्या नाहीत. शिक्षकाविषयीं तूं पुसतोस जर तुला तसा शिक्षक कोठचा सांगावा, इंग्लंड देशीं बरीक हें शास्त्र शिकणारांची कमती नाहीं. तेथें मोठमोठ्या शाळांत चांगली समजूत पडे अशा रीतीनें शिकवितात. त्यामुळें तिकडे या शास्त्राचा चांगला अभ्यास झाला आहे. ही देशव्यवहारव्यवस्थेची विद्या अलिकडे थोडक्या वर्षांत युरोपीयन लोकांत फार वाढली आहे. आडम स्मिथ् साहेब तर या विद्येचे आदि गुरू. यांचे या विद्येवर इंग्रेजींत फार चांगले ग्रंथ आहेत, तसेच दुसऱ्या साहेबांचे ही चांगले चांगले ग्रंथ आहेत, पण ते नवीन शिकणारास समजायास अवघड.

गोपाळ : शिक्षकापासून शिकून घ्यायाची सोय नाहीं; आणि ग्रंथांवरून शिकावें तर ते इंग्रेजींत. तेव्हां महाराज हें शास्त्र कोठून शिकावें ?

गुरु : तर बाबा याविषयीं कांहीं युक्ति निवेल कळलें. असें झालें, ज्या मंडळींत माझें वागणें असे त्या मंडळींत या शास्त्राच्या नेहेमी गोष्टी होत असत. त्या मला चांगल्या वाटूं लागल्या, त्याजवरून माझ्या मनांत आलें कीं, हें शास्त्र शिकावें. मग या शास्त्राचीं मूल तत्वें, (ह्मणजे पहिल्यानें समजून घ्यायाचीं प्रकरणें) मी शिकूं लागलों. पण त्याजवरील जे इंग्रेजी ग्रंथ त्यांतून एकादा ग्रंथ घेऊन उगेच पहात बसावें; अथवा मलतेंच एक प्रकरण काढावें असें म्या केलें नाहीं; तर ग्रंथकर्ता कोणत्या धोरणानें चालला आहे, त्याच्या बोलण्याचें तात्पर्य काय हेंच मी पहात गेलों. याप्रमाणे मुळापासून आरंभ करून, म्या या शास्त्राचा अभ्यास केला आहे. त्यास ज्याचा मोठमोठ्या विद्वानांनीं विचार केलेला असें हें शास्त्र मजपासून साध्या रीतीने समजून घ्यायास इच्छित असलास तर; या शास्त्राचीं जीं कठीण प्रकरणें ती मी तुला कळवीन असी प्रतिज्ञा न करितां मूलतत्वें तरी समजवीन.

गोपाळ : तर मग महाराज, फार चांगलें झालें ! हें शास्त्र आपल्यापासून समजून घ्यावें असा माझा निश्चय झाला. मी आपला पूर्वीपासून शिष्य आहें. आपला थोरपणा काय सांगावा ? अमुक हें पुसावें कसें, पुसलें असतां माझें अज्ञान बाहेर पडेल, असी, आपल्यास पाहून, मनांत शंकाच येत नाहीं. पण वारंवार पुसण्याचा माझा स्वभाव आपल्यास फार सहन करावा लागेल, ही शंका मात्र येती.

गुरु : तसी शंका येण्याचें कांहीं कारण नाहीं, तो विषय तुला अल्पायासानें कळेल. त्याचीं अवघीं मुख्यत्वेंकरून २२ प्रकरणें, तदंगभूत इतर प्रकारांसहित आहेत. आतां बोलणें झालें तो १ उपोद्घात, २ संपत्तीचें लक्षण, ३ संपत्युत्पादक कारणें, ४ मालाचें रक्षण, ५ उद्योगाची वांटणी, ६ भांडवल अथवा पुंजी, ७ पुनः तेंच प्रकरण असे सात प्रकार मिळून संपत्युत्पत्तिपर पूर्वभाग सांगितला आहे. ८ रोजमुरा व लोकसंख्या, ९ पुनः तेंच प्रकरण, १० मजुरांची स्थिति, ११ मोल आणि किंमत भरती व खप १२ उत्पन्न १३ धारा व भाडें, १४ स्थावरमालाचें उत्पन्न, १५ सारा आणि व्याजबट्टा, १६ पैका, १७ पुनः तेंच प्रकरण, १८ व्यापार, १९ परदेशव्यापार, २० व २१ तेंच प्रकरण, २२ संपत्तिव्यय ह्मणजे खर्च असे पंधरा प्रकार मिळून संपत्तिविनियोगपर उत्तरभाग सांगितला आहे. या क्रमाने, उद्यांपासून सांगण्यास आरंभ करितों.

—∞—

# पूर्वभागसंवाद २

## संपत्तीचें लक्षण

यांत देशव्यवहारव्यवस्थेचें लक्षण, लोक चांगले रूपास कसे येऊं लागले, वव्यवहार कसे करूं लागले तो प्रकार, देशव्यवहारव्यवस्थेचा नीतीसीं संबंध; संपत्तीचें लक्षण इत्यादि सांगितलीं आहेत.

गोपाळ : महाराज, काल मी आपल्यापासून गेलों, तसा देशव्यवहारव्यवस्थेचा विचार करीत बसलों. पण त्यापासून काहीं झालें नाहीं. या शास्त्राच्या च्यार गोष्टी मला समजल्या होत्या, त्यांत मोठा गोंधळ होऊन गेला. इतकें मात्र कळूं लागलें, कीं या शास्त्रांत सर्व गोष्टी सांठविल्या आहेत पण हें याचें अमुक स्वरूप असें लक्षण मला करितां येत नाहीं. हें लक्षण चांगलें स्पष्ट समजलें म्हणजे मी आरंभ करितों, ह्मणून याचें लक्षण थोडक्यांत शांगावें.

गुरु : देशव्यवहारव्यवस्था ह्मणून काय आहे हे थोडक्यांतच सांगावें, असें, कोणें एके बाईनें एका पंडितास पुसलें, तेव्हां त्याने उत्तर दिलें कीं, घरखटलीं कशीं बेतानें चालवावीं, ही व्यवस्था तुह्मास तर चांगलीच समजत आहे; त्यास जसी घरखटल्याची, तसीच, सर्व लोकांच्या अथवा देशाच्या खटल्याची व्यवस्था असती असें मनांत आणावें, ह्मणजे देशव्यवहारव्यवस्थेचें लक्षण कळेल.

गोपाळ : हें लक्षण त्या पंडितानें चांगलें थोडक्यांत सांगितलें, पण त्या बाईसारखी माझी उतावळी नाहीं. मी स्वस्थपणीं ऐकायास बसलों आहें, ह्मणून, एवढे मोठें शास्त्र याविषयीं आपलें बोलणें अगदींच थोडें होऊं नये. चांगलें सविस्तर व्हावें. आणि ह्मणही आहे कीं, कोणताही उद्योग "शनैः शनैः" ह्मणजे हळूहळू चालवावा. एकदम फार ओझें घेऊं नये. त्यास या शास्त्रांत मुख्य विषय काय, व शास्त्राचा उद्देश काय, तें सांगावें.

गुरु : बरें तर, ऐक संपत्ति ह्मणून काय, उत्पन्न होती कसी, तिची वांटणी होती कसी, कोण्या कारणामुळें वाढती, कोण्या कारणामुळें वाढत नाहीं, तेणेंकरून लोकांस सुखें अथवा दुःखें कसीं होतात, हें ज्या शास्त्रांत सांगितलें आहे, ती देशव्यवहारव्यवस्था, हें असें या शास्त्राचें लक्षण सांगितलें, हें विस्ताराने सांगतों.

असें पाहण्यांत आलें आहे कीं, रानटी लोकांच्या मुलखांत, लोक तर थोडकेच असतात; पण त्यांची वस्ती इकडे तिकडे पुष्कळ जमीनभर झाली असती. मासे मारावे, शिकार करावी हेंच त्यांचें काम, त्यांत जें काय मिळेल तें खाऊन राहावें, तें तरी मिळेल असें खचित नसतें. गरीबी यावी, दुष्काळ पडावा, असें जेव्हां तेव्हां त्या रानटी लोकांस होतच असतें; तेणेंकरून बहुतेकांचा नाश होतो. मुलांचे हाल होऊन तीं ल्हानपणींच नाहींसीं होतात, थोडीसीं जीं राहतात, त्यांचा मात्र ते लोक सांभाळ करितात. जीं माणसें ह्मातारीं, जर्जर झालीं असतात, त्यांस मारून टाकितात. पण इतकेंही

असतां आपण केवळ निर्दय असें मानीत नाहींत. असें मानितात की, आपण यांस मारून टाकितों ही यांजवर दयाच करितों. शिकार करून जो पोट भरणारा त्याला तर पुष्कळ जमीन पाहिजे; आणि पोटास जें पाहिजे तें मिळवायाकरितां, दूरदूर ठिकाणीं फिरलें पाहिजे. तें फिरणें अरिष्टांत पडण्यासारखें आहे. असें फिरणें ते तरणे ताठे असतील त्यांचें काम आहे, त्यांच्या मार्गे मार्गे, जीं म्हातारडीं त्यांच्यानें फिरवणार नाहीं, तीं फिरूं लागलीं असतां भुकेनें मरून जातील, अथवा त्यांस रानांतील जनावरें मारून खातील, म्हणून त्यांस मारून टाकावें हें बरें. असी जी लोकांची स्थिति ती पहिली अवस्था जाणावी.

रानटी लोक गुरें, बकरीं, अथवा मेंढरीं, पाळूं लागले म्हणजे त्यां लोकांचे पोटास जें पाहिजे तें थोडक्या वेळांत मिळूं लागतें; गुरें, बकरीं चारावयास मात्र बाहेर फिरावें लागतें. फार मेहेनत न पडतां, त्यांत गुरां बकऱ्यांवर त्यांचें पोट भरूं लागतें, त्याचीं कुटुंबें वाढूं लागतात, ते लोक मग फारसे क्रूर व निर्दय असत नाहींत. काहींशा चांगल्या रूपास येऊं लागतात.

मग असतां असतां शेत कसें करावें ही विद्या त्या लोकांस कळूं लागती, तेव्हां ज्या लहान जमिनीने थोडक्यांचें पोट भरत असतें, त्याच लहान जमिनीनें, अधिक लोकांचें पोट भरूं लागतें. पोटास मिळवायाकरितां इकडे तिकडे फिरावें लागत नाहीं. कुटुंबांची वस्ती काईम होऊं लागती, आणि व्यवहारास उपयोगी अशा विद्यांची चाल होऊन त्या विद्या वाढूं लागतात; ही लोकांची दुसरी अवस्था जाणावी.

लोक रानटी असतां त्यांत एकादी राज्यपद्धति चालू झाली असें विरळा. ते कोणाच्या हुकुमांत वागत नाहींत, लढाई होऊं लागती तेव्हां मात्र आपआपले फौजेच्या सर्दाराच्या हुकमांत वागतात.

त्या लोकांकडे गुरें, मेंढरीं जमून त्यांचे कळप झाले म्हणजे तो आपला माल असें ते लोक समजूं लागतात. मग त्या मालास काहीं नुकसान होऊं नये म्हणून कांहीं ठराव करून ठेवणें जरूर होतें. त्या लोकांत जे वडील व पुढाइत झालेले मनुष्य ते ठराव करून ठेवितात, त्याप्रमाणें चाललें नाहीं म्हणजे, तोच अपराध. त्या अपराधास दंड होऊं लागतो. असे होऊं लागलें म्हणजे, व्यवहाराचा आरंभ झाला असें समजावें. मग लोकांची वस्ती काईम होऊं लागती. ही त्यांची तिसरी अवस्था जाणावी.

ही तिसरी अवस्था लोकांस प्राप्त झाली म्हणजे, ते पहिले झालेले ठराव हळू हळू सुधारूं लागतात; तेव्हां असें होतें कीं, ज्या राज्यांत काय ती एकट्या राजाचीच सत्ता असें एकसत्ताक राज्य किंवा ज्या राज्यांत लोकांची सत्ता असें लोकसत्ताक राज्य उत्पन्न होतें. मग सर्व लोक चांगले रूपास येतात, उद्योगांची भरभर होती, कलाकौशल्यें उत्पन्न होतात, धातूंचा कसा काय उपयोग करावा त्याचा शोध लागतो, मेहनत वेगळाल्या माणसांकडे वांटली जाती, जो ज्या कामांत कुशल झाला असतो, तो तें काम बहुतकरून निराळें करूं लागतो. याप्रमाणें जे मुळचे रानटी, आडाणी व दुखापत भोगणारे लोक ते हळू हळू चांगले होऊन जातात. तेव्हां असें होतें कीं, ज्या शहरांत चांगले चांगले मार्ग असें शहर, किंबहुना ज्यांत मातबर चांगलीं वसलेलीं शहरें होणार असा मुलूख, त्या लोकांच्या हातीं येतो. मग ते आपल्या मुलखांतील अथवा दुसऱ्या मुलखांतील लोकांसीं मोठा व्यापार करूं लागतात.

गोपाळ : लोक पहिल्यानें कसे रूपास येतात व पुढें कसे सुधारत जातात, या गोष्टींचें मूल तत्त्व सांगितलें, तें चांगलें सुंदर रीतीनें सांगितलें. प्रण मला असें वाटतें कीं, हेंच बोलणें कांहीं अधिक चालावें.

गुरु : हेंच बोलणें पुढें अधिक विस्तरेंकरून होईल. कां तर कोणत्या कारणामुळें देश मातबर होतो आणि सुधारतो हेंच सांगायास देशव्यवहारव्यवस्था पुढाईत झाली आहे, याकरितां मी तुला राजे,

लढाई, राजकारस्थानें, अशांच्या गोष्टी सांगत नाहीं, तर कसबें, व्यापार, नवीन शोधून काढलेलीं प्रकरणें, लोकांची सुधारणूक, असल्याच गोष्टी सांगतो. अमेरिका ह्मणून एक खंड आहे. त्यांतील देशासारिखे कित्येक देश लौकर नांदूं लागतात व चांगले मातबर होतात. मिसर व सिरिया ह्मणून देश आहेत. त्यांसारिखा कित्येक देशांचा मोड होतो, वस्ती कमी होऊन लोकांस गरीबी येती असी घडामोड ज्या ज्या कारणामुळें होती, तीं तीं कारणें चांगलीं समजलीं ह्मणजे असा विचार करायास सोय पडते कीं, हा व्यापार सोडून दुसरा व्यापार करावा किंवा कसें; हा माल आपल्याकडे येऊं देऊं नये, किंवा तो माल येऊं देऊं नये. शेतकी ज्या रीतीनें चालली आहे; त्याहून काहीं दुसरी रीत काढावी किंवा कसें, खायास जे जिन्नस लागतात त्यांची अमुक अमुक किंमत असावी आणि अमुक मेहेनत केली असतां अमुक पैका द्यावा असा एक नेम ठरवावा किंवा ठरवूं नये, असे विचार राज्यांत होऊं लागले ह्मणजे, ज्याहींकरून रयतेचें कल्याण होईल असे उपाय सुचूं लागतात.

याजवरून पाहतां देशव्यवहारव्यवस्थेचे दोन भाग सिद्ध होतात. एक विचारप्रकरण आणि एक व्यवहारप्रकरण. एकापुढें एक अशा ज्या ह्या गोष्टी सांगितल्या त्या विचारप्रकरणांत सांगीतल्या आहेत. कायदे कसे बांधावे, देशाची संपत्ति वाढवायास कोणकोणते उपाय करावे. त्या संपत्तीस विघ्न करणारीं जीं कारणें तीं कशीं दूर करावीं हें व्यवहार प्रकरणांत सांगितलें आहे. विचारांत चुका असल्या ह्मणजे व्यवहारांत चुका होतात, हें विस्तरेंकरून सांगितलें जाईल. तेव्हां असें बोलणें प्राप्त होईल कीं, कित्येक राज्यांत देशव्यवहारव्यवस्थेविषयीं खोटी समजूत पडून गेली. त्यामुळें असें झालें कीं, त्या राज्यांत ज्यांस देशसंपत्ति वाढविण्याचें सामर्थ्य असतां त्यांनी संपत्तीस वाढविलें नाहीं, उलटा अटकाव केला.

गोपाळ : राजांच्या चुका झाल्यामुळें काहीं मोठा अनर्थ झाला नसेल. अनर्थ करणारें अज्ञान लोकांत पहिल्याच पासून होतें, लोक शिकून शाहाणे झाले ह्मणून आतां चांगले झालेसे दिसतात.

गुरु : ज्यांची गति मनुष्याचे हातीं नाहीं असीं काहीं स्वाभाविक कारणें असतात, यामुळें देशसंपत्ति वाढती, मग जरीं राज्य करण्याचे पद्धतींत चुका असल्या तरीं त्यांपासून त्या संपत्तीस मोठा अनर्थ होत नाहीं. परंतु त्या चुकांपासून काहीं चांगलें होत नाहीं, वाईटच होतें; उद्योगास अटकाव होतो, लोकांची सुधारणूक होणें मंद पडतें, राज्यांत जातिभेद असला तर कितिएक जातींच्या लोकांवरच मेहरबानी होत असती. दुसऱ्या जातींचा मोड होऊन त्यांजवर बलात्कार होतो. याप्रमाणें अनीति होऊन लोकांत संपत्तीची वांटणी नीट होत नाहीं. कसें, गोपाळा तुला आळस आलासा दिसतो. हें बोलणें आतां नको असें वाटूं लागलें काय?

गोपाळ : नाहीं महाराज! तसें नाहीं, मला वाटतें मी एथपर्यंत तर आपलें बोलणें समजलों. पण पुढें जें आपण सांगाल त्याच्या अगोदरच एक दूषण सुचलें आहे, तें मी बोलतों. तें ऐकून आपल्यास बरें वाटणार नाहीं हें मला कळतें. तें दूषण चांगलें सिद्ध झालें तर देशव्यवहारव्यवस्थेंत जे मुख्य नियम सांगितले आहेत ते मला खरे वाटणार नाहींत, आणि या शास्त्रावरून माझी भक्ति उडेल. तें दूषण असें कीं संपत्ति व संपत्ति उत्पन्न करणारीं कारणें व संपत्ति वाढविणारे उपाय, यांविषयींच काय तें आपण बोलत अहां. याजवरून असें दिसतें कीं, मातबर व्हावें, फार मातबर व्हावें, दुसऱ्या लोकांपेक्षां ही मोठें मातबर व्हावें, हाच देशव्यवहारव्यवस्थेचा मोठा रोख आहे. परंतु आपल्या धर्मांत व नीतिशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं लाभाची फार इच्छा ठेवूं नये, संपत्तीचा अतिलोभ असला ह्मणजे त्यापासून सर्व दोष घडतात. आणखी असें आहे, मोठे संपत्तिमान् तेच काय ते सुखी असतात असेंहि नाहीं. तेव्हां ज्या संपत्तीच्या हातून मनुष्य सुखी होत नाहीं, मग ती देशास सुखी कोठून करील. मातबर असून जो वाईट आचरण करतो त्यांस चांगलें सुख

कोठून, त्यापेक्षां गरीब असून चांगलें आचरण करितो तोच सुखी. याप्रमाणें पूर्वींच्या राज्यांविषयींचे जे लेख आहेत त्यांत ही सांगितलें आहे. तें स्मरल्यावांचून रहात नाहीं. पूर्वी ग्रीक ह्मणून कोणी लोक होते, त्यानी संपत्तीपासून प्राप्त जो डामडौल व विषयभोग तो तुच्छ मानिला, ही त्यांची स्थिति पाहून मोठा आनंद व चमत्कार वाटतो. रोमन् म्हणून कोणी लोक होऊन गेले, त्यांविषयीं असें सांगतात कीं, ते पहिल्याने गरीब होते व चांगले नीट चालत होते. पण त्यांस संपत्ति मिळाली तेणेंकरून त्यांचे स्वभाव बिघडले, मग ते जसे काय चाकरासारिखे होऊन गेले. सारांश, असें स्वभाव बिघडविणारें जें द्रव्य त्याचीच प्रीति लोकांनीं आपल्या ठायीं वाढवावी, सरकारास तरी द्रव्य मिळालें ह्मणजे सार्थक झालें. ह्मणून त्यानें द्रव्याविषयीं झटावे हाच काय तो विचार देशव्यवहार-व्यवस्थेंत सांगितलेला दिसतो. या शास्त्रांत मातबर लोकांच्या व पैक्याटक्याच्या गोष्टी असल्या तर या शास्त्राचा अभ्यास आपल्यास कशास केला पाहिजे. हें शास्त्र मोठे मोठे सावकार लोक कोठे शिकतात ?

गुरु : देशव्यवहारव्यवस्थेची तर बरीच उचल झाली ! असो पण हें शास्त्र तूं चांगलें समजूं लागलास तर त्वां जो दोष ठेविला त्यास कांहीं आधार नाहीं असें तुलाच कळेल. या शास्त्राचीं मूलतत्वें तुला माहीत झालीं पाहिजेत, तेव्हां त्यांपासून जे लाभ होतात ते तुला दिसूं लागतील. ह्मणून आतां जें मी तुला सांगतों त्या वचनावर विश्वास ठेव; तें वचन असें कीं देश सुखी होणें व चांगला नीतिमार्गास लागणें यास देशव्यवहारव्यवस्थेचींच मूलतत्वें कारण आहेत. असें आहे, मनुष्यास उपयोगी तर खरे, पण वाईट कामीं लाविले तर लावले जातात, असे जे बहुतेक पदार्थ त्यांतलेंच द्रव्य आहे, हें मी कबूल करितों. याजवरून पाहतां ग्रीक लोकानीं व रोमन् लोकानी खोट्या मार्गें संपत्ति मिळवून वाईट व्यवहारीं लाविली असेल; कदाचित त्यामुळें त्यांना बिघाड झाला असेल. बलात्कार लूट असलीं कर्में करून त्यानीं द्रव्य मिळविलें असेल. उद्योग जसा वाढवावयाचा तसा हळू हळू वाढवून त्या चांगल्या मोठ्या उद्योगानें द्रव्य मिळविलें नसेल, ही गोष्ट संभवती. अशा चांगल्या मोठ्या उद्योगानें द्रव्य मिळालें तरच त्या द्रव्यापासून सुखाचा फैलावा चहुंकडे होतो, नवे नवे आनंद येऊन पुढें उभे राहातात, व नव्या नव्या सुखभोगाच्या इच्छा उत्पन्न होतात. त्वां राज्याविषयींच्या लेखांतलें वर्तमान सांगितलें, ते लेख पाहिले असतां जसी राज्यांची स्थिति समजूं लागती तसी लोकांची स्थिति समजूं लागत नाहीं. कोण्या एकास देशींची आचरण—व्यवहार-रीति कशी असें समजून घ्यायचें असलें, तर देशोदेशीं फिरून तेथील वर्तमानें ज्यांनीं सांगितलीं आहेत त्यांचे लेख समजून घ्यावे. त्याजवरून असें कळूं येईल कीं लोकांकडे जसी जसी गरीबी अधिक तसें तसें त्यांस सुख कमी, तसें तसें त्यांचे बोलण्यांत चालण्यांत सौम्यपण कमी, आणि चांगले आचरणहि कमी—याप्रमाणें असतें.

एकटे द्रव्यापासून लोकांस सुख होत नाहीं. सुख उत्पन्न करणारीं जीं साधनें त्यातलेंच द्रव्य एक साधन आहे. म्हणून त्या सुद्धां संपत्ति असली तर सुख होतें. चांगला धर्म, मार्ग, चांगलें आचरण, शहाणे राज्यकर्ते, चहूंकडे ज्ञान झालेलें, असें जेव्हां होतें, तेव्हां लोक सुखी होतात. हे लाभ जर नाहींत तर एकट्या संपत्तीपासूनच सुख होणार नाहीं. असो या गोष्टी प्रसंगीं मात्र काढाव्या. हें प्रकरण, ज्या शास्त्रांत राज्यव्यवस्था व नियमरचना सांगितली आहे, त्या शास्त्रांत आहे. आतां आपलें लक्ष देशव्यवहारव्यवस्थेकडे लागलें आहे. ही त्या शास्त्राचा एक भाग होय. कोणकोणते पदार्थ मिळून संपत्ति होती ते पदार्थ कसे मिळवावे, कसे संग्रहीं ठेवावे, त्यांचा कसा उपयोग करावा, तेणेंकरून लोकांस कसें सुख होतें, आणि तें सुख कोणत्या उपायानी वाढतें हेंच बहुतकरून या देशव्यवहारव्यवस्थेंत सांगितलें आहे. बरें जेणेंकरून संपत्ति होती;

असे पदार्थ मेहनत करून पोट भरणाऱ्या लोकांकडे पुरतेपणीं असतात काय ? नसले तर पुरतेपणीं कसे मिळतील याचा आपण विचार करूं नये काय ? कां तर मेहनती गरीब असे जे कनिष्ठ लोक त्यांची संपत्ति वाढल्यावांचून ते सुधारणार नाहींत. गरिबी असली ह्मणजे बहुतकरून अपराध घडतात. जेव्हां दुकाळ पडतो व विपत्तीचा काळ येतो, तेव्हां जितक्या चोऱ्या होतात तितक्या दुसरे वेळीं होत नाहींत. ह्मणून कनिष्ठ लोकांत संपत्ति वाढली असतां ते नीतीनें वागतात, त्यांचा स्वभाव सुधारतो आणि त्यांचीं सुखेंही वाढतात. लोकांत कोठे दंगा असूं नये, स्वस्थपणा असावा, त्यांचें रक्षण व्हावें, नीतीने वागणे असावें. हेच देशसंपत्ति वाढवायाचे उपाय. मनुष्यांनी एकमेकाचा मत्सर केला ह्मणजे जसें अनहित होतें, तसेंच एका देशाचा दुसऱ्या देशाशीं मत्सर असला ह्मणजे अनहित होतें. कोणा एकाच्या हातून दुसऱ्याचें हित झालें तर त्यां दोघांसही लाभ झाला असें समजावें. ह्मणून एकमेकांची हानि करून मातबर होण्याची इच्छा धरूं नये. एका देशानें दुसऱ्या देशाशीं व्यापार करणें तो, व्यापाराचे थोर पद्धतीवर दृष्टि ठेऊन करावा. त्या व्यापारांत तरी एकमेकांचें साह्य करावें असें देशव्यवहारव्यवस्थाच सुचविती. याचा विचार करावा, तेणेंकरून मनांत नीच कल्पना उठत नाहीं. लाभाविषयीं जो अयोग्य लोभ मनांत वागवितो त्याचाही मोड होऊन जातो. ज्यांत हेवा, मत्सर, दुष्टपणा अशा कल्पनेस हें शास्त्र जसें काय औषधच आहे. फार काय सांगावें, ज्या वागण्यात शांति, अलोभ, अशा वागणुकीची जगांत कोठे भरभर झाली असली, तर तो चमत्कार या शास्त्राच्या थोर कल्पनांपासून झाला असें जाणावें. असो तुला संपत्तीचें साधारण रूप सांगितलें. आतां तेंच विस्तरेंकरून सांगतों. बरें बाबा गोपाळा, तूं संपत्ति कशास म्हणतोस ?

गोपाळ : हें काय पुसतां महाराज, संपत्ति म्हणजे सोनें, रुपें व दुसरें द्रव्य. अथवा दुसऱ्या रीतीनें ह्मणणें झाल्यास कोणा एकास मोठी प्राप्ति होणें, दुसऱ्यापेक्षां मोठा खर्च करायाची आपल्यास शक्ति असणें, हीच संपत्ति.

गुरू : एका माणसाकडे संपत्ति किती आणि एकापेक्षां दुसऱ्याकडे किती हें या बोलण्यांत सिद्ध झालें. याजवरून पाहातां जो कोणी एका प्रकारच्या लोकांत मातबर, तो दुसऱ्या प्रकारच्या लोकांत गरीब असें होईल. द्रव्य हा एक संपत्त्यंश असें समजून संपत्तीचें लक्षण करावें, तसें झालें नाहीं. त्यांस तूं संपत्ति कशास समजतोस, संपत्ति काय काय मिळून झाली आहे तें सांगावें.

गोपाळ : हां हां, पैका ह्मणून काय आहे हा आपल्या मनांतला भाव. तर मग सोनें आणि रुपें मिळून संपत्ति झाली आहे.

गुरू : बरें ज्या देशांत पैक्या वांचून दुसरी कांहींच संपत्ति नाहीं तेथें कशी काय अवस्था होईल. तुला त्या सफऱ्याची गोष्ट तर माहीत आहे. त्याचें तारू तेव्हां त्या ओसाड बेटांत फुटलें, तेव्हां त्यानें आपली सोन्याची थैली कशी मानिली; अरे कोणी एकाद्या पुरुषास द्रव्यांत पुरून ठेविला तर त्यापासून त्याचें काय हित होईल, ओसाड बेटांत द्रव्य वाटलें तर भूक जाईल काय ?

गोपाळ : पण तसें ओसाड बेट नसलें, चांगला वसता गांव असला तर आपल्यास जें व्हावें तें सोन्याने ह्मणजे पैक्याने घेतां येईल.

गुरू : तेव्हां असें समजावें कीं पैक्याने जे जिन्नस घेतां येतात, जसें जमीन, घरें, सामान, वस्त्रें, तांदूळ वगैरे आणि जिन्नस घेऊन देणारा पैका असें मिळून संपत्ति होती.

गोपाळ : खरें खरें. हे पदार्थ मिळून वास्तविक संपत्ति झाली आहे असें स्पष्ट झालें. खाण्याघेण्याचे पदार्थ जर सोन्यारुप्यानें मिळाले नाहींत तर मग जसें सिसें; लोखंड, तसेंच सोनेरुपें त्यांपासून आणखीं काय व्हायाचें आहे ?

गुरू : असें आहे ह्मणून ज्या पदार्थांचें फार अगत्य असतें, जेणेंकरून करायासवरायास सोयवरा होतें, जे हौस, उमेद पुरवितात, असे सर्व पदार्थ मिळून संपत्ति होती. त्यास स्थावर मिळकत घरें, शेतकी, कसबी कारागिरानी केलेले व्यापाराचे जिनस, खायाप्यायाच्या वस्तु, घरलटल्याचीं बनावरें, सारांश ज्या कयास किंमत आहे, आणि जें कांहीं मनुष्याच्या हितास व सुखभोगास उपयोगी पडतें, त्या सर्वांचा संपत्तींत संग्रह होतो, हें संपत्तीचें लक्षण जाणावें.

गोपाळ : ज्यांचा व्यापार करितात असे जिनस, ते आपण संपतीचे लक्षणांत कां आणिले ?

गुरू : त्याचें कारण असें कीं, बहुतेक मुलखांत जमिनींतून जे जिनस, आपेंआप उत्पन्न होतात त्यांचा खर्च किंवा विकरा होत नाहीं. तसले जिनस आपल्यास मिळाले आणि त्यांची किंमत येईल असें आपण मानिलें तरी, ते जिनस संपत्ति असें कोणी मानणार नाहीं. ते जिनस असे कीं रानांत गवत रानफळें वगैरे होत असतात, दुसऱ्या देशीं तरीं मोठमोठीं कुरणें, ओसाड जमिनीचीं पटांगणें, रानवट जनावरांचे मोकार फिरणारे कळप असतात, जसे अमेरिका ह्मणून जें खंड त्याचे दक्षिण प्रांतीं आहे. परंतु गवत काढून आणिलें; झाडें तोडून त्यांचीं लांकडें केलीं अथवा जसे त्या खंडांत पारधी त्यां जनावरांस मोठ्या मेहनतीनें धरून त्यांचीं कातडीं काढितात व चरबी काढून सुकवून तिचें मेण करितात, तसें करून त्या जिनसांचा खर्च अथवा विकरा व्हायासारिख्या ठिकाणीं ते जिनस पाठविले म्हणजे त्यांची किंमत होऊं लागती, तेव्हां त्यांचा संपत्तींत संग्रह होतो.

गोपाळ : जंगली ओसाड मुलखांत मात्र आपण सांगितलें तसें होईल पण सुधारल्या मुलखांत जमिनींतून पदार्थ उत्पन्न झाला आणि त्याचा विकरा होऊ नये असा तो असला तर त्या जमिनीचा धनी तो पदार्थ दुसऱ्या उपयोगास लावील.

गुरू : ज्या वर्षी आंबे पुष्कळच होतात, तेव्हां रायवळ आंबे झाडाखालीं पडून तसेच नासतात. ते कोणत्या उपयोगास लावावे, तसे जे जिनस, ज्यांचा अगदींच खप नाहीं ते गोळा करून आणायाची मेहनत देखील सुटणार नाहीं. इंग्लंड देशीं एकदां असें झालें कीं, अमेरिका खंडीं जे नवे वसविलेले मुलूख, तिकडचा कोणताही जिनस युरोप खंडांतील महाद्वीपांत येऊं देऊं नये असें ठरलें, तेव्हां काफी ह्मणजे बुंद भरून तारवें आलीं होतीं, तो माल समुद्रात टाकून दिला. कारण त्याचा खप नाहीं, तो माल उतरविला असता तर त्यापासून उतरविण्याचा खर्चहि भागला नसता. लढाई अथवा कांहीं दुसरीं कारणें यामुळें असें होतें कीं, ज्या जिनसांवर व्यापार चालायाचा त्यांची किंमत त्या त्या देशीं कांहीं वेळपर्यंत नाहींशी होऊन जाती.

गोपाळ : अहः अहः संपत्ति या शब्दाचा अर्थ किती विस्तरें करून सांगितला. ह्या सर्व कल्पना माझ्या मनांत होत्या पण एकांत एक मिळून गेल्या होत्या हें मला आतां कळूं लागलें. संपत्तीची गोष्ट निघाली ह्मणजे एका मनुष्याची संपत्ति अमुक, एकाची अमुक, असें समजूं नये, सर्वांकडे असणारी जी संपत्ति साधारण ती अमुक अमुक जिनस मिळून झाली आहे असें समजावें. संपत्तीचे जे लोकांकडे लाहान मोठे भाग तिकडे संपतीचें लक्षण करितां लक्ष्य जाऊं देऊं नये. असो आतां कांहीं पुसायासारिखें राहिलें नाहीं उगीच एक गोष्ट पुसतों. महाराज, आपण सांगतां तसेंच जर संपत्तीचें स्वरूप आहे तर मग सोनें, रुपें यांची पाहिल्यापासून जिकडेतिकडे प्रसिद्धि कां ? व यांसच इतकी किंमत कां ? व लोकांची दुसऱ्या पदार्थापेक्षां याच पदार्थांवर फार इच्छा कां ?

गुरू : बावा याचें कारण ऐक. सोनें रुपें इत्यादि द्रव्य ह्मटलें ह्मणजे तें मिळणें दुर्लभ, तयांत त्याची झळाळी, चकाकी ही विशेष, त्यामुळें सहजच यांजवर आपलें लक्ष्य बसतें. हे पदार्थ आपणास मिळावे अशी अंतःकरणांत इच्छा उत्पन्न होऊन हे प्राप्त होण्याविषयीं मनुष्य प्रयत्न करूं लागतो. या धातु क्वचित् क्वचित् ठिकाणीं असतात, यामुळें जेथें पाहिजे तेथें व जितक्या पाहिजे तितक्या मिळावयास

अडचण पडती, असें असतां या धातूची सर्वांस अपेक्षा असती. आणि यांस मिळवावयास श्रम तर फार पडतात. तेव्हां अर्थातच या धातु किंमतीस चढतात. आपल्यास जे पदार्थ पाहिजेत ते महाग असतात अथवा सवंग असतात, आपल्या जवळ सोनें रुपें असलें म्हणजे पदार्थ मिळतात, याजवरून पाहतां सोनें रुपें हे काहीं अपूर्व पदार्थ नव्हेत, दुसऱ्या वस्तु सारिख्याच याही दोन वस्तु आहेत. किंबहुना त्यांजपेक्षां काहीं कमी उपयोगी आहेत. असें ही ह्मटले असतां चालेल. कारण दुसऱ्या वस्तु ह्मणजे अन्नोदक, वस्त्रपात्र इत्यादि आपल्या जवळ असल्यास आपल्या निर्वाहास जशा उपयोगी पडतील तसें द्रव्य कोठून पडणार ? दुष्काळ पडला असतां सोन्या रुप्यास घेऊन काय करावें खावें काय ? बरें आपल्यास भूक लागली, आणि आपल्याजवळ सोन्याची लगड आहे तर तिजकडे पाहून पोट भरेल काय ? याज पासून जो वास्तविक उपयोग तो इतकाच कीं, व्यवहारामध्यें विक्र्यादि व्यापार यांचे योगानें सुलभ होतात. याचें स्पष्टीकरण पुढें हेंच प्रकरण निघेल तेव्हां होईल.

आतां कदाचित् तूं ह्मणशील कीं, लोकांजवळ पुष्कळ द्रव्य असतें. त्याचा व भूषणें इत्यादिकांचा उपयोग काय ? तर ऐक, काहीं द्रव्यसंचय, पुढें विपत्तिकाल आला असतां उपयोगी पडावा ह्मणून ठेविला असतो व काहीं भूषणें, शोभा, उपभोग, प्रतिष्ठा व्हावी ह्मणून करून ठेविलीं असतात. परंतु याविषयीं मुंबई मुकामीं इंग्रेजींत एक निबंध छापला आहे. त्यांत लहान मुलांस अलंकार भूषणें लेववील्यापासून किती अनर्थ होतात याविषयीं सांगितले आहे. ज्या लोकांमध्यें सचोटीचे सावकार लोक व पेंढीवाले व्याज देण्यास आहेत तेथें न ठेवितां आपणाजवळ उगेच द्रव्य राखून ठेविलें असतां निस्संशय अनहित होतें.

गोपाळ : महाराज. म्या जो आपणास प्रश्न केला कीं, लोकांची इच्छा दुसऱ्या पदार्थांपेक्षां द्रव्यावरच कां फार जाती, त्यांचें आपण उत्तर सांगितलें नाहीं.

गुरू : त्याचें कारण असें आहे कीं, द्रव्य आपणाजवळ असलें ह्मणजे ह्मटल्या वेळीं उपयोगी पडतें व त्याबद्दल पाहिजे त्या जिनसा मिळतात. भांडवलाच्या प्रकरणांत जेथें द्रव्याचा विषय निघेल तेथें याचा साद्यंत विचार होईल. आतां इतकेंच सांगणे पुरें.

गोपाळ : बरें, पण आजपर्यंत मी समजत होतों आणि बहुतेक अद्यापि तसेंच समजतात कीं, पैका ह्मणजे संपत्ति, त्यास ही अशी समजूत पडण्यास कारण काय बरें ?

गुरू : अरे त्याचें कारण असें आहे कीं; बहुधा सर्व व्यवहार द्रव्यद्वारा होतो, सर्व जिनसांच्या किंमती द्रव्यानें मापिल्या जातात, खतें, पत्रे, व्याजबट्टा इत्यादि सराफीचे व्यवहार, जमाबंदी, हीं सर्व पैक्याच्या मोडणीनें होत असतात, कोणा एकाद्यास विचारलें कीं, या गृहस्थाची सोय कशी काय आहे ? तर तुला असें उत्तर सांगेल कीं, तो काय बाबा लक्षाधीश आहे. तर यावरून तूं आपल्या मनांत पक्के समजशील कीं याजवळ लक्ष रुपये असावेत. परंतु असा अर्थ नव्हे, तर याची सर्व मालमत्ता लक्षावधि रुपयांची आहे. संसारसंबंधी कोणतें कां खटलें होईना तेथें आपणांस पाउलोपाउलीं द्रव्याची गरज लागती ; सर्व सरकारी व सावकारी व इतर व्यापार द्रव्याचे साधनानें चालतात. मोबदल्याने ह्मणजे एके वस्तूबद्दल दुसरी वस्तु देऊन व्यवहार करण्याचा जो प्रकार त्यांतील अडचणी नाहिंशा होऊन पैक्याच्या योगेंकरून व्यवहार किती सुलभ होतो हें पुढें तुझ्या दृष्टीस पडेल. तेव्हां असें जें हें आपलें साधन पैका याजविषयीं तूं ह्मणतोस त्याप्रमाणें तुझी व बहुत करून सर्व लोकांची समजूत पडून गेली; यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सारांश, जे पदार्थ मनुष्यास उपयोगी पडतात अथवा सुख देतात आणि ज्यांचा मोबदला होतो, ते सर्व मिळून संपत्ति झाली आहे. त्यांत सोन्या रुप्याचा फार थोडका अंश असतो; असें असतां कोणा एकाची अमुक संपत्ति ह्मणजे त्याचे पदरीं अमुक पैका आहे, अशी संपतिची गणती पैक्याने करायाची लोकांत बहुधा चाल पडून गेली आहे.

गोपाळ : महाराज, देशव्यवहारशास्त्राचा संपत्ती हा मुख्य विषय दिसतो. हें प्रकरण चांगलें सुरस होय.

गुरू : होय संपत्ति मनुष्यास अवश्यक आहे कळलें. कारण कीं, यास अन्न इत्यादि पाहिजे. तें बसें इतर प्राण्यास उद्योग केल्यावाचून मिळतें तसें यास मिळत नाहीं. मनुष्यास पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळालें ह्मणजे झालें, असें नाहीं, तर ज्ञान ही संपादन केलें पाहिजे; कारण "ज्ञानेन हीनाः पशुभिःसमानाः" ज्ञान नसलें तर पशूंत व त्यांत काय अंतर? परंतु ज्ञानप्राप्ति उगीच कशी होती! उपाशीं मरणार त्याच्या हातून अभ्यास कोठून होईल; तस्मात् संपत्तिसंचय असल्यावांचून कांहीं एक व्यापार व्हावयाचा नाहीं. तेव्हां मनुष्यास संपत्तीची आवश्यकता आहे असें अर्थात झालें. सारांश, जी वस्तु उपयोगी व हितावह ती अल्पायासें मिळे असें करावें. आपणास संपत्तीचें ज्यापेक्षां फार अगत्य त्यापेक्षां ती जितकी अल्पायासाने प्राप्त होईल तितकें हित अधिक. सुखकारक पदार्थांस व मोबदला होणाऱ्या जिनसास संपत्ति अशी संज्ञा ठेविली आहे. ते सर्व पदार्थ अतिसुलभ रितीने, फार थोडा खर्च पडतां कसे उत्पन्न करावे, ते पदार्थ पुढें यथाविभागें करून कसे वाटून द्यावे, शेवटीं यांचा कोणकोणत्या उत्तम रीतींनीं व्यय करावा हें आपणास समजावें. हाच या देशव्यवहारव्यवस्थाशास्त्राचा उद्देश होय.

गोपाळ : महाराज, आपण जें हे सांगितलें यास कांहींतरीं नियम असावे, त्या प्रमाणें जें होणें तें होत असेल. कारण शास्त्र ह्मटलें ह्मणजे त्यांत नियम असलेच पाहिजेत. नाहींतर तें शास्त्र कशाचें?

गुरु : यांत बहुत नियम आहेत.

गोपाळ : महाराज, बरें ते कोणी बांधिले?

गुरु : अरे, देशव्यवहारव्यवस्था म्हणून जे हें शास्त्र, यांत जे नियम आहेत, त्यांत कांहीं प्रकृतिसिद्ध आहेत, ते कृतिसिद्ध नव्हत. प्रकृतिसिद्ध ह्मणजे ईश्वरसंकल्पानें झाले आहेत. या प्रकृतिसिद्ध नियमांतून कांहीं नियमांचें ज्ञान होऊन, त्याचा बहुतकाळापासून, लोकांस प्रत्यय येत गेला आहे. त्या नियमांसच अनुसरून, संपत्ति उत्पन्न केली पाहिजे, म्हणजे आपलें हित होईल. संपत्ति सिद्ध झाल्यानंतर मग तिची वांटणी कशी होती व मोबदलाखर्च कसा होतो हे सर्व प्रकार मनुष्याच्या स्वाधीन आहेत, त्यांत त्यांस फेरफार करितां येतो.

गोपाळ : महाराज! द्रव्य म्हणजे कांहीं प्रकृतिसिद्ध अपूर्व पदार्थ आहे असें मी मानीत होतों, तें अज्ञान जाऊन तो पदार्थ एक धातु होय, त्याचा तादृश उपयोग नाहीं असें आतां मला कळलें. संपत्ति काय ती श्रीमान् लोकांकडे असती असें मी समजत होतों, परंतु ती तर ल्हान मोठ्या सर्व जीवांच्या शरीरास सुख व मनास आनंद करणारी असें कळून आलें. आपल्या चरितार्थास व सुखास आवश्यक अशी जी संपत्ति तिची उत्पत्ति कशी होती तो प्रकार केव्हां कळेल अशी उत्कंठा झाली आहे.

गुरु : बरें तर गोपाळा, आतां तुझेंही मन उठल्यासारिखें दिसतें, तशांत आज विषयही बराच झाला, आतां इतकेंच राहूं दे. उद्ईक आपण पुढें चालवूं, त्यांत पहिल्यानें संपत्तीच्या उत्पत्तीचें प्रकरण काढूं. आज जें काय झालें आहे याचें चांगलें मनन कर हो.

# पूर्वभागसंवाद ३

यांत संपत्तीच्या उत्पत्तीचीं मुख्य कारणें—उपकारणें—अनुभवहित ज्ञान इत्यादिकांची आवश्यकता, मालाचें रक्षण व मालाविषयीं कायदा, अनुभवसहित ज्ञान, व लक्षपूर्वक अवलोकन यांच्या उदाहरणार्थ, मेंढरें पाळून पोट भरणाऱ्या लोकांनीं देशांची रचना केल्याचा प्रकार, शेतकीची चाल व धान्याची लागवड, उलींढालीं, शाहणपण सचोटी याविषयीं उदाहरणें इत्यादि सांगितलीं आहेत.

गुरु : आज आपण प्रथम संपत्तीच्या उत्पादककारणांचा विचार करूं. तीं मुख्य कारणें, उपकारणें अशीं आहेत. उद्योग, आणि भूमि इत्यादि प्रकृतिसिद्ध पदार्थ, हीं दोन मुख्य कारणें. अनुभवसहित ज्ञान, लक्षपूर्वक अवलोकन, प्रकृतिसिद्ध अनुकूलता, उलींढालीं करण्याचा स्वभाव, लोकांमध्यें शाहणपण व सचोटी, उद्योगाची वांटणी व मालाचें रक्षण ही सात उपकारणें समजावी. हीं क्रमानें न सांगतां तत्तत् प्रकरणसंबंधानें सांगतों. बरें गोपाळा, या प्रकरणीं त्वां कधी विचार केला होता काय ?

गोपाळ : तो विचार कशास पाहिजे. सर्व पदार्थ तर भूमींच्या पोटीं उत्पन्न होतात, त्यास संपत्तीचे उत्पत्तीस भुमिच कारण दिसती, इतर कारणांची आवश्यकता दिसत नाहीं.

गुरु : तुझ्या मतें चांगली सुपीक भुमि, चांगली हवा असली ह्मणजे संपत्ति उत्पन्न होती, उद्योग करणें नको; षड्रसानें भरलेलें पात्र पुढें मांडलेलें असलें पुरे. जेवल्यावांचून पोटांत जातें, तर असें नव्हे कळलें. उद्योग केलाच पाहिजे. जर उद्योग नाहीं आणि चांगली सुपीक भूमि आहे तर काय व्हायाचें आहे. यद्यपि भूमि सरासरी आहे पण उद्योग विशेष आहे, तर तेथें शेंकडो शेतें भातें बागबगीचे होऊं लागतील. अरे या आपल्या जवळच्या महाबलेश्वरची जमीन तर केवळ डोंगरी परंतु तेथील चिनई लोक मुंगीसारिखे उद्योगी, त्यानी अलीकडे बटाटे लावण्याचा उद्योग काढिला आहे. त्यावर सर्व आपली उपजीविका चालवीत आहेत. त्यांतून कांहींकानी बराच संचयही केला आहे. हा केवळ हलका दृष्टांत खरा, परंतु उद्योग केला असतां संपत्ति मिळायास अशक्य नाहीं असें यावरून सिद्ध होतें ॥ उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी, दैवं प्रधानमिति कापुरुषा वदंति ॥ उद्योगी पुरुष सिंहासारिखा समजावा, त्यालाच लक्ष्मी प्राप्त होती. आळशी जे, ते दैवानेच लक्ष्मी प्राप्त होती असें मानून हातपाय पोटाळून बसतात.

गोपाळ : तर मग जमिनीची गरज नाहीं असा आपला भाव काय ?

गुरु : मी तसें ह्मणत नाहीं, परंतु तुझ्या बोलण्यांतून असें सिद्ध होतें कीं, संपत्तीचें उत्पादक कारण काय ती जमीन, त्याचें खंडन करण्यासाठीं मी एवढें बोललों.

गोपाळ : तर मग केवळ उद्योगापासून तरी संपत्ति उत्पन्न होती काय ?

गुरु : मी तसें म्हणत नाहीं. संपत्तीचीं मुख्य जीं उत्पादक कारणें त्यांतीलच उद्योग व जमीन आहे.

गोपाळ : बरें एक मनुष्य उद्योगी आहे, आणि त्याच्या मनांत कांहीं तरी आपल्या श्रमाचें सार्थक करावें असें आलें, आणि त्यास पाहिजे तितकी जमीनही मिळत आहे; तरी त्याच्या श्रमाचा काय उपयोग ? त्याच्याजवळ कांहीं साधन नाहीं तर उद्योग व जमीन असून निष्फळ.

गुरु : उद्योग आणि भूमि ही जी संपत्तीचीं उत्पादककारणें, इतक्यानेच कार्य होतें, असें नाहीं. दुसरेंहि एक कारण आहे. श्रम करण्यास साधनीभूत पदार्थांचा जो संचय तोही संपत्तीचें उत्पादक-कारण होय. ते पदार्थ कोणते ह्मणशील तर ऐक. कुणबी मृगसालीं शेत करायास लागतो. त्यास तें करायाच्या पूर्वी किती साधनें पाहिजेत बरें ? एकतर नांगर, बैल, कुदळें, पावडीं इत्यादि हत्यारें तर प्रथमच पाहिजेत. व तींहि नुसतीं असून फळ काय ? त्याजवळ चार महिन्यांची बेगमी पाहिजे. या प्रकारें सर्व सामग्री असेल तेव्हां पुढें शेतकी होणार. ही सामग्री उद्योगानें प्राप्त होती. याप्रमाणें पाहतां संपत्तीचीं मुख्य उत्पादक कारणें दोन सिद्ध होतात. उद्योग आणि सृष्टींतील पदार्थ, त्यांत मुख्यत्वेंकरून, जमीन, पाणी, वायू इत्यादिक आहेत.

गोपाळ : तेव्हां संपत्तीच्या उत्पादककारणांत एकटी जमीनच येत नाहीं. सृष्टींतील अणखींही पदार्थ येतात.

गुरु : होय, वनस्पति, धातु, इत्यादि जे सृष्टींतील पदार्थ त्यांतलाच जमीन हा एक मुख्य पदार्थ होय. जशी जमीन संपत्तीचे उत्पत्तीस आवश्यक, तशींच जल, इत्यादिक आवश्यक आहेत. कोणी देश-व्यवहारव्यवस्थावेत्ते तीन उत्पादककारणें सांगतात, तीं अशीं कीं, एक उद्योग, दुसरें, पूर्वोक्त साधनीभूत संचित सामग्री, जीस भांडवल असी संज्ञा आहे; तिसरें प्रकृति ह्मणजे ईश्वरसत्ता.

गोपाळ : महाराज, संपत्ति उत्पन्न करायाची ती शिल्पादि व्यापाराने उत्पन्न करितात. तेथें प्रकृतीचा काय संबंध ?

गुरु : शिल्पादिकांसहि प्रकृतीचा संबंध आहे. सुतार पेटी तयार करूं लागला असतां त्या पेटीची अनेक आंगें प्रकृतीच्याच संबंधानें एकमेकांस जडल्यामुळें ती पेटी होती. पदार्थांचे कण एकमेकांस जडून राहावे हा प्रकृतीचाच धर्म. यास स्नेहाकर्षकत्व म्हणतात. हा काष्ठादिकांच्या ठायीं नसता तर शिल्पव्यापार कोठून घडता ? ह्मणून संपत्ति उत्पन्न करायास स्नेहाकर्षकत्व, प्रकाश, उष्णता, यांचें साह्य अवश्य पाहिजे. हींच जर प्रतिकूल झालीं, तर आपलें कांहीं चालणार नाहीं.

गोपाळ : बरें संपत्तीचीं मुख्य उत्पादककारणें दोन, ह्मणजे एक उद्योग व एक तत्साधनीभूत पदार्थ, असें ह्मटलें असतां चालेल ना ?

गुरु : होय, संपत्तीचीं मुख्य उत्पादककारणें तुला समजलीं. आतां त्यांचे स्वरूपाचा विचार करूं. त्यांत प्रथम उद्योग. गोपाळा, उद्योग अथवा श्रम किती प्रकारचा असतो ?

गोपाळ : उद्योग दोन प्रकारचा. एक मानसिक उद्योग, व एक शारीर उद्योग.

गुरु : चांगलें उत्तर दिलें. अमुक एक गोष्ट एकट्या मानसिक उद्योगानेंच सिद्ध जाहली असें नाहीं; व अमुक एक केवळ शारीर उद्योगानें झाली असेंही नाहीं. तर सर्व कामांत दोन्ही उद्योग अधिक उणे असतात. ओझीं वाहाणारे हमाल यांसहि ओझें कसें घ्यावें, कोठें न्यावें असा किंचित तरी मानसिक उद्योगाचा संबंध आहे. तसाच मोठा कालिदासासारिखा विद्वान असला तरी, त्यास आपले ग्रंथ लिहिले अथवा लिहविले पाहिजेत. अभ्यास करिते वेळीं अनेक प्रकारचा शारीर उद्योग केला पाहिजे. संपत्ति उत्पन्न करायास हे दोन्ही उद्योग आवश्यक आहेत. जशीं कात्रीचीं दोन पातीं निराळीं केलीं तर, एकापासून कांहीं कार्य व्हावयाचें नाहीं, तसेंच मानसिक व शारीर श्रमाविषयीं समजावें.

गोपाळ : महाराज, उद्योगास प्रकृतीची तादृश आवश्यकता नाहीं तें माझें बोलणें मला खरें वाटतें.

गुरु : या प्रकरणाचा पुढें विचार होईल. यासमयीं इतकेंच सांगतों कीं, सृष्टींतील वायु, उदक, भूमि, तेज, उष्णता इत्यादि प्रकृतिसिद्ध पदार्थांच्या भिन्नभिन्न शक्ति त्या मनुष्यांच्या कृतीस अनुकूल होऊन उद्योग सफल करितात. सृष्टींतील पदार्थमात्राचे जे सांसिद्धिक धर्म व त्यांच्या ज्या निरनिराळ्या शक्ति तें अवघें, एकटी प्रकृतीच नटली आहे असें समजावें. आतां जमीन पाहिजे तितकी नाहीं; परंतु वायु, उदक, तेज, व उष्णता, हीं बहुतेक जागीं पाहिजे तितकीं प्राप्त होतात. या करितां ज्या नियमांच्या अनुरोधेंकरून भूमीचा व्यवहार चालतो, त्याच नियमांच्या अनुरोधानें यांचा चालत नाहीं; परंतु जेथें पाण्याच्या प्रवाहाच्या योगानें जांतणीनें पीठ दळतां येतें, तेथें पाणीही किंमतीस चढतें, त्याचप्रमाणें इंग्लंड देशीं मज्जनघंटिका ह्मणून एक पाण्यांत उतरण्याकरितां घांट केलेली असती, तींत बसून पाण्याचे तळाशीं गेल्यानंतर त्यांस खालीं प्राणरक्षणार्थ वायु पाहिजे तो, फार खर्च करून या यंत्रांनी आंत सोडून द्यावा लागतो, तेथें त्या वायूस किंमत चढती.

गोपाळ : बरें, पण पूर्वोक्त कारणांनीं संपत्ति उत्पन्न होती, तर मग सर्व देशांत सारखी कां होत नाहीं ? गुजराथप्रांतीं व नर्मदाकांठी रानामध्यें जे गोंड, व भील लोक आहेत, ते मेहनत करितात, व सुरतेजवळचेहि लोक शेतकीची मेहनत करितात, परंतु त्यांच्या आणि यांच्या स्थितींत इतकें अंतर कां ? त्या डोंगरी लोकांस तर रात्रंदिवस मेहनत करून पोटास अन्न व पांघरायास वस्त्रही पुरेसें मिळत नाहीं. तेव्हां याचें कारण काय ? या आपल्या देशामध्यें लोक मेहनत करितात, व इंग्लांड देश (ह्मणजे जेथून सांप्रतचे देशाधीश आले आहेत) त्या देशांतही लोक उद्योग करितात, असें असतां तिकडेच कां इतका व्यापार, कला, विद्या, संपत्ति, आणि आपल्या देशामध्येंच कां नाहीं ?

गुरु : फार चांगला प्रश्न केला, एणेंकरून तर अनुभवसहित ज्ञान इत्यादि जीं संपत्तीच्या उत्पत्तीचीं उपकारणें तीं सांगावीं असें सुचविलेंस. अरे, संपत्ति उत्पन्न करण्याचीं जीं साधनें आहेत; त्यांचा चांगला उपयोग जाहाला नाहीं, तर तीं सर्व निर्फळ होतात. दोन चांगले कसबी लांकडें चिरणारे व व दोन अडाणी गडी यांस सारखीच हातेरें देऊन लांकडें चिरायास सांगितलीं, तर कसबी, ते वरचेवर तें काम करितील. तसें अडाण्याच्या हातून होणार नाहीं. किंबहुना हत्यारांचाही नाश करून आपणास दुखापत करून घेतील. यावरून त्या गोंड लोकांच्या व जवळच्याच कृषि करणाऱ्या लोकांच्या स्थितींत अंतर कां हें समजावें. तसें अंतर येण्याची दुसरींही पुष्कळ कारणें आहेत. तीं तुला सांगायाचे पूर्वी आणखी एक गोष्ट सांगतों ती अशी.

पूर्वीपासून आपल्या हिंदुस्थान देशांत नानाप्रकारचीं वस्त्रें उत्पन्न होऊन येथून दुसऱ्या देशास जात असत. सुमारें सन पंधराशांपासून युरोपियन लोकांचा इकडे प्रवेश झाला, तेव्हांपासून कांहीं वर्षें जोंपर्यंत इकडे पोर्तुगीस (ह्मणजे फिरंगी) लोकच मात्र येत होते, तोंपर्यंत हिंदुस्थानाचा व्यापार एकसारखा चालला होता, परंतु पुढें जेव्हां इंग्लिश (ह्मणजे इंग्रेज) इकडे आले तेव्हां त्यांनीं हळूहळू इकडील कापडाच्या व्यापाराचा मोड करायासारिखा उद्योग मांडिला. तो प्रकार असा; इकडून कापूस नेऊं लागले, व तिकडे एक मोठा बुद्धिमान् व कल्पक असा वाटस नामें कोणी विख्यात पुरुष जाहाला, त्यानें अनेक व्यापारांस उपयोगी पडणारें असें जें वाफेचें यंत्र त्यास फार चांगले संस्कार करून तें पूर्णतेस आणिलें. तसेच आर्करैट् इत्यादि साहेबानी कापूस पिंजून विणण्याच्या मोठ्या कुशल युक्ति काढून शिल्प कलेचा इतका उत्कर्ष केला कीं, आज ते लोक आपल्या देशांतून कापूस नेऊन, तिकडे वस्त्रें विणून इकडे तीं वस्त्रें परत आणून विकतात. तरी तीं आपणास एथल्या केलेल्या सनगांपेक्षां विशेष स्वस्त पडतात. म्हणून इतकी शक्ति त्यांजमध्यें येण्याला, जरीं मूलभूत कारण उद्योग तरी दुसरींही साधनीभूत कारणें बहुत आहेत, त्या प्रत्येकांचा आपण विचार करावा.

म्या तुला संपत्तीचीं उत्पादक कारणें मुख्यत्वेंकरून सांगितलीं खरीं, परंतु त्यांपासून आपणास अधिकाधिक फल प्राप्त होण्यास दुसरींहि तदंगभूत उपकारणें अनुकूल करून घेतलीं पाहिजेत. हीं सर्व संपत्तीचीं उत्पादक कारणें आपणास जशीं जशीं समजत जातात तशी तशी आपली संपत्ति उत्पन्न करण्याची शक्ति वाढती.

गोपाळ : महाराज, जशीं संपत्युत्पादक कारणें सांगितलीं तशीं उपकारणेंही सांगाल परतु तीं ऐकून घेण्यापूर्वी एक शंका आली आहे ती सांगतों. आपण संपत्तीचीं उत्पादक कारणें अनेक प्रकारचीं सांगतां, परंतु मला वाटतें कीं उद्योग हाच संपत्तीचें उत्पादक कारण होय; सोनें रुपें जरी झालें तरी तें खाणींतून खणून काढावें तेव्हां हांतीं येतें, पण एकटें सोनें रुपें मिळून संपत्ति होत नाहीं, आणखी कांहीं असलें पाहिजे. बरें घरें म्हणावीं तीं तरी बांधावीं तेव्हां होतात. धान्यादिक तरी शेतमळा करावा तेव्हां उत्पन्न होतात. कसबी कारागिर लोक नाना तऱ्हेचे जिन्नस उत्पन्न करितात; त्याला तरी कष्ट करावे लागतात. यावरून असें सिद्ध होतें कीं कष्ट करणें हाच संपत्ति मिळवावयाचा उपाय. कष्टांपासून सर्व संपत्ति उत्पन्न होती.

गुरु : संपत्ति उत्पन्न व्हावयास कष्ट केले पाहिजेत ही गोष्ट मी कबूल करितों, परंतु केवळ कष्टानेच संपति उत्पन्न होती असें नाहीं; कारण रानटी लोकांस पहा किती कष्ट आहेत, तसे कष्ट चांगली शेतकी करणाऱ्यास पडत नाहींत, असें असतां रानट्याकडेस कांहीं संपत्ती असत नाहीं, शेतकऱ्याकडे तर धान्यादिक संपति असती. रानटी माणसास जें पोटास पाहिजे तें मिळावयाकरितां तरी कोठे कोठे हिंडावें लागतें. तें हिंडणें केवळ जिवाशी सापका असतें, केवळ साधें घर, अगदी जाडीं भरडीं आउतें अथवा हातेरें, तसेंच दुसरें कांहीं करणें झालें ह्मणजे अडचण पडती, असे रानटी लोकांस कष्ट आहेत. तूं ह्मणसील कीं चांगल्या सुधारल्या माणसास तरी कष्ट करावे लागतात, तर कष्ट मनुष्याचे पाठीमागे लागलेच आहेत. त्याने कष्ट करून आपला निर्वाह करावा असीच नेमणूक आहे, असें असतां रानटी माणूस कष्ट करितो त्याला पोटापुरतें मात्र मिळतें, परंतु चांगला सुधारलेला माणूस कष्ट करितो त्याला संपति मिळती.

गोपाळ : रानट्यास कोठून संपति मिळेल ? त्याची कळा कुशळता करमणूक झटली ह्मणजे कायती पारध, झोंपडी बांधणें, हातेरें करणें अथवा कांहीं साधी घरखटल्याची खटपट करणें हें त्याचे हातून चांगलें नीट होत नाहीं. चपळाइने, हौसेने एकसारिखें जुडून जो उद्योग करायाचा तो सुधारलेल्या माणसापासून होतो, तो रानट्यापासून कोठून होणार ? रानटी लोक इतके आळशी व आडाणी असतात कीं कोणा एकाचा आळशीपणा अथवा मूर्खपणा सांगणें झाल्यास तो रानटी आहे असें बोलतात.

गुरु : तेव्हां अनुभवसहित ज्ञान व लक्षपूर्वक अवलोकन असलें तरच चांगल्या रितीने उद्योग करितां येईल. मग जसा उद्योग करायाचा तसा केला असतां त्या उद्योगापासून संपति उत्पन्न होती. असा उद्योग रानटी लोकांत वाढवावा, त्यांचा आळस घालवून जागें करून त्यांस धीर द्यावा. त्यांस एकसारखी मेहनत करायाची सवई लागे असी अशा (आशा) दाखवावी. मनुष्याचा असा स्वभाव आहे कीं त्यास आळस गोड वाटतो, उद्योग झटला ह्मणजे जीव तोडून काम केलें पाहिजे; असें जीव तोडून काम जेव्हां तसाच नेट लागतो तेव्हां होतें. सुधारलेले लोक मोठे उद्योगी असतात पण त्यांस उद्योगाची सवई चांगलें शिकल्यामुळे लागती, आपेंआप लागत नाहीं. त्यांस पोटास अन्न आणि आंगास वस्त्र इतकीच इच्छा असत नाहीं, तर अनेक प्रकारचीं सुखें, व उपभोग दृष्टीस पडतात, त्यांचीहि इच्छा असती, तेव्हां असे इच्छेच्या नेटाने ते मोठ्या उद्योगास लागतात. ते त्यांचे कष्ट करीत असतात व मेहनतीचा पैका मिळवीत असतात आणि जसी जसी सुखांची व

भोगांची गोडी घेत जातात तसा तसा हौसेने आणखीही उद्योग करीत जातात. असें रानटी माणसास होत नाहीं. त्यास कशाचें अगत्य लागलें आणि तें त्यावेळीं मिळायासारिखें नसलें तर तो त्याविषयीं झटत नाहीं. त्यास काहीं चांगलें शिकविणें नाहीं, अज्ञान फार, त्यामुळें इच्छा कमी असती, उत्पन्न व्हावयाजोगलीं सुखें त्याच्या पाहण्यांत येत नाहींत. चांगल्या गोड मौजांसीं त्याची गांठ पडत नाहीं मग तिकडे त्याचें मन धांव घेईल कोठून ! जें कांहीं त्यास फार अगत्य असतें त्या नेटानेच तो जागा होऊन काम करूं लागतो आणि भुकेची चणचण मिटली म्हणजे मग पुढें कसें होईल याची चिंता न करितां स्वस्थ निजतो.

गोपाळ : असी जर रानटी लोकांची स्थिति असली तर ते सुखी समजावे. एक तर त्यांस कमी इच्छा, आणि ती तरी जीवाची आटापिटा न करितां तृप्त होती. असे सुधारलेल्या देशींच्या मेहनती लोकांस होत नाहीं. त्यांस इच्छा पुष्कळ असून प्राप्ति थोडकी, तेव्हां त्यांस सुख कोठून असेल ?

गुरु : केवळ अज्ञानाने जड बुद्धि व पशूसारिखी स्थिति होऊन इच्छा नाहींसी होती ती तृप्ति नव्हे, त्यास सुख म्हणूं नये. नाना देश फिरून आल्याचें वर्तमान कोणी एके कवीनें काव्यरूपानें इंग्रेजींत रचिलें आहे, त्यांत एक चांगलें सुरस वचन आहे, त्याचें तात्पर्य खरें वाटतें, तें असें कीं, कोणे एके गोष्टीचें अगत्य लागल्यामुळें मन तिकडे धाऊं लागतें, तेणें करून जी इच्छा उत्पन्न होती, ती प्राप्त झाली असतां जसा काय आनंदाचा झराच मिळाला असें मनास होत जातें. बुद्धीस जडपणा येऊन त्यामुळें इच्छा नाहींसी होती त्यास तूं सुख मानीत असलास तर तें तसलें सुख तरी रानटी माणसास नेहमी आहे असें नाहीं. रानटी मुलखांत जाऊन आल्याचीं वर्तमानें वाचून पाहिलीं असतां असें आढळतें कीं सुधारलेल्या देशींच्या खेड्यापाड्यांतील मेहनती लोक जी संपति व सुख भोगितात तसें संपति व सुख रानटी लोकांस नाहीं. इतर उपकारणें सांगण्यापूर्वीं मालांचें रक्षण म्हणून जें शेवटचें उपकारण त्याकडे लक्ष लागावें म्हणून तुलाच एक प्रश्न करितों, असो बरें कोणी चांगला सुधारलेला मनुष्य रानटी लोकांच्या गांवीं जाऊन चांगली सोयवार झोंपडी कशी बांधावी, पावसाळ्यांत चार महिन्याकरतां थोडिसी बेगमी कशी करून ठेवावी, तीर कामठे चांगले कसे करावे अशा उपयोगी कामाच्या युक्ति एकएकास शिकवूं लागला तर तेथें काय होईल ?

गोपाळ : तेथें असें होईल कीं, तो सुधारलेला माणूस काम करण्याच्या चांगल्या युक्ति शिकवील त्यांपासून कित्येकांस सुख होऊं लागेल; तें गावांतील दुसरीं माणसें पाहून आपण त्या युक्तिप्रमाणे काम करूं लागतील. तेणेकरून हौसेंने उद्योग करावा असेंच जिकडे तिकडे होईल.

गुरु : पण रानटी लोकांतून एकाने उद्योग करून जें मिळविलें असेल तें कोणी आळसी माणूस बळजोरी अथवा दगा करून घेईल; कष्ट करून झोंपडी बांधली असेल त्यांत आपण शिरून त्या झोंपडी बांधणारास बाहेर हांकून लावील. बेगमीकरितां साठवण करून ठेविलें असेल तें लुटून नेईल. चांगले अणीदार तीर केले असतील तेच घेऊन त्याचे छातींत मारील, असें बहुत करून घडायाचें नाही काय ? असें जर होऊं लागलें तर सुधारणूकच नाशास कारण होईल. मग ती सुधारणूक कोणी करावी ? जे काहीं मिळवावें ते सुख न देतां उलटें दुःखांत घालूं लागलें आणि जें आपल्या जवळ राहील असाही निश्चय नाहीं असें वाटूं लागलें तर तें मिळवावयास उद्योग तरी कोणी करावा ?

गोपाळ : पण मालाचें रक्षण व्हावें याकरितां कायदा ठरविला तर तसे अनर्थ होणार नाहींत.

गुरु : खरें; पण अमुक मालावर अमुक्याची सत्ता असें पहिल्याने सिद्ध झालें पाहिजे, नंतर त्या सत्तेचें रक्षण होईल. ईश्वराने सर्व वस्तू उत्पन्न केल्या, त्या वस्तूंवर सर्व मनुष्यांची सत्ता एकसारखीच असतां हा माल अमक्याचा असावा, हा तमक्याचा असावा, असें जें लोकांत ठरलें त्यास कायदा म्हणावें. हें माझें; तुझें नव्हे, अशी मालावर सत्ता करण्याची चाल केवळ लोकांच्या पहिल्या

अवस्थेपासून पडून गेली. त्यावरून कोणास असें वाटेल कीं, मालावर सत्ता करणें हें मुळचेंच सिद्ध आहे, ठराव केल्याने झालें नसेल. पण असें नाहीं. कायद्यावरून ठराव होईल तोंपर्यंत अमुक एक वस्तू माझी असें म्हणण्यास कोणा मनुष्यास अधिकार नाहीं.

गोपाळ : ज्याने मेहनत करून शिकार मारली, अथवा झोंपडी बांधली, अथवा आऊतें केलीं, त्यासही त्या त्या वस्तू माझ्या असें ह्मणण्यास अधिकार नाहीं काय? त्या वस्तू कोणी बळजोरीने हिरावून घेतल्या तर त्या हिरावून घेणाराची सत्ता त्यां वस्तूंवर होणार नाहीं.

गुरु : ज्या मनुष्याने एकादी वस्तू आपल्या मेहनतीने उत्पन्न केली, त्या वस्तूंवर त्याची वास्तविक सत्ता असें नीतीनें सिद्ध होतें. परंतु कांहीं एक वस्तू सृष्टींतील वस्तूंतून वेगळी करून ही माझी असें ह्मणून आपल्या उपयोगास लावण्याविषयी सत्ता करणें तें कायद्यावरून ठरतें.

यास उदाहरण. जर जमीन असली तर ही इतकी जमीन राघवजीची. ही दुसरी गोविंदाची व तिसरी मोरोबाची; ह्या जमीनी आपआपल्याकडे ठेवण्याविषयीं व त्यांचें उत्पन्न घेण्याविषयीं ह्याच मनुष्यांची सत्ता आहे. यांनीं त्या आपल्याकडे ठेवाव्या, विकाव्या अथवा अदलाबदल कराव्या, जिवंत असतां कोणास द्याव्या अथवा आपल्या मरणानंतर अमुकास मिळाव्या असें मृत्युपत्रांत लिहून ठेवावें. या प्रमाणें जी व्यवस्था होणें ती कायद्यावरून होती, आणि हा कायदा लोकांनी मानावा म्हणून कायदा मोडणारांस दंड ठरविला असतो. हर एक प्रकारच्या मालाची व्यवस्था व रक्षण यांविषयीं असे कायदे झाले, तेव्हां अमुक मालावर अमुकाची सत्ता असें सिद्ध झालें.

गोपाळ : आपल्या बोलण्याचें मला नवल वाटतें, माझ्या मते माल पूर्वीपासूनच सिद्ध आहे, तो कायद्यावरून सिद्ध झाला नाहीं; तो जगाच्या केवळ प्रथम काळापासूनच उत्पन्न झाला आहे. असें कोठे वाचण्यांत आलें आहे कीं पूर्वीचे मूळ पुरुष कुटुंबें पुष्कळ झालीं तेव्हां विभक्त झालें, आणि जे दुसऱ्या ठिकाणीं वस्ती करायास गेले, ते तेथें आपले कळप चारूं लागले, व जमीन आटोपून बसले त्यांस कोणी हरकत केली नाहीं, त्यांची जमीनीवर सत्ता नाहीं असा त्यांजबरोबर कोणी वाद सांगितला नाहीं; त्यांच्या मागें त्यांचीं मुलें ही आपल्या बापाची जमीन असें समजून तेथेंच वसलीं व लागवड करूं लागलीं.

जर आपण एका ओसाड बेटांत आपल्याकडील लोक पाठवून वस्ती करवली, तर ज्या मनुष्यास जितकी जमीन लागेल तितकी त्याने घेऊन तिची लागवड करावी आणि आपआपले मिळकतीच्या रक्षणाविषयीं सर्वांस सारखी आस्था असावी याप्रमाणें हा अमुक्याचा ठराव होऊन हा माल अमुक्याचा, असें सिद्ध होईल. कायद्यांचें कारण लागणार नाहीं.

गुरु : असा जो ठराव होणें हाच एक कायदा समजावा; हा अगदीं अपुरा कायदा खरा, परंतु ज्याचें जसें बळ, त्याचा तसा माल असेल तेव्हां हाच कायदा चालू झाला असेल, तो असा; जर कोणी एक माणूस दुसऱ्याचें गुरूं अथवा त्याचीं फळें घेऊन जाऊं लागला, तर त्या दुसऱ्यानें त्यास अडवावें. तो जर बळकट व चांगला हत्यारबंद असला, तर त्याने त्या माल नेणारास ठार करावें, अथवा हांकून लावावें; जर तो बळकट नसला तर लुटला जावा. अथवा त्यानें आपल्या शेजाऱ्यांस साह्यार्थ बोलवावें आणि त्या माल नेणारापासून सर्वांस भय आहे असें दाखवून त्याचा सूड उगवायास शेजारी मिळवावे.

कोणी कोणावर उठूं लागल्यास त्याचा बचाव करणें आणि अपराध्यास शिक्षा करणें याविषयीं चांगला कायदा ठरेल, तेव्हांच जुलूम बंद होईल आणि तेव्हांच मनुष्याच्याने बोलवेल कीं हें शेत माझें, हें घर माझें, हें बीज मी जमिनींत टाकितों, यापासून माझी आणि माझ्या कुटुंबाची पुष्कळ बेगमी होईल; हें झाड मी लावितों, यापासून मला प्रतिवर्षास फळें मिळत जातील, तीं गोळा करून घ्यावयास मला माझीच सत्ता आहे,

गोपाळ : अशा कायद्यापासून जें हित होईल, तें आतां माझ्या लक्षांत पुरतेपणीं आलें. एणेकरूनच मालाचें रक्षण होईल. असे कायदे कायम झाल्यापूर्वी जे बळकट ते दुर्बळापासून सर्व हरण करून घेत असतील, व ज्यांच्याजवळ रक्षणाचा उपाय नाहीं, असे ज्ञातारे मनुष्य, स्त्रिया, मुलें यांस जे बळवान् ते लुटीत असतील, व यांवर बळात्कार करीत असतील. जे भुकेने मरणारे, आळशी, उडाऊ यांचा जे कोणी मेहनती व उद्योगी ते द्वेष करीत असतील. ह्यां कायद्यांवांचून असें होईल कीं ज्यांनी फार कष्ट करून मेळविलें असेल, त्यांचा मेहनत न करणारे जे लोक ते नाश करतील. सारांश मधमाशानी मेळविलेली मध गांधलांनीं खावी असें होईल.

गुरु : होय, रक्षण होणें ही मुख्य गोष्ट आहे; रक्षण झालें असतां उद्योगाचा उठावा होतो; मेहनत सफळ होती, जसें जसें रक्षण तसी तसी लोकांची सुधारणूक, तसी तसी संपत्ति व तसें तसें चहूंकडेस सुख असें होत असतें.

गोपाळ : हें सर्व खरें, परंतु जमीनीच्या मालाविषयीं जी व्यवस्था सांगितली, त्यावर मला एक शंका आली. आपण ह्मणतां अमुक्याची अमूक जमीन, अमुक्याची अमूक, असें ठरविण्याचे अगोदर सर्व लोकांकडेस जमीन असे, त्या जमिनीवर सर्वांचा सारखा दावा असे, जमीन मालाची व्यवस्था करण्याचा कायदा होऊन सर्व लोकांचा दावा जमिनीवरून उडवून ती थोडक्या लोकांस दिली; तेव्हां बहुत्येकांस गरीब करून थोडक्यांस मातबर करावें अशा करितां कायदा झाला, बरें पण कित्येकांस मातबर करायासाठी इतरांचें हरण करून घ्यावें असी कायद्याची काय सत्ता आहे? कायद्याने आपलें उदारपण दाखवणें असल्यास पहिल्याने जें वाजवी तें करून मग उदारपण दाखवावें.

ही शंका ह्मटली असतां स्थावर मालाविषयीं आहे. दुसऱ्या मालाविषयीं नाहीं, न्याय पुसाल तर मनुष्यानी आपल्या श्रमाने जें मिळविलें तें माझें असें ह्मणून त्याचा त्यानें संग्रह करावा. त्यानी जीं घरें बांधिलीं, जो जिन्नस कसबानें केला, तें सर्व त्यांचें त्यांच्याजवळ असावें. असें न करितां, कायद्यानें कोणाएकाची जमीन काढून कोणाएकास दिली तर अनीति होईल, दुसऱ्यांची जी त्या जमिनीवर सत्ता ती हरण केली असें होईल.

गुरु : तुझ्या मतें तर जो कोणी संपत्ति मिळवील ती त्याजवळ असावी. परंतु ती संपत्ति जेणेंकरून मिळवावी तीं साधनें त्याकडे नसावी. त्यानें आपल्या घराचा धनी असावें, परंतु तें घर ज्या जमिनीवर असेल ती जमीन त्याकडे नसावी. शेतांत पीक झालें असेल त्याचें रक्षण होऊन तें त्यानें घ्यावें पण त्यानें त्या शेताचा धनी होऊं नये, वाऱ्हा, फार चांगलें.

गोपाळ : त्या शंकेचा आपण उपहास केला यावरून समाधान झालें असें मला वाटणार नाहीं. त्यांत काय चूक आहे ती आपण दाखवावी. आपण म्हणाल कीं अमुक जमीन अमुक्याचा माल असें ठरल्यावांचून उद्योगाचा चांगला उठावा होणार नाहीं, तर याचें उत्तर असें आहे कीं ईश्वरानें जमीन उत्पन्न केली आहे, तीवर सर्वांची सत्ता सारखी आहे. ती जमीन वांटणें झाल्यास बरोबर वांटावी; एकास कमी, एकास अधिक, असी वांटूं नये.

गुरु : कोणे एके मुलखांत नवी वस्ती झाली म्हणजे तेथील ओसाड जमिनीची लागवड करावयास जे उमेदवार असतात, त्यांस त्यां त्यां जमिनींची बहुतकरून इनामपत्रें मिळतात. मुलुख जिंकून घेतला तर मात्र तो जिंकून घेणारा, आपल्या मर्जीस येईल त्याप्रमाणें जमीन वांटून देतो. असेंच या देशीं झालें असावें. युरोपखंडांत तरी उत्तरेकडील म्लेच्छ लोक शिरले, तेव्हां तेथील जमिनीची त्यानी वांटणी करून जाहागिरीची पद्धत चालू केली.

जमीनीची वांटणी पहिल्यानें कोणत्या कारणावरून झाली, प्रथम ती बरोबर वांटून दिली, अथवा

एकास कमी एकास अधिक असी वांटून दिली हें यथास्थित नकळे; परंतु सारखी वांटून दिली असली, तर ती तशीच समविभाग लोकांकडे चालेल असें होणार नाहीं.

गोपाळ : कां होणार नाहीं, कित्येक देशीं जमीनींचे समविभाग राहावे ह्मणून कायदे झाले होते, आणि कोठें त्या कायद्याप्रमाणें घडून आलें ह्मणून ऐकतों. युरोपखंडांतील रोमशहरांत आणि ग्रीस देशांतील स्पार्टा शहरांत जमीनीचे समविभाग चालावे ह्मणून ठराव झाले होते. स्पार्टा शहरांत तर समविभाग बहुत्येक वर्षें चालले ह्मणून सांगतात.

गुरु : त्यां कायद्यापासून रोम शहरांत कांहींच झालें नाहीं; स्पार्टा शहरांत असें झालें कीं, समविभाग जमीनीचा उपभोग करणारे जे लढाऊ लोक होते, ते तेथील गुलामासारख्या वागणाऱ्यां माणसांवर बळात्कार व निर्दयपणा करूं लागले.

एकाकडे अधिक, एकाकडे कमी जमीन होणें, हें त्या जमीन बाळगणाराचे बऱ्यावाईट चालीवर आहे. तो जर उद्योगी, चतुर, कुशळ असला, तर त्याकडे पुष्कळ जमीन होऊन पुष्कळ पीक उत्पन्न होतें. ईश्वरकृपेने त्याचा उद्योग सफळ होतो. तो जर आळशी, अव्यवस्थित, अज्ञान असला तर त्याकडची जमीन कमी होऊन बिघडत जाती. हाच त्याचे अव्यवस्थितपण्यास ईश्वराकडून दंड समजावा. असें असतां सर्वांकडे समविभाग जमीन राहावी असें केलें तर ईश्वराची नेमणूक एक आणि आपण करूं पाहतों एक, उद्योग्याचें फळ आळशाला व आळशाचा दंड उद्योग्यास असें होईल. कळलें ?

गोपाळ : आळशास गरिबी येती हाच त्याचा दंड समजावा असें आपण ह्मणतां, परंतु गरिबी आळसापासूनच येती असें नाहीं, दुखणें अथवा कांहीं अनर्थ प्राप्त झाला म्हणजे कांहीं उद्योग चालेना असें होऊन गरिबी येती. अशा समयीं आळशास जो दंड व्हावयाचा तो भल्या मनुष्यास होऊं लागला तर मग फार कठिण गोष्ट.

गुरु : कठिण तर खरी, परंतु एक आहे, लोकांची स्थिति एकसारखी नसती, संसारांत दुःखें सुखें येत जात असतात, त्यामुळें बहुतेक सत्कर्म आचरण्याचा योग येतो. जो पिडलेला त्याच्या मनांत असे भाव उत्पन्न होतात कीं हें ग्या सहन करून घ्यावें; ही ईश्वराची इच्छा, याविषयी संतोष मानावा, धीर धरावा. जो चांगला सुखी आहे त्याला असें वाटतें कीं लोकांवर उपकार करावा, दया करावी, उदार व्हावें, धर्म करावा. अशा वृत्तीनें संपत्तीचा चांगला नीट उपभोग घडतो, त्यापासून जो आनंद होतो तो संपत्तीचा सर्वोत्कृष्ट आनंद समजावा.

जीवांच्या सुखाकरितां प्रकृतिसिद्ध अनुकूलतेनें ज्या वस्तू केल्या आहेत, त्या उत्पन्न करण्यांत अधिक उणें औदार्य दिसतें, परंतु अशा अधिक उण्या देण्यांत तरी चांगलाच हेतु आहे. कित्येक वस्तु इतक्या पुष्कळ केल्या आहेत कीं त्या कधीं कमी होऊंच नयेत, असाच प्रकाश व वायु आहे. हीं तत्वें ज्याला पाहिजेत त्यानी घ्यावी. यांचा उपभोग करावा. परंतु यांवर आपलीच सत्ता असावी, हीं आपलाच माल करून ठेवावीं असें कोणाच्या मनांत येत नाहीं. श्वासोच्छ्वास करायास कांहीं मेहनत न पडतां वायु मिळतो, तसें अन्न मिळत नाहीं, व तें तसेंच घेऊन तोंडांत टाकतांच, मनुष्याच्या शरीराचें पोषण करीत नाहीं. अन्न जर वायुसारखें असतें तर त्या अन्नास अथवा अन्न उपजविणारे जमिनीस सृष्टींतल्या वस्तूंतून कोणी वेगळें केलें नसतें आणि हीं माझा माल असें करून घ्यावयास कोणाच्या मनांत कधीं कल्पना आली नसती.

गोपाळ : जसा वायु मेहनत केल्यावांचून मिळतो तसें अन्न मिळतें तर केवढा आनंद होता. मग मेहनत करायाची गरज राहिली नसती. सारींच माणसें ज्ञानी होतीं. ईश्वरानें ही सृष्टि रचिली आहे. यांतील चमत्कारांचा विचार करावा, तें पाहून आनंद करावा, याच कामाचे पाठीस सारे जण लागते.

गुरु : अरे व्यापार व्यवहार करावयास प्रकृतिसिद्ध अनुकूलता उपयोगी असतां तिचा विपरीत अर्थ

करितोस. असें आहे. सृष्टीचा जो क्रम चालत आला आहे तो लक्षांत ठेवून विचार करावा, त्याहून वेगळ्या विचाराकडे बुद्धि जाऊं लागली असतां त्यापासून भय आहे. असें आहे, कीं सर्वज्ञ जो ईश्वर त्याकडून जीवांचे पालनाकरितां जी जी नेमणूक घडली आहे तीच नीट व चांगली कळलें, त्याकडून जें जें घडतें तें तें कसें हितकारक होतें,. हें सर्व समजायापुरतें आपलें जीवांचें ज्ञान नाहीं. परंतु मेहनत केल्यावांचून अन्न मिळूं लागलें, तर कसें काय होईल हें स्पष्ट समजायासारखें दिसतें. अरे, अन्नाकरितां जर मेहनत करावी लागत नसती तर ज्ञानी होणें दूरच राहतें, अवघे लोक आळशी, रानटी पशूंसारखे होते. पोटाचीच काळजी नाहीं, मग मेहनत तरी करावी कशास, मग बुद्धि, शक्ति हीं तरी जागीं करावी कशास, गोड लागणार जो आळस तो तरी दवडावा कशास ? जसी मेहनत करायची तशी केल्यावाचून पोट भरणार नाही असें अगत्य झाल्यामुळें असें होतें कीं मनुष्याच्या मनबुद्ध्यादि व सर्व शरीरशक्ति पहिल्यानें पोटाचकरितां प्रगट होतात. पण तुझ्या मताप्रमाणें झाल्यास पोटाकरितां कोणी उद्योग करणार नाहीं, कारण असें सिद्ध झालें आहे कीं सर्वांचीच सत्ता जमीनीवर असली तर कोणी उद्योग करून बीज पेरून जें पीक उत्पन्न करील, तें एकादा आळशी माणूस येऊन कापून नेईल. ह्मणून अमुक जमीन अमुक्याचा माल असें ठरेल तेव्हांच मनुष्य जमीनीची लागवड करील. लागवड होण्याच्या अगोदर अमुक जमीन अमुक्याचा माल असें अवश्य झालें पाहिजे. कोणाचें ह्मणणें असें आहे कीं अंत नाहीं इतकी जमीन पुष्कळ असली आणि अंत नाहीं इतकें पुष्कळ उपजलें तरीही जमिनीची लागवड होणार नाहीं. जसीं दुसरीं तत्वें पुष्कळ केलीं आहेत तसी जमीन केली नाहीं. कांहीं कमी केली आहे, ही मनुष्याचे हिताचीच गोष्ट होय. जमीन कमी करण्याचें हेंच कारण दिसतें कीं मनुष्याच्या दडून राहिलेल्या शक्ति बाहेर पडून उद्योगास लागाव्या. उपजून मात्र मरणाऱ्या पशुसारिखी जी याची स्थिति ती यानें सोडावी, सुधारणुकीचे मार्गास लागून दिवसानुदिवस ज्ञानाच्या नव्या नव्या गोष्टी समजून घ्याव्या. अशा मार्गास मनुष्य लागलें असतां त्याच्या ठायीं विवेक नांदूं लागतो, अनेक प्रसंगांसी गांठ पडल्यामुळें त्याचें मन दृढ होतें, तें मन विपत्तीने नम्र होतें, ईश्वरभक्तीनें थोर होतें, लोकांसी प्रीतीने वागल्याने शांत होतें, शास्त्रविद्यादिकें करून प्रौढ होऊन चांगलें रसिक होतें. शेवटीं तो मनुष्य अतिशय सुख पावावयास योग्य असीं चिन्हें त्याच्याठायीं दिसूं लागतात.

गोपाळ : वः फार चांगलें, आपल्यासारखीं जीं इतर मनुष्यें त्यांच्या सुखाविषयीं आपण चांगला मार्ग सांगितला, या मार्गास भय नाहीं, मी उगाच आडरानांत शिरलों होतों, जमीनीची वांटणी केल्यावरून काय लाभ होतात तें आपण दाखविलें, त्यांविषयीं आतां संशय राहिला नाहीं. लोकांत जे मोठे उद्योगी व चांगले, अशास अधिक जमीन असावी असें आपल्या मतें असलें तर तें नीट आहे. त्यांस वांटून दिलेली जी जमीन, त्यापेक्षा चांगले मोठे जमीनीचे ते लवकरच धनी होतील. त्यांच्या जमिनीचें रक्षण होऊन ती त्यांच्या वारसांस मिळेल, त्यांकडेस जमीन असली तर तिची फारच चांगली लागवड होईल व पुष्कळच उत्पन्न होईल.

गुरु : अमूक जमीन अमुक्याची असें ठरलें असतां जमीनीच्या धन्याचीच संपत्ति वाढती असें नाहीं तर दुसऱ्या सर्व लोकांची संपत्ति वाढती.

संपत्ति वाढवावयाचा उपाय जमीनच आहे,ती ज्याकडे असेल त्याकडे तिचें रक्षण झालें म्हणजे उद्योगास जीव येतो, सामर्थ्य येतें, असा नुक्ताच विचार झाला. रानटी लोक असें समजतात कीं जमीनीवर आमची अवघ्यांची एक सारखी सत्ता आहे. अशा समजुतीनें ते जमीन वहिवाटितात. अमक्याची अमुक जमीन, तिचें अमक्यापासून रक्षण व्हावें, असें त्यांकडे नाहीं. गांवांतील शेतकऱ्यांच्या मालाचें रक्षण होतें ह्मणूनच ते रानटी लोकांपेक्षां चांगले सुखी आहेत.

गोपाळ : कायदा झाल्यामुळें मालाचें रक्षण होतें. कायदा सर्वांस उपयोगी आहे, यापासून गैरवाजवी होणार नाहीं.

गुरु : नाहीं होणार यांत काय सांगावें. कोणताही कायदा असो, त्याचा सर्वांस उपयोग आहे किंवा नाहीं, त्याजवरून तो वाजवी किंवा गैरवाजवी आहे असें समजावें. मनुष्य झटलें झणजे त्यानें मोकळें असावें हा त्याचा स्वभाव, अशी जी स्वभावसिद्ध मोकळिक तीस कांहीं अटक केल्याशिवाय कोणता कायदा असत नाहीं. असी अटक करितो झणून कोणास कायद्याचा कंटाळा येत असेल, परंतु कायद्याची अटक नसली तर मनुष्यांच्या जीवाचें, मालाचें, अब्रूचें अथवा त्यांच्या मोकळिकीचेंही रक्षण होणार नाहीं, असें अढळलें आहे, याकरितां मनुष्याला आपले मोकळिकेपैकीं कांहीं अंश कायद्यास द्यावा लागतो, तें घेऊन तो त्यांची बाकी राहिली मोकळिक राखितो आणि रक्षण झाल्यामुळें जीं सुखें होतात तींही सर्व राखितो. व्यवहार नियमाचे जे कायदे, त्यांजवर ब्लाकस्टोन म्हणून एक साहेब होऊन गेला, त्यानें इंग्रजींत टीका केली आहे, तींत असें लिहिलें आहे कीं; जो कोणी लोकांत येतो, त्याचें तें येणें माल विकत घेतल्यासारखें आहे. त्या मालाचे किंमतीबद्दल त्यास आपले स्वाभाविक मोकळिकेचा कांहीं अंश द्यावा लागतो, आणि त्यां लोकांसी व्यवहार करण्यापासून जे लाभ होणार त्या प्राप्तीवर लक्ष ठेवून त्यास त्यां लोकांनी काईम केलेल्या कायद्याप्रमाणें चालावें लागतें. कां तर आपल्या मर्जीस येईल तसें करायास कोणाची अटक नसावी, असें सुज्ञाच्या तर मनांत येणार नाहीं. एकानें मर्जीस येईल तसें करावें, मग दुसऱ्यानें तसें कां करूं नये, असें अवघेच आपआपल्या मर्जीप्रमाणें करूं लागले तर मग लोकांच्या कोणत्याही संसारसुखाचें रक्षण होणार नाहीं; असें आहे झणून देशव्यवहार अथवा जनव्यवहार स्वातंत्र्य झणजे लोकांतील प्रत्येकाची स्वाभाविक मोकळीक समजावी, ती मोकळीक मनुष्यानें केलेल्या नियमाचे अटकेंत ठेवावी लागती, पण सर्वांचें हित व्हावयास जितकी जरूर आहे तितकीच अटक त्या मोकळिकेस ठेविली आहे.

रयत आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें वर्तणूक करण्याविषयीं मुखत्यार आहे, परंतु ज्या प्रकरणीं सांगी अथवा अटक पाळली पाहिजे त्या प्रकरणीं मात्र रयतेस अटक असावी, असे जे कायदे सांगतात तेच लोकांनी मोकळीक राखायास योग्य आहेत.

गोपाळ : महाराज, अमूक अमक्याचा स्थावर माल, असें ठरविण्याच्या कायद्यावरून अनहित होईल झणून माझ्या ज्या शंका होत्या, त्या अवघ्यांचें आपण पुरतेपणीं समाधान केलें. आतां संपत्ति व सुधारणूक यांविषयीं जें आपलें बोलणें तें चालवावें.

गुरु : आपण हळूहळू चालावें, कां तर सुधारणुकीचीं एकामागें एक पाउलें फार हळूहळू पडत गेलीं आहेत. मनुष्यांचे बुद्धीचा उदय होतो, उद्योग चालूं लागतो, परंतु हे प्रकार तरीं एकामागें एक असे क्रमेंकरून होतात, आणि कोणाच्या लक्षांत येऊं नये इतकी त्या उदय होण्याची व उद्योगाची गति हळू असती.

एका देशांतून कांहीं लोक दुसरे ठिकाणीं जाऊन वसाहत करतात. तेथेंतेथें बहुतकरून सुधारलेले देश होतात, रानटी लोकांचा सुधारलेला देश झाला असें विरळा. अमेरिका झणून एक खंड आहे त्याचा जेव्हां शोध लागला तेव्हां तेथील लोक रानटी स्थितींत आढळले, ते केवळ शिकारी लोक असत, जेथें भटकत फिरायास कशाचा अडथळा अथवा प्रतिबंध नाहीं असी पुष्कळ जमीन जोंपर्यंत मनुष्यांचे दृष्टीस पडती, तोंपर्यंत स्थिरतेनें संसार करावा, अणि शेतकीकडे आपली योजणूक करावी, असें बहुतकरून मनांत देखील येणार नाहीं.

ज्या मुलखांत मोठींमोठीं मैदानें पुष्कळ असतात, तेथें गुरां, मेंढरांचें पोषण करून संसार

करण्याची वहिवाट असती, अशा रीतीनें संसार करायासाठीं तरीं असें अगत्य आहे कीं, जमीनीवर जरी सर्वांची सारखी सत्ता असली तरीं अमुक गुरें आमच्याचा माल असें कायम झालें पाहिजे. अशाच रीतीनें संसार करण्याची पूर्वी सिथीयन ह्मणून लोक होऊन गेले त्यांची वहिवाट असे; ते टार्टार म्हणून देश आहे तेथील मोठ्या मोठ्या मैदान जमिनींत रहात असत. त्यांसारिखेच अलीकडील टार्टार व आरब लोक आहेत; ते एक्या ठिकाणी राहात नाहींत. पूर्वीच्या जूइश ह्मणजे यहुदी लोकांप्रमाणें तंबूंत राहतात, कुरणांच्या शोधाकरितां आपले कळप बरोबर घेऊन इकडे तिकडे फिरत असतात.

मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, त्याला आळस गोड वाटतो, त्यामुळें शेतकीचे चालीस हटकून मोठा अडथळा होतो; कां तर शेतकीस तर बरेंच शाहणपण व माहितगारी पाहिजे. अर्थात अनुभवसहित ज्ञान व लक्षपूर्वक अवलोकन पाहिजे. एका हंगामांत मेहनत केली त्याचें फळ दुसऱ्या हंगामांत पदरीं पडेल. उपजला माल कोणी नेणार नाहीं, त्याचें रक्षण होऊन तो राहील असा दृढ विश्वास पडला पाहिजे. आपण असें कल्पावें कीं गुरें, मेंढरें, पाळून कोणी आपलें पोट भरीत होते, मग असतां असतां त्यांपासून शेतकीची चाल झाली, ती असी कीं, कोणी गुरें, मेंढरीं पाळणारे लोक जिकडे तिकडे फिरतां फिरतां त्यांची शत्रुशीं गांठ पडली, आणि आपले कळप आपण गमावूं असें त्यांस भय वाटलें ह्मणून एका ठिकाणीं वस्ती करून रहावें असें त्यांच्या मनांत आलें, तर जेथें रानांतील जनावरांचा उपद्रव अथवा जवळच्या जंगली लोकांचा फेरा न होई असें जें चांगलें सुरक्षित स्थळ असेल तेथें लक्षपूर्वक अवलोकन घडल्यामुळें निवडून काढितील. कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं पूर्वी कोणी सिकोप ह्मणून होऊन गेला त्यानें शहर रचायाकरितां एक खडक शोधून काढिला. त्या खडकावर किल्ला बांधिला. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, आपलें रक्षण करायास समर्थ असें जवळ राज्य असलें, तेथील एकादें चांगलें पिकाऊ जमिनीचें ठिकाण त्यांच्या दृष्टीस पडलें तर तें पाहून ते तेथें वस्ती करितील. सिरीया ह्मणून देश आहे तेथील एक्या ठिकाणीं वस्ती न करितां जिकडे तिकडे फिरणारे जे लोक त्यांविषयीं वोलनी साहेबानें असें लिहिलें आहे कीं, कोण्या एका प्रांतीं स्वस्थपणा असला, आपल्या रक्षणापुरती बेगमी व्हावयाजोगी असली, म्हणजे ते लोक तेथें वस्ती करितात आणि कोणाच्या लक्षांत न येई अशा तऱ्हेनें हळूहळू स्थिरपणानें संसार व जमीनीची लागवड करायाचीं कसबें करूं लागतात, याप्रमाणें वारंवार होत असतें. हीं कसबें ते हळूहळू समजून घेत असतील त्यांचे लक्षांत असें येत असेल कीं फळझाडें पुष्कळ करितां येतात. ज्यांपासून आपलें पोषण होतें अशा झाडांचा फैलावा करितां येतो. बीजें प्रतिवर्षास उत्पन्न होतात, आणि बहुत जातींच्या जनावरांस माणसांत वागण्याची सवई लागे असें करितां येतें. याप्रमाणें त्यां लोकांस निर्वाह करायास पुरतेपणी बेगमी झाली ह्मणजे त्यांच्या मुलांचें चांगलें पोषण होतें, त्यांचीं कुटुंबें वाढतात, व म्हातारपणीं व बाळपणीं चांगलें रक्षण होऊन संभाळ होतो. हें लक्षपूर्वक अवलोकनानें घडतें.

अशा अवस्थेंत त्यां लोकांस शेतकी सरासरी माहित झाली असेल. शेतकी जसी करायाची तसी करण्याची माहितगारी व्हावयास दैवयोगानें बहुत्येक गोष्टी घडून आल्या पाहिजेत. रानटी धान्य कोठें अढळलें आहे असें नाहीं, आणि ग्रीक म्हणून जे लोक होऊन गेले, ते असें मानीत, कीं धान्य मोठी अमोल वस्तु ही देवानें या पृथ्वीवर आणून लागवड कसी करावी हें शिकविलें. आथेन्स, क्रीट, सिसिली, मिसर, हे सर्व देश अशा अभिमान वागवितात कीं धान्याची प्रथम लागवड काय ती आह्मी केली. धान्याची लागवड कसी करावी हें प्रगट करून दिल्याचा उपकार जगावर कोणत्या लोकांनी केला असेल तो असो, अथवा त्या लागवडीची युक्ति प्रसिद्धीस येण्याचीं काय साधनें असतील तीं असोत, परंतु लोकांच्या हितास फार उपयोगी पडलेली असी धान्याच्या

लागवडीशिवाय दुसरी युक्तीच नाहीं. धान्य शेतांत लागलें असतें तेव्हां तर नाजूक दिसतें. परंतु यास उन्हाळ्याच्या उष्णतेचा आणि हिवाळ्याच्या थंडीचा विकार होत नाहीं. हें बहुधा सर्व हवेंत वाढायासारिखें आहे, मनुष्यालाच खायास उपयोगी पडतें असें नाहीं, तर घरखटल्याच्या बहुतेक जातींच्या जीवांसही खायास उपयोगी पडतें. धान्य बहुत वर्षें ठेविलें असतां राहतें. याजवर बहुत दिवस निर्वाह करितां येतो, पुढें येणाऱ्या काळाचें भय वाटत नाहीं. ज्या काळीं अगदीं पीक येत नाहीं त्याकाळींही याच्या योगानें सुकाळ असतो.

असें धान्यासारखें अमोलिक फळ देणारें जें झाड त्याच्या लागवडीस बरीच पुंजी असली पाहिजे, स्थायिक वस्ती झाली पाहिजे, या देशांत जशीं नांगर वगैरे वेडींवांकडीं करितात तशांचा उपयोग नाहीं, शेतकीचीं आऊतें चांगलीं असलीं पाहिजेत, गुरें ढोरें इत्यादि जनावरें पाहिजेत, सारांश अमुक अमक्याचा माल असें ठरल्यावांचून जे कारखाने उभे करितां अथवा चालवितां येत नाहींत, असे कारखाने घरीं असल्याशिवाय शेतकीस कोणाच्यानें हात घालवणार नाहीं. जंगली लोकांकडेस धान्य नसतें, जमीनीची लागवड नसती, घरखटल्याचीं जनावरें नसतात. हरएक वस्तू मिळाली असतां ती पुनः कसी उत्पन्न होईल असा विचार न करितां ते खर्चून नासून टाकितात. हें असें झाल्यामुळें कसी गोष्ट झाली आहे ती पहा. जितक्या भूमीवर आतां लाखों मनुष्यें आणि जनावरें रहात आहेत, तितकीच भूमी दोनशें किंवा तिनशें रानटी लोकांचें पोट भरायास पुरी पडेल किंवा न पडेल.

गोपाळ : महाराज, आपण जरा विसावा घ्यावा. अहः हः किती आणि कशा वेगळाल्या कल्पना आपण सांगितल्या; त्या ऐकून मी तर गुंग होऊन गेलों. या गोष्टी पूर्वी माझ्या लक्ष्यांत आल्या नाहींत हा मला चमत्कार वाटतो. या जगाची आतांची सुधारलेलीच स्थिति नित्य माझे दृष्टीस पडती, त्यामुळें असें लक्ष्यांत येत नाहीं कीं लोकांस बहुत अडथळे व अडचणी आल्या असतील, आणि श्रम घेऊन क्रमेकरून उद्योग करावे लागले असतील, तेव्हांच ही असी पूर्ण स्थिति प्राप्त झाली असेल.

गुरु : मागील स्थितीपेक्षां मात्र आतांची स्थिति पूर्ण; बरकड पूर्ण स्थिति अझून दूरच आहे असें वाटतें. तुझ्या तरी बोलण्यांत असेंच सिद्ध झाले कीं लोकांस पाहून जिवाला वाईट वाटावें असी त्यांची स्थिति आहे, पण या प्रकरणीं तुझें अवघेंच बोलणें कबूल करायासारिखें नव्हे. असो. हल्लीं जे कायदे आहेत ते कसे, लोकांची स्थिति वाईट किंवा बरी करायाजोगे आहेत, हाच आपण विचार करीत बसूं नये. संपत्तीची आणि सुधारणुकीची चाड होऊन लोक सांप्रत काळींचे स्थितीस कसे आले याचा शोध करीत चालावें.

गोपाळ : अमुक अमक्याचा माल असा कायदा झाल्यावरून कसीं मोठमोटीं कामें होतात, तें मला वाटतें, आतां चांगलें स्पष्ट समजू लागलें, या कायद्यामुळें रानटी लोकांचें जें एक्या ठिकाणीं न राहतां इकडून तिकडे फिरणें तें बंद होतें. मनुष्यें स्थिरपणें संसार करूं लागतात. आपल्या आंगीं एकसारखी मेहनत करायाची सवई लावून घेतात, शाहणीं होतात, दूरवर पाहून व्यवहार करितात, लागवड करून पृथ्वी कसी शोभवावी, उपयोगी जनावरांच्या वेगळाल्या जाती कशा वाढवाव्या, शरीरास पुष्ट करणारीं वनस्पति, झाडें, इत्यादिकांची वृद्धि कसी करावी, हें लोकांस समजूं लागतें. सारांश पोट भरायाचें भांडवल पुष्कळच वाढवावयाची शक्ति येती, तेणेंकरून असें होतें कीं ज्यांत थोडकीं गरीब झोंपडीं व कमती वस्ती, अशा मुलखाचा एक मोठा मातबर देश करितां येतो हें सर्व अनुभवसहित ज्ञानादि उपकारणांचें फळ. आतां बाकीचीं जीं उपकारणें तीं सांगावीं आणि क्रम सोडून सांगितलीं त्यांचेंही कारण दर्शवावें.

गुरु : अरे संवादरूप ग्रंथांत कल्पिलेला क्रम कोठून राहणार, शिष्याचे जसे जसे प्रश्न अथवा शंका होतील त्या क्रमानें सांगावें व समाधान करावें लागतें. तथांत तत्तत् प्रकरणसंबंधानें सांगेन म्हणून पूर्वीच सुचविलें आहे. मालाचें रक्षण म्हणून जें शेवटचें उपकारण तें अगोदरच सांगितलें यावरून तुझ्या मनांत शंका आली असेल. तर उद्योग आणि त्यापासून झालेला माल, व त्या मालाचें रक्षण तसेंच धान्यादि माल ज्या जमीनीवर होतो ती जमीन इत्यादिकांचा परस्पर असा संबंध आहे कीं यांतील एकादें प्रकरण निघालें म्हणजे तत्संबंधी इतर प्रकरणें सांगितल्यावांचून चांगली समजूत होत नाहीं. असो. मालाचें रक्षण, तसेंच उद्योगाची वांटणी, हीं मोठीं प्रकरणें हीं अझून सांगायाचीं आहेत. यांखेरीज राहिलीं जीं उपकारणें तीं थोडक्यांत सांगून हा संवाद संपवितों. इतकें बरीक मनांत ठेव कीं संपत्युत्पादक मुख्य कारणाची आणि उपकारणाचीं असी कांहीं व्याप्ति आहे कीं या संपत्तिशास्त्राचे प्रायः सर्व भाग यानी व्यापिले आहेत, म्हणून हीं थोडींबहुत पुढें वारंवार येत जातील.

गोपाळ : बहुत बरें, माझ्या शंकेचें चांगलें समाधान झालें. महाराज आतां जीं सांगायाचीं तीं प्रकरणें आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें सांगावीं.

गुरु : इतर दोन उपकारणें सांगण्यापूर्वी प्रकृतिसिद्ध अनुकूलतेविषयीं थोडेंसें पुनः बोलतों. चांगला देश, सुपीक जमीन, हवा आरोग्यकारक, असलीं म्हणजे मनुष्यास उद्योग करायास हुशारी येऊन संपत्ति वाढती. हिंदुलोक, चिनइलोक, मिसरलोक, तसेच या एशिया खंडाचे पश्चिमेकडील फिनिशिआ प्रांतांतील लोक, हे प्राचीनकाळीं मोठे प्रख्यात होऊन गेले, या लोकांत कलाकौशल्याचें ज्ञान प्रकट होऊन वृद्धीप्रत पावलें, इत्यादि सुधारणा पूर्वीपासूनच होण्यास कारण सुपीक भूमी इत्यादि प्रकृतिसिद्ध अनुकूलता होय. इकडील हवा उष्ण त्यामुळें मनुष्याचे अंगीं किंचित आळस व पोस्ती येती. असें असतांही आपल्या हिंदुस्थानांतील सुपीक प्रांतामधील लोक चांगले उद्योगी आहेत, तसे डोंगरी प्रांतांतील नाहींत. पहा सातपुड्या पर्वतांतील गोंड व भील लोक, बागलानामधील रानटी लोक, यांस सुधारणुकेचें वारेंहीं नाहीं. बरें गोपाळा, चांगली जमीन व चांगली हवा यांसारखीं दुसरीं संपत्तीचे उत्पत्तीस काय काय असावींत?

गोपाळ : मला वाटतें दगडी कोळसे, लोखंड, तांबें इत्यादि उपयोगी धातु, चांगलीं बंदरें, मोठमोठ्या नद्या इत्यादि संपत्तीचे उत्पत्तीस उपयोगी आहेत.

गुरु : होय; पूर्वोक्तप्रकारें प्रकृतिसिद्ध अनुकूलता ज्या देशीं असती, तेथें मोठमोठे व्यापारव्यवहार करण्यास फारच सोय पडतें, त्या योगानें संपत्तीची वृद्धिही फार होती. दगडी कोळसे, लोखंड इत्यादिकांचा व्यवहारांत काय उपयोग सांगावा? इकडे मुंबईतच पहा, ज्या त्या यंत्रांत कोळसे, जिकडे तिकडे लोखंडी यंत्रें, आगबोटी इत्यादि वाहक चालक यंत्रें, तीं सर्व दगडी कोळशानें चालतात. असो, परंतु असी प्रकृतिसिद्ध अनुकूलता असून लोकांचा उलींढालीं करण्याचा स्वभाव नसला तर तादृश संपत्तीची उत्पत्ति होणार नाही.

गोपाळ : कोठून होईल? अनेक व्यापार धंदे केले पाहिजेत. एक युक्ति साधीली नाहीं तर दुसरी युक्ति काढिली पाहिजे, हिम्मत धरली पाहिजे, एखाद्या धंद्यांत साधलें नाहीं तर तितक्यांतच अवसान सोडून बसतां कामा नये, एक ना एक उद्योग करीत असावें. असा ज्या देशीं लोकांचा स्वभाव असेल तो देश मातबर होईल. असींच उलींढालीं करण्याचा स्वभाव इकडे वाणी, मारवाडी, पार्शी लोकांचा असतो. म्हणून त्यांत मोठे सावकार व्यापारी असतात.

गुरु : होय, त्यांचा कांहींसा तसा स्वभाव आहे खरा, परंतु उलींढालीं करणारे म्हटले म्हणजे युरोपियन लोक. यांचा उद्योग तसाच व छातीही तसीच. नसेल ती युक्ति कल्पून काढावी, नसेल तो

देश शोधून काढावा, आणि जेणेंकरून व्यापार व्यवहार सुगम होई असें करावें. पहा काय छाती करून जलमार्गानें हिंदूदेशाकडे येण्याचा मार्ग शोधून काढिला, तें पोर्तुगीज लोकांच्या वृत्तांतावरून समजतें. नंतर पोर्तुगीज वलंदेज इत्यादिकांनी या देशीं येऊन नुसतें राज्यच केलें नाहीं, तर ज्यांत लाखो रुपयांच्या घडामोडी असे मोठमोठे व्यापारही केले. परंतु सांप्रत इंग्रेज लोकांसारखे उलाढालीं करणारे दुसरें लोक विरळा. किती मुलूख घेतला आहे, कोठें कोठें व्यापार चालविला आहे, काय काय कला विद्या काढीत चालिले आहेत, त्याचें वर्णन कोठपर्यंत करावें. इकडे आगीची गाडी चालू करण्याचा उद्योग झटला झणजे किती हें अकटोविकट लटलें. या लोकांचें लक्ष एकसारखें उद्योगावरच. यांसारिखेच दुसरे अमेरिका खंडामध्ये स्वतंत्र स्थानें म्हणून देश आहेत, तेथील लोक ते यांचे मुळचे भाऊबंद, परंतु हल्लीं स्वतंत्र झाले आहेत.

गोपाळ : महाराज, मला वाटतें, उलाढालीं करण्याचा जो स्वभाव हा गुण उत्कृष्ट, इतक्यानेंच सर्व संपत्ति प्राप्त होईल.

गुरु : तो गुण उत्कृष्ट खरा पण शहाणपण व सचोटी या गुणांनीं शोभला आहे. झणून एकटा उलाढालीं करण्याचा स्वभाव असून उपयोग नाहीं. जो व्यवहार करायाचा, तद्विषयक ज्ञान असलें पाहिजे, आणि ज्यांबरोबर व्यवहार करायाचा, त्यांशीं तूट न पडे, त्यांत आपली पत राही असी सचोटी अवश्य असली पाहिजे. ज्या ज्या कामांत, धंद्यांत लोक जसेजसे कुशल व निपुण असतात, तसेंतसें त्यांचे हातून तें तें काम चांगल्या प्रकारें व अल्पायासानें होतें. तसें अडाण्याच्या हातून होणार नाहीं. झणून कलाविद्यादिकांचा तसाच चातुर्य इत्यादिकांचा सर्वत्र प्रसर झाला पाहिजे. पहा बरें, अक्षरशत्रु असे जे शिल्पी व्यापारी लोक, त्यांत कोणी स्वभावतः चपळ असून हतोटीनें काम करणारा निघाला, तरी तो जो उत्तम शिक्षा पावलेला असून चांगला माहितगारीनें काम करणारा त्यास पोंहचणार नाहीं. आपल्या इकडचीं कसबें, कारागिऱ्या, शिल्पकामें, यंत्रादिक साधनें पहा आणि तींच युरोपियन लोकांचीं पहा, त्यांत यांत जमीन अस्मानाचें अंतर म्हणून जेथें ज्ञान शाहणपण आहे तेथेंच व्यवहारनैपुण्य वसतें.

गोपाळ : संपत्तीचे प्राप्तीस लोकांत शाहणपण अवश्य पाहिजे, याविषयीं तर माझी खातरी झाली. बरें सचोटीचा तरीं असाच उपयोग आहे काय ?

गुरु : होय, अरे नुसत्या अज्ञानी अप्रमाणिक हातकाम्याचे अथवा अटकळीनें किंवा अंधपरंपरेनें व्यवहार करणाऱ्याचे हातून काय व्हावयाचें आहे ? उत्तम कार्यसिद्धि व्हावी असी अपेक्षा आहे तर शिल्पी, व्यवहारी लोकांत शास्त्रजन्य ज्ञान, तें तरी अनुभवसिद्ध युक्ति आणि प्रमाणिकपणा इहींकरून युक्त असें असलें पाहिजे. उदमी व्यापारी लोकांचें काय प्रमाण, बोलतील एक आणि करतील एक, असी बहुधा इकडे समजूत असती. अमूक एक जिन्नस दोन दिवसांनीं देतों, त्यास च्यार दिवस लावितील. अथवा खराब कम किमतेचा देतील. असी लोकांची स्थिति असल्यास लोकांत सचोटी राहिली नाही असें सिद्ध होतें. हें संपत्तीचे वृध्दीस उलटें अपायरूप होय. अप्रमाणिकपणामुळें मोठें अनहित होतें. साधारण मजूर लोकांवर मोठमोठे पगाराचें चौकसनीस ठेवावे लागतात, लोकांत अप्रमाणिकपणा नसता तर हजारो रुपयांचा कोडताचा खर्च, तसाच सीबंदी, फौज चौकी पहारा इत्यादिकांचा खर्च न लागता.

युरोपखंडीं पुष्कळ देशीं मोठा व्यापार चालतो, तेथेंही सचोटीचे मनुष्य कोठे कोठे नसल्यामुळें व्यापारास फार नडी येतात. एकदां एके इंग्रेज सावकारानें एक जिन्नस बाहेर पाठविण्यांत लबाडी केल्यामुळे सर्व दुसऱ्या देशीं त्याची पत बुडून त्या जिन्नसाचा व्यापारही नाहींसा झाला. जर सर्व देशीं सचोटी एकसारिखी असती, तर व्यापार व्यवहार अकुंठितपणें चालते.

मेस्तर बाबेज म्हणून एक इंग्रेजींत ग्रंथकर्ता एक शहराच्या प्रमाणिकपणाविषयीं असें लिहितो, कीं इथें दररोज लाखो रुपयांचे जिन्नसाची खरेदी व विकरी होती. परंतु कोणी कोणास लिहून देत नाहीं आणि कोणापासून लिहून घेत नाहीं. पूर्वी लढाई चालत असतां इंग्रेज लोकांबरोबर व्यापार करूं नये असें फ्रेंच लोकांत ठरलें, असें होत असतां तिकडील मुलुखांत इंग्रेजांची एक अडत होती, तेव्हां बाहेर बातमी फुटूं नये, एकस्या अक्षरओळखीवर बिननावाने व बिनसहीने व्यवहार चालावा अशी उभयपक्षी समजून झाल्यावरून, काय तें अक्षरओळख प्रमाण धरून निःशंकपणें लक्षावधि रुपयांचा व्यवहार चालला, त्यांतून जर कोणी लोक अप्रमाणिक होऊन झालेल्या व्यवहारास हरकत सांगते अथवा बातमी फोडते, तर मोठा अनर्थ होऊन बहुत प्राणास मुकते.

गोपाळ : वः याचें नांव सचोटी. शाहणपण व सचोटी यांचा व्यवहारांत किती उपयोग सांगावा. हे दोन गुण दोन नेत्र होत. हे नसून नुसता उलींढालीं करण्याचा जो स्वभाव, तो आंधळ्या माणसाच्या अंगबळासारिखा जाणावा. आतां जें सांगायाचें राहिलें त्याचा उद्देक आरंभ करावा.

# पूर्वभागसंवाद ४

यांत मालाचें रक्षण झालें नाही तर कसें होतें ? बोलनी साहेबानें देश फिरून आल्याचें वर्तमान लिहिलें आहे त्यांतील गोष्टी दृष्टांतास कशा लागू होतात, अमुक माल अमुक्याचा असा कायदा होऊन त्या मालाचें रक्षण झालें असतां कायकाय लाभ होतात--या देशीं कुणब्याची जमिनीवर सत्ता किती व सर्कारची किती, जमाबंदी इत्यादि सांगितली आहेत.

गुरु : सुधारणुकीचें पाऊल पुढें पडून मालाचें रक्षण होईतोंपर्यंत तिची चाल आपण पहात पहात आलों. आतां जर विपरीत झालें, म्हणजे सुधारलेल्या देशीं मालाचें रक्षण झालें, तर मनुष्याची स्थिति बिघडून त्याची रानटी स्थिति होईल किंवा कसें हें आपण पाहूं.

गोपाळ : सुधारलेले लोक पुनः रानटी झाले असें कोठे घडलें आहे काय ? असा पालट झालेला म्या कधीही ऐकिला असें मला स्मरत नाहीं.

गुरु : तसें घडलें नसेल, कारण अमुक्याचा अमुक माल असी व्यवस्था एकवेळ झाली ह्मणजे तिजपासून अद्भुत लाभ होत असतात. तिचा अगदी उच्छेद कदापि होत नाहीं. ज्या मुलखांत सरकाराच्या जुलुमामुळें मालाचे रक्षण होत नाहीं, तेथील लोकांची बरिक स्थिति बिघडती, तेथील मुलखास पहिल्याप्रमाणे गरिबी व रानटी स्थिति प्राप्त होती. टैर ह्मणून एक मातबर शहर होऊन गेलें, त्याचा दुःखकारक पालट झाला. मिसर ह्मणून एक देश आहे जो कळा विद्यांचें मूळ ठिकाण, त्याचाहि फार मोड झाला. बोलनी साहेबानें देश फिरुन आल्याचें वर्तमान फ्रेंच भाषेंत लिहिलें आहे, त्यांतील कांहीं मराठींत केलेली वाक्यें, तूं वाचिसील तर मी जें नुत्तें बोललों तें खरें असें तुला वाटेल.

गोपाळ : तीं वाक्यें वाचितों, तीं असीं. सरकारच्या जुलमामुळे गांवांतील राहणारांस निदानची अवस्था प्राप्त होती. तेव्हां शेतकी करणारे लोक आपलीं घरें सोडितात, आपलीं कुटुंबें घेऊन डोंगरांत जातात अथवा मैदानांत फिरूं लागतात. कोणी व्यवहार करूं लागल्यास त्याजवर कानून कायद्याचा जुलूम होतो, तो टाळण्याकरितां कित्येक लोक लुटारू होतात आणि एकत्र जमून एक ल्हानसा तळ घालुन त्या तळाचें रक्षण शस्त्राच्या बळानें करितात. मग तो तळ वाढुन त्याच्या नव्या जाती व नवे वंश होतात. सारांश लागवडीस आलेल्या मुलखांतल्या लोकांस भटकत फिरण्याची स्थिति प्राप्त होती, ती सरकारची अनीति अथवा अव्यवस्था झाल्यामुळें प्राप्त होती.

गुरु : कसे ! माझ्या बोलण्याप्रमाणेंच बहुतकरून आहे ना ? पुढे वाचिसील तें तरी त्याच बोलण्यास लागू पडेल.

गोपाळ : पुढें वाचितों. त्रिपोली ह्मणून जें सिरिया देशाचें शहर तेथें तुतीच्या झाडांची उतार अवस्था होऊन गेली. त्यांत कांही जीव राहिला नाही. त्यांची कोठें कोठें पोकळ खोडें मात्र राहिलीं. त्यामुळें

तेथील रेशमाचें तेज नाहींसें होत चाललें. नवीन झाडें कां लावीत नाहींत असें म्हणावें, तर हें झणणें युरोपियन लोकांचें. नवीन झाडें कोणी कधीं लावीत नाहीं, नवीन कांहीं लाविलें अथवा बांधिलें तर ह्या मनुष्याजवळ पैका आहे हा यापासून काढून घ्यावा असें पादशहा बोलूं लागतो.

अशें जेथें मालाचें रक्षण होत नाहीं तेथें पुढें जें उत्पन्न होणार त्याजवर कोणी भरंवसा ठेवावा ? तुती लावावयास जी मेहनत व खर्च लागेल त्याबद्दल उत्पन्न माझ्या पदरीं पडेल असी आशा बाळगायास धन्यास कोणाचा आश्रय ? असी त्या देशाच्या सरकाराची रयतेचे अर्थाकडे दृष्टि असतां तें सरकार रयत लोकांत उद्योगाची उठावणी करीत नाहीं हा मोठा चमत्कार. कारण उद्योग वाढविला असतां सरकारचे चांगलें हीत होईल.

गुरु : तें राज्य तुर्क लोकांचे त्या राज्यास विपत्तीची दशा प्राप्त झाली आहे. राजापासून तर अगदी गरीब प्रजेपर्यंत कोणाचा जीव व माल सुरक्षित नाहीं. त्यामुळें पुढील उत्पन्नाची कोणी आशा करीत नाहीं. तुरुत मिळायासारखें असेल त्याविषयीं अवघेजण झटतात. आणि त्याचाच उपभोग करून राहतात. त्या देशीं गैरसमजुतीची राज्यपद्धती चालू आहे. तिच्यापासून त्या सर्वांस किती दुःख भोगावें लागतें तें अमळ पुढें वाच म्हणजे तुला समजेल.

गोपाळ : वाचितों. राज्याची दुर्दशा झाल्यामुळें पादशाहाच्या ताब्यातील बहुत्येक परगणे भिकेस मिळून ओस झाले. बाहेरून माल आल्याचा जो फार पूर्वीचा हिशोब त्यावरून पाहतां आलेपो झणून जे शहर त्याच्या पोटीं ३२०० शां पेक्षां अधिक गांव लागले होते. हल्लीं कमावीसदाराकडेस ४०० गांव मिळायास अवघड. इंग्लंड देशांतील जे व्यापारी तेथें वीस वर्षें राहिले. त्यांच्या समक्ष आलेपो शहराच्या भोंवर गांवापैकीं बहुतेक गांवींची वस्ती नाहींसी झाली. कोसळून पडलेलीं घरें, निरुपयोगी झालेले हौद, ओसाड पडलेलीं शेतें हेंच काय तें वाटसरूचे दृष्टीस पडूं लागलें. शेतांची लागवड करणारे शहरांत पळून जाऊन शहरांतील वस्तींत गडप होऊं लागले. मनुष्यें शहरांत जाऊन तेथील दाटींत लपून राहतात त्यामुळें असें होतें, कीं ते त्या नागविणाऱ्या राजाचे हातीं सांपडत नाहींत. दुसऱ्या मुलखांत कोठे कोठे असें होतें, कीं प्रांतात लोकवसती अधिक होऊ लागली म्हणजे ते लोक येऊन शहरांत वस्ती करितात. त्याप्रमाणें सिरिया देशीं होत नाहीं. इकडे तर प्रांतांत ओस पडून शहरें वसूं लागलीं. डोंगरावरील रस्ते फारच वाईट करून ठेविले, घोडेस्वार पाठऊन लोकांस नागवावें असे पादशाहाच्या मनांत येऊन घोडेस्वार पाठविल्यास रस्त्याच्या खराबीमुळें त्यांस येववणार नाहीं झणून रस्ते तसे होऊं लागले.

लोकांनीं चोरून छपवून व्यवहार करून कांहीं मिळविलें असतां त्याची बातमी लागल्यावरून पादशाहास आनंद होतो, तशा बातम्या ठेऊं लागल्यामुळें लोकांस आपल्या मेहनतीचें फळ मिळत नाहीं. त्यामुळें ते आपला उद्योग आटपून जें अगदीं जरूर तितकेंच मिळवितात, आपण उपासीं मरूं नये झणून मात्र कुणबी पेरितात. कसबी लोक आपल्या कुटुंबाचें रक्षण व्हावयापुरती, मेहनत करतात. तशांत कोणाकडेस चार पैसे उरून राहिले तर लपवून ठेवितात. असें झाल्यामुळें लोक दरिद्री आणि दुःखी झाले, मग अशांवर जो जुलूम करणारा तो तरी मातबर कोठून होईल ? मनास येईल तसें राज्य करावें, बलात्कार करून प्रजेस नागवावें, असा ज्या राजाचा स्वभाव तोच स्वभाव त्यास दंडरूप होतो.

गुरु : मुसलमान लोकांनी इराणांतील व हिंदुस्थानांतील मोठीं मोठीं राज्यें घेतलीं त्यावेळेपासून त्या राज्यांचा मोड होत गेला. त्याचें कारण असें दिसतें कीं, मालाचें रक्षण होत नाहीं म्हणून राज्याचा अथवा देशाचा मोड होतो. पूर्वी या देशांत मुसलमान राजे होऊन गेले. ते मोठे निर्दय असत, लोकांवर बलात्कार करीत, शेतकी करणारांस असा प्रसंग प्राप्त होई कीं आपलीं घरें, आउतें, पिकें

यांस आग लावून रानें, डोंगर, असीं वसवावी लागत, तेथें त्यांचें कोणी रक्षण करीत नसे. जे तरवार गाजवून आपलें रक्षण करून घेत नसत त्यांचे हाल होऊन ते मरून जात.

गोपाळ : महाराज, हें वर्णन ऐकून खेदच व्हावा असें आहे. रानटी लोकांच्या दुःखापेक्षां ह्या लोकांचें दुःख अधिक. कारण मोठे विपत्तींत दिवस काढित असतां त्यांस पूर्वी भोगलेल्या सुखाची आठवण होत असेल तेव्हां फारच दुःख होत असेल.

गुरु : मालाचें रक्षण होत नसलें आणि कायद्यापासून जुलूम होत असला, ह्मणजे लोकांचा मोड होतो; मनुष्याची दुर्दशा होऊन जाती. याप्रकारच्या पुष्कळ झालेल्या गोष्टी देशोदेशीं फिरून आलेले साहेब सांगतात. सर्कासिया ह्मणून एशिया खंडांत एक देश आहे, तेथें असें आहे कीं, कोणी मनुष्य बी पेरूं लागलें, अथवा लावणी करून मारे बांधून गोळा करूं लागलें म्हणजे त्यावर कोणीतरी घाला घालायास येतो. पिकलाडीस शेतकीच्या औतांचें जसें अगत्य तसेंच ल्हानसी बंदुक, पिस्तुल, कटार, ह्यांचेंही अगत्य असतें.

सैप्रस ह्मणून सिरिया देशाकडे एक देश आहे, त्याविषयीं असें सांगतात कीं जरी तेथील जमीनीची राबणूक होत नाहीं तरी तेथें सर्व ठिकाणीं खाताडी, पांढरी चिकणी माती दृष्टीस पडती, ती फारच कसदार असती, पण तें बेट तुर्कांकडेस आहे. त्याचा ग्रीक लोकांवर इतका जुलूम होत असतो कीं त्या चांगले जमीनीची लागवड करायास त्या लोकांस हिम्मतच होत नाहीं; त्यानीं लागवड केली असतां जें पिक येतें तें त्याजपासून ते तुर्क लोक जबरीनें घेऊन जातात. कसें तरीं करून सरकारदेणीं भरोत या चिंतेनें ते अवघें वर्ष काढितात, ती देणींच भरायाकरितां जाणो जसे खपतात. सरकारचें देणें चुकलें असतां मोठी पीडा अथवा मरण प्राप्त होतें, देणें देववेना असें झालें म्हणजे कुळें तें बेट सोडून पळून जातात. असीं वर्षाच्या कांठीं बहुत गयाल* होतात. त्यामुळें अवघ्या बेटांत सुमारें ६०००० वस्ती झाली आहे. इतकी पूर्वी तेथील एका शहराची वस्ती असे. सारांश, मालाचें रक्षण नसल्यामुळें संपत्तीस अनेक अपाय होतात. त्यास मालाचें रक्षण असें झालें पाहिजे कीं जो जें उत्पन्न करील त्याचा त्यास अविछिन्नपणें उपभोग घडावा आणि मालाचे रक्षणार्थ जो कायदा कानुन करणें त्यांत मुख्यत्वेंकरून ज्या गोष्टी असायाच्या त्या जर त्यांत नसल्या तर तो कायदा असून फळ काय !

गोपाळ : मालाचे रक्षणार्थ कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत ?

गुरु : प्रथम तर सर्कारानें रयतेच्या मालाचें रक्षण करावें ह्मणजे सर्कारानें कोणाचा माल दुसऱ्यास बलात्कारानें घेऊंन देऊं नये. व दुसरें असें, त्या मालाचें सर्कारापासूनही रक्षण झालें पाहिजे. कारण सर्कार जर बलात्कार करून रयतेस नागवूं लागलें व त्यापासून त्याचा बचाव होत नसला तर देशाची दुर्दशा होऊन जाती ! तें तसें युरोप खंडांत व एसिआ खंडांत झाल्याचा प्रकार कांहीं दर्शविला.

इंग्लांड देशीं राज्यनीति उत्तम प्रकारची आहे. तेथील राजाचे मनांस येईल तसें वर्ततां येत नाहीं. कारण कीं तेथें राज्यांतील लोकांचे प्रतिनिधी व राज्यांतील मानकरी लोक यांच्या दोन सभा आहेत, त्यांजकडे बहुतेक कारभार सोपून दिला आहे. असें सर्कार असावें.

मालाचें रक्षण कोणत्या तिसऱ्या रीतीनें झालें पाहिजे तें सांगतों. देशांमध्यें लुटारू व बंडवाले लोक यांचा बंदोबस्त केला पाहिजे. न केल्यास फार तोटे होतात. सन १८००चे सुमारें खानदेशाची स्थिती कशी होती, आणि सन १८०२त जेव्हां यशवंतराव होळकर यांने तो देश लुटून फस्त

* परागंदा

केला, तेव्हांपासून त्या देशाची काय अवस्था झाली. त्या देशास विपरीत काळ आला. शिंदे व होळकर त्या देशांत येऊन धुमाळी करूं लागले. पेशव्यांस त्यांचा बंदोबस्त होईनासा झाला. प्रांतांत लागवड कमी होत चालली. दिवसानुदिवस लोक जमीनदोस्त होत चालले. पुढें सुमारें सन १८०७ त पेंढारी लोक उत्पन्न झाले. ते पुष्कळ फौजफांटा जमवून लुटूं लागले. त्यांत त्यांनीं खानदेशाची तर फारच दाणादाण केली, घरें मोडिलीं; चीजवस्त हरण करून नेली. बहुत मनुष्यांचा नाश केला. सन १८१८ चे सुमारें त्या देशाची अगदींच दुर्दशा झाली. पुढें जेव्हां पेंढारी लोकांचा बंदोबस्त होऊन जिकडे तिकडे स्वस्थ झालें, तेव्हांपासून या देशाचे लोकांस किंचित अवसान आलें. हा देश पूर्वी चांगला नांदत होता असें दिसतें. कारण की मिल्टन याविषयीं असें लिहितो कीं, या देशांत अद्यापि पूर्वीचे मोठमोठ्या कामाचा माग सांपडतो. तेथील लोकांनी सर्व देशांत पाणी खेळविण्याकरितां कालवे बांधिले होते त्यांतून अद्यापि कांहीं अदळतात. व मोठमोठ्या इमारतीचे चिरे, लांकडी सामान, किल्ल्यांचे मोडकळीस आलेले बुरुज आढळतात. असी अवस्था लुटारू लोकांपासून व परचक्रापासून देशांतील मालाचें रक्षण न झाल्यामुळें झाली. आतांही त्या देशाचे असपासचे डोंगरांतून भील व गोंड लोक पुष्कळ आहेत. परंतु त्यांविषयी सर्कारानें बराच बंदोबस्त केला आहे, ह्मणून त्यांचें कांहीं चालत नाहीं.

गोपाळ : पण महाराज, इकडे दक्षिण कोंकण प्रांतांत तर मी प्रत्यक्ष पाहिलें आहे, व दुसऱ्या कांहीं प्रांतांविषयी ऐकिलें की येथील रयत फार हवलदील आहे, कोंकणांत फार तर काय सांगावें त्या बिच्याऱ्या कुणब्यांस चार महिनेंपर्यंत कडू कारंदे खाऊन दिवस काढावे लागतात. आतां या तर प्रांतांत लुटारु लोक नाहींत व या देशांत मालाचें रक्षणही बरेंच होत आहे असें वाटतें. त्यास असें असून या प्रदेशांत दारिद्र्याचें आगमन कोठून होतें ?

गुरु : केवळ मालाचें रक्षणच असून फळ काय ? देशांत दारिद्र अथवा विपुलता यांची चाल होण्यास आरंभीं पंचवीस कारणें व उपकारणें सांगितलीं, त्यांतील मालाचें रक्षण हें एक आहे, तशांतही उद्योगी लोक जेथें फार तेथेंच कोणतीही हिताची गोष्ट होणें ती होत असती.

गोपाळ : महाराज क्षमा असावी. बाबावाक्य प्रमाण असें ह्मणतात त्याप्रमाणेंच आपण सांगतां. हें खरें किंवा ही गोष्ट सप्रमाण असें दाखवून द्यावें. आमच्या कोकणांत तर उन्हाळा पावसाळा शेती लोक खपत असतात तरी सारा वारून त्यांचे उदरनिर्वाहाची नीट सोय होत नाहीं.

गुरु : सर्व ठिकाणीच लोक निरुद्योगी असतात असें मी ह्मणत नाही. कांहीं जागी सर्कारदेणेंही फारच आहे, व कांहीं देशांत पुष्कळ श्रम करितात पण त्यांचा श्रम चांगला सुशिक्षित नसतो. असो ह्या खेरीज कपतान विंगेट आपल्या रपोटांत सरकारास असें लिहितो कीं कोकणांत व रत्नागीरी जिल्ह्यांत लोकसंख्या मनस्वी वाढल्यामुळें त्या लोकांची फारच हलाकी आहे. ह्यास्तव ह्यांतील कांहीं लोकांस सरकारनें खानदेशांत पडीत जमीन पुष्कळ आहे तेथे पाठवावें ह्मणजे त्या देशाचें कल्याण होईल, कोकणी कुणब्यांचेंही कल्याण होईल. ह्या लेखावरून कोकणांतील लोकांचे दद्रातीस त्यांची अतिशय संख्या कारण असावी असें मला वाटतें, आणि त्यांस सरकारी देणें झालें तरी तें पूर्वीपासून जें चालत आहे त्याचप्रमाणेंच कमज्याजती करून सर्कार घेत आहे.

गोपाळ : पूर्वीपासून ह्मणजे काय ? हे देणें अनादिसिद्ध तर नव्हतें. कांहीं जागीं तें इतकें आहे कीं तेथील रयत जाग सोडून जाण्यास तयार आहे.

गुरु : पण त्वां ऐकिलें गोपाळा, अलीकडेस पाहाणी चालली आहे. तेव्हां तूं ह्मणतोस हें बहुतकरून आतां होणार नाहीं. आणि आजपर्यंत केवळ कोकणांत काय असेल तें असो, परंतु देशामध्यें पुणें, धारवाड, वगैरे प्रांतांत पाहणी झाल्यापासून दस्त कमी झाला आहे, असें असतांही तिकडील लोक

अद्यापि कुरकुरत असल्यास हा केवळ त्यांचा अपराध असें मला वाटतें. आपल्या इकडे पूर्वी मुसलमान लोकांची जमाबंदी चालू होती, ती मोडून पुढें पेशवाईत नवी जमाबंदी झाली. त्यावर इंग्रेजींत आजपर्यंत पाहाणी करण्याकरिता सर्कारानें यत्न केले, परंतु अद्याप कांहीं झालें नव्हतें, ती अलीकडेस कमतान विंगेट साहेब वगैरे लोक पाहणी करित आहेत. त्यांनीं आजपर्यंत बरीच पाहणी केली व हल्लीं करीत आहेत त्यावरून सर्व देशाची जमाबंदी होऊन जिकडे तिकडे या पाहणीप्रकरणी काम सुरू झालें म्हणजे मग तूं पाहाशील तर तुझ्या दृष्टीस बहुत फेरफार पडेल.

मद्रास इलाख्यांत सर टामस मनरो यांचे कारकीर्दीत पाहणी झाली. त्या अलीकडे तिकडील वहिवाटीविषयीं यथास्थित कळलें नाहीं.

गोपाळ : परंतु ही जमाबंदी कायम राहील किंवा काय हें कोण जाणे. व न राहिली असतां पुढें काय होईल, कसे कर बसतील हें कोण जाणें.

गुरु : आतां बहुधा ठराव तीस वर्षांचा आहे, असें ऐकितों. परंतु आपल्या देशांत जितकी सरकारची मालकी आहे तसी कांहीं देशांतरीं नाहीं. फ्रान्स इटाली वगैरे कांहीं देशांत लोक आहेत, त्यांच्या खासगी एकदां ठराऊन घेतलेल्या जमीनी आहेत. त्यांशीं दुसऱ्या कोणाचा संबंध नाहीं, ते शेतकरी लोक फार सुखी.

गोपाळ : बरें, त्यांसारिखे आमचे इकडचे शेतकरी लोक कां सुखी नाहींत?

गुरु : त्याचें कारण असें कीं, ती जमीन त्यांची असती, त्यामुळें ते जीव लावून काम करितात. हे शेतकरी लोक चांगले दूरवर विचारानें वागतात. आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपल्या मुलांस विद्या शिकवितात. ते मुलांची लग्नें ल्हानपणीं करीत नाहींत, तेणेंकरून त्यांची लोकसंख्या नियमित असती. ते आपल्या जमीनीच्या बळावर आपला निर्वाह करितात. लोकसंख्या फार न वाढल्यामुळें या लोकांमध्यें गरीबीचें येणें होत नाहीं. हें प्रकरण पुढें लोकसंख्येचे प्रकरणीं सविस्तर सांगितलें जाईल.

गोपाळ : महाराज, आपल्या देशींही त्याप्रमाणेंच जमीनीवर लोकांची सत्ता कां बरें नाहीं?

गुरु : कांहीं नाहीं खरी, परंतु हल्लीं तीस वर्षांच्या मुदतीनें जमीनी दिल्या आहेत ती रयत लोकांची जमीनीवर सत्ताच झाली ना?

गोपाळ : परंतु कुणब्यांकडे जमीनीची मालकी सर्कार नेहमी देईल तर बरी.

गुरु : मिलसाहेब सांगतो कीं कांहीं वर्षांमागें शेतकरी लोकांला तीस वर्षांच्या मुदतीनें जमीनी ठराऊन दिल्या आहेत. हिंदुस्थानांचे उत्तरेकडील प्रांतांत व खानदेशाचा कांहीं भागांत याप्रमाणे वहिवाट चालली आहे, व तिजपासून लोकांचें कल्याण होईल असें दिसतें. ठाणें जिल्ह्यांत खालीसा जमीनीची मोजणी करून पांच वर्षांच्या ठरावाने देण्याच्या वगैरे ज्या चाली आहेत, त्या वाईट, कारण कीं या ग्रंथकर्त्यांचा असा अभिप्राय आहे, कीं थोडके दिवसांच्या बोलीने जमीनी ठरावून देणें हें चांगलें नाहीं. यापासून अनहित आहे. जर सरकार ठराव करून रयतेस जमीनी कायम करून देईल तर फार चांगलें, नाहीं तर मोठ्या मुदतीनें द्याव्या. केवळ दोन च्यार वर्षांच्या मुदतीनें दिल्यानें खराबी होती. कारण जी जमीन कुळाकडे दोन वर्षें रहाणार, तिची तें कुळ चांगली देखरेख व कमावणी करणार नाहीं. कां तर त्यास असें वाटतें कीं ती मुदत सरतांच आपल्या हातून ही जमीन जाणार. आपली दृष्टि केवळ आपणाकरितांच मिळवून ठेवावें असी नसती; तर आपण आपल्या मुलांबाळांसाठीं संचय करून ठेवित असतों. तेव्हां असा मक्ता असल्यानें जितकें त्या मुदतींत जमीनींतून निघेल, तितकें कुळ काढून घेईल. आणि याप्रमाणें सर्व करूं लागले तर जमीनीची खराबी होईल. थोडकी मुदतपर्यंत कुळाकडे जमीन ठेवण्याच्या पद्धतीपासून जमीनीची चांगली लागवड न होतां जमीन पडीत राहूं लागती, हें जसें लागवडीचा मोड होण्यास कारण,

तसेंच जमीनीची लागवड, शिल्प, इत्यादिकांचा मोड होण्यास, राज्यांत धुमाळी, उपद्रव इत्यादिकांस कारण आहे.

गोपाळ : मी त्या दिवसीं फ्रेंच लोकांचा इतिहास वाचित होतों. त्यांत त्यांनीं सन् १७८९ त आपल्या राज्यांत दंगा केला, तेव्हांपासून सन् १८१५ त पुनः दुसरा राजा गादीवर बसे तोंपर्यंत या देशांत मोठी धुमाळी चालली होती. ही जी तेथील लोकांनी उलटापालट केली, तेणेंकरून त्यांचें कल्याण झालें नाहीं.

गुरु : सर्व राज्यांचे उलटापालटीच्या वेळीं असेंच होत असतें. हें केवळ त्याच राज्यांत झालें असें नव्हे. त्याचें कारण असें कीं अशा प्रसंगी लोकांचें लक्ष्य लढाईकडे लागलें असतें, त्यामुळें शेतकीची अव्यवस्था होती. अशा लढाया होत असतां व्यापारास मोठा अडथळा होतो. व्यापार नसल्यामुळें जिन्नसपान्नसाची कमताई पडती. एका देशांतील लोकांचें वैमनस्य दुसऱ्यांशीं पडलें म्हणजे ते अर्थातच वांकडें करायास प्रवृत्त होतात. असें होऊं लागलें म्हणजे धान्यादिकांच्या कमताईमुळें ज्या देशांत उलथापालथ होत असती तेथील लोक जो सत्ताधारी असेल, त्याजवर उठतात. असें झालें ह्मणजे सर्व कारभार बंद होतो. सावकार लोकांचीं दिवाळीं निघतात. व त्या देशांतील सर्व भिकेस लागतात.

याप्रमाणें फ्रेंच लोकांनीं सन १७८८ त उलथापालथ केली, तेव्हा तूं सांगतोस तसें झालें. अशींच दुसरीं इतिहासांत उदाहरणें आहेत, याचप्रमाणें कांहींसे इंग्लिश लोकांनी जेव्हां पहिला चार्लस राजा यास सन १६४९ त मारिलें, तेव्हां त्या लोकांनीं आंतल्या आंत तंटे करून देशाची नासाडी केली होती.

सन १००१ त जेव्हां महमुदानें हिंदुस्थानांत प्रथम स्वारी केली, तेथपासून तर अल्लाउदीन खिलजी मुसलमान लोकांचा अंमल नर्मदेपर्यंत बसवी तोंपर्यंत उत्तर हिंदुस्थानांमध्यें धुमाळी चालली होती. राज्यांत स्वस्थता होऊन रयत लोकांच्या मालाचें रक्षण होऊं लागे तंवपर्यंत शेतकी वगैरे दुसरे उद्योग चांगले चालत नसत.

गोपाळ : हें सर्व मालाचें रक्षण न झाल्यामुळें झालें. महाराज, आपण मालाचे रक्षणाविषयीं जें सांगितलें, तेणेंकरून कित्येक नवीन गोष्टी समजल्या. आतां उद्योगाची वांटणी कळावी असें मनांत आहे.

गुरु : उद्योगाची वांटणी ह्मणून जें संपत्तीचें उत्पत्तीचें उपकारण तें उद्यां काढूं. आज इतकेंच पुरे.

# पूर्वभागसंवाद ५

यात मालास माल देण्याचा व्यवहार कसा चालू झाला. उद्योगाची वांटणी कसी होऊं लागली, उद्योगाच्या वांटणीविषयी आडम स्मिथ् साहेबानें देशसंपतींत कसें काय लिहिलें आहे, यंत्रसाहित्यापासून काय काय लाभ होतात, उद्योगाची वांटणी झाल्यामुळें लोकांचें आचरण, बुद्धि हीं कसीं सुधारतात, या सर्वांची एकुणांत ऋसी केली आहे, इत्यादि सांगितलीं आहेत.

गुरु : अमुक माल अमक्याचा असी व्यवस्था झाली, आणि त्या मालाचें रक्षण होऊं लागलें म्हणजे तें पाहून लोक आळस व अज्ञान सोडितात. आणि उद्योगाचे पाठीस लागतात म्हणून आळस व अज्ञान या बंदांतून लोकांची सुटका होण्यास मालाची व्यवस्था व रक्षण हींच मुख्य कारणें आहेत, असें मागें सिद्ध झालें. आतां जेणें करून उद्योग व सुधारणूक वाढत जातात तीं कारणें कोणकोणती तीं सांगतों. त्यांतून मोबदल्याचा व्यवहार करणें अथवा मालास माल देणें हें पहिलें कारण आहे.

मागें जें बोलणें झालें त्यावरून असें सिद्ध होतें कीं मनुष्यांजवळ जें कांहीं असेल त्याचें चांगलें खचितपणानें रक्षण होऊं लागलें म्हणजे तीं मनुष्यें दुप्पट चपळाईनें मेहनत करूं लागतात. थोडेंसें तुरुत पोटापुरतें मिळालें म्हणजे झालें, अशा समजुतीवर रहात नाहींत. पुढल्या काळाकरतां बेगमी करूं लागतात. केवळ अन्नपाणीच मिळवून बसत नाहींत, तर जेणेंकरून सुख होणार, जें उपयोगी पडणार, त्याचेंही ल्हानसें सांटवण करूं लागतात. एकजण शिकारीकरतां तिरांचें, दुसरा पावसाळ्याकरतां धान्याचें, तिसरा आंगावर घालण्याकरतां वस्त्रभूषणाचें, असीं असीं सांटवणें करूं लागतात आणि त्या त्या ल्हानशा मालांचा उपभोग करून निर्भय राहतात. तो माल जबरीनें अथवा दम्यानें घ्यावा असें कित्येकांस वाटतें, परंतु तसें करण्यास त्यांस अटकाव होतो, तेव्हां तो माल मिळवावयास ते कांहीं दुसरा उपाय करितात, शिकारीचा हंगाम आला, आणि तिरांचें अगत्य असलें म्हणजे, तीर करणारांकडे जातात. रित्या हातांनी जात नाहींत, तिरांचा मोबदला द्यावयाकरतां कांहीं तरी घेऊन जातात, ज्या वस्तूंकरितां तीर द्यावे असें जेणेकरून तीर करणारांच्या मनांत येईल त्या वस्तू त्याकडे नेतात. ज्यांचा जवळ मोबदला द्यावयास कांहींच नसतें, त्यांस तीर आपणास असावेत असी इच्छा होऊन व्यर्थ; कां तर त्या तिरांसांठी द्यावयास जवळ कांहीं वस्तू नसती.

याप्रमाणें मोबदला होऊं लागला म्हणजे उद्योग वाढूं लागतो, कोणा एकाकडे आपले गर्जेपेक्षां कांहीं पदार्थ अधिक झाला, म्हणजे त्यास असें वाटतें कीं, मला दुसऱ्या अमुक पदार्थांची इच्छा आहे म्हणून आपल्या जवळचा अधिक झालेला पदार्थ देऊन तो पदार्थ मिळवावा. जे हौसेजोगे पदार्थ ते जसे जसे उत्पन्न होत जातात, तसी तसी त्या पदार्थांविषयीं इच्छा वाढत जाती, आणि तसतसा ते पदार्थ मिळवावयाचा उद्योग वाढत जातो. मग ते पदार्थ स्वतां करावे अथवा ते जेणें

करून मिळतील असें कांहीं करावेसें वाटूं लागतें, याप्रमाणें रानटी मनुष्य जागा होतो, इच्छा नाहींसी करणारी जी जडबुद्धि व शरीरास अचेतन करणारी जी सुस्ती ती सोडून देतो आणि सुधारलेल्या मनुष्याप्रमाणें हौस, चमत्कार, इच्छा, चपलता, उद्योग यांचे मागें लागतो.

असा जो उद्योगाच्या मागें लागतो त्याचा उद्योग वाढत जातो, कोणी एक माळी पहिल्यानें लहान जमीनीवर एकाद्या जिन्नसाची लागवड करितो. मग असतां असतां कांदे, मुळे, वांगीं, अशा बहुत्येक जिन्नसांची लागवड त्याचे हातून होऊं लागती, हें असें होऊं लागण्यास एकटी लागवडच कारण होत नाहीं, तर लागवडीचें काम पत्कारल्यामुळें बहुत्येक उद्योगाकडे धांव जाती. ह्मणून तें तसें होऊं लागतें. मग त्याच्या मळ्यांत जी शाकभाजी उत्पन्न होऊं लागती, तीतकीच त्याच्या घरखर्चास लागत नाहीं. त्यांतून कांहीं तरी उरून राहती; ती ज्या जिन्नसांची त्यास गरज असती त्यांच्या मोबदला देऊन तो जिन्नस घेतो.

गोपाळ : तो शाकभाजी मोबदल्यास देतो हें नीट करितो, कां तर त्यास ज्या जिन्नसांची गरज असती ते अवघेच तो स्वतां करीत बसता तर मळ्याच्या कामास त्यास अवकाश कोठून सांपडता?

गुरु : खरें, तेव्हां असें होऊं लागतें कीं शाकभाजीची ज्या लोकांस गरज असती, ते माळ्यास जरूर असणारे जिन्नस पुरे पाडतात. कोणी नदींतले मत्स्य आणितात, कोणी रानांतील शिकार आणितात. या माळ्यास ज्यांची तुरुत गरज असती असे खायासवरायाचे जिन्नस मिळाले ह्मणजे असें वाटूं लागतें कीं आपल्यास शाकभाजी ठेवावयास टोपल्या पाहिजेत; कुदळीं, पावडें, असें कांहीं मळ्याचे कामाचें सामान पाहिजे; मग हा आपली शाकभाजी मोबदला देऊन ते उपयोगी जिन्नस घेतो, मग यास असी इच्छा उत्पन्न होती कीं चांगली पगडी अथवा आंगख्या, कंठी असी कांहीं लेणीं असावीं, ते हौसेचे जिन्नसही शाकभाजी मोबदला देऊन घ्यावे, असें याच्या मनांत येतें, तेव्हां ज्यां करितां हा आपली शाकभाजी द्यावयास राजी होई, असे अगत्याचे, उपयोगाचे अथवा मौजेचे जिन्नस करायास अथवा कोठून मिळवून द्यायास याचे शेजारी उत्सुक होतात, अशा कारणामुळें नवी नवी कल्पना बाहेर पडूं लागती, नवा नवा जिन्नस उत्पन्न होऊं लागतो, कला कुशलता वाढूं लागतात, असें होऊन उद्योग करण्याची हौस चहूंकडेच प्रगट होऊं लागती.

गोपाळ : जिन्नसास जिन्नस देण्याची चाल पडली, तिजपासून, आपण सांगितलें एथपर्यंत फार उपयोग झालासा दिसतो, परंतु एकादा उद्योग चालू झाला ह्मणजे मग प्रत्येकानें मोबदल्याचा व्यवहार सोडावा, आपल्यास जें जरुर पाहिजे, त्याची प्राप्ति व आपल्या इच्छांची तृप्ति करावयास आपलीच बुद्धि योजूं नये काय? एका मनुष्याकडे एकादा जिन्नस अधिक झाला तर तो त्यानें देऊन त्याबद्दल त्याची गरज असेल तें द्यावें हें नीट आहे. परंतु ज्याची आपल्यास गरज नाहीं असें कांहीं उत्पन्न करून ठेवावें आणि मागाहून ज्याची गरज लागेल त्याबद्दल तें घ्यावें हें तर मोठें लांबट खटलें, ही व्यवहार रीति एक तऱ्हेचीच दिसती.

गुरु : तेव्हां तुझ्या मतें त्या माळ्यास भाकरीकरितां जे दाणे लागतात ते त्यानेच पिकवावे, त्यानें आपल्या हातानेंच आपलें घर बांधावें, आपलीं वस्त्रें करावी, हें अवघें शाकभाजीचा पैशानें करवून घेववूं नये काय?

गोपाळ : हां हां, तसें नव्हे. मी चुकलों, तितकीं कार्यें त्यानें पत्कारल्यास ती त्याच्या हातून होणारच नाहींत; बहुत कामें होणार नाहींत, काय तें एकच काम चांगलें होईल. पण लोक रानटी असताना निर्निराळ्या माणसानी निर्निराळीं कसबें कामें करणें असें होणार नाहीं.

गुरु : नाहीं, पण जिन्नसानें जिन्नस घेण्याचा व्यवहार चालू झाला, ह्मणजे तें तसें होऊं लागतें. या व्यवहारास तूं लांबट खटलें मानितोस, पण याच व्यवहारामुळें आपली कळा, कुशलता, हस्तकौशल्य

वाढून नामी नामी पदार्थ उत्पन्न होऊं लागले. या व्यवहारापासून फार मोठे लाभ होतात. तूं मानितोस तसें नव्हे.

मोबदल्याचा व्यवहार चहूंकडे होऊं लागल्यानंतर लौकरच असें अढळलें कीं मनुष्य एकाच उद्योगावर बसेल, मग तो उद्योग धनुष्यबाण करणें कां होईना, तसें तसें त्या उद्योगांत त्याचें कौशल्य व हस्तचापल्य विशेष होईल, म्हणून त्याच्या हातून तीर कमटे लौकर होऊन चांगले कारागिरीनें होतील; असें जो मनुष्य वेगळाल्या कामांचे पाठीस लागेल त्याच्या हातून होणार नाहीं.

गोपाळ : मोबदल्याच्या व्यवहारापासून जो लाभ होतो, तो आतां मला समजूं लागला. यापासून उद्योग करावयास हौस येती, नानातऱ्हेचे उपभोग घडून येतात. आणखी असें होतें कीं ज्या कारागिरास तिरकामटे चांगले करतां येऊं लागले, तो जर केवळ तेंच काम करूं लागला, आणि त्यास जें कांहीं मिळविण्याची इच्छा होईल, त्याच्या मोबदला आपला केलेला माल देऊं लागला तर त्यास विशेष प्राप्ति होईल, त्याने नाना प्रकारच्या कामाकडे लक्ष्य दिलें असतां तसें होणार नाहीं.

गुरु : होणार नाहीं यांत काय संशय ? परंतु जे तीरकमटे करावयाचे ते लोकांत खपायापुरते मात्र करावे; अधिक करून काय उपयोग ? अधिक केले असतां विकले जाणार नाहींत. अथवा त्याचा मोबदला होणार नाहीं; मोबदला देण्याविषयीं कोणाजवळ कांहींच नसलें तर तो माल कशाने घेईल ? उद्योगाची प्रवृत्ति होऊन कित्येक दिवस जेव्हां लोटतात, तेव्हां कोठें मालास गिऱ्हाइकी मिळूं लागती, झणून जितकी पाहिजे तितकी गिऱ्हाइकी मिळेल, तेव्हां केवळ तीरकमटे करून आपलें पोट भरणारा जो मनुष्य त्याचें पोट भरेल.

लोक जेव्हां चांगले नांदूं लागतात तेव्हांच मालाचा खप व्हावयापुरती गिऱ्हाइकी मिळूं लागती, तेव्हांच लोकांस केवळ एकच धंदा चांगला झटून करायास उमेद होती, नाहीं तर होत नाहीं.

आडम स्मिथ साहेबाच्या पाहण्यांत असें आलें आहे कीं "स्काटलांड झणून जो देश तेथील उंचवट्याचा रखरखीत मुलुख आहे, तेथें जिकडे तिकडे अल्प घरें आहेत, केवळ ल्हान ल्हान गांवढीं आहेत, त्यांतील शेतकीचें काम करणारा झटला झणजे तो आपण, खाटीक व रोटीवाला तरीं आपणच असतो. अशा ठिकाणीं एक लोहार, सुतार अथवा गंवडी असला तर सुमारें दाहा कोसांत त्याच कसबाचा दुसरा मनुष्य अढळणें विरळा. जिकडे तिकडे जीं कुटुंबें असतात, तीं अशा कसब्यापासून फारच जवळ झटलें तरीं चार किंवा पांच कोसांवर राहतात, त्यांस बहुत्येक ल्हान ल्हान कामें आपल्या हातानीं करायास शिकावें लागतें. परंतु चांगलें वस्तीचे मुलखांत तीं तसलीं ल्हान ल्हान कामें करणारे मनुष्य वेगळेच असतात, त्यांच्या हातून गरज लागती तेव्हां लोक तीं करवितात.

वेगळाल्या मनुष्यानीं वेगळालीं कामें करणें यास देशव्यवहारव्यवस्थेंत उद्योगाची वांटणी असें झणतात. ही सुधारलेल्या देशींमात्र होत असती. ज्यांची भरभर होत चालली आहे असीं जी युरोप खंडांतील राज्यें, तेथें असे अढळतें कीं लोक जो एकादा धंदा पत्कारतात, त्याच धंद्याच्या मागें लागतात. दुसरें काम हातीं धरीत नाहींत. त्या धंद्याचे वेगळाले विभाग असतात, त्यांतून प्रत्येक विभाग वेगळाल्या काम करणाऱ्या मनुष्यांचा वेगळाला धंदा होतो. उद्योगाची वांटणी हा देशव्यवहारव्यवस्थेंत एक मोठा उत्कृष्ट विषय होय. याचें चांगलें लक्षपूर्वक मनन व्हावें.

या प्रकरणीं आडम स्मिथ साहेबाच्या ग्रंथांत फार चांगलें सांगितलें आहे, तें असें कीं सुधारलेल्या व नांदत्या मुलखांतील अगदी साधा कारागीर अथवा रोजिनदार मजूर असला तथापि त्याच्या संसाराची बेगमी असी असती, कीं ती बेगमी तयार करायास ज्या लोकांचे हात लागतात, ते लोक किती असतात हें सांगतां येत नाहीं. रोजिनदार मजूर अंगांत जें लोकरी इगलें

घालतो, तें तरी करायास पहा किती माणसें लागतात ? तें जाडें खरबरीत असें दिसतें, पण तें पुष्कळ लोकांच्या मेहनतीनें झालें असतें. इगल्यासारिखा घरगुती जिन्नस उत्पन्न करायास मेंढे पाळतात. लोंकरीच्या प्रति लावणारा, लोंकरपिंजारा, रंगविणारा, विंचरणारा, तंतू काढणारा. कोष्टी, ओप देणारा, असे बहुत्येक निरनिराळी कामें करणारे लागतात. त्या लोकांपासून लोंकर, बनात, असे जिन्नस घेऊन दूरदूर देशींचे जे दुसरे कसबी लोक असतात, त्यांकडे पाठवितात. त्या पाठविण्याच्या कामांत तरीं किती व्यापारी, व तो माल नेणारे लोक, असतात. लोंकरीस जो रंग देतात, त्यास वेगळाले जिन्नस लावतात. ते बहुतकरून पृथ्वीच्या फारच दूर कोणांतून येतात. तेव्हां ते तसे जिन्नस अणायाकरितां किती व्यापार चालू झाला असेल, किती गलबताचे जाणें येणें घडलें असेल, किती गलबतें बांधणारे, खलाशी, शिडें करणारे, दोर करणारे, लागले असतील तें पाहवें. त्यांतून जे अगदीं हलकीं कामें करणारे, त्यांचीं हातेरें करायास तरीं किती वेगळाल्या प्रकारची मेहनत लागती, खलाशी जें तारूं चालवितो, कापडास ओप देणाऱ्याकडेस जी चक्की असती, कोष्टी ज्या मागानें वस्त्रें विणतो, हीं यंत्रें तर अवघड आहेत. पण जेणें करून मेंढ्रीं पाळणारा लोंकर कातरितो, ती कातर केवळ साधें यंत्र आहे, हें असें साधें यंत्र करायास किती प्रकारचे उद्योगाचें अगत्य आहे त्याचाच आपण विचार करूं. धातु खणून काढणारा, धातूची माती धोधायाकरितां ज्या भटींत घालितात ती भटी बांधणारा, लांकडें तोडणारा, धातु शुद्ध करायास कोळसे लागतात ते कोळसे करणारा, इटा करणारा, गंवडी, भटीवर काम करणारीं मनुष्यें, चक्की फिरविणारा, हातोड्याने घडणारा, लोहार, या अवघ्यांचीं वेगळालीं कसबें एक्या ठिकाणीं मिळतात, तेव्हां कातर उत्पन्न होती. इंग्लंड देशांतील एकादे रोजिनदार मंजुराविषयीं तरीं असेंच असतें. अनेक तऱ्हेचीं कसबें व जिन्नस मिळून त्याचा पेहरावा व घरांतील सामान झालें असतें; त्यांच्या आंगांत कुडती असती ती तागाच्या सुताची असतो. तो पायांत जे जोडे घालतो ते चांबड्याचे असतात. तो ज्या बिछान्यावर निजतो, तो बिछाना नाना पदार्थ मिळून झाला असतो. तो ज्या चुलीवर आपलें खाणें तयार करितो, ती चूल लोखंडी जाळीची असती. त्या चुलींत सर्पणास कोळसे लावितो, ते भूमीच्या पोटांतून खणून काढलेले, दुरून जलमार्गानें अथवा जमीनीवरून गाडींत आणलेले असे दगडी कोळसे असतात. त्याच्या स्वैपाकघरांत रांधायाचीं भांडीं असतात आणि जेवण वाढायास ताटें असतात, तीं मातीचीं अथवा कथलाचीं असतात. तो खुरचीवर बसून मेजावर सुऱ्या कांट्यानें, खाणें खातो, ती लांकुड, लोखंड तिखें, अशांचीं केलीं असतात. तो जी रोटी खातो ती धान्याची आणि निरनिराळीं माणसें लागून केली असती. त्याचे घराचे खिडक्यांतून उष्णता आणि उजेड आंत येतो, पण वारा व पाऊस आंत येत नाहीं, ती खिडकी कांचेची असती. त्या देशीं लोकांचे घरांस बहुतकरून कांचा लावल्या असतात. अहः अहः कांचेसारखा सुंदर व सुखकारक पदार्थ उत्पन्न करायास किती ज्ञान व कौशल्य पाहिजे ? कांच नसती तर घरांपासून जें सुख होत असतें तें कोठून होतें ? हे असे सोयीचे व वेगळाले पदार्थ निरनिराळे काम करणारे उत्पन्न करितता. वेगळालीं हातेरें करायास लागतात. यांतून दरएक जिन्नसास किती निरनिराळ्या प्रकारची मेहनत लागती, त्याचा आपण विचार केला असतां आपल्यास असें कळूं येईल कीं सुधारलेल्या मुलखांत एकाद्या गरीबाचा संसार पाहिला असतां असा उगाच भास होतो, कीं ही संसाराची स्थिति साधी, परंतु त्या गरीबाची असी साधी स्थिति असतां त्याचा सांभाळ हजारो मनुष्यांच्या साह्यावांचून व उद्योगावांचून होत नाहीं. गरीबाच्या संसाराचे सोयीवार जिन्नस आणि मातबराच्या चळवळीत विषयभोगांचे जिन्नस पाहतां गरीबाची स्थिति साधी दिसती खरी; असें असतां युरोपखंडांतील एकादा शेतकरी उद्योगी असून बेतानें खर्च करून वागत असला तर त्याजवळ जे उपयोगी जिन्नस असतात,

ते तेथील राजाच्या संपत्तिपेक्षां कदाचित कमी असतील, पण दाहा हजार नागव्या रानटी लोकांस मर्जीस आलें असतां मारावें, तारावें, बांधावें, सोडावें, अशा रीतीनें राज्य करणारा एकादा आफ्रिका खंडांतील राजा, त्याजवळ त्या कुणब्याकडील उपयोगी जिन्नसांइतके जिन्नस नसतात, असें जें ह्मटलें आहे, तें कदाचित् सत्य असेल.

गोपाळ : सत्य असेल, यांत काय सांगावें ! म्या असें ऐकिलें आहे कीं पूर्वेकडेस चीनदेश आहे, तेथला चाहा आणि पश्चिमेकडेस इंडीस म्हणून जीं बेटें आहेत, तेथली साकर यावांचून इंग्लंड देशातील धोबीणही न्याहारी करायास बसत नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं बहुत्येक खाया-सवरायाचे जिन्नस फार दुरून येतात आणि ते तयार व्हावयास फार जणाचे हात लागतात.

लावणी करून भात घरीं आणावयास वेगळाली माणसें लावावीं, त्यांत तें काम वाटलें जातें ह्मणून झपाट्यानें लौकर होतें, तसें तें अवघें काम एकट्याच कुणब्यावर पडलें असतां त्याच्या हातून होणार नाहीं.

गुरु : मेहनतीची वांटणी केल्यापासून जे लाभ होतात, ते दाखवायाकरितां आडमस्मिथ साहेबानें जीं उदाहरणें सांगितलीं आहेत, त्यांतून किती एक मी तुला सांगतों. टांचण्या करायाच्या कारखान्या-विषयीं त्यानें असें सांगितलें आहे, कीं टांचण्या करायाचें काम जो शिकला नाहीं, अथवा हें काम करायास जें यंत्रसाहित्य लागतें तें कसें कामांत लावावें हें ज्यास माहित नाहीं, त्यानें पराकाष्ठेचा उद्योग केला तरीं त्याच्या हातून दिवसांत एकही टांचणी होणें कठीण; मग वीस टांचण्या तर होणारच नाहींत. हें काम आतां असें चालविलें आहे कीं, हें अवघें एकच कसब असें होत नाहीं, याचे कितीएक विभाग झाले आहेत, आणि त्यांतून बहुत्येक निरनिराळीं एक एक कसबें झालीं आहेत. एकजण तार काढितो, दुसरा ती नीट करितो, तिसरा ती कापितो, चौथा तिला अणी करतो, पांचवा तिला माथा बनवायाकरितां सांहाणेवर घांसितो. हे माथे करायास दोन तीन वेगळालीं कामें केलीं पाहिजेत; टांचणीवर माथा बसविणें हें एक वेगळेंच काम आहे. त्यांस साफ करणें हें एक दुसरें काम आहे, त्या कागदांत बसविणें हें एक स्वतंत्रच काम आहे. याप्रमाणें टांचण्या करायाचें जें हें ल्हानसें काम त्याचे देखील निरनिराळे अठरा विभाग झाले आहेत. हीं सर्व कामें कित्येक कारखान्यांत निरनिराळ्या माणसांकडून होतात. कित्येक कारखान्यांत एकच मनुष्य कोणेसमयीं दोन तीन कामें करितो. याप्रकारचा एक ल्हान कारखाना पाहण्यांत आला, तेथें दाहा माणसें काम करीत होती, ह्मणून कित्येकांस दोन तीन निरनिराळीं कामें करावीं लागत; तीं माणसें फार गरीब होतीं, याकरितां त्यांजवळ जें अवश्य असायाचें यंत्रसाहित्य तें सरासरी होतें, तथापि त्यांनी नेटून काम केलें असतां ते एक दिवसांत सुमारें बारा रत्तल टांचण्या करतील. एका रत्तलांत मध्यम मानाच्या टांचण्या चार हजारांवर असतात. त्यास त्या दाहा माणसांकडून एका दिवसांत टांचण्या अठ्ठेचाळीस हजारांवर होतील. दर एक जणाकडून अठ्ठेचाळीस हजाराचा दाहावा हिस्सा ह्मणजे चार हजार आठशें टांचण्या एका दिवसांत होतील. परंतु जर ते मनुष्य हें काम करायास शिकले नसते, आणि एकमेकापासून निरनिराळे राहून स्वतंत्रपणें काम करिते, तर त्यांतून दर एकाकडून अवघ्या दिवसांत एकही टांचणी झाली नसती, मग वीस टांचण्या कोठून होत्या ! त्यांच्या त्या वेगळ्या कामांची वांटणी आणि जुळणी झाल्यामुळें हल्लीं त्या अवघ्या जणांच्या हातून जें काम होतें त्याचा दोनशें चाळिसावा हिसा होत नसता.

गोपाळ : मेहनतीची वांटणी झाल्यापासून हीं असीं कार्यें होतात, हा तर वास्तविक चमत्कार होय.

गुरु : ज्यांस एकच सार्धें काम करावें लागतें, अशा माणसांस जी काम करण्याची हातोटी साधती तिजविषयीं तरीं आडम स्मिथ साहेबानें चमत्कारिक उदाहरण सांगितलें आहे, असें कीं जो लोहाराच्या

कारखान्यांत वहिवाटला नाहीं तो मनुष्य एका दिवसांत तीनशें खिळे करतो, आणि साधारण लोहार तर एक हजार खिळे करतो; परंतु कितीएक मुलगे पाहण्यांत आले, त्यांस काय तें खिळेच करायाचें कसब शिकविलें आहे, त्यांनीं असें हस्तकौशल्य संपादन केलें आहे कीं, एका दिवसांत त्यांच्या हातून दोन हजार तीनशें खिळे होतात.

गोपाळ : हें तर फारच मोठें अंतर, परंतु हें संभवण्याजोगें आहे. ज्यास जें कसब माहीत नाहीं, त्या कसबाचीं हातेरें तो किती आडमुठेपणानें धरून काम करितो तें पाहावें. त्या हातेरांची ज्यास वहिवाटी असती तो त्या हातेरांनी सहज चांगलें हातोटीनें काम करितो.

गुरु : तेव्हां आपण असें समजावें कीं, कोणे एके कार्याकडे मनुष्याचें अवघें लक्ष्य व बुद्धि लागली ह्मणजे आपली कारागिरी सुधरावयाचे जे उपाय ते तो शोधून काढील, अथवा आपली मेहनत सोपी व कमी होई असें करील, असें संभवतें. परंतु त्याचें मन नानाप्रकारच्या उद्योगांत गुंतलें असतां तें तसें होईल असें वाटत नाहीं. मेहनत करायाची रीत सुधारली, व आउतें चांगलीं झालीं, हा उपकार बहुधा काम करणाऱ्या लोकांकडून झाला.

वांटून मेहनत केली असतां काम सरळपणें व अविच्छिन्नपणें होतें, हा मेहनतीच्या वांटणीचा दुसरा लाभ. ज्या मजुरास बहुत वेगळालीं कामें करायाचीं असतात, त्याचा एक सोडून दुसऱ्या कामावर जाण्यांत आणि आपलीं तीं वेगळालीं कामें स्वाधीन करून घेण्यांत वेळही मोडतो. एकानेंच अनेक कामें पत्कारिल्यास असें होईल कीं, त्यानें एकास हात घातला नाहीं इतक्यांत तें सोडून अगदीं वेगळ्या तऱ्हेचें दुसरें काम त्यास घ्यावें लागेल. मग आपल्या नांगरावरून मागावर, मागावरून लोहाराचे भटीवर, त्या भटीवरून चक्कीवर जावें लागेल. पण त्यांचें जाणें अनेक कामांवर होणारच नाहीं; नांगर, माग, लोहाराची भटी, चक्की, यांतून एकादें असेल तर मग त्यानीं त्या कामावर जावें. मेहनतीची वांटणी झाल्यापूर्वी नांगर, माग इत्यादि मुळींच नव्हती. मेहनतीची वांटणी होती, तेव्हां लोकांस अवकाश सांपडतो. मग ते अनेक कामें सोडून, नांगर, माग इत्यादि यंत्रें करायाचें कसब शिकावयास अथवा तीं तीं यंत्रें करावयास इकडे तिकडे लक्ष न जाऊं देतां उद्योग करून तीं यंत्रें उत्पन्न करितात.

याकरितां मेहनतीच्या वाटणीविषयीं चांगली सुधारणूक झाली, त्याकाळीं यंत्रें होऊं लागलीं; श्रम करणें सोपें व कमी व्हावें असें जें या यंत्रांपासून कार्य होतें तें बहुधा कोणास खरेंसें वाटणार नाहीं. पवनचक्की अथवा पाणचक्की यासारिखें साधें यंत्र असतां, यापासून धान्य दळण्याचें काम पहा किती कमी मेहनतीनें होतें! दोहों दगडांच्या मध्यें धान्य घालून त्याचा चुराडा हातमेहनतीनें करणें तें दळणें होय. ही अशी दळण्याची रीत बहुतकरून फार श्रमकारक आहे, जातें इत्यादि जीं दळण्याचीं यंत्रें असतात, तिहींकरून दळूं लागलें असतां वेळ लागतो व श्रम होतात; परंतु पवनचक्की अथवा पाणचक्की इजकडून वायूच्या अथवा पाण्याच्या स्वाभाविक गतीनें दळण्याचें बहुत करून अवघें काम मोठ्या झपाट्यानें होतें.

मुंबई मुकामीं कापसाच्या गठ्या बांधायाच्या चक्क्या आहेत त्या तुझ्या पाहण्यांत आल्याच असतील. सुती काम करण्याच्या चक्क्या इंग्लंड देशीं आहेत असें सांगतात. त्या चक्क्यांपासून यंत्रसाहित्याचें चमत्कारिक कार्य होतें. त्या चक्क्यांचीं अवघीं चाकें व सूत कांतण्याच्या खुंट्या वाफेच्या यंत्रानें चालू होऊन शेंकडो माणसांचें काम होत असतें.

गोपाळ : उद्योगाची वांटणी हा मोठा सुरस विषय खरा. याचें आणखी व्याख्यान होईल तर बरें.

गुरु : बरें तर ऐक. उद्योगाची वांटणी झाली ह्मणजे खर्च कमी लागतो, यास कारणें दोन आहेत. तीं अशीं, मेहनत वांटली गेल्यामुळें वेळ फारच कमी लागून काम त्वरित होतें, व प्रत्येकास काम नेमून

दिलेलें असल्यामुळें त्यांत तो प्रवीण होतो. दुसरें असें कीं कोणत्याहि कारखान्यांत नाना प्रकारचीं कामें असतात; त्यांत कांहीं कामें सामान्य मनुष्यानें केलीं असतां होतात; व कांहीं कामांस फार कुशल कारागीर लागतात. आतां उद्योगाची वांटणी झाली नसली ह्मणजे, जो कसबी अतिशय नाजूक काम करीत असेल त्यासच बाकीचें सर्व काम करावें लागेल. तेव्हां जी त्याला मजुरी द्यावयाची ती सर्व कामाची सारखीच द्यावी लागेल. यास उदाहरण, जो म्या तुला टांचण्या करण्याचा कारखाना सांगितला, त्यांत कांहीं कारागीर लोकांस दरदिवस चार रुपये प्रमाणे मजुरी मिळती; त्यांसारखें ज्यांचें काम नाजूक नाहीं त्यांस दर दिवस आठ आण्याप्रमाणे मजुरी मिळती. या कारखान्यांत जर मेहनतीची वांटणी झाली नसती, तर आठ आण्याचें काम करायासही चार रुपये द्यावे लागते. पण मेहनतीची वांटणी झाल्यामुळें चार रुपयांचे किंमतीचें काम चार रुपयेवालेच करितात; रुपयावाले रुपयाच्या किंमतीचें काम करितात. व आठ आण्याचें काम नवे उमेदवार लोक करतात. याप्रमाणें उद्योगाची वांटणी झाली ह्मणजे नवीन यंत्रांचा शोध लागून, तीं चालू केल्यानें काम त्वकर उठतें, व ज्या कामास जी मजुरी योग्य तितकीच द्यावी लागती. म्हणून खर्च फार कमी लागतो.

गोपाळ : बरें, जरी यंत्र झालें तरी त्यास कोणी चालविणारा पाहिजे. त्याचे तर पोटास घालावें लागेल. तेव्हां खर्च कमी कसा होईल ?

गुरु : वायु, वाफ, पाणी, असे जे सिद्ध पदार्थ यांची यंत्राच्या ठायीं योजना करायाची कळा मनुष्यास जसी जसी साधती तसी तसी त्या यंत्रसाहित्याचे ठायीं कार्यशक्ति विशेष येती. मग त्याला जें स्वतां करायाचें काम, तें तो त्या सिद्धपदार्थांकडून करून घेतो. या उपायें करून मेहनत फार कमी होती. मनुष्यास जे श्रम करायाचे तितके करावे लागत नाहींत, आणि काम बहुतकरून चांगलें नीट एकसारिखें होतें.

खिळे करावयाच्या कामाची हातोटी कोठपर्यंत साधली हें मागें आपण पाहिलें. परंतु हस्तव्यापारेंकरून व्हावा तितका उद्योग केला तथापि तो यंत्रसाहित्यापुढें तुच्छ आहे. अमेरिका खंडांत युनैटेड स्टेट्स म्हणून राज्य आहे. तेथें लोखंडी खिळे करावयाचें यंत्र केलें आहे, तेणें करून इतके त्वरेनें काम होतें कीं, एका मिनटाच्या अवकाशांत २५० अथवा एक अवरांत १५००० खिळे पुरतेपणीं तयार होतात.

गोपाळ : मला वाटतें, मेहनतीची वांटणी करण्याची चाल बरीच झाली असेल तेव्हांच लोक धातूंचा उपयोग करूं लागले असतील.

गुरु : यांत काय सांगावें; बहुत मनुष्यें इतर कामें सोडून धातूच्या खाणी खणायाचा उद्योग करूं लागतील तरच धातूंचा उपयोग व्यवहारांत करितां येईल. अमेरिका खंडांतील मेक्सिकान् व पेरुवियान ह्मणून जे लोक त्यांनीं सुधारणूक कांहींसी चालू केली होती, परंतु पृथ्वीच्या पोटीं सोन्याविषयीं शोध केला नाहीं, नद्यांच्या पोटीं जें सोनें सांपडे तें तें वेचून घेऊन ते संतुष्ट असत. ब्रिटन् देशीं धातूंच्या खाणीं खणून धातु काढण्याचें काम बहुत काळापासून चालत आलें आहे. पूर्वीच्या ब्रिटिश लोकांसी फिनिसियन लोक कथील व दुसऱ्या धातु यांचा व्यापार करीत म्हणून सांगतात, त्यास फिनिसियन लोकांनीं धातूच्या खाणी खणायाची विद्या ब्रिटिश लोकांत चालू केली असावी.

गोपाळ : देशसंपत्तीचा संग्रह होण्याविषयीं उद्योगाची वांटणी अगत्य झाली पाहिजे असी माझी पुरतेपणीं खातरी झाली. बरें पण उद्योगाच्या वांटणीमुळें लोकांच्या मनबुद्ध्यादिकांस जडपणा येणार नाहीं काय ? जो मनुष्य एकाच साध्या शिल्प कर्मावर बसेल, तो तें काम सुगमरीतीनें व निपुणपणानें करण्याची फारच चांगली हातोटी साधील; पण तो दुसऱ्या सर्व संस्कारांस मुकेल. अडचणीच्या

प्रसंगीं मनानें जागृत होऊन उद्योगास लागणें, नाना प्रकार पाहून त्यांविषयीं आस्था वाटवूं लागणें, अथवा दुसऱ्याचें शाहणपण पाहून आपण शाहणें होणें असें त्यास कदापि होणार नाहीं. काय तो एकच उद्योग करायाचा, त्या उद्योगाच्या पाठीस त्यास अलडून राहवें लागेल; त्यामुळें त्याच्या कल्पनाही आकुंचित होतील, त्याचीं विवेकादिक नष्ट होऊन तो ज्या जड यंत्राच्या योगानें काम करितो त्यासारिखा जड होईल. पण कुणब्यास असें होणार नाहीं, यास अनेक उद्योग करावे लागतात. याची व यंत्रसाहित्याचीं फारसी गांठ पडत नाहीं. ह्मणून त्यां अनेक उद्योगांच्या वहिवाटीवरुन यास ज्ञान प्राप्त होतें, हा एकयाच ठिकाणीं अलडला राहत नाहीं, यास चहूंकडे पाहयास सापडतें, ह्मणून याची बुद्धिही चांगली विशाल होती.

गुरु : नांगरहाक्याचा समज त्याच्या कामाच्या मर्यादेप्रमाणें बहुतकरुन चांगलाच असतो. परंतु नांगरहाक्या आणि शिल्पी ह्मणजे कारागीर यांसीं, एकाद्या सामान्य विषयावर गोष्टी बोलूं लागलें असतां बहुतकरुन असें आढळतें कीं, कारागीराची हुशारी, बुद्धिचापल्य, विचार हीं अधिक, तसें नांगरहाक्याचे बोलण्यांत दिसत नाहीं. शिल्पकाम करणाऱ्या कारागीर लोकांसीं सहज व्यवहार होतो ह्मणून त्यांची हुशारी अधिक असती. शिल्पकळा, कसबें, शहरांत चालत असतात. त्यामुळें कारगिरांचें शहरांतच जवळजवळ राहणें पडतें, शहरांतील लोकांसीं त्यांचें बोलणें चालणें सहजांत होतें; तसें मुलखांत जेथें तेथें खेडींपाडीं असतात, तेथें होत नाहीं. कारागिरांची एकमेकासीं भेट झाली म्हणजे ते एकमेकाचे धंद्याच्या गोष्टी सांगतात, जे वाचायास शिकले आहेत ते वर्तमानपत्रें इत्यादि वाचितात, व्यापार कानून कायदे या प्रकरणींही गोष्टी बोलत असतात, ते मोठमोठ्या कारखान्यांत एक्याच जागीं काम करीत असतात, ह्मणून कामास कांहीं अडथळा न होतां त्यांस एकमेकासीं बोलायासवरायास सोईवार पडतें. कोणत्याहि स्थितीचे लोक असोत, पण त्यांचें एकमेकासीं बोलणें चालणें होऊं लागलें ह्मणजे एकमेकास पाहून शाहणे होऊं लागतात, जे चतुर व उद्योगी असतात त्यांचे उपभोग व सुखें कनिष्ठ स्थितीच्या लोकांचे पाहण्यांत येऊं लागतात. त्यांस असें वाटूं लागतें कीं, तीं चांगलीं सुखें आपणही मिळवावीं, मग ते तीं सुखें मिळविण्याचा उद्योग करुं लागतात. असें मनुष्यास होणें हा एक शिक्षेचाच प्रकार होय, एणेंकरुन लोकांचें अज्ञान नाहींसें होऊन त्यांची उद्योगाकडे प्रवृत्ति होती, असें मागें सांगितलेंच आहे.

गोपाळ : जेथें कसबें चालतीं असतात अशा शहरांतील कनिष्ठ स्थितीच्या लोकांचा एकमेकासीं नित्य सहवास होतो, तेणेंकरुन ते एकमेकास पाहून जसे शाहणे होतात, तसे त्यांचें आचरण बिघडत नाही काय ? ज्या शहरांत लोकांची वसती फार, तेथील कनिष्ठ स्थितीचे लोकांत दुराचरणही फार अढळतें, तितकें खेड्यापाड्यांतल्या लोकांत अढळत नाहीं; शहरांत जीं खटलीं होतात, तीं या गरिबांच्या झोपड्यांत होत नाहींत.

गुरु : उभय स्थलींचे वसतींत अंतर किती याचा तूं विचार कर; जेथें शिल्प कर्में होत असतात अशा एकाद्या शहरांत जितकी लोकांची वसती असती, तितकी खेड्यापाड्याच्या चवरस पंधरा कोस जमीनीवर देखिल असत नाहीं. एथें त्यांचा जिकडे तिकडे फैलावा झाला असतो. या करितां उभय स्थळींच्या लोकांचीं आचरणें जरी सारखीं असलीं तरी दुराचरणाची गोष्ट खेड्यापेक्षां शहरांत विशेष असें आढळेल. उभयतांची संख्या बरोबर असून त्यांच्या अपराधांच्या संख्या परस्परें ताडून पाहतां शिल्पकर्में करणाऱ्या लोकांपेक्षां कृषिकर्में करणाऱ्या लोकांच्या अपराधांची संख्या अधिक, असें केवळ मोठ्या माहितगारीची मनुष्यें सांगतात. एकाद्या गांवढळास दुर्लक्षणामुळें वाईट कर्म करावें असें वाटलें तर जबरी, चोरी, खून हीं उघड रीतीनें करायास त्याच्या संस्कारहीन स्थूलबुद्धीस कांहीं संकोच वाटत नाहीं. पण तशीं निर्दय कर्में करण्याविषयीं शहरांतील सुधारलेल्या लोकांचें मन पुढें

पाऊल घालीत नाहीं. यां लोकांचा त्यांच्याच बरोबरीच्या लोकांसीं नित्य सहवास होतो, तेणेंकरून यांचें आचरण, बुद्धि हीं सुधारतात, त्यामुळें घोर कर्मांकडे यांची धांव जात नाहीं, जर यांजकडून अपराध झाला तर लहानशी दगाबाजी, चोरी असा अपराध घडतो. फ्रान्स व इटाली म्हणून जे देश आहेत, तेथें असें पाहण्यांत आलें आहे कीं गांवढळ लोकांकडून अत्यंत घोर अपराध घडतात; एका प्रांतीं जितके कारागीर लोक, तितकेच दुसऱ्या प्रांतीं शेतकी करणारे लोक, अशा समान संख्यांचे दोन प्रांतांची अलीकडेस पाहणी करून मेळवून पाहिलें, त्यावरून शेतकी करणाऱ्या लोकांत अपराधांची संख्या अधिक असें आढळलें.

गोपाळ : आपल्या भाषणावरून मला चमत्कार वाटतो! गुरेंढोरें पाळून पोट भरणारे लोक केवळ साधे व निर्दोष असें वर्णन झालें आहे, तेव्हां आपण सांगतां तसें कसें होतें?

गुरु : तें वर्णन कवींनी केलें आहे, तें वर्णन व्यवहार स्थितींतल्या कल्पना धरून केलें नाहीं, कविजनाचे कल्पना-शक्तीच्या आश्रयानेच तसें वर्णन होत असतें. त्यांत काय त्या मोहक आणि मनोहर कल्पना असतात. खेड्यापाड्यांत विशेष साधेपणा असतो यांत संशय नाहीं; परंतु लोकांनी तितक्यावरच राहूं नये, आमची उत्तम प्रकारें सुधारणूक व्हावी तशीच आम्हास उत्तम बुद्धि व्हावी, सद्‌गुण प्राप्त व्हावे असी इच्छा करावी.

गोपाळ : असी इच्छा करावी खरी, पण जेथें नाना तऱ्हेचीं कसबें शिल्पकामें होत असतात असीं शहरें व मोठीं मोठीं नगरें, तेथें सद्गुणपेक्षां दुर्गुण अधिक असें आपल्या ऐकण्यांत येतें हें खरें असें आपणही बोलाल.

गुरु : अपराध्यांच्या डोकीवर कायदा करून ठेविला आहे, म्हणून अपराध झाला असतां त्याची प्रसिद्धि होऊन लोकांच्या ऐकण्यांत येतो, तसी सद्‌गुणाची सर्व लोकांत प्रसिद्धि होऊन वाहवा होणें विरळा घडतें. कोणी कोणास ठकविलें, कोणी कोणावर बलात्कार केला म्हणजे तें लागलेंच आपल्या कानीं पडतें, परंतु कोणाची भूतदया किती, परदुःख पाहून कोणास कसी करुणा आली, कोणी, गरिबांनी एकमेकास कसें काय देऊन एकमेकांचे विपत्तीचें निवारण केलें, हें वर्तमान चांगले भले वैद्य इत्यादि जे कोणी त्यां त्यां लोकांच्या घरखटल्याचे माहितगार होतात त्यांस मात्र कळतें.

गोपाळ : बरें, पण खेड्यांतील गरीबांची स्थिति, शहरांतल्यांच्यापेक्षां चांगली असें आपणास वाटतच नाहीं काय?

गुरु : त्या उभयतांतून प्रत्येकास जसें हित, तसें अहित आहे, आणि मला वाटतें, त्या उभयतांच्या बऱ्यावाईटाचें मान बहुधा सारिखेंच आहे. शहरांतील राहणाऱ्यांस अधिक माहितगारी असती, आणि कांहीं संसारसुखें अल्पायासें मिळतात तसें खेड्यांतील लोकांस असत नाहींत; पण ते अधिक बळकट व निरोगी असतात, त्यांकडे चांगलें स्वच्छ असतें. ते आपल्या श्रमानें जें उत्पन्न करितात त्या उत्पन्नास बहुतकरून नेहमी एकसारखी गिऱ्हाइकी मिळत असती. त्या उत्पन्नास लढाई, लोकांच्या चाली, व तशींच दुसरीं कारणें यांपासून धक्का बसायासारिखा योग फारकरून असत नाहीं. पण याच कारणामुळें शिल्पी लोकांस वारंवार मोठ्या विपत्ति प्राप्त होतात.

मेहनतीची वांटणी झाल्यामुळें कनिष्ट स्थितीच्या लोकांची बुद्धि चांगली वाढणार नाहीं, दाबून आकुंचित होऊन राहील, ही मोठी हानी, असें तुला अजून वाटत असलें तर असें समजावें कीं, उद्योगाची वांटणी झाल्यामुळें लोकांत भोग्यसंपत्ती बहुत झाली, हा फारच मोठा लाभ, एणेंकरून ती हानी दिसायास उरतच नाहीं. उद्योगाच्या वांटणीनें गोरगरीबांचीं सुखें वाढलीं इतकेंच नव्हे, तर ज्ञानप्राप्तीचीं साधनेंही सुगम झालीं. तेणेंकरून लहानमोठ्या लोकांत ज्ञानाची प्रवृत्ति होण्यास

सोय झाली. शिल्पकामें चांगलीं सुधरत गेलीं, आणि कितीएक नवीन नवीन निघालेल्या ज्या युक्ति, त्यांसारिखी ग्रंथ छापण्याची युक्ति प्रगट झाली, तेणें करून सर्व प्रकारच्या ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं एक चमत्कारीक साधन झालें, हे सर्व लाभ उद्योगाचे वांटणीपासून झाले.

गोपाळा, ही उद्योगाची वांटणीची कल्पना निघून तिची लोकांत प्रवृत्ति होऊन फार दिवस झाले. अलीकडे वेकफील्डसाहेबाने यावर एक कुशल युक्ति बसविली आहे, ती तुझ्या ऐकण्यांत आली आहे काय?

गोपाळ : नाही महाराज; पण आपण ज्यापेक्षां तिची इतकी स्तुति करितां त्यापेक्षा ती योग्यच असेल तर ती आपणच सांगावी.

गुरु : वेकफील्डसाहेब असें म्हणतो कीं नव्या देशांची वसाहत जेथें होत असती, तेथें दहावीस खेडेगावांमधत एक शहर वसवावें, म्हणजे तेणेंकरून गांवढ्यांतील जे शेतकरी लोक, त्यांस आपल्या धान्यादिकांचा, शहरांतील कारागीर लोकांच्या जिन्नसांसी मोबदला करायास सांपडेल. असें नसलें तर त्या गांवढ्यांतील लोकांचे दृष्टीस नाना प्रकारचे चमत्कारिक जिन्नस पडावयाचे नाहींत. ते शेतकी करून पोट भरुन कशाची इच्छा न करितां आळशासारिखे उगेच राहतील. शहरें जिकडेतिकडे असलीं म्हणजे, चोंहोंकडून जिन्नसा येतील त्या पाहून या आपणास असाव्या अशी यांस इच्छा होईल, तेणेकरून हे उद्योगी व हुषार होतील.

गोपाळ : महाराज, आपल्या हिंदुस्थानांत आणि त्यांत मुख्यत्वेंकरून मुंबई इलाख्यामध्यें शहरांची व तेथील कारागीर लोक यांचे धंद्याची फार कमताई आहे. यामुळेच मला वाटतें की, आपल्या ईकडील गांवांची सांगता तशी स्थिती झाली आहे.

गुरु : खरें, आपल्या इकडे शहरें, व्यापाराच्या जागा फार थोड्या. दाहा पाच कोशांत तर काय, बहुधा पांचपन्नास कोशांतही चांगलें शहर सांपडावयाचें नाहीं. शहराप्रमाणें आसपासच्या खेड्यांची स्थिति असती. मुंबईजवळील माहीम, वांद्रें, परळ, कुर्ले, पवई हे गांव पहा कसे नांदत आहेत. जिकडे पाहावें तिकडे लोक नाना प्रकारच्या शाकभाज्या करीत आहेत. बागबगीचे शोभा देत आहेत. पावसाळ्यांत शेतांची लागवड चालली आहे. कांहीं ऊंस पिकविण्याच्या उद्योगास लागले आहेत. याप्रमाणें सर्व जिकडे तिकडे कामांत निमग्न असतात. हे लोक हुशार, यांस व्यापारी लोकांच्या सहवासामुळें इतर गांवढ्यांतील लोकांपेक्षा विशेष ज्ञान. जेथें नानातऱ्हेचे जिन्नस उत्पन्न होतात व बाहेरूनही येतात, असें मुंबईसारिखें शहर यांस जवळ यामुळें हे जो जिन्नस उत्पन्न करितात, त्याचा तेथें विकरा होतो. व यांसही नाना प्रकारच्या पदार्थांचा उपभोग प्राप्त होतो.

सारांश पुष्कळ शहरें असलीं व त्या शहरांत पुष्कळ कारागीर लोक व व्यापारी लोक असले म्हणजे जसा नगराचे आसमंतात प्रदेश शोभायमान दिसतो त्याप्रमाणे सर्व देश चांगला नांदूं लागतो.

गोपाळ : तर महाराज, असें होण्यास उपाय काय करावा?

गुरु : यास उपाय इतकाच. प्रथम आपल्या इकडे उद्योगाच्या वांटणीचा प्रचार झाला पाहिजे. तो झाला म्हणजे संपत्तीची समृद्धि होऊन मग जिकडे तिकडे शहरें वसूं लागतील; व्यापार वाढेल, नाना प्रकारचीं यंत्रें इकडे येऊन, त्यांपासून लोकांचें फार हित होईल. इकडील गांवढ्यांची स्थिति सुधारेल. ज्यां गोरगरीबांस सद्यः पोटापुरतें अन्नही मिळत नाहीं, त्यांस यथेष्ठ, अन्न, वस्त्र प्राप्त होईल, आणि आळशीपणा व मंदपणा यांचा नाश होईल. असे या देशास उद्योगाचे वांटणीपासून अनेक लाभ होतील. आतां आपण आपला पूर्वोक्त विषय चालवूं.

मला वाटतें, आपण रानटी अवस्थेपासून मनुष्य उद्योगाची वांटणी करावयास योग्य होईपर्यंत त्याची चाल पाहिली. शेवटीं त्यास उद्योगाचे वांटणीपासून काय लाभ झाले ते पाहिले. हा

सुखकारक पालट ज्या कारणांवरून झाला, त्यांची तूं थोडक्यांत एकूणांत करून सांग. मग आपले दुसरे भेटीस त्या रानटी लोकांची पुढें कसी चाल झाली त्याचा आपण शोध करूं.

गोपाळ : संपत्तीचें उत्पन्न होण्याचें स्वाभाविक व प्रत्यक्ष कारण उद्योग दिसतो. मालाचें रक्षण करायास योग्य अशा राज्याची स्थापना होऊन त्यापासून होणाऱ्या लाभांचा विस्तार होईतोंपर्यंत अन्नवस्त्रादिक जें अगत्य पाहिजे तितकेंच प्राप्त होतें, नंतर उद्योगाची प्रवृत्ति लौकरच होती. एका माणसानें जें अधिक उत्पन्न केलें असेल, तें तो दुसऱ्याकडल्या अधिक झालेल्या जिन्नसास मोबदल्यानें देतो. अशा रीतीने जिन्नसास जिन्नस देण्याच्या व्यापाराची सोय झाली म्हणजे मेहनत अथवा काम वांटून करण्याची पद्धति आपेंआप चालू होती, मग ज्याच्या योग्यतेविषयीं आपण नुक्तीच वाटावाट केली असें जें यंत्रसाहित्य तें उत्पन्न करण्याची लवकरच प्रवृत्ति होती.

गुरु : फारच चांगलें सांगितलें. लोक रानटी स्थितींत होते, त्यापेक्षां आतां ते चांगले व सुखी झाले, असी तर आपली खातरी झाली, आतां आपण लोकांस सद्यः यांच्या या सुधारलेल्या अवस्थेंत ठेवून यांचा निरोप घेऊं.

# पूर्वभागसंवाद ६

यांत कोणी मनुष्य[1] मातबर कसा होतो, गरीब कसा होतो—संपत्तीचा संचय कसा होतो—तिची वहिवाट कसी होती—तिजविषयीं गरीब लोक मेहनत कसी करतात—भांडवलाचा धनी अथवा पुंजीदार व मजूर यांत कामाविषयीं कसा करार ठरतो, गरिबाला चाकरीस ठेवणे मातबरास कसें अगत्य आहे, भांडवलाचे अथवा पुंजीचें लक्षण कसें, पुंजीपासून उत्पन्न कसें होतें. मजुरांस चाकरीस ठेविल्याने काय नफा होतो. उपज करणारे मजूर कसें असतात. पुंजीदार मनुष्य घरचे सुखी कसे असतात, पुंजीच्या मानाप्रमणे उद्योगाची मर्यादा कसी असती. पुंजी वाढती त्याप्रमाणें उद्योग कसा वाढतो. जें उत्पन्न होईल त्यांतून रक्षण करून तें पुंजीत घातल्यानें पुंजी कसी वाढती, संपत्ति क्रमेंकरून मेळविल्यानें जसें सुख होतें तसें संपत्ति आपल्या संग्रहीं ठेविल्याने कां होत नाहीं. इत्यादि सांगितलीं आहेत.

गुरु : लोकांची सुधारणूक कसी होत गेली, याचा आपण शोध करीत असतां, मालाचें रक्षण व उद्योगाची वांटणी यांपासून जीं सुखकारक कार्यें झाली तीं लक्ष्यांत आणिलीं. तीं कार्यें होऊं लागलीं त्या काळापासून एक लहान एक मोठा इत्यादि नानाप्रकारच्या पदव्या आणि एक मातबर एक गरिब अशा नानाप्रकारच्या स्थिति लोकांत चालू झाल्या असें समजावें.

गोपाळ : होय. आणि त्या नानाप्रकारच्या पदव्या व स्थिति चालू झाल्यामुळें जें वाईट होतें, तेंही त्या काळापासूनच होऊं लागलें असें समजावें. नानाप्रकारच्या पदव्या व स्थिति एकेकडून मात्र चांगल्या दिसतात, दुसरेकडून पाहिल्या तर फार वाईट दिसतात.

गुरु : लोकांत नानाप्रकारच्या पदव्या आणि स्थिति चालू झाल्यापासून वाईट होऊं लागलें असें मला वाटत नाहीं. त्यापासून बहुतकरून फारच हित होतें, कां तर उद्योगाची प्रवृत्ति करायास व मनुष्यांची मनबुद्ध्यादिक व्यापारास लावायास नानाप्रकारच्या पदव्या व स्थिति फारच योग्य आहेत. गरीब मातबर असा प्रकार रानटी लोकांत नसतो, कां तर तिकडे सारेच गरीब, तुरुत निर्वाहास जितकें पाहिजे त्याहून अधिक कोणी मिळवूं शकतच नाहीं, मग मातबर कोठून होईल! लोक सुधारले म्हणजे मालाचें रक्षण व उद्योगाची वांटणी होती, त्यामुळें असें होतें कीं आपली गरज अथवा इच्छा तृप्त करून उरे इतकी विशेष संपत्ति मिळवावयास उद्योगी व चतुर मनुष्य समर्थ होतो. नेहमी उद्योग होत गेला म्हणजे त्या उद्योगापासून जें अधिक उत्पन्न होतें तें सांचत गेलें म्हणजे कालेंकरून संचय

१. मातबर म्हणजे पुंजीदार व गरिब म्हणजे पुंजीरहित अथवा मजूर.

होतो. असा संचय ज्याजवळ झाला तो मातबर होतो. पण जो कमी उद्योग करितो व जो फक्त आपल्या दररोजच्या पोटगीपुरतें मिळवितो तो गरीब होऊन राहातो, अथवा त्याकडे कांहीं संचय होत नाहीं. आणि जो निरुद्योगी असतो त्यास तर वास्तविक गरीबी प्राप्त होती.

गोपाळ : संपत्तीचा संचय करून फळ काय? संपत्ती स्थिर नव्हे; तिचा व्यय होऊन अथवा भूमींत पुरलेली राहून नाहींसी होती. जर व्यय झाला तर मोठे कष्ट करणाराही मनुष्य असला तथापि गरीब होतो, मग त्याची आणि कमी उद्योग करणारा जो त्याचा शेजारी त्याची दशा सारखीच होती. जर संपत्ति भूमींत पुरलेली राहिली तर मग तो संचय कोणालाच उपयोगी पडत नाहीं.

गुरु : ही शंका त्वां मोठी योजून काढिली, यांत दोहींकडून अडचण दाखविली. याचें उत्तर असें आहे, संपत्तीचा जेथें विशेष व्यय होतो, तेथें विशेष उपभोग व्हावा हें तर तुझ्याच बोलण्यावरून सिद्ध होतें. संपत्ति भुमीत पुरलेली राहती असें जें तुझें बोलणें त्यावरून असें निघतें कीं द्रव्य, पैका, यांचें ठिकाणीं तूं संपत्तीस पहिल्याप्रमाणे मानूं लागलास. अरे आपण ज्या संपत्तिविषयीं बोलत आहों ती मोबदल्याने द्याया-घ्यायाची संपत्ति; शेतकी, मळा, अथवा शिल्पकळा करून जे जिन्नस उत्पन्न होतात ते जिन्नस मिळून ही संपत्ति झाली आहे. हें तूं विसरलास काय? या संपत्तीचे बहुत्येक जिन्नस असे असतात कीं त्यांस भूमींत पुरून ठेविलें असतां ते राहाणारच नाहींत. त्यांची वहिवाट करण्याची फार चांगली युक्ति काढिली आहे, तेणेंकरून त्यांचें रक्षण होऊन त्यांची वृद्धिही होती.

गोपाळ : खरें काय? तर ती कोणती युक्ति?

गुरु : त्या युक्तीविषयीं तुला पहिल्याने कांहीं समजावून सांगितल्यावांचून बोध होणें अवघड आहे.

मनुष्यें रानटी स्थितींत असतां शिकार करून अथवा भूमींतून आपेंआप उत्पन्न झालेलें घेऊन आपलें पोट भरितात, असे ते सुधारलेले स्थितींत असतां आपलें पोट भरूं शकत नाहींत, कारण सुधारणूक झाली म्हणजे जमीनीची लागवड होऊन रान नाहींसें होतें. अमुक भूमी अमक्याचा माल असें होतें.

गोपाळ : मातबरांच्या स्वाधीन जमीन झाली, मग गरीबांचें पोट कोठून भरेल हें उघडच आहे.

गुरु : बरें, मातबर आपल्या संपत्तीस काय करीत असतील?

गोपाळ : गरीबांस तर त्या संपत्तीचा थोडकाच अंश प्राप्त होत असेल, कोणी कसेही परोपकारी असले तथापि त्यांच्या स्वकारणीं किती खर्च होतो, आणि त्यांकडून धर्म किती होतो याचा विचार केला असतां धर्मास दिलेलें अति अल्प दिसतें.

गुरु : गरीबानी आपल्या पोटगीकरितां मातबरांच्या धर्मादायाची इच्छा करून राहावें हें नीट नव्हे, कळलें? तुझ्या मतें गरिबानी भिकारीच झालें पाहिजे, त्या वांचून त्यांस मातबरांच्या संपत्तीचा अंश मिळण्याचा दुसरा मार्ग नाहीं काय?

गोपाळ : भीक मागावी, नाहींतर चोरी करावी, यावांचून दुसरा मार्ग कोणता? हां हां. त्यांनीं मेहनत करून मिळवावें असा आपल्या मनांतला भाव असेल.

गुरु : होय, त्यानी मेहनत करूनच मिळवावें. मला भीक द्या असें मातबरांकडे गरीबाने बोलूं नये, तर तुम्हास जें कांहीं पाहिजे त्याजपेक्षां तुमच्या जवळ अधिक आहे, माझ्याजवळ तर कांहींच नाहीं; तुमचे संपत्तीचा थोडासा अंश माझ्या निर्वाहाकरितां आपण मला द्यावा; त्याबद्दल द्यावयास माझ्याजवळ माझे मेहनतीवांचून दुसरें कांहीं नाहीं; तुम्ही जें मला द्याल त्याजपेक्षां तुम्हास मी आपल्या मेहनतीनें अधिक मिळवून देईन. तुम्हीं मला पोसाल तर मी तुमचें काम करीन असें बोलावें.

गोपाळ : मजुरांस खायाला न घालितां रोजमुराही देत असतात.

गुरु : खायास घातलें काय आणि रोजमुरा दिला काय, फळ सारखेंच. मजुरास ज्यां जिन्नसांची गरज असती, त्यांच्या ठिकाणीं रोजमुऱ्याचा ऐवज समजावा, त्या ऐवजाने खाया प्यायाचे जिन्नस विकत घेतां येतात.

गोपाळ : तेव्हां तो मजूर मातबरास असें बोलेल कीं, मला अन्न आणि वस्त्र द्या. त्यांचे बदली मी तुम्हास माझ्या मेहनतीने दुसऱ्या वस्तू पैदा करून देईन.

गुरु : होय, तो तसेंच बोलेल, आणि जें काम करून घ्यावयाचें त्याबद्दल तो मातबर मनुष्य आपल्याकडे जें उत्पन्न अथवा जो जिन्नस झाला असेल तो त्या मजूरास देईल. याप्रमाणें तो गरीबाची मजुरी आपल्या स्वाधीन करून घेतो आणि त्यापासून त्यास जें प्राप्त होतें तेणेकरून आपली संपत्ति वाढवितो.

गोपाळ : हें गरिबास आपला निर्वाह करून घेण्याचें साधन खरें, परंतु एणेंकरून माझें पुरतेपणीं समाधान होत नाहीं, कां तर मातबरांनी दया केली तर गरिबानी वांचावें; जर मातबरांनीं गरिबांस आपल्याकडे कामावर ठेऊन घेतलें नाहीं तर मग यानी भुकें मरावें.

गुरु : खरें, पण यांच्या साह्यावांचून मातबराचे हातून काय होणार होतें ?

गोपाळ : मातबरास गरीबाची काय गरज, मातबराजवळ जी संपत्ति असती त्या संपत्तीने त्यांचा चांगला सुकाळाने निर्वाह होईल.

गुरु : पहिल्यानें तसें कदाचित् घडेल, परंतु काळेंकरून त्या संपत्तिचा व्यय होऊन जाईल. मातबराचीं पिकें आणि गुरें नाहींसीं होतील, वस्त्रें वापरण्यानें फाटून जातील आणि घरें जायां होतील.

गोपाळ : पिकेंतर प्रतिवर्षी उत्पन्न होत असतात, वस्त्रें नवीन घेतां येतात आणि घरांची मरामत अथवा दुसरी बांधणी होत असती. ह्या सर्व गोष्टी द्रव्यानें सहज घडून येतात.

गुरु : बरें, पण नवीन पिकें कोण पिकवितो, नवीन वस्त्रें कोण करतो आणि नवीन घरें कोण बांधितो ? हीं कामें गरिब मजूर लोकांकडून घडतात कीं नाहीं ?

गोपाळ : होय, त्यांकडूनच घडतात, हीं कामें करायास मजूरांस कामावर ठेवणें जरूर आहे खरें. गरिबांस काम सांगण्यानें असें होतें कीं गरिबांचें वांचणें बहुतकरून स्वतंत्रपणें होऊं लागतें. मातबराच्याच मर्जीवर असत नाहीं. असें त्या गरिबांचें हित होतें आणि मातबराचेंही हित होतें हें माझ्या लक्षांत आलें नाहीं.

गुरु : मातबर आणि गरीब यांचें एकमेकास अगत्य आहे; हें पोट आणि हातपांय यांच्या गोष्टीसारिखें आहे.

गोपाळ : मातबर आपले संपत्तीस भूमींत पुरून न ठेवितां रक्षितो, असी एक युक्ति आहे म्हणून आपण मागें सांगितलें, तेव्हां मला वाटतें, प्रस्तुत जें बोलत आहां तेंच दर्शविलें.

गुरु : होय. मजूर लोक संपत्तीचा व्यय करून ती पुनः उत्पन्न करितात. कोणी एक मनुष्य आपली अवघी संपत्ति न खर्चितां तिचा कांहीं अंश रक्षून ठेवितो, आणि मजूर लोकांस काम करावयास सांगून त्यांस त्या अंशांतून रोजमुरा देऊन त्या व्यवहाराने नफा करून घेतो, त्या संपत्तीचे अंशास भांडवल अथवा पुंजी असें म्हणतात. तूं पुंजीविषयीं पूर्वी ऐकलेंच असशील ?

गोपाळ : होय, जो पैकेकरी असतो, त्यास पुंजीदार असामी म्हणतात. हे दोन्ही शब्द एक्याच अर्थाचे असावे.

गुरु : होय, एक्याच अर्थांचे; तथापि पुंजीदार म्हणजे द्रव्यवान नव्हे तर संपत्तिमान् आणि पुंजी खर्चून टाकणे यांत मोठा तोटा आहे. पुंजीपासून उत्पन्न होई अशा रितीने पुंजीस वहिवाटणें यांत नफा आहे. ती वहिवाट अशी, मजूर लोक कामास लागत अशा रितीनें पुंजीची योजना करितात

आणि त्या मजूरांच्या मेहनतीपासून जो फायदा होतो, त्यास जमा किंवा उत्पन्न असें म्हणतात हेंही त्वां ऐकिलें असेल.

गोपाळ : मजूरांना रोजमुरा देण्याकडे पुंजी लावली तर तिचा खर्च होऊन ती नाहींसी होईल, एकूण इकडून तोटा आणि पुंजीदाराने ती स्वतांकरीतां खर्चिली तरीही तोटा.

गुरु : मजुरांची मजुरी देण्याकडे पुंजी लाविली तर तोटा नाहीं. असें आहे, ज्या पुंजीची वहिवाट करावी तीचा व्यय होतो. ती नाहींसी होत नाहीं; पुढें उगवून वृद्धि करणारें जें बीज तें भूमींत टाकिलें असतां नाहींसें झालें असें दिसतें तसी ही नाहींसी झाली असी दिसती. पण त्याच बीजाप्रमाणें ही मजुरास दिली असतां नाहींसी होऊन त्यांचे कामाने झालेल्या पदार्थांच्या रूपें वाढत्या किंमतीने उत्पन्न होती. जर मजुराने वीस भाकरीचें धान्य पिकविलें, आणि त्याचा रोजमुरा दाहा भाकरीचे किंमतीचा असला, जर त्याने दोन डगल्यांचे कापड विणिलें आणि त्याचा रोजमुरा एका डगल्याचे किंमतीचा असला, तर ज्या दाहा भाकरी राहिल्या व जें डगलें राहिलें ही प्राप्ती झाली असें समजावें, व ही त्या मजुरास कामावर ठेवणाऱ्या धन्याचे उत्पन्नाचा हिस्सा होय. याप्रमाणे पुंजीची वहिवाट केली असतां उत्पन्न होतें.

गोपाळ : होतें तथापि हें उत्पन्न प्राप्त करून घेण्याची जी रीत तिजविषयीं माझ्या मनांत कांहीं शंका आहे. मजुराचा जो रोजमुरा त्यापेक्षां तो आपल्या मेहनतीनें अधिक पैदा करील तर त्याने ती आपली अवघी पैदास्त घ्यावी हें नीट दिसतें, त्या पैदास्तीपैकीं त्यास कांहीं हिसा कामावर ठेवणाऱ्या धन्यास द्यावा लागतो, एणेकरून त्याच्या उद्योगाचा मोठा हिरमोड होतो.

गुरु : आपल्या रोजमुऱ्याच्या किंमतीइतके जिन्नस मजूरदाराने पुंजीदाराकरितां पैदा केले, तर खर्चा-इतकीच जमा होईल, पुंजीदारानें जें त्यास दिलें तितकेंच त्यानें परत केलें असें होईल; या अशा मोबदल्याने यास कांहीं हानि अथवा लाभ होणार नाहीं, नासून जाणारें जें तें पुनः उत्पन्न केल्यानें जसेंचें तसेंच राहील इतकें मात्र होईल. अशा करारास कोणीच पुंजीदार कबूल होणार नाहीं हें सांगायास नलगे. याकरितां कोणी गरीब माणूस मातब्राकडेस आपल्या पोटगीकरितां जाऊन मी त्या पोटगीबद्दल आपलें काम करीन; असें जेव्हां त्यास बोलावें लागतें तेव्हां तुम्ही मला यावर्षी जें अन्न द्याल, तितकेंच अन्न मी तुह्मास दुसऱ्या वर्षी उत्पन्न करून देईन असें तो बोलत नाहीं, कां तर अशा बोलाने मला कोणी काम सांगणार नाहीं हें तो जाणतो. हल्लीं जें अन्न उत्पन्न झालें आहे, तें पुढें होणाऱ्या जिन्नसाकरितां द्यावयास पुंजीदाराचे मन वळे असी कांहीं हिताची आशा त्यास दाखविली पाहिजे. म्हणून तो गरीब असें बोलणे लावितो कीं हल्लीं आपण मला जें अन्न द्याल, त्या ऐवजी येत्या वर्षी मी आपल्यास जाजती अथवा अधिक किंम्मतवार भरणा होई असें करून देईन.

गोपाळ : खरें; परंतु पुंजीदारांनी अवघी जमीन ग्रासून आपली मिळकत केली, मजुरांस कष्टावांचून कांहींच ठेवलें नाहीं, असें असतां त्यां कष्टांपासून जीं फळें उत्पन्न होतात, ती अवघीच वेंचून घ्यावयास त्यांस मोकळीक असूं नये हा त्यांवर जुलूमसा दिसतो. जर मी कायदा करणारा असतों तर मजुराच्या मेहनतीपासून जें उत्पन्न होईल तें अवघें त्यांस पुंजीदाराने दिलें पाहिजे असी कानून ठरवितों. अशा कायद्याने मजुरांची स्थिति चांगली होऊं लागेल यांत संशय नाहीं. महाराज, आपल्यास हासें येऊं पाहतें; मला वाटतें, ही माझी युक्ति आपल्यास पसंत वाटत नाहीं.

गुरु : त्यांत माझ्याकडून अणखी एक जाजती करावें तें असें कीं मजुरास पुंजीदारांनी कामावर ठेविलें पाहिजे म्हणून एक कायदा बांधावा; तूं सांगतोस त्या बोलीने तर त्यांस कोणी काम सांगणार नाही. शेतांत खपणारे जे पिकवितील त्याच्या किंमतीइतका रोजमुरा त्यां खपणारांस शेताच्या धन्याने द्यावा

असें झालें तर त्या धन्यास कांहीं फायदा होणार नाहीं. याकरितां तो आपलीं शेतें बिनलागवड राहूं देईल, त्यामुळे जमीन ओसाड पडून राहील, आणि शेतखपे भुके मरतील, याच कारणास्तव कसबी लोक आपल्या काम करणाऱ्यां माणसांस, व्यापारी आपल्या कार्कुनांस रजा देतील; फार काय सांगावें, उद्योगाचा अगदी मोड होईल; देशांचा हटकून नाश व्हावा अशा कायदा करण्याचा तुझा बेत असला तर तूं सांगतोस तसाच कायदा केला पाहिजे.

गोपाळ : खरें, म्या सांगितल्याप्रमाणें कायदा झाला असतां आपण म्हणतां तसें होईल; हें पाहिलें असतां मला पूर्वीच कळावें, कां तर आपण मागें बोलिलां त्यावरून असें सिद्ध होतें कीं मजुरांस कामावर ठेविलें असतां लाभ होईल असें पुंजीदारास वाटतें, तेव्हां तो त्यास काम सांगतो.

गुरु : खरें, मातबर लोक आपल्या पुंजीची वहिवाट करितात, त्यापासून त्यांस जो लाभ होतो तें त्यांस उत्पन्न झालें असें जाणावें. असें उत्पन्न झालें नाहीं तर यंदा जो पुंजीतला ऐवज खर्चला तितकाच दुसऱ्या वर्षास जमा होईल. याप्रमाणें प्रतिवर्षास कदाचित् होत जाईल; परंतु पुंजीवर उत्पन्न न झाल्यामुळे पुंजीदार ती पुंजी आपल्या कुटुंबाच्या रक्षण्याकरितां खर्चून कांहीं दिवसांनी नाहींसी करून टाकील. तो प्रतिवर्षास गरीब होत जाईल, आणि गरिबांस आपल्याकडे कामावर ठेवण्याचें जें त्याचें साधन तें प्रतिवर्षास कमी होत जाईल.

गोपाळ : मला बाळपणांत ही कल्पना वारंवार गोंधळवीत असे. मला असें वाटे कीं आमचे तीर्थरूप जसा आपला पैका खर्चितात तसे ते गरीब व्हावे, पण पाहिलें असतां तसें होऊं नये. गरिबाच्या मेहनतीने संपत्ति पुन उत्पन्न होऊन वाढती हें आतां मला कळूं लागलें.

गुरु : आणखी असें आहे कीं गरिबांस कामावर ठेवल्यांवाचून दुसऱ्या कोणत्या उपायानें उत्पन्न करून घेतां येत नाहीं.

पुंजीदार आपल्या मजूरांकडून उत्पन्न करून घेतो, हें अघटित असें समजू नये. मातबरांस आपली संपत्ति वाढविण्याविषयीं गरिबाला कामावर ठेवावें लागतें ही एक ईश्वराच्याच घरची नेमणूक. ज्यांपासून जीवांचें मोठें हित व्हावें अशा ज्या योजना, त्यांतलीच ही समजावी.

याप्रमाणें मातबर लोकांस आपली पुंजी वाढविण्याची युक्ति असती. तो पुंजीस भूमींत पुरलेली ठेवून वाढवितो असें समजूं नये तर आपल्या मजूरलोकांत वांटितो, ते ती खर्चून दुसरी अधिक मोठी पुंजी उत्पन्न करितात; याकरितां त्यांस कोणें समयीं उपज करणारे मजूर असें म्हणतात.

गोपाळ : तेव्हां कोणा एका मनुष्यानें युक्तिनें खर्च करून चार पैसे उरवून संचय केला, अथवा त्यास वारसा मिळाला तेणेकरून चांगली पुंजी जाहली तर त्यास आपल्या पोषणाकरितां स्वतां काम करणें नलगे. ती पुंजी मजुरांस दिली असतां ते त्याच्याकरितां मेहनत करतील, त्या उत्पन्नानें त्याचें पोट भरेल.

गुरु : त्याची जशी पुंजी असेल आणि त्यास जशी इच्छा असेल त्याप्रमाणे होईल. जर त्या पुंजीच्या उत्पन्नानें त्याची इच्छा तृप्त होईल अथवा त्याचा व त्याच्या कुटुंबाचा चांगला सुखाने निर्वाह होईल, तर त्यास स्वतां काम करणें नलगे, मग त्याने घरीं बसून खावें. पुंजी पुरतेपणीं नसली तर त्यास स्वतां मेहनत करावी लागेल अथवा आपल्या मजूरांचे कामाची देखरेख तरी करावी लागेल. शेतकीचा खटला चालिवणारे व व्यापारी व कसबांचे कारखाने चालिवणारे हे आपआपल्या खटल्याची स्वतां देखरेख करितात.

ज्यांत उत्पन्न होतें अशां उत्पादाल्यास पुंजीवांचून हात चालवणार नाहीं, हें तूं आतां समजलास ना? मजूरांस मजुरी दिली पाहिजे, जिन्नस उत्पन्न करायाचा माल्मसाला, काम करायाची आउतें, हातेरें अशीं विकत घेतलीं पाहिजेत. सारांश मजूरांस कामावर ठेवण्याविषयींचा अवघा खर्च निभला पाहिजे. हें सर्व करायास पुंजी अगत्य असली पाहिजे.

गोपाळ : बरें, पण मजुरास चाकरीस ठेविल्यावांचून एकादे नफ्याचें काम कोणा एकाच्यानें पत्कारवणार नाहीं काय ? अहो रानोमाळीं जीं अळवीं करवंदासारिखीं रानफळें होतात तीं कोणीं गोळा करूं लागला, तर त्याला त्या कामास मजूर, भांडवल, आउतें, हातेरें, अशीं खटलीं कशास पाहिजेत ? अळवीं इत्यादि आपेआप पृथ्वीवर होतात, तीं एक टोपली घेऊन व्हावीं त्याने गोळा करावीं, त्याविषयीं सर्वांची सत्ता सारखीच आहे.

गुरु : लोक रानटी होते, तेव्हां कांहीं मेहनत न करितां पृथ्वीतून आपेआप जें उत्पन्न होई त्यावर आपला निर्वाह करीत. अशी निर्वाह करण्याची युक्ती असे, त्यांतून तूं सांगतोस ती कांहीं बाकी राहिली आहे, ज्यांस पुंजीची गरज लागत नाहीं अशीं कामें फार हल्कीं असतात आणि वर्षात त्यांचा हंगाम थोडकेच दिवस असतो.

गोपाळ : पण कोळीलोकांचें मासे मारायाचें काम आपण सांगतां तसें नव्हे. तें काम मोठें, बहुत दिवस चालायासारिखें असून त्यास पुंजीची गरज नाहीं; मासे मारायास काय ती मेहनतिचीच गरज; फार झालें तर जाळें, होडीं, अशीं लागतात, पावसाळ्यांत तुफानांत कोळी लोकांस समुद्रांत जातवेना असें होतें, त्यासमयीं त्यांच्याजवळ आपला निर्वाह करायास कांहीं असलें पाहिजे इतकीच काय ती अडचण.

बरें, पुंजीवांचून व्यवहार होणारच नाहीं काय ? ज्यांच्याजवळ कांहीं एक पुंजी नसती ते तर आपल्या पतीवर उधार व्यवहार करितात.

गुरु : ती तरी एक खेरीज गोष्ट आहे असें नाहीं; कां तर उधार व्यवहार करणें म्हणजे दुसऱ्याची पुंजी घेऊन वहिवाटणें असें होतें.

गोपाळ : तेव्हां असें झालें, कांहीं तरी जवळ असलें पाहिजे, त्यावांचून कांहीं मिळवितां येणार नाहीं, असी कल्पना मनांत आली असतां खेदास कारण होती. एकूण व्यवहार करायास ज्याच्याजवळ कांहींच नाहीं त्यास गरिबीच्या हातून सुटून जाण्यास कांहीं उपाय राहिला नाही.

गुरु : गरीबी म्हणजे कोणाजवळ अगदी कांहीं असूं नये अशी स्थिति, असा तुझ्या बोलण्याचा भाव असला तर रोजची आपली भाकर पैदा करणारा जो मजूर, त्याविषयीं तें तुझें बोलणें लागू पडणार नाहीं. ज्याच्याजवळ संपत्ति म्हणजे पुंजीचा संग्रह नाहीं, असी जी स्थिति ती गरीबी, असें तूं म्हणत असलास तर अवघेच मजूर त्या स्थितींत असतात असेंही सिद्ध होणार नाहीं. मजूर निरोगी व कष्टाळू असून चांगला कुशल असला, तर आपलें पोट भरून कांहीं मागें टाकायास उरेइतका रोजमुरा बहुतकरून मिळवील; मग तो उरवून जमलेला ऐवज, आल्यागेल्याचें असें जें घर तेथें अथवा दुसऱ्या तऱ्हेचे मौजेंत मर्जीस येईल तसा खर्चील. सांभाळून वागण्याचा त्याचा स्वभाव असला तर तो उरलेला ऐवज खर्चून नाहींसा करणार नाहीं; तर तो ऐवज एकीकडेस ठेवून ल्हानसी पुंजी जमवायाचा आरंभ करील, तींत दुसरी शिल्लक पडत गेली म्हणजे तिचा संचय होईल.

गोपाळ : खरें. महादू आमच्या माळ्याच्या हाताखालीं काम करितो, हा मोठा हुशार व मेहनती आहे. हा एका दिवशीं आपल्या बरोबरीच्या खपणारांपाशीं बोलत होता कीं संसार मांडावयास माझ्याजवळ थोडेसे पैसे जमले म्हणजे लग्न करायाचा माझा बेत आहे. महाराज, मला असें वाटतें कीं आमच्या रूपानी त्यास एक ल्हानसें घर व सुमारें एकदोन बिघे जमीन दिली तर तो बाजारांत ओपायाकरितां शाकभाजीची लागवड करील आणि त्या उपायेंकरून आपलें आणि आपल्या कुटुंबाचें पोट भरील.

गुरु : तसें केलें असतां तुझ्या तीर्थरूपानी पुंजी दिली असें होईल. तें ल्हानसें घर व जमीन भांडवल आहे. परंतु इतक्यानेच त्याचा निर्वाह होणार नाहीं. मळ्यांत काम करायाचीं आउतें, आणि

जमीनीची तयारी करावयास बहुत नसले तरी एक गडी, असें महादूस असलें पाहिजे. मळ्यांत उत्पन्न झालेला जिन्नस बाजारांत न्यावयासारखा होई तोंपर्यंत आपला व आपल्या कुटुंबाचा निर्वाह करायास महादूजवळ कांहीं असलें पाहिजे. हें इतकें करायाचें सामर्थ्य त्याच्या आंगीं यावयास त्याच्याजवळ लहानसी पुंजी असली पाहिजे, ती तो आपल्या रोजच्या उत्पन्नातून सांचवीत गेला असतां तीन किंवा चार वर्षांत जमवील व मग तो मजुरीने मेहनत करणार नाहीं, तो आपलें स्वतांचें काम करूं लागेल. याप्रमाणें सर्व गोष्टीचा आरंभ झाला पाहिजे, ज्या अत्यंत मोठ्या दौलती जमतात त्यां अवध्यांचींच आरंभाचीं साधनें मोठीं असतात असें नाहीं.

आतां आपण असें कल्पावें कीं महादूच्या जवळ १००० रुपयाची माया झाल्यावरून एक बिघा जमीन आपल्याकडेस सार्‍याने घ्यावयाचें त्याच्या आंगी सामर्थ्य आलें तर त्याकडेस १०००० रांची माया झाल्यास दाहा बिघे जमीन घ्यावयाचें सामर्थ्य येईल, त्याच्याने जाजती जमीन चेववणार नाही; सारा भरायाचें जें त्याचें सामर्थ्य त्यापलीकडे त्याच्याने आपली शेतकी वाढववणार नाहीं; याकरितां त्याच्या पुंजीच्या मानाप्रमाणें त्याच्या उद्योगाची मर्यादा होईल.

गोपाळ : मला याचा पुरतेपणीं बोध झाला नाहीं.

गुरु : आपण असें कल्पावें कीं कोणी एक कसबी मनुष्य आहे, घटकाभर मोची का होईना, त्याच्याजवळ जी पुंजी आहे तेणेंकरून आपल्याजवळ दाहा मनुष्यें कामावर ठेवायचें त्यास सामर्थ्य आहे. दुसऱ्या वर्षी त्यास असें अढळलें कीं त्यां मजुरांच्या मेहनतीने आपल्यास १००० रुपयांचा फायदा झाला. त्यास १००० रुपये ही त्याची प्राप्ति झाली. त्याने जर हा ऐवज खर्चिला, तर पुंजी तितकीच राहील, परंतु हा ऐवज त्याने आपल्या पुंजीत घातला तर जाजती मजूर राखून काम चालवायाचें त्यास सामर्थ्य येईल. आतां आपण असें मानावें, कीं दाहा सोडून बारा माणसें याच्याने ठेववतील असा हा झाला, एणेंकरून असें होईल कीं याकडे पूर्वीपेक्षां अधिक जोडे होतील आणि ते विकले असतां अधिक पैदास्त होईल, ही त्या पुंजींत घातली तर काम करणाऱ्यां माणसांस आपल्याजवळ ठेवायाचें जें याचें सामर्थ्य तें पूर्वीपेक्षां अधिक होईल. याप्रमाणें जसी पुंजी वाढेल तसें मजुरी करवून घेणें म्हणजे गरिबांस कामावर ठेवणें वाढेल आणि पुंजी जसी कमी होईल तसें तें कामावर ठेवणें कमी होईल.

गोपाळ : त्या मोच्यास जी प्राप्ति झाली त्यांतून त्याला आपलें आणि आपल्या कुटुंबाचें पोट भरलें पाहिजे, हें विसरतां कामास नये; म्हणून अवघी प्राप्ति पुंजींत दाखल करितां येणार नाहीं.

गुरु : नाहीं, यांत संशय काय. मनुष्याच्या प्राप्तीचा फारच मोठा अंश बहुधा त्याच्या कुटुंबाच्या खर्चांत नाहींसा होतो, परंतु तो जर शाहाणा असला तर जितकें उरवेल तितकें उरवून एकीकडे ठेवितो. अशी शिल्लक सांचली असतां तेणेंकरून त्यास त्याचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार असला तरी तो वाढवून चांगल्या रीतीने करतां येईल.

गोपाळ : होय. कोणाकडे तसी शिल्लक सांचली असतां तो शेतकीचें काम करणारा असला तर तो आपल्याकडे जाजती मजूर ठेवून आपल्या शेतीची लागवड वाढवून सुधारील. व्यापारी असला, तर आपलीं व्यापाराचीं खटलीं वाढवील. याकरितां मनुष्य जसजसा मातबर होत जाईल तसेंतसें त्याच्याठायीं आपली संपत्ति वाढविण्याचें सामर्थ्य येईल. असेंच ना ?

गुरु : होय, असेंच. पहिल्याने हजार रुपये मिळवायास जी अडचण असती त्यापेक्षां दुसरे दाहा हजार मिळवायास कमी अडचण असती.

गोपाळ : मग ज्याच्याजवळ कांहीं नाहीं त्यास ऐवज मिळण्याची किती अडचण असेल ! एकून गरिबाची कठीण अवस्था; त्याशी व्यवहार करून मातबर आपला स्वार्थ साधितात.

गुरु : जो मनुष्य आपल्या उद्योगेंकरून बहुत दौलतीचा संचय करितो तो तेणेंकरून कोणाचें अनहित करितो असें नाहीं. तो उलटें लोकांचें हित करितो. हें तुला पुढें चांगल्या रीतीने समजेल. सद्यः मी तुला इतकेंच कळवितों कीं संपत्तीपासून जें सुख होणार तें जितकें संपत्ती प्राप्त करून घेतानां होतें तितकें संपत्ति आपल्या संग्रही असण्यानें होत नाहीं. जशी जशी संपत्ति वाढत जाती तसा तसा बीत्रास सुखाचा अनुभव होत जातो. तुमचा माळी दोन तीन वर्षांनी संसार मांडावा या आशेने आपल्या प्राप्तींतून सांचवून ठेवित आहे, त्यास त्याच्या संग्रह संपत्ति होईल त्याकाळीं जें सुख होईल, त्यापेक्षां पुढें प्राप्त होणारी संपत्ति लक्ष्यांत आणण्यानें आतां विशेष सुख वाटत असेल; जोंपर्यंत तो वर्षाच्या वर्षास शिलकेचा ऐवज पुंजींत मेळवीत जाईल, तोंपर्यंत त्यास सुखच होत जाईल, परंतु प्रथम जसा आनंद वाटला असेल तसा वाटणार नाहीं. व्यापाऱ्यांस जसा प्रथम प्राप्तीपासून विशेष आनंद होतो तसा आनंद मागाहून जो संचय करतात त्या अवध्यापासूनही होत नाहीं असें ते व्यापारी लोकच सांगतात. आपल्या संग्रहीं संपत्ति असतांना जे सुख होत असतें त्यापेक्षां क्रमेंकरून संपत्ति प्राप्त झाली असतां विशेष सुख व्हावें, असी जी ईश्वराकडची योजना ती नीट आहे. ही उद्योगाची प्रवृत्ति होण्यास कारण होय; याप्रमाणें क्रमेंकरून समृद्धि प्राप्त झाली असतां देशांसही सुख होण्यास फारच उपयोगी पडती, हें पुढें आपल्या दृष्टीस पडेल.

# पूर्वभागसंवाद ७

## भांडवलाविषयीं

यांत स्थिर भांडवल अथवा पुंजी म्हणून काय आहे–स्थिर पुंजी आणि फिरती पुंजी कोणत्या कारणावरून निर्निराळ्या आहेत–पुंजी वेगळाल्या प्रकारच्या असतात त्याविषयीं काय काय उदाहरणें आहेत–गुलामाविषयीं काय सांगितलें आहे, स्थिर पुंजी आणि फिरती पुजी ह्या दोन पुंजी मजूर लोकांस एकसारख्या हितकारक कशा होतात–यंत्र-साहित्यापासून जे लाभ होतात त्याविषयीं म्याकफर्सन साहेबाचे ग्रंथांत काय सांगितलें आहे–से म्हणून साहेब होऊन गेला त्याने देशव्यवहारव्यवस्थेवर ग्रंथ केला त्यांत काय सांगितलें आहे इत्यादिकांचें कथन केलें आहे.

गुरु : पुंजीविषयीं मला कांहीं आणखी बोलायचें आहे.

जमिनीच्या धन्यास जें उत्पन्न होतें, त्यांतून शिल्लक सांचवून तो आपली संपत्ति वाढवितो, त्याजवळ पुंजी वाढती, ती अवघी पुंजी तो शेत खपणारांत वहिवाटीत नाहीं, पीक सांठवावयास कोठारें बांधितो, गुरांस राहायास गोठे बांधितो, त्या कामास जे लोक लागतात त्यांस त्या पुंजीतून कांहीं अंश देतो. लांकडें पैदा करायास झाडें लावितो, लहान लहान घरें बांधितो, आपल्या शेतकीपैकीं जी जमीन ओसाड असती, त्यांतील कांहीं लागवड करितो, या अशा अशा कामाकडेसहि त्याचा पुंजीच्या अंश लागतो. याचप्रमाणे शिल्पकाम कारागिरी करणारा आपलें यंत्र साहित्य अथवा आपल्या उद्योगाचीं आउतें, हातेरें वाढविण्याविषयीं आपल्या पुंजीपैकीं कांहीं पुंजीची वहिवाट करितो.

गोपाळ : मजूर मेहनत करून जे जिन्नस उत्पन्न करतात ते जिन्नस बाजारांत विकायास नेले असतां ताबडतोब विकले जातात म्हणून त्या मजुरांत पुंजीची वहिवाट केली असतां त्या पुंजीपासून चांगली प्राप्ति होती, तसी प्राप्ति घरें बांधणें, आऊतें व यंत्रसाहित्य करणें त्यांत पुंजी वहिवाटिली असतां होत नसेल.

गुरु : तसी प्राप्ति तत्क्षणींच होत नाहीं, काळेंकरून होती. घरें, इत्यादिकांपासून प्राप्तीची आशा नसली तर त्यांविषयीं शेतकी करणारा खोत व कारखाना चालविणारा शिल्पी, हे आपली पुंजी वहिवाटणार नाहींत. जर खोताकडे आपलें धान्य ठेवावयास कोठार अथवा दास्तान नसलें, तर पीक येतांच आपलें तें धान्य त्यास विकावें लागेल. तें जाजती मुदत ठेविल्यानें जाजती फायद्यानें विकलें जातें, म्हणून तें ठेवायास कोठार करणें त्यांत त्यांस फायदा आहे. शिल्प्याने आपले यंत्रसाहित्य सुधारिलें अथवा वाढविलें असतां थोडक्या मेहनतीने बहुत काम होऊं लागेल, याप्रमाणें त्यास प्राप्ति होईल.

गोपाळ : कोणी कारखानदाराने काम करायास माणसें न ठेवितां यंत्रेंच ठेविलीं तर, माणसास रोजमुरा द्यावयाचा जो खर्च होतो, तो होणार नाहीं. याप्रमाणे पुंजी वांचली ती तरी प्राप्तीच समजावी.

गुरु : जर वाफेचें यंत्र ठेविलें, तर मग माणसें तर काय, पण तें यंत्र चालायास घोडेही ठेवणे न लगे. तें यंत्र वाफेच्या नेटाने चालेल, याप्रमाणें झालें असतां माणसें वगैरे ठेवावयाचा जो खर्च त्यापेक्षां अर्धा खर्च कमी होईल.

याप्रमाणें मजुरी, यंत्रें, इत्यादिकांच्या खर्चाविषयीं ज्या पुंजीची वहिवाट होती, तीस स्थिर पुंजी म्हणतात; ही जमीन, घरें, यंत्रसाहित्य, अथवा कसबाचीं आऊतें यांत स्थिरपणें असती. ही पुंजी कोणा एकाकडे असली आणि इची वहिवाट होत गेली म्हणजे इजपासून प्राप्ति होती. जे कामकरी जिन्नस उत्पन्न करतात, तो विकला जाऊन त्यापासून तुरुत प्राप्ति होती. अशा काम करणाऱ्यांच्या पोटगीकरितां जी पुंजी वहिवाटली जाती, तीस फिरती पुंजी असें म्हणतात.

शेतकींत जो जिन्नस उत्पन्न होतो, अथवा शिल्पी जो जिन्नस करतो, तो बाजारांत येऊन विकला जातो, अथवा दुसऱ्या जिन्नसांचे मोबदला दिला जातो, तेव्हां त्यांपासून प्राप्ति होती, त्याच्या पूर्वी होत नाहीं. अशा कामांस जी पुंजी लागती ते नेहमी फिरती असती. ही पुंजी पहिल्याने रोजमुऱ्याच्या व मालमसाल्याच्या द्वारा धन्यापासून मजुरांकडे जाती; मग ही तयार झालेल्या व वाढलेल्या किमतीचे जे जिन्नस त्यांच्या द्वारा त्यां मजुरांपासून धन्याकडे परतून मागें येती, परंतु ज्यां लोकांस त्यां जिन्नसांचा खप त्यांस हे विकले जात, तोंपर्यंत त्या जिन्नसांपासून धन्यास प्राप्ति होत नाहीं.

गोपाळ : स्थिर पुंजी, व फिरती पुंजी, यांचा भेद मला कळलासा वाटतो. खोत आपलीं शेतकीचीं आऊतें आपल्याजवळ ठेवून तीं वापरीत असतो, त्यांपासून त्यास प्राप्ति होती, ती स्थिर पुंजीची प्राप्ति; त्यास जें पीक उत्पन्न होतें, तें त्याने विकलें असतां त्यापासून प्राप्ति होती, ती फिरती पुंजीची प्राप्ति असें समजावें. बरें पण शेतकीचीं गुरें कोणत्या प्रकारच्या पुंजीत घालावीं ?

गुरु : तीं जशीं असतील त्याप्रमाणें त्या पुंजींत घातलीं जातील. जशीं शेतकीचीं आऊतें, तशींच मेहनत करणारीं गुरें आहेत म्हणून तीं गुरें स्थिर पुंजी होय, जसें कीं इंग्लंड देशीं घोडे नांगरास जोडितात ते घोडे आणि तो नांगर स्थिर पुंजी समजावी. पण जी मेंढ्रें व बैल बाजारांत विकावयास ठेविलीं असतात, ती फिरती पुंजी समजावी.

गोपाळ : कोणे खोताकडे जोंपर्यंत बैल नांगर ओढितील तोंपर्यंत ते स्थिर पुंजी समजावी, पण त्यांस बाजारांत विकावयास नेलें म्हणजे तें फिरती पुंजी समजावी.

गुरु : होय, ते एक्यासमयीं स्थिर पुंजी व एक्या समयीं फिरती पुंजी असें समजावे. खोत त्यांस पाळून त्यांकडून काम घेतो, तेव्हां त्यांपासून त्यास प्राप्ति होती, त्यांस विकतो तेव्हांही त्यांपासून प्राप्ति होती.

गोपाळ : जसें मजूर लोकांचे पोटगीस जें लागतें त्यास फिरती पुंजी म्हणतात, तसेंच ज्या गुरांकडून काम घ्यावयाचें त्याचे पोटगीस जें लागतें, त्यास फिरती पुंजी म्हणावें अथवा स्थिर पुंजी म्हणावें ?

गुरु : मजुरांचे पोटगीस आणि गुरांचे पोटगीस जो ऐवज लागतो, तो फिरती पुंजीच समजावी. मजुरांच्या आणि गुरांच्या पोटगीस जें लागतें, तें नाहींसें होऊन पुनः उपजतें, त्यापासून प्राप्ति होती. गुरांच्या किमतीस स्थिर पुंजी असें समजावें, जशीं गुरें विकलीं जातात, त्याप्रमाणें मजूर लोक विकले जाते, तर त्यांस विकत घेणारा जो धनी त्याला त्यां मजुरांस मजुरी द्यावी न लागती, ते मजूर त्या धन्याचा माल होऊन स्थिर पुंजी होते.

गोपाळ : आतां गुलाम विकत घेण्याची बंदी झाली. पूर्वी ज्याजवळ गुलाम असत, ते त्यांस आपला माल असें समजत.

गुरु : गुलामास तर काय, पण रशिया व पोलंड या देशीं जमीनीचे धनी आपल्या कुणबी लोकांस बहुतकरून स्थिर पुंजी असें मानितात. गुलामावर जशी सत्ता करावी, तसी ते धनी त्या कुणब्यांवर सत्ता करितात. कुणबी म्हटला म्हणजे त्यावर त्या जमीनीचे धन्याचा जसा काय हक्कच असतो. अशा समजुतीने त्यांजपासून वेठ बिगार फुकट करवून घेतात. आणि रशिया देशीं जमीनीची किंमत बिघ्यावरून होत नाहीं, त्या जमिनीवर जे गुलाम असतात त्यांच्या गणतीप्रमाणें होती. अमेरिकाखंडीं वेष्टइंडिया इथें काफ्री लोकांस आतां मोकळिक झाली. पूर्वी ते गुलामगीरी करीत, तेव्हां कांहीं जमीनीच्या लावणीची किंमत करणें झाली, तर त्या लावणीस जे गुलाम लागले असतील, त्याप्रमाणें करीत, कांहीं शतवर्षांमागें युरोपखंडाच्या बहुत्येक भागीं जमीनीचे धनी इत्यादि आपल्या ताब्यांतील लोकांस गुलामाप्रमाणें ठेवीत. अलीकडे सुधारणूक चालू झाली, त्यामुळें असें झालें कीं, रशिया व पोलंड हे दोन देश सोडून बाकीच्या सर्व देशांत मजूर लोक मोकळेपणी वागूं लागले. असें पाहण्यांत आलें आहे, कीं लोक जसे जसे मोकळे व स्वतंत्र असतात, तसे तसे ते अधिक उद्योग करूं लागतात, व तसी तसी जमीनीची लागवड चांगली होऊं लागती.

गोपाळ : मला पहिल्याने वाटलें, कीं स्थिर पुंजी आणि फिरती पुंजी यांतील भेद पुरतेपणीं कळला; परंतु विचार करितां माल मिळकत असे जे कितीएक जिन्नस ते कोणत्या पुंजींत घालावे हें मला सुचत नाहीं. बरें, जो पैका जमीन नावारूपास आणावयास लावला, तो स्थिर पुंजी किंवा फिरती पुंजी समजावी?

गुरु : ओसाड जमीन लागवडीखालीं आणणें, कुपण घालणें, पाट काढून पाणी नेणें, चर खणणें, जमीनीवर कमाई करणें वगैरे कामास जो पैका लावावा, तो स्थिर पुंजी समजावा. त्याचप्रमाणें लागवडीस आलेल्या जमीनीवर अधिक कमाई करायास जो ऐवज लावावा, तोही स्थिर पुंजी समजावा. जो जमीनीचा धनी आपल्या जमीनीवर पुंजीचा खर्च करून ती जमीन बाहेर देतो, त्यास त्या जमीनीचा अधिक सारा मिळतो. जर तो स्वतां शेतकी करणारा असला, तर त्यास विशेष प्राप्ति होती. परंतु नांगरणें, पेरणी, लाणी, वगैरे करणें अशा शेतकीच्या सरळ कामांत जो ऐवज लाविला, तो पूर्वीच्या बोलण्याप्रमाणें कांहीं स्थिर पुंजी व कांहीं फिरती पुंजी असा समजावा.

गोपाळ : फिरत्या पुंजींत संपत्ति लावावी हें नीट आहे, स्थिर पुंजींत लावावी हें नीटसें दिसत नाहीं. दास्तानें, कोठारें, यंत्रसाहित्यें, मोठ्या खटल्याच्या धन्यास उपयोगी आहेत, पण मजूर लोकांस त्यांपासून तोटा आहे. कां तर जसा जसा ऐवज स्थिर पुंजींत लावावा, तसा तसा तो फिरत्या पुंजींत लावण्याविषयीं कमी होतो, त्यामुळें त्या ऐवजाकडून थोडक्यां मजुरांचा सांभाळ होतो.

गुरु : असें आहे. कोणे एका मुलखांत ज्या जिन्नसांचा खप असतो, ते जिन्नस पुष्कळ उत्पन्न केले असतां, त्यापासून मजूर लोकांचें फारच मोठें हित होतें. अन्नवस्त्रादिक संपत्ति कोणा एकाकडे पुष्कळ असली, आणि ती जशीची तसीच ठेविली, तर त्या संपत्तिपासून तिच्या धन्यास कांहीं हित होणार नाहीं; जर तो तिची वहिवाट करील म्हणजे उपज करणाऱ्या मजूरांस आपल्याकडे ठेवील, तरच हित होईल. याकरितां संपत्ति जसी विशेष असेल तसे अधिक लोक कामावर लागतील.

जेणेंकरून काम चांगलें होतें, अथवा काम करायास सोपें होतें, अशीं साधनें असलीं, तर मुलखांतील उत्पन्न वाढूं लागतें हें प्रसिद्धच आहे आणि फिरत्या पुंजीपेक्षा स्थिर पुंजीपासून विशेष उत्पन्न झालें तर, त्या स्थिर पुंजीपासून पुंजीदारास आणि मजूरांसही विशेष हित होईल.

गोपाळ : आपण सांगतां तसें कसें होईल, हें माझ्या लक्षांत येत नाहीं. मनुष्याकडून जें काम करून घ्यावयाचें ते वायु अग्नि इत्यादिकांपासून करून घेणें झालें. अथवा वाफेच्या यंत्रापासून करून

घेणें झालें, तरी मनुष्यांस कामांतून टाकावें लागतें. तेव्हां माणसांस कामावर ठेवूं नये असें करणाऱ्या ज्या नवीन युक्ति आणि यंत्रादि साधनें यांपासून गोरगरिबास कसें हित होईल?

गुरु : तें दिसण्यांत उलट दिसतें, पण ज्या साधनाच्या योगानें फार मेहनत न पडतां थोडक्याच मेहनतीने काम होतें, आणि काम करायास सोपें होतें, अशा साधनांपासून परिणामीं अधिक मजुरांस काम मिळूं लागतें.

गोपाळ : आपण सांगतां तशीं साधनें चालू झालीं, म्हणजे पहिल्याने तर लोकांस कामातून काढून टाकावें लागतें, मग त्यांस धंदा मिळवून देण्याची सोय पुढें केव्हां येईल ती येवो. नवीन यंत्र चालू करण्याविषयीं हीच मोठी हरकत कीं तेणेंकरून लोकांचा धंदा बुडतो.

गुरु : नवीन यंत्रसाहित्य चालू झालें असतां, त्यापासून कित्येकांस कांहीं काळपर्यंत फार अडचण होत असती, व अवघड पडत असतें खरें, पण त्यापासून जे लाभ होतात ते किती व कोठपर्यंत राहातात याची बहुधा गणतीच होत नाहीं.

गोपाळ : ते लाभ कदाचित् मातबरांस होत असतील, यंत्रसाहित्य गरिबांस तर धंद्यांतून काढून टाकितें म्हणून त्यापासून त्यांचें हित न होतां उलटें अनहित होत असेल.

गुरु : इंग्लांड देशीं पायमोजे विणायाचें यंत्र प्रथम चालू झालें, तेव्हां हाताने विणण्याचें काम करून पोट भरणारांस भारीच अडचण झाली असें लोक मानूं लागले, परंतु कापड विणण्याच्या मागावर पायमोजे मोठ्या सुगम रीतीने होऊं लागले, तेणेंकरून ते इतके स्वस्त झाले, कीं ज्यांस पूर्वी विकत घेण्याचें सामर्थ्य नसे, ते त्या मोज्यास आपल्या पायांत घालून सुख अनुभवूं लागले, आणि पायमोज्यांचा खप फार होऊं लागला, त्यामुळें असें झालें कीं हाताने विणून पायमोजे करणारे जे लोक होते, ते अवघेजण पायमोजांकरितां सूत, लोंकर, इत्यादिकांतून तयार करूं लागले, त्या कांतण्याचे कामाने ते आपलें पोट भरूं लागले.

गोपाळ : आपण सांगतां तसें पूर्वी झालें असेल, पण आर्करैट साहेबाचें यंत्र चालू झालें आहे, त्यांतून कांतलेलें सूत निघतें. तें यंत्र चालू झाल्यापासून असें झालें कीं, इंग्लांड देशीं घरोघरीं जें सूत कातण्याचें काम होत असे, तें आतां दृष्टीस पडत नाहीं. आतां सूत कातणारांस कोठे धंदा मिळेल? चांगलीं चांगलीं यंत्रें होऊं लागलीं, त्यामुळें मजूर लोक पोट भरायाकरितां एक ना एक युक्ति करूं लागले आहेत. शेवटीं असें होईल कीं त्यानी हरएक युक्ति केली तरी त्यांचें पोट भरणार नाहीं.

गुरु : यंत्रसाहित्याच्या योगाने देशांत जिन्नस फार होऊन देशसंपत्ति वाढती हें तूं कबूल करतोस ना?

गोपाळ : होय, कबूल करितों; पण जर गरिबांस कामावर ठेविलें नाहीं, तर त्यांस त्या संपत्तीचा अंश कसा मिळेल ह्याच माझ्या शंकेचें उत्तर झालें पाहिजे.

गुरु : जर जिन्नस पुष्कळच उत्पन्न झाले आणि त्यांतून गरीबांस मिळाले नाहींत तर ते जिन्नस मातबरांस जितके खपायाचे तितके खपून बाकी मागें उरतील; कळलें? इंग्लंड देशीं मन्चस्टर शहरांत कापडें करतात, लीडस इथें सकलाद करतात, व बर्मिंगहाम एथें लोखंडी माल होतो, त्यापैकीं तेथे कांहीं खर्च होऊन बाकीचा जिन्नस तसाच राहील. असा जो जाजती झालेला माल त्यास मातबर काय करतील?

गोपाळ : तें तर मला नकळे.

गुरु : त्या मालापैकीं जितक्याचा खप नसेल, तितका एकीकडे ठेवून त्याची पुंजीदाखल ते वहिवाट करतील, म्हणजे दुसरा माल करायास अथवा ज्या जिन्नसाचे कामावरून मजुरांस काढून टाकिलें असेल तोच जिन्नस करायास पुनः मजूर लोकांस कामावर ठेवितील.

गोपाळ : यंत्रसाहित्यापूर्वी जितके मनुष्य एकादा जिन्नस करायास लागत असत तितकेच मागाहून लागूं लागले, तर मग त्या यंत्रसाहित्यापासून कोणतें हित होणार ?

गुरु : तें हित असें आहे कीं, अमुक एक काम करणारीं माणसें, एकट्या हातमेहनतीने जें काम करतील, तींच माणसें यंत्रसाहित्याने त्या कामापेक्षा कदाचित् विसपट अधिक करितील. याकरितां वस्त्रें व प्रपंच्यास आवश्यक व उपयोगी असे जिन्नस, वीसपट अधिक उत्पन्न होतील. आतां हे सर्व जिन्नस यंत्रसाहित्येंकरून कमी खर्चाने झाले म्हणून यांची किंमतहि कमी होईल; असें झालें असतां यांस अधिक लोक विकत घेऊं लागतील, तेणेंकरून यांचा खप अधिक होईल; असा अधिक खप झाला असतां, त्याप्रमाणें ते जिन्नस पैदा करण्याचें काम वाढविलें पाहिजे; म्हणून बहुधा असें होतें कीं, पूर्वी जीं मनुष्यें हातमेहनतीने जिन्नस करीत असतात, त्यापेक्षा यंत्रसाहित्याच्या योगाने अधिक मनुष्यें कामावर लागतात.

गोपाळ : फार चांगलें सांगितलें, यावरून कांहीं संशय रहात नाहीं. आतां यावरून असें दिसून येतें कीं, यंत्रसाहित्याच्यायोगे गरिबांस धंदाच मिळतो इतकें नव्हे, तर झालेले जिन्नसही अधिक मिळूं लागतात.

गुरु : याकरितां यंत्रसाहित्याने मातबराचें हित व गरिबांचें अनहित होतें असें कांहीं नाहीं, यांत दोघाजणाचें हित होतें आणि यंत्रसाहित्य फारच चालू झाल्याने अथवा तें सुधारल्याने परिणामीं असें होतें कीं सर्वांस वाढते संपत्तीचा उपभोग घडतो.

गोपाळ : होय: कोठेतरी पुंजी वाढली, म्हणजे गरीबांस एक ना एक प्रकारें धंदा मिळेल, आणि यंत्रसाहित्याने उत्पन्न झालेल्या जिन्नसांची किंमत कमी होऊन ते जिन्नस त्या गरिबांस विकत घेण्यास सोय पडून त्यांचा प्रपंच चांगल्या रीतीने चालेल.

गुरु : जेथें विशेष संपत्ति असती त्या देशांत मोठी अकटोविकटो कामे होतात असें दृष्टीस पडतें. डोंगर फोडून त्यांतून रस्ते बांधतात, दूरदूरच्या नद्या मोठमोठे पाट बांधून एकीसएक मिळतात. मोठमोठे नामी पूल, आणि इमारती बांधतात, बहुत दुसरे प्रकारचीं चांगली चमत्कारिक कामें करीत असतात. याखेरीज शेतकी, शिल्पव्यापार अशांत पुंजीची नेहमी वहिवाट होत असती, तेणेकरून हजारोंजण धंद्यास लागतात. हें असें सर्व होत असतें याचें कारण काय ? मातबरांकडून आपल्या पुंजीची वहिवाट व्हावी, हेंच याचें कारण, कां तर जें राज्य चांगलें सुरक्षित असतें, व ज्यांत मोकळीक असती, तेथें कोणीही मनुष्य आपल्या पुंजीपैकीं कांहींएक पुंजीची वहिवाट केल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां पुंजीची जशी मर्यादा अथवा मान असतें त्याप्रमाणे लोकांस धंदा मिळतो. आपल्या मागील बोलण्याप्रमाणे पाहतां असें आहे कीं पुंजीचें जसें मान असेल, त्याप्रमाणें उद्योगाचें मान असतें. जो पुंजीदार नवीन यंत्र चालू करतो, त्यास तर त्यापासून तुरुत लाभ होतच असतो, परंतु फार चांगला बहुत दिवस राहायाजोगा जो लाभ होणें तो लोकांस होतो. यंत्रसाहित्याने जो माल उत्पन्न होतो, त्याची किंमत कमी होती, तेणेंकरून लोकांस फायदा होतो. जेणेंकरून हातमेहनत कमी होती, असे व्यापार चालू झाल्याने काम करणाऱ्या लोकांचें जसें हित होतें, तसें हित दुसऱ्या लोकांचें होत नाहीं. कां तर माल स्वस्त झाला असतां बहुतकरून काम करणाऱ्यां मजूर लोकांस तो माल विकत घ्यावयास सोईवार पडतें.

गोपाळ : महाराज, म्या असें ऐकिलें आहे कीं यंत्रसाहित्य चालू झाल्याच्या पूर्वी शिल्पीलोक जीं कामें करीत, त्यांची त्यांस जसी मजुरी मिळे तसी आतां मिळत नाहीं, हें कसें ?

गुरु : तसी मजूरी त्यांस मिळणार नाहीं. ज्या कामाचा कांही एक भाग यंत्रसाहित्याने घडतो, आणि जो काळ हातमेहनतीने काम करायास लागतो त्यापेक्षां चौथ्या हिःश्याचे काळांत यंत्रसाहित्याने तें

काम पुरतेपणीं करितां येतें. त्या कामास थोडकी मजूरी मिळेल, केवळ हातमेहनतीने काम करणार, इतकी मजूरी, यंत्रसाहित्याने काम करणारास द्यावी हें नीट नव्हे. असो. पण यंत्रसाहित्याने काम करणारास जें मिळतें तें जरी तो काम करितो त्या मानाप्रमाणे मिळत नाहीं. तथापि तो पूर्वी केवळ हातमेहनतीने काम करीत होता त्यापेक्षां अधिक मिळतें, असें अढळेल.

गोपाळ : तो काम करितो, त्या मानाप्रमाणें त्यास मिळूं नये हें वाजवी नाहीं.

गुरु : कां वाजवी नाही ? वाजवीच आहे; कां तर त्या कामाचा बहुत्येक भाग यंत्रसाहित्याने होतो, म्हणून त्या यंत्रसाहित्यास रोजमुऱ्याचा कांहीं अंश देणें वाजवी आहे. हा अंश त्या यंत्रसाहित्यास पूर्वीच मिळाला असतो. यंत्रसाहित्यांत शिल्पी जी स्थिर पुंजी घालितो, ती रोजमुऱ्याचाच अंश समजावी.

गोपाळ : तेव्हां शिल्पी आपल्या पुंजीचे दोन विभाग करितो, एक तो स्थिर पुंजीचे रूपें यंत्रसाहित्यांत घालून ठेवितो आणि एक फिरत्या पुंजीच्या रूपें लोकांस रोजमुरा देण्याचे कामांत वहिवाटितो.

गुरु : होय. आणखी असें आहे, मजूर लोक म्हणतात कीं यंत्रसाहित्य चालू झाल्यानें धंदा बुडाला, यंत्रसाहित्य नसतें तर बरें होतें. पण आह्मी काय बोलतों हें त्यांचें त्यांसच कळत नाहीं. यंत्रसाहित्यापासून जीं फळें प्राप्त होतात, त्यांचा ते वास्तविक विचार करून पाहाते, तर त्यांस असें अढळतें कीं यंत्रसाहित्यानें आमचें पोषण होत आहे इतकेंच नाहीं तर आमच्या वांचण्यासही तें कारण झालें आहे. अग्नि, वायु, इत्यादि मूलतत्वें आपआपल्या चमत्कारिक शक्तीनें परोपकारार्थ यंत्रव्यापार करतात त्यापासून जीं कार्यें घडतात तेणेंकरून जीवांचें रक्षण होतें. असें घडत नसतें, तर यंत्रव्यापारावर पोट भरणारांतून बहुत्येकजण वाचलेच नसते.

गोपाळ : यंत्रांविषयीं जीं दूषणें देतात, त्यांचें आपण चांगलें खंडन केलें, वाटस् साहेबाने वाफेचें यत्र केलें, त्यापासून जीं हितकारक कार्यें होतात, त्याविषयीं म्यां शंका घेतली असेल, तसेंच सर रिच्यार्ड आर्कराइट याणे जे यंत्रास संस्कार केले, त्यांविषयीं दोष ठेविला असेल तर ते न समजून झालें; त्याविषयीं क्षमा असावी.

गुरु : म्याकफरसन साहेबाने व्यापारवृत्तांताविषयीं ग्रंथ केला आहे त्यातील कांहीं अंश मी तुला वांचून ऐकवितो म्हणजे तो ग्रंथकर्त्ता आर्कराइट साहेबाने शोधून काढिलेल्या युक्ति किती थोर मानितो हें तुला कळून येईल.

जर आर्कराइट साहेबाने फार संपत्ति मिळविली असली तर तो त्या संपत्तीस योग्य होय. त्याणे आपल्या हितापेक्षां लोकांचे फारच हित केलें. तेणेंकरून असें फळ प्राप्त झालें कीं मोठीं, व बहुत दिवस कीर्ती राहायाजोगीं हजारों जयें मिळालीं असतां तसें फळ प्राप्त झालें नसतें. त्याणें बहुत मेहनत कमी केली, तेणेंकरून गरिबांचा धंदा न बुडतां असें झालें कीं, कमी मेहनत झाल्यानें फारच काम होऊं लागलें. पूर्वी जे लोक कामावर लागत, त्यांपेक्षां अधिक लोक कामावर लागूं लागले; त्याने सुत कांतण्याचीं यंत्रें उत्पन्न केलीं, नंतर सुमारें पंचवीस वर्षांनीं सन १७८५ त असें अढळलें कीं इंग्लंड देशीं लानकाशैर, व चेसशैर, व डर्बी, व नाटिंगह्याम व लेस्टर, यां शहरांतील कापसाच्या कामाच्या कारखान्यांत पांच लक्ष लोक काम करूं लागले. सर रिच्यार्ड आर्कराइट साहेब इंग्लंड देशांतील कसबी लोकांचें व व्यापारी लोकांचें अत्यंत हितकर्त्ता, पृथ्वीवरील बहुधा सर्व ठिकाणांतील कापूस लावणारे लोकांचें कल्याणकर्ता आणि जगावर जे अतिप्रसिद्ध उपकारकर्ते होऊन गेले, यांच्याच सारिखा होय. त्यांच्या नावाबरोबर याच्याही नावाचें स्मरण पुढें होणाऱ्या लोकांस व्हावें हें योग्य आहे.

गोपाळ : सर रिच्यार्ड आर्कराइटाची फार चांगली स्तुति झाली, ही त्यास योग्यच आहे. बरें पण

महाराज, शिल्पी लोकांकडून पुष्कळच माल उत्पन्न होणार नाहीं काय ? म्हणजे खप असण्यापेक्षां जाजती माल पैदा होणार नाहीं काय ?

गुरु : कोठें कोठें असें घडतें कीं, एकादा माल फारच उत्पन्न होतो. बाजारांत कोणेसमयीं लोंकरी कापड अथवा सणाच्या सुताचें कापड अथवा तसाच एकादा दुसरा जिन्नस फारच होतो. असें झालें म्हणजे त्या जिन्नसाची रेळ झाली असें म्हणतात, रेळ झालेला जिन्नस इतर जिन्नसांपेक्षां फारच अधिक असतो, तो जिन्नस विकत घ्यायाकरितां त्या अवघ्याच्या मोबदला द्यावयास त्याच्या किंमतीचे जिन्नस मिळत ना असें होतें, म्हणून तो बाजती झालेला जिन्नस विकल्यावांचून राहातो. आपल्यास सर्व वस्तू फारच मिळाव्या, अवघ्याचीच रेळ व्हावी असें मनांत आणणे हा वेडेपणा होय.

गोपाळ : असी रेळ झाली असतां सर्व लोकांच्याच हिताची गोष्ट होईल असें नाहीं.

गुरु : कां नाहीं, त्यांत सर्वांचें हित आहे, आणि मजूर लोकांचे तर विशेष हित आहे. आपल्या मेहनतीवांचून ज्याच्याजवळ मोबदला द्यावयास दुसरें कांहीं नाहीं, ते लोक जाजती झालेला जिन्नस कसा घेतात, हें तर त्वां नुक्तेंच ऐकिलें; म्हणून सर्वत्र भरभर झाली असतां, त्यां लोकांस पुष्कळ मिळेल. परंतु याचा शोध करीत बसणें निरर्थक. सेसाहेबाने देशव्यवहारव्यवस्थेवर एक उत्तम ग्रंथ केला आहे, त्यांतील छापण्याची युक्ति प्रगट केल्याविषयीं जो प्रकार सांगितला आहे तो तुला ऐकवून यंत्रसाहित्याच्या लाभाविषयीं जें माझें भाषण चाललें आहे तें संपवितों.

छापण्याची युक्ति चालू झाली, तेव्हां असें वाटूं लागलें कीं ग्रंथाचा उतारा करणाऱ्या लोकांतून बहुतेकांचा धंदा बुडेल, उतारा करणारे २०० माणूस असले तर त्यांच्याएवढें काम ऐकट्या छापणाऱ्याच्या हातून होईल. तेव्हा २०० तून १९९ माणसांनी धंद्यातून निघावें असें होईल, परंतु असें झालें नाहीं. लिहिलेल्या ग्रंथापेक्षां छापलेले ग्रंथ वाचावयास चांगलें सुगम झाले, व पहिल्यापेक्षा थोडक्या पैक्याने मिळूं लागले. जेणेकरून मनास बोध होतो, चांगलें रंजन होतें, असे पुष्कळ ग्रंथ करायाची हौस ग्रंथकर्त्यांस छापण्याच्या युक्तीवरून आली. शेवटीं थोडक्या काळांत असें झालें कीं पूर्वी जे ग्रंथ उतरणारे होते, त्यांपेक्षां अधिक छापणारे धंद्यास लागले. आतां असे जे छापण्याच्या कामास लागले आहेत, आणि छापण्याची युक्ति प्रगट झाल्याने जे आणखी लोक उद्योगास लागले आहेत, त्यांतून कित्येकजण छापण्याकरितां चित्रांच्या आकृति धातूवर कोरून काढितात, कित्येकजण छापायाचे ठासे ओतितात, कित्येक ग्रंथास पुष्टीपत्रें बांधितात, कित्येक ग्रंथ विकतात, या सर्वांची गणती काढली तर छापण्याची युक्ति प्रगत झाल्याच्या पूर्वी जे लोक ग्रंथ तयार करण्याचा उद्योग करीत होते, त्यापेक्षां शेंकडो पट अधिक मनुष्यें तोच उद्योग करीत आहेत, असें बहुतकरून आढळेल.

गोपाळ : तेव्हां ग्रंथ वाचणारांची संख्या तर फारच वाढली असेल. उद्योग वांटून करावयाविषयीं आपला संवाद झाला, तेव्हा ज्ञानाचा प्रसर करावयास छापण्याची युक्ति फारच अनुकूल झाली, असें आपलें बोलणें झालें, त्याचें तर आपल्यास स्मरण असेल.

बरें, पण यंत्रसाहित्याने जो जिन्नस उत्पन्न करायाचा तो कोणता कां असेना, परंतु त्यांत पूर्वीपेक्षां अधिकच लोक लाविले पाहिजेत असें मला वाटतें कांहीं जरूर नाहीं.

गुरु : नाहीं यांत काय सांगावें ? कोणे एके कसबांत यंत्र चालू केलें असतां त्या कसबांत पूर्वी जीं माणसें लागत त्यापेक्षां अधिक माणसें लावावीं नलगे, पूर्वीचींच मनुष्यें यंत्राच्या योगाने जिन्नस अधिक उत्पन्न करितात तो इतका अधिक होतो, कीं त्याचा जरी जाजती खप लागला तरी कित्येक समयीं तो जिन्नस पुरा पडतो. एकादा जिन्नस फार होऊन त्याचा खप होत नाहीं, तेव्हां तो फार उत्पन्न करीत नाहींत; त्यामुळें मजुरी कमी होती, मग कित्येक माणसांस कामांतून काढावें लागतें,

त्यामुळें पहिल्याइतकी पुंजी लागत नाहीं. जी पुंजी उरती, ती दुसऱ्या कामास लाविली असतां पुंजीदारांस व लोकांसही हित होतें. मग परिणामीं असें घडतें कीं जीं माणसें कामांतून काढली असतात त्यांस धंदा मिळतो.

याप्रमाणें पाहतां पुंजी स्थिर असो, अथवा फिरती असो; परंतु ती देशांतील उत्पन्न वाढवावयास नित्य अनुकूल होती; म्हणून मला वाटतें, पुंजीचें लक्षण असें करावें कीं, उत्पन्न करावयाचे जे पदार्थ ते उत्पन्न करावयास अवघड न पडे, असें होण्याकरितां जें उत्पन्न जमवून ठेवितात ती पुंजी होय. असी देशांतील अवघ्या राहणारांकडे पुंजी जमली असती, ती लक्ष्यांत आणून बोलणें झाल्यास, देशाची पुंजी असें बोलतात. सारांश, रस्ते, कालवे, पूल, गोद्या, कोठारें, चक्या, कारखाने, दुकानें, मत्या, यंत्रें, तारवें, होड्या, गाडी, बैल, नांगर, शिंपण्याकरितां विहिरी तळीं इत्यादि हे सर्व स्थिर भांडवलाचे प्रकार जाणावे. तसेंच धान्य, सर्व प्रकारची सामग्री, व्यवहारांत लावलेला पैका, विकण्याचा माल, इत्यादि हे सर्व फिरत्या भांडवलाचे प्रकार जाणावे, यांतील कित्येकांचें पुढें वर्णन होईल. आज आपलें पुंजीचें अथवा भांडवलाचें प्रकरण संपलें. आतां त्या भांडवलावर ज्या मजूर लोकांची तुर्तची उपजीविका चालती, त्या मजूर लोकांविषयीं, व त्या प्रकरणासीं ज्याचा अति निकट संबंध असें जें लोकसंख्या प्रकरण, त्याविषयीं हीं आपण उद्ईक विचार करूं. सारांश संपत्ति उत्पन्न कसी होती, तो प्रकार सांगून पूर्वभाग संपविला. आतां उत्पन्न झालेले संपत्तीची कसी कसी कोठे कोठे वांटणी होती याविषयीं जो उत्तर भाग त्याचा आरंभ करूं.

# उत्तरभागसंवाद ८

यांत रोजमुऱ्यांचें सर्वांहून मोठें मान कोणतें. लोकसंख्येपेक्षां भांडवल कोठें कमी असतें कोठें अधिक असतें, त्याप्रमाणें रोजमुऱ्याचें मान असतें–थोडकी पुंजी असली म्हणजे मजुरीचें थोडकें अगत्य असतें, रोजमुरा कमी होतो, आणि पुंजीदारांचा मोठा फायदा होतो–पुंजी वाढली म्हणजे मजुरीचें अगत्य अधिक होतें, रोजमुरा वाढतो, आणि पुंजीदारास कमी फायदा होतो–दुसऱ्या कामाच्या अगोदर अन्नवस्त्रादिक पोटगी संग्रही करून ठेवणें अगत्य आहे–पुंजी न वाढतां लोकसंख्या वाढली असतां रोजमुरा कसा कमी होतो–अन्नादिकाचें दुर्भिक्ष झालें असतां रोजमुऱ्यास कसें काय होतें—दुर्भिक्षाचे वेळी रोजमुरा वाढविला असतां कसें काय होतें–अन्नादिकांची अत्यंत मोठी किम्मत ती कसी–रोगामुळें लोकांची कमती झाली असतां रोजमुऱ्याच्या दरास कसें काय होतें–कामकरी लोकांस कामावर ठेवणें हें पुंजीच्या आधीन असतें, जें काम करायाचें त्या आधीन असत नाही—ऐर्लंड या देशीं रोजमुऱ्याचा दर कसा असतो–शहर व गांवढीं गांवें एथील रोजमुरा कसा असतो–अद्रव्यमय पुंजी म्हणून काय, इत्यादि सांगितलीं आहेत.

गुरु : आपल्या मागल्या संवादांत बोलणें झालें, त्यावरून असें सिद्ध होतें कीं, पुंजी मातबरांस हितकारक तसी बहुतकरून गरिबासही हितकारक आहे, पुंजी पाहिली असतां मातबराचा माल आहे, पण त्या मालानें गरिबाचा सांभाळ व्हावा असा त्या मालाचा स्वभाव आहे.

गोपाळ : पुंजी मजुरदारांकडे तर रोजमुऱ्याच्या रूपानें येती, मजुरदार जें काम करितो, त्यापासून पुंजीदारास कांहीं नफा झाला पाहिजे. बरें मजुरास जो रोजमुरा देतात, त्या रोजमुऱ्याच्या मानानें नफा किती होत असतो हें मला सांगावें.

गुरु : तो नफा वेगळाल्या मानानें होत असतो. मजुरांच्या रोजमुऱ्याचें एक मान असें आहे कीं, मजुरांच्या पोटापुरता रोजमुरा असावा, त्यापेक्षां कमी असूं नये, कमी असला तर मजुरांच्या हातून मेहनत होणार नाहीं.

गोपाळ : रोजमुऱ्याचें दुसरें एक मान असें असावें कीं, मजूर जें काम करतो, त्या कामाचे किम्मती-इतकाच तो रोजमुरा असूं नये, कां तर त्या मजुराचे धन्यास त्याच्या योगानें कांहीं उत्पन्न झालें नाहीं, तर तो त्यास कामावर ठेवणार नाहीं.

गुरु : हीं असीं मजुरांच्या रोजमुऱ्याचीं दोन मानें आहेत. यांच्या पोटांत दुसरे न्यूनाधिक भेद बहुत आहेत. जर मजुरांच्या रोजमुऱ्याने त्याचें एकट्याचेंच पोट भरलें; त्याच्या बायकोमुलाचें न भरलें

तर मजूर लोक हळूहळू कमी होत जातील. त्यांची कमताई झाली म्हणजे मग त्यांचा रोजमुरा वाढेल, तेणेंकरून ते विशेष सुखानें निर्वाह करून आपल्या कुटुंबांचें पोषण करितील, पण पुंजीदाराच्यानें रोजमुरा जितका कमी करवेल, तितका तो कमी करायास पाहतो, म्हणून मजुरांस आणि त्यांच्या कुटुंबास अन्नवस्त्रादिक निर्वाहापुरतें मिळतें, त्यापेक्षां अधिक मिळतें असें विरळा.

गोपाळ : निर्वाहापुरतें मिळणें यावरून काय समजावें ?

गुरु : अत्यंत गरीब लोक ज्या देशीं असतात तेथील हवेप्रमाणें व रीतीप्रमाणें त्यांच्या जीवाचें, व शरीरप्रकृतीचें, रक्षण व्हावयास, व ते दिसण्यांत चांगलेसे दिसावयास आवश्यक जें अन्नवस्त्र, राहण्याची सोय, असें असलें म्हणजे निर्वाहापुरतें मिळालें असें समजावें. सरपण व गरम कापडें हीं इंग्लंडासारिख्या थंड देशांत आवश्यक आहेत, तसीं आपल्या या देशीं अथवा आफ्रिका खंडी आवश्यक नाहींत. लोकांची स्थिति चांगली झाली, संपत्ति, कलाकौशल्यांची चाल झाली, त्यामुळें लोकांच्या निर्वाहास आवश्यक जे पदार्थ त्यांचें मान फार वाढलें, आतां सणाच्या सुताचें विलायती कापड वापरणें आवश्यक असें सर्व लोकांस वाटतें, जोडे व पायमोजे हे तरी असेच वाटतात. घरांत खुर्च्या हंड्या असें सामान ठेवणें तसेंच कांचेच्या खिडक्या व धुरांडीं करणें अगत्य असें झालें आहे. हें असें करणें इंग्लंडासारिख्या देशीं विशेष अगत्य आहे. जर असे रीतीची राहण्याची सोय तेथील गरीब लोकांस नसली, तर त्यांत मृत्यु फार वाढेल. ऐर्लंड देशीं, तसेंच या देशीं, तर कुणबी लोक आपलीं मुलेंबाळें सरांसरी बांधिलेल्या खोपटींत वाढवितात, त्या खोपटीस एक दार तेंच काय ती खिडकी व धुरांडें.

गोपाळ : विपत्तिकाळीं चांगली राहण्याची सोय नसल्यामुळें मोठें दुःख होतें, याकरितां चांगलें सुखानें राहूं नये. कुणबी मजूर यांसारखे कष्ट व अडचणी सोसून राहवयाची सवय लावावी, म्हणजे मग विपत्तिकाळीं दुःख होणार नाहीं.

गुरु : पण अन्नवस्त्रादिकांची कमती असूं नये. तीं चांगलीं यथास्थितपणें असावी. इंग्लंड देशींच्या कुणबी लोकांच्या झोपडींत आरोग्य, स्वच्छता, शहाणपण, सुख हीं जशीं असतात तसीं या देशींच्या कुणब्यांच्या खोपटींत असत नाहींत. भाजीपाला, जाडेंभरडें धान्य खाऊन राहणाऱ्यापेक्षां मांस, भाकर अथवा दूध तूप इत्यादि खाणाऱ्याचें बळ, हुशारी, उद्योग अधिक असतो.

गोपाळ : गरीब लोकांनी आपलें जितकें सुख होईल तितकें करून घ्यावें हें नीट आहे, पण त्यांचा रोजमुरा ल्हान, त्यामुळें त्यांस त्या सुखाचा उपभोग बहुत करून होत नाहीं, म्हणून त्यानी त्या सुखाची सवय लावून घेऊं नये हें बरें असें मला वाटलें.

गुरु : गरीबास जीं सुखें व राहाण्याच्या सोयीचें अगत्य आहे, त्यांचें मान कमी केलें असतां त्या गरीबांचे उपभोग मात्र उणे होतात. इतकेंच नाहीं तर विपत्तिकाळीं त्यास निर्वाह करण्यास कांहीं उपाय राहात नाहीं. पोटास अगत्य जे पदार्थ तितकेच मात्र त्यांस मिळूं लागले, तर मग ते कमी करतां येणार नाहींत. दुर्भिक्ष झालें तर नाशच होईल. जे बहुधा केवळ एकट्या धान्यावर निर्वाह करितात, तें मिळेनासें झालें म्हणजे हजारों मरूं लागतात.

गोपाळ : कनिष्ट स्थितीच्या लोकांस केवळ पोटगीपेक्षां कांहीं अधिक मिळे अशा दराचा रोजमुरा असला तर फारच चांगलें होईल.

- बरें, पण रोजमुरा अमुक दराचा असावा असें कशावरून ठरवावें ?

गुरु : मुल्खांतील मजूर लोकांचें व पुंजीचें जसें मान असतें, त्याप्रमाणें रोजमुऱ्याचा दर ठरला जातो.

गोपाळ : अथवा ज्या लोकांचें पोट भरायाचें त्यांचें, आणि जी पोटगी द्यावयाची तिचें, जसें मान असेल त्याप्रमाणें रोजमुऱ्याचा दर ठरला जाईल.

गुरु : होय, रोजमुऱ्याचा दर ठरविण्याविषयीं दुसऱ्या कशाचा आधार नसला म्हणजे तो याच कारणाने ठरला जातो, आणि याच कारणानें मेहनतीचें अगत्य लागतें, अथवा नाहींसें होतें. हा प्रकार तुला चांगला स्पष्ट समजावा म्हणून आपण याचा अनुमानानें विचार करूं. आपण असें कल्पावें कीं, आपण एक्या ओसाड बेटांत वसाहत केली, तेव्हां तेथें वसणारे लोक आपआपल्यांत जमीन वांटून आपल्या पोटगीकरितां लागवड करूं लागले; आणि धनी हेच व मजूरही हेच, याकरितां यांच्या मेहनतीचें जें फळ म्हणजे पिकलार ती अवघीच घेऊं लागले. अशा स्थितीने हे असतां यांच्या बंदरांत एक तारूं फुटलें आणि त्यावरील कांहीं खलाशांनी आपल्या बचावाकरितां यांचा किनारा धरिला, तर पुढें काय होईल? ते खलाशी तर मजूरदार होतील आणि आपली पोटगी व धंदा यासाठीं पहिल्याने वसाहत करणारांच्या अस्त्यानें राहतील.

गोपाळ : बरें, आपल्या पोटगीपेक्षां अधिक साहित्य यां वसणारानी मिळवून ठेविलें नसलें तर मग हे त्या नवीन येणारांचा सांभाळ कसा करतील? पुंजीवांचून यांच्यानी त्यांना कामावर ठेववणार नाहीं हें तर आपल्यास ठाऊकच आहे.

गुरु : त्वां नीट सांगितलें. यां लोकांत जे अत्यंत उद्योगी यानी आपल्या नित्याच्या खर्चापेक्षां कांहींसें अधिक अन्न मिळवून ठेविलें असेल. यांच्या जवळ कांहीं अल्प संग्रह उरून राहिला असेल तीच यांची पुंजी. तिची हे वहिवाट करतील. तेणेंकरून त्यां तारवांतून बुडता वांचलेल्यांपैकीं थोडक्यांचा तरी सांभाळ यांच्या हातून होऊन त्यांस धंदा मिळेल. यांच्या जवळ जें कांहीं अधिक असेल, त्यांतून थोडें थोडें आपल्या पदरीं पडावें अशीं तीं बिचारीं निराश्रित माणसें अपेक्षा करूं लागतील, आणि आपल्या जिवाचें रक्षण करायासाठीं थोडक्या अन्नाकरितां दरएकजण आपआपली मजुरी हेंच मोबदला देऊं लागतील. याप्रमाणें त्या बेटांतील पुंजी तेथल्या लोकांच्या सांभाळास अपुरती होऊन मजूर लोकांत धंद्याची चढाचढी होईल, त्यामुळें रोजमुरा फार कमी होईल, आणि पुंजीदारास त्यांच्या त्यां मजुरांचे मेहनतीपासून मोठा फायदा होईल. याकरितां थोडकी पुंजी असली म्हणजे मेहनतीचें अगत्य थोडकें असतें.

गोपाळ : मेहनतीचें अगत्य यावरून मजूर लोकांस कोठें तरी काम मिळावें, असें जें अगत्य असतें, तें किंवा पुंजीदारांस मजूर लोकांचें अगत्य असतें तें?

गुरु : मजुरांच्या मेहनतीचें पुंजीदारास अगत्य असतें तें. पुंजीदारापासून मिळवायाचा जो रोजमुरा त्याचें तर अगत्य मजुरांस असतें. रोजमुरा म्हटला, म्हणजे तो काम केल्याने मिळतो. याकरितां गरीब लोक काम मिळेल असें पहात असतात. असी जी काम मिळावयाची जरुरी, तेंच मेहनतीचें अगत्य असा अर्थ देशव्यवहारव्यवस्थेवरून होत नाहीं हें त्वां लक्ष्यांत ठेवावे.

गोपाळ : मजूरदारांचें अगत्य लागतें, असें बोलावें म्हणजे मला वाटतें कांहीं घोटाळा होणार नाहीं.

गुरु : होय, खरें. मजुरांकडून काम करवून त्याबद्दल त्यांस रोजमुरा, पोटगी अथवा दुसऱ्या कांहीं प्रकारचें देणें द्यावयास जे समर्थ, त्यांस मजुराचें जें अगत्य लागतें, तें मेहनतीचें अगत्य असें जाणावें.

बरें, पण त्या वसाहतींत मजुरांनी मेहनत करून आपल्या धन्यास मोठा फायदा करून दिला असतां कसें काय होईल?

गोपाळ : त्यानी चांगली पुष्कळ पिकलाड करून दिली असली तर त्यांना चांगली पुष्कळ पोटगी मिळेल?

गुरु : ज्यानी ती पिकलाड केली ती त्यांची नव्हे, त्यांस ज्यानी कामावर ठेविलें होतें त्यांची, तेव्हां त्या मजूरांस त्या पिकलाडीतून मोठा हिस्सा कसा मिळेल?

गोपाळ : मला वाटतें त्यां मजुरांच्या धन्याजवळ पुंजी अधिक झाली, तर त्यांतून त्यांस अधिक द्यावी, असें त्याच्या मनांत येईल.

गुरु : माझ्या मतें तर मजुरांचे मेहनतीपासून जितका फायदा होईल, तितका पुंजीदार करून घेईल, त्याची पुंजी वाढली असतां तो आपल्या काम करणार लोकांचा रोजमुरा न वाढवितां ते अधिक वाढवील. अधिक मजूर ठेवावयाचें सामर्थ्य असलें, म्हणजे मेहनतीचें अगत्य वाढतें. तेणेंकरून रोजमुरा अथवा मेहनतीस जें द्यावयाचें तें अधिक द्यावें असें होतें, हें मी तुला पुढें सांगेन.

त्या वसाहत करणारांची पुंजी मजुरांच्या उद्योगाने इतकी वाढेल कीं, त्यां नवीन येणारांचा सांभाळ करावयास कांहीं अडचण पडणार नाहीं. अशा वाढलेल्या पुंजीचे धनी आपल्या चाकरींत मजुरांस ठेवावयास खुशी होतील. त्यांस एकजण आपली झोंपडी बांधायास, एकजण आपल्या शेतास कुपण घालायास, एकजण आपली होडी करायास ठेवील, कां तर जादती झालेली पुंजी वहिवाटल्यावांचून कांहीं फायदा होणार नाहीं; म्हणून मला अगोदर काम मिळावें, मला पहिल्यानें कामावर ठेवावें अशी मजूर लोकांत चढचढ होणार नाहीं, तर मजूर लोकांस आपल्याकडे ठेवावयाची चढचढ कामावर ठेवणाऱ्या लोकांत होईल, तेणेंकरून रोजमुऱ्याचा दर अगत्य वाढेल, त्यामुळें पुंजीदारांचा फायदा कमी होईल.

गोपाळ : हां हां ! हें तर केवळ उघडेंच आहे. जर जानू आपल्याकडे काम करायास एका माणसास एका दिवसाचे आठ आणें देऊं लागला, ठमाजी आपली होडी करणारांस बारा आणें देऊं लागला, महादु आपल्या शेतास कुपण घालयाकरितां एक रुपया देऊ लागला तर रोजमुऱ्याचा दर वाढून दर दिवसाचा एक रुपया होईल. आणि जर जानू व ठमाजी यानी महादू जितकें देईल तितकें न दिलें तर अवघ्या मजुरांस महादुच आपल्याकडे ठेवून घेईल.

गुरु : अशां या माणसांच्या मेहनतीने जी जास्ती पुंजी झाली, त्या पुंजीनें मेहनतीचें अगत्य अधिक करून रोजमुरा वाढविला, याकरितां मजुरांचा सांभाळ करणारी पुंजी पुष्कळ झाली म्हणजे पुंजीदारांनी थोडक्याच फायद्यानें तृप्त झालें पाहिजे. आणि आपल्याकडे काम करणाऱ्यां मनुष्यांस अधिक मोकळ्या हातानें रोजमुरा दिला पाहिजे.

गोपाळ : अहाहा. हें तर आनंदकारक ! हें असेंच मी इच्छित होतों. पण महाराज, दुसऱ्या वर्षी त्या वसाहत करणाऱ्यानीं आपल्या शेतांची लागवड करावयास त्यां मजुरांस न लावितां घरें बांधायास, व शेतांस कुपण घालावयास लाविलें, तर पोटगीची पुनः कमताई होईल आणि त्यां मजुरांचे पुर्वीसारखेच हाल होतील. पहिल्यानें विपत्ति अनुभविली त्यावरून ते पुढल्या काळाविषयीं सावधपणानें वागूं लागले तर मात्र त्यांचे हाल होणार नाहींत.

गुरु : अमुक कामावर लागावें व अमुकावर न लागावें हें मजुरांच्या मर्जीवर नाहीं, त्यांस जें काम करायास ठेविलें असेल, मग तें कोणतें काम कां असेनां, तें त्यांस केलें पाहिजे. त्यांस कामावर ठेवणारे त्यांचे पोटाच्या तर्तूदीविषयीं सावध असतात, कां तर त्यांस असें कळलें असतें, कीं आम्हा-मधून जे कोणी मजुरीकरितां तर्तूद करून ठेवीत नाहींत, त्यांची चाकरी पुढें त्यां मजुरांच्या हातून होणार नाहीं. पोटगीवांचून मजुरांच्यानें खपवणार नाहीं, आणि त्या वसाहतीतून एकाद्याकडे पुर्तेपणीं पोटगी द्यावयास असतां ती त्याने त्यांस न दिली, तर ती मिळाल्यावांचून ते खपणार नाहीं. जर महादूइतकी जानूने पिकलाड केली नाहीं, तर दुसऱ्या वर्षी महादूइतकीं माणसें जानूच्यानें ठेववणार नाहीं. याकरितां प्रत्येक जमीनीचा धनी जरुरीची पोटगी आपल्या संग्रही करायासारिखें आपल्या मजुरांस काम सांगेल. नंतर त्यांस दुसऱ्या कामावर लावील. असी पोटगी संग्रही झाली असतां मेहनतीचें अगत्य फार होतें, आणि मेहनतीच्याच अगत्यानुरूप पोटगी किती द्यावी न द्यावी असें होतें.

आतां आपण असें कल्पावें कीं, त्या तारवांतून बुडतां वांचणारांनीं आपल्या समागमें आपल्या बायकाही आणल्या होत्या. ते जर आपल्या कुटुंबाचें पोषण करूं लागले, तर त्यामुळें रोजमुऱ्याच्या दरांत कांहीं कमजास्ती होईल काय ?

गोपाळ : रोजमुरा तर जशाचा तसाच राहील, परंतु त्यांस आपलें व आपल्या बायकामुलांचें पोषण करावें लागेल, त्यामुळें त्यांस पहिल्याप्रमाणें खायाप्यायास मिळणार नाहीं.

गुरु : जर अवघ्यांस पुरतेपणीं अन्न मिळालें नाहीं तर अगदी नुकसान अशीं जीं मुलें तीं मरूं लागतील, केवळ भुकेनेच नाहीं, तर पुरतेपणीं व यथायोग्य अन्न न मिळाल्यामुळें जे रोग होतात, त्या रोगानी तीं मरतील. म्हणून असें दिसून येतें कीं तुमच्या त्या बागेचे माळ्याच्या संग्रही कांहीं होतें त्यामुळें कमती पडत नसे, तसें संग्रहीं नसल्यास मजुराने आपला रोजमुरा कुटुंबाच्या सांभाळापुरता झाल्यावांचून आपले लग्न करू नये.

आतां आपण असें कल्पावें कीं, कित्येक वर्षें चांगलीं सुखानें जात असतां एक वादळ झालें, तेणेंकरून आपल्या वसाहत करणाऱ्यांच्या पिकाची इतकी नासाडी होऊन गेली, कीं गतवर्षी जी पिकलाड झाली होती तिच्या अर्धी झाली, असें झालें असतां मेहनतीबद्दल जो रोजमुरा द्यावयाचा त्याचें कसें होईल ?

गोपाळ : तो तर निःसंशय कमी होईल. कां तर पोटगीचें भांडवल्व कमी झालें. पण तो कोणत्या रीतीने कमी होईल हे माझ्या लक्ष्यांत पुरतेपणीं येत नाहीं.

गुरु : त्याचा क्रमें करून शोध करावा. आपण असें समजावें, कीं पूर्वी जितके मजूर कामावर ठेविले होते, त्यांच्या अर्धे सांभाळायापुरती पुंजी आपल्याजवळ आहे असें जानूस अढळल्यावरून तो खिन्न होऊन अर्ध्यांस रजा देईल. मग तीं बिचारीं माणसें काम पाहायास त्या वसाहतींत फिरूं लागतील. त्यांस कांहीं काम न मिळतां ज्या कारणावरून रजा मिळाली त्याच कारणावरून कामातून निघालेले दुःखी गडी आढळतील; मग ते निरुपाय होऊन आपल्या धन्याकडे जाऊन आम्हास कमती रोजमुऱ्याने ठेवावें असी विनंती करूं लागतील. जानूने कामाच्या कमताईमुळें त्यांस काढलें नव्हतें, जानूजवळ द्यावयास भांडवल नाहीं म्हणून काढलें होतें. तो आपल्या या निकृष्ट समयीं यांस कमती रोजमुरा देऊन सुखाने ठेवील. तो यांच्या बराबर नवीन करार करील, आणि याच कराराप्रमाणें राहवयास आपल्याकडलीं प्रथम ठेवलेलीं मनुष्यें कबूल न होतील, तर त्यांस काढून टाकायाचा ठराव करील. यां माणसांस दुसऱ्या ठिकाणीं काम मिळायची अडचण असें समजून ह्यांस कमती रोजमुऱ्याने काम पतकारणें जरूर होईल, याप्रमाणें पूर्वीपेक्षां रोजमुऱ्याचा दर वसाहतींत अर्धा कमती होईल.

गोपाळ : हें असें होईल हें तर स्पष्ट आहे. या विषयीं मला एक मात्र शंका आहे. हें असें त्या वसाहतींत कदाचित् घडेल; परंतु दुसऱ्या ठिकाणीं घडणार नाहीं. माझ्या मतें दुर्भिक्ष झालें असतां रोजमुरा कमी होत नाहीं, तो वाढत असतो. जर वाढला नाहीं तर गरीब लोक फार रड सांगूं लागतात.

गुरु : ज्यां देशांत रोजमुऱ्याबद्दल पैक्याचीच वहिवाट होत असती, तेथें दुर्भिक्षाच्या समयीं रोज-मुऱ्याचा दर कमी करण्याची जरूर नाहीं, कां तर दुर्भिक्षामुळें अन्नाची किंमत वाढली असतां रोजमुरा कमती झाल्याच सारिखें होतें. ज्या खाण्याच्या पदार्थांवर मजूर आपला निर्वाह करितो, त्यां पदार्थांची किंमत दुप्पट झाली असतां तूं त्यास जर पहिल्याच दरानें रोजमुरा देऊं लागलास तर त्याच्या पदरीं अर्धाच रोजमुरा पडेल, कारण दुर्भिक्ष झाल्याच्या पूर्वी तो जें घेत होता त्याच्या अर्धें त्या रोजमुऱ्याने त्यास मिळूं लागेल.

गोपाळ : हें तर त्यां बिचाऱ्यां मजुरांस फसविल्यासारखें आहे, मी जसा देशव्यवहारव्यवस्थेविषयीं अज्ञान, तसींच तीं अज्ञानं, त्यांस आठ आण्यानें जिन्नस अधिक केव्हां मिळतो आणि कमती केव्हां मिळतो हें नकळे. त्यांस चांगली समजूत नाहीं म्हणून दुर्भिक्ष झालें असतांहि तीं पूर्वीच्याच दरानें रोजमुरा घेऊन खपत असतात.

गुरु : त्यांस चांगली समजूत असली तर असें वाटूं लागेल कीं दुर्भिक्षादिकांमुळें विपत्ति आली असतां धीर न सोडतां सहन करावें. दुसरा उपाय नाही. पुंजी कमी झाली असतां मजूर लोक कमती करावे किंवा रोजमुरा म्हणजे मजुरांच्या कामाबद्दल जें द्यावें लागतें तें कमती करावें. यावांचून पुंजीदारास दुसरी सवड नाहीं. पैक्यानें जो रोजमुरा द्यावयाचा तो पैका कमीअधिक करावा तर तसें होत नाहीं. तो बहुधा जितक्याचा तितकाच राहातो. असें आहे त्यापेक्षां कित्येक मजुरांस पुरतेपणीं पोटास देऊन कित्येकांस उपोषित मारणें हें असें न करितां अवघ्यां मजूर लोकांत जी पोटगी असेल ती वाटणें हें नीट नव्हे काय?

गोपाळ : हें तर नीट आहे, परंतु मजूरांस पहिल्याप्रमाणेंच पोटास मिळावें म्हणून अन्नाची किंमत वाढली असतां पुंजीदारानीं रोजमुऱ्याचाही दर वाढवा असी त्यांवर कायदे करणारानीं जबरी केली असता चालेल किंवा नाहीं? मला वाटतें, गरीबांचें वांचणें बहुधा धान्यावर असतें, याकरितां धान्याच्या किंमतीच्या मानानें रोजमुऱ्याचा दर असावा म्हणजे धान्याची किंमत कसीही असली तथापि मजुरांस नित्याच्या मानाइतकें धान्य विकत घ्यावयास सोय पडेल.

गुरु : अथवा धान्य कितीहि कमती पिकलें तथापि प्रत्येक मनुष्यास नित्याच्या मानाइतकें अन्न खावयास सोय पडेल असें कां म्हणत नाहींस? असें आहे, अन्न जाजती होई असी कांहीं तजवीज न झाली तर रोजमुरा वाढवून कांहीं होणार नाहीं.

गोपाळ : पण अर्ध्या रुपयानें जितकें धान्य मिळेल त्याच्या दुप्पट रूपयाने मिळेल, हेंही, महाराज, खरें आहे किंवा नाहीं? आपण सांगतां तें व हें ह्या अशा दोन्ही गोष्टी खऱ्या असून परस्पर विरुद्ध आहेत.

गुरु : तर त्यांतून एक चूक असावी. रोजमुरा दुप्पट झाला तथापि अर्ध्या रुपयानें जितकें धान्य मिळायाचें त्याच्या दुप्पट रुपयानें मिळणार नाहीं, कां तर जसा रोजमुरा वाढला, तसी धान्याची किंमतहि वाढली.

गोपाळ : तर मग शेतकऱ्यास आपलें धान्य वगैरे यांची किंमत वाढवायाची मनाई करावी म्हणजे रोटीवाल्यास व दुसऱ्या जिन्नसदारांस किंमत वाढविण्याचें जरूर पडणार नाहीं. शेतकऱ्यास चांगली पिकलाड न झाल्यामुळें त्याने आपलें नुकसान लोकांवर घालावें, व आपलें कांहीं एक अनहित होऊं देऊं नये हें नीट नव्हे. जसें दुर्भिक्ष होईल, त्याप्रमाणें तो आपल्या मालाची किंमत वाढवीत गेला तर त्यास कांहीं होणार नाहीं. लोकांचें अनहित मात्र होईल.

गुरु : शेतकऱ्याकडे जसें धान्य उत्पन्न होतें, तसा त्या धान्याचा खर्चहि होतो. धान्याची किंमत वाढली असतां लोकांसारखें त्याचेंही अनहित होतें. जर तो आपलें धान्य नित्यापेक्षां दुप्पट किंमतीनें विकील, तर त्याचा घरांत जितक्या धान्याचा खर्च होईल, त्या धान्यावर ती दुप्पट किंमत बसेल. त्याने तें धान्य घरांत न खर्चितां बाजारांत विकलें तर त्यास त्या धान्याची किंमत मिळेल.

बरें, पण दुर्भिक्ष झालें असतां किंमत वाढवूं नये, असें ठरविलें तर त्यापासून काय परिणाम होतील? पिकलाडीपासून जें उत्पन्न व्हावयाचें त्यापेक्षां अर्धें उत्पन्न झालें आहे, ही मोठी गोष्ट तूं ध्यानांत धर हो. जर मजुरांचा रोजमुरा आणि धान्याची किंमत हीं जशाचीं तसींच राहिलीं तर मजूर लोक नित्याइतकें अन्न विकत घेऊन खर्चतील आणि सहा महिन्याचे अंतीं......

**गोपाळ** : महाराज आपण हें वाक्य संपवूं नये. सहा महिन्याच्या अंतीं धान्याचा अवध्या भांडवलाचा खर्च होईल आणि ज्या लोकांची मला दया आली होती ते लोक भुके मरूं लागतील.

**गुरु** : तूं सांगतोस तसें केलें असतां हें असें घडेल. कित्येक राजे जसे परोपकारी होते तसे विवेकी नव्हते. त्यानी धान्याची किंमत अमुक असावी असा नियम करण्याचा उद्योग केला, त्यापासून फार वाईट होऊं लागलें. तो तसा नियम होणें असाध्य व त्यापासून वाईट मात्र घडेल. मग तो किंमती-विषयीचा नियम कायदे करणारांनी रद्द केला. सन १३१५ चे सालीं इंग्लांड देशांत दुष्काळ पडला, तसा दुःखकारक दुष्काळ पूर्वी कधींच प्राप्त झाला नव्हता, त्यामुळें धान्याची किंमत इतकी चढली कीं तें मध्यम स्थितीच्या लोकांस मिळू नये असें झालें. तेव्हां असी चहूंकडे विपत्ति पाहून राज्यसभेस दया येऊन त्यां सभासदानीं असा हुकूम केला कीं आह्मी जसी किंमत ठरवूं त्या मध्यम किंमतेने खायादेयाचे सर्व पदार्थ विकावे. त्याचा असा परिणाम झाला कीं त्यानीं जी कमती किंमत ठरविली होती, त्या किंमतीने कोणताही पदार्थ कोणी न विकितां पहिल्यापेक्षां महाग झाला, अथवा बाजारांत अगदीं आणूच नये असें झालें. कोंबडीं, बकरीं, विरळा दृष्टीस पडूं लागलीं. मेंढरीं तर रोगाने मरूं लागलीं, आणि सर्व प्रकारचें धान्य फार मोठ्या किंमतीनें विकूं लागलें. त्या समयीं दुसरें वर्ष लागतांच सभासदानीं आपली चूक झाली असें समजून धान्याची किंमत व्हावी (हवी) तसी आपल्या आपण ठरविली जावी असें केलें.

हें असें आहे. याकरितां दुर्भिक्षापासून जो अपाय होणार, तो नाहींसा करण्याचा स्वाभाविक उपाय म्हटला म्हणजे धान्याची किंमत वाढली पाहिजे. किंमत वाढविणें हा अन्नाच्या लहानशा भांडवलाची चांगली वहिवाट करण्याचा व तें धान्य दुसरें पीक येई तोपर्यंत जोगाविण्याचा उपाय आहे. येणेंकरून भुसाऱ्यांस परमुलखांतून गल्ला आणावा, असें वाटतें, तेणेंकरून दुर्भिक्ष कमी होतें; परंतु धान्याची किंमत अथवा रोजमुऱ्याचा दर कमजारती करण्याच्या कामांत सरकारानें कधीं पडूं नये. हीं जशीचीं तसींच राहूं दिलीं तर हीं आपआपला पाड धरून राहातील, असो.

आतां त्या वसाहतीची गोष्ट चालूं द्यावी. तेथें एक औपसर्गिक रोग उत्पन्न होऊन तेथले अर्धे मजूर नाहींसे झाले, तर रोजमुऱ्याचें कसें काय होईल?

**गोपाळ** : तर मग जे राहिले त्यांच्या मेहनतीविषयींचें अगत्य अधिक होऊन त्यांचा रोजमुरा वाढेल.

**गुरु** : म्हणून आपण बहुतकरून असें म्हणावें कीं, मजूर लोकांची संख्या जशीची तसीच असतां पुंजी वाढली म्हणजे रोजमुऱ्याचा दर वाढतो, व पुंजी कमी झाली म्हणजे कमी होतो, आणि पुंजी जशीची तसीच असतां मजुरांची संख्या वाढली म्हणजे रोजमुऱ्याचा दर कमी होतो व ती संख्या कमी झाली म्हणजे वाढतो. अथवा कोणी एकादा हिशेबी बोलूं लागला तर असें बोलेल, कीं रोजमुऱ्याचा दर पुंजीच्या मानाप्रमाणें सरळ रीतीने न्यूनाधिक होतो, आणि मजुरांच्या संख्येप्रमाणें उलट रीतीने न्यूनाधिक होतो.

**गोपाळ** : पाट खणून काढणें, डोंगर इत्यादि फोडून त्यांतून नवीन मार्ग करणें असीं जीं कित्येक मोठीं करायाचीं कामें, त्यामुळें मेहनतीचें फार अगत्य असतें असें मला नित्य वाटत असे, परंतु तसें नव्हे. मजुरांस जें पोटास द्यावयाचें त्याचें जसें सांठवण असेल त्याप्रमाणें मजुरीचें अगत्य असतें.

**गुरु** : मजुरीचें अगत्य अथवा खप असणें यास जें काम करावयाचें असेल, तें तर प्रत्यक्ष कारण आहे. असें जें काम करायाचें तें कितीहि मोठें अथवा थोर असो, तें सिद्ध करणें म्हटलें म्हणजे पुंजी जितकी असेल तितकेंच तें काम सिद्ध होईल; अर्थात कोणा एकाजवळ आपल्या मजुरांस पोसावयास अथवा द्यावयास जसें भांडवल असेल त्या प्रमाणें तें काम होईल. हाच विचार देशाचे

पुंजीविषयीं समजावा. एक एका माणसाची पुंजी मिळवून एक संग्रह कल्पावा, ती देशाची पुंजी होय. असे पुंजीचे ठायीं पोसायाचें जें सामर्थ्य असेल त्यापेक्षां अधिक लोकांस धंद्यास लावणें हें तिजकडून होणार नाहीं. लागवडीस आणायाजोगी देशांतील जी अवघी ओसाड जमीन, तिची लागवड करणें हें एक काम असें समजावें. तें काम करवावयापुरते कोणाएकाजवळ मजूर असले पाहिजेत इतकेंच नव्हे, तर त्यांचा सांभाळ व्हावयापुरतें पोटगीचें भांडवल असलें पाहिजे. पुंजीवर आपलें भाषण चाललें होतें तेव्हां असें बोलणें झालें कीं ज्या देशाची पुंजी मोठी त्या देशीं प्रसिद्ध इमारती, पूल, वाफेच्या गाड्या चालायाचे लोखंडी रस्ते, पाट बांधून नेलेले, इत्यादि मोठीं मोठीं कामें होत असतात. या अशा सर्व गोष्टी होणें हें संपत्तीची भरभर झाल्याचें लक्षण समजावें.

गोपाळ : माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं मजुरांस इंग्लंडांत जो रोजमुरा मिळतो, त्यापेक्षां ऐर्लंडांत फार कमती मिळतो. त्या देशाची पुंजी तेथील लोकांचें पोषण करावयास पुरतेपणीं पुरी पडत नसेल म्हणून तेथे इतका कमी रोजमुरा. कां, असेंच ना?

गुरु : त्या देशीं मेहनतीचा पाड कमती व्हायाचीं जीं मुख्य कारणें त्यांतलें त्वां सांगितलें तें एक कारण आहे; तेथील राज्यांत कित्येक गोष्टीची उणीव आहे, त्यामुळें मेहनतीचा पाड कमी करणारीं बहुत दुसरीं कारणें आहेत. इंग्लिश लोकांपेक्षां ऐरिश लोकांचा फार कमी उद्योग असतो. आर्थर यंग साहेबाने ऐर्लंड देशीं पर्यटन केलें, त्याविषयीं त्यानीं एक ग्रंथ केला आहे, त्यांत असें कथन केलें आहे कीं शेतकीची मजुरी कमी पाडाची आहे, परंतु स्वस्त नव्हे. ऐर्लंडांत कोक (कॉर्क) एथें दररोज पावला द्यावा त्यापेक्षां अिंग्लंडांत साफोक एथें दररोज रुपया द्यावा तो स्वस्त, अमेरिकेंत ह्युरन म्हणून जंगली लोक असतात, त्यांतून एकादा दररोज चार पैसे घेऊन जमीन कुडवील तर तें ऐरिश माणसास जो पावला द्यावा लागतो त्यापेक्षां महाग.

गोपाळ : महाराज वेगळाल्या मुलखांत मेहनतीचा पाड वेगळाल्या मानानें असतो हें नीट आहे, परंतु एकाच मुलखाच्या वेगळाल्या प्रांतीं तो पाड फार वेगळाल्या मानानें असतो हें नवल. लोहाराने केलेले कांहीं जिन्नस मी थोडक्या दिवसांमागें घेऊं लागलों, तेव्हां मला सुऱ्या, चाकू, कातर असे जिन्नस दाखविले, त्यांतून हे शहरांत केलेले व हे प्रांतीं केलेले असें सांगितलें ते तर एकसारखेच दिसूं लागले. परंतु त्यांच्या किंमतींत बरेंच अंतर आढळलें. त्याचें कारण पुसल्यावरून मला असें सांगितलें कीं प्रांतापेक्षां लंडन शहरांत फार मोठा रोजमुरा द्यावा लागतो म्हणून मोलांत इतकें अंतर आहे.

गुरु : लंडन शहरांतील काम करणारांस इतका मोठा रोजमुरा देण्याचें कारण काय, असें जर त्वां पुसलें असतें, तर ते चांगले काम करणारे म्हणून असें ऐकिलें असतें. आमचे कारिगीरीची बूज लंडनांत उत्कृष्ट रीतीने होईल, आणि तेथील चाकरीस ठेवणारे आम्हास आमच्या मेहनतीबद्दल उत्तम रीतीने देऊं शकतील, असें जाणून केवळ हुशार जे कारागीर ते बहुधा तेथें जातात.

मेहनत करणारांच्या हुशारीप्रमाणें त्यांचे मेहनतीस देणें हें नीट आहे. तुमच्या मुख्य माळ्याच्या हाताखालीं जीं माणसें आहेत, त्यांतून एकाइतका तो काम करीत नाहीं. तथापि त्याची हतवटी, व समज पाहून तुम्ही त्यास त्या दुसऱ्या माणसांपेक्षां फार अधिक रोजमुरा देतां. याच कारणावरून इंग्लंड एथील सोनारास व घड्याळें करणारांस शिंप्यापेक्षां अथवा सुतारापेक्षां मोठा रोजमुरा मिळतो.

ज्यांत कौशल्याचें अगत्य नाहीं, आणि जीं अत्यंत मेहनतीचीं व त्रासकारक असीं लोहाराचीं लोखंड ओतायाचीं तसींच दुसरीं खाणीतून कोळसे काढायाचीं वगैरे कामें, यांस चांगलाच रोजमुरा मिळतो.

रंग लावणें, खाणीत काम करणें, बंदुकीची दारू करणें इत्यादि कामें शरीरप्रकृतीस विकार, मनास त्रास, किंबहुना जीवास अरिष्ट करणारीं असतात, तें पाहून लोक त्या कसबांस चांगला रोजमुरा देतात.

गोपाळ : बरें महाराज, जे साहेबलोक वैद्यकी, वकीली इत्यादि धंदे करितात, त्यांस जे लोक काम सांगतात त्यांविषयीं त्यांच्या वेळाची व बुद्धिकौशल्याची योजना झाली असती. तेव्हां ते तरी एक उत्तम प्रकारचे चतुर मजूर समजावे. त्यांस तर सर्वोत्कृष्ट मोठा रोजमुरा मिळतो. मला असें दिसतें कीं, शारीर सामर्थ्यापेक्षां मानसिक सामर्थ्य थोर म्हणून मानसिक शक्तीने व्यापार करणारा हा उत्तम प्रकारची मेहनत करितो इतकेंच; वरकड पाहिलें असतां, हा तरी शारीर सामर्थ्यानें जो मेहनत करणार त्याच्याच सारखा एक मजूर आहे.

गुरु : हें तुझें बोलणें मला पुरतेपणीं मान्य नाहीं. तूं सांगतोस तसे विद्वान, वकील, व्यवहारशास्त्रज्ञ, चतुर वैद्य अथवा नामांकित कारागीर इत्यादिकांचे बुद्धीस जी शिक्षा आवश्यक आहे, ती संपादन करावयास पुष्कळ मोठा खर्च लागतो. असी जी मोठ्या खर्चाची शिक्षा ही एक पुंजीच समजावी. इची त्यांच्या बुद्धीच्या ठायीं स्थापना केली असती, आणि त्यांस जें त्यांच्या कामाबद्दल मिळतें तें त्या स्थिर पुंजीचें उत्पन्न, रोजमुरा नव्हे असें समजावें.

गोपाळ : ही तर एक अगदी नव्या तऱ्हेची स्थिर पुंजी, जी साधारण स्थिर पुंजी आहे तिजपासून इची आपण कोणत्या नावानें निवड कराल ?

गुरु : इला कोणेसमयीं बुद्धिरूप, कोणेसमयीं अद्रव्यमयी पुंजी म्हणतात, एणेंकरून ही द्रव्यमयी पुंजीपासून भिन्न असा बोध होतो. सिनियर साहेबानें असें निरूपण केलें आहे, कीं जसीजसी लोकांच्या ठायीं सुधारणूक वाढत जाईल तसतसा प्रत्येक मनुष्य शिकत जाईल, तेणेंकरून उत्पन्न करण्याचें जें त्याचें सामर्थ्य तें बरेंच वाढेल. केवळ शरीरव्यापारानें व्हायाच्या अशा बहुधा हरएक वस्तु यांस पशु आणि यंत्रसाहित्य करील. परंतु जें कांहीं बुद्धिव्यापारानें घडायाचें, तें तर बुद्धीस जसा बाल्पणापासून व विचारपूर्वक संस्कार प्राप्त झाला असेल त्याप्रमाणें घडेल. सांप्रतकाळीं आपल्यास सुशिक्षितावस्था प्राप्त झाली आहे. ही पाहिलें असतां चांगलीच दिसती, परंतु जी सर्वोत्कृष्ट अवस्था ती कसी हें सहज मनांत आणितां येती, अथवा ती प्राप्त होईल असे भरवस्यानें वाटतें. त्या अवस्थेपेक्षां ही सांप्रतची अवस्था फार उणी आहे, तथापि ह्या अशा अवस्थेंत तरि ग्रेट ब्रिटन देशाची जी बुद्धिरूप व नीतिरूप पुंजी ती त्या देशाचे अवघ्या द्रव्यमयी पुंजीपेक्षां फारच अधिक आहे. ही केवळ थोरपणेंकरून अधिक आहे असें नाहीं तर उत्पन्न करण्याच्या सामर्थ्यानेंही अधिक आहे. ज्यां माणसांस रोजमुरा मात्र मिळतो, तीं पाहिलीं असतां तेथील लोकांच्या चतुर्थांश होतील. इतकी त्यांस जी मिळायाची रोजमुऱ्याची रकम ती बरीच मोठी असती, पण तेथील लोकांतील जे विशेष विद्वान ते आपल्या पुंजीने व कौशल्याने त्यां रोजमुरा घेणारांच्या उद्योगांस अनुकूल होऊन प्रवृत्त करितात, तेव्हांच ती रकम बहुतकरून त्यांच्या पदरीं पडती. स्थावर मिळकतीचें उत्पन्न ज्यांस मिळतें, ते तरी रोजमुरा घेणारांपेक्षां थोडके आहेत. जशी रोजमुऱ्याची प्राप्ति ज्ञानाधीन असती, तसीच ईश्वराने जें कांहीं दिलें असेल त्याची योजना व वहिवाट करणारें जें ज्ञान, प्रायः त्या ज्ञानाधीन त्या उत्पन्नाची प्राप्ति असती. देशांत जें उत्पन्न होईल त्याचा मुख्य भाग म्हटला असतां प्राप्ति होय, या प्राप्तींत स्थावर मालाचें उत्पन्न अथवा द्रव्यमयी पुंजी बहुधा तृतीयांशाइतकीही असत नाहीं. तेव्हां बाकीची जी प्राप्ति होणे ती आंगिक संपत्तिपासून अर्थात विद्येपासून होत असती.

गोपाळ : हा तर बुद्धिरूप पुंजीचा चांगलाच स्तव झाला. पण महाराज, या पुंजीस सिनियर साहेबाने नीतिरूप व आंगिक अशीं दोन विशेषणें दिलीं आहेत याचें कारण काय ?

गुरू : ही पुंजी ज्याच्याजवळ असती, त्याच्या अंगी राहिली असती म्हणून ही आंगिक होय, आणि बुद्धीची प्रवृत्ति झाली असतां नीति, उत्तम आचरण अशांकडे ज्या बुद्धीचा सबळ रोख असतो म्हणून ती नीतिरूप होय.

गोपाळ : तेव्हां संपत्ति नसली तर देश संस्था होत नाहीं तसेंच ज्ञान नसलें तरीं देशसंस्था होणार नाहीं.

गुरू : होय, लोकांस संपत्तिचे प्राप्तिविषयीं उपाय दाखवीणे व सामर्थ्य देणें हें ज्ञानानें घडतें. विद्याभ्यासाने प्राप्त होतें असें जें ज्ञान तें जर नसलें तर अत्यंत पिकावू जमीन, सर्वोत्कृष्ट चांगली हवा, किंबहुना फार हुशार लोक असले तरी ते सर्वदा गरिबच राहतील. याचे स्पष्ट उदाहरण ऐर्लंड देश होय. तें सिनिवर साहेबाने उत्तम प्रकारें करून दाखविलें आहे, तें मी त्याच्याच वाणीनें तुला ऐकवितों. जमीनीचे अथवा हवेचे गुण अथवा पदार्थ उत्पन्नकारक द्रव्यमय साधनाचा संग्रह याच्या आधीन देशसंपत्ति नसती, तर अद्रव्यमयी पुंजीचें जें मान व प्रसर त्याच्या आधीन असती. ऐर्लंड देशाची हवा, जमीन, दिशा ही उत्तम प्रकारचीं आहेत, व इंग्लंडाच्यापेक्षां फार उणी नाहींत असें असून द्रव्यमयी पुंजीच्या अभावामुळें त्या देशाची गरिबी झाली म्हणून सांगतात, परंतु ऐर्लंडांतील अवघे लोक इंग्लंडांत गेले आणि इंग्लंडांतले उत्तरेकडच्या प्रांती राहाणारे सत्तर लाख लोक ऐर्लंडांत गेले, तर हे ज्या पुंजीचा अभाव आहे ती लवकर उत्पन्न करतील. आणि ऐर्लंडांतील पश्चमेकडलीं तर दाहा लाख कुटुंबें येऊन इंग्लंडांत ट्रेनट नदीचे उत्तरेस राहिलीं, तर तीं लांकन् शैर व यार्क शैर म्हणून जे इंग्लंडांतील प्रांत यांची स्थिति ऐर्लंडांतील कानाट प्रांताप्रमाणें फारच लवकर करतील. ऐर्लंडास द्रव्यमयी पुंजीचें दरिद्र आहे, त्याचें कारण त्या देशास नीतिरूप व बुद्धिरूप पुंजीचें दरिद्र आहे, आणि हें दरिद्र असायाचें कारण हेंच कीं त्या देशास नितीरूप व बुद्धिरूप शिक्षा प्राप्त झाली नाहीं, व तो देश शिक्षेवांचून राहिला आहे, आणि अज्ञान व बलात्कार यांमुळें तेथील लोकांचें व त्यांच्या मालाचे रक्षण होत नाहीं आणि पुंजीच्या संग्रहास अटकाव होऊन तिची चाल होऊं नये असें होत आहे. असी स्थिति असतां त्या देशाचेंच दरिद्री हटकून हलकें करायाजोग्या कायद्यानें कांहीं होईल असें कोणास वाटेल, पण शरीरांतरीं रोग प्रकुपित असतां बाहेरील विकारांचें उपशमन करावें तसें मात्र होईल. चिरकाल हित होणार नाहीं, हा तर निश्चय. ज्ञान हीच शक्ति असें म्हणतात त्यापेक्षां ही संपत्ति यांत तर संशय नाहीं. एशिया मैनर, सिरिया, मिसर व आफ्रिकेच्या उत्तर कांठ्याचा मुलुख यांची पूर्वी पृथ्वीवरील अत्यंत मातबर मुल्कांत गणना होत असे, आतां अत्यंत विपत्तीस पावलेल्या मुल्कांत गणना होत आहे, याचें कारण इतकेंच कीं द्रव्यमयी संपत्ति पुरी पाडायाजोगीं अद्रव्यमयी संपत्तीचीं साधनें पुरतेपणी ज्यांच्याजवळ नव्हती अशां लोकांच्या हातीं ते मुलुक आहेत.

गोपाळ : महाराज, आपण अद्रव्यमयी पुंजीचें वर्णन केलें तें पाहून मला फारच आनंद झाला, आणि असें वाटूं लागलें कीं याच्या मोठेपणापुढें दुसरे वर्णन कांहींच नाहीं, तस्मात द्रव्यमयी पुंजी म्हणजे काय पदार्थ आहे.

गुरु : अद्रव्यमयी पुंजी म्हणजे ज्ञानाचे जे प्रकार आहेत ते अवघे प्राप्त झाले आसतां त्यांपासून श्रीमंतांस आनंद प्राप्त होतो, पण गरीबांस द्रव्यमयी पुंजी उत्पन्न करायाच्या युक्ति प्राप्त होतात. हाच काय तो या पुंजीचा सर्वोत्कृष्ट उपयोग, हें तूं विसरूं नको. उत्तम कला, शिल्प, इत्यादिविषयक शास्त्रें अथवा विद्या यांच्या व्यासंगापासून जो शुद्ध आनंद होतो त्याच्या उपभोगापेक्षां अन्नवस्त्राच्या समृद्धीचा उपभोग घेणें हें गरिबांच्या मुलास विशेष आवश्यक आहे. कळलें ?

# उत्तरभागसंवाद १

## रोजमुरा आणि लोकसंख्या यांविषयीं

यांत भांडवल मोठें असलें म्हणजे रोजमुरा नेहमी मोठा असतो असें नाहीं, चीनदेशीं भांडवल मोठें असून रोजमुरा लहान असतो–अमेरिकेंत भांडवल लहान असून रोजमुरा मोठा असतो–नवीन वसाहतीचे मुलखास फायदे होत आहेत–लोकसंख्येचे वृद्धीस दरिद्र हा एक स्वाभाविक प्रतिबंध होय–समृद्धि असून लोकसंख्या मोठी झाली तर मात्र हितावह होय–कोणतें एक भांडवल जशेचें तसेंच असणें त्यापेक्षां तें संपत्ति वाढती राही असें ठेवणें बरें आहे.–लोकसंख्येचे वृद्धीस उत्तेजन देणें ही चुकी आहे.–उद्योग–खंडकाम इत्यादि सांगितलीं आहेत.

गोपाळ : महाराज मागल्या संवादाविषयीं म्या फारच विचार करून असा सिद्धांत केला कीं, ज्या देशीं भांडवल मोठें त्या देशीं पुष्कळ लोकांचें पोट भरेल व मेहनतीस मोठा रोजमुरा मिळेल.

गुरु : पोटगीचें भांडवल जास्ती असलें तर जास्ती लोकांचें पोट भरेल यांत संशय नाहीं; परंतु त्यापासून मोठा रोजमुरा मिळेल असें सिद्ध होत नाहीं. चीनदेश हा मोठा मातबर मुलूख आहे, असें असतां तेथें रोजमुरा जसा कमी आहे तसा, मला वाटतें, कोठेच नाहीं. तेथील कनिष्ठ स्थितीचे जे लोक त्यांच्या विपत्तीचें वर्तमान हल्लीचे देशपर्यटन करणारे सांगतात तें ऐकून खेद होतो. त्यांस आळसामुळें गरिबी प्राप्त झाली आहे असें नाहीं, ते तर आपलीं हातेरें घेऊन कामाविषयीं याचना करीत रस्त्यांत फिरत असतात.

गोपाळ : चीन देशांत लोकसंख्या फारच मोठी म्हणून तसें घडतें. त्या देशाची पुंजी जरी मोठी असली तरी ती तेथील अवघ्या राहणाराच्या पोटगीस पुरी पडणार नाहीं.

गुरु : म्हणून त्वां असें लक्षांत ठेवावें कीं, पुंजीचें जें मान असेल त्याप्रमाणें रोजमुऱ्याचा दर असत नाहीं, तर पोष्य लोकांच्या संख्येच्या बेताने पुंजीचें जें मान असतें त्याप्रमाणे तो दर असतो. हा साधारण नियम समजावा. मजुराचें उत्पन्न करण्याचें जसें सामर्थ्य असतें, त्या प्रमाणें रोजमुऱ्याचा दर असतो. हें तारतम्य लक्ष्यांत न ठेविल्यामुळें देशव्यवहारव्यवस्थेंत असंख्य चुका होतात. चीन देशांत जी संपत्ति वस्तुतः आहे तिजपेक्षां दहापट अधिक असली आणि लोकसंख्याही आहे त्यापेक्षां दहापट अधिक झाली तरी लोकांस अन्न चांगलेपणीं मिळायाचें नाहीं.

अमेरिका म्हटली असतां लहान पुंजीचा मुलूख आहे, तथापि तेथें रोजमुरा फारच मोठा असतो.

गोपाळ : आपण त्याचें कारण काय सांगाल ? कां तर पुंजीचें जसें मान असेल त्याप्रमाणेंच मेहनतीविषयीं अगत्य असेल ?

गुरु : युरोप खंडांतील देशांची बरोबरी करून पाहातां अमेरिकेची पुंजी ल्हान आहे, परंतु त्या पुंजीने जी लोकसंख्या पोसावयाची त्या मानानें पाहातां ती पुंजी बरीच मोठी आहे. अमेरिकेंत व नवीन वसाहत झालेल्या सर्व मुलखांत लोकांची वस्ती पातळ पातळ असती, तेथें मेहनतीबद्दल रोजमुरा फार मोठा असतो. कां तर पुंजी फारच लवकर वाढत असती. तेथें जमीन पुष्कळ व चांगली पिकावू असती, आणि ती लागवड करायास मजुरांची कमताई असती, तेथें मजुर मिळविण्याविषयीं मोठी चडचड (चढचढ) होती, त्यामुळें मजूर लोकांस जमीनीच्या धन्यापासून मोठा रोजमुरा मागण्यास फावतें आणि रोजमुरा जसा जसा मजुरांस मोठा मिळतो, तसें तसें जमीन विकत घ्यावयास व स्वतां जमीनीचें धनी व्हावयास लवकर साधतें. याप्रमाणें मजूर लोक नेहमी मालक होत असतात, आणि जी नवीन प्रजा होत असती आणि परमुलखांतून जे लोक येत असतात त्यांस मजूर व्हावयास सोय पडती.

गोपाळ : तेव्हां मोठा रोजमुरा व जमीनीची कमी किंमत असे अमेरिकेंत दोन फायदे आहेत, त्या मुलखाची भरभर चालली आहे म्हणून ऐकतों, तर त्याविषयीं आश्चर्य काय !

गुरु : सुशिक्षित लोकांची नवीन मुलखांत वसाहत झाली असतां तेथें संपत्ति व सुधारणूक जसी त्वरेनें चाल करती, तसी कोठे करीत नाहीं. इतकेंच कीं त्यानीं आपल्या रक्षणाकरितां कायदा करावा, मग त्यांस उद्योग करण्याविषयीं दुसरी कोणतीही प्रेरणा न लगे. जेथे नवीन वसाहती झाल्या आहेत, व जेथें चांगले माहितगारीचे शेतखटलीं चालविणारे आहेत, जेथें युरोपखंडांतील शेतकीच्या आऊतानीं चांगली नवीन जमीन नेहमी लागवडींत आणीत चालले आहेत, असीं जीं अमेरिकेंतलीं ठिकाणें तेथें अनुपपत्ति म्हणून काय ती प्रायः ठाऊकच नाहीं; सर्वत्र समृद्धिच नांदत आहे, त्यांची लोकसंख्या त्वरेनें वाढती, त्यामुळें पुंजी कसी त्वरेनें वाढती याचें अनुमान करितां येईल. अमेरिका खंडांतील राहाणाऱ्यास कुटुंबाचें पोषण पुरतेपणी करावयास सुगम असतें, त्यावरून त्यांस लवकरच लग्नें करावीं असें वाटतें, आणि त्यांस बहुत मुलें होतात, त्या मुलांचें चांगलें पोषण होऊन तीं वाढत असतात व निरोगी असतात. या वसाहतीस युनैटेड स्टेट्स असें म्हणतात. येथील लोकांची संख्या सुमारें तेवीस वर्षांनी दुप्पट होती, त्यावरून जीं जन्मलीं त्यांतून किती थोडकीं मरतात हें सहज अनुमान करितां येईल.

गोपाळ : असी लोकसंख्या पुष्कळ होत असती म्हणून रोजमुऱ्याचा दर कमी होत नाहीं काय ?

गुरु : नाहीं, लोकसंख्येच्या मानाने त्यांची पुंजी अधिकच वाढत असती; आणि असें होत असलें तर रोजमुरा कमी न होतां वाढत जाईल. म्या जें कांहीं अमेरिकाखंडाविषयीं सांगितलें तें त्या देशाच्या युनैटेड स्टेट्स म्हणून जी वसाहत त्या विषयी मात्र जाणावें. यां प्रांतीं सरकारची मोकळीक असून सर्व प्रकारच्या लोकांच्या मालाचें संरक्षण होतें ही एक हिताची गोष्ट आहे. स्पेन देशींच्या ज्या वसाहती आहेत, तेथें फार वेगळ्या तऱ्हेचे सरकार असतें. म्हणून लोकांचे स्थितीची भरभर फार कमती असती. अमेरिकेंत स्पानिश् लोकांचीं जीं सर्वोत्कृष्ट संस्थानें आहेत त्यांतलेंच म्याक्सीको म्हणून एक संस्थान आहे, तेथील लोकसंख्या अठेचाळीस वर्षांनी दुप्पट होत असती.

गोपाळ : अमेरिकेंत पुंजी ल्हान असतां व इंग्लांडांत पुंजी मोठी असतां इंग्लांडांतील गरिब लोकांची विपत्ति अमेरिकेंतल्यांपेक्षां अधिक कां असावी हें अजून माझ्या लक्ष्यांत येत नाहीं.

गुरु : त्याचें कारण कामावर लावावयाचे व पोष्य लोकांचे संख्येस अनुलक्षून पुंजीच्या मानाचा विचार करीत असावें, असा जो मी तुला मुख्य नियम सांगितला त्यास तूं विसरतोस. नवीन वसाहत झालेल्या मुलखांत पुंजीचे वाढीस जसें सुगम असतें, तसें युरोपांतील इंग्लांड व इतर सर्व प्राचीन वसलेले मुलूख येथें असत नाहीं; जर लोकसंख्या वाढत गेली, आणि त्या मानानें संपति वाढली नाहीं तर

मेहनतीस द्यावयाचा जो रोजमुरा तो वाढणार नाहीं, उलटा कमी होईल, आणि गरीब लोकांस अधिक गरीबी येईल.

गोपाळ : बरें पण उपजीविकेच्या मानापेक्षां लोकसंख्या अधिक वाढूं शकेल काय ? लोक तर खायास असल्या विना वांचतच नाहींत.

गुरु : लोकांची प्रकृति नीट राहावी व त्यांचें अंगीं सामर्थ्य यावें इतकें अन्न त्यांचें पोषण करायास आवश्यक आहे, यापेक्षां कमी असलें तरी ते तितक्यावर वांचतील, आईबापांस मुलांचें पोषण करावयाचें सामर्थ्य नसलें तरी त्यांस मुलें होतील. अशा प्रसंगीं लोकसंख्या वाढूं शकणार नाहीं असें केवळ नव्हे, परंतु लोकांचा हळूहळू मोड होत जाईल.

असी दशा कोणाएका देशाची एकसारखी चालत असली म्हणजे त्यांचा ऱ्हास होऊं लागतो. याप्रमाणें जेथें मर्जीस येईल तसें राज्य करणारे असतात, व मालाचें रक्षण होत नाहीं, त्यामुळें उद्योगाचा मोड होतो, असे जे पूर्वेकडचे बहुतेक देश तेथें होत आहे.

गोपाळ : परंतु जेथें सुधारणूक बरीच झाली आहे, व मालाचें रक्षण होत आहे, असे जे इंग्लंड इत्यादि देश तेथें आपण सांगतां तसें होणार नाहीं. ऱ्हास होणें सोडून द्या, उलटी संपत्ति व समृद्धि प्रतिवर्षास इंग्लंडांत वाढत चालली आहे.

गुरु : होय, खरें. तेथें लोकसंख्याही वाढत चालली आहे, आणि संपत्तीचा बहुतेक अंश वाढविणें प्रत्येक जणाच्या वांटणीस आलें आहे, म्हणून संपत्ति पूर्वीपेक्षां फारच अधिक वाढत चालली आहे. पूर्वी किती एक शतवर्षांमागें तेथील लोकांच्या वडिलांस तागाचें कापड, जोडे, पायमोजे नसत, आणि मानकऱ्याच्या घरांतील सामान आतांच्या एका खोपटांतील सामानासारिखें विरळा असे. सारांश ज्या देशाची भरभर चालली असती तेथें संपत्ति वाढत असती. लोकसंख्या अतिशय अधिक होणें हें आगंतुक प्रसंगेंकरून, व अल्प काल राहायासारख्या कारणावरून मात्र होतें.

गोपाळ : फार चांगलें सांगितलें ! लोकसंख्या मोठी होणें हेंच संपत्तीचें कारण होय असें मला नेहमी वाटत असे. पाहिलें असतां मातबर, आबादान असे जे मुलुख त्यां अवश्यांत लोक पुष्कळ असतात; मोठ्या मोठ्या शहरांत तरी लोक फार असतात, देशास संपत्तिपासून मोठें हित होतें असें आपण मानितां, असी जी ही संपत्ति लोकसंख्या वाढवावयास उपयोगी पडती; आणि लोकसंख्या संपत्तीस वाढविती, कां तर मजुरांच्या खर्चास जें लागतें, त्यापेक्षां ते अधिक उत्पन्न करितात. तारवावरून बुडतां वांचलेल्या असामीस मजुरी मिळाल्यावरून आपली ती वसाहत कशी मातबर झाली त्याचें तर आपल्यास स्मरण असेल. ते पहिल्यानें आले त्यावरून कांहीं अडचण झाली खरी, परंतु आपण जसें यंत्रसाहित्याविषयीं बोलतां तसें मीही बोलतों, कीं ती अडचण थोडकी व थोडा वेळ राहाणारी, असें असतां जो लाभ झाला तो मोठा व शाश्वत असें झालें.

गुरु : आपल्या मुलांची प्रकृति चांगली राहून त्यांस सुख वाटे अशा प्रकारें त्यांचें पोषण करावयाजोगा रोजमुरा मजुरास देणारी पुंजी ज्या देशांत असती, त्या देशास मोठी लोकसंख्या फार हितकारक होती; परंतु आपल्या त्या वसाहतींत जसें झालें त्याप्रमाणें चांगले बळकट मजूर मिळाले म्हणजे लोकसंख्या वाढती असें बहुधा नव्हे, तर ज्यांचें पोषण आईबापानीं केलें तरच होईल असीं लहान बाळें जन्मलीं पाहिजेत. या बाळांच्या पोषणाची तर्तूद नसली तर तीं थोडकीं वर्षे दरिद्रांत काढायास मात्र जन्मलीं असें होतें, आणि अनुपपत्ति व विपत्ति यामुळें होणार जो रोग तो त्यांस लौकरच घेऊन जातो. असा प्रसंग प्राप्त झाला असतां देशाचें बळ, संपत्ति, अथवा सुख, यांतून एकही वाढत नाहीं; उलटें त्याचें बळ कमी होतें, तो भिकेस मिळतो, आणि त्यास अधिक विपत्ति प्राप्त होती. रें रें करणारीं मुलें यांपासून कांहीं उत्पन्न न होतां खर्चास कारण

होतात, हीं सुख मोगल्यांवाचून दुःख सोसून घेतात, आणि यांची जतन करणारीं जीं आईबापें त्यांचीं उतराई होण्याजोग्या वयांत आल्यावांचून त्यांच्या खिन्नतेस व शोकास कारण होतात. जेणेंकरून पोट भरायाचें त्याच्या मानापेक्षां जेथें लोकसंख्या फार असली म्हणजे तेथे याप्रमाणें बहुत मुलांची दशा होती, व असेंच इंग्लंडांतही वारंवार होत असेल.

गोपाळ : किती भयंकर ही कल्पना! परंतु कोणी मुलें भुकेनेच मेलीं असें तर आपल्यास वाटत नसेल?

गुरु : असीं कोणी मेलीं नसावीं; परंतु जसी व्हावी तसी जतन आणि पोटभर चांगलें अन्न नसल्यामुळें जीं मुलें हळूहळू क्षीणता पावून मरतात, त्यां दैवहीनांची दशा भुकेनें मरणार जीं मुलें त्यांच्यासारखी खेदास कारण होती. ज्या कुटुंबांत बहुत लहानलहान मुलें असतात, त्या कुटुंबांत आईस त्यांचे जतनेंविषयीं आपलें अवघें लक्ष लाविलें पाहिजे; परंतु त्यांना जें अल्प स्वल्प पोटास पाहिजे, तें कष्टेंकरून मिळवावें लागतें, तें मिळवावयास त्यां मुलांची आई त्यांस घरांत सोडून बाहेर जात असती. सांभाळ, स्वच्छता, मोकळा वायु, व पुष्टिकारक खाणें असीं नसलीं तर नानां प्रकारचे रोग उत्पन्न होतात, ते त्यां मुलांस घेऊन जातात. अथवा इतकें अशक्त करून सोडतात कीं औपसर्गिक रोग त्यांस पहिले भेटीसच मारून टाकितो. असा दुबळेपणा आणली वैद्याची व विवेकपूर्वक उपचाराचीही कमती असल्यामुळें कनिष्ट स्थितीचे लोकांची मुलें देवीनें व गोंवराने थोर लोकांचे मुलांपेक्षां फारच अधिक जातात.

लोकसंख्याच अतिशय झाल्याचे परिणाम मुलांच्याच ठायीं दिसून येतात असें नाहीं. एकादा मनुष्य दुःखणेकरी झाला तर त्यास औषध, उपाय व चांगलें पथ्य खाणें मिळालें तर तो बरा होतो; हीं त्यास मिळवायाचें सामर्थ्य नसलें तर तो मरून जातो. एकादी स्त्री नाजूक अथवा अशक्त असली तर तिला विश्रांति व अपेक्षित पदार्थ मिळाला पाहिजे, परंतु असें प्राप्त करून घ्यायाची तिला अनुकूलता नसती. मुलखाची जसी हवा आणि रीति-स्थिति असती त्याप्रमाणेच अन्नवस्त्रादिक असावीं आणि जसे वय व तेथील राहाणारांच्या स्त्रीपुरुषादि व्यक्ति व शरीरविकार त्यासही अनुसरून असावीं, आणि जेथें हे अवश्यक पदार्थ कमती होतात तेथें मृत्यु वाढतो. उपजीविकेच्या पदार्थांचे मानापेक्षां कधीं कधीं लोकसंख्या वाढून अधिकच झाली असली तर ती थोर लोकांच्या अविचारी वर्तणुकीनेंच झालीं असें नाहीं, तर कनिष्ट लोकांच्या अविवेकानें झालीं असें समजावें.

गोपाळ : गरीब लोकांत फारच पूर्ववयांत लग्नें होतात त्याविषयीं आपण बोलतां काय?

गुरु : होय, मागें असें भाषण झालें कीं, लोकांस अन्नादिक पुरतेपणीं मिळाल्यावरून लोकसंख्या फार वाढती. तेणेंकरून देशाचें सर्वोत्कृष्ट कल्याण होतें, समृद्धींत वाढलेलीं असीं जीं मुलें त्यांचे चांगले निरोगी व बळकट पुरुष होऊन ते आपल्या देशास आपल्या बळेंकरून रक्षितात व आपल्या उद्योगेंकरून समृद्ध करितात. या विषयावर ज्यानीं विचार केला नाहीं, त्यानीं जें कारण त्यास कार्य मानून तूं जसें बोलतोस तसें वारंवार बोललें आहेत कीं कसेंही असो, परंतु लोकसंख्या मोठी असली म्हणजे हीच समृद्धि व्हावयास कारण होती. लहानपणीं लग्नें झालीं असतां आपला देश सुखी व समृद्ध होईल अशा समजुतीने लहानपणीं लग्नें व्हावी, व कुटुंबें मोठीं व्हावीं म्हणून लोकांनीं व कायदे करणारांनीं मोठे प्रयत्न केले.

गोपाळ : तीं तर एक चूक मोठ्या दुर्दैवेंकरून झाली, परंतु लोकसंख्या कमी झाली म्हणजे जो अपाय होणार तो आपेंआप नाहींसा होत असेल; कारण लोकांची कमताई झाल्यामुळें त्या कमी झालेल्या लोकांचें पोषण जी पुंजी असेल तेणेंकरून पुरतेपणीं होऊं लागेल, त्यामुळें मेहनतीबदल जो रोजमुरा द्यावयाचा त्याचा दर वाढेल.

गुरु : होय खरें, परंतु या मंदगति व भयंकर युक्तीच्या मार्गें किती दुःख आहे तें पहा. ही युक्ति चालू केली असतां असें होत असतें कीं मजूर लोकांची कमताई करून अथवा कांहीं नवीन प्रकारच्या उद्योगानें पुंजी वाढवून मजूरांचा प्रपंच चांगला चालूं लागतो म्हणजे पुनः लग्नें पुष्कळ होऊं लागतात, मुलांची वाढी पुष्कळ होऊं लागती, आणि अन्नादिकांच्या मानापेक्षां लोकसंख्येचें मान पुनः अधिक होतें. त्यामुळें असें होतें कीं गरीबांचा जो प्रपंच थोडके दिवस चांगला चालला असतो त्यास पुनः पूर्ववत दैन्य प्राप्त होतें.

गोपाळ : आम्ही राहातों त्या ठिकाणाजवळ एक गांव आहे. तेथें आपण सांगतां तसेंच झालें. माझ्या असें ऐकण्यांत आहे कीं हा गांव पूर्वी एक ल्हानसा पाडा होता; तेथें राहाणारे लोक खोताची मजूरी करून आपलें पोट भरीत. बहुत वर्षांनीं त्या गांवाच्याजवळ एक कापसी काम करायाचा कारखाना चालू झाला. त्यामुळें गरीब लोकांस पुरतेपणी काम मिळूं लागलें, आणि पूर्वी आळशा-सारिखीं असत, असीं जीं मुलें तींही आपल्या पोटाकरितां कांहीं मिळवूं लागलीं. असे कांहीं वर्षें होत गेलें, तेणेंकरून त्यां मजूर लोकांचा प्रपंच चांगलेपणीं चालूं लागला. तें गांव फार त्वकर जमलें, त्यांत ल्हान ल्हान नवीन घरें बहुत झालीं, व बहुत कुटुंबें वसूं लागलीं, असें पाहून चमत्कार वाटतो, असें म्या आमच्या आजोबास बोलतानां ऐकिलें. परंतु कांहीं काळाने तो गांव मजूरांनीं फारच भरला, आतां त्या गावांत लोकसंख्या बरीच आहे, परंतु ज्या दैन्य विपत्तीच्या दशेपासून त्या गांवाचा उठावा झाला होता, त्याच दशेंत तें आतां बुडून गेलें आहे.

गुरु : तर मग तूंच पाहा ! जो कारखाना त्या गांवास पहिल्याने हितकारक झाला, तोच त्या मजुरांच्या अविचारामुळें अहितकारक झाला. जर ते लोक शाहाणे व दीर्घदृष्टी असते, तर मजुरीस जितक्यांचें अगत्य त्यापेक्षां ते अधिक झाले नसते, आणि त्या कारखान्यापासून जे लाभ प्रथम होत असत तसेच अझून झाले असते.

मजूरलोकांवर चिरकाळ उपकार व्हावा असें मनांत असलें तर उद्योगास प्रवृत्त करून स्वस्थ बसूं नये, तर त्या लोकांस जसें जवळचें हित तसेच दूरचे परिणाम कळूं लागत, अशा रीतीनें त्यांची बुद्धि जाग्रत व्हावयाकरितां शिकविण्याचा प्रयत्न करावा. त्याच्या मनांत असें वागूं लागावें कीं, प्रथम आपला प्रपंच चांगला सुखानें चालेल असें करून घेतलें पाहिजे, तसें झाल्यावांचून आपली संख्या अन्नादिकांच्या प्राप्तीच्या मानापेक्षां वाढविण्याविषयीं ल्हानपणींच लग्नें करूं नयेत.

गोपाळ : बरें, अन्नादिकांचें जे मान असेल त्याच्या आंत लोकसंख्या ठेविली, तर ती एकसारखीच सर्वकाळ राहणार नाहीं काय ?

गुरु : नाहीं. जेथें लोक उद्योगी आहेत तेथें पुंजी वाढेल, आणि पुंजी वाढली म्हणजे लोकसंख्येसही वाढायास अनुकूल होईल. इतकेंच कीं पुंजीची जी वाढण्याची गति त्या गतीस लोकसंख्येने अनुसरून असावें, त्याबाहेर पाऊल टाकूं नये.

गोपाळ : जेथें अन्नादिकांची मोठी समृद्धि व धंदा पुष्कळ असेल, अशा ठिकाणीं मात्र लोकसंख्येची वृद्धि करावी, इतर ठिकाणीं कदापि करूं नये असें मला आतां स्पष्ट दिसूं लागलें.

गुरु : तूं सांगतोस तशा ठिकाणी लोकसंख्येची वृद्धि करणें नलगे, तेथें ती आपेंआप वाढेल. कुटुंबा-करितां कांहीं एक तर्तूद केल्यावांचून लग्नें करावीं असें लोकांस बहुतकरून वाटतें, तें मात्र वाईट. परंतु उपजीविका सुगम रीतीनें मिळाली असतां लग्नें करण्यास कांहीं भय नाहीं. जेथें अन्नादिकांचा सुकाळ आहे, तेथें मुलांचें जसें पोषण होईल, तीं जसीं पांघरतील, त्यांची जसी जतन होईल, तसें त्यांचें आरोग्य व आयुष्य वाढेल. असें जेथें आहे, तेथें लोकसंख्येविषयीं कांहीं एक नियम करणें नलगे. कनिष्ठ स्थितीच्या लोकांस विद्या प्राप्त होऊन त्यांची उद्योग व विचार यांकडे प्रवृत्ति होई,

असा मात्र कायदेकानू करणारानीं बंदोबस्त करून ठेवावा. जसी लोकसंख्येची वृद्धि करण्यास लोकांची प्रवृत्ति स्वभावतः असती, तसीच जे शिकून चांगले होतात, त्यांची आपला प्रपंच सुधारण्याविषयीं प्रवृत्ति असती. त्यामुळें असें होतें कीं लोकसंख्येची नेमस्त वृद्धि होऊन चांगली नांदणूक होऊं लागती.

गोपाळ : उपजीविकेच्या मानापेक्षां लोकसंख्या अधिक होऊं नये, असें आपल्या बोलण्याचें तात्पर्य काय?

गुरु : होय. जो चांगला संस्थापित व सुशिक्षित देश असतो, तेथें लोकसंख्या संपत्तीच्या मानाप्रमाणें असती, कदापि पुढें पाऊल काढीत नाहीं.

उपजीविकेच्या मानापेक्षां लोकसंख्या अधिक होऊं पाहती, परंतु सुशिक्षित जे मनुष्य ते लोकसंख्येस नेमस्त ठेवितात. लोक जसे चांगले शाहणे अथवा मूर्ख असतात, त्याप्रमाणें ते लोकसंख्या नेमस्त राहूं देतात अथवा मनस्वी वाढवितात.

गोपाळ : या विषयाचा मला वास्तविक बोध होऊन माझें समाधान झालें, परंतु म्या जें ज्ञान संपादन केलें त्यापासून आनंद होत नाहीं. कारण लोकसंख्या फार झाली असतां लोकांस दुःखें प्राप्त होतात या गोष्टीनें माझ्या मनामध्यें मोठी खेदकारक वृत्ति उत्पन्न केली आहे.

गुरु : असें आहे; उपजीविकेच्या मानापेक्षां आपली संख्या अधिक व्हावी, असें मनुष्यांस स्वभावतः वाटतें, तो एक ईश्वराकडचाच नेम आहे. तेणेंकरून आपली उद्योगाकडे प्रवृत्ति होती व आपल्या ज्या अनेक प्रकारच्या शक्ति त्या जागृत होतात. उपजीवनाच्या मानापेक्षां लोकसंख्या अधिक होऊं लागली, म्हणून आपण भूमि आपल्या स्वाधीन करून घेतली. (तेणेंकरून अनेक प्रकारच्या पदव्या व प्रपंचस्थिति यांची प्रवृत्ति झाली, क्रमेंकरून लोकांची सुधारणूक होऊं लागली. रानटी लोकांच्या जिकडेतिकडे फिरणाऱ्या ज्या लहान लहान जाति, त्यांचे मोठे मोठे सुशिक्षित देश झाले.) जेथें राज्याची व्यवस्था नाहीं, तेथें कदाचित् लोकसंख्या वाढल्यामुळें लोकांस दुःखें होत असतील, परंतु चांगल्या संस्थापित लोकांत तसें होत नाहीं. तेथें लाखो उद्योगी व सुखी अशां प्राण्यांचें पोषण होत आहे. लोक जसे जसे चांगले शाहणे होत जातील, त्यांत जसी जसी विद्यादिगुणाची प्रवृत्ति होत जाईल, तसी तसी लोकसंख्या वाढण्यापासून होणारीं दुःखें कमती होत जातील.

गोपाळ : लोक शिकून चांगले शाहणे झाले म्हणून काय झालें? त्यांची संख्या जसी जसी वाढत जाईल तसें तसें उपजीविका मिळावयास कठीण पडत जाईल.

गुरु : पुढें असें होईल कीं, या पृथ्वीची लागवड व वसाहत पुरतेपणीं होईल. लोकसंख्येची वृद्धि अथवा उपजीविकेची वृद्धि तरी पुरतेपणीं होईल. पण तो समय प्राप्त होण्याच्यापूर्वी किती पिढ्या गुजरून जातील यांचें अनुमानही करणें अशक्य आहे. म्हणून अशी एक कल्पना करावी कीं उत्तम आचरण व ज्ञान यांची प्रवृत्ति होऊन लोकांस केवळ उत्तम अवस्था प्राप्त होईल तेव्हां तो समय प्राप्त होईल. मग लोकसंख्या कितीही वाढली तरी ती उपजीविकेच्या मानापेक्षां अधिक होणार नाहीं.

लोकांची सांप्रतकाळीं अशी अवस्था आहे, कीं उपजीविकेच्या मानापेक्षां लोकसंख्या अधिक होत जावी, परंतु तसें होण्यापासून जी अनुपपत्ति प्राप्त होती, ती मोठ्या मोठ्या देशीं व लोकसंकीर्ण प्रांतीं फार करून नसती, तर रानटी लोकांत असती. त्यांस जसें दुःख होतें, तसें दुसरे कोठे होत नाहीं. शिकार करणें, मासे मारणें, अथवा भूमींतून स्वभावतः उत्पन्न होईल तें घेणें, अशा प्रकारें रानटी लोक आपली उपजीविका करितात; त्यांत कमी झालें म्हणजे ते निरुपाय होतात. या देशीं तरी जे लोक एक्याच धान्यावर उपजीविका करणारे, त्यांतून दुष्काळांत हजारोजण मरून गेले म्हणून सांगतात. जसे जसे लोक सुधारत जातात, तसीं तसीं त्यांस तीं दुःखें थोडकीं

प्राप्त होतात. जेथें नवीन वसाहत झालेली, जेथें अप्रतिबंधक राज्य, असे जे अमेरिका खंडांतील प्रांतांसारिखे मुलुख, तेथें मात्र उपजीविकेची अनुपपत्ति अगदी नाहीं असें म्हटलें असतां चालेल.

माल्थस यांच्या देशव्यवहारव्यवस्थेच्या ग्रंथांतील कांहीं अंश वाचून आपण हा विषय संपवूं.

"मोठा रोजमुरा किंवा अन्नवस्त्रादिक पुष्कळ मिळवायाचें जें सामर्थ्य यापासून फार वेगळाले दोन परिणाम होतात, एक असें कीं, लोकसंख्येची त्वरित वृद्धि होती. तसें झालें असतां मोठ्या व वाढणाऱ्या कुटुंबाचा सांभाळ करायास त्या मोठ्या रोजमुऱ्याचा बहुधा व्यय होतो. दुसरें असें कीं, उपजीवन करायाच्या रीति निश्चयेंकरून सुधारतात, आणि चांगली समृद्धि जरी झाली नाही, तरी सोई व सुखें यांचा उपभोग घडतो."

"हे वेगळाले परिणाम पाहिले असतां वेगळाल्या देशींच्या व वेगळाल्या समयींच्या ज्या लोकांच्या स्थिति-रीति, हींच ह्यां परिणामाचीं कारणें असें स्पष्ट दिसतें. यां वेगळाल्या स्थिति-रीतींच्या कारणाविषयीं शोध करूं लागलें असतां असें बहुतकरून आढळतें कीं कितीएक गोष्टी अशा आहेत कीं तेणेकरून कनिष्ठ स्थितींचे लोक उदासीनासारिखे होतात, आणि झालेल्या गोष्टीवरून पुढें होणाऱ्या गोष्टीविषयीं तर्क चालवावयास असमर्थ असतात, अथवा असें मनांत आणितात कीं तसा तर्क चालवून काय फळ; प्रस्तुत जें कांहीं मिळत आहे, तें अल्पस्वल्प असलें तरी तितक्यानेंच चालवावें, मोठीं सुखें व मानमान्यता आपल्यास कोठून मिळणार, असा उदासपणा ज्या गोष्टींनी येतो, ती पहिल्या परिणामाचीं कारणें होत. कितीएक कारणें अशीं आहेत कीं तेणेंकरून कनिष्ठ स्थितीच्या लोकांस थोरपणा प्राप्त होऊं लागतो, ते पुढें मागे पाहून पाऊल टाकणाऱ्या प्राण्यासारखे सावध होतात, आपल्यास व आपल्या मुलांस मान्यता, सद्‌गुण, सुख प्राप्त व्हावें असें मनांत आणून तें जेणेंकरून मिळेल त्यां उपायांविषयीं झटतात, तें आपल्यास नसावें अशी कल्पनाही त्यांस सहन होत नाहीं. असें ज्या गोष्टीने होतें, तीं दुसऱ्या परिणामाचीं कारणें होत."

"कनिष्ठ स्थितीच्या लोकांच्याठायीं उदासपणा येतो, त्यास यथेच्छ राज्य, प्रजापीडन, अज्ञान अशीं कारणें आहेत. कनिष्ठ स्थितीच्या लोकांच्या ठायीं थोरपणा आणण्याविषयीं जनव्यवहार व राजकीय व्यवहार चांगला मोकळिकीने होऊं देणें, विद्यादिकांची प्रवृत्ति करणें अशीं कारणें आहेत."

जेथें मोठ्या पुंजीचा संग्रह बहुत दिवस होत आला आहे, जेथील संपत्तीची मंदगति आहे, अशा इंग्लंडासारिख्या देशांतील मजुरांस रोजमुरा मिळतो. अमेरिकेसारखे त्वरेने मातबर होणारे जे मुलुख, त्यांतीलही मजुरांस रोजमुरा मिळतो, पण त्यांच्यापेक्षां यांचा मोठा कां ? व त्यांचे प्रपंचाची स्थित चांगली कां ? हें आतां तुला समजूं लागलें ना ?

गोपाळ : होय, पुंजीची वृद्धि त्वरेने होऊं लागली म्हणजे मजूरीची फार गरज लागती, आणि रोजमुरा चांगला मिळतो. परंतु संपत्ति कितीही मोठी असून मंदगतीनें वाढूं लागली तर लोकसंख्या त्याच मंदगतीनें वाढूं लागेल अथवा उपजीविकेच्या मानापेक्षां अधिक होऊं लागेल, तेणेंकरून रोजमुरा कमती होऊन विपत्ति प्राप्त होईल.

गुरु : हेंच पूर्वीं म्या दर्शविलें, त्यावेळीं असें सांगितलें कीं, कोणा एका मनुष्याकडे कांहीं पुंजी वृद्धिंगत न होतां असली तर ती तशीच ठेवण्यापेक्षां संपत्तीची वृद्धि करणे त्या मनुष्यास व देशास फार हितकारक होईल.

या प्रकरणी पेली साहेबानें चांगलें स्पष्ट निरूपण केलें आहे, त्यांतील कांहीं अंश वाचून तुला ऐकवितों.

"मेहनतीबद्दल जी किंमत द्यावयाची, तिचें जसें मान असेल अथवा अन्नादिकांचें किंमतीचें जसें मान असेल, त्याप्रमाणें उपजीविका मिळणें सोपें होईल, आणि उद्योगास साह्यता होईल असें

कोणी म्हणतात, पण तें तसें होणार नाहीं, मेहनतीची किंमत अन्नादिकांचे किंमतीच्या बेताने राहण्याची व्यवस्था असली तरच तें तसें होईल. असी व्यवस्था चांगली राहणें हें कोणे एके देशांत संपत्तीची भरती होणें त्या अधीन आहे. म्हणजे जसी जसी संपत्ति वाढत जाईल तसी तसी अन्नादिकांची किंमत वाढण्यापूर्वीच मेहनतीची किंमत वाढत जाईल. असें आहे म्हणून उद्योगास व लोकांस हितावह होणें तें देशांत संपत्तीचा जो संग्रह झाला असतो त्यापासून होत नाहीं, तर ती संपत्ति वाढत गेल्यापासून म्हणजे संपत्तीची नवीन नवीन प्राप्ति झाल्यापासून होतें. ज्या ज्या देशीं संपत्तीची भरती अथवा उत्पत्ति निरंतर होत असती, त्या त्या देशीं निरंतर हित होत असतें. इंग्लांड देशाची पुंजी जशीचीतशीच राहिली आहे, असें त्वां मानूं नये. नवीन वसाहत झालेल्या मुलखाची जी चाल त्याच चालीने जरी इंग्लांड देशाचे संपत्तीची चाल होत नाहीं, तरी तेथें संपत्तीच्या वृद्धीची गति त्वरेनेच होत आहे असें समजावें."

# उत्तरभागसंवाद १०

## मजुरांच्या स्थितीविषयीं

यांत गोपचरांची व ओसाड जमीनीची लागवड करणें–परमुलखीं वसाहत करायास जाणे–कनिष्ठ स्थितीच्या लोकांस विद्या शिकविणें–उपयोगी मंडळ्या जमणें–ऐवज सांचवून ठेवावयाच्या पेढ्या मांडणें–गांवखात्यांतील ऐवजानें गरिबांचें साह्य करणें–भीक घालणें व गृहस्थांकडून धर्मादाय करणें–बक्षीसें देणें इत्यादिकांचें निरूपण केलें आहे–

गोपाळ : मजूर लोकांस आपली प्रपंचस्थिति सुधारण्याविषयीं कांहींच उपाय राहिला नाहीं किंवा कसें असा विचार मी आपली भेट घेऊन गेल्यानंतर करूं लागलों. त्यावरून असें मनांत आलें कीं अन्य देशीं जितकी लागवड जमीन आहे, तितकी जरी आपल्याकडे नसली तरी आपल्याकडे पुष्कळ ओसाड जमीन आहे, तिची लागवड झाली असतां अन्नादिक उत्पन्न होऊन मांडवल अधिक होईल.

गुरु : पुंजीचें मान असेल त्याप्रमाणेंच उद्योग होतो, म्हणून मजुरांस पोटगी द्यायाचें जें सामर्थ्य त्यापेक्षां अधिक मजुरांस कामावर लावितां येत नाहीं. कळलें? ते आपल्या रोजच्या अन्नाकरितां खपतात, तेंच त्यांस मिळालें नाहीं तर त्यांच्यानें खपवणार नाहीं, किंबहुना ते खपणारच नाहींत. कोणेएके देशांतील पुंजीकडून जितक्यां मजुरांचा सांभाळ व्हावयाचा तितके अवघे मजूर कामावर लागलेच असतात. तेव्हां जी जमीन लागवडीस लागली आहे तेथें त्यांनीं खपावें किंवा नवीन जमीन खणून राबूं लागावें, या गोष्टीचा मात्र विचार केला पाहिजे. ही गोष्ट जमीनदारांकडे सोंपावी आणि ते जें ठरवितील तें ऐकून घ्यावें, कां तर जितकें उत्पन्न करवेल तितकें करून घ्यावें, हें जसें मजूर लोकांस हितकारक तसेंच जमीनदारांसही आहे. बहुधा जुन्याच जमीनीची राबणूक सुधाराया-करितां पुंजीची वहिवाट करणें यापासून जसा फायदा होतो, तसा नवीन जमीनीची लागवड करायास पुंजी लाविली असतां होत नाही, कां तर बहुत दिवस लागवडीखालीं आलेली असी जी सर्वोत्कृष्ट चांगली जमीन त्याखेरीज जी राहिलेली ओसाड जमीन ती फार रूक्ष व नाकीर्द असती, आणि तिजवर जेव्हां पुष्कळ खर्च करावा तेव्हां ती देऊं लागती. असेंही असतां या दोन्हीं जमीनीची लागवड करायापुरती पुंजी लोकांकडे असती; आणि अलीकडे असें दृष्टीस पडतें कीं प्रांतांतील शेतकीची फार सुधारणूक झाली आहे, इतकेंच नाहीं तर बहुत्येक गोपचारांस वया घालून त्यांची लागवड होत चालली आहे.

गोपाळ : माझें बोलणें आपल्यास विसंगत असें वाटलें तर वाटो, परंतु गोपचारांस आवार घातल्याने वाईट झालें, असें मला बोलल्यावांचून राहवत नाहीं. खेड्यापाड्यांतील राहणारांची रोडलेलीं अशीं जीं थोडकीं राहिलेलीं गुरें, त्यांचा सांभाळ व्हावयास काय तो गोपचारांचाच आश्रय होता, तो

आतां नाहींसा झाला. याविषयीं गोल्डस्मिथ साहेब म्हणून जो एक सुरस कवि होऊन गेला, त्याचीं दोन वाक्यें प्राकृतांत रचिलीं आहेत तीं अशीं.

श्लोक

कोठे वास करूं अहा म्हणतसे दारिद्र तेव्हां मनीं ॥
श्रीगर्वें जन व्यापिलें मजहि तो दाबी तयापासुनी ॥
थोडीसी तृण काडि जी दिसतसे वेंचून घ्याया जरी ॥
खिल्लारां आपुल्याच हांकु तिकडे तेंही घडेना तरी ॥ १ ॥
आवाराविण कांहि गोचरण ज्या सीमा तयांच्याकडे ॥
हांकूनी फिरतांच जाउं म्हणुनी तें तों कदा ना घडे ॥
शेतें जीं वहवांचुनी निरखुनी श्रीपुत्र तीं वांटुनी ॥
घेती ते तृण हिन गोचरण ज्या दुष्प्राप त्याही जनीं ॥ २ ॥

गुरु : कवींचें बोलणें देशव्यवहारव्यवस्थेच्या शास्त्रांत चांगलें प्रमाण असें मानीत नाहींत. कळलें? गोपचारांस आवार घातल्यानें थोड्यांशा रोडक्या गुरांचा चारा बंद होईल, परंतु त्या गोपचारांनें बहुत चांगल्या गुरांचें पोषण अथवा चांगली शेतकी होऊं लागेल, त्यामुळें अन्नादिकांचें मान वाढेल, आणि गोरगरिबांस केवळ साक्षात् संबंधानें जरी प्राप्ति झाली नाहीं तरी शेवटीं चांगलीच पोटगी मिळेल. गोपचारांस कुंपण घालायास व त्याची लागवड करायास मजूर पाहिजेत, म्हणून गोपचारांजवळच्या खेड्यांतील लोकांस एक नवीन काम निघतें, याप्रमाणें त्यांच्या मेहनतीचें अधिक अगत्य लागतें, तेणेंकरून त्यांचें तत्क्षणींच हित होतें. गोपचारावरील त्यांचा हक्क बुडाल्याबद्दल त्यांस ऐवज मिळतो, आणि जीं गुरें त्यांच्यांनीं पाळवत नाहींत तीं जमीनीस नवीन आवार घालणारे विकत घेतात.

गोपाळ : लोकसंख्या वाढली असतां जे लोक अधिक होतील, त्यांकडून ओसाड जमिनीची लागवड करवावी हें निट, पण तसें करविल्यानेही त्यांचें पोट भरत नसल्यास कसें करावें? जेथें पोटगी मिळविणें सोपें व जेथें मेहनतीचें अधिक अगत्य अशा देशांत आपल्याकडच्या निरुद्योगी माणसांस कां पाठवूं नये? अथवा वसाहतीवांचून जे अमेरिकेंतले देश, तेथे त्यां लोकांनी जाऊन नवीन वसाहत कां करूं नये?

गुरु : लोकांची फारच गचडी झाली असतां त्यांस परदेशीं वसाहत करायास पाठविल्यावांचून दुसरा उपाय नाहीं खरा, परंतु बहुधा असें आहे कीं परमुलखांत जाणें लोकांच्या फार जिवावर येतें, आणि कित्येकांस उगीच भय वाटतें, कीं आपल्याकडून परमुलखांत वसाहत झाली असतां आपल्या देशाचें बळ कमी होईल, म्हणून परमुलखीं वसाहत करण्यास चांगलीशी अनुकूलता होत नाहीं.

गोपाळ : परमुलखांत फारच लोकांचें जाणें होऊं देऊं नये. माझें म्हणणें असें कीं आपल्या मुलखांत ज्यांना सांभाळ होणें अशक्य, त्यांविषयीं मात्र परमुलखांत तर्तुद व्हावी.

गुरु : जेथे मोकळीक व नीति आहे, अशा राज्यांतून परमुलखांत फार लोकांचें जाणें बहुधा होणार नाहीं. आपल्यास आपल्या जन्मभूमीची फार प्रीति असती. आपलीं एकमेकाशीं बहुत नातीं व संबंध असतात, ते प्रथम तोडले पाहिजेत, मग देश सोडण्याची गोष्ट. याकरितां स्वल्प हेतूनेंच स्वदेशाचा त्याग करण्याविषयीं कोणीं प्रवृत्त होणार नाहीं. मनोवृत्तिविषयीं ज्यास अतिनिपुण ज्ञान अशा एक्या ग्रंथकर्त्याचें वाक्य आहे कीं परमुलखांत वसाहतीस जाऊं नये. या विषयीं सर्वोत्कृष्ट नियम म्हणाल तर तो प्रकृतीनेच मनुष्यहृदयावर लिहून ठेविला आहे. या प्रकरणीं एक नवीन प्राकृत रचना अशी आहे.

## श्लोक

स्वजन्माची भूमी विचरत असों तीजमधुनी ॥
तियेतें सोडाया किति तरिच तो शोक स्वमनीं
वियोगाच्या दिवसीं सकळहि विषादें रचियलें
अरे देवा देवा कितिक सुचवूं दुःख अपुलें ॥ १ ॥

आणखी असें आहे, परमुल्खांत राहावयास जाणारे जे लोक त्यांचा प्रपंच चांगला मांडेतोंपर्यंत त्यांला अडचणीसींच प्रसंग पडतो, आणि आपल्या उपजीवनार्थ अन्न उत्पन्न करितां येई तोंपर्यंत त्यांस कष्ट काढावे लागतात, यामुळें पुढें पाऊल टाकायास धैर्य होत नाहीं. अनुपपत्तिसारखें सबळ कारण असलें तर नाकीर्द जमीनींत वसाहत करायास लोक कदाचित् प्रवृत्त होतील.

या कामास व दुसऱ्या सर्व खटल्यास कांहीं पुंजीही पाहिजे; अन्नादिक अवश्य पदार्थ परमुलखीं वसणारांस स्वतां उत्पन्न करितां येत तोंपर्यंत शेतकीचीं व कसबाचीं आऊतें, यांची बेगमी करून दिली पाहिजे, आणि अन्नवस्त्रादि पुरविलीं पाहिजेत. परमुलखांत वसाहतीस जाण्यास प्रतिबंध न करितां आश्वासन देण्याजोगा सरकारने अलीकडेस चांगला शाहणपणाने ठराव केला आहे, तथापि स्वदेशाचा त्याग करावा असें थोडक्यांच्याच मनांत येतें.

परमुलखांत उठून जाणें हें देशाचे संपत्तीस व समृद्धीस कित्येक प्रसंगीं अत्यंत अनहितकारी आहे, तथापि दरिद्रामुळें तसेंही करावें लागतें. मनांस येईल तसें सरकारानें वागावें असें जेथें असतें, तेथील कितीएक प्रकारच्या लोकांवर मोठा जुलूम गुजरतो, त्यामुळें परमुलखीं जाणें घडतें. असें युरोप खंडांत बहुत प्रसंगीं घडलें आहे. ज्याचा त्याने धर्म आचरण्याविषयीं मोकळीक असूं नये इत्यादि कारणामुळें तें तसें घडतें. त्याच कारणामुळें फ्रान्स देशांतून कित्येक लोकांचीं परमुलखीं जाणीं झालीं, ते लोक कुशल व उद्योगी असत. त्यांच्या कारागिऱ्या व कसबें जर्मनी, प्रुशीया हालंड, इंग्लांड अशा अशा देशीं चालत असत. आणि ते लोक.गेल्यामुळें असें झालें कीं फ्रान्स देश आपल्या अत्यंत गुणी प्रजेतून कांहीं प्रजेस मुकला. मुर लोकांस स्पेन देशांतून घालविल्यामुळें त्या देशांतील उद्योगास जो धक्का बसला, तो कधीच बरा झाला नाहीं. ही जी असी हानी त्या देशास झाली ती अमेरिकेच्या अवघ्या संपत्तीनेही दूर झाली नाहीं असो.

इंग्लांड देशींचे प्रजेचे संख्येविषयीं असें आहे कीं जसी जसी ती प्रजा अधिक होत जाती तसतसा प्रजाधिक्यामुळें अपाय होत जातो, तो नाहींसा केल्यावांचून निर्वाह नाही. म्हणून त्या अपायांचा नाशक जो उपाय तो प्रवृत्त करण्याची फार इच्छा असती. असे अपाय नाहींसे करण्याविषयीं अत्यंत आवश्यक उपाय हाच कीं ज्ञानाचा प्रसार सामान्यरीतीने सर्व लोकांत करावा, तेणेंकरून कनिष्ट स्थितीचे लोक आपल्या पुढील स्वार्थाविषयीं चांगलें सावध होतील.

**गोपाळ :** द्रव्यरूप पुंजी कसी प्राप्त करावी हें त्यांस समजायाकरितां बुद्धिरूप पुंजी मिळवावयास आपण शिकविणार काय ?

**गुरु :** होय. नीतीनें वागावें, देवाची भक्ति करावी, तसाच उद्योग करीत असावा, खर्च करणें तो बेतानें करीत असावा, दूरवर नजर ठेवून चालावें, असी स्थिति मुलांस जेणेंकरून लागे अशा रीतीने शिकविण्याचा यत्न करावा. जसा जसा मनास बोध होत जातो, तसा तसा अमुक केलें असतां अमुक होईल असा विचार सुचत जातो, असें जे बालबुद्धि व रानटी त्यांस सुचत नाहीं. ते जसे काय क्षणिक सुखाकरितांच जन्मले आहेत. जे चांगल्या रितीने शिकले म्हणून ज्यांस चांगला विचार सुचतो, ते तर मागें झालें तें लक्ष्यांत आणून पुढें होणार त्याकडे दृष्टी ठेवितात. असा विचार

सुचणें तो मुलांस काय तें वाचावयास व लिहावयास शिकविलें म्हणजे सुचेल असें नाहीं. तर त्यास चांगल्या उत्तम रितीनें शिकविलें पाहिजे. जेणेंकरून बुद्धि विशाल होती, चांगली शांत कोमल वृत्ति आंगीं येती, अंतःकरणांत दया वागूं लागती, लोकांवर प्रीति करावी असा स्वभाव होतो, असें ज्ञान ज्या शिक्षेनें प्राप्त होईल, त्या शिक्षेची प्रवृत्ति झाली पाहिजे. कुणबी, माळी इत्यादिकांस शिक्षाच नसती, मग त्यांस विचार कोठून असेल? ग्या लग्न केलें असतां माझ्या बायकोस मुलांस न जाणों काय विपत्ति प्राप्त होतील, हें अगोदर ध्यानांत न आणितां अथवा याविषयीं कांहीं चिंता न धरितां ते लग्नें करतात, तसें प्रपंचांतील सुखांची व शिष्टपणें वागण्याची योग्यता ज्यांला विद्येच्या योगाने कळली आहे ते करणार नाहीं. ते स्वतां आपल्यास व आपलीं जिवलगों त्यांस दरिद्रांत व त्यापासून होणाऱ्या अनेक विपत्तींत घालणार नाहींत.

गोपाळ : आपण इच्छितां त्याप्रमाणें विद्येच्या योगानें होईल हें ऐकून मला आनंद झाला. यावरून असें वाटतें कीं, अलीकडे गरीब लोकांत विद्येची प्रवृत्ति व्हायाकरितां जो आवेशपूर्वक उद्योग चालला आहे तो सफल होईल.

गुरु : गरीब लोकांत विद्येची प्रवृत्ति व्हायाकरितां जो आवेशपूर्वक उद्योग चहूंकडून होत आहे तो सफल होईल. प्रायः तेणेंकरून लोकांच्या ठायीं सर्वोत्कृष्ट भक्ति, नीती आणि व्यवहारव्यवस्था उत्पन्न होईल. लोकांच्या रीतिभाति फार चांगल्या करणें, तर त्याविषयीं दुसरा उपाय नाहीं; तें मुलांस विद्याभ्यास झाल्याने मात्र घडेल. ज्यांच्या अंगीं एकादा स्वभाव जडून राहिला अशां मनुष्याच्या रीतिभाति पालटणें अवघड किंबहुना असाध्य. ज्यांस अज्ञान कारण अशीं अविचाराचीं मतें एकवेळ थोर होऊन राहिलीं, तीं मग नवीन बोध झाला असतांही नष्ट होत नाहींत. बाळपणांत तर बरेंवाईट कळत नाहीं म्हणून त्या अवस्थेंत जो गुण लाविला तो प्रायः लागला जातो.

असो. गरीब लोकांचें बरें व्हावें म्हणून इंग्लंड देशीं मोठा उद्योग चालला असतो. त्यांच्या मुलांच्या विद्याभ्यासाकरितां अनेक प्रकारच्या शाळा घालितात. त्या शिवाय कित्येक मंडळी जमून गरीब लोकांकरिता असें करून ठेवितात कीं त्यापासून शाहणपणानें व मितव्यय करून कसें वागावें, असें विशेषेंकरून समजूं लागतें. अशा स्थापना कोठे कोठे स्वतां गरीब लोकांनीच केल्या असतात त्यांत असणारे असामी वर्गणीनें थोडें थोडें देऊन ऐवज जमवितात. दुखणें, विपत्ति अशा प्रसंगीं जीवांस सुख व्हावें, त्यांचें साह्य व्हावें या विषयीं त्यां मंडळ्यांच्या ऐवजाची योजना झाली असती. या मंडळ्यांचे आश्रयानें राहाणारे जे मजूरलोक त्यांची स्थिति पहावी, आणि गांवखात्यांतील ऐवज किंवा गृहस्थांकडील धर्मादाय तोच काय तो ज्यांस आश्रय त्यांची स्थिति पहावी. मंडळीच्या आश्रयानें रहाणारे ते स्वच्छ, उद्योगी असतात, अमली पदार्थ सेवीत नाहींत, बेतानें खर्च करितात, आपली योग्यता राखून असतात, आणि लोकही त्यांची योग्यता राखितात. कांहीं आगांतुक दुखणें अथवा जडजोखीम झालें तर त्यासमयीं ते स्वकष्टार्जित द्रव्याच्याच आश्रयानें राहतात. लोकांपाशीं मागण्यानें आपले योग्यतेस ल्हानपणा आणीत नाहींत. अशी स्थिति गांवखात्याच्या धर्मादायावर राहणाऱ्यांची नाहीं, त्यांस विपत्तिकाल प्राप्त झाला म्हणजे ते मळीन होऊन त्यांचे हाल होऊं लागतात. आणि गांवखात्याकडल्या थोडक्या सोईनें ते तृप्त न होतां त्यांचे हातून अपराध होऊं लागतात. हितकर्त्या मंडळ्यांची प्रथम स्थापना होऊन शंभर वर्षें अधिक झालीं, यांस सरकारचा व इतर गृहस्थांचा आश्रय मिळत गेला; आतां यांची प्रवृत्ति देशभर झाली आहे. तुझा ठुमाजी माळी चांगला शाहाणा आहे, तो जाणूं जसा काय त्यां मंडळ्यांतील एकादे मंडळीचाच आहे.

गोपाळ : कोणे एके ठिकाणीं मंडळीचा ऐवज वाढून तेथील दुःखित लोकांस व्हायाचें जें सुख तेंही अधिक वाढावें, तेणेंकरून त्या मंडळीच्या आश्रयाने राहायास गरीब लोकांस उमेद

व्हावी म्हणून त्या मंडळीचे जवळजवळ राहाणारे बहुत्येक गृहस्थ धर्मादायाप्रमाणें वर्गणीने ऐवज देतात काय?

गुरु : होय. असा धर्मादाय करणें ती सर्वोत्कृष्ट चांगली रीत. येणेंकरून दरिद्राने पिडल्यांचें साह्य होतें. आणि जे कष्टाळू गरीब अशाचेंही साह्य होतें. अशीच एक युक्ति लंडन शहराजवळील एक्या गावांत थोडक्यां वर्षांवर चालू केली, ती फारच चांगल्या रीतीने पार पडली. गोरगरिबांचें दरिद्र दूर व्हावें म्हणून पूर्वी त्या गावींच्या धार्मिक लोकांनीं अनेक युक्ति योजिल्या, आणि जे द्रव्यवान त्यानी असें करून ठेविलें कीं गरीबांस उद्योग करायाचें थोडेंच प्रयोजन राहिलें, त्या धर्मदायाचा उदारपणा पाहून जवळजवळच्या प्रांतींचीं गरिबें त्या गावीं येऊन जमलीं, तेव्हां असें होऊं लागलें कीं, द्रव्यवानानीं व्हावा तितका धर्मादाय करीत असावा; तथापि दरिद्री, दुःखित अशानी त्यांपासून दूर होऊंच नये. शेवटीं जसें जसें दरिद्र दूर करीत जावें तसें तसें अधिक वाढत जातें, असी त्यांची खातरी झाली, तेव्हां धर्मादाय करण्याची जी त्यांची युक्ति ती अगदी पालटून टाकावी असा त्यांनी निश्चय केला. मग त्यांनी हितकारी मंडळ्या स्थापिल्या आणि ते जो ऐवज पूर्वी भिकेस देत होते, तो ऐवज त्या मंडळ्याच्या आश्रितांस विपत्तिकाळीं पुरतेपणीं सुलास पडावा म्हणून आतां त्यां मंडळ्यांस देऊं लागले. तेणेंकरून असें झालें कीं, जे आळशी होते त्यानी तें स्थळ सोडून दिलें, आणि जे मेहनती होते ते तेथे राहून त्यांचा चांगला प्रतिपाळ होऊन ते गांव अगदीं नवेंसें दिसूं लागलें, दरिद्र, अनुपपत्ति हीं विरळा दृष्टीस पडावीं असें तेथें झालें.

सर्व ज्या स्थापना झाल्या त्यांहून जी सर्वोत्कृष्ट व हितकारीही मंडळ्याची गरज जीणे बरीच कमी केली, व गोरगरीबांची स्थिती सुधारण्याविषयीं जी वस्तुतः फार उपयोगीं पडलीं असी जी स्थापना, ती ऐवज सांचवून ठेवायाची पेढी होय. ही प्रथम प्रवृत्त करण्याची कीर्ति स्काटलांड देशाने मिळवीली. तेव्हां इजपासून जे लाभ होतात ते सर्वत्र मान्य होऊन थोडक्या वर्षांत इची प्रवृत्ति सर्व सुधारलेल्या देशीं झाली आहे. कोणी ग्रंथकर्ता असें लिहितो कीं गोरगरीब लोक जो थोडासा ऐवज सांचवितात तो ठेवावयास जागा असावी आणि त्याचें त्यांस योग्य रीतीचे दराने महिन्याचे महिन्यास व्याज मिळावें. आणि तो अवघा किंवा त्यापैकीं कांहीं ऐवज व्हावा तेव्हां काढण्याविषयीं त्यांस पुरतेपणी मोकळीक असावी, अशा बेताने ही पेढी केली आहे. असी सोइ साधारण पेढ्यांचें हातून होणें परम कठीण. अशी एक पेढी मुंबई शहरांत सरकाराने काढिली आहे.

प्रांतींच्या स्थलपरत्वानें व इतर कारणानें या सांठवणीच्या पेढ्या वेगळाल्या प्रकारें इंग्लंड देशांत प्रांतोप्रांतीं स्थापित केल्या आहेत. येणेंकरून कष्टाळू गरीब लोकांच्या ऐवजाचा सांभाळ होऊन उद्योगास सर्वोत्कृष्ट उत्तेजन येतें. कोणी उद्योगी मनुष्याने कष्ट करून थोडासा ऐवज जमविला असतो, त्यास सोध्यांची गांठ पडून तो फसून जुगार खेळूं लागतो, अथवा उलींढालीं करणारांच्या नादीं लागून एखाद्या अविचारी जोखमी खटल्यांत पडतो, नाहीं तर विपत्तींत पडलेल्या अथवा दगा करणाऱ्या दोस्तांस कर्ज देण्याच्या भरीं पडतो. गैरविल्हेस पडावा, अथवा चोरीखाली जावा अशीं विघ्नें पैक्यास वारंवार होतात, तीं तर सांगणें नलगे. आतां इंग्लांड देशीं सर्व प्रांतीं सांठवणीच्या पेढ्या झाल्या आहेत. तेथे गरीब लोकांस आपआपल्या प्राप्तीतून जें कांहीं थोडेंसें राखून ठेविलेलें ते सुखाने विनमेहनतीने सांठवून ठेवावयास सोय पडते. तेथें त्या ऐवजास पूर्वोक्त नाना विघ्नें न होतां तो सांचला जातो, आणि त्याचें त्यांस व्याज मिळतें. गोरगरीबानीं विचारें करून संसार चालविला असतां त्यांस धर्मादायाच्या आश्रयाचें अगत्य लागणार नाहीं, धर्मादायावर वांचण्यानें आंगीं नीचपणा येतो. इंग्लांड देशीं गरीब लोकांविषयीं जे नवे कायदे केले त्या पूर्वी धर्मादाय करणें मध्यम स्थितीच्या लोकांस इतकें जड झालें कीं तेणेंकरून बहुत्येक बसून गेले, आणि कनिष्ट

स्थितीच्या लोकांविषयीं असें सांगतात कीं धर्मादायानें कांहीं फार साह्यता झाली नाहीं, त्या लोकांत बरीक गरीबी अधिक वाढविली.

गोपाळ : खरें काय ? हें तर असें उलटें कसें झालें, हें मला न कळे.

गुरु : त्याचें कारण असें आहे, गोरगरीबांस असें वाटतें कीं गांवखात्याकडील धर्मादायातून अन्न-वस्त्रादिक आम्हास अवश्य मिळतील; आम्ही गरीबीची पर्वा कशास करावी ? परंतु गरिबी आली असतां आमचे सर्व प्रकारें हाल होतील असें खचित समजलें तर ती तशी बेपर्वा वाटणार नाहीं. आपल्या कुटुंबाचें संरक्षण स्वकष्टानें करण्याची ज्याला सोई नाहीं, व जडजोखीम अथवा दुःखणें प्राप्त झालें असतां, आपला निर्वाह करायास जवळ कांहीं तर्तुद नाहीं अशा कोणी एके नवे तरुण्याने लग्न केलें म्हणजे गांवखात्याच्या धर्मदायांत आमचे रक्षणाविषयीं कधीं अंतर पडणार नाहीं असें समजून तो त्या धर्मादायाच्या आश्रयानें राहतो. मग कांहीं जडजोखीम, अथवा आळस अथवा गैरचाल यामुळें अन्नवस्त्रादिक मिळेना असें झालें म्हणजे जशी अडचण असेल त्याप्रमाणें गांवखात्यांतून त्याचा सांभाळ होतो. वारंवार असें घडतें कीं कांहीं एक वास्तविक कारण नसतां आम्हास अमुक पाहिजे असें कोणी खोटें सांगून पैसा काढितात. तो नेऊन दारूच्या दुकानांत उधळितात. व्यसनी माणुस असें समजतो कीं माझा पगार कुटुंबाच्या पोटास लावायाचा तो न लवितां दारूच्या दुकानांत खर्चिला म्हणून काय झालें ? बायको, मुलें यांचे हाल होऊं लागले तर ती गरीब लोकांकरितां घर बांधलें आहे तेथें जातील. या प्रकारे जो अवगुण नाहींसा करायास गांवखात्यातील धर्मादाय प्रवृत्त झाला, तोच अवगुण वाढवूं लागला. या प्रकारें गांवखात्यांतील धर्मादायानें जें दरिद्र नाहींसें व्हावें तेंच वाढवावयास तो धर्मादाय कारण झाला.

गोपाळ : खरें. आळस, गैरचाल अशांमुळे येणारें जें दुर्दैन्य तेंच येण्याचें कारण तो धर्मादाय दिसतो.

गुरु : हा धर्मादाय गरिबांविषयीं योजिला, यापासून फारच मोठी हानि झाली. मजूरांचा बचाव ज्या ऐवजांतून व्हायाचा त्यातून धर्मादाय होऊं लागला, त्यामुळें मजूर कामावर ठेविणें कमी होऊन त्यां मजुरांचे पगारही कमी झालें, तेव्हां असें झालें कीं ज्यांला पोट भरावयास काम असलें पाहिजे अशां लोकांचा सांभाळ धर्मादायानें होऊं लागला. शेवटी धर्मादायाची प्रवृत्ति ज्या साधनाने होणार तेंच साधन क्षीणतेस पावूं लागलें. सारांश चपलायतीने उद्योग करणारांस जें द्रव्य मिळायाचें तें वारंवार आळसी व व्यसनी यांस भिक्षारूपें मिळूं लागलें.

फ्रान्सदेशीं गरीबांविषयीं नेमणूक चालू करून ठेवण्याचें बोलणें होऊं लागलें तेव्हां त्या प्रकरणीं जे असामी नेमिले होते, त्यांनीं तें बोलणें रद्द करून इंग्लंड देशास अनुलक्षून आपला अभिप्राय प्रगट केला.

गोपाळ : अहो, पण गोरगरीब आळशी व दुर्व्यसनी असले तथापि त्यांस भुकें मारितां येत नाहीं.

गुरु : नाहीं यांत काय सांगावें ? इंग्लंड देशीं गरिबांकरितां नवे कायदे झाल्यावरून त्यापासून फार चांगलें झालें. नवीन कायदा असा आहे की गरिबांस जें कांहीं द्यावयाचें तें घरीं राहण्याचें कांहीं विशेष कारण असल्यावांचून ते आपल्या घरीं राहिले असतां त्यांस देऊं नये. यास्तव गरिबांकरितां केलेल्या कारखान्यांत जाऊन राहिल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. त्या कारखान्यांत कित्येक गोष्टीविषयीं प्रतिबंध असतात म्हणून तेथें जाणें वाईट असें मानून बहुत्येक कुटुंबें आपलें पोट भरायाकरितां स्वतां मेहनत करूं लागले आहेत. हेच सर्व जण पूर्वीचा कायदा असता तर कितीएक वर्षेपर्यंत गांवखात्यातील धर्मादाय घेत गेले असते. म्हणून नवीन कायद्यामुळें आळसी, व्यसनी अशांचें ढोंग कांहीं चालत नाहीं. त्यांस असें वाटतें कीं गरीबांच्या कारखान्यांत जाणें हें आपल्यास कैद करून घेणें आहे. व तेथें गेलें असतां आपल्या पोटाकरतांच मेहनत करून कारखान्याकरतांही

मेहनत करावी लागेल, म्हणून आपल्या आपण मेहनत करून आपलें पोट भरावें हें बरें. अशीं गरिबांकरितां काम करायाचीं जीं घरें तीं आवघीं मिळून एक कारखाना झाला असतो, अशा कारखान्यांत आतां पुर्तेपणीं सुधारणूक झाली आहे. तेथें जो खर्च करणें तो बेतबाताने थोडक्यांत होईं असी युक्ति चालू केल्यावरून गरीबांच्या नेमणुकीबद्दल जो ऐवज लागत असे त्यांतून अर्धा लागूं लागला. जेथें ऐशीं हजाराचा खर्च होता तेथें आतां चाळीस हजाराचा खर्च होतो. याप्रमाणें जे चाळीस हजार शिलकेस पडतात तेणेंकरून पुंजी तितकी अधिक वाढून तो ऐवज स्वतंत्रपणे मेहनत करणारांच्या पदरीं पडतो. जर पूर्वोक्त व्यवस्था नसती तर तो तितका ऐवज गांवखात्यातील धर्मादाय करणारे गोरगरीबांस वांटून देते.

गोपाळ : अहः हः कितीतरी ऐवज हा मार्गे पडूं लागला. एणेंकरून पुंजी वाढली असतां लोकांस कामावर ठेवण्याची गरज वाढूं लागेल व मजूरांचे पगारही वाढतील.

गुरु : तूं सांगतोस तसें घडत असतें, आणि बहुत्येक ठिकाणीं पगारही वाढले आहेत.

गरिबांविषयीं पूर्वोक्त नवीन व्यवस्था केली तेणेंकरून त्यांचें शरीराचाच चांगल्या रीतीनें संभाळ होऊं लागला इतकेंच नाहीं, तर त्यांची वर्तणूकही चांगली होऊं लागली. गांवखात्यांतील धर्मादाय करणारांजवळ खोट्या गोष्टी सांगून त्यांपासून कांहीं काढून घ्यावें तर तसें करण्यास सवडच राहूं दिली नाही. एथें मेहनत करूं तर पोट भरेल असें समजून ते मेहनत करूं लागतात. तेणेंकरून त्यांस ती तसी सवई लागून स्वतंत्रपणें आपला निर्वाह करावा हें योग्य असें कांहीं दिवसांनीं त्यांचें त्यांसच वाटूं लागतें.

गोपाळ : आपण असें सांगतां खरें पण, वारंवार असें घडतें कीं गरीब कुटुंबास दुःखणे अथवा जडजोखीम यांमुळें असी विपत्ति प्राप्त होती कीं, त्यांच्या हातून आपलें रक्षण होत नाहीं, त्यांची साह्यताच केली पाहिजे.

गुरु : अशा प्रसंगीं पूर्वोक्त कारखान्यांत जाण्याविषयीं मोकळीक असती, तेथें त्यां दुःखितास राहयास जागा, अन्न, वस्त्र, औषध इत्यादि जें अवश्य असेल तें मिळतें. आळसी, दुर्व्यसनी अशांला मात्र नवीन कायदे झाल्यावरून कांहीं मिळत नाहीं.

गोपाळ : तर मग ते त्या कारखान्यांचा आश्रय कां करीत नाहींत ? त्या सुखाचे जाग्यांत जायास तर सर्वांस मोकळीक आहे.

गुरु : तूं सांगतोस तशा प्रकारच्या गरीबांस त्या कारखान्याचा लोभ होऊं नये असी युक्ति केली असती. जो गरीब दुःखणेकरी नसला त्यास जें अन्नवस्त्र देणें तें तर पुरतेपणीं देतात, परंतु तें साधें जाडें असतें. फार श्रम करणारास जसी अन्नवस्त्रादिक देणें त्याचप्रमाणें धर्मादायावर वांचणारास देणें ही उघड अनीति होय. येणेंकरून उद्योगाचा हिरमोड होईल. म्हणून त्या कारखान्यांतील राहणारांतून जो शरीराने चांगला सुदृढ असतो त्यास खपावें लागतें. त्याविषयीं त्यास अन्नवस्त्र मिळतें, पगार मिळत नाहीं. असें आहे म्हणून निरुपाय प्रसंग जेव्हां प्राप्त होतो, तेव्हांच कोणी भला अथवा व्यसनी त्या कारखान्याचा आश्रय करतो. आणि तेथें ज्यांचा सांभाळ करायाचा ते फार थोडे असतात, म्हणून गोरगरीबांस देण्याविषयीं ज्या ऐवजाची नेमणूक झाली होती त्यापैकीं आतां फार थोडका ऐवज लागूं लागला.

गोपाळ : बरें, पण आपण सांगतां तसा नवीन कायदा झाला त्यामुळे बहुत्येक गोरगरिबास भीक मागावी लागत असेल ?

गुरु : कोणी भला व उद्योगी असून त्यास जर गरीबी आली, तर तो लागलाच त्या कारखान्याचा आश्रय करितो, भीक मागून आपलें पोट भरणें असें जें नीच कर्म तें तो स्वीकारीत नाहीं. भीक

देण्याची जी चाल त्यामुळें असें होतें कीं, विपत्तीनें पीडित अशा कुटुंबाला धर्मादाय करण्याविषयीं लोकांस चांगली सवड सांपडती, परंतु योग्यायोग्य विचार न ठेवितां भीक घालणें ही धर्मादाय करण्याची केवळ अविचारी रीत, असें केल्यानें आळस व ढोंग यांची वृद्धि होऊं लागते आणि कष्टाळू गरीबांस जें अन्न मिळायाचें तें आळशी व दुर्व्यसनी अशांस मिळूं लागतें. भिकाऱ्यांस भीक देण्यापासून असें होऊं लागतें कीं, जसा एकादा प्रतिष्ठित धंदा लोकांस उद्योगपूर्वक शिकवावा, तसा भीक मागून पोट भरण्याचा जो निंद्य धंदा तो लोकांस शिकविला असें होतें. ख्रिस्ती मतांत क्याथोलिक म्हणून एक मतभेद आहे, त्या मताची ज्यां देशीं प्रवृत्ति असती, तेथें पूर्वोक्त प्रकार तर केवळ जगबाहीर आहे, भीक घालणें हें एक धर्मप्रकरणांतील कर्म असें त्या देशीं सर्वत्र मानितात. तेथें कितीएक शहरांत मठ व धर्मसंबंधी स्थापना असतात, त्यांविषयीं मोठमोठ्या नेमणुका करून ठेविल्या असतात, तेथून तर पात्रापात्रविचार कांहीं न राहतां मोठा धर्मादाय होत असतो. तसेंच किंबहुना विशेषही या देशीं होत असतें.

गोपाळ : हें अवघें खरें, पण दुःख व दरिद्रानें पिडलेले असे जीव मार्गांत वारंवार आपल्या दृष्टीस पडतात, त्यांस कांहीं न देतां पुढें जाणें फार वाईट वाटतें.

गुरु : ज्यांच्याठायीं दया उत्पन्न होती त्यांचा मी निषेध करितों असें नाहीं. लोकांवर दया करावी, त्याचीं दुःखें दूर करावीं, हें तर ईश्वरप्रणीत जीं मुख्य कर्मे त्यांतलें एक कर्म होय. परंतु तीं कर्मे उत्तम विचारपूर्वक घडावीं; पात्रापात्रविचार न करितां दया करणें असें अंधासारिखें होऊं नये. यास दिलेंच पाहिजे, अशी याची वास्तविक अवस्था आहे, असें खचित समजून घेऊन मग जें देणें तें त्यास द्यावें. त्यास जो धर्मादाय करणें तो त्याचें दुःख पाहून त्या मानानें करावा, इतकेंच नव्हे त्याची योग्यताही पाहून करावा. कोणी चांगल्या रितीनें चालल्यामुळें संकटांत पडला असतो, त्यावर दया करणें, त्यापेक्षां उद्योगी असून आकस्मिक किंवा निरुपाय गोष्ट घडून गरीबीस मिळाला, अशा कुटुंबवत्सलावर विशेषेंकरून दया करावी. चांगल्या रितीनें न चालणाऱ्यावर दया करीत असतां आपल्या शेजारांतील कोणी मोलमजुरी करणारा मोठा उद्योगी व चांगल्या रितीनें वागणारा अशालाही कांहीं बक्षीस द्यावें; नाहीं तर उद्योगी लोकांस कांहीं बक्षीस न देतां आळशांवरच कृपा केली, तर त्यापासून वाईट फळ उत्पन्न होईल. तसें पूर्वोक्त रितीनें केल्यानें मात्र होणार नाहीं.

गोपाळ : उद्योगापासून जे लाभ व सुखें प्राप्त होतात, तींच त्याचीं स्वाभाविक फळें म्हणून बक्षिसाची गरज दिसत नाहीं.

गुरु : नाही खरी. पण तशीं फळें मोठ्या प्रयासावांचून मिळणार नाहींत असें आहे. मोठ्या कष्टानें मजूरी करणाराच्या पाहण्यांत असें येतें कीं, आपल्या शेजारीं एक आळशी आहे, त्याचें कुटुंबाला आपल्याच कुटुंबाप्रमाणें सांभाळ होतो, आपण कष्ट करून जें मेळवावें तें त्यास धर्मादायानें मिळतें, असें त्याच्या मनांत आल्यावरून त्यास कदाचित् असंतोष होईल, व त्याच्या उद्योगाचा हिरमोड होईल. याकरितां आळसापासून उत्पन्न झालेल्या विपत्तीवर दया करूं लागलें असतां मुकाट्यानेंच त्या आळसाची प्रवृत्ति केली, आणि कोणाच्या दृष्टीस न पडतां आयासपूर्वक होणारा जो उद्योग त्याचा हिरमोड केला असें होतें. कोणाचा गुण पसंत करून त्यास द्रव्यद्वारा बक्षीस दिलें असतां, त्याचें मोल अन्य प्रकारच्या देण्यापेक्षां विशेष होतें. ज्यास बक्षीस द्यावें त्याचा कांही तेजोभंग न होतां उलटा त्यास थोरपणा प्राप्त होतो, त्याच्या गुणाची वृद्धि होती, किंबहुना त्यास असें वाटूं लागतें कीं गरीबें ज्यां माणसांचा आश्रय इच्छितात, त्या माणसांनीं आह्माकडे पाहून आमच्या गुणांची वाहवा केली. अशा वृत्ति मनांत वागूं लागल्या असतां उद्योगाचे परिश्रम नाहींसे होऊन मनुष्यास उत्तेजन येतें. सारांश विपत्तीनें पीडितांस साह्यता आणि चांगले गुणाचे जे गरीब लोक

त्यांस इनामें अशीं एकसमयीं प्राप्त होऊं लागलीं असतां दरिद्राचें उपशमन होऊन त्याची पुढें चालच होणार नाहीं.

गोपाळ : मशागत करणाऱ्यां गरीब लोकांच्या प्रपंचस्थितीस हितावह अशी एक युक्ति गतवर्षी उन्हाळ्यांत माझे पहाण्यांत आली. तो प्रकार असा की, बक्षीस देण्याची पद्धति चालू केली आहे, त्यापासून फार उत्तम फळें होत आहेत. एक्या प्रांतीं एका गृहस्थाजवळ मोठी जमीन आहे, त्याचे पदरीं जे मशागती गडी असतात, त्यांचीं झोपडीं ही त्यांच्याच जमीनीवर असतात. त्या दरएक झोपड्यास एक एक मळा व्हायापुरती अलीकडे पुष्कळ जमीन लावून दिली आहे. तो गृहस्थ त्यां लोकांस अशी लागवड करायास जी जमीन देतो, त्याचा फार कमती धारा दरसाल एक पावला असें दर झोपड्याचे धन्यापासून घेतो. हे मळे लहान असतात, पण त्यांत दर एकांत दर एक मजूरदाराचे कुटुंबास पुरे इतकी शाकभाजी उत्पन्न होती, आणि तो मजूरदार आपल्यास जो अवकाश सांपडतो तो त्या मळ्याचे लागवडींत घालवितो. ते मळे फार मोठे नसतात म्हणून त्यां मजुरांस आपलें दररोजचे काम सोडून देऊन त्यां मळ्यांचेच पाठीस लागावें असें त्यांस वाटत नाहीं, आणि बाहेर विकायाइतकेंही त्यांत उत्पन्न होत नाहीं. आणखी उद्योगाची अधिक प्रवृत्ति व्हावी म्हणून तो गृहस्थ असें करितो कीं ज्यांचे मळ्यांची फार चांगली लागवड झाली असेल, त्यांस बक्षीस देण्याकरितां तीन इनामें प्रतिवर्षी देत असतो. अशी ही उद्योगास बक्षीस देण्याची विचारपूर्वक युक्ति काढिली, त्यामुळें त्यां मळे करणारांत ईर्षा उत्पन्न झाली आहे. त्यां मळ्यांमधून वाटा असतात, म्हणून कोणे मळ्याची लागवड कशी व कोणाची कशी हें सहज दृष्टीस पडून एकापेक्षां एक आपला मळा चांगला करायास पाहतो.

गुरु : ही तर फार उत्तम युक्ति. येणेंकरून असें झालें कीं, मशागती लोकांचा जो वेळ आळसांत किंवा कलालाच्या दुकानांत जायाचा, तो वेळ शरीरास हितकारक अशा आहाराचें भांडवल वाढविण्याकडेस लागूं लागला, आणि जो पैका अमली पदार्थ घेण्यांत उडायाचा तो कांहीं चांगल्या कामाकरितां जमूं लागला. तो पैका जरी प्रथम फार थोडका असला तरी कांहीं काळानें तोच जमून त्याची पुंजी होऊन त्या मशागती मनुष्यास व त्याच्या कुटुंबास कांहींसा स्वतंत्रपणें निर्वाह करण्यास उपयोगी होईल.

# उत्तरभागसंवाद ११

## मोल, किंमत, खप, भरती यांविषयीं

मालाचे मोलाविषयीं विचार–मोल हा सांबंधिक शब्द–किंमत, मोबदला-मोल, उपयोगरूप मोल, मालाचें आंगमोल–भरती व खप यांचा पदार्थांच्या मोलावर परिणाम–वस्तूचा उपयोग व ती सिद्ध करण्याचे श्रम हीं मोलाचीं दोन कारणें–सर्व वस्तूंचे तीन वर्ग कल्पिले, नियमित प्रमाणानें होणाऱ्या ज्या वस्तू तो पहिला वर्ग, त्यांच्या मोलाविषयीं नियम–भरती व खप याचें समीकरण,–आंगमोल न वाढवितां जे पदार्थ पाहिजेत, तितके उत्पन्न करितां येतात त्यांच्या मोलाचा नियम–आंगमोल–आंगमोल वाढवून पाहिजे तितके उत्पन्न करितां येतात ते जिन्नस, त्यांच्या मोलाचा नियम. निकृष्ट रितीनें तो जिन्नस उत्पन्न करायास जें मोल लागतें तें–भाड्याचा मोलाशीं संबंध, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाचे जे जिन्नस त्या प्रकरणीं–इत्यादि.

गुरु : उत्पन्न होण्याकरितां पुंजी व्यवहारांत लावण्याच्या कितीएक युक्ति आहेत. त्यांचा विशेष रीतीनें विचार करण्याच्या पूर्वी मालाचें मोल म्हणून कशास म्हणतात हें तुला समजलें पाहिजे.

गोपाळ : तें समजणें कांहीं मोठें कठिण नाहीं. ज्या वस्तूंस फार पैका लागतो, त्या बहुमूल्य वस्तू असें म्हणतात. उदाहरण; हिऱ्यांचा हार ही एक बहुमूल्य वस्तू होय.

गुरु : बरें, पण त्या हाराकरितां जो पैका द्यायाचा त्याच्याबद्दल किनखाब, कापड, चाहा, साखर, अथवा कांहीं दुसरा माल दिला तरीं त्या हारास बहुमूल्यच म्हणावें काय?

गोपाळ : होय, बहुमूल्यच समजावें. कां तर, त्याबद्दल हजार रुपये दिले काय, व हजार रुपयांचा जिन्नस दिला काय? सारिखेंच.

गुरु : तसें नव्हे, जिन्नसाच्या संबंधानें जो जिन्नसाचा भाव त्यास मोल म्हणावें, त्याचे प्रकार सांबंधिक मोल, मोबदला-मोल इत्यादि जाणावें. मालाचे मोबदला जे जिन्नस द्यावे, त्या जिन्नसाचे मानानें त्या मालाचें मोल मापिलें जातें, अशा मोलास मोबदला-मोल म्हणतात.

गोपाळ : अथवा अन्य प्रकारें बोलणें झाल्यास मालाची किंमत असें म्हणावें.

गुरु : तसें नाहीं. किंमत हा मोबदला-मोलाइतका व्यापक शब्द नव्हे, कोणत्याही पदार्थांबद्दल जें द्रव्य मिळतें ती त्याची किंमत, परंतु मोबदला-मोल म्हणजे त्या जिन्नसाबद्दल केवळ द्रव्यच मिळायास नको. कांहींएक जिन्नसांचा साधारण अंश एखाद्या पदार्थांबद्दल मिळतो, तो त्या पदार्थांचें मोबदला-मोल होय. आणि हेंच जेव्हां द्रव्यद्वारा मिळतें, तेव्हां तें मोल किंमत होय.

गोपाळ : मला किंमत म्हणजे काय हें बरोबर समजलें, परंतु मोबदला-मोलाविषयीं जरा गोंधळ झाला, त्याअर्थीं चांगला बोध होईसें दृष्टांत देऊन सांगावें.

गुरु : अरे बाबा, त्वां सांगितलें कीं, त्या हाराबद्दल साखर, किनखाब, चाहा, कांहीं मिळो, सहस्र रुपयांचा माल मिळाला म्हणजे झालें. तेव्हां अशी कल्पना कर कीं हजार रुपयांस पांच खंडी साखर मिळती व तितक्याच रुपयांस किनखाबाचीं दोन थानें, अथवा दाहा खंडीं चाहा मिळतो. तेव्हां त्या चाहाचें मोबदला-मोल, तीं दोन थानें, अथवा ती पांच खंडी साखर, अथवा असे दुसरेंही अनेक जिन्नस घेतले असतां त्याचें जे परस्परांशीं मोबदला होण्याचें मान तें त्यांचें मोबदला मोल समजावें. याजवरून मोल हा संबंधिक शब्द होय. तेव्हां अर्थातच एका वस्तूचें मोल उतरलें म्हणजे दुसऱ्या वस्तूचें चढलें; म्हणजे आज दोन माद्रपाटी ताके देऊन एक मण साखर मिळत असली, आणि उद्यां तितक्याच साखरेस चार माद्रपाटाचे ताके द्यावे लागले तर माद्रपाटांचें मोल एक सारखेंच चढलें किंवा उतरलें तरी त्यांचे परस्पर संबंध तसेच राहातील. त्यास सर्व वस्तूंचें मोल उतरलें अथवा चढलें हे असें म्हणणेंच खोटें.

गोपाळ : महाराज, आपण सांगतां ती गोष्ट खरी, परंतु आपण बोलिलां त्याप्रमाणें आम्हीं कापड देऊन साखर घेत नसतों. कोणताही माल विकत घ्यायाचा असल्यास पैसा टाकून घेतों, व विकायाचा असल्यास पैका घेऊन विकत देतों. आपण पदार्थांच्या परस्पर सांबंधिक मोलाविषयीं सिद्धांत सांगतां खरे, परंतु व्यवहारांत त्याप्रमाणें कांहींच होत नाहीं. तो तर सर्व पैक्यानें चालतो; वस्तुस जें मोल येणें तें पैक्यानेंच येतें.

गुरु : व्यवहार पैक्यानें चालतो खरा. परंतु पैका कांहीं मोलास नेऊन वस्तूंत घालीत नाहीं. पैका इतकें मात्र करितो, कीं जसें गजानें कापड मोजावें, तसें पैका सर्व वस्तूंचे मोल मापितो, तेव्हां पैका हा एक मोलमापक समजावा. परंतु पैक्यानें जरी पदार्थांचें मोल मापिलें, तरी वास्तविक पाहूं गेलें असतां व्यवहार होणें तो पदार्थांच्या मोलास अनुसरून होतो. कांहीं जागीं असें आपणास वाटतें, कीं येथें पैक्यासींच आपला संबंध आहे, परंतु तसेंही जरी असलें, तरी तो पैका कांहीं मोलाच्या वस्तू देऊन अथवा खर्चून प्राप्त झाला असतो.

गोपाळ : महाराज, आपण मोबदला-मोलाची चांगली व्याख्या केली, परंतु सर्वकाळ या मोलानें व्यवहार चालत नसेल असें मला वाटतें. कां तर, एकदोन प्रसंगीं मला स्वतः द्यायास जें पडलें तें तर, माझी खात्री आहे कीं, त्या वस्तूंच्या मोबदला-मोलपेक्षां फारच अधिक असावें.

गुरु : तसें झाल्यास त्या मोलास उपयोगरूप मोल म्हणावें. कसें तर एक दृष्टांत ऐक. कोणी गृहस्थ देशांतरास जात असतां वाटेस एका गावीं आला, आणि तेथें त्याजवळ एकानें कांहीं वस्तु विकायास आणिली, तिचें मोल वास्तविक पाहूं गेलें असतां दाहा रुपये; परंतु समयविशेषीं असें घडून आलें कीं, त्या गावीं दुसरी तसली वस्तु नाहीं. तशांत त्या गृहस्थास तर त्या वस्तुची गरज आणि हा ज्या जागीं जाणार तेथेंही तसी मिळायाची नाहीं, तेव्हां त्या वस्तुविक्यानें ती त्यास साठ रुपयांनीं दिल्यासही तो साठ रुपयास विकत घेईल. कारण त्या प्रसंगीं त्या मनुष्यास तिचा उपयोगच तसा. असें जें मोल यास उपयोगरूप मोल म्हणावें.

गोपाळ : याजवरून मला वाटतें कीं कोणत्याही वस्तूचें मोबदला-मोल वाढलें असतां उपयोगरूप मोलाहून अधिक होणार नाहीं.

गुरु : नाहीं होणार, कारण जितका ज्या वस्तूचा कोणेकास उपयोग तितकें तो त्या वस्तूस मोल देईल, तेव्हा त्वां बोलिल्याप्रमाणें उपयोगरूप मोल हें मोबदलामोलाची सीमा होय.

गोपाळ : बरें, पण महाराज, मोबदलामोल चढलें असतां तें उपयोगरूप मोलाहून अधिक होत नाहीं; तसें तें उतरूं लागलें असतां अमुक मर्यादेचे खालीं उतरणार नाहीं, असेंच ना ?

गुरु : होय, पुढें जे प्रसंग सांगण्यांत येतील, ते खेरीज करून बहुधा सर्वदा कोणत्याही मालाचें मोल त्याच्या आंगमोलापेक्षां कमी होत नाहीं.

गोपाळ : महाराज, आंगमोल म्हणजे काय ?

गुरु : एकदा जिन्नस करायास जो खर्च बसतो, म्हणजे तो जिन्नस विकायासारिखा करायास जो ऐवज लागतो, तो त्या जिन्नसाचें आंगमोल समजावें. या आंगमोलावरून या जिन्नसाच्या मोबदला-मोलाचा नियम होतो, याच्या खालीं त्या वस्तूचें मोबदला-मोल जात नाहीं. ही ग्रंथ ठेवायाची पेटी करायास फार मेहनत लागली असेल, त्या मेहनतीप्रमाणें त्या पेटीचे कारीगरांस न मिळालें, तर मग पेट्या कशास करतील ? ज्यांत अधिक प्राप्ति असा दुसरा धंदा पाहातील. याजकरितां माल उत्पन्न करायास जो खर्च बसतो, तो खर्च बाहेर पाडायापुरती त्या मालाची किंमत असली पाहिजे. असेंही असतां भरती व खप, यांच्या योगानें मालाच्या किंमतीमध्यें बरेच फेरफार होतात. तो प्रकार भरती व खप याविषयीं जेव्हां बोलूं त्यावेळीं निघेल.

गोपाळ : मी भरती व खप यांचा परिभाषिक अर्थ विचारणार होतों, परंतु तो विषय पुढें येईल असें बोल्लिां म्हणून उगाच राहिलों. आतां असें पुसतों कीं कोणत्याही वस्तूचें जें मोल असतें तें त्या वस्तूचें ठायीं कसें येतें ?

गुरु : कोणत्याही वस्तूचा उपयोग व ती वस्तु मिळण्यास जो श्रम करावा लागतो, तो उपयोग व तो श्रम दोहींनीं मोलाचे परिमाणाचा नियम होतो. तेव्हां अर्थातच एकाद्या वस्तूचा उपयोग फार असल्यामुळें तिचें मोल जास्ती होतें, अथवा कोणतीही वस्तु निर्माण करायास श्रम फार लागल्यामुळेंही तिचें मोल वाढतें.

गोपाळ : महाराज, वायु हा फारच उपयोगी पदार्थ, तेव्हां याचें मोल तर बहुतच असावें.

गुरु : म्या तुला पूर्वीच सांगितले, कीं वस्तूच्या उपयोगाप्रमाणें व ती मिळवायास जे श्रम पडतात त्याप्रमाणें तिचें मोल होतें. आतां वायु हा जरी आपल्या जीवनास अवश्यक आहे, तरी साधारण प्रसंगीं हा प्राप्त होण्यास श्रम करणें नलगे, म्हणून यास व अशाच दुसऱ्या पदार्थांस मोल आहे, असें म्हणतां येत नाहीं.

गोपाळ : महाराज, सर्व पदार्थांचें मोल एकसारिख्या रीतीनें मापिलें जातें काय ?

गुरु : तसें कसें होईल ? सर्व पदार्थांचे तीन वर्ग केले असतां चालतील, ते असे, नियमित प्रमाणानें उत्पन्न होणाऱ्या वस्तु, आंगमोल न वाढवितां पाहिजे तितक्या उत्पन्न करितां येतात, त्या वस्तु, व आंगमोल वाढवून पाहिजे तितक्या उत्पन्न करितां येतात त्या वस्तु, असे तीन वर्ग मेस्तर मिल्ल म्हणून एक नामांकित ग्रंथकर्ता आहे, त्याने केले आहेत, यांमध्यें बहुधा सर्व पदार्थांचा संग्रह होतो. या तीन वर्गांतील वस्तूंचे मोलाच्या नियमाविषयीं आपण विचार करूं.

गोपाळ : नियमित प्रमाणानें उत्पन्न होणाऱ्या वस्तु, यावरून कोणत्या वस्तु समजाव्या बरें ? व त्यांचें मोल कसें ठरतें ?

गुरु : नियमित प्रमाणानें उत्पन्न होणाऱ्या वस्तू त्या अशा, रामटेंकास दोन तीन बागा आहेत, तेथें विड्याचीं पानें उत्कृष्ट उत्पन्न होतात, तशीं त्या गांवांत दुसऱ्या ठिकाणीं अथवा सर्व हिंदुस्थानांत दुसऱ्या गावीं होत नाहींत, तेव्हा त्या जाग्याशिवाय दुसऱ्या कोठेही होत नाहींत, म्हणून ही वस्तू नियमित प्रमाणानें होणारी असें म्हटलें असतां चालेल. तिचा खप कितीही अधिक झाला तरी, भरती तितकीच, कारण ती दुसऱ्या कोठे उत्पन्न व्हायाची नाहीं. यासारिखे चित्रकोटाचे आंवळे, स्पेन देशांमधील कांहीं जागचें द्राक्षरसमद्य, जुन्या कारागिरांनीं केलेलीं चित्रें, तसबिरा, ज्या तसबिरांचे कर्ते नामांकित असून प्रस्तुत नाहींत, त्याचप्रमाणें जुनी पुस्तकें, तसेच मोठे मोठे हिरे, मोठीं मोतीं, माणकें इत्यादि ज्या वस्तू त्या नियमित प्रमाणानें असणाऱ्या असें समजावें.

यांचे मोलाचें मान त्यांच्या भरती खपावर आहे. असें घेणारे व घ्यायाचे जिन्नस असतील

त्याप्रमाणें यांचें मोल होईल. जर घेणारे फार झाले, म्हणजे खप फार झाला, तर मोल वाढेल. तें इतकें वाढेल कीं त्यां घेणाऱ्यांतून कांहींकांस आतां ही वस्तु आपल्यास घेण्याचें सामर्थ्य नाहीं, असें वाटून ते ती घेणार नाहींत, तेव्हां अर्थातच खप कमी होऊन भरती खप समसमान होऊन जिन्नस खपूं लागेल. जर जिन्नस अधिक असून गिऱ्हाइकें थोडीं असलीं तर जिन्नसाचें मोल कमी होऊन बहुत लोकांस तें मोल कमी झाल्यामुळें तो जिन्नस घ्यायास सांपडेल; अथवा त्या जिन्नसांतील कांहीं ते उत्पन्न करणारे अगर विकणारे राखून ठेवितील. असें झालें म्हणजे खप भरतीचें समानत्व होऊन तो जिन्नस विकूं लागेल. याजवरून पाहतां या पहिल्या वर्गांतील जिन्नसाचें मोलाचा नियम फारच सोपा, तो गणितरितीनें बोलणें झाल्यास भरती खपाचे समीकरण, असा आहे.

गोपाळ : भरती म्हणजे विकायाचा जिन्नस, आणि खप म्हणजे विकत जाण्याचा माल, असा आपला भाव काय ?

गुरु : होय, तसा कांहींसा खरा, परंतु खप याजविषयीं एक मोठी चूक पडत असती, ती लक्षांत ठेविली पाहिजे. कोणत्याही जिन्नसाचा खप म्हणजे तूं काय समजत असतोस ?

गोपाळ : यांत सांगायास काय कठीण आहे ? ज्यास जिन्नस पाहिजे असतो त्यास त्या जिन्नसाचा खप असतो.

गुरु : एका गरीब भिक्षेकऱ्यास एक शालजोडी पाहिजे आहे तर यास त्या शालजोडीचा खप आहे असें तूं म्हणसील काय ? व असा खप असल्यानें त्या जिन्नसाच्या मोलास कांहीं होईल काय ?

गोपाळ : नाहीं, आपण सांगतां त्यावरून मला कांहींसा खप शब्दाचा बोध होतो खरा, परंतु स्पष्टार्थ कळत नाहीं.

गुरु : तर बाबा, खप असायास नुसती इच्छा असून फळ नाहीं, तर तो जिन्नस घेण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. बरें पूर्वोक्त दुसऱ्या वर्गांत कोणते जिन्नस असावे ? गोपाळा, या जिन्नसांच्या मोलाचा नियम कसा ठरतो ?

गोपाळ : बहुधा शेतकीचे व खाणीतले जिन्नस खेरीजकरून जे हातानें अथवा यंत्रसाहित्याने बनविलेले जिन्नस ते. यांचें मोल कांहींसें निराळ्या रीतीनें ठरत असावें, कारण हे जितके पाहिजे तितके कांहीं नियमित आंगमोलानें उत्पन्न करितां येतात.

गुरु : अशा जिन्नसाचें ठांब अथवा मुकरर मोल ठरणें तें त्या पदार्थांच्या आंगमोलावरून ठरतें, व साधारण बाजारभाव ठरणें तो त्याच्या भरतीखपावरून ठरतो. पूर्वी सांगितल्याप्रमाणें एकाद्या जिन्नसाची कल्पना कर. आतां जर हा जिन्नस खपापेक्षां कमी असला, तर या जिन्नसाकरितां लोकांत चणचण होईल, व याची किंमत वाढेल, ती इतकी कीं हा जिन्नस करणाऱ्यांस दुसऱ्या जिन्नसाचे कारीगरांपेक्षां जाजती नफा मिळूं लागेल. तेणेंकरून दुसऱ्या धंद्यांतून या धंद्यांत भांडवलाची योजणूक होऊन भरती जाजती होईल व पुनः किम्मत उतरेल ती इतकी कीं त्या किमतीनें आंगमोल सुटून दुसऱ्या धंद्यांइतका सरासरी नफा मिळेल. असें न होतां माल अधिक होऊं लागला, खप न होई असें दिसूं लागलें म्हणजे व्यापारी लोक किम्मत न उतरावी या बुद्धीनें दुसऱ्या धंद्यांत मालाची योजणूक करितात, अथवा जिन्नसांतून कांहीं विकायाचा ठेवितात. असें होऊन सरासरी तो इतक्यावर येऊन बसतो कीं, त्या मोलानें केवळ आंगमोल सुटून सरासरी नफा मिळतो.

परंतु यांत इतकें लक्षांत ठेवायास पाहिजे, कीं जिन्नसाचें मोल कमी अथवा अधिक व्हायास केवळ प्रत्यक्षच खप अथवा भरती कमीअधिक व्हायास नको. केवळ असा खप कमीअधिक होईल असा संभव पुरे, कोणता एक जिन्नस यंत्रसाहित्य चालू झाल्याने स्वस्त होईल असें

व्यापाऱ्यांस समजतांच आंतल्यांआंत चढाचढ होऊन तो जिन्नस स्वस्त होतो, तो इतका कीं त्याच्या नवीन आंगमोलावर सरासरी नफा मिळतो.

गोपाळ : आतां तिसऱ्या वर्गातील जिन्नसांचे मोलाविषयीं सांगावें.

गुरु : तिसऱ्या वर्गातील बहुधा जिन्नस म्हटले असतां खाणीतून काढितात ते, म्हणजे धातु अथवा कृषीपासून प्राप्त होणारे जिन्नस म्हणजे धान्यें. हे जिन्नस जितके जाजती पाहिजे असतात त्याप्रमाणें कमी कमी फलद्रुप किंवा दूरदूरचे जमीनींतून काढावे लागतात. व त्यांस खर्चही उत्तरोत्तर अधिक-अधिक करावा लागतो.

गोपाळ : तर मग या मालाचें मोल कसें ठरत असेल महाराज?

गुरु : कां बरें? असें पहा कीं एक शेत एका बेटांत होतें, तेथें शंभर खंडी धान्य उत्पन्न होई, तें २० रुपये खंडीप्रमाणें विकून त्याचा खर्च भागे, पुढें तेथें वस्ती ज्यास्ती झाली तेव्हां, पन्नास खंडी धान्य जास्ती उत्पन्न करावें लागलें. तें अधिक खर्च केल्याशिवाय होईना. तो खर्च होत असतां धान्याचें मोल रु. ३० वाढवायास लागलें. त्यासमयीं असें झालें कीं सुपीक जमीनींत १ खंडी भात पिकवावयास २० रुपये लागत होते, तितकेंच भात कमपीक जमीनीवर जास्ती खर्च केल्यामुळें ३० रुपयानें होऊं लागलें, आणि सर्व भाताचा दर ३० रुपये खंडी झाला, तेव्हां सुपीक जमीनीचे धान्यास दर खंडीवर रुपये दाहाप्रमाणें नफा मिळूं लागला. याजवरून तिसऱ्या वर्गातील जिन्नसाचें मोल निकृष्ट रीतीनें उत्पन्न करायास जो खर्च लागतो, त्यानें ठरतें. व धान्यांचें मोल वाढल्यानें सारा द्यावा लागतो, साऱ्यामुळें मोल वाढत नाहीं. हा विषय पुढें साऱ्याच्या प्रकरणीं निघेल.

गोपाळ : आपण हें जिन्नसांच्या मोलाविषयीं सांगितलें, तें सर्व खरें असें मला वाटत नाहीं. कारण आपण सांगतां त्या नियमानें नेहेमीं व्यापारांत मोल ठरत नाहीं. एकाच बाजारांत दोन तीन भाव असतात हें कसें?

गुरु : तसें होण्यास कित्येक कारणें आहेत. एकादा जिन्नस खरीद करण्याविषयीं जी हुशारी व चौकसी पाहिजे, तसी सर्वत्र सारिखी नसती. तशांत श्रीमान लोकांचा व्यवहार कांहीं असा असतो कीं, आलें काय गेलें काय याची पर्वा नसती, म्हणून कोणीं कोणास कोणेसमयीं एकच पदार्थ उण्याअधिक मोलाने सांपडतो. परंतु तेही झालें तरी कदाचित् व्यापाऱ्यांच्या कृत्रिमामुळें व लोकांच्या गैरहुशारी वगैरे कारणामुळें किरकोळ व्यापारांत होतें; परंतु एकठोक व्यापारांत म्हटलें म्हणजे या शास्त्रांत मोलाविषयीं जे पूर्वोक्त नियम सांगितले, त्याच नियमानें व्यवहार होतो.

# उत्तरभागसंवाद १२

## उत्पन्नाविषयीं

उत्पन्न होण्याकरितां भांडवलाची जी योजणूक करणें ती योजणूक करण्याच्या अनेक रीति आहेत.—त्यांतून चांगली लाभकारक रीति कोणती त्याचा विचार—देशाची जसीजसी स्थिती, तसी तसी त्या त्या देशीं भांडवलाची योजणूक करण्याची निरनिराळी रीति असती—व्यवहारांत पुंजीची योजणूक करण्याचा प्रकार—समसमान नफा होऊं लागला म्हणजे समजावें कीं लोकांत पुंजीची वांटणी बराबर होत आहे—देशाची जसी स्वाभाविक स्थिति असेल; तीस अनुसरून पुंजीची व्यवहारांत वांटणीं होत असतां कसें काय होतें, तो प्रकार—कृषि, व शिल्प, व व्यापार यांजपासून समसमान नफा होतो—कृष्यादि व्यापारांत समसमान प्राप्ति होत नाहीं असें दृष्टीस पडतें त्याचें कारण.

गुरु : मागील संवादात जो विषय सांगायाचा तो सोडून कांहीं बोलणें झालें. असो. पुंजीच्या अथवा भांडवलाच्या संग्रहाविषयीं आपलें जें भाषण झालें त्याचें तुला स्मरण आहे ना? आतां उत्पन्न करून घेण्यास पुंजीची कोणकोणत्या रीतीनें योजणूक करितात, त्याचाच विचार करूं.

शेतकी करणें.

दगडी कोळसे, धातू इत्यादिक खनिजवस्तु काढायास खाणी खणणें.

मासे मारणें.

शिल्पकामें, कसबें करणें.

व्यापार करणें अशां अशां कामांत पुंजीची योजणूक करितात.

गोपाळ : पुंजीची योजणूक करण्याच्या ज्या रीति सांगितल्या, त्यांत शेतकींत पुंजीची योजणूक करणें ही फार चांगली रीत. इजपासून देशास मोठें हित होतें, कारण मनुष्याच्या निर्वाहास केवळ अगत्य असें जें अन्न तें शेतकीपासूनच होतें.

गुरु : इंग्लंडासारिखे जे शीत देश तेथें तर मनुष्यास जसें अन्नाचें अगत्य तसेंच वस्त्राचें व घराचें अगत्य असतें, म्हणून तीं ज्यांपासून होतात, त्यां कसबांचेही अगत्य आहे.

गोपाळ : परंतु तीं कसबें करायास जी सामग्री लागती, ती तरी ज्या भूमीचा आश्रय शेतकीस आहे, त्याच भुमीतून उत्पन्न होती. वस्त्रें विणणें व घरें बांधणें झालें तर भूमीतून झालेलेच जिन्नस घेऊन तीं तसीं कामें करितात.

गुरु : तीं तसीं कामें होत नसतीं, तर त्यां कामास जी सामग्री पाहिजे ती कोण उत्पन्न करितें? शिल्पकाम

करणाऱ्यांस त्यां तशां जिन्नसांचें अगत्य लागतें म्हणूनच शेतकी करणारे ते जिन्नस उत्पन्न करितात. असें कृषिकर्म आणि शिल्पकर्म एकमेकास अनुकूल होतें.

गोपाळ : तें तसें होवो, परंतु त्यांपासून देशास एकसारिखाच लाभ होत नसेल. कारण कृषिकर्म जसें भूमीचें उत्पन्न वाढवितें, तसें शिल्पकर्म वाढवीत नाहीं. तें कांहीं नवीन उत्पन्न करितें असें नाहीं, तर शेतकीच्या योगाने जो कच्चा मालमसाला पैदा झाला असेल, त्यालाच शिल्पकर्म नवीन रूप व आकृति देऊन दाखवितो.

गुरु : खरें, परंतु तें तसें शिल्पकर्मांच्या योगानें घडतें, तेणेंकरून त्या कच्च्या मालमसाल्याचें मोल बहुधा शंभर पट वाढतें. अरे, शेतकी झाली तरी ती एक कृति होय, ती कांहीं प्रकृति नाहीं. धान्यादि उत्पन्न करण्याचें जें प्रकृतीचें सामर्थ्य त्या पुढें मनुष्याची कृति बापुडी आहे, कारण जसी काय रसायनकृतीने आणि यंत्रकृतीनेंच रचना झाली आहे, अशां अशां स्वरूपाचे पदार्थास प्रकृति उत्पन्न करिती, आणि इंद्रियानी युक्त, व आपल्यापासून आपल्यासारिखे उत्पन्न करण्यांची ज्यांस शक्ति अशां सजीव पदार्थांस तरी प्रकृतीच उत्पन्न करिती.

गोपाळ : शेतकी करूं लागलें असतां प्रकृति जसी अनुकूल होती तसी इतर कृतींत होत नाहीं. या विषयीं मागें दुसरे संवादात बोलणें झालेंच आहे. सारांश कुणब्याबरोबर तर ती जसी काय खपतच आहे असी दिसती. त्यानें शेत नांगरून पेरिलें पुरे, म्हणजे बाकीचें सर्व काम प्रकृतीच करिती. बीजास मोड फोडणें, त्यास भूमीतून बाहेर आणणें, सहन न्हायासारिखा वर्षाव करणें आणि धान्यादिक पक्व दशेस यावयासारिखें ऊन पडूं देणें, हें सर्व प्रकृतीचें करणें. कुणब्याने जें करायाचें तें बहुधा प्रकृतीच करिती. त्याने उठून फळें वेंचून घ्यावी, इतकेंच राहिलें असतें.

हें असें शिल्पव्यापारांत होत नाहीं. इथें अवघें काम मनुष्यास स्वतां करावें लागतें. यंत्ररूप कृति अथवा रसायनरूप कृति त्यास जरी अनुकूल झाल्या तरी श्रम करणें तें त्याचें टळत नाहीं. त्यानें कांहीं एक काम हस्तव्यापारानें अथवा मनोव्यापाराने केलें, तथापि तें कृतीचें; प्रकृतीचें नव्हें.

गुरु : कृतीनें व्यापार करितां यावा असी मनुष्याची प्रकृतिच आहे, असें मनांत न आणितां कृति निराळी आणि प्रकृति निराळी, असें बोलण्याची चाल पडून गेली. असें आहे, मनुष्यप्रकृतीनें जो कोणी वागतो, त्यालाच कृतीनें व्यापार करितां येतो, अशा प्रकृतीच्या धोरणानें जंगली लोक चालत नाहींत. त्यांच्या बुद्ध्यादि शक्ति उदयास आल्याच नसतात. ते जन्मल्यापासून मूर्खच राहतात. अशा स्थितीनें राहणें ही ज्ञानशक्तीनें युक्त जो मनुष्य त्याची प्रकृति नसावी. परंतु मनुष्यास मनुष्याचीच प्रकृति प्राप्त होणें, ती कृतीनें हळूहळू क्रमेकरून बुद्धीस संस्कार झाल्याच्या अंतीं प्राप्त होतीं.

मनुष्य केवळ पशुसारिखा नाहीं, बरें वाईट जाणायास योग्य असा आहे. नवीन कल्पना, नवीन युक्ति सुचण्याजोगीं त्यास मनबुद्ध्यादिक दिलीं आहेत. तेणेंकरून त्यास प्रकृतीचे कितीएक धर्म आपल्या स्वाधीन करून घेऊन आपल्या उपयोगास लावण्याचें सामर्थ्य आलें. कोणे पदार्थाच्या ठायीं काय कसा गुण आहे हें त्यानें आपल्या उपयोगाकरितां लक्ष्यांत आणून हलके पदार्थ पाण्यांत तरतात असें पाहून होडी केली, वाऱ्याचा सोसाटा आपल्या आंगास लागतो, त्याजवरून शीड करायाची कल्पना त्यास सुचली, लोहचुंबक पाहून त्यावरून होका तयार करून त्याच्या धोरणाने, तो अगदी दूरदूर देशीं जळमार्गानें जाऊं लागला. पाण्यांत गलबतानें तरावें, त्यास वायु लागून तें चालावें, लोहचुंबकानें एकेच दिशेकडेस वळलेलें असून मार्ग दाखवावा, असे त्यां त्यां पदार्थांच्या ठायीं प्रकृतीचे धर्म त्यांजवर मनुष्य आपली कृति चालवून त्यांपासून आपला उपयोग करून घेऊं लागला.

पूर्वोक्तप्रमाणें घडून येतें म्हणून कृषिकर्मातच प्रकृति अनुकूल होती असें नाहीं. ती जसी

शेतकऱ्यास धान्य उत्पन्न करायास साह्य होती, तशीच तें धान्य यंत्राच्या योगाने दळणारास साह्य होती.

शिल्पकर्मात तर कित्येक गोष्टींत प्रकृतीची साह्यता फार असती, तितकी तिची साह्यता कृषिकर्मासही असत नाहीं. यंत्रसाहित्यानें उद्योग करणें सोपें झालें, त्याचें कारण असें कीं, जें करायाचें त्यापैकीं मोठेंमोठें काम तें प्रकृतिधर्मांनीं युक्त जीं तत्वें त्यांजकडून करवितां येतें. किती एक कार्यें रसायणकृतीनें होतात त्यांत तर प्रकृतीची साह्यता फारच असती. वस्त्रांस ओप देण्यांत वारा, ऊन हींच तत्वें बहुतकरून अवघें काम करितात. कित्येक वस्तूंस कांहीं संस्कार करून पात्रांत भरून त्या तशाच्या तशाच ठेविल्या असतां आपोआप खतखतूं अथवा फुगूं लागतात, मग त्यांचीं मद्यादिक होतात. तीं चमत्कारिक कार्यें प्रकृति कोणत्या साधनानीं करिती तें तर आपल्यास समजतच नाहीं. सारांश कोणत्याही प्रकारचा व्यापार झाला, तथापि त्यांत प्रकृति कांहीं तरी करीत असती.

गोपाळ : खरें. कृतीनें केलेल्या कोणत्याही व्यापारांत प्रकृतीचें साह्य असतें, हें थोडका विचार करितांच समजूं लागतें. घडियाळ जरी झालें तरी त्यास जी कमाण असती, तीस प्रकृतीचाच संबंध आहे, कारण स्थितिस्थापकत्व म्हणून जो तिख्याच्याठायीं धर्म असतो, ज्यामुळें त्या तिख्याची कमाण व्हावी तितकी आवळडती. तो धर्म तिख्यास प्रकृतीच्या योगानें आला, त्यावांचून घडियाळ करितां आलेंच नसतें. आणि प्रकृतीनें अग्नीस जी शक्ति दिली आहे, ती शक्ति जर कृतीने व्यवहारांत आणिली नसती, तर कमाणच करितां आली नसती.

बरें, पण महाराज, धान्यादिक उत्पन्न करितेसमयीं मनुष्यास अज्ञात अशीं जी प्रकृतीचीं कार्यें घडतात, त्यांची आणि कृतीनें केलेल्या साधनांची साह्यता कृषिकर्मात असती; एकट्या प्रकृतीचीच असती असें नाहीं.

गुरु : खरें, हातानें करायाची मेहनत ज्या साधनाने सोपी होती, तें साधन असें काय यंत्रच जाणावें. पावडें कुदळी झाली म्हणून जमीन हातानीं उकरायाची मेहनत टळली. नांगर कुदळ झालें तेणेंकरून शेतकीचें काम बरेंच सोपें झालें. धान्य काठीनें झोडून काढायाची युक्ति अढळली तेणेंकरून ते धान्य हातानीं चोळून काढण्याचे श्रम टळले. आणि धान्याची झोडणी करायाचें यंत्र चालू झालें, तेणेंकरून धान्य हातानें झोडण्याची मेहनत कमी झाली. परंतु यंत्रादि साधनांचा शिल्पकर्मात जसा पुरतेपणीं उपयोग होतो, तसा कृषिकर्मात होत नाहीं, कारण कृषिकर्म म्हटलें म्हणजे त्यांत अनेक प्रकारचीं कामें असतात, त्यांस जागाही तसी विस्तीर्ण असली पाहिजे. आणि ज्याची गति मनुष्याच्या स्वाधीन नाहीं, असा ऋतुकाळ त्यां कामांत अनुकूल असला पाहिजे.

कोणे एके देशाची चांगली नांदणूक व्हावयास कृषि, शिल्प, व्यापार, असीं तिन्हीं असलीं पाहिजेत. परंतु यांतून एकादाच उद्योग धरून बसावें, अथवा ते तिन्हीं उद्योग करणें झाले तर त्यांचा किती किती अंश असावा, याचा विचार केला पाहिजे.

गोपाळ : होय, तोच विचार व्हावा. दुसरे उद्योग टाकून एकटी शेतकीच धरून बसावें, असें माझें म्हणणें नाहीं. बरें, महाराज, इंग्लंडसारिख्या देशीं जसा व्यापार व शिल्पकर्म चालविलें आहे, तसें कृषिकर्म चालविलें नसेल.

गुरु : तें माझ्यानें सांगवत नाहीं. आणि तुला तें प्रकरण, चांगलेंसें समजूं लागलें म्हणजे तें सांगून देणें कठिण असें वाटूं लागेल.

गोपाळ : असें कां म्हणतां ? उद्योगाचे जे पूर्वोक्त प्रकार ते चालू करण्याविषयीं देशाचे पुंजीचा किती किती अंश लावावा हें संपत्तिव्यवस्थाशास्त्र जाणत्यांस जर ठावुकें नसलें तर कसें होईल ?

गुरु : तो निर्णय करणें सोपें नव्हे, कळलें ? कारण देशांची जसी जसी स्थिति अथवा अवस्था असती,

त्या त्या प्रमाणें त्यां त्यां देशीं ते निरनिराळे उद्योग चालवावयास पुंजीचा अंश निरनिराळे मानानें लावितात, या प्रमाणें पुंजीची योजणूक करण्याच्या निरनिराळ्या रीति आहेत. अमेरिका खंडीं अथवा नवीन वसलेल्या देशीं जमीन थोडक्या मोलानें मिळती, लोक थोडके जिकडे तिकडे राहिले असतात, पुंजीची कमती असती, अशा ठिकाणीं मोठा चालता उद्योग म्हटला म्हणजे शेतकीच असती. कारण, तेथें रोजमुरा मोठा असल्यामुळें कोणे मजुराच्या पदरीं चार पैसे झाले म्हणजे त्यास जमीन पाहून ती घेऊन शेतकीचें खटलें उभारायास लौकरच उमेद येती. याप्रमाणें तेथें फार-करून शेतकीचीच चाल होऊं लागती. अमेरिका खंडीं तर संपत्ति लौकर वाढत चालली आहे, तथापि तेथील लोकांस जो तयार झालेला माल लागतो, तो बहुत्येक ते बाहेरून घेतात यांत त्यांचा नफा आहे. ते आपल्याकडे अवघा माल तयार करायास कारखाने घालीत नाहींत, त्यांजकडे पुंजीची कमती असेल म्हणूनच ते कारखाने घालीत नसतील असें समजूं नये, तर पुंजीची वहिवाट करायास, शिल्पकामापेक्षां दुसरें अधिक नफ्याचें काम असतें म्हणून ते कारखाने घालीत नाहींत.

गोपाळ : इंग्लांड देशांत तर लोक पुष्कळ असतात, आणि जमीन थोडकी असती, म्हणून इकडचा तयार झालेला माल देऊन त्याबद्दल अमेरिकाचें धान्य घेणें यांत इंग्लीश लोकांचे हिताची गोष्ट असावी.

गुरु : होय. पूर्वी वसलेले मुलखांत लोक आपल्यास जीं धान्यादिक पाहिजेत, त्यापैकीं कांहीं बाहेरून न घेतील, तर नवीन वसलेले मुलखांत आपल्या पोटापुरतेंच पिकवितील, परमुलखीं खप नसल्यामुळें अधिक पिकविणार नाहींत.

इंग्लांड देशीं जमिनीस फार किंमत बसती. तेथें काम करणाऱ्या मनुष्याकडे कांहीं ऐवज सांचला असतां जमीन विकत घ्यावयास त्याचें मन होत नाहीं; अथवा कोणाची जमीन धान्यानें घ्यावयासही त्यास उमेद होत नाहीं, तो बहुतकरून दुकान घालतो, अथवा जवळ जी पुंजी असेल ती माल तयार करण्याच्या कामांत लावितो.

देशाची जसी जसी स्थिति असती, त्यांत जो जो उद्योग करायास जशा जशा गोष्टी अनुकूल असतात, त्या त्या प्रमाणें त्या त्या उद्योगाकडे पुंजीची योजणूक होत असती. इंग्लांड देशीं अशा पुष्कळ नद्या व बंदरें आहेत. तसें ज्या देशीं असतें, तेथें तयार झालेल्या मालाचा परमुलखाशीं व्यवहार करण्यास फारच सोई असती. त्या कारणामुळें त्या तशा देशीं शिल्पकर्म मोठा हितकारक उद्योग असें समजून त्याचीच फार करून चाल झाली असती.

गोपाळ : एकादा देश कृषिकर्माविषयीं फार चांगला असतो, शिल्पकर्म चांगल्या रीतीनें चालायास योग्य असा एकादा देश असतो. एक धान्यादिक देतो, एक कलाकुशलतेनें केलेले पदार्थ देतो, याप्रकारें त्या उभयतांचा व्यवहार चालतो, तसेंच आपलें म्हणणें ना ?

गुरु : होय. तसेंच इंग्लांड देशीं जितक्या मालाचा खप असतो, त्यापेक्षां अधिक माल तयार करण्याकडे पुंजीची योजणूक झाली असती. आणि तऱ्हतऱ्हेचे कसबानें जो माल तयार होतो, तो परमुलखीं पाठवून त्याबदल तेथील जिन्नस घेतात, यांत नफ्याची गोष्ट आहे. कारण तो जिन्नस घरीं करायास जो खर्च बसतो, त्यापेक्षां कमी खर्चानें परदेशाहून आणितां येतो. याजवरून पाहतां असें सिद्ध होतें कीं, जशी तारुण्यापासून प्रौढ दशेची प्रवृत्ति होती, तसी कृषिकर्मापासून शिल्प व व्यापार यांची प्रवृत्ति होती. पूर्ववयांत शरीर जसें गरगरां वाढतें तसी कृषीची केवळ त्वरित वाढी होती. आणि प्रौढ वयांत जसें शरीर जमून सदृढ होतें, तसी शिल्प व व्यापार इहींकरून कृषीचे अंगीं शक्ति व दृढता येती. पुंजीचे योजणुकीचे प्रकरणीं कोणी एक ग्रंथकर्त्याचें असें म्हणणें आहे कीं, शेतकीची खटलीं करणाऱ्यांचा उद्योग निराळा आणि तरतऱ्हेचीं कसबें करून नवीन जिन्नस करणाऱ्यांचा व व्यापार करणाऱ्यांचा उद्योग निराळा. असी निवड करीत बसणें ही रिकामचेष्टा.

कारण, या दोहों प्रकारच्या उद्योगापासून झालेल्या जिन्नसाचा खर्च शिल्पादिकांपासून झालेले जिन्नस असल्यावांचून होत नाहीं, आणि यांचा खर्च ते असल्यावांचून होत नाहीं. असा उभय पदार्थांचा संयोग होतो, तेव्हांच एकादी वस्तु खर्चायासारिखी होती, आणि संपत्ति असें नाव पावती. म्हणजे ती पुंजी होऊन तीची व्यवहारांत योजणूक करितां येती. अवघ्या संपत्तिची सामग्री म्हटली असतां पृथ्वीच्या पोटीं उत्पन्न होती. त्या सामग्रीची उद्योगेंकरून संपत्ति होती. भूमीतून जे अनेक प्रकारचे पदार्थ उत्पन्न होतात. त्यांस उद्योग श्रम इहींकरून नवें रूप प्राप्त होतें, जो टाकायाचा अंश तो वेगळा केला जातो. यांहीं ज्यांचा संयोग करायाचा त्यांसी त्याचा संयोग घडतो, तेव्हां ते व्यय करण्यास योग्य होतात.

गोपाळ : पूर्वोक्त जे नानाप्रकारचे उद्योग त्यांतून कोणकोणत्या उद्योगांकडे पुंजीचा किती किती अंश योजिला असतो, हें, आपण म्हणतां, संपत्तिव्यवस्था-जाणत्यांस सांगतां येत नाहीं. बरें, देशाचें हित व्हावयाजोग्या मानानें लोकांत पुंजीची वांटणी बरोबर होत आहे किंवा कमती मानानें होत आहे, हेंही त्यांस सांगवणार नाहीं काय? मला वाटतें, ज्यांकडे पुंजी असती ते त्यांच्या मर्जीस येईल त्याप्रमाणें त्या पुंजीची वहिवाट करितात, लोकांचे हिताकडे पाहात नाहींत.

गुरु : लोकहिताकडे ते न पाहोत, परंतु आपल्या हिताकडे तर पाहतात. तेव्हां पुंजीची कसी कोठे योजणूक करावी, हें कांहीं मर्जीवर नाहीं तर आपल्या हितावर आहे. असें आहे, ज्या उद्योगापासून फार नफा होईल अशा उद्योगाकडे लोक आपली पुंजी योजितात, आणि ज्यां कामांची देशास फार गरज असती त्यांच कामांपासून फार नफा होतो.

गोपाळ : देशांतील लोकांच्या गरजेचा आणि पुंजीदाराच्या नफ्याचा काय संबंध हें मला नकळे.

गुरु : असें आहे, लोकांस ज्यां जिन्नसांची फार गरज असती, त्यांची ते फार किंमत देतात. बरें, जर कापडाची फार कमताई झाली, आणि लोकांस कापडाची फार गरज लागली त्यामुळें कापडाची किंमत चढून त्या व्यापारांत मोठा नफा मिळावा असी संधी आली, तर काय होईल? तेव्हां असें होईल कीं, ज्यां लोकांस शेतकीच्या खटल्यांत थोडका नफा मिळत असेल, ते आपल्या पुंजीपैकीं कांहीं पुंजी कापडें तयार करण्याचें जें मोठ्या नफ्याचें काम, तिकडे लावतील, त्यामुळें अधिक कापडें होऊन कापडाचा तोटा नाहींसा होईल. तें विकत घेण्याविषयीं जी लोकांची चढाचढी ती कमी होईल. असें झालें असतां कापडाची किंमत उतरेल व कापडें तयार करणारांस जो नफा व्हायाचा तो कमी होऊन शेतकऱ्यांचे नफ्याचे बरोबरीनें होऊं लागेल. त्यापेक्षांही कमी होऊं लागला तर शेतकीचें खटलें करणारानें जी पुंजी कापडे तयार करण्याच्या कामाकडे योजिली होती, तेथून काढून पुनः शेतकीकडे लावील.

गोपाळ : पुंजीची वेगळाल्या रीतीने योजणूक होत असतां बराबर सारखा नफा कसा होतो, हें दाखवावयास आपण चांगली कल्पना योजिली, परंतु त्याप्रमाणें व्यवहार होणें कठीण दिसतें. कारण एक धंदा सोडून दुसरा करूं लागणें त्यांत कितीएक अडचणीं व खर्च आहेत.

गुरु : अडचणी खऱ्या, किंबहुना त्या दूर होऊंच नयेत, अशा बहुधा त्या अडचणी असतात. पुंजीची वहिवाट कोणे एके रीतीनें होत असतां त्यापासूनच अधिक नफा नेहमी होऊं लागतो, तसा दुसऱ्या रितीने पुंजी वहिवाटिली असतां नफा होऊं नये, असें जेव्हां होतें तेव्हांच एक्या ठिकाणांतून पुंजी काढून दुसऱ्या ठिकाणीं लावावी, एक धंदा सोडून दुसरा करूं लागावा असें घडून येतें. तें तरीं काळेंकरून व नुकसान सोसल्याच्या अंतीं घडून येतें. कारण, जो धंदा चालता असेल त्याहून केवळ वेगळा अभ्यास हात घालणें त्यांत किती एक अडचणीच्या व अनहिताच्या गोष्टी असतात, म्हणून एकाद्या धंद्यांत झालेले तोटे सहन करवेना असें होतें, त्यासमयीं मात्र दुसरा धंदा पत्कारावा लागतो.

गोपाळ : केवळ वेगळा धंदा पत्कारणें म्हटलें असतां फार कठीण गोष्ट. एका धंद्यांत जी हुशारी माहितगारी अंगीं आली असती, ती दुसऱ्या धंद्यांत समयीं उपयोगी पडत नाहीं. बरें शिल्पकर्मांची यंत्रें मोडून त्यांची शेतकीचीं आऊतें करावीं, अथवा शेतकीच्या आऊतांनी शिल्पकर्म करून घ्यावें, तर तसेंही घडत नाहीं; यावरून मला असें वाटतें कीं, शेतकीचें खटलें करणारा म्हणेल कीं, आपली पुंजी या माझ्या धंद्यांतून काढून शिल्प अथवा व्यापार याकडे लावीन, तर तसें होणार नाहीं. अथवा शिल्पकाम किंवा व्यापार करणारा म्हणेल कीं, पुंजी शेतकीकडे लावीन तर तेंही होणार नाहीं. तसें करूं गेलें असतां अनहितातीच गांठ पडेल.

गुरु : होय, तूं सांगतोस तसें होईल खरें. परंतु इतकें बरिक बरें आहे, नफ्याच्या दरांत फारच कमीअधिक होत नाहीं, जर झालें तर थोडकें होतें, अथवा थोडे दिवस राहतें. म्हणून प्राप्तीची बराबरी करायास तूं म्हणतोस तसें करणें नलगे.

ऐवज व्याजानें बाहेर लावून, त्याचें जें उत्पन्न होईल, तें खाऊन असावें असे मोठमोठ्या मातबर देशीं पुष्कळ लोक असतात आणि व्यापारी अथवा शिल्पकर्मानें माल तयार करणारे झाले तरी त्यांच्याजवळ जितकी पुंजी असेल तितकीवरच त्यांस व्यवहार चालवितां येत नाहीं, त्यां पैकेकऱ्यापासून कर्ज काढावें लागतें. उसनवारी केल्यावाचून व्यवहार करणारे थोडकेच असतात. एकसारिखा असा याचा जो नफ्याचा दर त्यापेक्षां एकाद्या उद्योगांत नफा अधिक होऊं लागला म्हणजे तो उद्योग करणारे आपला व्यवहार वाढवावयाकरितां अधिक कर्ज काढितात. परंतु दुसऱ्या एकाद्या उद्योगांत नफा कमी होऊं लागला म्हणजे तो उद्योग करणारे व्यवहार कमी करून उसनवारी बंद करून टाकितात. रिकार्डो म्हणून एक साहेब संपत्तिव्यवस्थेवर ग्रंथकर्ता झाला. त्याचें म्हणणें असें आहे कीं, रेशमी कापडाचा खप अधिक होऊं लागतो, आणि कापसी कापडाचा खप कमी होतो, तेव्हां कापसी कापडाचा व्यवहार करणारा आपली पुंजी काढून रेशमाचे व्यवहाराकडे लावीत नाहीं, तर आपल्या कामकऱ्यांपैकीं कित्येकजणांस रजा देतो, आणि पैकेकरी व सावकार यांपासून ऐवज घेणें बंद करतो. असें रेशमी कापड तयार करणारा करीत नाहीं, त्यास अधिक कामकरी ठेवावे, अधिक ऐवज काढावा अशी उमेद येती. मग तो अधिक ऐवज कर्जी काढितो, तेव्हां व्यवहार करणारास आपण नित्याचा धंदा बंद करणें जरूर न होतां पुंजी जशी एका धंद्यातून काढून दुसऱ्या धंद्यांत लाविल्यासारखें होतें.

गोपाळ : यावरून असें होतें कीं, कृषि आणि शिल्प यां कामांत जो नफा होणें तो नेहमी समसमान व्हावा, अथवा नेहमी न झाला तरी काळेंकरून व्हावा.

गुरु : होय. काळेंकरून हें तुझें म्हणणें नीट आहे, कारण, नफ्याचा दर समसमान होणें हें अकस्मात् होत नाहीं, काळेंकरून होतें; याप्रमाणें काळेंकरून जो समसमान नफा होणें, तो कृषि व शिल्प यांच कामांत होतो असें नाहीं, दुसऱ्याही कामांत होतो. देशाची जशी स्वाभाविक स्थिति असेल तीस अनुसरून पुंजीची व्यवहारांत वांटणी होत असावी; असें ज्या देशीं असतें, तेथें त्या पुंजीच्या वांटणीपासून फारच मोठा नफा होत असतो, आणि पुंजीची योजणूक करायाचे जे दुसरे प्रकार त्यां अवघ्यांपासून बहुधा समसमान नफा होण्याची संधि येईतोपर्यंत मोठा नफा होत असतो.

गोपाळ : बहुधा समसमान कां, एकसारिखा समसमान असा नफा कां होऊं नये ?

गुरु : त्याचें कारण असें आहे. शेतकीचीं खटलीं करावयास बहुतयेक लोकांस चांगलीं वाटतात, तसें दुसरें कसब अथवा व्यापार वाटत नाहीं. म्हणून असें घडतें कीं, ज्यां मुलखांत पिकावू जमीन स्वस्त मिळती, तेथील कोणाएकाचे पदरीं कांहीं पुंजी झाली म्हणजे जमीन घ्यावी असें त्याच्या मनांत येतें. मग जेथें लोकांची वसती अगदी कमी अशाही प्रांतीं तो जाऊन शेतकीचें खटलें आरंभून लहानशा

संस्थानाच्या स्वामीसारखा नांदतो. असें अमेरिका खंडीं होत असतें. याप्रमाणें इतर उद्योगांपेक्षां शेतकीकडे विशेष भर असतो खरा, परंतु त्याचीही एक मर्यादा असती, तिजपेक्षां अधिक भर असत नाहीं; म्हणून पुंजीची वहिवाट करायाचे जे निरनिराळे प्रकार त्यांपासून बहुधा समसामान नफा होतो, असें म्हटलें असतां चालेल.

गोपाळ : अहः हः, कृतीने व्यवहार करण्याची केवढी उत्तम प्रकारची ही व्यवस्था. जसें जसें मला (देशव्यवहारव्यस्थेचें शास्त्र) समजत जातें तसें तसें दिसून येतें कीं, प्रकृतीचीं कार्यें ज्या नियमानीं घडतात ते नियम असे आहेत कीं, त्यांपासून विशेषेंकरून जितकें वाईट होतें, तितकें बरें होत नाहीं.

गुरु : वारंवार होतें असें म्हणावें, कारण विशेषेंकरून या शब्दाची व्याप्ती वारंवार या शब्दापेक्षां फार मोठी आहे. अरे असें आहे, प्रकृतीचीं कार्यें ज्या क्रमाने होत असतात, त्या क्रमाहून कोठे अधिक, कोठे कमी, कोठे वेगळे असे कृतीचे नेम असतात, ते तरी केवळ चांगले असतात असें नाहीं, परंतु ते जरी वाईट असले तरी अगदीच राज्य नसणें, त्यापेक्षां ते तसे नियम असणें बरें. पूर्वीही म्हणण्यांत आलें आहे कीं कृतीनें व्यापार करतां यावा असी मनुष्याची प्रकृतिच आहे. ही कृति विवेकापासून उत्पन्न होती, ही मनुष्यास उत्तमावस्थेच्या मार्गाकडे प्रवृत्त करिती. त्यामुळें असें घडतें कीं, पश्वादि प्राणी आपआपल्या स्वभावाच्या बंधनानें बांधलेले असून जसे वागतात, तसा मनुष्य नसून आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें वागण्यास मोकळा असतो. परंतु तो एकदा लोकांच्या मंडळींत आला, म्हणजे प्रकृतिसिद्ध नव्हे असा जो विवेकसिद्ध नियम, त्या नियमाने त्यास वागावें लागतें. मग जसी जसी त्याची ज्ञानशक्ति प्रकट होऊन संस्कार पावत जाती, त्या त्या प्रमाणें तो नवीन नवीन नियम, अल्प अथवा विशेष हितकारक असे करीत जातो. त्यांतून बहुत्येक नियम त्याची चांगली नांदणूक होण्यास प्रतिकूळ असेही असतात. असें असतांही त्या नियमापासून त्यांचें बहुतकरून हित व्हावें असें असतें.

गोपाळ : कृषि, शिल्प, इत्यादि सर्व उद्योगापासून समसमान नफा काळेंकरून होतो, असें आपण म्हणतां; पण असा समसमान नफा इंग्लंड देशीं होत नसेल, कारण तेथें शिल्प व व्यापार यांचीच फार चाल म्हणून कृषीपासून जो नफा व्हायाचा त्यापेक्षां शिल्प व व्यापार यांपासून अधिक नफा होत असेल.

गुरु : तूं म्हणतोस तसें नव्हे; कळलें ? शेतकीचीं खटलीं करणाऱ्यांस जी प्राप्ति होती तिजपेक्षां व्यापारी व शिल्पकर्म करणारे यांस पुष्कळ व त्वरित प्राप्ति होती, असें दृष्टीस पडतें. त्याचें कारण असें आहे कीं शेतकऱ्यांच्यापेक्षां ते बहुधा मोठ्या मानानें पुंजीची वहिवाट करितात, म्हणून त्यांची संपत्ति मोठ्या डौलानें मिरवती. परंतु शेवटीं काळेंकरून पाहतां शेतकीच्यापेक्षां व्यापार व शिल्पकर्म यांपासून अधिक प्राप्ति होत नाहीं असें सिद्ध होतें.

गोपाळ : जर व्यापाऱ्यांस व शिल्पकर्म करणाऱ्यांस शेतकऱ्यांच्यापेक्षां अधिक प्राप्ति होत नाहीं, तर मग ते इतके धनाढ्य कसे होतात ?

गुरु : ते धनाढ्य होओत, परंतु लोकांत असें म्हणणें आहे कीं, आज व्यापारी उद्यां भिकारी, उत्तम खेती. म्हणून जसी व्यापाऱ्याच्या सारिखी वारंवार व त्वरित द्रव्य मिळवावयाची संधि शेतकऱ्यास येत नाहीं. तसा त्याचा व्यापाऱ्यासारिखा वारंवार मोडही होत नाहीं. शेतकीच्या खटल्यापेक्षां व्यापारांत मोठमोठ्या जोखमासी गांठी पडतात. कोठे लढाई होऊं लागती; कोठे लेण्यावस्त्राची पूर्वीची चाल पालटून नवीन चाल चालू होती; कोठे लोकांकडून कर्ज येणें तेंच थकतें, अशा अशा दैवयोगानें घडणाऱ्या गोष्टीपासून व्यापाऱ्यास मोठेच तोटे होतात. तसें शेतकऱ्यांस क्वचित् होतें. असें आहे त्यापेक्षां व्यापाऱ्यास दैववशात शेतकऱ्यापेक्षां अधिक प्राप्ती झाली तर त्यांत काय नवल !

गोपाळ : एकून दैववशात जशी हानि होती, तसीच दैववशात प्राप्ति होती, असेंच आपल्या बोलण्याचें तात्पर्य काय ?

गुरु : होय. शेतकऱ्याच्यापेक्षां व्यापाऱ्याचा खेळ मोटा, म्हणून युक्तीनें अथवा दैवयोगानें डाव साधला तर सरासरी व्हावयाची जी प्राप्ति तिजपेक्षां अधिक प्राप्ति होऊन शेतकऱ्यापेक्षां व्यापारी लौकर धनाढ्य होतो. जर बुद्धीच्या कमीपणामुळें अथवा दुर्दैवामुळें डाव न साधला तर मोठमोठे तोटे येऊन त्याचें समयास दिवाळेंही निघतें.

गोपाळ : तसें म्हणाल तर शेतकीच्या खटल्यांत जोखिम नाहीं काय ? पाऊस, ऋतु, इत्यादिकांची गति कोणाच्या हातीं आहे ? तीं जसीं अनुकूल प्रतिकूल असतील त्याप्रमाणें धान्य जिन्नस इत्यादिकांचें होणें न होणें आहे.

गुरु : तू सांगतोस तशा करणांपासून जीं नुकसानें होतात त्यांपासून मनुष्याचा अगदींच मोड क्वचित होतो. जर एकादा ऋतु एका प्रकारच्या धान्यास अनुकूल नसला, तर दुसऱ्या प्रकारच्या धान्यास अनुकूल असतो. एका जिन्नसांत न साधलें तर दुसऱ्या जिन्नसांत साधतें. आणखी असें आहे, मनुष्याच्या पोटास ज्यांचें अगत्य, बहुधा असेच पदार्थ कृषीपासून होतात, म्हणून तशां पदार्थांचा खप नाहीं असें कोठून घडणार ? त्यां पदार्थांची जसी कमती असती तसी किंबहुना त्यापेक्षां अधिक त्यांची किंमत चढती. या कारणामुळे कोणेसमयीं असें होतें कीं, ज्या सालीं चांगली पिकलाढ नसती, त्या सालीं तर शेतकी करणारांस फारच प्राप्ति होती.

या आपल्या बोलण्यावरून असें सिद्ध होतें कीं, कृषि, शिल्प, व्यापार यांजपासून जो नफा होणें तो शेवटीं पाहिला असतां समसमानच होतो परंतु शेतकीचीं खटलीं करणाऱ्यांस समसमान नफा होतो, तसा व्यापाऱ्यांस व शिल्पकर्म करणाऱ्यांस समसमान नफा होत नाहीं. यांतून कित्येक मोठे धनाढ्य होतात, कित्येकांची दिवाळी निघतात.

सारांश ज्या ज्या व्यवहारांत पुंजी वहिवाटावी त्या त्या व्यवहारांत जसें जसें जोखिम असतें त्या त्या प्रमाणें त्या त्या व्यवहारापासून बहुधा नफा होतो. परंतु काळेंकरून व कित्येक खटल्यांच्या अंतीं झालेल्या नफ्याचें मध्यम मान काढून पाहतां असें अढळतें कीं पुंजीची योजणूक करण्याच्या ज्या नाना युक्ति त्यां सर्वांपासून समसमान नफा उत्पन्न होतो.

या प्रमाणें कृषि, शिल्प, व्यापार यांच्याठायीं पुंजीची वांटणीं समसमानपणें होत असती. आणि असा जो समसमानपणें वांटणी होत असण्याचा प्रकार त्यांत आगंतुक कारणावरून अंतर पडतें, तो प्रकार साहजिक ओघानें चालू ठेविला असतां तें अंतर नेहमी असणार नाहीं.

गोपाळ : असें आहे, तर मग पुंजीची वांटणीं होण्याचा जो ओघ त्यास कोणी हातच लावूं नये.

गुरु : परंतु बहुधा समसमानपणानें नफा होतो म्हणून सांगितलें, तो समसमानपणा, ज्या ज्या देशीं सरकार पुंजीचे योजणुकींत हात घालीत नाहीं त्या त्या देशीं देखील एकसारिखा नसतो, आणि त्यांत अंतर पडल्यांवांचून रहात नाहीं. अधिक उणें करणारीं जीं अनेक कारणें तेणेंकरून वारंवार त्या समसमानपणांत अंतर पडतें. कारण एकादा नवीन उद्योग काढिला अथवा चालत असलेला उद्योग चांगला सुधारला म्हणजे त्यांत जी पुंजी घातली असेल तिचा नफा वाढतो; परंतु ही नफा वाढण्याची गोष्ट समजतांच नवीन रीतीनें वहिवाटण्याजोगी पुंजी ज्यांचे संग्रही असती ते त्या नफ्याच्या उद्योगांत हात घालितात. तेव्हां जसी जसी चढाचढी त्या उद्योगाविषयीं होऊं लागती, तसा तसा नफा कमी होऊं लागतो. एकाद्या नवीन देशासीं व्यापार होऊं लागणें अथवा लढायी होऊं लागल्यामुळें परमुलखी व्यापार बंद होणें अशां अशां कारणामुळें व्यापाऱ्यास जो नफा व्हायाचा त्यांत अंतर पडतें. जसा तुफानानें समुद्र क्षुब्ध होतो, आणि तें राहिलें म्हणजे पूर्वीच्या समान

स्थितीवर येतो, तसा समसमान होणाऱ्या नफ्यांत आगंतुक कारणानें पालट होतो आणि तीं नाहींशीं झालीं म्हणजे नफा आपल्या पहिल्या समसमानपणावर येऊं पाहतो.

गोपाळ : एकून नफा समसमानपणें व्हावा असा त्याचा ओघ असतो, परंतु समुद्रास क्षुब्ध करणारीं जशीं कारणें तशीं श्रीं बहुत्येक आगंतुक कारणें तिहींकरून त्या नफ्याच्या समस्थितींत अंतर पडूं लागतें, त्यामुळें नफ्याची समस्थिति नेहमी जशीची तसीच राहणार नाहीं.

गुरु : होय, खरें. उद्यां जमिनीचें उत्पन्न कसें होतें, त्याचा आपण विचार करूं.

# उत्तरभागसंवाद १३

## धारा व भाडें याविषयीं

कृषिकर्मापासून जें उत्पन्न होतें त्याची मोठी किंमत झाल्यामुळें लोक जमीनीचा धारा घेऊं लागले – धान्यामुळें जमीनीचे उत्पन्नाची किंमत वाढली नाहीं – जमीनीचा सुपीकपणा – जमीनी नाना प्रतीच्या असणें – त्यांची लागवड करायास त्यांची सोई-गैरसोयीमुळें अधिक-उणा खर्च लागणें इत्यादि कारणावरून धारा घेण्याची चाल चालू झाली–धारा घेण्याचें उत्पत्तिकारण–धारा वाढतो कसा आणि उतरतो कसा तो प्रकार–कच्चा जिन्नस उत्पन्न होतो. त्याचे कमीअधिक भरतीप्रमाणें त्याची किंमत अधिक उणी होती.

**गोपाळ** : महाराज, उत्पन्नाच्या प्रकरणीं म्या फार विचार केला, त्यावरून असें सिद्ध झालें कीं, पुंजीपासून बहुतकरून जो नफा होत असतो, त्यापेक्षां शेतकीं करणाऱ्यांस अधिक नफा होत नसतातर ते जमिनीच्या धन्यास धारा कोठून भरिते ? ज्या पुंजीपासून व्यापारी अथवा शिल्पी जें उपजवितात त्यापेक्षां त्याच पुंजीपासून शेतकी करणारे अधिक उपजवितात. असें जें अधिक उपजवितात त्यांतून ते धारा भरितात. ते अधिक उपजवित नसते, तर धारा जाऊन जी बाकी राहती त्यावर नफा इतर उद्योगांच्या नफ्यापेक्षां कमी होता.

**गुरु** : पुंजीपासून बहुतकरून व्हायाचा जो नफा त्यापेक्षां शेतकी करणारे अधिक नफा करून घेतात हें तुझें म्हणणें नीट आहे. अरे, उत्पन्नांतून धारा भरून बाकी राहिलेल्या उत्पन्नापासून सर्वसाधारण जो नफ्याचा दर त्यापेक्षां कमी नफा होऊं लागला तर शेतकीच्या खटल्यांत कोणी कसा आपली पुंजी घालील.

**गोपाळ** : कमी नफ्याचें काम तर कोणी पतकारणारच नाहीं, परंतु शेतकीच्या खटल्याविषयीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, जरी शेतींत नफा न झाला तरी इतर उद्योगांपेक्षां शेती चांगली, कारण शेतकीच्या योगानें दोन लाभ होतात. एक तर बहुत दिवस सुरक्षितपणें पदरीं रहाण्याजोगा स्थावर माल म्हणजे जमीन मिळती, आणि शहराबाहेरच्या ठिकाणीं राहण्याचें जें सुख व मौज तींही प्राप्त होतात. यामुळें कमी नफा झाला तरी शेतकी करावी असें कोणाच्या मनांत येईल.

**गुरु** : लोकांची बोलणीं म्हटलीं असतां तीं पळपळीत असतात. तीं कोणे एके गोष्टीचा चांगला नीट सिद्धांत करायास उपयोगी नाहींत. बुद्धि भलतिकडे फांकू नये म्हणून त्यां तशां बोलण्याकडे लक्ष जाऊं

देऊं नये. शेतकीच्या योगानें सुरक्षित राहावयाजोगा स्थावर माल पदरीं होतो असें लोक बोलतात. परंतु स्थावर मालापासून कांहीं उत्पन्न न झालें तर तो बहुत दिवस सुरक्षितपणें पदरीं असून फळ काय? तशांत सरकार, इनामदार, खोत, धारेकरी, इत्यादिकांपासून जीं कुळें शेतीकरितां जमीन घेऊन त्यास धारा अथवा भाडें म्हणजे ठरविलेलें देणें देतात, ती जमीन त्यां कुळांचा माल कोठून होईल? जो कोणी शेतवाडी इत्यादि दुसऱ्यापासून विकत घेऊन आपल्या नांवावर चढवितो, अथवा कोण्या वतनदाराच्या पदरीं जमीन असती, ती त्याचा माल म्हटलें असतां चालेल, त्यानें त्याची घरींच वहिवाट केल्यास त्यास कोणाला स्वामित्व किंवा भाडें द्यावें लागत नाहीं, सरकारदेणें मात्र द्यावें लागतें. मग जमीनीचा धनी तोच व कुळही तोच म्हणून कोणी कुळानें कोणापासून लागवडीकरितां जमीन घेतली तर, त्या जमिनींत उत्पन्न झालेल्याच्या सुरक्षितपणाकडे जितकें लक्ष असतें, तितकें त्या जमीनीच्या सुरक्षितपणाकडे असत नाहीं. आपल्यास जें उत्पन्न करून वहिवाटायाचें त्यास कांहीं जोखीम न झालें म्हणजे आपलें हित झाले असें त्यास वाटतें.

जें उत्पन्न होईल त्यांतून खर्च वेंच, भाडें, जाऊन पुंजीवर अमुक एक नफा होईल असी अटकळ करून शेतकरी आपली पुंजी शेतखटल्यांत घालितो. आणि अटकळ केलेला नफा व्हावा म्हणून धान्यादिकांस जसी चांगली किंमत येईल तशा किमतीने विकतो, जर खर्च वेंच जाऊन कांहीं नफा न झाला तर तो तें खटलें कशास करील? कुणबी, माळी जमिनीची लागवड करून जें उत्पन्न घेतात, तें नफ्याचा जो सर्वसाधारण दर त्यापेक्षां अधिक असतें, परंतु ज्याची जमीन असती त्यास धारा अथवा भाडें द्यावें लागतें म्हणून त्यां कुळांस सरासरी नफा होतो.

गोपाळ : जर त्यांस भाडें भरावें लागतें तर ते आपली धान्यादिक स्वस्त विकितीं. धान्यादिकांस इतकी किंमत द्यावी लागती त्याचें कारण हेंच कीं कुळांस जमिनीच्या धन्याला भाडें भरावें लागतें. कुळानें शेतांत खपावें आणि शेताच्या धन्यानें घरीं बसून खावें असी गोष्ट घडून आली त्यास काय करावें?

गुरु : भाडें घेणारे जे शेताचे धनी त्यांस कशास बोल लावावा? कारण कुळास जमीनीचें भाडें जमिनीचे धन्याला द्यावें लागतें. त्यामुळें त्या जमिनींत उत्पन्न झालेल्या धान्यादिकांची किंमत चढती असें समजूं नये. धान्यादिक उत्पन्न करायास जो खर्च बसतो, त्या खर्चापेक्षां त्या धान्यादिकांची अधिक किंमत येती म्हणून तीं ज्या जमीनींत होतात त्या जमीनीचे भाडें शेतकरी भरितो. याप्रमाणें पाहतां धान्यादिकांची मोठी किंमत चढणें याचे भाडें अथवा धारा हें कार्य होय, कारण नव्हे.

गोपाळ : हें तर मोठें नवल. अहो, शेतांचे धनी कुळांपासून भाडें ठोकून घेऊं लागले तर तें त्यांनीं द्यावें कोठून? तीं आपलें धान्यादिक मोठे किंमतीनें विकितील तरच त्यांच्यानीं तो धान्याचा ऐवज भरवेल.

गुरु : धनी कुळावर जुलूम करून घेतो असें नव्हे. जें द्यावयाचें तें कूळ स्वसंतोषानें देतें. दोघे धनी राजी होऊन करार झाला असतो. शेतांत जें उत्पन्न होईल तें विकून त्याची जी किंमत येईल, त्यांतून पुंजीवर जो साधारण मानानें नफा व्हायाचा त्याप्रमाणें नफा होऊन बाकी कांहीं उरेल तर असें जें उरलेलें तें कूळ शेत वहिवाटल्याबदल त्याचे धन्यास स्वसंतोषें देईल. अशीं उत्पन्नाचीं शेतें बाग इत्यादि असलीं म्हणजे कुळेंच जाऊन भाडें, मुदत इत्यादि ठरवून धन्यापासून आपल्याकडे घेतात.

गोपाळ : भाडें द्यावें लागतें यामुळें जमीनींत उत्पन्न झालेल्या जिन्नसांची किंमत वाढत नाहीं, तर मग भाडें मोलाचा अंगभूत अंश होणार नाहीं. आपण मागें सांगितलें कीं भाडें हा जिन्नसाच्या मोलाचा अेक अंगभूत अंश होय.

गुरु : नाहीं असें कोण म्हणतो? परंतु त्या भाड्यामुळें उत्पन्न झालेल्यां जिन्नसाची किंमत वाढत नाहीं.

गोपाळ : तेव्हां शेतकीच्या खटल्यांत जो मोठा नफा होणें तो भाड्यामुळें होत नाहीं, असें सिद्ध होतें. बरें, या खटल्यांत लोक चढाचढी करून तो मोठा नफा साधारण मानाचा नफ्याइतका होईं असें कां करीत नाहींत ? शेतकींत जी पुंजी घातली असती त्यापेक्षां अधिक पुंजी घातली असतां अधिक उत्पन्न होईल. दाण्यागल्याची फार भरती होऊन किंमत उतरेल. म्हणजे गोरगरिबांस दाणा स्वस्त मिळूं लागेल.

गुरु : जसी पदार्थांची शिल्पकर्मद्वारा व्हावी तितकी भरती करितां येती तसी कृषिकर्मद्वारा करतां येत नाहीं. वस्त्र पात्र इत्यादिकांची कमती होऊन किंमत मनस्वी वाढली तर ते कसब दुसरे करूं लागतील आणि वस्त्रापात्रादिकांची पुष्कळ भरती झाल्यामुळें त्यांची किंमत उतरेल. शिल्पकर्म करणारास पदार्थ पुष्कळ उत्पन्न करायास जसें साधतें, तसें कृषिकर्म करणारास धान्य गुरे इत्यादि पुष्कळ उत्पन्न करायास साधत नाहीं.

गोपाळ : पुष्कळच उत्पन्न करायास जरी न साधलें, तरी शेतकीचीं आऊतें व तसींच दुसरीं साधनें चांगलीं उत्तम प्रकारची झालीं असतां आणि नवीन जमीन लागवडीखालीं आणली असतां बरेंच मोठें उत्पन्न करितां येईल.

गुरु : शेतकीचें उत्पन्न किती मोठें कां होईना आणि ज्या वांचून मनुष्याचा निर्वाह होऊं नये, अशा दाण्यागल्ल्याची भरती किती कां होईना, तथापि त्याची किंमत नेहमी उतरलेली राहणार नाहीं. कारण त्याचें जसें मान वाढतें तसी लोकसंख्या वाढती. पहिल्यापेक्षां लोक अधिक झाले तर त्यांच्या पोटास पहिल्यापेक्षां अधिक धान्य लागेल. म्हणून लोकसंख्या वाढायास कांहीं फार दिवस नको. थोडक्यांतच वाढली म्हणजे दाण्यागल्ल्याची जसी भरती होऊं लागेल तसाच खप होऊं लागेल. म्हणून त्याची किंमत नेहमीच पडून राहणार नाहीं. किंमतीविषयीं म्हटलें म्हणजे इतर सर्व पदार्थांचा प्रकार भिन्न, आणि धान्यादि जीं मनुष्याच्या उपजीवनास आवश्यक यांचा प्रकार भिन्न. वस्त्रपात्रादि पुष्कळ होऊं लागलीं, म्हणजे त्यांची किंमत उतरती, परंतु धान्यादिकांचा कांहीं असा विलक्षण गुण आहे कीं, त्यांची जसी भरती वाढत जाती तसा तसा त्यांचा खपही वाढत जातो.

गोपाळ : तेव्हां असें होतें कीं भाकरी झालीं किं झाली नाहीं तंव खायास तोंड तयार होतें. बरें, पण नफ्याच्या साधारण मानाइतका नफा पदरीं पडून भाडेंही भरतां यावें इतकी मोठी किंमत धान्यादिकांस कसी येती ? भाडें द्यावें लागतें म्हणून धान्यादिकांस मोठी किंमत येत नाहीं तर मग त्यास कांहीं दुसरें कारण असावें.

गुरु : धान्यादिक उत्पन्न करायास जो खर्च बसतो, त्याजपेक्षां इतकी अधिक किंमत येती कीं, ज्यांतून कुळास भाडें भरायास सोय पडतें. धान्यादिकास असी मोठी किंमत येऊन ती चढलेली राहण्यास कितीएक कारणें आहेत. पहिलें कारण तर वरवर पाहतां असें दिसतें कीं, त्या कारणामुळें किंमत कमी व्हावी. तें असें—ईश्वरानें या भूमीपासून धान्यादिक पुष्कळ उत्पन्न व्हावीं असा एक अमूल्य गुण इच्याठायीं ठेविला आहे, त्यामुळें इची लागवड करणारांस पोटापुरतें मिळून मागें उरे एवढें इच्यापासून उत्पन्न होतें.

गोपाळ : लोकांच्या निर्वाहापुरतें मिळून मागें उरे एवढें उत्पन्न होतें तर मग इतके लोक गरीब कां ?

गुरु : जे जमिनीची लागवड करितात त्यांच्याच निर्वाहाविषयीं बोलणें चाललें आहे. त्यांखेरीज जे दुसरे लोक त्यांविषयीं नाहीं. त्यांचा तरी अन्नानेंच निर्वाह होतो. ते कोण म्हणशील तर, जसे आपल्या पोटास अन्न पिकवणारे कुणबी तसे आपल्यास वस्त्रापात्रादि करणारे शिल्पी आहेत.

गोपाळ : होय, शिल्प्यांचें, किंबहुना हातपाय पोटाळून स्वस्थ घरीं बसणाऱ्यांचें अन्नानेंच पोट भरतें. खायास कोणास नको ? सर्वांस पाहिजे.

गुरु : कुणब्यानें जें शेत घेतलें त्यांत जें पिकलें तें अवघेंच पोटास खाल्लें तर मग दुसऱ्यांस विकत द्यावयास त्याजवळ काय राहील? स्वस्थ घरीं बसणारा जो शेताचा धनी, त्याला तो कुणबी भाडें कोठून भरील? अरे भूमीचा स्वाभाविक सुपीकपणा असा आहे कीं, बहुधा सर्व प्रतीचें उत्पन्न होतें. तें एवढें होतें कीं, लागवडीचा खर्चवेंच फेडून जी पुंजी घातली असेल तिजवर नफा होऊन कांहीं तरी मागें राहतें. मग असें जें मागें राहिलें त्यांणेंच तो भाडें देतो. जसी जसी पिकाऊ जमीन असती तसें तसें उत्पन्नांतून थोडेंबहुत मागें उरतें, आणि तसें तसें हलकें भारी भाडें भरायास कुणब्यास साधतें.

गोपाळ : बरें महाराज, ज्या मुलखांत नवीन वसाहत झाली असती, तेथें ज्यास जसी सुपीक जमीन पाहिजे तसी त्यास मिळती, तेथे शेतांस पीक पुष्कळ येतें. असें जेथें असेल, तेथें भाडें द्यावें लागत नसेल. याचप्रमाणें अमेरिका खंडीं बहुतेक प्रांतीं आहे म्हणून ऐकतों.

गुरु : जेथें जमीन पुष्कळ असती, जेथें जो कोणी लागवड करील त्यास जमीन सहज मिळती, तेथें कोणी कशास भाडें द्यावें? परंतु तेथें तरी लागवड करणाराच्या पदरीं उत्पन्नांतून भाडें द्यायापुरतें उरून राहतें. तेव्हां असें होतें कीं जमीनीच्या धन्यास भाडें भरायाचें तें लागवड करणाऱ्याच्याच जवळ राहतें, नवीन वसाहत करणाऱ्यांस भाडें बाहेर द्यावें लागत नाहीं. तशांत त्यांकडे हवा चांगली, जमीन सुपीक, म्हणून ते लौकर संपत्तिमान् होतात.

सारांश, जमीनीच्या ठायीं सुपीकपणा आहे म्हणून लागवड करणारास भाडें द्यावयास साधतें; आतां तें भाडें द्यावें असें जें त्याच्या मनांत येणें यांस दुसरें कारण आहे.

गोपाळ : त्याच्या मनांत येणें यावरून असें होतें कीं, भाडें देणें न देणें हें त्याचे मर्जीवर आहे. असेंच जर असलें तर भाडें द्यावें असें कोणाच्याही मनांत येणार नाहीं.

गुरु : बरें, तूं म्हणतोस तसेंच होतें किंवा कसें हें लवकरच समजेल. एका बेटांत वसाहत झाली म्हणून पूर्वी बोलणें झालें आहे, तशा बेटासारिख्या नवीन वसलेल्या मुलखांत पुंजी व लोकसंख्या वाढली म्हणजे धान्याचा खप अधिक होऊं लागतो, तसी त्याची किंमत चढती. आणि अधिक जमिनीची लागवड होऊं लागती; फार चांगली पिकाऊ जवळजवळची जमीन हाताखालीं आल्यानंतर कम-पिकाऊ अथवा जेथें चांगली सोय नाहीं, अशा जमिनीची लागवड होऊं लागती. परंतु ज्या जमीनी चांगल्या सुपीक नाहींत त्यांत धान्यादिक उत्पन्न करायास अधिक खर्च व मेहनत केली पाहिजे, अधिक खत घातलें पाहिजे, अधिक देखरेख ठेविली पाहिजे. इतकें करून पीक पुष्कळ येतें असें नाहीं, पिकलें पदरीं पडायास खर्च अधिक होतो.

गोपाळ : त्या बेटांत जे पहिल्यानें येऊन राहिले ते तिकडचे स्थायीक झाले. सुपीक जमीन मिळाली असेल तसी मागाहून येणारे उपरीसारखे त्यांस कोठून मिळेल? प्रथम वसाहत करणारांस मोठमोठे नफे होऊन ते लवकर मातबर होतील. कारण त्यांच्या पदरीं जीं पिकलीं पडतील तीं धान्यादिक एकेच जातींची असलीं आणि तीं उत्पन्न करायास खर्च अधिक उणा झाला असला, तथापि तीं विकिलीं असतां त्यांची समसमान किंमत येईल. कोणे समयीं असेंही घडेल कीं धान्यादिक उत्पन्न करायास फार थोडका खर्च बसून त्यांची किंमत फार मोठी येईल. कारण जमीन फार चांगली सुपीक असली म्हणजे बहुतकरून फार चांगला जिन्नस उत्पन्न होतो.

गुरु : प्रथम वसाहत करणाऱ्यांस आणखी एक लाभ होतो. ते फार चांगली सुपीक जमीन आटपतात इतकेंच नव्हे, तर ती जमीन फार चांगल्या सोयवार ठिकाणीं पाहून घेतात. वाहती नदी अथवा वाहतें बंदर या लगत अथवा शहराच्या आसपास शेतें मळे असले म्हणजे त्यांत झालेल्या जिनसाची गांवच्या गावीं आणि परक्याही गावीं विक्री करायास जसी सोय पडती तसें दूर दूर ठिकाणीं

जे लागवड करणारे त्यांस उत्पन्न केलेल्या जिनसाची विक्री करायास सोय पडत नाहीं. तथांत ज्या बाजारीं तो जिन्नस विकायाचा अथवा ज्या बंदरीं भरायाचा तेथें तो घरींहून नेला पाहिजे. त्याचें हेल मार्डेही असतें. म्हणून प्रथम वसाहत करणारांस जर पुंजीवर दर शेंकडा ३० रुपये कां होतनां याप्रमाणें प्राप्ति झाली तर दूरची कम पीक जमीनीची लागवड करणाऱ्यांस दर शेंकडा २५ प्रमाणें प्राप्ति होईल. एक तर फार चांगली सुपीक जमीन पदरीं असल्यामुळें सरासरी जमीनीच्यापेक्षां दुप्पट नफा होतो; तथांत कोणास भाडें द्यावें लागत नाहीं, असें असतां ते प्रथम वसाहत करणारे लवकर मोठे संपत्तिवान् होतात यांत आश्चर्य काय! यांच्या जर मनांत वागूं लागलें कीं आतां आपलें म्हातारपण होत आलें, आपल्या पदरीं जो माल आहे तो कोणास विकत न देतां कामधंद्याची दगदग सोडून घरीं स्वस्थ बसावें—तर ते काय करतील बरें ?

गोपाळ : हां हां कळलें. ते आपली जमीन कुळांकडे माड्यानें लाऊन देतील. तीं कुळें त्या जमिनीची लागवड करतील त्याबदल जें कांहीं देतील तेंच भाडें समजावें.

गुरु : होय, खरें. त्या बेटांतील जमीनीच्या मालकास वाटलें कीं आतां शेतकीचें खटलें सोडून देऊन स्वस्थ घरीं बसावें तर त्याचे जमीनीची लागवड करायास कुळांची कांहीं कमती पडणार नाहीं. कारण ज्यानीं मागाहून येऊन वसाहत केली त्यांस असें वाटेल कीं आपल्या पदरीं जीं शेतें आहेत तीं फार दूर, तथांत जमीनही चांगली सुपीक नाहीं, असें आहे. त्यापेक्षां प्रथम वसाहत करणारांपैकीं एक गृहस्थ आपली जमीन मक्त्यानें देणार, ती चांगली सुपीक आहे. तीं आपण लागवडीकरितां घेऊन तिचें त्यास दरसाल भाडें भरीत जावें, हें बरें, असें समजून ती जमीन ते आपल्याकडे घेतील.

गोपाळ : प्रथम वसाहत करणाऱ्यांस मागाहून वसाहत करणाऱ्यांपेक्षां दर शेंकडा ५ रुपये जास्ती मिळतात, कारण त्यांकडे चांगली सुपीक जमीन असती. मागाहून वसाहत करणाऱ्यांस जमीनीचा कमी पिकाऊपणा वगैरे कारणामुळें दरशेंकडा २५ मिळतात त्यांस जर ३० मिळूं लागले तर त्यांतून ५ रुपये भाड्याचे द्यावयास कांहीं अवघड पडणार नाहीं.

गुरु : खरें. असी स्थिति होणें हेंच भाडें उत्पन्न होण्याचें कारण समजावें. जमीनीचा मालक आपल्या घरींच लागवड करीत असतां त्यास ३० मिळत होते आणि कूळ आपली स्वतांचीच जमीन लागवड करीत असतां त्यास २५ मिळत होते, त्यास चांगली जमीन मिळाल्यामुळें ३० मिळूं लागले आणि त्यांतून ५ जमिनीच्या मालकास दिले, तर त्या कुळास पहिल्या प्रमाणें २५ सांचीच प्राप्ति होईल. या कुळाची आणि मागाहून येऊन जमीनीचे मालक होऊन आपल्या घरींच लागवड करणारे त्यांची प्राप्ति समसमान होईल. तेव्हां शेतकीच्या खटल्यापासून दरशेंकडा ३० प्रमाणें जो नफा व्हायाचा तो २५ प्रमाणें होऊं लागेल. इतका नफा कमी होईल.

गोपाळः : शेतकींत दर शेंकडा २५ रुपयाप्रमाणें जरीं मिळालें तरीं तो कम नफा समजूं नये, तो मोठाच नफा.

गुरु : होय, अशा दरानें नफा होऊं लागला तरी लोक लवकरच संपत्ति मिळवतील. देश जसा जसा संपत्तिवान होऊन त्यांतील लोकसंख्या जसी जसी वाढेल तसा तसा धान्याचा खप वाढेल, तसी तसी नविन जमीन लागवडी खालीं येईल. ती नवीन जमीन जसी जसी दूर असेल अथवा कम पिकाऊ असेल तशा तशा अडचणीनें त्या जमिनीची लागवड होईल. मग तिजपासून जो नफा होणें तो घटकाभर दरशेंकडा २० या मानानें कां होईना त्यापेक्षां अधिक होणार नाहीं. असें होतांच मागाहून वसाहत करणाऱ्यांस आपल्या जमीनीचें भाडें उत्पन्न करण्याची संधि येईल. कारण त्यांच्याहून जे मागें आले, त्यांस असें वाटेल कीं घरांतून पुंजी जमीनींत घालावी त्यांत कायदे दरशेंकडा २० मिळतात. जरी कोणास कांहीं द्यावें लागत नाहीं तरी ही जमीन नको. ज्या जमिनीच्या लागवडी-

पासून २५ मिळतात त्यांतून जरी ५ भाडें द्यावयास गेले तरी त्या जमिनीची लागवड करण्यांत फायदा आहे, असें समजून ते जमीन भाड्यानें घेऊं लागतील, तेव्हां शेतकींत जी पुंजी घालावी तिजवर जो नफा होणें तो उतरून दर शेंकडा २५ व्हायाचे ते दरशेंकडा २० होऊं लागतील.

गोपाळ : परंतु ज्यांनीं पहिल्यानें जमीन भाड्यानें घेतली, त्यांस दरशेंकडा २५ चे २५ नफा होणार नाहीं काय?

गुरु : कुळानें मालकाशीं जितके मुदतीचा करार केला असेल, तितकी मुदत भरे तोंपर्यंत तो तसा नफा त्या कुळास होईल. मुदत सरल्यानंतर होणार नाहीं, कारण आतां पुंजीवर नफा होणें तो उतरला. दर शेंकडा २० या मानानेच नफा होतो, असें मालकास समजलें म्हणजे तो कुळास म्हणतो, "अरे, लोक कांहींसे खडतर जमीनींत पुंजी घालीत असतां त्यांस दरशेंकडा २० उत्पन्न होऊं लागलें. माझी जमीन तर सुपीक असून चांगल्या ठिकाणीं आहे, ती आतां तुझ्याकडे पहिल्याच भाड्यानें ठेवणार नाहीं; तूं जर जास्ती भाडें देशील तर तुझ्याकडे ठेवीन" असें म्हणून तो मालक जास्ती भाडें बसवील. अथवा कुळांत चढाचढ होऊन तीं मालकाकडेस मागणी करितील तेणेंकरून सारा चढेल. कमपीक जमीनीची वहिवाट करणारा पदरीं जें उरून राहतें, त्यापेक्षां सुपीक जमिनीची वहिवाट करणारास जास्ती उरून राहतें. अवल, दूम, सीम अशा अनेक प्रतीच्या आणि बागाईत, जिराईत, पाटस्थळ, मोटस्थळ, खार, पाणस्थळ, भुकाड, बरड, अशा अनेक प्रकारच्या जमीनी असतात, तसें तसें सारा, धारा, स्वामित्व, भाडें इत्यादि जें त्या जमीनीविषयीं भरावें लागतें, तें अधिक उणें असतें. सारांश जसी जसी नवीन जमीन वहिवाटीखालीं येऊं लागती, जसी जसी ती कनिष्ठ प्रतीची अथवा कनिष्ठ प्रकारची असती, तसें तसें अगोदरचे वहिवाटलेले जमीनीचें भाडें अधिक मिळूं लागतें आणि पुंजीवर व्हायाचा जो नफा तो कमी होऊं लागतो.

गोपाळ : यावरून तर असें सिद्ध होतें कीं, जसें जसें जमिनीचें भाडें चढत जाईल, तसी तसी त्या जमीनींत झालेल्या जिनसाची किंमत चढत जाईल.

गुरु : तसें होणार नाहीं, भूमींत उत्पन्न झालेल्या पदार्थांची किंमत चढण्याविषयीं भाडें कारण नाहीं. त्या पदार्थांची किंमत चढल्यामुळे भाड्याची चाल झाली म्हणून भाडें कार्य समजावें. तूं पुढचें मागें आणि मागचें पुढें करितोस म्हणून तुला नीट समजत नाहीं.

गोपाळ : हें नीट समजणें मला तर कठिण आहे.

गुरु : मागाहून बोलत आलों त्याचा विचार कर म्हणजे सोपें होईल. बरें, कनिष्ठ प्रतीच्या जमीनीची लागवड कां होऊं लागती?

गोपाळ : लोकसंख्या अधिक झाल्यामुळें त्यांस अधिक धान्य पाहिजे म्हणून.

गुरु : अधिक धान्य पाहिजे हें कशावरून समजतें?

गोपाळ : धान्याची किंमत चढती त्याजवरून.

गुरु : धान्याची कमती झाल्यामुळें किंमत चढली, तर त्या संधीस धान्याची भरती अधिक करण्याविषयीं कसें काय होईल बरें?

गोपाळ : धान्याची किंमत चढली असें पाहून जमीनीचे मालक व शेत करणारे लोक यांस अधिक धान्य पिकवावयास उमेद येईल.

गुरु : उमेद येईल खरी, परंतु उत्तम प्रतीच्या जमीनी लागवडीखालीं असल्या तर मग कसें करावें? कनिष्ठ प्रतीच्या जमीनीची लागवड करावी लागेल, आणि धान्य पिकवावयास अधिक खर्च बसेल.

गोपाळ : अधिक खर्च बसेल तो त्या धान्याच्या अधिक किंमतींतून फिटेल.

गुरु : तेव्हां असें सिद्ध होतें कीं, धान्याचे भरतींत कमती झाली म्हणजे धान्याची किंमत चढती,

आणि ती किंमत म्हणजे तेंच कनिष्ठ प्रतीच्या जमीनी लागवडीखालीं आणायाचें कारण होतें.

गोपाळ : धान्याची कमती झाल्यामुळे त्याची किंमत चढती, तर धान्याची भरती जितकी पाहिजे तितकी झाली, आणि लोकांस पुरतेपणीं धान्य मिळूं लागलें म्हणजे धान्याची किंमत उतरून पाहिल्याप्रमाणें जसीची तसीच होईल.

गुरु : तसें झालें तर असें होईल कीं शेतकऱ्यांस कनिष्ठ प्रतीचे जमीनीची लागवड करायास जो खर्च झाला असेल, तो उत्पन्न होणार नाहीं.

गोपाळ : होणार नाहीं खरा. तेव्हां असें सिद्ध होतें कीं, धान्याची किंमत चढायास जें कारण त्याहून एक दुसरें कारण ती किंमत चढलेलीच राहावयास असावें.

गुरु : तें कारण कोणतें असावें तें तुला सांगावयास सुचत नाहीं काय ?

गोपाळ : कनिष्ठ प्रतीचे जमीनींत धान्य उत्पन्न करायास जो अधिक खर्च लागतो तोच तें कारण नाहीं काय ?

गुरु : होय, तोच तें कारण. धान्य अधिक पिकवून त्याची बाजारांत भरती अधिक झाली आणि धान्याची किंमत चढलेली राहिली नाहीं, तर शेतकी करणाऱ्यांस तोटा होईल, त्यामुळें ते ज्या जमीनीच्या लागवडींत कांहीं नफा न होतां तोटाच होऊं लागला त्या जमीनीची लागवड सोडून देतील.

गोपाळ : बरें, जितक्या धान्याचा खप असेल त्यापेक्षां अधिक पिकविलें तर त्या धान्याचे किमतीस कसें काय होईल ?

गुरु : ती किंमत उतरेल, आणि धान्य उत्पन्न करायास जो अधिक खर्च लागला असेल, तो खर्च उत्पन्न होई इतक्या पाडावरती किंमत येऊन राहील. त्याच्या पलीकडे उतरणार नाहीं; पलीकडे उतरली तर कमी भात पिकवून गांवांत कमी भरती करावी असें शेतकऱ्यांस वाटेल.

गोपाळ : बरें, लोकसंख्या वाढली त्यामुळें धान्याची अधिक भरती झाली असतां ही पुरी पडेना असें झालें तर धान्याची किंमत चढेल.

गुरु : चढेल यांत काय सांगावें ! ती किंमत चढून कनिष्ठ प्रतीच्या आणखी जमीनींची लागवड होऊं लागेल. सारांश, लोकांची संख्या वाढूं लागली म्हणजे त्यांस अन्न पुरें पाडायाकरितां जसी जसी कनिष्ठ प्रतीचे जमीनीची लागवड करूं लागावें तसी तसी अडचणींसी गांठ पडती, त्यामुळें तसा तसा त्या जमीनींत धान्य उत्पन्न करायास खर्च अधिक लागतो असें होतें. म्हणून कनिष्ट प्रतीची दरएक जमीन लागवडीखालीं आणिली असतां भाड्याचा दर वाढतो आणि नफा कमी होतो, आणि जो जिन्नस उपजतो त्याची किंमतही वाढती. कारण पाटस्थळ, जिराईत, अशा अव्वल प्रतीच्या जमीनींत फार कम खर्चानें भात पिकविलें अथवा तेंच केवळ मोठ्या अडचणीच्या जागेंत पिकविलें, तथापि बाजारांत नेल्यास त्या दोन्ही भातांचा पाड सारिखाच येईल.

गोपाळ : सारिखाच येईल यांत काय सांगावें ! जो भात विकत घेणारा तो तें कोणते जमिनींत पिकलें त्याची चवकशी कशास करीत बसेल ? चांगलें असेल तें पाहून घेईल. आपण सांगतां तसा बाजारांत दोन्ही भातांचा पाड सारिखा असतां भोजनास बसलेल्या गृहस्थाच्या पात्रावरील दोन्ही भातांचा पाड केवळ भिन्न असतो, हें नवल नाहीं काय ? साध्या भातास जो खर्च त्यापेक्षां साकरभातास चौपट खर्च लागत असेल.

गुरु : आपलें बोलणें कच्च्या भाताविषयीं चाललें आहे. तें कच्चें भात व सर्व प्रकारचा जो कच्चा जिन्नस पैदा होतो त्याची किंमत ठरणें, तो प्रकार असा आहे कीं, काहीं भाडें येऊं नये अशा ज्या अगदी कनिष्ट प्रतीच्या अथवा अगदी गैरसोईच्या जमिनी त्यांत जिन्नस उत्पन्न करायास जो खर्च बसतो, त्याच्या मानानें त्या जिनसाची किंमत ठरती. आतां ज्या उत्तम प्रतीच्या जमीनी त्यांत जिन्नस उत्पन्न

करायास जो सर्व खर्च बसतो तो वजा करून मागें जें उरतें, तेंच भाडें असें समजावें. शेतकऱ्यास जो नफा होणें तो जिन्नस उत्पन्न करायाच्या खर्चांतच आला. कारण सर्व खर्च असें म्हटलें आहे.

गोपाळ : जमीनीच्या भाड्याविषयीं व चांगलेवाईट जमीनीची लागवड होऊन भाताची व तशांच दुसरे जिनसांची किंमत उतरणें चढणें इत्यादिकांविषयीं जें बोलणें झालें त्याप्रमाणें इंग्लंडासारिख्या देशीं होत असेल, तसाच व्यवहार या देशीं होत नसेल. उगीच दृष्टांताकरितां एक गोष्ट सांगतों. चाळीस वर्षांपूर्वी मुंबईत व जवळजवळच्या ठिकाणीं भातास व नारळास जो पाड असे, तो आतां कोठे आहे? भाताच्या दर मुड्यास अथवा नारळांच्या दर हजारास जी किंमत असे ती उतरून सरासरी अर्धी झाली आहे. त्या वेळीं मुंबईत जे लोक होते त्यांजपेक्षां आतां चौपट वाढले. त्यांस चौपट अधिक अन्न लागावें, त्या प्रमाणें अन्नादिकांची किंमत वाढावी आणि तें उत्पन्न करायास शहराच्या आसपास शेतकी फार होत असावी; तर तसें नाहीं. अगदी उलटें झालें आहे, आणि शेतीचा मोड होत असतां जसी जसी शहरालगत अथवा शहरांत जमीन तसी तसी तिची किंमत आणि भाडें अधिक होत चाललें आहे हें कसें?

गुरु : अरे, आपलें बोलणें ज्या नियमांविषयीं चाललें आहे, त्या नियमास अगदी सोडून मुंबईत किंबहुना या भरतखंडांत व्यवहार होत आहे असें नाहीं; कळलें? मुंबईत जसी लोकसंख्या वाढूं लागली तसीं पूर्वी ज्या ज्या दूर दूर ठिकाणांहून दाणा गल्ला, फळफळावळ, शाकभाजी, इत्यादि माल येत नव्हता तेथून येऊन लोकसंख्येस पुरी पडायाजोगी भरती होऊं लागली म्हणून आतां धान्यादिकांची किंमत उतरली आहे. पूर्वी जवळजवळच्या ठिकाणीं जें उत्पन्न होई, तितकेंच कायतें मुंबईस येई; दूरदूरच्या ठिकाणाहून विरळा, अथवा थोडकें येई म्हणून भात नारळ इत्यादिकांची किंमत मोठी असे. शहरालगत जमीनींत शेतीचा मोड होत चालला आहे असें म्हणतोस तर त्याप्रमाणें शहराबाहेर प्रांतीं होत चाललें आहे काय? बाहेर प्रांतीं खेड्यापाड्यांत तर बहुधा शेतेंच दिसतात. शहरालगत जशीं शेतें नाहींसीं होत चाललीं आहेत तसे तेथें बागबगीचे होत चालले आहेत. बागाईत म्हटली म्हणजे तो एक कृषिकर्मांतीलच प्रकार आहे. जमीनीच्या धन्यांस भात पिकविल्यापासून जें उत्पन्न व्हायाचें त्यापेक्षां बाग केल्यापासून, अथवा मळा करायास अथवा कोणास घर बंगला इत्यादि बांधायास जमीन दिल्यापासून अधिक उत्पन्न होऊं लागलें, म्हणून ते शेतकीचा नाद सोडून बाग करणें, बंगले बांधणें इत्यादि खटल्याकडे जमीनीची योजणूक करूं लागले, आणि शेती कुळापासून जें मिळायाचें त्यापेक्षां भाड्यापासून फार उत्पन्न होऊं लागलें. असीं भाडीं जेथें लाखो रुपयांचा घडमोड होत आहे त्या शहराहून जीं दूरदूरचीं खेडींपाडीं, जेथें म्हटलें असतां कित्येक गोष्टींची गैरसोय, तेथें कोठून मिळणार? तेथें काय तें शेती कुळापासून जें थोडेंसें मिळतें तेंच भाडें. अरे जवळजवळच्या शेतांत व आगरांत जें भात व नारळ व फळफळावळ होणार तितक्यानेंच मुंबईतील लाखों मनुष्यांचा निर्वाह होत नाहीं; दूरदूरच्या प्रांतांहून व मुलखांहून जिन्नस किराणा येतो तेणेकरून त्यांचा निर्वाह होतो.

गोपाळ : होय, या देशांतून लाखो रुपये हरण करणारें असें जें इंग्लंडासारिख्या देशाहून कापड, लोखंडी काम, किलोर काम इत्यादि सामान येते, त्या योगानें या देशांतील जमीनीचें भाडें कसें वाढतें, आणि एखादे ठिकाणी पूर्वी जें धान्यादिक उत्पन्न होत असे, त्यांची किंमत कसी उतरती हें मला नकळे.

गुरु : तूं सांगतोस तेंच केवळ भाडें वाढण्याचें व धान्यादिकांची किंमत उतरण्याचें कारण नाहीं. तथापि त्यापासून पूर्वीच्या स्थितींत काहींसें अंतर पडतें; कळलें? अरे इंग्लंडादि देशाहून माल येऊन इकडे त्याचा व्यापार चालू झाल्यामुळें आपल्यास त्यापासून काही लाभ नाहीं, हानी आहे, असें तुला

वाटत असेल परंतु तसें केवळ नाहीं. हर एक प्रकारचा हरएक ठिकाणीं व्यापार-व्यवहार चालू झाल्यामुळें तेथील शेतीचा उद्योग काहींसा कमी होऊन काहीं जमीन बीनलागवड राहूं लागती, परंतु त्यामुळें जमिनीचें भाडें कमी येऊं लागतें असें नाहीं; उलटें अधिक येऊं लागतें, नवीन वसाहत होऊं लागती. दुकानें, कारखानें, वखारी इत्यादि इमारतींची गरज लागती, तेव्हां तीं ज्या जमीनीवर होतात त्या जमीनीचें भाडें शेतीच्या जमीनीच्या भाड्यापेक्षां अधिक येऊं लागतें, व व्यापारादिकांचे नवीन उद्योग चालू झाल्यामुळें ते उद्योग जे पत्कारितात त्यांस शेतकी करणाऱ्यांपेक्षां बहुधा अधिक प्राप्ति होऊं लागती. असें जेथें होऊं लागतें, तेथील उत्पन्न झालेल्या धान्यादिकांची किंमत उतरणें, त्याचें कारण असें आहे की मोठा व्यापार व वसाहत झाल्यामुळें एखाद्या ठिकाणाची प्रसिद्धी होऊन तेथें चहूंकडून धान्यादिक येऊं लागतात त्यांची भरती कोठेकोठे खपापेक्षां अधिक असती.

गोपाळ : आपण म्हणता अशा प्रकारच्या इमारती बांधून भाड्याचा लाभ होणें तो विरळाच होईल. जमीनीची शेतकीकडे योजणूक केल्यापासून जे लाभ होतात ते विशेष आहेत. इतकेंच कीं जमीन चांगली सुपीक असावी, हवापाणी चांगलीं असावीं.

गुरु : अरे असें आहे. प्रकृतीची साह्यता नसल्यामुळें कमी पिक यावयाचा योग असला तर कृतीची अनुकूळता होऊन संपतीची वृद्धि होती. शेती चांगल्या रीतीनें करायाच्या नवीन नवीन युक्ति निघत जातात, तेणेंकरून लागवडीस फार खर्च न बसतां धान्यादिक अधिक उत्पन्न होऊं लागतात, आणि तीं बाजारांत आणायास स्वस्त पडे असें होऊं लागतें. कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड करायास प्रथम अधिक खर्च बसतो, परंतु जसीजसी लागवड होत जाती तसीतसी ती जमीन चांगली कसत जाती, तसातसा तींत उत्पन्न करायाचा खर्च कमी होत जातो. चांगला बांध, चांगला खप, बुडी न बसे असा चांगला नाला इत्यादि शेती चांगली रुपास येण्याचीं जीं साधनें तिहींकरून बरड मुरुड असी जमीन असली तरी ती असतां असतां बहुतकरून सुपीक जमीन होती. जसी जसी लोकांचे वहिवाटीची चाल होत जाती तसीं तसीं गैरोईची जीं ठिकाणें तीं सोईचीं ठिकाणें होत जातात. असपास लोकांची वस्ती अधिक होऊं लागती, नवीन गांवें वसूं लागतात, बाजार भरूं लागतात या प्रमाणें होतें. लोकसंख्या नेहमी वाढत असली तर त्यांस अन्न पुरवावयाकरितां नेहमी नवीन जमीन लागवडीखालीं आणणें जरूर आहे. नवीन लागवड करणें जरूर नसतें तर धान्य उत्पन्न करायास कमी खर्च लागता, आणि त्याची किंमत चढणें तें एकीकडे राहून ती उलटी उतरती.

गोपाळ : आपण म्हणतां कीं जमीनींत जिन्नस उत्पन्न करायास जो खर्च बसतो तो वजा करून मागें कांहीं उरतें तेंच भाडें समजावें, ते जमीनीच्या मालकास दिलें जातें. असें जर आहे तर शेती चांगली रुपास यावयाजोगा उद्योग करून फळ काय? तेणेंकरून उत्पन्न झालेला जो कचा जिन्नस त्याची किंमत काहीं उतरणार नाहीं. तो जिन्नस ज्या जमीनींत झाला तिचें द्यावयाचें जें भाडें तें मात्र चढेल.

गुरु : तसें होणार नाहीं, अगदी कनिष्ठ प्रतीच्या अथवा गैरोईच्या जमीनीची लागवड करायास जसा जसा अधिक उणा खर्च लागतो, तसी तसी त्यां जमीनींत जो कचा जिन्नस पैदा होतो त्याची किंमत चढती उतरती म्हणून नुकतेंच बोलणें झालें. याकरितां त्या जमीनींत पिकवावयास जसजसा खर्च कमी लागेल, व त्या जमीनीची जी गैरोय ती जसी जसी नाहींसी होत जाईल, तसी तसी त्या जमीनींत झालेल्या जिन्नसाची किंमत उतरेल. आतां अगदी कनिष्ठ प्रतीचे जमीनींत दाणा उत्पन्न करायास दर फऱ्यास तीन रुपये या मानानें खर्च लागत असला, आणि शेतकी चांगल्या नवीन युक्तीनें सुधारून दाणा उत्पन्न करायास दर फऱ्यास दोन रुपये या मानाने खर्च लागूं लागला, तर दाण्याची धारण उतरून दर फऱ्यास दोन रुपये असी बहुतकरून होईल.

गोपाळ : एकून जसी जसी कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड होत जाती तसा तसा शेतकीच्या खटल्यांत जो नफा होणे तो कमी होत जातो, असेंच जर आहे तर लोक शेतकीच्या खटल्यांत पुंजीची फारसी योजणूक न करितां शिल्पव्यवहारांत कां योजणूक करीत नाहींत? कृषिकर्मांत हा जसा कमी नफा होतो तसा शिल्पकर्मांत होत नसेल.

गुरु : कृषिकर्मांत आणि शिल्पकर्मांत बहुतकरून सारखाच नफा होत नसता तर तूं म्हणतोस तसें लोक करिते. अरे असें आहे, कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखालीं आणण्यांत जो बहुधा कमी नफा होतो त्याचा संबंध एकट्या कृषिकर्मासीच असत नाहीं तर पुंजीची योजणूक करण्याचे जे नानाप्रकार त्यां सर्वांसी त्या कमी नफ्याचा संबंध असतो.

गोपाळ : तसें न होईल तर सर्व उद्योगापासून समसमान नफा कसा होईल? बरें, शेतकींत कमी नफा झाल्यामुळें इतर उद्योगांत कमी नफा कसा होतो?

गुरु : तें असें आहे. कोणी एकानें आपल्या पुंजीची योजणूक एखाद्या उद्योगांत केली म्हणजे देशांत जसें उत्पन्न होत असेल त्या प्रमाणें त्या उद्योगांत लाविलेल्या मनुष्याचा रोजमुरा जितका कमी देववेल तितका कमी तो पुंजीदार देऊं पाहतो. देशांत जीं अन्नादिक उत्पन्न होतात तीं तर मजुरांच्या पोटास संसारास अवश्य पाहिजेत; बरें, तीं उत्पन्न करायास अधिक खर्च बसल्यामुळें त्यांची किंमत वाढली, आणि मजुरांचा रोजमुरा न वाढला तर त्यांच्यानें तो महाग दाणा कसा घेववेल? म्हणून शेतकींत कमी नफा झाला म्हणजे मजुरांचा रोजमुरा वाढून इतर उद्योगांतही कमी नफा होतो.

चांगलें पिक न आल्यामुळें दाण्याची किंमत वाढली म्हणजे गोरगरिबांस खाण्याघेण्याची फार कमती होती; त्यांस कांहीं इलाज रहात नाहीं. परंतु चांगलें पिक न आल्यामुळें जी खाण्यापिण्याची तंगचाई ती फार दिवस रहात नाहीं, धान्यादि उत्पन्न करायास अधिक खर्च बसल्यामुळें त्यांची किंमत चढती, ती नेहमीं तसीच चढलेली राहती. तेव्हा ज्या पुंजीदाराच्या मनांतून असें असतें कीं, आपल्या पदरीं जितके मजूर आहेत त्यांतून कोणी कमी न होतां ते तितकेच राहवे. त्याला तर आपल्या पदरच्या मजुरांचा रोजमुरा वाढविला पाहिजे. मग तो शेतकीचें खटलें करणारा असो अथवा दुसऱ्या कांहीं उद्योगाचे खटलें करणारा असो. मजूर म्हटला मग कोणती कां मजुरी असेना, त्याचे पाठीस पोटखर्च लागलाच आहे.

गोपाळ : एकूण पुंजी पुष्कळ जमल्यामुळें रोजमुरा वाढतो तेव्हां जसें होतें तसें पिक कमी येऊन रोजमुरा वाढल्यामुळें होत नाहीं.

गुरु : अहः इः तसें सुख कोठून होणार? पिक कमी आल्यामुळे रोजमुरा वाढला तर अमुकास मजूर ठेविले पाहिजेत असें मजुरांचें अगत्य वाढत नाहीं. अथवा मजुरांचा संसारही चांगला होत नाहीं. तेव्हां कामावर ठेवणारापासून मजुरास अधिक रोजमुरा मिळाला तो पुंजी पुष्कळ झाल्यामुळें मिळाला नाहीं, दाणा उत्पन्न करायास अधिक खर्च लागूं लागल्यामुळे दाण्यास किंमत अधिक बसून मजुरास पोट भरणें महाग झाल्यामुळें अधिक रोजमुरा मिळूं लागला.

हें प्रकरण नीट समजून तुझ्या ध्यानांत राहवे म्हणून रोजमुरा वाढण्याचीं जीं कारणें तीं तुला सांगतों.

प्रथम—पुंजी जमली म्हणजे रोजमुरा वाढतो. तेव्हां मजुरास चांगली मजुरी मिळती, पुंजीचा नफा कमी होतो, लोकसंख्या वाढती, आणि देश चांगला नांदूं लागतो.

दुसरें—कृषिद्वारा धान्यादिक उत्पन्न करायास खर्च अधिक लागूं लागला म्हणजे रोजमुरा वाढतो. तेव्हां जरी नफा कमी होऊं लागला तरी मजुरांस पोटास चांगली मजुरी मिळत नाहीं. कारण

जमिनींतून जें उत्पन्न व्हायाचें तें पुरतेपणीं न झाल्यामुळें कामावर ठेवणारास, व काम करणारास जसें वांटून द्यावयाचें तसें द्यावयास पुरें पडत नाहीं.

तिसरें—धान्यादिकांची कमती झाल्यामुळें तीं महाग झालीं म्हणजे कोणेसमयीं रोजमुरा वाढतो. धान्याची कमती झाली तर परमुलखांतून दाणा येतो इतकाच काय तो फायदा. परंतु धान्यादिक महाग मिळणें तें काहीं चुकत नाहीं. म्हणून मजुरांचा रोजमुरा वाढला तरी त्यांस काय फायदा होणार? धान्यादिकांची कमती झाल्यामुळे मजुरदाराचें नुकसानच आहे.

गोपाळ : असें कां म्हणतां? धान्यादिक सुपीक जमिनींतून पुरत नसली तर कनिष्ठ प्रतीची जमीन खेडावी, ती तर निदानची गोष्ट आहे. बरें, पण कनिष्ठ प्रतीच्या जमिनीची लागवड झाल्याच्या अगोदर जसी धान्याची किंमत वाढती तसा तें धान्य घ्यावयास रोजमुरा वाढतो, मग मजुरदाराचें नुकसान कसें होईल?

गुरु : धान्याची किंमत आणि रोजमुरा वाढणें हें तर पुंजी पुष्कळ जमणें म्हणून जें प्रथम कारण सांगितलें त्या कारणापासून होतें. हें असें कोणे समयीं कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड झाल्याच्या अगोदरही होतें.

गोपाळ : पुंजी म्हटली म्हणजे अन्न वस्त्र किंबहुना मनुष्यास जें काहीं अवश्य आहे तें सर्व देणारी असी असतां, ती पुंजी कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड झाल्याच्या अगोदरच वाढली असली, तर मग कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड करायाचें काहीं अगत्य राहणार नाहीं. अहो, लोकसंख्या वाढूं लागली तिचा निर्वाह अधिक झालेल्या पुंजीनें होत आहे, तथापि त्या लोकसंख्येस अन्न अधिकत्व असलें पाहिजे, हें म्हणणें विसंगत नाहीं काय?

गुरु : मनुष्यास अन्नवस्त्रादिक जें काहीं अवश्य पाहिजे, तेंच केवळ पुंजी नव्हे, तर सोईचे, सुखाचे, ख्यालीखुशालीचे जिन्नस त्यांचाही पुंजीत संग्रह होतो. म्हणून पुंजी वाढली म्हणजे अन्नच वाढतें असें होत नाहीं. हें प्रकरण रिकार्डो साहेबानें संपतिव्यवस्थेवर निबंध केला आहे त्यांत स्पष्ट रितीनें दर्शविलें आहे, म्हणून तो ग्रंथांश मी तुला वाचून ऐकवितों.

धान्याचा खप अधिक होऊं लागल्यामुळें धान्याची किंमत चढली तर ती चढण्याच्या अगोदरच रोजमुरा वाढला पाहिजे; कारण लोकांस ज्या पदार्थांची इच्छा असती तो पदार्थ घ्यावयाचें जें सामर्थ्य तें त्यां लोकांत वाढलें नाहीं तर त्या पदार्थांविषयींचा खप वाढणार नाहीं. पुंजी जमली म्हणजे मजुरांस कामावर ठेवणारांत चढाचढी उत्पन्न होती. एक म्हणतो, मीं अधिक मजुरीनें मजुरांस ठेवितों. दुसरा म्हणतो, मी अधिक मजुरी देतों. असें झालें म्हणजे मेहनतीला मोल येतें.

गोपाळ : रोजमुरा वाढण्याचीं जीं आपण तीन कारणें सांगितलीं त्यांतलेंच हें प्रथम कारण होय. आपल्या त्या बेटांतील वसाहतींत असेंच झालें त्याचें मला स्मरण आहे.

गुरु : मजुराच्या पदरी वाढलेला रोजमुरा पडूं लागला म्हणजे तो अवघा आपल्या पोटालाच लावितो असें नाहीं तर संग्रह करून दुसरे उपयोगाचेंही सुख घेतो. खाऊन घेऊन च्यार पैसे जवळ झाले म्हणजे तो अपलें लग्न करितो. तेव्हां रोजमुऱ्यापैकीं जें उरत होतें किंवा दुसऱ्या उपभोगांकडे लागत होतें तें कुटुंबाच्या पोटास खर्चतें. याप्रमाणें अन्नाचा खप अधिक होऊं लागतो. धान्याची किंमत वाढती त्याचें कारण लोकांत खप वाढतो आणि खप वाढतो त्याचें कारण धान्य घ्यायास लोकांचे पदरीं च्यार पैसे झाले असतात. असी स्थिति असली म्हणजे सर्वसाधारण जो नफा होणें त्यापेक्षां शेती करणारास अधिक नफा होऊं लागतो. आणि धान्य उत्पन्न करायास जितकी पुंजी व्हावी तितकीची योजणूक होईल तोंपर्यंत तो अधिक नफा होईल. असें आहे, एका गावीं दाहा मुड्यांचा खप आहे व तितकेंच पिकायापुरती लागवड जमीन आहे. तेथें दाहा मुड्यांपेक्षां अधिक

खप होऊं लागला तर दाण्याची किंमत वाढेल; परंतु त्या खपाच्या बेताने जाजती भरती धान्याची झाली ती त्याच गावीं नवीन जमीन लागवड करून होऊ अथवा दुसऱ्या गावींचें धान्य येऊन होऊ, पण जाजती भरती झाली तर ती किंमत उतरेल. जाजती भरती झाली असतां धान्याची किंमत उतरून पहिल्याप्रमाणें होणे अथवा नेहमीं चढलेलीच असणें हें ज्या नवीन जमिनींत तें धान्य पिकेल त्या जमिनीच्या गुणावर आहे. लागवडीखालीं आलेल्या सुपीक जमिनीसारिख्या जमिनींत अधिक खर्च न बसतां पिकूं लागलें तर धान्याची किंमत उतरून पहिल्याप्रमाणें होईल. जर कमपीक जमिनींत अधिक खर्च लागून पिकूं लागलें तर किंमत नेहमी चढलेलीच राहील.

गोपाळ : शेतकीसंबंधीं पुंजी जमल्यामुळें जसा रोजमुरा वाढेल तसा त्या पुंजीवर जो नफा होणें तो कमी होऊं लागेल. हें असें होणें तरी कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखालीं आणल्याच्या पूर्वीच होईल.

गुरु : होय. पुंजी पुष्कळ झाली म्हणजे त्या पुंजीवर नफा कमी होतो, आणि रोजमुरा वाढतो. परंतु पुंजी पुष्कळ होणें व त्यापासून व्हायाचीं जीं कार्यें तीं होणें हें दोन दिवसच असतें, बहुतकाळ रहात नाहीं. कारण लोकसंख्या वाढत जाती तसा अन्नाचा खप वाढत जातो. शेती करणाऱ्यास वाढलेला रोजमुरा द्यावयाचा जो खर्च बसतो तो धान्यादिकांच्या चढत्या किंमतींतून मिळतो आणि पुंजीची दुसऱ्या रीतीनें योजणूक केल्यापासून जो नफा व्हायाचा त्यापेक्षां अधिक नफा कांहींकाळ होऊं लागतो.

गोपाळ : बरें, धान्यादिकांची किंमत वाढून अधिक नफा होऊं लागला तर शेतकरी ज्या जमिनीची लागवड करीत असेल त्या जमिनीचे मालकास शेतकऱ्याला अधिक भाडें द्यावयास लागत नसेल काय ?

गुरु : शेतकऱ्यास ठरलेलें भाडें मात्र द्यावें लागतें. एकेसालीं चांगलें पीक आलें अथवा न आलें हें त्याचें नसीब. तशांत त्यास जो फारच मोठा नफा होणें तो नेहमी होतो असें नाहीं. पूर्वी लागवडीखालीं आलेल्या जमिनींत जशी लागवड होती त्याचप्रमाणें नवीन जमिनीची लागवड होऊं लागली आणि तिजपासून झालेल्या अन्नाची गावांत भरती होऊन धान्याविषयीं जो खप आणि वाढला असेल तो नाहींसा होऊं लागला, तर धान्याची किंमत उतरून पहिल्याप्रमाणें होईल म्हणून भाषण झालें आहे. जसा कापडाचा खप अधिक असला म्हणजे त्याची तशी किंमत चढती; कापडाची भरती होऊन तो खप नाहींसा झाला म्हणजे ती किंमत उतरती. परंतु भरती करायास जें कापड आणिलें तें तयार करायास पहिल्यापेक्षां अधिक खर्च लागला असला तर कापडाची किंमत उतरून पहिल्याप्रमाणे होणार नाहीं. असेंच धान्याचे किंमतीविषयीं समजावें. जर जास्ती लागणारें धान्य कमपीक जमिनींत अधिक खर्चानें उत्पन्न होऊं लागलें तर त्याची किंमत खर्च नेहमी चढलेलीच राहील. सुपीक जमिनींत पिकवावयास जो खर्च लागतो त्यापेक्षां तितकेंच कमपीक जमिनींत पिकवावयास अधिक खर्च लागूं लागतो, त्यामुळें जिन्नसाची किंमत नेहमी चढलेली राहती; तेव्हां त्यास सुपीक जमिनीचा मालक त्या जमिनीवर भाडें वाढवितो.

पुंजी अधिक झाली असतां तिजपासून जो नफा होणें तो नेहमीच उतरलेल्या मानानें होणार नाहीं. पुंजीच्या मानाप्रमाणें लोकसंख्येचें मान वाढलें म्हणजे मजुरीस कोणी फार करून पुसेना असें होऊन मजुरीचें मान उतरले असें झालें असतां नफ्याचें मान वाढून पहिल्याप्रमाणें होऊं लागेल. जेव्हां अन्न उत्पन्न करायास खर्च अधिक बसूं लागतो तेव्हां रोजमुरा वाढलेल्या आणि नफा उतरलेल्या मानानें असतो.

गोपाळ : बरें, जिचें कांहींच भाडें उत्पन्न होऊं नये असी लागवड जमीन अस्त नाहीं काय ?

गुरु : अगदी कनिष्ठ प्रतीचे जमिनीची लागवड केली असतां भाडें, सरकार देणें इत्यादि किती एक मुदतपर्यंत उत्पन्न होत नाहीं. इंग्लंडसारिख्या देशीं संपत्ति आणि लोकसंख्या वाढल्यामुळें

जमिनीची लागवड फार होत चालली आहे. तेथें जीचें काहींच भाडें उत्पन्न होऊं नये असी बरड अथवा ओसाड जमीन थोडकीच असेल. पोलंड, रुसिया, अमेरिका अशा देशीं व या आपल्या देशीं कृषिकर्मांची जसी प्रवृत्ति असायाची तसी नाहीं म्हणून बिन् लागवड बिन् भाड्याची जमीन अधिक असती. असे जमिनीची लागवड केली असतां कुळंब्याचें पोट नीट सुटणार नाहीं; मग तो मालकास भाडें अथवा सरकारास देणें कोठून भरील ? असी जमीन भाडें व नफा उत्पन्न करणारे सुपीक जमिनीसारिखी एकदम होत नाहीं. ती कुळाकडे माफीने देऊन तीची लागवड होतां होतां तिजवर भाडें, देणें बसवायासारिखी कालेंकरून होती.

दर्यागर्क, नदीगर्क, डोंगरगर्क अशा जमीनी असतात. त्या कौलाने घेऊन त्यांस चांगले बांध घालून चांगली बंदिस्ती करून, त्यांत बेतापुरतें पाणी राही असें करितात. त्यांस कुपण घालून चांगलें खत लावुन त्या लागवडीस आणितात. अशी जमीन लागवडीस आणायास प्रथम आपल्या पदरचा खर्च करावा लागतो, तो खर्च सुटून जसें जसें पिकूं लागतें तसा तसा इस्तावा म्हणजे चढता सारा द्यावा लागतो, अथवा जसा कौल असेल कीं अमुक दिवस माफी, अमुक सूट त्याप्रमाणें द्यावें लागतें.

कोठे जमीन बिराईत असती अथवा बागाईत असती. कोठे एकेच जमीनींत दोन्ही प्रकार असतात. कोठें एक्याच ठिकाणीं बाग, शेत, त्या बागेंत पाणी लावावयास विहीर, त्या ठिकाणाची लागवड करणारास राहायास घर, गुराढोरांस गोठा, दाणा गल्ला सामान ठेवावयास पडसाळा हें सर्व त्या जमिनीच्या मालकाने आपल्याच खर्चाने करून ठेविलें असतें, तसें तसें तो भाडें अधिक घेतो. कोठे असें असतें कीं काहीं जमीन चांगली पिकाऊ असती; तिच्या लगत माट जमीन अथवा ओसीक असती त्यांत काहीं सांगायासारिखें उत्पन्न होत नाहीं. परंतु ती लागवड जमिनीचे पोटीं लागली असती म्हणून त्या जमिनीसुध्धाही सारा भरावा लागतो. कोठे असें असतें कीं फक्त जमिनीचेंच ठरलेलें भाडें मिळतें. कोणी शेतीचें खटलें करणारानें दरसाल २० रुपयांचे भाड्यानें जमीन घेतली त्या जमिनींत ५०० रुपयांची पुंजी घालून दरसाल दर शेंकडा १० रुपयांचें उत्पन्न करून घेतलें असतां त्या बिराईत जमिनीची बागाईत झाली आणि पुष्कळ उत्पन्न होऊं लागलें तर कुळास नफा फार होईल, परंतु भाडें जें ठरलें असेल तितकेंच तो देईल.

गोपाळ : पण मक्त्याची मुद्दत भरल्यानंतर त्या जमीनीचा मालक अधिक भाडें घेऊं लागेल.

गुरु : त्या जमिनींत शेतकरी जी जास्ती पुंजी घालील, त्या पुंजीपासून जसा नफा होईल, त्या मानानें जें अधिक भाडें देणें तें दिल्हें जाईल. जर त्या पुंजीपासून जितका नफा व्हायाचा त्यापेक्षां अधिक नफा न झाला, तर तो शेतकरी अधिक भाडें कोठून देईल ? तें पाहून त्या शेताचा मालकही अधिक भाडें मागणार नाहीं. त्यास असें वाटेल कीं मी अधिक भाडें मागों लागलों असतां शेतकरी आपली ज्यास्ती पुंजी शेतखटल्यांतून काढून दुसरे कोठे ज्यास्ती नफ्याचे ठिकाणीं लावील; कारण नेहमीचा जो नफ्याचा दर तितकाच नफा होऊं लागला तर भाडें द्यावयास उत्पन्न होणार नाहीं, मग तो आपलें शेत वहिवाटणार नाहीं.

गोपाळ : नाहीं होणार. कारण नेहमिचा जो नफ्याचा दर त्यांतून भाडें द्यावयास लागलें तर शेतकऱ्याचें नुकसान होईल असें आहे, त्यापेक्षा शेतकऱ्याचे पदरीं च्यार पैसे जमले असले तर तो त्या शेतखटल्यांत न घालितां दुसऱ्या एखाद्या खटल्यांत घालिल.

गुरु : खरें; पण नेहमिचा जो नफ्याचा दर त्यापेक्षां शेतकऱ्यास शेतखटल्यांत घातलेले ज्यास्ती पुंजीवर अधिक नफा मिळूं लागल्यास शेताचा मालक अधिक भाडें मागूं लागेल, तें शेतकऱ्यास द्यावयास सोय पडेल. बरें, गोपाळा, धान्याची किंमत उतरलि असतां त्यापासून काय फायदा होईल ?

गोपाळ : जर धान्य स्वस्त झालें तर त्याचा अधिक खप होईल आणि गोरगरिबांस पुष्कळ मिळूं लागेल.

गुरु : अरे, ज्या जमिनींत जें पिकायाचें तितकेंच त्या जमिनींत जरी भाड्याची माफी झाली तरी पिकेल. जर अधिक पिकलें नाहीं तर मग लोकांत धान्याचा खप अधिक कोठून होईल? धान्याची जी भरती व्हायाची त्यापेक्षां खप अधिक होऊं लागला तर जाणावें कीं दुकाळाचा पाया. हालीं दाण्याचा भाव दोन रुपये फरा आहे, त्याजवरून लोकांत धान्याचा खप नेमस्त होत आहे. म्हणजे दुसरें पिकलें येईतोंपर्यंत धान्य पुरे अशा बेताने खर्च होत आहे. जर सर्कार हुकमावरून तो धान्याचा भाव उतरला तर लोकात अधिक खप होऊन दुसरें पिकलें येई तोपर्यंत धान्य दास्तनीं राहाणार नाहीं. तूं म्हणसील कीं दुसरे वर्षी अधिक पिक येऊन जो तोटा पडला असेल तो नाहीसा होईल तर तसें होणार नाहीं, कारण हालीं धान्याचा जो भाव आहे त्या बेताने ज्या जमीनींची लागवड केली असतां खर्च भागतो, त्या जमीनीचि लागवड धान्याचा भाव कमि झाल्यामुळे होणार नाहीं. कारण कमि किमतीमुळें लागवडिचा खर्चच भागणार नाहीं. असें झालें असतां कोणे एके देशी जें उत्पन्न व्हायाचे त्याची कमती होईल.

गोपाळ : खरें. सरकारजुलमाने धान्यादिकांची किंमत उतरली असतां काय परिणाम होईल तिकडे माझें लक्ष गेलें नाहीं. बरें, पण जें उत्पन्न व्हायाचें त्याची कमती झाली असता त्याची पहिली जी किंमत त्यापेक्षा ती अधिक होणार नाहीं काय?

गुरु : अरे, दुसरें पिक येईतोंपर्यंत धान्याचा पुरोटा व्हावयास त्याची किंमत किती असली पाहीजे?

गोपाळ : तें हालीं ज्या भावाने विकत असेल म्हणजे दर फरा दोन रुपये इतकी असली पाहिजे.

गुरु : एकूंन धान्य दुसरें पिकलें येई तोंपर्यंत पुरें पडावें याकरीतां त्याची किंमत उतरीतां कामास नये. याजवरून तुलाही वाटेल कीं धान्याची कमती न व्हावी याजकरितां धान्याची किंमत चढलेलीच राहावी. ती कींमत चढलेलीच राहाणे यांत कांहीं अनहित नाहीं.

मनुष्यकृतीचे जे नियम ठराव इत्यादिकांपासून कसें काय होतें त्याचा विच्यार करूं गेलें असतां त्या नियमादिकांत वारंवार चुकी अढळतात, परंतु प्रकृतीसिद्ध जे नियम त्यांत तसें आढळत नाहीं. ते जाणो जसे काय शुद्ध हेतुनेच झाले आहेत असें अढळतें. त्या नियमाचा जसाजसा यथार्थपणें विचार करावा तसेतसे ते नियम प्रवृत्त करणारा जो जगदीश्वर त्याचें मोठ्या विस्मयानें अभिवंदन करावें असे भाव आपल्या अंतःकरणाचे ठायीं उत्पन्न होऊं लागतात.

याजवरून पाहातां असें सिद्ध होतें कीं भाडें, सारा, धारा देणें इत्यादिकांपासून काहीं अनहित होत नाहीं. हीं देण्याची चाल भूमीचे सुपीकपणापासून व भूमीच्या ज्या नाना प्रती त्यांपासून पडली आहे व भाडें इत्यादिक असल्यामुळें असें होतें कीं धान्याची जशी भरती होत असती त्याप्रमाणें धान्याचा खप होत असतो असें आहे. तथापि कृषीकर्मापासून जें उत्पन्न होतें त्याची किंमत मनुष्यकृतीने वाढली आणि त्यामुळे शेतकऱ्यापासून अधिक भाडें मिळु लागलें तर अनहित आहे. याजवरून असें सिद्ध होतें की धान्यादिक बाहेरून मोकळेंपणी येण्यास काहिं अटकाव केला असतां धान्यादिकांची आपल्याकडे किंमत वाढती परंतु त्यापासून असें होतें किं धान्याचा ज्यांस खप त्याच्या पदरचा ज्यास्ती ऐवज जमिनीचे मालकाकडे जाऊं लागतो.

गोपाळ : अमुक जिन्नस आपल्याकडे यावा अथवा न यावा, अमुक्याची अमुक जकात द्यावी असे जे अटकाव केलेले असतात, त्यापासून भाडें, सारा, धारा हीं ताबडतोब वाढतात काय?

गुरु : कौल करार, इत्यादिकांची मुदत भरे तोंपर्यंत भाडें इत्यादि वाढत नाहीत. कौल करार जोंपर्यंत चालत असतात तोंपर्यंत काय जो नफा अथवा तोटा होणें तो शेतकरी आपल्या दैवानें झाला असें समजतो. त्या कौलादीकांची मुदत सरून ते नविन करावे असें जेव्हां होते, तेव्हां नफ्याचा जसा दर असेल त्याप्रमाणें ते होतात, मग शेतकऱ्यास जसा नफा होत असेल त्याप्रमाणें भाडें अधिक

अथवा कमी देण्याचें ठरतें. कोठें असें ठरतें कीं पुंजीवर जो काहीं ज्यास्ती नफा होईल, तो अवघा जमिनीचे मालकास देऊंन साधारण जो नफा तितकाच शेतकऱ्यानें घ्यावा. कोठे असेंही घडते कीं जमिनीचे मालकास चांगलि हूशारी अथवा माहितगारी नसली अथवा त्यास फार लोभ नसला तर शेतकरी जितकें भाडें देऊं शकेल त्यापेक्षां त्यापासून कमी घेतलें जातें. परंतु असें क्वचित् घडतें. खर्च वेंच जाऊंन पुंजीचें जें काहीं उत्पन्न उरतें तें अवघें भाड्यांत जातें. तें भाडें वाजवी व चाली-प्रमाणें असें समजतात. यावरून असें सिद्ध होतें कीं ज्यास धान्याचा खप आहे, त्याला जमीनिचे मालकास भाडें म्हणून जी देणगी ती दिल्हीच पाहिजे. ती देणगी एकापासून काढुन दुसऱ्यास नेऊंन देण्याविषयीं शेतकरी लगाच एक साधन आहे.

भाडें, धारा इत्यादि कशीं उत्पन्न झाली, त्यांची चाल कशी झाली त्यांविषयींचे नियम तुला यथास्थीतपणें सांगितले. हा सर्व प्रकार प्रथम मालथस साहेबानें प्रकट केला. नंतर त्यापासून कसे काय उत्पन्न होते व काय काय परिणाम होतील, याविषयी रिकार्डो साहेबानें कल्पना चालवून पुरतेपणी विचार केला आहे.

गोपाळ : मला वाटतें, आपण या प्रकरणीं जें बोलिलां तें मी अवघें समजलो. त्याची मी एकूणांत करून दाखवितों म्हणजे मला निट कळलें किंवा कसें हें आपणास समजेल. प्रथम तर जसी पुंजी जमुं लागती तसा मेहनतीविषयीं खप अधिक होऊं लागतो, म्हणजे लोकांस आपल्याकडे मजुर ठेवण्याचें अगत्य वाटतें. त्यामुळे रोजमुरा वाढतो, तेणेंकरून गोरगरीब लोक सुखी होऊं लागतात. त्यांची संतती वाढूं लागती, त्यामुळें धान्यादिकांचा अधिक खप होऊं लागतो, तेणेंकरून धान्यादिकांची किंमत काहीं काळ चढती, त्याजवरून अधिक जमिनीची लागवड करावी असी शेतकऱ्यांस ऊमेद येती. जर ती नविन जमीन कनिष्ठ प्रतीची असली तर त्या जमिनींत पिकवावयास अधिक खर्च लागतो त्यामुळें धान्यादिकांची किंमत बहुधा वाढती आणी उतम प्रतीचे जमिनीचें भाडें सारा इत्यादि उत्पन्न होऊं लागतें. त्यामुळें असें होते कीं, धान्यादिक नेहमी माहाग मिळूं लागतात, त्यामुळें रोजमुऱ्याचा दर नेहमि चढला राहतो, त्या प्रमाणें नफ्याचा दर उतरतो.

गुरु : बाबा, त्वां फार चांगली एकुणांत केली. म्या तुला जें सांगितलें त्याचा चांगला बोध झाला, तें पाहून मला आनंद वाटला. हें धारा व भाडें, याचें प्रकरण. असें आहे कीं देशव्यवहारव्यस्थेचीं जीं मोठीं मोठीं प्रकरणें त्यांजपेक्षां या प्रकारणाचा अलीकडे जरी फार विचार केला आहे तरी याचा पुरतेपणीं शोध लागून बोध झाला नाहीं.

# उत्तरभागसंवाद १४

## स्थावर मालाचे उत्पन्नाविषयीं

पुंजीचे दोन प्रकार–उत्पन्नाचे दोन प्रकार–शेतकऱ्यास पुंजीवर नफा होतो तो–जमीनीचे कौल करार–धातूच्या खाणी खणण्याचा उद्योग–मासे मारण्याचा उद्योग—

गोपाळ : मागल्या संवादांत जें बोलणें झालें त्यावरून असें होतें कीं जमीनीचे धन्यास एक उत्पन्न आणि जमिनीची लागवड करणारास एक उत्पन्न असीं दोन निर्निराळीं उत्पन्नें कृषिकर्मापासून होतात.

गुरु : तीं जसीं दोन निर्निराळीं उत्पन्नें तशाच तीं उत्पन्नें करून घ्यावयास निर्निराळ्या दोन पुंजीही लागतात. एके पुंजीने जमीन विकत घेतात आणि एके पुंजीनें त्या जमिनीची लागवड करितात. जो कोणी पैका देऊन जमीन घेतो, तो त्या जमिनीचा धनी होतो, त्याला त्या जमिनीचें भाडें मिळतें, तेंच त्याचें उत्पन्न. जो कोणी जमीन मक्त्यानें घेऊन त्या जमिनीची लागवड करण्यांत पुंजी घालतो, त्या जमिनींत जें पिकतें तें त्या शेतकऱ्याचें उत्पन्न.

गोपाळ : मला वाटत असे कीं जमीनच पुंजी होय, तिजपासून शेतकऱ्यास जो नफा होणें तो होतो.

गुरु : तसें नव्हे. जो ज्या जमिनीचा धनी त्याची ती जमीन पुंजी होय. तिजपासून त्यास जें मिळतें तें त्याचें उत्पन्न. शेत करणारासही त्या जमिनीपासून मिळतें परंतु तें लागवड केल्यानें म्हणजे त्या जमिनींत मेहनत करून व खर्च करून मिळतें.

गोपाळ : शेतकऱ्यास शेतांत जें उत्पन्न होतें त्यास जो खर्च लागतो त्या खर्चापेक्षां उत्पन्न झालेल्याची अधिक किंमत मिळेल तर नफा होईल. त्या नफ्याच्या ऐवजांतून लागवडिचा खर्च भागेल.

गुरु : शेतकऱ्यास जो नफा होतो त्यांतून भाडें जाऊन बहुतकरून त्याचे कुटुंबाचे निर्वाहापुरतेंच उरतें. बरें प्रथम तो शेतकी करूं लागला आणि त्याच्याजवळ कांहीं पुंजी नसली तर शेतकीस जो खर्च करायाचा तो कोठून करील? मजुरांस मजुरी द्यावयास गुरें, गाडे, नांगर, इत्यादि शेतीचें सामान घ्यावयास पुंजी पाहिजे. शिल्पी लोकांस जसें यंत्रादिकांचें अगत्य तसेंच कृषि करणारास लागवडीचे साधनाचें अगत्य. तीं साधनें नसल्यास त्यानें नुस्ती जमीन घेऊन काय करावें? तस्मात् लागवडिचा खर्च करायास त्याच्याजवळ पुंजी नसली तर त्याच्याने कोणेएके जमिनीचा मक्ता करवणार नाहीं.

गोपाळ : मला असें वाटत असे कीं शेतांत जें उत्पन्न होतें तें खर्चवेंच भागायापुरतें असतें. जर उत्पन्नापेक्षां लागवड करण्याचा खर्च भाडें इत्यादिकांस अधिक ऐवज लागूं लागला तर मग शेतीपासून काहींच नफा होणार नाहीं.

गुरु : तसें नव्हे, शेती करणाराचे पुंजीची प्रथम योजणूक शेत खटल्यांत होती, पिक आलें म्हणजे मजुरांचा, सामानाचा, भाड्याचा, जो खर्च झाला असेल तितका सुटून त्याची प्रथमची पुंजी त्याचे पदरीं पडून त्या पुंजीवर झालेला नफाही त्याचे पदरीं पडतो. याजवरून असें सिद्ध होते कीं जें

भाडें द्यावयास लागतें व लागवड करावयास जो खर्च होतो त्यापेक्षां शेतींत उत्पन्न अधिक होतें. याच प्रमाणें पुंजीची योजणूक कोणत्याही दुसऱ्या खटल्यांत केली असतां होतें. शिल्पी प्रथम आपली पुंजी सामान विकत घेण्यांत, कारागिरांस मजुरी देण्यांत घालितो. तसाच व्यापारी माल खरेदी करण्यांत आपली पुंजी घालितो. पुंजीची प्रथम योजणूक केल्यावांचून कोणताही धंदा चालणार नाहीं. जी पुंजी प्रथम वहिवाटावी ती मागाहून तिजवर झालेल्या नफ्यासुद्धां पदरीं पडती.

गोपाळ : खरें, आपण म्हणतां तसेंच होतें. जो कोणी मजुरास ठेवितो आणि त्यास मजुरी देतों त्या मजुरीपेक्षां तो मजुर आपल्या धन्यास अधिक उत्पन्न करून देतो. असें जें अधिक उत्पन्न होतें तें त्या धन्याचा नफा समजावा. शेतकऱ्याजवळ मजुरांस द्यावयास ऐवज नसला तर तो त्याला काम करायाला कशास ठेविल?

गुरु : शेतकरी आपली पुंजी शेतखटल्यांत घालतो त्यापासून त्यास जो नफा होतो, त्या विषयीं आपले नुकतेंच बोलणें झालें त्याचें तर तुला स्मरण असेल. शेतकऱ्यानें आपली तिन हजारांची पुंजी शेतखटल्यांत घातली आणि भाड्याचा व लागवडिचा खर्च भागून त्यास दर शेंकडा दाहा रुपयाप्रमाणें मिळालें तर तिनशें रुपयांचा नफा होईल.

गोपाळ : तेव्हां मागल्या वर्षापेक्षां त्याचे पदरीं तिनशें रुपये वाढतील.

गुरु : होय. त्यानें त्या अवघ्या वर्षांत कांहींच खर्च केला नसला तर वाढतील, परंतु शेतकऱ्याचा अवघा संसार चालणें त्यास शेतीचाच आधार असतो. म्हणून जसा त्याचा घरखर्च असेल आणि जसें त्याचें उत्पन्न असेल त्या त्या प्रमाणें वर्षाकांठीं त्याच्या पदरीं पैका वाढेल अथवा कमी होईल.

गोपाळ : बरें, ज्या जमिनीत शेंकड्यास दाहा रुपयाप्रमाणें मिळतें त्या जमिनीचें भाडें काय द्यावें लागत असेल?

गुरु : जमिनीची लांबीरुंदी जसी असेल, ती जसी सुपीक अथवा कंपीक असेल बहुधा त्याप्रमाणें भाडें द्यावें लागेल. चांगली लागवडीखालीं आलेली तशांत सुपीक असी चांगली मोठी जमीन असली तर तींत चांगल्या रितीने शेती वगैरे करण्यास तीन हजार रुपये लाविले तरी लागतील, पण त्या जमिनीपेक्षा अर्धी जमीन असून तेथें चांगली सोय नसली, तशांत जमीन कंपीक असली, तर त्या जमिनीची लावड करायासही तितकेच रुपये लागतील. ह्या दोन जमिनींचीं जीं भाडीं द्यावयाचीं तीं अधिक उणीं अशा मानानें दिल्हीं जातील.

गोपाळ : चांगली मोठी जमीन असली तर तिचें भाडें अधिक मिळेल. ल्हान असून गैरसोयची जमीन असली तर तिचें भाडें कमी मिळेल.

गुरु : शेतकऱ्यास जसें थोडकें भाडें द्यावें लागतें तसा त्या जमिनीचे खराब्यामुळें अधिक खर्च करावा लागतो, आणि जसें अधिक भाडें द्यावें लागतें तसा जमिनीचे चांगलेपणामुळें कमी खर्च लागतो. या प्रमाणें पाहातां त्यां जमिनींत जी पुंजी घातली असेल, त्या पुंजीवर समसमान नफा होईल. सरासरी पाहातां असें दिसून येईल कीं ज्या जमिनीची लागवड करायास च्यार हजार रुपये लागतील, त्या जमिनीचें भाडें सुमारें दोनशें रुपये होईल; म्हणजे शेतकऱ्यास दोन वांटे आणि शेताच्या धन्यास एक वांटा असे मिळेल. भाड्याचा दर एकसारखाच नसतो. कोठें अर्धलीचे बोलानें, कोठें तिजाईचे बोलानें जमिनीची लागवड होत असती.

गोपाळ : अर्धल म्हणजे जें पिकेल त्याचा अर्धा अंश जमिनीचे धन्यास द्यावा, तिजाई म्हणजे तिसरा अंश द्यावा असाच अर्थ होतो ना? एकून जमिनीच्या धन्यापेक्षा लागवड करणारास तिप्पट चौपट नफा होतो.

गुरु : तसें नव्हे. सर्व जें उत्पन्न होतें त्यांतून नुस्तें भाडेंच द्यावें लागत नाहीं, लागवडखर्चही द्यावा लागतो. उत्पन्नांतून भाडें वजा जाऊन जें राहतें त्यांतून अर्धें लागवडखर्चास जातें. तेव्हां शेतींत च्यार हजार रुपयांची पुंजी वहिवाटली असेल, त्या पुंजीवर दरशेंकडा दाहा प्रमाणें च्यारशें रुपये उरतील तो कायतो नफा असें सिद्ध होतें. त्या च्यारशांतून पन्नास रुपये सांचवून ठेविले असले, तर तो ते शेताची चांगली लागवड होई अशा रीतीनें त्याच शेतांत खर्चील, तर त्यास येते वर्षीं अधिक पीक येऊन अधिक उत्पन्न होईल, परंतु भाडें द्यायाचें तें अधिक द्यावे लागणार नाहीं, करारावप्रमाणें द्यावें लागेल.

गोपाळ : त्या कराराची मुदत भरल्यानंतर जमिनीचा धनी नवीन करार करीतेसमयीं जमीन चांगली लागवडीस आलेली पाहून भाडें वाढविणार नाहीं काय?

गुरु : होय वाढवील. जमिनीची लागवड होण्याकरितां जे कौल, करार ठरतात त्यांची थोडकीच मुदत असत नाहीं. जमिनीची किती एक मुदत लागवड करावी तेव्हां ती पिकती होऊन लागवड करणारास नफा होतो. याजकरितां कौल बहुत वर्षांचा असेल तरच शेतकऱ्यास लागवड करण्याची उमेद होईल.

गोपाळ : बरें, दुसरा मक्ता देणे तो पहिलेच कुळास देतात किंवा कोण्या दुसऱ्यास देतात?

गुरु : बहुतकरून पहिल्याच कुळास देतात. कारण त्यानें मेहनत करून जमीन चांगली नावारुपास आणिली ती थोडक्यासाठीं त्याजपासून काढून दुसऱ्यास दिल्ही, तर तें पाहून मक्ता घेणारे जमीन चांगली करण्यास झटणार नाहींत. आणि मक्ता घेणाऱ्याकडे जमीन जसीची तसीच राहिली तर त्यांत शेवटीं जमीनीचें धन्याचें नुकसान आहे. कोठे कोठे फार मुदतीचा मक्ता करून देत नाहींत; कोठें सालाची, कोठे महिन्याची असी बोली करून जमीन वगैरे भाड्याने देतात. कोठें मक्ता घेणाराबरोबर असा करार असतो, कीं तूं अमुक ओसीक जमीन लागवडीस न आणलीस अथवा बागेंत नवी लावणीं न केलीस, तर तुझ्यापासून जमीन काढली जाईल. अशा मकत्यांत मक्ता घेणाराचें हित आहे, चांगली लागवड केल्यापासून अधिक उत्पन्न होण्याच्या आशेनें, तसेंच आंळसामुळें जमीन पडित राहिली असतां मक्ता दुसऱ्याकडेस जाण्याच्या भयानें, तो एकसारखा उद्योग करीत असतो, असें कोणाचें म्हणणें आहे; परंतु अशा करारामुळें असें होतें कीं, जमीनीचा धनी भला मनुष्य नसल्यास काहीं एक निमित पाहून कुळास जमीनीतून काढून टाकील, तेव्हां त्याने जे त्या जमीनींत पुढच्या आशेवर श्रम केले असतील ते व्यर्थ जातील. उद्योगेंकरून जें काहीं प्राप्त होईल तें आपल्याजवळ राहील न राहील असी मनात शंका वागणें ह्याच उद्योग करण्यास मोठा अटकाव आहे. धन्याच्या मर्जीस येईल तेव्हां तो आपल्यास काढील, असें कुळास वाटूं लागलें असतां तो चांगली लागवड करण्यास झटणार नाहीं.

गोपाळ : थोडक्या मुदतीने बाहेर जमीन लावून देऊं नये म्हणून चौथ्या संवादाचे अंती बोलणें झालें. जमीनीचा धनी भला मनुष्य असल्यास थोडक्या कारणावरून जमीन काढणें अथवा काहींसे अधिक उत्पन्न दिसलें म्हणजे अधिक भाडें बसविणें असें तो करणार नाहीं. पण त्यामागें त्याचा वारीस त्याच्यासारिखा नसला, क्षुल्लक मनुष्य असला तर तो विपरीत करण्यास चुकणार नाहीं. कुळाचा माल, जिन्नस इत्यादिकांचें संरक्षण न झालें तर त्याची कुळवाडी कसी चालेल?

गुरु : खरें. मालाचें संरक्षण असल्यामुळें उद्योगाची चाल होण्यास फार अनुकूलता होती. म्हणून शेतकीची चांगली चाल होण्याकरितां सरकाराकडून जो मोठा आश्रय असणें तो असा असावा कीं जमीनीची चांगली लागवड करायास जमीनीवर शेतकऱ्याची सर्व सत्ता असावी, व जमीन नावारुपास आणण्यापासून जी प्राप्ति होईल ती अवघी त्याचीच, त्यांतून कोणी काहीं हरण करणार नाहीं, असी त्याची खातरी व्हावी. याप्रमाणें सर्काराकडून बन्याव झाला असतां नीट आहे.

शेतीची चांगली चाल होण्याकरितां मुख्य उपाय असा आहे कीं, जसा कोणेएकाचा आपले मालावर धनीपणा असतो त्या मालाचें त्याकडे रक्षण होतें तें त्याचप्रमाणें सरकारानें जमिनीची लागवड करणाराची जमिनीवर सत्ता राखावी व लागवड चांगल्या रितीनें होई असी त्यास अनुकूलता करून द्यावी. दुसरें असें कीं, जो कोणी जमीन चांगली नावारूपास आणील त्यांत जें उत्पन्न होईल तें अवघें त्यालाच देववावें.

शेतकीविषयीं बोलणें झालें इतकें पुरे. आतां दगडी कोळसे धातु इत्यादि खनिज वस्तु काढायास खाणी खणन्याचा जो उद्योग चालला असतो त्याचा काहीं विचार करूं. तो उद्योग शेतकीच्या खालीं सांगितला आहे, कारण शेतीचे खटल्यांत जसें भाडें उत्पन्न होतें, तसें त्याही उद्योगांत उत्पन्न होतें.

पृथ्वीचे बाहेरलें अंग भूमी आहे, ती जसी बरी वाईट असतीं तसें अधिक उणें उत्पन्न होतें. त्याचप्रमाणें पृथ्वीच्या आंतल्या आंगी ज्या खाणी ध्याव्या त्या जशा बऱ्यावाईट लागतात त्याप्रमाणें त्यांचे अधिक उणें उत्पन्न होतें.

गोपाळ : पडित जमीन लागवडीखालीं आणायास जो खर्च लागतो, त्या बेताने जसी धान्याची किंमत ठरती, त्याचप्रमाणें नवीन खाण खणून धातु काढण्यास जो खर्च लागत असेल, त्या बेताने त्या धातूंची किंमत ठरत असेल.

गुरु : पृथ्वीचे बाहेरच्या आंगची शेवटची पडित जमीन बहुतकरून केवळ कनिष्ट प्रतिची असती. तेथें कितीएक गोष्टीची सोय नसती म्हणून तिची लागवड झाली नसती. परंतु असें खाणीविषयीं समजूं नयें. जसी जमीन पाहण्यांत येती, तसें पृथ्वीचे पोटीं काय कसें आहे, तें पाहण्यात येत नाहीं. म्हणून वारंवार असें घडून येतें कीं नवीन खाणींत पूर्वी खणलेल्या खाणीपेक्षां अधिक धातु उत्पन्न होती. म्हणून ज्यां खाणीपासून फार थोडकें उत्पन्न होतें त्यातून धातु काढण्यास जो खर्च लागेल त्याप्रमाणें त्या धांतुची किंमत ठरेल असें म्हटलें असतां चालेल.

दगडी कोळसे खणून काढायाच्या खाणी बहुधा इंग्लंडासारिख्या देशीं असतात. त्यां खाणींत काम करायास जरी यंत्रें चालू केलीं असतात, तरी हजारो मजूरदार तें खणण्याचें काम करायास लागतात. या उद्योगापासून एवढें उत्पन्न होतें कीं, त्यां हजारो मजूरदारांची पोटगी चालून त्यांला ज्यानें कामांवर ठेविलें असतें, त्यास प्राप्ति होऊन त्या खाणी ज्याचे जमीनीत असतात त्यासही भाडें दिल्हें जातें. हें भाडें शेतीचे जमीनीचे भाड्यापेक्षां बहुतकरून मोठें असतें, कारण दगडी कोळश्यांचा लोकांत फार खप असतो. किंबहुना जमीनीत जें उत्पन्न होतें त्यापेक्षा दगडी कोळश्याचे खाणींत जें उत्पन्न होतें, तें अधिक किमतीस चढलें आहे.

गोपाळ : ज्या धातूच्या खाणीं असतात त्यांतून जें उत्पन्न होतें, तें तर आपण सांगतां त्यापेक्षां अधिक किमतीस चढलें असेल.

गुरु : होय. आणि तश्या खाणींचें भाडेंही अधिक असतें. परंतु जो कोणीं त्या खाणीं भाड्यानें घेऊन त्यांत आपली पुंजी वहिवाटितो, त्या पुंजीदारास व खाणींत काम करणारांस जो नफा होणें तो फार होत नाहीं; खाणींची किंमत केवळ धातूचे जातीवर असत नाहीं, धातु ज्या मानानें लागती त्याप्रमाणें ही खाणींची किंमत असती, म्हणून वारंवार असे घडतें कीं, रुप्याच्या खाणींपेक्षा शिशाच्या खाणींचें भाडें अधिक मिळतें. धातूच्या खाणीं खणण्यांस जो खर्च लागतो, त्यापेक्षां दगडी कोळश्याच्या खाणींत खणायाचा खर्च कमी असतो. कोळश्याच्या खाणींतून कोळसा खणून काढला म्हणजे झालें, धातूच्या खाणींत तर मोठें अडचणींचें काम असतें. धातुची जी माती त्या मातीतून त्या धातु मटीच्या योगाने निराळ्या कराव्या लागतात, त्यांस अनेक संस्कार करावे लागतात

तेव्हां त्या व्यवहारांत उपयोगी पडायासारिख्या होतात. पुंजीची वहिवाट दुसरे उद्योगांत करावी त्यांत जें जोखीम व अनिश्चितपणा असतो, त्यापेक्षां खाणीं खणण्याच्या उद्योगांत अधिक असतो. त्यामुळें असें घडतें कीं इतर उद्योगापेक्षां या उद्योगानें लोक मातबर फार होतात तसे गरीबीसही फार मिळतात.

गोपाळ : एकून या उद्योगानें जसा तोटा होण्याचा तसाच प्राप्ति होण्याचा योग असतो. परंतु सरासरी पाहातां मला वाटतें कीं, पुंजीची वहिवाट इतर उद्योगांत केली असतां जो नफा होतो, तोच नफा या उद्योगापासून होत असेल.

गुरु : साधारण मानानें जो नफा होत असतो, त्यापेक्षां खाणी खणण्याच्या उद्योगापासून कमी नफा होत असेल. सर्व जीं जोखमाचीं कामें त्यांत लोक आपल्या दैवांवर भरवसा ठेऊन हात घालितातां त्या कामापासून जो लाभ अलाभ होणार त्याचा वास्तविक रीतीनें विचार न करितां आग्रहांस या कामांत दैव अनुकूल होईल, असा बहुधा लोकांचा समज असतो. याचप्रमाणें सोडतीचे खटल्यांत आपल्या दृष्टीस पडतें. सर्वांस दैव अनुकूल होऊन सोडती मिळणार नाहीं, असें पक्केंपणी समजत असतांही लोक आपला पैका नेऊन सोडतीचे भरीस घालितात. या सोडतीपेक्षां खाणीं खणण्याचा उद्योग मोठा लाभदायक आहे, तरी सोडतीप्रमाणेंच बहुत्येकास कांहीं मिळत नाहीं; थोडक्यांसच काय जें मिळायाचें तें मिळतें. मिळण्याची आशा व भरंवसा मनांत वागूं लागला असतां जाणूं जसें काय मिळालेंच असें जिवास वाटूं लागतें. सारांश, खाणीं खणण्याच्या उद्योगापासून जो नफा होतो तो पाहून जसा कित्येकांचा हिरमोड होतो तसी धातूची जितकी भरती व्हावयाची तितकी न झाल्यामुळें त्या धातूंची ऊंच किंमत पाहून धातु खणण्याच्या उद्योगाकडे पुरतेपणीं पुंजीची योजणूक करायास कित्येकास उमेदही येती.

गोपाळ : महाराज, आपल्या या देशीं धातु इत्यादि खनिज वस्तु खाणी खणून काढण्याचा उद्योग फार चालत नसेल, कारण दगडी कोळसे व तशाच दुसऱ्या उपयोगी धातु आपल्या देशीं नसतील. इकडे खाणीं खणल्या असतां व त्या मोठ्यां मोठ्यां मुंबईसारख्या शहरालगत असल्या असत. त्यांतून माती, दगड, कड अशाच विकायासारिख्या वस्तु उपन्न होतील; अमोलिक वस्तु कोठून उत्पन्न होतील?

गुरु : अरे, असें कां म्हणतोस? हिऱ्यासारिखे बहुमूल्य पदार्थ उत्पन्न होण्याच्या खाणीं या आपल्या देशीं गोवळकोंडें प्रांतीं, मार्वाड देशचे उत्तरेकडे इत्यादि स्थळीं आहेत. त्या खाणीं ज्या जमिनींत खणावयाच्या त्या जमिनीच्या धन्याबरोबर फार मोठें भाडें देण्याचा करार करून त्या खाणीं घेतात. लोखंड इत्यादि धातु उत्पन्न होण्याचीं कोठे कोठे ठिकाणें या आपलें जंबुद्वीपीं आहेत.

खाणीं खणण्याच्या उद्योगाखालीं मासे मारण्याचा उद्योग सांगितला आहे. या उद्योगांत पुंजी वहिवाटिली असतां उत्पन्न होतें. इंग्लांड देशीं मासे मारण्याचे उद्योगांत फार मोठ्या पुंजीची वहिवाट करितात. तेथें तेल इत्यादि उत्पन्न करावयास मोठे मोठे मासे आणि लोकांकरितां लहान लहान मासे मारितात. हा उद्योग समुद्रांत होत असतो. समुद्र म्हटला म्हणजे कोणे एकाचा माल आहे, असें नव्हे, म्हणून तेथें या उद्योगापासून कोणास भाडें मिळत नाहीं; परंतु गावांत नदी, डोह, तळें, इत्यादिकांवर ज्यांची सत्ता असती त्यांस त्या त्या स्थळीं मासे मारणारे लोक बरींच भाडीं देतात. आपल्या या देशीं मलबार, गोवें, कोंकण, इत्यादि स्थळीं मासे मारण्याचा उद्योग कोळी लोक करितात, ते आपल्या शेंकडो जनाची पोटगी त्या उद्योगावर चालवून त्या उद्योगाबदल सरकारास हजारों रुपयांचें देणें मिळतें, व गोळ म्हणून एक माशांत जाती आहे, त्याची विक्री त्या त्या ठिकाणीं होऊन त्यामधील भोद म्हणून एक अंश आहे त्याचा व कांहीं दुसरे माशांचें

अंशाचा हजारो रुपयांचा व्यापार चीन देशापर्यंत चालतो. मासे मारण्याचे ठिकाणालगत जीं शेतें जिरवाच्या जमीनी असतात त्यांस खत घालायास कुटा म्हणून जो माशांचा त्याज्य अंश असतो तो फार उपयोगी पडतो.

गोपाळ : मासे मारण्याचे ठिकाणाचें जें भाडें उत्पन्न होणें, तें त्या ठिकाणीं जसे जितके मासे असतील त्याप्रमाणे अधिकउणें होत असेल.

गुरु : होय. त्याप्रमाणें आणि मासे मारण्यास जशी उणीअधिक मेहनत लागती त्याप्रमाणें तें भाडें असतें.

शिल्पकर्मापासून जें उत्पन्न होतें त्याचा तर आपण पूर्वींच विचार केला आहे. त्या प्रकरणीं आणखी जें कांहीं बोलणें तें व्यापाराचें प्रकरण निघेल तेव्हा होईल. शिल्पाचा व व्यापाराचा फार जवळचा संबंध आहे.

गोपाळ : तें प्रकरण पुढल्या संवादांत निघेल काय?

गुरु : नाहीं, अजून उत्पन्नाविषयीं बहुत सांगितलें पाहिजे. व्यापाराचा विचार करण्याचे पूर्वी पैक्याचें स्वरूप व उपयोग काय तें समजलें पाहिजे; त्या वांचून व्यापाराचें प्रकरण समजणें फार कठिण आहे.

# उत्तरभागसंवाद १५

## सारा आणि व्याजबट्टा

जे कोणी स्वतां आपल्या पुंजीची वहिवाट न करितां त्यांस त्या पुंजीपासून जें उत्पन्न होतें, त्याविषयीं – सारा अथवा भाड्यानें दिलेलें जमीनीचें उत्पन्न – पैक्याचें व्याज, जमीनीचें भाडें, व पैक्याचें उणेंअधिक व्याज होण्याचें कारण, नाना देशींचे व्याजाचा दर – सर्कारी नोटी – अलाभकारी मजूर म्हणजे दुसऱ्याचे उत्पन्नावर आपली उपजीविका करणारे लोक.

गोपाळ : कृषि, शिल्प, व्यापार, यांपासून उत्पन्न कसें होतें, तें मला समजूं लागलें. बरें, बहुत्येक लोकांजवळ मालमिळकत असून ते कृष्यादि कांहीं एक उद्योग करीत नाहींत, तेव्हां त्यांच्या पदरीं जी पुंजी असती, त्या पुंजीपासून उत्पन्न कसें होतें ?

गुरु : ज्याच्याजवळ फार मालमिळकत असती, तो तिची वहिवाट स्वतांच करीत नाहीं. कोणे समयीं ती वहिवाट दुसऱ्याकडे सोपितो. जमीनीचा धनी असला तर ती जमीन कुळाकडे लावून देतो, त्या जमीनीचें जें भाडें येतें तेंच त्याचें उत्पन्न.

गोपाळ : ज्यांच्याजवळ स्थावर मिळकत आहे, त्यांची आपण गोष्ट सांगितली; स्थावर मिळकत नसून ज्यांच्याजवळ पैका असतो, त्यांस पुंजीची वहिवाट केल्यावांचून उत्पन्न कसें होतें ?

गुरु : कोणती पुंजी कां असेना, ती वहिवाटल्यावांचून तिजपासून उत्पन्न होणार नाहीं. जर पुंजीदार कोणी एक्या खटल्यांत आपल्या पुंजीची योजणूक स्वतां करित नसला, तर आपणासाठीं ती योजणूक दुसरे कोणास सांगतो. तो आपल्या मनांत असें म्हणतो कीं, मजूर लोकांस पोटगीस द्यावयास अन्न आणि नवीन जिन्नस उत्पन्न करायास सामान आपल्या जवळ पुष्कळ आहे. पण लोकांस कामावर ठेवावें, व त्यांचे कामापासून जें उत्पन्न होईल त्यांतून आपला नफा काढावा, हें असें मेहनतीचें खटलें आपण स्वतांच करावें त्यापेक्षां हें कोण्या दुसरे मनुष्याकडे सोपावें हें बरें.

गोपाळ : हें खटलें ज्या मनुष्याकडे सोंपिलें असतें, त्यास चांगलें वेतन दिल्हें पाहिजे, कारण त्यास दुसऱ्याचे पुंजीची वहिवाट करण्याकडे आपला वेळ व श्रम योजिला पाहिजे.

गुरु : त्या करितां त्यास चांगलें वेतन मिळतें, म्हणजे ज्या पुंजीची तो वहिवाट करतो, त्या पुंजीवर झालेल्या नफ्यातून त्यास बराच अंश मिळतो. ज्यांच्या जवळ पुष्कळ मिळकत असती, ते तिची वहिवाट करण्याची स्वतां मेहनत न घेतां तिच्या उत्पन्नांतील अंश स्वसंतोषानें वहिवाट करणारास देतात. यावरून असें सिद्ध होतें कीं, पुंजीची वहिवाट करणारा व पुंजीचा धनी हे वारंवार निरनिराळे मनुष्य असतात.

गोपाळ : असे वहिवाट करणारे गुमास्ते कारभारी हे मोठे पेढीदाराकडे असतात. कोणी साधारणे पैकेदाराने गुमास्ता ठेविला असें तर ऐकण्यांत आलें नाहीं.

गुरु : कोणी साधारण पुंजीदार गुमास्ता कशास ठेविल? त्याजवळ पुंजी असली तर तो कोणे दुसरे मनुष्यास देईल. तो मनुष्य आपल्या नफ्याकरितां कृषि, शिल्प, अथवा व्यापार अशा उद्योगांत ती पुंजी लावील, आणि त्या पुंजीची वहिवाट केल्याबद्दल दर शेंकडां अमुक अशा करारानें त्या पुंजीदारास देईल. अशा रीतीचे व्यवहारास रुपये पुंजी लावणें असें म्हणतात.

गोपाळ : रुपये मात्र कर्जी देतात, किंवा धान्यादिक जी पुंजी तीही कर्जी देतात, हें कसें, हें सांगावें.

गुरु : अरे, रुपये कर्जी दिल्हे अथवा पुंजी कर्जी दिल्ही तरी फळ सारिखेंच.. जो कोणी कर्ज घेणारा त्याच्या हातीं पैका आला म्हणजे धान्यादिक सहज त्याचे हातीं येतात. जर कर्ज घेणारास ज्या वस्तु पाहिजेत त्या पैक्यानें न मिळत्या, तर तो कर्ज कशास काढिता? तो कर्ज काढतो त्याचें कारण असें आहे कीं काम करायास सामग्रीद्रव्यें, मालमसाला अथवा शस्त्रें-हत्यारें पाहिजेत तर तीं पैक्यानें मिळतात. मजूर लोकांस पोटास द्यावयाचें तें पैक्यानें दिल्हें जातें. शेतकीचे खटल्यास जें सामान पाहिजे तें अथवा व्यापार करायास जे विकाऊ जिन्नस पाहिजेत ते पैक्यानें मिळतात. फार काय सांगावें, एक पैका पदरीं असला म्हणजे व्हावा तो उद्योग करायास अंगीं सामर्थ्य येतें.

गोपाळ : मला वाटतें कीं पुंजीदारानीं अमुक एक दरमाहा ठरवून पुंजीची देखरेख करायास कारभारी ठेविला असतां आपल्यास कांहीं काळजी वागवावी लागणार नाहीं.

गुरु : कारभारी ठेविला असतां बरें आहे, परंतु आपले पुंजीची आपल्यास जसी कळकळ तसी कारभाऱ्यास कोठून असणार? कारण कोणे एके कुळास व्याजानें ऐवज दिल्हा, आणि तो त्याकडे थकला तर तो तोटा कारभाऱ्यास होणार नाहीं; पुंजीदारास होईल.

गोपाळ : बरें, कारभारी न ठेवितां पुंजीची वहिवाट दुसरे कोणास सांगितली तर जो तोटा होणें तो चुकेल काय? पुंजीचे वहिवाटदाराचा मोड झाला असतां पुंजीचे धन्याचा अर्थातच मोड होतो.

गुरु : होय, तूं म्हणतोस तसी गोष्ट वारंवार घडती, परंतु कारभारी ठेवला असता काय जो तोटा होणें तो पुंजीचे धन्यासच होतो; म्हणून पुंजीची वहिवाट करणारा नेमिला असतां तसे तोटे फार करून होणार नाहींत. कारण तो वहिवाट करणारा आपल्या स्वार्थास जपत असतो. ऐवज कुळाकडे थकला असतां वहिवाटदाराचा व धन्याचा मोड होतो. कारभारी कारकून याचें काय तें वेतनच नाहींसें होतें, परंतु धन्याचा सर्वस्वी नाश होतो.

जे शाहाणे आहेत ते चांगल्या जामीनकीवांचून पुंजी कोणास कर्जी देत नाहींत. जर कर्ज व्यापाऱ्यास देणें झालें, तर त्यापासून दुसरे व्यापाऱ्यांची अथवा ज्यांचेजवळ चांगली मिळकत असेल, त्यांची हमी घेतात. जर स्थावर मालाच्या धन्यास ऐवज देणें झालें, तर त्या ऐवजाचे जामीनकीस त्याचा तो माल आपल्याकडेस लाऊन घेतात, म्हणजे कराराप्रमाणें ऐवज परत न दिल्यास ज्या मालावर कर्ज दिल्हें आहे, त्या मालावर कर्ज देणाराची सत्ता होईल असा करार करून घेतात. अशा रीतीनें कर्ज देणें त्या व्यवहारास गाहाणानें कर्ज देणें असें म्हणतात.

गोपाळ : जमीनीचें गाहाण घेणें तें फार चांगलें, त्यास कशाचें भय नाहीं. जमीनीचें गाहाण घेणें हें फिरते पुंजीस स्थिर पुंजीची हमी घेणें आहे. जो कोणी व्यवहार करायास कर्ज काढितो, त्यास कर्जाचें जें व्याज द्यावयाचें त्या व्याजापेक्षां व्यवहारांत अधिक नफा न झाला तर तो बुडून जाईल.

गुरु : होय. जी पुंजी कर्जी काढावी तिचें जें व्याज देणें त्यापेक्षा सरासरी त्या पुंजीवर दुप्पट नफा होतो. बहुत करून दरशेंकडा ५ रुपये व्याज असतें, आणि व्यापारांत दर शेंकडा सुमारे १० रुपये याप्रमाणें नफा होतो.

**गोपाळ :** तेव्हां धनको आणि रिणको अथवा पुंजीची वहिवाट करणारा आणि पुंजीचा धनी हे दोघे जण पुंजीपासून नफा होतो तो सारिख्या हिश्यानें म्हणजे एकास अर्धा आणि एकास अर्धा असा वांटून घेतात. एकास पुंजीचे धनीपणामुळे मिळतें, दुसऱ्यास त्या पुंजीवर व्यवहार केल्यामुळें मिळतें.

जमीनीचा धनी आपली जमीन कुळास भाड्यानें देतो, त्याच सारिखा धनको आपला ऐवज व्याजानें देणारा समजावा. जमीनीचा धनी व ऐवजाचा धनी हे दोघेजण आपआपल्या पुंजीची स्वतां वहिवाट करीत नाहींत. आपल्या वतीनें दुसऱ्यास वहिवाट करायास सांगतात, तेव्हां कुळाकडून जें भाडें येतें, तें रिणकोपासून व्याज येतें तसेंच समजावें.

**गुरु :** होय, तसेंच जमीन कुळाकडे लावून देण्यांत जसें हित आहे, तसेंच ऐवज कर्जी देण्यांत हित आहे. जर कुळ भाडें न भरितां लागवड करायास अमुक एक वेतन घेऊन जमीनीचे धन्याकडे राहिला, आणि जें उत्पन्न होईल, तें अवघें त्यास देऊं लागला, तर त्यास लागवडीची सरासरी काळजी राहील. त्यां उत्पन्नाची जसी जसी किंमत वाढेल तसी तसी मला प्राप्ति होईल, असें त्याने स्वतां शेत केल्यानें त्याच्या मनांत वागूं लागेल तेव्हां त्यास त्या लागवडीची फार काळजी राहील.

जमीन भाड्यानें घेणें आणि कर्ज व्याजानें काढणें यांत असा विशेष आहे कीं, व्यापार अथवा शिल्पाचे कारखानें यांत पुंजीची योजणूक करायास जो कोणी पुंजी काढितो, त्यास व्यवहार करायास दुसरें कांहीं साधन लागत नाहीं, पुंजी मिळाली म्हणजे काम चालतें. असें शेतकऱ्यास होत नाहीं; त्यानें जमीन भाड्यानें घेतली म्हणजे लागवड करायास दुसरे पुंजीचें अगत्य लागतें. ती त्याच्याजवळ असली तर मग नीट, नाहीं तर दुसऱ्यापासून कर्जी घेतली पाहिजे.

**गोपाळ :** आणखीही एक विशेष आहे. जमीनीच्या लागवडीपासून जें उत्पन्न होतें तें कूळ आणि जमिनीचा धनी हे समभाग वांटून घेत नाहींत. कुळास अधिक उत्पन्न होतें तितकें धन्यास भाड्यानें होत नाहीं. ऐवज कर्जी देणारास व घेणारास समभाग उत्पन्न होतें.

**गुरु :** जी पुंजी वहिवाटावी, त्या कामांत जसें जोखीम असतें, त्याप्रमाणें त्या पुंजीवर जो नफा मिळणें तो मिळतो. याप्रमाणें पाहतां जसें इतर उत्पन्नास जोखीम असतें, तसें जमीनीच्या भाड्याच्या उत्पन्नास नाहीं. जर जमीनीचे वहिवाटदारास तोटा झाला, तर तो जमीन खाऊन जात नाहीं. फार जर झालें तर तो जमीनीची वहिवाट करणें सोडून देईल, तरी त्या जमीनीचा धनी त्या कुळाची जिंनगी जप्त करून आपले भाड्याचा ऐवज घेईल. आणखी असें आहे कीं जसी जसी जमीनीची लागवड होऊं लागती तसेंतसें उत्पन्न वाढूं लागतें. तेणेंकरून कुळास नफा अधिक होऊं लागतो. जमीनीचे धन्यास अधिक भाडें मिळूं लागतें. म्हणून जमीनीचे धन्यास आपल्या त्या पुंजीवर दर शेंकडा तीन किंवा चार या प्रमाणें जें उत्पन्न मिळेल तें घेऊन त्याने स्वस्थ राहावें हें बरें. एक तर थोडेबहुत तरी जोखीम, तथांत पुंजी कांहीं सुधारती असेंही नाहीं, त्यास असा जो कर्ज देऊन दर शेकडा पांच प्रमाणे व्याज मिळविण्याचा धंदा त्याच्या मर्री पडूं नये.

**गोपाळ :** एकूण पुंजीवर दरशेंकडा तीनपासून चारपर्यंत जें उत्पन्न मिळतें, त्यास कांहीं भय नाहीं; त्याजवर जें मिळणें तें भयाचें, जोखमाचें घर.

**गुरु :** खरें. जमीनीच्या भाड्यास एक तर कांहीं भय नाहीं; तथांत जमीन चांगली होऊन पुढें अधिक भाडें वाढायाची आशा असती. असें पैक्याचे व्याजाविषयीं समजूं नये. परंतु जर कांहीं भय नसतां पैका कर्जी दिल्यास त्यापासून जें व्याज उत्पन्न होतें, तें जमीनीच्या भाड्यापेक्षां अधिक असें समजावें. या व्याजाविषयीं आणखी कांहीं सांगतों.

कोणी असें सांगतात कीं, पूर्वी व्याजाचा दर फार मोठा होता. तो शेंकडो वर्षे उतरत उतरत सांप्रतच्या स्थितीवर आला आहे.

गोपाळ : असें कां बरें व्हावें ?

गुरु : अरे, असें आहे, पुंजी वहिवाटावी तिजपासून अधिक नफा झाला तर अधिक व्याज उत्पन्न होईल, कमी झाला तर कमी व्याज होईल. एकादा देश चांगला नांदूं लागला, लोक पुष्कळ झाले म्हणजे कनिष्ठ प्रतीचे जमीनीचीही लागवड होऊं लागती, अन्नादिक महाग होतात, मजूरीचा दर वाढतो. पुंजीचा नफा कमी होऊं लागतो, त्याप्रमाणे व्याजाचाही दर उतरतो. कारण जो कोणी ऐवज कर्जी घेतो, तो त्या ऐवजावर जसा नफा मिळण्याची आशा असेल, त्याप्रमाणें व्याज देण्याची बोली करितो.

एकाएकी पुष्कळ पुंजी वाढली तर, मजूरीचें लोकांस फार अगत्य पडून मजूरीस जें द्यावयाचें त्याचा दर वाढून नफा होणें तो कमी होईल. हें असें लोकसंख्या त्या पुंजीचे मानानें वाढे तोंपर्यंतच राहील. तेव्हां नवीन कनिष्ठ प्रतीच्या जमीनीची लागवड करावी लागेल. त्यापासून मग पूर्ववत् नफा होऊं लागेल. सारांश जसें मजूरीचें अगत्य अधिकउणें असतें तसें नफ्यांत व व्याजांत अंतर पडतें. नफा व व्याज उतरून एक सारिखा कमी दरानें अणण्यास कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली येणें हेंच कारण होय.

कोणी असें सांगतात कीं, रोमशहरचा अगस्टस म्हणून सार्वभौम होऊन गेला, त्याच्या समयीं बहुत परमुलूख जिंकिले, तेथून बहुत संपत्ति आणिली, त्यामुळें त्या रोमशहरांत व्याज दर शेंकडा दाहा होतें, ते उतरून दर शेंकडा चार याप्रमाणें झालें. या आपल्या देशीं तर मजूरदारांच्या मानांपेक्षां पुंजीचें मान फार थोडकें म्हणून पुंजीचा नफा, आणि पैक्याचें व्याज हीं फारच मोठीं असतात. दर शेंकडा बारा रुपये या प्रमाणें बहुत दिवसपर्यंत व्याजाचा दर होता. कोणेसमयीं कित्येक व्यवहारांत दर शेंकडा वीस किंबहुना तीस रुपये याप्रमाणें व्याज अढळतें. चीन देशीं तर दर शेंकडा दरमहा सहा या प्रमाणें व्याजाचा दर असतो.

गोपाळ : अमेरिकाखंडीं तर मजूर फार थोडके असतात, आणि रोजमुरा फार मोठा असतो, तेथें व्याज कमी असतें काय ?

गुरु : नाहीं, कारण तेथें शेतीचे खटल्यांत फार नफा होत असतो. जो मुलूख पुरतेपणीं वसला नसतो, जेथें व्हावी तितकी सुपीक जमीन मिळती, त्यामुळें कनिष्ठ प्रतीची जमीन कोणी लागवडी-खालीं आणीत नाहीं, म्हणून जेथें थोडकें भाडें उत्पन्न होतें, किंबहुना भाडेंच उत्पन्न होत नाहीं, तेथें लागवड करणारास मोठा रोजमुरा देण्यास सोय पडते, असें असतांही त्यास मोठा नफा होतो. जेथें पुंजी वहिवाटिली असतां मोठें उत्पन्न होतें, तेथें कर्जी ऐवज काढिला असतां त्या ऐवजाचें मोठें व्याज देतात. असें आहे म्हणून इतर देशांपेक्षां अमेरिका खंडी पुंजी फार त्वरित वाढली असतां त्या पुंजीची जिकडे तिकडे लाभ व्हावयासारिखी लौकरच वहिवाट करायास सोय सांपडते, कारण नवीन व सुपीक जमीन लागवड करायाची असती, त्यामुळे त्या पुंजीचें म्हणजे ऐवजाचें व्याज उतरून कमी होत नाहीं.

ज्या देशीं पुर्वीपासून लोकांची वसती पुरतेपणीं झाली असती, तेथें व्याज कमी असलें तर असें समजावें कीं तेथें लोक पुष्कळ आहेत, पुंजी फार जमली आहे, नाना प्रतीच्या जमीनीची फार लागवड होत आहे, त्या जमीनींत उत्पन्न झालेल्या जिन्नसाची किंमत मोठी येत आहे, मजूरीचा दर मोठा आहे, आणि नफा थोडका होत आहे.

गोपाळ : आपल्या बोलण्यावरून असें सिद्ध होतें कीं, जो कोणी ऐवज कर्जी घेतो, त्या ऐवजावर थोडके उत्पन्नाची आशा असली तर त्या ऐवजाचें थोडकें व्याज देतो. जर मोठी मजूरी द्यावी लागली, तर त्या ऐवजापासून थोडकें उत्पन्न होतें. अन्नादिक महाग असली म्हणजे मजूरी वाढती, कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखालीं येऊं लागली म्हणजे अन्नादिक महाग होतात, लोकसंख्या अधिक होऊं

लागली म्हणजे कनिष्ट प्रतीच्या जमीनीची लागवड होऊं लागती, आणि संपत्ति जमूं लागली त्यामुळें मजूरी वाढली म्हणजे लोकसंख्या वाढूं लागती.

गुरु : होय. संपत्ति जमली म्हणजे देश नांदूं लागला असतां व्याजाचा दर उतरतो असें सिद्ध होतें.

गोपाळ : मला वाटत असे कीं, व्याजाचा दर कायदा करून ठरविला असतो; त्यांत अधिकउणें होत नाहीं.

गुरु : होय. परंतु कायद्यानें ठरलेल्या व्याजापेक्षां कोठें कोठें कमी व्याज असतें, सरकार मात्र कायद्यापेक्षां अधिक व्याज देववीत नाहीं.

गोपाळ : कोणाचे मतीं व्याज घेऊच नये असें असतें, असें म्हणणारे पुंजी म्हणून काय, तिचा उत्पन्न करण्याचा स्वभाव कसा हें कांहींच समजत नसतील. हें जर समजतें, तर व्याज घेणें अयोग्य असें त्यांचें म्हणणे नसतें.

गुरु : पुंजीचा प्रकार इत्यादिक समजणें हें देशव्यवहारव्यवस्थेनें समजते. हें शास्त्र पूर्वी लोकांस ठाऊक नव्हतें, हें अलीकडे निघालें, म्हणून पूर्वीच्या कोणी लोकांनीं व्याज घेण्याचा निषेध केला असेल, त्यांत काय नवल? परंतु योग्य व्याज घेणें हें नीट आहे, असें पूर्वीचे जे ग्रीक व रोमन लोक त्यांसही वाटत असे. त्या वेळींचा सोलोन म्हणून एक नीतिकर्त्ता होऊन गेला, त्यानें व्याजाचा दर कमी करून योग्य व्याज दरशेंकडा बारा याप्रमाणें ठरविलें. कोणी म्हणतात कीं, आपल्या या देशीं सुमारें ३००० वर्षांमागें धर्मशास्त्रकर्त्यांनें असें ठरविलें कीं, दर शेंकडा दरमहा अडीच याप्रमाणें व्याज घ्यावें. युरोपखंडीं तर इसवी सन १५४६ सांत कायद्याप्रमाणें व्याज घ्यायाचें ठरलें.

मार्कफर्सन साहेबानें व्यापाराच्या इतिहासग्रंथांत व्याज घेणें अयोग्य याविषयीं लिहिलें आहे. तें असें कीं "इसवी सन १२५१ सांत, असें झालें कीं व्याज खाणें हें चांगलें कर्म नव्हे, म्हणून व्याज खाणारांस लोक फार उपद्रव देऊं लागले, त्यामुळें ते फार संतापून व्याजाचा दर मनस्वीच वाढविला." सारांश कर्ज देणाराच्या ऐवजास मोठें जोखीम असलें, तरीं दर शेंकडा पांच यापेक्षां अधिक व्याज घेऊं नये, असें कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु जसा दुसरा जिन्नस भाड्यानें घेतात, त्याविषयीं मर्यादा नसती; मग अमुकच व्याज असावें, अधिक असूं नये असी मर्यादा काय म्हणून असावी?

गोपाळ : व्याजाविषयीं मर्यादा नसली, मनास येईल तसें व्याज घ्यावें असी मोकळीक असली, तर त्यामुळें सावकारांस नवेतरणे अविचारी उडाऊ अशांला कर्ज देण्यांची मोठी उमेद येईल.

गुरु : तशांस कर्ज देणें तें चांगला प्रतिष्टित सावकार देणार नाहीं; मारवाड्यांसारिखा धूर्त असेल तोच देईल. कारण उडाऊ, कर्जबाजारी, अशांजवळ बहुतकरून चांगलें गहाण द्यावयास नसतें. ते व तसेच मोठे अडचणींत आलेले लोक मारवाडी जें व्याज मागेल, तें देण्यांची बोली करून कर्ज काढितात तेव्हां अशांस ऐवज देणें, तो केवळ जोखमांत ऐवज घालणें आहे. तो तसा व्यवहार मनस्वीच व्याजाच्या आशेने मारवाडीलोक करितात. त्यांस लौकिकाची फार करून चिंताच असत नाहीं. मग तो ऐवज बुडतो अथवा मोठे तंटेफिर्यादी होऊन वसूल होतो.

पुंजीची आपण स्वतां वहिवाट न करितां ती एका कर्ज घेणारास देऊन त्यापासून उत्पन्न होत असतें. तो कर्ज घेणारा तर असा असतो कीं त्यास त्या पुंजीवर नफा करून घेण्याची किंबहुना ती मुद्दल पुंजी परत देण्यांचीही आशा असत नाहीं.

गोपाळ : काय, मुद्दल पुंजी परत देण्यांचीही आशा असत नाहीं? असा कर्ज घेणारा तर कोणता? अशास कोण हो कर्ज देईल?

गुरु : हा चमत्कारिक कर्ज घेणारा दुसरा कोणी नाहीं, सरकारच आहे. सरकार जो ऐवज कर्जी घेतें, तो ऐवज ताबडतोब खर्चला जातो. तो परत येईल असी कर्ज देणारास आशा रहात नाहीं. असेंही

असतां लोक सरकारास कमी व्याजानें ऐवज देतात. त्याचें कारण असें आहे कीं सरकारातून व्याज बरोबर मुद्दत झाली म्हणजे मिळतें, तसें दुसऱ्या लोकांपासून मिळत नाहीं, आणि जरीं सरकार ऐवज परत देत नाहीं, तरी तो ऐवज आपले हातीं दुसऱ्या मार्गानें व्हावा तेव्हां येण्याची सोय असती.

गोपाळ : तो कोणता मार्ग?

गुरु : आपला त्या ऐवजाचें व्याज घेण्याचा जो धनीपणा तो जो कोणी ऐवज सरकारांत ठेवूं इच्छित असेल, त्यास विकावा म्हणजे तो प्रथम ऐवज कर्जी देणाराचे ठिकाणीं होतो, हा ऐवज परत येण्याचा मार्ग होय.

गोपाळ : बरें, तो धनीपणा विकणें तो सरकारास मुद्दल ऐवज दिला असेल, तितक्याच ऐवजाने विकला जातो किंवा कसें?

गुरु : नेहमी तितक्याच ऐवजाने विकला जात नाहीं. बाजारभाव असेल त्याप्रमाणें कधीं अधिक, कधी कमी अशा ऐवजाने विकला जातो. सरकारास ऐवज कर्जी दिला असतां सरकारांतून नोट म्हणजे चिटी मिळती, त्या चिटीस सरकारी नोट म्हणतात. त्या नोटीवर मागाहून व्यवहार चालतो. नोटी विकणारे बहुत असले आणि घेणारे थोडे असले तर नोट विकणारास कमी नफा मिळतो. जर नोटी घेणारे बहुत असले, आणि विकणारे थोडके असले, तर विकणारास अधिक नफा मिळतो. कमी नफा मिळतो तेव्हां नोटीचा भाव उतरला, आणि अधिक मिळतो तेव्हां चढला असें म्हणतात.

गोपाळ : सरकार जो ऐवज कर्जी घेतें त्याजवर कांहीं नफा न होतां त्याचा खर्च होत असला तर सरकार त्या ऐवजाचें लोकांस व्याज कोठून देत असेल?

गुरु : सरकारनें रयतेवर कर बसविले असतात, त्यांचा वसूल येतो, त्यातून तें व्याज दिलें जातें.

गोपाळ : सरकार ऐवज कर्जी घेतें, त्याचा खर्च होतो, तेव्हा तो ऐवज सरकारांतही राहत नाहीं असें होतें. ऐवज कर्जी देणाराच्या हातीं नोट म्हणजे कागदाचा तुकडा राहतो, तोच काय तो त्याचा ऐवज; तितक्यावरच तो खुशी असतो.

गुरु : त्याचे हातातून ऐवज जावो, परंतु वर्षांच्या काठीं ठरलेलें व्याज त्याच्या पदरीं पडतें. तें त्याचें जसें काय वर्षासनच समजावें. सरकारांतून मुद्दल ऐवज परत मिळे तोंपर्यंत त्या ऐवजाचे धन्यास पोंहचत असतें. म्हणून असा ऐवज देणाराचा तोटा होत नाहीं. तो ऐवज सरकारनें खर्चिल्यामुळें देशास तोटा होतो. सरकारी नोट हीच ऐवज समजावी, ती चिटी विकतां येती. तिजवर व्यवहार करितां येतो, तिचें उत्पन्न येतें, किंबहुना संपत्तिमानासारिखेच नोटीचे धन्यास उपभोग घडतात.

गोपाळ : देशांतील संपत्तीचा सरकार खर्च करूं लागलें तर देश कोठून नांदता होईल?

गुरु : नांदता होणार नाहीं खरें, परंतु कित्येक प्रसंगी खर्च करावाच लागतो. कोठे लढाई करावी लागली म्हणजे मोठा खर्च येतो. तेव्हां मोठें कर्ज काढावें लागतें. तो ऐवज लोकांवर देणीं बसवून उभा करावा तर तत्क्षणींच होणार नाहीं. लोकांपासून जो ऐवज काढावा, त्याची फेड न झाली तर तो जमून जसें काय अवघ्या देशावर कर्ज होतें. आणि नोटीच्या धन्यास व्याज द्यावयास उत्पन्न व्हावें म्हणून लोकांवर जीं देणीं बसवितात, त्यामुळे तें कर्ज देशावर जसें काय ओझेंच असें होतें.

गोपाळ : सरकारकर्जाचें देशावर ओझें असतें, त्यापेक्षां तें नोटीच्या धन्यावर असेल, कारण ते तरी देश सोडून असत नाहींत.

गुरु : तें ओझें नोटींच्या धन्यावर असत नाहीं; देशावर म्हणजे नोटीचे धन्यांस व्याज द्यावयास ज्या लोकांपासून सरकारदेणीं वसूल होतात, त्यां लोकांवर असतें. हें प्रकरण पुढें कोठें निघेल. आतां इतकेंच पुरें. बरें, जे आपल्या पुंजीची स्वतां वहिवाट करीत नाहींत, त्यांस त्या पुंजीचें कसें उत्पन्न होतें, हें तुला पुरतेपणें समजलें ना?

गोपाळ : होय, ते त्या पुंजीची वहिवाट दुसऱ्यास सांगतात. जर पुंजी जमीन असली, तर वहिवाट करणारा भाडें देतो. जर पैका असला, तर व्याज देतो. हेंच पुंजीच्या धन्याचें उत्पन्न.

गुरु : चांगलें सांगितलें. परंतु पैका म्हणजे केवळ धातुमय द्रव्यच समजूं नये. जमीन, विकाऊ माल, कच्चा जिन्नस, अथवा तयार केलेली वस्तु हें सर्व पैक्यांतच खपतें. म्हणून मागें सांगितलें, आणि आतांही सांगतों, कीं पैक्याचें स्वरूप व उपयोग कळल्यावांचून हें प्रकरण चांगलें नीट समजणार नाहीं.

लोक आपलाले पुंजीवर कोणकोणत्या रितीनें उत्पन्न करून घेतात, त्या सर्व प्रकारचा विचार झाला. आतां दुसऱ्यांच्या उत्पन्नावर आपलें पोट भरणारे जे लोक ते कोण कसे, त्यांचा मात्र विचार करणें राहिला.

गोपाळ : ते लोक कोण असतील? मजूरलोक म्हणावे तर ते धन्याचे उत्पन्नातून आपले पोटास रोजमुरा घेतात, पण ते मेहनत करून धन्यास उत्पन्न करून देतात.

गुरु : त्यांस उत्पन्न करणारे मजूर अथवा लाभकारी असें म्हणावें. ते जसे आपलें पोट दुसऱ्याच्या पुंजीवर भरितात, तसे ते त्या पुंजीदाराची मेहनत करतात. माझें बोलणें दुसऱ्याच्या पुंजीवर पोट भरणारांविषयीं नाहीं, दुसऱ्यांच्या उत्पन्नावर पोट भरणारांविषयीं आहे. हेही तरी मेहनत करणारे मजूरच आहेत, परंतु यांच्या मेहनतीपासून कांहीं उत्पन्न न होता हे धन्यांचें उत्पन्न मात्र खातात. अशांची मेहनत देशाची संपत्ति वाढवायास उपयोगी पडत नाही, म्हणून यांस अलाभकारी मजूर म्हणण्यास चिंता नाहीं.

गोपाळ : अहो, घरांत जे चाकर ठेवावे, ते तर अलाभकारी मजूर नव्हत?

गुरु : तेच ते. त्यांच्या चाकरीचा धन्यास मात्र उपयोग, त्यापासून देशाची संपत्ति वाढत नाहीं. लाभकारी मजूर जें काम करितो, त्यापासून जें उत्पन्न होतें, त्यांतून त्यास रोजमुरा दिला जातो. त्यानें काम करून जें तयार केलें, तें सांचवून ठेवितां अथवा दुसरे जिन्नसाचे मोबदला देतां येतें. असें कांहीं घरांतल्या चाकरापासून होत नाहीं. तो घरधन्याची चाकरी मात्र करितो, त्याची संपत्ति वाढे असें कांहीं करीत नाहीं. संपत्ति वाढणें एकीकडे राहून दुसऱ्यानें जें उत्पन्न केलें असेल त्यांतून त्याचे पोटास द्यावें लागतें.

गोपाळ : लाभकारी आणि अलाभकारी असे मजुरांचे दोन निराळे प्रकार आहेत खरे. लाभकाऱ्यांपासून संपत्ति वाढती; अलाभकाऱ्यापासून धन्याला उलटा खर्च होतो. कोणी मेस्तरी अपल्या कारखान्यांत जसे अधिक सुतार ठेवील, तसें त्याचें काम अधिक होऊन अधिक उत्पन्न होईल, परंतु घरीं जसे अधिक गडी ठेवील, तसा त्यास अधिक खर्च होऊन तो गरीब होईल.

गुरु : सुतारांस जो पगार देणें, तो कारखान्यांत जी पुंजी वहिवाटिली असती त्यांतून दिला जातो, आणि घरीं गड्यास जो पगार देणें, तो त्या पुंजीवर जें उत्पन्न होतें त्यांतून दिला जातो. म्हणून त्यास अधिक सुतार ठेविल्यामुळें अधिक उत्पन्न होईल, आणि अधिक गडी ठेविल्यामुळें अधिक खर्च होईल. फ्रॅंक्लीन साहेब म्हणून एक ग्रंथकर्ता होऊन गेला, त्यानें या प्रकरणीं असें लिहिलें आहे कीं, "भूमी आणि पाणी यांच्या योगानें श्रम करावे तेव्हां संपत्तीचीं मूळबीजें प्राप्त होतात. जर कोणा एकाकडे जमीन असली, त्या जमीनींत त्यानें धान्य पिकवून कांहीं एक काम करणारीं कुटुंबाचीं माणसें पोसिलीं, तर त्याचे धान्याचा खर्च होईल, आणि तो वर्ष पुरें होतां मोठा मातबर होणार नाहीं; वर्ष बसतांच जसा होता तसाच राहील. त्यांस जसें खायास घालील, तसें त्यांचे हातून काम घेईल कोणास सूत कांत्तायास, कोणास लांकडें तोडायास, कोणास लांकडें करवतानें चिरून फळ्या करायास, कोणास बांधकामाकरितां इटा करायास सांगेल तर त्याचे त्या धान्याची किंमत उभी राहून त्याचेच जवळ राहील, आणि वर्ष पुरें होतां त्या कुटुंबांतील अवघे जणांस

आंगास चांगलें वस्त्र राहयास चांगली सोय असें होईल. ज्या मनुष्यास खायास घालून इटा करायाचें काम सांगायाचें तें न सांगतां त्यास यजमानाला खुशी करायाकरितां सारंगी वाजवायास सांगितलें, तर तो जें धान्य खाईल तें फुकट गेलें असें होईल. कारण त्याचे वाजविण्यानें कांहीं कुटुंबाची संपत्ति वाढणार नाहीं आणि कुटुंबाची सोय चालायाच्या वस्तु मिळणार नाहींत. त्या सारंगी वाजविणाराचे योगानें तो यजमान गरीब होईल. त्या शिवाय दुसरीं कुटुंबाचीं माणसें अधिक काम करतील अथवा कमी खातील तर त्या वाजविणारामुळें झालेला तोटा नाहींसा होईल.

गोपाळ : तो सारंगी वाजविणारा घरांतील मनुष्य नसला, वाजविण्याचे कामापुरता कांहीं द्यायाचें कबूल करून बोलावून आणिला असला, तर यजमानांस तोटा होणार नाहीं.

गुरु : नाहीं. अलाभकारी मजूर केवळ घरांतले चाकरच असत नाहींत. तमासगीर, गाणारे, कळवांतीणी इत्यादिक दुसऱ्याचे मेहनतीचे उत्पन्नावर पोट भरणारीं तीं सर्व अलाभकारी मजूर समजावीं.

गोपाळ : ते लोक नाच तमाशा इत्यादि न करितां चांगला उपयोगी धंदा करिते, तर फार चांगलें होतें. परंतु चांगला धंदा त्यांजकडून करवायास त्यांजवर कोणी जुलूम करवावा.

गुरु : खरें, परंतु घरांतील चाकर अलाभकारी मजूर असून त्यांचे चाकरीचें घरधन्यास बहुतकरून फार अगत्य असतें. त्यांचे योगाने लाभकारी मजूरास मोठी उपयोगी मेहनत करायास सोय पडत्ये. चाकर नसल्यास धन्याचे हातून फार काम होणार नाहीं. घरधनीच आपलें घरदार झाडणें, रांधणे इत्यादि सर्व काम स्वतांच करूं लागला आणि त्याचेकडे मोठे पुंजीचें खटलें असलें, तर तें मोठे काम आपल्यासाठीं करायास अथवा लोकांचे उपयोगी पडायासारिखें कांहीं करायास त्यास फार थोडका अवकाश सांपडेल.

गोपाळ : उद्योगाची वांटणी केल्याने जे लाभ होतात, कांहींसे तसेच लाभ घरांतील काम करायास गडी ठेविल्यानें होतात.

गुरु : अलाभकारी मजूरांत मोठमोठ्या पदवीचेही लोक असतात. कळलें? लोकांस धर्मोपदेश करणारा, वैद्य, शिपाई, राज्याधिकारी, न्यायाधीश इत्यादि जे लोकांस उपयोगी पडणारे ते सर्व अलाभकारी मजूर होत.

गोपाळ : खरें काय? अशा थोर प्रतिष्ठित लोकांस मजूराची संज्ञा आहे हें म्यां आजच ऐकीलें. असो. पण मजूरीचा अर्थ उद्योग होत असला आणि त्या उद्योगापासून जरी उत्पन्न होत नसलें, तरी त्यापासून लोकांचें जितकें हित होतें, तितकें कित्येक लाभकारी मजूरांपासून होत नसेल. न्यायाधीश सत्यानें न्याय करूं लागला, वैद्य काळजी धरून लोकांस बरें करूं लागला, तसेंच धर्मोपदेश करणारा आस्थेनें लोकांस धर्मनीति-मार्ग शिकवूं लागला, तर त्यापासून लोकांस जसे लाभ होतील, तसे मिठाईवाला, अत्तर इत्यादि सुगंध द्रव्यें विकणारा गंधी, अथवा दुसरा कोणी लाभकारी मजूर यांजपासून लाभ होणार नाहींत.

गुरु : खरें. मालाचें रक्षण झालें असतां उद्योगाची प्रवृत्ति होती; तें रक्षण होणें न्यायाधीशाचे हातीं आहे; म्हणून न्याय हा एक ज्यापासून उत्पन्न होतें अशा उद्योगास प्रवृत्त करण्यास अवश्यक साधन होय. कानुकायदे करणारे, इनसाफ करणारे, कोतवाल हे अगत्य असले पाहिजेत. यांचे उद्योगापासून जिन्नस उत्पन्न होतो असें दिसत नाहीं, तरी तो जिन्नस उत्पन्न करायास जसें कृषिकर्म अथवा शिल्पकर्म करणाराचे मेहनतीचें अगत्य, तसेंच न्यायाधीशादिकांचे उद्योगाचें अगत्य आहे. या रीतीनें नाना प्रकारचे उद्योग पदार्थ उत्पन्न करायास पाहिजेत. ते नाना उद्योग नव्हत तर एकच उद्योगाची नाना रीतीनें वांटणी झाली आहे.

# उत्तरभाग संवाद १६

## पैक्याविषयीं

विकत घेण्यादेण्याचें पैका साधन आहे. नाणें पाडणें, पैका किंमत ठरविण्यास उपयोगी पडतो, मोलाचा निर्णय करण्यास पैका प्रमाण आहे, सोन्यारुप्याचें मोबदला-मोल यांत उणें-अधिक झालें असतां वस्तूंचे भावांत अंतर पडतें, दिसायाजोगा सवंगपणा आणि वास्तविक सवंगपणा – पैक्याचा भाव अधिक उणा झाला असतां कोण-कोणास नुकसान होतें. नाणें व्यापाराकरितां परमुलखीं पाठविणें –वेगळाले देशीं सोन्यारुप्याचें समसमान चलन.

गुरु : मागल्या संवादांत पैका कर्जी देतात त्यापासून जें व्याज उत्पन्न होतें, त्याविषयीं बोलणें झालें. आतां पैक्याचा कसा काय उपयोग असतो त्याचा विचार करूं. आपले जवळचा दुसऱ्यास, दुसऱ्याचे जवळचा आपल्यास कांहीं एक पदार्थ देणें घेणें झालें, तर तो व्यवहार बहुतकरून पैक्यानेच होतो. उद्योगाची वांटणी झाल्यामुळें मोबदल्याचा व्यवहार फार वाढला म्हणून पैका नसता तर मोठ्या अडचणी पडल्या आणि लोकांत सुधारणुकीची चाल व्हावयास अनुकूल झालें नसतें. केवळ मोबदल्यानें व्यवहार करण्यांत फार अडचण आहे. कोणे गावीं वाणी आणि कुणबी असे दोघे रहात असले, त्यांतून एकास तेलतुपाची गरज लागली, तें घ्यावयास आपल्या जवळचें भात वाण्यास नेऊन द्यावें तर त्याची त्यास गरज नाहीं, अथवा मोबदला करायासारखे किंमतीचे एकाएका-जवळ पदार्थ नाहींत तर फार कठिण गोष्ट होईल.

गोपाळ : तयांत अमुक इतका पदार्थ पाहिजे, त्यास आपले जवळचा कोणता किती द्यावा, हा हिशोब करीत बसणें तरी अवघडच गोष्ट आहे.

गुरु : खरें. याजकरितां जो माल घ्यायाचा त्याबद्दल देण्याघेण्यास कांहीं अडचण पडूं नये असी कांहीं वस्तु अवश्य पाहिजे. असी सोईची वस्तु पाहतां एक पैका आढळला म्हणून उपयोगी वस्तु विकत घ्यायास पैक्याची चाल झाली.

गोपाळ : कोणे एका वाण्यास धान्यांचें अगत्य नसलें, दुसऱ्या वस्तूचें अगत्य असलें तर तो आपलें तेलतूप पैका घेऊन विकील आणि त्या पैक्यानें त्यास ज्या वस्तूंचा खप त्या घेईल.

गुरु : खरें. कोठे कोठे पैक्यानें जें काम करून घ्यायाचें तें कांहीं दुसऱ्या वस्तूनी करून घेतात, त्यांच वस्तूनी व्यवहार करावा असें तेथील लोकांचें संकेतानें ठरलें असतें. नाण्याची जेथें फार कमती असती तेथें मीठ इत्यादि वस्तु नाण्याचे ठिकाणी योजितात.

गोपाळ : तसें केल्यापासून मोठीच अडचण होत असेल. मीठ कोठे दूर न्यायाचें झालें तर त्या नेण्याचा खर्च त्याचे किंमतीइतका होईल.

गुरु : जेथें व्यापारव्यवहार फार थोडका चालला असतो, जेथें मजूरी म्हटली असतां फार स्वस्त अशा मुलखांत पैक्याचे ठिकाणीं मीठ, तंबाखू, कवड्या इत्यादिक वापरीत असतात. हे असे कोणतेही पदार्थ असले तथापि धातूनें व्यवहार करायास जसें सोय पडतें तसें त्यां पदार्थांनें सोय पडत नाहीं. धातु म्हटली म्हणजे तिचा काळेंकरून इतर पदार्थांसारिखा नाश होत नाहीं, ती आटून कांहीं कमी न पडतां तिचे वेगळाले अंश करितां येतात. ती वजनानें भारी म्हणून ती आकारानेंही फार कमी असती. म्हणून व्यापारांत धातूंची विशेषेंकरून चाल झाली आहे.

गोपाळ : धातूंची व्यवहारांत चाल फार पुरातन असावी, कारण ग्रीक लोकांचे इतिहासांत लोखंडाचे, आणि रोमन लोकांचे इतिहासांत तांब्याचे पैशांविषयीं लिहिलेलें अढळतें.

गुरु : सोन्यारुप्याचें नाणेंही फार पुरातन काळापासून चालत आलेलें असावें. आपल्या या देशींचे प्राचीन ग्रंथांत सुवर्णादि धातूंचीं नांवें सांपडतात. मनुस्मृतींत लिहिलें आहे कीं ज्या कुळांत अमुक कर्में होत नसतील तें कुळ जरी गाई, बकरी, मेंढरीं, सोनें, धान्य इहींकरुन संपन्न असलें तरी त्या कुळांतली नवरी द्विजन्म्यानें करूं नये. कोणी असें सांगतात कीं अमेरिका खंडीं सोन्याच्या खाणीं अढळण्यांत आल्याचे पूर्वी सोन्याची फार कमती होती. इसवी सन चालू झाल्याच्या पूर्वी सुमारें २०० वर्षांवर रोम शहरांत सोन्याचें नाणें प्रथम पाडिलें. त्या अगोदर सुमारें ६५ वर्षांवर रुप्याचें नाणें पाडलें होतें.

गोपाळ : ख्रीस्ती मताचे पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं आब्राहीम याने ४०० रुप्याचे तुकडे देऊन एक शेत घेतलें, तर ते तुकडे काय नाणें असेल ?

गुरु : ते नाणें नाहीं. फारच पुरातनकाळीं नाण्याची चाल नव्हती. धातूचे लगड्यांची चाल होती. आब्राहीमानें रुपें तोलून दिलें म्हणून लिहिलें आहे. तेव्हां नाण्याची चाल असती तर तें रुपें तोलून देण्याचें अगत्य लागलें नसतें. नाणें चालू झाल्याचे पूर्वी धातूनें देण्याघेण्याचा व्यवहार करायास अडचण पडत असे. कारण ज्या धातूनें व्यवहार करायाचा ती तोलली पाहिजे व ती कसास लाऊन तिचा दर ठरविला पाहिजे.

नाण्याची चाल झाल्यानें धातूंस तोलणें, त्या कसोटीस लाऊन पाहणें ही सर्व खटपट राहिली. टांकसाळींत नाणें पाडणें म्हटलें म्हणजे हा धातूचा अंश अमुक वजनाचा व अमुक चोखपणाचा आहे, असें समजण्यासाठीं त्या धातूवर मुद्रा अथवा छाप करणें असें आहे. असा धातूस संस्कार झाला म्हणजे तेंच नाणें पैका असें समजावें.

गोपाळ : अमुक जिन्नस अमुक किंमतीचा अमुक्याचें अमुक पडेल असें समजायासही नाणें उपयोगी पडतें. नाण्याचे चालीचे पूर्वी तपेलेंभर तेल अधिक किंवा तपेलेंभर दाणें अधिक असें ठरवायास मोठी अडचण पडत असेल.

गुरु : होय, म्हणून वस्तु घ्यायास-द्यायासच पैका उपयोगी पडतो, इतकेंच नव्हे तर, त्यां वस्तूंची किंमत अमुक असें सरासरी ठरवायासही उपयोगी पडतो. म्हणजे अमुक वस्तूचे अमुक मानास अमुक धातु अमुक वजनाची द्यावी; जसें ५ शेर तुपास १ रुपाया द्यावा. याप्रमाणें नाण्याच्या योगाने व्यवहार चांगल्या रीतीनें चालतो.

नाण्याची चाल झाल्याचे पूर्वी लोकांस आपले मालाची किंमत ठरवायास मोठी अडचण पडे. म्हणून सर्वांचे समजुतीनें नित्य वाहिवाटीचे पदार्थांची किंमत ठरवून त्या किंमतीइतकी जो पदार्थ द्यायाघ्यायाचा असेल त्याची किंमत, असें समजून व्यवहार करीत. याचप्रमाणें इतर देशींचे प्राचीन ग्रंथांत सांपडतें. अमुक्याची संपत्ति अमुक गुरांचे व मेंढऱ्यांचे कळपाइतकी असें पूर्वी म्हणत. तो हजाराची किंवा लाखाची असामी असें बोलत नसत. कोणे एकाचेकडे पशू असतील तीच काय

ती संपत्ति असें समजत. मनुस्मृतींत आठ प्रकारचे विवाह म्हणजे लग्नें सांगितलीं आहेत. त्यांत नवरीचा बाप वरापासून दोन किंवा चार गाई घेऊन ती नवरी त्यास देतो तो आर्ष विवाह. याजवरून असें सिद्ध होतें कीं आतां जो व्यवहार कोणी कोणी रुपये घेऊन करीत असतील तो पूर्वी पश्वादिक घेऊन करीत होते. अजून तरी कोठे कोठे असें आहे कीं अमुक वस्त्राची किंमत अमुक घोड्यांइतकी. जे देश चांगले सुधारले आहेत तेथें कोणे एकाची जी पुंजी असेल ती अमुक संख्या द्रव्याइतकी आहे असे म्हणतात. त्याची २०००० हजारांची पुंजी आहे, त्याजवरून असें समजावें कीं त्याचे पदरीं जरी २० रुपये नसले तरी त्याची जमीन अथवा माल विकला असतां २०००० हजार रुपये उत्पन्न होतील.

गोपाळ : बरें, कोणे एका देशीं कोणे व्यापाऱ्यानें सोनें नेलें असतां त्याची विकरी कशी होती? त्या सोन्याबद्दल कांहीं दिलें पाहिजे; असें जें कांहीं द्यावयाचें तें सोनेंच नसेल. कोणत्या देशीं सोनें मुळींच नाहीं.

गुरु : अरे, ज्या देशीं सोन्याचा व्यापारी सोनें घेऊन जातो त्या देशीं त्या सोन्याच्या मोलपेक्षां दुसरे पदार्थ अधिक मिळाले नाहींत तर तो त्या देशीं सोनें कशास घेऊन जाईल? त्या व्यापाऱ्यास सोन्याबद्दल सोनेंच मिळालें नाही तरी दुसरे पदार्थ इतके अधिक मिळतात कीं त्यास व्यापाराचा जो नफा घ्यायाचा तो नफा होऊन त्याचा नोरही सुटतो; किंबहुना ९० अथवा ९५ चें सोनें असल्यास त्यास १०० रुपयांचा जिन्नस मिळतो. सोन्यारुप्याबद्दल त्यास लोंकरी वस्त्र, कापड, सुऱ्या, चाकु, कातरी इत्यादी लोखंडी जिन्नस, नीळ असे असे पदार्थ मिळतात.

गोपाळ : तेव्हां कित्येक लोक जसे सोन्यानें कांहीं माल उत्पन्न करितात तसेच विकाऊ मालानें सोनें उत्पन्न करितात.

गुरु : खरें. ज्या सोन्याबद्दल माल देतात त्या सोन्याचें नाणें झालें नसतें म्हणून त्या व्यवहारास विक्री असें बोलूं नये. तो केवळ मोबदला आहे.

गोपाळ : खाणींत जें सोनें उत्पन्न व्हायाचें त्यापेक्षां तें कमीं होऊं लागलें, त्यामुळें सोन्याची कमती झाली तर त्याची किंमत वाढेल; तेंव्हा पूर्वीपेक्षां सोन्याचे बद्दल अधिक माल द्यावा लागेल.

गुरु : होय. सोन्याचे लगड्यांची मूळ किंमत सोनें उत्पन्न करायास जो खर्च बसला असतो त्याजप्रमाणें असती, तसीच दुसरे जिन्नसाचे उत्पन्नाच्या खर्चाप्रमाणें त्याची किंमत असती. सोनें खाणींतून काढून विकायासारखे स्थितीस आणायास जे श्रम पडतात व तें जेथें विकलें जाईल तेथें न्यावयास जी मेहनत लागती तो सर्व उद्योग करणें याचेंच नाव सोनें उत्पन्न करणें आहे. सोन्याचे मोबदला-मोल तर सोन्याचा जसा खप असेल व भरती असेल त्याप्रमाणें अधिक-उणें असतें, सोन्याचे मोबदला जो माल द्यावयाचा त्यापेक्षां अधिक अथवा कमी माल द्यावा लागला म्हणजे समजावें कीं सोन्याचे मोबदला-मोलांत अंतर पडलें. जसें इतर जिन्नसांचें मोल पैक्यानें ठरलें जातें, तसें सोन्यारुप्याचें मोल ठरायास तें सोनेंरुपेंच प्रमाण होत नाहीं.

गोपाळ : दुसऱ्या जिन्नसांचें मोल सोन्यारुप्यानें ठरतें, तेव्हां सोन्यारुप्याचे मोबदला-मोलांत अधिकउणें झालें असतां त्यां जिन्नसांचे मोलांतही अधिकउणें होईल.

गुरु : होय. जिन्नसांचें अमुकच मोल असावें असा केवळ निश्चय सोन्यारुप्यानेंच होत नाहीं; कारण सोनें रुपें पुष्कळ झाल्यामुळें त्याचा भाव उतरला तर त्याचे मोबदला जो माल द्यायाचा तो कमी दिला जातो. म्हणजे असें होतें कीं सोन्यारुप्याचें मोल उतरलें तर मालाचें मोबदला-मोल उतरत नाहीं; तें उलटें चढून माल महाग होतो. पैक्याची कमती झाल्यामुळें पैक्याचा भाव चढला तर त्याच्या मोबदला अधिक माल द्यावा लागतो, म्हणजे असें होतें कीं मालाची किंमत उतरून माल स्वस्त होतो.

गोपाळ : कोणे एका जिन्नसाची कमती झाल्यामुळें त्याचें मोबदला-मोल वाढतें म्हणजे त्याची जी मुळची किंमत त्यापेक्षां अधिक किंमत द्यावी लागती. याजकरून पाहतां सोन्यारुप्याची कमती झाल्यामुळें असें होईल कीं पूर्वी जितक्या मालाचे मोबदला सोनेंरुपें मिळत होतें तितक्या मालाचे मोबदला सोनेंरुपें कमी मिळूं लागेल; म्हणजे फराभर धान्यांस जो पैका येत होता त्यापेक्षां कमी पैका येऊं लागेल. अर्थात धान्य स्वस्त होईल.

गुरु : अरे, बहुमूल्य धातूंची कमती झाल्यामुळें एकटें धान्यच काय, वस्त्रपात्र इत्यादि सर्व सवंग होईल.

गोपाळ : बरें, पैक्याची कमती होऊन सर्व जिन्नस स्वस्त झाले तर त्यांत देशाचें हित आहे किंवा कसें?

गुरु : जिन्नस उत्पन्न करायाचा खर्च कमी झाल्यामुळें जो जिन्नस पुष्कळ होउन स्वस्त होतो त्यांत देशाचें हित आहे; पैक्याचे कमतीमुळें स्वस्त होतो त्यांत काहीं हित नाहीं. पैक्याची कमती झाल्यामुळें माल दास्तानीच पडून राहातो त्याचे मोबदला-मोलांत अधिकउणें न होता त्याची किंमत उतरती. म्हणून अशा रीतीने जो माल उतरला तो वास्तविक स्वस्त झाला नाहीं, दिसण्यांत मात्र स्वस्त झाला. च्यार आण्यानें धान्याची पायली ज्या वेळीं मिळत होती त्या वेळींच्या धान्याइतकेंच धान्य गावांत असतां दोन आण्यानें पायली मिळूं लागली तर त्या सवंगपणामुळें धान्य पुष्कळ झालें असें होणार नाहीं.

गोपाळ : गावांत धान्याची अधिक भरती न होतां किंमत उतरून दोन आण्यानें पायली मिळूं लागली तर मजूर लोक सवंगपणा पाहून धान्य खपवून टाकितील; त्यामुळें दुसरें पिक येई तोंपर्यंत धान्याची फार कमती होईल. म्हणून आपण जो दिसायाजोगा किंबहुना खोटा सवंगपणा सांगितला त्यांत देशाचें अनहित आहे.

गुरु : तूं म्हणतोस तसें होणार नाहीं. कारण पैक्याचीच कमती असली, मग धान्य जरी सवंग झालें तरी मजूर लोक अधिक खपविणार नाहींत. अधिक विकत घ्यावयास त्यांचेजवळ पैका कोठून येईल? पैक्याचे कमतीमुळें जसा सर्व जिन्नसांचा पाड उतरेल तसा रोजमुऱ्याचाही पाड उतरेल. म्हणून धान्य विकत घेण्याचें जें त्यांचें सामर्थ्य त्यांत अधिकउणें होणार नाहीं.

गोपाळ : खरें. सोन्यारुप्याची एखादी नवीन खाण सांपडली त्यामुळें अथवा कांहीं दुसऱ्या कारणामुळें पैक्याची भरभर झाली तर सर्व जिन्नसाचा भाव चढेल.

गुरु : होय, असा जो भाव चढणें तो जिन्नसाचे कमतीमुळें चढत नाहीं. म्हणून जरी त्याची किंमत चढली तरी त्याचें आंगमोल चढत नाहीं. त्या जिन्नसाच्या मानांत अधिकउणें होत नाहीं. म्हणून लोकांस जितका मिळायाचा तितकाच मिळत असतो. इतकें मात्र होतें कीं द्रव्य पुष्कळ झाल्यामुळें पैक्याचा भाव उतरतो. त्यामुळें असें होतें कीं पूर्वी जो जिन्नस जितक्या पैक्याने मिळत होता तितक्याच पैक्याने तो जिन्नस मिळत नाहीं; त्यास अधिक पैका द्यावा लागतो. धान्याचे दर पायलीस दोन आणे द्यायाचे तर चार आणे द्यावे लागतात. परंतु पैक्याची भरभर झाल्यामुळें रोजमुरा दुप्पट मिळूं लागतो, म्हणून दर पायलीस चार आणे देऊनही धान्य घेण्याचें सामर्थ्य मजुराचे अंगीं येतें. कोणे एके पदार्थाची किंमत आणि आंगमोल हीं दोन्हीं निरनिराळीं असतात.

एकादे पदार्थाचें मोल उतरतें आणि किंमत चढती तो प्रकार सांगतों. पायलीभर धान्य दोन आण्यानीं मिळायाचें तें कोणे समयीं चार आण्यानीं मिळूं लागेल. परंतु पैक्याची भरभर झाल्यामुळें असें होईल कीं पूर्वी जितकें तेलतूप दोन आण्यानीं मिळत होतें तितकें चार आण्यानीं मिळणार नाहीं. म्हणून चार आण्याचे तेलतुपास पायलीभर धान्य मोबदला देणें योग्य नव्हे. कारण धान्याचे मोबदला-मोल तेलातुपाचे मोबदल्यापेक्षां उतरलें; त्याची किंमत म्हणजे पैक्यानें ठरलेलें मोल मात्र चढलें.

गोपाळ : अमुक जिन्नसाचे भावांत अधिकउणें झालें आहे, तें जिन्नस अधिकउणा झाल्यामुळें झालें आहे, अथवा पैका अधिकउणा झाल्यामुळें झालें, हें आपण कशावरून समजावें? तें समजण्याविषयीं कांहीं नियम असावा.

गुरु : मोलाविषयीं निर्णय करणें म्हटलें म्हणजे फारच कठिण, कारण अमुक पदार्थांचें अमुकच मोल असावें, याविषयीं नित्य एकसारिखें असणारें असें प्रमाणच नाहीं. ज्याचें मोल कधींच पालटू नये असा प्रकृतिसिद्ध किंवा कृतिसिद्ध कोणी पदार्थच सांपडत नाहीं. असा जर पदार्थ असता तरच मोलाविषयीं निर्णय करितां येता.

गोपाळ : असा पदार्थ असता तर फारच उपयोगी पडता. कोणे पदार्थाची किंमत ठरविणें ती दुसरे पदार्थाची किंमत लक्षांत आणून ठरवितात, त्या दुसरे पदार्थाची किंमत अधिकउणी होत असली, तर मग बरोबर किंमत ठरणें कोठून होईल? एके पदार्थांचे किंमतीचा हवाला दुसरे पदार्थाचे किंमतीवर, दुसऱ्याचा तिसऱ्यावर असें कोठपर्यंत करीत जावें? हें तर जसें कोणी म्हणतात कीं पृथ्वीस आधार शेषाचा अथवा हत्तीचा, हत्तीस आधार कूर्माचा त्यासारिखें झालें. कोणाकडे ५ बिघे जमीन आहे, एवढ्यावरून तर त्याचे संपत्तीचें अनुमानच होणार नाहीं, परंतु दर बिघा अमुक किंमतीचा आहे असें सांगितलें तर त्याची अमुक संपत्ति असें ठरवितां येईल. तेव्हां जमीनीचे लांबीरुंदीवर किंमत ठरती असें म्हणावें तर तेंही प्रमाण नाहीं. ती जमीन सुपीक असेल, अथवा चांगले सोईचे ठिकाणीं असेल, अथवा कंपीक, नापीक, गैरसोईची असेल त्याप्रमाणें तिची किंमत ठरेल. बरें, हेंही असो. जमीनीचे धन्यानेंच सांगितलें कीं दर बिघा ५०० रुपये अशी माझी जमीन आहे, त्यावरून किंमत ठरवितां येईल असें म्हणावें तर तेंही बराबर ठरवितां येणार नाहीं; कारण पैक्याचा भाव एकसारिखाच असत नाहीं. कोठे पैक्याची भरभर झाली असती, कोठे कमती असती, कोठे पैक्याचा भाव उतरला असतो, कोठे चढला असतो. सारांश ज्या प्रमाणांत कधीच अंतर पडू नये असें कांहीं प्रमाण असल्यावांचून किंमतीचा बराबर ठराव होणार नाहीं.

गुरु : बरें, जर पैक्याचा भाव दरशेंकडा २५ इतका उतरला असला, आणि कापड करण्याचे कामांत कांहीं चांगली युक्ति अढळल्यामुळें एक ताका तयार करायास चार रुपये बसायाचे तर तीन रुपये बसूं लागले, तर तें कापड कोणत्या किंमतीनें विकेल?

गोपाळ : त्याची जी मूळ किंमत चार रुपये त्याच किंमतीनें विकेल. पण त्या किंमतीनें जरी तें विकलें तरी तें स्वस्तच समजावें, कारण जसा पैक्याचा भाव उतरला तसें तें कापड तयार करण्याचा खर्चही कमी झाला.

गुरु : खरें. बरें, जर पैक्याची कमती झाली, आणि एकादा जीन्नस उत्पन्न करायास जो खर्च लागायाचा तोही कमी झाला, तर असें होईल, कीं तो जिन्नस देण्यांतच स्वस्त होणार नाहीं, तर वास्तविक स्वस्त होईल.

गोपाळ : तसें झालें तर कापडाची किंमत जी चार रुपये होती ती उतरून दोन रुपये होईल.

गुरु : तशांत कापडाचा जो खप असायाचा त्यापेक्षां कापडाची अधिक भरती झाली, त्यामुळें कापड करणारे कापड करायास जो खर्च बसला होता त्यापेक्षां तें कमी किंमतीनें विकूं लागले, तर त्या कापडाची किंमत फारच उतरेल, किंबहुना एक रुपयास ताका मिळूं लागेल.

या अशा कारणावरून किंमत उतरती, परंतु पदार्थ उत्पन्न करायास जो खर्च लागायाचा तो कमी लागल्यामुळें जी किंमत उतरती त्यांत मात्र हिताची गोष्ट आहे. पैक्याचा भाव उतरल्यामुळें किंमत उतरती, तो उगाच दिसायाजोगा स्वस्तपणा असें समजावें. जितकी भरती पाहिजे त्यापेक्षां

फार भरती झाल्यामुळें किंमत उतरून जी सवंगाई होती, त्यांत तर अनहितच जाणावें. तेणेंकरून लोकांची खराबी होती, आणि उद्योगाचाही मोड होतो.

गोपाळ : आपल्या बोलण्यावरून असें सिद्ध होतें, कीं पैक्याची भरभर होऊ, अथवा कमती होऊ, पण लोकांत पैका अधिकउणा होत नाहीं.

गुरु : असें कां म्हणतोस ? पैक्याच्या भावांत एकाएकी अंतर पडलें असतां तें सर्व लोकांस जाचतें. आणि कित्येकांचा असा मोड होतो कीं ते कधींच सुधरत नाहींत.

गोपाळ : नुकसान यांत काय सांगावें ? कुळ आपलें गवत धन्यास विको अथवा दुसरे कोणास विको, परंतु बाजारभाव जेव्हां पडला, तेव्हां कुळास नुकसान झाल्यावांचून राहणार नाहीं.

गुरु : खरें. जर पैक्याचा भाव दुप्पट चढला तर माल्याचे ऐवजानें जो जिन्नस मिळायाचा त्याचे दुप्पट मिळूं लागेल. शंभर रुपयानीं दोनशें रुपयांचा जिन्नस मिळेल. याजवरून पाहतां भाडें तर दिसण्यांत जसेंचें तसेंच असतां वस्तुतः दुप्पट वाढेल. तें निरर्थक कुळाकडून काढून धन्याची भर करायास दिलें जाईल.

गोपाळ : हें असें कुळास नुकसान होणें, तें त्या जमीनीचा नवीन करार झाला असतां बंद होईल.

गुरु : खरें, परंतु कुळाकडे जितकीं वर्षे पहिला करार भरायाचा आहे तितकीं वर्षे तर कुळाचें नुकसान होत जाईल. यांत कायद्यास कांहीं विपरीत झालें नाहीं, पण मालाचें रक्षण होणें त्यांत उघड रीतीने अंतर पडलें. अरे, मालाचें रक्षण होणें हेंच संपत्ति उत्पन्न करण्याचें व संचय करण्याचें साधन होय. मेहनत केली असतां त्याचें आपल्यास फळ प्राप्त होईल, अशा आशेनें मेहनत करावी असें वाटतें. परंतु त्यापेक्षां आपले मालाचें संरक्षण होईल, याजवरून मेहनत करायास अधिक उमेद येती.

गोपाळ : बरें, पण पैक्याची भरभर झाल्यामुळें पैक्याचा भाव उतरला असतां आपण सांगतां त्याहून विपरीत परिणाम होईल. कुळाचें तर हित होईल. आणि धन्याचें नुकसान होईल. कारण पैक्याचे कमतीचे समयीं जें भाडें उत्पन्न होत होतें तितकें उत्पन्न होणार नाहीं.

गुरु : नाहीं, होणार यांत काय सांगावें ? पैक्याचे भावांत उणेंअधिक झालें असतां, अलाभकारी म्हणून जे पूर्वी उद्योग करणारे सांगितले, त्यांसही उणेंअधिक नुकसान होतें. त्यांतून ज्यांचा रोजमुरा बांधलेला असतो त्या रोजमुऱ्यांत तर लाभकारी मजुरांचे रोजमुऱ्यांत जसें अंतर पडतें तसें अंतर पडत नाहीं. तशांत सरकारांत जे जाहाजाच्या अथवा लष्करी खात्यांत चाकरीस असतात त्यांचा, तसाच वैद्यक, न्यायाधिश, धर्मोपदेश इत्यादि थोरले रोजगार करणारांचाही बांधलेला रोजमुरा असतो. यांखेरीज, ज्यांचा बांधलेला रोजमुरा नसतो असे जे अलाभकारी मजूर त्यांचें, पैक्याचे भावांत उणेंअधिक झालें असतां, अनहित अथवा हित होतें.

गोपाळ : पैक्याचा भाव उतरला असतां थोरले रोजगार करणारे जे अलाभकारी मजूर ते आपला सांभाळ करून घेतील. परंतु शिपाई, जहाजावर काम करणारे, यांनीं कसें करावें ? यांस यांचा चांगले रीतीनें निर्वाह होईं असा रोजमुरा यांस अवश्य आला पाहिजे.

गुरु : तूं सांगतोस तशा लोकांस सरकारांतून रोजमुरा मिळत असतो आणि अन्नवस्त्रादिकही मिळत असतात. म्हणून केवळ रोजमुराच दिल्यानें जें त्यांचें नुकसान व्हायाचें, तसें नुकसान पैक्याचा भाव पडला असतां होत नाहीं.

गोपाळ : बरें, त्यांस केवळ रोजमुराच मिळत असतां, पैक्याचा भाव पडला तर त्यांची स्थिती कसी होईल ?

गुरु : तें मी तुला दुसरे बैठकीस सांगेन. पैक्याचा भाव उतरला असतां सावकारी व्याजबट्यानें व्यवहार

करणारांचेंही नुकसान होतें. सरकारी नोटी ज्यांचेजवळ असतात त्यांस जें व्याज नोटीप्रमाणें मिळायाचें तें तर मिळत असतें, परंतु त्या नोटींवर कांहीं व्यवहार करूं गेलें असतां कमी उत्पन्न होतें.

गोपाळ : पैक्याविषयीं माझी भलतसीच समजूत होऊन गेली होती. म्यां असें मानिलें होतें कीं जे पदार्थ मिळून संपत्ति झाली आहे, त्यांतीलच पैका एक मुख्य पदार्थ होय. परंतु विचार करितां असें सिद्ध होतें, पैका संपत्तींत मोजायास योग्य नव्हे; कारण देशाची संपत्ति वाढवायास पैक्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. अहो, पैका पुष्कळ झाला म्हणजे सर्व जिन्नस महाग करितो, बरें कमी झाला म्हणजे स्वस्त करितो. एकून महागाई सवंगाई करणें हाच काय तो याचा पराक्रम; याच्यानें देश कांहीं सधन करवत नाहीं. असें आहे म्हणून पैक्यास संपत्ति असें मानूं नये. हा उगाच तिचें सोंग आहे. असो. याचा मुख्य उपयोग इतकाच दिसतो कीं मोबदल्याचा व्यवहार करण्याविषयी हा चांगलें सोईचे साधन आहे. आणि मोल ठरविण्याविषयीं कांहींच वस्तु साधन नसतां हा अपूर्तेसें प्रमाण झाला आहे.

गुरु : पैका संपत्तीचें सोंग नव्हे; कळलें? संपत्ति ज्या मोलानें व्यवहारांत वागती त्याच मोलानें पैका वागत आहे. याचे ठायीं कांहीं मोल नसतें तर याचेबद्दल संपत्तिरूप पदार्थ कोणी कशास देतें? पैका हा देशाचे संपत्तीचाच अंश आहे. जे पदार्थ उपयोगी अथवा उपभोग्य, ते पदार्थ परिमित मानानें मिळाले म्हणजे त्या संचयास संपत्ति असी संज्ञा येती. पैका तर मोबदल्याचे व्यवहाराचें मोठेंच साधन आहे, तसेंच मोलाचा निर्णय करण्याविषयीं प्रमाण झाला आहे. तस्मात् पैक्याचा उपयोग काय सांगावा? यानें मोबदला करण्याचा व्यवहार सोपा केला, त्या योगानें विकाऊ जिन्नसांचा चहूंकडेस फैलाव होऊन ते पुष्कळ करावे असी लोकांस उमेद झाली.

गोपाळ : खरें. पैका व्यवहारांत मोठा उपयोगी आहे. बरें, पण जितका असायाचा त्यापेक्षां अधिक झाला, तर याचें मोल कोठून राहील?

गुरु : तें बोलणें एकट्या पैक्यास लागत नाहीं. संपत्तिरूप जे पदार्थ त्यां सर्वांस लागतें. वस्त्र, पात्र, इत्यादिक अधिक झालीं असतां यांचें मोल कोठून राहील? कोणता पदार्थ कां असेना, अधिक झाला म्हणजे त्याचें मोल उतरतें, आणि तो कांहीं कमी पडत नाहीं.

गोपाळ : जे जिन्नस अधिक झाले ते परमुलखीं नेऊन, आपल्यास जे जिन्नस पाहिजेत ते त्यांचे मोबदला घ्यावे.

गुरु : तसेंच पैक्याचें कां करू नये? पैका अधिक झाला म्हणजे तो परमुलखीं नेऊन, व्यापारी परमुलखी जिन्नस खरीद करितात. अधिक झालेल्या पैक्याचा असा व्यवहार केला नाहीं तर त्याचा संपत्ति उत्पन्न करायास कांहींच उपयोग होणार नाहीं. जितके पिठाचा खप तितकें दळायापुरते घरट असावे. अधिक असले, तर ते आपेआप पीठ देणार नाहीत; ते उगेच संग्रही ठेविल्यानें कांहींच उपयोग होणार नाहीं.

गोपाळ : कोणी असें म्हणतात कीं ज्या देशीं जसा पैका, तसा तो देश मातबर असें समजावें.

गुरु : तें एक अर्थी खरें आहे. तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ विकाऊ जिन्नसांचा व्यवहार करण्यास पुष्कळ पैका पाहिजे. जे चांगले मातबर नांदते देश तेथें पुष्कळ पैका लागतो आणि तो मिळविण्याची त्या त्या देशीं साधनेंही असतात. परंतु पुष्कळ पैका असणें हे संपत्तिमान होण्यास कारण नव्हे. संपत्तिमान होणें म्हणजे विकाऊ जिन्नसाचा मोठा व्यवहार करण्याचें सामर्थ्य येणें, याचें पुष्कळ पैका होणें हें कार्य आहे. लोक मातबरीच्या गोष्टी सांगतां, कार्याचे ठिकाणीं कारण मानितात ही त्यांची चूक आहे. कोणे एका देशीं चांगला व्यापार चालायापुरतें नाणें असावें, म्हणजे त्या

देशाची संपत्तिमान जे देश त्यांत गणना होती. त्यापेक्षां अधिक नाणें असून फळ काय ? असें कामीं न पडायाचें नाणें जो कोणी आपल्याकडची संपत्ति देऊन घेतो, त्यानें ती संपत्ति निरर्थक गमविली असें समजावें.

गोपाळ : लोकांचें बहुधा असें म्हणणें असतें कीं पुष्कळ द्रव्य असलें म्हणजे नाना प्रकारचे उद्योग करावे, व्यापार करावा असी लोकांत प्रवृत्ति होऊं लागती. हें म्हणणें खरें असावें. कारण अमेरिका खंडी सोन्याच्या खाणी सांपडल्यापासून युरोपखंडाची चढती कळा झाली. त्या पूर्वी तर युरोपखंड विपत्तींत व अज्ञानांत गर्क होऊन गेलें होतें.

गुरु : युरोपखंडांत उद्योगाचा उदय होण्यास तूं सांगतोस तें एक कारण आहे खरें. अमेरिका खंड पूर्वी अज्ञात होतें. त्याचा शोध लागतांच जसा एक नवीन लोकच अढळला, असें युरोपखंडींच्या लोकांस वाटून ते रानवटपण अज्ञान इत्यादिरूप झोपेंतून उठून उद्योगास लागले. परंतु अमेरिका खंडीं जरी सोन्याच्या खाणी सांपडल्या नसत्या, तरी युरोपखंडी उद्योग-व्यापार बंद पडला नसता. कारण सोनें जरी अमेरिकाखंडीं न मिळालें तरी मोठा व्यापार करायाजोगे साकर, काफी, नीळ, तंबाखु, कित्येक औषधि इत्यादि पुष्कळ संपत्ति सांपडती, तेणेंकरून युरोपखंडीं सुखसमृद्धि झाली आहे. केवळ सोन्यारुप्याच्या लोभानेच मनुष्याची उद्योगाकडे प्रवृत्ति होत नाहीं.

अरे युरोपखंडीं उत्तम प्रकारें करून कृषिकर्म होतें, अकुंठितपणें व्यापार चालतो, नानाप्रकारच्या उत्कृष्ट शिल्प कलाकौशल्यें आहेत, हीं काय अमूल्य धातूंचे समृद्धीने केलीं ? हे असे लाभदायक परिणाम तेथील लोकांत पूर्वी नव्हते, त्याचें कारण द्रव्याची न्यूनता नव्हे; कळलें ? कोणी म्हणतात कीं नाणें परमुलखीं व्यापारास नेऊं नये, जिन्नसच मोबदल्याकरितां न्यावा. परंतु असें म्हणणें नीट नव्हे असें आडम स्मिथ् साहेबाचे मतें आहे.

गोपाळ : कोणे एके देशीं नाणें पुष्कळ झालें आणि परमुलखीं व्यापारास नेण्याची मनाई असली, तर तें आटून त्याची खोट करावी.

गुरु : नाणें आटून खोट करायाची मनाई असली, तर तें नाणें तसेंच राहील अथवा त्याचें अधिक चलन होईल. अर्थात नाण्याचा भाव उतरेल.

सांप्रत इंग्लंड देशीं नाणें व्यापारास बाहेर नेण्याची मनाई नाही, तेणेंकरून व्यापारास चांगली आनुकूलता झाली आहे. नाणें फार जमून त्याचा भाव उतरूं लागला. अर्थात विकाऊ जिन्नसाची किंमत वाढूं लागली म्हणजे तेथील व्यापारी नाणें परमुलखीं जिन्नस खरीद करायास नेतात. आणि इकडे किंमत चढली असें पाहून परमुलखी व्यापारी तिकडचा माल इकडे पाठवून देतात, आणि इकडे जे जिन्नस महाग मिळणार ते न घेतां स्वस्त झालेला जिन्नस, म्हणजे नाणें, मोबदला घेतात.

गोपाळ : अर्थात, ते विक्री करितात, खरीद करीत नाहींत.

गुरु : होय. याप्रकारें अधिक झालेलें नाणें मुलखांतून जातें. मग पुढें व्यापार होऊं लागला म्हणजे नाण्याचा भाव चढतो; जिन्नसांचा भाव उतरतो. तेव्हां परमुलखी व्यापारी आपल्याकडचे मालाबदल नाणें न घेतां इकडचा स्वस्त झालेला जिन्नस घेतात, म्हणून नाणें व्यापाराकरितां परमुलखीं पाठविण्यांत कांहीं भय नाहीं.

युरोपखंडीं स्पेन व पोर्तुगाल म्हणून देश आहेत, तेथेंही परमुलखीं नाणें व्यापारास नेण्याची मनाई झाली होती. त्याप्रमाणेंच जर चाललें असतें, तर त्या देशीं जें अमेरिकेंतून आणलेलें पुष्कळ सोनें रुपें, त्याचा तांबें शिसें यांच्यापेक्षां कांहीं अधिक उपयोग झाला नसता.

बरें, नाण्याची कमती झाल्यामुळें जिन्नस खरीद करण्याचें गावांत कोणांत सामर्थ्य राहिलें नाहीं. तेणेंकरून जिन्नसाचा भाव उतरला तर कसें काय होईल ?

गोपाळ : तर परमुलखी व्यापारी येऊन इकडचा माल खरीद करितील, आणि त्याचे मोबदला माल न देतां नाणें देतील. ते खरीद मात्र करितील; इकडचा बाजारभाव पडलेला पाहून विक्री करणार नाहींत.

गुरु : भले, चांगलें उत्तर दिलें. याप्रकारें सर्व सुधारलेल्या देशीं सोन्यारुप्याचा पैलावा होत असतो. जेथें कमती पडली म्हणजे तेथें सर्व ठिकाणाहून संपत्तीचा प्रवाह चालतो आणि चांगली भरती झाली म्हणजे तो प्रवाह उलटतो. या बहुमूल्य धातूंचा यथानुक्रमें प्रसर होत असतो आणि त्यांचे मोलांत अंतर पडूं नये, नेहमी एकसारिखेच रहावें, असा रोख असतो, म्हणून इतर वस्तूंचें मोल ठरवावयास बहुधा याच अमूल्य धातु प्रमाण धरल्या आहेत. पैका इतर वस्तु विकत घ्यावयास-द्यावयास साधन आहे. त्या वस्तूंचे मोलांत जसें अंतर पडतें तसें पैक्याचे मोलांत अंतर पडतें, तर मोलाचा निर्णय करण्याविषयीं पैक्याची कोणीच योजना केली नसती.

# उत्तरभाग संवाद १७

## पैक्याचविषयीं

सोनेंरुपें यांचा भाव उतरत आल्याचा प्रकार – नाण्यामध्यें हीण घातल्यानें त्याचें मोल कमी होतें – सरकारी व सावकारी पेढ्या – कागदाचा पैका – कागदाच्या नाण्याबदल सरकारानें पाहिजे तेव्हां धातुरूप पैका न देण्यापासून होणारे परिणाम – पैका व त्याचे साह्यानें इतर वस्तूंचा होणारा जो फैलावा, त्या उभयतांचा परस्पर संबंध, इत्यादि सांगितलीं आहेत.

गोपाळ : कालच्या संवादावरुन असी कल्पना सिद्ध होती कीं एका देशीं नाण्याची भरभर होऊन त्याचा भाव उतरत नसला तरी तसें सर्वत्र होणार नाहीं. कारण बहुमूल्य धातु प्रतिवर्षी खाणींतून काढीत असतात, त्यापैकीं कांहीं अंशाचीं भूषणें, पात्रें इत्यादि करितात, परंतु बहुत्येक अंशाचें टांकसाळींत नाणें घडतें. तेव्हां असी जी नाण्याची भरती होत जाती त्यामुळें नाण्याचा भाव सर्वत्र उतरला राहील.

गुरु : नाण्याची भरती झाली असतां त्याचा भाव उतरणार नाहीं. कारण जसी भरती तसा खप होतो. भूमींतून व्यवहारोपयोगी वस्तु जशा जशा अधिक उत्पन्न होतात, तशा तशा अमूल्य धातूहि होत जातात. त्या वस्तूंचा जसा व्यवहार होतो, त्याचप्रमाणें नाण्याचा व्यवहार होतो. म्हणून असा विचार करावा, कीं वस्तु केवढ्या आणि त्या वस्तु ज्या नाण्यानें घ्यावयाच्या तें नाणें केवढें, याप्रमाणें पाहतां नाण्याची पृथ्वीवर भरभर होऊन त्याचा भाव उतरला राहील असें सिद्ध होत नाहीं.

एक फरा धान्याची किंमत एक रुपया असली, आणि प्रतिवर्षास जसें हजार फरे धान्य भूमींतून उत्पन्न होऊं लागलें, तसेच हजार रुपये खाणींतून निघूं लागले, तर त्या धान्याची किंमत जसीची तसीच राहील आणि नाण्याची भरती होत गेली, तरी त्याचा भाव उतरणार नाहीं.

गोपाळ : महाराज, हजार फऱ्यांचे धान्याचा लेकांत खप झाला म्हणजे झालें, मागाहून जे हजार रुपये खाणींतून निघतील, ते तर तसेच राहतील.

गुरु : अरे, हजार फरे धान्य खाणारे जे लोक, त्यांतून बहुत्येक जण येते वर्षी हजार फऱ्यांपेक्षां अधिक धान्य उत्पन्न करतील.

गोपाळ : याजवरुन असें सिद्ध होतें कीं, कृषिकर्म व शिल्पकर्म यांचें उत्पन्न धातूचे खाणीपेक्षां अधिक.

गुरु : धातूचे खाणीतून जें प्रतिवर्षी उत्पन्न होतें, तें शिल्पकर्म करायास व जमीनीचें जें अधिक उत्पन्न होतें तें विकत घ्यावयास पुरें पडेल तर नाण्याचा भाव व वस्तूची किंमत जसीची तसीच राहील. जर खाणीतून सोनेंरुपें कमी निघालें तर मालाची किंमत उतरेल. जर अधिक निघालें, तर चढेल. सारांश, नाण्याचे कमीअधिक असण्यावर मालाचे किंमतीचा फेरफार होणें आहे.

अमेरिकाखंडीं सोन्यारुप्याचे खाणींचा शोध लागल्यापूर्वीं नाण्याचें मोबदला-मोल अधिक असे. पैक्याची पूर्वी किंमत किती असे, आणि आतां किती आहे, तें पूर्वकाळींचे राजे किती द्रव्यानें लाखो फौजा ठेवित त्याजवरून पहावें. पर्शिया देशींना क्षक्षक्षॉस पादशाह होऊन गेला, त्याचा तो देश मातबर व फार मोठा असतां, त्यांत काय ते तीन कोटी रुपये उत्पन्न होत, आणि त्याची जी मोठी प्रबळ सेना, तशींच ल्ढाऊ गलबतें यां एवढ्यांचा त्या तितक्या उत्पन्नानें निर्वाह होई.

गोपाळ : एकूण आतां जें काम जितक्या नाण्यानें होतें, त्या कामास पूर्वी तितकें नाणें लागत नसें. तेव्हां नाण्याची किंमत मोठी होती असें सिद्ध होतें. असी मोठी किंमत असतां, रोमन लोकांनीं डामडौल ख्यालीखुशालींत फारच नाणें उधळिलें, असें त्यांचे इतिहासावरून समजतें.

गुरू : त्या काळीं नाण्याची मोठी किंमत इतर देशीं असेल. रोमन लोकांस तर नाणें मोठे किंमतीचें असें वाटत नव्हतें, कारण त्यांनी योग्य श्रमानें मिळविलें नव्हतें. जे जे मुलख घेतले, ते ते सर्व लुटून तेथून सोनेंरुपें आणिलें. असो. नाणें अधिक झालें म्हणजे नाण्याचा भाव उतरतो म्हणून सांगितलें. तो भाव उतरण्यास दुसरीही कारणें आहेत. एक तर असें कीं जें नाणें पाडितात त्याची चांगली चोख धातु नसती, तींत कांहीं भेळ असती. पूर्वीच्या अकबरशाही मोहरा, सुरती रुपये, चोख सोन्यारुप्याचे वजनांत बरोबर असत. तशा दुसऱ्या शिक्याच्या मोहरा व रुपये नसत. कित्येक देशीचें राजे नवीन नाणें पाडवीतेसमयीं चांगल्या चोख धातूंत दाटून भेळ घालवितात. तेणेंकरून नाणें कमी असतां अधिक भरतें. कित्येक राजानी लोकांपासून चांगला ऐवज घेऊन त्याची फेड या अशा नाण्यानें केली; हें असें करणें हें कपट समजावें. अशा नाण्याचे चलनापासून अनेक वाईट गोष्टी होतात. एक तर रयतेस नुकसान होतें, नाण्याच्या भावांत अंतर पडतें. हे रुपये इतके अधिक, ते इतके कमी असा गोंधळ होतो. जिन्नसाचा भाव वाढतो. याप्रमाणें नाणें इसवी सन १३५१ नांत इंग्लंड देशीं एडवर्ड तिसरा म्हणून एक राजा होऊन गेला, त्यानें पाडविलें होतें. असो. अलिकडे तर कागदाचे रुपयांचीं चाल झाली आहे...

गोपाळ : काय म्हणतां! कागदाचे रुपये झाले काय? अशा रुपयांची हो काय किंमत येणार!

गुरु : कागदाची किंमत म्हटली तर फारच स्वल्प, किंबहुना कांहींच नाहीं. असें असतां धातूचे नाण्यानें जो व्यवहार व्हायाचा तो व्यवहार कागदाचे नाण्यानें होऊं लागला हाच चमत्कार. वस्तूस दुसरी वस्तू देणें म्हणजे मोबदल्यानें व्यवहार करण्यांत फार अडचणी पडूं लागल्या, त्या दूर करण्याकरितां पैक्याची चाल झाली. कोणी कोणास कांहीं वस्तु देतो, त्या वस्तूचा जो पैका घेतो, तो अशा भरंवशानें घेतो, की मला जी वस्तु पाहिजे ती या पैक्यानें मिळेल; त्यास ती वस्तु त्या पैक्याच्या मोलाइतकी मिळाली म्हणजे झालें, मग तो पैका कशाचा कां केला असेना, त्याकडे तो पाहणार नाहीं.

गोपाळ : जिन्नस विकत घेण्याचें मोल पैक्यालाच आहे. तें कागदास येत नाहीं. कागदाचा तुकडा घेऊन याबदल कोणी कांहीं जिन्नस देणार नाहीं.

गुरु : बरें, तुला एक कागदाचे तुकड्यावर लिहून दिलें, कीं तूं जेव्हां मागसील तेव्हां तुला हजार रुपये मिळतील, तर तो कागदाचा तुकडा तुला हजार रुपयांचे ठिकाणीं होईल किंवा कसें?

गोपाळ : तें तसें आपण लिहून दिलें असतां होईल, कारण आपल्याविषयीं माझी खातरी आहे. तसें कोणी अनोळख्यानें लिहून दिलें असतां होणार नाहीं.

गुरु : बरें, असाच हजार रुपये देण्याचा एक कागदाचा तुकडा मोठे प्रसिद्ध सावकारापासून मिळाला तर तूं घेसील कीं नाहीं?

गोपाळ : त्या सावकाराविषयीं माझी खातरी पटल्यास मी घेईन.

गुरु : खरें. मातबर प्रतिष्ठित सावकारांची लोकांस खातरी पटून, ते त्यां सावकारांचे भागीनें मांडलेल्या पेढ्यांच्या कबूलाती चिठ्या (ज्यांस ब्यांकनोटी म्हणतात) त्या नाण्याचे ठिकाणीं घेतात.

गोपाळ : तेव्हां अमूक ऐवज मागितला असतां दिला जाईल, असें ज्या चिटींत कबूल करून लिहून दिलें असतें, तीच ब्यांकनोट होय.

गुरु : खरें, अशा नोटींस लोकव्यवहारांत नाण्याचे ठिकाणीं चालवितात. त्या नोटी ज्या पेढीच्या असतात त्या पेढीची त्यां नोटींवर खूण असती. त्या नोटी त्या पेढ्यांस दाखविल्या असतां, त्या पेढ्यांतून त्या नोटींचा ऐवज मिळतो.

गोपाळ : नोटीची म्हणजे कागदाचे पैक्याची युक्ति काढली, ही फार चांगली. यांत फार कमी खर्च होतो. ही युक्ति जसी काय सोन्याची खाणच सांपडली, किंबहुना सोन्याचे खाणीपेक्षांही विशेष. एथें उत्पन्नाविषयीं कांहीं धोका नाहीं, आणि खर्च तर फारच स्वल्प.

गुरु : होय, धातूचे नाण्याचें ठिकाणीं कागदाचें नाणें चालू करणें ह्यांत फार हिताची गोष्ट आहे. एकादे देशांत वीस कोटींचें नाणें आहे. त्याचें दर शेकडा दरसाल ८ प्रमाणें एक कोट साठ लक्ष रुपये उत्पन्न होतात. हे इतके रुपये पेढ्यांत न वहिवाटीतां, दुसरे उद्योगांत वहिवाटीले असतां तितकेंच उत्पन्न होईल. परंतु पुंजी दुसरे खटल्यांत घातल्यामुळें नुकसान होईल. पुंजीस अग्नीचें भय, पाण्याचें भय, गलवतें बुडणें इत्यादि जोखमें आहेत. अशा कारणामुळें जे तोटे होतील ते पुरे पाडायास दरवर्षास पुंजींत भर घातली पाहिजे. म्हणून सोन्याचें नाणें व्यवहारांत चालू ठेवणें यांत खर्चाचें घर आहे.

गोपाळ : हीं असी कागदाचा पैका चालविण्याची युक्ति लोकांस पूर्वी कसी सुचली नाहीं ? ही युक्ति काय अलिकडचीच आहे ?

गुरु : पुरातन इतिहासांत ही युक्ति कोठे अढळत नाहीं. परंतु कार्थिजिनियन् म्हणून जे पूर्वी लोक झाले, ते छापलेली चांमडीं नाण्याचे ठिकाणीं वहिवाटीत होते. त्यां लोकांनी धातूचें नाणेंही पाडलें होतें. त्या नाण्याची किंमत अमुक असें छाप लागलेल्या चामड्याचे तुकड्यावरून समजत. हालीं जसा कागदाचा तुकडा म्हणजे नोट असेल त्याप्रमाणें, शंभर, हजार, इत्यादि रुपये असें त्या कागदाचे तुकड्यावरून समजतात.

गोपाळ : पूर्वीं कागद तयार करण्याची युक्ति ठाऊक नव्हती. तेव्हां सर्वत्र लोकांत लिहिणें चर्मपत्रावर होत असे, असेंच पातळ साफ चांमडें घेऊन अमुक अमुक रुपये घ्यावयाचे असा ठसा त्या चामड्यावर बसवीत असतील.

गुरु : त्या प्रकरणीं बराबर शोध लागला नाहीं आणि त्यावांचून कांहीं अडतें असेंही नाहीं. असो. कागदाचे नाण्याच्या पेढ्या इंग्लंड देशीं चालू झाल्या. अलिकडे या देशीं मुंबई इत्यादि शहरीं चालू झाल्या आहेत. तेथें हजारों रुपयांची घडामोड होत असती. मुंबई ब्यांक ही एक तशी पेढी होय.

गोपाळ : यां पेढ्यांच्या नोटी मुंबई इलाख्यांत पुणे, नगर, सुरत, अहमदाबाद इत्यादि सर्व ठिकाणीं चालतात किंवा मुंबई शहरांतच चालतात ?

गुरु : जशा मुंबई शहरांत बिनदिक्कत चालतात, तशा सर्वत्र चालत नाहीं. कारण बाहेर जिल्ह्यांत मोठे सावकार मुंबईचे सावकारांसी व्यवहार करणारे, तसेच साहेबलोक, यांशिवाय गोरगरीब लोकांस नोटीचा व्यवहार काय कळे ? म्हणून जिन्नस घेण्यादेण्याचें काम प्रांतांत बहुधा नाण्यानेंच होतें.

गोपाळ : महाराज, आपण म्हणतां कीं नाण्यांस अग्नी पाणी इत्यादिकांचें भय, तर कागदाचे नाण्यास तसें भय नाही काय ? कारण नोट जळाली, कोणी चोरली अथवा कोठे सांडली म्हणजे तो ऐवज

नोटीचे धन्यास मिळत नाहीं, तशांत नाण्यानें व्यवहार करणारे सावकार लोकांचीं दिवाळीं निघतात, तसींच नोटीने व्यवहार करणारे पेढ्यांचीं दिवाळीं निघतात. असेंच जर आहे, तर मग कागदाचे नाणें चालू करण्यांत विशेष हित दिसत नाहीं ?

गुरु : अरे, कोणतेंही उलेंढालें म्हटलें म्हणजे तें अगदी बिनजोखमी कोठून असणार ? मुळीं द्रव्यालाच स्थिरता नाहीं, मग त्यानें जरी कागदाचें रूप धरिलें तरी त्याचा मुळस्वभाव अगदींच नाहींसा होणार नाहीं. बरें, हजारो रुपये नेण्यासवरण्यास किती मेहनत पडती ? लाखो रुपये कोठे नेणेंठेवणें झाल्यास चोरट्यांचे तत्क्षणीच दृष्टीस पडते ? ते कागदाचे रुपये सहजांत नेतां, देतां, घेतां, येतात. यांत किती हिताची गोष्ट आहे बरें ! पेढ्यांचीं दिवाळीं निघतात याविषयी म्हणशील तर ज्या पेढीस सरकारची हमी असती, तेथें दिवाळें निघून नुकसान होईल असें संभवत नाहीं. कागदाचें नाणें चालू झाल्यापासून असें झालें आहे कीं कांहीं नाणें आणि कांहीं सरकारी हुकमावरून तयार केलेल्या नोटी पदरी होतांच लाखो रुपयांची घडमोड करण्याचें अंगीं सामर्थ्य येतें. जर कागदाचे नाण्याची चाल नसती तर जेव्हां लाखो रुपये रोख जवळ होते, तेव्हांच काय तो लाखो रुपयांचा व्यवहार चालता. ब्यांकनोट क्वचित कोणे वेळीं जळाली सांडली असतां त्या नोटीचा धनी तितक्या ऐवजास नागवला असें जरी आहे तरी तसें सरकारी नोटीविषयीं समजूं नये. नोटीचा आपल्या जवळ नंबर असल्यास ती गोष्ट विदित केल्यास सरकारांतून पूर्ववत नोट मिळून तिजवर जें व्याज मिळणें तें जसेंचें तसेंच मिळूं लागतें.

गोपाळ : कागदाचे नाण्याचा आपण सांगतां तसा उपयोग होतो खरा. हें नाणें मोजून घ्यावयाची, रुपये खरे खोटे असें पाहून घेण्याची कांहींच अडचण पडत नाहीं. तीन हजार रुपयांचे, तीन कागदाचे तुकडे हातीं आले म्हणजे काम झालें. आणखी असें आहे; कागदाचे नाण्याचें चलन झाल्यामुळें धातूचें बहुत्येक नाणें रिकामें पडत असेल. तें नाणें ज्या देशीं कागदाचे नाण्याचें चलन नसेल तेथें व्यापारास नेण्यास व्यापारी लोकांस चांगलें सोय पडत असेल ?

गुरु : त्या देशीं जर कागदाचे नाण्याचें चलन असल्यास कसें होईल ?

गोपाळ : कागदाचे नाण्यांचें सर्व पृथ्वीवर चलन झाल्यास मग देशोदेशीं धातूचें नाणें रिकामें राहील; जो व्यापार होणें तो कागदाचेच नाण्यानें होईल.

गुरु : जे चांगले सुधारलेले देश आहेत तेथें कागदाचें नाणें जसेंजसें चालू होईल तसेंतसें धातूचें नाणें रिकामें राहूं लागेल. कागदाचेच नाण्याची फार चाल होऊं लागली असतां त्या कागदाचे नाण्याचा भाव उतरेल. परंतु असें जरी झालें तरी धातूचें अवघेंच नाणें गडप होऊन जाणार नाहीं. कारण कागदाचे नाण्याचे व्यवहार करणाऱ्या पेढीदारांस आपल्या संग्रहीं धातुचें नाणें ठेवावें लागतें. तें अकस्मात नोटीचे धनी पैका मागूं लागल्यास त्यांस नोटीचे कराराप्रमाणें तत्क्षणीच दिलें पाहिजे; न दिलें तर पेढी बुडाली असें होईल.

गोपाळ : परंतु जितक्या नोटी तितकेंच नाणें ते पेढीदार संग्रही ठेवीत नसतील, तितकेंच जर ठेविलें तर त्या कागदी नाण्याचें खटल्यांत काय उत्पन्न होईल ? तें करून न करून सारिखें.

गुरु : गावांत नाण्याची जसी भरती कमती असती, त्या बेतानें ते आपल्याकडे रोख नाणें आणि नोटी ठेवितात. आणि रोकड व नोटी मिळून जसी काय अवघीच एकच पुंजी असें करून त्या अवघ्यावर रोकड पुंजीप्रमाणें उत्पन्न करून घेतात. तेव्हां असें होतें, रोकडीवरच नाहीं, तर केवळ कागदाचे तुकड्यांवरही उत्पन्न होतें.

गोपाळ : बरें महाराज, सोन्याचा तोळा म्हटला म्हणजे त्याची किंमत सरासरी पंधरा रुपये; त्याचे वजनांत तर अधिकउणें होत नाहीं; किंमतींत कां अधिकउणें होतें ? पूर्वी कोणी सांगतात, वीस

बावीस रुपये दर तोळ्यास पडत. आतां सोनें इतकें स्वस्त झालें आहे कीं दर तोळ्यास सवापंधरा रुपये मात्र पडतात हें कसें ?

गुरु : इतर जिन्नसाप्रमाणें सोन्याची किंमत चढतीउतरती. सोन्यारुप्याची भरती व खप असतो त्याप्रमाणें त्याची किंमत चढती-उतरती. आतां हें नाण्याचें प्रकरण संपवावें. धातूंचें व कागदाचें असें दोन प्रकारचें नाणें समजावें.

# उत्तरभाग संवाद १८

## व्यापाराविषयीं

एकथोक व्यापार व फुटकळ व्यापार – व्यापारापासून होणारे लाभ – व्यापारेंकरून देश संपत्तिमान होतो – फुटकळ व्यापाराचा उपयोग – लहान पुंजीपासून मोठा नफा – शेतकी व कसबें करणारांस गिऱ्हाइकापासून लौकर ऐवज मिळाला असतां उपयोग होतो – रस्ते, कालवे वगैरे यांपासून व्यापारास कसी सोय होती – स्वदेश, परदेश, बाह्यदेश व्यापार – स्वदेशव्यापार करणाऱ्यांचे हातीं लौकर ऐवज येतो – हे सर्व प्रकार सांगितले आहेत.

गुरु : मागें असें सांगितलें कीं पुंजीचें उत्पन्न करून घेण्याविषयींच्या अनेक रीति आहेत, व्यापार करणें ही एक त्यांतीलच रीति आहे. पैका कशास म्हणावें, त्याचा उपयोग काय, हें कळल्यावांचून व्यापारापासून कसें काय उत्पन्न होतें हें समजणार नाहीं, म्हणून व्यापाराचें स्वरूप सांगितलें नाहीं. व्यापाराचे योगानें लोक संपत्तिमान कसे होतात, देशाची संपत्ति कसी वाढती, तो प्रकार आतां सांगतों. या पृथ्वींतून अनेक पदार्थ उत्पन्न करणारे, तसाच त्यांचा व्यय करणारे, या दोघांमध्ये वहिवाट करणारा जो तिसरा मनुष्य त्यास व्यापारी असें म्हणावें. असे व्यापारी आपले पुंजीची वहिवाट व्यापारांत अथवा धंद्यांत, त्यां उभयतां जणांचे अनुरोधानें करितात, म्हणजे ते व्यापारी त्या पदार्थांस उत्पन्न करणारांपासून विकत घेऊन त्या पदार्थांचा खर्च करणारांस विकितात; असे कामांत पुंजीवर जो नफा होतो त्यास व्यापाराचें उत्पन्न असें समजावें.

व्यापारी दोन प्रकारचे असतात. कच्चा पदार्थ अथवा तयार केलेला पदार्थ एकथोक विकत घेणारे असतात. दुसरे फुटकळ विकणारे असतात, हे दुकानदार वगैरे समजावे. हे व्यापाऱ्यांपासून फुटकळ खरीद करून लोकांत जसा जिन्नसाचा खप असेल त्याप्रमाणें किरकोळ विकरी करितात.

गोपाळ : व्यापारांत जो कोणी आपली पुंजी घालीतो, त्यास तर उत्पन्न होईल, परंतु देशांत शिल्पकर्मेंकरून जी संपत्ति उत्पन्न होणारी, त्या संपत्तीची वाढ व्यापाऱ्याचे हातून कसी होईल? व्यापारी अथवा दुकानदार झाले तरी ते कांहीं नवा जिन्नस उत्पन्न करीत नाहीत. देशसंपत्तीचे सांठवणांत त्यांचे हातून कांहीं पडत नाहीं. जे जिन्नस दुसरे लोकांनीं उत्पन्न केले असतील, तेच जाणो जसे-काय वांटीत सुटतात. लोकांत व्यापार करणाऱ्यांचा बराच भरणा असतो, आणि त्यांस तसा नफाही होतो, परंतु लोकांनी केलेल्या सांठवणांतून, ते जर हरण करूं लागले तर ते संपत्तिमान् होतील, पण त्यांच्या योगाने देशाची संपत्ति वाढणार नाहीं.

गोपाळ : कृषिकर्मेंकरून नवीन पदार्थ उत्पन्न होतात, शिल्पकर्मेंकरून कच्चे पदार्थ लोकांस उपयोगी

पडायासारिखे उत्पन्न होतात. ते पाहून असें वाटतें की देशसंपत्ति त्या त्या कर्मेंकरून तत्क्षणीच वाढती, व्यापारानें वाढत नाहीं; पण असें नाहीं; कळलें? व्यापारानें देशसंपत्ति काळेंकरून वाढती. जिन्नसाचें मोल अधिक वाढणें तें व्यापारानेंच होतें. ज्या ठिकाणीं पुष्कळ जिन्नस असेल, तेथून कमी जिन्नस ज्या ठिकाणीं असेल, तेथें आणून देणें; ज्याचा लोकांस थोडका खप असेल, तो जिन्नस त्यांजपासून घेऊन त्याच्या मोबदला अधिक खपाचा जिन्नस देणें; विकाउ जिन्नसाची चहूंकडे वांटणी करून देणें; शेतकीचीं खटलीं करणारांस तसेंच नाना तऱ्हेचीं कसबें कारीगऱ्या करणारांस उद्योग करायाची उमेद होणें, हें सर्व व्यापारापासून होतें. अरे, एका शहरांत अथवा प्रांतांत ज्यां पदार्थांचा खप असेल, ते अवघे नाना प्रकारचे पदार्थ उत्पन्न करणें म्हटलें म्हणजे अवघड गोष्ट आहे; कळलें? कारण असें करण्यास नाना प्रतिच्या जमीनी, हवा, कसबें, कारीगऱ्या अवश्य पाहिजेत. असें एकेच ठिकाणी कोठून असेल? कित्येक जमीनी धान्य पिकवायाच्या असतात; कित्येक गोपचार करणाच्या असतात; कित्येक शहरांत कापड चांगलें होतें; कित्येकांत रेशीमी काम चांगलें होतें; कित्येकांत उरणा वस्त्रें चांगली होतात, सारांश एकादे जिन्नसाची भरभर असणें, एकादे जिन्नसाची कमती असणें, असें सर्वत्र सारखेंच आहे; म्हणून त्या त्या जिन्नसांचा मोबदला करण्याचा व्यापार चालू झाला, तो केवळ एका माणसासींच दुसऱ्याबरोबर होऊं लागला इतकेंच नाहीं, तर एक शहरचा दुसऱ्यासीं, एक मुलखाचा दुसऱ्यासीं, किंबहुना एक दुर देशाचा दूर देशासीं, तो व्यापार होऊं लागला. एके ठिकाणीं जो पुष्कळ जिन्नस झाला असतो, त्या जिन्नसाचा मोबदला दुसऱ्या ठिकाणचे पुष्कळ झालेले जिन्नसासीं कोणी व्यापारी करणार नाहीं. जो कोणी एखादे जिन्नसाचा व्यापार करितो, तो असा शोध काढीत असतो, कीं हा जिन्नस कोणते ठिकाणीं पुष्कळ होत असतो; हा तेथें किती कमी किंमतेनें विकतो, हा कोणते ठिकाणी फार कमी असतो, हा तेथें नेला असतां याची मोठी किंमत मिळणें ती कोठपर्यंत मिळेल, व एक्या ठिकाणचे पेठेतून दुसरे ठिकानचे पेठेंत हा जिन्नस न्यावयास जो कमी खर्च लागेल तो निदानपक्षीं किती लागेल?

गोपाळ : व्यापारी लोक याप्रमाणें विचार करीत असतां, यांत आपल्यास किती नफा होईल, त्याचीही अटकळ काढीत असतील. कारण ज्या पेठेंत केवळ सवंग जिन्नस मिळेल तेथें खरेदी करून जेथें पेठ अगदी चढली असेल, तेथें विकरी केली तरच फार मोठा नफा होईल.

गुरु : खरें, आणि दैवयोगेंकरून असें घडतें, कीं व्यापारी आपल्या हिताचा विचार करीत असतां त्यांत लोकांचे हिताचाही विचार होतो. अमुक एक ठिकाणीं व्यापाराने मोठी किंमत मिळण्याचे आशेने आपला माल पाठविला असतां तेथील लोकांस ज्या मालाची गरज असती, त्याचें अर्थातच काम होतें. जसा जसा लोकांस मालाचा खप असतो, तसी तसी त्या मालाची व्यापाऱ्यास अधिक किंमत मिळती. अशा पेठेंत मालाची चांगली भरती झाली म्हणजे गिऱ्हाइकांस माल खरीद करायाची चांगली सवड सांपडती इतकेंच नव्हे, तर त्या मालाची किंमतही उतरती.

शिल्पलोक जे नाना प्रकारचे पदार्थ उत्पन्न करितात त्यांचा इतका खप होण्यास व्यापारीच कारण होत. जर व्यापारी नसते तर बऱ्हाणपूर, सोलापूर इत्यादि ठिकाणीं जें कापड उत्पन्न होतें, तें काय तें तेथल्या तेथेंच खपायापुरतें होतें; इकडे तो माल येणें तो व्यापाराचे योगानें येतो. याचप्रमाणें इंग्लंडासारिख्यां दूर दूर देशाशीं व्यापार होत असतो.

व्यापाराचे योगानें वस्तूंचा भाव उतरला असतां उद्योग वाढतो. व्यापारी मोठमोठीं मालाचीं दास्तानें खरीद करितात, आणि तीं कोणेएके पेठेंत नेण्याची त्यांस कित्येक गोष्टीची सोई असती. तेणेंकरून त्यांस थोडकें भाडें बसून ते कमी किंमतेने माल विकतात. तितके कमी किंमतेने कोणी एकादे ठिकाणाहून तो माल मुजरत आणविला असतां येणार नाहीं.

गोपाळ : पण जो जिन्नस ज्या ठिकाणीं उत्पन्न होतो अथवा तयार होतो, तेथें तो कम किंमतेनें सांपडतो ?

गुरु : खरें, पण कोणा गृहस्थानें घडियाळ, दुर्बिण, झुंबर म्हणजे बिलोरी मणिखचित रमणीय दिवे, आरसे असें सामान आणायास मुजरत कोणास इंग्लंड देशीं पाठविलें तर त्या आणणाराचा खर्च, भाडें इत्यादि पाहतां त्या जिन्नसाची किती भारी किंमत पडेल आणि तेच एथें आलेले जिन्नस विकत घेतले असतां किती स्वस्त किमतीनें मिळतील तें पहावें.

गोपाळ : खरें, जेथें जो जिन्नस उत्पन्न होतो तेथून तो गडी पाठवून आणविलें म्हटलें म्हणजे एकटा खर्चच भारी बसतो इतकेंच नाहीं तर तसें करणेंच मोठें अडचणीचें काम–अहो चार दिवसांवर लग्नांस कांहीं किनखाप, पागोटीं, शाली पाहिजेत, तर अहमदाबाद, पैठण, काश्मीर अशा अशा ठिकाणीं गडी कोठून पाठवावे, आणि ते परत येऊन पोंहचतील कधीं असें होऊं लागलें तर मोठी तारांबळ होईल.

तेव्हां लोकांस उपयोगी जिन्नस अनायासें मिळऊन देणें आणि तसें करण्यानें ते जिन्नस सवंग करणें हें सर्व व्यापाराचे योगानें घडतें. परंतु याजवरून असें सिद्ध होतें कीं पदार्थांचा लोकांत व्यय होण्यास व्यापार जसा अनुकूल होतो, तसा नवीन पदार्थ उत्पन्न करण्यास अनुकूल होत नाहीं. नाना प्रकारचीं सुखें, विषयभोग प्राप्त करून देणारे पदार्थ लोकांस आणून देण्याविषयीं व्यापार तर कुशल आहे, याविषयीं नाहीं कोण म्हणेल ? परंतु लोकांस असें सुखी केल्यानें देशसंपत्तीची वृद्धि त्याचे हातून कसी होती हें तर महाराज मला न कळे.

गुरु : अरे जर पदार्थांचा व्यय होत गेला नाहीं तर दुसरा पदार्थ उत्पन्न करावा असें कोणास वाटेल काय ? देशांतील लोक सुखी व्हावे, त्यांस नाना उपभोग प्राप्त व्हावे याच हेतूनें देशसंपत्तीचा संग्रह झाला असतो. हें असें होणें हें तर ते ते सुखकारक पदार्थ पुष्कळ उत्पन्न केल्यावांचून होणार नाहीं. व्यापाराचे योगानें तर असें होतें कीं पदार्थांची किंमत स्वस्त होऊन त्यां पदार्थांचा अधिक व्यय होऊं लागतो, तेव्हां त्या त्या पदार्थांची कमती पाहून त्यांची चांगली भरती व्हावी म्हणून ते ते पदार्थ उत्पन्न करणारांस उद्योगाविषयीं मोठा उत्साह होतो. विकाऊ पदार्थांची किंमत उतरली म्हणजे ते जिन्नस बहुत्येक जणांस विकत घ्यावयास सोई पडतें, तेणेंकरून त्या त्या पदार्थांचा खप अधिक होऊं लागतो. कारण ते पदार्थ सवंग मिळूं लागल्यामुळें ते आपणही घ्यावे असें गोरगरिबांचे मनांत येऊन ते विकत घेतात. पूर्वीं कलंबी आंबे, बारीक कापडाचे अंगरखे इत्यादि थोडक्यां मातबर लोकांस मिळत. आतां त्यां पदार्थांची किंमत उतरल्यामुळें ते ते जिन्नस बहुत्येकांस मिळूं लागले.

लोकांत जिन्नसांचा खप अधिक वाढला म्हणजे शेतकी करणारांस व शिल्पकर्म करणारांस उद्योग करण्याची फार उमेद येती आणि जिन्नसाची जितकी भरती पाहिजे तितकी ते करून देतात. तेणेंकरून त्यांस चांगली प्राप्ति होती. त्यांस प्राप्ति झाली असतां त्यांकडेही जिन्नस अधिक खपूं लागतो. कारण जसी इच्छा तृप्त करण्याचें साधन वाढत जातें, तसी इच्छाही वाढत जाती. सारांश जसें उत्पन्न अधिक होऊं लागतें तसा खर्चही अधिक होऊं लागतो. कृषि करणारा केवळ आपलेच निर्वाहापुरतें उत्पन्न करीत नाहीं; तर शिल्प करणारांचेही निर्वाहापुरतें करतो, शिल्प करणारांस आपल्याकरितां उपयोगी पदार्थ उत्पन्न करून त्यांचा कृषि करणारास जसा खप असेल, त्याप्रमाणें त्याला देतो. या रीतीनें जे जे पदार्थ अधिक उत्पन्न होतात ते ते पदार्थ लोक मोबदल्यानें एकमेकास देतात. हा मोबदला तर व्यापारी लोकांचे योगानें द्रव्यद्वारा होतो. परंतु हें वस्तुतः पाहिलें असतां शिल्पकाम करणारानें कृषि करणारापासून धान्य घेऊन त्याबद्दल त्यास कापड देणें त्यासारिखें आहे. तस्मात्

विकाऊ पदार्थ अधिक झाले असतां त्यांत सर्वांस लाभ आहे. जमीनीचा धनी आपलें भाडें अधिक वाढवून मातबर होतो; शेतकीचें खटलें चांगलें चालल्यामुळें तें अधिक भाडें द्यावयास शेतकऱ्यास सोई पडतें; लोकांत मजूरीचें अधिक अगत्य लागल्यामुळें मजूर लोकांस चांगले रीतीनें संसार करायाजोगा रोजमुरा मिळूं लागतो. सारांश जसे जिन्नस अधिक होऊं लागतात, तसे ते जिन्नस उत्पन्न करण्याचे कामांत जे जे सामील असतील त्यांस त्यांस ते ते जिन्नस अधिक मिळूं लागतात.

गोपाळ : व्यापारापासून जे चहूंकडे लाभ होतात, ते मला आतां कळूं लागले, याप्रमाणें फुटकळ विकरी करणारे जे दुकानदार त्यांपासूनही लाभ होत असतील ? मातबरांस तसेच गरिबांस मालाचें दास्तान एकथोक खरीद करणें म्हटलें म्हणजे फार अवघड गोष्ट आहे. तशांत व्यापारी तर फुटकळ जिन्नस कधीं विकणार नाहीं. जर दुकानदार नसते, तर शेरभर अथवा मणभर तूप घेणें झाल्यास अवघा मोठा तुपाचा बुदलाच खरीद करावा लागता.

गुरु : फुटकळ विकत घेण्यादेण्याचा व्यापार फारच उपयोगी आहे. ही तरी एक उद्योगाची वांटणीच आहे. जे मजूरदार रोजचेरोज लहानसी मजूरी घेतात, त्यांस रोजचे रोज आपल्या निर्वाहाकरितां हा फुटकळ व्यापार फारच उपयोगी पडतो.

गोपाळ : मजूर लोकांस नित्य दाणा, फांटीं, तेल, तंमाखू असें लागतें. तें वाणी मारवाडी यांजपासून फुटकळ घेतात, ते फार जरब किंमतेनें देतात. तें पाहून त्यां गरीब मजूराची दया येती. मातबर लोक एकथोक खरीद करितात त्यामुळें त्यांस जिन्नस स्वस्त मिळतो.

गुरु : जर दुकानदार नसते तर गरीब लोकांस जिन्नस विकत घेण्याची फार अडचण पडती. एकथोक विक्रीपेक्षां फुटकळ विक्रीनें दुकानदार अधिक किंमत घेत असतील, तर त्यांस जें भाडें वगैरे द्यावें लागतें, अवघा दिवस दुकानावर मेहनत करावी लागती, म्हणून ते अधिक किंमत घेतात असें म्हणवत नाहीं. फारच अधिक किंमत घेऊं लागल्यास दुसरे लोक तो धंदा करूं लागतील, आणि योग्य किंमतीने विकूं लागल्यामुळें त्या दुकानदारांस कोणी पुसेना असें होईल.

गोपाळ : फुटकळ विक्रीने अधिक किंमत घेऊं लागल्यास अधिक नफा होऊं लागेल, तेव्हां पुंजीची कोणत्याही उद्योगांत वहिवाट केली असतां समसमान नफा होतो असें जें आपण मागां बोललां त्यास बाध येऊं पाहतो.

गुरु : तर त्यां दुकानदारांस पुंजीवर समसमान नफा होण्यापेक्षां जें कांहीं अधिक मिळत असेल तें त्यांची आंगमेहनतीची मजूरी असें समजावें. जो कोणी जसी जसी थोडकी पुंजी वहिवाटीतो, तसी तसी त्यास अधिक मेहनत करावी लागती; आणि तसें तसें त्यास जो पुंजीवर नफा होणार त्यांतून त्याचे मजुरीबद्दल अधिक जात असतें. रुपया दोन रुपयाचे आंबे, लिंबें अथवा दुसरा किराणा जिन्नस विकत घेऊन जे कोणी गल्लीकुच्चीनें दारोदार विकायास अवघा दिवस फिरत असतात, त्यांस त्या मालाची किंमत सुटून नफा मिळणें तो मजूरदाराचे मजूरीपेक्षां अधिक विरळाच मिळतो. कोणेसमयीं कित्येक असें बोलतात कीं हा आमचा धंदा सोडितां कामास नये ? वरकड मजूरांस जी प्राप्ति आहे ती आम्हास नाहीं.

गोपाळ : जसा जसा धंदाव्यापार हलका अथवा मोठा, तसे तसे त्यांत श्रम अधिकउणे, व तसी तसी त्यांत प्राप्ति उणीअधिक असें समजावें.

गुरु : तसें केवळ सर्वत्रच नाहीं. परंतु सरासरी पहातां मजूरापेक्षां कारकुनास कोठे कोठे अधिक मिळतें, आणि जरी मोठेमोठे रोजगार केले तरी उदमी व्यापारी यास जसी प्राप्ति तसी रोजगार करणारांस प्राप्ति होत नाहीं. केवळ फुटकळ विकणाऱ्यांकडे पाहू नये. एकथोक विकरी करणारे जे मोठे व्यापारी त्यांकडे पाहावें. असो.

कृषि करणारे व शिल्प करणारे आपला माल व्यापाऱ्यांस विकतात, त्यापासून त्यांस आण
हित होतें. त्यानी तो माल उत्पन्न करायास जी पुंजी वहिवाटली असती ती त्यांस त्या व्यापाऱ्या
पासून लवकरच मिळती. ते जर तो माल किरकोळ घेणारास विकते, तर ती पुंजी तसी लवकर ः
होत नसती, व्यापारास माल विकला असतां किंमत तावडतोब येती.

कोणी कापसाचा कारखाना चालविणारानें मजूर वगैरे खर्चाकरितां एक हजार रुपयांची ए
वहिवाटिली, व तो सर्व तयार झालेला माल एकथोक खरीद करणाऱ्या व्यापाऱ्यास विकिला तर त्य
अकराशे रुपये येतील. कदाचित असें न करितां किरकोळ किरकोळ खरीद करणाऱ्यांस तो ः
हंगमशीर विकिला तर त्यास बाराशें किंवा तेराशें रुपयांचे किंमतीचा आकार दिसेल, परंतु ते रु
त्यास तावडतोब मिळणार नाहींत, हळूहळू मिळत जातील. तेणेंकरून मजूर लोकांची मजूरी व
खर्चाचा निकाल करायास फार अडचण पडेल.

गोपाळ : शेती करणारास धान्यदिकांची किंमत लवकर मिळाली नाहीं, तर त्यांस पुढले वर्षी जमीनी
लागवड करायास मोठी अडचण पडेल. कां तर लावणी बेणणी इत्यादि करायास जे म
लागतात, त्यांस तर रोकड मजूरी दिली पाहिजे.

गुरु : खरें, परंतु अशी अडचण पडावी म्हणून शेतकींची खटलीं करणारे अथवा तसींच दु
कसबें करणारे आपल्या पुंजीचे दोन विभाग करितात. अर्धी पुंजी मालमसाला कच्चा जिन्नस
चालू करायास पाहिजे त्याकडे लावितात. अर्धी पुंजी मजूरी इत्यादि खर्चाकडे लावितात. ः
अथवा शिल्पकर्म करणारानें व्यापार पत्कारिला असतां चालेल, परंतु तीं दोनी खटलीं बरोबर उत
कठिण आहे. कारण पृथ्वीवर जें उत्पन्न होईल, त्याचा लोकांत फैलावा करून देणें हें व्यापार
योगानें होतें. या कामास तर स्वतंत्र मनुष्यें पाहिजेत, त्यांची पुंजी, वेळ, लक्ष, काय तें व्याप
कडेसच लागलें पाहिजे. तेव्हां तो व्यापार चांगले रीतीने होईल. शिल्प, कृषि हीं एकीकडे टे
व्यापार केला असतां चांगलें आहे. तथापि कृषि शिल्प याचें साह्य व्यापारास असल्यानें व्या
चांगला चालेल, चांगले पुष्कळ रस्ते असले, व चांगले वाहते कालवे असले म्हणजे मुलखांत
जिन्नस उत्पन्न झाला असेल, तो पेठोपेठीं थोडे मेहनतीने व त्वरेनें न्यावयास सोय पडतें, का
थोडी मेहनत व त्वरा यांच्या योगाने वेळ व श्रम कमी लागतात. कांहीं एक जिन्नस उत्पन्न करा
थोडका वेळ व श्रम लागला असतां तो जिन्नस स्वस्त होतो.

गोपाळ : जेथें रस्ते नसतात तेथें शेतकऱ्यास आपलीं धान्यादिक बाजारांत विकरी होण्याकां
पाठवायास अडचण पडती. असें जेथें असतें, तेथें शेतकरी आपल्या कुटुंबाचे निर्वाहाप
अथवा शेजारचेच कोणी घेणारे असले त्यांस विकत द्यावयापुरतेंच धान्य पिकवील. त्यानें तें घ
खाऊन स्वस्थ असावें. शिल्पकृतीनें जे नाना प्रकारचे पदार्थ उत्पन्न होतात, त्यांची त्याने आशा ः
नये. कारण मूळीं रस्तेच नाहींत, तेव्हां ते तसे जिन्नस त्याकडे कोणी कसे नेईल? रस्त्यांची ः
नसल्यास शिल्प करणारासही आपला तयार झालेला माल बाजारांत विक्री होण्याकरितां पाठवाय
अडचण आहे.

गुरु : जेथें रस्त्यांची सोईच नसेल, तेथें गांव शहरें वसणें; नानातऱ्हेचे कसब चालणें हें कोठून होई
अरे, धान्यादिक शहरांत राहणाऱ्यांस पोंहचलीं नाहींत, तर तें कसे वांचतील? कारीगरीने केले
जिन्नसाचें अगत्य शेतकऱ्यास तर आहेच, पण त्यापेक्षां शिल्पकर्म करणारास धान्यादिकांचें अग
फारच आहे. कोणे एके गावीं राहणारे आपल्या निर्वाहापेक्षां धान्यादिक अधिक पिकवितात, ते
तें अधिक पिकलेलें शहरच्या कारागीरांस प्राप्त होतें. तसेंच ते कारागीर आपल्यास ज्या जिन्नस
उपयोग त्यापेक्षां अधिक जिन्नस तयार करितात. तो अधिक तयार झालेला जिन्नस कृषिकर्म करणा

मिळतों, म्हणून खेडें, पाडें, प्रांत, एथून शहरास जाण्यायेण्यास जसीजसी रस्त्यांची सोई असती, तसतसी कृषिकर्माची व शिल्पकर्माची वृद्धि होती. यावरून पहातां या देशीं लोखंडी रस्ते चालू झाले, आतां फारच मोठे लाभ होतील. किती एक देशाचे इतिहासावरून असें सिद्ध होतें कीं शिल्प व व्यापार यांची वृद्धि झाली तेव्हां जमीनीची लागवड चांगली नावारूपास आली. इंग्लंड देशचे वृतांतावरून असें समजतें कीं तेथील पूर्वी राज्यपद्धति कांहीं विलक्षण असे, लोकांच्या रीतिभाति रानटी लोकांसारिख्या असत, म्हणून त्या देशाची संपत्ति वाढण्यास व तेथें सुधारणुकीची चाल होण्यास प्रतिबंध होत असे. असेंही असतां प्रकृतिसिद्ध जी अनुकूलता तीचे योगानें चांगलेंच झालें. शहरें वसूं लागलीं, संपत्ति व सुधारणूक यांची चांगली चाल झाली, आणि कृषिकर्माचीही उत्तम रितीने प्रवृत्ति झाली.

गोपाळ : इकडून तिकडे जायायायास रस्ते असले म्हणजे जिन्नस सुखाने नेतां-आणतां येतो असें आपण सांगितलें; परंतु रस्ते जरी झाले तरी ते लागवड जमीन घेऊन केले असतील. जमीनीचें धान्य गवत इत्यादि उत्पन्न किती व रस्त्यांपासून हित किती असा विचार केला असतां, रस्त्यांपासून कांहीं नफा झाला नाहीं, तोटा झाला असें वाटतें. ज्या जमीनीची लागवड होत असेल, ती जमीन रस्त्याकडे लावणें, हें तर शेतांत लावणीचे कामांस लागलेले लोकांस काढून रस्त्यावर खपायास लावणें त्यासारखें आहे.

गुरु : अरे, संपत्तीची वृद्धि व्हावयास जसी कृषि कारण, तसेच रस्ते व पाण्याचे कालवे कारण आहेत. जर रस्ते कालवे नसते तर व्यापार करणें तो बंदरें, खाड्यां, नद्या यानीच होता. पायरस्ता नसता तर मुंबईहून ठाण्यास नेहमी जळमार्गानें व्यापार करण्यास अडचण पडती व खर्चही अधिक बसता.

गोपाळ : महाराज, खाड्या-नद्यानेंच काम होत असतां कालवे कशास पाहिजेत? आणि कालवा म्हणून काय आहे?

गुरु : नद्यादिकांचें पाणीं इतर ठिकाणीं न्यावयाकरितां चांगला वाहता मोठा रुंद खणून जो मार्ग करितात, त्यास कालवा म्हणतात. जेथें नद्याची सोई नसती, तेथें असे कालवे बांधितात. हिंदुस्थानामध्येंही या प्रमाणें एक मोठ्या नदीसारिखा पाण्याचा कालवा दिल्लीचा बादशाहा फिरोझ तगलख यानें हान्सी शहरापासून हिसारा शहरापर्यंत बांधिला होता असें नामदार मौंटस्टुअर्ट एलफिन्स्टन साहेबाच्या इतिहासावरून कळतें.

गोपाळ : बरें, महाराज, अलिकडे असे कालवे या देशांत बांधीत नाहीं काय?

गुरु : कां बांधींत नाहींत? प्रस्तूत हिंदुस्थान प्रांतीं एक मोठा कालवा बांधीत आहेत. तिकडे रुरकी गांवीं कालव्याचें काम पहावयास एक गृहस्थ गेला होता, त्याने त्या कारखान्याचें असें वर्णन केलें आहे कीं इंग्लांडच्या राणीनें शीक लोकांचा पराजय करून कोहिनूर म्हणून जो मोठा हिरा संपादीला, ज्यावरून युरोपांतील सर्व लोक एशियाखंडात केवढी मोठी संपत्ति व त्या खंडात इंग्रेज लोकांची किती सत्ता, अशी अटकळ करूं लागले; ज्याची किंमत म्हटलीं असतां पांसष्ट हजार रुपये, असाही हिरा प्रस्तूत इंग्रेजलोक हिंदुस्थानामध्यें गंगेस एक मोठा कालवा बांधीत आहेत, त्या कामाची बरोबरी करणार नाहीं. कारण त्या कालव्याच्या योगानें दरवर्षी सरकारास कोहिनूर हिऱ्याच्या किंमतीपेक्षा तिप्पट पैसा उत्पन्न होऊन एत्तदेशिय लोकांचें पुष्कळ हित होईल. हि गोष्ट थोड्यांसच माहित असेल. हा कालवा तयार होऊन त्यांतून गंगा वाहूं लागली म्हणजे ह्या देशांतील व्यापार वाढून एथील लोकांचें कल्याण होईल.

हें काम फारच मोठें असून सरकारानें स्वतः चालविलें आहे. हें काम करण्याचें सरकारास अगत्य पडलें होतें, असेंही नाहीं. या कामाचा आरंभ झाला तेव्हां कोणी म्हणूं लागले कीं ह्या गोऱ्या लोकांनीं देवतेची हेळना मांडिली आहे. हे कितीही खोल खणोत पण ती आपल्या मार्गांबाहेर

जाणार नाहीं. आतां हें काम सिद्धीस जाईल, असें बहुतेक म्हणूं लागले आहेत, परंतु त्या बोलण्यांत असें सुचवितात कीं हें काम समयास झालें तरी त्या लोकांची सद्दी आहे. इंग्रेज लोक जी गोष्ट हातीं घेतील तीं शेवटास लावितील, याविषयीं आमचे लोकांची खातरी आहे.

गोपाळ : या कालव्याच्या योगानें हिंदुस्थान प्रांतीं नावा चालूं लागतील. तेणेंकरून जिन्नस न्यायाआणायास फारच सोई होईल. बरें, महाराज, कालवा कोठे बांधित आहेत ?

गुरु : हरिद्वार म्हणून एक पुण्यक्षेत्र आहे, तेथें हिमालयपर्वतापासून गंगा पडती, पुढें हिंदुस्थानांत शिरून सुमारें दोन हजार कोस वाहत गेल्यावर पूर्वसमुद्रास मिळती. या हरिद्वाराजवळ हा कालवा बांधण्यास आरंभ केला आहे. हरिद्वारापासून सुमारें दाहा कोशांचे आंत, या कामास फार मोठ्या अडचणी आल्या होत्या, त्या अशा कीं तेवढ्या अंतरांत, वाटेने तीन नद्या आडव्या गेल्या आणि त्यांतून कालवा पार नेण्यास निरनिराळ्या तीन युक्ति कराव्या लागल्या. एक नदी उंचवट्यावर असल्यामुळें तिच्या खालून कालवा बांधून नेला आहे. व एकीवर पूल बांधून त्यावरून कालवा नेला आहे. आणि तिसरीच्या एका आंगानें नेला आहे. त्या कामावर गुडनवी आणि आलीन म्हणून दोन साहेब आहेत, त्यांचें हाताखालीं पांच चार हजार मनुष्यें आहेत.

गोपाळ : तो कालवा बांधायास सामान लागत असेल तें कोठून आणीत असतील ?

गुरु : रुरकि गांवापाशीं कालव्याच्या अगदीं जवळ सिवालीक डोंगर आला आहे. या डोंगरांत इमारतीचे व जाळावयाचे लांकडांस अगदीं तोटा नाहीं. त्या कालव्याच्या कामास व दुसऱ्या कारखान्यांस जें लाकूड लागतें तें मक्तेवाले रानांतून आणून पावतें करितात. त्यांस विटा पाहिजेत त्या मजूरलोक ठेऊन त्यांचे हातून तेथें करवितात. विटा पाडण्याचीं दोन यंत्रें इंग्लंडांतून आणविलीं आहेत, व त्या नमुन्यावरून तशीं यंत्रें एथें पुष्कळ केलीं आहेत. तें यंत्र करावयास इंग्लंडांत जो खर्च लागतो त्या खर्चांत एथें तीन यंत्रें होतात. या एका यंत्रानें एका दिवसांत अकरा हजार विटा पडतात. यांस मजुरी पांच रुपये पुरतात. आतां फुटीतुटीबदल शेंकडा दाहा वजा करून पांच रुपयांस दाहा हजार विटा पडतात. या यंत्राच्या सहायानें सत्तावीस रुपयांत ज्या विटा होतात, त्या एरवीं करायास शंभर रुपये लागतात. या रुरकी गांवाजवळ सर्पण मनस्वी स्वस्त व कारखान्याची देखरेख करणारे फारच चतुर व हुशार, तेणेंकरून या विटा भाजण्याचाही खर्च कमी झाला.

गोपाळ : बरें या कारखान्याचे कामावर मुख्य चौकसनीस साहेब लोक कां ठेविले नाहींत ?

गुरु : त्याचें कारण असें. मोठमोठीं शिल्पकामें चांगलीं करायाजोगीं शिल्पविद्येंत इकडील लोकांची गति साहेबलोकांसारखी नाहीं. आणखी असें आहे—आपल्याकडेसच कारखाना व चौकशी ठेविली असतां जसें काम होतें तसें बाहेर मक्तेदारांस दिलें असतां होत नाहीं. चांगले विश्वासानें काम करणारे मक्तेदार या देशीं थोडकेच अढळतील. रुरकीच्या कारखान्यांतील काम चालविणाऱ्या साहेबलोकांस हरएक बांधण्याचें काम नेटीव लोकांकडे देववत नाहीं. अमुक पैसा दिला असतां अमुक काम तयार करून देऊं असा करार करून देण्यास पुष्कळ नेटीव मेस्तरी सिद्ध आहेत, परंतु त्यांवर विश्वासानें काम टाकवत नाहीं. जेथें काम लहान असून मोठें करून दाखवितां येतें व जेथें केलेलें काम बरें किंवा वाइट दृष्टीस पडत नाहीं, अशा ठिकाणीं कामगारलोकांस संधि सांपडल्यास यजमानास ठकवितात. चांगल्या नीतीनें चालण्याची शिक्षा नसल्यामुळें असा लहान मजुरापासून तर मोठ्या कामगारापर्यंत अन्यायानें वर्तण्याचा स्वभाव पडत गेल्यानें, व्यवहारव्यापार न चालतां देशसंपत्तीचा मोड होईल.

गोपाळ : महाराज, असले कारखाने चालू झाल्याने आणि या कालव्यासारिखीं मोठीं कामें आपल्या देशांत पुष्कळ झाल्यानें, व्यापार वाढून चांगली भरभर होईल.

गुरु : अरे बाबा, इतकेंच काय ? यापासून आपल्या देशास दुसरेही पुष्कळ लाभ आहेत. युरोपियन लोकांनें असले मोठमोठे कारखानें एथें चालविले, म्हणजे त्या कारखान्यांत नेटिव कारागीर लोक पुष्कळ लागतील. तेणेंकरून त्यांस युरोप खंडांतील कलाकौशल्यें अवगत होतील. आणि त्यांच्या हाताने तऱ्हतऱ्हेचीं कामें घडतील. असो. जेथें प्रकृतिसिद्ध अनुकूलता तादृश नसती तेथें पूर्वोक्त साधनें करावीं लागतात. असे कालवे नावा इत्यादि चालण्यास इंग्लंडासारिख्या मोठमोठ्या शहरांत केले असतात. यांचे योगानें माल न्याया आणायास जसें सोय पडतें तसें नद्यादिकांनीं सोय पडत नाहीं. नदी कोठे वांकडीतिकडी दूर असती, नेहमीच वाहती असत नाहीं. खाड्यांत तर भरती ओहटाचें संधान राखून वागावें लागतें. व्यापार चांगला चालावा, लोकांस पाण्याचे सुख व्हावें, शिवाय शेती चांगली व्हावी म्हणून असे कालवे पाट मोठमोठे खर्च करून गांव, शहर, व्यापाराचीं ठिकाणें याचे संधानानें बांधिले असतात, त्यांपासून त्यांचे धन्यास उत्पन्नही फार होतें. इकडे कर्नाटकांत तुंगभद्रा व कावेरी या नद्यांचे, शेतकी करण्यासाठी कांहीं कालवे काढले आहेत.

व्यापाराचे तीन भेद आहेत, स्वदेशव्यापार, परदेशव्यापार आणि बाह्यदेशव्यापार. कोणाचे मुलखीं आंतले आंत समुद्राचे कांठ्यानें जो मुलखी व्यापार चालला असतो त्या अवघ्यास स्वदेश-व्यापार म्हणावें. जे कोणी आपले देशींचे जिन्नस देऊन परमुलखी जिन्नस घेण्याचा व्यवहार करितात, त्यास परदेशव्यापार ह्मणावें. आणि आपल्या देशींचे जिन्नस न घेतां एका देशींचे जिन्नस दुसऱ्या देशीं नेऊन तेथील जिन्नसांवर बाहेरला बाहेर जो व्यवहार करितात, त्यास बाह्यदेशव्यापार म्हणावें. यांतून स्वदेशव्यापाराविषयीं विचार करावा.

गोपाळ : ज्याचा जो देश असेल त्यास त्या देशाविषयीं स्वदेशव्यापार इतर व्यापारांपेक्षां अधिक हितकारक असें समजावें. कारण स्वदेशव्यापार केल्यानें त्याचेच देशींचे लोकांत उद्योगाची बढती होईल.

गुरु : स्वदेशींचे लोकांस उद्योग मिळणें ही देशाचे हिताची गोष्ट आहे खरी, परंतु ज्या परदेशाचा आपल्या देशाबरोबर व्यापार चालला असतो, त्या देशीं लोकांस उद्योग मिळाला असतां त्यांत आपलें कांहीं अनहित होत नाहीं. कारण जसें आपलेकडले लोक जिन्नस उत्पन्न करितात ते आपण परमुलखीं पाठवितों, तसे तिकडील लोकांनीं केलेले जिन्नस आपल्या उपभोगाकरितां आपलेकडे येतात, मुलखांतल्या मुलखांत व्यापार होण्यापासून इतकें बरिक घडतें खरें कीं व्यापारांत जें मिळायाचें तें लौकर हातीं येतें. जसी जसी पेठ जवळच्या प्रांतीं असती, तसी तसी तेथें विकरी झाल्याची पुंजी व्यापाऱ्यास लौकर मिळती आणि तसें तसें शेतकी कारणाऱ्यापासून अथवा शिल्प करणारापासून दुसरा जिन्नस व्यापाराकरितां घ्यावयास सोई पडतें. अरे, सुरत, पुणें, राजापूर एथें मुंबईची व्यापाऱ्यांचा व्यापार चालला असतां देण्याघेण्याचा जसा लौकर उलगडा होईल तसा कलकत्ता, चीन, इंग्लंड इत्यादि दूर दूर देशीं व्यापार चालला असतां जरी मोठा नफा होत असला तरी देण्याघेण्याचा लौकर उलगडा होणार नाहीं.

गोपाळ : तेव्हां दूरदेशीं परमुलखीं आपण व्यापार करूं नये काय ?

गुरु : त्यांशीं व्यापार करूं नये असा माझे बोलण्याचा भाव नव्हे. दूर देशीं व्यापार केल्यानें देण्याघेण्यास जो विलंब लागतो त्याविषयीं मी बोलिलों. परदेशांशी मत्सरभाव सोडून त्यांजबरोबर व्यापार करावा. निष्कृत्रिमपणानें, सचोटीनें एका देशाचा दुसऱ्या देशासीं व्यापार चालला असतां त्यांत परस्परांस मोठे लाभ प्राप्त होतात. असो. याच प्रकरणीं आणखी कांहीं बोलायाचें आहे तें उद्यां काढू. सारांश आपल्या मुलखीं परमुलखीं व्यापार करणें तें संपत्तीचे उत्पत्तीवर आहे म्हणून संपत्तीचीं उत्पत्तिकारणें—मग तीं मुख्य असोत अथवा उपकारणें असोत—त्याविषयी जितका विचार होईल तितका थोडा; म्हणून तुला तीं उपकारणें सांगून नंतर परदेशव्यापाराचा आरंभ करूं.

# उत्तरभाग संवाद १९

## परदेशव्यापाराविषयीं

परदेशव्यापारापासून काय काय लाभ होतात—अधिक झालेले पुंजीची परदेशव्यापारांत कसी योजणूक होती आणि अधिक झालेला जिन्नस कसा वहिवाटला जातो—परदेशव्यापार करायास लोकांस उमेद यावी म्हणून सरकारांतून काय माफी केली कसती—परदेशव्यापाराची मनाई केली असतां कसें काय होतें हें सर्व सांगितलें आहे.

गोपाळ : मागल्या संवादांत आपलें बोलणें असें पडलें कीं परदेशाबरोबर निष्कृत्रिमपणें, सचोटीनें व्यापार करावा, परंतु मला वाटतें कीं परदेशाबरोबर व्यापार करूं नये, आपल्या देशीं उद्योगाची जितकी बढती होईल तितकी करावी, त्यांत आपलें हित आहे.

गुरु : परमुलखांत उद्योगाची बढती झाल्यावांचून आपले मुलखांत उद्योगाची बढती होणार नाहीं. कारण परमुलखांत वस्तूचा खप असल्यावांचून आपल्याकडे जिन्नस उत्पन्न करायास लोकांस उमेद होणार नाहीं. जर परमुलखांबरोबर व्यापार करण्याची मनाई केली तर आपले मुलखांत जितके जिन्नसांचा खप व्हावयाचा तितक्याच पुरता उद्योग करावा असें लोकांस वाटेल. जर मुंबई व इतर ठिकाणीं शालजोड्या पाठऊं नयेत असा काश्मीर देशीं सरकारहुकूम झाला, तर तेथल्या लोकांस शालजोड्या पुऱ्या पडायापुरताच उद्योग होईल. असें झालें असतां तेथें त्या जिन्नसाचा खप किती व त्याप्रमाणें तो जिन्नस उत्पन्न करायास उद्योग किती लागेल तें पाहावें.

गोपाळ : जर त्या देशीं शालजोड्यांचा खप होत नसला, तर ज्या जिन्नसाचा खप असेल तो जिन्नस उत्पन्न करण्याचा उद्योग करावा.

गुरु : ज्या जिन्नसाचा आपल्या देशीं खप आहे, परंतु तो जिन्नस उत्पन्न करायास जवळ पुंजी नाहीं तर कसें करावें ? याजकरितां ज्या जिन्नसाचा खप स्वदेशीं होऊन अधिक जिन्नस उरे असी पुंजी जवळ असल्यास आणि त्या पुंजीची वहिवाट करून अधिक जिन्नस उत्पन्न झाल्यास तो घरींच ठेवुन काय फळ ? त्याची विकरी होण्याकरितां तो परमुलखीं पाठविलाच पाहिजे. अर्थात् परदेशाबरोबर व्यापार करावा असें सिद्ध होतें. बरें, सर्व पुंजी केवळ स्वदेशव्यापाराकडे लाविली असतां कसें काय होईल त्याचा विचार करूं. चीन देशीं असा हुकूम झाला कीं तेथील चहा, खडीसाकर इत्यादि परमुलखीं पाठऊं नये, तर मग त्यां वस्तूचा त्या देशीं थोडाच खप होईल, त्याप्रमाणें त्या वस्तु उत्पन्न करण्याचा जो उद्योग तोही कमी होईल. याचप्रमाणें जमेका म्हणून एक बेट आहे तेथील काफी, साकर; रशिया देशीचा ताग, शण; पिरू व चिली एथील नीळ वनस्पत्यादि परमुलखीं पाठविण्याची मनाई झाली असतां उद्योगाची कमती होऊन लोकांस गरिबी येईल.

गोपाळ : माझें म्हणणें असें आहे कीं आपल्या देशीं मालाचा खप असेल तितका प्रथम उत्पन्न करावा; अधिक उत्पन्न होईल तो परदेशीं पाठवावा.

गुरु : अरे, मालाची वहिवाट स्वदेशीं अथवा परदेशीं करणें हें त्या मालाची जसी किंमत येईल त्यावर आहे. स्वदेशचे किंमतीपेक्षां परदेशीं अधिक किंमत मिळूं लागली तर परदेशीं माल पाठवीण्याचा लोभ उत्पन्न झाल्यावांचून होणार नाहीं.

गोपाळ : परदेशीं मालावर अधिक नफा मिळूं लागला म्हणजे समजावें कीं आपल्या देशापेक्षां त्या देशीं त्या मालाचा खप अधिक आहे.

गुरु : होय, कोणत्याही देशीं कृषिकर्मानें अथवा शिल्पकर्मानें झालेले पदार्थ प्रथम त्या देशांतील खपाप्रमाणेंच असतात, त्या खपापेक्षां अधिक झालेले पदार्थ परदेशींच्या पदार्थांकरितां मोबदला दिले जातात, असें जर नसलें तर अधिक पदार्थ उत्पन्न होणार नाहींत, आणि ते अधिक पदार्थ उत्पन्न करणाऱ्यांस पुढें उद्योग मिळणार नाहीं.

प्रथम, देशांत धान्यादिक उत्पन्न होतात. तीं देऊन त्यांबद्दल परमुलखींचे वस्त्रपात्रादि पदार्थ घेतात. याजप्रमाणें नवीन वसलेल्या अमेरिकाखंडीं चाललें आहे. पोलांड व रशिया एथें संपत्ति व लोकसंख्या यांची गति मंद आहे म्हणून तेथेंही तसाच व्यवहार मोबदल्याचा चालला आहे. देशांत संपत्ति व लोकसंख्या बरीच झाली म्हणजे तेथें जें धान्य पिकतें, तें तेथल्यांचेच निर्वाहास लागतें. मग अधिक झालेले लोकांस उद्योग मिळावा म्हणून नाना प्रकारचे कसबांची चाल होऊं लागती; मग असतां असतां तेथें धान्याचें अधिक अगत्य लागतें. तेव्हां तेथें बाहेरून धान्य येतें, तें तेंथील कसबी लोकांनी जे जिन्नस केले असतात ते देऊन तें धान्य घेतात. कनिष्ठ प्रतीचे जमीनींत पिकवावयास खर्च फार लागतो म्हणून जिन्नस देऊन जें धान्य घेतात तें स्वस्त मिळतें. याप्रमाणें कित्येक देशीं होतें.

गोपाळ : दूर देशाबरोबर व्यापार केला असतां जें मिळणें तें काळेंकरून मिळतें, त्वरित मिळत नाहीं, तस्मात् अशा दूर परमुलखाशीं व्यापार करण्यांत काय नफा ?

गुरु : जर कांहीं नफा नसता तर तो व्यापार कोणीच करीत नसतें. जसी जसी विकरीची पेंठ दूर, तसा तसा विकलेल्या पदार्थावर नफा अधिक मिळतो. तो इतका अधिक मिळतो कीं फार दिवस लागल्याचें नुकसान, गलबताचा जोर, समुद्रांत कांहीं जोखीम न व्हावें त्याबदलचा विमा, हें सर्व त्या नफ्यांतून उमें होतें.

गोपाळ : परमुलखांतील लोक एवढी मोठी किंमत देऊन आपल्याकडचे जिन्नस घेतात, त्यापेक्षां ते तसे जिन्नस आपण स्वतांच कां उत्पन्न करीत नाहींत ?

गुरु : जो जिन्नस जसा परमुलखांत होतो, तसाच थोडके खर्चानें आपल्याकडे होऊं लागला, तर तो अधिक किंमत देऊन बाहेरून कोणी घेणार नाहीं. अवघ्याच प्रांतीं अथवा अवघ्याच देशीं हवा, पाणी, लोकांचे गुण, व्यापार इत्यादि एकसारखेंच असत नाहींत, म्हणून जसा एके ठिकाणीं जिन्नस होतो, तसा दुसरे ठिकाणीं कोठून होईल ? लोकांतही म्हणत असतात; कीं, रेशमी कापड अमदाबादे-सारखें दुसरें कोठें होत नाहीं; वस्त्रांचे जरीपदर पैठणींच चांगले असतात. पोर्टुगाल देशीं जसें द्राक्षमद्य होतें तसें कितीही खर्च केला तथापि इंग्लंड देशीं थंडीमुळें होत नाहीं, तसेंच इंग्लंडदेशीं जसी बनात होती तसी पोर्टुगाल देशीं होत नाहीं. तसी तेथें करायास फार खर्च बसून होत नाहीं. म्हणून त्यांच्या देशीं उत्तम प्रकारेंकरून व्हावयासारिखा जो जिन्नस तो देऊन त्याबद्दल ते बनात घेतात, ती त्यांस स्वस्त मिळती.

गोपाळ : व्यापारास जिन्नस परमुलखीं नेला असतां, त्याजवर नफा फार मिळतो, म्हणून सांगतां;

पण त्या जिन्नसाचा केवळ नोर, विमाच लागतो इतकें नव्हे त्या जिन्नसाची जकात द्यावी लागती. असें असतां मोठा नफा कोठून मिळेल?

गुरु : मालावर जकात घेतात ती फार जरब घेतात असें नाहीं, तशांत परमुलखीं अमुक माल व्यापारास नेला असतां त्यास अमुक ऐवजाची माफी मजुरा मिळेल म्हणून कोठे कोठे सरकाराचा हुकूम असतो. त्याप्रमाणें ऐवज मजुरा मिळतो, त्यामुळें जकात देणें जड पडत नाहीं. लोकांनीं परदेशींच्या व्यापाराविषयीं कंबर बांधावी, त्यांस परदेशव्यापाराविषयीं जी स्वाभाविक अनास्था व अप्रीति ती आड येऊं नये म्हणून सरकारानें व्यापारी लोकांस उमेद यावयाजोगी एक युक्ति काढिली आहे.

गोपाळ : तेव्हां मालावर माफी मिळण्याचे आशेने लोक परमुलखांत जो माल पाठवावयाचा त्यापेक्षां अधिक पाठवीत असतील काय?

गुरु : होय, त्या आशेनें कोठे असें होतें कीं परदेशव्यापारांत जितकी पुंजी घालायाची त्यापेक्षां अधिक घातली जाती. ज्या मालातून काय तें नोर वगैरे खर्चच सुटून फारसा नफा होत नाहीं, तो बाहेर न जातां घरींच पडून राहिला तर सरकारास त्यांतून कांहींच उत्पन्न होणार नाहीं, म्हणून व्यापाऱ्यास मोठ्या नफ्याची आशा दिसावी, आणि त्यांतून सरकारासही कांहीं उत्पन्न व्हावें म्हणून व्यापाऱ्यास सरकार माफी देऊं लागलें.

गोपाळ : अशा आशेवर व्यापारी स्वदेशांतून अधिक माल परदेशांत नेऊं लागला तर स्वदेशीं व्यापारांत समसमान नफा होणें तो कोठून होईल?

गुरु : समसमान नफा होणें त्यांत कोणेसमयीं अंतर पडतें. बहुधा असें होत असतें, इकडचा माल तिकडे जावा म्हणून इकडचें सरकार त्या मालावर जसी माफी करितें तसें तिकडचें सरकार समजतें कीं हा माल आपलेकडे आल्यानें आपलेकडल्या मालाचे विकरीस नुकसान होईल असें समजून तो माल तिकडे उतरतांच त्या मालावर जकात घेतें, म्हणून जसी माफीचे आशेने माल बाहेर न्यावयास उमेद येती, तसी बाहेर बंदरींची जकात पाहून ती उमेद कांहींसी खचून जाती. याजकरितां मुलखांतून जितका जायाचा बहुधा तितकाच माल परदेशीं व्यापारास जातो.

गोपाळ : परदेशीं व्यापार करण्यास जकातीचा अटकाव नसता तर व्यापार मोकळेपणीं होत असता.

गुरु : असा अटकाव एक अर्थी चांगला आहे. माफीवर नजर ठेवून आपलेकडचे व्यापारी परमुलखीं फारच माल नेऊन विकते, तर परमुलखी लोकांचें हित होतें, आणि आपलें अनहित होतें, म्हणून त्यांनी जी आपल्या इकडच्या मालावर जकात बसविली आहे तें नीट आहे.

गोपाळ : खरें, एक देश अमुक प्रकारानें व्यापार चालवूं पाहतो, एक देश त्या व्यापारास अटकाव करूं पाहतो, परंतु त्यां दोघांसही पाहत ठेवून व्यापाराची जी साहजिक गति, त्या गतीनें व्यापार चहूंकडे चालत असतो हा मोठा चमत्कार.

गोपाळ : ज्या वस्तु आपल्या देशीं होत नाहींत, त्या व्यापाराचे योगानें मिळतात म्हणून परदेशांसी व्यापार अवश्य करावा, परंतु आपल्या देशीं व्हायासारिखा ज्या वस्तु त्यांविषयीं परदेशव्यापार कशास पाहिजे? जरी अधिक खर्च लागला, तरी त्या आपल्याच देशीं उत्पन्न कराव्या.

गुरु : करूं नये असें कोण म्हणतो? इतकेंच कीं त्या अधिक खर्च करून परमुलखी वस्तूंसारिख्या व्हाव्या आणि त्यां सारिख्या स्वस्त मिळाव्या म्हणजे मग आपल्याकडले लोक परमुलखी वस्तू विकत घेण्याचे भरीस पडणार नाहींत. परंतु मागें बोलणें झालें कीं कित्येक जिन्नस ज्या देशीं व्हायाचे ते त्याच देशीं होतील, तें मात्र लक्षांत ठेवावें. अरे, किती खर्च केला म्हणून कोंकणांत जसे नारळ होतात, श्रीवर्धनास सुपारी होती, तसे नारळ सुपारी देशांत होईल काय? अथवा सुरतेची जसी बर्फी, ठाण्याचा जसा बहर मारणारा पागोटें इत्यादिकांचा रंग, तसी बर्फी, तसा रंग मुंबई, पुणें

यां शहरांत होईल काय? वर्जिनिया म्हणून अमेरिकेंत एक प्रांत आहे तेथें तमाखू होतो, तो इंग्लंड देशीं कोणी म्हणेल कीं मी करीन, तर होणार नाहीं; आणि इंग्लंड देशीं जसी बनात होती, तसी वर्जिनिया एथें होणार नाहीं. म्हणून बनात देऊन तमाखू घेतात. असा मोबदला करण्यांत दोन्ही देशांची हिताची गोष्ट आहे.

गोपाळ : हजार रुपयांचा तमाखू घेऊन त्या बदल हजार रुपयांची बनात दिली, तर यांत व्यापारी लोकांस जो नफा व्हायाचा तो होईल, देशसंपत्तीची वृद्धि होणार नाहीं.

गुरु : असें आहे, ह्या दोन्ही वस्तू ज्या ठिकाणीं होतात, तेथें यांचा उत्पन्न करायाचा खर्च म्हणजे अंगमोल कमी असतें, आणि ह्या ज्या ठिकाणीं जातात, तेथें यांचें मोबदला-मोल अधिक असतें, कारण, ज्या ठिकाणीं ह्या पुष्कळ असतात, तेथून, जेथें यांची कमती असती, तेथें जातात. हजार रुपयांचा तमाखू भरून गलबत वर्जिनियाहून हकारलें तें इंग्लंडचे बंदरीं आलें असतां त्या जिनसाचा तेथें खप कमती म्हणून त्या जिनसाचे तेथें मुल्दावर दोनशें रुपये उत्पन्न होतील. याच प्रमाणें हजार रुपयांची बनात इंग्लंडाहून भरली, तर तिचें वर्जिनिया एथें मुदलावर दोनशें रुपये उत्पन्न होतील.

गोपाळ : जसें मालाचें उत्पन्न होतें, तसा त्याचे पाठिमागें नोर, भाडें वगैरे लागला आहे; त्यापेक्षां ज्यास जो जिन्नस पाहिजे, तो घरचे घरींच उत्पन्न केला तर चांगलें होईल; बाहेर नेण्याची, बाहेरला जिन्नस आपल्याकडे घेण्याची दगदग चुकेल.

गुरु : तूं सांगतोस तें खरें. जरी परमुलखी वस्तू कदाचित् आपलेकडे झाली, पण ती उत्पन्न करायास फार खर्च बसूं लागला, तर कसें करावें? जर हजार रुपयांची बनात करायास एका मनुष्याचे एक हजार दिवस लागले, ती बनात देऊन दोन हजार दिवसांचे मेहनतीनें उत्पन्न झालेला तमाखू घेतला, तर एक हजार दिवसांची मेहनत वांचली असें जाणावें. याचप्रमाणें जी बनात करूं गेल्यास वर्जिनिया एथें दोन हजार दिवस लागतील ती बनात एक हजार दिवसांचे मेहनतीनें उत्पन्न झालेला तंबाखू देऊन घेतली तर एक हजार दिवसांची मेहनत वांचली, असें जाणावें, याप्रमाणें दोन्ही देशांस हित होतें. जी मेहनत वांचती, ती दुसऱ्या उद्योगाकडे लाविली असतां त्यापासून उत्पन्न होतें. असें उत्पन्न परदेशव्यापाराचे योगानें होतें, तेणेंकरून देशसंपत्तीची वृद्धि होती.

गोपाळ : तेव्हां जो जिन्नस घरीं केला असतां जो खर्च लागतो, तो जिन्नस परदेशव्यापाराचे योगानें त्या खर्चापेक्षां अर्ध्या खर्चानें मिळतो.

गुरु : होय, परंतु असें सर्वदांच होत नाहीं.

गोपाळ : जिन्नस चांगला स्वस्त जवळच मिळूं लागला, तर तो टाकून दूरचा जिन्नस घ्यावयास लोक जात नाहींत, हें नीट आहे. पण असेंच व्यापारी कां करितात?

गुरु : व्यापारी आपल्या आसपासचे व्यापाऱ्यांसी व्यापार करितात त्याचें कारण असें आहे कीं, जवळचा मनुष्य भला प्रामाणिक आहे किंवा कसा आहे हें जसें समजलें असतें, तसें दूर देशीं राहणाराविषयीं समजलें नसतें, म्हणून असें जवळील राहणाराविषयीं समजलें असतां व्यापारी एकाएकी फसला जात नाहीं. तशांत कांहीं व्यवहारांत तंटा झाला, ऐवजवसूल आला नाही, तर त्या आपल्या जवळच्या राहणारावर सरकारांत फिर्याद करायास सोई पडते. बाहेरचे व्यापारांत जो नफा व्हायाचा तितकाच नफा आपले देशीं व्यापार केला असतां मिळूं लागला तर कोणी परदेशव्यापाराचें नाव घेणार नाहीं. फारच मोठे नफ्याची आशा दृष्टीस पडती, तेव्हांच परदेशव्यापाराविषयीं कंबर बांधितात. परंतु जेथें जसा मोठा नफा, तेथें तसें जोखीमही अधिक ही गोष्ट विसरूं नको हो.

गोपाळ : परदेशाबरोबर व्यापार केला असतां आपलें आणि परदेशाचें असें उभयताचें हित होतें, हें

आतां मला समजलें. पूर्वी मला वाटत असे कीं, आपले देशांतून मालाचें हरण होऊन परदेशाची भर होती, म्हणून मला परदेशव्यापाराविषयीं शंका आली होती.

गुरु : तुला ती शंका येवो, पण असें आहे कीं, कोणताही व्यापार कां असेना, त्यास कोणी प्रतिबंध न करितां तो सरळ चालला असतां त्या पासून उभयपक्षीं हितच आहे. त्यांत एकास थोडा कांहीं अधिक नफा होतो, ही गोष्ट कांहीं गणनेंत आणायासारिखी नाहीं. कमअधिक नफा होणें हें कांहींसें लोकांचे स्वार्थदृष्टीवरही आहे. कसें म्हणसील तर, कांहीं एक जिन्नस पाहिला म्हणजे त्यावर व्यापाऱ्यांच्या उड्या पडतात; एक एकावर चढ करूं पाहतो. मोठे व्यापारी असें करीत नाहींत. फुटकळ घेणारे व्यापारी असें करितात. विक्रीचे कामांत असा चढ होऊं लागला म्हणजे तो जिन्नस उलटा स्वस्त होतो. लोक खरेदीकरितां चढ करूं लागले म्हणजे त्या जिन्नसाची किंमत चढती. एका जिन्नसाचीं जवळजवळ दुकानें जशीं अधिक, तसा तसा तो जिन्नस अधिक स्वस्त मिळतो.

गोपाळ : खरें, आपला माल आधीं विकला जावा म्हणून एक दुकानदार दुसऱ्या दुकानदारापेक्षां मालाची किंमत उतरीत जातो.

गुरु : तेव्हां माल महाग व्हावा याविषयीं चढ दुकानदारांकडून होत असतो; माल स्वस्त होऊन सर्वांस मिळावा, याविषयीं चढ गिऱ्हाईकांकडून असतो. यांतून देशाचें हित व्हायासारिखें कोणाकडून घडतें?

गोपाळ : गिऱ्हाइकाकडून म्हणजे मालाचा खर्च करणारांकडून घडतें. दुकानदार, फुटकळ व्यवहार करणारे व्यापारी झाले तरी ते मालाचे गिऱ्हाइकच समजावे, कारण त्यांकडेही इतर लोकांसारिखा मालाचा खर्च होतो.

गुरु : खरें. स्वार्थबुद्धि न ठेवितां माल स्वस्त होण्याकरिता लोकांकडून जो चढ होतो, तेणेंकरूनच मालाची मोठी किंमत, मनस्वी नफा घेण्यास अटकाव होतो, तेणेंचकरून मालाची किंमत उतरून तो योग्य रितीनें स्वस्त विकला जातो.

गोपाळ : बरें, ख्यालीखुशालीचे जिन्नस आपल्या देशीं उत्पन्न होतात, ते सोडून परमुलखी जिन्नस ख्यालीखुशालीकरितां घ्यावे काय?

गुरु : सर्वसाधारण व्यापार म्हटला म्हणजे त्यांत अवघे जिन्नस येतात. प्रपंचाचे उपयोगी पडावे, जेणेंकरून उपभोग घडावा, असे पदार्थ परमुलखांत झाले आणि आपल्यास स्वस्त मिळाले तर ते कां घेऊ नयेत? आपल्याकडे लुगडीं, साड्या, पागोटीं असीं असीं चांगलीं वस्त्रें होतात, पण चित्रें, घरांत मौजेकरितां ठेवावयाचें सामान, इत्यादि चांगलीं टुमदार होत नाहींत. म्हणून चीन, फ्रान्स, इंग्लंड अशां अशां देशांहून नाना तऱ्हेचीं छिटें, कापडें, ऊर्णावस्त्रें, बिलोरकाम, चित्रें तसेंच मसकत, मुसुंब, आर्बस्थान येथील मेवा फळें इत्यादिकांचा व्यापार आपल्या देशाबरोबर चालला असतो, ते ते जिन्नस सोई पडेल तसे घ्यावे, परमुलखी असें समजून त्याविषयीं आग्रह धरूं नये.

गोपाळ : खरें, ते परमुलखी जिन्नस घ्यावे, तशांत ते अवघे घेण्याविषयीं आपलेकडल्या द्रव्याचाच व्यय होतो, असें कांहीं नाहीं, इकडले जिन्नस मोबदल्यास देऊनही ते जिन्नस घेतात.

गुरु : आपल्याकडले लोकांस ते तसे जिन्नस करितां येत नाहींत, आणि ते तसे जिन्नस उत्पन्न करायास उपयोगी पडणाऱ्या ज्या कळा विद्या त्यांकडेही त्यांचा भर नाहीं. म्हणून लोंकर कापूस इत्यादि तयार करायाचें काम त्यांचें हातून घ्यावें, आणि ते जिन्नस देऊन त्यांचे मोबदला ऊर्णावस्त्रें, कापड इत्यादि परमुलखांत झालेलीं घ्यावीं.

गोपाळ : आपल्याकडचे जिन्नस देऊन त्यांबदल परमुलखी जिन्नस घेतले असतां, त्यांत आपलें नुकसान नाहीं, आणि परमुलखाचेंही नुकसान नाहीं.

गुरु : नुकसानाची गोष्ट सोडून दे; हित होतें असें म्हण. ज्या देशींचे लोकांस जे जिन्नस चांगले रितीने करितां येतील, तेच त्यांकडून करवावे; जे त्यांस करितां येत नाहींत, त्यांकडे त्यांस योजिलें असतां त्यांचे वेळाचा फार व्यय होतो. फार वेळ न लागतां जिन्नस उत्पन्न करणें यांतच हित झालें असें समजावें. कारण एके कामाकडे थोडका वेळ लागला म्हणजे बाकीचा वेळ दुसरे कामाकडे लावितां येतो. अर्थात् जे जिन्नस मोबदल्यास द्यावयाचे ते उत्पन्न करायास खर्च कमी लागतो.

फार वेळ लागून कमी उत्पन्न होतें, याविषयीं एक गोष्ट सांगतों. बोनापार्ट म्हणून फ्रान्स देशींचा पादशाहा होऊन गेला. तेव्हां कांहीं राज्यक्रांतीमुळें अमुक देशाचा अमुक देशाबरोबर व्यापार होऊं नये म्हणून बंदी झाली. फ्रेंच लोक अमेरिकाखंडांतली साकर आणि काफी विकत घेत असत, तीं त्यांस मिळतनाशीं झालीं. हे जिन्नस तर त्यांस फारच प्रिय, त्यांवांचून त्यांच्याने राहवेना; तेव्हां नाना प्रकारचीं कंदमूळें घेऊन त्यांतून साकर उत्पन्न करण्याचा उद्योग आरंभिला, काफीबद्दल एक वनस्पति उपयोगी पडायासारिखी असे, तिची लागवड करूं लागले. परंतु असें केल्यानें साकर, काफी यांसारिखे रुचिकर गोड पदार्थ न होतां पुंजीचा नाश झाला, आणि पुष्कळ वेळ फुकट गेला, त्या तितके वेळांत प्रपंचास उपयोगी पडणाऱ्या, आणि गोरगरिबांचा निर्वाह करणाऱ्या अशा बहुत्येक वस्तू झाल्या असत्या.

गोपाळ : यंत्राची युक्ति चालू केली म्हणजे मेहनत कमी होती, आणि पदार्थ चांगला उत्पन्न होतो. याहून व्यापाराची बंदी करण्याची युक्ति तर विलक्षण दिसती. ही बंदी चालू केली म्हणजे मेहनत फार लागून पदार्थ चांगला उतरत नाहीं.

गुरु : म्हणून व्यापाराची बंदी केली असतां देशांची संपत्ति, उपभोग, नांदणूक इत्यादि वाढणें तें एकीकडे राहून त्यांस उतरता पाया लागतो. व्यापाराची बंदी असूं नये, या पृथ्वीवरील अवघ्या देशांस एकमेकांसीं व्यापार करण्यास मोकळी असावी, जसा एकया गांवाचा दुसरे गांवांसी व्यापार चालला असतां हित होतें, तसाच परस्पर देशांचा व्यापार चालला असतां हित होईल. कोणी कोणी राज्यव्यवस्थाकर्ते लोक व्यवहारव्यवस्थाकर्ते झाले त्यानी अमुक देशीं व्यापार करूं नये, अमुक्याबरोबर व्यवहार करूं नये असा निषेध केला असला, तर कांहीं स्वार्थावर लक्ष ठेवून अथवा चांगल्या लोकव्यवहारांत त्यांची दृष्टीच पोंहचली नाहीं म्हणून तो निषेध केला असें समजावें. व्यापाराच्या योगाने कोण्या एका देशाचा नाश झाला असें तर कोठें आढळत नाहीं.

गोपाळ : अन्य देशाबरोबर व्यापारव्यवहाराची बंदी करणे हें भिकेस मिळायाचें लक्षण, असो. पण महाराज, धान्यादिक परमुलखांतून आणण्याची बंदी असावी, आणि तीं आपल्यास पुरीं पडायापुरतीं इकडेच पिकवावीं, परमुलखी धान्याची गरज ठेऊं नये. कारण त्या अन्नाचा भरवसा असला आणि तेथें कांहीं राजिक दैविक उत्पन्न झालें तर आपल्यास फार कठीण पडेल.

गुरु : हें तुझें बोलणें धान्यव्यापाराचें प्रकरण सुचवितें, परंतु आतां अवकाश राहिला नाहीं म्हणून तें प्रकरण उद्यां काढूं.

# उत्तरभाग संवाद २०

## परदेशव्यापाराचविषयीं

धान्याचा व्यापार–मोठे पुंजीचे व मोठे वसतीचे जे देश ते परमुलखी धान्याच्या आशेवर राहिल्यामुळें होणारे परिणाम–धान्य कमीअधिक झाल्यामुळें महागाई-सवंगाई–व्यापारास कांहीं अटकाव नसावा–विचार न करितां एकाएकी नवीन उद्योग चालू केल्यापासून होणारे परिणाम–व्यापारास मोकळीक असल्यामुळें होणारे लाभ.

गुरु : कालचे दिवशीं तूं बोलिलास कीं, धान्य परमुलखांतून आणू नये, आपल्याच देशीं पिकवावें. परमुलखांतून आलेल्या धान्यावरच निर्वाह करीत गेलें, तर परमुलखांत जडजोखीम झाल्यास, आपल्यास कठीण पडेल. बरें, या आपल्या देशीं कोणकोणत्या परमुलखांतून धान्य येतें, ते मुलूख सांग.

गोपाळ : आतां तर या आपल्या देशांत परमुलूख कोठें राहिलाच नाहीं. कलकत्ता, मद्रास, मुंबई हे तीन इलाखे मिळून हा आपला देश आहे. एथें तर बहुधा सर्वत्र इंग्रेजीच झाली आहे. परंतु पूर्वीं एकीकडे पेशवे सरकार, एकीकडे मोगल, कोंकणपट्टीकडे पोर्टुगीज–ज्यांस फिरंगी म्हणतात, दक्षिणेंत टिपू असीं निरनिराळीं अनेक राज्यें होतीं, त्यां त्यां अमलांतील मुलूख एकमेकांस परमुलूखच होते. तेव्हां एके मुलखांतून धान्य दुसरे मुलखांत जात असलें, तर त्या त्या मुलखाची लढाई होत असल्यास अथवा जेथून धान्य यावयाचें तेथें दुष्काळ पडल्यास त्या धान्याचे आशेवर राहणारे जे परमुलखी लोक, त्यांस फार कठीण पडेल, कारण आपल्याकडे धान्य पिकत नाहीं, आणि दुसरे कोठून धान्य मिळायाची सोई नाहीं, असी देशाची स्थिति मनांत आणून मी तें तसें बोललों.

गुरु : तर आतां ती शंका घेण्याचें कारण राहिलें नाहीं, हिमालयापासून तर रामेश्वरापर्यंत या आपल्या जंबूद्विपांत जें धान्य लागतें तें अवघें एथेंच पिकतें. दुसऱ्या देशाहून धान्य येत नाहीं. मुंबई शहरांत लोकांची संख्या फारच वाढली आहे. यांला फार धान्य लागतें; जवळ जवळच्या प्रांतीं पिकलेलें कोठून पुरें पडणार ? एथें गुजराथेकडून, देशाकडून, मलबारकडून जरी धान्य येतें, तरी ते परमुलूख असें होत नाहीं, कारण हे सर्व मुलूख एकाच राज्याखालीं आहेत.

गोपाळ : बरें, इंग्लांड देशीं धान्याविषयीं कसें काय आहे ? अवघें धान्य इंग्लांड देशींच उत्पन्न होतें किंवा परदेशांतून येतें ?

गुरु : अमेरिकेचे वेगळालें प्रांतांतून, बाल्टिक म्हणून समुद्र आहे, तसाच भूमध्य म्हणून समुद्र आहे, यांचे किनाऱ्यांकिनाऱ्यांस जे मुलूख असतात तेथून, इंग्लांड देशीं धान्य येतें, परंतु एथें तरी कांहीं भय संभवत नाहीं, कारण ह्यां अवघ्या देशांबरोबर वाकडें पडून एक्याच काळीं इंग्लांड देशाची लढाई होऊं लागेल, अथवा अवघ्या देशांत दुकाळ पडेल, असें नाहीं. दुकाळ पडला तर पृथ्वीचे कोणे एके भागीं पडेल, अवघ्याच भागीं एक्याच समयीं दुष्काळ पडेल, असें बहुधा होणार नाहीं.

असें वारंवार पाहण्यांत आलें आहे कीं, जी हवा एके जातीचें जित्रबास वाईट, तीच हवा दुसरे जातीचे जित्रबास गुणकारी होती. आणि इकडे तरी कोठें कोठे असें घडतें कीं, ज्यावर्षी कोकण पट्टी चांगली पिकती, त्या वर्षी देशांत चांगलें पिकलें येत नाहीं. तसेंच इसवी सन अठराशांत इंग्लांड देशीं धान्याचा फार दुष्काळ पडला होता, त्यासालीं स्पेन देशांत पुष्कळ पिक आलें होतें; पुढें इंग्लांड देशीं ज्या सालीं धान्य भरपूर झालें होतें, त्यासालीं स्पेन देशीं तर दुकाळ पडला होता. यावरून असें सिद्ध होतें कीं, एका देशाचा दुसरे देशाबरोबर धान्याचा व्यापार चालला असतां धान्याचे कमतीमुळें संकट प्राप्त झाल्यास त्याचें निवारण होईल.

गोपाळ : अशा प्रसंगीं परमुलखांतून धान्य आणलेंच पाहिजे, परंतु नेहमीच बाहेरून आणावें त्याजपेक्षां घरीं पिकवावें त्यांत आपल्या हिताची गोष्ट आहे.

गुरु : आपल्यास धान्याची गरज लागेल तेव्हांच परमुलखांतून धान्य आणण्याविषयीं उद्योग केला, आणि तेथें मिळालें नाहीं, तर मग कसें करावें ? ज्या देशीं धान्य पिकतें तेथील लोक आपले निर्वाहापुरतें उत्पन्न करितात. कधीं अधिक झालें, तर तें अन्यदेशीं पाठवितात. असे जे धान्य उत्पन्न करणारे देश असतील, त्यांस दुकाळाच्या वेळीं पुसलें कीं, आम्हाकडेस धान्य पाठऊन द्या, तर त्यांचें कदाचित् असें उत्तर येईल कीं, आमच्याकडे धान्य उत्पन्न होतें तें आमच्या गिन्हाइकास पूरत नाहीं मग तुम्हास कोठून द्यावें ?

गोपाळ : तर मग आपल्याचकडे पुष्कळ धान्य उत्पन्न करावें, म्हणजे आपला निर्वाह होऊन कांहीं संग्रहीं राहील, तें दुकाळांत कामीं पडेल; जर दुष्काळ पडला नाहीं, तर तें परमुलखांत पाठवितां येईल.

गुरु : पुष्कळ धान्य उत्पन्न करणें कठीण गोष्ट आहे. कारण, जसी जसी अधिक जमीनीची लागवड करावी, तसी तसी धान्याची किंमत वाढती. हें कोणास विपरीत दिसेल; परंतु धान्याची भरती आणि खप यांत चढउतार होऊन धान्याचे किंमतीत चढउतार होतो, ती गोष्ट एकीकडे ठेवून विचार केला असतां, अधिक जमीनीची लागवड केल्यास धान्याची किंमत कसी वाढती हें समजेल.

जसें जसें धान्य अधिक पिकवावें तसी तसी कनिष्ठ प्रतीची अधिक जमीन लागवडीखालीं आणावी लागती. त्या कनिष्ठ प्रतीचे जमीनींत धान्य पिकवायास जो खर्च लागतो, तो त्या धान्याचे किंमतीतून द्यावा लागतो, म्हणून जितकें धान्य पाहिजे त्यापेक्षां अधिक पिकवायास अधिक कमपीक जमीन लागवडीखालीं आणावी लागेल, तसी त्या धान्याची किंमतही वाढवावी लागेल.

गोपाळ : होय, किंमत वाढविल्यावांचून अधिक लागवडीचा खर्च भागणार नाहीं.

गुरु : खरें, धान्य कनिष्ठ प्रतीचे जमीनींत पुष्कळ पिकविल्यामुळें त्याची किंमत वाढली असतां तें विकण्याकरितां परमुलखांतही पाठवितां येत नाहीं.

गोपाळ : बरें, तर धान्याची किंमत उतरणें यांत शेती करणारास नुकसान होणार नाहीं काय ?

गुरु : धान्य उत्पन्न करण्याचा खर्च कमी लागत असला तर धान्याच्या उतरलेल्या किंमतीपासून कांहीं नुकसान होणार नाहीं. कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखालीं आणल्यामुळें शेतकऱ्यास फार खर्च होतो, तो जर उत्पन्नातून भागला नाहीं, तर त्या उतरलेल्या किंमतीपासून त्याचें नुकसान होतें. धान्य उत्पन्न करायास थोडका खर्च लागूं लागला तर तें कमी किंमतीनें विकतां येईल. म्हणून चांगली सुपीक जमीन पिकवावी; कमपीक जमीनीचे लागवडीचे भरीं पडूं नये.

ज्यां देशीं सुपीक जमीन पुष्कळ असती आणि पुंजी तर थोडकी असती, त्यांस शेतकीसारखा दुसरा लाभदायक उद्योग नाहीं. ते धान्य पिकवून परमुलखांत पाठवितात. अमेरिकेंत तर नवीन वसती झाली आहे, तेथें चांगली जमीन पुष्कळ आहे. पिकवावयाचा खर्च म्हटला म्हणजे थोडकाच असतो, म्हणून तेथें इतकें पिकतें कीं, तेथल्या लोकांस पुरें पडून परमुलखांत पाठवितां येतें. पोलांड व प्रशिया

म्हणून जे देश आहेत, त्यांतही शेतकी बरीच होत असती. तेथून परमुलखांत धान्य जात असतें. परंतु इंग्लंडसारिखे बहुत दिवसांचे वसलेले जे देश तेथें नाना प्रकारच्या शिल्पकळा चांगल्या उदयास आल्या आहेत, लोकसंख्याही पुष्कळ झाली आहे, म्हणून तेथल्या चांगल्या जमीनींत जें धान्य उत्पन्न होतें, तितक्यानेच अवघ्या लोकांचा निर्वाह होत नाहीं, म्हणून कांहीं बाहेरून आणावें लागतें. कनिष्ठ प्रतीच्या जमीनीचीं गोपचार कुरणें असीं केलीं असतात तेणेंकरून दूध, लोणी इत्यादिकांचाही सुकाळ असतो. घरी धान्य अधिक पिकतें तेव्हां बाहेरून थोडकें आणतात, थोडकें पिकतें तेव्हां बाहेरून अधिक आणतात. याप्रमाणें धान्याचा खप आणि भरती बरोबर ठेविली असती, तेणेंकरून धान्याची किंमत आणि रोजमुरा हीं फार चढत नाहींत, आणि उतरतही नाहींत, बेतानेच असतात.

गोपाळ : बरें, अमेरिका खंडांतून जें धान्य येतें त्याचा नोर विमा असा जो खेरीज खर्च तो अवघा देऊन धान्य स्वस्त पडतें काय ? तितक्यापेक्षां कमी खर्चानें घरीं धान्य उत्पन्न करतां येणार नाहीं काय ?

गुरु : नाहीं, तें बाहेरचेंच स्वस्त पडतें. ज्यां देशीं पुंजी पुष्कळ असती, आणि लोकही पुष्कळ असतात, तेथें अवघ्यांच्या निर्वाहापुरतें धान्य पिकविलें असतां त्यांत कित्येक गोष्टीनें नुकसान होतें. एक तर धान्याची किंमत बहुधा नेहमी चढली राहती. आणि धान्याची कमती झाली अथवा भरभर झाली म्हणजे त्या धान्याचे किंमतींत फारच चढउतार होतो. या अशा अडचणी परमुलखी धान्य आणण्याचा व्यापार चालत असतां येत नाहींत. धान्याची किंमत एकाएकींच चढली असतां गोरगरीब मजूरलोकांस फारच कठीण पडतें.

गोपाळ : महाराज, आतां माझी खातरी झाली. अमुक वस्तुविषयीं परदेशव्यापार करावा, अमुक वस्तूविषयीं करूं नये असें म्हणणें नीट नव्हे. जशा इतर वस्तू परमुलखी व्यापारी लोकांपासून घेतात तसें धान्यही परमुलखी व्यापाऱ्यापासून घ्यावें.

गुरु : खरें. जी गोष्ट होण्यास अशक्य असें आपल्या विचारावरून आणि प्रकृतिसिद्ध नियमावरून दिसत असतां त्या गोष्टीविषयीं झटणें यांत केवळ वेडेपणा आहे. जी वस्तू पाहिजे ती आम्ही आपलेचकडे उत्पन्न करूं, परमुलखी वस्तू घेणार नाहीं, असा आग्रह धरून बसूं नये. जी वस्तू उत्पन्न करण्यास देश हवा अनुकूल असेल तीच उत्पन्न करण्याविषयीं झटावें, परमुलखींच होणारे जे जिन्नस ते करण्यांत श्रम करणें निरर्थक होय.

गोपाळ : आपण म्हणतां तसें सर्वच परमुलखी वस्तुविषयीं समजूं नये, कारण, कित्येक परमुलखी वस्तू या देशांत अलीकडे होऊं लागल्या. विलायती गाड्या, घरांचीं कामें, तसें खुर्च्या, कोचे इत्यादि सामान बहुधा विलायतीसारिखेंच होऊं लागलें. तसेंच इंग्लंड देशीं चिनी प्याले वगैरे, आपल्या या देशांत जीं कापडें होतात त्यांपैकीं कित्येक कापडें असे असे अनेक परमुलखी जिन्नस इंग्लंड देशीं होऊं लागले. तेव्हां असें सिद्ध होतें कीं, जसा परमुलखी जिन्नसाचा व्यापार करावा तसे परमुलखी जिन्नसापैकीं आपल्याकडे व्हायाक्षारिखे जे जिन्नस असतील ते करण्याचा उद्योग करावा त्यांत आपलें हित आहे.

गुरु : परमुलखी जिन्नस आपल्याकडे करूं नये, म्हणून बोलणें पडलें, त्याजवरून कोणताच परमुलखी जिन्नस इकडे करूं नये असें होत नाहीं. हवा पाणि इत्यादि कारणामुळें जो जिन्नस एथें होत नाहीं, अथवा ज्यास फार खर्च लागून चांगला उतरत नाहीं, त्याची मनाई सांगितली. परमुलखी जिन्नस बाहेरून येतो त्यापेक्षां घरीं केला असतां स्वस्त पडूं लागला तर तो करूं नये असें कोण म्हणेल ? परंतु परमुलखी नवीन जिन्नस आपलेकडे करावा कोणता, न करावा कोणता हें त्या त्या कसबांत माहितगार व निपुण असतील त्यानीच तो विचार करावा; नवीन उद्योग करणारानीं भलताच एकादा जिन्नस उत्पन्न करण्याच्या खटल्यांत पडूं नये.

परमुलखी धान्यादिक वस्त्र, पात्र, असे अनेक प्रकारचे पदार्थ विकत घेतले असतां जसे थोडक्या मोलानें मिळतात, तसे थोडक्या खर्चानें आपलेकडे उत्पन्न होते आणि करितां येते, तर परदेशव्यापाराची प्रवृत्तिच झाली नसती. परंतु ईश्वराकडचा नेम विलक्षण आहे, त्यानें नानादेशीय हवा पाणी इत्यादिकांचे ठायीं निरनिराळे गुण ठेवून निरनिराळे पदार्थ उत्पन्न व्हावे असें करून ठेविलें आहे, म्हणून मनुष्यमात्रानें अनेक देशाबरोबर मोठमोठ्या दूर दूर ठिकाणच्या लोकांबरोबर व्यवहारव्यापार करून परस्परांचें हित व सुख करून घ्यावें, असा ईश्वराचा संकल्प स्पष्ट दिसतो; असें असतां मनुष्यें आपल्या लोभादिकांमुळें व अज्ञानामुळें तद्विपरीत आचरण करितात.

गोपाळ : खरें, जसे देश निराळे तशा भूमी, ऋतू, व तेथें उत्पन्न होणारे प्रकृतिसिद्ध पदार्थ निरनिराळे असतात, म्हणून जसें एक्याच मनुष्यास अनेक प्रकारच्या कळाविद्यांत निपुणता संपादणें अशक्य, तसेंच एक्या देशीं अनेक प्रकारचे पदार्थ उत्पन्न करणें अशक्य आहे.

गुरु : अरे, असें आहे, जसे एकादे देशीं अनेक प्रकारचे लोक असतात त्यांत उद्योगाची वांटणी झाल्यामुळे शिल्पादि कर्में उत्तम प्रकारें होतात, तसेंच या पृथ्वीवरील जे अनेक देश त्यांच्याठायीं उद्योगाची वांटणी होऊन व्यापारादिक उत्तम प्रकारें होतात. या पृथ्वीवरील सर्व लोक व्यापाररूपी एक कुटुंबच आहे, कुटुंबांतील जशीं एकमेकाचे आश्रयानें वागतात तसें परस्परांच्या आश्रयानें मनुष्यमात्रानें वागावें, म्हणून जसे वेगळाले देश तसे तेथें वेगवेगळाले पदार्थ ईश्वरानें निर्माण केले आहेत. जशी उपभोग घेण्याची इच्छा तशी उपभोग्य पदार्थ उत्पन्न करण्याची शक्तिही कोठे अधिक कोठे कमी अशा मानानें मनुष्याच्या ठायीं ठेविली आहे. असो. पूर्वीच्या लोकांचा व्यापाराचे योगेंकरून पृथ्वीवर सांप्रतकाळींचे लोकांइतका संचार होत नव्हता म्हणून त्यांस सांप्रतकाळींच्या लोकांसारिखा उत्तम संपत्तिचा उपभोग कोठून होणार?

आपल्यास एकादा जिन्नस आपल्या जवळचे देशींचे लोकांसारिखा करितां येत आहे, तर तोच पदार्थ त्यांजपेक्षां चांगला होईं, अशी निपुणता त्याच उद्योगांत संपादावी, ज्या उद्योगास देशकाल अनुकूळ नाहीं, त्या उद्योगाच्या नादीं लागूं नये. या रितीने लेक वर्तू लागले असतां उत्तम रीतीने पुष्कळ पदार्थ उत्पन्न होऊं लागतील. आणि सर्व देशांचें परस्परें करून फार हित होईल. आपल्या जवळचे देश कृषिकर्मांत अथवा शिल्पकर्मांत चांगले निपुण झालेले पाहून त्यांजबरोबर मत्सर वागविणें हें केवळ नीचपणाचें व अल्प बुद्धिचें लक्षण होय. जवळचे देश जसे संपन्न होतात, तसे ते आपल्याकडले जिन्नस घ्यावयास समर्थ होतात. तेव्हां अर्थातच आपल्याकडे उत्पन्न झालेला जिन्नस पडून न राहतां त्याचा खप होऊं लागतो. आपले जवळचे देश आळशी गरीब झाले असतां आपल्यास त्यांची धास्ती पडावी. संपन्न उद्योगी झाले असतां पडूं नये.

गोपाळ : खरें महाराज, आपल्या जवळचा देश संपत्तिमान असला तर त्यांत आपलें हित आहे. कोणी वाणीउदमी झाला तरी तो आपलें दुकान जेथें चार ताजी गिऱ्हाइकें असतील तेथें मांडील, भिकारी लोकांच्या शेजारी कशास मांडील? तीं बापुडीं त्याचा माल कशाने घेतील? हे जसे वाणीउदमी आपल्या हिताकरतां मातबर गिऱ्हाईकाची इच्छा करितात, तसेंच व्यापार करते देशानीं आपल्या जवळील देश संपत्तिमान होण्याची इच्छा करावी. या प्रकरणीं जसें जसें मी ऐकत जातों तसा तसा माझा निश्चय असा दृढ होत आहे कीं, परदेशव्यापार केल्यापासून देशांतील राहणारांचें हितच होईल. कोणी देशाने अथवा कोणी मनुष्याने कोणाचा हेवा मत्सर करू नये, सर्वांशीं प्रीतिपूर्वक वागावें.

गुरु : थोर मन, दीर्घ दृष्टी असीं जेथें आहेत तेथून असेच उद्गार निघतील; केवळ व्यवहारी ज्ञानापासून असे असे संकल्प उत्पन्न होणार नाहींत. मनुष्यमात्राच्या ठायीं परोपकारबुद्धि उत्पन्न होणें हें तर उत्तम शास्त्रविद्येच्या अभ्यासेंकरून होईल.

# उत्तरभाग संवाद २१

## परदेशव्यापाराविषयीं

हुंड्यांचा प्रकार – समसमान व्यापार – हुंड्यांचे पाडांत चढउतार – इकडून परमुलखांत परमुलखी इकडे पाठविलेला माल कमीअधिक असल्यामुळें होणारे परिणाम – हुंड्याचे पाडांत उगीच दिसायासारिखा फेरफार होतो तो प्रकार – कोणी एके देशाचे नाण्याचा भाव उतरण्याचा प्रकार.

गुरु : कां गोपाळा, परदेशव्यापारापासून लाभ होतात याविषयी तुझें पुरतेपणी समाधान झालें ना ?

गोपाळ : होय, महाराज पुरतेपणीं झालें. आतां एक पुसायाचें राहिलें, व्यापार म्हटला म्हणजे बहुधा एके जिन्नसाबदल दुसरा जिन्नस द्यावा घ्यावा अशा मोबदल्यानें होतो. कोणी मुंबईस तुपाचा व्यापार करणारा आहे, त्याकडे ज्याफराबादेहून तूप आलें, त्याजबद्दल दुसरा कांहीं जिन्नस दिला पाहिजे. तुपास तूप देतां येत नाहीं, आणि तो व्यापारी तर तुपावांचून दुसरे कशाचा व्यापार करीत नाहीं, तेव्हा तो कसें करीत असेल ?

गुरु : तूप, गूळ, इत्यादि अनेक पदार्थ संग्रहीं ठेऊन बहुत्येक व्यापारी व्यापार करीत असतात. एक जिन्नस घेऊन त्याचे मोबदला दुसरे जिन्नस देतात. इंग्लंड देशाहून व्यापारी कापड, बिलोरकाम इत्यादि आणितात. त्याबदल एथील व्यापारी कापूस तसेच या देशींचे दुसरे जिन्नस पाठवितात. परंतु मोबदला म्हटला म्हणजे एका देशाचा दुसऱ्या देशासी होतो. एक देश आपल्याकडे झालेले जिन्नस दुसऱ्या देशींच्या जिन्नसाबद्दल देतोघेतो. व्यापारी लोक पाहिलें असतां मोबदला करीत नाहींत, ते विकरी व खरेदी करितात असें म्हणावें.

गोपाळ : कित्येक व्यापारी लोक जिन्नसांचा मोबदला करीत नाहींत, ते जो माल घेत असतील त्या मालाचा पैका देत असतील. तो पैका दुसरा माल-मोबदला द्यावयाचा तितकाच असेल. जर सोलापूरचा व्यापारी शंभर रुपयांचीं लुगडीं मुंबईचे व्यापाऱ्याकडे पाठवील, तर येथून तिकडे शंभर रुपयांचें विलायती कापड पाठविलें पाहिजे. कापड न पाठविलें, तर शंभर रुपये पाठवावे लागतील, परंतु असें नाणें पाठविणें यांत जोखीम व अडचणी आहेत. अशा अडचणी न पडत असी कांहीं देण्या-घेण्याची सोईवार युक्ति असती, तर उभयपक्षीं सुख होतें.

गुरु : पैक्यावांचून विकरी व खरेदी करण्याची एक युक्ति आहे. ती कोणती म्हणसील तर हुंडी लिहून देणें.

गोपाळ : हुंडी ही ब्यांक नोटीप्रमाणें कागदाचा पैका आहे काय ?

गुरु : हुंडी केवळ ब्यांक् नोटीसारखी नाहीं. अमुक ऐवज अमुक्यास द्यावा म्हणून दुसरे गावींचे राहणारावर जी चिठी लिहितात ती हुंडी होय. कोणे व्यापाऱ्याने आपला माल कोणाकडे पाठविला

म्हणजे त्या मालाचा ऐवज अमुक तारखेस ज्याचें नांव हुंडींत लिहिलें आहे, त्यास द्यावा, असी हुंडी माल खरिद करणारावर तो व्यापारी लिहून पाठवितो. कोणेसमयीं असें घडतें कीं मुंबईचा व्यापारी सुरतेस माल पाठवितो, आणि तो माल ज्या व्यापाऱ्यावर पाठविला त्याजवर हुंडी लिहून पाठवावयाची ती न पाठवितां तिचा ऐवज मुंबईतच घेण्याची तजवीज करितो. मुंबईत चौकशी करितां या सावकारासीं त्याची गांठ पडती, तो सावकार सांगतो कीं मला सुरतेंत अमुक दुकानाचे अडत्यास ऐवजाचा भरणा करायाचा आहे, तो ऐवज मी तुम्हास देतों, म्हणजे सुरतेस ऐवज पाठवायाची मेहनत पडणार नाहीं. मग हा सावकार त्या माल पाठविणारापासून ती हुंडी घेऊन त्यास ऐवज देऊन हुंडीवर मला अथवा सुरतेचा माझा अडत्या त्यास हुंडीचा ऐवज घेणें असें लिहून ती हुंडी सुरतेस आपल्या अडत्याकडे पाठवितो. तो ज्यावरती हुंडी लिहिली असेल, त्यापासून त्या हुंडीचा ऐवज घेतो.

गोपाळ : तेव्हां जसा मुंबईचे सावकारास घरबसल्या आपला ऐवज मिळतो, तसाच सुरतेच्या व्यापाऱ्यानें मुंबईच्या व्यापाऱ्यावर माल पाठविल्यास त्याची किंमत आपण सांगतां अशा युक्तिनें त्या व्यापाऱ्यास सुरतेंत मिळेल. एकून व्यापारांत हुंडीचा फार उपयोग आहे. इच्या योगानें देण्याघेण्यास मोठें सुख झालें. जर माझे पुण्याचे मित्राकरितां कांहीं पुस्तकें मुंबईत म्या विकत घेतलीं त्यांचा ऐवज मला पुण्याहून येणें असला, व तितकाच ऐवज एथें राहणारा माझा भाऊ त्याकरितां पुण्यास पागोटें घेतल्याबद्दल त्याजवर निघत असला, तर मी आपल्या मित्रावर जी हुंडी लिहीन ती माझा भाऊ एथें मजपासून विकत घेऊन ज्यापासून पागोटें विकत घेतलें असेल, तेथें त्याचा ऐवज भरायाकरितां त्याकडे ती हुंडी पाठवील. तो कापडवाला त्या हुंडीचा ऐवज माझे मित्रापासून घेईल. कसें महाराज, व्यापाऱ्यांत अशाच रीतीचे हुंडीने देवघेव होतो काय?

गुरु : होय, तुला हुंडीने व्यवहार करण्याची रीति समजूं लागली खरी. दोन देशांचा व्यापार होत असला आणि इकडून जितका माल पाठविला तितकाच तिकडून आला तर ऐवजाच्या हुंड्यांच्या बरोबरच रकमा होतील. तो ऐवज एकमेकांकडे न पाठवितां घरीं बसल्याच पोंहचेल.

गोपाळ : खरें. बरें, पण इकडून तिकडे माल पाठविला, तिकडून इकडे आला, त्या मालाची किंमत अधिकउणी असली, तर हुंड्यानींच अवघा देवघेव होणार नाहीं. एका देशाची दुसऱ्या देशावर कांहीं बाकी येणें निघेल.

गुरु : ती बाकी देण्याचा प्रकार सांगतों. आपला इंग्लंड देशाबरोबर व्यापार चालला असला, आणि आपण जितके किंमतीचा तिकडे माल पाठविला तितकेच किमतीचा तिकडून येऊं लागला, तर आपला-त्यांचा समसमान व्यापार चालला आहे असें होईल. जर त्यानी आपल्याकडे कापड पाठविलें, त्याची किंमत आपल्याकडला कापूस गेला त्याचेपेक्षां अधिक झाली, तर त्यांकडून आपल्यावर अधिक हुंड्या येतील. आपल्याकडून त्यांवर कमी हुंड्या होतील. हुंड्यानी जितका देवघेव व्हावयाचा तितका होऊन त्यांची बाकी आपल्यावर निघेल. त्याबद्दल आपल्याला नाणें पाठविलें पाहिजे.

गोपाळ : एकून नाणें पाठवायाची दगदग चुकत नाहीं; नाणेंच परमुलखांत पाठविलें पाहिजे.

गुरु : नाणें पाठविण्यास नोर, विमा, इत्यादि मोठा खर्च बसतो, म्हणून नाणें पाठविण्याचा प्रसंग जोपर्यंत टळेल तोंपर्यंत व्यापारी टाळूं पहातात. इंग्लंडचे व्यापाऱ्यांवर आपल्याकडून ज्या हुंड्या व्हावयाच्या त्यांची कमती झाली म्हणजे आपल्याकडले व्यापारी जे त्यांचे देणेदार असतात, ते त्या हुंड्या घेण्याविषयीं मोठे आतूर होतात. एक म्हणतो मला हुंडी पाहिजे, दुसरा म्हणतो, मला पाहिजे; याप्रमाणें चढाचढी झाली म्हणजे त्यां हुंड्यांची किंमत चढती, कारण हुंडीची जी रकम आहे त्यापेक्षां अधिक दिलें तर पुरवेल, परंतु कापड घेतलें आहे त्याबद्दल नाणें विलायतेस

पाठविणें पुरवणार नाहीं. असा जो अधिक ऐवज हुंडींचे रकमेपेक्षां देतात त्यास मंडावणी असें म्हणावें.

गोपाळ : तेव्हां इंग्लंडचे सावकाराचा जो ऐवज आपल्याकडले सावकारावर घेणें निघत असेल, त्याने जास्ती द्यावें असें सिद्ध होतें.

गुरु : होय, त्या हुंड्यांची जसी कमती असती तसा मंडावणीचा ऐवज अधिक द्यावा लागतो.

गोपाळ : विलायतेच्या सावकारांकडून अधिक किंमतेचा माल आला, आपल्याकडून कमी किंमतेचा माल गेला, म्हणून आपल्या हुंड्या त्यांजवर कमी झाल्या आणि त्यांच्या आपल्यावर जास्ती झाल्या. परंतु त्यांकडे जो ऐवज पाठविणें, त्यास जो खर्च बसेल त्यापेक्षां मंडावणीस जास्ती ऐवज जाऊं लागला तर मग त्यांकडे नाणें पाठविणें हें बरें.

गुरु : जसाजसा देश दूर असतो, जसी जसी पाठविण्याची सोई अथवा गैरसोई असती; तसा तसा नाणें पाठविण्याचा खर्च कमीअधिक लागतो.

गोपाळ : एकूण हुंड्यानेच अवघें काम होत नाहीं. बाकींच्या ऐवजाकरितां नाणें पाठविलेंच पाहिजे, कारण इकडच्या ज्या सावकारास हुंड्या मिळाल्या नाहींत, त्यास ऐवज पाठविल्यावांचून दुसरी गति नाहीं.

गुरु : दुसरी गति आहे, ती सांगतों. कित्येक व्यापारी हुंड्याचा व्यापार करितात, हुंड्या पुष्कळ आणि स्वस्त असल्या म्हणजे विकत घेऊन त्या कमती व महाग झाल्या म्हणजे विकतात. जसा कापडाचा अथवा कोणे जिन्नसाचा व्यापार करावा, तसाच हुंड्यांचा व्यापार आहे.

आपल्याकडून विलायतेच्या सावकारावर झालेल्या हुंड्यांची कमती झाली म्हणजे विलायतेच्या सावकारावर दुसऱ्या देशांतून झालेल्या हुंड्या आपल्याकडले हुंड्याचे व्यापारी खरीद करितात, आणि आपल्याकडले बाजारांत त्या हुंड्यांचा व्यवहार करितात.

गोपाळ : विलायतेचे सावकारांवर आपल्याकडल्या सावकारांच्या हुंड्या कमी झाल्या असल्या आणि दुसऱ्या देशांतून कांहींच झाल्या नसल्या तर कसें होईल?

गुरु : बहुधा असें होतें कीं एका देशांतून इंग्लंडावर झालेल्या हुंड्याची कमती असली म्हणजे दुसऱ्या देशांतून इंग्लंडावर झालेल्यांची जास्ती असती. एका देशाबरोबर इंग्लंडाचा व्यापार चालला असतो, त्यांत इकडून कमी तिकडून अधिक असें जरी जात येत असलें, तथापि तें अंतर इंग्लंडचा सर्वसाधारण व्यापार पाहिला असतां नाहींसें होतें. कारण नेहमीच बाहेरून फार माल इंग्लंडाकडे जाऊं लागला तर त्याची किंमत देण्यांत तेथील आवघा पैका हरण होईल. जर तेथून बाहेर माल फारच जाऊं लागला तर त्याची किंमत जमून नाण्याचा भाव उतरेल. सारांश, जसी इंग्लंडाची बाकी घेणें इतर देशांकडे निघेल, तसीच इतर देशांची बाकी घेणें इंग्लंडावर निघेल, म्हणून इंग्लंडावर झालेल्या हुंड्या तशाच इंग्लंडाच्या इतर देशांवर झालेल्या हुंड्या ह्या समसमान मानानें होतील. हुंड्यांचे व्यापाऱ्याचें काम इतकेंच कीं इंग्लंडावर कोणत्या देशीं अधिक हुंड्या झाल्या आहेत व कोणत्या देशीं कमी झाल्या आहेत त्या बेतानें त्या हुंड्या एकाठायीं खरीद करून त्या दुसऱ्या ठायीं विकाव्या.

गोपाळ : तेव्हां आपल्याकडून इंग्लंडावर झालेल्या ज्या हुंड्या त्या हुंड्यांचे व्यापारी खरीद करणार नाहींत, तर आपल्यावर इंग्लंडाच्या झालेल्या हुंड्या खरीद करतील. तसें केलें असतां त्या हुंड्यांचे योगानें आपल्यावर चढलेला जो इंग्लंडाचा ऐवज तो आपण त्या हुंड्या घेतल्या असतां दिला असें होईल.

गुरु : होय. इंग्लंडाचा व्यापार इताली देशाबरोबर चालला आहे, तिकडून इकडे रेशमी काम तसेच

दुसरे जिन्नस येतात, इकडून तिकडे कांहीसे शिल्पकृतीचे पदार्थ जातात. परंतु इकडून तिकडे थोडका पदार्थ जातो, आणि तिकडून इकडे बहुत पदार्थ येतो, म्हणून इकडून नाणें पाठवावें लागत असतें, परंतु हुंड्यांचा व्यापार करणारे आहेत त्यामुळें तसा प्रसंग येत नाहीं. हे व्यापारी लोक इताली देशांतून इंग्लंडवर झालेल्या हुंड्या विकत घेतात, आणि जेथें इंग्लंडावर झालेल्या हुंड्यांची कमती असती असीं जीं जर्मनी, फ्रान्स, स्पेन, इत्यादि स्थळें तेथें पाठवितात.

गोपाळ : तेव्हां जर्मनी, फ्रान्स, स्पेन इत्यादि देश इंग्लंडाचें कर्ज देतात असें सिद्ध होतें.

गुरु : होय, त्यां देशांस इंग्लंडास ऐवज देणें असला तर इंग्लंडावर झालेले हुंड्याचा ते देशस्थ लोक पत्कार करतील, नाहीं तर त्यां हुंड्यास ते लोक शिवणार नाहींत.

गोपाळ : कोणास या विचारावरून असें वाटेल कीं, हुंड्याचे व्यापारी लोक व्यवहार करितात त्या योगानें असें होतें कीं पदार्थ इकडून तिकडे अधिक पाठविला त्यामुळे एकाकडे अधिककमी ऐवज राहिला असी जी किरकीर ती दूर होऊन सर्वत्र समसमान व्यवहार चालला असतो. बरें महाराज, व्यापारी लोकांनी जो माल घेतला असेल त्याकरितां परमुलखांत द्रव्य पाठविलेंच पाहिजे काय?

गुरु : सर्वदांच पाठविलें पाहिजे असें नाहीं. जेथें मालापेक्षां नाण्याचाच खप फार अशा देशाबरोबर व्यवहार केला असतां मात्र नाणें पाठवावें लागेल.

गोपाळ : तेव्हां मंडावणी म्हटली म्हणजे आपल्याकडे माल पाठविणारास मिळत नाहीं. परंतु आपल्याकडून बाहेर माल पाठविणारास मिळती असें होतें, म्हणून आपल्याकडल्या बाहेर माल पाठविणारांस मोठी उमेद येईल, तसेंच बाहेरून माल आपल्याकडे घेणें त्यासही अटकाव होईल. एणेकरून देण्याघेण्याचा व्यापार समसमान चालेल.

गुरु : समसमान व्यापार न चालल्यामुळें जें नुकसान होतें तें इकडून तिकडे तिकडून इकडे बरोबर माल येऊं जाऊं लागला म्हणजे नाहींसें होतें.

गोपाळ : अशा कारणावरून नाणें परमुलखांत पाठविण्याचें जें अगत्य, तें नाहींसें होतें काय? आणि कोणा एका देशाकडे कोणा देशाची बाकी देणें ती फिटती काय?

गुरु : होय. हा विचार बहुधा सर्व देशांचे स्थितीस लागू आहे. ज्या देशीं सोन्याच्या खाणी आहेत, त्या देशीं कदाचित हा विचार लागू होणार नाहीं.

गोपाळ : महाराज, हुंड्या खरीद करितात त्यां हुंड्यांचे भावांत चढउतार होतो, बरें, परमुलखी जिन्नस आला असेल त्याची किंमत पाठवावयास जो खर्च बसतो त्यापेक्षां त्या हुंड्याचा भाव उतरून कमी होत असेल काय?

गुरु : होय, तो भाव उतरून कमी होत असतो. परंतु असा भाव उतरण्याचीं कारणें वेगळींच आहेत. इकडून तिकडे अधिक माल गेला, तिकडून इकडे माल कमी आला, केवळ अशा कारणावरूनच त्यां हुंड्यांचे भावांत चढउतार होत नाहीं. मागें असें बोलणें झालें कीं नाण्याचा भाव उतरणेंचढणें ते जिन्नसाचे किंमतीचे अधिकउणें होण्यावर आहे. परंतु नाण्याचे भावांत चढउतार होण्यास इतकेंच कारण नाहीं. दुसरीही कारणें आहेत. नाणें फारच होणें अथवा त्या नाण्यांत भेळ घालणें किंवा तसेंच दुसरें कारण असणें इत्यादिकांमुळें नाण्याचे भावांत चढउतार होतो.

गोपाळ : बरें, आपलेकडून परमुलखांत माल अधिक पाठविला, परमुलखांतून माल आणणें तो कमी आणिला, असें केलें असतां हुंड्याचे भावांत चढउतार होणें तें विघ्न टळेल किंवा कसें?

गुरु : तसें केल्यानें तो चढउतार नाहींसा होणार नाहीं. इकडचा माल बाहेर अधिक पाठविला अथवा बाहेरचा माल इकडे कमी येऊं दिला, तथापि हुंड्यांचा व्यापार करणारा तो हुंड्यांचा व्यवहार मंडावणी घेतल्यावाचून करणार नाहीं. नाण्याचा भाव पडल्यामुळें हुंड्याची किंमत वाढली तर त्या

व्यापाऱ्यास नफा होईल असें समजूं नये. कारण एका देशांतून दुसरे देशीं माल जाणें येणें हें अंतीं पाहिलें असतां समसमान मानाने होत असतें.

गोपाळ : मला वाटतें, आपल्या बोलण्याचा भाव समजला. नाण्याचा भाव उतरला म्हणजे हुंड्यावर मंडावणी घेण्याचें काम चालू होतें. परंतु नाण्याचा भाव उतरल्यामुळें विकाऊ जिन्नसाचे किंमतींत अंतर पडतें, म्हणून हुंड्याचे भावांतही अंतर पडेल.

गुरु : खरें. आणखी असें आहे कीं एका देशांतून दुसऱ्या देशीं कमी माल पाठविणें आणि तिकडून अधिक येणें असें नाण्याचा भाव उतरल्यामुळें झालें तर व्यापाराची विषम गति झाली असें समजूं नये. असें अंतर व्यापाराची समसमान गति असतांही होईल. आणि हुंड्याच्या व्यवहारांत चढउतार होतो त्यापासून तो व्यवहार करणारांस नफातोटा होत नाहीं, आणि त्यासीं व माल बाहेर पाठविणें, आपल्याकडे येऊ देणें यासी कांहीं संबंध नाहीं.

गोपाळ : माल बाहेर पाठविणें, आपल्याकडे बाहेरचा माल येऊं देणें यांत अधिकउणें होण्याचें काय कारण असावें ?

गुरु : तें कारण यथास्थितपणें सांगतां येत नाहीं.

गोपाळ : बरें महाराज, आपल्याकडे शिल्पी लोक नाना प्रकारचे उद्योग करून जे पदार्थ उत्पन्न करितात ते अवघे परमुलखांत पाठवून त्याचेबद्दल नाणेंच इकडे येऊं दिलें तर त्या नाण्यापासून आपल्याकडे काय उपयोग होईल ?

गुरु : तें नाणें आपल्यास दुसरे पदार्थ उत्पन्न करायास, तसेच दुसरे उद्योग चालू करायास उपयोगी पडेल. ज्यां देशांची चढती कळा असती तेथें अमूल्य धातू केवळ जव्हेरी सोनार इत्यादिकांस भूषणेंच करून लोकांस शोभवावयास उपयोगी पडती इतकेंच नव्हे, तर देशांत जसी विकाऊ जिन्नसाची बढती होती तसा त्यांचा व्यवहार होण्याकरितां अधिक द्रव्याचें अगत्य लागतें.

गोपाळ : तर विकाऊ जिन्नसांचा चांगल्या रीतीनें व्यवहार करण्यास स्पेन व पोर्तुगाल या देशीं चांगली सोय झाली असेल, कारण अमेरिका खंडांतील अवघें द्रव्य प्रथम त्याच देशीं आलें, मग तेथून त्याची युरोपखंडी चाल झाली म्हणून सांगतात.

गुरु : त्यां देशांतून द्रव्य युरोपखंडीं चालून आलें असें समजूं नये तर तें व्यापारद्वारा आलें असें समजावें.

गोपाळ : बरें, स्पेन देशीं द्रव्य पुष्कळ झाल्यामुळें शिल्पकर्मेंकरून झालेले असे परमुलखांतून नाना प्रकारचे पदार्थ त्या देशीं फारच जाऊं लागले तर त्या देशींच्या लोकांचे उद्योगास अटकाव होणार नाहीं काय ?

गुरु : अटकाव तर खराच, परंतु फारच अटकाव होणार नाहीं, कारण अमेरिकाखंडांतून जें सोनें रूपें स्पेन देशास मिळतें तें कांहीं त्याबद्दल खर्च होऊन मिळतें आणि कांहीं अमेरिकाखंडीं देणें बसविलें असतें त्याचें आणि कांहीं तेथील धातूचे खाणीचे भाड्याचें मिळतें.

आतां हें व्यापाराचें प्रकरण संपवावें. ज्यांपासून उत्पन्न होतें असीं जीं उत्पन्नाचीं नाना अधिकरणें त्यांचा विचार झाला असतां त्या उत्पन्नाचा व्यय कसा होतो, त्यापासून काय काय होतें, त्याचा पुढल्या संवादांत विचार होईल.

# उत्तरभाग संवाद २२

## संपत्तिव्यय म्हणजे खर्च याविषयीं

उत्पन्नाची वहिवाट कसी होती–लोक कसाकाय खर्च करितात–पुंजीचा खर्च केल्यापासून कसें काय होतें–देशाची पुंजी वाढली असतां तेथील अवघ्यां लोकांचें हित कसें होतें–पुंजीचे वहिवाटीविषयीं सरकाराने कांहीं कायदा केल्यास कसें काय होतें–ज्यांपासून अनेक सुखांचा उपभोग घडतो त्यां पदार्थांकडे मनुष्याचा भर असावा किंवा कसें–त्या पदार्थांचा उपभोग उद्योग वाढविण्याविषयीं कसा कारण होतो–मजूर लोकांकडे संपत्तीची अकस्मात् वृद्धि झाली असतां तेणेंकरून त्यांचा बिघाड कसा होतो–अतिशय ख्यालीखुशालीपासून काय अनहित होतें, हे सर्व विषय एथें सांगितले आहेत.

गुरु : पुंजीचा संचय कसा करावा, तिजपासून उत्पन्न करून घ्यायास ती कसी वहिवाटावी हें तर तुला समजलें. आतां पुंजीपासून जें उत्पन्न होतें त्याची कसी वहिवाट होती तें सांगतों.

गोपाळ : उत्पन्न झालें असतां त्याचा खर्च होईल अथवा तेंच सांचवून पुंजींत घातलें तर त्याची पुंजी होईल. जो कोणी बेताने खर्च करून उत्पन्न सांचवीत जातो, पुंजीत वहिवाटीत जातो तसा तसा तो मातबर होतो.

गुरु : हें जसें मनुष्याविषयीं तसेंच देशाविषयीं समजावें. देशाची पुंजी उद्योगेंकरून मितव्ययेंकरून वाढती अथवा उधळेपणामुळें कमी होती.

गोपाळ : देशांत जे राहणारे त्यां अवघ्यांची जी पुंजी तीच देशाची संपत्ती असें समजावें ना?

गुरु : होय, परंतु याच प्रकारें देशाचें उत्पन्न समजूं नये. लोकांचे उत्पन्नावरून देशाचे उत्पन्नाची अटकळ काढूं गेल्यास केवळ अपसिद्धांत होईल. कारण कोणेकास दरसाल दाहा हजार रुपयांचें उत्पन्न असलें, त्यांतून दरसाल पांचशें रुपये घरभाड्यास जाऊं लागले तर ते पांचशें रुपये घरधन्यास जरी मिळाले तरी ते त्या दाहा हजारांतून गेले असें समजावें. ते दाहा हजार आणि घरभाड्याचे पांचशें रुपये याप्रमाणें मोजीत गेल्यास देशाचें उत्पन्न किती याचा निर्णय होणार नाहीं.

गोपाळ : देशाचे उत्पन्नाचा ठरावकरितां जसें एक एकाचें उत्पन्न घेऊं नये तसें देशांचे खर्चाचा ठरावकरितां एक एकाचा खर्चंही घेऊं नये काय? कारण दाहा हजारांतून पांचशें रुपयांचा भाड्याचे पोटीं खर्च झाला, तेच रुपये घरधन्याकडे गेले असतां त्यांचा पुनः कशांत तरी खर्च होईल.

गुरु : उत्पन्नाच प्रमाणें खर्चाविषयीं समजूं नये. पैक्याचा खर्च करणें म्हणजे शुद्ध मोबदला करणें आहे. पैका देऊन त्याचेच किंमतीइतकी दुसरी वस्तु घेणें, याचें नांव खर्च करणें. रुपया देऊन

अर्धा फरा दाणें घेणें, अथवा दीड रुपया देऊन धोतर घेणें, यांत असें झालें कीं आपले जवळचे अडीच रुपये गेले, परंतु विचारेंकरून पाहतां कांहींच गेलें नाहीं. एक्या वस्तूच्या ठिकाणीं दुसरी वस्तू झाली इतकें मात्र झालें. पोटास अन्न आणि आंगास वस्त्र मिळालें.

गोपाळ : असें जर आहे, तर मग खर्च केल्यानें लोक गरीब का होतात ?

गुरु : वस्तु विकत घेणें गरिबीस कारण नाहीं. त्यां वस्तूचा खर्च करणें कारण आहे. दाणें व धोत्र विकत घेऊन ठेविल्यानें अडीच रुपये गेले असें नाहीं; ते दाणें पोटास खाल्ले, वस्त्र वापरलें म्हणजे आपले पदरचे अडीच रुपये उणें झाले असें समजावें. भुसारी शेंकडो फरे दाणा खरीद करतो. कापडांचा व्यापारी शेंकडो दिंडीं विकत घेतो, तेणेंकरून तो गरीब होत नाही, कारण त्याकडे त्यां वस्तूचा खर्च होत नाहीं.

कोणी कांहीं वस्तू विकायाकरितां खरीद केल्या म्हणजे तो त्यां वस्तूचा व्यापारी होतो आणि त्या वस्तू त्याची वहिवाटायाची पुंजी होतात. परंतु त्या वस्तू खर्चायाकरितां म्हणजे वापरायाकरितां घेतल्या असल्या म्हणजे व्यापार केला असें होत नाहीं, तर खर्च केला असें समजावें.

गोपाळ : मला आपले बोलण्याचें तात्पर्य समजलें. जो कोणी विकायाकरितां माल खरीद करितो ती त्याची पुंजी. ती वहिवाटली असतां त्यास नफा होतो. जो कोणी माल वापरायाकरितां खरीद करितो, तो त्यांनी वापरला असतां त्यास तोटा होतो, म्हणजे त्या मालाचे मोलाबद्दल जो पैका दिला असतो, तो नाहींसा होतो.

गुरु : होय. एकापासून माल दुसऱ्याकडे जाण्याविषयीं पैका साधन आहे. पैक्याचा अनेक वेळ खर्च झाला तरी तो तसाचा तसाच असतो. माल वापरला म्हणजे नाहींसा होतो.

अवघे लोकांचे संपत्तीवरून देशाचें संपत्तीची जशी अटकळ काढावी, तशीच लोकांचे खर्चावरून देशाचे खर्चाची अटकळ काढावी आणि अमुक देश नांदता आहे, किंवा कसें, असें समजायाकरितां देशांत जो खर्च होतो, तो लाभकारी किती व अलाभकारी किती याचा विचार करावा.

गोपाळ : लाभकारी खर्चानें संपत्ति वाढती, अलाभकारी खर्चानें संपत्ति उणी होती.

बरें, महाराज कोणी एक फार उडाऊ निघाला, त्यानें आपलें अवघें उत्पन्न व पुंजीही उधळून टाकिली, परंतु असा खर्च लाभकारी मजूरांचा संभाळ करायास्तव झाला असला तर असें होईल कीं तो खर्च करणारा गृहस्थ बिच्यारा बुडाला, पण त्यापासून देशाचें कांहीं अनहित झालें नाहीं. असो. माझे मतें कोणी एकानें लाभकारी मजूरांचा संभाळ करून त्यापासून आपल्यास नफा व्हावा अशा बुद्धीने आपली पुंजी वहिवाटीली, अथवा त्यां लाभकारी मजूरांनी केलेले जे सुखकारक पदार्थ ते आपल्या उपभोगाकरितां विकत घ्यावयास आपली पुंजी खर्चीली तरी फळ सारखेंच. जर अलाभकारी मजूरांचा संभाळ करायास पैका खर्चला असला, आणि त्याबद्दल कांहीं सांगायासारिखें हातीं आलें नसलें, तर ती गोष्ट भिन्न आहे. जर तो पैका व्यापारी, कारागीर अशा लोकांत खर्चून चांगलें सुंदर घर सामानाने भरलेलें, डौलदार गाड्या घोडे, सेवेंत अनेक चाकर, मोठमोठ्या मेजवान्या अशी ख्यालीखुशाली करून घेतली असली, तर असें झालें कीं दुसरे अधिक पदार्थ उत्पन्न करण्याकरितां व्यापारी कारागीर लोकांस सोय पडावी म्हणून त्या उधळ्या बावाने आपली पुंजी त्यां लोकांकडे जशी काय सोपूनच दिली.

गुरु : असें झालें असलें तर त्या उधळ्या बावाने कांहीं वाईट केलें नाहीं; त्यानें आपली पुंजी व्यापारी लोकांत खर्चीली म्हणजे आपल्या जवळचा पैका देऊन तितके किंमतीचे नाना प्रकारचे पदार्थ घेतले. ही एक त्याने नवी पुंजी मेळविली, तर तो उधळ्या बावा असे पुंजीची कोणत्या व्यवहारांत वहिवाट करील ?

गोपाळ : आपल्या इच्छा तृप्त करणें, आपल्या इष्टमित्रांस मेजवान्या करणें, गाडी-घोडे वापरणें, उंच वस्त्रें नेसणें, चाकरांही चांगलें शोभिवणें अशा व्यवहारांत त्या पुंजीची वहिवाट होईल.

गुरु : तेव्हां असें झालें कीं व्यापारी इत्यादि लोकांस जो पैका देऊन त्याजपासून नाना प्रकारचे उपभोग्य पदार्थ घेतले, त्या पैक्याचा योग्य खर्च न होतां उपभोग्य पदार्थांचा मेजवान्या डौलदिमाखाखाली फडशा उडाला, म्हणून असी जी पुंजी त्या उधळे बावाने उडविली तीस तो व लोकही आंचवले. सारांश पुंजीचा केवळ उपभोगाकरितां जो खर्च तोच खर्च झाला, दुसरे जिन्नस उत्पन्न करायास पुंजीचा जो खर्च तो ह्मणायास मात्र खर्च झाला.

गोपाळ : लोक पैका खर्चून ख्यालीखुशालीचे जिन्नस जर विकत न घेतील तर त्या कारगिर लोकांनीं त्या जिन्नसांस काय करावें? लोकांत जिन्नसांचा खप पाहून यांत आपल्यास चार पैसे मिळतील अशा आशेने कसबी लोक ते जिन्नस उत्पन्न करितात.

गुरु : नाना प्रकारचे खेळाचे जिन्नस, मिठाया तसेच दुसरे मौजेचे पदार्थ शहरांतील दुकानांत, बहुतकरून यात्रेंत असतात ते व नाचतमाशे, दुर्व्यसनें इत्यादिकांचा लोकांत खप कमी झाल्यास त्यांवर उपजीविका करणारांचें कसबांत कमी होईल खरें, परंतु त्यापासून लोकांचें कांहीं अनहित होणार नाहीं. पुंजीचा खर्च होतो तेव्हांच तिजपासून उत्पन्न होतें. परंतु जे उद्योगी अशांचेठायीं त्या पुंजीचा खर्च झाला पाहिजे. त्यांपासून चांगलें मोलदार उत्पन्न होतें आणि त्याचे योगाने दुसरे जिन्नस घेतां येतात, तेंच मोलदार उत्पन्न कारागीर कसबी अशांत वांटलें जातें. तेणेंकरून त्यांस आपआपले धंदे करायास उमेद येती. मातबर लोक उधळेपणा न करितां जें कांहीं ठेवितात, तेणेंकरून मध्यम स्थितीचे आणि कनिष्ठ स्थितीचे लोकांस सुख होतें.

गोपाळ : परंतु लोक असें म्हणतात कीं जो कोणी मनाचा उदार, हाताचा सुटा असतो, त्याचे दसाळ खर्चानें जरी त्याचें अनहित होतें तरीं त्याचे हातून बहुत्येकांचा संभाळ होतो.

गुरु : असें म्हणणें देशव्यवहारव्यवस्थेंत अगदी उपयोगी नाहीं, केवळ भ्रमात्मक होय. त्या उधळेबावासारिखे ऐशआरामाखालीं लोक संपत्ति उधळूं लागले तर मग मजूरदारांचा कसा बचाव होईल? उद्योग करणारांस धंदा मिळणार नाहीं, त्यामुळें निर्वाह करणें फार कठीण होईल. पोटास अन्न, आंगास वस्त्र, राहयास ठिकाण मिळणार नाहीं. सर्व संपत्तीचा खर्च उडाऊ लोकांकडे होऊ लागला, मेहनत करणारे उपाशीं मरूं लागले, अशा ज्या देशांच्या दशा तेथें असतां असतां संपत्तीचा आणि लोकांचा मरणा नाहींसा होऊन जातो, असें सांगायास न लगे.

गोपाळ : लोक उधळेपणानें खर्च करितात, त्यांविषयीं सरकार कांहीं कायदा करितें तर ख्यालींखुशालींत जो ऐवज ते उधळितात, तो ऐवज कृषिकर्म, शिल्पकर्म इकडे लागून गोरगरिबांस सुख होतें.

गुरु : अमक्यानें अमुक रीतीने अमुक वस्त्र पांघरावें, अमुक भूषणादिकें वापरावीं, असे असे कायदे कित्येक देशीं केले होते, परंतु त्यापासून कांहीं चांगलें निष्पन्न झालें नाहीं. पुंजीचा जसा स्वभावें-करून ओघ चालेल तसा चालू देणें यांतच हिताची गोष्ट. पुंजीची कसी काय वहिवाट करावी हें पुंजीचे धन्याकडेच ठेवावें. ज्याची पुंजी त्यालाच उत्तम रीतीने वहिवाटायाची युक्ति सुचेल.

गोपाळ : ज्याचा पैका पुंजी त्याला जसी त्याविषयीं काळजी, तसी दुसरे कोणास असणार नाहीं. परंतु तो आपल्याच स्वार्थाची युक्ति काढील. गोरगरिबांचें हीत होई अशा रितीने पुंजीची वहिवाट होण्याची युक्ति काढणार नाहीं. सारांश मातबर लोकांनी कांहीं संचय करून संग्रहीं पुंजी करून ठेविली पाहिजे.

गुरु : अरे, संचय करणें त्यासही कांहीं मर्यादा असावी.

गोपाळ : मर्यादा नसावी असें कोण म्हणतो? खर्च न केला तर आपलें वांचणेच होणार नाहीं. परंतु जसा कमी खर्च तसा अधिक संचय असें जेथपर्यंत साधेल तेथपर्यंत करून घ्यावें.

गुरु : हा नेम तर संचयमर्यादेचे फारच बाहेर गेला. या संसारांत जीवाने खावें, प्यावें, सुखसंतोष भोगावा, दुसऱ्यावर दया करावी, आपलें-परावें ओळखावें म्हणून संपत्ति केली आहे, त्यास, अन्नवस्त्रांदिकांची ददात न काढितां चांगला मोकळ्या हाताने खर्च केला असतां त्यास शब्द लावू नये. निरर्थक खर्च करणें यांत जसी मनुष्याची संपत्ति कमी होती, तसीच देशाची संपत्ति कमी होती. ज्या खर्चांपासून कांहीं लाभ होत नाहीं, तो खर्च जरी खर्च करणारास मोठा आनंदकारक असला, तरी तेणेंकरून लोक गरीब होतील. कारण, लोकांचा निर्वाह होण्याचें जें सांठवण त्यातून त्या खर्चानें उणें झालें. एक एक मनुष्यानें केलेला जो संचय तो अवघा मिळून देशाची पुंजी होती. ज्या मनुष्यास जितकें उत्पन्न, तितकें तों अवघेंच खर्चूं लागला, तर काळेंकरून देशाची अवघीच संपत्ति नाहींसी होऊन जिकडे तिकडे दरिद्र विपत्ति दृष्टिस पडूं लागेल. तसेंच जर हरएक मनुष्य अन्नपाण्याशीं गांठ पडायापुरताच खर्च करूं लागला, तरी जिकडे तिकडे दरिद्र विपत्ति दृष्टिस पडूं लागेल. याप्रकारें पहातां खर्चाच्या शेवटच्या दोन मर्यादा दिसतात. एक ददात काढणें म्हणजे कृपणपणानें वागणें आणि एक उधळेपणा करणें. या दोन्ही रिती वाईट आहेत. लोकांत चांगल्या स्थितीनें वागणें, परोपकारादिक करणें हें असे कांहींच कृपणाचे हातून होत नाहीं. उधळेपण करणारा तर गोरगरिबांचा निर्वाह होऊन कामधंदा चालविण्यास साधनभूत जें अन्नवस्त्रांदिकांचें सांठवण, तेंच नाहींसें करून टाकितो. अरे, मनुष्यास इच्छिलेले पदार्थांची वाण केली असतां, समयीं असें घडतें कीं त्यापासून होणार जो उद्योग त्याचाच हिरमोड होतो. बरें, मातबर लोक मजूरांस कामावर कशास ठेवितात ?

गोपाळ : त्यांच्या मजुरीपासून जें काम होतें त्यातून उत्पन्न व्हावें म्हणून.

गुरु : बरें, ते मातबर उत्पन्नास काय करितात ?

गोपाळ : कोणी तें अवघें खर्चितात, कोणी आपली पुंजी वाढवायाकरितां सांचवून ठेवितात.

गुरु : ते पुंजी कशाकरितां वाढवितात ?

गोपाळ : कोणाच्या मनांत असतें कीं लोकांनीं आम्हास मातबर म्हणावें; कोणाच्या मनांत असतें कीं पैका गाटीं झाला म्हणजे चाकरीधंदा नको, स्वतंत्रपणानें राहायास सोय पडेल; कोणाची असी इच्छा असती कीं, द्रव्य मिळालें असतां आपले हातून लोकांचें बरें होईल; पण बहुत्येकांचा असा भर असतो कीं, कुटुंबाचें चांगलें पोषण व्हावें, त्यांस कशाची कमती असूं नये. याप्रमाणें द्रव्याची इच्छा करण्याविषयीं अनेक हेतू आहेत. सारांश संसार चांगल्या प्रकारें चालावा, नाना प्रकारचे उपभोग घडावे, हाच द्रव्य मिळविण्याचा मुख्य हेतु होय.

गुरु : तेव्हां ख्यालीखुशालीचें जिन्नस मनुष्याने वापरूं नये, त्याचें मन ज्या पदार्थांवर धांवेल तो त्यास मिळूं नये असा कायदा केल्यास असें होईल कीं, पुंजीची वृद्धि करण्याचें जे हेतु तेच नाहींसे होतील. पदार्थांचा उपभोग करण्याची जी इच्छा, तीच तृप्त होऊं नये असें झालें असतां कोणी कशास उद्योग करील, आणि पुंजी वाढवील ? पुंजी म्हणजे मजूर लोकांचें अन्नवस्त्रादिकांचें साठवणच वाढविलें असें समजावें.

गोपाळ : चांगलें मिष्टान्न खावें, उंच उंच वस्त्रें नेसावी, अशा सुखभोगाचे खर्चाची मनाई असावी.

गुरु : सुखभोगाचे पदार्थ कोणते आणि प्रपंच्यास अगत्य असणारे पदार्थ कोणते असें पाहूं गेलें असतां निर्णय होणें हें कठिण आहे. गरीब लोकांस रोजमुऱ्याने जे जिन्नस घेतां येतात, ते त्यांचे प्रपंच्यास अगत्यरुप असतात. ज्यानें पूर्वीं जो पदार्थ खालला घेतला नसेल तो त्यास मिळाला म्हणजे तो केवळ अपूर्व वाटतो. तो पदार्थ मातबरास तर नित्याचाच पदार्थ आहे, परंतु यास तर सुखभोगाचा पदार्थ होतो. तेव्हां अमुक प्रकारचा अमुक मानाचा असला म्हणजे तो सुखभोगाचा

पदार्थ असें होत नाही सुखभोगाचा पदार्थ होणें हें उपभोग करणाराचे स्थितीवर आहे. गरीबास जेवायास चांगली भाजी, एकादे पक्वान्न असलें म्हणजे त्यास मिष्टान्न होतें, कारण त्याच्या रोजमुऱ्याप्रमाणें नित्याचे जेवणास भातभाकर असती. श्रीमंतांकडे तर चांगल्या भाज्या, पक्वान्नें नित्याचे जेवणांस असतात, तेव्हां एकास जो सुखभोगाचा पदार्थ तो दुसऱ्यास नित्य वापरायाचा पदार्थ होतो.

गोपाळ : अमुक मौजेचे जिन्नस व अमुक प्रपंच्याचे अगत्याचे जिन्नस असा निर्णय करणें कठीण; त्यापेक्षां अमुक्याने अमुक जिन्नसाचा उपभोग करू नये असी मनाई करू नये. अतिशय खर्च करण्याविषयीं मात्र मनाई किंबहुना दंड असावा.

गुरु : जो कोणी उधळेपणाने खर्च करितो, तो भिकेस मिळतो हाच त्यास दंड समजावा, त्या दंडाचें भय अविचाराने वागणाऱ्यांसही प्राप्त होतें. तेणेंकरून मोठमोठे खर्च करण्याविषयीं त्यास हांव होत नाहीं. खावून घेऊन सुखसमाधान पावावें, प्रपंच चांगला करावा, असा मनुष्याचा स्वभावच आहे. असा स्वभाव जिकडे तिकडे लोकांत सुख होण्याविषयीं आवश्यक आहे. आपल्यास सुखी करून घेण्याची जी जागती वृत्ति मनुष्याच्याठायीं ठेविली आहे, तेणेंकरून या जगाची स्थिती उत्तरोत्तर उत्तम प्रकारची होत चालली आहे. आपला संसार चांगला नांवारूपास आणावा असें ज्या स्त्रियाऱ्याचें लक्षण असतें, तो स्तुतीस योग्य होतो, तो लोकांत कोणे स्थितिचा कां असेना; त्याच्या त्या वृत्तीचा मोड करू नये.

मनुष्याच्या वृत्ति अनेक प्रकारच्या असतात. कोणी थोडकीशी मिळकत करून स्वस्थ बसतो, आपल्या मुलांबाळांस सरासरी करण्याचे कामधंदे शिकवितो, आणि पुढे त्यांस कामी पडावें, म्हणून वर्षाकाठीं चार पैसे सांचवून ठेवितो. कोणाची हांव मोठी असती, तो मोठ्या प्रयत्नानें व आपले बुद्धिबलानें उलींढालीं करून पुंजीचें जितकें उत्पन्न होईल तितकें करून घेतो. त्यांतून संचय करितो, खर्च चांगला डौलानें करितो, खावून घेऊन मौज मारितो, याप्रमाणें आपला व आपल्या कुटुंबाचा स्वपराक्रमानें लौकीक वाढवितो.

गोपाळ : संपत्ति मिळविण्याविषयीं लोक अनेक हेतूनें प्रवृत्त झाले असतात. एक आपलें लग्न व्हावें म्हणून संपत्ति मिळवितो. एक गाडीघोडा मिळावा अथवा एक बाग-बंगला व्हावा म्हणून संपत्तीच्या नादीं लागतो. एक तर आपल्या मुलाबाळांचा चांगला उदय होऊन त्यांची मानमान्यता वाढावी या बुद्धीने संपत्तीचा संग्रह करितो.

गुरु : लोकांच्या अशा वृत्ति असल्या म्हणजे त्यांची उद्योगाकडे व मितव्ययाकडे प्रवृत्ति होती. उद्योग करावा, युक्तीनें खर्च करावा असी एक वेळ सवई लागली म्हणजे ती सुटत नाहीं.

कित्येक लोकांच्या अशा वृत्ति असतात कीं, आमचेसारिखा डामडौलाने वागणारा दुसरा कोणी नाहीं, असी आमची किर्ती व्हावी म्हणून इनामें ज्याहागीरा यांपासून जें उत्पन्न होईल तें साज सरंजाम, घोडीं, पुष्कळ माणसें, हांजी हांजी करणारे, अशांकडे खर्चलें जातें. अशांचे हातून देशाचें कांहीं हित होत नाहीं. रिकामें बसून खाणारीं जीं त्यांच्या पदरचीं मनुष्यें त्यांचा मात्र संभाळ होतो. तीं काढून टाकिलीं आणि जितका खर्च असायाचा तितकाच ठेविला तर उत्पन्नांत कांहीं कमी होणार नाहीं. आहे त्यापेक्षां अधिक होऊं लागेल, आणि शेंकडो मेहनती मनुष्याचें पोट भरूं लागेल, असे पुष्कळ चाकर उगेच ठेवण्याची चाल इंग्लांड देशीं पूर्वीचे सरदार लोकांकडे होती. व हिंदुस्थानांतही पुष्कळ आहे.

कोणाच्या मतें असें आहे, या जगांतील जे अवघे लोक त्यांतून अर्ध्यांचें काम असें असतें कीं, त्यानी बाकीचे जे अर्धे लोक त्यांस कामावर लावावें, अर्थात असें पदार्थ करून ठेवावे कीं, त्यां अर्ध्या लोकांचें त्यां पदार्थांवर मन धाऊन उद्योग करायास हौस यावी. मग ते पदार्थ कसे कां

असेतनां, ते पदार्थ पाहिले असतां त्यांविषयीं इच्छा उत्पन्न होऊन ते मिळविण्याचे उद्योगास लागावें. असें झालें असतां चांगला परिणाम होईल, आणि व्यापारही चांगला चालूं लागेल. चांगलें पागोटें, घड्याळ किंवा तसाच कांहीं अपूर्व पदार्थ दृष्टीस पडला म्हणजे तो मला असावा असी इच्छा उत्पन्न होऊन तो विकत घेण्याचें सामर्थ्य आपले आंगीं यावें म्हणून मनुष्य उद्योग करूं लागतो आणि संचयही करूं लागतो.

गोपाळ : वस्त्रादिकेंकरून आपलें शरीर चांगलें शोभवावें असा मनुष्याचा स्वभावच आहे.

गुरु : अरे, एकटें शरीरच काय, घरदार, तें जेथें असेल ती जागा, इत्यादिही शोभविण्याविषयीं मनुष्यास हौस असती. आपल्याकडे तर फारकरून पाहाण्यांत येत नाहीं, परंतु इंग्लांड देशीं खेड्यापाड्यांत जरी गेलें तरी तेथें गरीब लोकांचीं लहान लहान घरें, चांगलीं नीटनेटकीं दृष्टीस पडतात. अंगणीं, घराजवळची जागा, केवळ स्वच्छ असती. तेथें फुलझाडांच्या चार कोंड्या शाखभाजी लावलेली, असा एक लहानसा बाग, घरांतही चांगलें साफ ठेऊन भिंतीस कांहीं चित्रें इत्यादि पदार्थांनीं थोडक्यांतच टामटूम करून ठेविली असती. त्यां गरिबांस थोडकी प्राप्ति असतां घरदार असें सुशोभित करण्याची इच्छा असती हेंच अधिक.

गोपाळ : कोणी म्हणतात कीं अज्ञानी लोकांस संपत्ति मिळाली असतां तेणेंकरून त्यांचा बिघाड होतो; हें कसें ?

गुरु : कोठें कोठें असें घडतें कीं एक तर मुळीं अज्ञान, लिहिणें, वाचणें चांगली शिक्षा काय तें मुळींच ठाऊक नाहीं, अशांस संपत्ति मिळाली म्हणजे ते उन्मत्त होतात. त्यांचा उद्योगावर भर असत नाहीं. दुर्व्यसनाकडे भर होतो, याप्रमाणें ते बिघडून जातात. ज्यांस चांगली संगत असती, त्यांस थोडका जरी पैका मिळाला, तरी तो उडवूं नये, त्यानें वस्त्रपात्र घ्यावें, घरदार चांगलें करावें असी बुद्धि होती. परंतु असें क्वचित् होतें, अज्ञानी लोकांस संपत्ति मिळाली असतां त्यांचे मूळ स्वभाव पालटून ते चांगले सुधारले असें विरळा.

गोपाळ : अज्ञानी लोकांची तर गोष्ट सोडून द्या, परंतु चांगले शिकलेले ज्ञानी अशांस संपत्ति मिळाली असतां त्यांचाही बिघाड झालासा दिसतो. किती काय खर्च करावा असें त्यांस धोरण रहात नाहीं. कोणी सांगतात कीं रोमन लोकांचें राज्य चाललें होतें तेव्हां कोणेएके स्त्रीचे अंगावर जीं भूषणें होतीं तीं तीन कोटीं रुपयांचीं होतीं. हा केव्हढा अकटोविकट खर्च ? तसेंच इकडे नागपूरकर भोसले यांचा आंगरखा साठ लक्ष रुपयांचा व टिपूसुल्तानाचा पलंग तीन लक्षांचा होता. व हिंगण्यास रोज तीनशे रुपयांची कस्तुरिमय खिचडी लागे.

गुरु : रोमन लोकांचा दुसरा अकटोविकट उधळेपणा सांगतों, तो ऐक. अरे, एक मेजवानी केली होती, तिला तर साहा लक्ष रुपये लागले होते, आणि एक्या पादशाहास दररोज रात्रीस उगीच फराळ करायास साठ हजार रुपयांचा खर्च होत असे. रोमन लोकांचा डामडौल करण्याविषयीं जो उधळेपणा, तो तर अगदीच वाईट. त्यानी चांगला उद्योग करून संपत्ति मिळविली नाहीं, देशचे देश लुटून नागवून संपत्ति आणिली म्हणून मनास येईं तसे ते उधळीत. त्या संपत्तीपासून असें झालें कीं दुसऱ्याचें हरण करावें असाच त्यां लोकांचा स्वभाव झाला, आणि त्यांचे राज्यांतील मुलखांत मालाचें रक्षण होईना. असें झाल्यामुळें उद्योगाचा मोड होऊन गेला. रोमन लोकांची संपत्ति झाली तरी तिचा केवळ कळस होऊन सर्वत्र भरमर झाली होती असें नव्हे, तर एकीकडे धनसंपदा, पराक्रम, एकीकडे गुलामगिरी, लांचारी, कंगाली असें झालें होतें. असो.

नाना सुखांचे उपभोगापासून असें होतें कीं लोकांत उद्योगाची प्रवृत्ति होती, तसाच खर्चही अधिक होऊं लागतो. उधळेपणा न होतां उपभोग होत असला तर खर्च करण्यास चिंता नाही.

त्यापासून लोकांचेंही हित होतें. उधळेपणा होऊन उत्पन्नासुद्धां पुंजीही गडप होऊन जाई असा सुखांचा उपभोग करूं नये; असें होऊं लागल्यास सर्वस्वें अनहित आहे.

देश चांगला नांदता करणें तर पुंजी वाढविली पाहिजे. कोणी म्हणेल कीं, पुंजी वाढविण्याविषयीं कायदा असावा तर तसें होणार नाहीं. मालाचें रक्षण होण्याविषयीं कायदा झाला असला पुरे म्हणजे पुंजी वाढेल. पुंजीची वहिवाट अमुक रितीने करावी, ती अमुक प्रकारची असावी, तिचा अमुकच खर्च व्हावा, अशी कायद्याने ओढाताण केली तर त्यापासून इतकें होईल कीं, लोकांत उद्योग होणें मंद पडेल.

गोपाळ : जो कोणी आपल्या उत्पन्नांतून संचय करून आपली पुंजी वाढवितो, तो मजूरलोकांची पोटगीच वाढवितो, असें समजावें. जो कोणी खर्च करून आपली पुंजीच कमी करितो, तो त्यां लोकांची पोटगीच कमी करितो. वेंचलेली पुंजी पुनः जसीची तसी झाली पाहिजे, तें काम तर मजुरांचे हातून होतें, पोटगी हें तर मजुरांस कामावर ठेवण्याचें साधन होय; तस्मात् कोणी कां असेना, त्याने खर्च आटोपसर ठेवून आपलें जें उत्पन्न असेल त्यांतून संचय करून वर्षाकाठीं आपले पुंजीत कांहीं तरी टाकीत असावें, यांत त्याचें हित आहे, इतकेंच नव्हे तर हें नीतिमार्गें पाहतां त्यास केलेंच पाहिजे.

गुरु : अरे, पुंजींत जें पडणें तें तर जसें उत्पन्न आणि खर्च असेल त्याप्रमाणें पडेल. जसी कृपणता करून दद्‌ात भोगूं नये, तसेंच ढसाळ खर्च करूं नये. उधळमाप करू नये, बेतशीर खर्च असावा. मनांत विचार करावा कीं हा खर्च केलाच पाहिजे, आणि करणें उचित आहे किंवा कसें ? जर बुद्धीस प्रशस्त वाटलें, तर तो खर्च करावा. कोणी थोर संभावित गृहस्थ असून त्याचें कुटुंब मोठें आहे तर त्याकडे खर्चवेंचाची किती जरी व्यवस्था असली तरी वर्षाकांठी जो संचय होणें तो ज्या गृहस्थाकडे तितकेंच उत्पन्न असून कुटुंबाचीं माणसें थोडकीं त्याचे संचयाइतका होणार नाहीं.

उत्पन्न किती कां मोठें असेना, तथापि मनुष्यानें खर्चवेंचाची व्यवस्था सोडूं नये. माझे पदरीं पुष्कळ पैका आहे म्हणून मी व्यवस्था सोडून खर्चवेंच करितों, तर हें त्याचें बोलणें जनांत मान्य होणार. व्यवस्था हा मोठा गुण होय, नीतिविचारेंकरून पाहातां असें आहे कीं सर्वांनीच व्यवस्थेनें वागलें पाहिजे. कोणी संपत्तिमानाकडे चांगला डौलाने खर्च होत असला तर तसा खर्च ठेवण्याचा कांहींतरी हेतु असतो; प्रपंचाची व्यवस्था सोडून उडवाउडव करणें यास कांहींच हेतु दिसत नाहीं. उडवाउडव करणारास जो तोटा होतो तो त्यास जरी तुच्छ वाटला, तरी गोरगरिबांचें उदरपोषण कामधंदा चालायाकरितां उपयोगी पडणारें जें सांठवण त्यांतून त्या तोट्याइतकी कमती झाली असें समजावें.

समाप्त

# ARTH SHASTRA PARIBHASHA

OR

## THE PRINCIPLES OF POLITICAL ECONOMY

FROM THE WORK OF

**JOHN STUART MILL,**

*by*

*Krishna Shastri Chiplonkar,*

Assistant Professor of Vernacular Literature
in the Poona College.

**VOL. I.**

*Lithographed for the Board of Education,*
*at the Press of the Poona College.*

1855

# अर्थशास्त्रपरिभाषा.

## प्रकरण पहिलें.

हा ग्रंथ मिल्साहेबांच्या इंग्रेजी ग्रंथाच्या आधारानें असिस्तंत प्रोफेसर कृष्णशास्त्री चिपळोणकर निसबत पुणे पाठशाळा ह्यांनीं केला, तो

मेहरबान बोर्ड आव् एद्युकेशन ह्यांच्या हुकुमावरून

पुणे पाठशाळेकडील छापखान्यांत छापिला.

छापणार नारो रामचंद्र ठकार सु० छापखाना.

शके १७७७

सन १८५५

## अनुक्रमणिका


भाग.

उपोद्घात.... ... ... ... ... ... ... ... ...

पहिला. धनोत्पत्तीच्या कारणांचा विचार. ... ... ... ... ... ...

दुसरा. संपत्तीचे उत्पत्तीस कारण जो श्रम त्याविषयीं विचार.... ... ...

तिसरा. धनानुत्पादक म्हणजे ज्यापासून धन उत्पन्न होत नाहीं असा जो श्रम त्याविषयीं. ... ... ... ... ... ... ... ... ...

चवथा. भांडवलाविषयीं विचार. ... ... ... ... ... ... ...

पांचवा. भांडवलाविषयीं मूलभूत सिद्धांत. ... ... ... ... ...

साहावा. विनाशी भांडवल व अविनाशी भांडवल ह्यांविषयीं विचार.... ...

सातवा. संपत्त्युत्पादक कारणांचे ठायीं न्यूनाधिक उत्पादकत्व आणणाऱ्या गोष्टींविषयीं. ... ... ... ... ... ... ... ...

आठवा. श्रमसंयोग म्हणजे अनेकांनीं मिळून काम करणें ह्या विषयीं. ... ...

नववा. जिन्नस उत्पन्न करण्याचे लहान कारखाने व मोठे कारखाने ह्यांविषयीं.

दाहवा. श्रमवृद्धि ज्या नियमांनीं होते त्या नियमांविषयीं. ... ... ...

अकरावा. भांडवलाची वृद्धि ज्या नियमानें होते त्याचा विचार. ... ... ...

बारावा. जमिनीचें उत्पन्न ज्या नियमानें वाढतें त्या नियमाविषयीं. ... ...

तेरावा. मागल्या तीन भागांत सांगितलेल्या नियमांचीं कार्यें. ... ... ...

# प्रस्तावना.

व्यावहारिक गोष्टींच्या उपपत्तीचें लोकांस यथार्थ ज्ञान असणें फारच आवश्यक आहे. तसल्या गोष्टींविषयीं गैरसमजुती असल्या म्हणजे त्यांपासून व्यवहारांत अनेक प्रकारचे अनर्थ होतात. ह्यास उदाहरण,—वैद्यास जर रोगांच्या स्वरूपांचें यथार्थ ज्ञान नसलें, किंवा औषधांच्या गुणांविषयीं भलत्याच समजुती असल्या तर त्या अज्ञानापासून व गैरसमजुतींपासून केवढाले अनर्थ होतात बरें! शिल्प्यास धातू, लांकूड, धोंडे वगैरे ज्या द्रव्यांचीं यंत्रें, इमारती वगैरे होतात, त्यांच्या गुणांविषयीं भ्रांति असल्यापासून किती तोटा होतो, हेंहीं सर्वांच्या लक्ष्यांत सहज येतें; व ह्या प्रकारचीं अनेक उदाहरणें दाखवतां येतील.

आतां, वर सांगितलेली गोष्ट जर खरी आहे—म्हणजे व्यवहारांतल्या गोष्टींच्या यथार्थ उपपत्ति समजणें जर आवश्यक आहे,—तर अर्थशास्त्राचा अभ्यास फारच आवश्यक आहे असें मानलें पाहिजे. कारण, अर्थशास्त्रांत ज्या गोष्टींचें निरूपण केलें आहे, त्या गोष्टी नेहमींच्या व्यवहारांतल्या आहेत, व त्या गोष्टींच्या भ्रांतिपासून मोठमोठे अनर्थ होण्याचा, व त्यांच्या यथार्थ ज्ञानापासून मोठें कल्याण होण्याचा संभव आहे. देशांतील संपत्तीचें स्वरूप, तिचीं कार्यें, तिचीं प्रधान व गौण कारणें, तिच्या मर्यादेचीं कारणें, देशांतील सरकाराशीं तिचा संबंध, परदेशच्या व्यापाराशीं तिचा संबंध, तिचा क्षय ज्या कारणांनीं होतो तीं कारणें, इत्यादि अनेक विषयांचें प्रतिपादन ह्या शास्त्रांत आहे; व ह्या विषयांचें यथार्थ ज्ञान होणें लोकांस किती आवश्यक आहे, हें ह्या शास्त्रांत त्या विषयांविषयीं जे सिद्धांत ठरवले आहेत ते, व लोकांत ह्या विषयांविषयीं ज्या समजुती आहेत त्या, ह्यांची तुलना करून पाहिलें असतां, लक्ष्यांत सहज येईल.

ह्या पुढील ग्रंथ, इंग्लंडांत मिल्नामें महाप्रसिद्ध ग्रंथकार आहे, त्याच्या ग्रंथाच्या आधारानें लिहिला आहे. आतां मूलग्रंथांत कितीएक असे विचार आहेत, कीं ते केवळ युरोप खंडास लागू आहेत, व ते इकडेस लौकर समजावयाचे नाहींत, व ते समजून तादृश उपयोगही नाहीं, असें प्रकृत ग्रंथ लिहिणाऱ्यास वाटलें, म्हणून ते विचार त्यानें ह्या ग्रंथांत घेतले नाहींत. तसेंच, कांहीं कांहीं सिद्धांतांचें विवरण करण्याच्या प्रसंगीं मुळच्या ग्रंथांत इंग्लंडच्याच संबंधाचीं उदाहरणें होतीं, तीं बदलून मराठी वाचणाऱ्यांस सहज समजण्याजोगीं इकडलीं उदाहरणें योजलीं आहेत, व ह्याच जातीचा थोडाबहुत फेरफार कोठें कोठें केला आहे. प्रकृत ग्रंथ लिहिणारांस ह्या देशांतील व्यापाराची, शेतकीची, व राजव्यवस्थेची, विशेष तपशीलवार माहिती असती, तर ह्या ग्रंथाच्या ठायीं व्यावहारिक उपयोगिता विशेष येती, हें ग्रंथ करणारा संतोषानें कबूल करतो. ह्या प्रकारें व्यवहारसंबंधानें ह्या ग्रंथास कांहीं न्यूनता असली, तरी शास्त्रांतील मूल विषयांच्या प्रतिपादनाविषयीं तादृश न्यूनता ह्या ग्रंथांत आढळणार नाहीं, अशी प्रकृत ग्रंथकर्त्यांची समजूत आहे; आतां ही समजूत बरोबर आहे किंवा नाहीं, ह्याचा निर्णय करणें सुज्ञ वाचणारांकडे आहे.

महाराष्ट्र भाषेंत ह्या जातीच्या शास्त्रीय विषयांवर ग्रंथ फारच थोडे आहेत, व शास्त्रीय रीतीनें प्रकृत विषयासारख्या विषयांवर विचार करण्याचा प्रघातही लोकांत नाहीं, ह्यास्तव ह्या ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं कठीण कठीण संस्कृत शब्दांचा प्रयोग करणें ग्रंथकारास भाग पडलें. तर ह्या अनिवारणीय

कारणानें प्रकृत ग्रंथास कांहीं ठिकाणीं दुर्बोधता आली असेल, तीविषयीं सुज्ञ वाचणारे त्यास दोष लावणार नाहींत, अशी आशा आहे.

वाचणारांच्या हातीं जो ग्रंथ आहे, हा संपूर्ण ग्रंथ नव्हे; तर ग्रंथकर्त्यानें अर्थशास्त्राविषयीं जो ग्रंथ करण्याचें योजलें आहे, त्यांतील एक प्रकरण आहे. बाकीचीं प्रकरणें लौकरच प्रसिद्ध करावीं अशी त्याची इच्छा आहे; परंतु मनुष्याचें काम केवळ इच्छा धरण्याचें आहे; ती सिद्धीस नेणें हें त्याच्या हातीं नाहीं; तें केवळ परमेश्वराच्या स्वाधीन आहे.

# अर्थशास्त्रपरिभाषा.

## उपोद्घात

अर्थशास्त्राचा विषय धन होय. ह्या शास्त्रांत धनाची उत्पत्ति व वांटणी हीं ज्या नियमांनीं होतात, त्या नियमांचें विवरण केलें आहे.

लोकांत धन शब्दाचा जो अर्थ प्रसिद्ध आहे तो व अर्थशास्त्रांतला धन शब्दाचा अर्थ हे भिन्न आहेत, म्हणून अर्थशास्त्रांतला धन शब्दाचा अर्थ मूलारंभीं विविक्त करून सांगितला आहे.—

लोकांत धन शब्द केवळ पैक्यासच लावतात खरा, परंतु केवळ संज्ञाशब्दासारखा लावीत नाहींत, तर ते धन हें सुखास साधन आहे असें समजून लावतात, परंतु धन शब्देंकरून सुखसाधन असा अर्थ समजून तो शब्द द्रव्याचे ठायींच योजणें हें नीट नाहीं. सुख उत्पन्न होण्यास कारण द्रव्याखेरीज दुसरे असंख्य पदार्थ आहेत व त्या सर्वांस धन शब्द लावावा हें योग्य आहे. आता धन शब्दानें लोक केवळ द्रव्यच समजतात, ह्याचें प्रमाण हेंच पाहावें, कीं सांप्रतकाळीं कोणीं कोणास विचारलें कीं, अहो, आपला हा हिंदुस्थान देश भिकारी कां झाला? ह्या लोकांची हल्लीं हलाखी कां? तर ह्या प्रश्नावर लहानमोठे असें समाधान करतात, कीं, अहो, ह्या देशाची हलाखी कां झाली म्हणून काय विचारतां? तिचें कारण इतकें स्पष्ट असतां तुमच्या मनांत येत नाहीं?–ह्या देशांतील सर्व पैका इंग्रज विलायतेस घेऊन जातात, हें आमच्या विपत्तीचें कारण. तसेंच, कोणीं कोणास विचारलें, कीं पूर्वीपेक्षां सांप्रत धान्य वगैरे स्वस्त आहे, व पूर्वीप्रमाणें हल्ली दंगाधोपा नाहीं व दुष्काळही पडत नाहींत, असें असतां, तुम्ही पूर्वीच्या काळास आतांच्यापेक्षा सुखी म्हणतां, ह्याचें कारण काय? तर लोक असें उत्तर करतात, कीं पूर्वी धान्य वगैरे आतांच्यापेक्षां महाग होतें खरें, परंतु तेव्हां पैसा पुष्कळ होता. आतां पैसा कमी झाला, ह्यामुळें आमची हलाखी आहे. ह्यावरून ते पैसाच सुखाचें साधन असें समजतात, हें सिद्ध होतें.

पैकाच संपत्ति अशी लोकांची समजूत झाल्यापासून, राज्यनीतींत व नीतींत, लोकांच्या भलभलत्याच समजुती पडून गेल्या होत्या. व त्या समजुती कितीएक लोकांस सांप्रतकाळींही खऱ्या वाटताहेत. स्वदेशांतून परदेशीं पैसा जाऊं नये, व परदेशांतून स्वदेशीं जितका पैसा येईल, तितका आणावा, हें धोरण धरून पूर्वीचे मुत्सद्दी लोक, कायदे करणें ते करीत. निरनिराळीं मनुष्यें, किंवा निरनिराळे देश, परस्परांशीं व्यापारादि करून, जें धनार्जन करतात, तें आपण मिळवलेल्या संपत्तीच्या मानानें, दुसऱ्या मनुष्यास, किंवा देशास भिकारी केल्यावांचून, ह्यांच्या हातून होत नाहीं असें प्राचीन लोक समजत. त्यांस असें वाटे कीं, जो आपणास सधन करतो, तो त्याच उपायांनीं परंपरेनें लोकांस दरिद्री व दरिद्रद्वारा दुःखी, करतो असें आहे; ह्यास्तव, आपणास लोकहितकर्ता असें म्हणवणाऱ्या पुरुषानें व्यापारादि कदापि करूं नये, परंतु या सर्व समजुती भ्रांतिमूलक होत हें आतां लौकरच वाचणाऱ्यांस समजून येईल.

आतां कोणी असें म्हणेल, कीं द्रव्येण सर्वे वशाः, या न्यायानें देशांत द्रव्य असलें, म्हणजे त्याच्या पोटीं सर्व गोष्टी येतातच, म्हणून आम्ही द्रव्यासच धन म्हणतों; तर त्यानें असें मनांत आणावें

कीं पैसा दिला म्हणजे जी पाहिजे ती गोष्ट प्राप्त होते, ह्यास्तव, आपणाजवळ पैसा जसजसा अधिक होत जाईल, तसतसें आपणांस उपभोग्य पदार्थ मिळवण्याचें अधिक सामर्थ्य येईल; ही गोष्ट, केवळ एक मनुष्यास लक्षून पाहिली असतां, खरी आहे; परंतु सर्व देशाचे अनुरोधानें पाहिली असतां, खरी नाहीं. एकच मनुष्यापाशीं अधिक अधिक पैसा होत गेला; तर त्याचें, उपभोग्य वस्तू घेण्याचें, सामर्थ्य वाढेल खरें; परंतु देशांतील सर्व मनुष्यांजवळ जर पैसा वाढत गेला तर पैशाचा अधिक पुरावा होऊन, त्याची किंमत उतरून, उपभोग्य पदार्थ घेण्याचें कोणाचेंही सामर्थ्य वाढावयाचें नाहीं. पैसे, रुपये, मोहरा, वगैरे हीं नाणीं, सर्वत्र चालणाऱ्या अशा केवळ चिठ्या होत, आणि सगळ्या देशांत पैशाची वृद्धि करणें, म्हणजे मोठमोठ्या* कागदांवर चिठ्या लिहिणें असेंच होय. ह्यावरून स्पष्ट कळतें, कीं सर्व देशांत पैसा जास्त किंवा कमी झाला असतां, त्या पैशानेंच स्वतः देशाचा उत्कर्ष किंवा अपकर्ष कांहींच व्हावयाचा नाहीं. ह्या वरच्या विचारावरून दुसरी अशी एक गोष्ट कळते, कीं पैसाच काय तें धन अशी भ्रांति पडल्यामुळें जो तोटा झाला, तो एकाचाच झाला नाहीं, तर सर्वांचा झाला. तसेंच एकास लक्षून अत्यंत महत्त्वाची जी गोष्ट असते, ती सर्व देशाच्या संबंधानें पाहिली असतां, अत्यंत क्षुल्लक असते, असेंही ह्याच विचारावरून कळतें.

धन जर स्वतः सुखप्राप्तीस, किंवा दुःखनिवृत्तीस, कारण असतें तर मग देशांत झालेल्या धनवृद्धीच्या मानानें, तेथें सुखवृद्धि, किंवा दुःखनिवृत्ति झाली असती; परंतु धनानें स्वतः म्हणून कोणत्याही इंद्रियाची तृप्ति होत नाहीं; तें जें इंद्रियतृप्तीस कारण होतें तें सुखदायक इतर पदार्थसंपादन-द्वारा होतें. ह्यास्तव धनाच्या वृद्धीनें सुखवृद्धि होत नाहीं. दोन देशांच्या मध्यें व्यापार चालतो व तेणेंकरून व्यापारी लोक पैसा मिळवतात, तो पैसा, कोणत्या तरी एका देशास भिकारी करून मिळवतात, असें पुष्कळांस वाटतें, म्हणून वर सांगितलें आहे. तर तें त्यांचें वाटणें भ्रांतिमूलक आहे, ह्याविषयीं थोडेंसें सांगतों. व्यापारी लोक जो नफा मिळवतात, तो ते ज्यांशीं व्यापार करतात त्यांस बुडवून मिळवीत नाहींत, तर नफा म्हणून मिळालेलें धन, ते नवें उत्पन्न करतात. तें अशा रीतीनें, कीं जो श्रम व जें भांडवल, पूर्वी ज्या उद्योगांत लागलें असतें, तोच श्रम व तेंच भांडवल, व्यापाराच्या योगानें त्या उद्योगांतून निघून अधिक नफ्याच्या उद्योगांत लागतें. सारांश, ज्या सृष्ट पदार्थांस व ज्या श्रमास जो माल उत्पन्न करण्यास अत्यंत सुलभता असते, तोच माल उत्पन्न करण्याविषयीं त्या सृष्टपदार्थांची, व श्रमाची योजना व्यापाऱ्याच्या योगानें होते. आतां एवढ्याच निरूपणानें अपरिचित वाचणाऱ्यांची समजूत व्हावयाची नाहीं, हें आम्हास समजतें, परंतु प्रकृतस्थलीं ह्या विषयाचें विशेष निरूपण करतां येत नाहीं; पुढें योग्य स्थलीं ह्या व्यापाररूप विषयाचें सविस्तर विवेचन करूं, त्याप्रसंगीं हा विषय वाचणाऱ्यांचे ध्यानांत पूर्णपणें येईल.

वरील विचारांवरून असें उघड सिद्ध होतें, कीं केवळ द्रव्यास धन अथवा संपत्ति म्हणणें अयुक्तिक आहे. तस्मात् जो जो पदार्थ सुखप्राप्तीस, किंवा दुःखनिवृत्तीस साक्षात् किंवा परंपरया, साधन आहे, त्यास धन म्हणावें. परंतु ह्या शास्त्रांत धनशब्दाचा, सुखप्राप्तीस किंवा दुःखनिवृत्तीस साधन असाही अर्थ घ्यावयाचा नाहीं, कां कीं तें लक्षण हवा, तेज, पाऊस, इत्यादि पदार्थांवरही येतें. परंतु ते पदार्थ ह्या शास्त्रांत धन शब्दानें ग्राह्य नाहींत. कां कीं, ह्या शास्त्रांत मनुष्यांचे हातून ज्या नियमांनीं संपत्ति उत्पन्न होते व ती विभागली जाते त्या नियमांचें निरूपण केलें आहे; आणि हवा, तेज, वा पाऊस, ह्यांची मुख्य, किंवा गौण, उत्पत्ति मनुष्यें करीत नाहींत व त्यांस ती करतां येत नाहीं; म्हणून

* मोठ्या कागदांवर चिठ्या लिहिणें जसें व्यर्थ तसे इतर देशाशीं व्यापार नसतां नाणीं वाढणें हें सर्व देशाच्या अनुरोधानें पाहिलें असतां व्यर्थ होय

ह्या शास्त्रांत धन शब्देंकरून, विनिमयार्ह (म्हणजे ज्याचे क्रयविक्रय होतात असा) पदार्थ, इतका अर्थ घ्यावा; म्हणजे हवा, पाणी, इत्यादिकांचें निवारण होऊन, विवक्षितार्थाचा संग्रह होतो.

ह्याप्रमाणें ह्या शास्त्रांतील विषयाचें स्वरूप सांगितलें. आतां ह्या शास्त्राचा अभ्यास करून, व ह्याची माहिती करून घेऊन जें फळ होतें, त्याचें निरूपण करतों :—

प्राचीन काळच्या बहुतेक ग्रंथकारांचे असे लेख आहेत, कीं संपत्ति ही जगांत मोठ्या अनर्थास कारण आहे. कोणी असें लिहितात कीं, धनाच्या लोभानें मनुष्यें अनेक प्रकारचीं पातकें करतात–धनाकरितां मुलांनीं आईबापांस दुःख दिलें आहे; भावांनीं भावांस जिवें मारलें आहे; धन मित्रत्वाचा नाश करतें; तेव्हां ह्या प्रकारच्या अनेकविध अनर्थास कारण असें जें धन त्याच्या प्राप्तीकडे लक्ष्य देणें शत्यांस उचित नाहीं; अशी मोठमोठ्या ग्रंथकारांनीं धनाची निंदा केली आहे. परंतु वास्तविक पाहातां, असे अनर्थ होतात, म्हणून धन उत्पन्न करूं नये, असा उपदेश करणें, हें, अजीर्ण होऊन पुष्कळ लोक मेले, व पुष्कळ लोक, घरांस आग लागून त्यांत जळाले, म्हणून शाहाण्यानें जेऊं नये, व घरांत राहूं नये, असा उपदेश करण्यासारखें होय. एकाद्या राजानें गांवांत चोऱ्या होतात म्हणून सर्वांनीं भिकारी राहावें, असा जर कायदा केला, तर त्यास विचारी पुरुष काय म्हणतील ? वेडा म्हणणार नाहींत काय ? तर तत्त्वांश पाहातां, त्या वेड्या राजाचा कायदा व वर सांगितलेल्या ग्रंथकारांचा धनाचा तिरस्कार करण्याविषयीं लोकांस उपदेश, ह्या दोन गोष्टी अगदीं सारख्या आहेत. आतां मोठे विचारी, व तत्त्वदर्शी अशा पुरुषांस धनाविषयीं अशी भ्रांति कशी पडली ? ह्या आपणास मोठा चमत्कार वाटतो खरा, परंतु विचार करून पाहिलें असतां, त्यांच्या भ्रांतीचें कारण हें दिसतें कीं त्यांनी धनाचा एकांशीं विचार केला; सर्वांशीं विचार केला नाहीं; म्हणजे जगास धनापासून जो तोटा झाला तिकडेच त्यांनीं लक्ष्य दिलें; परंतु त्यापासून झालेल्या नफ्याकडे त्यांचें लक्ष्य पुरलें नाहीं.

आतां हे ग्रंथकार धनाचा त्याग करावा, म्हणून जें सांगतात, तें धनापासून जर केवळ अनर्थच होते, तर सयुक्तिक होतें, परंतु ह्या जगास धनापासून केवढा नफा झाला आहे तो पाहा ! अन्नवस्त्ररूप धन आहे, म्हणून आपणां सर्वांचें जीवन होतें; गृहरूप धन आहे, म्हणून थंडी, वारा, पाऊस, उष्ण, इत्यादिकांपासून आपला बचाव होतो. सारांश, इहलोकीं मनुष्यास ज्या ज्या पदार्थांनीं सुखप्राप्ति, अथवा दुःखनिवारण, होतें ते सर्व पदार्थ धनरूप आहेत. तसेंच लोकांत ज्या नानाप्रकारच्या विद्या, शास्त्रें, कला, कौशल्य, हीं झालीं आहेत, तीं तरी धनाच्याच आश्रयानें झालीं आहेत. पाहा, खाण्यापिण्याची जर तजवीज नसती, तर लोकांचें मन विद्यादिकांकडे लागतें काय ? कदापि लागलें नसतें. जे लोक सतत भिकारी असतात, म्हणजे ज्यांस धनाची कमताई असते, त्यांस विद्यादिकांची वार्ता देखील नसते; ते पराकाष्ठेचे अज्ञानी असतात. धर्म व नीति हीं वाढावयास देखील धन हें मोठें साधन आहे. लोकांत म्हणही आहे कीं, "आधीं पोटोबा मग विठोबा." तात्पर्य हें, कीं कोणताही एकादा मोठा उद्देश सिद्धीस जाणें म्हटलें, म्हणजे तो धनवंताच्या हातून जातो; दरिद्र्याच्या हातून जात नाहीं; म्हटलें आहे कीं—

"उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः"

आतां ह्यावर कोणी अशी शंका करील, कीं जो पुरुष चतुर, गुणी आहे, तो भिकारी असतांही, आपले हेतु सिद्धीस नेतो, त्याच्याजवळ धन कोठें असतें ? तर त्यावर असें उत्तर आहे, कीं तसल्या पुरुषाजवळ स्वतः जरी धन नसलें, तरी तो आपल्या अकलेच्या बळानें सधनास वश करून घेऊन, त्याच्या हातून आपलें काम करून घेतो; एतावता कामास धन पाहिजेच.

कोणाची शंका अशी आहे, कीं उपजीविकेस धनच कशास पाहिजे ? रानांत फळें, मुळें,

पाणीं हीं फुकटचीं आहेत, त्यांवर उपजीविका केली, तर होईल. परंतु हें म्हणणें, कोठपर्यंत बरें दिसतें ? कीं सर्व त्या कंदमूलांकडे जात नाहींत तोंपर्यंत. जर सर्व तिकडे गेले, तर कंदमूलें मिळेनातशीं होतील, ह्यांत संशय नाहीं. असो. सर्व विचारांतील सारांश इतकाच, कीं ह्याप्रमाणें सर्वांशीं इहलोकच्या व कांहीं अंशीं परलोकच्या, सौख्यास कारणीभुत जें धन, तत्प्रतिपादक शास्त्राचा विचार करून त्यांतील मुख्य सिद्धांतांचें ज्ञान करून घेणें हे सर्वांत थोडेंबहुत आवश्यक आहे.

# प्रकरण पहिलें

# धनाची उत्पत्ति

## भाग पहिला

## धनोत्पत्तीच्या कारणांचा विचार.

धनोत्पत्तीचीं मुख्य कारणें दोन आहेत. पहिलें, श्रम; दुसरें, सृष्टपदार्थ, व तद्गत धर्म, वर जें विनिमयार्हत्वरूप धनाचें लक्षण सांगितलें, तें ज्या पदार्थांचे ठायीं आहे,—म्हणजे जो जो पदार्थ देऊन दुसरा घेतां येतो—त्या त्या पदार्थांस, श्रमादि दोन कारणें लागलीं आहेत. वनांत आपोआप उगवलेल्या, व वाढलेल्या झाडांची फळें, समुद्रांतील वगैरे मासे, व जंगलांतील हरिणादि सावजें, हे पदार्थ धन असतांही ह्यांस उत्पन्न करावयास श्रम लागत नाहीं, असें कोणी म्हणेल; तर ह्यावर असें उत्तर आहे कीं, ह्या पदार्थांच्या उत्पत्तीस जरी मनुष्याचा श्रम लागत नाहीं; तरी त्यांजवर धनत्व येण्यास कारण, जें त्यांचें संपादन, तें श्रमावांचून होत नाहीं; ह्या करितां तसल्याही धनास श्रम कारण आहे असें सिद्ध होतें. धनाची उत्पत्ति म्हणून जें वर लिहिलें आहे, तेथें धनोत्पत्ति शब्दानें धनाची अपूर्व सत्ता करणें, असा अर्थ घ्यावयाचा नाहीं; तर त्याचे ठायीं कांहीं, स्पष्ट, नवा आकार, किंवा नवा रस, इत्यादि नवा धर्म आणणें, असा अर्थ समजावा. ह्यास उदाहरण सांगतों. आपण मातीचें चित्र नवें उत्पन्न करितों. येथें आपण चित्रास अपूर्व सत्ता आणीत नाहीं, तर मातीस विवक्षित, नवा आकार देतों. ह्याप्रमाणेंच धान्यादिकांची उत्पत्ति समजावी. त्या स्थलींही आपण पृथ्व्यादिकांच्या परमाणूंस कारण विशेषयुक्त करून, गुणविशेषयुक्त करतों; आणि गुणविशेषयुक्त जे परमाणु, त्यांचेंच नांव धान्य. असा उत्पत्ति शब्दाचा अर्थ आहे म्हणून पदार्थांवर आकारादिविशेष उत्पन्न करणारे जे शेतकरी, सुतार, साळी, वगैरे ते सर्व जसे संपत्त्युत्पादक, तसेंच धनाचे ठायीं स्थानविशेषस्थितत्व आणणारे जे व्यापारी, गाडेवाले, खलाशी इत्यादि हेही संपत्त्युत्पादक होत असें सिद्ध होतें.

सृष्टपदार्थ, धनोत्पत्तीस कारण आहेत; ह्याविषयीं तर कोणास संशय नाहींच. मनुष्य जो जो पदार्थ उत्पन्न करितें, तो तो कांहींतरी द्रव्याचा करितें; हें तर सर्वांस माहीतच आहे. परंतु ह्या स्थलीं लोकांस भ्रांति इतकीच आहे, कीं सृष्टपदार्थ धनोत्पत्तीस उपयोगीं पडतात, हे केवळ प्रकृतिरूपानें पडतात; म्हणून मनुष्यास व्यापार चालविण्यास ते पात्रभूत मात्र आहेत, ह्याखेरीज त्यांचा दुसरा उपयोग नाहीं, कारण ते स्वतः अगदीं निर्व्यापार आहेत. परंतु विचार करून पाहिलें असतां; सृष्टपदार्थ सव्यापार आहेत, असें दिसतें; व सांप्रतकाळीं पूर्णावस्थेस आलेल्या ज्या पदार्थविज्ञानादि विद्या, ह्यांच्या आधारानें ही गोष्ट सिद्ध होते. पदार्थविज्ञानवेत्ते असें सिद्ध करून दाखवतात, कीं सर्व सृष्ट मूर्त पदार्थांचे ठायीं गुरुत्वाकर्षण, रसायनाकर्षण, केशाकर्षण, इत्यादि अनेक सांसिद्धिक धर्म आहेत. धोंडा आकाशांत फेंकला असतां पृथ्वी त्यास आपणाकडे ओढते, व लोहचुंबक लोखंडास आपणाकडे

ओढतो; इत्यादि अनुभवसिद्ध गोष्टींवरून, मूर्तद्रव्यरूप पदार्थ निर्व्यापार आहेत, हें मत केवळ भ्रांतिमूलक आहे, असें सिद्ध होतें.

ह्या वरील विचारावरून असें समजावयाचें, कीं धनाच्या उत्पत्तीस जें सृष्टपदार्थांस कारणत्व आहे, तें केवळ प्रकृतिरूपत्वेंकरूनच नाहीं, तर ते सृष्टपदार्थ धनोत्पत्तीस निमित्तकारणेंहीं होतात, म्हणजे सृष्टपदार्थांचे व्यापारही धनोत्पत्तीस उपयोगीं पडतात. पाहा, पाणचक्की, पवनचक्की, वाफेचीं यंत्रें, घड्याळें, इत्यादि उदाहरणांत पाणी, वायु, वाफ, कमान, सृष्टपदार्थ आपल्या आंगच्या स्वतःसिद्ध व्यापारद्वारा धनोत्पत्तीस कारण होतात, आणि मनुष्याचे श्रमानें जें काम व्हावयाचें तें हे करतात.

ह्या वरील उदाहरणावरून कोणास असें वाटेल, कीं कांहीं ठिकाणीं मनुष्याच्या श्रमानें व्हावयाचें काम सृष्टपदार्थगत व्यापार करतात, येथें मात्र ते, धनोत्पत्तीस निमित्तकारण होतात, एरवीं होत नाहींत. परंतु असें वाटूं देऊं नये, कां कीं, त्यांचे व्यापार सर्वत्र कारण आहेत, त्यांवांचून धनशब्दवाच्य कोणताही पदार्थ उत्पन्न होत नाहीं. भेद इतकाच, कीं वर सांगितलेल्या उदाहरणांत त्यांचें कारणत्व साधारण मनुष्याचेही मनांत यावयाजोगें स्पष्ट आहे, आणि इतर स्थळीं तें तसें स्पष्ट नाहीं, परंतु स्पष्ट नाहीं म्हणून मुळींच नाहीं, असें समजूं नये. मातीचें मडकें कुंभार करतो येथें मातीच्या परमाणूंच्या आंगीं जें स्नेहाकर्षण आहे, तें स्नेहाकर्षण, मडकें होण्यास कारण आहे. तसेंच, मनुष्य झाडें तोडतो; परंतु तोडलेलीं लांकडें खालीं पडण्यास पृथिवीच्या आंगचा जो गुरुत्वाकर्षणव्यापार तो कारण आहे; ह्याचप्रमाणें सर्वत्र समजावें. सारांश; कोणत्याही पदार्थाच्या उत्पत्तींत, मनुष्य आपल्या श्रमानें इतकेंच करतो, कीं तो विवक्षित उद्देश सिद्ध होईसा पदार्थांचा संयोग करतो; आणि तो संयोग झाला, म्हणजे पदार्थांच्या व्यापारानें विवक्षित कार्य होतें. आचारी पदार्थ भांड्यांत घालून विस्तवावर ठेवतो, आणि पुढें ते पदार्थ शिजणें व त्यांच्या ठायीं रसविशेष उत्पन्न होणें तें सर्व अग्नीच्या व त्या पदार्थांच्या आंगच्या रसायनव्यापारांनीं होतें. शेतांत शेतकरी बीं पेरतो, परंतु त्या बीजाचा अंकुर होणें वगैरे सर्व गोष्टी, जमीन, बीज, उष्णता, पाणी, वगैरे ह्यांच्या आंगच्या व्यापारांनीं होतात. ह्याप्रमाणें मनुष्याच्या श्रमाचें साक्षात्फल पाहिलें असतां, पदार्थ विवक्षित ठिकाणीं ठेवणें, त्यांचे ठायीं गति उत्पन्न करणें, पूर्वीची गति असल्यास ती नाहींशी करणें, इतकेंच होय; ह्यांखेरीज, मनुष्याच्या हातीं कांहीं नाहीं. पण एवढ्याच शक्तीचा, पाहा, केवढा प्रभाव आहे ! ही शक्ति वा ज्ञानशक्ति, ह्या दोहींच्या योगानें, मनुष्य सर्व सृष्टीचा राजा होऊन, तिजवर अंमल चालवीत आहे; जो अंमल पुढें वाढत वाढत किती वाढेल ह्याची अटकळ देखील करतां येत नाहीं. ह्या शक्तींच्या योगानें मनुष्य कांहीं स्थळीं, सृष्टपदार्थांचे ठायीं जो व्यापार असतो, त्या व्यापारापासून आपलें काम करून घेतो, व कधीं कधीं नवा व्यापार उत्पन्न करतो. गलबतांचीं अवजारें, पवनचक्की, इत्यादि कांहीं स्थळीं, चातुर्यानें योजना करून वायूच्या आंगच्या व्यापारापासून आपले इष्ट उद्देश साधून घेतो व वाफेचीं यंत्रें वगैरे ह्या स्थलीं विस्तव, सर्पण, पाणी, वगैरे पदार्थांचा विशेष रीतीनें संयोग करतो, आणि तेणेंकरून पाण्याचे ठिकाणीं नवाच व्यापार उत्पन्न करतो.

तस्मात्, ह्या जगात मनुष्यश्रमाचें जें काय कार्य, तें पदार्थांची विशेष रचना करणें, त्यांस गति देणें, व कांहीं स्थळीं त्यांच्या सिद्धगतीचा प्रतिबंध करणें, हेंच होय. पुढील सर्व कार्य त्या त्या पदार्थांच्या आंगच्या व्यापारांनीं होतें. आतां पदार्थांची रचना वगैरे करण्याचीं कामें मनुष्यानें आपल्या श्रमानेंच केलीं पाहिजेत असें नाहीं. तीं कामें तो कांहीं स्थळीं पशूंच्या योगानें व अग्नि, जल, वायु, इत्यादि अचेतन पदार्थांच्या योगानेंही करतो.

धनाच्या उत्पत्तींत श्रमापासून जें वास्तविक कार्य होतें त्याचें वर बरेंच विवेचन केलें; त्यावरून आतां कोणी लोक पुष्कळ कष्ट करीत असतांही, त्यांस थोडें फळ प्राप्त होतें, व कोणी थोडा

श्रम करीत असतां, त्यांस पुष्कळ फळ प्राप्त होतें; असा भेद कां असावा? जर श्रम धनोपत्तीस कारण आहे, तर जे फार श्रम करतात, त्यांस फलोत्पत्तिही फार असावी; ह्या शंकेचें समाधान होतें. पदार्थांचे ठायीं गोडी येण्यास जशी साकर, व जळण्यास जसें सर्पण, कारण आहे, तसा जर श्रम धनोत्पत्तीस कारण असता, तर श्रमवृद्धीनें धनवृद्धि झाली असती; परंतु श्रम तसा कारण नाहीं; तर धनोत्पादक जीं कारणें त्यांचा विवक्षित संयोग, किंवा विवक्षित स्थिति एतद्द्वारा धनोत्पत्तीस श्रम कारण आहे; तो संयोग, किंवा ती स्थिति झाली, म्हणजे झालें; मग तीं थोड्या श्रमानें किंवा फार श्रमानें होवोत—कोणीं श्रमावांचून मंत्रानें जरी तीं केलीं तरी चिंता नाही—फळ होईल.

यांत्रिकविद्या, रसायनविद्या, इत्यादिकांच्या ज्ञानानें अल्प श्रमानें पुष्कळ धन उत्पन्न होतें, ह्याचेंही तत्त्व हेंच आहे. ह्या विद्यांच्या योगानें तो संयोग, व ती विशेषस्थिति, सौलभ्येंकरून कशी करावी, हें समजतें. परीट वस्त्रें धुतो, ह्याच्या श्रमाचा उद्देश, वस्त्र व त्यास चिकटलेला मळ, ह्यांचा वियोग करणें, हा होय. ह्या उद्देशाच्या सिध्यर्थ, आडाणी परिटास वस्त्रें आपटण्याचे वगैरे फार श्रम करावे लागतात, परंतु साबणाच्या आंगीं मळ आकर्षून घेण्याची शक्ति आहे हें त्यास रसायनविद्येच्या योगानें कळलें असतां, किंवा ज्या कोणास कळतें, त्यानें त्यास सांगितलें असतां, तो वस्त्रांस साबू लावतो, आणि तेणेंकरून अल्पायासानें त्याचा इष्ट उद्देश सिद्ध होतो. ह्याचप्रमाणें यंत्रयोजनेनें श्रम कमी होतो, ह्याची उपपत्ति समजावी.

धनोत्पत्तीस श्रम, व सृष्टपदार्थ, व तद्गतधर्म, हे कारण आहेत; म्हणून सांगितलें; ह्या स्थळीं कोणी ग्रंथकारांनीं, कांहीं पदार्थांचे उत्पत्तीस श्रम अधिक कारण आहे, व कांहीं पदार्थांच्या उत्पत्तीस सृष्टपदार्थ व तद्गतधर्म अधिक कारण आहेत असा भेद केला आहे. ते म्हणतात, कीं शेतकीच्या कामांत सृष्टपदार्थांचे व्यापार जितके उपयोगी पडतात, तितके सुतारी काम वगैरे शिल्पकामांत पडत नाहींत, आणि असें आहे म्हणून, शेतकऱ्यांस सारा देतां येतो. परंतु सूक्ष्म विचार करून पाहातां हें त्यांचें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. हरएक जिन्नस, ज्यास धन शब्द म्हणून लागतो, तो जिन्नस श्रम, व सृष्टपदार्थ, व त्यांचे व्यापार, ह्यांवांचून उत्पन्न होत नाहीं, असें वर सिद्ध केलें आहे; तर आतां ह्या तीनही गोष्टी जर आवश्यक आहेत, तर ह्यांतुन अमुक, अधिक कारण, व अमुक, कमी कारण, हा विचार करणें, हें, माती शब्दानें मृत्तिकेचा बोध होण्यास "मा" हें अक्षर अधिक कारण किंवा "ती" अक्षर अधिक कारण ह्या योरकळ विचारासारखें आहे. आतां शेतकऱ्यास जमिनीचें भाडें द्यावें लागतें; आणि लोहार वगैरे शिल्प्यांस, अग्नि, पाणी, इत्यादि सृष्टपदार्थांचें भाडें द्यावें लागत नाहीं, ह्याचें कारण शेतकींत जमीन अधिक उपयोगीं पडते, आणि लोहारांस अग्न्यादिक तादृश उपयोगीं पडत नाहींत, हें नव्हे; तर जमीन थोडी पडली, ती ज्यास पाहिजे त्यास मिळत नाहीं, व अग्न्यादि पदार्थ मुबलक आहेत, ते ज्यांस जितके पाहिजेत, तितके त्यांस मिळतात, हें होय.

## भाग दुसरा.

# संपत्तीचे उत्पत्तीस कारण जो श्रम त्याविषयीं विचार.

धनोत्पत्तीस श्रम कारण म्हणून वर सांगितलें. तो श्रम दोन प्रकारचा आहे. कांहीं श्रम, धनोत्पत्तीस साक्षात् कारण आहे; व कांहीं, परंपरेनें कारण आहे,—म्हणजे कांहीं श्रमानें मनुष्यास सुख देणाऱ्या वस्तूच साक्षात् उत्पन्न होतात, व कांहीं श्रम त्या वस्तूंची सामग्री वगैरे सिद्ध करण्यास लागतो. उदाहरणार्थ वस्त्रें घेतलीं असतां, कोष्ट्याचा श्रम, वस्त्ररूप धनोत्पत्तीसच साक्षात् कारण आहे; व सूत काढणाऱ्यांचा श्रम, वस्त्ररूप धनाची जी सामग्री, तिच्या उत्पत्तीस कारण आहे. ह्याप्रमाणें शेतकरी, पिंजारी इत्यादिकांचा श्रमही वस्त्रोत्पत्तीस परंपरेनें कारण समजावा. आतां शेतकरी, पिंजारी, सूत काढणारा, इत्यादि लोकांच्या श्रमापासून कापूस, पिंजलेला कापूस, सूत, इत्यादि धनरूप फलें साक्षात् उत्पन्न होत असतां, त्यांचा श्रम, वस्त्रास परंपरेनें कारण मानून, वर सांगितलेला भेद करावयाचें प्रयोजन काय? अशी कोणास शंका येईल; तीवर असें उत्तर आहे कीं ह्या श्रमकर्त्यांच्या श्रमाचें कापूस, वगैरे फळ असलें, तरी त्या श्रमाचें शेवटचें फळ वस्त्रच होय. हे श्रमकर्ते जो कापूस वगैरे उत्पन्न करतात, तो कापूसाकरतांच करीत नाहींत, तर वस्त्रांकरितां करतात, आणि त्या सर्वांस त्यांच्या श्रमाची मजुरी वस्त्रापासून, किंवा वस्त्राच्या किमतीपासूनच, प्राप्त होते. त्यांस ती मिळण्यास दुसरें स्थान नाहीं; त्यांच्या श्रमाचें वास्तविक फळ वस्त्र होय; ह्यास्तव त्यांचा श्रम त्या वस्त्रास परंपरेनें कारण आहे, अशी कल्पना करणें अवश्य आहे.

आतां वस्त्रोत्पत्तीस शेतकरी, पिंजारी वगैरे ह्यांचाच श्रम परंपरेनें कारण आहे, असें नाहीं; तर ह्यां खेरीज दुसरे पुष्कळ असे लोक आहेत, कीं ज्यांचा श्रम वस्त्रास परंपरेनें कारण आहे, व ज्यांस त्यांच्या श्रमाची किंमत वस्त्रापासून प्राप्त होते. पाहा, माग करणारा सुतार, व शेतकऱ्याचा नांगर करणारा सुतार, व नांगराचा फाळ करणारा घिसाडी, व त्या सुताराचीं हत्यारें करणारा लोहार व कापूस एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणारा बैलवाला भाडेकरी, किंवा जलमार्गानें नेला असला, तर गलबतवाला, इत्यादी अनेक व्यापाऱ्यांचा व उदम्यांचा श्रम वस्त्रास परंपरेनें कारण आहे व त्यापासून त्यांचे श्रमाची मजुरी त्यांस प्राप्त होते. आतां माग करणारा सुतार, व त्याचीं हत्यारें घडणारा घिसाडी, किंवा लोहार ह्यांच्या श्रमांत विशेष हाच, कीं माग करणाऱ्याच्या श्रमानें झालेल्या मागानें शंभर वस्त्रें झालीं, तर मागाच्या मोलाचा शंभरावा भाग एका वस्त्रांतून त्यास मिळतो, आणि घिसाड्याच्या श्रमानें झालेल्या विखणांनीं तसे १० माग झाले असल्यास त्या विखणांच्या मोलाचा हजारावा भाग त्यास त्या वस्त्रांतून मिळतो, आणि ह्याच रीतीनें जसेंजसें मागें जावें तसतसा भाग फार सूक्ष्म होऊन तो हिशेबांत धरला किंवा न धरला तरी सारखेंच, असें होत जातें.

धनोत्पत्तीच्या सामग्रीस उत्पन्न करणाऱ्यांचे श्रमांत, मजूर वगैरे ह्यांस जें अन्नवस्त्र लागतें, तें उत्पन्न करण्याचा जो श्रम, त्याची गणना केली पाहीजे. धनोत्पत्तीस, ही अन्नादिरूप सामग्री फारच आवश्यक आहे. प्रायः कोणताही माल चांगला तयार होण्यास कांहीं काळ लागतो, आणि त्या इतक्या काळांत मजुरांच्या खाण्याची तयारी नसली, तर त्या मजुरांच्यानें तो माल उत्पन्न करावावयाचा नाहीं. पाहा, शेतकरी शेत करतो, त्याच्या श्रमाचें फल उत्पन्न व्हावयास त्यास तीनचार महिने लागतात, ह्या

तीनचार महिन्यांत खाण्यास अन्न जर नसेल तर त्याच्यानें शेतकी कशी होईल ? ह्या प्रमाणेंच तांबट मांडीं करतो, त्याची मांडीं तयार होऊन तीं विकत तोंपर्यंत त्यास खाण्याची वगैरे तजवीज असल्यावांचून त्याच्या हातून तो धंदा व्हावयाचा नाहीं. गरीब लोक आपल्या मुलांस विद्या वगैरे शिकवीत नाहींत, म्हणून त्यांस कोणी मूर्ख म्हणतात; परंतु हा दोष सर्वत्रच त्यांकडे असत नाहीं; कितीएक आईबापांचे मनांत, आपल्या मुलांनीं चांगलें विद्याकलासंपन्न होऊन योग्यतेस यावें, असें असतें; पण तीं मुलें विद्या वगैरे शिकून त्या विद्यांपासून तयार होत तोंपर्यंत त्यांस पोटास घालण्याचें सामर्थ्य त्या आईबापांस नसतें. ही अन्नवस्त्ररूप सामग्री सर्व प्रकारच्या व्यापारांत आवश्यक आहे; ह्यास्तव देशांतील श्रमांपैकीं पुष्कळ श्रम ह्या सामग्रीच्या संपादनाकडे लागला असतां कोणत्याही देशांत पाहिलें असतां, इतर श्रम करणाऱ्यांच्या संख्येपेक्षां, शेतकीचे श्रम करणाऱ्यांची संख्या फार असते. तसेंच हल्लीं ह्या देशांतील शेतकरी वगैरे ह्यांच्या हातून विहिरी, बांध, इत्यादि कामें होण्यास ह्या सामग्रीचा अभावच मुख्य प्रतिबंधक आहे, असें वाटतें.

वर केलेल्या उपपादनावरून धान्यादि पदार्थांचा संचय करणें, हें, धनोत्पादक कृत्यांतलें एक मोठें कृत्य आहे, असें सिद्ध होतें. आतां ह्या अन्नरूप सामग्रीकडे लागलेला श्रम, व इतर सामग्रीकडे लागलेला श्रम, ह्यांच्यामध्यें एक मोठा भेद आहे, तो ह्या स्थळीं सांगितला पाहिजे. तो भेद हा कीं, कोष्टी कापड करतो, ह्या उदाहरणांत, कापूस लावणारा शेतकरी, माग करणारा सुतार, व त्या सुताराचीं विलणे घडणारा घिसाडी, इत्यादि लोकांस त्यांच्या श्रमाचें फळ वस्त्ररूप शेवटल्या उत्पन्नांतून मिळतें, परंतु ह्या सर्वांस खाण्याकरतां धान्य उत्पन्न करणारा जो शेतकरी, त्यास त्यांच्या श्रमाचें फळ धान्यरूपच होय. त्यास वस्त्रांतून कांहीं एक अंश मिळत नाहीं. यद्यपि कोणताही जिन्नस उत्पन्न करण्यास श्रम, हत्यारें, द्रव्यें, व अन्न, हीं सर्व सारखीं अवश्य आहेत, तथापि हत्यारें, व द्रव्य, ह्यांस स्वतः उपयोगित्व नाहीं, दुसऱ्या पदार्थांच्या उत्पत्तिद्वारा उपयोगित्व आहे, म्हणून त्यांच्या उत्पत्तीकरतां जे श्रम करतात, त्यांस त्यांच्या श्रमाचें फळ शेवटच्या उत्पन्नांतूनच आलें पाहिजे. परंतु अन्नाची गोष्टी तशी नाहीं. तें मनुष्यांची क्षुधा शांत करण्यास स्वतः कारण आहे. अन्न उत्पन्न करणाऱ्यांस त्यांच्या श्रमाचें अन्नरूपच फल प्राप्त होतें; ह्यास्तव त्यांस तें अन्न खाऊन उत्पन्न केलेल्या पदार्थांतून फल कल्पिण्याची गरज नाहीं. ह्या सर्व विचारांतील तत्त्व इतकेंच आहे कीं कापूस पेरणाऱ्याच्या श्रमापासून, वस्त्रें विणणाऱ्यांच्या श्रमापावेतों, सर्व श्रमांचें फल वस्त्रेंच होत व त्याकरतांच ते श्रम करतात. परंतु त्यांचें अन्न उत्पन्न करणारा शेतकरी, जो श्रम करतो, तो वस्त्राकरतां करीत नाहीं; तर अन्नाकरतां करतो; म्हणून कापूस पेरणाऱ्यांस वगैरे वस्त्रांतून फल प्राप्त होतें, आणि अन्न उत्पन्न करणाऱ्यांस तें तसें प्राप्त होत नाही. सरकारानें, वस्त्रें कोणीं करूं नये, अशी मनाई केल्यास, कापूस पेरणारे वगैरे कोणीच श्रम करणार नाहींत, परंतु धान्य उत्पन्न करणारा आपलें काम करील. मजुरानें केलेल्या वस्त्रांतून त्याचें अन्न उत्पन्न करणाऱ्यास अंश मिळत नाहीं खरा, परंतु तें अन्न त्या मजुरास ज्या भांडवलवाल्यानें दिलें असतें, त्यास त्या वस्त्रांतून अंश मिळतो, पण तो अंश श्रमाबद्दल मिळत नाहीं; तर उपभोगाच्या विलंबाबद्दल मिळतो. पाहा, ज्या मनुष्याजवळ अन्नसंग्रह असतो, त्यास तें अन्न देऊन नानाप्रकारचे उपभोग्य पदार्थ प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य असतें; परंतु तो तसें न करितां आपल्या उपभोगास विलंब करून ज्या अर्थी वस्त्रें वगैरे करणाऱ्या मजुरांस वगैरे तें देतो, त्याअर्थी त्यांच्या श्रमाच्या फळांतून वांटा घेण्याचा त्याचा अधिकार आहे; आणि तो भांडवलवाला, त्यानें ज्या किंमतीचें अन्न दिलें असेल त्या किंमतीचाच केवळ अंश घ्यावयाचा नाहीं. कां कीं, तितकाच अंश मिळाल्यास त्यानें कांहीं दिवस उपभोगाचा विलंब केल्याचें फळ काय ? तर तो दिलेल्या भांडवलापेक्षां कांहीं अधिक अंश घेईल. त्या अधिक अंशास अर्थशास्त्रांत, व व्यवहारांत "नफा" असें नांव दिलें आहे. ह्या नफ्याची इच्छाच, मजुरांस

आपलें संचित अन्नरूप धन देण्याविषयीं, मांडवलवाल्याची प्रवृत्ति होण्यास, कारण आहे. ह्याप्रमाणें माग करणाऱ्या सुतारांस वगैरे, अन्नादि मांडवल देणाऱ्यांचा नफाही वस्त्रांतूनच निघतो. सारांश कोणताही माल उत्पन्न करणाऱ्यास जी अन्नरूप सामग्री लागते, ती उत्पन्न करण्यास जो श्रम लागतो, त्याचें फळ त्या मालांतून निघत नाहीं, तर तें अन्न देणाऱ्यांचा नफा मात्र त्या मालांतून निघतो, आणि अन्नाखेरीज जी सामग्री आहे, ती उत्पन्न करणाऱ्यांच्या श्रमाचें फळ, व त्यांस मांडवल देणाऱ्यांचा नफा, हीं दोनही त्या सामग्रीचे योगानें तयार झालेल्या मालांतून निघतात. हा विशेष, मजुरांस निर्वाहांस आवश्यक जे अन्नासारखे वस्त्रप्रावरणादि दुसरे पदार्थ, त्यांविषयींही अन्नासारखाच समजावा. वरील विचारावरून असें दिसतें, कीं, धनोत्पत्तीस परंपरेनें कारण जो श्रम त्यामध्यें मजुरांच्या निर्वाहास आवश्यक, जे अन्नवस्त्रादि पदार्थ, तदुत्पादकश्रमाची गणना करावयाची गरज नाहीं. आतां अन्न उत्पन्न करण्यावांचून धनोत्पत्तीस परंपरेनें कारणीभूत, असा जो श्रम राहिला, त्याचे पांच प्रकार आहेत:—प्रथम प्रकार, द्रव्योत्पादक श्रम. ज्या द्रव्याचा माल होतो असें जें द्रव्य तें उत्पन्न करण्याचा श्रम. द्रव्य उत्पन्न करण्याचा श्रम दोन प्रकारचा आहे. कांहीं ठिकाणीं त्या द्रव्याचें संपादन करण्याचा, व कांहीं ठिकाणीं त्याची उत्पत्ति करण्याचा. इमारतीच्या कामांत, लांकडें, धोंडे, वगैरे द्रव्य, ह्यांची, मनुष्य आपल्या श्रमानें उत्पत्ति करीत नाहीं, तर संपादन करतो. तसेंच विटा, मडकीं, कौलें, वगैरे मालाचें प्रकृतिरूप कारण जी माती; व सोनें, रुपें, तांबें वगैरे धातु, हे ज्या मातींतून निघतात, ती माती; ह्यांची मानवी श्रमानें उत्पत्ति होत नाहीं, तर संपादन होतें, परंतु बहुत ठिकाणीं असें आहे कीं, श्रमानें तयार केलेले जे पदार्थ, ते दुसऱ्या जिनसांच्या उत्पत्तीस द्रव्यद्वारा कारण होतात, तसल्या द्रव्यांच्या उत्पत्तीसच श्रम लागतो. इमारतीच्या कामांत विटा, चुना, हीं द्रव्यें आहेत; हीं द्रव्यें आयतीं तयार सांपडत नाहींत; श्रमानें नवीं करावीं लागतात. सोनार, तांबट, लोहार, इत्यादिकांच्या कामांत लागणारीं, जीं, धातूरूप द्रव्यें, त्यांचीही उत्पत्ति श्रमावांचून होत नाहीं. धान्य उत्पन्न करण्याचा जो श्रम, तोही किती एक ठिकाणीं द्रव्योत्पादकच श्रम समजावा. कां कीं, धान्यरूप द्रव्याचेंच सुतारी, भटारी, यांचें सामान होतें. कांहीं ठिकाणीं माल उपभोगार्ह होण्याचे पूर्वी त्यास तीन, चार, वेळ द्रव्यावस्था येती. पिंजारी, कापूस पिंजतो; त्या पिंजलेल्या कापसाचें, सूत काढणारा सूत काढतो, त्या सुताचें कोष्टी वस्त्र विणतो, त्या वस्त्राचे, शिंपी, आंगरखे शिवतो. ह्या प्रकारचीं आणखींही उदाहरणें पुष्कळ सांपडतील. धनोत्पत्तीस परंपरेनें कारणीभूत जे श्रम त्यांपैकीं दुसरा प्रकार, साक्षात् कारण श्रमास सुलभत्व आणणारीं जीं हत्यारें किंवा विलणीं, तीं करण्याचा श्रम होय. येथें हत्यार शब्दानें कारकुनास लिहावयास उपयोगीं पडणारी जी टोलीची बरूची लेखणी तीपासून घड्याळें वगैरे नाजूक कामें करावयास जीं हजारों रुपयांच्या किमतीचीं, मोठमोठीं, यंत्रें लागतात, त्यांपर्यंत सर्व साधनें घ्यावयाचीं. कांहीं माल तयार करण्याच्या एकंदर श्रमांत हत्यारें करण्यासच श्रम फार पडतो. हल्लीं विलायतेंत वस्त्रें विणण्याचे वगैरे मोठमोठे कारखाने आहेत, त्या कारखान्यांत, यंत्ररूप हत्यारें घेण्यास मोठा खर्च लागतो. व त्या देशांत, हत्यारें तयार करण्याकडेसच बहुत लोकांचा श्रम लागतो.

आतां धनोत्पत्तीच्या कारणांपैकीं कांहीं कारणें अशीं आहेत, कीं जीं, द्रव्यें किंवा हत्यारें, ह्यांपैकीं एकांतही सामावत नाहींत. पाहा, लोहार, तांबट ह्यांच्या कामांत मट्टी पेटवण्यास कोळसे लागतात; तसाच परटास साबण लागतो; तसेंच हत्यारें वगैरे साफ करण्यास तेल वगैरे लागतें; ह्या असल्या पदार्थांस लोकांत द्रव्यही म्हणत नाहींत व हत्यारेंही म्हणत नाहींत, परंतु वस्तुतः पाहिलें असतां त्यांस हत्यारें असें म्हणणें हें मला बरें वाटतें. आतां द्रव्य व हत्यार ह्यांतला मुख्य भेद समजण्याकरतां त्यांचीं लक्षणें सांगतों. ज्या कारणास सोडून कार्य रहात नाहीं म्हणजे त्या कारणासच परिणामांतर होऊन कार्यता येते, त्यास द्रव्य म्हणतात, जसें चित्रांचें द्रव्य माती होय, व ज्या कारणास सोडून कार्य राहातें

त्यास हत्यार किंवा करण म्हणतात. जसें, भिंत घालण्यास करणी रंधा इत्यादि. ह्या लक्षणावरून पाहातां कोळसे वगैरे हत्यारें होत; द्रव्यें नव्हेत. कोणी द्रव्याचें व हत्यारांचें अशी लक्षणें करतात कीं, जें कारण एका कार्यास उपयोगीं पडलें असतां, तें कार्य आहे, तों पर्यंत दुसऱ्या कार्याचे उपयोगीं पडत नाहीं, तें द्रव्य होय, व जें कारण, त्याचें एक कार्य असून दुसऱ्या कार्यास उपयोगीं पडतें, तें हत्यार होय. पहिल्याचें उदाहरण विटा, तुळया, हीं घराचीं द्रव्यें होत. यद्यपि ह्या विटा व तुळया ह्यांनीं दुसरें नवें घर होईल, तथापि पहिल्या घराचा नाश झाल्यावांचून व्हावयाचें नाहीं. दुसऱ्याचें उदाहरण करणी, वांकस वगैरे होय. कां कीं एका करणीनें व वांकसानें एक घर बांधलें असतां तें तसेंच असून दुसरें बांधतां येतें. ह्या दुसऱ्या लक्षणाप्रमाणें कोळसे वगैरे द्रव्यें होत, व दुसरा भेद असा आहे, कीं ह्या दुसऱ्या मताप्रमाणें द्रव्य तयार करण्याच्या श्रमाचें सगळें फळ त्या द्रव्यापासून जी वस्तू झाली असेल त्याच वस्तूंतून निघालें पाहिजे; व हत्यारांचें तसें नाहीं. तर एका हत्यारानें जितक्या वस्तू तयार झाल्या असतील त्या सर्वांतून हें हत्यार तयार करण्याचें फळ प्राप्त होईल, एकींतूनच होणार नाहीं. हा जो वर बारीक विचार लिहिला, ह्याचा अर्थशास्त्रांत, व व्यवहारांत, तादृश मोठा उपयोग नाहीं, परंतु तेणेंकरून वाचणाऱ्यांची बुद्धि सूक्ष्म विचार करण्यास योग्य होते असें समजून हा विचार येथें लिहिला आहे.

तिसरा प्रकार संरक्षणश्रम. धनोत्पत्तीस द्रव्य व हत्यारें लागतात म्हणून वर सांगितलें. तदुत्पादक श्रमांखेरीज आणखी एक प्रकारचा श्रम धनोत्पत्तीस परंपरेनें कारण आहे. हा श्रम धनोत्पादक कृतीस विघ्न आणणारे व उत्पन्न केलेल्या मालाचा नाश करणारे जे वारा, पाणी, अग्नि, थंडी, उष्णता, वगैरे सृष्टपदार्थ; ह्यांच्या व चोरादिकांच्या, उपद्रवाचें निवारण करण्याचा होय. वखारी, कारखान्यांचीं घरें, गोठे, शेतांतले बांध, कुंपणें, वगैरे बांधण्याचा श्रम, ह्याच वर्गांत मोडतो. पण मजूरलोक ज्या घरांत राहतात, तीं बांधण्याचा श्रम, त्यांच्या खाण्याचें अन्न उत्पन्न करण्याच्या श्रमाप्रमाणें परंपरेनें धनोत्पादक श्रमामध्यें येत नाहीं. कां कीं तीं घरें वगैरे अन्नाप्रमाणें स्वतः उपयोगीं पडणारीं आहेत. गुराखी, मेंढके, इत्यादिकांचा श्रमही ह्याच वर्गांत समजावयाचा. तसेंच न्यायाधीश, फौजदार, कोतवाल, शिपाई, गस्तवाले, इत्यादि बहुतेक सरकारी मनुष्यें ह्यांस धनाच्या रक्षणाबद्दलच त्यांतूनच अंश मिळतो. ही गोष्ट खरी आहे, कीं न्यायाधीशप्रभृति धनाचें संरक्षणच करतात असें नाहीं, त्यांपासून दुसरींही लोकहितावह पुष्कळ कामें होतात. तसेंच धनोत्पादक लोक, सरकारास जो कर देतात, तो कर धनोत्पादक खर्चांमध्यें कोणी गणीत नाहींत, तरी वास्तविक पाहातां, सरकारास जो कर मिळतो, तो उत्पन्न केलेल्या द्रव्यांतूनच मिळतो, व ज्या देशांत चांगलें सरकार असतें, तेथें त्यापासून धनोत्पत्तीस पुष्कळ उपयोगही पडतो. पाहा, सरकार जरीं नसतें, तरी लोकांस चोरादिकांचा प्रतिबंध करण्याकरतां पदरचें धन देऊन लोक ठेवावे लागतेच, तर तोच धनांश किंबहुना त्यापेक्षां फार कमी धनांश त्या प्रतिबंधाकरतां, ते हल्लीं सरकारास देतात, व असें करण्यांत आणखी एक मोठा फायदा असा आहे, कीं ज्यांच्या श्रमापासून त्यांच्या निर्वाहापुरतेंच धन उत्पन्न होतें व ह्यामुळें आपलें रक्षण होण्याकरतां दुसऱ्यास धन देण्याचें ज्यांस सामर्थ्य नसतें त्यांचेंसुद्धां आतां सरकारापासून संरक्षण होतें.

चवथा प्रकार वहनश्रम, कितीएक श्रम असे आहेत कीं ज्या श्रमांनीं नवा पदार्थ उत्पन्न होत नाहीं; परंतु उत्पन्न झालेले पदार्थ त्यांचा उपभोग करणाऱ्यांच्या हातीं जातात. ह्याच प्रकारचा श्रम करणारे बहुत लोक असतात. भाडेंवाले, बैलवाले, खलाशी, हमाल, हेलकरी, वगैरे. तसेंच गलबतें, गाड्या, वगैरे करण्याचा श्रम; तसेंच सडका, पूल, वाटेवरच्या विहिरी, तळीं वगैरे बांधण्याचा श्रम, ह्याचाही वहनश्रमांतच अंतर्भाव होतो. कधींकधीं सरकार आपल्या पदरचा खर्च करून रस्ते वगैरे

बांधून, लोकांस फुकट वहिवाटूं देतें. तथापि वास्तविक पाहातां, त्याच्या श्रमाचें फळ देशाच्या उत्पन्नांतूनच निघतें; व ह्या प्रकारचे रस्ते झाले, म्हणजे देशांतीलही उत्पन्न वाढतें. रस्ते चांगले झाले म्हणजे देशांतील उत्पन्न कसें वाढतें हें, अनेक देशांत परस्पर व्यापार असल्यानें दोन्हीं देशांचें कल्याण कसें होतें, हें कळले, म्हणजे कळेल.

व्यापारी, व उदमी, ह्यांचा श्रमही वहनश्रमांतच लेखावयाचा. आतां व्यापारी, व उदमी, ह्यांचा श्रम संपत्तीचा उत्पादक कसा, ह्याचें वर्णन करतों. व्यापारी वगैरे लोक जर नसते, तर निरनिराळे माल उत्पन्न करणाऱ्यांस स्वतः एकमेकांकडे खरेदी व विकरी करावयास जावें लागतें व तसें करण्यांत त्यांचा श्रम पुष्कळ व्यर्थ जाता. कधीं कधीं माल विकणारे व विकत घेणारे निरनिराळ्या देशांत, किंबहुना निरनिराळ्या द्विपांत देखील, असतात; तेव्हां हे व्यापारी वगैरे नसते, तर त्यांचा परस्पर व्यापार झाला नसता. हीच अडचण निवारण्याकरतां, प्रथम कांहीं नेमलेल्या वेळीं बाजार भरण्याची चाल निघाली असावी; ज्या लोकांत धान्य वगैरे शेतीच्याच उत्पन्नाचा व्यापार असे, त्यांस ही युक्ति बरीच सोईवार पडे. कां कीं, शेतकरी लोकांस वर्षांतून तीन चार महिनें, शेतकीचा उद्योग नसतो म्हणून त्यांस बाजारास जाण्यास फावे. परंतु जेव्हां लोकांत शिल्पाचे जिंनस होऊं लागले; तेव्हां ते जिंनस करण्यांस, आपलें काम संभाळून, बाजारास जाण्याची गैरसोय पडूं लागली, व त्या शिल्पी लोकांचे मजुरांस चारचार पांचपांच महिन्यांची वेगमी करण्याची शक्ति नसे, व शिल्पीलोक आपल्या कामांत नेहमी गुंतल्यामुळें, कोठें कोणता माल स्वस्त, व कोठें कोणता माहाग, विकतो हें कळण्याचें त्यांस कठीण पडूं लागलें, ह्यामुळें, दुकानदार, व्यापारी, उदमी ह्यांची गरज लोकांस लागूं लागली.

शिंपी, हलवाई, चांभार, कुंभार, वगैरे व्यापारी, धनाचे उत्पादक असून, तेच विकणारेही असतात. परंतु त्यामध्यें देखील जो कोणी हुशार असतो, तोच एकटा, घेवीदेवीचीं कामें करतो, व बाकीचे, माल तयार मात्र करतात. ज्या जिंनसांचा फार खप, व जे एकदम पुष्कळ केले असतां नफा आहे, असे जिन्नस उत्पन्न करणाऱ्यांस, फुटकळ विकरी करण्याचें काम करण्यापासून, तोटा आहे; ह्याकरतां तें काम ते करीत नाहींत. कापड विणणारे कोष्टी, भांडी करणारे तांबट, धान्य उत्पन्न करणारे शेतकरी, वगैरे ह्यांनीं दुकानें मांडून, फुटकळ विकरी करण्यांत घालवावयाचा वेळ, माल उत्पन्न करण्यांत घालविला असतां, त्यांचा विशेष नफा आहे; तसेंच पन्नास जिन्नस पन्नास ठिकाणीं घेण्यापेक्षां, ते सर्व जिन्नस एके ठिकाणीं मिळाले असतां, गिराईकांचा पुष्कळ काळ व श्रम वांचतात. पाहा, वाण्याच्या दुकानीं तूप, तेल, गूळ, साकर, वगैरे अनेक जिन्नस मिळतात, ते निरनिराळे ठिकाणीं घ्यावयास जावें लागलें असतां, गिराईकांस किती वेळ व किती श्रम पडतील? तर ह्या सर्व अडचणी निवारण्याकरतां दुकानें घालण्याची चाल निघाली; ते दुकानवाले, नानाप्रकारचे जिन्नस त्या त्या उत्पन्नकर्त्यापासून विकत घेऊन, एके ठिकाणीं विकतात, तेणेंकरून त्या उत्पन्नकर्त्यांस आपआपल्या धंद्याकडे सतत लागतां येऊन, उत्पन्न पुष्कळ होतें. ह्यावरूनच माल फुटकळ विकणारे, व थोडथोडा माल घेऊन, तो दारोदार विकीत फिरणारे, ह्या सर्वांचा श्रम धनोत्पत्तीस, किंवा धनवृद्धीस परंपरेनें कारण मानला पाहिजे. हे श्रम करणारे जर नसतील, तर पुष्कळ तोटा होईल. पाहा, शिंपी, कोष्टी, वगैरे पुष्कळ लोकांचे व्यापार असे आहेत, कीं त्या लोकांनीं त्या व्यापाराकडे सर्वकाळ लावला असतां त्यांचा जितका नफा आहे, तितका त्यांनीं बाजारांत स्वतः जिन्नस विकावयास जाण्यांत नफा नाहीं. आतां फुटकळ विकणाऱ्यांच्या योगानें आळशी मनुष्याचा आळसही वाढेल, ही गोष्ट खरी आहे. तथापि ह्या एवढ्या कारणावरून त्यांचा धनवृद्धीस उपयोग नाहीं असें म्हणतां येत नाहीं. सारांश, ज्या मनुष्यास पदार्थ उत्तम प्रकारें करतां येतो तो पदार्थ करण्याकडे त्या मनुष्याची निर्वेध योजना, ज्या ज्या गोष्टींच्या योगें होते, ह्या सर्व गोष्टी, जगांतील धन वाढण्यास कारण आहेत असें समजावें.

धनोत्पत्तीस परंपरेने कारणीभूत श्रमाचे वर जे चार प्रकार सांगितले, ह्या प्रकारच्या श्रमाचें फल अचेतन पदार्थांवर उत्पन्न होऊन, तद्द्वारा तो श्रम धनोत्पत्तीस कारण होतो. आतां श्रमाचा आणखी एक प्रकार सांगावयाचा राहिला आहे. ह्या प्रकारच्या श्रमाचें फल अचेतन पदार्थांवर उत्पन्न होत नाहीं, तर सचेतन जे जीव, ह्यांवर तें उत्पन्न होतें. कोणत्याही मनुष्यास धनोत्पादक, करावयासाठीं त्यास कांहीं व्यापार, व तत्संबंधी कलाकौशल्य, हीं ल्हानपणापासून शिकवावीं लागतात; व हीं शिकवण्यास बराच श्रम करावा लागतो. ह्या श्रम केला नाहीं, तर मनुष्यास मोठेपणीं धन उत्पन्न करता यावयाचें नाहीं, म्हणून पंतोजी, व कलाकौशल्य शिकवणारे, जे लोक आहेत, त्यांचा श्रम, परंपरेनें धनोत्पत्तीस कारण मानला पाहिजे, व त्या श्रमाचें फल त्यांस देशांतील सामान्य उत्पन्नांतून प्राप्त झालें पाहिजे. यद्यपि एकेक मनुष्य घेऊन, त्याचा आपआपल्या मुलास शिकविण्याचा उद्देश पाहिला असतां, तीं मुलें विद्या शिकून पुढें जें धन उत्पन्न करतील, त्यांतून आपणास अंश मिळावा, असा असतो, असेंच केवळ म्हणतां येत नाहीं; ते त्यांच्याच कल्याणाकरतां त्यांस विद्या शिकवीत असतात; तथापि सर्व देश एकवट करून पाहिलें असतां, त्या देशांतील शिल्पी वगैरे लोक, जी विद्या शिकवितात, व जीं नाना प्रकारचीं कलाकौशल्यें संपादितात, त्या सर्व मेहनतीचें फल, त्यांस त्यांनीं उत्पन्न केलेल्या धनांतून प्राप्त झालें पाहिजे; अन्यथा त्यांची, श्रमाकडे प्रवृत्ति व्हावयाची नाहीं.

ह्याप्रमाणें, हस्तकौशल्य असो, किंवा कांहीं विद्या असो, ज्याच्या ज्याच्या योगानें म्हणून धनवृद्धि होते, तें हस्तकौशल्य, व ती विद्या, शिकण्याच्या व शिकवण्याच्या श्रमाची गणना धनोत्पादक श्रमांत केली पाहिजे; व त्या श्रमाचें फल, सर्व देश जें धन उत्पन्न करतो, त्या उत्पन्नांतून मिळालें पाहिजे. तसेंच धनोत्पादक ज्याचा श्रम आहे, अशा मनुष्यास आरोग्य राहाण्याकरतां, व त्यास रोग उत्पन्न झाले असतां, त्यांचें निवारण करण्याकरतां, ज्यांचा श्रम आवश्यक आहे, असे जे औषधीवैद्य, व शस्त्रवैद्य, ह्यांचा श्रमही, परंपरेनें धनोत्पत्तीस कारण मानिला पाहिजे. कांकीं असे लोक नसतील, तर धनोत्पत्तीस प्रतिबंध होईल. ह्या स्थळींही, एकएक मनुष्याची औषध घेण्याची प्रवृत्ति पाहिली असतां, ती पुढें आपणास धन उत्पन्न करतां यावें म्हणूनच नसते; तथापि सर्व देशाच्या धोरणानें पाहिलें असतां, वैद्यादिकांच्या श्रमाचें फल, सामान्य उत्पन्नांतूनच कल्पिलें पाहिजे. तसें त्यांस औषध वगैरे तयार करण्यास लागलेल्या श्रमाची मजूरी, व भांडवलाचा नफा, हींही सामान्य उत्पन्नांतूनच निघालीं पाहिजेत.

ह्या प्रमाणें देशाच्या संबंधानें पाहातां, नाना प्रकारचे ग्रंथकार, नव्यानव्या कल्पना काढणारे लोक, इत्यादिकांचा श्रमही, परंपरासंबंधानें, धनोत्पादक समजावा. तसा धर्मोपदेशकांचा श्रमही कांहीं अंशीं धनोत्पादक जाणावा, कारण तेणेंकरून जेथें लोकांस प्रामाणिकपणा, सत्यशीलता, मितव्ययता, इत्यादि गुण प्राप्त होतात, तेथें तद्द्वारा उत्पन्न झालेल्या धनास त्या धर्मोपदेशकाचा श्रम परंपरेनें कारण मानला पाहिजे; व त्या सर्व श्रमकर्त्यांस, त्यांच्या श्रमाचें फल देशाच्या सामान्य उत्पन्नांतून प्राप्त होणें योग्य आहे.

असे हे धनाच्या उत्पत्तीस, व वृद्धीस, कारणीभूत श्रमाचे बहुतेक प्रकार सांगितले; ह्यांखेरीज कांहीं राहिले असल्यास, ते, वाचणाऱ्यांनीं विचार केला असतां, त्यांच्या लक्षांत येण्यासारखे आहेत, म्हणून येथें त्यांच्या निरूपणाची तादृश गरज नाहीं.

—०००—

## भाग ३

# धनानुत्पादक, म्हणजे ज्यापासून धन उत्पन्न होत नाहीं, असा जो श्रम त्याविषयीं.

धनोत्पत्तीस श्रम आवश्यक आहे, त्यावांचून धन उत्पन्न होत नाहीं; असा नियम वर सांगितला; परंतु श्रमापासून सर्वदा धनरूपच कार्य होतें असें नाहीं; म्हणून अर्थशास्त्रकारांनीं उत्पादक आणि अनुत्पादक, असे श्रमाचे दोन भाग केले आहेत. त्यांत कोणत्या श्रमास उत्पादक म्हणावें, व कोणत्यास अनुत्पादक म्हणावें ह्याविषयीं त्या शास्त्रांत मोठा वाद आहे.

कोणी ग्रंथकार, श्रमापासून विनिमयार्ह असा कांहीं इंद्रियगोचर, म्हणजे डोळे, त्वचा इत्यादी इंद्रियांनी प्रत्यक्ष व्हावयाजोगा पदार्थ उत्पन्न झाल्यावांचून, त्या श्रमास उत्पादक म्हणणें नीट नाहीं, असें म्हणतात. आतां कितीएक दुसरे ग्रंथकार अनुत्पादक ह्या शब्द, "व्यर्थ" ह्या अर्थाचा समजून, ते असा पक्ष धरतात, कीं ज्या ज्या श्रमापासून आनंद किंवा दुःखनिवारण, इत्यादि इष्ट उद्देश सिद्ध होतो, त्या सर्व श्रमास उत्पादक श्रम असेंच म्हणावें; त्या श्रमास अनुत्पादक म्हणणें, हा केवळ अन्याय आहे. असा पुष्कळ वाद आहे. वास्तविक तत्त्व पाहातां, उत्पादक व अनुत्पादक, ह्या दोन शब्दांचा अर्थ दोहों पक्षांच्या ग्रंथकारांनीं निरनिराळा घेऊन व एकामेकांचा भाव न समजून, ते भांडत आहेत असें वाटतें. पहिल्या पक्षाचे वादी, वैद्य, न्यायाधीश, शिपाई, चाकर, इत्यादिकांच्या श्रमास अनुत्पादक म्हणतात. त्यांचा अभिप्राय, ह्या लोकांचा श्रम, अनुत्पादक म्हणजे व्यर्थ, असा नाहीं; तर त्या श्रमापासून धन उत्पन्न होत नाहीं, असा त्यांचा भाव आहे. ज्यापासून धन साक्षात् किंवा परंपरेनें निष्पन्न होत नाहीं, तो श्रम व्यर्थ असें कोणी विचारी पुरुष म्हणणार नाहींत. कां कीं, ह्या जगांत धनच एक मनुष्यास संपादनीय आहे, असें नाहीं. धनाखेरीज बहुत गोष्टी मनुष्यास संपादनीय आहेत. आरोग्य, न्याय रक्षणें, इत्यादि गोष्टी धनाप्रमाणेंच, किंबहुना त्याच्यापेक्षांही अधिक महत्त्वाच्या आहेत. तेव्हां तसल्या गोष्टी ज्यांच्या श्रमानें सिद्ध होतात, असे जे वैद्य न्यायाधीश प्रभृति, ह्यांच्या श्रमास व्यर्थ कोण म्हणेल! आतां ह्या विचारावरून पाहातां, उत्पादक श्रम, व अनुत्पादक श्रम, ह्यांविषयींचा वाद केवळ क्षुल्लक आहे, असें समजूं नये, कां कीं शब्दाचा प्रयोग जर यथायोग्य नसला, तर तेणेंकरून देखील शास्त्रांत भ्रांति उत्पन्न होऊन, तत्त्वार्थ समजण्यास प्रतिबंध होतो, म्हणून ह्या स्थळीं उत्पादक श्रम, व अनुत्पादक श्रम ह्याविषयीं थोडासा विचार करतों.—

उत्पादक शब्देंकरून, "मूर्त द्रव्यांची उत्पत्ति करणारा", असा अर्थ धरला, तथापि वास्तविक पाहातां, मूर्तद्रव्याची, अपूर्व सत्तारूप मुख्य उत्पत्ति कोणत्याही मानवी श्रमानें होत नाहीं; तर त्या द्रव्याचे ठायीं "इष्टधर्माची उत्पत्ति" असा जो उत्पत्ति शब्दाचा गौण अर्थ आहे, तोच येथें घेतला पाहिजे, हें मागें एकवेळ लिहिलेंच आहे. वस्त्रें उत्पन्न करणाऱ्या साळ्याच्या श्रमानें वस्त्ररूप मूर्तद्रव्याची अपूर्व सत्ता उत्पन्न होत नाहीं, तर सिद्ध जीं सुतें, ह्यांचे ठायीं त्याच्या श्रमानें इष्टरचनारूप धर्म उत्पन्न होतो. ह्याच प्रमाणे सर्वत्र जाणावें. तसेंच, मनुष्यें वस्तूंचा उपभोग करून नाश करतात; येथेंही वस्तूंचा असत्तारूप नाश समजावयाचा नाहीं; तर त्या वस्तूंवरच्या इष्ट धर्मांचा नाश समजावयाचा.

आपण वस्त्रें, अन्न, वगैरे वस्तूंचा उपभोग करून नाश करतों, तो त्या द्रव्यांचा करीत नाहीं, तर त्यांवरच्या इष्ट म्हणजे उपयुक्त, धर्मांचा नाश करून, तीं उपयोगी नाहींत असें करतों, असें आहे. म्हणून, वैद्य, न्यायाधीश, वगैरे ह्यांच्या श्रमास उत्पादक म्हणणारे असें विचारतात, कीं, "इष्टधर्मोत्पादक" असा जर उत्पादक शब्दाचा अर्थ आहे, तर तो शब्द दगडावर आकारविशेष उत्पन्न करणाऱ्या पाथरवटांच्याच श्रमांस कां लावावा? आणि आरोग्य, विद्या, हे धर्म उत्पन्न करणारे वैद्य, शिक्षक, ह्यांच्या श्रमास तो शब्द कां लावूं नये? आतां ह्या, वर सांगितलेल्या, लोकांचा श्रम उपयोगी आहे खरा, परंतु उत्पादक श्रम ह्या शब्दापासून लोक, "इष्टधर्मांचा उत्पादक श्रम", इतकाच अर्थ समजत नाहींत, तर वर लिहिल्याप्रमाणें "धनाचा उत्पादक श्रम" असें समजतात; म्हणजे श्रमानें उत्पन्न केलेला जो इष्टधर्म, तेणेंकरून युक्त जी वस्तू, ती, धनशब्दवाच्य असावी. तेव्हां आतां विचारणीय अंश हा झाला, कीं, धन कोणत्या वस्तूस म्हणावें, व कोणतीस म्हणूं नये, म्हणजे चाकरानें केलेल्या चाकरीस, गाणाऱ्यानें गाइलेल्या गाण्यास, वगैरे धन शब्द लावावा, किंवा नाहीं, हाच विचार प्राप्त झाला.

आतां ह्या विचारांत गोंधळ होऊं नये, म्हणून आपण येथें मनुष्याच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या इष्टधर्मांचे तीन प्रकार कल्पूं.—

पहिला प्रकार. श्रमानें मूर्त पदार्थांवर इष्टधर्म उत्पन्न होतात. ते धर्म लोहार, सुतार, शिंपी, साळी, शेतकरी, वगैरे लोकांच्या श्रमाचीं कार्यें होत. हे धर्म पहिल्या प्रकारांत मोडतात, व हे उत्पन्न करणाऱ्यांच्या श्रमास उत्पादक म्हणावें किंवा न म्हणावें ह्या विषयीं कोणाचाही वाद नाहीं.

दुसरा प्रकार. श्रमानें मनुष्यादिक प्राण्यांच्या ठायीं, जे धर्म उत्पन्न होतात, ते, जसें विद्या, कलाकौशल्यादिकांचें ज्ञान; हात वगैरे अवयव विवक्षित रीतीनें वळवण्याची संवय, चांगल्या रीतीनें चालविण्याची प्रीति; व उद्योग करण्याची संवय, इत्यादि इष्टधर्म दुसऱ्या प्रकारांत समजावे.

तिसरा प्रकार. ह्या प्रकारच्या श्रमानें उत्पन्न झालेलीं कार्यें अचेतन पदार्थांवर, किंवा चेतन पदार्थांवर, उत्पन्न होतात, परंतु तीं मागल्या प्रकारच्या कार्याप्रमाणें स्थायी नसतात, तर तीं क्षणमात्र राहून तत्काल नाश पावतात. गवई, नाचणाऱ्या कलावंतीणी, तमासगीर, चाकर, शिपाई, इत्यादिकांच्या श्रमांचीं कार्यें ह्या तिसऱ्या प्रकारांत येतात. ह्या लोकांच्या श्रमानें आनंद वगैरे कार्यें उत्पन्न होतात. परंतु साळी, शिक्षक, इत्यादिकांच्या श्रमानें आनंद करणारे किंवा दुःखनिवारण करणारे, किंवा सोईस अगर निर्वाहास उपयोगी, असे, पदार्थगत, स्थायी धर्म, जसे उत्पन्न होतात, तसे गवयी वगैरे यांच्या श्रमानें होत नाहींत. पाहा, शिंप्यानें केलेला आंगरखा, किंवा साळ्यानें केलेलें वस्त्र, हीं, बरा वेळ टिकतात. पण गवयाचें गाणें तसें नाहीं; त्याच्या श्रमानें साक्षात् आनंद उत्पन्न होतो, परंतु जो तत्काळ नाहींसा होतो. अशींच सैन्याच्या श्रमाचीं कार्येंही समजावीं. त्याच्या श्रमानें सुख देणारा, किंवा दुःखनिवारण करणारा, पदार्थ उत्पन्न होत नाहीं; तेणेंकरून दुःखाचें किंवा दुःखदायक भयाचें मात्र निवारण होतें, ह्या प्रमाणेंच न्यायाधीश, वैद्य, ह्यांविषयीं जाणावें. आतां पदार्थ एका ठिकाणून दुसऱ्या ठिकाणीं नेणारे जे गाडीवाले, बैलवाले, गलबतवाले, व्यापारी, उदमी, ह्यांच्या श्रमाचीं कार्येंही तिसऱ्या प्रकारांतच घालावीं; कां कीं, त्यांच्या श्रमापासून पदार्थांचे ठायीं नवा धर्म उत्पन्न होत नाहीं; असें कोणी म्हणेल; परंतु हें त्याचें म्हणणें बरोबर नाहीं; कां कीं, त्या लोकांच्या श्रमानें "विवक्षित स्थळीं असणें," हा गुण पदार्थांवर उत्पन्न होतो, म्हणून वर सांगितलेंच आहे, व हा गुण उत्पन्न झाल्यामुळें पदार्थास विशेष किंमत येते, तस्मात् त्या लोकांचा श्रम, तिसऱ्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा नव्हे, पहिल्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा होय.

हे जे श्रमांच्या कार्यांचे तीन प्रकार सांगितले, त्यांवरून श्रमाचेही तीन प्रकार सिद्ध होतात. आतां ह्या प्रकारांपैकीं कोणत्या प्रकारच्या श्रमास धनोत्पादक म्हणावें, व कोणत्यास म्हणूं नये, ह्याचा

विचार केला पाहिजे. तिसऱ्या प्रकारचीं श्रमकार्यें जीं आनंदरूप किंवा सेवारूप असतात, त्या कार्यांस कोणीही धन शब्द कदापि लावीत नाहीं. लोकांत ज्या ज्या पदार्थांस धन शब्द लागतो, तो तो पदार्थ सांठवून ठेवण्याजोगा असावा लागतो. ज्या ज्या वस्तू उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावतात, व ज्या भावी उपयोगाकरतां राखून ठेवतां येत नाहींत, अशा वस्तूंस धन शब्द कोणी लावीत नाहींत, असें वाटतें. आतां दुसऱ्या प्रकारचा जो श्रम आहे, त्यापासून मनुष्याच्या ठायीं ज्ञान, कौशल्य, सद्गुण वगैरे धर्म उत्पन्न होतात, त्या गुणांस धन शब्द लावावा हें सयुक्तिक आहे. यद्यपि लौकिकांत त्यांस धन म्हणत नाहींत, तथापि हत्यारें, यंत्रें ह्यांस जसा धन शब्द लागतो, तसा त्या हत्यारांसारखेच धनोत्पत्तीस आवश्यक, जे कलाकौशल्यादि गुण, त्यांस धन शब्द लागावा हें योग्य आहे. कां कीं ह्या प्रकारचे गुण, स्थायी, व संचित होण्यास योग्य, आहेत. परंतु वाचणाऱ्यांनीं इतकें मात्र मनांत ठेवलें पाहिजे कीं, येथें मनुष्याच्या कलाकौशल्यादि गुणांस जें धन म्हटलें, तें कलाकौशल्यादि स्वतः चांगलीं व इष्ट आहेत, म्हणून म्हटलें नाहीं; तर त्यांपासून मूर्तपदार्थरूप धन उत्पन्न होतें, म्हणून म्हटलें आहे. सारांश, ह्या ग्रंथांत धन शब्द हा, मनुष्यास इष्ट, व श्रमसाध्य, असे जे मूर्तद्रव्यांचे पदार्थ त्यांस व त्या पदार्थांच्या उत्पत्तीस आवश्यक जे जे मनुष्याचे गुण, त्यांस लावला आहे. ज्या ज्या श्रमानें वर सांगितलेल्या लक्षणाचें धन, साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होतें, त्या सर्व श्रमास उत्पादक श्रम म्हटलें आहे, व असें फल, ज्या श्रमापासून साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होत नाहीं, (मग त्या श्रमापासून केवढाही मोठा दुसरा उपयोग होवो) त्यास अर्थशास्त्रांत अनुत्पादक म्हटलें आहे. पाहा, संकटकाळीं मित्राचा जीव वांचवणें, हें फार मोठें काम आहे खरें, तरी ह्या कामास जो श्रम लागला, त्या श्रमास, त्या वांचलेल्या मित्राच्या हातून पुढें कांहीं धन न उत्पन्न झाल्यास, अर्थशास्त्राच्या अनुरोधानें उत्पादक शब्द लागणार नाहीं. जो मनुष्य धार्मिक आहे. त्याच्या दृष्टीनें यात्रेस जाण्यास जो श्रम लागतो, तो अमोलिक कामाकडे लागतो, तथापि ह्या शास्त्राच्या दृष्टीनें तो श्रम अनुत्पादकच समजला पाहिजे. आतां अनुत्पादक श्रमानें बहुतकरून कोणत्या एकाद्या देशांतील किंवा जगांतील संपत्ति वाढत नाहीं खरी; तरी तसल्या श्रमानें एखाद्या पुरुषाची संपत्ति बहुत ठिकाणीं वाढते. उदाहरण, गवई गाणें गाऊन, गाण्याचा ज्यांस शोक असतो त्यांपासून धन मिळवतो. ह्या उदाहरणांत, गवयाची संपत्ति अनुत्पादकही श्रमानें वाढली. परंतु त्यास जें धन मिळतें, तेवढें देणाऱ्याचें कमी होतें. त्याच्या श्रमापासून शेतकरी वगैरे ह्यांच्या श्रमाच्या सारखें नवें धन उत्पन्न होत नाहीं. एका मनुष्याच्या सारखें देशासही कांहीं उदाहरणांत दुसऱ्या देशापासून अनुत्पादक श्रमानें धन प्राप्त होतें. जसें, एका देशांतले गाणारे किंवा तमासगीर वगैरे, दुसऱ्या देशांतून पैसा मिळवून आणतात. ह्या स्थळीं त्यांच्या अनुत्पादक श्रमानें एक देश सधन होतो खरा, परंतु त्याच मानानें दुसरा देश भिकारी होतो. ह्या सर्व उदाहरणांत एक ठिकाणची संपत्ति दुसरे ठिकाणीं जाते, व धन उत्पन्न करणारे जे गवई वगैरे, हे जितक्या धनाचा व्यय करतात, तितकें धन जगांतून नाहींसें झालें, असें समजलें पाहिजे. आतां ह्या श्रमकर्त्यांच्या श्रमापासून कांहीं आनंदादिक उपयोग झाला; तर त्यांनीं नष्ट केलेलें धन कामास लागलें, आणि त्यांच्या श्रमापासून कांहीं उपयोग न झाल्यास, तें व्यर्थ गेलें, असें समजावें.

धनाचा व्यर्थ नाश अनुत्पादक श्रमकर्त्यांपासूनच होतो, असें नाहीं, तर उत्पादक श्रमकर्त्यांकडूनही तो कधीं कधीं होतो. उत्पादक श्रमकर्त्यांचे ठायीं विवक्षित चातुर्य नसल्यामुळें, किंवा त्यांस काम करावयास सांगणाऱ्यांस यथास्थित कामाची माहीतगारी व विचार नसल्यामुळें कामांत अनावश्यक खर्च झाला, तर तो खर्च व्यर्थ मानला पाहिजे. उदाहरण, शेतकऱ्यानें, दोन बैलांनीं जें काम व्हावयाचें, त्यास तीन बैल लाविले, किंवा जेथें थोड्या खर्चानें विहीर खणून होते तेथें मूर्खपणानें अधिक खर्च करून नदीचा पाट आणला तर अधिक केलेला खर्च व्यर्थ गेला असें समजावें. तसेंच बाजारांत ज्या

पदार्थांचा जितका खप असतो, त्यापेक्षां तो पदार्थ अधिक उत्पन्न केला असतां, तो पदार्थ उत्पन्न करणाऱ्याच्या श्रमापासून विवक्षित धन उत्पन्न झालें तरी तो श्रम व वास्तविक विचार करून पाहातां व्यर्थच होय, तसेंच, जेव्हां ज्या पदार्थांची लोकांस गरज असती, तेव्हां तो पदार्थ उत्पन्न न करतां, ज्या पदार्थांची गरज पुढें कांहीं काळानें लागणार, तो पदार्थ उत्पन्न केल्यास त्यांतही देशाचें नुकसान आहे.

अनुत्पादक आणि उत्पादक असा भेद जसा श्रमाचा होतो, तसा धननाशाचाही होतो. म्हणजे कांहीं धननाश धनोत्पत्तीस प्रयोजक आहे, व कांहीं धननाश तीस प्रयोजक नाहीं. मजूर वगैरे उत्पादक लोक, अन्न, वस्त्र, द्रव्य, हत्यारें वगैरे धनाचा नाश करतात खरा; परंतु तो नाश नव्या धनाच्या उत्पत्तीस कारण आहे. आणि गवई, तमासगीर, उगीच बसून खाणारे व ऐषाराम करणारे जे श्रीमंत लोक, ते खाऊनपिऊन धनाचा जो नाश करतात, तो नाश अनुत्पादक होय. उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम असा भेद सांगितला असतां, नाशांत उत्पादक व अनुत्पादक असा भेद सांगण्याचें स्वारस्य इतकेंच, कीं, देशांतील सर्वच लोक श्रम करणारे असतात, असें नाहीं; ह्यास्तव उत्पादक श्रम करणारे व अनुत्पादक श्रम करणारे ह्या भेदांत सर्वांचा संग्रह होत नाहीं. परंतु उत्पादकत्वेंकरून धननाश करणारे, व अनुत्पादकत्वेंकरून धननाश करणारे असा लोकांचा विभाग केला असतां, त्या विभागांत सर्वांचा समावेश होतो; कारण, देशांतला कोणताही मनुष्य घेतला, तरी, तो मनुष्य, वर सांगितलेल्या दोन प्रकारांपैकीं एका प्रकारानें धननाश करणारा असतोच असतो. आतां उत्पादक मनुष्यांनीं केलेला धननाशही नियमानें उत्पादक असतो, असें समजूं नये; तर उत्पादक मनुष्यें आपल्या आंगीं आरोग्य, व श्रम करण्याचें सामर्थ्य, हीं राहाण्याकरतां, किंवा तीं नवीं आणण्याकरतां, धनाचा जो नाश करतात, तो खेरीज करून, ते सुखोपभोगार्थ व ऐषारामींत जो धनाचा व्यय करतात, तो व्यय उत्पादक नव्हे; तर अनुत्पादकच होय. कां कीं, त्या व्ययानें नवें धन उत्पन्न होत नाहीं. सारांश, धनाचा जो व्यय केल्यावांचून नवें धन उत्पन्न व्हावयाचें नाहीं, तेवढा धनव्यय मात्र उत्पादक होय, मग धनाचा जो व्यय देशांतील जमीन चांगली सुपीक होण्याकरतां असो, किंवा द्रव्यें, हत्यारें, रस्ते वगैरे, व वाहक साधनें नवीं करण्याकरतां किंवा जुनीं नीट राखण्याकरतां असो, किंवा उत्पादक जे मजूर वगैरे लोक ह्यांचे ठायीं कलाकौशल्य, ज्ञान, करामत, शारीरबल, आरोग्य इत्यादिक उत्पादक गुण येण्याकरतां असो. पुष्कळ जिन्नस असे आहेत कीं, ज्यांचा नाश उत्पादकत्वेंकरून होतच नाहीं. पाहा, पैठणी, पागोटीं, शेले, पितांबर, शालजोड्या वगैरे वस्त्रें, पेढेबर्फी वगैरे मिठाई, इत्यादिकांचा व्यय सर्वकाल अनुत्पादकत्वें करूनच होतो. कां कीं, ह्या जिन्नसांच्या उपभोगेंकरून, त्यांच्यापेक्षां कमी खर्चांत होणाऱ्या मालाच्या उपभोगेंकरून मजुरांस जितकें बलादि येतें, त्यापेक्षां अधिक येत नाहीं. ह्या करतां ह्या पदार्थांच्या उत्पत्तीस जो श्रम लागतो, तो अनुत्पादक श्रम मानावा, असें कोणीं म्हटल्यास एका अंशीं तें म्हणणें संभवेल, व याप्रमाणें ज्या ज्या पदार्थांचा उपभोग अनुत्पादक लोक करतात, ते ते पदार्थ उत्पन्न करण्याचा श्रम अनुत्पादक श्रम म्हटल्यास एका अर्थी चालेल. भटांस खाण्यास अन्न उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्याचा श्रम व गाणाऱ्याचा श्रम, हे दोन्ही अर्थशास्त्राच्या दृष्टीनें सारखेच. त्यांच्यामध्यें भेद इतकाच, कीं पहिल्या श्रमानें, तदुत्पन्न फल जोंपर्यंत आहे, तों पर्यंत जग विशेष सधन होतें, व त्या फळाचा (धान्याचा) उत्पादकत्वेंकरून व्यय केल्यास, तो पहिला श्रम उत्पादक होण्याचा संभव असतो, आणि दुसरा श्रम उत्पादक होण्याचा मुळींच संभव असत नाहीं.

ह्या वरील विचारावरून, उत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा नाश होतो, तें धन उत्पन्न करणाऱ्यांचा श्रम, व उत्पादकत्वें करून, ज्या धनाचा नाश होत नाहीं, तें धन उत्पन्न करणाऱ्यांचा श्रम, असे श्रमाचे दोन विभाग होतात, व ह्या विभाग कळणें विशेषतः उपयोगी आहे. कोणताही देश घेतला असतां, त्यांतील एकंदर उत्पन्नाच्या कांहीं भागाचा सर्वकाळ उत्पादकत्वेंकरूनच व्यय होत असतो, व बाकी

राहिलेल्या उत्पन्नाच्या व्ययेंकरून, उत्पादक लोक अनुत्पादकर्त्वे करून ज्या धनाचा व्यय करतात तें धन उत्पन्न होत असतें व अनुत्पादक लोकांचा निर्वाह व ऐषाराम चालत असतात. उदाहरणार्थ असें कल्पितों कीं, कोणत्या एका देशांतील वार्षिक उत्पन्नांतील निमे उत्पन्न पहिल्या कामास लागतें, व निमे उत्पन्न दुसऱ्या कामाकडे लागतें; तर त्या देशांतील उत्पादक श्रमापैकीं, अर्धा श्रम मात्र तेथील स्थायी संपत्तीचें मूळ आहे व बाकीच्या अर्ध्या श्रमानें ज्या वस्तू उत्पन्न होतात, त्यांचा सर्व काल अनुत्पादकर्त्वेंकरून उपभोग होतो, मग त्या उत्पन्नाचा व्यय उत्पादक लोक करोत, किंवा अनुउत्पादक करोत; कोणीही ह्या निंमे उत्पन्नाचा व्यय केला तरी त्या व्ययाच्या योगानें त्या देशाच्या स्थायी संपत्तीची वृद्धि कदापि व्हावयाची नाहीं. ही गोष्ट स्पष्टपणें मनांत भरण्याकरतां असें कल्पूं, कीं अनुत्पादकर्त्वेंकरून ज्याध नाचा व्यय होतो, तें धन उत्पन्न करणारे आपला धंदा सोडून वर्षभर जर उगीच बसले; आणि ज्या धनाचा उत्पादकर्त्वेंकरून व्यय होतो तें धन उत्पन्न करणाऱ्यांनीं आपल्या श्रमानें सर्वांच्या निर्वाहाचे पदार्थ नेहमींच्याप्रमाणें उत्पन्न केले, तर, असें करण्याचा परिणाम इतकाच होईल, कीं ऐषअरामी करावयास कोणास सांपडावयाचें नाहीं. परंतु अनुत्पादक लोक खेरीजकरून सर्व लोकांस खाण्यापिण्यास मिळेल; व त्या देशांतील स्थायी संपत्ति उत्पन्न करण्याची सामग्री पूर्ववत् यथास्थित राहील, तिचा क्षय अगदीं व्हावयाचा नाही. परंतु हीच कल्पना जर उलट केली, म्हणजे उत्पादकर्त्वेंकरून नाश पावणाऱ्या धनाचे कर्त्ते, वर्षभर उगीच रिकामे बसले, आणि अनुपादकर्त्वेंकरून नाश पावणाऱ्या संपत्तीच्या कर्त्यांनीं आपले धंदे केले, तर वर्षाच्या अंतीं ऐषअरामीचे आणि निर्वाहाचे सर्व जिन्नस एकदम नाहींसे होऊन तो देश अगदीं भिकारी होईल.

इंग्लंडासारखे विद्याचारसंपन्न व धनाढ्य जे देश आहेत, त्या देशांतील वार्षिक उत्पादनाचा पुष्कळ अंश अनुत्पादक उपयोगास लागतो, व असें घडतें ही गोष्ट एक प्रकारें मोठी आनंदाची आहे. धनाचा इतका अनुत्पादक व्यय होतो म्हणून कोणास वाईट वाटेल, तर तसें वाटणें ही चूक होय. ह्या गोष्टीबद्दल खेद करणें, म्हणजे लोकांच्या ज्या चातुर्यानें त्यांस थोड्या श्रमानें सगळ्यांपुरते, निर्वाहोपयोगी, पदार्थ करतां येऊन, आणखी ऐषअरामीचे पदार्थ उत्पन्न करावयास व विद्यादिकांची वृद्धि करावयास वेळ सांपडतो, त्या चातुर्याविषयीं खेद करणें होय. तर ह्या गोष्टीनें विचारी व ज्ञात्या पुरुषांस खेद होऊं नये, उलटा आनंद व्हावा. ह्या स्थळीं खेदावह गोष्ट इतकीच कीं, ही जी उपभोग्य संपत्ति होती, तिचा यथायोग्य अंश सर्वांस प्राप्त होत नाहीं. परंतु त्या गोष्टीचा विचार एथें करावयाचा नाहीं, तो विचार, जेव्हां संपत्तीच्या विभागाचा विषय येईल तेव्हां होईल.

## भाग चवथा.

# भांडवलाविषयीं विचार.

पहिल्या भागांत धनाच्या उत्पत्तीस श्रम व सृष्टपदार्थ, अशीं दोन मुख्य कारणें आहेत, असें सांगितलें; परंतु लोक शाहाणे व विद्याचारसंपन्न होऊन, जसजसे नानाप्रकारचे सुखोपयोगी व ऐषआरामीचे पदार्थ करूं लागतात, तसतशी त्यांस संपत्ति उत्पन्न करण्यास तिसऱ्या कारणाची अपेक्षा लागते; त्या कारणावांचून संपत्ति होत नाहीं. तें कारण, परंपरेनें कारण, असा जो मागें श्रम सांगितला, त्या श्रमानें उत्पन्न झालेली द्रव्यादि सामग्री, ही जी पूर्वश्रमेंकरून संचित करून ठेवलेली सामग्री, हीस अर्थशास्त्रकार भांडवल असें म्हणतात. भांडवलापासून धनोत्पत्तीस कोणकोणता उपयोग घडतो, हें पुरतेंपणीं समजणें फार आवश्यक आहे. कां कीं, अर्थशास्त्रांतील विषयासंबंधी ज्या बहुत गैरसमजुती लोकांत आहेत, त्यापैकीं पुष्कळ गैरसमजुतींचें मूळ, भांडवलाच्या वास्तविक स्वरूपाचें व त्याच्या उपयोगाचें अज्ञान हें आहे.

ज्यांस अर्थशास्त्राची वासनासुद्धां नाहीं, असे पुरुष भांडवल म्हणजे नाणें असें समजतात; परंतु केवळ नाणेंच धन नव्हे, ह्या विषयीं जीं प्रमाणें पहिल्या भागांत सांगितलीं आहेत, त्यांजवरूनच भांडवल व नाणें हीं एक, ही समजूत भ्रांति आहे, असें स्पष्ट होतें. पाहा, धनोत्पत्तीस सौकर्य आणणें, हें भांडवलाचें काम होय, तें काम नाण्यापासून साक्षात् होत नाहीं, तेव्हां नाण्यासच भांडवल कसें म्हणावें? ज्यापाशीं नाणें आहे, त्यास कांही धनाची उत्पत्ति करणें झाल्यास, त्यास तें नाणें देऊन, धनोत्पत्तीस आवश्यक जीं द्रव्यें, हत्यारें, किंवा दुसरी सामग्री ती घ्यावी लागते, ह्या करतां धनोपत्तीचें वास्तविक कारण म्हटलें म्हणजे नाणें नव्हे, तर द्रव्यें, हत्यारें, संरक्षणसाधनें, व मजुरांचें अन्नवस्त्र, इत्यादि होत. त्यांस भांडवल हें नांव वास्तविकपणें योग्य आहे.

भांडवलाचें खरें स्वरूप व त्याचीं खरीं प्रयोजनें, वाचणाऱ्यांच्या ध्यानांत पक्केपणीं ठसावीं, म्हणून एक उदाहरण देतों.—साळ्याचे उदाहरणांत, त्याच्या भांडवलाचा कांहीं अंश त्याच्या मागांत असतो; कांहीं भाग हत्यारांत, कांहीं सुतांत, कांहीं, कामांस लागलेल्या मजुरांच्या अन्नवस्त्रांत, असा असतो. आतां वास्तविक पाहिलें असतां, साळी किंवा तांबट वगैरे बहुतेक भांडवलवाले, हे मजुरांस अन्नवस्त्र खरोखरी देत नाहींत, पैसा देतात. परंतु सूक्ष्म विचारें पाहिलें असतां, तो पैसा, दाणेवाल्यावर व कापडवाल्यावर वगैरे दिलेल्या चिठ्यांसारखाच आहे. ह्याकरतां तेच तें अन्न वगैरे देतात, असें म्हटलें असतां चिंता नाहीं. तसेंच, साळी, तांबट वगैरे उदम्यापाशीं जो तयार झालेला माल असतो, तोही त्यांच्या भांडवलाचाच एक भाग होय. कां कीं, तो माल विकून ते द्रव्यें, हत्यारें वगैरे सामग्री पुनः घेतात. परंतु त्यांच्या जवळचा सगळाच तयार केलेला माल भांडवल समजूं नये. कांकीं, त्यांतील कांही अंश विकून ते आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाचे व कदाचित् ऐषआरामीचे पदार्थ घेतात; तो अंश धनोत्पत्तीस कारण नाहीं, म्हणून तो भांडवल नव्हे. आतां ह्या उदाहरणांवरून भांडवलाचें वास्तविक स्वरूप व त्याचीं कार्यें हीं स्पष्टपणें व्यक्त होतात, व द्रव्यादि सामग्रीरूप जें वास्तविक भांडवल, तें त्या सामग्रीरूपानेंच सर्वदां भांडवलवाल्यांजवळ नसतें, हेंही स्पष्ट होतें.

हीच गोष्ट कांहीं उदाहरणांनीं विशेषतः स्पष्ट करतों—पाहा, कोणी एक तांबट आहे; ज्याजवळचीं हत्यारें, तांबें वगैरे ह्यांचे पत्रे, हे खेरीजकरून बाकीचें त्याचें भांडवल, तयार झालेल्या मांड्यांच्या

रूपानें आहे. ह्या स्थळीं मांड्यांनीं मजुरांस पोसतां येत नाहीं, हें स्पष्टच आहे. परंतु तीं मांडीं विकून अन्न घेतां येतें, ह्यास्तव त्या मांड्यांस मांडवल म्हणावयास कांहीं चिंता नाहीं. असो. आतां अशी कल्पना करतों, कीं तो मांडीवाला तांबट, आपल्या संपत्तींतून कांहीं संपत्ति खर्चून कांहीं चाकर, कांहीं घोडे वगैरे इतमाम राखीत होता, परंतु त्याची इच्छा फिरून, त्यानें घोडे, चाकर वगैरे बाळगण्याचें सोडून, त्यांजकडे जो पैसा खर्चत असे त्याचें मांडवल करावयाचें, म्हणजे तो पैका मजुरांस देऊन त्यांजकडून कांहीं नवें धन उत्पन्न करावयाचें, असा बेत केला; असें झालें असतां घोडे व चाकर अनुत्पादकत्वेंकरून ज्या अन्नाचा वगैरे व्यय करीत होते, तें अन्न आतां मजुरांस मिळालें, अणि ही सर्व अदलाबदल, तांबटानें आपली इच्छा फिरवल्यानें झाली. आतां ही कल्पना फिरवून असें कल्पूं, कीं तो तांबट पूर्वी आपली संपत्ति घोडे वगैरे बाळगण्यांत घालवीत नव्हता, तर तो शेलेपागोटीं घेण्यांत घालवीत असे, आणि शेलेपागोटीं घेण्यांत जी संपत्ति जात होती, त्या संपत्तीचें मांडवल करण्याचें त्या तांबटाच्या मनांत आलें. ह्या उदाहरणांत त्याची संपत्ति शेलेपागोट्यांत जाणार नाहीं, तर ती परिणामीं मजुरांस मिळून, त्यांच्या हातून अन्न विकत घेण्यांत जाईल. यद्यपि मागल्या उदाहरणांतल्या प्रमाणें येथें घोड्याचें किंवा चाकरांचें अन्न राहिलें नाही. तथापि मजुरांस जें अन्न पाहिजे, तें परदेशांतून येईल; व परदेशांतून येण्याची सोय नसली तर, एक वर्ष मात्र अडचण सोसावी लागेल; परंतु दुसऱ्या वर्षी शेलेपागोटीं कमी उत्पन्न होऊन, अन्न अधिक उत्पन्न होईल, आणि पुढें तसाच क्रम चालेल. तस्मात्, ह्या विचारावरून अशी गोष्ट उघड सिद्ध होते, कीं मनुष्याजवळ कोणत्याही प्रकारचें धन कां असेना, त्या धनाचा अंश त्यानें अनुत्पादकत्वें करून खर्चावयाचा बंद करून, उत्पादकत्वें करून खर्चावयाचा संकल्प केला असतां, त्याच्या तेवढ्या संकल्पानेंच अनुत्पादकत्वेंकरून नाश पावणाऱ्या पदार्थांची उत्पत्ति मना होऊन उत्पादकत्वेंकरून नाश पावणारे अन्नादि पदार्थ उत्पन्न होऊं लागतात. सारांश, मांडवलपणा किंवा गैरमांडवलपणा हीं तादृश पदार्थांच्या स्वरूपावर नाहींत; तर त्या पदार्थांचा धनी, त्यांचा उपयोग ज्या प्रकारेंकरून इच्छील, त्या प्रकारावर आहेत; व पदार्थ स्वतः खरें मांडवल होण्यास कितीही अयोग्य असला, तरी त्याच्या धन्यानें तो नवें धन उत्पन्न करण्याकडे योजण्याची इच्छा केली, म्हणजे तो परिणामीं मांडवलाचें रूप पावतो. ह्या प्रमाणें नव्या धनाच्या उत्पत्तीच्या उद्देशेंकरून, भिन्नभिन्न पुरुषांनीं योजलेले जे आपापल्या संपत्तीचे अंश त्या सर्व अंशांचा समुदाय मिळून देशाचें मांडवल होय. मग ते धनांश स्वतः नवी संपत्ति उत्पन्न करण्यास अयोग्य असले तरी ते, हरएक तऱ्हेनें परिणामीं संपत्ति उत्पन्न करण्यास योग्य असें रूप पावतात. नवें धन उत्पन्न करण्याच्या उद्देशानें जो जो धनांश आपण खर्चतों, तो तो मांडवल होय, असा सिद्धांत झाला. त्या सिद्धांतापासून सर्व मांडवलाचा व्यय नवें धन उत्पन्न करण्याकडे होतो, असा दुसरा सिद्धांत गर्भित होतो. परंतु ह्या दुसरा सिद्धांत सर्वत्र खरा असत नाहीं, त्यास कांहीं अपवादस्थलें आहेत, तीं सांगितलीं पाहिजेत. पाहा, कोणीएकापाशीं कांहीं धन आहे, व तें त्याच्या मनांत संपत्ति उत्पन्न करण्याकडे लावावयाचें आहे, परंतु त्यास मनाजोगे धंदे सांपडत नाहींत; तर ह्या स्थळीं, त्या मालकाच्या त्या धनापासून कांहीं संपत्ति उत्पन्न न होतांही त्या धनास मांडवल समजलें पाहिजे. तसेंच, एकाद्या उद्योजवळ तयार झालेला माल पुष्कळ आहे, व तो कांहीं काळ न खपतां उगीच पडला आहे. येथेंही त्या मालापासून नव्या संपत्तीच्या उत्पन्नास साहाय्य न मिळालें तरी त्या मालास देशाच्या मांडवलाचा एक अंश मानलें पाहिजे. तसेंच, कांहीं ठिकाणीं थोड्या मांडवलानें काम चालवयाजोगें असतांही, राजनियमामुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणावरून अधिक मांडवल खर्चावें लागतें; त्या स्थलीं त्या अधिक मांडवलापासून संपत्ति उत्पन्न होत नाहीं. पाहा, शेतकरी शेताबद्दल सरकारास जो धारा देतो, तो त्यास आगोटीच्या वेळीं द्यावा लागत असला, तर ह्या उदाहरणांत साऱ्याबद्दल जें धन द्यावयाचें, तें धनधान्याबद्दलच्या

मांडवलांतून द्यावें लागतें. कारण, अन्न, द्रव्य, हत्यारें, वगैरे सामग्री असल्यावांचून, जसें नवें धान्यरूप धन उत्पन्न होत नाहीं, तसेंच धान्याचें द्रव्य असल्यावांचूनही होत नाहीं; म्हणून त्या द्रव्यासही मांडवल म्हटलें पाहिजे. परंतु भांडवलाच्या ह्या अंशानें नवें धन उत्पन्न होतेंच, असा नियम नाहीं. सरकारानें धान्याबद्दल घेतलेलें धन उत्पादकरवेंकरून खर्चल्यास, त्यापासून नव्या धनाची उत्पत्ति होईल; व त्यानें तें अनुत्पादक श्रम करणाऱ्या शिपायांस व चाकरांस वगैरे दिल्यास, त्यापासून नवें धन उत्पन्न व्हावयाचें नाहीं. ह्यावरून असें सिद्ध होतें, कीं वर लिहिलेल्या रीतीनें कर घेण्याची रीति देशांत धनोत्पत्ति होण्यास प्रतिबंधक आहे. कां कीं, तसली रीत नसतां देशांतील मांडवलापासून संपत्ति व्हावयाची जी योग्यता असते, ती तसल्या रीतीनें कमी होते.

तसाच, देशांतल्या मांडवलाचा मोठा अंश मजूर लोकांस व दुसऱ्या उत्पादक श्रम करणाऱ्या लोकांस मजुरी व पगार देण्याकडे जातो. परंतु तो सर्वच अंश नव्या धनाच्या उत्पत्तीस आवश्यक असतो, त्यावांचून ती व्हावयाची नाहीं, असें नसतें. अन्नवस्त्रादि ज्या पदार्थांवांचून मजूर वगैरे ह्यांचें जीवन व्हावयाचें नाहीं, किंवा त्यांच्या आंगीं चांगली काम करण्याची शक्ति राहावयाची नाहीं, ते पदार्थ किंवा ते पदार्थ घ्यावयाकरतां जो मजुरीचा अंश देतात, तो खेरीज करून, सुखाचे किंवा ऐषआरामीचे पदार्थ जे मजूर वगैरे उपभोगतात, ते पदार्थ किंवा ते घेण्याकडे मजुरीचा जो अंश जातो तो, ह्यांहींकरून नवें धन उत्पन्न होतें, असें म्हणतां येत नाहीं, व हा अंश धनोत्पत्तीच्या पूर्वी असलाच पाहिजे असेंही नाहीं. तो नसला तरी, जितकें धन व्हावयाचें तितकें होईल. तस्मात् ही गोष्ट स्पष्ट आहे कीं हल्लीं मजुरी देण्याची जी चाल आहे, ती प्रमाणें पाहातां, धनोत्पत्तीस वास्तविक आवश्यक जें मांडवल आहे, त्यापेक्षां अधिक मांडवल खर्चावें लागतें, आणि मांडवलवाला नवें धन उत्पन्न व्हावें म्हणून जें धन योजतो, त्या सर्व धनाचा उत्पादकरवेंकरून खर्च होत नाहीं. वर केलेल्या प्रतिपादनावरून सर्व श्रमकर्त्यांचें उपजीवन मांडवलावरच होतें, असा सिद्धांत घेऊन आपण चाललों आहों, असें वाचणाऱ्यांच्या ध्यानांत स्पष्टपणीं आलेंच असेल, व हा सिद्धांत विचार करून पाहातां खरा आहे. आतां शेतकरी, तांबट, चिसाडी वगैरे पुष्कळ श्रमकर्ते आपल्या उत्पन्नावर निर्वाह करून नवा माल उत्पन्न करतात, ते सर्वच लोकांपासून मांडवल उसनें घेत नाहींत, ह्यावरून त्यांचें उपजीवन मांडवलावर होत नाही, असें समजूं नये. कां कीं तेही, वास्तविक पाहातां, मांडवलावरच उपजीवन करतात, परंतु तें मांडवल त्यांस कोणी मांडवलवाला देत नाहीं; तें त्यांचेंच असतें. शेतकरी शेतकीचें काम चाललें असतां मागल्या वर्षी श्रम करून उत्पन्न केलेल्या धान्यावर उपजीवन करतो, प्रकृत काळच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या धान्यावर करीत नाहीं, हें स्पष्टच आहे. ह्याप्रमाणें इतर उदाहरणांतही समजावें. तस्मात् नवें धन उत्पन्न करणाऱ्या मनुष्यांस उपजीवन होण्यास जें धन लागतें तें धन मांडवल, मग तें घरचें असो, किंवा त्यांनीं दुसऱ्या कोणापासून उसनवार घेतलें असो. त्या धनाचा जो व्यय होतो, तो उत्पादक व्यय होय, असें उघड सिद्ध होतें.

वर बरींच उदाहरणें देऊन मांडवलाच्या स्वरूपाचें प्रतिपादन केलें, तथापि त्याच विषयाचें आणखीं थोडेंसें निरूपण होऊन, तो वाचणाऱ्यांच्या मनांत पूर्णपणीं ठसावा, म्हणून आणखीं एक उदाहरण देतों. कां कीं, कोणत्याही शास्त्राच्या विषयाविषयीं लोकांत ज्या भ्रांति असतात, त्या, त्या शास्त्राच्या मूलाधारभूत विषयांचें पूर्ण ज्ञान नसल्यामुळें उत्पन्न झाल्या असतात; ह्याकरतां ह्या मूल विषयाचें जितकें स्पष्टीकरण होईल तितकें चांगलें. असो; जे लोक स्वतः नवें धन उत्पन्न करीत नाहींत, पण आपलें धन दुसऱ्यास उसनें देऊन त्याच्या व्याजावर उपजीवन करतात, त्यांचें धन देशाच्या मांडवलांत गणावें किंवा न गणावें, व गणावयाचें असल्यास कोणत्या उदाहरणांत गणावें, व कोणत्यांत गणूं नये ? ह्याचें विवेचन करतों.—

तीनचार महिन्यांत खाण्यास अन्न जर नसेल तर त्याच्यानें शेतकी कशी होईल? ह्या प्रमाणेंच तांबट मांडीं करतो, त्याची मांडीं तयार होऊन तीं विकत तोंपर्यंत त्यास खाण्याची वगैरे तजवीज असल्या-वांचून त्याच्या हातून तो धंदा व्हावयाचा नाहीं. गरीब लोक आपल्या मुलांस विद्या वगैरे शिकवीत नाहींत, म्हणून त्यांस कोणी मूर्ख म्हणतात; परंतु हा दोष सर्वत्रच त्यांकडे असत नाहीं; कितीएक आईबापांचे मनांत, आपल्या मुलांनीं चांगलें विद्याकलासंपन्न होऊन योग्यतेस यावें, असें असतें; पण तीं मुलें विद्या वगैरे शिकून त्या विद्यांपासून तयार होत तोंपर्यंत त्यांस पोटास घालण्याचें सामर्थ्य त्या आईबापांस नसतें. ही अन्नवस्त्ररूप सामग्री सर्व प्रकारच्या व्यापारांत आवश्यक आहे; ह्यास्तव देशांतील श्रमांपैकीं पुष्कळ श्रम ह्या सामग्रीच्या संपादनाकडे लागला असतां कोणत्याही देशांत पाहिलें असतां, इतर श्रम करणाऱ्यांच्या संख्येपेक्षां, शेतकीचे श्रम करणाऱ्यांची संख्या फार असते. तसेंच हल्लीं ह्या देशांतील शेतकरी वगैरे ह्यांच्या हातून विहिरी, बांध, इत्यादि कामें होण्यास ह्या सामग्रीचा अभावच मुख्य प्रतिबंधक आहे, असें वाटतें.

वर केलेल्या उपपादनावरून धान्यादि पदार्थांचा संचय करणें, हें, धनोत्पादक कृत्यांतलें एक मोठें कृत्य आहे, असें सिद्ध होतें. आतां ह्या अन्नरूप सामग्रीकडे लागलेला श्रम, व इतर सामग्रीकडे लागलेला श्रम, ह्यांच्यामध्यें एक मोठा भेद आहे, तो ह्या स्थळीं सांगितला पाहिजे. तो भेद हा कीं, कोष्टी कापड करतो, ह्या उदाहरणांत, कापूस लावणारा शेतकरी, माग करणारा सुतार, व त्या सुताराचीं विकणे घडणारा घिसाडी, इत्यादि लोकांस त्यांच्या श्रमाचें फळ वस्त्ररूप शेवटल्या उत्पन्नांतून मिळतें, परंतु ह्या सर्वांस खाण्याकरतां धान्य उत्पन्न करणारा जो शेतकरी, त्यास त्यांच्या श्रमाचें फळ धान्यरूपच होय. त्यास वस्त्रांतून कांहीं एक अंश मिळत नाहीं. यद्यपि कोणताही जिन्नस उत्पन्न करण्यास श्रम, हत्यारें, द्रव्यें, व अन्न, हीं सर्व सारखीं अवश्य आहेत, तथापि हत्यारें, व द्रव्य, ह्यांस स्वतः उपयोगित्व नाहीं, दुसऱ्या पदार्थांच्या उत्पत्तिद्वारा उपयोगित्व आहे, म्हणून त्यांच्या उत्पत्तीकरतां जे श्रम करतात, त्यांस त्यांच्या श्रमाचें फळ शेवटच्या उत्पन्नांतूनच आलें पाहिजे. परंतु अन्नाची गोष्टी तशी नाहीं. तें मनुष्यांची क्षुधा शांत करण्यास स्वतः कारण आहे. अन्न उत्पन्न करणाऱ्यांस त्यांच्या श्रमाचें अन्नरूपच फल प्राप्त होतें; ह्यास्तव त्यांस तें अन्न खाऊन उत्पन्न केलेल्या पदार्थांतून फल कल्पिण्याची गरज नाहीं. ह्या सर्व विचारांतील तत्त्व इतकेंच आहे कीं कापूस पेरणाऱ्याच्या श्रमापासून, वस्त्रें विणणाऱ्यांच्या श्रमापावेतों, सर्व श्रमांचें फल वस्त्रेंच होत व त्याकरतांच ते श्रम करतात. परंतु त्यांचें अन्न उत्पन्न करणारा शेतकरी, जो श्रम करतो, तो वस्त्राकरतां करीत नाहीं; तर अन्नाकरतां करतो; म्हणून कापूस पेरणाऱ्यांस वगैरे वस्त्रांतून फल प्राप्त होतें, आणि अन्न उत्पन्न करणाऱ्यांस तें तसें प्राप्त होत नाही. सरकारानें, वस्त्रें कोणीं करूं नये, अशी मनाई केल्यास, कापूस पेरणारे वगैरे कोणीच श्रम करणार नाहींत, परंतु धान्य उत्पन्न करणारा आपलें काम करील. मजुरानें केलेल्या वस्त्रांतून त्याचें अन्न उत्पन्न करणाऱ्यास अंश मिळत नाहीं खरा, परंतु तें अन्न त्या मजुरास ज्या भांडवलवाल्यानें दिलें असतें, त्यास त्या वस्त्रांतून अंश मिळतो, पण तो अंश श्रमाबद्दल मिळत नाहीं; तर उपभोगाच्या विलंबाबद्दल मिळतो. पाहा, ज्या मनुष्याजवळ अन्नसंग्रह असतो, त्यास तें अन्न देऊन नानाप्रकारचे उपभोग्य पदार्थ प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य असतें; परंतु तो तसें न करितां आपल्या उपभोगास विलंब करून ज्या अर्थीं वस्त्रें वगैरे करणाऱ्या मजुरांस वगैरे तें देतो, त्याअर्थीं त्यांच्या श्रमाच्या फळांतून वांटा घेण्याचा त्याचा अधिकार आहे; आणि तो भांडवलवाला, त्यानें ज्या किमतीचें अन्न दिलें असेल त्या किंमतीचाच केवळ अंश घ्यावयाचा नाहीं. कां कीं, तितकाच अंश मिळाल्यास त्यानें कांहीं दिवस उपभोगाचा विलंब केल्याचें फळ काय? तर तो दिलेल्या भांडवलापेक्षां कांहीं अधिक अंश घेईल. त्या अधिक अंशास अर्थशास्त्रांत, व व्यवहारांत "नफा" असें नांव दिलें आहे. ह्या नफ्याची इच्छाच, मजुरांस

आपलें संचित अन्नरूप धन देण्याविषयीं, मांडवलवाल्याची प्रवृत्ति होण्यास, कारण आहे. ह्याप्रमाणें माग करणाऱ्या सुतारांस वगैरे, अन्नादि मांडवल देणाऱ्यांचा नफाही वस्त्रांतूनच निघतो. सारांश कोणताही माल उत्पन्न करणाऱ्यास जी अन्नरूप सामग्री लागते, ती उत्पन्न करण्यास जो श्रम लागतो, त्याचें फळ त्या मालांतून निघत नाहीं, तर तें अन्न देणाऱ्यांचा नफा मात्र त्या मालांतून निघतो, आणि अन्नाखेरीज जी सामग्री आहे, ती उत्पन्न करणाऱ्यांच्या श्रमाचें फळ, व त्यांस मांडवल देणाऱ्यांचा नफा, हीं दोनही त्या सामग्रीचे योगानें तयार झालेल्या मालांतून निघतात. हा विशेष, मजुरांस निर्वाहास आवश्यक जे अन्नासारखे वस्त्रप्रावरणादि दुसरे पदार्थ, त्यांविषयींही अन्नासारखाच समजावा. वरील विचारावरून असें दिसतें, कीं, धनोत्पत्तीस परंपरेनें कारण जो श्रम त्यामध्यें मजुरांच्या निर्वाहास आवश्यक, जे अन्नवस्त्रादि पदार्थ, तदुत्पादकश्रमाची गणना करावयाची गरज नाहीं. आतां अन्न उत्पन्न करण्यावांचून धनोत्पत्तीस परंपरेनें कारणीभूत, असा जो श्रम राहिला, त्याचे पांच प्रकार आहेत:—प्रथम प्रकार, द्रव्योत्पादक श्रम. ज्या द्रव्याचा माल होतो असें जें द्रव्य तें उत्पन्न करण्याचा श्रम. द्रव्य उत्पन्न करण्याचा श्रम दोन प्रकारचा आहे. कांहीं ठिकाणीं त्या द्रव्याचें संपादन करण्याचा, व कांहीं ठिकाणीं त्याची उत्पत्ति करण्याचा. इमारतीच्या कामांत, लांकडें, धोंडे, वगैरे द्रव्य, ह्यांची, मनुष्य आपल्या श्रमानें उत्पत्ति करीत नाहीं, तर संपादन करतो. तसेंच विटा, मडकीं, कौलें, वगैरे मालाचें प्रकृतिरूप कारण जी माती; व सोनें, रुपें, तांबें वगैरे धातु, हे ज्या मातींतून निघतात, ती माती; ह्यांची मानवी श्रमानें उत्पत्ति होत नाहीं, तर संपादन होतें, परंतु बहुत ठिकाणीं असें आहे कीं, श्रमानें तयार केलेले जे पदार्थ, ते दुसऱ्या जिनसांच्या उत्पत्तीस द्रव्यद्वारा कारण होतात, तसल्या द्रव्यांच्या उत्पत्तीसच श्रम लागतो. इमारतीच्या कामांत विटा, चुना, हीं द्रव्यें आहेत; हीं द्रव्यें आयतीं तयार सांपडत नाहींत; श्रमानें नवीं करावीं लागतात. सोनार, तांबट, लोहार, इत्यादिकांच्या कामांत लागणारीं, जीं, धातूरूप द्रव्यें, त्यांचीही उत्पत्ति श्रमावांचून होत नाहीं. धान्य उत्पन्न करण्याचा जो श्रम, तोही किती एक ठिकाणीं द्रव्योत्पादकच श्रम समजावा. कां कीं, धान्यरूप द्रव्याचेंच मुसारी, भटारी, यांचें सामान होतें. कांहीं ठिकाणीं माल उपभोगार्ह होण्याचे पूर्वी त्यास तीन, चार, वेळ द्रव्यावस्था येती. पिंजारी, कापूस पिंजतो; त्या पिंजलेल्या कापसाचें, सूत काढणारा सूत काढतो, त्या सुताचें कोष्टी वस्त्र विणतो, त्या वस्त्राचे, शिंपी, आंगरखे शिवतो. ह्या प्रकारचीं आणखींही उदाहरणें पुष्कळ सांपडतील. धनोत्पत्तीस परंपरेनें कारणीभूत जे श्रम त्यांपैकीं दुसरा प्रकार, साक्षात् कारण श्रमास सुलभत्व आणणारीं जीं हत्यारें किंवा विलणीं, तीं करण्याचा श्रम होय. येथें हत्यार शब्दानें कारकुनास लिहावयास उपयोगीं पडणारी जी टोपीची बरूची लेखणी तीपासून घड्याळें वगैरे नाजूक कामें करावयास जीं हजारों रुपयांच्या किमतीचीं, मोठमोठीं, यंत्रें लागतात, त्यांपर्यंत सर्व साधनें घ्यावयाचीं. कांहीं माल तयार करण्याच्या एकंदर श्रमांत हत्यारें करण्यासच श्रम फार पडतो. हल्लीं विलायतेंत वस्त्रें विणण्याचे वगैरे मोठमोठे कारखाने आहेत, त्या कारखान्यांत, यंत्ररूप हत्यारें घेण्यास मोठा खर्च लागतो. व त्या देशांत, हत्यारें तयार करण्याकडेसच बहुत लोकांचा श्रम लागतो.

आतां धनोत्पत्तीच्या कारणांपैकीं कांहीं कारणें अशीं आहेत, कीं जीं, द्रव्यें किंवा हत्यारें, ह्यांपैकीं एकांतही सामावत नाहींत. पाहा, लोहार, तांबट ह्यांच्या कामांत मट्टी पेटवण्यास कोळसे लागतात; तसाच परटास साबण लागतो; तसेंच हत्यारें वगैरे साफ करण्यास तेल वगैरे लागतें; ह्या असल्या पदार्थांस लोकांत द्रव्यही म्हणत नाहींत व हत्यारेंही म्हणत नाहींत, परंतु वस्तुतः पाहिलें असतां त्यांस हत्यारें असें म्हणणें हें मला बरें वाटतें. आतां द्रव्य व हत्यार ह्यांतला मुख्य भेद समजण्याकरतां त्यांचीं लक्षणें सांगतों. ज्या कारणास सोडून कार्य रहात नाहीं म्हणजे त्या कारणासच परिणामांतर होऊन कार्यता येते, त्यास द्रव्य म्हणतात, जसें चित्रांचें द्रव्य माती होय, व ज्या कारणास सोडून कार्य राहातें

त्यास हत्यार किंवा करण म्हणतात. जसें, भिंत घालण्यास करणी रंधा इत्यादि. ह्या लक्षणावरून पाहातां कोळसे वगैरे हत्यारें होत; द्रव्यें नव्हेत. कोणी द्रव्याचें व हत्यारांचें अशी लक्षणें करतात कीं, जें कारण एका कार्यास उपयोगीं पडलें असतां, तें कार्य आहे, तों पर्यंत दुसऱ्या कार्याचे उपयोगीं पडत नाहीं, तें द्रव्य होय, व जें कारण, त्याचें एक कार्य असून दुसऱ्या कार्यास उपयोगीं पडतें, तें हत्यार होय. पहिल्याचें उदाहरण विटा, तुळया, हीं घराचीं द्रव्यें होत. यद्यपि ह्या विटा व तुळया ह्यांनीं दुसरें नवें घर होईल, तथापि पहिल्या घराचा नाश झाल्यावांचून व्हावयाचें नाहीं. दुसऱ्याचें उदाहरण करणी, वांकस वगैरे होय. कां कीं एका करणीनें व वांकसानें एक घर बांधलें असतां तें तसेंच असून दुसरें बांधतां येतें. ह्या दुसऱ्या लक्षणाप्रमाणें कोळसे वगैरे द्रव्यें होत, व दुसरा भेद असा आहे, कीं ह्या दुसऱ्या मताप्रमाणें द्रव्य तयार करण्याच्या श्रमाचें सगळें फळ त्या द्रव्यापासून जी वस्तू झाली असेल त्याच वस्तूंतून निघालें पाहिजे; व हत्यारांचें तसें नाहीं. तर एका हत्यारानें जितक्या वस्तू तयार झाल्या असतील त्या सर्वांतून हें हत्यार तयार करण्याचें फळ प्राप्त होईल, एकींतूनच होणार नाहीं. हा जो वर बारीक विचार लिहिला, ह्याचा अर्थशास्त्रांत, व व्यवहारांत, तादृश मोठा उपयोग नाहीं, परंतु तेणेंकरून वाचणाऱ्यांची बुद्धि सूक्ष्म विचार करण्यास योग्य होते असें समजून हा विचार येथें लिहिला आहे.

तिसरा प्रकार संरक्षणश्रम. धनोत्पत्तीस द्रव्य व हत्यारें लागतात म्हणून वर सांगितलें. तदुत्पादक श्रमांखेरीज आणखी एक प्रकारचा श्रम धनोत्पत्तीस परंपरेनें कारण आहे. हा श्रम धनोत्पादक कृतीस विघ्न आणणारे व उत्पन्न केलेल्या मालाचा नाश करणारे जे वारा, पाणी, अग्नि, थंडी, उष्णता, वगैरे सृष्टपदार्थ; ह्यांच्या व चोरादिकांच्या, उपद्रवाचें निवारण करण्याचा होय. वखारी, कारखान्यांचीं घरें, गोठे, शेतांतले बांध, कुंपणें, वगैरे बांधण्याचा श्रम, ह्याच वर्गांत मोडतो. पण मजूरलोक ज्या घरांत राहतात, तीं बांधण्याचा श्रम, त्यांच्या खाण्याचें अन्न उत्पन्न करण्याच्या श्रमाप्रमाणें परंपरेनें धनोत्पादक श्रमामध्यें येत नाहीं. कां कीं तीं घरें वगैरे अन्नाप्रमाणें स्वतः उपयोगीं पडणारीं आहेत. गुराखी, मेंढके, इत्यादिकांचा श्रमही ह्याच वर्गांत समजावयाचा. तसेंच न्यायाधीश, फौजदार, कोतवाल, शिपाई, गस्तवाले, इत्यादि बहुतेक सरकारी मनुष्यें ह्यांस धनाच्या रक्षणाबद्दलच त्यांतूनच अंश मिळतो. ही गोष्ट खरी आहे, कीं न्यायाधीशप्रभृति धनाचें संरक्षणच करतात असें नाहीं, त्यांपासून दुसरींही लोकहितावह पुष्कळ कामें होतात. तसेंच धनोत्पादक लोक, सरकारास जो कर देतात, तो कर धनोत्पादक खर्चांमध्यें कोणी गणीत नाहींत, तरी वास्तविक पाहातां, सरकारास जो कर मिळतो, तो उत्पन्न केलेल्यां द्रव्यांतूनच मिळतो, व ज्या देशांत चांगलें सरकार असतें, तेथें त्यापासून धनोत्पत्तीस पुष्कळ उपयोगही पडतो. पाहा, सरकार जरीं नसतें, तरी लोकांस चोरादिकांचा प्रतिबंध करण्याकरतां पदरचें धन देऊन लोक ठेवावे लागतेच, तर तोच धनांश किंबहुना त्यापेक्षां फार कमी धनांश त्या प्रतिबंधाकरतां, ते हल्लीं सरकारास देतात, व असें करण्यांत आणखी एक मोठा फायदा असा आहे, कीं ज्यांच्या श्रमापासून त्यांच्या निर्वाहापुरतेंच धन उत्पन्न होतें व ह्यामुळें आपलें रक्षण होण्याकरतां दुसऱ्यास धन देण्याचें ज्यांस सामर्थ्य नसतें त्यांचेंसुद्धां आतां सरकारापासून संरक्षण होतें.

चवथा प्रकार वहनश्रम, कितीएक श्रम असे आहेत कीं ज्या श्रमांनीं नवा पदार्थ उत्पन्न होत नाहीं; परंतु उत्पन्न झालेले पदार्थ त्यांचा उपभोग करणाऱ्यांच्या हातीं जातात. ह्याच प्रकारचा श्रम करणारे बहुत लोक असतात. भाडेंवाले, बैलवाले, खलाशी, हमाल, हेलकरी, वगैरे. तसेंच गलबतें, गाड्या, वगैरे करण्याचा श्रम; तसेंच सडका, पूल, वाटेवरच्या विहिरी, तळीं वगैरे बांधण्याचा श्रम, ह्याचाही वहनश्रमांतच अंतर्भाव होतो. कधींकधीं सरकार आपल्या पदरचा खर्च करून रस्ते वगैरे

बांधून, लोकांस फुकट वहिवाटूं देतें. तथापि वास्तविक पाहातां, त्याच्या श्रमाचें फळ देशाच्या उत्पन्नांतूनच निघतें; व ह्या प्रकारचे रस्ते झाले, म्हणजे देशांतीलही उत्पन्न वाढतें. रस्ते चांगले झाले म्हणजे देशांतील उत्पन्न कसें वाढतें हें, अनेक देशांत परस्पर व्यापार असल्यानें दोन्हीं देशांचें कल्याण कसें होतें, हें कळले, म्हणजे कळेल.

व्यापारी, व उदमी, ह्यांचा श्रमही वहनश्रमांतच लेखावयाचा. आतां व्यापारी, व उदमी, ह्यांचा श्रम संपत्तीचा उत्पादक कसा, ह्याचें वर्णन करतों. व्यापारी वगैरे लोक जर नसते, तर निरनिराळे माल उत्पन्न करणाऱ्यांस स्वतः एकमेकांकडे खरेदी व विकरी करावयास जावें लागतें व तसें करण्यांत त्यांचा श्रम पुष्कळ व्यर्थ जाता. कधीं कधीं माल विकणारे व विकत घेणारे निरनिराळ्या देशांत, किंबहुना निरनिराळ्या द्विपांत देखील, असतात; तेव्हां हे व्यापारी वगैरे नसते, तर त्यांचा परस्पर व्यापार झाला नसता. हीच अडचण निवारण्याकरतां, प्रथम कांहीं नेमलेल्या वेळीं बाजार भरण्याची चाल निघाली असावी; ज्या लोकांत धान्य वगैरे शेतीच्याच उत्पन्नाचा व्यापार असे, त्यांस ही युक्ति बरीच सोईवार पडे. कां कीं, शेतकरी लोकांस वर्षांतून तीन चार महिनें, शेतकीचा उद्योग नसतो म्हणून त्यांस बाजारास जाण्यास फावे. परंतु जेव्हां लोकांत शिल्पाचे जिंनस होऊं लागले; तेव्हां ते जिंनस करण्यांस, आपलें काम संभाळून, बाजारास जाण्याची गैरसोय पडूं लागली, व त्या शिल्पी लोकांचे मजुरांस चारचार पांचपांच महिन्यांची वेगमी करण्याची शक्ति नसे, व शिल्पीलोक आपल्या कामांत नेहमी गुंतल्यामुळें, कोठें कोणता माल स्वस्त, व कोठें कोणता माहाग, विकतो हें कळण्याचें त्यांस कठीण पडूं लागलें, ह्यामुळें, दुकानदार, व्यापारी, उदमी ह्यांची गरज लोकांस लागूं लागली.

शिंपी, हलवाई, चांभार, कुंभार, वगैरे व्यापारी, धनाचे उत्पादक असून, तेच विकणारेही असतात. परंतु त्यामध्यें देखील जो कोणी हुशार असतो, तोच एकटा, घेवीदेवीचीं कामें करतो, व बाकीचे, माल तयार मात्र करतात. ज्या जिंनसांचा फार खप, व जे एकदम पुष्कळ केले असतां नफा आहे, असे जिन्नस उत्पन्न करणाऱ्यांस, फुटकळ विकरी करण्याचें काम करण्यापासून, तोटा आहे; ह्याकरतां तें काम ते करीत नाहींत. कापड विणणारे कोष्टी, भांडी करणारे तांबट, धान्य उत्पन्न करणारे शेतकरी, वगैरे ह्यांनीं दुकानें मांडून, फुटकळ विकरी करण्यांत घालवावयाचा वेळ, माल उत्पन्न करण्यांत घालविला असतां, त्यांचा विशेष नफा आहे; तसेंच पन्नास जिन्नस पन्नास ठिकाणीं घेण्यापेक्षां, ते सर्व जिन्नस एके ठिकाणीं मिळाले असतां, गिराईकांचा पुष्कळ काळ व श्रम वांचतात. पाहा, वाण्याच्या दुकानीं तूप, तेल, गूळ, साकर, वगैरे अनेक जिन्नस मिळतात, ते निरनिराळे ठिकाणीं घ्यावयास जावें लागलें असतां, गिराईकांस किती वेळ व किती श्रम पडतील ? तर ह्या सर्व अडचणी निवारण्याकरतां दुकानें घालण्याची चाल निघाली; ते दुकानवाले, नानाप्रकारचे जिन्नस त्या त्या उत्पन्नकर्त्यापासून विकत घेऊन, एके ठिकाणीं विकतात, तेणेंकरून त्या उत्पन्नकर्त्यांस आपआपल्या धंद्याकडे सतत लागतां येऊन, उत्पन्न पुष्कळ होतें. ह्यावरूनच माल फुटकळ विकणारे, व थोडथोडा माल घेऊन, तो दारोदार विकीत फिरणारे, ह्या सर्वांचा श्रम धनोत्पत्तीस, किंवा धनवृद्धीस परंपरेनें कारण मानला पाहिजे. हे श्रम करणारे जर नसतील, तर पुष्कळ तोटा होईल. पाहा, शिंपी, कोष्टी, वगैरे पुष्कळ लोकांचे व्यापार असे आहेत, कीं त्या लोकांनीं त्या व्यापाराकडे सर्वकाळ लावला असतां त्यांचा जितका नफा आहे, तितका त्यांनीं बाजारांत स्वतः जिन्नस विकावयास जाण्यांत नफा नाहीं. आतां फुटकळ विकणाऱ्यांच्या योगानें आळशी मनुष्याचा आळसही वाढेल, ही गोष्ट खरी आहे. तथापि ह्या एवढ्या कारणावरून त्यांचा धनवृद्धीस उपयोग नाहीं असें म्हणतां येत नाहीं. सारांश, ज्या मनुष्यास पदार्थ उत्तम प्रकारें करतां येतो तो पदार्थ करण्याकडे त्या मनुष्याची निर्वेध योजना, ज्या ज्या गोष्टींच्या योगें होते, ह्या सर्व गोष्टी, जगांतील धन वाढण्यास कारण आहेत असें समजावें.

धनोत्पत्तीस परंपरेने कारणीभूत श्रमाचे वर जे चार प्रकार सांगितले, ह्या प्रकारच्या श्रमाचें फल अचेतन पदार्थांवर उत्पन्न होऊन, तद्द्वारा तो श्रम धनोत्पत्तीस कारण होतो. आतां श्रमाचा आणखी एक प्रकार सांगावयाचा राहिला आहे. ह्या प्रकारच्या श्रमाचें फल अचेतन पदार्थांवर उत्पन्न होत नाहीं, तर सचेतन जे जीव, ह्यांवर तें उत्पन्न होतें. कोणत्याही मनुष्यास धनोत्पादक, करावयासाठीं त्यास कांहीं व्यापार, व तत्संबंधी कलाकौशल्य, हीं ल्हानपणापासून शिकवावीं लागतात; व हीं शिकवण्यास बराच श्रम करावा लागतो. ह्या श्रम केला नाहीं, तर मनुष्यास मोठेपणीं धन उत्पन्न करता यावयाचें नाहीं, म्हणून पंतोजी, व कलाकौशल्य शिकवणारे, जे लोक आहेत, त्यांचा श्रम, परंपरेनें धनोत्पत्तीस कारण मानला पाहिजे, व त्या श्रमाचें फल त्यांस देशांतील सामान्य उत्पन्नांतून प्राप्त झालें पाहिजे. यद्यपि एकेक मनुष्य घेऊन, त्याचा आपआपल्या मुलास शिकविण्याचा उद्देश पाहिला असतां, तीं मुलें विद्या शिकून पुढें जें धन उत्पन्न करतील, त्यांतून आपणास अंश मिळावा, असा असतो, असेंच केवळ म्हणतां येत नाहीं; ते त्यांच्याच कल्याणाकरतां त्यांस विद्या शिकवीत असतात; तथापि सर्व देश एकवट करून पाहिलें असतां, त्या देशांतील शिल्पी वगैरे लोक, जी विद्या शिकवितात, व जीं नाना प्रकारचीं कलाकौशल्यें संपादितात, त्या सर्व मेहनतीचें फल, त्यांस त्यांनीं उत्पन्न केलेल्या धनांतून प्राप्त झालें पाहिजे; अन्यथा त्यांची, श्रमाकडे प्रवृत्ति व्हावयाची नाहीं.

ह्याप्रमाणें, हस्तकौशल्य असो, किंवा कांहीं विद्या असो, ज्याच्या ज्याच्या योगानें म्हणून धनवृद्धि होते, तें हस्तकौशल्य, व ती विद्या, शिकण्याच्या व शिकवण्याच्या श्रमाची गणना धनोत्पादक श्रमांत केली पाहिजे; व त्या श्रमाचें फल, सर्व देश जें धन उत्पन्न करतो, त्या उत्पन्नांतून मिळालें पाहिजे. तसेंच धनोत्पादक ज्याचा श्रम आहे, अशा मनुष्यास आरोग्य राहाण्याकरतां, व त्यास रोग उत्पन्न झाले असतां, त्यांचें निवारण करण्याकरतां, ज्यांचा श्रम आवश्यक आहे, असे जे औषधीवैद्य, व शस्त्रवैद्य, ह्यांचा श्रमही, परंपरेनें धनोत्पत्तीस कारण मानिला पाहिजे. कांकीं असे लोक नसतील, तर धनोत्पत्तीस प्रतिबंध होईल. ह्या स्थळींही, एकएक मनुष्याची औषध घेण्याची प्रवृत्ति पाहिली असतां, ती पुढें आपणास धन उत्पन्न करतां यावें म्हणूनच नसते; तथापि सर्व देशाच्या धोरणानें पाहिलें असतां, वैद्यादिकांच्या श्रमाचें फल, सामान्य उत्पन्नांतूनच कल्पिलें पाहिजे. तसें त्यांस औषध वगैरे तयार करण्यास लागलेल्या श्रमाची मजूरी, व भांडवलाचा नफा, हींही सामान्य उत्पन्नांतूनच निघालीं पाहिजेत.

ह्या प्रमाणें देशाच्या संबंधानें पाहातां, नाना प्रकारचे ग्रंथकार, नव्यानव्या कल्पना काढणारे लोक, इत्यादिकांचा श्रमही, परंपरासंबंधानें, धनोत्पादक समजावा. तसा धर्मोपदेशकांचा श्रमही कांहीं अंशीं धनोत्पादक जाणावा, कारण तेणेंकरून जेथें लोकांस प्रामाणिकपणा, सत्यशीलता, मितव्ययता, इत्यादि गुण प्राप्त होतात, तेथें तद्द्वारा उत्पन्न झालेल्या धनास त्या धर्मोपदेशकाचा श्रम परंपरेनें कारण मानला पाहिजे; व त्या सर्व श्रमकर्त्यांस, त्यांच्या श्रमाचें फल देशाच्या सामान्य उत्पन्नांतून प्राप्त होणें योग्य आहे.

असे हे धनाच्या उत्पत्तीस, व वृद्धीस, कारणीभूत श्रमाचे बहुतेक प्रकार सांगितले; ह्यांखेरीज कांहीं राहिले असल्यास, ते, वाचणाऱ्यांनीं विचार केला असतां, त्यांच्या लक्षांत येण्यासारखे आहेत, म्हणून येथें त्यांच्या निरूपणाची तादृश गरज नाहीं.

—०००—

आपण वस्त्रें, अन्न, वगैरे वस्तूंचा उपभोग करून नाश करतों, तो त्या द्रव्यांचा करीत नाहीं, तर त्यांवरच्या इष्ट म्हणजे उपयुक्त, धर्मांचा नाश करून, तीं उपयोगी नाहींत असें करतों, असें आहे. म्हणून, वैद्य, न्यायाधीश, वगैरे ह्यांच्या श्रमास उत्पादक म्हणणारे असें विचारतात, कीं, "इष्टधर्मोत्पादक" असा जर उत्पादक शब्दाचा अर्थ आहे, तर तो शब्द दगडावर आकारविशेष उत्पन्न करणाऱ्या पाथरवटांच्याच श्रमांस कां लावावा ? आणि आरोग्य, विद्या, हे धर्म उत्पन्न करणारे वैद्य, शिक्षक, ह्यांच्या श्रमास तो शब्द कां लावूं नये ? आतां ह्या, वर सांगितलेल्या, लोकांचा श्रम उपयोगी आहे खरा, परंतु उत्पादक श्रम ह्या शब्दापासून लोक, "इष्टधर्मांचा उत्पादक श्रम", इतकाच अर्थ समजत नाहींत, तर वर लिहिल्याप्रमाणें "धनाचा उत्पादक श्रम" असें समजतात; म्हणजे श्रमानें उत्पन्न केलेला जो इष्टधर्म, तेणेंकरून युक्त जी वस्तू, ती, धनशब्दवाच्य असावी. तेव्हां आतां विचारणीय अंश हा झाला, कीं, धन कोणत्या वस्तूस म्हणावें, व कोणतीस म्हणूं नये, म्हणजे चाकरानें केलेल्या चाकरीस, गाणाऱ्यानें गाइलेल्या गाण्यास, वगैरे धन शब्द लावावा, किंवा नाहीं, हाच विचार प्राप्त झाला.

आतां ह्या विचारांत गोंधळ होऊं नये, म्हणून आपण येथें मनुष्याच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या इष्टधर्मांचे तीन प्रकार कल्पूं.—

पहिला प्रकार. श्रमानें मूर्त पदार्थांवर इष्टधर्म उत्पन्न होतात. ते धर्म लोहार, सुतार, शिंपी, साळी, शेतकरी, वगैरे लोकांच्या श्रमाचीं कार्यें होत. हे धर्म पहिल्या प्रकारांत मोडतात, व हे उत्पन्न करणाऱ्यांच्या श्रमास उत्पादक म्हणावें किंवा न म्हणावें ह्या विषयीं कोणाचाही वाद नाहीं.

दुसरा प्रकार. श्रमानें मनुष्यादिक प्राण्यांच्या ठायीं, जे धर्म उत्पन्न होतात, ते, जसें विद्या, कलाकौशल्यादिकांचें ज्ञान; हात वगैरे अवयव विवक्षित रीतीनें वळवण्याची संवय, चांगल्या रीतीनें चालविण्याची प्रीति; व उद्योग करण्याची संवय, इत्यादि इष्टधर्म दुसऱ्या प्रकारांत समजावे.

तिसरा प्रकार. ह्या प्रकारच्या श्रमानें उत्पन्न झालेलीं कार्यें अचेतन पदार्थांवर, किंवा चेतन पदार्थांवर, उत्पन्न होतात, परंतु तीं मागल्या प्रकारच्या कार्यांप्रमाणें स्थायी नसतात, तर तीं क्षणमात्र राहून तत्काल नाश पावतात. गवई, नाचणाऱ्या कलावंतीणी, तमासगीर, चाकर, शिपाई, इत्यादिकांच्या श्रमांचीं कार्यें ह्या तिसऱ्या प्रकारांत येतात. ह्या लोकांच्या श्रमानें आनंद वगैरे कार्यें उत्पन्न होतात. परंतु साळी, शिक्षक, इत्यादिकांच्या श्रमानें आनंद करणारे किंवा दुःखनिवारण करणारे, किंवा सोईस अगर निर्वाहास उपयोगी, असे, पदार्थगत, स्थायी धर्म, जसे उत्पन्न होतात, तसे गवयी वगैरे यांच्या श्रमानें होत नाहींत. पाहा, शिंप्यानें केलेला आंगरखा, किंवा साळ्यानें केलेलें वस्त्र, हीं, बरा वेळ टिकतात. पण गवयाचें गाणें तसें नाहीं; त्याच्या श्रमानें साक्षात् आनंद उत्पन्न होतो, परंतु जो तत्काळ नाहींसा होतो. अशींच सैन्याच्या श्रमाचीं कार्येंही समजावीं. त्याच्या श्रमानें सुख देणारा, किंवा दुःखनिवारण करणारा, पदार्थ उत्पन्न होत नाहीं; तेणेंकरून दुःखाचें किंवा दुःखदायक भयाचें मात्र निवारण होतें, ह्या प्रमाणेंच न्यायाधीश, वैद्य, ह्यांविषयीं जाणावें. आतां पदार्थ एका ठिकाणून दुसऱ्या ठिकाणीं नेणारे जे गाडीवाले, बैलवाले, गलबतवाले, व्यापारी, उदमी, ह्यांच्या श्रमाचीं कार्येंही तिसऱ्या प्रकारांतच घालावीं; कां कीं, त्यांच्या श्रमापासून पदार्थांचे ठायीं नवा धर्म उत्पन्न होत नाहीं; असें कोणी म्हणेल; परंतु हें त्याचें म्हणणें बरोबर नाहीं; कां कीं, त्या लोकांच्या श्रमानें "विवक्षित स्थळीं असणें," हा गुण पदार्थांवर उत्पन्न होतो, म्हणून वर सांगितलेंच आहे, व हा गुण उत्पन्न झाल्यामुळें पदार्थास विशेष किंमत येते, तस्मात् त्या लोकांचा श्रम, तिसऱ्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा नव्हे, पहिल्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा होय.

हे जे श्रमांच्या कार्यांचे तीन प्रकार सांगितले, त्यांवरून श्रमाचेही तीन प्रकार सिद्ध होतात. आतां ह्या प्रकारांपैकीं कोणत्या प्रकारच्या श्रमास धनोत्पादक म्हणावें, व कोणत्यास म्हणूं नये, ह्याचा

विचार केला पाहिजे. तिसऱ्या प्रकारचीं श्रमकार्यें जीं आनंदरूप किंवा सेवारूप असतात, त्या कार्यास कोणीही धन शब्द कदापि लावीत नाहीं. लोकांत ज्या ज्या पदार्थास धन शब्द लागतो, तो तो पदार्थ सांठवून ठेवण्याजोगा असावा लागतो. ज्या ज्या वस्तू उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावतात, व ज्या भावी उपयोगाकरतां राखून ठेवतां येत नाहींत, अशा वस्तूंस धन शब्द कोणी लावीत नाहींत, असें वाटतें. आतां दुसऱ्या प्रकारचा जो श्रम आहे, त्यापासून मनुष्याच्या ठायीं ज्ञान, कौशल्य, सद्गुण वगैरे धर्म उत्पन्न होतात, त्या गुणांस धन शब्द लावावा हें सयुक्तिक आहे. यद्यपि लौकिकांत त्यांस धन म्हणत नाहींत, तथापि हत्यारें, यंत्रें ह्यांस जसा धन शब्द लागतो, तसा त्या हत्यारांसारखेच धनोत्पत्तीस आवश्यक, जे कलाकौशल्यादि गुण, त्यांस धन शब्द लागावा हें योग्य आहे. कां कीं ह्या प्रकारचे गुण, स्थायी, व संचित होण्यास योग्य, आहेत. परंतु वाचणाऱ्यांनीं इतकें मात्र मनांत ठेवलें पाहिजे कीं, येथें मनुष्याच्या कलाकौशल्यादि गुणांस जें धन म्हटलें, तें कलाकौशल्यादि स्वतः चांगलीं व इष्ट आहेत, म्हणून म्हटलें नाहीं; तर त्यांपासून मूर्तपदार्थरूप धन उत्पन्न होतें, म्हणून म्हटलें आहे. सारांश, ह्या ग्रंथांत धन शब्द हा, मनुष्यास इष्ट, व श्रमसाध्य, असे जे मूर्तद्रव्यांचे पदार्थ त्यांस व त्या पदार्थांच्या उत्पत्तीस आवश्यक जे जे मनुष्याचे गुण, त्यांस लावला आहे. ज्या ज्या श्रमानें वर सांगितलेल्या लक्षणाचें धन, साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होतें, त्या सर्व श्रमास उत्पादक श्रम म्हटलें आहे, व असें फल, ज्या श्रमापासून साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होत नाहीं, (मग त्या श्रमापासून केवढाही मोठा दुसरा उपयोग होवो) त्यास अर्थशास्त्रांत अनुत्पादक म्हटलें आहे. पाहा, संकटकाळीं मित्राचा जीव वांचवणें, हें फार मोठें काम आहे खरें, तरी ह्या कामास जो श्रम लागला, त्या श्रमास, त्या वांचलेल्या मित्राच्या हातून पुढें कांहीं धन न उत्पन्न झाल्यास, अर्थशास्त्राच्या अनुरोधानें उत्पादक शब्द लागणार नाहीं. जो मनुष्य धार्मिक आहे. त्याच्या दृष्टीनें यात्रेस जाण्यास जो श्रम लागतो, तो अमोलिक कामाकडे लागतो, तथापि ह्या शास्त्राच्या दृष्टीनें तो श्रम अनुत्पादकच समजला पाहिजे. आतां अनुत्पादक श्रमानें बहुतकरून कोणत्या एकाद्या देशांतील किंवा जगांतील संपत्ति वाढत नाहीं खरी; तरी तसल्या श्रमानें एखाद्या पुरुषाची संपत्ति बहुत ठिकाणीं वाढते. उदाहरण, गवई गाणें गाऊन, गाण्याचा ज्यांस शोक असतो त्यांपासून धन मिळवतो. ह्या उदाहरणांत, गवयाची संपत्ति अनुत्पादकही श्रमानें वाढली. परंतु त्यास जें धन मिळतें, तेवढें देणाऱ्याचें कमी होतें. त्याच्या श्रमापासून शेतकरी वगैरे ह्यांच्या श्रमाच्या सारखें नवें धन उत्पन्न होत नाहीं. एका मनुष्याच्या सारखें देशासही कांहीं उदाहरणांत दुसऱ्या देशापासून अनुत्पादक श्रमानें धन प्राप्त होतें. जसें, एका देशांतले गाणारे किंवा तमासगीर वगैरे, दुसऱ्या देशांतून पैसा मिळवून आणतात. ह्या स्थळीं त्यांच्या अनुत्पादक श्रमानें एक देश सधन होतो खरा, परंतु त्याच मानानें दुसरा देश भिकारी होतो. ह्या सर्व उदाहरणांत एक ठिकाणची संपत्ति दुसरे ठिकाणीं जाते, व धन उत्पन्न करणारे जे गवई वगैरे, हे जितक्या धनाचा व्यय करतात, तितकें धन जगांतून नाहींसें झालें, असें समजलें पाहिजे. आतां ह्या श्रमकर्त्यांच्या श्रमापासून कांहीं आनंदादिक उपयोग झाला; तर त्यांनीं नष्ट केलेलें धन कामास लागलें, आणि त्यांच्या श्रमापासून कांहीं उपयोग न झाल्यास, तें व्यर्थ गेलें, असें समजावें.

धनाचा व्यर्थ नाश अनुत्पादक श्रमकर्त्यांपासूनच होतो, असें नाहीं, तर उत्पादक श्रमकर्त्यांकडूनही तो कधीं कधीं होतो. उत्पादक श्रमकर्त्यांचे ठायीं विवक्षित चातुर्य नसल्यामुळें, किंवा त्यांस काम करावयास सांगणाऱ्यांस यथास्थित कामाची माहीतगारी व विचार नसल्यामुळें कामांत अनावश्यक खर्च झाला, तर तो खर्च व्यर्थ मानला पाहिजे. उदाहरण, शेतकऱ्यानें, दोन बैलांनीं जें काम व्हावयाचें, त्यास तीन बैल लाविले, किंवा जेथें थोड्या खर्चानें विहीर खणून होते तेथें मूर्खपणानें अधिक खर्च करून नदीचा पाट आणला तर अधिक केलेला खर्च व्यर्थ गेला असें समजावें. तसेंच बाजारांत ज्या

पदार्थांचा जितका खप असतो, त्यापेक्षां तो पदार्थ अधिक उत्पन्न केला असतां, तो पदार्थ उत्पन्न करणाऱ्याच्या श्रमापासून विवक्षित धन उत्पन्न झालें तरी तो श्रम व वास्तविक विचार करून पाहातां व्यर्थच होय, तसेंच, जेव्हां ज्या पदार्थांची लोकांस गरज असती, तेव्हां तो पदार्थ उत्पन्न न करतां, ज्या पदार्थांची गरज पुढें कांहीं काळानें लागणार, तो पदार्थ उत्पन्न केल्यास त्यांतही देशाचें नुकसान आहे.

अनुत्पादक आणि उत्पादक असा भेद जसा श्रमाचा होतो, तसा धननाशाचाही होतो. म्हणजे कांहीं धननाश धनोत्पत्तीस प्रयोजक आहे, व कांहीं धननाश तीस प्रयोजक नाहीं. मजूर वगैरे उत्पादक लोक, अन्न, वस्त्र, द्रव्य, हत्यारें वगैरे धनाचा नाश करतात खरा; परंतु तो नाश नव्या धनाच्या उत्पत्तीस कारण आहे. आणि गवई, तमासगीर, उगीच बसून खाणारे व ऐषाराम करणारे जे श्रीमंत लोक, ते खाऊनपिऊन धनाचा जो नाश करतात, तो नाश अनुत्पादक होय. उत्पादक श्रम व अनुत्पादक श्रम असा भेद सांगितला असतां, नाशांत उत्पादक व अनुत्पादक असा भेद सांगण्याचें स्वारस्य इतकेंच, कीं, देशांतील सर्वच लोक श्रम करणारे असतात, असें नाहीं; ह्यास्तव उत्पादक श्रम करणारे व अनुत्पादक श्रम करणारे ह्या भेदांत सर्वांचा संग्रह होत नाहीं. परंतु उत्पादकत्वेंकरून धननाश करणारे, व अनुत्पादकत्वेंकरून धननाश करणारे असा लोकांचा विभाग केला असतां, त्या विभागांत सर्वांचा समावेश होतो; कारण, देशांतला कोणताही मनुष्य घेतला, तरी, तो मनुष्य, वर सांगितलेल्या दोन प्रकारांपैकीं एका प्रकारानें धननाश करणारा असतोच असतो. आतां उत्पादक मनुष्यांनीं केलेला धननाशही नियमानें उत्पादक असतो, असें समजूं नये; तर उत्पादक मनुष्यें आपल्या आंगीं आरोग्य, व श्रम करण्याचें सामर्थ्य, हीं राहाण्याकरतां, किंवा तीं नवीं आणण्याकरतां, धनाचा जो नाश करतात, तो खेरीज करून, ते सुखोपभोगार्थ व ऐषारामींत जो धनाचा व्यय करतात, तो व्यय उत्पादक नव्हे; तर अनुत्पादकच होय. कां कीं, त्या व्ययानें नवें धन उत्पन्न होत नाहीं. सारांश, धनाचा जो व्यय केल्यावांचून नवें धन उत्पन्न व्हावयाचें नाहीं, तेवढा धनव्यय मात्र उत्पादक होय, मग धनाचा जो व्यय देशांतील जमीन चांगली सुपीक होण्याकरतां असो, किंवा द्रव्यें, हत्यारें, रस्ते वगैरे, व वाहक साधनें नवीं करण्याकरतां किंवा जुनीं नीट राखण्याकरतां असो, किंवा उत्पादक जे मजूर वगैरे लोक ह्यांचे ठायीं कलाकौशल्य, ज्ञान, करामत, शारीरबल, आरोग्य इत्यादिक उत्पादक गुण येण्याकरतां असो. पुष्कळ जिन्नस असे आहेत कीं, ज्यांचा नाश उत्पादकत्वेंकरून होतच नाहीं. पाहा, पैठणी, पागोटीं, शेले, पितांबर, शालजोड्या वगैरे वस्त्रें, पेढेबर्फी वगैरे मिठाई, इत्यादिकांचा व्यय सर्वकाल अनुत्पादकत्वें करूनच होतो. कां कीं, ह्या जिन्नसांच्या उपभोगेंकरून, त्यांच्यापेक्षां कमी खर्चांत होणाऱ्या मालाच्या उपभोगेंकरून मजुरांस जितकें बलादि येतें, त्यापेक्षां अधिक येत नाहीं. ह्या करतां ह्या पदार्थांच्या उत्पत्तीस जो श्रम लागतो, तो अनुत्पादक श्रम मानावा, असें कोणीं म्हटल्यास एका अंशीं तें म्हणणें संभवेल, व याप्रमाणें ज्या ज्या पदार्थांचा उपभोग अनुत्पादक लोक करतात, ते ते पदार्थ उत्पन्न करण्याचा श्रम अनुत्पादक श्रम म्हटल्यास एका अर्थी चालेल. भटांस खाण्यास अन्न उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्याचा श्रम व गाणाऱ्याचा श्रम, हे दोन्ही अर्थशास्त्राच्या दृष्टीनें सारखेच. त्यांच्यामध्यें भेद इतकाच, कीं पहिल्या श्रमानें, तदुत्पन्न फल जोंपर्यंत आहे, तों पर्यंत जग विशेष सधन होतें, व त्या फळाचा (धान्याचा) उत्पादकत्वेंकरून व्यय केल्यास, तो पहिला श्रम उत्पादक होण्याचा संभव असतो, आणि दुसरा श्रम उत्पादक होण्याचा मुळींच संभव असत नाहीं.

ह्या वरील विचारावरून, उत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा नाश होतो, तें धन उत्पन्न करणाऱ्यांचा श्रम, व उत्पादकत्वें करून, ज्या धनाचा नाश होत नाहीं, तें धन उत्पन्न करणाऱ्यांचा श्रम, असे श्रमाचे दोन विभाग होतात, व हा विभाग कळणें विशेषतः उपयोगी आहे. कोणताही देश घेतला असतां, त्यांतील एकंदर उत्पन्नाच्या कांहीं भागाचा सर्वकाळ उत्पादकत्वेंकरूनच व्यय होत असतो, व बाकी

राहिलेल्या उत्पन्नाच्या व्ययेंकरून, उत्पादक लोक अनुत्पादकर्त्वे करून ज्या धनाचा व्यय करतात तें धन उत्पन्न होत असतें व अनुत्पादक लोकांचा निर्वाह व ऐषाराम चालत असतात. उदाहरणार्थ असें कल्पितों कीं, कोणत्या एका देशांतील वार्षिक उत्पन्नांतील निमे उत्पन्न पहिल्या कामास लागतें, व निमे उत्पन्न दुसऱ्या कामाकडे लागतें; तर त्या देशांतील उत्पादक श्रमापैकीं, अर्धा श्रम मात्र तेथील स्थायी संपत्तीचें मूळ आहे व बाकीच्या अर्ध्या श्रमानें ज्या वस्तू उत्पन्न होतात, त्यांचा सर्व काल अनुत्पादकर्त्वेकरून उपभोग होतो, मग त्या उत्पन्नाचा व्यय उत्पादक लोक करोत, किंवा अनुउत्पादक करोत; कोणीही ह्या निंमे उत्पन्नाचा व्यय केला तरी त्या व्ययाच्या योगानें त्या देशाच्या स्थायी संपत्तीची वृद्धि कदापि व्हावयाची नाहीं. ही गोष्ट स्पष्टपणें मनांत भरण्याकरतां असें कल्पूं, कीं अनुत्पादकर्त्वेकरून ज्याध नाचा व्यय होतो, तें धन उत्पन्न करणारे आपला धंदा सोडून वर्षभर जर उगीच बसले; आणि ज्या धनाचा उत्पादकर्त्वेकरून व्यय होतो तें धन उत्पन्न करणाऱ्यांनीं आपल्या श्रमानें सर्वांच्या निर्वाहाचे पदार्थ नेहमींच्याप्रमाणें उत्पन्न केले, तर, असें करण्याचा परिणाम इतकाच होईल, कीं ऐषअरामी करावयास कोणास सांपडावयाचें नाहीं. परंतु अनुत्पादक लोक खेरीजकरून सर्व लोकांस खाण्यापिण्यास मिळेल; व त्या देशांतील स्थायी संपत्ति उत्पन्न करण्याची सामग्री पूर्ववत् यथास्थित राहील, तिचा क्षय अगदीं व्हावयाचा नाही. परंतु हीच कल्पना जर उलट केली, म्हणजे उत्पादकर्त्वेकरून नाश पावणाऱ्या धनाचे कर्त्ते, वर्षभर उगीच रिकामे बसले, आणि अनुपादकर्त्वेकरून नाश पावणाऱ्या संपत्तीच्या कर्त्यांनीं आपले धंदे केले, तर वर्षाच्या अंतीं ऐषअरामीचे आणि निर्वाहाचे सर्व जिन्नस एकदम नाहींसे होऊन तो देश अगदीं भिकारी होईल.

इंग्लंडासारखे विद्याचारसंपन्न व धनाढ्य जे देश आहेत, त्या देशांतील वार्षिक उत्पादनाचा पुष्कळ अंश अनुत्पादक उपयोगास लागतो, व असें घडतें ही गोष्ट एक प्रकारें मोठी आनंदाची आहे. धनाचा इतका अनुत्पादक व्यय होतो म्हणून कोणास वाईट वाटेल, तर तसें वाटणें ही चूक होय. ह्या गोष्टीबद्दल खेद करणें, म्हणजे लोकांच्या ज्या चातुर्यानें त्यांस थोड्या श्रमानें सगळ्यांपुरते, निर्वाहोपयोगी, पदार्थ करतां येऊन, आणखी ऐषअरामीचे पदार्थ उत्पन्न करावयास व विद्यादिकांची वृद्धि करावयास वेळ सांपडतो, त्या चातुर्याविषयीं खेद करणें होय. तर ह्या गोष्टीनें विचारी व ज्ञात्या पुरुषांस खेद होऊं नये, उलटा आनंद व्हावा. ह्या स्थळीं खेदावह गोष्ट इतकीच कीं, ही जी उपभोग्य संपत्ति होती, तिचा यथायोग्य अंश सर्वांस प्राप्त होत नाहीं. परंतु त्या गोष्टीचा विचार एथें करावयाचा नाहीं, तो विचार, जेव्हां संपत्तीच्या विभागाचा विषय येईल तेव्हां होईल.

## भाग चवथा.

# भांडवलाविषयीं विचार.

पहिल्या भागांत धनाच्या उत्पत्तीस श्रम व सृष्टपदार्थ, अशीं दोन मुख्य कारणें आहेत, असें सांगितलें; परंतु लोक शाहाणे व विद्याचारसंपन्न होऊन, जसजसे नानाप्रकारचे सुखोपयोगी व ऐषआरामीचे पदार्थ करूं लागतात, तसतशी त्यांस संपत्ति उत्पन्न करण्यास तिसऱ्या कारणाची अपेक्षा लागते; त्या कारणावांचून संपत्ति होत नाहीं. तें कारण, परंपरेनें कारण, असा जो मागें श्रम सांगितला, त्या श्रमानें उत्पन्न झालेली द्रव्यादि सामग्री, ही जी पूर्वश्रमेंकरून संचित करून ठेवलेली सामग्री, हीस अर्थशास्त्रकार भांडवल असें म्हणतात. भांडवलापासून धनोत्पत्तीस कोणकोणता उपयोग घडतो, हें पुरतेंपणीं समजणें फार आवश्यक आहे. कां कीं, अर्थशास्त्रांतील विषयासंबंधी ज्या बहुत गैरसमजुती लोकांत आहेत, त्यापैकीं पुष्कळ गैरसमजुतींचें मूळ, भांडवलाच्या वास्तविक स्वरूपाचें व त्याच्या उपयोगाचें अज्ञान हें आहे.

ज्यांस अर्थशास्त्राची वासनासुद्धां नाहीं, असे पुरुष भांडवल म्हणजे नाणें असें समजतात; परंतु केवळ नाणेंच धन नव्हे, ह्या विषयीं जीं प्रमाणें पहिल्या भागांत सांगितलीं आहेत, त्यांजवरूनच भांडवल व नाणें हीं एक, ही समजूत भ्रांति आहे, असें स्पष्ट होतें. पाहा, धनोत्पत्तीस सौकर्य आणणें, हें भांडवलाचें काम होय, तें काम नाण्यापासून साक्षात् होत नाहीं, तेव्हां नाण्यासच भांडवल कसें म्हणावें? ज्यापाशीं नाणें आहे, त्यास कांही धनाची उत्पत्ति करणें झाल्यास, त्यास तें नाणें देऊन, धनोत्पत्तीस आवश्यक जीं द्रव्यें, हत्यारें, किंवा दुसरी सामग्री ती घ्यावी लागते, ह्या करतां धनोपत्तीचें वास्तविक कारण म्हटलें म्हणजे नाणें नव्हे, तर द्रव्यें, हत्यारें, संरक्षणसाधनें, व मजुरांचें अन्नवस्त्र, इत्यादि होत. त्यांस भांडवल हें नांव वास्तविकपणें योग्य आहे.

भांडवलाचें खरें स्वरूप व त्याचीं खरीं प्रयोजनें, वाचणाऱ्यांच्या ध्यानांत पक्केपणीं ठसावीं, म्हणून एक उदाहरण देतों.-साळ्याचे उदाहरणांत, त्याच्या भांडवलाचा कांहीं अंश त्याच्या मागांत असतो; कांहीं भाग हत्यारांत, कांहीं सुतांत, कांहीं, कामांस लागलेल्या मजुरांच्या अन्नवस्त्रांत, असा असतो. आतां वास्तविक पाहिलें असतां, साळी किंवा तांबट वगैरे बहुतेक भांडवलवाले, हे मजुरांस अन्नवस्त्र खरोखरी देत नाहींत, पैसा देतात. परंतु सूक्ष्म विचारें पाहिलें असतां, तो पैसा, दाणेवाल्यावर व कापडवाल्यावर वगैरे दिलेल्या चिठ्यांसारखाच आहे. ह्याकरतां तेच तें अन्न वगैरे देतात, असें म्हटलें असतां चिंता नाहीं. तसेंच, साळी, तांबट वगैरे उदम्यापाशीं जो तयार झालेला माल असतो, तोही त्यांच्या भांडवलाचाच एक भाग होय. कां कीं, तो माल विकून ते द्रव्यें, हत्यारें वगैरे सामग्री पुनः घेतात. परंतु त्यांच्या जवळचा सगळाच तयार केलेला माल भांडवल समजूं नये. कांकीं, त्यांतील कांही अंश विकून ते आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाचे व कदाचित् ऐषआरामीचे पदार्थ घेतात; तो अंश धनोत्पत्तीस कारण नाहीं, म्हणून तो भांडवल नव्हे. आतां ह्या उदाहरणांवरून भांडवलाचें वास्तविक स्वरूप व त्याचीं कार्यें हीं स्पष्टपणें व्यक्त होतात, व द्रव्यादि सामग्रीरूप जें वास्तविक भांडवल, तें त्या सामग्रीरूपानेंच सर्वदां भांडवलवाल्यांजवळ नसतें, हेंही स्पष्ट होतें.

हीच गोष्ट कांहीं उदाहरणांनीं विशेषतः स्पष्ट करतों-पाहा, कोणी एक तांबट आहे; ज्याजवळचीं हत्यारें, तांबें वगैरे ह्यांचे पत्रे, हे खेरीजकरून बाकीचें त्यांचें भांडवल, तयार झालेल्या भांड्यांच्या

रूपानें आहे. ह्या स्थळीं मांड्यांनीं मजुरांस पोसतां येत नाहीं, हें स्पष्टच आहे. परंतु तीं मांडीं विकून अन्न घेतां येतें, ह्यास्तव त्या मांड्यांस मांडवल म्हणावयास कांहीं चिंता नाहीं. असो. आतां अशी कल्पना करतों, कीं तो मांडीवाला तांबट, आपल्या संपत्तींतून कांहीं संपत्ति खर्चून कांहीं चाकर, कांहीं घोडे वगैरे इतमाम राखीत होता, परंतु त्याची इच्छा फिरून, त्यानें घोडे, चाकर वगैरे बाळगण्याचें सोडून, त्यांजकडे जो पैसा खर्चत असे त्याचें मांडवल करावयाचें, म्हणजे तो पैका मजुरांस देऊन त्यांजकडून कांहीं नवें धन उत्पन्न करावयाचें, असा बेत केला; असें झालें असतां घोडे व चाकर अनुत्पादकत्वेंकरून ज्या अन्नाचा वगैरे व्यय करीत होते, तें अन्न आतां मजुरांस मिळालें, अणि ही सर्व अदलाबदल, तांबटानें आपली इच्छा फिरवल्यानें झाली. आतां ही कल्पना फिरवून असें कल्पूं, कीं तो तांबट पूर्वी आपली संपत्ति घोडे वगैरे बाळगण्यांत घालवीत नव्हता, तर तो शेलेपागोटीं घेण्यांत घालवीत असे, आणि शेलेपागोटीं घेण्यांत जी संपत्ति जात होती, त्या संपत्तीचें मांडवल करण्याचें त्या तांबटाच्या मनांत आलें. ह्या उदाहरणांत त्याची संपत्ति शेलेपागोट्यांत जाणार नाहीं, तर ती परिणामीं मजुरांस मिळून, त्यांच्या हातून अन्न विकत घेण्यांत जाईल. यद्यपि मागल्या उदाहरणांतल्या प्रमाणें येथें घोड्यांचें किंवा चाकरांचें अन्न राहिलें नाही. तथापि मजुरांस जें अन्न पाहिजे, तें परदेशांतून येईल; व परदेशांतून येण्याची सोय नसली तर, एक वर्ष मात्र अडचण सोसावी लागेल; परंतु दुसऱ्या वर्षी शेलेपागोटीं कमी उत्पन्न होऊन, अन्न अधिक उत्पन्न होईल, आणि पुढें तसाच क्रम चालेल. तस्मात्, ह्या विचारावरून अशी गोष्ट उघड सिद्ध होते, कीं मनुष्याजवळ कोणत्याही प्रकारचें धन कां असेना, त्या धनाचा अंश त्यानें अनुत्पादकत्वें करून खर्चावयाचा बंद करून, उत्पादकत्वें करून खर्चावयाचा संकल्प केला असतां, त्याच्या तेवढ्या संकल्पानेंच अनुत्पादकत्वेंकरून नाश पावणाऱ्या पदार्थांची उत्पत्ति मना होऊन उत्पादकत्वेंकरून नाश पावणारे अन्नादि पदार्थ उत्पन्न होऊं लागतात. सारांश, मांडवलपणा किंवा गैरमांडवलपणा हीं तादृश पदार्थांच्या स्वरूपावर नाहींत; तर त्या पदार्थांचा धनी, त्यांचा उपयोग ज्या प्रकारेंकरून इच्छील, त्या प्रकारावर आहेत; व पदार्थ स्वतः खरें मांडवल होण्यास कितीही अयोग्य असला, तरी त्याच्या धन्यानें तो नवें धन उत्पन्न करण्याकडे योजण्याची इच्छा केली, म्हणजे तो परिणामीं मांडवलाचें रूप पावतो. ह्या प्रमाणें नव्या धनाच्या उत्पत्तीच्या उद्देशेंकरून, भिन्नभिन्न पुरुषांनीं योजलेले जे आपापल्या संपत्तीचे अंश त्या सर्व अंशांचा समुदाय मिळून देशाचें मांडवल होय. मग ते धनांश स्वतः नवी संपत्ति उत्पन्न करण्यास अयोग्य असले तरी ते, हरएक तऱ्हेनें परिणामीं संपत्ति उत्पन्न करण्यास योग्य असें रूप पावतात. नवें धन उत्पन्न करण्याच्या उद्देशानें जो जो धनांश आपण खर्चतों, तो तो मांडवल होय, असा सिद्धांत झाला. त्या सिद्धांतापासून सर्व मांडवलाचा व्यय नवें धन उत्पन्न करण्याकडे होतो, असा दुसरा सिद्धांत गर्भित होतो. परंतु हा दुसरा सिद्धांत सर्वत्र खरा असत नाहीं, त्यास कांहीं अपवादस्थलें आहेत, तीं सांगितलीं पाहिजेत. पाहा, कोणीएकापाशीं कांहीं धन आहे, व तें त्याच्या मनांत संपत्ति उत्पन्न करण्याकडे लावावयाचें आहे, परंतु त्यास मनाजोगे धंदे सांपडत नाहींत; तर ह्या स्थळीं, त्या मालकाच्या त्या धनापासून कांहीं संपत्ति उत्पन्न न होतांही त्या धनास मांडवल समजलें पाहिजे. तसेंच, एकाद्या उद्योग्याजवळ तयार झालेला माल पुष्कळ आहे, व तो कांहीं काळ न खपतां उगीच पडला आहे. येथेंही त्या मालापासून नव्या संपत्तीच्या उत्पन्नास साहाय्य न मिळालें तरी त्या मालास देशाच्या मांडवलाचा एक अंश मानलें पाहिजे. तसेंच, कांहीं ठिकाणीं थोड्या मांडवलानें काम चालवयाजोगें असतांही, राजनियमामुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणावरून अधिक मांडवल खर्चावें लागतें; त्या स्थलीं त्या अधिक मांडवलापासून संपत्ति उत्पन्न होत नाहीं. पाहा, शेतकरी शेताबद्दल सरकारास जो धारा देतो, तो त्यास आगोटीच्या वेळीं द्यावा लागत असला, तर ह्या उदाहरणांत साऱ्याबद्दल जें धन द्यावयाचें, तें धनधान्याबद्दलच्या

मांडवलांतून द्यावें लागतें. कारण, अन्न, द्रव्य, हत्यारें, वगैरे सामग्री असल्यावांचून, जसें नवें धान्यरूप धन उत्पन्न होत नाहीं, तसेंच धान्याचें द्रव्य असल्यावांचूनही होत नाहीं; म्हणून त्या द्रव्यासही मांडवल म्हटलें पाहिजे. परंतु भांडवलाच्या ह्या अंशानें नवें धन उत्पन्न होतेंच, असा नियम नाहीं. सरकारानें धान्याबद्दल घेतलेलें धन उत्पादकरवेंकरून खर्चल्यास, त्यापासून नव्या धनाची उत्पत्ति होईल; व त्यानें तें अनुत्पादक श्रम करणाऱ्या शिपायांस व चाकरांस वगैरे दिल्यास, त्यापासून नवें धन उत्पन्न व्हावयाचें नाहीं. ह्यावरून असें सिद्ध होतें, कीं वर लिहिलेल्या रीतीनें कर घेण्याची रीति देशांत धनोत्पत्ति होण्यास प्रतिबंधक आहे. कां कीं, तसली रीत नसतां देशांतील मांडवलापासून संपत्ति व्हावयाची जी योग्यता असते, ती तसल्या रीतीनें कमी होते.

तसाच, देशांतल्या मांडवलाचा मोठा अंश मजूर लोकांस व दुसऱ्या उत्पादक श्रम करणाऱ्या लोकांस मजुरी व पगार देण्याकडे जातो. परंतु तो सर्वच अंश नव्या धनाच्या उत्पत्तीस आवश्यक असतो, त्यावांचून ती व्हावयाची नाहीं, असें नसतें. अन्नवस्त्रादि ज्या पदार्थांवांचून मजूर वगैरे ह्यांचें जीवन व्हावयाचें नाहीं, किंवा त्यांच्या आंगीं चांगली काम करण्याची शक्ति राहावयाची नाहीं, ते पदार्थ किंवा ते पदार्थ घ्यावयाकरतां जो मजुरीचा अंश देतात, तो खेरीज करून, सुखाचे किंवा ऐषआरामीचे पदार्थ जे मजूर वगैरे उपभोगतात, ते पदार्थ किंवा ते घेण्याकडे मजुरीचा जो अंश जातो तो, ह्यांहींकरून नवें धन उत्पन्न होतें, असें म्हणतां येत नाहीं, व हा अंश धनोत्पत्तीच्या पूर्वी असलाच पाहिजे असेंही नाहीं. तो नसला तरी, जितकें धन व्हावयाचें तितकें होईल. तस्मात् ही गोष्ट स्पष्ट आहे कीं हल्लीं मजुरी देण्याची जी चाल आहे, ती प्रमाणें पाहातां, धनोत्पत्तीस वास्तविक आवश्यक जें मांडवल आहे, त्यापेक्षां अधिक मांडवल खर्चावें लागतें, आणि मांडवलवाला नवें धन उत्पन्न व्हावें म्हणून जें धन योजतो, त्या सर्व धनाचा उत्पादकरवेंकरून खर्च होत नाहीं. वर केलेल्या प्रतिपादनावरून सर्व श्रमकर्त्यांचें उपजीवन मांडवलावरच होतें, असा सिद्धांत घेऊन आपण चाललों आहों, असे वाचणाऱ्यांच्या ध्यानांत स्पष्टपणीं आलेंच असेल, व हा सिद्धांत विचार करून पाहातां खरा आहे. आतां शेतकरी, तांबट, धिसाडी वगैरे पुष्कळ श्रमकर्ते आपल्या उत्पन्नावर निर्वाह करून नवा माल उत्पन्न करतात, ते सर्वच लोकांपासून मांडवल उसनें घेत नाहींत, ह्यावरून त्यांचें उपजीवन मांडवलावर होत नाही, असें समजूं नये. कां कीं तेही, वास्तविक पाहातां, मांडवलावरच उपजीवन करतात, परंतु तें मांडवल त्यांस कोणी मांडवलवाला देत नाहीं; तें त्यांचेंच असतें. शेतकरी शेतकीचें काम चाललें असतां मागल्या वर्षी श्रम करून उत्पन्न केलेल्या धान्यावर उपजीवन करतो, प्रकृत कालच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या धान्यावर करीत नाहीं, हें स्पष्टच आहे. ह्याप्रमाणें इतर उदाहरणांतही समजावें. तस्मात् नवें धन उत्पन्न करणाऱ्या मनुष्यांस उपजीवन होण्यास जें धन लागतें तें धन मांडवल, मग तें घरचें असो, किंवा त्यांनीं दुसऱ्या कोणापासून उसनवार घेतलें असो. त्या धनाचा जो व्यय होतो, तो उत्पादक व्यय होय, असें उघड सिद्ध होतें.

वर बरींच उदाहरणें देऊन मांडवलाच्या स्वरूपाचें प्रतिपादन केलें, तथापि त्याच विषयाचें आणखीं थोडेंसें निरूपण होऊन, तो वाचणाऱ्यांच्या मनांत पूर्णपणीं ठसावा, म्हणून आणखीं एक उदाहरण देतों. कां कीं, कोणत्याही शास्त्राच्या विषयाविषयीं लोकांत ज्या भ्रांति असतात, त्या, त्या शास्त्राच्या मूलाधारभूत विषयांचें पूर्ण ज्ञान नसल्यामुळें उत्पन्न झाल्या असतात; ह्याकरतां ह्या मूल विषयाचें जितकें स्पष्टीकरण होईल तितकें चांगलें. असो; जे लोक स्वतः नवें धन उत्पन्न करीत नाहींत, पण आपलें धन दुसऱ्यास उसनें देऊन त्याच्या व्याजावर उपजीवन करतात, त्यांचें धन देशाच्या मांडवलांत गणावें किंवा न गणावें, व गणावयाचें असल्यास कोणत्या उदाहरणांत गणावें, व कोणत्यांत गणूं नये ? ह्याचें विवेचन करतों.—

जो मनुष्य आपलें धन व्याजावर उसनें देतो, त्याचें तें धन मांडवल आहे, असें लोकांत म्हणतात, व हें म्हणणें योग्य आहे; परंतु एक एक पुरुष लक्षून ज्या गोष्टी खऱ्या असतात, त्या सर्व देशास लक्षून खऱ्या असतातच असा नियम नाहीं, असें मागें सांगितलें आहेच. प्रकृत स्थलीं जें धन एका मनुष्याचें मांडवल असतें, तें देशाचें मांडवल कांहीं उदाहरणांत असतें व कांहींत असत नाहीं. ह्या भेद स्पष्ट कळण्याचा नियम हाच, कीं जें धन मालक स्वतः अनुत्पादकत्वेंकरून खर्चीत नाहीं, व्याजावर दुसऱ्या मनुष्यास उसनें देतो, तें धन तो दुसरा मनुष्य उत्पादकत्वें करून खर्चो, किंवा अनुत्पादकत्वें-करून खर्चो – तें मालकाचें मांडवल होय. परंतु जें धन देशाचें मांडवल म्हणून गणावयाचें, तें त्याच देशांत उत्पादकत्वेंकरूनच खर्चलें पाहिजे; अन्यथा तें देशाचें मांडवल व्हावयाचें नाहीं. पाहा, क्ष नामक मनुष्यानें आपले १००० रुपये य नामक मनुष्यास उसने दिले, व यनें तें रुपये शेतकीच्या कामांत घातले. ह्या स्थलीं वास्तविक पाहातां क्ष मनुष्य खरा मांडवलवाला होय; व य हा त्याचे कारभाऱ्यासारखा होय. तो तें धन, उत्पादकत्वेंकरून म्हणजे मजुरांस अन्नवस्त्र वगैरे देण्याकडे, व शेतकीस आवश्यक जीं द्रव्यें व नांगर वगैरे हत्यारें, हीं घेण्याकडे खर्चून, तेणेंकरून झालेलें नवें धन क्षस देतो, व त्या धनांतील कांहीं अंश स्वश्रमाबद्दल आपणास ठेवतो. ह्या उदाहरणांत हजार रुपये एक मनुष्य क्ष यास लक्षून व सर्व देशास लक्षूनही मांडवल आहेत.

आतां पहिलें उदाहरण बदलून दुसरें असें कल्पूं कीं, क्षनें आपले रुपये य नामक शेतकऱ्यास न देतां, ते ज्ञ नामक मनुष्यास, त्याचें शेत गाहाण घेऊन, दिले, व ते रुपये ज्ञनें खर्चून आपल्या शेतांत नव्या दोन विहीरी खणल्या. ह्या स्थलींही त्या रुपयांचा उत्पादकत्वें करून व्यय झाला, कां कीं, ते रुपये खर्चून नव्या केलेल्या विहिरींपासून शेतांत धान्यरूप धन विशेष होऊं लागलें व कांहीं काळानें त्या नव्या उत्पन्नांतून, त्याकरतां खर्चलेलें मांडवल निघून, त्या विहिरींच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या धनांशानें देशांतील संपत्ति वाढेल, असें म्हटलें पाहिजे. आतां वरची कल्पना फिरवून अशी कल्पना करूं, कीं ज्ञनें जे रुपये उसनें काढले, ते विहिरी बांधण्याच्या वगैरे उत्पादक कामास लावले नाहींत; तर ते रुपये त्यानें कोणास बक्षीस केले, किंवा पहिल्या जुन्या सावकारास देऊन त्याचें कर्ज फेडलें. ह्या उदाहरणांत, ते हजार रुपये देशाचें मांडवल होतील, किंवा होणार नाहींत. ते रुपये बक्षीस घेणाऱ्यानें किंवा त्या सावकारानें त्यांचा उत्पादकत्वेंकरून व्यय केल्यास, मांडवल आहेत, व अनुत्पादकत्वेंकरून केल्यास मांडवल नाहींत. परंतु त्यांनीं ते रुपये कसेही खर्चले, तरी क्षचें मांडवल आहेतच.

आतां वरच्या कल्पना एकीकडे ठेवून, नवीनच कल्पना अशी केली, कीं ज्ञनें क्षपासून व्याजीं काढलेले रुपये, मेजवान्यांत व ख्यालीखुशालींत खर्चले. ह्या उदाहरणांत, त्या हजार रुपयांपासून, कांही एक नवें धन उत्पन्न न होतां त्यांचा नाश झाला. आतां क्ष जितका पूर्वी मातबर होता तितकाच आहे; त्याचा कांहीं तोटा झाला नाहीं. कां कीं, त्याच्याजवळचे हजार रुपये गेले तरी, त्याजवळ तितक्या रुपयांचें खत आहे, व त्यास पाहिजे त्या वेळेस त्या खताचें बेचन करून रुपये घेतां येतील, परंतु ज्ञ मात्र हजार रुपये जाऊन पहिल्यापेक्षां भिकारी झाला. श्रीमंत कोणीच झाला नाहीं. कोणी असें म्हणेल कीं, ज्ञ ते रुपये खर्चीत असतां, ते ज्या उदम्यांच्या हातीं गेले, त्यांस ते मिळून, ते पहिल्यापेक्षां मातबर झाले असतां, कोणीही मातबर झाला नाहीं, असें कसें म्हणावें ? तर ह्या शंकेवर उत्तर असें आहे, कीं ज्ञपासून उदम्यांनीं रुपये बर ठकवून घेतले असतील, तर ते त्यांस मिळाले असें म्हणावे, परंतु तशी गोष्ट झाली नाहीं. ज्ञनें उदम्यांपासून बरोबर हजार रुपयांचा जिन्नस घेऊन, त्या जिनसाचा अनुत्पादकत्वेंकरून उपभोग केला, किंवा त्यानें आपल्या इष्टमित्रांकडून तो करविला. तेव्हां उदमी पहिल्यापेक्षां मातबर झाले, असें कसें म्हणावें ? पुनः कोणी अशी शंका घेईल,

कीं यद्यपि सगळे हजार रुपये उदम्यांस मिळाले नाहींत, तथापि त्यांचा माल विकून त्यांस नफा झाला असेल; तर ही शंका खोटी आहे. कारण ज्ञनें ते रुपये उत्पादकर्वेकरून जरी खर्चले असते, म्हणजे मजुरांस अन्न, वस्त्र, हत्यारें, द्रव्यें, इत्यादि मालांत घालविले असते, तरी हे जिन्नस विकणाऱ्या उदम्यांस नफा होऊन, आणखी ज्ञस मजुरांनीं उत्पन्न केलेलें, निदान हजार रुपयांचें तरी, नवें धन प्राप्त झालें असतें. तेव्हां ज्ञच्या अनुत्पादक व्ययानें, उदमी पहिल्यापेक्षां सधन झाले, असें कोणत्याही प्रकारें म्हणतां येत नाहीं. ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, ज्ञच्या उधळेपणानें हजार रुपये म्हणजे हजार रुपयांचा माल अगदीं नष्ट झाला, व त्या नाशापासून नवें धन अगदीं उत्पन्न झालें नाहीं. परंतु ह्या प्रकारें हजार रुपये खर्चल्यापासून क्षचा कांहीं नाश झाला नाहीं. त्याला त्याच्या रुपयांचें व्याज मिळतेंच आहे. परंतु तें व्याज त्याला त्या हजार रुपयांपासून मिळत नाहीं, तर तें ज्ञच्या मिळकतींतून मिळतें. ही मिळकत ते हजार रुपये खर्चल्यानें झालेली नाहीं, दुसऱ्या भांडवलापासून झालेली आहे. ह्या उदाहरणावरून असें स्पष्ट सिद्ध झालें कीं, ते हजार रुपये क्षचें भांडवल असतांही, ते देशाचें भांडवल नव्हत, आणि ते खर्चल्यानें देश पहिल्यापेक्षां निर्धन होऊन भिकारी झाला. तो तोटा त्यांतले केवळ हजार रुपये गेले इतकाच नाहीं, तर ते रुपये उत्पादकर्वेकरून खर्चण्यापासून होणारा नफाही बुडाला. इंग्लंडादि कांहीं देशांत सरकार लोकांपासून कर्ज काढून आपल्या कामांस खर्चतें. ह्या उदाहरणांतही वरच्या सर्व गोष्टी बरोबर लागू पडतात. सरकारानें कर्ज काढलेला पैका रस्ते वगैरे बांधण्यांत घालविला, तर तो पैसा देशाचें भांडवल समजावें. व बंदुका, दारू वगैरे लढाईच्या सामानांत खर्च केला, तर तो भांडवल असें समजूं नये.

## भाग पांचवा.

# भांडवलाविषयीं मूलभूत सिद्धांत.

मागल्या भागांत भांडवलाचें स्वरूप व त्याचीं प्रयोजनें ह्यांचें बरेंच निरूपण केलें आहे; त्यावरून, ज्यांचा अर्थशास्त्रांत फारसा अभ्यास नाहीं, त्यांस सुद्धां भांडवलाचे हे पुढील सिद्धांत समजतील; व हे सिद्धांत पूर्णपणीं समजले असतां, त्यांहींकरून वाचणाऱ्यांचा अर्थशास्त्रांत चांगला प्रवेश होईल, असें वाटतें.

पहिला सिद्धांत—उद्योग भांडवलाच्या अधीन आहे; म्हणजे कोणताही उत्पादक श्रम करावयाचा असल्यास, तो भांडवलावांचून व्हावयाचा नाहीं. उत्पादक श्रम वाढवणें तर भांडवल वाढवलें पाहिजे. पाहा. कोणताही उदमी कांहीं माल करूं लागला म्हणजे, त्यास निर्वाहास अन्न, वस्त्र, द्रव्य, हत्यारें, इतकी सामग्री पाहिजे, तिजवांचून त्याचें कदापि चालावयाचें नाहीं. सामग्री म्हणजे पूर्वश्रमाचें संचितफल. हेंच भांडवल होय. भांडवलाच्या अधीन उद्योग आहे. ही गोष्ट जरी इतकी उघड आहे, व ती बहुत लोकांस माहीतही असेल, तथापि, ह्या गोष्टीस विरुद्ध ज्या गोष्टी आहेत, त्या खऱ्या वाटूं नयेत, अशी ह्या गोष्टीविषयीं पक्की खातरी थोड्यांचीच असेल. जुन्या काळच्या बहुत मोठमोठ्या शाहाण्या लोकांची अशी समजूत होती, व हल्लींही बहुत लोकांची तशीच समजूत आहे, कीं परदेशांतून जे जिन्नस स्वदेशांत येतात, ते तेथून येण्याचे बंद केले असतां, आपल्या देशांत ते उत्पन्न करावे लागून आपल्या लोकांचा उद्योग फार वाढतो, व जितके पदार्थ नवे होतात, तितक्या पदार्थांच्या मानानें आपला देश अधिक सधन होतो; परंतु वास्तविक पाहिलें असतां ही समजूत केवळ भ्रांतीची आहे. आतां ही समजूत भ्रांतीची कशी ह्याचें प्रतिपादन अर्थशास्त्रकार ह्याप्रमाणें करतात.—

पाहा, हा आपला हिंदुस्तान देश आहे; ह्यांतील लोक कापूस व अफू हे जिन्नस उत्पन्न करून ते इंग्रजांस देऊन त्यांपासून कापड विकत घेतात. आतां ह्या देशांत जर असा कायदा झाला, कीं हिंदुलोकांनीं इंग्रजलोकांपासून कापड विकत घेऊं नये; तर ह्या लोकांस कापड करावें लागेल, व तें ते बरेंवाईट करतील. ह्या उदाहरणांत अर्थशास्त्रांत अनभ्यस्त जे त्यांस असें वाटतें, कीं आपल्या देशांत वस्त्ररूप धन नवें उत्पन्न झालें. परंतु हें त्यांचें समजणें भ्रांतीचें आहे. कां कीं, कापड करावयास जे लोक लागतील, त्यांस द्रव्य, वस्त्र, हत्यारें, अन्न, वगैरे भांडवल पाहिजे; आणि हें भांडवल वाढलें नाहीं, तर पहिल्या भांडवलांतून घ्यावें लागेल. तें घेतलें म्हणजे तितकें भांडवल पहिल्या भांडवलांतून कमी होऊन, पहिल्या-इतका कापूस किंवा अफू उत्पन्न होणार नाहीं. तेव्हां कापूस व अफू हीं कमी होऊन जें कापड झालें, तेणेंकरून देशांतील संपत्ति अधिक झाली असें म्हणतां येत नाहीं; तर ती पूर्वीं होती, तितकीच आहे. पहिल्यानें कापूस व अफू ह्यांच्या रूपानें जी होती, आतां कापडाच्या रूपानें झाली. एतावता रूप मात्र फिरलें, परंतु इयत्ता वाढली नाहीं.

उद्योग भांडवलाच्या अधीन आहे, भांडवल वाढल्यावांचून तो वाढत नाहीं, म्हणून सांगितलें; परंतु देशांत जितकें भांडवल असतें, त्यापासून उद्योग जितका चालावा तितका चालतो, असें बहुतकरून कोणत्याही देशांत घडत नाहीं. ओसाड देशांत प्रथमतः वसाहती होतात, तेव्हां तेथें भांडवल पुष्कळ असतें; परंतु तेथें सर्व भांडवल कामी लावावयापुरते मजूरच मिळत नाहींत. आतां, नव्या वसाहती

कर्यास पाहिजेत? कोणताही देश घेतला, तरी त्या देशांत धनाचा अनुत्पादक व्यय करणारे पुष्कळ असतात; किंबहुना सर्व लोक धनाचा थोडाबहुत नाश अनुत्पादकत्वेंकरून करतात, असें म्हटलें तरी चालेल. मनुष्याच्या निर्वाहास व त्यास काम करण्यापुरतें सामर्थ्य राहावयास त्यास धनाचा जितका व्यय करावा लागतो, त्यापेक्षां अधिक जो धनव्यय, तो सर्व अनुत्पादक होय. मनुष्यें, अन्नवस्त्र वगैरे आवश्यक पदार्थांखेरीज शरीरास व मनास सुख होण्याकरतां, ज्या वस्तूंचा उपभोग करतात, त्यांच्या व्ययानें कांहींही धन उत्पन्न होत नाहीं; व त्या वस्तू मुळींच उत्पन्न केल्या नाहींत, तर मनुष्यांचें सुख कमी होईल खरें; परंतु त्या गोष्टी उत्पन्न न झाल्यामुळें पुढें उत्पन्न होणाऱ्या संपत्तींत न्यूनता येणार नाहीं. ज्या वेळेस अवर्षण किंवा युद्ध इत्यादि दैविक किंवा राजकीय अनर्थ चांगल्या सधन देशांवर गुदरतात, त्या वेळेस तेथील लोकांस जे हाल भोगावे लागतात त्यांचें कारण असें असतें, कीं त्या अनर्थांच्या योगानें भांडवल नेहमींच्या पेक्षां कमी होतें, आणि भांडवल कमी झाल्यानें त्यांची पहिली ऐषआरामीचीं सुखें व सोई वगैरे कमी होऊन, त्यांचे हाल होतात; तरी त्यांचें सरासरी पोषण होतें. ह्यावरून त्या तसल्या देशांतील सर्व भांडवलाचा उत्पादकत्वेंकरून व्यय होत नसतो, असें सिद्ध होतें.

देशांतील भांडवलावर जेवढ्या लोकांचें जीवन होण्याजोगें असतें,—म्हणजे त्या भांडवलावर जितकी संपत्ति उत्पन्न होण्याजोगी असते, तितकी संपत्ति देशांत उत्पन्न होत नाहीं अशा ठिकाणीं त्या देशांतल्या सरकारानें केल्यास त्याच्या हातून संपत्तीची वृद्धि होते; व ती करण्याचे मार्ग अनेक आहेत. पाहा, ज्या देशांत भांडवल पुष्कळ आहे, आणि मजूर थोडे आहेत, तेथें सरकारानें परदेशांतील आणखी मजूर आणले असतां, मजुरांची संख्या वाढून तेवढ्याच भांडवलावर अधिक संपत्ति उत्पन्न होईल. तसेंच, देशांत श्रीमान् लोक बहुत आहेत, व ते ऐषआरामीच्या उपभोगांत पुष्कळ संपत्ति खर्चतात; अशा ठिकाणीं सरकारानें त्या लोकांवर कर बसवून, द्रव्य उत्पन्न करून, तें मजुरांस देऊन, त्यांकडून संपत्ति उत्पन्न करविली, तर होईल. ह्या दोनही उदाहरणांत, ज्या संपत्तीचा अनुत्पादक व्यय होत होता, जसें दुसऱ्या उदाहरणांत श्रीमान लोक जी संपत्ति ऐषआरामींत खर्चीत होते, त्या संपत्तीचा आतां उत्पादकत्वें-करून व्यय होईल.

उद्योगाची इयत्ता भांडवलाच्या इयत्तेवर आहे, म्हणून भांडवलाची वृद्धि झाली असतां, तिच्या मानानें उद्योगाची वृद्धि होतेच असें नाहीं तर, होण्याची योग्यता बरीक असते. कारण भांडवल वाढलें म्हणजे त्याचा वाढलेला भाग किंवा त्यांतील कांहीं अंश यंत्रें करण्याकडे, रस्ते बांधण्याकडे, किंवा जमीन सुधारण्याकडे कधींकधीं लावतात, आणि त्यापक्षीं भांडवलाची वृद्धि झाली असतांही उद्योगाची वृद्धि होत नाहीं, ह्याकरतां भांडवलाची वृद्धि झाली असतां, उद्योगाची वृद्धि होतेच असें म्हणतां येत नाहीं; तर ती होण्याची योग्यतामात्र आहे, हें सिद्ध आहे आणि ह्याप्रमाणें भांडवलाची अमर्याद वृद्धि झाली तर, उद्योगाचीही अमर्याद वृद्धि होईल. सारांश, उद्योग वाढण्यास भांडवल वाढलें पाहिजे. तें असलें, म्हणजे मग त्याशिवाय दुसऱ्या कोणत्या गोष्टीची गरज नाहीं. श्रम करावयास मजूर; आणि अन्नवस्त्र, द्रव्य, हत्यारें इत्यादि भांडवल, हीं दोन असलीं म्हणजे हवी तितकी संपत्ति उत्पन्न करतां येईल; तिला तिसऱ्या कारणाची अपेक्षा नाहीं. आतां वर सांगितलेली गोष्ट फारच स्पष्ट दिसते; इतकी स्पष्ट दिसते, कीं ती सांगण्याचीसुद्धां गरज नाहीं, असें वाटतें. परंतु ही गोष्ट इतकी स्पष्ट असतांही, तद्विरुद्ध समजुती लोकांत बहुत आहेत. बहुतेक लोकांची अशी समजूत आहे, कीं लोकांत संपत्तीचा अनुत्पादक व्यय आहे, म्हणून पुष्कळ मजुरांचें पोषण होतें. सामान्य लोक तर काय, परंतु मोठमोठ्या अर्थशास्त्रकारांच्या ग्रंथांत सुद्धां ही चूक आढळते. ते असें लिहितात कीं, लोक आपल्या मिळकतीपैकीं जितक्या भागाचें भांडवल करतात, त्यापेक्षां अधिक करूं लागले, आणि अनुत्पादक व्यय कमी झाला तर वाढलेलें भांडवल व्यर्थ जाईल. कां कीं, अनुत्पादक व्यय बंद झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या मालाचा

खप नाहींसा होऊन तो माल वायां जाईल. ह्या भ्रांतीचें कारण आम्हांस असें वाटतें, कीं त्या ग्रंथकारांनीं प्रथमतः सुगम स्थळांचा विचार करून मग मिश्र स्थळांचा विचार करावा, तसें केलें नाहीं; ह्यामुळें असें झालें.

वर सांगितलेली समजूत भ्रांतीची कशी, ह्याचें विवरण करतों :—आपण अशी कल्पना करूं, कीं कोणा एका देशांतल्या सरकारानें त्या देशांतील अन्नवस्त्र, हत्यारें, द्रव्य, वगैरे संपत्तीचीं सर्व कारणें आपल्या ताब्यांत घेतलीं, आणि असा नियम केला, कीं कांहीं तरी उत्पादक श्रम करून घेतल्यावांचून, कोणास अन्नवस्त्र वगैरे द्यावयाचें नाहीं. तर जोंपर्यंत म्हणून देशांत कोणा एकाद्यास निर्वाहाच्या किंवा ऐषआरामीच्या मूर्त द्रव्यरूप पदार्थांची गरज आहे, तोंपर्यंत त्या सरकारच्या लोकांला श्रम करण्यास स्थळ नाहींसें होणार नाहीं. आतां जे मांडवलवाले आपलें मांडवल वाढवतात, ते पूर्वोक्त कल्पित उदाहरणांत सरकारानें जें केलें असतें तेंच करतात. उदाहरणांत हवें तसें स्थळ कल्पिण्यास चिंता नाहीं, म्हणून आपण अशी कल्पना करूं, कीं जी पुढें कल्पना करण्यास जागा उरणार नाहीं. असें समजा, कीं, सर्व मांडवलवाल्यांनीं व जमीदारांनीं असा निश्चय केला, कीं आपण व मजूर सर्व मनुष्यें सारखीं आहों, त्या अर्थी आपण मजुरांपेक्षां अधिक सुखोपभोग करणें नीट नाहीं; तर आपणांस निर्वाहास जेवढें लागेल, तेवढ्यांत आपला सर्व खर्च आटपावा, व बाकीच्या सर्व संपत्तीचें मांडवल करून तेणेंकरून मजुरांचें पोषण करावें, असा त्यांनीं स्वतः विचार केला, किंवा सरकारानें, याच भावाचा कायदा केल्यावरून असें त्यांस करावें लागलें, असें कल्पूं; एतावता उभयपक्षींही देशांतील अनुत्पादक व्यय बंद होईल, मग नव्या वाढलेल्या मांडवलानें उत्पन्न केलेल्या पदार्थांस विकत घेणारा कोण ? त्यांचा खप बंद झाल्यामुळें, त्यांस गिऱ्हाईक न मिळून ते दुकानांतल्या दुकानांतच नासून जातील, आणि मग, खप नाहीं म्हणून, नवे पदार्थ होण्याचें बंद होऊन मजुरांस रोजगार नाहींसा होईल; व अनुत्पादक व्यय चालू होऊन, कांहीं मांडवलाचा नाश होऊन, तें पहिल्याइतकें होईतोंपर्यंत तशीच स्थिति राहील; असें शंकाकार म्हणतात. परंतु ह्या स्थळीं ते अर्ध्या गोष्टीचा विचार करतात, व अर्धी तशीच सोडतात, ह्यामुळें त्यांची चूक त्यांच्या मनांत येत नाहीं, पहा, कल्पित स्थळीं, यद्यपि, मांडवलवाले व जमीदार ह्यांनीं ऐषआरामीचे पदार्थांचा उपभोग करण्याचा सोडल्यानें, त्यांकडून खप होत होता, तो नाहींसा झाला खरा; परंतु त्यांनीं आपल्या मिळकतीचें मांडवल केल्यानें लोकांत मुळीं खप नाहीं, असें नाहीं. पूर्वी मांडवलवाले वगैरे, अनुत्पादकखर्चेंकरून संपत्तीचा व्यय करीत; आतां तिचा उत्पादकखर्चेंकरून व्यय मजूर करतील, इतकाच भेद झाला.

आतां, मजुरांविषयीं दोन पक्ष संभवतात. एक पक्ष हा, कीं मजुरांची संख्या दिवसानुदिवस वाढते. दुसरा, त्यांची संख्या वाढत नाहीं. त्यांत प्रथमपक्षीं तर कांहींच अडचण नाहीं. कारण, जुन्या लोकांनीं ऐषआरामीचे पदार्थ उपभोगण्याचें बंद केल्यामुळें जें मांडवल राहिलें असेल, तें नव्या लोकांस निर्वाहोपयोगी पदार्थ उत्पन्न करण्याकडे लागेल. मजुरांची संख्या वाढत नाही, असा पक्ष घेतला तरी इतकेंच होईल, कीं मांडवलवाले व मजूर पूर्वी जसा अनुत्पादक व्यय करीत होते, तसा आतां मजूरच करूं लागतील. कां कीं, मजुरांची संख्या आहे तितकीच आहे आणि मांडवल वाढेल तेणेंकरून मजुरीचा दर वाढून मजुरांस संपत्तीचा अंश अधिक मिळेल. एतावता, जमीदार ज्या पदार्थांचा उपभोग करीत असतील, ते पदार्थ उत्पन्न होण्याचे जागीं मजुरांस उपभोगण्याजोगे पदार्थ उत्पन्न होतील, आणि एकाद्या मजुरास एकाद्या पदार्थांची गरज आहे तोंपर्यंत नवी संपत्ति उत्पन्न होण्याचें चालेल. सारांश, संपत्ति उत्पन्न होण्यास जो प्रतिबंध होतो तो खपाच्या कमताईमुळें कदापि होत नाहीं; तर उत्पादकांच्या किंवा उत्पादक साधनांच्या कमताईमुळें होतो. मांडवलांत जी भर पडते, तिच्या योगानें नव्या मजुरांचें उपजीवन होतें, किंवा जुन्या मजुरांस अधिक मजुरी मिळते. पहिल्यापक्षीं, देश विशेष संपन्न होतो;

व दुसऱ्यापक्षीं, मजूर (जे देशांतील सर्व लोकांत तीन चतुर्थांशावर असतात ते) विशेष संपन्न होतात. आणि ह्या पक्षींही, मजुरांस अधिक मजुरी मिळूं लागल्यानें, कदाचित्, त्यांस उत्तेजन येऊन, ते, खूप मेहनत घेऊन, संपत्तीचें उत्पन्न अधिक करतात.

मांडवलाविषयीं दुसरा सिद्धांत असा आहे, कीं भांडवल संग्रहापासून होतें. ह्या सिद्धांताची सत्यता वाचणाऱ्यांच्या मनांत येण्याजोगें मागें बरेंच प्रतिपादन झालें आहे. तथापि, ह्या विषयाचें आणखी कांहीं विवेचन केलें असतां चांगलें, असें जाणून ह्या विषयांवर थोडेसें लिहितों :—

जर सर्व मनुष्यें आपआपल्या श्रमाच्या सर्व उत्पन्नाचा व्यय करूं लागलीं, तर मांडवल कदापि वाढावयाचें नाहीं. प्रायः सर्व मांडवल संग्रहमूलक आहे. प्रायः पद घालण्याचें कारण असें आहे, कीं जो मनुष्य आपल्याच करतां श्रम करतो, तो निर्धन न होतां, त्याला आपल्या श्रमाच्या सर्व उत्पन्नाचा स्वसुखार्थ व्यय करतां येतो.* ह्या मनुष्याच्या उदाहरणांत त्याचा माल तयार होईतोंपर्यंत तो ज्या पदार्थांचा व्यय करतो, त्या पदार्थांस मांडवल म्हणावें असें कोणी म्हटल्यास तें म्हणणें एक प्रकारें बरें दिसतें. परंतु वास्तविक पाहातां त्या पदार्थांस मांडवल म्हणतां येत नाहीं. कां कीं, त्या पदार्थांचा तो मनुष्य उत्पादक बुद्धीनें व्यय करीत नाहीं, तर स्वसुखार्थ करतो; म्हणून, तेथें स्वोपभोगाचा प्रतिबंध झाला असें म्हणतां येत नाहीं. आतां बारीक विचार केल्यास ह्या स्थळीं सुद्धां पुढल्या उत्पन्नाकरतां बियाचा वगैरे संचय प्रकृत सुखाचा प्रतिबंध करूनच करावा लागतो. तस्मात्, लोकांची कितीही साधी अवस्था घेतली, तरी तितकांहीं संग्रह असला पाहिजे; किंवा उत्पन्नापेक्षां खर्च तरी कमी असला पाहिजे. आतां मजूर चाकरीस ठेवून त्यांकडून संपत्ति उत्पन्न करण्याचें म्हटलें तर, या अवस्थेंत पहिल्या साध्या अवस्थेंतल्यापेक्षांही अधिक संग्रह असला पाहिजे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यांकडून संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत जें धन खर्चतो, तें सर्व मुळीं संग्रहापासूनच झालेलें असतें; म्हणजे तें कोणी तरी उत्पन्न केलें पाहिजे, व उत्पन्नकर्त्यानें त्याचा उपभोग न घेतला पाहिजे.

लोक अडाणी असतात व त्यांमध्यें बंदोबस्त कमी असतो. त्या अवस्थेंत बहुतकरून असें घडतें, कीं ज्यांपाशीं मांडवल असतें त्यांनीं त्यांचा मुळीं संग्रह केला नसतो; तर जे विशेष बळकट असतात किंवा ज्यांस त्याचें पाठबळ असतें, ते अशक्तांनीं संचित केलेलें धन जुलमानें बळकावतात. आणि ज्या लोकांत वर सांगितल्यापेक्षां ज्ञान व बंदोबस्त हीं विशेष असतात, त्यांतही कितीएकांचें मांडवल लोकांच्या उपभोगाचा प्रतिबंध होऊन झालेलें असतें. आतां अशा प्रकारच्या धनास संग्रह म्हणत नाहींत; कां कीं, तो संग्रह ज्यांच्या उपभोगाच्या प्रतिबंधानें होतो, ते स्वेच्छेनें तो प्रतिबंध करीत नाहींत. ह्यास उदाहरण गुलाम बाळगून त्यांकडून जे संपत्ति उत्पन्न करवितात, त्यांचा संग्रह हें होय. परंतु ह्या स्थळीं देखील धन्यास कांहीं काळपर्यंत स्वोपभोगाचा प्रतिबंध करावा लागतो, आणि तो जर आपल्या गुलामांनीं उत्पन्न केलेल्या सर्व संपत्तीचा व्यय करील, तर त्याचें मांडवल कधीं वाढणार नाहीं. तेव्हां गुलामांच्या धन्यासही गुलामांच्या पोटास जें पाहिजे तें व उत्पन्न करावयाच्या संपत्तीस जें हत्यारें द्रव्यें वगैरे मांडवल पाहिजे, तें संग्रह करूनच केलें पाहिजे, संग्रहावाचून मांडवल कदापि व्हावयाचें नाहीं. आतां हा संग्रह करतांना तो आपल्या उपभोगाचा प्रतिबंध तादृश करावयाचा नाहीं; गुलामांचे हाल करील.

वर जें उपपादन केलें त्याचा उद्देश हा कीं, संग्रहानेंच मांडवल वाढतें, असा जो नियम सांगितला, त्या नियमावर साधारण वाचणाऱ्याच्या मनांत अशी शंका येईल, कीं गुलामांचे धनी, स्वसुखोपभोगाच्या प्रतिबंधामुळे झाला जो संग्रह तो करीत नसतां त्यांपाशीं मांडवल असतें; तर ती

---

* रानवट अवस्थेंत बहुत मनुष्यांची स्थिति वर सांगितल्याप्रमाणेंच असते.

शंका त्याच्या मनांत येऊं नये, कां कीं, त्या स्थळींही उत्पादक जे गुलाम, त्यांच्या सुखोपभोगाच्या प्रतिबंधामुळें संग्रह आहेच आहे.

आणखीही कांहीं उदाहरणें आहेत, जेथें वर सांगितलेला सिद्धांत लोकांच्या बरोबर ध्यानांत येत नाहीं. भांडवल वाढणें तें संग्रह वाढल्यावांचून होत नाहीं; म्हणून भांडवल वाढण्यासाठीं विशेष संग्रह, म्हणजे विशेष स्वसुखोपभोगाचा प्रतिबंध केला पाहिजे; असें संग्रह शब्दाच्या लौकिकार्थांवरून मनांत येतें. परंतु तें खरें नव्हे. पाहा, भांडवलवाल्यानें आपलें उत्पन्न कांहीं नव्या युक्तीनें वाढवलें, तर वाढलेल्या उत्पन्नाच्या योगानें त्यास, आपला पहिल्याप्रमाणें सुखोपभोग राखूनही, भांडवल वाढवितां येईल; व एवढेंच काय, पण तसेंच उत्पन्न वाढल्यास पहिल्यापेक्षां सुखोपभोग वाढवूनही भांडवल वाढवितां येईल.

भांडवलाविषयीं तिसरा सिद्धांत असा आहे, कीं सर्व भांडवल संग्रहमूलक आहे खरें. परंतु त्याचा व्यय झाल्यावांचून त्यापासून संपत्ति उत्पन्न होत नाहीं. भांडवलवाला धनाचा संग्रह करतो, तो स्वोपभोगाचा प्रतिबंध करून करतो, म्हणून त्या धनाचा मुळींच व्यय होत नाहीं, तें तसेंच राहातें, असें समजूं नये; तर त्याचा व्यय होतोच. परंतु तो व्यय भांडवलवाला स्वसुखार्थ करीत नाहीं. तर तो व्यय मजुरांकडून उत्पादकर्वेकरून करवितो. पाहा, नवें भांडवल झालें म्हणजे त्याचा कांहीं भाग हत्यारें घेण्यांत जातो; व तीं हत्यारें काम केल्यानें झिजून नाहींतशीं होतात; व कांहीं भाग नवा माल करावयाचीं जीं द्रव्यें (बीं, लांकूड, सूत वगैरे) ह्यांच्या रूपानें असतो, तीं द्रव्यें कामास लाविलीं म्हणजे नाहींतशीं होतात; बीं पेरलें म्हणजे नष्ट होतें; व सूत, लांकूड वगैरे द्रव्यें, ह्यांचें कापड, चवरंग, पाट, देव्हारे वगैरे सामान, केलें म्हणजे तीं मूळरूपानें नाहींतशीं होतात, व त्यांचा उपयोग झाला, म्हणजे तर अगदींच नष्ट होतात, व भांडवलाचा मोठा भाग मजुरांस मजूरी देण्याकडे जातो. त्या भागाचा ते आपल्या निर्वाहाकडे वगैरे व्यय करून नाश करतात. ह्याप्रमाणें भांडवलापासून नवें धन उत्पन्न होतें, तें त्याचा नाश होऊन होतें.

ह्या वर सांगितलेल्या सिद्धांताविषयीं लोकांत जी समजूत आहे, तिकडे लक्ष्य दिलें म्हणजे अर्थशास्त्रांतील मूलभूत जे विषय ते त्यांस नीट समजून घेण्याची किती आवश्यकता आहे, हें ध्यानांत येईल. संग्रह केलेल्या सर्व भांडवलाचा व्यय होतो, हा नियम अर्थशास्त्रांतील मूलभूत नियमांतला आहे. परंतु ज्यांनीं ह्या शास्त्रांचा तादृश अभ्यास केला नाहीं, त्यांच्या ध्यानांत हा सिद्धांत बिंबलेला असत नाहीं व पुष्कळ लोकांस हा प्रथमदर्शनीं इतका विलग दिसतो, कीं ते तो मुळींच मान्य करीत नाहींत. भांडवलवाल्याच्या सर्व संग्रहाचा व्यय होतो, ही गोष्ट अशिक्षित लोकांच्या मनांतच येत नाहीं. त्यांस असें वाटतें, कीं जो जो मनुष्य संग्रह करतो, तो तो धनाची रास करून ठेवतो. आतां संग्रह करणारा, पुढें आपल्या कुटुंबाच्या व संकटसमयीं किंवा आपले हातपाय राहातील, त्या वेळेस आपल्या उपजीवनाकरतां तो संग्रह करीत असल्यास, लोकांस त्याचें करणें वाईट वाटत नाहीं. परंतु कोणाचे संग्रह करण्यानें इतर लोकांस लाभ होतो, असें त्यांस कदापि वाटत नाहीं. त्यांची समजूत अशी असते, कीं संग्रह करणें म्हणजे केवळ स्वोपभोगाकरतां वस्तू बाळगून ठेवणें, व खर्च करणें, हें आपलें धन चौघांच्या उपयोगी पाडणें होय. जो मनुष्य आपल्या धनाचा अनुत्पादक व्यय करतो, म्हणजे नानाप्रकारच्या ऐषआरामीचे पदार्थ विकत घेण्यांत व ख्यालीखुशालींत धन खर्चतो, तो आपलें धन लोकांत विखरतो, असें वाटून लोक त्याला चांगला असें म्हणतात. ते आपला स्वतःचा पैसा खर्चणाऱ्यास चांगलें म्हणतातच; परंतु जो मनुष्य संग्रह करणाऱ्या दुसऱ्या लोकांचा पैसा उसना आणून, तो खर्चून मौज मारतो, तो सुद्धा कांहीं अंशांनीं लोकांस बरा वाटतो.

ही जी वर लोकांची गैरसमजूत सांगितली, तिचें कारण हें आहे, कीं भांडवलवाल्याचा उत्पादक

व्यय, व ऐषआरामी करणाऱ्याचा अनुत्पादक व्यय, ह्यांचीं जीं वास्तविक कार्यें आहेत, तीं सर्व ते मनांत आणीत नाहींत. त्या कार्यांपैकीं जीं उघड आहेत, त्यांवरून ते आपल्या मनांतले सिद्धांत करतात. जो संग्रह करतो त्याचा पैसा त्याच्या घरांत राहिला इतकें मात्र अज्ञान लोकांस दिसतें व त्यापुढें तो पैसा कोणीकडे जातो, हें ते लक्ष्यांत आणीत नाहींत. आणि मनुष्य ऐषआरामींत जो पैसा खर्चतो, तो पैसा त्यानें ज्या ज्या व्यापाऱ्यापासून माल घेतला असतो, त्यांच्या घरीं जातो; आणि त्यापासून त्यास नफा झाला असें त्यांस वाटतें. आतां वास्तविक पाहातां जो मनुष्य आपल्या धनाचें भांडवल करतो, व जो तें ऐषआरामींत खर्चतो, ते दोघेही आपल्या धनाचा व्यय करतात. आणि व्यय करण्यापर्यंत त्या दोघांचीही कृति सारखीच आहे. दोघांच्याही धनाचा आरंभी नाश होतो. त्यांत भेद इतकाच कीं दुसऱ्याच्या धनाचा नाश त्याच्याच हातून होतो; व पहिल्याच्या धनाचा नाश इतरांच्या, म्हणजे मजूर वगैरे ह्यांच्या हातून होतो. परंतु ह्या दोघांच्या कृत्यांचे ह्यापुढील परिणाम पाहिले तर, अगदी भिन्न आहेत. अनुत्पादक व्यय झाला म्हणजे त्या धनाचा शेवटच झाला. श्रमाचें तितकें फळ जगांतून नाहींसें झालें; त्याचें मागें कांहींच उरलें नाहीं. परंतु उत्पादक व्ययाचा परिणाम पाहिला, तर तो अगदींच निराळा दिसतो. उत्पादक व्ययानेंही अनुत्पादक व्ययाप्रमाणेंच संपत्तीचा नाश होतो खरा; परंतु तो नाश चालला असतां इकडे नवी संपत्ति उत्पन्न होत असते; आणि शेवटीं पाहावें तों जितकी संपत्ति नाहीशी होते, तितकी उत्पन्न होऊन तीवर आणखी नफा उत्पन्न होतो; आणि एकदां संग्रह होऊन जें भांडवल झालें, त्याचा त्याप्रमाणें उत्पादक व्यय केला असतां, त्यापासून, नवा विशेष संग्रह झाल्यावांचूनही, कांहीं मजुरांचें अनंतकाळ उपजीवन होईल व दर खेपेस कांहीं विशेष नफाही, केल्यास, होईल.

हे दोन प्रकारचे व्यय पैशाच्या द्वारें होतात, ह्यामुळें त्यांचीं वास्तविक कार्यें अशिक्षित लोकांच्या मनांत चांगलीं येत नाहींत. क्रयविक्रय होतो, तो सर्व पैसा मध्यें येऊन होतो, तेणेंकरून ह्या व्यवहारांत पैसाच काय तो मुख्य असें वाटूं लागतें, आणि अनुत्पादक व्यय करणाऱ्याच्या हातून पैशाचा नाश न होतां, तो त्याच्या हातून दुसऱ्याच्या हातीं जातो, इतकेंच मात्र होतें. ह्यामुळें तसा व्यय करणारा संपत्तीचा नाश करतोसें लोकांस वाटत नाही. जो मनुष्य संग्रह करतो, तो लोकांतला पैसा आपणांपाशीं अधिक अधिक सांचवतो; ह्यामुळें लोकांतला पैसा अर्थांतच कमी होतो, असें ते समजतात. परंतु पैसा व संपत्ति ह्यांच्यामध्यें जो भेद आहे, तो ते विसरतात, ह्यामुळें त्यांसही वर सांगितलेली भ्रांति होते. अनुत्पादक व्यय करणारा पैशाचा नाश करीत नाहीं खरा; परंतु तो उत्तम प्रकारचे पोषाक, व साकर, तूप, बदाम, पिस्ते, वगैरे खाद्य पदार्थ; एतद्रूप जी संपत्ति तिचा नाश करतो. कोणी जर असें म्हटलें, कीं पोषाक व साकर वगैरे पदार्थ हे उत्पादक द्रव्यें किंवा हत्यारें नव्हत; ह्याकरतां ह्यांचा व्यय सर्वकाल अनुत्पादकत्वेंकरूनच व्हावयाचा. ते पदार्थ मजुरांच्या निर्वाहास आवश्यक कदापि असत नाहींत. ह्यास्तव जेव्हां हे पदार्थ उत्पन्न झाले, तेव्हांच तदुत्पादक संपत्तीचा अनुत्पादक व्यय झाला, आणि देशांतील तितकी संपत्ति नष्ट झाली. तर, हें त्यांचें म्हणणें आम्ही मान्य करतों. परंतु अनुत्पादकत्वेंकरून नष्ट झालेली संपत्ति जर ज्यांत नवी भर पडत नाहीं अशा पूर्वस्थित भांडवलापासूनच उत्पन्न होती, तर ह्या शंकेंत जीव असता; परंतु तशी गोष्ट होत नाहीं. लोक ऐषआरामीच्या पदार्थांचा व्यय करूं लागले, म्हणजे त्या पदार्थांस तेजी येऊन ते उत्तरोत्तर विशेष उत्पन्न होतात. ह्या करतां अनुत्पादक व्यय होऊं लागल्यानें ते पदार्थ उत्पन्न करणाऱ्या मजुरांचा श्रम संपत्तीच्या उत्पन्नास अनुपयोगी जे पदार्थ ते उत्पन्न करण्याकडे जाऊं लागतो. त्या मजुरांचा श्रम देशांतील संपत्तीच्या वृद्धीस अगदीं अप्रयोजक आहे; व त्या मजुरांच्या निर्वाहास जें धन लागतें, तें, व ज्या हत्यारांनीं व द्रव्यांनी तें काम करतात, तीं ही सर्व संपत्ति देशाच्या भांडवलांतून मुळींच लयास जाते. ह्यास्तव देशांत ऐषआरामीचा उपभोग करणारे, म्हणजे धनाचा अनुत्पादक

व्यय करणारे, जसे कमी किंवा जास्त असतील त्या मानानें ते ऐषआरामीचे पदार्थ उत्पन्न करण्याकडे देशांतला उणाअधिक श्रम लागतो; आणि तेणेंकरून उत्पादक मजुरांचा धंदा कमी होतो, आणि इतकेंच होऊन राहात नाहीं, तर ते ऐषआरामीचे पदार्थ उत्पन्न करण्याकडे जीं हत्यारें वगैरे लागतात तीं उत्पन्न करण्यानेंही उत्पादक मजुरांच्या पोषणास कारण जें देशांतील एकंदर भांडवल, तें कमी होतें.

सारांश, उत्पादक व्यय करणारा व देश, ह्या दोघांचीही संपत्ति वाढते; व अनुत्पादक व्ययानें व्यय करणारा व देश, ह्या दोघांच्याही संपत्तीचा क्षय होतो, म्हणजे उत्पादक व्ययकर्त्ता आपल्या कृत्यानें आपलें व देशाचें सांसारिक सुख वाढण्यास कारण होतो; व अनुत्पादक व्ययकर्त्ता आपल्या कृत्यानें आपणास व आपल्या देशास दारिद्र्य आणण्यास कारण होतो.

सर्व संपत्तीचा चरम परिणाम व्यय होय. मग तो भांडवलाचे रूपानें असो, किंवा अन्य रूपानें असो. आतां तो भांडवलाच्या रूपानें असला तर उत्पादक होतो, व भांडवलाच्या रूपानें नसला तर अनुत्पादक होतो; एतावता सर्व संपत्तीचा व्यय म्हणून व्हावयाचाच. ह्या शास्त्रांत सांगितलेला संपत्ति शब्दाचा अर्थ ज्या ज्या पदार्थास लागतो, त्यापैकीं दाहापांच वर्षांवर टिकणारे असे पदार्थ फार थोडे आहेत. बहुतेक प्रकारचीं धान्यें, धडवतीचीं वस्त्रें, किराणा जिनस, वगैरे पदार्थ एक दोन वर्षांच्या आंतच नाश पावतात. उंच उंच वस्त्रें, धातूंचीं भांडीं वगैरे, व त्यांपेक्षां चिरस्थायी इमारती वगैरे, हीं पुष्कळ दिवस टिकतातसें वाटतें; परंतु त्यांसही तोडमोड करावी लागते; तेणें करून तीं नवीं केल्यासारखींच होतात. ह्या प्रकारें सूक्ष्म दृष्टीनें पाहातां, दाहापंधरा वर्षांत देशांतल्या बहुतेक संपत्तीचा नाश होतो. ह्या वर सांगितलेल्या गोष्टीवरून आपल्या ध्यानांत स्पष्ट येईल, कीं देशांतलें भांडवल जें स्थिर राहातें किंवा वाढत जातें, तें रक्षणानें स्थिर राहात नाहीं, अथवा वाढतही नाहीं, तर त्याचा पुनः पुनः खर्च करून, तें पुनः पुनः उत्पन्न केल्यानें स्थिर राहातें, किंवा वाढतें. देशांतील भांडवल वाढणें हें देशांतील लोकसंख्या वाढण्यासारखें, किंवा वाहात्या नदीचें पाणी वाढण्यासारखें आहे. दृष्टांतीं जसें, कीं मनुष्यें देशांत असतात, तीं असून नवीं उत्पन्न होतात, किंवा नदींत जें पाणी असतें तें तसेंच राहून नवें अधिक होतें असें नाहीं, तर, पहिलीं मनुष्यें मरत असतात. परंतु नवीं मनुष्यें मरणाऱ्या मनुष्यापेक्षां अधिक उत्पन्न होतात. किंवा नदींतलें पाणी प्रत्येक क्षणीं पुढें जात असतें; परंतु नवें पाणी गेल्या पाण्यापेक्षां अधिक येतें. तसें देशांतील पहिली संपत्ति तर दरवर्षी खर्च होतच असती; परंतु नवी जी उत्पन्न होते, ती खर्चलेल्यापेक्षां अधिक होते; तेणेंकरून देशांतील एकंदर संपत्ति वाढते, असें जाणावें.

इतिहासांत अशी गोष्ट वारंवार आढळते, कीं एकाद्या देशांत शत्रु शिरून तो देश अगदीं उध्वस्त करतो, आणि तो अनर्थ झाल्यापासून थोड्याच काळानें तो देश सांवरून पुनः पहिल्याप्रमाणें सधन होतो. ह्याप्रमाणे झालेली स्थिति ह्या हिंदुस्थानच्या इतिहासांतच पुष्कळ ठिकाणीं आढळते. मुसलमान स्वाऱ्या घालून देश धुवून नेत; तरी ते पुनः स्वारीस आले म्हणजे हा देश पहिल्यासारखाच सधन त्यांच्या दृष्टीस पडे. ह्या प्रकाराचें देशाचें सांवरणें साधारण वाचणाऱ्यांस फार चमत्कारिक वाटतें. परंतु भांडवल कसें वाढतें, ह्याविषयीं वर प्रकार सांगितला, त्याकडे लक्ष्य देतां, आपणांस तसें होण्याचें कारण सांगण्यास फार श्रम लागणार नाहीं. पाहा, उध्वस्त केलेल्या देशांतील, शत्रूंनीं जी संपत्ति नेली, ती असती तरी पांचचार वर्षांनी लयास जातीच; विशेष इतकाच होता, कीं ती असल्यानें तिच्या व्ययानें देशच्या लोकांस सुखोपभोग झाला असता; व शत्रूंनीं ती नेल्यामुळें तो उपभोग त्यांस घडला नाहीं, व कित्येकांचे हालही बहुत झाले. ह्या देशांतील संपत्ति होण्याचीं वास्तविक कारणें जीं हत्यारें, द्रव्यें, मजुरांच्या निर्वाहाचे आवश्यक पदार्थ, त्यांचें ज्ञान, कलाकौशल्य, जमिनीचा पिकाऊपणा, ह्यांस शत्रूपासून प्रायः उपद्रव घडत नसे; त्यामुळें देश पहिल्याप्रमाणें पुनः सांवरला जाई. शत्रूंनीं जी संपत्ति नेली, ती संपत्ति उत्पादक नव्हती; तर ती केवळ उपभोग्य होती. ती शत्रूंनीं नेली नसती तरी तिचा

उपभोग होऊन ती लौकरच नाश पावली असती. उत्पादक संपत्ति देशांत राहिली होती, म्हणून तिच्या योगानें पहिल्याप्रमाणें उत्पादक व अनुत्पादक उपभोग्य संपत्ति उत्पन्न होऊन देश सांवरला. परंतु ज्या स्थळीं शत्रूंनीं संपत्तीच्या वर सांगितलेल्या कारणांचा नाश केला आहे, तेथें उध्वस्त देशास पुनः सांवरण्यास फार कठीण पडलें आहे.

बहुतेक संपत्तीचा लौकरच नाश होतो, ह्या सिद्धांतावरून आपणांस पुष्कळ व्यावहारिक गोष्टींचें विवरण होतें; परंतु विस्तारभयास्तव तें आतां येथें लिहीत नाहीं.

भांडवलाविषयीं चवथा सिद्धांत सांगतों. मागें जे तीन सिद्धांत सांगितले; त्या सर्वांपेक्षां हा सिद्धांत फार दुर्बोध आहे. हा सिद्धांत असा कीं, उत्पादक मजुरांच्या पोषणास, ते ज्या भांडवलाच्या योगानें उद्योगास लागतात, तें भांडवल कारण होय. त्यांच्या श्रमानें पदार्थ तयार झाल्यावर त्या पदार्थांचा जो खप होतो, तो त्या मजुरांचे पोषणास कारण नव्हे. साधारण लोक असें समजतात, कीं मालाचा खप होऊं लागला म्हणजे, तो उत्पन्न होण्याचे कारखानें वाढून मजुरांचा रोजगार पिकतो; ह्यास्तव मालाचा जो खप तो मजुरीचा खप होय. परंतु ही त्यांची समजूत खोटी आहे. मालाचा खप वाढला म्हणजे मजुरीचा खप वाढतो असें नाहीं. मालाचा खप वाढल्यानें इतकेंच होतें, कीं, ज्या मालाचा खप वाढला असेल, तो माल उत्पन्न करण्याकडे विशेष भांडवल जाऊं लागतें. ह्याप्रमाणें मालाचा खप, भांडवलाची व श्रमाची योजना तो माल उत्पन्न करण्याकडे होण्यास मात्र कारण आहे; मजुरांचें पोषण होण्यास तो अगदीं कारण नाहीं.

पाहा, बाजारांत शालजोड्यांचा फार खप आहे, म्हणजे घेणारे शालजोड्या विकत घेण्यास तयार आहेत; परंतु शालजोड्या उत्पन्न करण्याचा कारखाना वाढवण्यास शालजोड्या करणाऱ्यांजवळ भांडवल नाहीं; तर शालजोड्यांच्या वर सांगितलेल्या चणचणीनें मजुरांचें काय हित व्हावयाचें आहे! आतां, बाजारांत शालजोड्यांचा दर चढून त्यांच्या व्यापारांत विशेष नफा होऊं लागल्यामुळें, इतर व्यापारांतलें भांडवल त्या व्यापारांत आल्यास, किंवा शालजोड्या विकत घेऊं इच्छिणाऱ्यांस त्यांची फार उत्कंठा होऊन त्यांनीं शालजोड्या करणाऱ्यांस, भांडवलाकरतां, आगाऊ पैसा दिल्यास, मात्र नव्या शालजोड्या होऊं लागतील. परंतु दोन्ही पक्षीं भांडवल वाढल्यावांचून शालजोड्या उत्पन्न करणाऱ्या मजुरांचा रोजगार वाढला नाहीं. बरें आतां वर जी कल्पना केली, तद्विरुद्ध कल्पना करून, असें स्वत्र धरूं, कीं शालजोड्या करणाऱ्यापाशी भांडवल पुष्कळ आहे, आणि लोकांस शालजोड्यांची गरज नाहीं. ह्या उदाहरणांत शालजोड्या उत्पन्न व्हावयाच्या नाहींत खऱ्या; परंतु भांडवलवाल्या व्यापाऱ्यांस शालजोड्या करण्याची विशेष आवड आहे असें नाहीं; त्यांचें नफा मिळवण्याकडे लक्ष्य असतें. ह्याकरितां ते शालजोड्या उत्पन्न करण्याचें सोडून ज्याचा खप असेल, तेंच उत्पन्न करतील. आतां, बाजारांत विशेष खप कोणत्याही मालाचा नाहीं असें झालें तरी (या कल्पनेप्रमाणें वास्तविक होणें कठीण) भांडवलवाले व मजूर, हे ज्या अर्थी श्रम करतात, त्या अर्थी त्यांस कांहीं माल हवा असतो, तोच माल ते उत्पन्न करतील. ह्याप्रमाणें विचार करून पाहातां मजुरांच्या पोषणास भांडवल आवश्यक आहे; भांडवलावांचून त्यांचा रोजगार चालत नाहीं; असें स्पष्ट सिद्ध होतें. आतां आम्ही जो खपाचा फेरफार कल्पिला, हा एकाएकीं होणारा कल्पिला नाहीं, असें वाचणाऱ्यानें समजलें पाहिजे. कां कीं, ज्या ज्या स्थळीं माल तयार होऊन गेल्यावर त्या मालाची एकाएकीं मंदी पडून तो माल विकेनासा होतो, त्या स्थळीं भांडवलानें माल तर उत्पन्न होऊन चुकतो; पण तो कोणासही नकोसा झाल्यामुळें, तो व्यर्थ नासून जातो, ह्यास्तव त्यापासून मजुरांचें जें पूर्वीप्रमाणें पोषण व्हावयाचें तें आतां होणार नाहीं. आणि असें होण्यास भांडवल नासून कमी झालें हें कारण होय; खप नाहींसा झाला हें कारण नव्हे. कारण कीं त्या मालाचा खप होऊन गेल्यावर त्या मालाची लोकांस एकाएकीं गरज नाहींशी

झाल्यास त्या मंदीपासून मजुरांचा कांहीच तोटा घडत नाहीं. ह्याकरतां माल उत्पन्न होऊन तो विकण्याच्या पूर्वी जी एकाएकीं मंदी होते, ती उदाहरणास घेऊं नये. त्या उदाहरणीं प्रकृत सिद्धांत खरा किंवा खोटा, हें बरोबर समजावयाचें नाहीं. त्याचा खरेपणा किंवा खोटेपणा पाहाण्यास नीट उदाहरण म्हटलें म्हणजे, जेथें खपामध्यें फेरफार पडत पडत पडतो व जो पूर्वीं उदम्यांस समजतो, व जेणेंकरून भांडवलाचा नाश होत नाहीं, व ज्या मालाची मंदी होते त्याचा कारखाना मोडत मोडत मोडतो, म्हणजे त्या कारखान्यांतील यंत्रें व सामान झिजून किंवा खर्चून कमी होतात, तीं नीट करण्याकडे किंवा त्यांत भर घालण्याकडे उदमी नवें भांडवल घालीत नाहींत, व थोडाथोडा माल खपून जो पैसा येतो तो ते दुसरा माल तयार करण्याकडे लावतात, अशा उदाहरणांत वर सांगितल्याप्रमाणें जें भांडवल एका कारखान्यांतून मोकळें होतें, तें दुसऱ्या कारखान्याकडे लागतें. आतां, अशा स्थळींही एक प्रकारच्या भांडवलाचा नाश होतोच, तो नाश टाळतां येत नाहीं. तो हा कीं, ज्या मालाची मंदी पडते तो उत्पन्न करणारे भांडवलवाले व मजूर ह्यांस तो विशेष माल उत्पन्न करण्याचा सराव पडल्यामुळें जें कांहीं कौशल्य प्राप्त झालें असतें, तें सगळें कौशल्य ते दुसरा माल करूं लागले असतां त्यांच्या उपयोगीं पडत नाहीं, आणि हाच तोटा काय तो अनिवार्य आहे. परंतु याखेरीज मोकळें झालेलें इतर भांडवल पहिल्याप्रमाणें मजुरांचें पोषण करतेंच. पहिल्या उदम्यांस दुसरा उदीम स्वतः येत नसल्यास ते आपलें भांडवल दुसऱ्यांस उसनें देतात, आणि त्यांस तो उदीम येतो आहे आणि पहिल्या मजुरांस तो येत नाहीं, असें असल्यास ते नवे मजूर ठेवतात. एकूण देशांत पहिल्याइतक्या मजुरांचें पोषण होतेंच होतें.

जिन्नस विकत घेण्यांत मजुरांस उद्योगास लावलें असें होत नाहीं. जिन्नस तयार होण्याच्या पूर्वी मजुरी देऊन मजुर चाकरीस ठेवणें व जिन्नस तयार झाल्यावर तो खरेदी करणें, हीं कृत्यें अगदीं भिन्न आहेत, ही गोष्ट चांगली स्पष्ट जरी आहे, तरी बहुतेकांच्या ती ध्यानांत पुरी येत नाहीं. त्यांस असें वाटतें कीं, आपण स्वतः चाकर ठेवून जिन्नस केला काय, आणि दुसऱ्यानें चाकर ठेवून तयार केलेला जिन्नस आपण विकत घेतला काय, फळ एकच. दोन्ही पक्षीं आपण मजुरांस रोजगार उत्पन्न केलाच. पहिल्या पक्षीं साक्षात् आपणच मजुरांस रोजगार लावतों. दुसऱ्या पक्षीं तसें आपण करीत नाहीं, तरी दुसऱ्याच्या हातून करवितों; एतावता त्यांस रोजगार लागण्यास आपण माल विकत घेणें हेंच कारण होय. कां कीं, पदार्थ विकत घेणारा कोणी नसला तर उदमी पदार्थच उत्पन्न करणार नाहींत; आणि तसें झालें तर मजुरांस रोजगार कोठून लागेल? ह्याप्रमाणें बहुत लोक अनुमान करतात. परंतु ह्या अनुमानांतली चुकी आम्हीं वर दाखविलीच आहे. ती ही कीं, उदमी जो माल तयार करतो, त्यांत त्याचा मुख्य उद्देश गिऱ्हाईकास उपयोग व्हावा, असा नसतो; तर तो माल विकून आपणाला नफा व्हावा म्हणजे आपणास जे पाहिजेत ते पदार्थ मिळावे हा असतो, आणि तो उद्देश सिद्धीस जाण्यास, ज्याचा खप होतो तो जिन्नस उत्पन्न करणें, हा एक उपाय आहे, म्हणून तो उदमी तो जिन्नस उत्पन्न करतो. तर, अमुक एक पदार्थाचा खप नसला तर तो पदार्थ उदमी करणार नाहींत, त्यांस जो व्हावा असेल तोच करतील. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, खपानें मजुरांस उपयोग होत नाहीं; तर त्यानें भांडवल व श्रम ह्यांची विशेष व्यापाराकडे योजना मात्र होते; म्हणजे तीं लावण्याचे अनेक मार्ग असल्यास तीं अमुकच मार्गानें लावावीं, असा व्यापाऱ्यांच्या मनाचा निर्णय होतो. परंतु हा विषय गूढ आहे, ह्याकरतां हा वाचणाऱ्यांच्या मनांत पूर्णपणीं बिंबण्याकरतां आणखीं एकदोन उदाहरणें देऊन ह्याचें विवेचन करतों :—

आतां आपण असें उदाहरण कल्पूं कीं, कोणी एक गृहस्थ मजूर ठेवून त्यांकडून एक बाग तयार करवून तींत एक बंगला बांधण्यांत आपली मिळकत उडवितो, किंवा शालजोड्या, उत्तम प्रकारचे सुवासिक पदार्थ, वगैरे विकत घेण्यांत खर्चितो. ह्या उदाहरणीं आपण विचार करून पाहूं कीं, मिळकत

खर्चण्याचे जे दोन प्रकार वर कल्पिले, त्या दोहोंतही मजुरांचें सारखेंच हित होतें किंवा त्यांच्यामध्यें कांहीं भेद आहे? प्रथमतः ही गोष्ट स्पष्ट आहे, कीं तो गृहस्थ कांहीं काळ पहिल्या प्रकारें आपल्या मिळकतीचा व्यय करीत असला, आणि त्यानें तो प्रकार सोडून दिला, आणि दुसऱ्या प्रकारें तो व्यय करूं लागला, तर माळी, गवंडी, व सुतार, ह्यांचा रोजगार बंद होईल. परंतु शंका करणारे कदाचित् असें म्हणतील, कीं माळी वगैरे ह्यांचा रोजगार बंद झाला म्हणून काय चिंता आहे? दुसऱ्या पक्षीं शालजोड्या इत्यादिकांचा खप वाढल्यामुळें, तो माल उत्पन्न करण्याकडे अधिक मजूर रोजगारास लागतील. एतावता उभयपक्षीं सरासरीनें पाहातां मजुरांचा रोजगार सारखाच होईल. परंतु त्यांच्या ह्या म्हणण्यात चूक आहे, व ती चूक कशी आहे, हें आम्ही आतां स्पष्ट करून दाखवतों:—शंकाकारांच्या म्हणण्यांत असें आलें, कीं शालजोड्यांची गरज बाजारांत वाढल्यामुळें, शालजोड्या करण्याकडे अधिक मजूर लागतील, परंतु शालजोड्या विकत घेऊं इच्छिणारा गृहस्थ त्या तयार झाल्यावर घेऊन आपलें धन उदम्यास देणार, पण त्या पूर्वी भांडवल व श्रम असल्यावांचून, तयार होतील कशा? बाजारांत शालजोड्यांची गरज वाढली; पण अधिक शालजोड्या होण्यास भांडवल कोठें आहे? आतां हें भांडवल येण्यास एक मार्ग दिसतो. तो असा कीं, तो गृहस्थ पहिल्या प्रकारें आपली मिळकत खर्चीत होता, तेव्हां ती माळी वगैरे, ह्यांच्या हातीं जाई, आणि ती ते अन्नवस्त्र घेण्यांत खर्चीत; व तें अन्नवस्त्र होण्यास कांहीं श्रम व भांडवल लागत, तर, तें भांडवल व तो श्रम, हीं, तो दुसऱ्या रीतीनें आपली मिळकत खर्चूं लागल्यानें माळी वगैरे बेरोजगारी होऊन, ते जें अन्नवस्त्र घेत असत, तें उत्पन्न होण्याचें बंद झाल्यामुळें, रिकामीं होऊन नव्या अधिक शालजोड्या उत्पन्न करण्यास उपयोगीं पडतील. आतां, आमचा केवळ असा अभिप्राय समजूं नये, कीं, अन्नवस्त्राचें भांडवल मुळच्याच रूपानें शालजोड्यांचे उपयोगीं पडेल, तर भांडवलास रूपांतर होण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं एखाद्या मार्गानें तें शालजोड्यांच्या भांडवलाचें रूप पावेल. इतकी गोष्ट सिद्ध आहे कीं प्रकृत उदाहरणीं जें भांडवल आहे, तें मजुरांचें अन्नवस्त्र किंवा शालजोड्या, ह्या दोहोंतून एक होण्यापुरतें आहे; दोन्ही होण्यापुरतें नाहीं. आतां दोहोंपैकीं कोणता माल उत्पन्न व्हावा, (भांडवलाची योजना कोणत्या उत्पन्नाकडे व्हावी), हे त्या गृहस्थाच्या इच्छेवर (खपावर) आहे; आणि त्यानें शालजोड्यांची इच्छा धरल्यास माळ्यांचा वगैरे रोजगार बंद होईल.

वरच्या लेखावरून कोणी असें अनुमान करील, कीं पैसा खर्चणाऱ्यानें तो पैसा माल घेण्यांत खर्चण्यापेक्षां मजूर ठेवण्यांत खर्चावा; तसा खर्चण्यांत मजुरांचें विशेष हित आहे, तर हें अनुमान खोटें आहे. मजुरांचें हित होणें हें पैसा खर्चणाऱ्यानें घेतलेल्या पदार्थावर नाहीं; तर तो खर्चण्याच्या प्रकारावर आहे. पैसा खर्चणाऱ्याच्या पैशानें, दुसऱ्या कोणाचें भांडवल मध्यें न येतां, मजुरांचें पोषण होत असल्यास त्या पैशानें मजुरांचा उद्योग उत्पन्न होतो; आणि तसें पोषण त्यानें होत नसल्यास तो मजुरांच्या उपयोगीं पडत नाहीं. पाहा, पैसा खर्चणारा आपला पैसा बाग व बंगला तयार करण्याकडे खर्चतो आहे; परंतु तीं करण्याचा मक्ता तो दुसऱ्या कोणास देतो; तर येणेंकरून मजुरांचा कांहींच नफा व्हावयाचा नाहीं. कां कीं, ह्या स्थळीं बाग वगैरे घेणाऱ्याच्या पैशानें मजुरांचें पोषण होत नाहीं, तर ते मक्ता करणाऱ्याच्या भांडवलानें होतें, व विद्यमान भांडवलांतून कांहीं अंश येऊन बाग वगैरे होतात, म्हणून विकत घेणाऱ्यानें तीं विकत घेतल्यानें भांडवल वाढत नाहीं, तर त्या भांडवलाची विशेष उद्योगांत योजना मात्र होते.

मालाच्या खपानें मजुरांस रोजगार उत्पन्न होतो, ही भ्रांति केवळ साधारण लोकांस स्वाभाविक आहे, व ती होण्यास कारणेंही पुष्कळ आहेत, व तीं कारणें आम्हीं वर सांगितलींच आहेत. शालींचा खप वाढल्यानें मजुरांचा एकंदर रोजगार वाढत नाहीं, तर, पूर्वीं विद्यमान जें भांडवल व जो

श्रम असेल, त्यांची तो माल उत्पन्न करण्याकडेस योजना होण्यास मात्र कारण तो खप होतो. तथापि जे भांडवलवाले व मजूर शालजोड्या करण्याच्या कामांत लागले आहेत, व जे तो धंदा सोडूं इच्छित नाहींत; त्यांस त्या मालाचा खप वाढणें फार उपयोगी आहे. मनुष्य जो उदीम करतो तो सोडण्यास त्यास इतकें कठीण पडत असतें, कीं त्या उदीमांत केवळ मुदलांतच फार तोटा येऊं लागला, तो तरच उदीम तो सोडतो; परंतु जोपर्यंत मुदलावर कांहीं थोडासा नफा मिळतो आहे, तोंपर्यंत तो उदीम सोडीत नाहीं. ज्यांत हरहुनेरीपणा कमी, किंवा ज्यांत एकच व्यापार पिढ्यानपिढ्या करण्याची चाल असते, असले लोकांमध्यें चालता उदीम सोडणें मनुष्याच्या मोठें जिवावर येतें. कां कीं, त्याचा सर्व प्रपंच त्या उदमावर चालला असतो, व तो सुटला म्हणजे त्यास अन्नाची भ्रांति पडण्याचा प्रसंग येतो. ह्यावरून प्रत्येक उदम्याची आपापल्या मालाचा खप कमी होण्यांत किती नुकसानी आहे, हें सहज ध्यानांत येईल. अन्य पक्षीं पाहिलें तर मालाचा खप वाढला असतां त्यांत त्याचें मोठें हित आहे. तसें झालें म्हणजे त्यास आपला उदीम वाढवितां येतो, आपल्याजवळ अधिक भांडवल असल्यास तें घालून, किंवा लोकांपासून उसनें घेऊन, अधिक नफा मिळवितां येतो. तसेंच लौकर खप होऊं लागला म्हणजे भांडवलाची लौकर घडामोड होऊन, असतें तेवढ्याच भांडवलावर विशेष नफा होऊं लागतो. तसेंच ज्या मालाचा खप वाढतो, तो उत्पन्न करणाऱ्या मजुरांस पहिल्यानें वर्षांतून आठ महिनें मजुरी लागत असल्यास, आतां ती दाहा महिनें किंवा वर्षभरही लागते; किंवा त्या विशेष व्यापारांत कदाचित् अधिकही मजूर लागतात; किंवा कधीं कधीं त्यांस अधिक मजुरी मिळते. ह्यावरून खप वाढला असतां एकंदर मजुरांचा रोजगार वाढतो, हें खोटें आहे, तरीं विशेष व्यापारांत खप वाढल्यानें त्यांतल्या मजुरांचा रोजगार वाढतो हें खरें आहे. परंतु विशेष व्यापारांत खप वाढल्यानें त्यांतल्या मजुरांचा नफा होतो, इतकाच दुसऱ्या एकाद्या व्यापारांतल्या मजुरांचा तोटा होतो, हें साधारण लोकांच्या लक्ष्यांत येत नाहीं.

खपाचा विचार क्रयविक्रयाच्या प्रकरणांत उपयोगी आहे, संपत्त्युत्पत्ति प्रकरणांत त्याचा तादृश उपयोग नाहीं. देशांत जे पदार्थ उत्पन्न होतात ते एकत्र समजून त्यांचा विचार केला असतां असें स्पष्ट दिसून येतें कीं संपत्त्युत्पादक जे भांडवलवाले व मजूर ह्यांस नफा होतो, व मजुरी मिळते, हीं त्यांच्या भांडवलाच्या व त्यांच्या श्रमाच्या उत्पादक शक्तीच्या अनुरोधानेंच असतात. लोक माल देऊन द्रव्य घेतात, व माल घेऊन द्रव्य देतात, हा क्रयविक्रय समान मोलांच्या जिन्नसांचा होय; हा ते आपल्या सोयीकरतां करतात. यद्यपि श्रमविभाग श्रमाची उत्पादकता वाढण्यास कारण आहे म्हणून तन्मूलक व तदुत्तेजक जो विनिमय (मोबादला) त्यानें श्रमाचें उत्पादकत्व वाढतें हें खरें आहे; तथापि उत्पादक पुरुषांस श्रमाचें फळ प्राप्त होतें तें भांडवल व श्रम यांपासून होतें; विनिमयापासून होत नाहीं. ह्यावरून ही गोष्ट मनांत पक्की धरली पाहिजे, कीं विनिमय पदार्थांचा होवो, किंवा तो द्रव्यद्वारा होवो, —त्यानें इतकेंच होतें, कीं भांडवलवाल्यांस किंवा मजुरांस आपल्या भांडवलाचें किंवा श्रमाचें फळ, त्यांस ज्या रूपानें तें आपणापाशीं असावें असें वाटत असेल त्या रूपानें ठेवतां येतें. परंतु विनिमयानें त्यांची वास्तविक नवी संपत्ति उत्पन्न होत नाहीं.

## भाग साहावा.

# विनाशी भांडवल व अविनाशी भांडवल ह्यांविषयीं विचार.

भांडवलरूप विषयाचें एवढा वेळ विवरण चाललें आहे, तें, त्याचे (भांडवलाचे) दोन प्रकार आहेत, त्यांचे निरूपण करून, समाप्त करतों:— भांडवल दोन प्रकारचें आहे. एक विनाशी आणि दुसरें अविनाशी. ह्या दोन जातींच्या भांडवलांमध्यें जो भेद आहे, तो लक्ष्यांत येण्याजोगा आहे व कदाचित् तो वाचणाऱ्यांच्या ध्यानांत आलाही असेल. असो; आतां ह्या भागांत त्या प्रकारांचीं स्पष्ट लक्षणें व प्रत्येकांचीं कांहीं विशेष कार्येंही सांगतों.

कोणताही पदार्थ घेतला तरी त्यास उत्पन्न व्हावयास जें भांडवल लागतें, त्यांपैकीं कांहीं भांडवल असें असतें, कीं त्याची योजना तो जिन्नस उत्पन्न करण्याकडे एक वेळ झाली, म्हणजे त्या भांडवलाचा भांडवलपणा जातो. तें पुनः तो जिन्नस उत्पन्न करण्याच्या उपयोगी पडत नाहीं. निदान नवा झालेला जिन्नस आहे तोंपर्यंत तरी तो दुसरा पदार्थ त्याने उत्पन्न होत नाहीं. उदाहरण, – कोणताही पदार्थ उत्पन्न करावयास जें द्रव्य किंवा द्रव्यें लागतात, तीं ह्या प्रकारचीं असतात. तेल्याच्या व्यापारांत तीळ द्रव्य, तसेंच हलवायाच्या व्यापारांत दूध, साकर, मसाला, हीं द्रव्यें, घर बांधण्याच्या कामांत धोंडे, विटा, माती, लांकडें वगैरे द्रव्यें. पहिल्या उदाहरणांत, तिळांचें एक वेळ तेल निघालें म्हणजे तिळांचे रूपानें त्यांचा नाश होतो. ते तेलाच्या रूपानें दुसरा उत्पन्न करण्यास कारण होवोत, परंतु तेल उत्पन्न करण्यांत ते एक वेळेच उपयोगी पडतात, दुसऱ्यानें पडत नाहींत. दुसऱ्या उदाहरणांत तर दूध वगैरे भांडवलानें एकदा पेढे झाले म्हणजे तें दुसरी कोणतीही संपत्ति उत्पन्न करण्यास अनुपयोगी होतें. तिसऱ्या उदाहरणांत घराचीं उत्पादक द्रव्यें, विटा, माती, लाकडें वगैरे, दुसरें घर, पूल किंवा देऊळ करायास उपयोगीं पडतात; पण पहिलें घर मोडल्याशिवाय पडत नाहींत. तसेंच भांडवलाचा जो भाग मजुरी देण्यांत किंवा मजुर पोसण्यांत जातो, तोही ह्याच प्रकारचा होय. घर बांधणारे गवंडी, सुतार, पाथरवट, मजूर, ह्यास जी मजुरी देतात, ती एकदां दिल्यावर, घर बांधण्याच्या कामास पुनः उपयोगीं पडत नाहीं. तीपैकीं जेवढा अंश कामगार व मजूर खातात; तेवढा अंश मुळींच नाहींसा होतो, व कांहीं भागाचा त्यांनीं संचय करून ठेवला, तरी तो त्यांचें भांडवल होय; घर बांधणाऱ्यांचें नव्हे. तें भांडवल होण्यास कामगारांस स्वोपभोगाचा नवा प्रतिबंध करावा लागला. तें घर बांधणाऱ्यांच्या पूर्वीच्या उपभोगाच्या प्रतिबंधानें झालें नाहीं. ह्याप्रमाणें ज्या भांडवलाचा संपत्ति उत्पन्न करण्यांत एक वेळच उपयोग घडतो, अधिक वेळ घडत नाहीं, त्यास अर्थशास्त्रांत विनाशी भांडवल असें म्हणतात. विनाशी हा शब्द अगदीं निर्दुष्ट आहे असें नाहीं; पण तो शब्द लावण्याचें कारण इतकेंच, कीं ह्या प्रकारच्या भांडवलापासून संपत्तीचें उत्पादन एक वेळ झालें म्हणजे त्याच्या पूर्वरूपाचा बहुतकरून नाश होतो.

कांहीं भांडवल असें आहे, कीं त्यानें एकवार संपत्ति उत्पन्न झाली असतां, त्याचा नाश होत नाहीं. त्या भांडवलानें उत्पन्न झालेला जिन्नस विद्यमान असून, तें आणखी जिन्नस उत्पन्न करावयास उपयोगीं पडतें. ह्या प्रकारचें भांडवल म्हटलें म्हणजे संपत्ति उत्पन्न होण्यास साधन अशीं नाना प्रकारचीं हत्यारें, यंत्रें वगैरे होत. तसेंच कारखानें चालण्याकरतां व माल ठेवण्याकरतां ज्या इमारती व वखारी

असतात त्यां, व माल एका ठिकाणून दुसऱ्या ठिकाणीं सुलभ रीतीनें जाण्याकरतां ज्या सडका, लोखंडी रस्ते, कालवे केले असतात ते, गाड्या, व गलबतें, इत्यादिक ह्याच प्रकाराखालीं येतात, तसेंच जमीनीचें पीक वाढण्याकरतां केलेल्या विहिरी व बांधून आणलेले पाट व ताली व शेतकीच्या कामांत औतें व इकडून तिकडे माल नेण्याआणण्याकरतां जीं बैल वगैरे जनावरें लागतात तीं, बांधलेलीं बंदरें वगैरे सर्व ह्याच वर्गात मोडतात. हे पदार्थ संपत्ति उत्पन्न करण्याकडे एकवारच उपयोगीं पडून नाश पावत नाहींत, त्यांच्या नाशापासून बहुत वेळ संपत्ति होते. ह्या सर्वांस अविनाशी मांडवल म्हणतात.

अविनाशी मांडवलांत जे पदार्थ एतात, तेही प्रसंगवशात् किंवा कांहीं नियमित काळानें थोडेबहुत जुन्याचे नवे करावे लागतात. नांगर, पावडीं, कुदळीं, वांकस, किंकरीं, करवत, इत्यादि हत्यारें व कारखाने ज्यांत असतात त्या इमारती, व विहिरी हीं सर्व मध्येंमध्यें उजरावीं लागतात, किंवा त्यांची डागडुजी करावी लागते, व नीट करतां करतां हीं सर्व झिजून झिजून किंवा फारच जुनीं होऊन द्रव्याच्या वर्गात जातात. कांहीं कामें अशीं असतात, कीं एकादी अस्मानीसुल्तानीच झाली तर वेगळी गोष्ट; परंतु तसें न झाल्यास तीं अगदीं अनुपयुक्त अशी कदापि होत नाहींत. परंतु त्यांनाहीं नीट राखण्याकरतां मध्यें मध्यें कांहीं खर्च करावा लागतोच, कालवे, खाणीं, चांगल्या चिरेबंदी विहिरी, हीं खर्च करून एक वेळ केलीं म्हणजे, तीं बहुतेक अक्षय्य होतात. तीं यंत्रांसारखीं पुनःपुनः करावीं लागत नाहींत. त्यांचा नाश कोणी बुद्धिपूर्वकच केला किंवा धरणीकंप झाला किंवा वीज पडली तर मात्र होईल, एरवीं होणार नाहीं. परंतु हींही उपयोगी पडण्याजोगीं राहण्यास मध्यें मध्यें थोडाथोडा खर्च केला पाहिजेच. एकदां कालवा किंवा खाण खंटली म्हणजे तीं पुनः खणावीं लागत नाहींत; परंतु त्या कालव्यांतला कांहीं नियमित काळानें गाळ काढावा लागतो; तसें खाणींतलें पाणी वरच्यावर काढून ती नीट राखली पाहिजे, नाहींतर कांहीं दिवसांनीं तीं निरुपयोगी होतात.

वर सांगितल्याप्रमाणे अविनाशी मांडवलाच्या दोन जाति झाल्या; एक प्रकारचें मांडवल कामास लागतां लागतां कांहीं दिवसांनीं अगदीं निरुपयोगी होतें; दुसरे प्रकारचें, मध्यें मध्यें त्याची उस्तवारी केली असतां, कितीही काळ वापरलें तरी अनुपयोगी होत नाहीं. ह्या दुसऱ्या जातीच्या मांडवलापैकीं विशेष महत्त्वाचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे शेतकीच्या कामांत जमिनीचें पीक वाढवण्याकरतां केलेल्या विहिरी, पाट वगैरे होत. ह्या कामांच्या योगानें जें उत्पन्न वाढतें, तें त्यांची दुरुस्ती करण्यास जो मध्येंमध्यें खर्च करावा लागतो, त्यापेक्षा फार अधिक असतें. हें अधिक उत्पन्न कांहीं वर्षेपर्यंत, त्या कामास जो खर्च झाला असतो, तो उगवण्याकडे जातें. परंतु हें उत्पन्न यंत्राचें उत्पन्न जसें कांहीं दिवसांनीं यंत्रें झिजून अनुपयोगीं झालीं म्हणजे बंद होतें, तसें बंद होत नाहीं; सदोदित राहातें. ह्याप्रमाणें पिकण्याची शक्ति अक्षयी झाल्यामुळें जमिनीची किंमत वाढते, म्हणून वर सांगितलेल्या विहिरी वगैरे बांधण्याच्या कामांत जें मांडवल घातलें तें अक्षय्य मांडवल झालें असें लोक म्हणतात; तथापि कोणी जर अशी शंका घेईल, कीं सर्व मांडवल खर्चून त्याचा नाश होतो असा जो वर सिद्धांत सांगितला आहे, त्याला ह्या स्थळीं बाध आला; तर ही त्याची भ्रांति आहे. कां कीं, इतर मांडवलाप्रमाणें ह्या स्थळींही वास्तविक मांडवलाचा नाश होतोच. विहिरी वगैरे करण्याकरतां मजुरांनीं अन्नवस्त्ररूप मांडवलाचा खर्च केलाच, तसेंच विटा, चुना, धोंडे, ह्या द्रव्यांचा, व झिजल्यामुळें त्या कामास लागलेल्या हत्यारांचाही नाश होतो खरा; तरी त्या सर्व मांडवलाचा उत्पादकत्वेंकरून व्यय होतो. त्याच्या नाशानें सांसिद्धिक पदार्थरूप जमिनीचा पिकाउपणा वाढतो, आणि तो पिकाउपणा सदोदित वाढतो, म्हणून तो येण्याकरतां खर्चलेलें मांडवल अक्षय झालें असें म्हणतात. आतां अधिक जें उत्पन्न होतें, त्यास मांडवल व सांसिद्धिक पदार्थ जमीन हीं दोन कारणें म्हटलीं तर चालतील; परंतु अशा ठिकाणीं जमिनीच्या आंगचा मुळचा पिकाऊपणा व मांडवल खर्चून आणलेला पिकाऊपणा ह्यांचा

अक्षय संयोग झाल्यामुळें भांडवलाचा नफा नफ्याचा साधारण नियमांच्या अनुरोधानें असत नाहीं तर भाड्याचा नियमांच्या अनुरोधानें असतो. ह्याविषयाचें विशेष निरूपण पुढें होईल.

एकंदर कच्चे उत्पन्नाशीं व ह्या दोन जातींच्या भांडवलांशीं वेगळाला संबंध आहे. विनाशी भांडवल एकवेळ कामास लागलें म्हणजे नाश पावतें; निदान मालकास तरी तें नाहीसें होतें; यास्तव मालकास पहिल्या खेपेस जें उत्पन्न होतें, त्यांतूनच काय तें खर्च केलेलें भांडवल निघावयाचें, व त्यास नफा व्हावयाचा, म्हणून विनाशी भांडवलाचें उत्पन्न ह्यावरच्या गोष्टींस पुरेसें असावें लागतें; म्हणजे त्याची किंमत खर्चलेले भांडवलाच्या किंमतीपेक्षां मालकास चौघांप्रमाणे त्या भांडवलावर नफा होण्यापुरती अधिक बसवावी लागते. परंतु अविनाशी भांडवलाच्या उदाहरणांतही वर सांगितलेली आवश्यकता नाहीं. ह्याचें कारण असें आहे, कीं यंत्रें हत्यारें वगैरे अविनाशी भांडवल विनाशी भांडवलासारखें एका खेपेसच नाहीसें होत नाहीं; ह्यास्तव त्या भांडवलाची सर्व किंमत पहिल्या खेपेच्या उत्पन्नांतूनच काढावी लागत नाहीं. ह्या स्थळीं पहिल्या खेपेचे उत्पन्नाची किंमत कामास लागलेल्या भांडवलाच्या सर्व किंमतीपेक्षां अधिक असावी लागत नाहीं; तर वर्ष दोन वर्षे असा कांहीं विवक्षित काळ घेऊन त्या काळांत जें उत्पन्न होतें तें तितक्या वेळांत त्या यंत्रांची वगैरे वापरल्यामुळें जितकी किंमत कमी झाली असेल, तितकी किंमत, व तितक्या वेळांत तें यंत्र वगैरे दुरुस्त करण्यास जो खर्च लागतो तो, व मालकास बाजारभावानें त्याच्या भांडवलावरचा नफा, ही निघण्यापुरतें असलें म्हणजे झालें.

वरच्या लेखावरून स्पष्ट मनांत येईल कीं विनाशी भांडवल खर्चून अविनाशी भांडवल केलें असतां, म्हणजे ज्या भांडवलानें मजुरांचें पोषण होत असतें, तें भांडवल खर्चून विहिरी, पाट, किंवा यंत्रें वगैरे अविनाशी भांडवल केलें असतां, तेणेंकरून निदान कांहीं कालपर्यंत तरी मजुरांचा तोटा होतो. ह्या सिद्धांताची सत्यता उदाहरणद्वारा दाखवितों. आपण असें कल्पूं कीं कोणी शेतकरी आहे, त्यापाशीं दोन चाहुरांचीं दोन मोटस्थळ शेतें आहेत, व तो वीस मजूर गडी ठेवून त्यांच्या साहाय्यानें त्या शेतांत पंचवीस खंडी धान्य पिकवितो; व त्यांतून वीस खंडींवर गड्यांची मजुरी वारतो; आणि पांच खंडी धान्य त्यास नफा राहातें. आतां त्या शेतकऱ्यानें असें मनांत आणिलें, कीं दाहा खंडी धान्य खर्चून एक वर्षांत दाहा मनुष्यांच्या हातून एक पाट बांधवावा; आणि एका शेताचें पाटस्थळ करून त्यांतच पुष्कळ धान्य किंवा अधिक किंमतीचा दुसरा ऊंस किंवा अफू वगैरें उंचा माल करावा; आणि दुसरें शेत सोडावें, व दुसऱ्या वर्षापासून दाहा गड्यांवर काम चालवून बाकीच्या दाहा गड्यांस निरोप द्यावा; आणि त्याप्रमाणें त्या शेतकऱ्यानें केलें. ह्या उदाहरणांत पहिलें वर्षी विसाही गड्यांना रोजगार राहील. भेद इतकाच प डेल कीं दाहा गडी नेहमींप्रमाणें शेतांत खपतील, व दाहा पाट बांधून आणतील; परंतु दुसऱ्या वर्षी शेतकऱ्यापाशीं पूर्वीप्रमाणें वीस खंडी प्रमाणाचें धान्यरूप भांडवल राहिलें नाहीं; तर दाहा खंड्या मात्र धान्य आहे, व गतवर्षीच्या दाहा खंड्या खर्चून तयार केलेला पाट आहे, दुसरे वर्षी व पुढें दर वर्षी तो शेतकरी दाहा गडी मात्र ठेवील व त्यामध्यें दाहा खंडी धान्य वाटील. आतां नव्या पाटाच्या योगानें पंचवीस खंडी धान्य किंवा इतक्या किंमतीचा उंचा जिन्नस शेतांत उत्पन्न झाल्यास शेतकऱ्यास पहिल्यापेक्षां तिप्पट नफा होऊन तो आपलें भांडवल वाढवील, आणि तेणेंकरून पाट बांधल्यामुळें कमी झालेल्या विनाशी भांडवलांत भर पडून पुनः पहिल्याइतक्या मजुरांस रोजगार लागेल. परंतु पाटाच्या साह्यानें पंचवीस खंड्या धान्य किंवा त्या किंमतीचा माल उत्पन्न होईलच असा नियम नाहीं; कां कीं पाटाच्या योगानें पंचवीस खंड्या धान्य न होतां सतराअठरा खंड्या धान्य झालें तरी त्यांत शेतकऱ्याचा नफा झालाच. कां कीं पाट झाल्यावर त्यास दाहा खंडी मात्र धान्य मजुरांस द्यावें लागेल, आणि तें त्यांस त्यांच्या मजुरीबद्दल देऊन त्यापाशीं पहिलें पांच खंडी राहत होतें तें आतां सात आठ खंडया राहील; ह्यावरून हें सिद्ध होतें, कीं पाट बांधण्यानें भांडवलवाला जो शेतकरी ह्याचा नफा होऊन मजुरांचा

तोटा झाला. ह्यावरच्या उदाहरणांत शेतकऱ्याच्या मनांत दोनही शेतें वाहावयाचीं असलीं, व बाजारांत अधिक धान्याचा खप असला, तरी त्यापाशीं त्या दहा मजुरांस मजुरी द्यावयास धान्य कोठें आहे? पूर्वी दाहा खंडी धान्यापासून साडे बारा खंडी धान्य दरवर्षी उत्पन्न होऊन त्यापैकीं दाहा खंडींनीं दाहा मजुरांचें वर्षोवर्ष पोषण होत असे. परंतु त्या दाहा खंडी पाट बांधल्यामुळें मुळींच नाहींतशा झाल्या, व त्यांपासून झालेल्या पाटानें साडेबारा खंडींच्या जागीं साऱ्या चार किंवा पांच खंडी उत्पन्न होतात, व एकंदर नफ्यापैकीं पूर्वीप्रमाणें पांच खंडी शेतकऱ्याच्या घरगुती खर्चास जाऊन त्यापाशीं साऱ्या दोन किंवा तीन खंडी राहातात; त्यांवर दाहा मजूर कसे ठेवतां येतील? आतां तो जर दाहा खंडी धान्य लोकांपासून उसनें काढून इकडे लावील, तर तें उसनें घेतलेलें भांडवल जिकडून येईल, तिकडचें कमी होईल. एतावता शेतकीच्या कामांत त्या मजुरांचा रोजगार कमी न झाला तर दुसऱ्या कोणत्या एखाद्या कामांतला कमी होईल. शेवटीं मजुरांचा एकंदर रोजगार कमी होईल तो होईलच.

वर जो सिद्धांत सांगितला, तद्विरुद्ध कितीएक ग्रंथकारांचें मत आहे. ते असें म्हणतात कीं यंत्रें वगैरे कारखान्यांत चालू केलीं असतां, त्यांपासून मजुरांचा तोटा कदापि होऊं सकत नाहीं. आणि ते स्वमताचे पुष्टीकरणार्थ असें प्रमाण सांगतात, कीं यंत्रांच्या योगानें थोड्या श्रमानें माल होऊं लागला, म्हणजे तो स्वस्त होतो, आणि तेणेंकरून त्याचा खप वाढून तो उत्पन्न करण्याचा कारखाना पहिल्यापेक्षां वाढून पुष्कळ मजुरांस रोजगार होतो. ह्या त्यांच्या म्हणण्याप्रमाणें व्यवहारांत घडलेल्या गोष्टीही ते उदाहरणार्थ दाखवितात. छापखाने निघाल्यानें लेखकांचा रोजगार बुडाला खरा, परंतु ग्रंथ स्वस्त झाल्यामुळें त्यांचा खप इतका वाढला, कीं कल्पना निघाल्यापासून थोडक्याच काळांत पूर्वी हातानें लिहिण्याचा प्रचार असतां जितके लेखक लागत होते, त्यांपेक्षां बहुतपट लोक हल्लीं छापखान्यांत अक्षरें जुळण्याच्या व यंत्रें फिरवण्याच्या वगैरे कामांत लागतात. तसेंच हार्ग्रीव्ज् व आर्करैट, ह्यांनीं स्वबुद्धिवैभवानें जीं कापड विणण्याचीं यंत्रें नवीं कल्पून केलीं, त्यांहीं करून हातांनीं वस्त्रें विणणाऱ्यांचा रोजगार बुडाला खरा; परंतु वस्त्रें स्वस्त झाल्यामुळें तीं विणण्याचे कारखाने इतके वाढले आहेत, कीं त्यांमध्यें हल्लीं जे मजूर लोक लागतात, त्यांची संख्या हातांनीं विणणाऱ्यांपेक्षां शेकडोंपट अधिक आहे, व त्यांखेरीज हजारों लोकांचें पोषण तीं यंत्रें तयार करण्याचे कारखान्यांवर होत आहे. ह्याप्रमाणें पूर्वसिद्धांतविरुद्धमतवादी आपल्या पक्षाचें प्रतिपादन करतात. परंतु त्यांस असा प्रश्न केला पाहिजे कीं, वर सांगितलेले माल वाढविण्यास भांडवल कोणीकडून आलें? तें भांडवल जर ते माल उत्पन्न करण्याचे कामांत सुधारणा झाल्यामुळें भांडवलवाल्यांस अधिक नफा होऊन त्यांनीं नवा संग्रह करून नवें उत्पन्न करून आपल्या त्या व्यापारांत घातलें नसेल, तर तें भांडवल इतर व्यापारांपेक्षां ह्या व्यापारांत विशेष नफा आहे म्हणून तिकडून इकडे आलें असेल. तर भांडवलास हें स्थलांतर झाल्यानें देशांतील मजूर एकवट पाहातां त्यांस नफा कोणता? ह्या व्यापारांतल्या मजुरांचा तोटा न झाला तर ज्या व्यापारांतलें भांडवल इकडे आलें त्यांतल्या मजुरांचा तोटा झाला असेल. त्यांचें पोषण विनाशी भांडवलाच्या ज्या अंशानें होत होतें, त्याचें यंत्रादि अविनाशी भांडवल झाल्यानें जी एकंदर विनाशी भांडवलांत खांच पडली, ती भांडवलास केवळ स्थळांतर केल्यानें कशी भरेल?

सर्व मजूर एकवट धरले असतां, कारखान्यांत यंत्रें चालू केलीं असतां किंवा चिरस्थायी कामांत भांडवल घातलें असतां, त्यांचा तोटा होण्याचा संभवच नाहीं; असें म्हणणारे स्वपक्ष दृढ करण्याकरतां जीं जीं प्रमाणें आणतात, त्यांत कांहीं तरी चूक असतेच. एखादा पदार्थ उत्पन्न करण्याच्या कारखान्यांत यंत्रें वगैरे चालू होऊन सुधारणा झाली असतां, त्या विशेष व्यापारांतल्या मजुरांचा तोटा होतो, हें तर अगदीं स्पष्ट आहे; व ती गोष्ट बहुतकरून सर्व मान्यही करतात. परंतु पुष्कळ ग्रंथकारांचें असें म्हणणें आहे कीं, त्या विशेष व्यापारांत श्रमाची आवश्यकता कमी झाल्यानें तितका मजुरांचा

तोटा होतो, परंतु त्याच मानानें त्या व्यापारांतला पदार्थ स्वस्त झाल्यानें तो पदार्थ खर्चणाऱ्या लोकांस दुसरा एकादा जिन्नस विशेष विकत घेण्याचें सामर्थ्य येऊन त्या जिनसांचा खप वाढतो; आणि तेणें-करून तो उत्पन्न करण्याचें काम वाढून तिकडे मजुरांस नफा होतो. ही त्यांची युक्ति दिसण्यांत बरीशी दिसती; परंतु विचार करून पाहातांही पूर्वभागांत, मालाच्या खपापासून मजुरांस रोजगार होत नाहीं, असा जो सिद्धांत स्थापला आहे, त्यास विरुद्ध आहे. उत्पन्न करण्याच्या कामांत सुधारणा झाल्यामुळें एकादा जिन्नस स्वस्त झाल्यास तो जिन्नस घेणाऱ्यांपाशीं दुसरे जिन्नस विकत घेण्यास पैसा राहिल खरा, परंतु ते दुसरे जिन्नस उत्पन्न करण्यास भांडवल असल्याशिवाय ते घेण्यास लोक तयार आहेत, एवढ्यानें ते उत्पन्न व्हावयाचे नाहींत, आणि ज्या सुधारणेनें हे जिन्नस घेण्याचें सामर्थ्य लोकांस आलें, त्या सुधारणेनें भांडवल तर रिकामें झालें नाहीं; ह्यास्तव दुसरे जिन्नस उत्पन्न करण्याचें काम वाढणार नाहीं; व तें न वाढल्यामुळें मजुरांचा तोटा नाहींसा होणार नाहीं. ज्यांत सुधारणा झाली तो माल स्वस्त झाल्यामुळें जर कोणी तो माल खर्चणारे दुसऱ्या एकाद्या मालाचा खप वाढवितील, तर सुधारणेमुळें बेरोजगार झालेले मजुरांकडून पूर्वी होणारा खप कमी होईल. एतावता रमारमीच झाली, मजूर जे निरुद्योगी झाले त्यांनीं इतर मजुराशीं चढाओढी करून मजुरीचा दर कमी केल्यावांचून किंवा कोणी परोपकारी लोकांनीं आपला उपभोग करून त्यांस कांहीं दिल्यावांचून त्यांचें पोषण व्हावयाचें नाहीं.

वरच्या लेखावरून कोणाच्या मनांत सहज अशी शंका येईल, कीं यंत्रादि अविनाशी भांडवलानें मजुरांचा तोटा होतो, व त्यांची मजुरी कमी होते, तर इंग्लंड वगैरे ज्या देशांत नवीं नवीं यंत्रें उत्पन्न होऊन संपत्ति उत्पन्न होण्याच्या कामांत वरच्यावर सुधारणा होत आहे, त्या देशांत मजुरीचा दर ह्या देशांतल्यापेक्षां कमी असावा, परंतु तो तर फारच अधिक आहे, हें कसें? तर ह्या विरोधाचें वारण आपणास केलें पाहिजे. ह्या शंकेचें समाधान असें आहे, कीं लोकांत श्रमाचें उत्पादकत्व वाढविणारीं यंत्रें किंवा जमिनीचा पिकाऊपणा वाढविणारीं विहिरी वगैरे कामें जीं होतात, तीं बहुतकरून मजुरांचा तोटा होऊन होत नाहींत. हीं कामें एकाएकीं जर होत असतीं तर मजुरांचा तोटा होता. कां कीं त्या पक्षीं तीं मजुरांचे उपजीवनास आवश्यक जें विनाशी भांडवल त्याचा नाश होऊनच झालीं पाहिजेत. परंतु तीं सुधार-णुकेचीं कामें एकाएकीं होत नाहींत; होत होत होतात; आणि तीं होण्यास प्रायः विनाशी भांडवल खर्चत नाहीं; तर व्यापारी प्रतिवर्षी जो नवा संग्रह करतात, तो खर्चून तीं कामें होत असतात. तसेंच जेथें जेथें व जेव्हां जेव्हां अविनाशी भांडवल वाढतें; तेथें तेथें व तेव्हां तेव्हां बहुतकरून नियमानें विनाशी भांडवलही त्याच मानानें वाढतें. मोठमोठालीं, व ज्यांस फार खर्च लागतो, अशीं यंत्रें किंवा इमारती, ह्यांत भांडवल घालावयाचें म्हटलें म्हणजे, दूरच्या लाभाकरितां आपल्याजवळच्या हजारोंही रुपयांचा व्यय करणें होय. ही गोष्ट घडावयास पहिली गोष्ट, देशांत मालमत्तेचें उत्तम प्रकारचें रक्षण असलें पाहिजे, व दुसरी गोष्ट, त्या देशांतील लोक मोठे मेहनती व मोठे छातीचे पाहिजेत, व तिसरी गोष्ट, त्यांचे ठायीं संग्रह करण्याची उत्कृष्ट इच्छा, व दूरदृष्टी हीं असलीं पाहिजेत. ह्या तीन गोष्टी भांडवल वाढण्यास मुख्य कारण होत. यद्यपि वरील युक्तीप्रमाणें पाहातां विनाशी भांडवलाचा नाश होऊन अविनाशी भांडवल झालें असतांच केवळ मजुरांचा तोटा आहे असें नाहीं, तर देशांत प्रजा ज्या मानानें वाढत असेल त्या मानानें जरी यंत्रादि अविनाशी भांडवल झाल्यानें विनाशी भांडवल वाढलें नाहीं, तरीही मजुरांचा तोटा आहे. तथापि वास्तविक लोकस्थितींत पाहातां विनाशी भांडवलापेक्षां अविनाशी भांडवल वाढलें असें बहुतकरून घडत नाहीं.

वर सांगितलेल्या गोष्टींखेरीज दुसरी अशी एक गोष्ट आहे, कीं संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत सुधारणा झाली असतां तीपासून जरी कांहीं काल देशांतील एकंदर कच्चें उत्पन्न कमी झालें, व

मजुरांचा तोटा झाला, तरी परिणामीं मी सुधारणा एकंदर उत्पन्न वाढण्यास व मजुरांचें हित होण्यास कारण होते. तसल्या सुधारणुकेपासून भांडवलाचें उत्पन्न पहिल्यापेक्षां वाढतें, आणि ह्या वृद्धीपासून नफ्याचा दर चढून भांडवलवाल्याचें हित होतें, किंवा तसें न झालें तर जो जिन्नस उत्पन्न करण्याच्या कामांत सुधारणा होते, तो जिन्नस स्वस्त होऊन तो विकत घेणाऱ्यांचें तरी हित होतें. एतावता कोणाचें तरी हित नियमानें होतेंच; आणि तेणेंकरून लोकांस संग्रह करण्याचें सामर्थ्य विशेष येतें. तसेंच सुधारणुकेच्या योगानें नफ्याचा दर वाढतो, तेणेंकरून संग्रह करण्याची इच्छाही लोकांस विशेष उत्पन्न होतें. पूर्वीं आपण असें उदाहरण कल्पिलें आहे, कीं विनाशी भांडवल मोडून अविनाशी भांडवल केल्यानें, पूर्वीं जेथें पंचवीस खंडी धान्य होत होतें तेथें त्या सुधारणुकेनें केवळ सतरा किंवा अठराच खंडी होऊं लागलें; त्या उदाहरणांत हें स्पष्ट आहे, कीं एकंदर उत्पन्न कमी झालें; तरी शेतकऱ्याचा नफा वाढला. त्यास पूर्वीं पांच खंड्या मिळत होत्या, त्या आतां सात किंवा आठ खंडी मिळूं लागल्या; तेणेंकरून त्याचें संग्रह करण्याचें सामर्थ्य वाढलें, व नफा पहिल्यापेक्षां विशेष होऊं लागला, म्हणून संग्रह करण्यास अधिक उत्तेजनही झालें; आणि तो जर दोन किंवा तीन खंडी धान्याचा दरवर्षी संग्रह करून उत्पादकत्वेंकरून व्यय करीत गेला; तर विनाशी भांडवलांत जी सात आठ खंडींची खांच पडली आहे, ती तीन चार वर्षांत सहज भरून जाईल; आणि इतकेंच नाहीं, तर तीन चार वर्षांनंतर पुढें दरवर्षी भांडवलांत जी भर पडेल तिच्या योगानें तें पहिल्यापेक्षां पुष्कळ अधिक वाढत जाईल. ह्यावरून सुधारणुकेचीं कामें केलीं असता, त्यांहींकरून कांहीं काळ मजुरांचा तोटा होत असला, तरी कांहीं काळानें त्यांचा तोटा नाहींसा होऊन त्यांस पहिल्यापेक्षां विशेष विशेष धंदा होतो. ही गोष्ट वाचणाऱ्यांच्या ध्यानांत स्पष्टपणें आली असेल.

देशांतलें भांडवल व संपत्ति हीं वाढण्यास कांहीं मर्यादा आहेत, त्यांचें निरूपण पुढें होईल. असो. त्या मर्यादांच्या संबंधानें संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांतल्या सुधारणुकांच्या आंगच्या एकंदर भांडवल व संपत्ति हीं वाढविण्याच्या योग्यतेचा विचार करून पाहिला असतां, ती योग्यता विशेष स्पष्टत्वेंकरून लक्ष्यांत येईल. त्या मर्यादा प्रतिबंधकासारख्या आहेत. त्या सुधारणुकेच्या कामांनीं कांहीं दूर होतात, परंतु त्या मर्यादा कोणत्या, व त्या सुधारणुकेनें दूर कशा होतात, ह्या सर्व विषयाचें निरूपण पुढें होईल. त्या निरूपणाच्या प्रसंगीं असें दिसून येईल, कीं देशांत भांडवलाची जी वृद्धि होते, किंवा जी होण्याचा संभव आहे, तसेंच देशांत जी संपत्ति उत्पन्न होते, किंवा जी होण्याचा संभव आहे, त्या वृद्धीशीं व त्या संपत्तीशीं आणि देशांत संपत्ति उत्पन्न करण्याचे जे मार्ग चालू असतात, त्यांच्याशीं कांहीं संबंध असतो; तो संबंध चांगला समजला म्हणजे मग सहज समजेल, कीं यंत्रादिक जीं सुधारणुकेचीं कामें, ह्यांनीं कांहीं काळ देशांतील एकंदर विनाशी भांडवल व संपत्ति हीं कमी झालीं, तरी त्यांच्या योगानें परिणामीं देशांत पहिल्यापेक्षां भांडवल व तद्द्वारा एकंदर संपत्ति हीं विशेष वाढण्याची योग्यता येते. आणि ही योग्यता येते, ही जी गोष्ट आहे, हीच संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत यंत्रादिक चालू करावीं, तेणेंकरून मनुष्यमात्राचें हित आहे, असें म्हणणाऱ्यांच्या पक्षाचें साधक मुख्य प्रमाण होय. ह्या प्रकारें यंत्रादिकापासून देशाचें व कांहीं उदाहरणांत सर्व जगाचें हित परिणामीं होतें, म्हणून त्यांपासून जो कधीं कधीं विद्यमान मजुरांस उपद्रव होतो, तो कमी करणें, किंवा झाल्यास मुळींच बंद करणें, सरकारचें आवश्यक कृत्य नाहीं, असें कोणी समजूं नये. ज्या भांडवलानें मजुरांचें पोषण होतें, त्या भांडवलाची फारच जल्द त्या कामांकडे योजना होऊन जर मजुरांचे हाल होऊं लागले, तर सरकारानें ती जल्दी कमी करण्यासाठीं कांहीं तजवीज करावी, हा सरकारचा धर्म आहे; व ज्या अर्थी सुधारणुकेच्या कामांनीं देशांतील एकंदर रोजगार कमी झाला नाहीं तरी कांहीं मजुरांचा रोजगार बहुतकरून कमी होऊन त्यांस निरुद्योगी

असावें लागतें, त्या अर्थी सरकारानें दुसऱ्याच्या लाभाकरतां ज्यांचा तोटा होतो, त्यांच्या हिताकडे लक्ष्य द्यावें हें फार आवश्यक आहे असें आम्हास वाटतें.

असो. भांडवलाच्या दोन प्रकारांचीं लक्षणें वर केलीं आहेत, त्यांविषयीं आणखी थोडासा विचार करून हा भाग समाप्त करतों. जो जो संपत्त्यंश संपत्ति उत्पन्न करण्याकडे लावावयाकरतां ठेविला असतो, त्या सर्वांस भांडवल म्हणावें; तेव्हां ह्या प्रकारचा जो जो संपत्त्यंश असतो, त्याच्या भांडवलाच्या वर सांगितलेल्या दोन जातींपैकीं एका जातींत अंतर्भाव झाला पाहिजे. परंतु तसें होत नाहीं. उदम्याजवळ जो तयार झालेला माल असतो, तें त्यांचें भांडवल होय; परंतु त्यावर विनाशी भांडवलाचें लक्षण येत नाहीं व अविनाशी भांडवलाचेंही येत नाहीं. तथापि ह्या शंकेचें समाधान असें आहे, कीं वर जो भांडवलाचा विभाग सांगितला तो उत्पन्नसंबंधानें ज्या भांडवलाचें लक्षण आहे, त्या भांडवलाचा होय. सावकाराच्या दृष्टीनें जें लक्षण आहे त्याचा नव्हे. पाहा. तयार झालेल्या मालाचें जें वर उदाहरण घेतलें, तेथें तो माल स्वतः उत्पन्नास उपयोगी असत नाहीं. पाहा. तपकीर करणाऱ्यापाशीं तपकीर तयार केलेली आहे, ती त्याचें भांडवल खरें; परंतु ती उत्पन्नास स्वतः उपयोगीं पडणारी नव्हे; तर असला माल प्रथमतः विकावा लागतो, म्हणजे तो देऊन उत्पन्नास वास्तविक कारण जी सामग्री ती घ्यावी लागते, तेव्हां तो माल देऊन विनाशी किंवा अविनाशी भांडवल सावकारानें घेतल्यापूर्वी त्या मालास विनाशी किंवा अविनाशी हें कोणतेंच नाव लागत नाहीं. त्या मालपैकीं कांहीं भाग उदमी मजुरांस मजुरी देतो, कांहीं भाग देऊन आपल्या तयार करावयाच्या मालाचीं द्रव्यें खरेदी करतो, कांहीं भाग आपलीं यंत्रें नीट करण्याकडे लावतो. आतां तो अमुक माल विनाशी भांडवल घेण्याकडे खर्चितो, व अमुकच अविनाशीकडे खर्चितो ह्याचा नियम असत नाहीं. ती गोष्ट त्याच्या उदमावर व विशेषकाळीं त्यास जी गरज असेल तीवर आहे.

ही गोष्ट ह्या प्रसंगीं सांगितली पाहिजे, कीं बीज आणि द्रव्यें यांच्या रूपानें जो भांडवलाचा भाग असतो, हा जरी विनाशी भांडवलांत मोडतो, व हा कच्च्या उत्पन्नांतून उगवावा लागतो; तरी मजुरांच्या उद्योगाशीं या भागाचा संबंध अविनाशी भांडवलाच्या संबंधासारखाच आहे. यंत्रादिकांत जो भांडवलाचा भाग जातो, तो जसा मजुरांच्या पोषणास लागणाऱ्या संपत्त्यंशांतून कमी होतो. तसेंच बीज व द्रव्यें यांकडे जो भाग जातो, तो तसाच कमी होतो; ह्यास्तव हल्लीं मजुरांस मजुरी देण्याकडे ज्या भांडवलाची योजना होते, तें भांडवल, बीज वगैरे घेण्याकडे जाऊं लागल्यास तेणेंकरून यंत्रादि आणि-त्यानें जसा मजुरांचा तोटा होतो, तसाच तोटा होईल. परंतु लोकांत प्रायः अशा प्रकारचा फेरफार घडत नाहीं. सुधारणेचा कल म्हटला म्हणजे बीज व द्रव्यें ह्यांची इयत्ता कमी करण्याकडे असतो; अधिक करण्याकडे असत नाहीं.

## भाग सातवा.

# संपत्युत्पादक कारणांचे ठायीं न्यूनाधिक उत्पादकत्व आणणाऱ्या गोष्टींविषयीं.

संपत्ति उत्पन्न होण्यास आवश्यक जीं कारणें, त्यांचे सामान्य रूपानें निरूपण इतका वेळ झालें. त्या निरूपणांत असें सिद्ध झालें कीं त्या सर्व कारणांचा तिहींत संग्रह होतो. एक श्रम, दुसरे सांसिद्धिक पदार्थ व तद्गतधर्म, आणि तिसरें भांडवल. ह्यांपैकीं पहिलीं दोन, म्हणजे श्रम, व द्रव्यरूप सांसिद्धिक पदार्थ, हीं मुख्य होत; ह्यांच्यावांचून चालावयाचेंच नाहीं. वायु, जल, वाफ, इत्यादि, पदार्थांच्या आंगीं ज्या चालकत्वादि शक्ती आहेत, त्यांपासून साहाय्य करून घेतलें असतां होतें, परंतु त्या संपत्युत्पादनास आवश्यक नव्हेत; म्हणजे त्यांवांचून अडावयाचें नाहीं. आतां, तिसरें कारण जें भांडवल, तें स्वतः श्रमाचें फळ होय, म्हणून त्यास जें कारणत्व आहे, तें वास्तविक पाहातां परंपरेनें श्रमासच आहे. तथापि अशी गोष्ट आहे म्हणून भांडवलाचा निराळा उल्लेख करण्याची गरज कमी होत नाहीं. कोणताही पदार्थ उत्पन्न करण्यास साक्षात् लागू होणारा श्रम जसा आवश्यक आहे; तसा त्या पदार्थाच्या भांडवलाच्या उत्पत्तीस लागणारा श्रमही आवश्यक आहे. आतां भांडवलापैकीं मोठा भाग म्हटला म्हणजे, ज्यांच्या श्रमानें संपत्ति उत्पन्न होते असे जे मजूर, त्यांच्या पोषणाकडे जातो, व बाकीचा अंश उत्पन्नास साक्षात् उपयोगीं पडणारीं जीं हत्यारें व द्रव्यें त्यांकडे जातो.

आतां आपण अर्थशास्त्रांतला, दुसरा जो विषय त्याचें विवेचन करूं. तो विषय हा कीं हीं वर तीन कारणें सांगितलीं, ह्यांचे ठायीं संपत्युत्पादकता न्यूनाधिक असते, ही कोणत्या कारणांनीं असते त्या कारणांचा विचार होय. ही न्यूनाधिकता भिन्न कालीं व भिन्न देशीं भिन्न भिन्न असते, हें तर स्पष्ट आहे. लोकसंख्या व देशविस्तार हीं सारखीं असतांही, कांहीं देशांत कांहीं काळीं इतर काळांतल्यापेक्षां उत्पन्न जास्त असतें. इंग्लंडाच्या इतकाच ज्याचा विस्तार असा एकादा रशियांतला किंवा हिंदुस्थानांतला प्रांत घेतला, तर इंग्लंडांतलें उत्पन्न त्या प्रांतांतल्या उत्पन्नापेक्षां मनस्वी अधिक आहे, असें स्पष्ट दिसून येईल. तसेंच इंग्लंडांतील लोकांइतके रशियांत किंवा हिंदुस्थानांत लोक घेतले तर त्या दोघांचीं उत्पन्नें सारखीं आढळत नाहींत. तसेंच चारशें वर्षांपूर्वीचें इंग्लंडांतलें उत्पन्न त्याच देशांतल्या हल्लींच्या उत्पन्नापेक्षां फार कमी होतें, व मिश्रदेश, सिसली बेट, व हिंदुस्थान, ह्या देशांतल्या प्राचीन कालच्या उत्पन्नांपेक्षां, त्याच देशांतलीं सांप्रत काळचीं उत्पन्नें फारच कमी आहेत. आतां उत्पादक शक्तींत हा विपर्यास पडण्याचीं कांहीं कारणें स्पष्ट आहेत, व इतर कारणें तादृश स्पष्ट नाहींत. ह्यास्तव त्या कारणांपैकीं कितीएक कारणांचें पुढें वर्णन करतों.

विशेष उत्पादकत्वाच्या कारणांपैकीं अत्यंत स्पष्ट कारण म्हटलें म्हणजे, स्वतःसिद्ध गुण, म्हणजे देशाच्या आंगच्या संपत्ति उत्पन्न करण्याच्या सोयी होत. हे गुण किंवा ह्या सोयी अनेक प्रकारच्या आहेत. जमिनीचा पिकाऊपणा हा एक मुख्य गुण आहे. सर्व देशांतल्या जमिनी सारख्या पिकाऊ नसतात. त्यामध्यें बहुत जाति आहेत. गंगा, गोदावरी, नीलनदी, इत्यादि नद्यांच्या थड्या फारच पिकाऊ आहेत, व अरबस्थान, आफ्रिकेचा मध्य भाग, मारवाड, ह्या देशांत जीं कांहीं मैदानें आहेत, त्यांत

मुळींच कांहीं पीक होत नाहीं. दुसरा स्वतःसिद्ध गुण उत्तम प्रकारची हवा होय. हा गुण मागल्या गुणापेक्षां संपत्ति उत्पन्न होण्यास विशेष उपयोगी आहे. पृथ्वीवर कांहीं देश असे आहेत, कीं तेथील जमीन पीक होण्याजोगी असतांही, तेथें थंडीच्या फार कडक्यामुळें लागवड होत नाहीं. उत्तरध्रुव-वृत्तांतले व त्या वृत्ताजवळ जे देश आहेत, तेथील, लोक मासे धरून त्यांवर किंवा शिकारीवर, उपजीवन करतात; व कांहीं लोक जे विशेष विद्याचारसंपन्न आहेत, ते रेन्डीयरनामक हरणें बाळगून त्यांच्या मांसावर निर्वाह चालवितात. कांहीं ठिकाणीं हवा चांगली नसल्यामुळें, नागली, वऱ्या वगैरे भिकार धान्य मात्र उत्पन्न होतें, गहूं हरबरा वगैरे चांगलीं धान्यें उत्पन्न होत नाहींत. स्पेन, इताली, हिंदुस्थान, मसाल्याचीं बेटें इत्यादि देशांत द्राक्षें, अंजीर, कवले, नारिंगें, ऊंस, जायपत्री, जायफळें, वेलदोडे, लवंगा इत्यादि अनेक प्रकारचे उंची जिन्नस निपजतात व चांगल्या हवेच्या योगानें थोड्या श्रमानें जमीनीस पीकहीं वर्षांतून दोनदोन तीनतीन वेळां येतें. चांगल्या हवेचा गुण केवळ शेतकीच्याच कामांत आवश्यक आहे असें नाहीं; तर तो गुण इतर उत्पादक व्यापारांतही फार आवश्यक आहे. इमारतीस टिकाऊपणा येण्यास हवा हें एक मुख्य कारण आहे. लुक्झार व कार्नाक ह्या ठिकाणीं जीं जुनीं देवालयें होतीं, तीं मनुष्यांनी बुद्धिपुरःसर मोडली नसतीं, तर तीं त्रिकाल जशींच्या तशीं राहतीं, असें वाटतें. कारण त्या देवळांपैकीं कांहीं देवळांच्या दगडांवर कोरलेले लेख हजारों वर्षांचे जुने असतांही, इंग्लंडांतल्या पन्नास वर्षांच्या जुन्या लेखांपेक्षां चांगले दिसतात. तसेंच रूस देशांत सेंट पीतस्बार्गाजवळ ज्या मोठ्या इमारती आहेत, त्या चांगल्या कणखर काळ्या दगडांच्या मजबूद बांधल्या आहेत, व त्या बांधून पुरतीं चाळीसपन्नास वर्षेंदेखील लोटलीं नाहींत; तथापि त्या पुनः बांधण्यासारख्या खराब झाल्या आहेत; व त्या इतक्या लौकर इतक्या खराब होण्याचें कारण असें आहे, कीं त्या देशांत एकाएकीं अत्यंत थंडी पडती, व कधीं कधीं अकस्मात् पुष्कळ उन्हाळाही होतो. युरोपखंडातल्या दक्षिणेकडील इटाली वगैरे देशांत तयार झालेल्या सणगांचे रंग इंग्लंडांतल्या रंगांपेक्षां विशेष लखलखीत व उमदा दिसतात; ह्याचें कारण ही त्या देशांतील चांगली हवा होय, असें कितिएक लोकांचें म्हणणें आहे; व ह्या हवेनें जें काम होतें, त्याची बरोबरी अर्वाचीन रसायनशास्त्राच्या ज्ञानाच्या व रंगविण्याच्या कळेच्या बळानें इतर देशांत झालेल्या कामास होत नाहीं.

देशांची हवा चांगली असल्यापासून दुसरा असा एक फायदा आहे कीं, संपत्ति करणारे जे मजूर व कारागीर, ह्यांचा निर्वाह थोड्या खर्चावर होतो. उष्ण देशांत मनुष्याचे थंडीवाऱ्यापासून चांगलें संरक्षण होण्यास थंड देशांतल्यासारखीं मोठी भक्कम घरें, व तितकीं पुष्कळ चिरगुटें लागत नाहींत. थंड देशांतल्या राहाणाऱ्या लोकांस साधारण सुख होण्यास, किंबहुना जीवनधारण होण्यास, आवश्यक जें जळण, त्याची उष्ण देशांत राहाणाऱ्यांस गरज मुळींच पडत नाहीं. सर्पण म्हटलें म्हणजे स्वयंपाक करण्यास व लोहार क्षिसाडी वगैरेंच्या कारखान्यांत मात्र लागतें. तसेंच थंड देशांत मेहनत करणाऱ्या मनुष्यांच्या आंगीं हुशारी राखण्याकरतां त्यांस कांहीं पदार्थ खावे लागतात, ते खाण्याची गरज उष्ण देशांतल्या मनुष्यांस पडत नाहीं. तेथें केवळ हवेच्या स्वाभाविक उष्णतेनें त्यांचें तें काम होतें. ह्या वरील गोष्टीस्तव इतर देशांत केवळ उपजीवनोपयोगी पदार्थांचें संपादन करण्याकडे जो श्रम करावा लागतो, तो उष्ण देशांत लोक जर विचारी व दूरदृष्टी असतील, आणि आपली संख्या अतिशयित वाढविणार नाहींत, किंवा गमणार नाहींत, तर त्यांस सुखोपभोगाचे पदार्थ करण्याकडे, किंवा ज्ञान वगैरे उत्तम गोष्टींकडे लक्ष्य देण्याकडे, लावावयास सांपडेल.

चांगली जमीन व चांगली हवा, ह्यांखेरीज आणखीं एक स्वतःसिद्ध गुण आहे. तो गुण देशांत उपयुक्त पदार्थांच्या व थोड्या खर्चांत चालणाऱ्या चांगल्या समृद्ध खाणी असणें हा होय. इंग्लंडाची जी हवा व जमीनही फारशी चांगलीं नाहींत; पण त्या देशांत एक मोठा गुण आहे. तेथें कोळशांच्या

उत्तम खाणी आहेत. व त्या फार खोल खणाव्या लागत नाहींत. तसेंच त्या देशांत लोखंडाच्या चांगल्या खाणी आहेत. त्यांतल्या मातींतून थोड्या श्रमानें शुद्ध धातू काढतां येते, व या लोखंडाच्या खाणी व कोळशांच्या खाणी, ह्या एकमेकांच्या जवळजवळ आहेत, ही मोठी सोय आहे. देशास विशेष संप यु-त्पादकत्व आणणारे जे गुण इतक्या वेळ सांगितले, त्या सर्वांपेक्षां समुद्रसांनिध्य हा गुण मोठा उपयोगी होय, व त्यांत स्वाभाविक चांगलीं बंदरें असतील, तर मग फार उत्तम. समुद्रसांनिध्यापेक्षां खालोखाल महत्त्वाची सोय म्हटली म्हणजे, नावा चालवयाजोग्या मोठमोठ्या नद्या होत. आतां ह्या ज्या सोयी सांगितल्या, ह्यांनीं नवी संपत्ति साक्षात् उत्पन्न होत नाहीं; तर माल मात्र एका ठिकाणून दुसऱ्या ठिकाणीं लौकर व अल्प श्रमानें नेतां येतो. ह्या करतां ज्यांनीं अर्थशास्त्रांतील ह्या विषयाचें फारसें विवेचन केलें नाहीं, व क्रयविक्रय लौकर व सुलभ रीतीनें होत असला, म्हणजे तेणेंकरून उत्पन्न किती वाढतें, हें ज्यास पुरतेंपणी विदित नाहीं, त्यांस ह्या सोयी संपत्ति उत्पन्न होण्यास किती उपयोगी पडतात, हें बरोबर समजणार नाहीं. समुद्रसान्निध्य वगैरे सोयींपासून जो फायदा होतो, तो इतका होतो, कीं त्याच्या योगानें जमीन किंवा हवा हीं चांगलीं नसल्यामुळे व खाणी वगैरे नसल्यामुळे संपत्तीची जी न्यूनता येत असते, ती नाहींशी होऊन तो देश, ज्यांस चांगली जमीन वगैरे गुण असतात, त्यांपेक्षां फार विशेष संपन्न असतो, असें बहुत ठिकाणीं दृष्टीस पडतें; व लोकांस विद्येच्या व कौशल्याच्या साह्याय्यानें जेव्हां दळणवळणाचे मार्ग करतां येत नसतात, तेव्हांच्या अवस्थेंत तर विशेषेंकरून वर सांगितलेले सिद्ध मार्ग देशांस फारच सधन करतात. प्राचीन काळचे इतिहासावरून पाहिलें असतां, ज्या देशांत जमीन चांगली व हवा चांगली, ते देश सर्वांत सुखी व सधन होते असें दिसत नाहीं; तर वरचे गुण कमी असल्यामुळें ज्या देशाच्या लोकांस व्यापार करण्याची आवश्यकता पडे, व ज्यांस समुद्रसांनिध्यादि सोयी असत, ते लोक विशेष श्रीमंत व ज्ञानवान होते. ह्यास उदाहरणें; आथेन्स, मार्सेल, वेनिस वगैरे संस्थानें, मिश्रदेश, अशीं अनेक आहेत.

देशास स्वाभाविक गुण म्हणजे आंगच्या सोई असल्यापासून त्याचें उत्पादकत्व वाढतें, म्हणून सांगितलें; व धनोत्पादनास आणखीं जीं कांहीं कारणें आहेत, तीं असून हे स्वाभाविक गुण अनुकूल असल्यास, त्यांपासून देश विशेष धनाढ्य होतो; हें साधारण मनुष्याचे सुद्धां ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. परंतु जगाच्या आजपर्यंत घडलेल्या स्थितीवरून असें स्पष्ट दिसून येतें, कीं संपत्ति किंवा थोरपणा हीं अनायासेंकरून मनुष्यास प्राप्त झालीं असतां, त्यांपासून त्याचें व्हावें तसें कल्याण जसें होत नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या स्वाभाविक गुणांनीं देशास जितकी संपत्ति यावी, असें वाटतें, तितकी येत नाहीं. अत्यंत कल्याणकारक जी गोष्ट आहे, तीच गोष्ट अनायासेंकरून प्राप्त झाली असतां, बहुत करून ती उलटी अहितावह होते. प्राचीनकाळीं पाहा, किंवा अर्वाचीन काळीं पाहा, ज्या देशांत सर्वोत्कृष्ट जमीन किंवा सर्वोत्कृष्ट हवा हीं आहेत, ते देश पूर्वी किंवा हल्लीं अत्यंत सधन किंवा अत्यंत पराक्रमी होते, किंवा आहेत, असें बहुतकरून आढळत नाहीं, तर ते देश प्रायः अत्यंत गरीब व दुर्बळ अशा देशांत मोडत आले आहेत. आतां त्यांच्या तशा गरिबींतही त्या देशांतल्या लोकांस बहुतकरून, इतर सर्व देशांतल्या लोकांपेक्षां एकंदर सुखानुभव विशेष असतो. तसल्या देशांत मनुष्यानें थोडासा श्रम केला, म्हणजे त्याचा निर्वाह सहज होतो, म्हणून त्याला दगदग किंवा काळजी ही फार कमी असतात. तसेंच हवा चांगली असते, ह्यामुळे इतर देशांत ज्या सुखांकरतां पुष्कळ श्रम किंवा पैसा खर्चावा लागतो, तीं सुखें सहज व फुकट प्राप्त होतात. ह्यास उदाहरण असें पाहावें, कीं इंग्लंड वगैरे थंड देशांतील कांहीं शहरांतल्या घरांत ऊन करण्याकरतां लक्षावधि रुपये खर्चले आहेत; ती ऊन ह्या देशांत कवडी न खर्चतां व बोट न हालवितां प्राप्त होते, अशी उदाहरणें पुष्कळ आहेत, असो. अशा देशांतले लोक आवेश आल्यास, तो आहे, तोंपर्यंत मेहनत करण्यास अगदीं कसर करीत नाहींत. परंतु त्यांच्यानें

एकसारखा कष्टून श्रम करवत नाहीं, ते लौकर कंटाळतात, किंवा थकतात. त्यांस तादृश काळजी वाहावी लागत नाहीं, ह्यामुळें त्यांस दूरदृष्टि कमी असते; तेणेंकरून, कालांतरीं ज्यांचे लाभ व्हावयाचे, असे जे उत्तम प्रकारचे राज्यनियम, ते स्थापण्याविषयीं ते लोक बहुतकरून फारसें लक्ष्य देत नाहींत, म्हणून त्यांमध्यें मालमत्तेचें चांगलें रक्षण नसतें, आणि तेणेंकरून श्रम करण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति कमी पडते. संपत्ति उत्पन्न करण्यांत, किंवा दुसऱ्या कोणत्याही उद्योगांत, उत्कर्ष होणें हें, जसें त्या कामास लागलेल्या मनुष्यांच्या गुणावर आहे, तसें त्या कामास साधनीभूत गोष्टींच्या गुणांवर नाहीं. लढाईत जय होणें, चित्र सुरेख काढणें, किंवा करणें ह्या गोष्टी, शिपाई, चितारी, मूर्तिकार, ह्यांच्या गुणांवर जशा असतात, तशा तरवार, कलम, कोरणी, ह्यांच्या गुणांवर असत नाहींत, हें उघड आहे. हीच गोष्ट संपत्ति उत्पन्न करण्यांतही लागू आहे. शरिराची शक्ति, व मनाचे बुद्ध्यादि गुण, जे वाढतात, ते अडचणी पडून त्यांचें निवारण करण्यानें व त्यांस कष्ट दिल्यानें वाढतात; त्यांस स्वस्थ ठेवून वाढत नाहींत. ह्यास प्रमाण,—इतिहास पाहातां असें आढळतें, कीं ज्यांनीं दुसऱ्या देशांवर स्वाऱ्या करून ते देश काबीज केले, व तेथील लोकांस आपणांकरतां खपायास लावलें, ते लोक प्रायः पुष्कळ कष्ट भोगलेले, व हाल काढतां काढतां लहानांचे मोठे झालेले, असे होते. ज्यांनीं दिल्लीची बादशाही बहुत वेळ बुडविली व चीनचें राज्य घेतलें, तें मोगल लोक हिमालयाच्या उत्तरेस तार्तरी, काबूल वगैरे रुक्ष व माळवट जमीनीच्या देशांत राहणारे होते. रोमन लोक व ग्रीक लोक ह्यांनीं मोठमोठे पराक्रम केले. त्यांच्या देशांतील हवा व जमीन हीं चांगलीं होतीं, ह्यास्तव त्यांस श्रम करण्याची स्वाभाविक आवश्यकता नव्हती; परंतु त्या लोकांचे लष्करी कायदे व शिक्षाप्रकार हीं फार कडक होतीं; त्यांच्या योगानें शिपाईलोकांस हाल काढण्याची व कष्ट करण्याची संवय होत असे, आणि इतली व ग्रीस येथील असे कडक कायदे बंद झाले, तेव्हांपासून त्या देशच्या लोकांचा अम्मल इतर देशच्या लोकांवर नाहींसा होत गेला.

तस्मात् ह्या सर्व विचारावरून पाहातां विशेष संपत्युत्पादकत्वाचें दुसरें कारण दृढ श्रम होय, असें सिद्ध होतें. येथें दृढ श्रम ह्या शब्दांनीं प्रसंगवशात् झालेला मोठा श्रम समजावयाचा नाहीं; तर नियमानें व सदोदित सारखा श्रम करण्याची संवय, अथवा संवईत पडलेला श्रम, समजावयाचा. अत्यंत आळशी व गमणारा असा जरी मनुष्य असला, तरी तोही प्रसंगवशात् मरेमरेतों श्रम करतो व कष्ट सोसतो. ह्यावरून असें सिद्ध होतें, कीं मनुष्यामनुष्यांमध्यें किंवा जातीजातींमध्यें जो भेद आहे, तो फल संनिध असतां, त्याच्या प्राप्तीकरतां झटून काम करण्यांत तादृश नाहीं, तर दूरच्या फळाकरतां प्रकृत काळीं मेहनत करण्यांत, व काम साधारण असो, किंवा कसेंही असो, तें करण्याकडे पूर्ण अवधान लावण्यांत आहे. कोणतेंही काम असलें तरी तें मन लावून करण्याचा स्वभाव इंग्रज लोकांच्या आंगीं फार विलक्षण आहे; त्यांमध्यें खेळण्याचा किंवा गंमत करण्याचा नाद फार कमी. कोणताही धंदा ते हातीं घेवोत,—तिकडे त्यांचें मन सर्वदां लागतें, तीच तीच गोष्ट करण्यानें दुसऱ्यास जसा कंटाळा येतो, तसा त्यांस येत नाहीं. एकत्र चौघांनीं बसून चार घटका गप्पा मारणें, किंवा उगीच गमण्यांत, किंवा ख्यालीखुशालींत, काळ घालवणें येणेंकरून त्यांस सुखच होत नाहीं असें दिसतें;—आपलें काम बरें आणि आपण बरें—त्यांच्या आंगीं दृढ उद्योग करण्याचा जो मोठा विलक्षण स्वभाव आहे, तेणेंकरून त्यांचें हातीं धरलेलें काम चांगलें सिद्धीस जातें; व हाच त्यांचा गुण त्यांच्या देशास इतकी संपत्युत्पादकता येण्याचें मुख्य कारण आहे. त्या देशांत जेथें जेथें वस्त्रें विणण्याचे किंवा लोखंडी वगैरे काम करण्याचे कारखानें आहेत, तेथें तेथें दृढ श्रम करण्याची लोकांस अशी चमत्कारिक संवय लागून गेली आहे, कीं प्रत्येक मनुष्य आपआपल्या कामांत निमग्न असतो; व लहान हलक्या मजुरापासून तो मोठ्या कुशल कारागिरापर्यंत सर्व आपापलें काम पराकाष्ठेच्या हुशारीनें व बेतानें करतात, तेणेंकरून त्यांच्या कारखान्यांत इतका माल उत्पन्न होतो. इंग्लंडांतलेच कारागीर इतर देशांत नेले

असतां, त्यांच्या हातून इंग्लंडांतल्यासारखें पुष्कळ काम तेथें होत नाहीं. कां कीं, त्यांच्या हाताखालचे लोक, त्यांच्यासारखें आपलें काम बेतानें व मन लावून करीत नाहींत; व त्यांच्या गमण्याच्या वगैरे संवईनें त्या कारागिरांच्या वेळेची वगैरे खोटी होते. कांहीं देशांतले लोक बुद्धीनें व कौशल्यानें इंग्लंडांतल्या काम करणाऱ्या लोकांपेक्षां वरचढ आहेत; परंतु श्रम करतांना इंग्लंडच्या कारागिरांचें किंवा मजुरांचें लक्ष्य जसें सर्वकाळ हातीं घेतलेल्या कामाकडे लागलेलें असतें, तसें इतर कोणत्याही लोकांचें लागलेलें असत नाहीं. हें जें वर वर्णन केलें, तें इंग्लंडच्या लोकांचे सामान्य स्वरूपाचें समजावें. ह्यास उभय प्रकारेंही अपवाद पुष्कळ आहेत; म्हणजे इंग्लंडांत गमणारे लोक पुष्कळ आहेत, व इतर देशांतही दृढ श्रम करणारे लोक पुष्कळ सांपडतील.

देशांत विशेष संपत्ति उत्पन्न होण्याचें तिसरें कारण, तेथील लोकांचें ज्ञान, व विशेष कौशल्य, हीं होत. आतां ज्ञान व कौशल्य हीं कधीं कधीं साक्षात् संपत्तीचे उत्पन्न करणारे जे मजूर व कारागीर ह्यांचे आंगीं असतात, व कधीं कधीं तीं ज्या मजुरांच्या वगैरे हातून काम घेणारे जे त्यांचे धनी, त्यांच्या आंगीं असतात. जे स्वतः हातानें नेहमीं तेंच तेंच काम करतात, त्यांचे हस्तकौशल्यानें; व ज्यांच्या कामांत बुद्धीची योजना विशेष आहे त्यांच्या चाणाक्षपणानें; तसेंच सृष्ट पदार्थांचे गुण, व शक्ति, ह्यांची माहिती करून घेऊन तिची योजना संपत्ति उत्पन्न करण्याकडे केल्यानें, श्रमाचें उत्पादकत्व वाढतें, ही गोष्ट बहुतेकांस स्पष्टपणें माहीत आहे. लोकांस कलांचें जसें थोडेंबहुत ज्ञान असतें, त्या प्रमाणानें त्यांच्या श्रमास थोडी किंवा बहुत उत्पादकता असते; व त्या कलांची विशेष वृद्धि झाली; आणि स्वतःसिद्ध पदार्थांची, व त्यांच्या शक्तींची, पूर्वीपेक्षा उत्तम योजना संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत होऊं लागली; म्हणजे तसें झाल्यानें पूर्वीच्या इतक्याच श्रमानें पूर्वीपेक्षां अधिक उत्पन्न होतें; ही गोष्ट आपोआप लक्षांत येण्यासारखी आहे.

ज्ञानानें संपत्ति वाढते, म्हणून आम्हीं वर लिहिलें, तेथें ज्ञान कोणत्या प्रकारचें घ्यावयाचें हें वाचणाऱ्यांच्या ध्यानांत आलेंच असेल. संपत्ति उत्पन्न करण्यांस उपयोगी ज्ञान, सृष्ट पदार्थांच्या धर्मांचें होय. तें ज्ञान, पदार्थविज्ञान, यंत्रशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इत्यादिकांच्या अभ्यासानें होतें. हें ज्ञान संपत्ति उत्पन्न होण्यास कसें लागू पडतें, ह्याविषयीं विचार केल्यावर आपणांस असें दिसून येईल, कीं हें ज्ञान साक्षात् श्रम करणाऱ्यांचे ठायींच असलें पाहिजे असें नाहीं. ह्या ज्ञानाच्या योगानें, पदार्थांची योजना उत्तम कोणती, व विवक्षित धर्म पदार्थांत अत्यंत थोड्या श्रमानें कसा येतो, अमुक प्रकारची गति उत्पन्न होण्यास कोणत्या प्रकारें यांत्रिक शक्तिंची योजना केली पाहिजे, इत्यादि गोष्टी कळतात; व त्या ज्ञानाचा व्यवहारांत प्रयोग केला, म्हणजे उत्पन्न वाढतें; मग तो प्रयोग उत्पन्न करणारा मजूर किंवा कारागीर स्वतः करून करीत किंवा त्यांस तो करावयास दुसरा कोणी सांगो.

संपत्ति उत्पन्न होण्याच्या कामांत ज्ञानानें एक मुख्य उपयोग असा होतो, कीं तेणेंकरून नवीन नवीन यंत्रें व हत्यारें करण्याच्या कल्पना निघतात; व त्या यंत्रांची व हत्यारांची योजना कशी करावी, हें समजतें. यंत्रादिकांच्या योजनेनें उत्पन्न कसें वाढतें, ह्याचें सविस्तर निरूपण करूं लागल्यास ग्रंथाचा विस्तार फार होईल; ह्यासाठीं सामान्यरूपानें ह्या स्थळीं ती गोष्ट निवेदितों.—संपत्ति उत्पन्न होण्याच्या कामांत कांहीं कामें अशीं अचाट आहेत, कीं तीं केवळ मनुष्याच्या शक्तीनें कदापि व्हावयाचीं नाहींत, व कांहीं इतकीं सूक्ष्म व नाजूक आहेत, कीं तीं त्यास कधींही व्हावयाचीं नाहींत, व त्याचा हात लागल्याबरोबर नासून जातील. तर तसलीं कामें यंत्रें आहेत म्हणून होतात, नाहीं तर कदापि झालीं नसतीं. गलबतें व होड्या ह्यांवाचून समुद्राच्या पार जातां येतेंनां, तसेंच कसल्या तरी कुऱ्हाडी आणि सुमे असल्यावांचून आपणास मोठमोठीं झाडें तोडतां नयेतीं, व लाकड फोडतां नयेतें; तसेंच नांगर किंवा कुदळी असल्यावांचून जमिनीची लागवड न होती; तसबिरी व धातूंच्या मूर्ति हत्यारांवांचून

कदापि न होत्या; ह्या सर्व गोष्टी स्पष्ट आहेत. आतां हीं सर्व कृत्यें मनुष्यास सरासरी करतां येण्यास सरासरी व ओबडधोबड हत्यारें असलीं म्हणजे पुरतात. आणि मनुष्यांचें ज्ञान वाढून जीं यंत्रें व हत्यारें करण्याच्या कल्पना निघतात, तीं, चांगलें सुरेख व जल्द काम व्हावें ह्याकरतां मुख्यत्वेंकरून केलेलीं असतात. तसाच यंत्रादिकांपासून आणखीं एक लाभ होतो, तो असा कीं थोड्या श्रमानें पुष्कळ काम होतें; आणि वांचलेला श्रम दुसऱ्या कामाकडे लावतां येतो.

संपत्ति उत्पन्न करण्यांत ज्ञान उपयोगीं पडतें, तें हत्यारें व यंत्रें ह्यांच्या द्वारेंच पडतें असें नाहीं; —तें उपयोगीं पडण्याचे दुसरे अनेक मार्ग आहेत. शेतकीच्या कामांत ज्ञानाचा जो उपयोग झाला आहे, तो यंत्रद्वारा तादृश झाला नाहीं; तर त्या कामांत ज्ञानाच्या योगानें असे लाभ होतात, कीं जमिनीचे गुण, व तींत होणाऱ्या वनस्पतींचे गुण, वाढवण्याच्या कृति समजूं लागतात. जमिनींत एकच धान्य दोन चार वर्षांवर चांगलें पिकत नाहीं, म्हणून इंग्लंडांत दोनतीन वर्षांनीं शेतें पड टाकावीं लागत असत, ती न लागावीं म्हणून ते आतां पाळीपाळीनें निरनिराळीं धान्यें पेरतात, हा एक ज्ञानानें फायदा झाला. तसेंच, लागवडीनें पिकाऊपणा जातो, तो आणण्यास तींत चांगलीं व थोड्या खर्चात होणारीं खतें घालणें, चांगल्या रीतीनें झाडें खची करणें, इत्यादि अनेक प्रकारच्या कृति ज्ञानानें प्राप्त झाल्या आहेत. तसेंच, रंगाऱ्याच्या कारखान्यांत थोड्या खर्चात कपडे चांगले स्वच्छ करण्याची, त्यांच्यावर चांगला रंग उठविण्याची, व तो रंग तकतकीत होण्याची, व तो, पाहिजे असल्यास, पक्का होण्याची वगैरे, कृति ह्याच वर्गातली होय. तसेंच, हल्लीं इकडे विजेच्या योगानें मुलामा देण्याची कृति प्रसिद्धीस आली आहे, तीही ह्याच जातींतली होय. कांहीं कृतींपासून पदार्थांचा गुण सुधरत नाहीं, परंतु काम थोड्या काळांत होतें; कांहींकांच्या योगानें अनुपयुक्त पदार्थ उपयोगास लागतात; कांहींकांच्या योगानें पूर्वी फार द्रव्य लागत असतें, तें थोडें लागूं लागतें. ह्यास उदाहरण करवत,—पाहा, हें हत्यार नसतें, तर तक्ते तयार करण्यांत आतांच्यापेक्षां किती लांकडें नासावीं लागतीं !

लोकांत ज्ञान वाढलें असतां देशाचें धन वाढतें हें समजणें फारसें कठीण नाहीं; व यंत्रादि दृष्टीस पडल्यानें अशिक्षित मनुष्यांच्यासुद्धां ती गोष्ट ध्यानांत येते. परंतु देशांतल्या साधारण लोकांत चाणाक्षपणा, व विचार करण्याची साधारण शक्ति, व बहुश्रुतता, हीं वाढलीं असतां, तेथील संपत्ति वाढते, ही गोष्ट समजणें विशेष कठीण आहे; व ती कितीएकांस मुळींच खरी वाटत नाहीं. संपत्ति उत्पन्न करण्याच्या कारखान्यांत कितीएक कामें अशीं आहेत, कीं तीं केवळ स्मृतीनें किंवा दररोजच्या सरावानें चांगलीं होतात, व कितीएक कामें अशीं आहेत, कीं तीं केवळ सरावानें चांगलीं करतां येत नाहींत. तीं चांगलीं होण्यास करणाऱ्याच्या आंगीं कल्पना व विचारशक्ति हीं असावीं लागतात. ह्यास्तव वर सांगितलेल्या गुणांचे मनुष्य पुष्कळ झाले असतां, हल्लीं बहुतेक कारखान्यांत देखरेख करण्यांस जे एवढाले मोठमोठे पगार द्यावे लागतात, ते द्यावे लागणार नाहींत. व सर्वच मनुष्यांस कोणत्यारीतीनें काम केलें असतां चांगलें होईल, हें सांगणारे मिळत नाहींत, व ते मिळाले, तरी सर्वकाळ त्यांच्या जवळ बसून अमुक अमूक असें असें करावें असें त्यांस सांगणें दुसऱ्याच्या हातून संभवत नाहीं, ह्यास्तव त्यांच्या बुद्धीप्रमाणें त्यांस आपलें काम करावें लागतें, तर त्या सर्वांस आपापल्या सर्व कामास जितकें ज्ञान व्हावें असतें, तितकें असल्यास, त्यांच्या श्रमाचें उत्पादकत्त्व किती वाढेल बरें ! पाहा, शेतकरी, माळी, रंगारी, चांभार, लोहार, सोनार, ह्यांस वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र ह्यांतील व्यापक व उपयुक्त नियमांची चांगली माहिती झाल्यास, त्यांस केवढा उपयोग होईल ! मनुष्याची साधारण विचारशक्ति वाढलेली असली, म्हणजे त्यास कोणी कांहीं बऱ्याची गोष्ट सांगितली असतां, ती समजते; व त्यास आपलें हित कशांत व अहित कशांत आहे, हें समजूं लागतें, तो आपल्या कामांत अव्यवस्थितपणें राहात नाहीं; त्यास विचाराच्या योगानें दूरचे अनर्थ दिसूं

लागतात. व असें झालें म्हणजे तेणेंकरून संपत्ति उत्पन्न करण्याचे कामांत मोठा फायदा होतो. चोहींकडे शाळा घालून वगैरे साधारण लोकांत उपयुक्त विद्येचा प्रसार केल्यापासून जे कांहीं इतर लाभ होतात, ते, संपत्ति उत्पन्न करण्यांत होणारे जे लाभ वर सांगितले, त्यांपेक्षां फार मोठे आहेत; तथापि हे वरचे लाभ क्षुल्लक आहेत असें समजूं नये.

लोकांची बुद्धि, कल्पना, इत्यादि वाढल्यानें जसें देशांतलें उत्पन्न वाढतें, तसेंच त्यांचें आचरण चांगलें झाल्यानेंही वाढतें. मजूर कारागीर वगैरे कैफबाज असल्यानें त्यांची बुद्धि व शरीरें हीं खराब होतात, व ते व्यसनी असल्यानें त्यांचें मन चंचल होऊन त्यांच्या हातून एकसारखा दृढ श्रम होत नाहीं; इत्यादि, वाईट आचरणानें, जे परिणाम होतात, ते संपत्तीच्या उत्पत्तीस किती बाधक आहेत, हें विचार केल्यानें ध्यानांत सहज येईल. ह्याखेरीज मनुष्याच्या आचरणांत आणखी एक दोष असतो, तो तर संपत्तीच्या उत्पत्तीस फारच बाधक आहे. तो दोष अप्रामाणिकपणा. श्रम करणाऱ्यांचे व कारागिरांचे श्रमाचें उत्पादकत्व पुष्कळ अंशीं त्यांच्या प्रामाणिकपणावर आहे. गडी मजुरीनें दुसऱ्यानें आपल्या शेतांत लावला असला, म्हणजे तो काम करतो तें, व तो आपल्या स्वतःच्या शेतांत तितक्याच वेळांत जें काम करतो तें, ह्या दोहोंच्यामध्यें पराकाष्ठेचा भेद असतो. जो गडी आपल्या घरीं सकाळपासून दोन प्रहरपर्यंत कडब्याच्या पेंढ्या दोनतीनशें बांधतो, त्यासच दुसऱ्यानें त्याच कामास मजुरीनें लावलें असतां, तो संध्याकाळपर्यंत शंभर पेंढ्या बांधीत नाहीं. सुतार, गवंडी, ह्यांस रोजंदारीने ठेवलें असतां, ते कुचराई करून कामास किती अधिक दिवस लावतात, व त्यांस मक्त्यानें तें काम दिलें असतां काम किती कच्चें करतात, हें पुष्कळांस माहीत असेलच. तसेंच, सोनार, शिंपी, गवळी, इत्यादि सर्व उदमी अप्रामाणिकपणा करून कामाचा किती नाश करतात हेंही बहुतांस ठाऊक आहे. एक साधारण मनुष्य रोजंदारीने लावला, तर त्याकडे वरचेवर नदर ठेवावी लागते; नाहीं तर तो फुकट रोज खाऊन जातो. कामास लावलेले मजूर, किंवा कारागीर आपलें काम संकेताप्रमाणें करतात किंवा नाहींत हें डोळ्यांत तेल घालून धन्यास पाहावें लागतें, व ह्याविषयीं जितका श्रम करावा लागतो, तितका सर्व उत्पादक श्रमांतून कमी करून देखरेखीकडे मनुष्यांच्या अप्रामाणिकपणामुळें लावणें भाग पडतें. केवल वस्तुस्थिति पाहातां, हा श्रम पदार्थोत्पत्तीस आवश्यक नाहीं, व धन्यानें त्यांस कुचराई व कृत्रिम करतां येऊं नये, म्हणून कितीही उपाय केले, तरी त्या बाहेरील उपायांनीं करवलेल्या कामास, त्यांनीं आपल्या इमानानें केलेल्या कामाची सर कदापि येणार नाहीं. मनुष्यांस एकमेकांवर विश्वास ठेवतां येतो, ही गोष्ट फारच महत्वाची आहे; व हिचा उपयोग संसारांतील हरएक गोष्टींत आहे. देश सधन होण्यास ह्या विश्वासरूप गुणापासून जो उपयोग होतो, तो त्यापासून होणाऱ्या इतर उपयोगांशीं लावून पाहातां, फार अल्प आहे खरा, परंतु हा ह्याचा उपयोग एवढ्याच गोष्टीवरून क्षुल्लक म्हणतां येत नाहीं. मनुष्याच्या अप्रामाणिकपणानें संपत्तीचा साक्षात् नाश होतो, त्याचाच विचार केला असतां, त्यांत केवढा तोटा आहे! पाहा—सर्व देशांत शेंकडो लोक केवळ इतर लोकांस लुटून व ठकवून उपजीवन करीत असतात, व ते शेंकडा अमुक असतात, असें निश्चयपूर्वक जरी सांगतां येत नाहीं, तरी सुमारानें पाहातां जसजसा देश सधन, तसतशी तेथें ह्या दुष्ट लोकांची संख्या मोठी असते. ह्या लोकांच्या उपजीवनाचा देशावर मोठा भार आहे. तसेंच प्रत्येक देशांत शहरच्या बंदोबस्ताकरतां, व रखवालीकरतां, पुष्कळ पोलिसाचे लोक ठेवावे लागतात, ते, व दुष्ट लोक कोण आहेत ते ते निवडून काढून त्यांस शासन करण्याकरतां फौजदारी कोडतें ठेवावीं लागतात, तीं व दिवाणी कोडतें, हीं कांहीं अंशीं मनुष्याच्या दुष्ट आचरणामुळेंच आवश्यक झालीं आहेत. मनुष्याचें आचरण चांगलें असतें, तर हे कारखानें बाळगण्याचें ओझें देशावर कशास पडतें? जसजसे लोक प्रामाणिक विशेष, तसतसें हें ओझें कमी असतें. अप्रामाणिकपणानें, तयार झालेल्या संपत्तीचा हा व्यर्थ होणारा नाश सांगितला. अप्रामाणिकपणा कमी

झाल्यानें हा नाश बंद होईल असें नाहीं; तर नवी संपत्तिही पुष्कळ उत्पन्न होईल. मोठाली कामें म्हटलीं म्हणजे तीं एकट्याच्या श्रमानें, बुद्धीनें, किंवा भांडवलानें, होण्याजोगीं नसतात, तीं होण्यास अनेक लोकांची जूट व्हावी लागते. तर लोकांचा एकमेकांवर विश्वास वाढला असतां व आपण दुसऱ्यास भागीदार केलें असतां, तो आपलें काम विश्वासानें करील, आपणास फसवणार नाहीं, असें मनुष्यास पक्केपणीं वाटूं लागलें असतां, किती बरे जुटी होतील? व केवढा व्यापार व तद्वारा, संपत्ति वाढेल! पुष्कळ लोकांपाशीं भांडवल असतें, पण तें व्यापारांत घालण्यास व्यापाराची माहिती पाहिजे ती त्यांस नसते, किंवा वेळ नसतो, म्हणून त्यांजवळ भांडवल असून नसल्यासारखें होतें. तसेंच, दुसऱ्या लोकांस व्यापाराची चांगली माहिती असती, व ते रिकामे असतात, पण त्यांपाशीं भांडवल नसल्यामुळें त्यांची माहिती व वेळ व्यर्थ जातात. परंतु लोकांत जर विश्वासुकपणा विशेष असेल, तर भांडवल ज्यांपाशीं आहे ते, व ज्यांस व्यापाराची माहिती व तो करण्यास वेळ आहे ते, एकत्र होऊन व्यापार वाढून उभय पक्षांचेंही कल्याण होईल, व देशाचें उत्पन्न वाढेल. कांहीं देशांतले लोक फार अप्रामाणिक असल्यामुळें त्यांचा माल घेण्याविषयी इतर देशांतले व्यापारी फार दिकत घेतात. कां तर त्यांचा माल, व ते लोक व्यापाऱ्यांस जो मासला दाखवतात तो, ह्यांच्यामध्यें बहुत वेळ अंतर पडलेलें असतें, आणि व्यापाऱ्यांनीं हौसेनें तो माल न घेतल्यामुळें त्या लोकांस तो तोटा करून विकावा लागतो. तसेंच, कधीं कधीं व्यापारी किंवा कारागीर चांगला प्रामाणिक आहे एवढ्याकरतां त्यांच्या मालास अधिक किंमत द्यावी लागते, व त्या कारागिरांस अधिक मजुरी द्यावी लागती. जे दुकानदार प्रामाणिक असतात, त्यांच्या दुकांनीं जिन्नस महाग असतो; व जे सोनार, शिंपी, वगैरे कारागीर प्रामाणिकपणाविषयीं विख्यात असतात, ते इतरांपेक्षा अधिक मजुरी घेतात; हें सर्वांस माहीत आहे. ह्याप्रमाणें संपत्ति उत्पन्न होण्यास अप्रामाणिकपणापासून अनेक विघ्नें येतात, व तिचा व्यर्थ नाश पुष्कळ होतो. तस्मात् लोकांचें आचरण प्रामाणिक असणें हें देशास उत्पादकत्व विशेष येण्यास एक कारण आहे, असें सिद्ध होतें.

देशास विशेष संपत्युत्पादकत्व आणणारीं जीं वर अनेक उपकारणें सांगितलीं, त्या सर्वांपेक्षां मालमत्तेचे संरक्षण हे मुख्य होय. मनुष्य जो संपत्ति उत्पन्न करण्यासाठीं श्रम करतो, व अनेक प्रकारचीं दुःखें सोसतो, तो संपत्तीचा आपणास उपभोग होईल म्हणून करतो, व सोसतो, परंतु पुष्कळ श्रम करून व अडचणी सोसून जर परिणामीं त्याच्या मेहनतीचें व बुद्धीचें फल दुसरा बळकावतो, तर तो मनुष्य, ज्यावांचून पोट चालतच नाहीं, तेवढे मात्र उत्पन्न करील; परंतु त्यापेक्षां अधिक उत्पन्न करण्याविषयीं त्याची प्रवृत्ति कधींही होणार नाहीं. ह्यास्तव देशांत उत्तम प्रकारें संपत्ति उत्पन्न होण्यास मालमत्तेचे चांगलें संरक्षण असलें पाहिजे. मालमत्तेचें पूर्ण संरक्षण म्हटलें म्हणजे, ज्याची मालमत्ता असेल, त्याच्या खुशीवांचून त्यापासून ती दुसऱ्यास घेतां न येणें. मालकाच्या खुशीवांचून मालमत्तेचें हरण होण्याचे दोन प्रकार आहेत, व तिचें संरक्षण होण्याचेही दोनच प्रकार आहेत. चोर, ठक, परचक्र, ह्यांपासून देशांतल्या मालमत्तेस अपाय होतो, व ह्या अपायाचें निवारण सरकाराकडून होतें; तसेंच, सरकार व त्याचे कामगार ह्यांपासून मालमत्तेस एक अपाय असतो, त्यापासून उत्तम प्रकारच्या राज्यव्यवस्थांच्या योगानें व उत्तम प्रकारच्या कायद्यांच्या योगानें तिचें संरक्षण होतें. मालमत्तेच्या संरक्षणाचे हे दोन्ही प्रकार फार आवश्यक आहेत, व पहिल्यापेक्षा दुसरा कांहीं विशेष आवश्यक म्हटला तरी चालेल. पाहा, इतर लोकांनीं अन्याय केला असतां सरकारांत दाद लागण्याची आशा असते. परंतु सरकार किंवा त्याच्या आश्रयानें त्याचे कामगारच प्रजेच्या धनाचें हरण करूं लागल्यास, दाद लागणेंच प्रायः अशक्य असतें. ह्यांत विशेष वाईट गोष्ट ही असते, कीं सरकारच्या उपद्रवाचा प्रतिबंध करण्यास जो यत्न करतो, तो उलटा सरकारचा गुन्हेगार होऊन व त्याची दाद लागणें एकीकडे

राहून त्याला शिक्षा होते. सरकारच्या वर सांगितलेल्या अपहारामुळेंच एशिया खंडांतले अनेक देश आज दरिद्रावस्थेंत आहेत. इंग्लंड वगैरे ज्या देशांतले लोक चांगले विद्वान व हुशार आहेत, त्या देशांतल्या लोकांनीं उत्तम प्रकारच्या राज्यव्यवस्था व कायदे स्वदेशांत करून घेतले आहेत; त्यांच्या योगानें त्या देशांतल्या सरकारांस प्रजेच्या मालमत्तेचें हरण करतां येत नाहीं. इंग्लंडांत राजास प्रजेवर कांहीं कर बसवणें झाल्यास त्यास प्रथमतः पार्लमेन्ट म्हणजे प्रजेनें राज्यकारभार चालवण्याकरतां आपल्या तर्फेनें नेमलेल्या मुखत्यारांची सभा, तिचे अनुमोदनावांचून बसवतां येत नाहीं.

राजांपासून व त्यांच्या कामगारांपासून मालमत्तेचे रक्षण फार आवश्यक आहे, म्हणून सांगितलें, तसेंच, राजकृत संरक्षणही मोठें उपयोगी आहे. राजा अशक्त असल्यामुळें त्याचा अम्मल त्याचे चाकरांवर नसला, म्हणजे ते चाकरच स्वतंत्र होऊन प्रजेस लुटतात. तसेंच, तसल्या राजांच्या हातून चोर, दरवडेकरी, ह्यांचा चांगला बंदोबस्त होत नाहीं; ह्यास्तव कोणत्या वेळीं काय अनर्थ येईल असें भय प्राप्त होऊन प्रजेची प्रवृत्ति व्यापारादिक करण्याकडे फारशी होत नाहीं. इंग्रजांचें राज्य ह्या देशांत झाल्यापासून दरवडेकरी, व चोर, ह्यांचा उपद्रव बहुतकरून नाहींसा झाला आहे, व सरकारच्या अम्मलदारांचा रयतेवर जुलूमही पहिल्याइतका होऊं सकत नाहीं. हा ह्या देशास ह्या सरकारापासून मोठा लाभ झाला आहे.

कधीं कधीं राजाचे कामगार राजाच्या जातीचे, व प्रजा निराळ्या जातीची, असल्यामुळें राजाचा आपल्या जातीच्या कामगाराकडे पक्षपात पडून, त्यांपासून प्रजेस झालेल्या उपद्रवांची दाद लागत नाहीं. विलियम विजयी ह्यानें इंग्लंडचें राज्य घेऊन आपल्या नार्मन लोकांस कामें सर्व राज्यांतील सांगितलीं, त्यावेळीं इंग्लंडच्या मुळच्या लोकांस त्या नार्मन लोकांपासून बहुत उपद्रव होई, व सरकारांत त्यांची दाद लागत नसे. तसेंच, मागें ह्या देशांत मुसलमानी राज्य होतें, तेव्हां मुसलमान अंमलदार हिंदूंस हवें तसें लुटीत. तसेंच पेशवाईंत देखील ब्राह्मणांची जशी लौकर दाद लागे, तशी इतर जातींची कोठें लागे? हल्लींच्या राज्यांत प्रजेस उपद्रव होण्याचें वर सांगितलेलें कारण आहे, परंतु कांहीं अंशीं सरकारच्या चांगल्या कायद्यांनीं, व दुसऱ्या अनेक कारणांनीं, त्या जातीचा उपद्रव प्रजेस फारसा होतो, असें म्हणतां येत नाहीं.

मालमत्तेचें संरक्षण होण्यास राजभय जसें कारण आहे, तसें, किंबहुना त्यापेक्षां मोठें, कारण लोकभय हें होय. मोठमोठ्या सावकारांचा व्यापार खतपत्रांशिवाय होतो, तरी प्रायः ते एकमेकांस ठकवीत नाहींत, त्यांस इतर लोकांपेक्षां विशेष प्रामाणिक म्हणावें, तर तेंही संभवत नाहीं. कां कीं, प्रसंगवशात्, ते इतर लोकांस ठकवतात. तर, ते जे एकमेकांस ठकवीत नाहींत, ते केवळ ते ज्या लोकांत राहातात, व वागतात, त्यांच्या भयास्तव ठकवीत नाहींत. मनुष्य ज्या लोकांत राहातो, त्यांचें भय, किंबहुना राज्यभयापेक्षांही, त्यास अधिक असतें. वाणी, सोनार, शिंपी, हे आपल्या गिऱ्हाइकांस ठकवतात; पण त्यांस एकमेकांस ठकवण्यास भय वाटतें, फार तर काय, चोरांस व रामोश्यांस आपल्या जातींच्या लोकांशीं प्रामाणिकपणानें वागणें भाग पडतें. ब्राह्मण लोक मद्यपान करण्यास भितात; ख्रिस्तियन लोक एक बायको असतां दुसरी करीत नाहींत, व राजास जुन्या देशचाली मोडवत नाहींत; ह्या सर्व गोष्टी लोकभयानें होतात, असें म्हटलें पाहिजे. मिल वगैरे ग्रंथकारांचें म्हणणें असें आहे, कीं इंग्लंडांत जें मालमत्तेचें रक्षण होतें, तें लोकभयानें जितकें होतें, तितकें तेथील उत्तम राज्यव्यवस्थेनें, व उत्तम कायद्यांनीं देखील होत नाहीं. ह्या विचारावरून साधारण लोकांत उपयुक्त ज्ञानाचा व सुविद्येचा प्रसार करून त्यांच्या समजुती सुधारणें हें देशास किती हितावह आहे, हें आमच्या वाचणाऱ्यांनीं लक्ष्यांत आणावें.

देशास विशेष उत्पादकत्व येण्याचीं मुख्य मुख्य कारणें सांगितलीं. ह्यांखेरीज निरनिराळे कायदे, लोकांच्या रीतिभाति, धर्म वगैरे अनेक गोष्टी देशाची उत्पादकता वाढण्यास किंवा कमी

होण्यास कारण आहेत, त्या सर्वांचें निरूपण केल्यास ग्रंथाचा विस्तार फारच होईल, व तितकें करून त्यांचें, कदाचित, पुरतें निरूपण व्हावयाचेंही नाहीं. त्यांपैकीं कांहींचें विवेचन पुढें प्रसंगवशात् कदाचित् होईल. ह्या स्थळीं सामान्यरूपानें इतकेंच सांगतों, कीं ज्या ज्या कायद्यांच्या व रीतिभातींच्या योगानें मनुष्याचें ज्ञान वाढतें, व त्यास त्याच्या भांडवलाचा, वेळेचा, ज्ञानाचा, अत्यंत योग्य कामांत विनियोग करतां येतो; व ज्यांच्या योगानें त्याच्या श्रमाचें सर्व फल त्याच्या स्वाधीन राहातें; दुसऱ्यास तें बुचाडतां येत नाहीं; व ज्यांच्या योगानें एकाच्या हिताकरतां दुसऱ्याचा नाश होत नाहीं; अशा प्रकारचे कायदे, रीतिभाती देशांस सधन करतात, व ज्यांनीं विपरीत कार्यें होतात, त्यांनी देश दरिद्री होतो.

## भाग आठवा.

# श्रमसंयोग म्हणजे अनेकांनीं मिळून एक काम करणें, ह्याविषयीं.

श्रमाची उत्पादकता वाढवणाऱ्या कारणांचें मागल्या भागांत कथन केलें, त्या प्रसंगीं एक मुख्य कारणाचें आम्हीं अगदींच निरूपण केलें नाहीं. त्याचें कारण असें आहे, कीं तें कारण मोठें आहे, व त्या कारणाच्या विचारांत अनेक इतर गोष्टींचा विचार प्रसक्त होतो, तो पूर्णपणीं व्हावा, ह्याकरतां त्या कारणाचें यथायोग्य सविस्तर विवेचन एका निराळ्याच भागांत करण्याचें योजून तें ह्या भागांत करतों.—तें कारण श्रमसंयोग, म्हणजे अनेक श्रमकर्त्यांनीं एकत्र मिळून एक काम करणें. उत्पन्न वाढण्याचें जें हें महत्साधन, ह्याच्याच एक जातीस श्रमविभाग म्हणतात. ह्या जातीच्या श्रमसंयोगाविषयीं अर्थशास्त्रकारांनीं बहुत विचार केला आहे, व तितका विचार करणें ह्या विषयास योग्यही आहे, तथापि त्या ग्रंथकारांनीं ह्या एकच जातीकडे विशेष लक्ष्य दिल्यानें, त्यांचें लक्ष्य दुसऱ्या जातीकडे पोहोंचावें तितकें पोहोंचलें नाहीं. ही चूक प्रथमतः वेकफील्ड नामक ग्रंथकाराच्या लक्ष्यांत येऊन, त्यानें असें सिद्ध करून दाखवलें, कीं श्रमविभागच संपत्युपत्तीस स्वतः कारण होय, असें अर्थशास्त्रकार आजपर्यंत लिहित गेले, परंतु श्रमविभाग हा मुख्य कारणाचा एक प्रकार होय, व ज्या नियमानें त्यास कारणत्व आलें आहे, तो नियम विशेष व्यापक असून त्यांत श्रमविभागाचा अंतर्भाव होतो.

श्रमसंयोगाच्या जाती दोन आहेत,—अनेक मनुष्यें एकच काम परस्परांच्या साह्यानें करतात, ही एक जाति; व अनेक मनुष्यें, एकाच कामाचे अंगभूत जे अनेक व्यापार, ते करून तद्वारा एकमेकांस साह्य करतात, ही दुसरी जाति. पहिल्या प्रकारांत सर्वांच्या श्रमाचें एकच कार्य होतें; व दुसऱ्या प्रकारांत त्यांच्या श्रमापासून अनेक अंगभूत कार्यें होऊन त्यांपासून एक मुख्य कार्य होतें, हा त्या दोहो प्रकारांच्यामध्यें भेद आहे. पहिल्या प्रकारास साक्षात् श्रमसंयोग, किंवा स्पष्ट श्रमसंयोग म्हणावें; व दुसऱ्या प्रकारास फलद्वारक श्रमसंयोग, किंवा अस्पष्ट श्रमसंयोग म्हणावें.

असें म्हणतात, कीं दोन पारधी कुत्रे निरनिराळे धावूं लागले असतां जितके ससे मारतात, त्यांपेक्षां ते जमून धांवले असतां अधिक मारतात. ह्या उदाहरणांत साक्षात् श्रमसंयोगापासून होणारा लाभ दिसून येतो. ह्याप्रमाणेंच अनेक साधारण कामांत असें आहे, कीं चौघे मनुष्य निरनिराळे खपत असतां, त्यांच्या हातून जितकें काम होतें, त्यापेक्षां ते एकमेकांस साहाय्य करून एकत्र खपले असतां काम अधिक होतें. चार बायका निरनिराळीं जातीं घेऊन दळण्यास बसल्या असतां जितकें दळण दळतील, त्यापेक्षां त्यांनीं एकत्र एका मोठ्या जात्यानें दळलें असतां अधिक दळण दळतील. तसेंच मोठमोठालीं ओझीं चढवणें, मोठालीं झाडें तोडणें, तुळया करवतणें, आगोठीस भाताचें आवण लावणें, नाचणी वरी इत्यादि आवटणें, वगैरे कामांत, प्रत्येक मनुष्य एकटा काम करूं लागला असतां काम फारच थोडें होईल, व कांहीं उदाहरणांत तर, काम मुळींच व्हावयाचें नाहीं.—नाव वल्हवून नेणें, तारवाचे दोरखंड वर ओढणें, उंच इमारती बांधण्याकरतां पाहाड बांधणें, सगळ्याचे सगळे रस्ते एकदम चांगले करण्याकरतां खडी फोडून तयार करून त्यांवर पसरणें, इत्यादि शेंकडों कामें, अनेक

मनुष्यांनीं एकत्र श्रम केल्यावांचून, कदापि व्हावयाचीं नाहींत, न्यू हालंडांतील लोक, उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोक वगैरे रानटी एकमेकांस साह्य करीत नाहींत; त्यांमध्यें ज्याचें काम तो करतो, व ही चाल त्यांच्या श्रमास चांगलें उत्पादकत्व येण्यास एक मोठी प्रतिबंधक आहे. त्या लोकांची स्थिति कांहीं अंशीं पशूंच्यापेक्षांही वाईट आहे. असो. इंग्लंड वगैरे ज्या देशांतील श्रमास उत्पादक शक्ति मनस्वी आहे, तेथील लोक एकमेकांस अगदीं साह्य करीनातसे झाल्यास, व ज्याचें त्यास आपलें काम करावें लागल्यास, त्या देशाची काय अवस्था होईल, हें मनांत आणावें, म्हणजे साक्षात् श्रमसंयोगापासून संपत्तीचें उत्पन्न करण्यास किती उपयोग पडतो, हें लक्ष्यांत सहज येईल. हजारों कारखान्यांत असें आहे, कीं कांहीं मर्यादेपर्यंत श्रम करण्यास एकमेकांस उपयोगीं पडणें जसजसें विशेष, तसतसें त्या श्रमास उत्पादकत्व विशेष. साक्षात् श्रमसंयोग हा लोकांची परस्पर संबंधानें हित करून घेण्याची पहिली पायरी होय. दुसरी पायरी ही, कीं परस्परांच्या साहाय्यानें उत्पन्न वाढतें, ह्यास्तव कांहीं लोक एकवट होऊन श्रमसंयोगाच्या योगानें आपणास हवें त्यापेक्षां अधिक धान्य उत्पन्न करूं लागले, म्हणजे दुसरे कांहीं लोक एकत्र होऊन त्याच उपायानें आपणांस हवीं त्यापेक्षां अधिक वस्त्रें उत्पन्न करूं लागतात, आणि ज्यास्ती झालेलीं वस्त्रें देऊन, पहिल्या लोकांनीं जें अधिक धान्य उत्पन्न केलें असतें, तें घेतात; आणि श्रमसंयोगाच्या योगानें दोघां समुदायांचें उत्पन्न वाढलें असतें, म्हणून विनिमयाच्या योगानें दोघांपाशींही त्या प्रत्येकांच्या गरजेपेक्षां अधिक धान्य व वस्त्रें होतात, तेणेंकरून त्यांपाशीं भांडवल होऊन आपापल्या कामांत मजूर ठेवण्याचें सामर्थ्य त्या दोन्ही समुदायांस येतें. ह्याप्रमाणें साक्षात् श्रमसंयोगापासून पुढें फलद्वारक श्रमसंयोग उत्पन्न होतो, असें वेकफील्ड्साहेबाचें मत आहे. साक्षात् श्रमसंयोगस्थळीं एक प्रकारचीं कामें करण्यास श्रमकर्ते परस्परांस साह्य करतात. जसें एक कुणबावा वाहणाऱ्या गड्यांचें एकमेकांस साह्य, व फलद्वारक श्रमसंयोगस्थलीं एका मुख्य कामाचीं अंगभूत जीं अनेक कामें तीं वांटून घेऊन तीं करून तें मुख्य जें काम तें सिद्ध होण्यास परस्परांस साहाय्य करतात, जसें, सर्वांस धान्य व वस्त्रें पाहिजेत. तर कोणी सर्वांस पुरेसें धान्यच करतात, व कोणीं सर्वांस पुरतशीं वस्त्रें करतात, आणि अशा रीतीनें एकमेकांचे उपयोगीं पडतात. ह्या दुसऱ्या प्रकारास बहुतेक अर्थशास्त्रकार श्रमविभाग म्हणतात.

श्रमसंयोगाच्या वर सांगितलेल्या दोन प्रकारांच्यामध्यें एक मोठा भेद आहे, तो हा, कीं साक्षात् श्रमसंयोग ज्यांचा श्रमाचा संयोग असतो, त्यांस समजतो, व अशिक्षित मनुष्याच्यासुद्धां, दिसल्यामुळें, लक्ष्यांत सहज येतो. परंतु फलद्वारक जो श्रमसंयोग आहे, तो समजणारे थोडे. तो ज्यांच्या श्रमाचा संयोग असतो, त्यांस सुद्धां, बहुधां, कळत नाही. ह्याचें कारण असें आहे, कीं अनेक मनुष्यें एकादें ओझें उचलूं लागलीं असतां आपण एकमेकांस साह्य करतों, असें त्यांस समजतें; कां कीं, ती गोष्ट डोळ्यांनीं दिसते, तेव्हां तीविषयीं कोणास भ्रांति असत नाहीं. परंतु फलद्वारक श्रमसंयोगस्थळीं, निरनिराळीं मनुष्यें किंवा मनुष्यांचे समुदाय निरनिराळ्या जागीं, निरनिराळ्या काळीं, निरनिराळे उद्योग करतात. ह्याकरतां ते वास्तविकपणें एकमेकांस साह्य करतात खरें; परंतु तें लक्ष्यांत सहज येत नाहीं, तें लक्ष्यांत येण्यास विचार करावा लागतो; व ह्या भेदामुळेंच त्या दोन प्रकारांस वर स्पष्ट श्रमसंयोग व अस्पष्ट श्रमसंयोग अशा संज्ञा दिल्या आहेत.

प्रकृत काळीं एक आंगरखा करण्याच्या श्रमाचा किती विभाग झाला आहे, म्हणजे तो आंगरखा करण्यांत किती मनुष्यांच्या श्रमाच्या संयोग झाला आहे, तो पाहा;—तो आंगरखा लोकरीचा असल्यास मेंढरें राखणारे, व त्यांची लोंकर कापणारे लोक निराळे,—त्या लोकरीचें सूत काढतां येईशी ती तयार करण्याचें काम निराळें,—तिचें सूत काढण्याचें तिसरें काम,—त्या सुताची बनात विणण्याचें चवथें काम, —ती बनात रंगविण्याचें पांचवें;—व तिचा आंगरखा शिंवण्याचें साहावें काम. ह्यांखेरीज लोंकरीच्या

अवस्थेपासून शेवटपर्यंत त्या द्रव्याचें स्थलांतर किती वेळ होतें, व तें न्हावयास गलबतवाले, गाडीवाले, किंवा बैलवाले, किती लागतात; व किती एक उदम्यांच्या हातीं तें द्रव्य जातें; व त्या गलबताचे किंवा मागाचे करणारे इत्यादि श्रमकर्त्यांचा विचार केला; तर तो फार मोठा आहे. हे सर्व लोक, चरम फल जो आंगरखा तो तयार होण्यास, परस्परांस सहाय्य करतात, व त्या सर्वांच्या श्रमाच्या संयोगानें तें फल उत्पन्न होतें. परंतु आपण एकमेकांस साह्य करतों, असें त्यांस वाटत नाहीं, व ह्या कृत्यामध्यें त्यांचा पूर्वसंकेत नसतो. आतां वर सांगितलेल्या लोकांच्याच श्रमानें तो आंगरखा उत्पन्न झाला आहे काय? त्यास ह्यांपेक्षां अधिक लोकांचा श्रम लागला आहे. वर जितके उदमी व व्यापारी सांगितले, त्यांपैकीं प्रत्येकास धान्य आणि शेंकडों पदार्थ पाहिजेत, आणि दुसरे कोणी लोक ते पदार्थ उत्पन्न करताहेत, ते आपणास मिळतील, असा त्यास पक्का भरंवसा नसता; तर त्या प्रत्येकास आंगरखारूप माल तयार होण्यास आवश्यक जे व्यापार त्यांपैकीं एकेका व्यापाराकडेच आपली सर्व वेळ लावतां नयेती, आंगरख्याच्या ह्या उत्पादकांस ज्यांपासून धान्य व घरें प्राप्त झालीं, त्यां सर्वांनीं, त्यांस जरी वाटलें नाहीं, तथापि, त्यांस आंगरखा उत्पन्न करण्यास साहाय्य केलें. ह्यावरून असें दिसतें कीं आपणास हवें त्यापेक्षां अधिक धान्य उत्पन्न करणाऱ्या मनुष्यांच्या एका समुदायास ज्यास्त उत्पन्न केलेलें धान्य देऊन, त्यास हवीं त्यांपेक्षां अधिक उत्पन्न करणाऱ्या मनुष्यांच्या समुदायापासून त्यांनीं ज्यास्त उत्पन्न केलेलीं वस्त्रें विकत घेतां येतात; व दुसऱ्या समुदायास पहिल्या समुदायापासून धान्य घेतां येतें; हा विनिमय त्या दोन समुदायांची जूट आहे म्हणून होतो. आतां यद्यपि ते सर्व मनुष्य एकमेकांशीं असें करण्याचा स्पष्ट संकेत करीत नाहींत खरा; तथापि त्यांस एकमेकांपासून साह्य प्राप्त होण्याचा भरंवसा असतोच; आणि ते समुदाय एकमेकापासून दूर अंतरावर गेल्यानें किंवा राजप्रतिबंधानें, किंवा त्यांचा परस्परांत तंटा झाल्यानें वगैरे त्यांची जूट मोडून पूर्वोक्त विश्वास नाहींसा झाल्यास, कोणत्या तरी रीतीनें पुनः जूट झाल्यावांचून त्यांस धान्य व वस्त्रें उत्पन्न करण्याच्या श्रमाचे दोन भाग करतां येत नाहींत.

मागल्या उपपादनावरून संपत्ति उत्पन्न होण्यास श्रमविभाग किती आवश्यक आहे, हें वाचणाऱ्यांच्या ध्यानांत आलेंच असेल. निरनिराळीं मनुष्यें, किंवा मनुष्यांचे समुदाय, एकएक पदार्थ उत्पन्न करण्याकडे आपला सर्वकाळ, किंवा बहुतकाळ, लावूं लागले; म्हणजे ते पदार्थ अधिक उत्पन्न होतात, एवढेंच नाहीं; तर श्रमविभाग जर अगदींच नसता, तर हल्लीं जे पदार्थ उत्पन्न होतात, त्यांतून फारच थोडे पदार्थ उत्पन्न होते, व बाकीचे पदार्थ मुळींच उत्पन्न होते ना.

असें कल्पा, कीं एका ओसाड व पिकाऊ जमिनीच्या बेटांत कांहीं मनुष्यें जाऊन वसाहत करून राहिलीं. तीं सर्व एकच धंदा करतात. प्रत्येक कुटुंबानें एकएक शेत घेऊन, त्या शेतांत खपून, त्या कुटुंबांतलीं मनुष्यें आपापल्या निर्वाहापुरतें धान्य उत्पन्न करतात. आतां सर्वच धान्य उत्पन्न करणारे पडले, तेव्हां धान्य ज्यास्त उत्पन्न करून तें विकत घेण्यास कोणी नाहीं, सबब प्रत्येक कुटुंबास धान्याखेरीज जे पदार्थ लागत असतील, ते त्या कुटुंबातल्या माणसांसच उत्पन्न करावे लागतात. अशा स्थितींत त्या बेटांतील जमीन जर बरीच पिकाऊ असली, व त्या पिकाऊपणाच्या मानानेंच त्या लोकांची संख्या असली, तर ते लोक धान्याखेरीज निर्वाहाचे दुसरे कांहीं पदार्थ उत्पन्न करतील. प्रत्येक कुटुंबांतील बायकांस कांहीं वेळ सांपडेल, त्यांत त्या सूत काढून कुटुंबाच्या मनुष्यांस निर्वाहापुरतीं थोडीशीं मोठीं धोटीं वस्त्रें विणतील,* तसेंच जेव्हां शेतांत निकडीचें काम नसेल, तेव्हां कुटुंबांतलीं कांहीं माणसें खपून आवडधोवड खोपटीं बांधतील, किंवा तीं बांधलेलीं असल्यास त्यांची डागडुजी करतील. ह्याप्रमाणें धान्य (तेंही पाऊस जसा कमीज्यास्त पडेल, त्या मानानें कधीं कधीं पुरतें मिळालें

---

* ही श्रमविभागाची पहिली पायरी होय.

मिळालें नाहीं नाहीं), मोठें घोटें धड्डूत कांवरूण, सरासरी खोपटी, ह्यांच्या पलीकडे अधिक, कोणत्याही कुटुंबास, प्रायः उत्पन्न करतां यावयाचें कठीण. हें इतकेंच उत्पन्न करावयास त्यांपैकीं बहुतेकांस पराकाष्ठेची मेहनत करावी लागेल. ते धान्य उत्पन्न करतील, तेंसुद्धां त्यांजवळचीं आउतें पराकाष्ठेचीं आवडघोबड असल्यामुळें फारसें उत्पन्न व्हावयाचें नाहीं. सुखाचे व ऐषआरामीचे पदार्थ उत्पन्न करण्याची तर वार्ताच नको; कां कीं, ते पदार्थ उत्पन्न करण्याचें ज्ञानच त्यांस नसतें. आणि कांहीं वस्तू त्यांस यथा कदाचित करतां यावयाजोग्या असल्या, तरी त्यांस फावणार कोठून? व कांहीं जिन्नस करावयास त्यांस स्थलांतर केलें पाहिजे, तेंही त्यांच्यानें करवायाचें नाहीं. ह्यास्तव असल्या लोकांत अनेक प्रकारचे धंदे असणार नाहींत; व जे थोडेसे धान्यादि आवश्यक पदार्थ ते उत्पन्न करीत असतील, त्यांतही फारसें उत्पन्न व्हावयाचें नाहीं. कां कीं, त्यांचीं आऊतें वाईट, हें त्यांच्या श्रमाची उत्पादकता वाढण्यास मोठें प्रतिबंधक आहेच; व तें असून दुसरें असें मोठें प्रतिबंधक आहे, कीं कुटुंबांचे माणसांनीं आपल्या निर्वाहापुरतें स्वश्रमानें आपल्या जमिनींत उत्पन्न केलें, म्हणजे त्यांची गुदरण होते, मग कुटुंबाचीं माणसें आहेत तितकीं आहेत तोंपर्यंत, त्यांस आपल्या जमिनीचें उत्पन्न वाढवण्यास, किंवा विशेष श्रम करण्यास, कांहीं हेतु नाहीं. हेतु असल्यावाचून उगीच मेहनत कोण करतो?

आतां असें कल्पा, कीं कांहीं लोक आपलीं हत्यारें घेऊन, व एका वर्षाच्या बेगमीपुरतें धान्य बरोबर घेऊन त्या बेटांत येऊन राहिले. असें झाल्यास त्या शेतकरी लोकांच्या पूर्वीच्या स्थितींत मोठा विपर्यास पडेल. नवे आलेले कारागीर लोक, त्या साध्या शेतकरी लोकांस आवडण्याजोगे शोभादायक पदार्थ, अथवा उपयोगाचे पदार्थ, करूं लागतील, आणि त्यांनीं बरोबर आणलेलें धान्य संपण्यापूर्वी आणखीं धान्य घेण्यास त्यांपाशीं त्यांनीं नवा केलेला माल पुष्कळ होईल. असें झाल्यानें त्या पहिल्या शेतकऱ्यांस आपली संपत्ति वाढवण्याची विशेष उमेद येईल. त्यांस आतां सुखाचे व ऐषआरामीचे पदार्थ घेण्याची सोय झाली. जोंपर्यंत त्यांस कोणत्याही पदार्थांचें संपादन करण्यास स्वश्रमावांचून दुसरा मार्ग नव्हता, तोंपर्यंत ते पदार्थ उत्पन्न होणेंच अशक्य होतें; मग ते ह्यांस कोठून मिळावे? आतां त्यांनीं अधिक श्रम करून आपल्या जमिनींत धान्य वगैरे अधिक उत्पन्न केल्यास, तें देऊन हे पदार्थ घेण्यास रस्ता खुला झाला, म्हणून शेतकऱ्यांस आपलें उत्पन्न वाढवण्यास व विशेष श्रम करण्यास, पूर्वीं हेतु नव्हता, तो आतां हेतु झाला. आतां सोयीचे पदार्थ त्यांला जे मिळण्याजोगे झाले, त्यांत त्यांस चांगलीं आऊतें मिळतील, हेंही त्यांचा श्रम विशेष उत्पादक होण्यास मोठें साधन झालें. ह्या अशा कारणांनीं बहुतेकांचें पहिल्यापेक्षां उत्पन्न वाढून त्यांस अधिक झालेलें धान्य कारागिरांस देऊन, त्यांनीं स्वश्रमानें उत्पन्न केलेला माल विकत घेतां येईल. शेतकरी लोकांनीं धान्य ज्यास्त उत्पन्न केल्यास त्याला कोणी गिऱ्हाईक नव्हतें, तें हे कारागीर लोक त्यांमध्ये येऊन राहिल्यानें झालें, व तेणेंकरून त्या बेटांतली संपत्ति वाढली; ती हे नवे आलेले लोक जो माल करूं लागले, तेवढ्यानेंच वाढली, असें नाहीं, तर ते आल्याच्या योगानें जें अधिक धान्य उत्पन्न होऊं लागलें, तेणेंकरूनही वाढली.

ह्या स्थलीं कोणास, कदाचित, असें वाटेल, कीं ही जी आतां गोष्ट लिहिली, कीं नवें गिऱ्हाईक झाल्यामुळें बेटांतलें, एकंदर उत्पन्न वाढलें, ह्या गोष्टींशीं, व मागें पांचव्या भागांत जो एक सिद्धांत सांगितला आहे, कीं पदार्थांचा खप मजुरांस धंदा उत्पन्न होण्यास कारण नाहीं, त्या सिद्धांताशीं विरोध येतो; परंतु वास्तविकपणें त्या दोहींत विरोध नाहीं. शेतकऱ्यांस जो धंदा पूर्वीं होता, तोच आहे, व नवीं गिऱ्हाइकें येण्यानें, त्यांचा पूर्वीं निर्वाह होत नव्हता, तो होऊं लागला असेंही नाहीं. धान्य विकूं लागल्यानें काय झालें, तें इतकेंच, कीं तेणेंकरून शेतकरी लोक पहिल्यापेक्षां विशेष खपूं लागले, व त्या योगानें त्यांच्या श्रमापासून अधिक उत्पन्न होऊं लागलें, तसेंच कारागीर लोकांचा माल शेतकरी घेऊं लागल्यानें त्या कारागिरांस पूर्वीं रोजगार नव्हता, तो झाला, किंवा त्यांचे पोषण होत नव्हते, तें

होऊं लागलें असें नाहीं; कां कीं त्यांजवळ एक वर्षाची बेगमी होतीच, ती खाऊन ते जर मुळच्या लोकांप्रमाणें शेतकीचा रोजगार करते, तर तो खुशाल होता, व तेणेंकरून त्यांचा उदरनिर्वाह बाकीच्या लोकांच्या प्रमाणें झाला असता; असो.

वरील सर्व उत्पादनावरून आपणांस हें स्पष्ट दिसून येतें, कीं एक प्रकारची संपत्ति उत्पन्न करणाऱ्यांच्या श्रमास चांगलें उत्पादकत्व येण्यास, दुसरे प्रकारची संपत्ति उत्पन्न करणारे त्यांच्या टप्यांत असणें, हें मोठें कारण आहे. मनुष्यांस आपापल्या श्रमानें उत्पन्न झालेल्या मालांचा विनिमय करतां न येता, तर त्यांच्या हातून उत्पादक श्रमच फारसा झाला नसता. एकाद्या जिन्नसाचा खप वाढला असतां त्या मालाची उत्पत्ति वाढते, ती म्हणजे सर्वकाळ दुसऱ्या एकाद्या मालाची उत्पत्ति कमी होऊनच वाढते असें नाहीं. कधीं कधीं असें होतें, कीं पदार्थांचा खप वाढल्यानें तो पदार्थ उत्पन्न करण्यांत विशेष नफा होऊं लागून, पूर्वी जे लोक केवळ उत्तेजन नसल्यामुळें चांगला श्रम करीत नसतात, ते आतां श्रम करूं लागतात, व ज्यांपाशीं भांडवल असून नफा नसल्यामुळें, ते तें कामास लावीत नसतात, ते कामास लावूं लागतात; व जे पूर्वी संग्रह करीत नसतात, ते आतां नफ्याच्या इच्छेनें संग्रह करूं लागतात. तसेंच, मालाचा खप थोडा असला, म्हणजे तो उत्पन्न करण्याच्या कामांत उत्तम प्रकारचीं यंत्रें वगैरे ह्यांची योजना करून किंवा विशेष श्रमविभाग करून उत्पन्न वाढवण्यांत फळ नसतें, तें होऊं लागल्यानें त्या यंत्रादिकांची योजना होते.

ह्या विचारावरून असें सिद्ध होतें, कीं देशांत शहरवस्ती पुष्कळ असल्यावांचून, किंवा इतर देशांत धान्य वगैरे शेतकीचा माल पाठवण्याचा मोठा व्यापार असल्यावांचून, तेथें उत्तम प्रकारची शेतकी व्हावयाची नाहीं. येथें शहरची वस्ती ह्या शब्दानें नानाप्रकारचे उदमी, व्यापारी, कारागीर, हे घ्यावयाचे; व त्या सर्वांचा वाचक एक शब्द नाहीं, व ते लोक बहुतकरून श्रमसंयोगाच्या कारणानें शहरांत जमून राहातात, ह्यावरून शहरवस्ती हा शब्द त्यांस लावला आहे. हे लोक व शेतकरी एकमेकांच्या टप्यांत असले म्हणजे दोघांसही विशेष श्रम करावयास उत्तेजन येतें.

हिंदुस्तान वगैरे उत्तम प्रकारच्या जमिनीच्या व उत्तम प्रकारच्या हवेच्या देशांत शेतकीचें उत्पन्न वाढण्यास जीं हल्लीं प्रतिबंधकें आहेत त्या सर्वांत एक मोठें प्रतिबंधक हें आहे, कीं त्या देशांत शहरी वस्ती कमी. हिंदुस्तानांत शेतें करण्याची रीत अशी आहे, कीं एकएक शेतकरी लहानलाहान शेत घेऊन तेवढेंच वाहून तो आपला चरितार्थ चालवतो. ह्या देशांत ते इंग्लंडांतल्या सारखे मोठमोठाले कुणबावे करीत नाहींत. येथें श्रमसंयोग करण्याचा बराच परिपाठ आहे. प्राचीन काळापासून येथें बलुत्यांची चाल आहे. ते बलुतेदार म्हटले तर सुतार, म्हार, गुरव, न्हावी, परीट असे पुष्कळ असतात. त्यांचीं पूर्वी कामें अशीं असत, कीं वर्षभर त्या बलुतेवाल्यांचें जें जें काम शेतकऱ्यांस लागेल, तें तें त्यांनीं करावें; व शेतकऱ्यांनीं शेताची मळणी झाल्यावर त्यांस कांहीं नियमाप्रमाणें थोडेंथोडें धान्य द्यावें. ह्याखेरीज दर खेड्यास बहुतकरून एकादा वाणी असतो, तो तेथील शेतकऱ्यांस नेहमीं लागणारे जिन्नस धान्य घेऊन देतो, व त्यांस भांडवल देणारा सावकारही बहुतकरून तोच असतो. ह्या रीतीनें त्यांच्या मध्यें बराच श्रमसंयोग असतो, परंतु त्यांच्या जुटीनें न होणारीं जीं कामें म्हणजे तळीं बांधणें, मोठमोठीं धरणें बांधणें, किंवा मोठमोठे पाट खणून आणणें,—असल्या कामांस सरकार चांगलें तर तें तगाई देतें. ह्या देशांतलीं आउतें फार खराब आहेत, व शेतकरी ह्यांस शेतकीतल्या चांगल्या चांगल्या कृति माहीत नाहींत, ह्यामुळें जमीन चांगली पिकाऊ असतां, व हवाही वनस्पतींच्या वाढीस अत्यंत गुणावह असतांही, उत्पन्न फारच थोडें होतें. चांगलीं आऊतें वगैरे असतील, व विहिरी, पाट, वगैरे कामें पुष्कळ होऊन पाणी जर जमिनीस पुष्कळ मिळेल, तर ह्या देशांतल्या जमिनींत हल्लीं जितक्यांच्या उपजीविकेपुरतें धान्य उत्पन्न होत आहे, त्यांपेक्षां फार पुष्कळ लोकांस पुरून उरेसें धान्य उत्पन्न

करण्याची ह्या जमिनीस योग्यता आहे. परंतु असें उत्पन्न वाढवण्यास उत्तेजन नाहीं. तें उत्तेजन येण्यास शहरी वस्ती पुष्कळ असून, एके ठिकाणचा माल दुसऱ्या ठिकाणीं थोड्या खर्चानें, व लौकर, जाण्याजोगे चांगले मार्ग पाहिजेत. हल्लीं विलायतेहून कापड, लोखंडी सामान, कागद, वगैरे अनेक प्रकारचा माल येऊं लागल्यानें येथील शहरी वस्ती व एतद्देशीय उद्यमी व कारागीर फारच कमी झाले आहेत. त्यास अशा अवस्थेंत देशाची संपत्ति वाढण्याचा मुख्य उपाय हाच दिसतो, कीं देशांत चोहींकडे चांगले रस्ते करून येथील जमिनीचें उत्पन्न (कापूस, नीळ, बूंद, अफू, साखर वगैरे) थोड्या खर्चांत विलायतेस जाईलसें करावें, म्हणजे हे जिंनस तिकडे जाण्याचा व्यापार चालू होईल; व तेणेंकरून ह्या देशांत शहरी वस्ती वाढल्याचें पुष्कळ अंशीं फळ येईल. आतां कापूस वगैरे जिन्नस उत्पन्न करणाऱ्यांस धान्य पाहिजे, तें ते इतर शेतकऱ्यांपासून घेतील; तेणेंकरून, धान्य उत्पन्न करणाऱ्यांस उत्तेजन येईल; व ह्याप्रमाणें धान्य उत्पन्न करणाऱ्यांस वगैरे अधिक नफा होऊं लागला, म्हणजे त्यांस कांहीं सुखाचे वगैरे पदार्थ घेण्याची गोडी लागून, व ज्ञान प्राप्त करून घेण्याकडे लक्ष्य लागून, त्या शेतकरी लोकांत लपणारे पदार्थ उत्पन्न करणारे व्यापारी व कारागीर ह्यांचीं संख्या वाढूं लागेल.

ह्या प्रमाणें निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळे धंदे वांटून घेण्याचा हा प्रकार झाला. ही वांटणी देशांतला उत्पादक श्रम वाढवण्याचा मूळ पाया होय. ही जेथें नाहीं, तेथें उत्पादक श्रम वाढावयाचा नाहीं. पण ही वाटणी करण्याचा प्रघात पडून ती चांगली चालू झाली, आणि एकेका व्यापाऱ्यानें किंवा कारागिरानें एकएकच जिन्नस उत्पन्न करून तो पुष्कळांस पुरवावा, व त्यास स्वतः जे दुसरे पदार्थ खर्चावयास पाहिजेत, ते त्यानें आपल्या मालाबद्दल दुसऱ्यांजवळून घ्यावे, असें करण्याचा सर्वसाधारण प्रचार पडला; म्हणजे पुढें ज्या कारणांनीं ही श्रमविभाग करण्याची रीत प्रथम पडते, त्याच कारणांनीं ती रीत विशेष वाढत जाते. प्रत्येकानें सर्व धंदे करण्यापेक्षां निरनिराळ्यानें निरनिराळा एकेकच धंदा केला असतां, एकंदर उत्पन्न वाढतें, म्हणून धंद्याची वांटणी चालू झाली. तसेंच एकेक धंद्याच्या पोटांत पुष्कळ कामें असतात. जसें एक तांबटाचें काम उदाहरणार्थ घेतल्यास, त्यांत अनेक तऱ्हांचीं भांडीं करणें हें असून, त्यांत आणखी धातूंचा रस करणें, मुशी तयार करणें, त्यांत तो रस ओतणें, मांडें घडणें, तें चरकावर लावणें, इत्यादिक कामें असतात; तितकीं सगळीं एकट्यानें करण्यापेक्षां दोघांचौघांनीं वांटून घेऊन एकेकानें दोनदोन तीनतीनच केल्यास एकंदर उत्पन्न वाढतें; व एकेकानें एकेकच काम केल्यास, तें फारच चांगलें होतें; म्हणून कामांचे बारीक बारीक विभाग होऊन श्रमविभाग फारच वाढत जातो. आदम स्मिथ वगैरे ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत श्रमविभागाचीं उदाहरणें लिहिलीं आहेत, तीं ह्या शेवटल्या प्रकारच्या श्रमविभागाचीं आहेत. त्या ग्रंथकारानें टांचण्या करण्याच्या कारखान्याचें उदाहरण दिलें आहे, तें फारच चांगलें आहे. टांचणी हा पदार्थ इतका लाहान आहे, परंतु तो करण्याच्या कामांत निरनिराळे अठरा भाग केले असतात. एक माणूस तार ओढतो, दुसरा ती नीट करतो, तिसरा ती तोडून तिचे बेताचे तुकडे करतो, चवथा त्या तुकड्यांच्या एके बाजूस टोंक करतो, पांचवा ते तुकडे दुसरे बाजूस घांसून त्यांस डोकीं बसवण्यास तयार करतो,—डोकीं तयार करण्यात दोनतीन माणसें वेगळींच असतात, एकाचें काम तीं डोकीं त्या तुकड्यांस बसवण्याचें असतें, एक टांचण्या पांढऱ्या करतो. एकाचें काम इतकेंच असतें, कीं त्यानें तयार झालेल्या टांचण्या कागदास टोंचाव्या. आदम स्मिथ म्हणतो, कीं म्यां टांचण्या करण्याचा एक कारखाना पाहिला होता, त्यांत सारीं दाहाच माणसें होतीं, ह्याकरतां त्यांपैकीं कांहींकांस दोनदोन तीनतीन कामें करावीं लागत. आणि ते लोक गरीब होते, ह्यांमुळें त्यांपाशीं असावीं तितकीं हत्यारें नव्हतीं; तथापि ते ज्या दिवशीं चांगले खपत, त्यादिवशीं ते साहा शेर टांचण्या तयार करीत. आतां एका शेरांत मध्यम प्रतीच्या टांचण्या आठ हजारांवर असतात; तेव्हां ह्या मानानें दाहा मनुष्यांच्या

हातून एक दिवसांत अठ्ठेचाळीस हजारांवर टांचण्या झाल्या, व एकेकाच्या हातून चार हजार आठशें टांचण्या झाल्या. परंतु तींच दाहा माणसें जर निरनिराळीं एकमेकांच्या साह्यावांचून, तें काम करतीं, व त्यांपैकीं कोणी कोणताही धंदा विशेषेंकरून शिकला नसता, तर त्यांस वीस टांचण्यासुद्धां न करवत्या, अथवा विसांची कथा दूर आहे, परंतु एक देखील टांचणी करण्याचें कठीण पडतें.

घड्याळें करण्याच्या एका व्यापारांत निरनिराळ्या एकशेंदोन शाखा आहेत; व ती प्रत्येक शाखा शिकावयास कांहीं वर्षें लागतात; व तितकीं वर्षें घालून ती शाखा आली, तरी तेवढी मात्र येते; दुसऱ्या कोणत्या शाखांतली कांहीं माहिती होत नाहीं. ती माहिती व्हावी असल्यास त्या शाखा आणखी शिकल्या पाहिजेत. घड्याळें जुळणारा म्हणून एक निराळाच कारागीर असतो, त्याचें काम निरनिराळे सर्व भाग घेऊन ते एकत्र जुळून घड्याळ तयार करावयाचें असतें. एकशेंदोन कारागिरांमध्यें त्या एकास मात्र आपल्या कामाखेरीज दुसरें कोणतेंही काम येत असतें.

धंदे वाढले असतां, तेणेंकरून श्रमाची उत्पादकता वाढते, ह्यांचीं कारणें बहुत आहेत, त्यांपैकीं जितकीं सांगवतील तितकीं सांगतों. आदम स्मिथ ह्यानें त्या सर्वांचा अंतर्भाव तिहींत केला आहे. तीं तीन हीं, कीं श्रमविभागानें प्रत्येक कारागिराचें कौशल्य वाढतें, व तें श्रमाचें उत्पादकत्व वाढण्याचें पहिलें कारण. दुसरें कारण हें, कीं एकासच अनेक कामें करावयाचीं असलीं, म्हणजे तो एक काम सोडून दुसरे कामास लागूं लागला, म्हणजे जो वेळ मध्यें बहुतकरून जात असतो, तो श्रमविभागानें वांचतो; व तिसरें कारण असें आहे, कीं यंत्रांची उत्पत्ति; ज्या यंत्रांच्या योगानें श्रमास सौकर्य येतें, व पुष्कळ श्रमाच्या ठिकाणीं थोडा श्रम पुरूं लागतो, व तेणेंकरून एक माणसास पुष्कळ माणसांचें काम करतां येऊं लागतें.

ह्या तीनही गोष्टींमध्यें प्रत्येक कारागिराचें कौशल्य वाढतें, ही गोष्ट अत्यंत स्पष्ट, व सर्वमान्य आहे. कोणती गोष्ट करण्याचें कौशल्य येतें, म्हणजे ती गोष्ट चांगली सफाईदार करतां येते; ती केवळ ती गोष्ट अनेकवार केल्यानें येती असें नाहीं; तर ती येणें हें मुख्यत्वेंकरून मनुष्याच्या बुद्धीवर आहे. एकादा मनुष्य वर्षोंवर्षे किंत्ते वळवीत असतो, व खडे गिरवीत असतो, पण त्यास चांगलें अक्षर काढतां येत नसतें, व एकाद्यास कांहीं महिन्यांतच चांगलें लिहितां येऊं लागतें; ह्यावरून सफाई येणें ती कारागिराची जशी बुद्धि असेल, व हस्तलाघव—म्हणजे इवातसा हात वाहाण्याचा गुण—जसा असेल त्या मानानें येती. एकच गोष्ट वारंवार करणें एतद्रूप जो अभ्यास, तेणेंकरून इतकें होतें, कीं ती गोष्ट सहज करतां येऊं लागते. वारंवार कृतीच्या योगानें अवयवांची व इंद्रियांची शक्ति वाढते. स्नायु विशेष बळकट होतात. शिरांस लवचिकपणा अधिक येतो. बुद्धि, कल्पना, स्मृति, इत्यादि मानसिक धर्मही अभ्यासानें विशेष कार्यक्षम होतात; व शीण व कंटाळा हींही लौकर येईनातशीं होतात. जी गोष्ट मनुष्यास सहज करतां येऊं लागली, ती त्यास चांगली करतां येऊं लागण्याचा विशेष संभव होतो; व त्यास ती लौकर करतां येतेच. ह्याप्रमाणें पहिल्यानें उशीरानें होणारें काम अभ्यासानें सत्वर होऊं लागतें. तसेंच जें काम पहिल्यानें चांगलें, पण उशिरानें, होत असतें, तें पुढें चांगलें होऊन सत्वर होऊं लागतें. ह्या वर सांगितलेला नियम शरीरव्यापारांस जसा लागू आहे, तसा मानसिक व्यापारांसही लागू आहे. लाहान मूलदेखील अभ्यासाच्या योगानें—म्हणजे तोच तोच धंदा अनेकवार केल्यानें—एकावर एक पुष्कळ रकमा असल्या, तरी तें त्यांची बेरीज इतके लौकर करतें, कीं एखाद्यास असें वाटेल कीं ती बेरजेची संख्या त्यास, बेरीज न करतां, आपोआप समजली. एकादी नवी भाषा बोलणें, घडघड वांचणें इत्यादि गोष्टी प्रकृत नियमांतर्गतच होत. गाणें, नाचणें, वाद्यें वाजवणें, पहिलवानकीच्या नाना प्रकारच्या कसरती करणें, इत्यादि शारीर व्यापार किती सहज, व सत्वर, सफाईदार होतात, हें मनांत आणल्यास अभ्यासानें व्यापारांत किती सौकर्य, व किती शीघ्रत्व येतें, हें लक्ष्यांत सहज येतें. आदम

स्मिथ म्हणतो, कीं कांहीं कारखान्यांतील कारागीर लोक अभ्यासाच्या योगानें अशा त्वरेनें काहीं काम करतात, कीं ज्यांनीं त्यांस काम करतांना कधीं पाहिलें नाहीं, त्यांस मनुष्याच्या हातास इतकी त्वरा येईल असें मनांत सुद्धां आणतां येत नाहीं. ही गोष्ट शहरांत राहाणाऱ्यांस बहुतकरून माहीत असते, कीं वाणी, तेली वगैरे ह्यांस नेहमींच्या सवयीनें केवळ नदरेनें वजन समजतें; तसेंच गंधी मासा दोन मासे तेल किंवा दुसरा जिन्नस इतक्या बेतानें काढून आणतात, कीं तो जिन्नस ताजव्यांत घातला असतां तंतोतंत तितकाच भरतो; असें अभ्यासाचें फल आहे. हें कौशल्य जसजसा श्रमविभाग विशेष असतो, तसतसें थोड्या अभ्यासानें येतें. परंतु कारागिरास फार कामें करावीं लागल्यास प्रत्येक कामांत कौशल्य येण्यापुरता त्याचा अभ्यास त्याच्या हातून होत नसल्यामुळें, त्यास सर्व कामांत चांगलें कौशल्य कदापि यावयाचें नाहीं. कौशल्यानें श्रमाचें उत्पादकत्व वाढतें, व काम चांगलें होतें, एवढेंच नाहीं; तर तेणेंकरून वेळेचें रक्षणही होतें; व काम शिकतांना होणारा द्रव्याचा नाशही कमी होतो. मनुष्य कोणतेंही कारागिरीचें काम शिकूं लागला असतां त्याच्या हातून कांहीं वेळ द्रव्याचा व्यर्थ व्यय होतो, किंवा जिन्नस तयार झाला, तरी तो नासतो. मनुष्य खुर्च्या करावयास शिकूं लागला असतां कांही दिवस तो कांही लांकडें तासून नाशील, व वाईटसाईट खुर्च्या करील, तेव्हां पुढें त्यास चांगल्या खुर्च्या करतां येतील. आतां श्रमविभाग नसला, तर एकेका मनुष्यास अनेक कामें शिकावीं लागून तीं शिकतांना त्याच्या हातून जितका द्रव्याचा नाश होईल, त्या पेक्षां एकेक मनुष्य एकेकच काम शिकला असतां, द्रव्याचा एकंदर नाश कमी होईल. तसेंच एकेक मनुष्य अनेक कामांत तयार होण्यास जितका वेळ लागेल, त्यापेक्षां एकेक मनुष्य एकेक कामांत तयार होण्यास कमी वेळ लागेल.

श्रमविभागापासून उत्पन्न वाढण्यास दुसरें कारण कालरक्षण. एकाच मनुष्यास अनेक कामें करावयाचीं असलीं, म्हणजे तीं कामें निरनिराळ्या ठिकाणीं, व निरनिराळ्या हत्यारांनीं करावयाचीं असल्यास, एक काम सोडून दुसऱ्या कामास आरंभ करतांना मध्यें वेळ फुकट जातो, तो श्रमविभाग असला म्हणजे जात नाहीं. आतां दोन कामें जरी एकत्र करावयाचीं असलीं व एक काम सोडून दुसरें करावयास जरी लांब जावयाचें नसलें, तरी पहिलीं हत्यारें नीट ठेवण्यास व दुसरीं काढण्यास, कितीएक कामांत हत्यारें नाजूक असल्यामुळें, बराच वेळ लागतो. तसेंच मनुष्य एक काम सोडून दुसरें करूं लागतांना कांहीं गमतो; पण त्यास एकसारखें एकच काम करावयाचें असलें म्हणजे तो गमत नाहीं. पाहा, मनुष्यास एक काम संपवून दुसऱ्या कामास आरंभ करावयाचा झाला, म्हणजे तो मध्यें उगीच पाणीच पिईल, किंवा गुरगुडीच ओढील, किंवा घरीं काम करीत असला, तर क्षणभर मूलच घेईल, असें मध्यें गमणें होतें. तसेंच मनुष्य नवें काम करूं लागलें, म्हणजे आरंभीं कांही काल त्या कामांत त्याचें मन गढत नाहीं, ह्याकरतां त्या वेळांत त्याच्या हातून चांगलें काम होत नाहीं; त्या त्या वेळांत हत्यारांशीं वगैरे खेळण्यासारखें काम करीत असतो, परंतु तो असा वारंवार गमल्यानें, व चांगलें लक्ष्य लावल्यावांचून त्यानें काम केल्यानें, तसेंच काम करण्याची खोड त्यास अर्थांतच लागते, आणि तेणेंकरून त्या मनुष्याच्या हातून एकसारखा दृढ श्रम पुष्कळ वेळ होऊं सकत नाहीं.

मनुष्यास अनेक कामें करावयाचीं असलीं, म्हणजे तसें करण्यापासून जे दोष होतात, ते सांगितले. परंतु तसें करण्यांत कांहीं गुणही आहेत, ते गुण आतां सांगतों. –निरनिराळ्या कामांत निरनिराळ्या अवयवांचा, किंवा निरनिराळ्या स्नायूंचा, व निरनिराळ्या मानसिक वृत्तींचा व्यापार घडतो. जसें, भडभुंज्याचा दंग हालवणाऱ्या गड्यांच्या पायांचा मात्र व्यापार घडतो, हातांचा अगदीं घडत नाहीं. सुताराच्या कामांत हातांसच श्रम पडतो, पायांस अगदीं पडत नाहीं. तसें, हातांतल्या हातांतच, सामता ओढतांना ज्या शिरांस मेहनत पडते, त्या शिरांस हातोडा मारतांना पडत नाहीं. ह्याप्रमाणेंच मानसिक वृत्तींविषयींही आहे. गणिताचा ग्रंथ वाचतांना कंटाळा आला असतांही, मनुष्यास इतिहास किंवा

कविता वाचण्याचा कंटाळा येत नाहीं, —उलटी हुशारी येते. कां कीं, त्या दोन कृत्यांत मनाच्या भिन्नभिन्न वृत्तींस व्यापार घडतो. तर ह्या विचारावरून एक मनुष्यानें अनेक कामें करण्यांत असा गुण आहे, कीं नीट योजना केली असतां, त्यास पुष्कळ वेळ काम करतां येईल. तो जर एकच काम करतो आहे, तर अभ्यासानें तें काम करण्याची शक्ति वाढली, तरी कांहीं मर्यादेनें वाढेल. सर्वदां त्यास सारखें काम करतां येण्याजोगी कदापि वाढावयाची नाहीं. ह्यास्तव कांहीं वेळ काम झालें, म्हणजे त्यास विसावा घेण्याकरतां काम करणें बंद करावें लागेल. परंतु त्यास अनेक कामें करावयाचीं असलीं, व तीं कामें चांगलीं योजून घेतलीं असलीं, तर त्यास एका कामाचा कंटाळा आला असतां दुसरें काम करतां येईल. ही गोष्ट बहुधा सर्वांच्या अनुभवास आली असते, कीं निरनिराळीं कामें केलीं असतां, मनुष्याच्या हातून जितकी मेहनत होती, तितकी मेहनत तो एकच काम करीत असला तर त्याच्या हातून होत नाहीं. निरनिराळ्या कामांत निरनिराळ्या स्नायूंस, किंवा निरनिराळ्या मानसिक वृत्तींस, व्यापार घडतो; ह्यास्तव एके कामांत ज्या स्नायूंस किंवा ज्या मानसिक वृत्तींस श्रम घडला असतो, त्यांस दुसरें काम आरंभिलें म्हणजे, विसावा मिळतो, आणि दुसऱ्यांचा व्यापार चालू होतो. पण मनुष्य एकच व्यापार करीत असला, तर त्याच्या कांहीं स्नायूंचा, व मानसिक वृत्तींचा मात्र उपयोग घडेल, आणि बाकीच्यांचा कांहीं घडणार नाहीं. एकानें एकच काम करणें, व अनेक कामें करणें, ह्या उभय पक्षांस जी वर साधकें व बाधकें सांगितलीं तीं सर्व मनुष्यांस सारखीं लागू असत नाहींत; तीं लागू होणें मनुष्यांच्या भिन्न भिन्न प्रकृतींवर आहे. कित्येक लोक असे असतात, कीं त्यास अनेक कामें करण्यापेक्षां, एक काम पुष्कळ वेळ करणेंच बरें वाटतें. ते कामास लागले असतां, कामाचे आरंभीं जो कांहीं कंटाळा येतो, तो जाऊन त्या कामांत मन गढून जाण्यास त्यांस इतर लोकांपेक्षां अधिक वेळ लागतो, व पहिल्यानें आलेला कंटाळा जाऊन, एकदां त्यांची तार लागली, म्हणजे त्यांस तें काम सोडावेंसेंही वाटत नाहीं; तर ते न खेळतां अशी झटून मेहनत करतात, कीं एकादे वेळेस तेणेंकरून त्यांची प्रकृतिही बिघडते. परंतु दुसरे कांहीं लोकांची प्रकृति वर सांगितलेल्या लोकांच्या प्रकृतीशीं अगदीं विपरीत असते. ते काम करूं लागले म्हणजे त्याकडे त्यांचें मन लौकर लागतें; व त्यांस त्याचा कंटाळाही लौकरच येतो. ह्याप्रमाणें प्रकृतिभेदावरही गोष्ट आहे खरी, तथापि अभ्यासानें या मूलप्रकृतींत पुष्कळ भेद पडतो; व बालाभ्यासानें इतर संवई जशा लागतात, तशी गमल्यावांचून एक काम सोडून दुसरें काम करण्याची ही संवय लावून घेतल्यास लागेल; आणि ती एकदां लागली, म्हणजे प्रत्येक काम बदलतांवेळेस वेळ व्यर्थ जाणार नाहीं; व मांद्य येणार नाहीं; तर उलटें कारागीर प्रत्येक कामास मोठ्या हुशारीनें व मोठ्या आनंदानें आरंभ करील; परंतु तो जर आपल्या संवईपेक्षां अधिक वेळ एकच काम करूं लागला; तर त्यास तशा हुशारीनें व तशा आनंदानें तें काम कांहीं वेळावर प्रायः करवायाचें नाहीं.

श्रमविभागापासून होणारा तिसरा लाभ कांहीं अंशीं मात्र खरा आहे. मनुष्याचें लक्ष्य एकाद्या कामाकडे जसजसें अधिक लागेल, व त्या कामाविषयीं जसजसा तो अधिक विचार करील, तशीतशी तें काम थोड्या श्रमानें करण्याची विशेष कल्पना त्यास सुचेल; व ह्या मनुष्यास उपयुक्त कल्पना सुचण्याचा जसा संभव आहे, तसा, ज्याचें लक्ष्य अनेक कामांकडे असतें, त्याला सुचण्याचा संभव नाहीं, हें स्पष्टच आहे. परंतु कौशल्य येण्याप्रमाणें कल्पना काढण्याची ही गोष्ट ही मुख्यत्वेंकरून कारागिराच्या बुद्धीवर व कल्पकतेवर जितकी आहे, तितकी एकच काम करण्यावर नाहीं; व मनुष्य एका कामाकडेच सर्व लक्ष्य देऊन इतर कामांकडे अगदीं दुर्लक्ष्य करू लागला, तर त्याच्या हातून सुधारणुकेची कांहींएक कल्पना न निघतां तो जें काम करतो, तें सुद्धां व्हावें तसें न होण्याचा संभव विशेष आहे. आणखी एक गोष्ट अशी आहे, कीं यंत्रादिकांच्या कल्पना निघण्यास कारण कांहीं असो; कल्पना एकदां निघाल्यानंतर

पुढें जें श्रमाचें उत्पादकत्व वाढतें, त्यास कारण म्हटलें म्हणजे त्या कल्पनाच होत; श्रमविभाग नव्हे, कां कीं, यंत्राची योजना कामांत झाल्यावर श्रमविभाग नसला तरी श्रमाचें उत्पन्न वाढेलच.

सूक्ष्म श्रमविभागापासून होणारे तीन नफे आदम स्मिथ ह्यानें वर्णिलें त्यांपैकीं पहिला नफा सर्वांत मोठा होय. त्याच्या खालोखाल एक मोठा नफा श्रमविभाग सूक्ष्मपणें केला असतां होतो. त्याचा उल्लेख आदम स्मिथ ह्याच्या ग्रंथांत नाहीं. तर त्याचा उल्लेख प्रथमतः बाबेज नामक प्रसिद्ध ग्रंथकाराचे ग्रंथांत आढळतो; तो नफा हा, कीं श्रमविभागाच्या योगानें श्रम करणारे मजूर व कारागीर ह्यांची कारखान्यांत योजना प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें करतां येते, व तेणेंकरून एकंदर श्रमापासून जितकें व जसें उत्तम फल प्राप्त व्हावें, तितकें व तसें होतें. एकाच कामाचे निरनिराळ्या अनेक भागांस सारखें कौशल्य व सारखें शरीरसामर्थ्य हीं लागत नाहींत. कांहीं भाग अल्प सामर्थ्यानें किंवा अल्प कौशल्यानें होतात; व कांहीं भागांस विशेष सामर्थ्य किंवा विशेष कौशल्य हीं लागतात. ह्यास्तव ज्यांच्या ठायीं कौशल्य विशेष असतें, त्यांस अत्यंत कठीण भागच करावयास लावलें असतां; व ज्यांच्या ठायीं पुष्कळ शारीर सामर्थ्य असतें, त्यांस अत्यंत मेहनतीचें काम करावयास योजलें असतां; व तसलीं कामें ज्यांपासून चांगलीं व्हावयाचीं नाहींत, अंशास साधारण कौशल्यानें व शरीरसामर्थ्यानें होणारीं कामेंच दिलीं असतां, एकंदर काम अधिक व विशेष चांगलें होईल. कामाचे प्रत्येक भागास जितकें कौशल्य व जितकें सामर्थ्य हीं आवश्यक आहेत, तितक्यांचीच त्या भागांकडे योजना व्हावी, व विशेष कौशल्याची व विशेष सामर्थ्याची योजना होऊन तीं वांयां जाऊं नयेत; अशी व्यवस्था कारखान्यांत असली म्हणजे कारखाना उत्तम प्रकारें चालला असें म्हणावें. आंगरखा करण्याचें काम उदाहरणार्थ घेतलें असतां त्या कामांत आंगरखा बरोबर बेतून तो कापणें, त्याचीं छाती व कुंद शिवणें, हीं कामें फार कठीण आहेत; परंतु बाह्या शिवणें, कळ्या वगैरे जोडणें, झोळाचीं शेवटें तुरपणें, हे भाग तितके कठीण नाहींत. आतां दाहा आंगरखे शिवावयाचे असतां दाहा शिंप्यांस एकेक आंगरखा दिला तर दाहाही चांगले शिंपी बोलावले तरच आंगरखे चांगले तयार होतील. पण चांगला शिंपी म्हटला म्हणजे त्याला साधारण शिंप्यापेक्षां निदान दुप्पट रोज पडतो. ह्याकरतां दाहा आंगरख्यांची शिलाई, एकेकाची साहा साहा आणे धरल्यास, साठ आणे झाली. पण त्याच कामाचे भाग करून चांगल्या शिंप्यांनीं आंगरखे बेतून कापण्याचें वगैरे फार कसबाचें काम मात्र करावें; आणि सोपें काम राहिलें, तें तीन तीन आणे रोजाच्या साधारण शिंप्यांनीं करावें, असें केल्यास थोड्या खर्चांत आंगरखे तयार होतील—म्हणजे चांगल्या शिंप्यांचा वेळ साधारण काम करण्यांत जाणार नाहीं. टांचण्या करण्याच्या कारखान्यांत निरनिराळ्या भागांस इतकें निराळें कौशल्य लागतें, कीं कांहीं मजुरांचा रोज केवळ तीन साडेतीन आणे असतो, आणि अत्यंत कठीण भाग करणारांचा रोज केवळ तीन रुपयांपर्यंत असतो. आतां त्या कारखान्यांत श्रमविभाग जर नसता, तर तीन तीन रुपये रोजाचे सर्व मनुष्य ठेवावे लागून त्या मनुष्यांच्या हातून दिवसांत कांहीं वेळपर्यंत तीन साडेतीन आणे रोजाचें, व पुष्कळ वेळपर्यंत तीन रुपयांच्यापेक्षां कमी दराचें, काम करून घेणें प्राप्त पडतें. श्रमविभाग नसल्यानें काम कमी होईल, तिकडे लक्ष्य न देतां; व दाहा कारागीर, श्रमविभाग असतां जितक्या वेळांत पांच शेर टांचण्या तयार करतात, तितक्या वेळांत एकेका कारागिरास अर्ध अर्ध शेर टांचण्या करतां येतील, असें कल्पिलें असतां; हीं हल्लीं (श्रमविभाग असतां) टांचण्या ज्या भावानें विकतात, त्यापेक्षां पावणेचारपट अधिक दरानें त्या, श्रमविभाग नसल्यास, विकूं लागतील; असा बाबेजसाहवानें आपल्या ग्रंथांत हिशोब केला आहे. तसेंच, तो आणखीं असें लिहितो, कीं सुया करण्याचे कारखान्यांत तर चार चार आण्यांपासून दाहा दाहा रुपयांपर्यंत निरनिराळ्या मजुरांचा रोज असतो; ह्याकरतां श्रमविभाग बंद झाला तर सुया तर टांचण्यापेक्षां फारच माहाग होतील.

श्रमकर्त्यांच्या कौशल्यापासून जितका उपयोग होण्याची योग्यता आहे, तितका उपयोग जसा श्रमविभाग असतां करून घेतां येतो; तसेंच, हत्यारांपासून जितका उपयोग होण्याचा संभव आहे, तितका उपयोगही त्याच्याच योगानें करून घेतां येतो. अमेरिका देशांत रे नामें एक मोठा अर्थशास्त्रवेत्ता होता, तो आपल्या ग्रंथांत असें लिहितो, कीं श्रमविभाग नसता, तर प्रत्येक मनुष्यास अनेक कामास उपयोगीं पडणारीं अशीं अनेक प्रकारचीं हत्यारें आपणापाशीं बाळगावीं लागतीं. परंतु दररोज त्या मनुष्यास हत्यारांपैकीं एक चतुर्थांशाचा मात्र कदाचित् उपयोग पडून बाकी तीन चतुर्थांश हत्यारें रिकामीं व अनुपयुक्त राहतीं. परंतु श्रमविभागाच्या योगानें प्रत्येक मनुष्य एकेकच काम करूं लागल्यामुळें त्यास अनेक कामांचीं हत्यारें बाळगावीं लागत नाहींत; व तेणेंकरून देशांतल्या एकंदर कामास हत्यारें फार कमी लागतात; व जीं आवश्यक लागतात, त्यांचा सर्वकाल उपयोग होतो. ह्यास्तव ह्या श्रमविभागरूप व्यवस्थेनें देशाचें हित होतें, व त्याच्या पोटांत त्यांतील प्रत्येक राहाणाऱ्याचेंही हित होतें. तें असें कीं देशांत एकंदर हत्यारें कमी पुरल्यामुळें अधिक हत्यारांत जें पूर्वी भांडवल जात असतें, तें जात नाहीं; व विद्यमान हत्यारांत जें भांडवल जातें, तें, त्या हत्यारांचा भराभर उपयोग झाल्यामुळें, जल्द मालकापाशीं येतें. तेणेंकरून त्यांस तीं पहिल्यापेक्षां चांगलीं करावयास सांपडतात, आणि असें झालें असतां देशाचें उत्पन्न वाढतें.

श्रमविभाग अधिक किंवा उणा असणें हें खपावर आहे. ज्या मालाचा खप फार, तो माल उत्पन्न करण्याच्या कामांत श्रमविभाग अधिक होतो, व ज्या मालाचा खप कमी, त्याच्या कारखान्यांत कमी होतो. टांचण्या करण्याच्या कारखान्यांत कामाचे दाहा विभाग करून एकेक कारागिराकडे एकेकच भाग करण्याचे ठेवले असतां, नित्य ४८००० टांचण्या होतात, म्हणून वर सांगितलें. परंतु दररोज ४८००० टांचण्याचा लोकांत खप असल्यास मात्र श्रमविभागाची इतकी वृद्धि करतां येईल. पण लोकांत दररोज २४००० चाच जर खप आहे, तर तितक्याच दररोज होतील, व इतकाच श्रमविभाग करण्यांत फायदा आहे, अधिक करून फायदा नाहीं. खप वाढणें श्रमाचें उत्पादकत्व वाढण्यास कारण होण्याचा एक प्रकार मागें सांगितला; व त्याखेरीज त्यास कारणत्व येण्याचा हा दुसरा प्रकार होय. खपाच्या वृद्धीचा प्रतिबंध करणारीं कारणें बहुत आहेत.—देशांत लोकसंख्या फार थोडी असणें, किंवा लोक बरेच पुष्कळ असले, तरी ते एकमेकांपासून फुटून फुटून फारच दूर राहल्यामुळें त्या एकमेकांत चांगलें सोईचें दळणवळण नसणें, किंवा ते लोक दरिद्री असणें, म्हणजे त्यांचा एकंदर उत्पादक श्रम फार कमी असल्यानें त्यांस कोणताही जिन्नस घेण्याचें सामर्थ्य नसणें, अशीं अनेक कारणें असतात. ह्या देशांत कोणत्याही जिन्नसाचा खप वाढण्यास दुसरें व तिसरें हीं प्रतिबंधकें आहेत. ज्या देशांत प्रथमतः वसाहत होती, तेथें बहुतकरून पाहिलें प्रतिबंधक असतें. लोकांत आळस फार असला, किंवा कलाकौशल्य नसलें, किंवा त्यांच्यामध्यें श्रमसंयोग चांगला नसला, म्हणजे ह्या दोषांच्या योगानें त्यांस एकादा जिन्नस पुष्कळ विकत घेण्याचें सामर्थ्य नसतें; व तेणेंकरून तो जिन्नस उत्पन्न करणाऱ्यांमध्यें श्रमसंयोग वाढण्यास प्रतिबंध होतो. ह्यावरून असें दिसतें, कीं एक जिन्नस उत्पन्न करणाऱ्यांत श्रमसंयोग होणें हें दुसऱ्या जिनसाच्या उत्पन्न करणाऱ्यांत श्रमसंयोग होण्यास कारण होय. प्राचीन काळीं ज्या समयीं लोकांत विद्यादिकांची प्रसृति फार कमी होती; तेव्हां कोणत्या विशेष स्थलीं कोणत्याही पदार्थाचा खप अर्थातच फार थोडा असे; ह्यास्तव जे लोक समुद्रकिनाऱ्यास, किंवा नौकागमन-योग्य नद्यांच्या काठीं, किंवा सपाट व पिकाऊ देशांत, राहात होते; त्यांमध्यें मात्र श्रमास उत्पादकत्व चांगलें असें. कां कीं, त्या लोकांस जलमार्गानें, किंवा खुष्कीनें, इतर अनेक देशांशीं व्यापार करावयास सांपडल्यामुळें, त्यांच्या जिनसांचा पुष्कळ खप होई. अर्वाचीन काळीं उपयुक्त ज्ञानाच्या वृद्धीनें जगांतली संपत्ति वाढत आहे; व बहुतेक सर्वांस सर्वत्र व्यापार करण्याची मोकळीक

झाली आहे. तसेंच नौकानयनकलेची वृद्धि झाल्यानें, व सडका, कालवे, लोखंडी रस्ते, हे उत्तरोत्तर वाढत चालल्यानें, जळमार्गानें व खुषकीनें दळणवळण वाढत चाललें आहे; तेणेंकरून विशेषतः प्रत्येक देशांतल्या लोकांस जे जे जिन्नस उत्पन्न करण्याची विशेष सोय आहे, त्या त्या जिनसांचा खप वाढल्यानें त्यांस श्रमविभाग विशेष वाढवण्याची सोय झाली आहे; आणि तेणेंकरून त्याच्या एकंदर श्रमाचें उत्पादकत्व वाढलें आहे.

श्रमविभागाची वृद्धि होणें खपावर आहे; तसें, कित्येक स्थलीं तें उद्योगाच्या स्वभावावर आहे; म्हणजे कांहीं उद्योग असे आहेत, कीं त्यांत श्रमविभाग पुष्कळ वाढतो, व कांहीं असे आहेत, कीं त्यांत तो फारसा वाढवतांच येत नाहीं. टांचण्या वगैरे करण्याच्या कितीएक कारखान्यांत जितका सूक्ष्म श्रमविभाग करतां येतो, तितका शेतकीच्या कामांत कदापि यावयाचा नाहीं. एक मनुष्य नेहमीं आपला नांगरतोच आहे, व एक आपला नेहमीं पेरतोच आहे, व तिसरा एक नेहमीं कापणी करतो आहे, असें कदापि संभवायाचें नाहीं. हें होणें त्या उद्योगाच्या स्वभावासच विरुद्ध आहे. ह्यास्तव एक मनुष्य जर नुस्ती पेरणी करील, किंवा नुस्तें नांगरील, किंवा कापणी करील, तर एका वर्षांतून दाहा अकरा महिने त्यास रिकामें बसावें लागेल. एका मनुष्यानें जरी हीं सर्व कामें एकामागून एक केलीं, तरी त्याची सुद्धां वेळ रिकामी राहाते, शेतकीच्या कामांत श्रमसंयोग म्हटला म्हणजे, साक्षात् श्रमसंयोग मात्र संभवतो. शेतकीच्या कामांत उत्पन्न वाढण्याकरतां मोठी सुधारणा करावयाची आहे, —म्हणजे एकादी विहीर किंवा पाट बांधून आणावयाचा, किंवा मोठें शेत असल्यास त्यास पाणी द्यावयाचें आहे, तर अशा कृत्यांस पुष्कळ मनुष्यें एकदम एकत्र खपलीं पाहिजेत. परंतु देखरेख करणारे थोडे लोक खेरीजकरून बाकीचे सर्व बहुतकरून एकच काम करीत असतात. विहीर खणण्याचें काम हें दुसरें उदाहरण. ह्या कामांत फार श्रमसंयोग होऊं सकत नाहीं. त्या कामांत म्हटलें, म्हणजे बहुतकरून पुष्कळ लोक खणीत असतात. खणण्याखेरीज दुसरीं कामें आहेत; परंतु फार थोडी आहेत. असल्या कामांत जाती थोड्या ह्यास्तव तेथें फारसा श्रमविभाग करतां येत नाहीं.

## भाग नववा.

# जिन्नस उत्पन्न करण्याचे लहान कारखाने व मोठे कारखाने ह्यांविषयीं.

मागल्या भागांत, श्रमसंयोगापासून नफा होतो असें सिद्ध करून दाखवलें, त्यावरून असें अनुमान स्पष्ट होतें, कीं पुष्कळ स्थळीं जिन्नस उत्पन्न करण्याचा कारखाना मोठा असल्यानें उत्पन्न अधिक होतें. ज्या ज्या स्थलीं साक्षात् श्रमसंयोगरूपानें बहुत श्रमकर्त्यांनीं परस्परांच्या अनुरोधानें काम केलें असतां त्यांचा श्रम अत्यंत उत्पादक होतो, त्या त्या स्थलीं त्या पुष्कळ लोकांचा समावेश होण्याजोगा कारखाना मोठा असला पाहिजे; व त्यांच्या उपजीवनास पुरेसें मोठें भांडवल असलें पाहिजे. आणि ज्या स्थलीं सूक्ष्म विभाग होण्याजोगें काम आहे, व खप मोठा असल्यानें तसें करण्यांत फायदाही आहे, त्या स्थलीं तर पुष्कळ लोक ठेवण्याजोगा कारखाना, व त्यांस मजुरी द्यावयास मोठें भांडवल, हीं असणें फारच आवश्यक आहेत. जसजसा कारखाना मोठा असतो, तसतसा श्रमविभाग सूक्ष्म सूक्ष्म करतां येतो. इंग्लंडादि मोठमोठ्या व्यापारी देशांत मोठमोठे कारखानें असण्याचें कारण हेंच आहे, कीं त्या देशांत भांडवल पुष्कळ आहे. कामाचा जितका विभाग व्हावयाचा तितका झाला, पुढें विशेष विभाग होत नाहीं, असें जरी झालें असलें, तरी व्यर्थ व्ययाचा प्रतिबंध होण्याकरतां कांहीं स्थळीं कारखाना वाढवतात; म्हणजे त्या वाढवण्याचा उद्देश इतकाच असतो, कीं त्या कारखान्यांत जितकीं मनुष्यें ठेवावीं लागतात, त्या सर्व मनुष्यांचा सर्व वेळ कामास लागून त्यांस रिकामपणा सांपडत नाहीं.

आतां, ह्याचें उदाहरण असें पाहा, कीं मुंबईंत कापूस गिरण्यांत घालून, तो त्या यंत्रानें दाबून त्याचे घट्ट गढे बांधतात. तेथें त्या कारखान्यांत पुष्कळ मजूर ठेवावे लागतात. आतां ते सर्व मजूर वेळच्या वेळेस येतात, त्यांस मोजून आंत सोडण्यास एक मनुष्य ठेवावा लागतो. आतां शंभर मजूर आंत घ्यावयाचे असोत, किंवा हजार घ्यावयाचे असोत, ते मोजून त्यांची हजिरी घेण्यास एक मनुष्य पाहिजे; तर ह्या स्थळीं गिरण्या सर्वकाळ चालतील, अशा रीतीनें पुष्कळ लोक ठेवून त्यांस पाळीपाळीनें कामास लावलें असतां, यंत्र सर्वकाळ चालेल; व त्यांस आंत घेणाऱ्या मनुष्याचा सर्व काळ कामास लागेल. तसेंच यंत्रें बिघडलीं असतां तीं तत्काल नीट केलीं म्हणजे खोळंबा होत नाहीं, व तीं थोडीं बिघडल्याबरोबर तीं नीट केल्यास थोड्या खर्चात तीं नीट होऊन अधिक टिकतात; ह्याकरतां यंत्रें नीट करणाराच एक कारखान्यांत चाकरीस ठेवला असतां, तो सर्व काम चांगलें खोळंबा न होतां करील. परंतु त्या कारागिरास सर्व काळ काम असण्यास मोठा कारखाना असला पाहिजे. कारखाना मोठा असल्यापासून हा दुसरा फायदा.

कामांत जो भाग केवळ शारीर श्रमानें होतो, म्हणजे वरच्या गिरणीच्याच उदाहरणार्थ यंत्र फिरवण्याचें काम मानवी श्रमानें होतें, अशा भागाकडे जनावरांची योजना केली असतां, किंवा वाफेच्या यंत्राची योजना केली केली असतां, नफा विशेष आहे. परंतु तसें करण्यास कारखाना व भांडवल हीं वाढविलीं पाहिजेत; व उत्पन्न होणाऱ्या मालाचा खप पुष्कळ व्हावयाजोगा पाहिजे; कां कीं कारखाना लहान असल्यामुळें यंत्र जर सर्व काळ चालू नसेल, तर त्या यंत्रापासून नफा न होतां कदाचित् तोटा होईल.

तसेंच, कारखाना वाढला, म्हणजे त्यांत कारकून ठेवावे लागतात. त्यांचें काम हें असतें, कीं त्यांनीं मजुरांस मजुरी द्यावी; व त्यांची हजीरी घ्यावी; तसेंच कारखान्याकरतां द्रव्यें, हत्यारें वगैरे सामान विकत घ्यावें; किंवा हें सामान पुरवण्याच्या कामावर जे जागोजागीं गुमास्ते असतील, किंवा तयार झालेला माल विकण्याकरितां जे निरनिराळ्या ठिकाणीं लोक असतील, त्यांशीं पत्रव्यवहार राखावा व त्यांचे हिशेब बरोबर राखावे; तसेंच ज्या ज्या इतर उदम्यांचीं खातीं असतील, त्यांचे त्यांचे हिशेब बरोबर राखावे, अशीं कामें असतात. आतां कारकुनास ५०० मनुष्यांस पगार देण्यापेक्षां हजार मनुष्यांस पगार देण्यास फारशी अधिक मेहनत पडत नाही; तसेंच, दाहा खात्यांचा हिशेब ठेवण्यापेक्षां पंचवीस खात्यांचा हिशेब ठेवण्यास विशेष श्रम पडत नाहीं. कारखाना दुप्पट मोठा केल्यास, कारकून, शिपाई, ह्यांची संख्या कदाचित वाढवावी लागते, परंतु दुप्पट कदापि करावी लागत नाहीं. ह्यावरून जसजसा कारखाना मोठा होतो, तसतसा, त्याच्या महत्त्वाच्या मानानें त्यास कमी कमी खर्च पुरूं लागतो.

साधारण नियम असा आहे, कीं ज्या मानानें कारखाना वाढवावा, त्या मानानें त्याचा खर्च कदापि वाढत नाहीं, तर उलटा कमी कमी होऊन जिनसाची किम्मत कमी कमी होते, – म्हणजे कारखाना जसजसा मोठा करावा, तसेंतसें श्रमाचें एकंदर उत्पादकत्व अधिक अधिक वाढतें. ह्यास उदाहरण, – छापण्याच्या कामांत ग्रंथाच्या किंवा वर्तमानपत्राच्या जशा जशा प्रती ज्यास्ती काढाव्या, तसतशी प्रत्येक प्रतीची किम्मत कमी होते. आता मोठा कारखाना असल्यानें नफा होतो, हें विशेष स्पष्टपणे मनांत बिंबवून देण्यास दुसरे उदाहरण पोष्टाचें. हल्लीं सरकारानें बहुतेक सर्व हिंदुस्तानांत पत्रें व बंग्या जाण्याकरतां पोष्टाचा मोठा एक कारखाना स्थापला आहे. तो नसून अथवा असून परस्परांची स्पर्धा करणारे सावकारी पांच सहा कारखाने असते, तर पाहा, एकंदर खर्च किती अधिक लागता! चांगल्या रीतीनें, व बेताच्या बेतानें पत्रें व बंग्या पोंहचवावयाचीं म्हटलीं, म्हणजे प्रत्येक सावकारी कारखानेवाल्यास सर्व मुख्य मुख्य जागीं पोस्ट ऑफिसें व कारकून, व पत्रें पोंहचविणारे शिपायी, ठेवावे लागते; व पत्रें इकडून तिकडे नेण्याकरतां व आणण्याकरतां घोडे, गाड्या, व गडी, ठेवावे लागते; व इतके सर्व कारखाने पांचपट साहापट वाढून काम आतांच्या इतकेंच चांगलें होतें, ह्या पेक्षां चांगलें न होतें. व प्रत्येक सावकारास आतांच्यापेक्षां काम थोडें, व खर्च आतांच्यापेक्षां, कामाच्या मानानें, फार, असें होऊन पत्रें पाठवण्यास लोकांस खर्च अधिक पडता. तो सर्व खर्च देशांत एक मोठा कारखाना केल्यानें वांचतो आहे. पुस्तकगृहही ह्याच जातींतलें उदाहरण होय. हजार मनुष्यांनीं एकेक वेळ पंचवीस पंचवीस रुपये व दर महिन्याचा एक रुपया देऊन, एक पुस्तकगृह स्थापून, त्यांत त्या पंचवीस हजारांचीं पुस्तकें ठेविलीं, व दरमाहां कांहीं वर्तमानपत्रें घेऊन त्या पुस्तकगृहांत ठेवलीं, तर प्रत्येकास एकवेळ पंचवीस रुपये व दरमाहां एक रुपया खर्चून पंचवीस हजारांच्या पुस्तकांचा व वर्तमानपत्रांचा उपभोग घडतो. पण हें फल कारखाना मोठा करण्याचें होय.

कारखाना मोठा असल्यानें अनेक प्रकारें फायदा होतो, म्हणून सांगितलें; तो फायदा, कारखाना लहान असतां यजमानास स्वतः विशेष देखरेख करतां येते, व लाहान साहान नफानुकसानीकडे त्याचें लक्ष्य पुरतें, परंतु तसें मोठ्या कारखान्यांत करतां न आल्यामुळें जो तोटा होतो, त्यापेक्षां अधिक होतो, किंवा कमी होतो, ह्याचा निश्चय होण्यास एक निर्बाध प्रमाण म्हटलें म्हणजे बरकत. एक माल उत्पन्न करण्याचा लाहान कारखाना आहे, व एक मोठा कारखाना आहे, व ल्हानमोठेपणाचा एवढा एक भेद सोडून बाकीच्या सर्व सोयी दोहोंस सारख्या आहेत, असें असतां एक कारखानेवाला दुसऱ्यापेक्षां सर्वदा माल स्वस्त विकतो, आणि तेणेंकरून पाहिल्यास मात्र बरकत येती, आणि दुसरा कारखाना बुडतो; तर ज्या प्रकारचा कारखाना चालतो, तो प्रकार विशेष फायद्याचा आहे, असें निर्विवादपणें सिद्ध होतें. एका कारखानेवाल्यास दुसऱ्या कारखानेवाल्यापेक्षां सर्व काल जिन्नस स्वस्त विकण्याचें सामर्थ्य येतें,

तें पहिल्याच्या कारखान्यांतला श्रम व भांडवल हीं दुसऱ्याच्या कारखान्यांतला श्रम व भांडवल यांपेक्षां विशेष उत्पादक असल्यामुळेंच येतें; व हें सामर्थ्य मोठे कारखानेवाल्यास श्रमविभाग विशेष करावयास सांपडल्यानें, किंवा कारागिरांच्या व मजुरांच्या कौशल्याची किंवा श्रमाची यथायोग्य योजना करतां आल्यानें, आलें असलें तर असें सिद्ध होतें; कीं तो थोड्या श्रमानें अधिक उत्पन्न करतो असें नाहीं, तर पहिल्या इतक्याच श्रमानें विशेष उत्पन्न करतो,—म्हणजे श्रमाच्या मानानें केवळ त्याचें उत्पन्न वाढतें असें नाहीं, तर तितकाच श्रम करणाऱ्या दुसऱ्याच्यापेक्षां त्याचें एकंदर उत्पन्न ज्यास्त होतें. आतां, एकाद्या जिन्नसाचा कारखाना वाढला, आणि त्याचा खप तर आहे तसाच आहे, वाढला नाहीं; तर लहान कारखाने मोडून त्यांतले मजूर रिकामे होतील; पण मजुरांच्या मानानें त्या कारखान्यांतलें भांडवलही रिकामें होईल; आणि त्या मजुरांची व भांडवलाची योजना दुसरा एकदा जिन्नस उत्पन्न करण्याकडे होऊन देशाचें एकंदर उत्पन्न वाढेल.

सर्व काल श्रमविभाग विशेष व्हावा, व काटकसर अधिक व्हावी म्हणूनच कारखाना वाढवितात असें नाहीं; तर कधीं कधीं बहुत मोलाच्या यंत्रांच्या योगानें जिन्नस उत्पन्न करावयाची रीत चालू केल्यामुळेंही कारखाने वाढतात. बहुत मोलाचीं यंत्रें चालू करणें म्हणजे मोठें भांडवल पाहिजे, व ही गोष्ट त्या यंत्रापासून जितकें उत्पन्न होण्याजोगें असतें, तितकें उत्पन्न करण्याचा उद्देश असल्यास, व त्या सर्व उत्पन्नाचा खप होण्याचा संभव असल्यास मात्र, भांडवलवाले करतात. ह्यास्तव यंत्राची योजना कारखान्यांत केली, म्हणजे तो मोठा करावा लागतोच. आतां ह्या स्थळींही मोठे कारखानेवाल्यास पदार्थ सर्व काल पहिल्यापेक्षां स्वस्त विकतां येईल. परंतु त्या गोष्टीवरून मागील उदाहरणांतल्याप्रमाणें एकंदर उत्पन्न वाढलेंच असें सिद्ध होत नाहीं. जिन्नस अक्षय स्वस्ता होणें हें, जिनसाच्या उत्पन्नाच्या वास्तविक वृद्धीवर नाहीं; तर तें उत्पन्न व त्याचा खर्च ह्यांच्यामधील प्रमाणाच्या वृद्धीवर आहे. ती प्रमाणाची वृद्धि एकंदर उत्पन्न कमी होऊन सुद्धां होतें, हें साहाव्या भागांत सिद्ध करून दाखवलेंच आहे. ज्यावर मजुरांचें पोषण होत असे, व ते मजूर ज्याचा व्यय करून पुनः पुनः जें उत्पन्न करीत असत, अशा विनाशी भांडवलाचें अविनाशी यंत्ररूप भांडवल झालें, म्हणजे त्या अविनाशी भांडवलास कार्यक्षम राखण्यास खर्च थोडा लागतो; ह्यास्तव एकंदर उत्पन्न पाहिल्यापेक्षां थोडें असलें तरी तें थोडें उत्पन्न त्या खर्चास व बाकीचें विनाशी एकंदर भांडवल पहिल्याइतकें राखण्यास पुरून कदाचित् उरतें; ह्याकरतां यंत्रें चालू केल्यानें कारखान्यांतलें उत्पन्न कमी झालें तरी कारखानेवाला ज्या उद्देशानें यंत्रें चालू करतो, तो उद्देश (विशेष नफा मिळविणें) सिद्ध होऊन, आणखी त्यास जिन्नस पहिल्यापेक्षां कमी भावानेंही विकतां येतो. आतां, हें खरें आहे, कीं एकादा विशेष जिन्नस पहिल्यापेक्षां स्वस्त झाल्यानें त्या एका जिनसाचा खप कमी न होतां उलटा कदाचित वाढेल. कारण, एकंदर उत्पन्न कमी झाल्यापासून मजुरांची प्राप्ति कमी झाली, व मजूर बहुतेक शिल्पोत्पन्न पदार्थांचीं मुख्य गिऱ्हाइकें असत नाहींत, म्हणून त्यांची प्राप्ति कमी झाल्यानें त्या विशेष मालाचा खप कमी व्हावयाचा नाहीं; पण तो स्वस्त झाल्यामुळें अधिक होईल. परंतु ह्या एका विशेष जिनसाचें उत्पन्न जें वाढेल, तें, ज्या उदिमांतलें विनाशी भांडवल कमी झालें आहे, त्यांत दुसऱ्या उदिमांतल्या भांडवलांतून भर पडून मात्र वाढतें; तें वाढण्यास दुसरी रीत नाहीं; आणि ह्याप्रमाणें त्या एका उदिमांतल्या विनाशी भांडवलांत पडलेली खांच भरली, तरी ज्या दुसऱ्या उदिमांतलें भांडवल किंवा त्याचा अंश इकडे येऊन ती भरली, म्हणून त्या उदिमांतले विनाशी भांडवल कमी झालें, आणि तेणेंकरून इकडे उत्पन्न वाढलें, तरी तिकडलें उत्पन्न कमी झालें; व इकडल्या मजुरांचा रोजगार कमी नाहीं झाला, तरी तिकडल्या मजुरांचा कमी झाला. आतां, हे मजूर बहुतकरून रिकामे बसत नाहींत. ते त्याच धंद्यांत असतात; परंतु पहिल्यापेक्षां आतां भांडवल थोडें; व मजूर तितकेच, असें झाल्यानें मजुरांमध्यें परस्परांत चढाओढ लागून मजुरीचा दर कमी होऊन कांहींकांचा जो सर्वथैव तोटा व्हावयाचा,

तो अंशतः थोडथोडा तोटा सर्वांचा होतो. एतावता एकत्रट मजुरांच्या वर्गांचा तोटा झालाच. आतां ह्या स्थळीं मजुरीचा दर उतरण्यापूर्वीं मजुरांची अवस्था, जर मजुरीचा दर कमी झाला तरी त्यांच्याकडून पहिल्यासारखाच उत्पादक श्रम होण्यासारखी असली, तर देशांतलें एकंदर उत्पन्न कमी व्हावयाचें नाहीं. इतकेंच होईल, कीं मजुरी कमी होऊन, त्यांस पूर्वी जो एकंदर संपत्तीचा अंश मिळत होता, त्यापेक्षां कांहीं काळ त्यांस कमी अंश मिळेल; हा त्यांचा तोटा होईल. हा मजुरांचा तोटा, किंवा ज्या पक्षीं मजूर अगदीं बेरोजगारी होतात, आणि ते भीक मागणें वगैरे उपायांनीं दुसऱ्यांच्या संपत्तीच्या अंशांवर उपजीवन करतात, त्या पक्षीं एकंदर उत्पन्नांत पडलेली कमताई, हीं साधारण उपायांनीं देशांतला संग्रह वाढून विनाशी भांडवल व मजुरांची एकंदर संख्या, ह्यांच्यामधलें प्रमाण पहिल्याप्रमाणें होतें, तेव्हां नाहींतशीं होतात. हें सर्व उपपादन आम्हीं मागें साहाव्या भागांत एकवार केलेंच आहे, असें असतां एथें पुनः त्याचा अनुवाद करण्याचा हेतु इतकाच, कीं उत्पन्न करण्याच्या एकाद्या रीतीचें अवलंबन केल्यानें उदम्यांस एकादा विशेष जिन्नस विशेष स्वस्त विकतां येऊं लागला असतां, त्या रीतीनें एकंदर उत्पन्न पहिल्यापेक्षां वाढतेंच असा नियम नाहीं; ही गोष्ट वाचणाऱ्यांच्या मनांत विशेष बिंबावी. आतां, जेथें पदार्थ स्वस्त होतो, तेथें बहुतकरून एकंदर उत्पन्नही वाढतें; परंतु एक गोष्ट झाली असतां दुसरी झालीच पाहिजे असा नियम नाहीं. आतां असा नियम नसतां ह्या गोष्टींचें लोकांत प्रायः सर्वत्र सामानाधिकरण्य कां असतें, ह्याचें मागें बरेंच विवरण केलें आहे, व विशेष विवरण पुढील एकाद्या भागांत प्रसंग आला असतां होईल.

कारखाना मोठा असल्यानें इतर श्रम जसा विशेष उत्पादक होतो, तसा भांडवलवाल्याचा श्रम, म्हणजे देखरेखीचा श्रम, हा ही विशेष उत्पादक होतो. ल्हान ल्हान शंभर भांडवलवाले थोडथोडें भांडवल घेऊन उदीम करीत असल्यास, त्या प्रत्येकास आपलें सर्व लक्ष्य उदिमाकडे द्यावें लागतें; किंवा निदान इतकें तरी लक्ष्य द्यावें लागतें, कीं त्याच्या हातून दुसरा मोठा धंदा होत नाहीं. परंतु त्या सर्वांच्या भांडवलाइतके भांडवलाचा एकच मोठा कारखाना एकाचा असल्यास, तो एकटा दाहा बारा कारकून हाताखालीं घेऊन त्यांच्या मदतीनें यथास्थित काम चालवितो, आणि तें काम करून त्यास दुसरीं कामें करण्यास फावतें, हा एक नफा आहे. आतां हें खरें आहे, कीं ल्हान भांडवलवाले बहुतकरून साधारण देखरेख करून कारखान्यांतलें कांहीं विशेष कामही करतात. ल्हान शेतकरी स्वतः नांगर धरतो; ल्हान वाणी दुकानांत बसतो; आणि ते जीं दुसरीं कामें करतात; तीं मोठे भांडवलवाले करीत नाहींत. परंतु अशीं कामें त्यांस करतां आलीं, तरी त्यांच्या श्रमाची व्हावी तशी यथायोग्य योजना होत नाहीं. भांडवलवाल्याच्या आंगीं देखरेख करून दुसऱ्यास अमुक अमुक प्रकारें कामें करावीं, असें सांगण्याजोगी हुशारी व ज्ञान वगैरे जे गुण असतात, ते त्यानें साधारण मजुराचें काम केल्यास व्यर्थ जातात, व त्याच्या आंगीं ते गुण नसल्यास, त्याच्या हातून देखरेख, किंवा लोकांस काम करूं सांगण्याचें काम हीं बराबर होत नाहींत. एतावता दोन्ही पक्षीं यथायोग्य योजना होत नाहींच. ह्याप्रमाणें लाहान लाहान पुष्कळ कारखाने असल्यास त्या सर्वांस मिळून जितका देखरेखीचा श्रम लागतो, त्यापेक्षां फार थोड्या श्रमाने त्या सर्वांच्या भांडवलाइतक्या भांडवलाचा मोठा कारखाना चांगला चालतो. असा लाहान भांडवलवाल्यांस अधिक श्रम पडतो; किंवा त्यांच्या श्रमानें उत्पन्न कमी होतें खरें; परंतु ह्या तोट्याचा चांगला वजपा निघावयाजोगी एक गोष्ट त्यांस अनुकूल असती. ती ही, कीं आपण आपले धनी आहों, दुसऱ्या कोणाची आपणांवर सत्ता नाहीं, असें वाटून त्यांस समाधान असतें, आणि त्यांस स्वातंत्र्याची गोडी असून जर त्या स्वातंत्र्याची योग्यता त्यांस समजत आहे, तर ते तें स्वातंत्र्य प्राप्त होण्यास कांहीं किंमत पडत असली, तरी ती देऊन तें घेण्याला तयार असतात. ती किंमत हीच, कीं मोठाले कारखानेवाल्यांशीं त्यांची स्पर्धा लागल्यास, ते आपला जिन्नस कमी

भावानें विकून थोडासा तोटा सोसतात, परंतु बहुत वेळ त्यांच्यानें तो तोटा सोसून निभावणी होत नाहीं. ह्याप्रमाणें कांहीं वेळ कष्टानें उपजीवन करून शेवटीं ते स्वतंत्रपणें धंदा करावयाचें सोडून मोठे मांडवलवाल्यांचे चाकरीस राहातात, किंवा भिकेस लागून नाहींतसे होतात. ह्याच प्रमाणें ह्या देशांतले साळी वगैरे ह्यांची अवस्था होत चालली आहे.

मोठे कारखाने होण्यास मोठें मांडवल पाहिजे; परंतु मोठें मांडवल ज्यांपाशीं आहे, असे लोक पुष्कळ असत नाहींत; व कांहीं व्यापारांस इतकें मोठें मांडवल लागतें कीं तितकें मांडवल बहुतकरून कोणापाशीं असतच नाहीं. ह्या प्रतिबंधाच्या निवारणाजोगी युक्ति सुधारल्या इंग्लंडादि देशांत निघाली आहे, व ज्या युक्तीच्या योगानें त्या देशांतल्या लोकांनीं स्वदेशांत व परदेशांत मोठमोठे कारखाने चालू केले आहेत व कांहीं कारखाने हल्लीं विद्यमान आहेत, ते ती युक्ति नसती, तर कधींही झाले नसते. ती युक्ति ही, कीं अनेक लोकांनीं थोडें थोडें मांडवल देऊन एक मोठें मांडवल करून त्यावर कंपनीच्या, म्हणजे मंडळीच्या नांवानें व्यापार किंवा उदीम करावयाचा. ह्या अशा प्रकारच्या मंडळीस संस्कृत भाषेंत, मनूच्या वगैरे कायद्यांत, संभूय समुत्थान असें नांव दिलें आहे. त्या मंडळीच्या व्यापारापासून मोठमोठे पुष्कळ नफे आहेत. त्यांपैकीं कांहींचें येथें निरूपण करतों.—

प्रथमतः, अशीं पुष्कळ कामें आहेत, कीं तीं सिद्ध होण्यास इतकें मोठें मांडवल लागतें, कीं तितकें मांडवल अत्यंत श्रीमान् पुरुषापाशींही नसतें; व तितका पैसा दाहा पांच सावकारांनीं घरगुती रीतीनें पाती केली, तरीही होत नाहीं; तर तसलीं कामें करण्याकरतां किती एक सावकार एकत्र जमून सरकार-महशूर अशी मंडळी करतात; व त्या मंडळीस तीं कामें करण्याच्या सनदा सरकारांतून मिळतात. मग ते कांहीं विवक्षित रकमेचा एकेक भाग ठरवतात. ते भाग, ज्यांस इंग्रजींत "शेर", म्हणतात, ते ज्यांस पाहिजेत, त्यांनीं तितका पैसा देऊन विकत घ्यावे; व त्या पैशाबद्दल त्यांस कंपनी (मंडळी) रोख्यासारखे कागद देते; ते रोखे विकत घेणाऱ्यांस पाहिजेत त्या वेळेस त्यांनीं विकावे, असें असतें. असो. आतां असल्या मंडळ्यांवाचून न होण्याजोगीं कामें म्हटलीं, म्हणजे सडका, लोखंडी रस्ते, वगैरे होत. मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत आगीच्या गाड्या जाण्याकरतां लोखंडी रस्ता बांधणें, हें काम होण्याजोगें मांडवल, एक मनुष्य कितीही श्रीमंत असला, तरी त्यापाशीं सामान्यतः असत नाहीं. लोखंडी रस्ता एक मैल म्हणजे अर्धा कोस बांधण्यास इंग्लंडांत पांच लाख रुपये लागतात; व ह्या देशांत श्रम वगैरे स्वस्त आहे, तरी लाख दोन लाखांखालीं पुरणार नाहींत. तेव्हां ह्या मानानें शें दोनशें कोस असा रस्ता बांधणें, एक दोन मनुष्यांची तर कथाच नको, परंतु शें दोनशें मनुष्यास सुद्धां होणें अशक्य. असलीं कामें वर सांगितलेल्या मंडळ्यांच्या मात्र हातून होतात, किंवा तीं सरकारच्या हातून होण्यासारखीं असतात. व ज्या देशांत अनेक प्रतिबंधांमुळें अशा मंडळ्या होण्याची चाल नाहीं, त्या देशांत (ह्यास उदाहरण, एशिया खंडांतले बहुतेक सर्व देश होत) ज्या कामास पराकाष्ठेचें मोठें मांडवल लागतें, अशीं, मोठाल्या इमारती, रस्ते, तळीं, कालवे, वगैरे कामें करण्यास सरकारच योग्य, असें लोकांस वाटतें; व आजपर्यंत अशीं कामें झालीं आहेत, तीं राजांनीं, किंवा बादशहांनींच केलीं आहेत. सरकारास हीं कामें करतां येण्याचीं कारणें अशीं आहेत, कीं सरकारास अमलाचे जोरानें, जितका पाहिजे, तितका पैसा (तो देशांत असला मात्र पाहिजे,) उत्पन्न करतां येतो, व त्यास असे मोठमोठाले कारखाने करण्याची संवय असते; व कोणीं कारागिरांनीं, किंवा त्यांवरच्या देखरेख करणाऱ्यांनीं कृत्रिम वगैरे केल्यास त्यांस शासन करण्याचें त्याला सामर्थ्य असतें; इत्यादिक अनेक कारणें आहेत. परंतु वर सांगितलेल्या मंडळ्यांच्या हातून जर कामें होण्याजोगीं आहेत, तर सरकारचे हातीं तीं कामें देऊं नयेत. कारण, जरी सरकार चाकरांच्या द्वारानें लोकांच्याच पासून पैसा घेऊन हीं कामें करतें, तरी तो पैसा लोकांनीं आपआपणांत जमा करून आपल्या मुख्त्यारींत कामें केलीं असतां तीं चांगलीं व लौकर होतात.

असें करण्यांत पहिला लाभ हा आहे, कीं पातीवाल्यांस, मंडळीनें वाईट काम केलें असतां जसें पुसतां येईल, तसें सरकारास कदापि पुसतां येणार नाहीं. दुसरें कारण असें आहे, कीं कंपनी आपल्या चाकरांवर जशी देखरेख ठेवील, तशी सरकारच्या हातून, त्याच्या मनांत ती ठेवण्याची असली, तरी ठेवली जाणार नाहीं; इत्यादि अनेक कारणें आहेत.

दुसरें; कांहीं कामें अशीं आहेत, कीं एकेका सावकारास करतांच येत नाहींत, असें नाहीं; तीं त्यांस करतां येतात खरीं, परंतु जशीं व्हावीं तशीं त्यांच्या हातून होत नाहींत. इंग्लंड व हिंदुस्तान ह्यांच्यामध्यें आगबोटीची डांक आहे, ही डांक एका मंडळीची आहे; व अशा डांकेच्या पुष्कळ मंडळ्या आहेत. ह्या उदाहरणांचा विचार करा. आतां कोठून कोठें ही गलबतें पाठविण्याचें ज्यांस सामर्थ्य आहे, असे विलायतेस पुष्कळ लोक आहेत, व ते जेथून पाहिजेत तेथून, जेथें पाहिजेत तेथें पत्रें व उतारू नेतील; व गलबतें दूर पाठवण्याचा प्रघात संभूय समुत्थानरूप मंडळ्यांची वार्ताही जेव्हां नव्हती, तेव्हां-पासून चालत आला आहे; परंतु देशांत प्रजा, संपत्ति, कला, कौशल्य, व उदीम, हीं वाढल्यामुळें व इतर अनेक देशांशीं व्यापारादिद्वारा बहुत संबंध वाढल्यानें, इंग्लंडच्या लोकांस कधीं कधीं पत्रें, माल, व लोक, हिंदुस्थानास वगैरे पाठवण्याची सोय होती, ती पुरेनाशी झाली. त्यांस बेताच्या बेतानें व लौकर जाणाऱ्या येणाऱ्या व जितकीं पाहिजेत, तितकीं मनुष्यें, व माल नेणाऱ्या डांका लागूं लागल्या; व त्यांचा उपयोग करून घेण्याचें सामर्थ्यही त्यांस आलें. आतां, हे स्पष्ट आहे, कीं ह्याप्रमाणें डांका ठेवण्यास मोठ्या व पुष्कळ किंमतीच्या आगबोटी पुष्कळ पाहिजेत,—व त्यांवर मोठाल्या पगाराचे, हुशार नाकवे व खलाशी पुष्कळ पाहिजेत; आणि एवढ्या कारखान्यास जेवढें भांडवल लागतें, तेवढें एकापाशीं कधींही असत नाहीं, म्हणून तो व्यापार करण्यास मंडळी लागते. व मंडळी जमवून व्यापार करण्याची युक्ति नसती, तर हें अशा प्रकारचें काम कदापि झालें नसतें. कांहीं कामें अशीं आहेत, कीं तीं थोड्या भांडवलानें होण्याजोगीं असतात, तथापि तीं करणाऱ्यांच्या हातीं लोकांस आपला पैसा ठेवावयाचा असतो, ह्याकरतां त्यांच्यापासून हवा तेव्हां आपला तो पैसा परत घेतां येईल, अशी लोकांस खात्री येण्याकरतां, बहुत लोकांनीं वर्गणीनें आपसाआपसांत पुष्कळ पैसा जमवून तो तारणाप्रमाणें प्रसिद्धपणें कारखान्यांत ठेवावा लागतो. ह्या जातीचीं कामें म्हटलीं म्हणजे पेढ्या व नानाप्रकारचे विमे घेणारीं दुकानें हीं होत. पुष्कळ लोकांपाशीं पैसा थोडाबहुत शिलक असतो, तो थोडा असल्यामुळें, किंवा मालकास व्यापार करण्यास वेळ, किंवा माहिती, किंवा इच्छा, नसल्यामुळें त्या पैशापासून त्या मालकास उपयोग कांहीं काळ घडत नसतो; परंतु तोच सर्व पैका एकत्र झाल्यास व व्यापार करण्याची माहिती, इच्छा, व तो करण्यास वेळ ज्यांस आहे, त्यांच्या हातीं तो पैका गेल्यास, त्यापासून त्यांस मोठा उपयोग घडेल, व मालकासही त्यांतील अंश मिळेल; तर तें तसें व्हावें; तो रिकामा पडणारा पैसा उपयोगास लावावा, इत्यादि अनेक प्रयोजनांच्या उद्देशानें पेढ्यांची स्थापना झाली आहे. तसेंच सावकार गलबतांत हजारों रुपयांचा माल भरून एका देशांतून दुसऱ्या देशांत जातात. त्यांत कोणाचीं कधीं गलबतें बुडतात. तसेंच मोठाल्या शहरांत लोकांच्या लाखों रुपयांच्या मोठमोठाल्या इमारती व कारखाने असतात. त्यांतून कधीं कधीं आग लागून कांहीं जळतात. आतां हे दैविक अनर्थ कोणावर कोसळतील, ह्याचा नियम नसतो. ज्यावर ते कोसळतात, त्यांचा सफाई नाश होऊन ते धुळीस मिळतात. तर असें न व्हावें, म्हणून इंग्लंडादि सुधारलेल्या देशांत एक युक्ति योजली आहे. ती अशी, कीं विम्याच्या मंडळ्या असतात. त्या मंडळ्या त्यांनी कांहीं गणिताच्या आधारावर दर ठरवलेले असतात, त्या दरांप्रमाणें पैसा देऊन गलबताचा किंवा घराचा वगैरे विमा त्यांस द्यावा; मग गलबत बुडाल्यास, किंवा घर जळाल्यास ते ठरवलेला पैसा देतात. गलबत वगैरेचा नाश न झाल्यास मालकानें दिलेला पैसा विमा घेणाऱ्या मंडळीस मिळतो; व असा थोडा थोडा पैसा त्यास मिळाल्यानें त्यांस एकादे वेळेस अनर्थ घडल्यास, नष्ट झालेला माल (गलबतें वगैरे)

भरून देतां येतो. असो. तर असल्या मंडळ्यांपाशीं लोकांस आपला पैसा ठेवावयाचा असतो. ह्यास्तव त्या लोकांस विश्वास यावयाकरतां, ह्या मंडळ्यांस आपल्या दुकानांत प्रसिद्धपणें पुष्कळ पैसा ठेवावा लागतो. ह्या मंडळ्या जीं कामें करतात, तीं कामेंच म्हटलीं, तर त्यांस दुकानात ठेवतात इतक्या पैक्याची गरज नसते.

एकेका मनुष्यानें काम केलें असतां होत नाहींत व बहुतांनीं एकत्र मिळून काम केलें असतां होतात, असे जे लाभ आहेत, त्यांपैकीं कांहींकांचें एवढा वेळ वर्णन केलें. परंतु बहुतांनीं एकत्र मिळून काम केलें असतां, नाहींत, व ज्याचें काम त्यानेंच केलें असतां आहेत, असें कांहीं गुण आहेत; असेंही, विचार केला असतां, दृष्टीस पडतें. तर आतां त्या गुणांचें निरूपण संक्षेपेंकरून करतों. त्या गुणांपैकीं प्रधान गुण हा, कीं ज्याचा तोच काम करणारा असला, म्हणजे त्यास हातचें काम सिद्धीस नेण्याची काळजी विशेष असती, तशी काळजी होणारा लाभ किंवा तोटा पुष्कळांचा असतो त्यास असत नाहीं. वर्गणीनें भांडवल जमा करून कारखाना घालणाऱ्या मंडळीचें काम वहिवाटणारे बहुतकरून दरमाहा देऊन चाकरीस ठेवलेले लोक असतात; तेव्हां त्यांस साक्षात् मालकासारखी काळजी कशी असेल? आतां त्या वहिवाटदारांवर देखरेख करण्याकरतां वर्गणीदारांपैकीं कितीएक वर्गणीदारांची कमिटी असते; व त्या कमिटीदारांस ते वहिवाटदार कामावर ठेवण्याचा; किंवा त्यांस कामावरून दूर करण्याचा अधिकार असतो; तथापि त्यांसुद्धां त्या प्रत्येकाची जेवढी पाती असते, तिच्या मानानेंच सगळा कारखाना चांगल्या रीतीनें चालण्याची काळजी असते. आतां प्रत्येकाचा अंश म्हटला म्हणजे तो सगळ्या भांडवलाचा फार लहान भाग असतो; व तो त्या कमिटीदारांच्या संपत्तीचाही लहानच भाग असतो. ह्याखेरीज त्यांस आपलीं दुसरीं ह्या कामासारखींच किंवा कदाचित् ह्यापेक्षां विशेष काळजीचीं कामें असतात. ह्यास्तव त्यांचें सर्व अंतःकरण व लक्ष्य ह्याच कामाकडे लागूं शकत नाहीं. तेव्हां ह्या कामाकडे आपला सर्व वेळ व पूर्ण चित्त लावणारे म्हटले, म्हणजे ते चालविण्याकरतां मुद्दाम ठेवलेले चाकर लोक मात्र होत. परंतु कामांत ज्यांचें स्वतःचें हित किंवा अहित असतें, त्यांच्या काम करण्यांत व पैसा देऊन ठेवलेल्यांच्या काम करण्यांत किती तफावत असते; व जेथें पैसा देऊन काम करण्यास चाकर ठेवावेच लागतात, तेथें त्यांवर स्वतः मालकाचा डोळा कसा असावा लागतो, हें जगाच्या आजपर्यंतच्या अनुभवावरून सर्वांस समजतच आहे.

कोणताही कारखाना चांगला चालून त्यांत बरकत येण्यास दोन गोष्टी आवश्यक आहेत; त्या गोष्टी अगदीं परस्पर भिन्न आहेत. त्या ह्या, कीं एक विश्वासुकपणा, व दुसरी कळकळ. एकाद्या कारखान्यांत दरमाहा देऊन काम करण्याकरतां ठेवलेल्या लोकांच्या ठायीं पहिला गुण (विश्वासुकपणा) प्राप्त करून घेणें कठीण आहे; तथापि तो संपादतां येतो. त्या चाकरांकडून जें काम करून घ्यावयाचें असतें, त्या विषयीं स्पष्ट नियम करतां यावयाजोगे असले, म्हणजे त्या नियमांप्रमाणें वागण्याचा त्यांपासून करार करून घेतला असतां, त्यांस ते नियम मोडवत नाहींत. कां कीं, तसें करण्यास त्यांचें मन त्यांस निषेधीत असतें; व ते तिकडे प्रामाणिक व पापभीरु नसले, तरी चाकरी जाण्याच्या किंवा दंडाच्या धाकानें तरी त्यांस संकेतप्रमाणें वागावें लागतें. परंतु मोठे कारखाने उत्तम प्रकारें चालावयास अशा शेंकडों गोष्टी लागत असतात, कीं त्याविषयीं स्पष्ट नियम करतां येत नाहींत; म्हणून त्यांविषयींचा ठराव पूर्वी होऊं शकत नाहीं; आणि ह्यास्तव त्याची जबाबदारी चाकरांवर स्पष्टपणें ठेवतां न येऊन त्या न केल्याच्या दोषास्तव त्यांस शिक्षा करतां येत नाहीं. ह्यास उदाहरण, काम मुख्यत्वेंकरून वहिवाटणाऱ्यांत मुख्य व आवश्यक गुण हा लागतो, कीं त्याचें अंतःकरण सर्व काल कारखान्याच्या कामांत मग्न असावें. त्यानें सदा सर्वकाल कारखान्यांत अधिक नफा होण्याविषयीं किंवा विद्यमान खर्च कमी होण्याविषयीं ऊहापोह करीत असावें. परंतु रोजमुरा घेऊन चाकराच्या नात्यानें दुसऱ्याचें काम वहिवाटणाऱ्याच्या

ठायीं कामाविषयीं अशी कळकळ असणें फारच विरळा. जगांत आजपर्यंत ज्या वर सांगितलेल्या प्रकारच्या गोष्टी घडल्या आहेत त्या सर्वांच्या परिणामावरून पाहातां, साधारण असा सिद्धांत होतो, कीं आपल्या हिताच्याप्रमाणें परहिताविषयीं कळकळ असण्याचा गुण मनुष्यस्वभावांत नाहीं. आतां ह्या नियमास कांहीं अपवाद होऊन गेले आहेत, व पुढेंही होतील, तथापि तो सामान्यरूपानें खरा आहे, असें मानलें पाहिजे. ह्यास उदाहरण, राजे व राज्याधिकारी प्रधान वगैरे ह्यांचें घ्या. ह्या पुरुषांचें काम प्रजेचें हित करावयाचें, व तिचें पालन करावयाचें, हें होय. आतां तो अधिकार त्यांस ईश्वराच्याच इच्छेनें आला, असें कोणी म्हणतात. कोणी कोणी तो प्रजेच्या इच्छेनें प्राप्त झाला असें म्हणतात. एतावता वर सांगितलेलीं कामें करणें हा त्यांचा धर्म होय, असें सर्व लोक मान्य करतात; व त्यांचें जें काम आहे, तें सर्व कामांत विशेष उत्साह व आवेश आणण्याजोगें आहे. तसेंच, त्यांनीं तें काम बरें किंवा वाईट केलें असतां, सर्व देशाचें हित किंवा अनहीत घडतें, त्यांचा जो वांटा ह्यांस प्राप्त होतो, तो म्हणजे क्षुल्लक असतो, असेंही प्रायः असत नाहीं. ह्याखेरीज त्यांनीं काम चांगलें, किंवा वाईट केल्यास त्यांची स्तुति, किंवा निंदा लोकांत होते, तीही फार मोठी असते. व तशी स्तुति किंवा निंदा दुसरें कोणास प्राप्त होत नाहीं. तथापि ह्या सर्व उत्तेजकांपेक्षां विचास श्रम देऊन विचार करण्याचा कंटाळा ज्यांचे ठायीं विशेष प्रबल नाहीं, असे राजे व प्रधान किती विरळा असतात बरें ! तसेंच प्रजेचें हित होण्याच्या तजविजी शोधून काढण्याविषयीं आपल्या अंतःकरणास श्रम देणारे, किंवा दुसऱ्यानें त्या तजविजी सुचविल्या असतां त्यांकडे लक्ष्य देणारे, त्यांत किती थोडे असतात बरें ! लक्षांत, एक किंवा दहा लक्षांत एक असेल, कीं कोण जाणे. आतां, जर लोक फारच गोंगाटा करूं लागले, व त्यांचें ऐकण्यापेक्षां न ऐकण्यांतच फार त्रास होऊं लागला, तर मग उपाय नाहीं; म्हणून ते कांहीं विचार करूं लागतात; आणि तो विचार तरी साधारण दोष टाळावयापुरता वरच्यावर करतात. आतां राजांचें वगैरे उदाहरण हें फारच मोठें, त्यापेक्षां लहान साधारण उदाहरणें पुष्कळ आहेत. मोठमोठे व्यापारी लोक आपल्या कारखान्यांत रोज किंवा दरमहा देऊन जे चाकर ठेवतात; त्यांविषयीं सर्वांस रोजच्या अनुभवावरून माहीत आहेच, कीं, ते मजूर लोक श्रम करण्यांत किती कुचरपणा करतात ते. तसेंच जेथें फार दिवस चाकरीस असल्यानें, किंवा एकमेक एकमेकांच्या उपयोगीं पडल्यानें, चाकरांची यजमानावर प्रीति जडते; व त्याचें हित तें आपलें हित असें चाकरांस वाटूं लागतें; तसलीं उदाहरणें सोडून एरवीं घरगुती कामाकरतां ठेवलेले चाकर यजमानांच्या हिताकडे किती दुर्लक्ष्य करतात, हें सर्वांस ठाऊकच आहे.

पुष्कळ भांडवल एकत्र जमवून जो व्यापार करतात, त्यांत आणखी दोष आहे, व जो दोष मोठमोठ्याल्या सर्व कारखान्यांत थोडाबहुत होतोच. तो दोष हा, कीं तसल्या व्यापारांत लहान नफा व लहान तोटा ह्यांकडे लक्ष्य असत नाहीं. मोठें भांडवल असतें, व मोठी देवघेव चालली असती, तेथें, व विशेषेंकरून जेथें वहिवाटदारांचा स्वतःचा तोटा नफा व्यापारांत नसतो, तेथें, लहान लहान रकमा तादृश जमाखर्चात नसतात, व त्या राखण्यास जो श्रम घडतो, व जें लक्ष्य द्यावें लागतें, त्यांच्या योग्यतेच्या त्या रकमा आहेतसें वहिवाटदारांस वाटत नाहीं. ह्यास उदाहरण हें, कीं कांहीं माल विकत घ्यावयाचा आहे, किंवा कांहीं मजूर ठेवावयाचे आहेत, किंवा बऱ्याचा वगैरे भाव ठरवावयाचा आहे, तर चार ठिकाणीं चौकशी वगैरे करण्याची त्यांस व्यर्थ जिकीर वाटते; व त्यांनीं त्या लहानसहान कसरींकडे लक्ष्य न दिल्यानें त्यांस सहज धीताल्पणाविषयीं, व हाताचे सढळपणाविषयीं लौकिक मिळतो. परंतु लहान नफा किंवा लहान खर्च हीं पुष्कळ वेळ झालेलीं एकत्र केलीं, म्हणजे त्यांचाच मोठा नफा किंवा मोठा तोटा होतो. मोठे भांडवलवाल्यास ह्या हिशेब चांगला समजत असतो, म्हणून तो कारखान्यांत अशी रीत घालून देत असतो, कीं हुशार देखरेख करणाऱ्यानें सर्व काल ती रीत यथास्थित चालवली, तर तिच्या योगानें मोठ्या कारखान्यांत होण्याजोगा व्यर्थ खर्च असतो, तो अगदीं बंद होतो. परंतु

मंडळीच्या व्यापारांत तसली रीत घालून दिली असली, तरी ती सर्वत्र एकसारखी सतत चालू ठेवण्याजोगें लक्ष्य दरमहा देऊन ठेवलेले लोक, किंवा कमेटीदार, कामाकडे देत नाहींत.

ह्या असल्या दोषांवरून आदम स्मिथ ह्यानें असा सिद्धांत करून टाकला होता, कीं पेढ्या, विम्याचीं दुकानें, वगैरे ज्या कामांत चांगले स्पष्ट नियम बांधतां येतात, व तेणेंकरून चाकरांची कुचराई वगैरे दोष फारसे होऊं सकत नाहींत, तसलीं कामें खेरीज करून बाकीचीं कामें, मंडळ्यांनीं चालवलीं असतां त्यांस कांहीं विशेष हक्क व आश्रय सरकारांतून प्राप्त झाले असल्यावांचून, त्या मंडळ्यांस कदापि बरकत यावयाची नाहीं. परंतु ही अतिशयोक्ति आहे. आदम स्मिथ ह्यानें ग्रंथ लिहिला, त्या वेळीं पेढ्यांचा वगैरे व्यापार खेरीज करून दुसरे व्यापार करणाऱ्या मंडळ्या विलायतेंत कमी होत्या; परंतु अलीकडे त्या देशांत तसल्या पुष्कळ मंडळ्या होत चालल्या आहेत; व त्या होण्याचें कारण असें आहे, कीं विलायतेंतील लोकांत अशा मंडळ्या केल्यापासून कोणते नफे होतात, हें पूर्णपणें कळूं लागून, एकत्र जमून व्यापार करण्याची रीत उत्तरोत्तर वाढत चालली आहे. ही गोष्ट लिहिण्याचें प्रयोजन इतकेंच, कीं ज्या गोष्टी आज होत नाहींत अशा वाढत असतात, त्याच गोष्टी, कांहीं काळानें लोकांस त्यांपासून होणारे लाभ समजूं लागले, व त्या लोकांत ज्ञान व प्रामाणिकपणा हीं अधिक झालीं, म्हणजे सुलभपणानें होऊं लागतात. ह्यास्तव एकादी गोष्ट दाहा पांच वेळ फसली, तरी, ती जर चांगली आहे, तर तीविषयीं पुढें प्रयत्न करणें सोडूं नये; तर तो तसाच चालवावा, म्हणजे परिणामीं तींत यश येतेंच येतें. असो. आदम स्मिथ ह्यानें मंडळी, भांडवल एकत्र जमवून, व्यापार करूं लागली असतां, त्या व्यापारांत जे दोष होतात, तिकडेच केवळ लक्ष्य दिलें, म्हणून त्यानें तसें अनुमान केलें; परंतु तसल्या व्यापारांत जसे कांहीं दोष आहेत, तसे कितीएक गुणही आहेत.

ह्या गुणांपैकीं मुख्य गुण हा आहे, कीं कामाची देखरेख करणें इत्यादि जीं अकलेचीं व धोरणांचीं कामें असतात, तीं बुद्धिमान्, चाणाक्ष, व कल्पनिक, अशा पुरुषांच्या हातीं येतात. जेथें मालकच हीं कामें करतो, तेथें त्याला पूर्ण स्वार्थबुद्धि असते, व पराकाष्ठेची काळजी असते, ह्यास्तव तो पराकाष्ठेची मेहनत करतो, खरी; परंतु त्याचे ठायीं जर उत्तम प्रकारची बुद्धि व योजनाशक्ति हीं नाहींत, तर त्याच्या मेहनतीपासून मोठेंसें फळ व्हावयाचें नाहीं. काम उत्तम प्रकारें चालण्यास जशी मेहनत आवश्यक आहे, तशी बुद्धि व कल्पना हीं आवश्यकच आहेत. पाहा, विद्यार्थी मोठा मेहनती आहे; परंतु त्यास बुद्धि जर कमी आहे, तर त्याच्या मेहनतीचें, व्हावें तसें, फळ होत नाहीं; इत्यादि उदाहरणें सर्वांच्या अनुभवांतलींच आहेत. असो. आतां, ज्या पक्षीं मालकच आपल्या कामांची मुख्य वहिवाट करीत असतात, त्या पक्षीं मनुष्यांत उत्तम बुद्धिमान व कल्पक असे थोडे, ह्यास्तव ती वहिवाट उत्तम प्रकारें होत नाहीं. परंतु मंडळ्यांचे कारखाने मोठे असतात; व भांडवलेंही मोठीं असतात, ह्यास्तव त्या स्थळीं एकंदर वहिवाट करणाऱ्यांचें काम, व त्यांच्या खालोखालचीं दुसरीं अकलेचीं व कलाकौशल्याचीं कामें, हीं करण्यास त्यांस चांगले बुद्धिमान् व कल्पक लोकांची योजना करावयास सांपडतें, व रोजमुरा देऊन ठेवलेल्या ह्या लोकांस तादृश कळकळ नसल्यामुळें जो कांहीं तोटा होतो, त्याचा वजपा, ठेवलेल्या लोकांनी बुद्धीच्या विशेष कल्पनेच्या योगानें आपापलीं कामें केल्यामुळें मालकाचा जो नफा होतो, त्यांत निघून जाऊन नफा तोट्यापेक्षां अधिकही होतो. त्यांची बुद्धि विशेष विशद असते. त्यांनीं थोडें लक्ष्य दिलें असतांही त्यांस नफा होण्याचीं साधकें बाधकें जीं दिसत असतात, तीं इतरांनीं आपलें सर्व अंतःकरण एकसारखें विचाराकडे लावलें, तरी त्यांच्या मनांतसुद्धां येत नाहींत. तसेंच बुद्धिमान् पुरुषांच्या ध्यानांत एखाद्या कार्याचें वास्तविक स्वरूप बहुतकरून येत असतें, व त्यांचें अनुमानही प्रायः खरें असतें, तेणेंकरून चुका होण्याचें त्यांस तादृश भय वाटत नाहीं. परंतु इतरांस त्याच चुकांचें भय वाटून एकादी नवी युक्ति वगैरे निघाली असतांही, ती आपल्या व्यापारांत चालू करण्यास त्यांचें धारिष्ट होत नाहीं.

ह्या स्थळीं आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे; ती ही, कीं मंडळ्यांच्या कारखान्यांत किंवा व्यापारांत मुख्य जबाबदारीच्या कामावर; व हाताखालच्या जागांवर जे मनुष्य नेमावयाचे ते नियमित रोजमुरा देऊनच नेमले पाहिजेत, अशी आवश्यकता नाहीं. कारखान्यांत विशेष बरकत येण्याविषयीं त्यांच्या मनांत काळजी उत्पन्न करण्याचा, व त्यांत चार पैसे अधिक नफा झाल्यास त्यांत आपलाही विशेष स्वार्थ आहे, असें त्यांच्या मनांत आणण्याच्या, रीती पुष्कळ आहेत. जेथें श्रम करणाऱ्याचेंच भांडवल असतें, तेथें तो केवळ स्वार्थाकरतांच श्रम करतो, व काम चांगलें होण्याविषयीं त्यांस पूर्ण कळकळ असते, हा एक अवधि; व जे मनुष्य रोज किंवा दरमाहा किंवा साल घेऊन केवळ दुसऱ्याचें काम करतात, व ज्यांस चांगलें काम होण्याविषयीं आपला रोजमुरा मिळवण्यापुरती मात्र काळजी असते, ते मनुष्य, हा दुसरा अवधि; ह्या दोन अवधींच्यामध्यें काम करण्याच्या रीति पुष्कळ आहेत, ज्यामध्यें काम चांगलें होण्यापासून श्रम करणाऱ्यांचा कोठें थोडा, कोठें त्यापेक्षां अधिक, कोठें त्याहीपेक्षां अधिक, असा निरनिराळ्या मानानें स्वार्थ असतो. ज्या कामांत कौशल्य नसतें, केवळ शारीर श्रम असतो, अशीं कामें उक्तीं दिलीं असतां, तीं कच्च्या कामापेक्षां चांगलीं होतात, हें बहुतेकांस माहीतच आहे. कारण उक्तें काम असलें म्हणजे, तें लौकर करण्यांत श्रमकर्त्यांचें हित असतें, व तें करतांना गमण्यांत त्यांचा तोटा असतो; ह्यास्तव तें करण्यांत त्यांस रोजदारापेक्षां चांगली विशेष काळजी असते; ह्याचकरतां चतुर पुरुषांस कांहीं काम करावयाचें असलें, व कामाचे गुण स्पष्टपणें समजावया-जोगे असले, तर तें काम ते उक्तें देतात, जसें अमुक प्रकारच्या कांहीं खुर्च्या हव्या आहेत, किंवा अमका माल अमुक ठिकाणाहून अमूक ठिकाणीं न्यावयाचा आहे, तर तीं कामें उक्तीं द्यावीं हें चांगलें. म्हणजे त्या कामाची देखरेख करण्याचा त्रासदायक श्रम असतो, तो वांचतो. परंतु ज्या कामाचा गुण स्पष्ट समजत नाहीं,—म्हणजे जसें, भिंत बांधावयाची आहे, तर मक्तेवाल्यानें ती चांगली बांधली आहे, किंवा तींत कच्च्या विटा वगैरे वाईट सामान मध्यें घातलें आहे, हें भिंत तयार झाल्यावर स्पष्ट समजत नाहीं, म्हणून असलीं कामें मात्र उक्तीं देतां येत नाहींत. असो. मंडळी एकत्र भांडवल जमवून जो कारखाना घालते, किंवा व्यापार करते, त्यांत मुख्य काम वहिवाटणारे किंवा इतर मोठमोठ्या कारखान्यांत वगैरे देखरेख करणारे ह्यांविषयीं इंग्लंडांत वगैरे पुष्कळ ठिकाणीं अशी चाल आहे, कीं त्यांचा स्वार्थ व भांडवलवाल्यांचा स्वार्थ, हे एक होऊन त्यांस आपलीं कामें उत्तम प्रकारें करण्याविषयीं आस्था विशेष यावी, म्हणून त्यांच्या ठरवलेल्या पगाराखेरीज त्यांस कारखान्यांतल्या एकंदर नफ्यांतून शेंकडा कांहीं एक दोन किंवा पांच असा कांहीं भाग द्यावयाचा ठरवतात. आतां, ह्याप्रमाणें केलें असतां, त्या चाकरांच्या ठायीं जी आस्था उत्पन्न होती, ती साक्षात् मालकाच्या आस्थेप्रमाणें उत्कट असणार नाहीं, हें खरें आहे; तथापि तितकी आस्था त्यांस जपून व जीव लावून काम करण्याविषयीं प्रवृत्त करण्यास बरेंच कारण होईल; व तितकी आस्था असून त्यांची बुद्धि, व कल्पनाशक्ति साधारण लोकांच्यापेक्षां विशेष असतात, ह्यामुळें ते जें काम करतात तें, इतर भांडवलवाले अत्यंत काळजीनें व झटून जें काम करतात, त्यापेक्षां चांगलें होतें.

ल्हान कारखाने व मोठे कारखाने ह्यांपैकीं एक अमुक उदिमांत विशेष चांगला कोणता, ह्याचा निर्णय करण्याचा उपाय आम्ही मागें सांगितला आहे, त्याचप्रमाणें प्रकृत स्थळींही अमुक विशेष व्यापार किंवा कारखाना मंडळीनें करण्यांत फार नफा, किंवा एका मनुष्यानें करण्यांत विशेष नफा, ह्याचाही निश्चय अप्रतिबंध स्पर्धेनें होतो. ती चालली असतां, जो प्रकार विशेष उत्पादक व विशेष काटकसरीचा असतो, त्यानें उत्पन्न केलेला पदार्थ दुसऱ्या प्रकारानें उत्पन्न केलेल्यापेक्षां स्वस्त विकतो; आणि तेणेंकरून पहिला चालतो, आणि दुसरा बुडतो.

माल उत्पन्न करण्याचे कारखाने मोठे होण्यास अनेक कारणें पाहिजेत. त्यांत मालाचा मोठा खप

हें एक मुख्य कारण होय. माल पुष्कळ करावयाचा असला, तर कारखाना मोठा करण्यांत विशेष नफा आहे. तसेंच, पुष्कळ मालाचा खप असल्यास, पुष्कळ माल करून उपयोगही आहे. तेव्हां मोठमोठे कारखाने होतात, ते ह्या गोष्टींतून एक तरी गोष्ट, किंवा दोन्ही, असल्यास होतात. त्या दोन गोष्टी ह्या कीं देशांत सधन प्रजा पुष्कळ असावी, किंवा परदेशांत ह्या देशच्या मालाचा खप पुष्कळ असावा. तसेंच, कारखाने उत्तरोत्तर मोठमोठाले होण्यास देशांत भांडवलही उत्तरोत्तर वाढत असलें पाहिजे. देशांत भांडवलाची वार्षिक वृद्धि मोठी असावी, म्हणजे नवें नवें भांडवल व्यापारांत घालण्यास लोकांनीं संधि पाहात असावें; व असें असलें म्हणजे नवा व्यापार वगैरे काम जसें जलद व सहज चालू होतें, तसें विद्यमान व्यापारांतून भांडवल काढून तें नव्या व्यापारांत घालावयाचें असलें, म्हणजे होत नाहीं. तसेंच, मोठमोठे भांडवलवाले देशांत असणें हेंही ह्या गोष्टीस मुख्य कारण आहे. आतां, लाहान लाहान भांडवलवाले पुष्कळ असून त्यांनीं थोडें थोडें द्रव्य देऊन एकंदर मोठें भांडवल केल्यास मोठे कारखाने होण्याचा संभव आहे, तथापि असें होण्यास साकी, उलाढाल करण्याचें धारिष्ट, हे गुण लोकांत फारच वाढले पाहिजेत. परंतु हे गुण लोकांत ज्ञानादिकांचा फारच प्रसार झाल्यावांचून, व त्यांस व्यापार करण्याची फार गोडी असल्यावांचून, वाढत नाहींत.

ज्या देशांत इतर देशांतल्यापेक्षां संपत्ति मोठी, जेथें साकी व धारिष्ट, ह्या गुणांचा प्रसार सर्वांतल्यापेक्षां विशेष, जेथें भांडवलाची वार्षिक वृद्धि सर्वांतल्यापेक्षां अधिक, व जेथें मोठमोठें ज्यांचें भांडवल असे सावकार सर्वांतल्यापेक्षां पुष्कळ, अशा देशांत एकाच्या मागून दुसऱ्यांत अशा पुष्कळ उद्मांत व व्यापारांत लहान लहान कारखाने मोडून मोठमोठे कारखाने होत चालले आहेत; व ह्या जातीचे फेरफार जेथें मनस्वी घडत आहेत, असा जो इंग्लंड देश, तेथें कळेनें उत्पन्न होणारे जे जिन्नस ते उत्पन्न करण्याच्या कामांतच उत्तरोत्तर मोठमोठे कारखाने होत चालले आहेत असें नाहीं; तर, जेथें गिऱ्हाइकें पुष्कळ असल्यामुळें उदीम मोठा असतो, तेथेंही मोठालीं दुकानें व वखारी होत चालल्या आहेत; व ह्या मोठाल्या दुकानदारांस वगैरे लहान दुकानदारांपेक्षां नियमानें जिन्नस विशेष स्वस्त विकतां येतो. असें करण्याचें सामर्थ्य त्यांस येण्याचीं दोन कारणें आहेत. पहिलें हें कीं त्यांस श्रमविभाग विशेष सूक्ष्म करतां येऊन, जेथें जितक्या अकलेचा, व जितक्या कौशल्याचा मनुष्य पाहिजे, तेथें तसला मनुष्य ठेवतां येतो. व दुसरें कारण असें आहे, कीं त्यांस एकदम खरेदी वगैरे करतां येती. विक्री ज्या मानानें करावयाची असते, त्या मानानें ती करण्याचा श्रम वाढत नाहीं; व त्यामानानें वेळही अधिक खर्चत नाहीं, व कांहीं तीं अधिक झालीं, तरी लहान लहान अनेक खरेद्या वगैरे करावयास एकंदर जितकीं तीं (वेळ व श्रम) लागतात त्यां सर्वांपेक्षां फारच थोडीं लागतात. श्रमाची विशेष उत्पादकता, व तन्मूलक एकंदर संपत्तीची वृद्धि, ह्यांच्याच केवळ अनुरोधानें पाहातां वर सांगितलेला फेरफार सर्वथा चांगला आहे. जरी कांहीं उदाहरणांत ह्या फेरफारापासून कांहीं दोष होतात, तरी ते दोष लोकांच्या परस्पर संबंधांत मुख्यत्वेंकरून उत्पन्न होतात, व ते संपत्तीच्या उत्पत्तीस तादृश बाधक होत नाहींत. त्या दोषांच्या स्वरूपाचें सूचन मागेंच कांहींसें केलें आहे. ते दोष असे, कीं मोठाले कारखाने झाले म्हणजे त्यांहींकरून लहान लहान कारखानेवाल्यांचा तोटा होऊन त्यांस दुसऱ्यांच्या ताबेदारींत वागावें लागतें; व कांहीं स्थळीं त्यांचा अगदीं नाश होतो. पण ह्या फेरफारापासून कोणतेही दोष असले, तरी ते तो फेरफार होतांना प्रथमतः मात्र होतात. परंतु एकदां कारखाने मोठे झाल्यानंतर ते विशेष वाढण्यास ते दोष लागू होत नाहींत; तर ते वाढण्यापासून केवळ कल्याणच होतें. ह्यास उदाहरण,—समजा, कीं एकाद्या शहरांत छापखान्याची युक्ति प्रथमतः चालू झाली. आतां ती युक्ति चालू होऊन पुष्कळ ग्रंथ वगैरे होण्याचे कारखाने प्रवृत्तींत आल्यानें, पहिल्या लेखकाचा रोजगार बुडेल; परंतु ते कारखाने एकदां चालू झाल्यानंतर ते जर विशेष वाढले, तर त्या वाढण्यापासून लोकांचें बरेंच हित

होईल. कारण, जर लहान लहान दोन चार कारखाने असतील, तर त्या दोहोंचोहोंच्या एकंदर खर्चांपेक्षां एकच मोठा कारखाना होऊन त्यांतच त्या दोहोंचोहोंचें काम होईल, तर त्यास एकंदर खर्च कमी लागून त्यांत तयार झालेला माल (ग्रंथ वगैरे) लोकांस स्वस्ता मिळेल. कदाचित् माल स्वस्ता झाला नाही, तरी एकंदर कामास पहिल्यापेक्षां कमी खर्च लागेल. अतएव कमी भांडवल लागल्यानें कारखानेवाल्यास तरी नफा अधिक मिळेल; व राहिलेल्या भांडवलावर दुसरा उद्योग होईल. आतां असला एक कारखाना दोहोंचोहोंच्या ठिकाणी झाल्यास स्पर्धा मोडून माल महाग होईल, ह्याकरतां दोनचार कारखाने असावें हें चांगलें, अशी कोणी शंका करील; परंतु ती शंका भ्रांतिमूलक आहे. कारण जेथें व्यापारांत भांडवल्वाले थोडे असतात, तेथें ते आपापसांत कट करून पदार्थांची किंमत उतरूं देत नाहींत. नवाच मनुष्य व्यापारांत शिरला असतां, त्यांस बुडविण्याकरितां कदाचित कांहीं वेळ मात्र ते पदार्थांचा भाव चढाओढीनें उतरतात; परंतु त्या नव्याचा पाय ठरला, व तो आपणाच्यानें जात नाहीं, असें स्पष्ट दिसूं लागलें, म्हणजे आपणांत विचार करून त्यास आपल्या कटांत घेऊन, पुनः पदार्थ पहिल्या भावानें विकू लागतात, आणि ह्या कारणास्तव नवा व्यापारी झाल्यानें पदार्थांचा भाव उतरून लोकांचा नफा होत नाहीं, तर तो नवा व्यापारी विद्यमान गिऱ्हाइकांला एक अधिक वांटणीदार मात्र होतो; व नफ्याचा पूर्वींचा दर तसाच राहून प्रत्येकास एकंदर नफा कमी होतो; म्हणजे व्यापाऱ्यांचा तोटा होतो, पण गिऱ्हाइकांचा नफा होत नाहीं. तसेंच एका ठिकाणापासून दुसरे ठिकाणापर्यंत लोखंडी रस्ता एक असतां दुसरा बांधणें हें केवळ देशांतलें भांडवल खराब करणें आहे, कां कीं, एकाचे दोन रस्ते झाले तरी दोहोंनींही एकापेक्षां फारसें काम अधिक होत नाहीं, व भांडवल मात्र मनस्वी खराब होतें. ह्यास्तव सरकारानें असले रस्ते किंवा पूल वगैरे कामें उगीच अधिक बांधण्यास सावकारांस परवानगी देऊं नये, व ह्या असल्या कारखान्यांवर कांहीं अंशीं सरकारची मालकी असावी.

कारखाने लहान असल्यास विशेष हितावह, किंवा मोठे असल्यास विशेष हितावह, ह्या गोष्टीचा विचार शेतकीच्या कामांत करूं लागलें असतां, शिल्पाच्या जिनसाच्या उत्पत्तीविषयीं त्याच गोष्टीच्या विचारांतल्या साधकबाधकांपेक्षां कांहीं अंशीं निराळीं अशीं साधकबाधकें येतात; व ह्या विषयांत लोकांच्या परस्पर संबंधांच्या विचाराचा अनुषंग आहे, व संपत्तीची वांटणी करण्याच्या नियमांचाही संबंध आहे; परंतु त्या संबंधानें ह्या विषयाचें विवेचन पुढें होईल. प्रकृतीं शेतकींत लहान कारखाने विशेष हितावह, किंवा मोठे कारखानें विशेष हितावह, ह्या गोष्टीचा विचार करावयाचा. प्रकृत विषयावर मतें दोन प्रकारचीं आहेत. कोणी असें म्हणतात, कीं इंग्लंडादि देशांत मोठमोठालीं शेतें करण्याची जी पद्धति आहे, ती चांगली; व कोणी असें मानतात, कीं फ्लानदर्स वगैरे देशांत लहान लहान शेतें करण्याची चाल आहे, ती चांगली. आतां, ह्या स्थळीं आम्ही मुख्यत्वेंकरून ज्याच्या ग्रंथाच्या आधारानें किंवा ज्याच्या ग्रंथांचें भाषांतररूपानें हा ग्रंथ लिहिला आहे, त्या मिल् नामक प्रसिद्ध ग्रंथकारानें ह्या दोन प्रकारच्या मतांचा सारांश लिहिला आहे. तो लिहितो, कीं शिल्पाचे जिनसाच्या उत्पत्तीविषयीं मोठाल्या कारखान्यांचे गुण जसे स्पष्ट आहेत, तसे ते शेतकीच्या कामांत स्पष्ट नाहींत.

ही गोष्ट आम्ही मागें एकवार लिहिली आहे, कीं शेतकीच्या कामांत श्रमविभाग होण्याची फारशी योग्यता नाहीं, त्या कामांत मोठा कारखाना केला, तरी त्यांत फार श्रमविभाग होत नाहीं. तो होण्याची जागा म्हटली, म्हणजे, इतकीच, कीं कांहींनीं गुरें राखावीं; कांहींनीं बाजार करावा; व कांहींनीं लागवडीचें काम करावें. परंतु असल्या सोप्या श्रमविभागापेक्षां फारसा श्रमविभाग त्या कामांत होत नाहीं. शेतकींत मनुष्यांनीं एकमेकांस साह्य केलें, तरी तें श्रमविभागद्वारा फारसें करतां येत नाहीं, तर तें केवळ स्पष्ट श्रमसंयोगरूपानें करतां येतें,—म्हणजे एकच काम अनेक मनुष्यांनीं एकत्र व

एककाळीं व कदाचित् एका मालकाकरतां करावें. परंतु वास्तविक जीं शेतकींचीं कामें आहेत, त्यांस अशा साह्यानें फारसा उपयोग होतो असें वाटत नाहीं. आतां थोडक्या वेळेंत काम आटपावयाचें असलें तर ती गोष्ट मात्र खेरीज; परंतु एव्हवीं पुष्कळ मनुष्यें एका शेतांत नांगरीत असलीं, किंवा खणूं लागलीं, किंवा पेरूं लागलीं, म्हणजे तसें करण्यापासून विशेष नफा होईलसें दिसत नाहीं. असल्या कामांत जितक्या साह्याची आवश्यकता असते, तितकें साह्य, एका कुटुंबात पांचसात मनुष्यें असतात, त्यांस एकमेकांस करतां येतें; व जीं कांहीं घाईचीं वगैरे कामें अनेक साह्याधीन असतात, तीं करण्यास लहान शेतकरी एकमेकांस साह्य करतात. जमिनीचे विभागांचे विभाग होऊन होऊन लहान शेतें झालीं असतां तेणेंकरून जमिनीची उत्पादक शक्ति व्यर्थ होऊन मोठा तोटा होतो खरा; परंतु तो, ते विभाग फारच लहान होऊन शेतकऱ्यांचा वेळ रिकामा राहूं लागला, म्हणजे होतो. त्यांचा सर्व काळ कामांत जाईल, येथपर्यंत शेतकीचा कारखाना वाढण्यांत, शिल्पकृत पदार्थांचे कारखाने वाढवण्यास जीं साधकें आहेत, तींच लागू आहेत. त्यांच्या श्रमास व भांडवलास वगैरे अत्यंत उत्पादकत्व येण्यास ते, व त्यांचीं कुटुंबांतलीं काम करणारीं माणसें, त्यांचे बैल वगैरे, व त्यांचीं आऊतें, ह्या सर्वांस सर्व काळ काम असेल, व तीं कांहीं काम नाहीं, म्हणून रिकामीं राहाणार नाहींत, इतकीं मोठीं त्यांचीं शेतें असावीं हें फार चांगलें आहे. परंतु ही गोष्ट होण्यास फार मोठालीं शेतें नकोत; साधारण लांबरुंद असलीं म्हणजे पुरेत.

आतां शेतें मोठालीं, असलीं, म्हणजे गुरांना बांधावयास मोठे मोठे गोठे एकदम बांधावयास सांपडतात. पण तीं लहान लहान असलीं, म्हणजे जितकीं शेतें तितके लहान लहान गोठे करावे लागतील, व ते चांगले करावयाचे म्हटले, म्हणजे एकंदर खर्च अधिक लागेल. तसेंच चांगले नांगर वगैरे चांगल्या प्रकारचीं आऊतें माहाग असल्यामुळें लहान शेतकऱ्यांस तीं घ्यावयास सांपडत नाहींत. तसेंच, ज्यांची शेतकी मोठी असती, त्यांस बाजारास एकदम पुष्कळ जिन्नस न्यावयास सांपडतो; व खत वगैरे सामान विकत घ्यावयाचें असतें तेंही चांगलें मिळेल तेव्हां ठोक दरानें एकदम घेतां येतें; इत्यादि सोई मोठमोठीं शेतें असण्यांत आहेत खऱ्या; व त्यांपासून कांहीं नफाही आहे, परंतु तो नफा फार आहे असें म्हणतां येत नाहीं. ज्या देशांत लहान लहान शेतें करण्याची चाल आहे, व जेथें शेतें मिराशीसारखीं आहेत, तेथें शेतकरी विशेष आस्थेनें जशी मेहनत करतात, तशी मेहनत जो मोठालीं शेतें करतो, व ज्यास रोजमुरा देऊन चाकर ठेवावे लागतात, त्यांच्या शेतांत होत नाहीं.

लहान लहान शेतें करण्याच्या रीतीस आणखी असा एक दोष सांगत असतात, कीं लहान शेतकरी असले, म्हणजे त्यांच्या शेतांच्या मानानें त्यांपाशीं गुरेंढोरें नसतात; त्यामुळें त्यांस शेतकीच्या कामास बैल वगैरे गुरें पुष्कळ असत नाहींत, व त्यामुळें त्यांच्या शेतांत खतही पुष्कळ मिळत नाहीं; ह्यास्तव त्या रीतीनें जमीन उत्तरोत्तर खराब होत जाती. परंतु ही वर सांगितलेली गोष्ट शेतें फारच लहान असलीं, व त्यांचे करणारे भिकारी असले, म्हणजे होते. परंतु लहान शेतकरी म्हणजे भिकारीच असावा असा नियम नाहीं. प्रकृतीं आपणास विचार इतकाच करावयाचा, कीं लहान शेतें करण्याची रीत, व मोठीं शेतें करण्याची रीत, ह्या दोन्हींत एक दुसरीपेक्षां विशेष हितावह आहे कीं काय? तर आतां ह्या विषयाचा यथार्थ निर्णय करण्यास ज्यांपाशीं त्यांच्या शेताच्या महत्वाच्या मानानें, सारखीं भांडवलें आहेत, असे दोन शेतकरी (एक लहान शेत करणारा व एक मोठें शेत करणारा), उदाहरणास घेतले पाहिजेत; व त्यांचीच तुलना करून उपयोग. एकास दुसऱ्यापेक्षां गुण किंवा सोय अधिक आहे, आणि त्या पहिल्याचें उत्पन्न अधिक होत आहे, तर तो विशेष नफा अधिक गुणामुळें झाला असें होईल; तेणेंकरून अमूक रीत विशेष नफ्याची असें सिद्ध होणार नाहीं. आतां लहान शेतकऱ्यांस त्यांच्या शेताच्या मानानें व्हावीं तितकीं गुरें ठेवतां येतच नाहींत, असे वादीस सिद्ध करून देतां येतें, तर ती

गोष्ट निराळी. परंतु तसें सिद्ध होणें अशक्य आहे. फ्लांदर्स देशांत ल्हान ल्हान शेतें करण्याची चाल असतां तेथील लोकांच्या शेतकीच्या कामांत मुख्य गुण हा आहे, कीं त्यांपाशीं गुरेंढोरें पुष्कळ आहेत, व त्यांच्या शेतांस खत मुबलग मिळतें; व त्यांचा गुण असल्या विषयांत जे प्रवीण आहेत, ते सुद्धां वाहातात.

ल्हान ल्हान शेतें करण्याची रीत, व मोठालीं शेतें करण्याची रीत, ह्या परस्परांशीं ताडून पाहतां पहिल्या रीतींत दुसऱ्या रीतीपेक्षां कमी गुण असला तर हाच असेल, कीं तींत कौशल्य व ज्ञान ह्यांचें साह्य कमी असतें. परंतु ही गोष्टही सामान्यरूपानें खरी आहे, असें म्हणतां येत नाहीं. कारण, पहिली रीत जेथें चालू आहे, असे जे फ्लान्दर्स देश, व इताली देश, त्या देशांत, ज्या इंग्लंडादि देशांत दुसरी रीत चालू आहे, त्यांच्या पूर्वीं बहुत वर्षांपासून उत्तम प्रकारची शेतकी चालत होती, व सर्व गोष्टी हिशोबांत घेऊन पाहातां, तेथील शेतकी अद्यापि सर्व देशांतल्या शेतकींत उत्तम असें म्हटलें तरी कदाचित् चालेल. पिढीजाद्या शेतकीचीं कामें करणाऱ्या ल्हान शेतकरी लोकांस रात्रंदिवस तींच तींच कामें केल्यानें ज्या खुब्या माहीत असतात, त्या मोठालीं शेतें करणारे जे भांडवलवाले लोक (जे बहुतकरून पिढीजादा तें काम करणारे नसतात, व ज्यांचा सर्व काळ शेतांत नेहमीं खपणाऱ्या ल्हान शेतकऱ्यांच्या सारखा तींच तींच कामें करण्यांत जात नाहीं), त्यांस बहुतकरून ठाऊक असत नाहींत. ह्यास उदाहरण, ज्या देशांत द्राक्षें पुष्कळ पिकतात, त्या देशांतल्या लोकांस वाडवडिलांपासून आलेलें द्राक्षीची लागवड करण्याचें जें ज्ञान असतें, तें कांहीं विलक्षण असतें. आतां ही गोष्ट खरी आहे, कीं ह्या लोकांचें हें असलें ज्ञान सोपपत्तिक नसतें. त्यांस अमुक गोष्ट केली म्हणजे अमुक होतें, एवढें मात्र ठाऊक असतें; परंतु तें तसें कां होतें, ह्याची उपपत्ति त्यांस समजत नसते; व नवी नवी कल्पना काढून सुधारणा करण्याची रीत त्यांत बहुत करून कमी असते. बापानें जें केलें, तेंच लेंक करतो. परंतु आपण स्वतः कांहीं नवी युक्ति करून पाहावी, व जुनींत कांहीं फेरफार करावा, हें त्याच्या मनांत बहुतकरून येत नाहीं. तसेंच, ल्हान शेतकऱ्यांपाशीं नवीन गोष्ट करून पाहाण्यास मोठे भांडवल नसतें. त्या तसल्या गोष्टी म्हटल्या, म्हणजे मोठे भांडवलवाल्यांनींच कराव्या. पाहा, एकादे ठिकाणीं मोठी विहीर बांधावयाची आहे, किंवा लांबून पाट बांधून आणावयाचा आहे, किंवा एकादा नवा जिन्नस उत्पन्न करावयाचा आहे, किंवा जुनाच नव्या रीतीनें तयार करावयाचा आहे, इत्यादि धारिष्टाच्या गोष्टी, ज्यांचें भांडवल थोडें असतें, असे जे ल्हानल्हान शेतकरी, ह्यांच्या हातून होत नाहींत. आतां ह्याही गोष्टी त्यांनीं आपआपणांत कट करून आपल्यांतून थोडथोडें भांडवल जमविलें, तर त्यांच्या हातून होण्याजोग्या आहेत. परंतु हें होणें जसजशी त्यांची समजूतदारी वाढते तसतसें होतें.

ल्हान ल्हान शेतें करण्याच्या रीतीस कमीपणा आणणारा जो वर दोष सांगितला, त्याच-सारखा मोठा त्या रीतींत एक गुणही आहे. तो गुण हा, कीं शेतकऱ्याची शेतावर सत्ता असली म्हणजे किंवा सत्तेसारखाच पुष्कळ वर्षांचा कौल असला म्हणजे, तो शेतकरी जशी मेहनत, आपल्या शेताचें उत्पन्न वाढवण्याविषयीं घेतो, तशी मेहनत शेत त्याचें नसल्यास तो घेत नाहीं, असें सर्व निपुण ग्रंथकार मान्य करतात. ल्हान शेतें करण्याच्या रीतीचा वास्तविक परिणाम काय आहे, ह्याचा ज्यांस निर्णय करावयाचा आहे, त्यांनीं जेथें जमीनदारांपासून कुळें ल्हान ल्हान शेतें साऱ्यानें घेऊन करतात, व जेथें त्या कुळांपासून त्या जमीनदारांस आपली जमीन ग्हावी तेव्हां काढतां येते, व जेथें कुळांस जितका सारा देतां यावयाजोगा असतो, त्यापेक्षां तो अधिक ठरविला असतो, म्हणून जमीनदार त्या कुळांपासून जितका पैसा निघेल तितका काढितच असतात, त्या स्थळाचें उदाहरण घेऊं नये. कारण, त्या स्थळीं उत्पन्न कमी होतें, तें ल्हान शेतें करण्याच्या रीतीपासूनच होतें, असें सिद्ध होत

नाहीं; तर शेतें करणाऱ्या कुळास जमिनीचें उत्पन्न वाढवण्यापासून स्वतः फळ व्हावयाचें नसतें; ह्यास्तव तें जितकी मेहनत केली पाहिजेच, जी केल्यावांचून उपाशीं मरण्याची पाळी येणार, तितकी मात्र करतें. तर ह्या विषयाचें तत्त्व समजण्यास, जेथें लहान शेतें करणारे जमिनीचे मालक आहेत, किंवा अमुक पैसा त्यांनीं वर्षास दिला, म्हणजे त्यांकडे जमीन सतत किंवा पंचवीसतीस वर्षेपर्यंत राहाते, अशी चाल असते, व ह्यास्तव उत्पन्न वाढलें असतां तें सर्व, किंवा त्यांचा नियमित बराच मोठा अंश, शेतकऱ्यांस निश्चयें प्राप्त होतो, त्या स्थळच्या शेतकीचें उदाहरण घेतलें पाहिजे; व ह्याप्रमाणें उदाहरण घेतलें असतां तेथें शेतकऱ्यांचा व शेतांचा चांगला संबंध असतो, म्हणजे जमिनीच्या मालकास पाहिजे तेव्हां त्यांकडून जमीन काढतां येत नाहीं; किंवा पाहिजे तसा सारा वाढवतां येत नाहीं; ह्यास्तव त्या स्थळीं लहान लहान शेतकरी जें उत्पन्न करतात, तें, त्यांच्या इतक्याच जमिनीची लागवड करणारा जो मोठा शेतकरी त्याच्या उत्पन्नापेक्षां फारच अधिक असतें. वर ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांचा विचार केला असतां, हल्लीं सरकारानें जमिनींच्या यथागुण मती करून त्यांच्या साऱ्याचे दर ठरवून तीस तीस वर्षांच्या कौलानें त्या कुळांस द्यावयाच्या व ती तितकी मुदत संपण्याच्या पूर्वी साऱ्याचा दर बदलावयाचा नाहीं, असा जो ठराव केला आहे, तो देशांत शेतकी उत्तम अवस्थेंत येण्यास किती अनकूल आहे, हें वाचणाऱ्यांच्या सहज लक्ष्यांत येईल.

ज्यांपाशीं भांडवल पुष्कळ असतें, व जे तें व्यापारांत लावून त्यापासून नफा होण्याकरतां चाकर ठेवून त्यांच्या मदतीनें शेतकीचा व्यापार करतात, त्यांस मात्र लहान शेतें करण्यापेक्षां मोठालीं शेतें करणें विशेष हितावह होय. कारण घरचें ज्याचें शेत नाहीं, व जो नफ्याकरतां शेतकींत भांडवल घालतो, व मजुरांकडून काम करवितो, त्यास शेतांत जितकें उत्पन्न होण्याची योग्यता असते, तितकें सर्व उत्पन्न करण्यांत फायदा असत नाहीं. कां कीं, शेतकीच्या कामांत जितका जितका श्रम करावा, तितकें तितकें उत्पन्न वाढतें खरें; परंतु तें श्रमाच्या प्रमाणानें वाढत नाहीं; पहिल्या खेपेस श्रमास जें उत्पन्न होतें, तें दुसऱ्यानें तितकाच श्रम केला असतां, दुप्पट होत नाहीं; तर दुपटीपेक्षां कांहीं कमी होतें. ह्याप्रमाणेंच पुढें जाणावें. ह्यास्तव भांडवलवाला शेताची उत्तम रीतीची लागवड करीत नाहीं. त्याच्या शेतांत, शेताचा मालक आपल्या शेतांत जितकी मेहनत करतो, तितकी मेहनत त्याजकडून होत नाहीं. त्याचें कारण पहिल्याची शेतकी मोठी असल्यानें श्रमसंयोग होऊन त्यास कमी मेहनत पुरते, हें नव्हे; तर त्यानें त्या शेतावर मोठा श्रम लावला असतांही, त्या श्रमाचे मानानें त्यास फार उत्पन्न होतें, हें होय. भांडवलवाला जितका श्रम लावील, तितक्या सर्वांची त्यास मजुरी द्यावी लागते, म्हणून श्रमाच्या मानानें उत्पन्न वाढत नसल्यास, तो श्रम लावण्यांत त्याचा नफा नसतो. परंतु मालकच शेत करणारा असला, म्हणजे तेथें असें नसतें. त्याचा श्रम घरचा असतो; ह्यास्तव तो आपल्या श्रमानें जितकें उत्पन्न काढवेल, तितकें काढतो. भांडवलवाल्याचे शेतांत जें उत्पन्न होतें, तें, शेताचा मालक शेत करीत असतां त्यांत जें उत्पन्न होतें, त्यापेक्षां ह्याच्या शेताच्या मानानें कमी असतें खरें; परंतु ह्याच्या शेतांत जो श्रम होतो, तो ह्याच्या शेताच्या मानानें, त्याच्या शेताच्या मानानें त्याच्या शेतांत झालेल्या श्रमापेक्षां फार कमी असतो; आणि ह्यामुळें ह्यास नफा होतो.

लहान लहान शेतें करण्याच्या रीतीवर इंग्लंडांतील ग्रंथकार आणखी एक दोष देत असतात. तो दोष असा, कीं लहान शेतें करण्याची रीत चालू असली, म्हणजे एकंदर उत्पन्न जरी अधिक झालें, व तेणेंकरून देशास अधिक प्रजेचें उपजीवन करण्याचें सामर्थ्य जरी आलें, तरी देशांतलें निकें उत्पन्न, म्हणजे शेतकीचा खर्चवेंच जाऊन जें उत्पन्न राहातें तें उत्पन्न, कमीच असलें पाहिजे; व तसें झाल्यानें देशांत शेतकीखेरीज इतर व्यापारांस उपयोगीं पडणारे लोक, म्हणजे कलाकौशल्याचे पदार्थ तयार करणें, व्यापार, गलबतांवरील काम, विद्यावृद्धि, देशसंरक्षण, वैद्यकी, वकिली, धर्मोपदेश,

कला, विद्या, इत्यादि कामांस लागणारे लोक, थोडे होतील. कारण ह्या सर्वांचें उपजीवन शेतकीच्या निक्याच उत्पन्नावर आहे; आणि तें कमी असल्यास, हे लोक पुष्कळ कसे असतील? व हे लोक जेथें कमी असतात, त्या देशास सामर्थ्य कमी असतें. व त्या देशांत प्रापंचिक वगैरे सुख होण्याचीं कारणें कमी असतात. परंतु हा दोष सर्वथैव खराच आहे, असें म्हणतां येत नाहीं. मोठालीं शेतें करण्याची रीत असतां, देशांत शेतकऱ्यांशीं व इतर प्रजेशीं जें प्रमाण असेल, त्यापेक्षां लहान शेतें करण्याची रीत असतां, त्यांचें त्यांशीं प्रमाण कमी होईल खरें; परंतु असें झाल्याच्या पोटीं शेतकऱ्यांहून इतर लोक कमी होतीलच, असा नियम नाहीं. जर शेतकरी, व त्याहून इतर लोक, ह्यांची एकंदर संख्या वाढली, तर इतर लोक पुष्कळ असूनही त्यांचें एकंदर संख्येशीं प्रमाण कदाचित् कमी होईल. तसेंच एकंदर उत्पन्न अधिक होऊन निकें उत्पन्नही कदाचित् अधिक होईल, आणि असें होऊनही कदाचित् दुसऱ्याचें पहिल्याशीं प्रमाण कमी होईल. असो.

दोन रीतींची तुलना केली असतां, कच्चें उत्पन्न, म्हणजे एकंदर उत्पन्न, तें वाढण्यास लहान शेतें करण्याची रीत चांगली होय; व विशेषतः मालक शेतें करीत असतां, तिच्या त्याविषयींच्या चांगलेपणाविषयीं तर वादच नाहीं. परंतु निकें उत्पन्न वाढण्यास कोणती रीत चांगली, ह्याविषयीं अजूनपर्यंत वाद आहे. मोठमोठ्या प्रवीण ग्रंथकर्त्यांचींसुद्धां ह्या विषयावर मतें परस्पर विरुद्ध आहेत. इंग्लंडांतील ग्रंथकार मोठीं शेतें करण्याची रीत चांगली असें म्हणतात; व फ्रान्सादि देशांतील ग्रंथकार तद्विरुद्ध रीतीस पसंद करतात. प्रोफेसर रो म्हणून एक महाप्रसिद्ध ग्रंथकार आहे, व ज्यानें केलेल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथाची सर्वोत्कृष्ट ग्रंथांत गणना करतात, त्याचे मतीं लहान शेतें करण्याची रीत निकें उत्पन्न वाढण्यास सुद्धां कारण आहे. परंतु तो ग्रंथकार हें लिहितो, कीं देशांत कांहीं मोठे श्रीमान् शेतकरी असावे, हें चांगलें. कां कीं ते शेतकीच्या कामांत नव्या नव्या युक्ति, (ज्या युक्तींस आरंभीं विशेष खर्च लागतो, व ज्या चालू करण्यास अधिक धारिष्ट लागतें,) त्या प्रवृत्त करण्यास ते उपयोगीं पडतात. तसा पासी नामक महाप्रसिद्ध व विवेचनशील ग्रंथकार आहे, तो असें लिहितो, कीं धान्य व गवत इत्यादि शेतकीचे जिन्नस उत्पन्न करावयास मोठालीं शेतें करण्याची रीत विशेष नफ्याची होय. परंतु जे जिन्नस उत्पन्न करण्यास फार मेहनत करावी लागते, व फार लक्ष्य द्यावें लागतें, (जसे द्राक्षीचे मळे वगैरे, ज्यांस प्रत्येक झाडास मशागत करावी लागते) ते जिन्नस उत्पन्न करण्यास लहान लहान शेतें करण्याची रीत विशेष हितावह होय. सर्व ग्रंथकार असें मान्य करतात, कीं जे जिन्नस फार मेहनत केल्यावांचून, व फार ओज केल्यावांचून चांगले होत नाहींत, ते लहान लहान शेतकऱ्यांच्या हातून जितके चांगले, व पुष्कळ होतात, तसे मोठालीं शेतें मजुरांकडून करवणाऱ्यांच्या हातून होत नाहींत.

ही गोष्ट स्पष्ट आहे, कीं जो जो श्रम करणारा आपणास व आपले कुटुंबांतील मनुष्यांस जें धान्य लागतें, त्यांपेक्षा अधिक उत्पन्न करतो, तो शेतकऱ्याहून इतर प्रजेची उपजीविका होण्यास कारण होतो. आतां त्याचे श्रमाचें उत्पन्न त्याचें पोट भरून त्याला वस्त्रें घेण्यापुरतें जरी राहात असलें, तरी तो शेतकऱ्याहून इतर जे लोक, म्हणजे त्याचीं वस्त्रें करणारा साळीं वगैरे त्यांच्या उपजीवनास कारण होतो. ह्याप्रमाणें जे जे शेतकरी आपल्या कुटुंबांतील मनुष्यांच्या अन्नवस्त्रादिकांपुरतें उत्पन्न करतात, ते देशांतील एकंदर कच्चें उत्पन्न, व निकें उत्पन्नही, थोडेंबहुत, वाढवतात, असें अवश्य म्हटलें पाहिजे. आतां कोणा एकास स्वतः खावयास जितकें पाहिजे, त्यापेक्षां अधिक धान्य जर त्याच्या श्रमापासून उत्पन्न होत नसेल, तर त्याचा मात्र श्रम देशांतलें निकें उत्पन्न वाढण्यास कारण होणार नाहीं; परंतु असा शेतकरी बहुतकरून कोणत्याही देशांत नसेल असें वाटतें.

## भाग दाहावा.

# श्रमवृद्धि ज्या नियमानें होते, त्या नियमाविषयीं.

संपत्ति उत्पन्न होण्याच्या एकेका कारणाचा, व त्या कारणांची उत्पादक शक्ति ज्या उपायांनीं वाढते, त्या उपायांचा, आपण मागें अनुक्रमानें विचार केला. आतां संपत्त्युत्पत्तीशींच ज्यांचा संबंध आहे, अशा विषयांपैकीं निरुपण करण्याचा एकमात्र मोठा मूलभूत विषय राहिला आहे, त्याचें निरुपण करतों.

संपत्तीचें उत्पन्न हा नियमित इयत्तेचा पदार्थ नव्हे, तर हा पदार्थ वाढणारा होय. वाईट राज्यनियम, वाईट लोकनियम, कलाकौशल्याची निकृष्टावस्था, ह्यांनीं तिचा अवरोध न केल्यास, उद्योगफलरूप जी संपत्ति, तिचा स्वभाव सामान्यतः वाढण्याचा असतो; व ती वाढण्यास, उत्पादक जे पुरुष; त्यांस आपणांस उपभोग करण्याचीं अधिक अधिक साधनें असावीं अशी इच्छा असते, हेंच कारण आहे, असें नाहीं; तर उपभोग करणारीं जीं मनुष्यें त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत असते, हेंही कारण होय. तेव्हां वाढण्याचा जिचा स्वभाव अशी जी संपत्ति हिची ही वृद्धि कोणत्या नियमानें होती? व त्या वृद्धीचीं आवश्यक कारणें कोणतीं? त्या वृद्धीस व्यवहारांत कांहीं मर्यादा आहे, कीं काय? व मर्यादा असल्यास तिचीं कारणें कोणतीं? ह्या सर्व गोष्टींचा विचार, अर्थशास्त्रांत जे कांहीं प्रधान प्रधान विचार आहेत, त्यांपैकींच आहे, व ह्या विषयांविषयीं साधारण लोकांत जितकें अज्ञान आहे, त्यापेक्षां अधिक अज्ञान अर्थशास्त्रांतील दुसऱ्या कोणत्याही विषयाविषयीं नाहीं, व ह्या विषयाविषयींच्या भ्रांतीनें जितका अनर्थ होण्याची योग्यता आहे, व तो होतही आहे, त्या पेक्षां अधिक अनर्थ दुसऱ्या विषयाच्या भ्रांतीनें होत नाहीं.

आपणांस मागल्या प्रतिपादनावरून समजलें आहे, कीं संपत्तीच्या उत्पत्तीस अनन्यथासिद्ध, म्हणजे आवश्यक, कारणें तीन आहेत. तीं हीं, कीं श्रम, भांडवल, व सांसिद्धिक पदार्थ; ह्यांत भांडवल शब्दानें बाह्य जड पदार्थरूप जीं कारणें, व जीं श्रमापासून उत्पन्न होतात, त्यांचा संग्रह करावयाचा, व सांसिद्धिक पदार्थ शब्दानें बाह्य जडपदार्थरूप असून श्रमापासून ज्यांची उत्पत्ति नाहीं, अशा कारणांचा संग्रह करावयाचा; हेंही वर सांगितलेंच आहे. परंतु प्रकृत स्थळीं सांसिद्धिक पदार्थांत जे पदार्थ सृष्टींत अपरिमित आहेत, व ज्यांवर कोणास स्वत्व उत्पन्न करतां येत नाहीं, व ज्यांच्या विवक्षित गुणांमध्यें फेरफार घडत नाहीं, म्हणून जे कितीही संपत्ति उत्पन्न करावयाची असली तरी सारखे उपयोगीं पडतात, असे जे हवा वगैरे पदार्थ, ह्यांचा विचार करण्याची गरज नाहीं. आतां आपणास संपत्तीच्या उत्पत्तीस सौकर्य आणणाऱ्या कारणांचा विचार कर्तव्य नाहीं; तर तीस अवरोध करणाऱ्या कारणांचा विचार कर्तव्य आहे; ह्यास्तव ज्यांच्या इयत्तेच्या अंशीं किंवा उत्पादक शक्त्यंशीं न्यूनता पडण्यासारखी आहे, ते सांसिद्धिक पदार्थ येथें विचारांत घ्यावयाचे. परंतु ज्यांची परिमिति नाहीं व ज्यांची उत्पादकशक्ति अखंड आहे, ते घ्यावयाचा उपयोग नाहीं, असो. पहिल्या प्रकारच्या सर्व सांसिद्धिक पदार्थांचा संग्रह जमीन शब्दानें केला असतां होईल. शेतकीच्या उत्पन्नाच्या आश्रय-स्थानाच्या रूपानें जमीन इतर सर्व सांसिद्धिक पदार्थांपेक्षां संपत्त्युत्पत्तीस विशेष उपयोगीं पडती, व तो जमीन शब्दच, त्याचा अर्थ लक्षणेनें वाढवून, खाणी, मासे धरण्याच्या जागा, व पृथ्वीच्या पोटांत व

पाण्यांत जें जें सांपडतें तें, ह्या सर्वांस लागू केल्यास त्यानें प्रकृत स्थळीं आपणास विवक्षित जितका अर्थ आहे, तितक्या सर्वांचा संग्रह होईल.

आतां जमीन शब्दाचा वर सांगितलेला लाक्षणिक अर्थ घेऊन पाहतां संपत्तीचीं कारणें तीन होतात;—श्रम, भांडवल, व जमीन. ह्याकरतां संपत्ति वाढणें हें ह्या तीन कारणांच्या उत्पादक गुणांवर आहे. ह्या तीन कारणांपैकीं कोणत्याही कारणाची इयता वाढली असतां, किंवा त्याची उत्पादकता वाढली असतां, तेणेंकरून संपत्तीच्या उत्पत्तीची वृद्धि होते. तस्मात् संपत्तीच्या वृद्धीचा नियम, ह्या तीन कारणांचे वृद्धीचे जे नियम, त्यांपासून झालेला असावा; आणि उत्पन्नाच्या वृद्धीस ज्या कांहीं मर्यादा असतील, त्याही ह्या कारणांच्या वृद्धीच्या नियमांनींच झाल्या पाहिजेत. ह्यास्तव आपण आतां मर्यादाकरणरूप कार्यांच्या संबंधानें त्या तीन कारणांचा अनुक्रमानें विचार करूं; म्हणजे उत्पन्नाची वृद्धि व श्रम ह्यांच्यामधल्या संबंधाचें विवेचन प्रथम, त्याच्या मागून ती वृद्धि व भांडवल ह्यांच्यामधल्या संबंधाचें विवरण व शेवटीं जमीन व ती वृद्धि ह्यांच्यासंबंधाचें विवेचन करूं.

श्रमाची वृद्धि म्हणजे मनुष्यांची वृद्धि होय. ह्या विषयावर माल्थसनामक ग्रंथकारानें एक प्रसिद्ध निबंध लिहिला आहे, व त्या निबंधावर खंडक मंडक ग्रंथ पुष्कळ झाले आहेत, त्या सर्वांच्या योगानें ह्या प्रजावृद्धिरूप विषयाचें पुष्कळ आलोडण होऊन त्याचा जो इत्यर्थ झाला आहे, तो इत्यर्थ जरी अद्यून सर्वांस मान्य आहे, असें नाहीं, तथापि तो मान्य न करणाऱ्यांपेक्षां मान्य करणारे पुष्कळ आहेत; ह्यास्तव ह्या स्थळीं माल्थससाहेबाच्या ह्या विषयावरच्या सिद्धांताचें संक्षेपेंकरून येथें निरूपण करतों.

सेंद्रिय जे पदार्थ, म्हणजे वनस्पति व प्राणी, ह्यांच्या ठायीं आपापली जाति वाढवण्याची जी शक्ति आहे, ती अमर्याद आहे, असें म्हटल्यास चालेल. कोणतीही वनस्पतीची किंवा प्राण्याची जात घ्या. तिचें जर चांगलें पोषण होत आहे, व तीच एकटी जात जर पृथ्वीवर आहे, तर ती जात, ज्या ज्या देशांतल्या हवेंत वांचण्यास योग्य आहे, त्या सर्व देशांस थोड्या वर्षांत अगदीं भरून टाकील; व ह्याप्रमाणें करण्याची शक्ति अथवा योग्यता जीस नाहीं, अशी वनस्पतीची, किंवा प्राण्याची, जात नाहीं. आतां वनस्पति व सर्व प्राणी सारख्या काळांत सारखे वाढतात, असें नाहीं. कांहीं लौकर वाढतात व कांहींकांस वाढण्यास कांहीं विशेष काळ लागतो. तथापि थोड्या वेळांत सर्व पृथ्वी व्यापण्याजोगी जलद वाढण्याची शक्ति सर्व प्राण्यांत व सर्व वनस्पतींत आहे. वनस्पतींत कांहीं जाति अशा आहेत, कीं त्यांच्या एका झाडापासून एका वर्षांत हजार नवीं झाडें उत्पन्न होतात. आतां, त्या हजारांपैकीं दोन झाडें जरी वर्षांस मोठीं झालीं, तरी एका झाडापासून चवदा वर्षांत सोळा हजारांवर नवीं झाडें होतील. तसेंच असे प्राणी पुष्कळ आहेत, कीं ज्यांची संख्या एका वर्षांत चौपट वाढते. आतां ते प्राणी पन्नास वर्षांत चौपट वाढतात असें जरी धरलें, तरी त्या जातीच्या दाहा हजार प्राण्यांपासून दोनशें वर्षांत पंचवीस लक्ष नवे प्राणी होतील. ह्यावरून असा नेम सिद्ध होतो, कीं प्राणी व वनस्पति ह्यांची वृद्धि भूमितिप्रमाणानें होती. आतां गुणोत्तररूप जी संख्या ती मात्र जातिभेदेंकरून निरनिराळी असते,—म्हणजे कोठे दुपटीनें, कोठें चौपटीनें, अशी त्यांची संख्या वाढत जाते.

सेंद्रिय पदार्थांच्या वृद्धीचा जो हा नियम आहे, त्यास मनुष्यजाति अपवाद आहे असें नाहीं, तर तो नियम तीसही लागू आहे. मनुष्याचे ठायीं स्वजाति वाढवण्याची शक्ति अमर्याद आहे. त्या सर्व शक्तीचा जर विनियोग होईल, तर मनुष्यांची वास्तव संख्या विलक्षण जल्दीनें वाढेल. परंतु त्या शक्तीचा पूर्ण विनियोग कोठेंच होत नाहीं. कारण तसें होण्यास प्रतिबंधकें फार आहेत. तर जेथें लोकवृद्धीस अत्यंत अनुकूळ अशा गोष्टी घडून आल्या आहेत; जसें, कलाकौशल्यांत निपुण व विद्याचारसंपन्न अशा देशांतील कांहीं लोक संपत्ति उत्पन्न करण्याची सामग्री बरोबर घेऊन चांगल्या हवेच्या व पिकाऊ देशांत जाऊन वसाहात करून राहिले आहेत, तेथें त्या वसाहात केलेल्या देशांत नवे आणखी

लोक आल्याशिवाय त्या पहिल्याच लोकांपासून वीस वीस वर्षांत दुप्पट दुप्पट लोकसंख्या होत गेली आहे. मनुष्यांत शक्तिच म्हटली तर, त्याहीपेक्षां अधिक वाढण्याची आहे, असें, ज्या देशांत हवा चांगली असते, व अल्पवयांत लग्नें करण्याची चाल असते, तेथें कुटुंबांत मुलांची संख्या प्रायः किती मोठी असते, व राहाण्याची जागा चांगली निरोगी असली, व लोक खाऊनपिऊन सुखी असले, म्हणजे हल्लीं आरोग्य राखण्याचें ज्ञान लोकांत थोडें असतां, व जें थोडें आहे, तेंही पुष्कळ प्रसूत झालें नसतां झालेल्या मुलांपैकीं पुष्कळ तारुण्यदशेस येतात, ह्या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, स्पष्टपणें ध्यानांत येईल. ह्यास्तव, लोक चांगले निरोगी व सुदृढ आहेत, व त्यांस उपजीवन होण्याची काळजी नाहीं, तर ते पंचवीस वर्षांत, किंवा तीस वर्षांत दुप्पट होतील, असें धरलें, तर ह्यांत मनुष्यांच्या स्वजातिवृद्धि करण्याच्या शक्तीचें मान फार हलकें धरलें असें समजलें पाहिजे.

ह्या वर सांगितलेल्या गोष्टी, ज्यांस इंग्रेजींतील ह्या विषयावरच्या ग्रंथांची फारशी माहिती नाहीं, त्यांस एकदम खऱ्या वाटावयाच्या नाहींत; व पंचवीस-तीस वर्षांच्या मागें युरोपांत देखील ह्या गोष्टी सिद्ध करण्यास्तव फार प्रमाणें व उदाहरणें आणावीं लागत. परंतु अमेरिकादि ज्या देशांत हुशार लोकांनीं वसाहाती केल्या आहेत, तेथें वर सांगितलेल्या गोष्टी स्पष्ट घडल्या आहेत; ह्याकरतां आतां त्यांवर कोणाची शंका चालत नाहीं; व ह्या गोष्टी आतां प्रत्यक्ष प्रमाणासारख्या धरल्या तर चालावया-जोग्या आहेत. परंतु असें आहे, तरी ह्या गोष्टी खऱ्या मानण्याविषयीं विलायतेंतसुद्धां लोकांस पराकाष्ठेचा असंतोष आहे असें दिसतें. कारण ह्याविषयीं इतकीं सबल प्रमाणें असतांही कोणी मधूनमधून कांहीं एतद्विरुद्ध उपपत्ति काढतात, व त्या उपपत्तींनीं असें सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, कीं ईश्वर, लोकस्थितीस अनुकूल होईल अशी मनुष्यांची प्रजोत्पादनशक्ति न्यूनाधिक करतो, ह्यास्तव अवस्था-भेदेंकरून लोकवृद्धीचा नियम भिन्नभिन्न असतो. परंतु ह्या त्यांच्या निर्जीव उपपत्ति फार दिवस टिकत नाहींत. त्यांस कांहीं दिवस झाले, म्हणजे त्या लोक विसरून जातात, मध्येंमध्यें ह्या नव्या नव्या उपपत्ति निघतात, येणेंकरून प्रकृत विषयाचें यथार्थ ज्ञान होण्यास प्रतिबंध होतो, असें नाहीं; तर मनुष्यांचे ठायीं स्वजाति वाढण्याची इतकी मोठी शक्ति असतांही बहुतेक ठिकाणीं बहुतेक काळीं प्रजेची वास्तविक वृद्धि ज्या कारणांनीं किंवा प्रतिबंधकांनीं झाली नाहीं, त्या कारणांचा व प्रतिबंधकांचा स्पष्ट बोध होत नाहीं, ह्यास्तव प्रजावृद्धीच्या वास्तविक नियमाविषयीं लोकांची खात्री होत नाही.

परंतु वास्तविक पाहातां, ज्या प्रतिबंधकांनीं प्रजावृद्धीचा प्रतिबंध होतो, तीं प्रतिबंधकें कांहीं गूढ आहेत असें नाहीं. ससे, हरणें ह्यांची संतति वाढून तिनें पृथ्वी कां बरें भरून जात नाहीं? तसें होण्यास ह्या प्राण्यांस प्रजोत्पादन शक्ति कमी आहे, हें प्रतिबंधक आहे असें नव्हे; तर तसें होण्यास प्रतिबंधकें निराळीं आहेत. त्या प्राण्यांस शत्रु फार, व भक्ष्याची कमती. त्यांस स्वतः खावयास थोडें, व त्यांस खाणारे दुसरे फार; ह्या अशा प्रतिबंधकामुळें त्यांच्या वृद्धीस प्रतिबंध होतो. आतां मनुष्यजातीची वृद्धि होण्यास दुसरें प्रतिबंधक बहुतकरून कोठेंही नाहीं; परंतु त्यांच्या स्थानीं त्याचें काम करणारीं लढाया व रोग हीं आहेत. इतर प्राणी, म्हणजे पशुपक्षी इत्यादिक, ह्यांची वृद्धि जशी केवळ ग्राम्य इच्छेनें होते, तशी मनुष्यांची जर होती तर त्या प्राण्यांच्या वृद्धीचा प्रतिबंध ज्या कारणांनीं होतो, त्याच कारणांनीं ह्यांच्याही वृद्धीचा प्रतिबंध होता; म्हणजे त्यांच्या ठायीं जितकी प्रजावृद्धि करण्याची योग्यता आहे, तीअन्वयें जर पुष्कळ संतती उत्पन्न होती, तर पुष्कळ मनुष्यें मरून लोकसंख्येचे वृद्धीस प्रतिबंध होता. परंतु मनुष्यांचे ठायीं ईश्वरानें विचारशक्ति ठेविली आहे, व तिचा विनियोग त्यांनीं केल्यास त्यांस दूरचे परिणाम कळतात; व ही विचारशक्ति थोडीबहुत सर्वांच्या प्रवृत्तिनिवृत्तींस कारण असते. तसेंच, त्यांचें आचरण इतर प्राण्यांचे सारखें केवळ प्राणिप्रेरणाकृत नसतें, तर त्या प्राणिप्रेरणांपेक्षां श्रेष्ठ अशा ज्या मनोवृत्ति त्या त्यांच्या आचरणास थोड्याबहुत कारण असतात. ह्यास्तव तीं पशुप्रमाणें

ग्राम्य इच्छेनें प्रवृत्त होत्सातीं स्वसंतति वाढवीत नाहींत. विचारशक्तीच्या योगानें किंवा उत्तम मनोवृत्तीच्या योगानें त्यांस आपल्या ग्राम्य इच्छांचें थोडेंबहुत दमन करतां येतें. तेणेंकरून केवळ दुःख भोगण्यास किंवा अकाल-मरण पावण्यास प्राणी उत्पन्न होण्याचा प्रतिबंध होतो. मनुष्यें जसजशीं पशूंच्यापेक्षां श्रेष्ठावस्थेस चढत जातात; म्हणजे त्यांचे ठायीं प्राणिप्रेरणांपेक्षां विचार, दूरदृष्टि, दया, माया, इत्यादि उत्तम गुणविशेष प्रबल होऊं लागतात, तसेंतसें अन्नादिकांच्या अभावानें प्रजावृद्धीची मर्यादा जी होत असते, ती तशी न होऊन त्या अभावाच्या भयानें ती होऊं लागते. आतां ज्यांस आपणांस किंवा आपल्या कुटुंबांस अन्नादिकांची वाण पडण्याचें भय नसतें, त्यांसही कधीं कधीं लग्न करण्याचें व संतति असण्याचें नको असतें. कारण, त्या गोष्टी झाल्यास आपला खर्च फार वाढून आपणांस भिकारीपणानें वागावें लागून आपली प्रतिष्ठा कमी होईल, असें भय वाटत असतें. हें शेवटीं जें प्रजावृद्धीचें प्रतिबंधक सांगितलें, तें ह्या देशास बहुतकरून लागू नाहीं; तें युरोप खंडांतील कांहीं लोकांस मात्र लागू आहे. व ह्या कारणामुळेंच पुष्कळ साहेबलोक पुष्कळ वय झालें तरी लग्न करीत नाहींत, व कांहीं तर मुळींच लग्न करीत नाहींत. तसेंच त्यांच्या देशांत ज्यांचा मुळींच विवाह होत नाहीं अशा स्त्रियाही शेंकडों असतात; त्याचें कारणही हेंच. मनुष्यसामान्याचा विचार करतां त्यांचें प्रजावृद्धि करण्याचें प्राविण्य मोडण्याजोगीं प्रबल कारणें आजपर्यंत दोनच दिसतात. हा सामान्य सिद्धांत. मनुष्यविशेषीं ह्या दोहोंपेक्षां अन्यही कारणें लागू आहेत, असें आढळतें. त्या गौण कारणांत धर्मसंबंधी विशेष समजूत हें एक होय. पूर्वींपासून वैराग्य, म्हणजे संसार सोडणें, किंवा मुळींच त्याचा अंगीकार न करणें, हें ईश्वरप्राप्तीस मुख्य साधन आहे, असा सर्व देशांत पुष्कळ लोकांचा ग्रह आहे. ह्यामुळें वैराग्य प्राप्त होऊन कितीएक लोक संसार टाकीत, व कांहीं अजूनही टाकतात, व कोणी पहिल्यापासूनच ब्रह्मचर्य करतात. प्रॉतस्तन्त पंथ होण्याच्या पूर्वी वैराग्य घेण्याची चाल युरोपखंडांत पुष्कळ होती; व हल्लींही ती चाल जेथें क्याथलिक पंथ चालत आहे, तेथें थोडीबहुत आहे. अशीं प्रजावृद्धीस दुसरीं पुष्कळ प्रतिबंधकें आहेत. इंग्लंडांत मध्यम प्रतीचे लोक, म्हणजे कारागीर, उदमी, व्यापारी, वगैरे लोक, ह्यांची, व त्यांपेक्षां गरीब जे आहेत, त्यांची रीत अशी आहे, कीं ते ज्या स्थितींत उत्पन्न झाल्यामुळें, किंवा तींत फार दिवस राहिल्यामुळें, जी स्थिति आपलीशी त्यांस वाटते, ती स्थिती राखवून जितक्या अल्प वयांत लग्न होईलसें असेल, तितक्याच वयांत ते तें करतात. तसेंच, ती स्थिति कमी न होतां जितकीं मुलें होतील, तितकीं व्हावीं, असें त्यांस वाटतें. मध्यम प्रतीच्या लोकांत असेही कितीएक असतात, कीं त्यांस आपली स्थिति आणखी चांगली व्हावी, अशी इच्छा असते; तीही त्यांस लग्न करण्यास विशेष प्रतिबंध करते. परंतु ही इच्छा ह्या कार्यास प्रतिबंध करण्याजोगी प्रबळ पुष्कळांत असत नाहीं. साधारण मजूरी करून पोट भरणारे जे असतात, ते स्वतः ज्या स्थितींत लहानाचे मोठे झाले असतात, त्या स्थितींत त्यांचीं मुलें राहातीलसें असलें, म्हणजे तेवढ्यानें, त्यांमध्यें जे विशेष विचारी असतात, त्यांचें सुद्धां समाधान होतें; व असेंही बहुत ठिकाणीं घडतें, कीं ते लोक वर सांगितलेल्या गोष्टीचा विचार करीत नाहींत; तर केवळ दैवावर किंवा लोकांच्या किंवा सरकारच्या धार्मिकपणावर भरंवसा ठेवतात.

लोक फारच अज्ञानावस्थेंत असले;—म्हणजे युरोप खंडांतील लोक चार साडेचारशें वर्षांमागें ज्या दशेंत होते, व एशियाखंडांतील कितीएक देशांतले लोक ज्या दशेंत सध्या आहेत;—त्या दशेंत प्रजावृद्धि शुद्ध अन्नाभावानें खुंटत असते. हा अन्नाभाव साधारणपणें थोडाबहुत पाऊस नेहमी पडतो, म्हणून सर्वदा असत नाहीं. परंतु ज्या वर्षी पाऊस टाळा देतो, किंवा लढाई वगैरे कांहीं मोठा अनर्थ घडतो, आणि तेणेंकरून दुष्काळ किंवा खर्पड पडतें, त्यावेळेस हजारों हजार लोक केवळ अन्नावांचून मरतात, किंवा त्यांस अन्न पोटभर चांगलें मिळत नाहीं, किंवा जीव राखण्याकरितां वाईटसाईट पदार्थ

त्यांस खावें लागतात, व तेणेंकरून सांत उत्पन्न होऊन गांवांचीं गांवें ओसाड पडतात; व पुनः पाऊस पडून वगैरे सुबत्ता झाली म्हणजे आणखीं लौकर प्रजावृद्धि होते; व ती पुनः कांहीं अनर्थ झाला, म्हणजे पुनः क्षय पावते. ह्याप्रमाणें वारंवार दाहापंधरा वर्षांनीं घडामोड होत असते. लोकांची अवस्था सुधरून ते विशेष ज्ञानयुक्त झाले, म्हणजे त्यांत अत्यंत गरीब जे असतात, त्यांतसुद्धां, ज्यांस केवळ प्राणधारणा-पुरतेंच अन्नवस्त्रादि मिळतें, त्यापेक्षां अधिक मिळत नाहीं, असे फारच थोडे असतात. सर्वांस थोडे-बहुत सुखाचे पदार्थ मिळत असतात, व लोकसंख्या जी उत्पन्नाच्या बेतानें राहाते, ती वरच्यासारखी पुष्कळ मनुष्यें मेल्यानें राहात नाहीं; तर नवी प्रजा उत्पन्न व्हावयाची, ती बेतानेंच होत असते, तेणेंकरून राहाते. प्रजेच्या उत्पत्तीचें हें नियमन अनेक प्रकारांनीं होतें. कांहीं देशांत लोक विचारी असल्यामुळें, ते जाणून सवरून ग्राम्य इच्छेचें दमन करतात, तेणेंकरून तें कार्य होतें. मजुरी करून निर्वाह करणाऱ्या लोकांसुद्धां कांहीं विशेष अवस्थेची संवय पडून गेली असते, व त्यांस स्पष्ट दिसत असतें, कीं आपण अविचारानें जर आपलें कुटुंब फारच वाढवलें, तर आपणांस आपली सांप्रतची स्थिति सोडून निकृष्ट स्थितीस यावें लागेल; किंवा आपणांस नाहीं तर आपल्या मुलांस तरी दरिद्रावस्था नियमानें येईल, अशा भीतीनें तशी गोष्ट न होईल असे ते वागतात. हल्लीं ज्या देशाविषयीं आपणास चांगली माहिती आहे, त्या सर्वांत नार्वे व स्वित्सर्लेंडचे कांहीं प्रांत, येथील लोक स्वतः होऊन प्रकृत विषयाविषयीं, म्हणजे लग्न करण्याचे कामांत, फारच विचार व मनोनिग्रह करतात. ह्या दोन देशांत लोकवृद्धि फारच थोडी होते; तिचा जो प्रतिबंध होतो, तो फार लोक मरण्यानें होत नाहीं; नवी प्रजा उत्पन्न होते; तीच कमी होते, येणेंकरून होतो. त्या देशांतील एकंदर लोकसंख्येच्या मानानें पाहातां, मरणारी व जन्मणारी प्रजा थोडी आहे, व मध्यम प्रमाणानें पाहातां, त्या दोन देशांतील लोक जितके दिवस वांचतात, तितके दिवस सगळ्या युरोप खंडांत दुसऱ्या कोणत्याहि देशांतले लोक वांचत नाहींत. तसेंच एकंदर लोकसंख्येच्या मानानें ह्या दोन देशांत जितकीं मुलें कमी, व धट्टीकट्टीं मनुष्यें फार; तशीं पृथ्वीवरचा दुसरा कोणताही देश घेतला असतां तेथें सांपडणार नाहींत. ह्या दोन देशांत मुलें असतात, तेणेंकरून तेथील लोकांस खाण्यापिण्याचें चांगलें सुख असतें, व तेणेंकरून त्यांचें आयुष्य वाढतें. तसेंच, ते लोक विचारी व निग्रहशील असतात. ह्यामुळें रोगांचें मुख्य कारण जें दारिद्र्य तें त्यांत फार कमी असतें; व तेणेंकरून त्या दोन देशांत रोगाचा उपद्रव कमी आहे. आम्ही ज्या ह्या देशाविषयीं कांहीं गोष्टी सांगितल्या, त्या सर्व सप्रमाण आधारांवरून समजण्यांत आल्या आहेत. अशींहीं दुसरीं पुष्कळ उदाहरणें आहेत, कीं जेथें लोक स्वतः ह्या विषयाविषयीं विचार करीत नाहींत; तर सरकार त्याविषयीं विचार करून कांहीं कायदे ठरवितें, व तेणेंकरून प्रजातिवृद्धीस प्रतिबंध होतो. कांहीं देशांत लग्न करूं इच्छिणाऱ्या स्त्रीपुरु-षांनीं आपणांस आपला व आपल्या भावी कुटुंबाचा, चांगला निर्वाह करण्याचें सामर्थ्य आहे, असें दाखवल्यावांचून त्यांस लग्न करण्याची परवानगी मिळत नाहीं. कांहीं देशांत प्रत्येक तरुण पुरुषानें पंचवीस किंवा तीस वर्षांचें वय होईतोंपर्यंत लष्करांत शिपाईपणाचें काम करावें असा कायदा असतो, ह्यास्तव त्यांस त्या मुदतीचे आंत लग्न करण्याची मनाई असते. कोठें कोठें सरकारी कायदा प्रतिबंधक नसतो; परंतु देशाची कांहीं एकादी विशेष चाल असते, तिनें प्रजातिवृद्धीस अटकाव होतो. मारवाडी लोकांत व गुजराथी लोकांत अशी चाल आहे, म्हणून सांगतात, कीं पुरुषानें मुलीस दोन चार हजार रुपये स्त्रीधन दिल्यावांचून त्याचें लग्न होत नाहीं; व ह्या चालीस्तव त्यास लग्न होण्याच्या पूर्वी तितके रुपये मिळवावे लागतात; तेणेंकरून त्याच्या लग्नास अर्थातच विलंब होतो. युरोपांत कांहीं देशांत अशी चाल आहे म्हणून सांगतात, कीं मुलीनें आपणाकरतां सूत काढून कांहीं वस्त्रें तयार केल्यावांचून लग्न करूं नये. तेणेंकरून तेथील मुलींचीं लग्नें फार उशीरानें होतात. इंग्लंडांतही हल्लीं कित्येक

स्थळीं विचार करून लग्नें करतात. ह्याचें प्रमाण असें आहे, कीं व्यापार व उदीम त्या देशांतील ज्या प्रांतांत फार आहे, तेथील लोकांत जेव्हांजेव्हां व्यापाराची मंदी असते, तेव्हांतेव्हां लग्नें नेहमींपेक्षां फार थोडीं होतात. ह्याप्रमाणें प्रजावृद्धीस प्रतिबंधकें अनेक ठिकाणीं अनेक असतात.

लोकसंख्येच्या वृद्धीचा प्रतिबंध होऊन ती संख्या संकुचित मानानें राहाण्याचीं कारणें कोणतीं असोत, त्या कारणांचा प्रतिबंध दूर झाला असतां ती संख्या वाढण्याची जी मनस्वी अनुद्भूत शक्ति मनुष्यांच्या ठायीं आहे, ती आविर्भूत होण्यास किंचित्‌ही विलंब लागत नाहीं. तीं प्रतिबंधकें दूर होण्याचाच सर्व काळ अवकाश असतो. मजुरी करून पोट भरणाऱ्या लोकांची स्थिति सुधारण्याजोगी गोष्ट घडली असतां, तेणेंकरून बहुतकरून इतकेंच होतें, कीं कांहीं काळमात्र त्यांस निर्वाहापेक्षां अधिक संपत्त्यंश मिळून तो अनुभवायास सांपडतो; व पुढें लवकरच त्यांची एकंदर संख्या वाढून त्यांस आवश्यक जें लागतें, व त्यांस जी मजुरी मिळते, त्यांच्यामधलें अंतर नाहींसें होऊन जातें. ह्या परिणामाखेरीज दुसरा परिणाम सुधारणुकेपासून क्वचित् घडतो. आणि असें झाल्यानें त्या सुधारणुकेचा लाभ त्या लोकांच्या पुढल्या पिढीस मुळींच होत नाहीं. ह्याकरतां साधारण लोकांची सुखकारक निर्वाहाविषयींची समजूत बदलून, त्यांस विशेष सुखकारक निर्वाहाची गोडी व संवय बळकट लागून, तें विशेष सुख आपणास अवश्य असावें असें वाटूं लागल्यावांचून, त्यांची अवस्था चिरकाळ सुधारण्याजोगी गोष्ट होणें अशक्य, हें सुखकारक व आवश्यक निर्वाहाचें त्यांचें मान वाढल्याखेरीज श्रमाचें उत्पादकत्व वाढण्याचे मोठमोठे उपाय केले असतांही, त्यांचा चरम परिणाम इतकाच होतो, कीं तें उत्पादकत्व वाढल्यानें देशांत किंवा जगांत लोक मात्र अधिक होतात, परंतु त्यांचें सुख कांहीं पहिल्यापेक्षां अधिक वाढत नाहीं. अवश्य निर्वाहाचें मान, ह्या शब्दांनीं इतकेंच समजावयाचें, कीं त्या मानानें निर्वाह होत आहे, तोंपर्यंत लोकांचीं लग्नें करून कुटुंब वाढण्याविषयीं प्रवृत्ति व्हावी, परंतु त्या मानाखालीं स्थिति जाण्याचा संभव दिसत असल्यास त्यांची त्या लग्नादि व्यापारापासून निवृत्ति व्हावी; त्या लग्नादिकांच्या सुखाकरतां त्यांनीं निकृष्टावस्था पतकरूं नये. लोकांचें ज्ञान जसजसें वाढत जातें, जसजशा त्यांच्या रीतिभाती सुधारत जातात, जसजसे त्यांमध्यें दया, उदारता, स्वातंत्र्य-प्रीति, वगैरे गुण उत्कर्षास येतात; व जसजशी त्यांस उत्तम प्रकारच्या सुखांची गोडी लागते; तसतसें त्यांचें सुखकारक स्थितीचें मान वाढतें, व युरोप खंडांतील पश्चिमभागचे इंग्लंड फ्रान्स वगैरे देशांत हें मान हळूहळू वाढत चाललें आहे, ह्यांत संशय नाहीं. इंग्लंडांत धान्यादि खावयाचे पदार्थ गेल्या सोळा वर्षांत जितके जलद वाढले तितके जलद पूर्वी कधींच वाढले नव्हते; तथापि सन १८४१ ह्या वर्षीं जी खानेसुमारी झाली, तीवरून असें दिसतें कीं सन १८३१ ह्या वर्षांतल्या खानेसुमारीपेक्षां धान्यादिकांच्या वृद्धीच्या मानानें प्रजा कमी वाढली. तसेंच फ्रान्स देशांत शेतकीचें व व्यापारादिकांचें उत्पन्न वर्धमान प्रमाणानें वाढत असतां, त्या देशांत पांच पांच वर्षांच्या अंतरानें खानेसुमारी होते; तीवरून एकंदर लोकसंख्येच्या मानानें पाहातां नवीन प्रजा कमी उत्पन्न होत आहे, असें दिसतें.

ह्या प्रजावृद्धीचा विषय श्रम करून उपजीवन करणाऱ्या लोकांच्या स्थितीच्या संबंधेंकरून विचारांत आणखी एकदां यावयाचा आहेच. प्रकृतस्थलीं संपत्त्युत्पत्तीस कारण जो श्रम, त्याच्या संबंधेंकरून मात्र ह्या विषयाचा विचार आपणास कर्तव्य होता, आणि त्यासंबंधानें विचार करीत असतां, आपले पूर्णपणें लक्ष्यांत आलें, कीं प्रजावृद्धीची केवळ शक्ति म्हटली तर ती मनुष्यांच्या ठायीं अमर्याद आहे; व असें असतां त्या शक्तीचा आविर्भाव कोणत्या कारणांनीं होत नाहीं, व वास्तविक प्रजासंख्या थोडी असते, ह्याच्या कारणांचें निरुपण बरेंच केलें. ह्याप्रमाणें ह्या विषयाचें संक्षिप्त विवेचन झालें. आतां पुढें उत्पन्नाचें दुसरें कारण जें भांडवल त्याविषयीं विचार करूं.

## भाग अकरावा.

# भांडवलाची वृद्धि ज्या नियमानें होते, त्याचा विचार.

संपत्ति उत्पन्न होण्याचीं मुख्य जीं तीन कारणें – श्रम, भांडवल, आणि जमीन–सांगितलीं, त्यांत पहिलें कारण श्रम, त्याच्या न्यूनतेमुळें संपत्तीचे वृद्धीस प्रतिबंध होत नाहीं, असें मागल्या भागांत सिद्ध झालें. श्रमाच्याच संबंधानें पाहातां, संपत्तीचें उत्पन्न अमर्यादपणें व क्षीण न होणाऱ्या त्वरेनें सुद्धां वाढण्यास प्रतिबंध नाहीं. श्रम करणारीं जीं मनुष्यें त्यांच्या ठायीं एकसारखें व भूमितिप्रमाणानें त्वरित वाढण्याची योग्यता आहे. संपत्युत्पत्तीचें मुख्य कारण जर श्रमच असतें, तर संपत्तीसही त्या कारणाच्याच प्रमाणानें वाढण्याची योग्यता असती; आणि त्यापक्षीं तिच्या वृद्धीस मर्यादा काय ती एकच राहती. ती हीच, कीं मनुष्यें वाढून वाढून पृथ्वी भरून अधिक मावण्यास अवकाश नाहींसा होऊन मनुष्यवृद्धि व तन्मूलक संपत्तिवृद्धि हीं दोन्हीं खुंटतीं.

परंतु संपत्तिवृद्धीस श्रमच कारण नाहीं. तीस आणखी दुसरीं कारणें आहेत. त्यांत प्रकृत भागांतविचारणीय भांडवल होय. ह्या दुसऱ्या कारणाच्या (भांडवलाच्या) योगानें पहिल्या कारणाचें (श्रमाचें) नियमन होतें. प्रकृत श्रमाचें फल उत्पन्न होईतोंपर्यंत जितक्या लोकांचें उपजीवन गतश्रमाच्या संचित फलाच्या योगानें होतें, त्यापेक्षां अधिक लोक कोणत्याही देशांत असावयाचे नाहींत. तसेंच, कोणत्याही देशांत उत्पादक श्रमकर्त्यांची जी संख्या असावयाची तीही, गतश्रमाच्या संचित फलाचा जितका अंश त्या फलाच्या मालकांनीं पुढें भावि संपत्ति उत्पन्न करण्याकडे लावायास ठेविला असतो, व ज्या अंशास भांडवल म्हणतात, त्या अंशाच्या अनुरोधानें असते. ह्या अंशानें जितक्यांचें उपजीवन होण्याजोगें असतें, त्यांपेक्षां अधिक उत्पादक श्रमकर्ते कोणत्याही देशांत असणें अशक्य. ह्याकरतां श्रमकर्त्यांच्या संख्येचें नियमन करणारें जें भांडवल, तें कोणत्या कारणांनीं वाढतें, व त्या वृद्धीची त्वरता कोणत्या कारणांनीं नियमित होते, व त्या वृद्धीचाच स्वतः अवधि कोणता ह्या सर्व विषयांचा विचार आतां करतों.

भांडवल सर्वत्र संग्रह केल्यापासून होतें, त्यास दुसरें कारण नाहीं; आणि संग्रह करणें, म्हणजे भावी लाभाच्या प्राप्तीकरतां प्रकृत उपभोगाचा अवरोध करणें होय. दोन गोष्टींवरून असें दिसतें, कीं भांडवलाची वृद्धि होणें ती, दोन कारणांच्या अधीन आहे. एक कारण, ज्या धनांशांतून संग्रह करतां येतो त्या धनांशाची इयत्ता व दुसरे कारण संग्रह करण्याच्या, म्हणजे पुढील नफ्याकरतां हल्लींचा उपभोग सोडण्याच्या, इच्छेचें उत्कटत्व.

ज्या धनांशांतून संग्रह करतां येतो, तो धनांश म्हटला, म्हणजे संपत्ति उत्पन्न करण्यास ज्या मनुष्यांचा श्रम साक्षात् किंवा परंपरेने लागतो, त्या सर्वांचे अंश, सर्व श्रमाच्या एकंदर उत्पन्नांतून वजा होऊन जी बाकी राहती, व जिला निर्के उत्पन्न म्हणतात, ती होय. ह्या बाकीपेक्षां, म्हणजे निव्वळ उत्पन्नापेक्षां, अधिक संग्रह कदापि व्हावयाचा नाहीं. आतां, ह्या सगळ्या निव्वळ उत्पन्नाचाही संग्रह होत नाहीं खरा; परंतु तो केला असतां व्हावयाजोगा आहे. उत्पादक श्रम करणाऱ्यांस केवळ निर्वाहाखेरीज सुखोपभोगाचे जे पदार्थ लागतात, ते ह्या उत्पन्नांतूनच होतात. तसेंच जे लोक संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांत साक्षात् किंवा परंपरेने उपयोगीं पडत नाहींत, त्यांचेंही उपजीवन वगैरे ह्याच

उत्पन्नांतून होतें. तसेंच, मांडवलाची वृद्धि व्हावयाची, तीही ह्यांतूनच व्हावयाची. निव्वळ उत्पन्न ह्या शब्दानें मांडवलवाल्यासच खर्चवेंच जाऊन जो धनांश राहतो, तो अंश असा अर्थ घेतला असतां एकेक मनुष्यास लक्षून तो अर्थ बरोबर आहे. परंतु सर्व देशाचें निव्वळ उत्पन्न म्हटलें, म्हणजे त्यांत तितक्याच अर्थाचा संग्रह करून चालत नाहीं; त्यापक्षीं प्रत्येक मांडवलवाला आपल्या मजुरांस जी मजुरी देतो, व त्या मजुरींतून त्यांचा निर्वाह होऊन जो अंश त्यांस राहातो, व ज्या अंशाचा ते उपभोग करतात, किंवा संग्रह करतात, त्याही अंशाचा अंतर्भाव निव्वळ्या उत्पन्नांत केला पाहिजे. व हा व्यापक अर्थ घेतला असतांच देशाच्या निव्वळ्या उत्पन्नावरून तेथील लोकांच्या श्रमाच्या वास्तविक उत्पादकत्व-शक्तीचें खरें अनुमान करतां येतें; म्हणजे त्या उत्पन्नाच्या इयत्तेवरून त्या देशांतील लोकांस, व सरकारास, लोकोपयुक्त कीं, रस्ते, कालवे, बंदरें, वगैरे बांधणें, विद्यालयें घालणें, देशाचा बंदोबस्त ठेवणें, वगैरे कामें, तीं करण्याची शक्ति किती असेल, व सरकारास आपल्या कामगार लोकांस वेतनें ल्हान किंवा मोठीं देतां येतील, किंवा लोकांस सुखाच्या व ऐषआरामीच्या पदार्थांचा उपभोग कितपत करतां येईल, व उत्तरोत्तर देशांतील मांडवल वाढेल किंवा नाहीं; इत्यादि सर्व गोष्टींची अटकळ बांधतां येते.

हें जें निव्वळ उत्पन्न, म्हणजे श्रमकर्त्यांस आवश्यक निर्वाहास जें लागतें, तें त्यांच्या श्रमाच्या उत्पन्नांतून वजा करून खालीं राहिलेली शिल्लक, त्याची इयत्ताही संग्रहाच्या इयत्तेच्या नियामक कारणांतलें एक कारण होय. श्रम करणाऱ्यांच्या आवश्यक निर्वाहास जाणारा अंश वजा होऊन खालीं शिल्लक राहाणारें उत्पन्न जसजसें अधिक, तसतशी देशास संग्रह करण्याची शक्तिही विशेष; व ही निव्वळ्या उत्पन्नाची इयत्ता संग्रह करण्याच्याच शक्तीची नियामक आहे, असें नाहीं; तर कांहीं अंशी ती वास्तविक संग्रहाच्या इयत्तेचीही नियामक होते. मनुष्याची संग्रह करण्याविषयीं प्रवृत्ति होण्यास जे हेतु आहेत, त्यांमध्यें संग्रह केल्यापासून पुढें नफा होण्याची जी दृष्टि असते, ती एक हेतु आहे. संग्रह करून झालेलें मांडवल कामांत घालून त्या मांडवलाइतकेंच उत्पन्न झाल्यास तसें होऊन उपयोग नाहीं; तर मांडवलापेक्षां कांहीं अधिक उत्पन्न झालें पाहिजे. त्या अधिक उत्पन्नास नफा असें म्हणतात. तो नफा जसजसा अधिक असतो, तसतशी संग्रह करण्याची इच्छा विशेष उत्कट असते; आणि तो जसजसा कमी, तसतसें इच्छेचें उत्कटत्वही कमी असतें. आतां यद्यपि ज्या संपत्त्यंशाचा संग्रह करतां येतो, असे जें देशांतील श्रम करणारे मांडवलवाले, व जमीनदार, ह्यांचें निव्वळ उत्पन्न, त्याच्या इयत्तेवर संग्रह करण्याच्या इच्छेचें उत्कटत्व असत नाहीं; तर त्या निव्वळ्या उत्पन्नाचा जो भाग मांडवलवाल्यांस प्राप्त होतो, ज्यास मांडवलाचा नफा असें म्हणतात, त्याचे इयत्तेवर तें आहे. तथापि ह्या विषयाचें जें पुढें सविस्तर विवरण करावयाचें आहे, त्यापूर्वीं इतकें वाचणाऱ्यांच्या लक्ष्यांत सामान्यरूपानें येईल, कीं श्रम व मांडवल ह्या दोहोंच्याही उत्पन्नाची इयत्ता वाढविली असतां, मांडवलवाल्याचा जो अंश, नफा, तोही वाढण्याचा बहुतकरून संभव असतो. आतां एकंदर वाढवलेल्या निव्वळ्या उत्पन्नापैकीं श्रमकर्त्यांचा वाटा किती वाढतो, व मांडवलवाल्याचा किती वाढतो, ह्याचें नियमित प्रमाण असत नाहीं. कधीं कधीं एक अधिक असतो, किंवा दुसरा अधिक असतो; व कधीं कधीं दोनही सारखे असतात.

संग्रह करण्याविषयीं जी मनुष्याची प्रवृत्ति होते, ती तो करण्यापासून होणाऱ्या नफ्याची जी इयत्ता तद्रूप बाह्य प्रवर्तक कारणांवरच सर्वथैव असते असें नाहीं. संग्रह करण्यापासून द्रव्यरूप लाभ होण्याचा सारखाच संभव असतांही, तो करण्याची प्रवृत्ति निरनिराळ्या व्यक्तींत व निरनिराळ्या लोकांत निरनिराळी असते. संग्रह करण्याच्या कार्यक्षम इच्छेचें उत्कटत्व प्रतिव्यक्तीच्या स्वभावभेदेंकरून भिन्नभिन्न असतें, इतकेंच नाहीं, तर तें भिन्नभिन्न लोकांच्या स्थितिभेदेंकरून व त्यांच्या ज्ञानादि भेदेंकरूनदेखील भिन्न असतें. प्रीति, क्रोध, द्वेष, इत्यादि अन्य अंतःकरणवृत्तींप्रमाणें, ही संग्रहेच्छारूप अंतःकरण-

वृत्तिही, मनुष्यांचे ठायीं त्यांच्या अवस्थापरत्वें व त्यांच्या ज्ञानादिपरत्वें न्यूनाधिक भावानें असते.

मागल्या भागांतला प्रजावृद्धीचा विचार, तसाच प्रकृत भागांतला संग्रहेच्छेच्या वैचित्र्याचा विचार, असल्या विषयांचें यथास्थित व सविस्तर विवेचन करणें म्हटलें, म्हणजे त्यास स्वतंत्र ग्रंथ हवेत. परंतु तसें असतांही, मागल्या भागांत प्रजावृद्धीच्या नियमांचें निरूपण करतांना माल्थसच्या ग्रंथांतला जसा सारांश सांगितला; तसा प्रकृत विषयावर सर्वोत्तम ग्रंथ रे नामक एका अमेरिकन ग्रंथकारानें लिहिला आहे, त्यांतला सारांश येथें लिहितों.

संग्रह करणें म्हटलें, म्हणजे सर्वकाल त्याच्या पोटांत भावी लाभाकरतां प्रकृत उपभोगाचा त्याग करणें, हा अंश असतो. आतां हा त्याग करण्यांत सर्वदा सारखें हित असत नाहीं. त्या हिताचा अवस्थाभेदेंकरून व प्रसंगभेदेंकरून न्यूनाधिकभाव फार असतो; व तो त्याग करण्याच्या इच्छेचा तर न्यूनाधिक भाव पुरुषभेदेंकरूनही फारच असतो.

प्रकृत उपभोग व भावी लाभ ह्या दोहोंची तुलना करूं लागलें असतां, भावी सर्व पदार्थांच्या ठायीं जो अनियमितपणा असतो, तो द्वितीय पक्षास न्यूनत्व आणतो, ह्याकरतां त्या अनियमितपणाचा विचार ह्या तुलनेंत मुख्य होय. हा अनियमितपणा सर्व पदार्थांविषयीं सारखा असत नाहीं. तो फार न्यूनाधिक भावानें असतो. ह्यास्तव भावी लाभाकरतां केलेल्या उद्योगापासून होणाऱ्या फलाचा उपभोग आपणांस किंवा आपल्या इष्टांस प्राप्त होण्याचा संभव ज्या ज्या गोष्टीनें वाढतो त्या त्या गोष्टीस, वास्तविक पाहातां, कार्यक्षम संग्रहेच्छेचें उत्कटत्व वाढण्यास कारणत्व मानलें पाहिजे; व असें आहे, म्हणून देशांतील हवा, किंवा कर्तव्यरोजगार, हीं प्रकृतीस मानवण्याजोगीं असलीं, म्हणजे तेणेंकरून संग्रह करणारा पुष्कळ दिवस वांचण्याचा संभव वाढतो, व तेणेंकरून त्या गोष्टी संग्रह करण्याची इच्छा विशेष उत्कट होण्यास कारण होतात. जेथील हवा रोग उत्पन्न करते, अशा देशांत जे लोक राहातात, किंवा ज्यांत जिवास धोका घडण्याचा संभव फार, असे रोजगार जे करतात, त्या लोकांपेक्षां, प्रकृतीस मानवणाऱ्या हवेच्या देशांत राहाणाऱ्या लोकांची, किंवा ज्यांत अपाय नाहीं असे धंदे करणाऱ्या लोकांची, संग्रह करण्याकडे प्रवृत्ति विशेष असती, लष्करांत शिपायांचा, किंवा आरमारावर खलशाचा, रोजगार करणारे लोक अतएवच उधळे होतात. वेस्त इंदीज, न्यू आर्लियन, हिंदुस्तान, इत्यादि देशांत राहाणाऱ्या लोकांचा खर्चिकपणा इतका अधिक असतो, तो ह्याच कारणावरून. ह्याच देशांतले लोक ते देश सोडून युरोपखंडांतल्या निरोगी देशांत येऊन तेथें स्थायिक झाल्यास, व त्यांस उधळेपणा व्यसनादाखल जडला नसल्यास, तेच लोक अधिक काटकसरीनें वागूं लागतात, असें अनुभवास आलें आहे. लढाया व सांती ह्यांपासून त्या बंद झाल्यावर पुढें अनर्थ जे घडतात, त्यांत व्यर्थ खर्च व ऐषआरामींत अतिशय खर्च, हे दोन अनर्थ बहुत करून नियमानें घडत असतात. तसेंच ज्या ज्या गोष्टींच्या योगानें मनुष्यांच्या व्यापारास निर्भोकपणा विशेष येतो, ती ती गोष्ट त्यांच्या संग्रह करण्याच्या इच्छेस विशेष उत्कटत्व आणणारी होते, ह्याची ही उपपत्ति वर सांगितल्या नियमाप्रमाणेंच होते. कारण, तसें झालें म्हणजे मनुष्यांस स्वकृत प्रयत्नाचें फल प्राप्त होण्याचा संभव अधिक वाढतो. चोंहीकडे एक कायदा चालून व्यवस्था होणें, दंगेधोपे बंद होऊन देशांत बहुत वर्षे स्वस्थता असणें, ह्या गोष्टीही अतएवच संग्रह करण्याची बुद्धि लोकांत वाढण्यास कारण होतात. देशांत मालमत्तेचें संरक्षण जसजसें ज्यास्ती होऊं लागतें, तसतसें संग्रह करण्याच्या इच्छेस उत्कटत्व विशेष येतें. जेथें मालमत्तेस धोका फार, किंवा जेथें मोठमोठ्या दौलती राजकीय कारणानें वगैरे वारंवार मोडतात, तेथें संचय करणारे फारच थोडे असतात; व जे कांहीं थोडे असतात त्यांपैकीं बहुतांची मोठा नफा असल्यावांचून प्रकृतोपभोगाचा प्रबल मोह टाकून संदिग्ध जो भावी लाभ तो मिळविण्याविषयीं झटण्याची प्रवृत्ति होत नाहीं.

संचय करणें, म्हणजे प्रकृतोपभोगास योग्य अशी हातांतली तयार झालेली संपत्ति पुढल्या स्वार्थाकरतां सोडणें, होय. तर विचार करणारा हें संचयरूप कृत्य करूं लागला असतां, त्याच्या दृष्टीनें दोनही विरुद्ध पक्षांस (म्हणजे प्रकृतोपभोग आणि भावी लाभ यांस) बलाबल आणणाऱ्या ज्या गोष्टी असतात, त्यांचें हें कथन वर केलें. परंतु सर्व मनुष्यांची सर्वदा विचारानेंच इतर गोष्टींविषयीं जशी प्रवृत्ति होत नाहीं, तशी संग्रह करण्याविषयींही होत नाहीं. विचाराच्याच अनुरोधानें जितका संग्रह करावा असें दिसतें, त्यापेक्षां फारच कमी करणारे पुष्कळ आहेत; व त्यापेक्षां अधिक करणारेही अनेक आहेत. दोनही मनुष्यांस संचय करण्यापासून सारखें हित असतां, एक अगदीं उधळ्या असतो, तो मुळींच संचय करीत नाहीं; व दुसरा अगदीं कृपण असतो, तो जेथें खर्च करावा, तेथेंही न करतां सर्व मिळकतीचा संचय करतो. तेव्हां ह्या विचारावरून असें दिसतें, कीं संचय करण्याविषयींच्या प्रवृत्तीस तो करणाऱ्या मनुष्याचा स्वभाव व त्याचा समजूतदारपणा हींही कारण आहेत.

संग्रहेच्छा मनुष्यांत कमी असण्यास कारणें दोन आहेत. तीं हीं, कीं एक पुढील काळजी नसणें, किंवा दुसऱ्याविषयीं आस्था नसणें. त्यांत पुढील काळजी असणें हें मनुष्याच्या स्वभावाच्या अनुरोधें-करून व त्याच्या ज्ञानाच्या अनुरोधेंकरून असतें. ज्या लोकांस ज्ञान कमी, त्या लोकांस पुढील काळजी बहुतकरून कमी असती. थोडीबहुत दीर्घ दृष्टि येण्यास व अविद्यमान, व विशेषेंकरून भावी, ज्या गोष्टी हितावह, किंवा अहितावह असतात, त्या अंतःकरणांत थोड्याबहुत तरी बिंबण्यास मनुष्याची बुद्धि कांहीं तरी वाढली पाहिजे. दुसऱ्याविषयीं अनास्था असली, म्हणजे संग्रहेच्छा कमी असते; ही गोष्ट ह्यावरून सिद्ध दिसते, की हल्लीं जगांत कितीएक लोक संग्रह करतात, त्यापासून त्यांचें हित तादृश असत नाहीं; दुसऱ्याचें हित असतें. जसें, मुलास विद्या शिकविणें, किंवा धंदा शिकविणें, त्यांची पुढील स्वस्थता करून ठेवणें, किंवा आपले आत्मीय इष्टमित्र ह्यांचें कल्याण होण्याचा प्रयत्न करणें, किंवा विहीरी बांधणें, तळीं बांधणें, शाळा घालणें, अन्नछत्रें घालणें, वगैरे लोकोपकारक जीं कामें तीं करणें; असलीं कामें करण्याकरितां जे संग्रह करतात, ते परार्थबुद्धीनें करतात, असें म्हटलें पाहिजे. सर्व लोक केवळ स्वार्थपरायण होऊन दुसऱ्याविषयीं सर्वथैव उदासीन झाल्यास, त्यांच्या हातून फारसा संचय कदापि होणार नाहीं. त्यांच्या जिवांत जीव आहे, तोंपर्यंत ददात नसावी, इतकीमात्र पुढील चिंता त्यांस राहील, हीपेक्षां अधिक राहणार नाहीं. ह्यास्तव तशा समजुतीचे लोक, आपल्या संपत्तीचा आपणास जितका उपभोग घेववेल, तितका घेतील. इतकें मात्र धोरण ते ठेवतील, कीं आपण व आपली संपत्ति दोहींचा अंत एककाळीं व्हावा; म्हणजे संपत्ति आपण असतां मात्र नाहींशी होऊं नये. ह्या प्रकारच्या स्थितीच्या जवळ जवळ, रोमन लोकांची पादशाही बुडाली, त्या वेळेस त्यांची स्थिति झाली होती.

ह्या वर सांगितलेल्या स्वभावदोषांमुळें, व बुद्धीच्या संकोच्यामुळें मनुष्यांच्या संग्रहवासनेंत पराकाष्ठेचाच न्यूनाधिक भाव उत्पन्न होतो. कांहीं देशांतील लोकांत विद्याचाराचा प्रसार सामान्य मुखानें झाला नाहीं. तो न होण्यास संग्रहवासनेची ही न्यूनता हें एक मोठें कारण आहे. परंतु हें कारण इतर कारणांप्रमाणें विचार करणाऱ्यांच्या लक्ष्यांत तितकें स्पष्टपणें येत नाहीं. जे अनाडी लोक पारध करून उपजीवन करीत असतात, त्या लोकांस पुढील विचार अर्थात्च असत नाहीं. कारण, ते लोक त्या अज्ञानावस्थेंत असले म्हणजे त्यांस पुढें काय होईल, हें निश्चितपणें कळत नसतें. ही एक गोष्ट. कदाचित् कांहीं गोष्टी त्यांस कळल्या तरी त्यांचें निवारण करण्याचें, किंवा त्या अमुक प्रकारें घडवून आणण्याचें त्यांस ज्ञान व सामर्थ्य नसतें. ह्याप्रमाणें द्रव्यादि सामर्थ्यांच्या योगानें पुढील गरजा पुरवण्याची तजवीज करण्याविषयीं प्रवृत्ति होण्यास अज्ञान मनुष्यास कांहीं उद्देश नसतो; व तो नसून आणखीही एक गोष्ट त्यांच्या ठायीं कमी असती ती ही, कीं त्यांस विचार करण्याची व उद्योग करण्याची सवय

नसते. व विचार करण्याची संवय वगैरे नसल्यामुळें ती संवय ज्यांस असते, त्यांस त्या गोष्टी एकमेकांपासून दूर असल्या तरी त्यांचा कार्यकारणभावरूप संबंध जसा स्पष्ट समजतो; व कधींकधीं विवक्षित कार्य व विवक्षित कारण ह्यांच्यामध्यें अनुक्रमानें कितीएक गोष्टी घडून तद्वारा त्या कार्यकारणांचा संबंध असतो, तो सर्व संबंध, असा विचार करणाऱ्यांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट उभा राहातो; तसे ते संबंध वगैरे ज्यांस विचार करण्याची वगैरे संवय नसते, त्यांस स्पष्ट दिसत नाहींत. ह्याकरतां त्या तसल्या अज्ञान लोकांच्या मनांत संग्रह करण्याचा उद्देश येण्याकरतां त्यांस कोणत्याही गोष्टीचा कार्यकारणभाव कोणी समजावून दिला, तरी तो त्यांच्या मनांत पूर्णपणीं ठसण्याकरतां त्यांस नेहमीं विचार करण्याची व ऊहापोह करण्याची संवय लागली पाहिजे.

ह्यास उदाहरण,– उत्तर अमेरिकेंत सेंट लॉरेन्स नदीचे कांठावर इंदियन लोकांचीं लाहान लाहान पुष्कळ खेडीं आहेत. ह्या खेड्यांभोंवतालीं आंतलें रान तोडून मोकळी केलेली अशी जमीन पुष्कळ असते, व त्यांच्या हद्दींत मोठमोठालीं रानेंही पुष्कळ असतात. तथापि ते लोक त्या जमिनीची लागवड करतात, अशी गोष्ट फार क्वचित् घडते; मुळींच करीत नाहीत, असें सुद्धां म्हटलें तरी चालेल. आतां रान तुटून आयती मैदान झालेली जी जमीन असते, तिची ही गत; मग जेथें रान आहे, तें तोडून शेतकीजोगती नवीन जमीन त्यांच्या हातून तयार होण्याची वार्ता कशास पाहिजे? आयती तयार झालेली जमीन असते, ती चांगली पिकाऊ असते, व पिकाऊ नसली तरी तीस पिकाऊपणा आणण्यास त्या लोकांच्या खोंपट्याभोंवतालीं खताचे ढीगचे ढीग पडलेले असतात. प्रत्येक कुटुंबांतील मनुष्यांनीं तींतल्या अर्ध्या अर्ध्या एकर जमिनीस कुंपण घालून तिची मशागत करून तींत बटाटे किंवा मका लावल्यास, तितके जमिनींत झालेल्या उत्पन्नावर त्यांची साहा महिन्यांची बेगमी होईल. बरें, त्यांस खावयास पुष्कळ असतें म्हणून ते हा श्रम करीत नाहींत, असें म्हणावें, तर तसेंही नसतें; त्यांस वारंवार खाण्याची वाण अशी पडत असते कीं त्या वाणीमुळें, व खावयास मिळेल, त्या वेळेस अनियमित खाल्ल्यामुळे, त्या लोकांची संख्या उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. हें त्यांचें औदासिन्य त्यांस श्रम करण्याचा त्रास असल्यापासून येतें, असें अगदीं म्हणतां येत नाहीं. कारण श्रमाचें फळ जर तात्कालिक व्हावयाजोगें असलें, तर ते जीव लावून मोठी मेहनत करतात. ह्यावरून त्यांस श्रम करण्यास नको, असें कल्पतां येत नाहीं. ते लोक पारधीचें व मासे धरण्याचें काम मोठ्या हौसेनें करतात; व ह्याखेरीज सेंट लॉरेन्स ह्या नदीवर नावाड्याचें काम करणारे ते लोक पुष्कळ आहेत. ह्या शेवटच्या कामांत वल्हीं मारणें, किंवा लांब वांसा घेऊन त्यानें नाव चालवणें, इत्यादि कामें मोठीं कष्टाचीं आहेत; तरी पुष्कळ इंदियन लोक तीं कामें करतात. त्यांस शेतकीचा त्रास असेल, ह्यामुळें असें होतें म्हणावें, तर तें म्हणणेंही जमत नाहीं. ह्या लोकांस कांहीं वेड्या समजुतीमुळें शेतकीचा त्रास कांहींसा असतो खरा; परंतु वेड्या समजुती स्वाभाविक नव्हत; त्या नफा दिसूं लागला असतां फार दिवस कोणाचे ठायींही टिकत नाहींत. शेतकी करून फल मोठें असून तें लवकर प्राप्त होत असल्यास, ते इंदियन लोक शेतकीही करतात. सेंट फ्रान्सिस नामक एक मोठें सरोवर आहे. त्या सरोवरांत कांहीं लहान लहान बेटें आहेत. त्या बेटांत मका चांगला होतो. तो इतका चांगला कीं एक शेर बीं पेरलें, तर तें शंभरपट होतें; व मका अर्धाकच्चा असतो, तेव्हांपासून तो खावयाचे चांगला उपयोगी पडतो. ह्यास्तव त्या बेटांत जवळचे जवळचे इंदियन लोक वर्षास मक्याची लहान लहान वावरें करतात. हीं वावरें तळ्यांत असल्यामुळें तेथें गुरें जाऊं सकत नाहींत. सबब त्यांस कुंपणें करण्याची गरज नसते; परंतु हीं कुंपणें जर करावीं लागतीं, तर ते तीं वावरें कदाचित् न करते. कारण त्यांच्या गांवांच्या जवळ जीं पडित मैदानें आहेत, त्यांत पूर्वी लागवड होत होती, अशीं चिन्हें दिसतात. परंतु पुढें युरोपियन लोक जेव्हां त्यांच्या शेजारीं जाऊन राहिले, तेव्हांपासून त्या शेतांत चांगलीं कुंपणें नसत,

म्हणून त्या युरोपियनांचीं गुरें तीं धान्यें खाऊं लागलीं. ह्या करतां त्या इंदियन लोकांनीं तीं शेतें करण्याचीं सोडलीं; परंतु कुंपणें घालण्याची अधिक मेहनत केली नाहीं. कुंपणें घालून शेतें करण्यास जी मेहनत लागते, तिचें पूर्ण फळ उत्पन्न होण्यास विशेष विलंब लागतो; व तितक्या विलंबानें फळ उत्पन्न होई तोंपर्यंत धीर धरण्याजोगी त्या लोकांची संग्रह करण्याची इच्छा उत्कट नाहीं.

ह्यास्थळीं ही पुढील गोष्ट सांगतों, हिकडे वाचणाऱ्यांनीं लक्ष्य द्यावें. ती गोष्ट ही, कीं हे इंदियन लोक जेथें शीघ्र फळ व्हावयाजोगें असतें, तेथें कष्ट करण्यास अगदीं मागेंपुढें करीत नाहींत. ज्या लहानलहान शेतांची ते लागवड करतात, त्यांची ते फारच मशागत करतात. ही मशागत अशी, कीं ते तीं शेतें चांगलीं खणतात, व त्यांत गवत व रानझाडें अगदीं राहूं देत नाहींत. ह्या कामांत यत्किंचित हयगय केली असतां शेतांचें उत्पन्न फार कमी होतें, ही गोष्ट त्यांस फार दिवसांच्या अनुभवानें पुरी समजली आहे. ह्यास्तव त्या अनुभवाप्रमाणें ते वागतात. ह्यावरून हें स्पष्ट दिसतें, कीं ते लोक जी मोठी शेतकी करीत नाहींत, ती त्यांस त्या कामास आवश्यक जी मेहनत ती करण्याच्या त्रासानें करीत नाहींत असें नाहीं, तर तसल्या शेतकीचें फळ सिद्ध होण्यास उशीर लागतो, म्हणून ते ती केवळ करीत नाहींत. कांहीं कांहीं इंदियन लोक आपल्या शेतांवर जितकी मशागत करतात, तितकी जे युरोपियन लोक अमेरिकेंत जाऊन राहिले आहेत, ते सुद्धां आपल्या शेतांत करीत नाहींत. हे लोक एकाच जमिनीची वर्षोंवर्षं लागवड करतात. ह्यामुळें त्या जमिनीचा कस कमी होतो. ह्यास्तव पराकाष्ठेची मशागत करून शेतांतली माती अगदीं भुसभुसीत केल्यावांचून वगैरे त्यांत पीक चांगलें येत नाहीं. युरोपियन जे तेथें जातात, ते शेत खराबसें झालें, म्हणजे तें सोडून दुसरें शेत तयार करतात. नव्या पडीची लागवड केल्यास, तींत पहिल्या वर्षी श्रमाप्रमाणें पीक होत नाहीं खरें; परंतु दुसऱ्या वर्षापासून तेथें अधिक उत्पन्न होऊं लागून लौकर पहिल्या वर्षाचा वजाा सहज निघून अधिक नफा होतो. परंतु इंदियन लोकांच्या समजुतीप्रमाणें दुसरें वर्ष म्हणजे फार दूर; तोंपर्यंत त्यांस कसला धीर निघतो ? ते थोड्याश्या महिन्यांत फळ होत असल्यास, श्रम अधिक करतात. परंतु त्यांस थोड्या श्रमानें उशीरां होणारें काम पत्करत नाहीं.

रोमन् काथलिक धर्मांत जेसुइत नामक आश्रमाचे धर्मोपदेशक असतात; त्या धर्मोपदेशकांपैकीं कांहींकांनीं पारेग्यु येथील इंदियन लोकांस उत्तमावस्थेस आणण्याविषयीं फार चांगला प्रयत्न केला होता. त्यावरूनही वर सांगितलेली गोष्ट सिद्ध होते. त्या अनाडी लोकांचा पराकाष्ठेचा विश्वास त्या उपदेशकांवर बसला होता. हे जें जें सांगत, तें तें ते अनन्यभावानें मानून त्याप्रमाणें वागत, ह्यांनीं त्यांस युरोपांतलीं शेतकीचीं सर्व कामें शिकविलीं होतीं व त्याखेरीज त्यांपेक्षां अधिक कठीण अशींहीं कांहीं कसबें शिकविलीं होतीं. ह्या धार्मिक लोकांनीं मेहनत घेऊन त्या लोकांत कितीएक मुलामा करणारे, चितारी, मूर्तिकार, सोनार, घड्याळजी, सुतार, रंगारी, इत्यादि अनेक प्रकारचे कारागीर तयार केले; व त्यांचीं दुकानें चोहींकडे झालीं. धंद्यांत जें उत्पन्न होई, तें कारागिरांची स्वतःची मिळकत नसे. त्यांच्या सर्व एकंदर उत्पन्नावर त्या धर्मोपदेशकांची मुखत्यारी पूर्ण असे; व ते त्या उत्पन्नाचा, त्यांस वाटे, तसा विनियोग करीत; व त्यांचा त्या लोकांवर हवा तसा अम्मल चाले; आणि ते लोकही त्यांनीं सांगितलेलें मोठ्या संतोषानें ऐकत. असें असे, ह्यामुळें संपत्ति उत्पन्न होण्यास श्रम करण्याच्या त्रासापासून प्रतिबंध अगदीं नव्हता. वास्तविक प्रतिबंध म्हटला म्हणजे तो, त्या अनाडी इंदियन लोकांस पुढील चिंता नसे, तेणेंकरून होई. त्यांस दूरचा विचार करतांच येत नसे, ह्यामुळें त्यांच्या उपदेशकांस त्यांच्या व्यापारांतल्या अत्यंत बारीकसारीक गोष्टींचीदेखील रात्रंदिवस देखरेख ठेवावी लागे. ह्यास उदाहरण, त्या उपदेशकांनीं नांगराचे बैल जर त्यांच्या हवालीं केले, तर त्यांनीं ते आळसानें व अविचारानें नांगरास जुंपलेलेच ठेवावे. कधीं कधीं ते ह्याहीपेक्षां मोठा मूर्खपणा करीत; तो असा, कीं संध्याकाळीं

खाण्याकरतां त्यांनीं एकादा बैल्व मारावा. त्यांस असें वाटे, कीं तसें केल्याबद्दल उपदेशक रागें भरूं लागल्यास, आम्हांस भूक लागली, मग आम्हीं काय करावें? असें म्हटल्यावर मग आम्हाकडे अन्याय कसला आला आहे? असें होई ह्याकरतां उपदेशकांस त्यांच्या घरोघर जाऊन त्यांच्या घरांत आहे काय, व नाहीं काय, हें पाहावें लागे. कारण ते तसे न जपल्यास, इंदियन लोक कोणत्या गोष्टीविषयीं स्वतः जपत नसत. जपणें हा पदार्थ त्यांस माहीतच नसे. त्यांनीं खावयास जर एकादें जनावर मारलें, तर ह्या उपदेशकांस तेथें जवळ असावें लागे. ते नसले, तर ते (इंदियन लोक) आपापणांत मास बरोबर वांटून घेत नसत, इतकेंच नाहीं, तर कांहीं मास उगीच नाशीत. त्याप्रमाणें ते उपदेशक जपत, व देखरेख ठेवीत, व त्यांस आवश्यक निर्वाहाच्या पदार्थांची वाण पडूं नये, म्हणून तजवीज ठेवीत; तरी असें कितीएक वेळ घडे, कीं ते इंदियन लोक बियांपुरतें देखील धान्य आपणापाशीं राखून ठेवीत नसत; व त्यांची चौकशी चांगली न ठेविल्यास त्यांस कधीं कधीं उपासाची पाळी येई.

इंदियन लोकांत संग्रहेच्छा फारच थोडी आहे, व युरोप खंडांतील अर्वाचीन लोकांत ती फार उत्कट आहे; ह्या दोन अवधींच्या मध्यवर्ती स्थितीचें उदाहरण म्हटलें म्हणजे चीनच्या लोकांचें होय. ह्या लोकांच्या स्वभावांतील कांहीं गोष्टींवरून, व त्यांच्या परस्पर संबंधाच्या प्रकारावरून ते लोक एशिया खंडांतल्या इतर लोकांपेक्षां विशेष विचारी आहेत, व त्यांस मनाचा निरोध करण्याची विशेष शक्ति व संवय आहे, असें दिसतें; तथापि ह्या गोष्टींत युरोपांतल्या बहुतेक लोकांपेक्षां कमी आहेत असें पुढल्या विचारावरून सिद्ध होतें.

घरें, हत्यारें वगैरे पदार्थ टिकाऊ करण्याची चाल जेथें असते, तेथील लोकांत संग्रहेच्छा फार उत्कट आहे, असें समजलें पाहिजे. चीन देश ज्या लोकांनीं पाहिला आहे, ते असें सांगतात कीं त्या देशांत जे पदार्थ होतात, ते त्याच जातीच्या युरोपांतल्या पदार्थांपेक्षां कमी टिकाऊ असतात. जे श्रीमान् लोक असतात, ते खेरीज करून बाकीच्या सर्व लोकांचीं घरें कच्च्या विटांचीं, किंवा चिकणमातीच्या ढेंकळांचीं किंवा गिलावा केलेल्या कुडांचीं, असतात; व त्यांवर पातळ फळ्या वांद्यासारख्या दूरदूर टाकून तीं वरून ओंबवलेली असतात. ह्या असल्या घरांपेक्षां अधिक लुकसान घरांची कल्पनासुद्धां करतां येत नाहीं. त्या लोकांचीं आऊतें, व त्यांच्या घरांतलीं मांडीं, वगैरे अशाच प्रकारचीं असतात. हें सर्व सामान लांकडाचें असतें. व उपाय नाहीं तेथें मात्र त्यांस धातू लावलेली असते. ह्यामुळें हें सामान लौकर झिजून जाऊन वारंवार नवें करावें लागतें. ह्या लोकांत विशेष उत्कट संग्रहेच्छा असती, तर ते हे सर्व पदार्थ करतांना एक वेळ पुष्कळ खर्च लागला तरी तो करून ते पुष्कळ वर्षें टिकतसे चांगल्या द्रव्यांचे करते. परंतु ती इच्छा त्यांत कमी, म्हणून ते तसें करीत नाहींत; व ह्याच कारणानें ह्या देशांत पुष्कळ जमीन पड आहे; जी जमीन दुसऱ्या देशांत असती, तर तिची लागवड झाली असती. तो देश फिरून आलेले सर्व लोक असें सांगतात, कीं कितीएक दल्दली तेथें आहेत; व त्या उपयोगांत आणण्याविषयीं कोणीही प्रयत्न करीत नाहींत, दल्दल लागवडीजोगी करण्याचें जें काम आहे, तें पूर्ण होण्यास कितीएक वर्षें जावीं लागतात. पहिल्यानें तींतलें पाणी सर्व काढून टाकावें लागतें; व कांहीं दिवस त्या जमिनीस ऊन पिऊन वाळूं द्यावें लागतें; व तीस खत घालणें वगैरे अनेक गोष्टी कराव्या लागतात; व ह्या सर्व गोष्टी झाल्यावर मग त्या जमिनीस धान्य उत्पन्न करण्याची योग्यता येते. यद्यपि ही जमीन तयार झाल्यावर ती तयार करण्याकरतां जो श्रम व खर्च झाला असतो, तो चांगला सफल होण्यासारखें तींत उत्पन्न होतें खरें; तथापि तें उत्पन्न तत्काल होत नाहीं; पुष्कळ वेळानें होतें. परंतु इतका वेळ थांबण्यापुरती उत्कट संग्रहेच्छा चिनी लोकांत नाहीं. ह्यास्तव त्यांच्या हातून तसल्या जमिनीची लागवड होत नाहीं.

त्या लोकांची धान्याची वगैरे बेगमी करण्याची रीत पाहिली तर तींत ही वर सांगितलेलीच स्थिति दिसते; व मनुष्यें बेगमी करतात ती पुढें वाण न पडावी ह्या हेतूनें करतात; ह्यास्तव पुढील अडचणी दूर करण्याच्या इतर तजविजीप्रमाणेंच (म्हणजे घरें बांधणें वगैरेंच्याप्रमाणें) बेगमी करण्याचाही प्रकार त्या लोकांत आढळतो. चीन देशांत वरवेचें मुख्य धान्य तांदूळ. त्याचीं वर्षास दोन पिकें येतात; एक जून महिन्यांत व दुसरें आक्टोबर महिन्यांत. तेव्हां आक्टोबरपासून जूनपर्यंत आठ महिन्यांची बेगमी त्या देशांतील लोकांस करावी लागते. आतां ह्या लोकांस दूरदृष्टि व मनोनिग्रह करण्याची शक्ति हीं किती असतात, हें, त्यांच्या ह्या बेगमी करण्याच्या रीतीवरून दिसून येतें. आठ महिनेपर्यंत मनोनिग्रह करणें म्हणजे फार मोठी गोष्ट नाहीं; असें असतां, त्या आठ महिन्यांतसुद्धां त्या लोकांस खाण्याची वाण बहुत वेळ पडते; व कधीं कधीं त्यांस मुळींच खाण्यास मिळत नाहीं; व हें सर्व यांस दूरदृष्टि कमी, ह्यामुळें होतें; असें त्या देशांत फार दिवस राहाणारा व तेथील ल्हानमोठ्या सर्व लोकांच्या रीतीभातींची माहिती ज्यास चांगली, व स्वतः मोठा चाणाक्ष असा जो पारेनिन नामक धर्मोपदेशक, त्याचें मत आहे.

संपत्ति उत्पन्न होण्याची जी खुंटते, ती श्रमाच्या न्यूनत्वानें खुंटत नाहीं; तर दूरदृष्टीच्या न्यूनत्वानें खुंटते; ही गोष्ट, अर्धीमुर्धी शेतकी करणाऱ्या इंदियन लोकांच्या उदाहरणापेक्षां चीन लोकांचें उदाहरणांत चांगली स्पष्ट दिसते. जेथें उत्पन्न लौकर व्हावयाचें असतें, व हत्यारें ज्या कामाकरतां केलीं असतात, तें काम सिद्ध होण्यास ज्या स्थळीं फार वेळ लागत नाहीं, त्या स्थळीं ते पराकाष्ठेची कढून मेहनत करतात. व त्या देशांत व्हावयाजोग्या, व तेथील लोकांस ज्यांचा उपयोग, अशा कला त्या लोकांत पुष्कळ वाढल्या आहेत. व तेणेंकरून त्यांचा श्रम सफलही होतो. त्या देशांत हवा चांगली गरम, जमिनीचा स्वतःसिद्ध पिकाऊपणा, लोकांस शेतकीविषयीं चांगलें ज्ञान, इत्यादि गोष्टींच्या योगानें; व त्या लोकांस अत्यंत उपयुक्त धान्यादि उद्भिजें उत्पन्न करायाची माहिती आहे, व कोणकोणती जमीन त्यांपैकीं कोणकोणत्या उत्पन्नास अत्यंत चांगली हेंही ज्ञान त्यांस आहे, ह्या गोष्टींच्या योगानें; त्यांस प्रत्येक जमिनीपासून कांहीं तरी चांगलें उत्पन्न करतां येतें; व तें उत्पन्न त्यांस शेतकीच्या श्रमापेक्षां अधिक वाटतें. त्या लोकांस वर्षास दोन किंवा कधीं कधीं तीनसुद्धां पिकें प्राप्त होतात; व त्या देशांतलें मुख्य पीक जो तांदूळ त्यासारखा पुष्कळ उत्पन्न होणारा जिन्नस असला, म्हणजे ते लोक तो जिन्नस कधी तरी लागवडीजोगी मात्र जमीन असली, म्हणजे तींत आपल्या कौशल्यानें पुष्कळ पिकवल्यावांचून सोडीत नाहींत. जमीन लागवडींत यावयाजोगी मात्र असावी, मग ती त्यांच्या श्रमानें पिकत नाहीं असें कधीं होत नाहीं. टेकड्या व मोठमोठे डोंगर ह्यांवरसुद्धां चढून ते त्यांवर ओट्यांसारखीं शेतें करतात. त्यांनीं पाट बांधून पाणी जिकडे तिकडे नेलें आहे, व चमत्कारिक यंत्रांच्या साह्यानें उंच उंच ठिकाणीं देखील पाणी चढवलें आहे; व हीं यंत्रें त्या लोकांस हजारों वर्षांपासून माहीत आहेत. अशा कठीण ठिकाणीं उत्पन्न होतें, ह्याचें पहिलें कारण त्यांचा श्रम होय; व दुसरें कारण असें आहे, कीं अशा डोंगरी प्रदेशांत देखील खोलपर्यंत काळी माती चांगली असते. फळ लवकर प्राप्त होण्यासारखें असलें, म्हणजे काम पराकाष्ठेचें कठीण असलें, तरी ते लोक श्रम किती संतोषानें करतात, हें फारच स्पष्ट ज्यांत दिसतें, तें उदाहरण सांगावयाचें अजून राहिलेंच. तें हें, कीं ते लोक फळ्यांचे किंवा वांशांचे ताफे बांधून ते नद्यांत किंवा तळ्यांत तरंगत सोडतात, व त्या ताफ्यांवर काळी माती पसरून वरतीं धान्य पेरतात. असें करण्यास श्रम फार लागतो; परंतु त्यापासून उत्पन्नही पुष्कळ होतें. काळी उत्तम माती, खालीं पाण्याचा पाहिजे तितका ओलावा, व वर सूर्याचें उत्तम प्रकारचें ऊन, इतकीं साहित्यें जमल्यावर मग त्या शेतांचा उफाटा काय विचारावयाचा आहे! तीं शेतें फार उमदा पिकतात. परंतु जेथें फलप्राप्ती पुष्कळ, परंतु ती विलंबानें होती, तेथें त्या लोकांकडून

श्रम व्हावयाचे कठीण. युरोपांतले जे लोक त्या देशांत जातात, त्यांनीं हीं तरंगणारी लहान लहान शेतें तळ्यांवर पाहिलीं असतां, त्यांस फार आश्चर्य वाटतें. ते आपल्या मनांत असा विचार आणतात, कीं हे लोक ह्या दोन चार वर्षांत नासून जाणाऱ्या ताप्यांवर जी इतकी मेहनत करतात, ती न करतां एकदम अंमळ अधिक मेहनत करून त्या तळ्यांचे पाट काढून देऊन तीं कोरडीं करून त्यांतल्या जमिनीवर कां मशागत करीत नाहींत? परंतु ते चिनी लोक विद्यमान काळाप्रमाणें पुढील काळाची चिंता बाळगीत नाहींत. युरोपियन लोक व चिनी लोक ह्यांच्या संग्रहेच्छेच्या उत्कटपणांत फार भेद आहे. युरोपियन लोकांच्या विचाराचा पल्ला दूरवर असतो, त्यांस चिनी लोक अल्पदृष्टीमुळें वर सांगितलेल्या प्रकारचे जे श्रम करतात, ते कष्टरूप व दुःसह वाटतात. परंतु चिनी लोकांचे विचार संकुचित असतात, त्यामुळें जेव्हांचें तेव्हां श्रमाचें फळ प्राप्त झालें, म्हणजे त्यांत त्यांचें समाधान असतें; व युरोपियनांस जी स्थिति दुःखाची वाटते, तीच स्थिति त्या चिनी लोकांस बालाभ्यासाच्या योगानें सुखाची वाटते.

कोणत्याही देशांत कलाकौशल्याचें जें ज्ञान असतें, त्या ज्ञानाच्या योगानें, व त्या देशांतल्या लोकांच्या संग्रहेच्छेच्या उत्कटपणाच्या अनुरोधानें, जितकें उत्पन्न वाढण्याजोगें असतें, तितकें वाढलें म्हणजे त्या देशांत संपत्ति वाढण्याची हद्द झाली, असें समजावें. तेथें पुढें अधिक संपत्ति वाढण्यास दोन मार्ग आहेत, ते हे कीं देशांतलें कलाकौशल्य वाढलें पाहिजे हा एक; किंवा लोकांच्या संग्रहेच्छेचें उत्कटत्व वाढलें पाहिजे, हा दुसरा. त्या दोन मार्गांपैकीं कोणता तरी एक उत्पन्न झाल्यावांचून देशाचें उत्पन्न वाढावयाचें नाहीं. ह्याप्रमाणें देशांतलें एकंदर भांडवल वाढत नाहींसें झालें, तरी तेथील लोकांपैकीं कोणी विशेष श्रीमान् व कोणी विशेष दरिद्री होतच असतात. पुढील विचार करण्याचें जें देशांत साधारण मान असतें, त्यापेक्षां ज्यांस कमी विचार असतो, ते दरिद्री होऊन, ज्यांची संग्रहवासना विशेष असते, त्यांस संचय विशेष करण्यास सवड होते. हे मागून सांगितलेले पुरुष पहिल्यानें सांगितलेल्यांचीं जमिनी, कारखाने, वगैरे संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें विकत घेऊन त्यांचे मालक होतात. अशी घडामोड नेहमीं सर्वत्र चालत असते.

आतां एका देशांतल्यापेक्षां दुसऱ्या देशांत भांडवलास नफा विशेष ज्या कारणांवरून मिळतो, त्या कारणांचें व अवस्थाविशेषीं जसें जसें भांडवल वाढवावें, तसतसा नफ्याचा दर कमी होत असतो, तो तसा ज्या कारणांनीं होतो, त्या कारणांचें स्पष्ट निरूपण पुढें होईल. चीन देशांत एकंदर संपत्ति वाढण्याची हद्द होऊन ती पुढें वाढण्याची खुंटली, असें कितीएक ग्रंथकारांचें मत आहे. हें मत जर खरें आहे, तर त्या देशांत नफ्याचा दर मोठा असतां तेथील भांडवल वाढण्याचें बंद झालें असें सिद्ध होतें. त्या देशांत कायद्याप्रमाणें एकोत्रा व्याजाचा दर आहे व व्यवहारांत त्याचा दर दिढोत्र्यापासून अडचोत्र्यापर्यंत आहे, असें सांगतात. ह्यावरून अशी कल्पना होते, कीं त्या देशांत भांडवल अधिक झालें असतां त्यावर वर सांगितलेल्या इतकें व्याज मिळावयाचें नाहीं व या दरापेक्षां कमी व्याज मिळाल्यास तितक्यानें चीन लोकांची प्रकृतोपभोग टाकण्याविषयीं प्रवृत्ति व्हावयाची नाहीं. आतां ह्या व्याजाचा दर व हॉलंद देशांतला व्याजाचा दर, हे परस्परांशीं लावून पाहिल्यास त्यांच्यामध्यें फारच फरक दिसतो. हॉलंद देशचा पराकाष्ठेचा भरभराट होता, तेव्हांसुद्धां तेथें सरकारास अडीच आणे शेंकड्याच्या भावानें व लोकांस चार आणे शेंकड्यानें पाहिजे तितका पैसा नेहमीं कर्जाऊ मिळत असे. आतां, ब्रह्मदेश व हिंदुस्थानांतलीं नेटीव लोकांचीं संस्थानें, येथें व्याजाचा दर फारच मोठा होता व अजूनही आहे खरा; परंतु तो तसा असण्याचें कारण असें आहे, कीं ह्या देशांतील सरकार व साधारण लोक अप्रामाणिकपणामुळें किंवा शक्ति नसल्यामुळें सावकारांचें कर्ज बुडवतात. त्या बुडीचा वचपा निघण्याकरतां व्याजाचा दर इतका मोठा असतो. परंतु ब्रह्मदेशासारखी वगैरे चीन देशाची स्थिति नाहीं;

आणि असें असून जर तेथें व्याजाचा दर मोठा असून भांडवल वाढण्याचें खुंटलें आहे, तर तेथील लोकांच्या संग्रहेच्छेचें उत्कटत्व फार कमी आहे–म्हणजे त्या लोकांत युरोपांतील बहुतेक लोकांपेक्षां भावी लाभाची योग्यता फारच कमी आहे, असें सिद्ध होतें.

ज्या देशांत मालमत्तेचें संरक्षण बरें चांगलें असतां, तेथील लोकांच्या संग्रहवासनेच्या व दूरदृष्टीच्या न्यूनत्वामुळें, युक्तीच्या दृष्टीनें जितका संग्रह व्हावा, तितका होत नाही, तसल्या देशांविषयीं एवढा वेळ प्रतिपादन केलें. आतां जेथें व्हावा त्यापेक्षां अधिक संग्रह होतो, अशा देशांविषयीं कांहीं सांगतों. युरोपखंडांत विशेष सुखी जे देश आहेत, तेथें यद्यपि पुष्कळ अविचारी व उधळे आहेत; व श्रम करून मजुरीवर पोट भरणाऱ्या लोकांत काटकसरीनें व पुढील विचारानें वागण्याची रीत फारशी आहे असें दिसत नाहीं, तथापि त्या देशांत कारागीर लोक, व्यापारी लोक, व वैद्याचा, वकिलाचा वगैरे प्रतिष्ठित धंदे करणारे लोक; ज्या लोकांस संग्रह करण्याची वासना व सामर्थ्य हीं दोन्ही असतात, त्या लोकांत संग्रहेच्छा इतकी उत्कट आहे, कीं जिकडे पाहावें तिकडे संपत्ति जलद वाढत आहे, अशींच चिन्हें दिसतात. आणि जेव्हां जेव्हां नफ्याचा रोजगार नवा उत्पन्न होतो; (जसें लोखंडी रस्ते बांधणें, व परदेशांत व्यापार करणें इत्यादि) तेव्हा तेव्हां त्या व्यापारास लाखों रुपयांचें भांडवल लवकर मिळतें. ह्यावरून ह्या इंग्लंडादि देशांत व्यापारांत शिरण्याची सवड पाहणारे, एकंदर भांडवल किती पुष्कळ असेल, हें मनांत येऊन पुष्कळ आश्चर्य वाटतें.

इंग्लंडांतील लोकांत संचयवासना इतकी विलक्षण वाढण्यास पुष्कळ कारणें झालीं आहेत. लढायांनीं देशांतली संपत्ति पुष्कळ खराब होत असती; परंतु इंग्लंड ह्या अनर्थापासून फार दिवस सुटलें आहे. तसेंच, त्या देशांत लोकांच्या मालमत्तेस लष्करी लोकांच्या लुटीपासून, व जुलमी व स्वच्छंद सरकार, व त्याचे कामगार, ह्यांच्या जुलमापासून, धोका फार दिवसांपासून नाहींसा झाला आहे. तेणेंकरून लोकांस आपली संपत्ति व्यापारांत, किंवा दुसऱ्या चिरकाल स्थायी कामांत, वगैरे घालण्यास भय वाटत नाहींसें झालें आहे. परंतु भीति जाऊन पूर्ण भरंवशानें आपली संपत्ति आपल्या हातावेगळी करण्याची संवय त्यांस लागण्यास कितीएक पिढ्या लोटाव्या लागल्या. इतर देशांत भरंवशानें व्यापारांत पैसा घालण्याची रीत इंग्लंडांतल्यापेक्षां अर्वाचीन आहे, म्हणून ती अजून चांगली ठरली नाहीं. तसेंच इंग्लंडाची संस्थाही तेथील लोकांस व्यापाराची संवय लागण्यास थोडी बहुत कारण आहे. हा देश चोहोंकडून समुद्रानें वेष्टित पडला, ह्यास्तव येथील लोकांस वजनदारी व थोरपणा मिळवण्यास लढायांपेक्षां व्यापार व उदीम करणें हा मार्ग बरा पडत गेला. व तेणेंकरून इतर देशांत बुद्धिमान् व उद्योगी व धारिष्टाचे लोक जसे बहुतकरून लष्करी कामांत शिरतात, तसें ह्या देशांतले पुष्कळ तसले लोक व्यापारांत वगैरे शिरत गेले, व त्यांनीं इतर देशांतल्यासारखें लोकांनीं आयती उत्पन्न करून जमवून ठेवलेली संपत्ति बुचाडून आपणांस थोरपणा न मिळवतां, व तिच्या उपभोगानें आपल्या वांच्छा न पुरवतां, आपण नवी संपत्ति उत्पन्न करून, व जमवून तिच्या योगानें, आपल्या इच्छादि पुरवण्याचा ह्या देशांत संप्रदाय विशेष पडला. तसेंच, त्या देशांतली उत्तम प्रकारची राज्यव्यवस्थाही, वर सांगितलेली गोष्ट होण्यास हेतु आहे. त्या देशांतलें सरकार सर्वच गोष्टींमध्यें हात घालीत नाहीं. ज्याचें हित ज्यांत असेल, त्यानें तें करावें, असा अधिकार त्या देशांतील लोकांस पुष्कळ आहे. तेणेंकरून इतर देशांतल्याप्रमाणें तेथील लोक प्रत्येक गोष्टीविषयीं सरकारच्या तोंडाकडे पाहात नाहींत; तर त्यांस आपल्या शाहाणपणावर व उद्योगावर भरंवसा ठेवून काम करण्याची संवय लागली आहे. व तेथें पुष्कळांनीं एकत्र जमून सकंतीनें व्यापार वगैरे करण्यास प्रतिबंध नाहींत, ह्यामुळें लोकांस मोठमोठाले कारखाने करण्यास उत्तेजन येतें. कारखाने मोठे असल्यापासून संपत्ति वाढते कशी, हें मागें एका भागांत सांगितलेंच आहे. शिपाईपणावर थोरपणा मिळवणारे सरदार लोक ह्यांचा मान इतर व्यापारी वगैरे लोकांपेक्षां मोठा

पूर्वी होता, व आतांही पुष्कळ ठिकाणीं तसा आहे. बहुतेक स्थळीं सरदार लोक व्यापाऱ्यांस वगैरे तुच्छ मानीत असतात; परंतु व्यापारी व सरदार ह्यांच्यामधला भेद इंग्लंडांत फार दिवसांपासून बहुतकरून मोडलाच आहे. तेणेंकरून व्यापार करण्याचें लोकांस उत्तेजन आलें आहे; व कांहीं काळापासून आलीकडे राज्यव्यवस्थेंत अशी रीति चालू झाली आहे, कीं तिच्या योगानें ज्यापाशीं पैसा अधिक, त्यांचें राज्यप्रकरणांत वजन विशेष असतें. व असा प्रकार झाला, तेणेंकरून संपत्तीच्या आंगीं वास्तविक सुख प्राप्त करून देण्याची शक्ती असून आणखी तिच्या ठायीं कल्पित थोरपणा आणण्याचाही गुण आला आहे. म्हणून तिची प्राप्ति होण्याविषयीं लोक फारच झटूं लागले आहेत. संपत्ति असणें म्हणजे एक प्रकारचा अंमल असणें असें होऊन गेलें आहे; आणि अंमल हा साधारण मनुष्यांत वजन पडण्यास कारण आहे, म्हणून संपत्तिवानाची योग्यता लोकांत विशेष होते; व संपत्तीवरून त्याच्या गुणाचीही लोक किंमत करतात. इंग्लंडांत साधारण लोकांच्या मतीं संसारांत हा एक मुख्य पुरुषार्थ आहे, कीं आपण ज्या स्थितींत असतों तिच्या वरच्या स्थितीस चढावें; आणि हा उद्देश सिद्धीस जाण्यास संपत्ति हा उपाय आहे. तसेंच, श्रम केल्यावांचून जे श्रीमंत असतात, त्यांची योग्यता जे श्रमाच्या योगानें श्रीमंत होतात, त्यांच्यापेक्षां साधारणपणें लोकांत अधिक असते. ह्यास्तव ती योग्यता मिळवण्या‧करतां जो मनुष्य संग्रह करतो, तो केवळ उद्योगांत असतां आपणास नफा पुष्कळ व्हावा एवढ्याच उद्देशानें करीत नाहीं; तो करण्यांत त्याचा उद्देश आणखी असा एक असतो, कीं उद्योग सोडून आपणास पुष्कळ उत्पन्नाची जमीन विकत घेतां येऊन मोठ्या इतमामानें वागतां यावें. ह्या सर्व कारणांस विशेष जोर आणण्यास इंग्लंडात आणखी एक मोठें कारण आहे; तें हें कीं त्या देशांतल्या लोकांस ऐषअरामीनें आपल्या जिवास सुख करून घेण्याची गोडी फारच कमी आहे. परंतु ही गोडी नसल्यानें तेथें संग्रह वाढवण्यास एका प्रकारें जसें सौगम्य येतें, तसें दुसऱ्या एका गोष्टीनें तो होण्यास विशेष कठीणपणाही येतो. ती दुसरी गोष्ट अशी, कीं त्या लोकांस ऐषआरामीची व विलासांची गोडी नाहीं; परंतु आपणांस लोकांनीं खर्चीक म्हणावें ह्याची त्यांस फार आवड आहे. थोरपणा व श्रीमंतीचीं चिन्हें ह्या दोहोंचा संबंध त्या लोकांच्या मनांत असा कांहीं विलक्षण झाला आहे, कीं त्या देशांतले हजारों लोक आपला खर्चीकपणा लोकांत दिसावयाकरतांच केवळ शेकडों रुपये खर्चतात, व इतक्या खर्चांपासून वास्तविक सुखानुभव त्यांस फारच थोडा होतो. जो खर्चीक मोठा, तो श्रीमंत मोठा; व जो श्रीमंत मोठा, तो प्रतिष्ठित मोठा; अशा केवळ वेड्या समजुतीनें त्या लोकांस खर्चीकपणाची जी चट लागली आहे, त्या चटीमुळें हॉलंडांतल्याप्रमाणें इंग्लंडांत संग्रहवासना तितकी वाढली नाहीं. हॉलंद देशांत इंग्लंडांतल्या सारखे केवळ डामडौलाकरतां खर्च करणारे वेडे लोकांचा वर्चस्वपणा पहिल्यापासून नव्हता; तेथें राज्यांत थोर म्हटले, म्हणजे सावकार, व व्यापारी हे लोक होते. ह्यास्तव त्यांनीं साध्या रीतीनें व काटकसरीनें वागण्याचा जो कित्ता घातला, तो सर्व देशांत चालू झाला.

मागील सर्व लेखावरून असें दिसतें, कीं इंग्लंड व हॉलंद ह्या दोन देशांत फार दिवसांपासून, व युरोपखंडांतील बहुतेक सर्व देशांत प्रकृत काळीं, संग्रहेच्छा कार्यक्षम होण्यास (म्हणजे तिच्या योगानें संग्रह करण्याविषयीं लोकांची प्रवृत्ति होण्यास) एशिया खंडांतल्याप्रमाणें नफ्याचा दर फार मोठा असावा लागत नाहीं; तर तो दर फार थोडा असला तरी लोकांची प्रवृत्ति संचय करण्याकडे होते. अशावरून कीं हल्लीं त्या (युरोपखंडांतल्या) देशांत भांडवल वाढण्याची मंदी न पडतां भांडवलाची वृद्धि उत्तरोत्तर अशी जलदीनें होत चालली आहे, कीं तशी पूर्वी कधींच झाली नव्हती; व संपत्तीची वृद्धि होण्याचें दुसरें कारण जी भांडवलाची वृद्धि तिची न्यूनता होण्याचा रंग मुळींच दिसत नाहीं. भांडवलाच्या वृद्धीच्याच संबंधानें पाहिलें, तर संपत्तीची वृद्धि अमर्याद होण्यास योग्य आहे असें दिसतें.

आतां, हें खरें आहे, कीं हल्लीं जो नफ्याचा दर आहे, त्यापेक्षांही तो कमी झाल्यास भांडवल आतांसारखें वाढणार नाहीं; पुष्कळ कमी वाढेल. परंतु भांडवल वाढल्यानें नफ्याचा दर कां उतरावा? ह्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें म्हटलें म्हणजे उतरलेलें जें संपत्युत्पत्तीचें तिसरें कारण, त्याचा विचार प्रसक्त होतो. उत्पन्नाच्या वृद्धीस जो प्रतिबंध होतो, तो श्रम व भांडवल ह्यांच्या ठायीं स्वभावकृत न्यूनता असून तिच्या योगानें जर होत नाहीं, तर तो प्रतिबंध स्वभावतः ज्याच्या इयत्तेची मर्यादा आहे, असें जें तिसरें कारण, त्याच्या उत्पादक गुणाच्या न्यूनतेनेंच होतो, असें म्हटलें पाहिजे. तें तिसरें कारण जमीन, ह्यास्तव तिचा, व तिच्या गुणांचा विचार पुढल्या भागांत करतों.

## भाग बारावा.

# जमिनीचें उत्पन्न ज्या नियमानें वाढतें, त्या नियमाविषयीं.

संपत्तीचीं दोन कारणें, श्रम आणि भांडवल, ह्यांच्या व तिसरें कारण जमीन हीच्यामध्यें ह्या एक भेद आहे, कीं तिसऱ्याच्या ठायीं पहिल्या दोहींच्या प्रमाणें अमर्याद वाढण्याची योग्यता नाहीं, जमिनीच्या विस्ताराची मर्यादा आहे व ज्यांचे ठायीं उत्पादकशक्ति विशेष अशा ज्या जमिनीच्या जाति आहेत, त्यांचा विस्तार तर सामान्य जमिनीच्या विस्तारापेक्षांही मर्यादित आहे. तसेंच, जमिनीचे ठायीं धान्य, धातू, वगैरे उत्पन्न करण्याची जी शक्ति आहे, तीही अमर्याद नाहीं, हें स्पष्टच आहे. आतां, जमिनीचे हे जे गुण सांगितले, म्हणजे तिचा समर्याद विस्तार, व तिची समर्याद उत्पादक शक्ति, हे गुण संपत्तीच्या वृद्धीचे वास्तविक नियामक होत. ह्यांच्या मर्यादेमुळें संपत्तीच्या वृद्धीची मर्यादा होऊन ती खुंटते.

हे गुण उत्पन्नवृद्धीची चरम मर्यादा होत, ही गोष्ट स्पष्टच आहे, व ती सर्व मान्य करतात. परंतु ह्या चरम मर्यादेपर्यंत उत्पन्न कोठेंच वाढलें नाहीं. तसेंच, पृथ्वीवर असा कोणता देश सांगतां येत नाहीं, कीं जेथें धान्य उत्पन्न होण्याजोग्या यच्चयावत् जमिनीची लागवड होऊन गेली आहे; व त्या जमिनीवर इतकी मशागत होत आहे, कीं त्या जमिनींतून, विशेष श्रम केला असतां, विशेष पीक उत्पन्न होत नाहीं. तसेंच. आज पृथ्वीच्या पाठीवर बहुतेक सर्व देशांत जी पुष्कळ पड जमीन आहे; व जी लागवडींत आहे, त्या सर्व जमिनींची व्हावी तितकी मशागत होत नाहीं. ह्या सर्व गोष्टींवरून कितीएक मोठ्या ग्रंथकारांची अशी समजूत आहे (व ती समजूत साधारणपणें स्वाभाविक दिसते.) कीं उत्पन्नवृद्धीची व लोकवृद्धीची जी वर मर्यादा सांगितली, ती मर्यादा अजून फारच दूर आहे; व ती चरम मर्यादा व जगाची सांप्रत स्थिति ह्यांच्यामध्यें निरवधि अंतर आहे, असें म्हटलें तरी चालेल; व हजारोंहजार वर्षांनीं कदाचित् त्या मर्यादेचा विचार करण्याचा उपयोग व्यवहारांत आला तर येईल; तेव्हां तसल्या मर्यादेचा विचार प्रकृतकाळीं अगदीं व्यर्थ आहे.

ही जी वर समजूत सांगितली, ही फारच मोठी भ्रांति आहे; व अर्थशास्त्रांतील विषयांविषयीं ज्या लोकांत अनेक भ्रांति आहेत, त्या सर्वांत ह्या भ्रांतिसारखी मोठी भ्रांति दुसरी नाहीं. प्रकृत विषय सर्व विषयांत मुख्य व मूलभूत आहे. देशांत संपत्ति व उद्योग हीं पुष्कळ असतांही, दारिद्र्य ज्या कारणांनीं असतें, त्या कारणांचें बीज ह्या विषयाच्या विचारांत आहे; ह्यास्तव ह्या विषयाचें पूर्ण विवेचन झाल्या-वांचून पुढील विषय कदापि स्पष्ट होणार नाहींत; ह्यास्तव तें विवेचन करणें प्रकृतीं आवश्यक आहे.

जमिनीचे गुण उत्पन्नाच्या वृद्धीस मर्यादा आहेत, म्हणून वर सांगितलें. ह्या स्थळीं ही मर्यादा एकाद्या तटासारखी आहे, म्हणजे त्या मर्यादेस कोणी पोंचे तोंपर्यंत त्याच्या गतीस कांहीं प्रतिबंध होत नाहीं, व तो एकवेळ तेथें पोचला, म्हणजे त्यास मुळींच थांबावें लागतें, असा ह्या प्रकृत मर्यादेचा प्रकार नाहीं; तर ती मर्यादा, एकाद्या पराकाष्ठेच्या चिंवट पदार्थाचा पडदा असावा अशी आहे. ही मर्यादा, पलीकडे सारतां सारतां, ती पुढें सरकत नाहीं असें तर अजून कधींही झालें नाहीं. परंतु ती मर्यादा जितकी मागें सरण्याजोगी आहे, तितकी ती सरल्याच्या आधींच तीपासून प्रतिबंध होऊं लागतो, व ती जसजशी अधिक पलिकडे सारावी, तसतसा उत्तरोत्तर अधिक श्रम करावा लागतो.

देशांत शेतकीचा धंदा बराच वाढला, (मग तो फार वाढावयास नको) लोक बरेंच मन लावून

जमिनीची लागवड करूं लागले, व त्यांच्या शेतकींत बरींच चांगलीं आऊतें वापरण्याचा वगैरे परिपाठ चालू झाला, म्हणजे तेव्हांपासून जमिनीच्या उत्पन्नाच्या वृद्धीचा असा नियम दिसूं लागतो, कीं (मग लोकांत शेतकीचें कौशल्य, व माहिती, हीं उत्तम किंवा निकृष्ट किंवा मध्यम कोणत्याही प्रकारचीं असोत) शेतांत ज्या मानानें श्रम वाढवावा, त्या मानानें त्याचें उत्पन्न वाढत नाहीं. ह्यास उदाहरण, शेतांत दुप्पट खपलें, तर दुप्पट धान्य उत्पन्न होत नाहीं. म्हणजे पहिल्याइतकेंच अधिक उत्पन्न करणें झाल्यास पहिल्यानें विवक्षित उत्पन्नास जितका श्रम लागला असेल, त्यापेक्षां अधिक श्रम केल्यावांचून तितकें अधिक उत्पन्न प्राप्त होत नाहीं; व हाच अर्थ शब्दांतरानें सांगतों, कीं ज्या मानानें श्रम वाढवावा त्यापेक्षां कमी मानानें उत्तरोत्तर उत्पन्न वाढत जातें.

शेतकीच्या उत्पन्नाच्या वृद्धीचा हा सामान्य नियम अर्थशास्त्रांतील बहुतेक सिद्धांतांचा पाया होय. हा नियम जर भिन्न असता, तर संपत्तीच्या उत्पत्तीविषयीं व तिच्या वांटणीविषयीं जे अनेक नियम हल्लीं दृष्टोत्पत्तीस येतात, त्यांपैकीं बहुतेक अगदीं निराळे झाले असते. अर्थशास्त्रांतील मूलभूत नियमाविषयीं ज्या लोकांत अनेक भ्रांति आहेत, त्या, ह्या प्रकृत नियमाचें ज्ञान त्यांस पुरें न झाल्यामुळें, राहिल्या आहेत. त्यांचें लक्ष्य ह्या मुख्य नियमाकडे न पुरतां कांहीं विवक्षित कार्यांचीं वरवर जीं कारणें दिसतात, त्यांस ते चरम करणें समजतात.

धान्यादि पदार्थांचें उत्पन्न वाढण्यासाठीं कमी प्रतींच्या जमिनींची लागवड करावी लागती. तेव्हां ह्या तितक्या गोष्टींवरूनच स्पष्ट दिसतें, कीं ज्या मानाचें श्रम वाढवावा, त्याच मानानें उत्पन्न वाढत नाहीं. कमी प्रतीची जमीन म्हटली, म्हणजे त्या शब्दांच्याच पोटांत असा अर्थ निष्पन्न होतो, कीं ज्या मानानें त्या जमिनीवर श्रम करावा, त्यापेक्षां कमी मानानें तींत उत्पन्न होतें. जमीन कमी प्रतीची दोन प्रकारांनीं होते. एक प्रकार, तिच्या अंगच्या पिकाऊपणा कमी असल्यानें तीस कमीपणा येतो; किंवा तिंतल्या उत्पन्नाची विक्री होण्याचें जें स्थळ, बाजार, त्यापासून ती दूर अंतरावर, किंवा अवघड ठिकाणीं, असल्यानें, तो येतो. पहिला प्रकार असला, म्हणजे तींत उत्पन्न करण्यास श्रम विशेष लागतो; व दुसरा प्रकार असला तर वहनश्रम वाढतो. पाहा, क्ष नामक एका जमिनींत कांहीं खर्चावेंचानें पांच खंडी गहूं उत्पन्न होतात; आणि दुसरे पांच खंडी म्हणजे एकंदर १० खंडी गहूं उत्पन्न करावयास जर ब नामक कमी पिकाऊ किंवा बाजारापासून ज्यास्त लांब अशा जमिनीची लागवड करावी लागते, तर दाहा खंडी गहूं उत्पन्न करण्यास पांच खंडी गहूं उत्पन्न करण्याच्या खर्चाच्या दुपटीपेक्षां अधिक खर्च लागतो, व शेतकीचें उत्पन्न वाढतें, तें श्रमाच्यापेक्षां कमी मानानें वाढतें असें स्पष्ट दिसतें.

उत्पन्न वाढवणें झाल्यास निकृष्ट प्रतींच्या जमिनींचीच लागवड करावी लागते, असा नियम नाहीं. तो उद्देश, चांगल्या प्रतीच्या जमिनीवर पहिल्यापेक्षां ज्यास्त मशागत केली असतांही, सिद्ध होतो. ती रीति अशी, कीं चांगलें शेत एकदांचे ठिकाणीं दोनदा किंवा तीनदां नांगरावें लागतें, किंवा नांगरल्यावर कुदळ्यानें ढेकळें फोडून माती चांगली भुसभुशीत करावी, त्यांत उगवलेलें गवत किंवा रानझाडें एकून एक उपटून टाकावीं किंवा पहिल्यापेक्षां चांगलीं आऊतें योजावीं, किंवा विशेष चांगलें व जास्त खत त्यांत घालावें, व तें मातींशीं चांगलें मिळवावें, किंवा पहिल्यापेक्षां अधिक पाणी द्यावें, ह्या प्रकारें मशागतीचे पुष्कळ प्रकार आहेत; ते करावे लागतात; व त्यांहीकरून शेताचें उत्पन्न अधिक होतें. परंतु असें केलें तरी श्रमाच्या व खर्चवेंचाच्या मानानें उत्पन्न वाढत नाहीं. ही गोष्ट कमी प्रतींच्या जमिनींची लागवड सर्व देशांत होते, ह्यावरून सिद्ध होतें. ज्या जमिनी कमी पिकाऊ असतात, किंवा ज्या बाजारापासून दूर असतात, त्यांपासून चांगल्या जमिनींच्या सारखें उत्पन्न होत नाहीं; व लोकांत ज्यास्त जें धान्य पाहिजे, तें अधिक खर्च केल्यावांचून होत नाहीं, व खर्चवेंच वाढला म्हणजे उत्पन्नाची किंमत अर्थातच वाढते. लोकवृद्धि झाल्यामुळें अधिक जें धान्य लागतें, तें जर चांगल्या जमिनींतून

पहिल्या धान्याच्या इतक्या खर्चवेंचानें उत्पन्न होण्याजोगें असतें, तर त्या जमिनींची लागवड करणाऱ्यांस इतर शेतकऱ्यांपेक्षां कमी दरानें धान्य विकतां येऊन सर्व गिऱ्हाईकें आपणाकडेसच ओढून घेतां येतीं. कमी पिकाऊपणाच्या किंवा बाजारापासून दूर अंतरावरच्या, जमिनींची लागवड त्यांचे मालक आपल्या निर्वाहाकरतां कदाचित् करतील; परंतु नफ्याकरतां शेतकीचा रोजगार म्हणून जे करणारे आहेत, ते तसलीं शेतें कदापि करणार नाहींत; कां कीं, ती करण्यापासून त्यांस नफा होणार नाही. परंतु त्या उद्योगांत (निकृष्ट जमिनींची लागवड करण्यांत) भांडवल घालण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति होण्याजोगा त्यांस त्या शेतापासून नफा होतो. ह्यावरून असें सिद्ध होतें, कीं चांगल्या जमिनींची लागवड इतकी झाली आहे, कीं त्या जमिनींपासून विशेष उत्पन्न करणें झाल्यास, निकृष्ट प्रतीच्या जमिनींच्या लागवडीच्यापेक्षां अधिक किंवा निदान बरोबरीनें तरी खर्च केल्यावांचून तें अधिक उत्पन्न होत नाहीं.

इंग्लंड, स्काटलंड इत्यादि देशांत आपल्या हिंदुस्थानांतल्याप्रमाणें मिरासदार पिढीजाद शेतें करणारे लोक पुष्कळ नाहींत; तर मोठमोठे भांडवलदार लोक नफ्याच्या बुद्धीनें इतर व्यापारांप्रमाणें जमीनदारांपासून शेतें साऱ्यानें घेऊन, तीं करतात. ही त्या देशांतली रीत वाचणाऱ्यांनीं लक्ष्यांत ठेवली पाहिजे; असो. आतां इंग्लंड आणि स्काटलंड, ह्या देशांत कांहीं ठिकाणीं लोक शेतकीच्या कामांत फार मशागत करतात; ह्यावरून असें दिसतें, कीं तेथें जमिनीचें उत्पन्न वाढण्यास उत्तरोत्तर अधिक खर्चवेंच लागूं लागला आहे. कां कीं, साधारण रीतीच्या लागवडीपेक्षां फार मशागतीच्या लागवडीस खर्च फार लागतो; व तीस खर्च फार लागतो, ह्यास्तव धान्याची किम्मत चढल्याशिवाय ती करण्यांत फायदा असत नाहीं. म्हणून भांडवलवाले चांगली पिकाऊ जमीन पड असल्यास ती टाकून जुन्या जमिनीवर इतका खर्च करणार नाहींत. ज्या देशांत ज्यास्त धान्य उत्पन्न करण्यास पहिल्यानें लागवडींत आलेल्या जमिनीसारखी पिकाऊ व सोईची जमीन मिळत असते, तेथें लोक जुन्या जमिनीवर फार मशागत करीत नाहींत. ते श्रम वाढवला असतां त्याच्या मानानें उत्पन्न वाढतें आहे, तोंपर्यंत मात्र जुन्या जमिनीवर श्रम करतात. परंतु श्रमवृद्धीच्या मानापेक्षां उत्पन्नवृद्धीचें मान कमी होऊं लागलें, म्हणजे त्या जमिनीवर श्रम करण्याचें सोडून नव्या पडी लागवडींत घेऊन, देशास अधिक धान्य पाहिजे, तें त्यांत उत्पन्न करतात. अमेरिका देशांत इंग्लंडचे लोक फिरावयास गेले असतां, तेथील शेतकीची रीत त्यांस कांहीं काळपर्यंत आवडत नाहीं. तेथील लोक आपल्या शेतांत युरोपांतल्याप्रमाणें मेहनत करीत नाहींत. परंतु त्यांनीं असें करावयाचें कारण, अमेरिकेंतले लोक आळशी आहेत, किंवा त्यांस शेतकीच्या कामाची कळा माहीत चांगलीशी नाहीं, असें नव्हे; तर त्या ठिकाणीं पिकाऊ जमीन पड पुष्कळ, ह्याकरतां त्या लोकांस, युरोपांतल्याप्रमाणें जुन्या जमिनीवर पुष्कळ मेहनत वगैरे केल्यापेक्षां, नव्या पडी लागवडींत घेण्यापासून फायदा अधिक आहे, म्हणून ते तसें करतात. जेव्हां चांगल्या सर्व पिकाऊ जमिनींची लागवड होऊन जाते, व जेव्हां अशा मात्र जमिनी पड असतात, कीं ज्या कमी पिकाच्या असल्यामुळें, किंवा बाजारापासून दूर असल्यामुळें, धान्याची किंमत चढल्याशिवाय, ज्यांची लागवड करण्यापासून नफा होत नाहीं; तेव्हां मात्र जुन्या चांगल्या जमिनींवर फार मशागत करण्यांत नफा असतो; अन्यथा असत नाहीं. कमी प्रतींच्या जमिनींची लागवड करावयाची ती, किंवा श्रमवृद्धीचे मानानें उत्पन्नाची वृद्धि होत नसतांही, जुन्या चांगल्या जमिनीवर अधिक श्रम व अधिक भांडवल ह्यांची योजना करावयाची, ती शेतकरी, व विशेषेंकरून नफ्याच्याच बुद्धीनें मजुरीनें गडी ठेवून शेतकीचा व्यापार करणारे लोक, लागवडींत आलेल्या जमिनीसारख्याच पिकाऊ व सोईच्या पड जमिनी मिळण्याजोग्या असतां, किंवा जुन्या जमिनींचेंच उत्पन्न श्रमवृद्धीच्या मानानें वाढवावयाच्या युक्ति असतां, करीत नाहींत, असा जो वर नियम सांगितला, त्या नियमाचें आणखी उपपादन केलें पाहिजे; व त्या नियमास कांहीं अपवाद आहेत, ते दाखविले पाहिजेत. देशांत कमी प्रतींच्या जमिनींची

लागवड होत असली किंवा श्रमवृद्धीच्या मानानें उत्पन्नवृद्धि होत नसतांही जुन्या चांगल्या जमिनींवर लोक विशेष श्रम करूं लागले, म्हणजे त्या देशांत श्रमवृद्धीच्या मानानें उत्पन्नवृद्धि होण्याचे उपाय राहिले नाहींत, असें सर्व काळ अनुमान करतां येत नाहीं. कारण दलदल जमिनींतलें पाणी काढून देऊन त्या कोरड्या करणें, किंवा जमिनी चांगल्या आहेत, परंतु त्यांस पाणी चांगलें मुबलक न मिळाल्यामुळें त्यांत पीक चांगलें पुष्कळ होत नसतें, तसल्या जमिनींत पाट बांधून वगैरे अक्षय पाणी आणणें, किंवा जमिनीचा पिकाऊपणा अक्षय वाढण्याजोगे चुना, वाळू, वगैरे पदार्थ तींत घालणें, इत्यादि श्रमवृद्धीच्या मानानें किंबहुना त्यापेक्षां अधिक मानानें उत्पन्न वाढवण्याचे उपाय योजण्याचे पूर्वीच बहुतेक सर्व देशांत कमी प्रतींच्या जमिनी लागवडींत येतात, किंवा जुन्या जमिनींवर थोड्या उत्पन्नाकरतां विशेष मशागत होऊं लागते. असें होण्याचें कारण हें आहे, कीं वर सांगितल्या उपायांनीं उत्पन्न वाढतें खरें; परंतु तें सिद्ध करण्यास फारच श्रम व फार मांडवल हीं लागतात; त्यांपासून नफा होण्यास फार काळ लागतो. ह्यास्तव मांडवलवाले अत्यंत सोईवार रीतीनें सर्व काळ आपलें मांडवल कामास लावूं पाहात आहेत, व त्यांस दुसरीं लौकर नफा होण्याचीं कामें सापडताहेत, तर ते फार उशिरानें नफा होणाऱ्या वर सांगितलेल्या व्यापारांत मांडवल घालणार नाहींत. परंतु ह्या व्यापारांत नफा थोडथोडा होतो, तरी तो बहुत दिवस होतो; ह्यास्तव तो एकंदर करून पाहातां, फारच मोठा असतो, ह्या हिशेबानें हे व्यापार मांडवल घालण्यास अत्यंत सोयीवार असें म्हटलें, तर तें म्हणणें खरें आहे. परंतु लोकांत व्यापार करण्याची बुद्धि फारच वाढत असते, तेव्हां लवकर होणारें थोडें उत्पन्न टाकून विलंबेंकरून होणारें, परंतु एकंदरी पाहतां फार, अशा उत्पन्नाकडे लक्ष्य देण्याची लोकांची प्रवृत्ति होते; व व्यापार करण्याची बुद्धि जरी लोकांत पुष्कळ वाढली असली, तरी जमिनीच्या मालकीविषयीं, व ती खंडानें करण्याविषयीं सरकारी कायदे व देशचाली अशा असतात, कीं त्यांच्या योगानें देशांत मांडवल असलें, तरी मांडवलवाले संतोषानें शेतकीच्या कामांत फारसें मांडवल घालीत नाहींत. आणि ह्यामुळें देशांत लोकवृद्धि झाल्यामुळें जर धान्य लागलें, तर लोक श्रमवृद्धीच्या मानानें उत्पन्नवृद्धि होण्याजोगे वर सांगितलेले उपाय व्हावयाजोगे असतांही, ते सोडून ज्यांत श्रमवृद्धीच्या मानापेक्षां कमी मानानें उत्पन्नवृद्धि होते, असल्या उपायांनीं ते ज्यास्त धान्य उत्पन्न करतात. आज इंग्लंडांत ज्या शेतकीच्या सुधारणा लोकांस माहीत आहेत, व ज्या केल्या असतां हल्लीं धान्यास त्या देशांत जो भाव आहे, त्या भावाप्रमाणें नफा होईल, म्हणजे ज्या सुधारणुकांच्या खर्चाच्या मानानें, किंवा त्यापेक्षां अधिकही, उत्पन्न होईल, त्या सुधारणुका लोकांनी मांडवल खर्चून पुढील वर्षी केल्यास, असा परिणाम होईल, कीं नव्या कमी प्रतीच्या जमिनीची लागवड कितीएक वर्षेपर्यंत करावी लागणार नाहीं; व हल्लीं ज्या कमी प्रतीच्या जमिनींची लागवड होत आहे, त्यांतून बाजारापासून दूरदूर अशा कांहींची लागवड होणेंही कदाचित् बंद होईल; किंवा विवक्षित ज्या सुधारणा आहेत, त्या वाईट जमिनीच्या चांगल्या जमिनी करण्याजोग्या आहेत, ह्यास्तव चांगल्या जमिनींची, हल्ली फार श्रम व मांडवल लावून जी मशागत थोड्या उत्पन्नाकरतां करतात, ती कदाचित् बंद होऊन इंग्लंडांतील शेतकी अमेरिकेंतील शेतकीसारखी होईल; व ज्या सुधारावयाजोग्याच नसतील अशा वाईट जमिनी मुळींच पड पडतील; व देशांतल्या जमिनींचें एकंदर उत्पन्न श्रमाच्या मानानें पहिल्यापेक्षां अधिक होईल; व कमी उत्पन्न होण्याचा जो साधारण नियम आहे, तो कांहीं वेळ चालण्याचा तहकूब होईल. आतां असें झालें, तरी देशांत पाहिजे तितकें सगळें धान्य चांगल्या जमिनींतून उत्पन्न व्हावयाचें नाहीं. तर कमी प्रतींच्या जमिनींची लागवड करावी लागेलच; व त्यापासून श्रमाच्या मानानें चांगल्या जमिनीपेक्षां कमी उत्पन्न होईल. तसेंच जसजशी देशांतील प्रजा वाढेल, तसतशी कमी प्रतीच्या जमिनी लागवडींत घ्याव्या लागून पुनः कमी उत्पन्नाचा नियम चालू होईल; आणि श्रमाच्यापेक्षां कमी कमी मानानें उत्पन्न होऊं लागेल.

जमिनीचें उत्पन्न श्रमाच्या संबंधानें पाहातां उत्तरोत्तर उतरत्या प्रमाणानें वाढतें, म्हणून जें आम्ही वर लिहिलें आहे, तो (प्रासंगिक अपवाद सोडले असतां) शेतकीच्या उत्पन्नाच्या वृद्धीचा व्यापक नियम होय. आतां कितीएक ग्रंथकार हा वर सांगितलेला नियम मुळींच मान्य करीत नाहींत. ते असें म्हणतात, कीं शेतकीची कला जसजशी वाढत जाते, व त्या कामांत जसजसें अधिकाधिक भांडवल लागत जातें, तसतसें जमिनीचें उत्पन्न श्रमाच्या मानानें कमी तर होत नाहींच, पण उलटें अधिकाधिक वाढतें व ह्या आमच्या मतास आजपर्यंतची लोकस्थितिच मोठें बलवत्तर साधक प्रमाण आहे, असें ते म्हणतात. ते म्हणतात, कीं प्राचीन काळीं इंग्लंडांत वगैरे उत्तम प्रकारच्या जमिनीपासून दर बिघ्यास जें उत्पन्न होत होतें, तितकें उत्पन्न, सांप्रतकाळीं तितक्याच श्रमानें, अत्यंत निकृष्ट ज्या जमिनी आहेत, त्यांतल्या प्रत्येक बिघ्यास होत आहे.

आतां, हें त्या ग्रंथकारांचें बोलणें कदाचित् खरें असेल, व ते त्यांचें बोलणें अगदीं शब्दशः खरें नसलें, तरी त्या बोलण्यांत पुष्कळ वास्तवांश आहे, ह्याविषयीं संशय नाहीं. इंग्लंडांत प्राचीन काळीं एकंदर लोकसंख्येच्या मानानें जितके शेतकरी असत, त्यांपेक्षां सांप्रत ते कमी आहेत, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु ह्या गोष्टीवरून ज्या नियमांविषयीं प्रकृतीं विचार चालला आहे, तो नियम नाहीं, असें सिद्ध होत नाहीं; तर इतकेंच सिद्ध होतें, कीं शेतकीचें उत्पन्न क्षीयमाण प्रमाणानें वाढण्याचा जो नियम सांगितला, तद्विरुद्ध एक दुसरा नियम बहुतेक काळीं लोकांत चाललेला असतां; त्या दुसऱ्या नियमाच्या योगानें पहिल्या नियमाचें कार्य कांहीं काळ बंद होतें. आतां आपण त्या विरुद्ध नियमाचें विवेचन करूं. हें विरुद्ध कारण म्हटलें, म्हणजे लोकांच्या स्थितीचा वाढणारा उत्कर्ष. आतां लोकस्थितीचा उत्कर्ष ह्या इतक्या व्यापक शब्दाचा प्रयोग करण्याचें प्रयोजन असें आहे, कीं प्रकृत स्थळीं संग्राह्य कारणें अनेक प्रकारचीं अनेक आहेत, त्या सर्वांचा समावेश त्या शब्दाच्या अर्थांत व्हावा.

त्या कारणांपैकीं अत्यंत स्पष्ट कारणें म्हटलीं म्हणजे कृषिकर्मांचें ज्ञान, कौशल्य, व त्या कामांतल्या अनेक युक्ति हीं होत. शेतकीच्या कामांत सुधारणा करण्याचे प्रकार दोन. पहिल्या प्रकारांत, ज्यांहीं करून श्रमाच्यापेक्षां अधिक मानानें उत्पन्न वाढतें, त्या सर्व गोष्टींचा संग्रह होतो; व दुसऱ्या प्रकारांत, ज्यांहीं करून उत्पन्नाची वास्तविक वृद्धि होत नाहीं, पण पूर्वी जें उत्पन्न होत असतें, तेंच पहिल्यापेक्षां कमी श्रमानें व कमी खर्चानें होतें, त्या गोष्टी येतात. इंग्लंडांत पूर्वी दोनतीन वर्षांआड जमिनी पड टाकाव्या लागत, म्हणून मागें एक वेळ सांगितलें आहेच; अलीकडे अशी कल्पना निघाली आहे, कीं त्या पड टाकाव्या लागत नाहींत; तर दर दरवर्षी एकच धान्य न पेरतां पाळीपाळीनें अनेक धान्यें वगैरे शेतांत करतात. ही रीत पहिल्या प्रकारची सुधारणा होय. तसेंच, त्या देशांत विलायती गवत लावण्याची चाल शेंपन्नास वर्षांतच चालू झाली आहे, तिणेंकरून जमिनीचें एकंदर उत्पन्न वाढलें, इतकेंच नाहीं; तर चारा वाढल्यामुळें गुरें वाढून, त्यांच्या योगानें खत वाढून, देशांत धान्य विशेष होऊं लागलें. तसेंच, विशेष पोषक जे जिन्नस, जसे, बटाटे, रताळीं वगैरे, व विशेष उत्पन्नाचे पदार्थ, जसे, विलायती ऊंस, विलायती कापूस इत्यादि, ह्यांची लागवड चालू करणें हें उत्पन्न वाढण्याचा एक उपाय आहे. तसेंच, नाना प्रकारच्या खतांच्या गुणांची माहिती, व त्यांची योजना करण्याचें ज्ञान, हीं-ही पहिल्या प्रकारांतच येतात. ज्या जनावरांच्या मांसावर मनुष्यांचें पोषण होतें, व ज्यांचा शेतकींत उपयोग घडतो, व ज्यांपासून दूधतूप होतें, असल्या जनावरांची ऊर्जा करण्याची व त्यांची संतति वाढण्याची कला, व माहिती, हींही ह्याच वर्गात मोडतात. ह्याप्रकारें अनेक उदाहरणें जाणावीं. दुसऱ्या प्रकारच्या सुधारणा; ज्यांनीं उत्पन्न तर वाढत नाहीं, पण तेंच उत्पन्न करण्याचा श्रम व खर्च कमी होतात. त्या प्रकारांत आऊतें चांगलीं करण्याच्या कल्पना येतात. नांगर, मोटा, घरट, विळे, इत्यादिकांची सुधारणा झाली असतां, तिच्या योगानें पीक तर वाढत नाहीं, पण तेंच पीक पहिल्या-

पेक्षां कमी श्रमानें प्राप्त होतें; आणि तेणेंकरून लोकसंख्या वाढल्यानें धान्य वगैरे भक्ष्य पदार्थ उत्पन्न करण्याचा खर्च जो वाढत असतो, तो कमी होतो.

शेतकीच्या कामांत दुसऱ्या प्रकारच्या सुधारणा सांगितल्या, त्यांच्याच सारखा वाहक श्रमांच्या सुधारणांचाही परिणाम आहे. चांगले रस्ते, व चांगली आऊतें, ह्यांपासून एकसारखेंच कार्य होतें. धान्यादि माल उत्पन्न करण्यांत श्रम कमी पुरूं लागला काय, किंवा तो माल जेथें खपतो, तेथें तो नेण्याचा श्रम कमी झाला काय, कोणतें झालें तरी फळ सारखेंच होतें. रस्ते वगैरे झाल्यानें खत वगैरे नेण्याचा खर्च कमी होतो; आणि तेणेंकरून एकंदर शेतकीचा श्रम कमी होतो; हा एक रस्ते वगैरे चांगले झाल्यापासून फायदा आहेच. सडका, लोखंडी रस्ते, कालवे वगैरे झाले, म्हणजे माल स्वल्पांत जाऊं येऊं लागतो; आणि तेणेंकरून तो माल उत्पन्न करण्याचा श्रम कमी झाल्याप्रमाणें होतें;—म्हणजे माल उत्पन्न करण्यास कमी श्रम पुरूं लागला असतां, जसा तो माल गिऱ्हाइकांस स्वस्ता मिळूं लागतो, तसेंच, तो माल कमी खर्चानें जाऊं लागण्यानेंही तो स्वस्त होतो. तसेंच, सडकांच्या वगैरे योगानें शेतकीच्या कामास उपयोगी जीं हत्यारें वगैरे असतात, तीं वाहक श्रम कमी झाल्यानें कमी किमतीनें मिळूं लागून तद्द्वारा उत्पन्नाचा खर्च कमी होऊं लागतो. तसेंच, सडकादिक नसतां उत्पन्नाचा खप नसल्यामुळें ज्या जमिनींची लागवड करण्यांत, किंवा त्यांत चांगलें उत्पन्न करण्यांत फायदा नसतो, तो फायदा, सडका वगैरे झाल्यामुळें थोड्या खर्चात माल दूरदूर जाऊं येऊं लागल्यानें त्या मालाचा खप वाढून, होऊं लागतो; आणि येणेंकरून देशाचें, खर्च वाढल्यावांचून, उत्पन्न वाढतें. तसेंच समुद्रावरचा व्यापार ज्या देशांत पुष्कळ असतो, त्या देशास गलबतें चालवायाची, व ती बांधण्याची वगैरे, कला वाढली असतां, तसाच मोठा फायदा होतो.

ह्याप्रमाणें विचार करून पाहातां असें दिसतें, कीं केवळ शिल्पांतल्या ज्या सुधारणा, ज्या सुधारणांचा शेतकीच्या कामाशीं कांहीं विशेष संबंध पहिल्यानें लक्ष्यांत येत नाहीं, तसल्या सुधारणांपासून देखील मनुष्यांच्या उपजीविकेचा खर्च कमी होतो. मातींतून लोखंड गाळण्याचे कृतींत मोठी सुधारणा होऊन लोखंड स्वस्त झालें असतां नांगर, वगैरे विशेष स्वस्त होतील. तसेंच त्या सुधारणांच्या योगानें सडका, लोखंडी रस्ते, कालवे, गाड्या, गलबतें, वगैरे करण्याचा खर्च कमी होईल. ज्या अनेक कामांत, महाग असल्यामुळें लोखंड आज लागत नाहीं, त्यांत तें लागूं लागेल; आणि तेणेंकरून उपजीविकेचे पदार्थ उत्पन्न करण्याचा एकंदर खर्च व श्रम कमी होतील. असेंच, हल्लीं धान्य जात्यांनीं दळावें लागतें, तर जात्यांबद्दल पवनचक्क्या, किंवा पाणचक्क्या व्यवहारांत चालू झाल्या; व मोटांनी पाणी काढण्याच्या ठिकाणीं वाफेच्या यंत्राची योजना झाली; तरी वरच्या सुधारणांसारखेंच कार्य होईल. वाहक श्रमांत सुधारणा होऊन जिन्नस इकडून तिकडे कमी खर्चानें जाऊंयेऊं लागल्यानें जो नफा होतो तो वर सांगितलाच आहे; त्यावरून इंजनरीच्या कामांत ज्या अनेक कला निघाल्या आहेत, त्यांचा, परंपरेनें उपजीविकेचा खर्च कमी करण्याकडे, उपयोग आहे, हें वाचणाऱ्यांनीं थोडा विचार केला असतां, त्यांच्या ध्यानांत येईल. जमिनीची समपातळी काढण्याच्या कलेचा, सडका, लोखंडी रस्ते, कालवे, वगैरे बांधण्याच्या कामांत, मोठा उपयोग आहे. तसेंच, तळीं, बांध, धरणें, पाट, बांधण्याच्या कामांत सुधारणा होऊन तीं कामें अल्प श्रमांत होऊं लागलीं किंवा पुष्कळ दिवस टिकूं लागलीं, तर त्यांच्या योगानें उपजीविकेचे पदार्थ उत्पन्न करण्याचा श्रम कमी होईल.

शिल्पाच्या कामांत अशा ज्या सुधारणा आहेत, कीं ज्यांपासून उपजीविकेचे उपयोगी धान्यादि पदार्थांची उत्पत्ति वाढण्यास कोणताही उपयोग घडत नाहीं; व तसें न घडल्यामुळें जमिनीचें उत्पन्न श्रमाच्या मानानें उत्तरोत्तर कमी होणें, ज्या सुधारणांनीं बंद होत नाहीं; त्या सुधारणांपासून देखील जें कार्य घडतें, त्याचा परिणाम जमिनीचें उत्पन्न वाढण्याच्या सारखाच आहे. जमिनीचें उत्पन्न कमी

होण्याचें त्या सुधारणांनीं बंद झालें नाहीं; तरी त्या नियमांपासून होणाऱ्या तोट्याएवढा व कधींकधीं त्या तोट्यापेक्षां मोठा, असा नफा त्या सुधारणांनीं होतो.

शिल्पानें जे जे जिन्नस तयार होतात, त्या सर्वांचीं द्रव्यें जमिनीपासून प्राप्त होतात, व त्या द्रव्यांपैकीं बहुत द्रव्यें शेतकीपासूनच होतात. वस्त्रें उत्पन्न करण्याचीं द्रव्यें कापूस, ताग, हीं तर शेतींतच पिकतात; रेशीम लोंकर हीं साक्षात् शेतांत पिकत नाहींत, तरी तीं ज्या रेशमी किड्यांपासून, व बकऱ्यांपासून उत्पन्न होतात; त्या प्राण्यांचें उपजीवन शेतकीच्या उत्पन्नावर (तुतीचा पाला, गवत वगैरे ह्यांवर) होतें. तस्मात् वस्त्रांचीं सर्व द्रव्यें केवळ जमिनीपासून होतात, असें म्हटलें पाहिजे. ह्याप्रमाणेंच धातूंच्या पदार्थांचीं द्रव्यें जीं तांबें, लोखंड, वगैरे धातू, तींही जमिनींतून प्राप्त होतात. जसजशी लोकसंख्या वाढत जाते, व अधिक उत्पन्न लागूं लागतें, तसतशी जमिनीची उत्पादकशक्ति कमी होऊन, धान्यादि उत्पन्न करण्याप्रमाणें, शिल्पांचीं द्रव्यें उत्पन्न करण्यासही उत्पन्नाच्या मानानें अधिकअधिक श्रम करावा लागतो. परंतु शिल्पकृत जिनसांस एकंदर जो खर्च लागतो, त्याशीं ताडून पाहिलें असतां त्यांचें द्रव्य उत्पन्न करण्याचा खर्च फारच थोडा असतो; ह्यास्तव तो जिन्नस तयार करण्यास लागलेल्या एकंदर श्रमांत द्रव्य उत्पन्न करण्याचा श्रम कितीएक ठिकाणीं हिशोबांत सुद्धां धरण्याजोगा असत नाहीं. पाहा, शालजोडी, शेला, पट्याळ, वगैरे पदार्थांच्या उदाहरणांत, द्रव्योत्पत्ति करण्याचा श्रम सर्व श्रमाचा हजारावा वांटा असेल, कीं नाहीं; कोण जाणे! जमिनींतून पदार्थ उत्पन्न करण्याचा श्रम खेरीज करून बाकी जो श्रम, म्हणजे पदार्थ विविक्षित रीतीनें तयार करण्याचा श्रम, तो तयार करण्याचे पदार्थ जसजसे पुष्कळ, तसतसा सर्व काळ, कमी पुरूं लागतो. शेतकीच्या कामांपेक्षा शिल्पाच्या कामांत, श्रमाची गरज कमी करणाऱ्या यंत्रादि युक्ति निघून त्यांची योजना होण्यास, फारच पुष्कळ जागा असते; व श्रमाचा विभाग, व त्याची यथायोग्य योजना हीं झाल्यापासून किती श्रम कमी होतो व त्या सुधारणा पूर्ण होण्यास मोठ्या खपाची, व कारखाने वाढवण्याची, आवश्यकता किती असते हें मागें सांगितलेंच आहे; तर सर्व गोष्टींचा विचार एकंदर करतां, असें दिसतें, कीं शिल्पकृत पदार्थांची उत्पत्ति जसजशी वाढती तसतसा त्यांच्या उत्पत्तीचा एकंदर खर्च कमी करण्याचीं कारणें इतकीं होतात, कीं त्यांपुढें, त्यांच्या उत्पत्तीचा उत्तरोत्तर खर्च वाढवणारें जें एक कारण (जमिनीचें उत्पन्न उत्तरोत्तर श्रमाच्या मानानें कमी होण्याचा नियम) त्याचें कांहींच चालत नाहीं. ह्यास्तव लोकवृद्धि झाल्यामुळें व लोकांच्या गरजा वाढल्यामुळें, शिल्पाच्या कामांत जे अधिक अधिक पदार्थ लागतात, ते उत्पन्न करावयास त्यांच्या इयत्तेच्या मानानें उत्तरोत्तर अधिक अधिक श्रम न लागतां, उलटा कमी कमी श्रम पुरतो. ही गोष्ट लोकस्थितीवरूनही सिद्ध होते. ती अशी, कीं इंग्लंडादि विद्याचारसंपन्न देशांत गेल्या दोनशें वर्षांत बहुतेक सर्व शिल्पकृत पदार्थांची किंमत व मोल हीं उत्तरोत्तर उतरत आलीं आहेत; व गेल्या साठसत्तर वर्षांत ज्या यंत्रादि सर्वोत्कृष्ट युक्ति त्या देशांत निघाल्या, त्यांच्या योगानें तर त्या किमती फारच उतरल्या आहेत; व ह्यापुढें त्या कोठपर्यंत उतरत जातील, ह्याची कल्पना देखील आज करतां येत नाहीं. असो.

आतां, ही गोष्ट चांगली संभवदुक्तिक आहे, कीं शेतकीचें उत्पन्न कदाचित् उत्तरोत्तर श्रमाच्या मानानें कमी कमी होत जाईल, व तसें झाल्यानें धान्यादि उपजीविकेच्या पदार्थांची किम्मत उत्तरोत्तर वाढत जाईल, आणि नवे नवे लोक वाढतील, त्या सर्वांस एकंदर लोकांच्या उपजीविकेकरतां शेतकीचें काम करावें लागेल; व इकडे शेतकीचें उत्पन्न कमी कमी होऊन, तिकडे अधिक अधिक श्रमाची गरज लागत असतां, तिकडे शिल्पाच्या सर्व कामांत श्रमाचें उत्पादकत्व असें जलद वाढेल, कीं शिल्पाच्या कामाकडला श्रम कमी करून तो शेतकीच्या कामाकडे लावतां येईल; आणि श्रम कमी झाला तरी शिल्पकृत पदार्थांचें उत्पन्न वाढेल; आणि तेणेंकरून, एकंदर पाहातां, देशांतील लोकांचा उत्तरोत्तर

निर्वाह चांगला होत जाईल; व हा फायदा कदाचित् अत्यंत गरीब लोकांस सुद्धां प्राप्त होईल. तो असा, कीं धान्यादि उत्तरोत्तर माहाग झाल्यामुळें झालेल्या त्यांच्या तोट्यापेक्षां त्यांस वस्त्रप्रावरणादि स्वस्त झाल्यानें नफा अधिक होईल.

ह्याप्रमाणें विचार करतां असें दिसतें, कीं संपत्ति उत्पन्न करण्याच्या कोणत्याही कामांत सुधारणा झाली असतां, तिच्यापासून कोणत्या तरी रीतीनें शेतकीच्या श्रमाचें उत्पादकत्व उत्तरोत्तर कमी होण्याच्या नियमाच्या कार्यास प्रतिबंध होतो, व असें संपत्ति उत्पन्न करण्याच्या कामांतल्याच सुधारणांपासून होतें, असें नाहीं; तर राजव्यवस्थेंत किंवा देशाच्या कायद्यांत सुधारणा झाल्या असतां, व लोकांच्या परस्पर संबंधांत, व त्यांच्या आचरणांत, सुधारणा झाल्या असतां, त्या बहुतेक सर्व सुधारणांपासून त्या नियमाच्या कार्याचा, साक्षात्, किंवा परंपरेनें अशा कोणत्या तरी रीतीनें, प्रतिबंध होतो. पाहा, देशांत वाईट कायदे असतात, किंवा जुलमी कर असतात, जे कर असल्यानें मनुष्यांची उत्पन्न वाढविण्याविषयीं प्रवृत्ति होत नाहीं; तसेंच, ज्या लोकचालींनीं ज्यांस जो व्यापार अत्यंत हितावह वाटतो, तो करण्यास प्रतिबंध असतो; किंवा नाना प्रकारचे अप्रयोजक खर्च करावे लागतात; किंवा मद्यपान, व्यभिचार, विश्वासघात वगैरे, लोकांत अनेक दुराचार असतात; किंवा राज्यनियम वाईट असल्यामुळें राजास व त्याच्या कामगारांस प्रजेस पीडा करतां येते; किंवा त्यांच्या संपत्तीचें हरण करतां येतें, किंवा राजाच्या अशक्तपणामुळें वगैरे देशांत दंगे व चोरावीं फार असतात; इत्यादि जे अनेक राजदोष व लोकदोष ह्यांचें निवारण ज्या कारणांनीं होतें, त्यांपासून तसेंच कार्य उत्पन्न होतें, म्हणजे श्रमाचें साधारण उत्पन्न वाढतें. परदेशाशीं व्यापार करण्याची मनाई, किंवा परदेशांतला माल न यावा, म्हणून त्या मालावर जबर जकाती, व देशांतल्या देशांत जकाती व नाना प्रकारचे व्यर्थ हक, व बाबी, ज्यांच्या योगानें वास्तविक श्रमकर्त्यांचा उत्पन्नाचा वांटा कमी होऊन श्रम न करणाऱ्यास तें फुकट मिळतें; त्या जकाती, बाबी वगैरे मोडल्यापासून तसाच उत्तम परिणाम होतो. शेतकऱ्यांपासून योग्य रीतीनें सारा घेण्याचा प्रकार, व त्यांस मोठमोठाले कौल देणें, व त्यांस जेव्हां पाहिजे तेव्हां शेत सोडण्याची मोकळीक देणें, व त्यांपासून योग्य काळीं पट्टी घेणें, व त्यांवर सरकारी अम्मलदारांस जुलूम करतां न येईल अशी तजवीज करणें, इत्यादि ज्या सर्व उत्तम गोष्टी सरकारांनीं आलिकडे चालू केल्या आहेत, त्यांपासून उत्पन्न वाढवण्यास मोठा उपयोग आहे.

लोकांत विद्येचा प्रसार होण्याच्या युक्ति आहेत, त्यांचा परिणाम फारच हितावह आहे, असें म्हटलें पाहिजे. श्रम करणाऱ्याच्या आंगीं समंजसपणा असणें हा गुण त्याच्या श्रमास विशेष उत्पादकत्व घेण्यास फारच आवश्यक आहे. तो समंजसपणा आमच्या ह्या देशांतल्याच श्रमकर्त्यांच्या आंगीं कमी आहे, असें नाहीं. आतां कदाचित् ह्या देशांत तो फारच कमी असेल; परंतु ती कमताई आपणास अत्यंत विद्याचारसंपन्न म्हणवणाऱ्या अशा कांहीं देशांत इतकी आहे, कीं ही कमताई दूर केली असतां, जितका नफा होईल, तितका दुसऱ्या कोणत्या कृत्यापासून होईल असें दिसत नाहीं; असें मोठ्या मोठ्या ग्रंथकारांचें म्हणणें आहे. ह्या देशांत अनेक कारखाने वगैरे झाले असतां, मोठें हित होईल खरें; परंतु मला वाटतें, की लोकांचा साधारण समंजसपणा वाढल्यानें जें हित होईल, तें हित त्याहीपेक्षां मोठें होईल. फार तर काय, ते सर्व कारखाने वगैरे इकडे होण्यासुद्धां तो समंजसपणाच मुख्यत्वेंकरून कारण आहे, असें म्हटलें तरी चालेल. असो. सावधपणा, विश्वासुकपणा, मितव्यय करण्याचा स्वभाव, हे गुण श्रमकर्त्यांचे ठायीं किंबहुना सर्व मनुष्यांचें ठायीं आवश्यक आहेत. तसेंच चाकर धनी, देणारा घेणारा, इत्यादिकांच्या ठायीं परस्पर मित्रभाव, परस्परांच्या हिताकडे परस्परांचें लक्ष्य, हे गुण लोकांत साधारण-रूपें चालू झाल्यास देशाचें, किंबहुना जगाचें किती कल्याण होईल बरें! समंजसपणा व सदाचरणप्रीति, हीं वाढलीं असतां श्रम करून पोट भरणाऱ्यांचेंच कल्याण होईल असें नाहीं; तर ज्यांस रिकामा

वेळ सांपडतो, असे जे श्रीमान लोक ह्यांच्या ठायीं हे गुण आले असतां, त्यांस उपयुक्त ज्ञान प्राप्त झालें असतां व त्यांचा विचार, सद्वासना व लोकप्रीति, हीं वाढलीं असतां, ते लोक देशांतली संपत्ति वाढण्याच्या पुष्कळ युक्ति चालू करण्यास, व त्या युक्ति वाढविण्यास, कारण होतील. तसेंच ते लोक विद्वान व सदाचरणी, झाल्यास त्यांच्या हातून देशांतलें राज्यनियम व लोकचाली चांगल्या होतील. सारांश, मानवी कृत्यांत सुधारणा झाली असतां, तीपासून जे अनेक हितावह परिणाम होतात, त्यांत बहुतकरून हा एक परिणाम होतो, कीं श्रमाची उत्पादकता वाढते. आतां विद्याभ्यासादिकांच्या योगानें मनुष्याचें मन विकसित होऊन त्यास विद्येची व उत्तम कलांची, गोडी लागली असतां त्याचें लक्ष्य सर्वात्म भावें संपत्ति उत्पन्न करण्याकडे लागणार नाहीं, खरें; तरी त्या कामाकडे तो जो श्रम करील, तो बहुतकरून नेहमीं विशेष फलोत्पादक होईल.

शेतकीच्या उत्पन्नाची इयत्ता नियमित करणारे जे वर परस्पर विरुद्ध नियम सांगितले, त्यांच्या स्वरूपाच्या विचारापासून जे मुख्य मुख्य सिद्धान्त ठरतात, ते सांगण्याच्या पूर्वी आपणास एक गोष्ट सांगितली पाहिजे, कीं शेतकीच्या विषयीं कमी उत्पन्नाचा जो नियम सांगितला, तोच नियम, जमिनीपासून ज्यांचीं द्रव्यें प्राप्त होतात, त्या सर्व कलांविषयीं लागू आहे. उदाहरणार्थ, खाणीचें काम घ्या. खाणींत जसजसें अधिक खणीत जावें, तसतसा उत्पन्नाच्या मानानें खर्च वाढत जातो; व खाणीच्या कामांत शेतकीच्या कामापेक्षां एक दोष विशेष आहे, तो असा, कीं खाणींतून जो पदार्थ काढावा, तो तींत शेतकींतल्या प्रमाणें पुढील वर्षी पुनः उत्पन्न होत नाहीं; ह्यामुळें शेवटीं खाणीचें उत्पन्न मुळींच संपण्याचा निश्चय आहे, एवढेंच नाहीं; तर हल्लीं जरी इंग्लंडांतल्या कोळशांच्या खाणी रिकाम्या होण्याचें चिन्ह अगदीं दिसत नाहीं, तथापि दरदर वर्षी त्या खणण्याचा खर्च उत्पन्नाच्या मानानें अधिक अधिक लागतो; तो ह्या कारणांनीं कीं खाण उत्तरोत्तर विशेष खोल, किंवा आडवी लांब, खणावी लागते. तसेंच, खळींतलें पाणी उपसून काढण्यास अधिक श्रम करावा लागतो. आंतली धातूंची माती, किंवा कोळसे, वगैरे अधिक खोल तळापासून वर शेंदावे लागतात, व आडवी खाण गेली असल्यास खाणीच्या तोंडाशीं आणावयाकरतां विशेष अंतरावर न्यावे लागतात. एवढ्याच विचारावरून पाहातां, कमी उत्पन्न होण्याचा नियम शेतकीपेक्षां खाणीच्या कामास विशेष लागू दिसतो; परंतु खाणीच्या कामांत जो एक मोठा गुण आहे, तो शेतकींत नाहीं. तो गुण हा, कीं खाणीच्या कामांत नाना प्रकारच्या सुधारणा होण्यास पराकाष्ठेची जागा आहे, तितकी जागा शेतकींत नाहीं. वाफेच्या यंत्राची योजना प्रथम मोठ्या कामाकडे झाली, ती खाणीच्या कामांत झाली; व मातीपासून शुद्ध धातू काढण्याच्या कृतींत रसायनशास्त्राच्या योगानें पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत; व पुढें किती होतील, त्यांची मर्यादा दिसत नाहीं. तसेंच, वरच्यावर नव्या नव्या जुन्यांसारख्या व जुन्यापेक्षां चांगल्या खाणी सांपडतात, तेणेंकरून खाणीच्या कामांत कमी उत्पन्नाचा नियम चालू होण्यास पुष्कळ काळपर्यंत प्रतिबंध होईल.

ह्या सर्व भागाचा सारांश असा दिसतो, कीं संपत्तीच्या उत्पन्नाचीं जमीन वगैरे नियमित विस्ताराचीं व नियमित इयत्तेचीं, जी स्वाभाविक कारणें आहेत, त्यांची उत्पादकशक्ति सांसिद्धिक आहे, इतकेंच नाहीं; तर त्या चरम अवधीपर्यंत उत्पन्न पोहंचण्याचें आधींच पुष्कळ वेळ, जसजसें अधिक उत्पन्न करूं लागावें, तसतसा उत्पन्नाच्या मानानें अधिकअधिक श्रम लागूं लागतो, ही एक गोष्ट; व ज्या ज्या गोष्टींनीं मनुष्याची शक्ति जड पदार्थावर चालू होऊन ते पदार्थ त्यांच्या अंमलांत येतात, त्या त्या गोष्टींनीं व विशेषतः त्या पदार्थांच्या कार्यकारणभावाचें ज्ञान होऊन त्या पदार्थांची स्थिति पाहिजे तशी त्यांस करतां आल्यानें, उत्पन्न कमी होण्याच्या सामान्य नियमांचा प्रतिबंध होतो; व कधीं कधीं उत्पन्न कमी न होतां उलटें वाढतें, ही दुसरी गोष्ट.

## भाग तेरावा.

# मागल्या तीन भागांत सांगितलेल्या नियमांचीं कार्यें.

मागल्या तीन भागांत जें प्रतिपादन केलें, त्यावरून असें दिसतें, कीं संपत्तीच्या वृद्धीच्या मर्यादा, म्हणजे प्रतिबंधक कारणें, दोन आहेत. भांडवलाची कमताई हें पहिलें, व जमिनीची कमताई हें दुसरें. कोणत्याही देशांत संपत्ति वाढण्याची जी खुंटते, ती त्या देशांतल्या लोकांत विशेष भांडवल वाढण्याजोगी उत्कट संग्रहेच्छा नसते, म्हणून खुंटते; किंवा भांडवलवाल्यांत संचय करण्याचें सामर्थ्य व इच्छा हीं असतांही, जमिनीच्या कमताईमुळें प्रकृत उपभोगाचा त्याग करण्याजोगा नफ्याचा दर नसतो, म्हणून खुंटते.

एशिया खंडांत जे अनेक प्रकारचे लोक आहेत, त्यांच्याप्रमाणें जेथच्या लोकांत संग्रहवासना फारच दुर्बल असते, व जेथें नफा फारच मोठा असल्यावांचून, व नफा मोठा असून तो अविलंबें करून प्राप्त झाल्यावांचून लोक संग्रह करीत नाहींत; व संग्रह करण्याचें सामर्थ्य येण्याविषयीं श्रमही करीत नाहींत; व जेथें ज्यांच्या योगानें मनुष्याचें काम सूक्ष्मपदार्थच करतात, अशा ज्या यंत्रादि युक्ति त्यांची योजना करण्याजोगें लोकांस ज्ञान किंवा दीर्घदृष्टी नसते, किंवा त्यांपाशीं भांडवल नसतें, त्यामुळें देशांत उत्पन्नच थोडें असतें, किंवा उत्पन्न करण्यास फारच कष्ट करावे लागतात; तसल्या देशांत संपत्ति वाढण्यास उपाय म्हटला, म्हणजे त्यांत उपयुक्त कलांचें ज्ञान, दीर्घदृष्टि, व्यापार करण्याचें धारिष्ट, उद्योग करण्याची आवड, व संग्रह करण्याची वासना, इत्यादि गुण वाढले पाहिजेत. हे गुण वाढण्याचे मार्ग म्हटले, म्हणजे चांगली राज्यव्यवस्था, मालमत्तेचें विशेष रक्षण, हलके कर, हे होत. तसेंच राजा व त्याचे कामगार, ह्यांस करांच्या मिषानें प्रजेची संपत्ति बुचाडतां न यावी; व उद्योग करणाऱ्यांस त्यांचा श्रम, त्यांचें चातुर्य, त्यांची काटकसर, ह्यांचें फल जितकें पूर्णपणें मिळण्याजोगें असेल, तितकें मिळेल अशी व्यवस्था असावी; व शेतकऱ्यांस त्यांच्या रोजगारांत फायदा होईसा साऱ्याचा दर असावा, व त्यांनीं त्या कामांत भांडवल घातल्यास त्याचा नफा निघण्याजोगे त्या शेताचे कौल पुष्कळ वर्षांचे असावे. तसेंच, साधारण लोकांचा समंजसपणा वाढावा. त्यांचा श्रम सफल होण्यास व्यत्यय आणणाऱ्या ज्या वाईट देशचाली व वेड्या समजुती असतील, त्या नाहींतशा व्हाव्या; व ऊहापोह करण्याची संवय त्यांच्या मनास लागावी; व त्यांस नव्या सुखांची गोडी उत्पन्न व्हावी; व ज्या देशांत संपत्ति वाढवावयाची असते, त्या देशांतल्या लोकांच्या दुर्बल संग्रहवासनेनेंही त्यांची नवें भांडवल करण्याविषयीं प्रवृत्ति होण्याजोगा नफा होईल, असल्या परदेशांतल्या कला, त्या देशांत प्रवृत्त कराव्या. तसेंच परदेशांतले लोक भांडवल घेऊन ह्या देशांत येतील असें करावें, म्हणजे तेणेंकरून विवक्षित देशांत संपत्ति वाढणें, हें त्या देशांतल्या लोकांची काटकसर व पुढील काळजी, ह्यांवरच राहात नाहीं. परदेशांतले लोक येथें व्यापार करूं लागलेले पाहून ह्या विवक्षित देशांतल्या लोकांस उत्तेजन येतें, व त्यांच्या सहवासानें वगैरे ह्यांस नव्यानव्या गोष्टी समजूं लागतात. तेणेंकरून त्यांची अवस्था जरी कदाचित् चांगली न झाली, तरी वाईट देशचालींचे पाश तुटूं लागतात, व ह्यांस नव्या नव्या जिन्नसांची आवड लागते; व आपणही त्या परकीय लोकांप्रमाणें संपत्ति मिळवावी, अशी मनांत उमेद येते; व पुढील विचार करण्याची संवय लागते; इत्यादि अनेक मार्ग आहेत. हा जोवर सर्व विचार सांगितला हा थोडाबहुत एशियांतील सर्व

देशांस लागू आहे. व रशिया, इंगारी, स्पेन, ऐर्लंद, इत्यादि युरोपांतल्याही कांहीं देशांस हा विचार लागू आहे.

आतां इंग्लंड प्रभृति कांहीं थोडेसे असे देश आहेत, कीं ज्यांत उद्योग करण्याची गोडी, व संग्रह करण्याची कार्यक्षम वासना, लोकांत पुष्कळ असल्यामुळें त्या वाढविण्याची तादृश गरज नाहीं. ज्या देशांत लोक थोड्या फलासाठीं संतोषानें पुष्कळ कष्ट करतात, व थोडा नफा मिळवण्याकरतां, प्रकृत उपभोगाचा त्याग करतात, व ज्या देशांत यद्यपि मजूरी करून तीवर पोट भरणाऱ्या लोकांमध्यें जितका काटकसरीपणा व पुढील विचार, हे असावे तितके नाहींत; तथापि ते गुण व्यापारी वगैरे पुष्कळ लोकांत असावे, त्यापेक्षां सुद्धां कदाचित् फार आहेत; अशा अवस्थेस येऊन पोंचलेल्या देशांत पिकाऊ जमिनीच्या कमताईमुळें लोकांच्या श्रमास उत्तरोत्तर कमी कमी उत्पादकत्व न येतें तर, भांडवल अमर्याद वाढून त्याची न्यूनता कदापि न पडती. ही कमताई पडण्याचें कारण तसल्या देशांत हेंच, कीं तेथें चांगल्या जमिनी कमी त्यामुळें श्रमाचें उत्पादकत्व कमी होतें; आणि तेणेंकरून जसजशी विशेष संपत्ति उत्पन्न करावयास लागावें, तसतशी उत्पादक श्रम करणाऱ्यांची अवस्था वाईट वाईट होऊं लागते, व श्रमाचें उत्पादकत्व कमी कमी होऊं लागतें, आणि तेणेंकरून परिणामीं संपत्ति वाढण्याची मुळींच खुंटते. ही गोष्ट, जमिनीच्या उत्पन्नाच्या ठायीं उत्तरोत्तर कमी होण्याचा जो गुण आहे, त्याचेंच शुद्ध कार्य होय.

कोणताही देश घ्या; ज्या देशांत शेतकीच्या कामांत बरीच सुधारणा झाली आहे, त्या त्या देशांत लोकसंख्या वाढल्यामुळें धान्यादि पदार्थ जेव्हां जेव्हां अधिक करावे लागतात, तेव्हां तेव्हां तसें करण्यापासून, सामान्यतः पाहिलें असतां, प्रत्येक उत्पादक मनुष्याच्या संपत्तीचा पहिला वांटा कमी होतो. आतां लोकवृद्धीबरोबर तिच्याच मानानें धान्यादि उत्पन्न करण्यांत सुधारणा झाल्यास मात्र, वर सांगितलेला परिणाम घडत नाहीं; परंतु वर सांगितलेल्या सुधारणा न झाल्यास, व देशांत चांगली पड जमीन नसल्यास, प्रजावृद्धि जसजशी होत जाते, व नव्या प्रजेकरतां जसजसें धान्यादि अधिक उत्पन्न करावें लागतें, तसतसें श्रमाचें उत्पादकत्व कमी झाल्यावांचून राहात नाहीं; व जर कोणत्या स्थळीं व कोणत्या काळीं, हा अनिष्ट परिणाम घडल्यावांचून प्रजावृद्धि होत असेल, तर त्या त्या स्थळीं व त्या त्या काळीं लोकवृद्धीच्या मानानें सुधारणा वाढत गेली पाहिजे, व चांगल्या चांगल्या युक्ति निघून त्यांच्या योगानें मनुष्यांचा अंमल जड पदार्थांवर अधिक अधिक वाढत असला पाहिजे. तसें झाल्यावांचून तें कदापि व्हावयाचें नाहीं.

वरील उपपादनावरून असें सिद्ध होतें, कीं देशांत संपत्तीची वृद्धि बंद होण्यास किंवा ती कमी होण्यास कारणें दोन होत. एक भांडवलाची कमताई, आणि दुसरी पिकाऊ जमिनीची कमताई; ह्या देशांत संपत्तीची वृद्धि व्हावी, तशी होण्यास जो प्रतिबंध होतो, तो दुसऱ्या कारणानें तादृश होतो असें म्हणतां येत नाहीं; तर तो पहिल्या कारणानेंच प्रायः होतो. आतां बहुतेक सर्व लोक असें समजतात, कीं ह्या देशांत जें पुष्कळ दरिद्र आहे, तें केवळ सरकारच्या दोषानें आहे. सरकारानें पुष्कळ लोकांस चाकऱ्या दिल्या, व त्यांस मोठमोठाले पगार दिले, व सारा कमी केला; तर बहुत लोक सधन व सुखी होतील; परंतु ही समजूत वरच्या उपपादनावरून पाहातां, भ्रांतिरूप आहे असें स्पष्ट दिसतें. लोकांत दारिद्य यावयास सरकार कारण पुष्कळ ठिकाणीं असतें, ही गोष्ट सर्वांस मान्य करावी लागेल; परंतु तें जें दारिद्यास कारण होतें, तें, कामगार लोक कमी ठेवल्यानें, किंवा त्यांस पगार कमी देण्यानें, होत नाहीं; तर लोकांत चांगला बंदोबस्त न ठेवण्यानें, व चोर, दरवडेकरी, ठक, ह्यांस प्रजेस लुटूं दिल्यानें, किंवा आपल्या कामगारांच्या जुलमापासून तिचें संरक्षण न करण्यानें, किंवा आपणच लढाया वगैरे व्यर्थ खर्च चालवण्याकरतां कराच्या मिषानें तिच्या संपत्तीचें हरण

करण्यानें, होतें. आतां सारा घेण्यानें सरकार देशास गरिबी येण्यास कारण होतें, हें म्हणणें अंमळ बरेसें दिसतें; परंतु विचार करून पाहातां असें दिसतें, कीं सरकार जर जमिनीचा सारा केवळ भाड्याच्या रूपानें घेतें आहे; तर त्या घेण्यापासून देशास गरिबी येते, असें म्हणतां येत नाहीं. कारण सरकारानें भाडें घ्यावयाचें सोडलें; तर जेवढे शेत करणारे आहेत, त्यांचा मात्र नफा होईल; एकंदर देशाचा नफा म्हणून होणार नाहीं. असो. ही गोष्ट पुढें जेव्हां भाड्याच्या स्वरूपाचें विवरण होईल, तेव्हां चांगली लक्ष्यांत येईल. आतां पुष्कळ लोकांस चाकरीस ठेवून त्यांस मोठमोठे पगार देण्यापासून, एकंदर देशाच्या मानानें पाहातां, लोक सधन न होतां उलटे कांहीं भिकारी होतील. कारण सरकार जें आपले कामगारांस वेतनें देतें, तें मंत्रानें पैसा उत्पन्न करून तो देत नाहीं; तर प्रजेपासून करादिकांच्या रूपानें घेऊन तो देतें. तेव्हां सरकारकामगारांची संख्या वाढवली असतां, व त्यांस पगार मोठे केले असतां लोकांस अधिक कर द्यावा लागून ते पूर्वीपेक्षां विशेष भिकारी मात्र होतील. तर ह्यावरून पाहातां सरकारी चाकरी लागणें, व ती पहिलीच असल्यास पगार अधिक होणें, ह्या गोष्टी एकेका पुरुषाच्या दृष्टीनें, त्यांच्या कल्याणास कारण आहेत खऱ्या; परंतु सर्व देशाच्या दृष्टीनें पाहातां, त्या देशाच्या सधनतेस कारण नाहींत, इतकेंच नाहीं, तर उलट्या देशास निर्धनता येण्यास त्या कारण होत. सरकार चांगलें असलें, म्हणजे त्यापासून इतका उपयोग घडतो, कीं देशांत उत्पन्न झालेल्या संपत्तीचा नाश होत नाहीं; व्हावा, त्यांस तिचा उपभोग होतो; आणि तसें झाल्यानें संपत्ति उत्पन्न करण्यास लोकांस उत्तेजन येतें. यद्यपि हा उपयोग लाहानसाहान नाहीं, फार मोठा आहे खरा, परंतु एवढ्यानेंच देशाची संपत्ति कदापि वाढावयाची नाहीं. देशाची संपत्ति वाढण्यास देशांत भांडवल वाढलें पाहिजे; व भांडवल वाढण्यास लोकांत कार्यक्षम अशी संग्रहवासना, व श्रम करण्याची गोडी, ह्या वाढल्या पाहिजेत; व श्रमास व भांडवलास विशेष फलद्रूपता येण्यास कलाकौशल्य व सृष्टपदार्थांच्या धर्मांचें यथार्थ ज्ञान, ह्यांचा उत्कर्ष झाला पाहिजे; व लोकांचा समंजसपणा व नीति, ह्या वाढल्या पाहिजेत, हीं व ह्यांसारखीं दुसरीं कारणें हीं सिद्ध झाल्यावांचून राज्यनियम, व राज्यव्यवस्था, हीं कितीही चांगलीं झालीं तरी त्यांपासून लोकांच्या दारिद्र्याची निवृत्ति कदापि व्हावयाची नाहीं. ह्यास्तव देशाचें कल्याण करूं इच्छिणाऱ्या परोपकारी व देशाभिमानी पुरुषांनीं राज्यव्यवस्था वगैरे सुधारण्याकडे लक्ष्य देऊं नये, असें आमचें म्हणणें नाहीं; तर तिकडे लक्ष्य देऊन त्यापेक्षां भांडवल वगैरे वाढवण्याकडे विशेष लक्ष्य द्यावें; तरच त्यांचे उद्देश सिद्धीस जातील.

आतां जेथे भांडवलाच्या न्यूनत्वामुळे संपत्ति वाढवण्याची खुंटते, तेथची गोष्ट झाली. परंतु इंग्लंड वगैरे ज्या देशांत भांडवल मुबलक असतें; परंतु पिकाऊ जमिनीच्या कमताईमुळें पुढें संपत्ति वाढणें मना होतें. तेथें शेतकीच्या वगैरे कामांतल्या सुधारणांच्यापेक्षां अधिक मानानें प्रजावृद्धि झाली असतां उत्तरोत्तर श्रमाची व भांडवलाची उत्पादकत्वशक्ति कमी कमी होऊन लोकांस दारिद्र्य येतें, म्हणून तसल्या देशांत प्रजावृद्धि बेतानें होईल, अशा उपायांची योजना करणें आवश्यक आहे. ह्या विषयावर त्या तसल्या इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतल्या कांहीं ग्रंथकारांचे म्हणणें असें आहे; कीं त्या देशांत कांहीं लोक फारच श्रीमंत व कांहीं फार भिकारी असें संपत्तीचें वैषम्य आहे, म्हणून प्रजावृद्धि बेतानें राखण्याची आवश्यकता उत्पन्न होते. संपत्तीचें साम्य जर असतें, तर ती आवश्यकता आली नसती. परंतु ह्या भागाच्या आरंभीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत; त्यावरून पाहातां तें त्यांचें म्हणणें खरें दिसत नाहीं. प्रजावृद्धि बेतानें राखण्याची आवश्यकता संपत्तीचें वैषम्य असतां जशी आहे, तशीच संपत्तीचें साम्य असतांही राहील. देश अज्ञान किंवा सज्ञान कोणत्या अवस्थेंत असो, त्या देशांत लोकसंख्या कमी असतां प्रत्येक मनुष्यास सरासरीनें संपत्तीचा जो अंश येईल, त्यापेक्षां तो, लोकसंख्या अधिक झाली असतां, कमी येईल, ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. ह्यास्तव देशांत प्रजातिवृद्धि

झाली असतां जे दारिद्र्यादि अनर्थ उत्पन्न होतात, ते सृष्टपदार्थ, जमीन वगैरे, ह्यांची उत्पादकशक्ति उत्तरोत्तर क्षीण होत जाते म्हणून होतात; मनुष्यकृत व्यवस्थांच्या दोषानेंच केवळ होत नाहींत असें म्हटलें पाहिजे. लोकव्यवस्था व राज्यव्यवस्था, वाईट असल्यानें इतकेंच होतें, कीं कांहीं काळानें जे अनर्थ व्हावयाचे, किंवा लोकवृद्धीचा प्रतिबंध करण्याची जी आवश्यकता यावयाची, ते अनर्थ, किंवा ती आवश्यकता, ही कांहीशी लौकर येतात. परंतु लोकव्यवस्था वगैरे उत्तम असलीं, म्हणजे ते अनर्थ वगैरे यावयाचेच नाहींत, असें समजतां उपयोगी नाहीं. कोणी असे म्हणतात. कीं खाणारे लोक देशांत अधिक झाल्यास काय चिंता आहे? जितके खाणारे अधिक होतात, तितके काम करणारेही अधिक होऊन उत्पन्न अधिक होईल. परंतु हें त्यांचें म्हणणें व्यर्थ आहे; कारण नव्या मनुष्यांस खावयास जुन्यांच्या बरोबरीनें लागतें, कमी पुरत नाहीं. परंतु त्यांच्या श्रमाची उत्पादकता उत्तरोत्तर कमी होत जाते. इंग्लंडादि सधन देशांत संपत्ति उत्पन्न करण्याचीं जीं साधनें आहेत, तीं सर्वांचीं समाईक केलीं, व देशांत एकंदर जें होईल, ते सर्वांस सारखें वांटून दिलें, अशी व्यवस्था झाली असतां, तेथील लोक पहिल्याप्रमाणें जर श्रम करतील, तर हल्लीं त्या देशांत जितकी प्रजा आहे, तितकी सर्व मोठ्या सुखानें नांदूं लागेल, आणि देशांत दारिद्र्य अगदीं नाहींसें होईल; ही गोष्ट खरी; परंतु ही अशी सुखाची स्थिति फार दिवस राहाणार नाहीं. कारण, असें झालें असतां, प्रजावृद्धीचीं हल्लींचीं प्रतिबंधकें नाहींतशीं होऊन पुढल्या वीस वर्षांत प्रजासंख्या हल्लींच्या दुप्पट होईल, आणि तसें झाल्यावर त्यांची अवस्था कशी होईल बरें? आतां, त्याच वीस वर्षांत शेतकीच्या वगैरे कामांत कांहीं लोकोत्तर सुधारणा होऊन श्रमाची उत्पादकत्वशक्ति विलक्षण वाढली तर गोष्ट निराळी; पण तसे न झाल्यास पुढल्या वीस वर्षांत त्या देशांतल्या लोकांस निकृष्ट जमिनींची लागवड करावी लागेल, किंवा जुन्या जमिनीवर थोड्या उत्पन्नासाठीं पूर्वीपेक्षां अधिक श्रम करावा लागेल; आणि तसें करावें लागल्याच्या पोटीं श्रमाच्या मानानें एकंदर उत्पन्न कमी होऊन प्रत्येकाचा वांटा कमी होईल, आणि वीस वर्षांपुढेंही जर लोकवृद्धि वरच्याच मानानें होत जाईल, (आणि मनुष्यकृत प्रतिबंधकें नसल्यास तशी ती होण्याचा संशय नाहीं.) तर लौकरच अशी वेळ येईल, कीं प्रत्येक मनुष्याच्या वांट्यास प्राणधारणापुरताच केवळ संपत्त्यंश येईल; व पुढें तशीच प्रजावृद्धि होत चालल्यास केवळ मृत्यूनें ती खुंटेल. तस्मात् संपत्तिसाम्य असलें, तरी प्रजावृद्धि बेतानें राखण्याची आवश्यकता आहेच असें सिद्ध होतें.

विवक्षित काळीं किंवा विवक्षित स्थळीं श्रमाच्या मानानें लोकांची उत्पादकत्वशक्ति वाढणें किंवा कमी होणें, व लोकांची साधारण स्थिति वाईट होणें किंवा चांगली होणें, ह्या गोष्टी त्या काळीं किंवा त्या स्थळीं लोकसंख्येपेक्षां सुधारणा वाढण्यावर, किंवा सुधारणेपेक्षां लोकसंख्या वाढण्यावर आहेत. श्रमसंयोग उत्तम प्रकारचा होण्यास जितकी लोकसंख्या आवश्यक असते, तितकी लोकसंख्या वाढल्यावर पुढें जी लोकसंख्या वाढते, ती स्वरूपतः पाहिली असतां देशास उपद्रवकारक होय. परंतु असें असता, ही देशात लोकसंख्या वाढत असता, अनेक स्थळीं साधारण लोकांची स्थिति उत्तरोत्तर वाईट न होता कदाचित् चांगलीचांगली होत जाते. तिचें कारण असें असतें, कीं त्या स्थळीं लोकसंख्येपेक्षां सुधारणा अधिक वाढत असते; व सुधारणेपासून प्रजावृद्धीचे अनिष्ट परिणामाचा प्रतिबंध कांही ठिकाणीं होतो, म्हणून मागील एका भागांत सांगितलेंच आहे. येथें सुधारणा शब्दाचा अर्थ मोठा व्यापक घ्यावयाचा; व त्यांत श्रमाची उत्पादकता साक्षात् वाढवणाऱ्या ज्या अनेक यंत्रशास्त्रसंबंधी व रसायनशास्त्रसंबंधी वगैरे युक्ति, त्यांचा संग्रह करावयाचा. तसाच, त्या शब्दाच्या अर्थात राज्यव्यवस्था, व लोकव्यवहार, व लोकांच्या समजुती, व त्यांचें आचरण, ह्यांत झालेल्या ज्या ज्या सुधारणा श्रमाची उत्पादकत्वशक्ति वाढण्यास साक्षात् किंवा परंपरेने कारण होतात, त्या सर्व सुधारणांचाही अंतर्भाव करावयाचा. देशांत प्रजावृद्धि ज्या मानानें होत असेल, त्याच मानानें श्रमाची उत्पादकशक्ति

वाढत असली, तर, वाढलेल्या प्रजेसाठीं धान्यादिक उपजीविकासामग्री उत्पन्न करण्याकरितां पहिल्यापेक्ष निकृष्ट प्रतींच्या जमिनींची लागवड करण्याची, किंवा थोड्या उत्पन्नाकरतां जुन्या जमिनींवरच अधि श्रम करण्याची गरज पडत नाहीं; व शेतकींत सुधारणा न होऊन तींत उत्पन्नाच्या मानानें अधिक श्र करावा लागला, तरी शिल्पकृत पदार्थांच्या उत्पत्तींत सुधारणा होऊन त्या पदार्थांच्या उत्पत्ती पहिल्यापेक्षां थोडा श्रम पुरून बाकीचा श्रम शेतकीकडे अधिक व्हावा, तो लावायास सांपडते एतावता देशाच्या एकंदर उत्पन्नांत तूट पडत नाहीं. परंतु सुधारणा वाढण्याची बंद झाली, किंवा कम झाली, आणि प्रजावृद्धि होण्याची जर त्याच मानानें कमी झाली नाहीं; आणि जर मनुष्यांच सृष्टपदार्थांवर अंमल आहे तितकाच आहे आणि तितक्याच अमलाच्या योगानें त्यांपासून अधि संपत्ति उत्पन्न करावयाची आहे, तर वाढलेल्या नव्या प्रजेस जे उपजीविकेचे धान्यादि पदार्थ पाहिजेत ते प्रत्येक मनुष्याचा श्रम सरासरी मानाने अधिक झाल्यावांचून, किंवा प्रत्येकाचा, सरासरी माना संपत्तीचा वांटा कमी झाल्यावांचून, उत्पन्न व्हावयाचे नाहींत.

देशांत सुधारणांपेक्षां लोकसंख्या अधिक वाढून लोकांस उपजीविकेचे पदार्थ वगैरे प्राप्त करू घेण्याकरितां चांगल्या जमिनीच्या कमताईमुळें उत्पन्नाच्या मानानें अधिकाधिक श्रम करावा लागतो तेव्हां ह्या संकटाचें निवारण करण्याचे दोन मार्ग आहेत; त्या मार्गांचें अवलंबन केलें असतां, लोकसंख्य वाढली असतांही, देशांतल्या एकंदर श्रमाचें उत्पादकत्व कमी होत नाहीं. त्या दोन मार्गांपैकीं परदेशांत धान्य आणणें ह्या एक मार्ग; व परदेशांत वस्ती करावयास लोक पाठवणें ह्या दुसरा मार्ग.

परदेशांतून कमी दरानें धान्य आणणें, व जिच्या योगानें स्वदेशांतच कमी खर्चांत धान्य उत्प करतां येतें अशी शेतकीच्या कामांतली एकादी सुधारणा करणें, ह्या दोन्ही गोष्टींचा परिणाम एक आहे. दोनही गोष्टींनीं देशांतील श्रमाची उत्पादकत्वशक्ति वाढती. परदेशांतून धान्य आणण्याची री पडण्यापूर्वी, शेतकींत विवक्षित श्रम केला असतां, त्यापासून विवक्षित धान्य प्राप्त होत असतें; परं परदेशांतून धान्य आणण्याची रीत चालू झाली असतां तितकाच श्रम स्वदेशांत वस्त्रें, लांकडी सामा किंवा लोखंडी किंवा पितळी सामान, किंवा परदेशांत जो कोणता जिन्नस विकत असेल, तो जिन्नस, उत्प करण्याकडे लावला असतां, ते जिन्नस परदेशाच्या लोकांस देऊन त्यांपासून अपल्या देशांतल्यापे अधिक धान्य प्राप्त होऊं लागतें. शेतकीच्या कामांत झालेली सुधारणा, किंवा परदेशांतून कमी दरानें धा आणण्याची रीत, ह्या दोन्ही गोष्टींनीं जमिनीचा स्वामाविक पिकाऊपणा कमी असल्यामुळें संपत्तीच वृद्धीस जो प्रतिबंध झाला असतो, तो कांहींसा दूर होतो. आणि देशांत संपत्ति उत्पन्न करण्याच शक्तीचा जो संकोच व्हावयास लागला असतो, तो बंद होऊन पुनः त्या शक्तीचा विकास होऊं लागतं वरवर विचार करणाऱ्यांस कदाचित् असें वाटेल, कीं ज्या देशांत सर्व देशांशीं व्यापार करण्या मोकळीक असते, व ती असल्यामुळें पृथ्वीवर जेथें जेथें स्वस्त धान्य असेल, तेथून तें आणतां ये त्या देशास प्रजेच्या अतिवृद्धीपासून होणाऱ्या अनर्थांचें भय नाहीं. कारण पृथ्वीवरच्या स देशांतून धान्याचा पुरावा होत असल्यावर पृथ्वीचे एका कोंपऱ्यासारख्या एका देशांत दुप्प आणि तिप्पट प्रजा वाढली, तरी ती कितीशी वाढणार आहे? व तीपासून पुराव्यांत तोटा का पडणार आहे? परंतु असें अनुमान जे करतात, ते प्रकृत विषयास लागू अशा बहुत गोष्टींक दुर्लक्ष्य करतात. त्या गोष्टी त्यांनीं मनांत आणल्यास त्यांस वर सांगितल्याप्रमाणे वाटणार नाह त्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी पुढें सांगतों.

कोणताही देश घेतला, तरी त्यास पृथ्वीवरील सर्व देशांतून धान्य आणण्याची सोय नसते. धा आणणाऱ्या देशाच्या शेजारीं जे देश असतील, व ज्यांच्या व ह्या देशाच्यामध्यें डोंगर वगैरे नसतील, त्यांत मात्र या देशास धान्य आणतां येईल; व ह्या देश समुद्राच्या कांठीं अथवा मोठ्या नदीच्या कांठीं असल्य

त्याच समुद्राच्या कांठीं, किंवा नदीच्या कांठीं जे देश असतील तेथचें धान्य मात्र ह्या देशास आणतां येईल. तसेंच ज्या देशांतून धान्य आणावयाचें, तेथें ह्या देशांतल्यापेक्षां अधिक पिकाऊ जमीन पाहिजे. परंतु समुद्राच्या किंवा मोठ्या नदीच्या काठीं जे पिकाऊ जमिनीचे देश आहेत, तेथें बहुतकरून प्रजाही पुष्कळ आहे. ह्यास्तव त्या देशांत तेथचे लोकांस पुरून दुसऱ्या ठिकाणीं पाठवण्यास धान्यही फार असत नाहीं. आतां समुद्राच्या कडेस असून ज्यांत पिकाऊ जमीन पुष्कळ, व जेथें वस्ती थोडी, असे देश कांही आहेत. परंतु ते थोडे आहेत, ह्यास्तव मनस्वी प्रजा वाढली असतां तिच्या निर्वाहास पुरेसा धान्याचा पुरावा उत्तरोत्तर उत्पन्नाच्या मानानें खर्च ज्यास्त लागल्यावांचून फार दिवस त्या देशांकडून व्हावयाचा नाहीं. समुद्रकिनाऱ्यापासून दूर जे देश असतात, तेथें धान्य कमी खर्चात होण्याजोग्या जमिनी असल्या तरी प्रकृत काळीं त्यांचा उपयोग दुसऱ्या दूरच्या देशांस पडत नाहीं. कारण, धान्याची किंमत कमी ज्यास्त होणें, जसें तें उत्पन्न होण्यास जो खर्च लागतो, त्यावर असतें; तसेंच तें विवक्षित ठिकाणीं येण्यास जो खर्चवेच लागतो, त्यावरही असतें. आतां दोनही देश समुद्राच्या कांठीं असले म्हणजे थोड्या खर्चात गलबताच्या योगानें एकांतलें धान्य दुसऱ्यांत जातें. परंतु दोन किंवा दोहोंतून एक देश समुद्रापासून किंवा मोठ्या नदीपासून दूर असला, म्हणजे जाण्यायेण्याचा खर्च मनस्वी होऊन एक ठिकाणचें धान्य दुसऱ्या ठिकाणीं जात नाहीं. आतां सडका, कालवे, लोखंडी रस्ते, हे बांधले असतां जाण्यायेण्याचा खर्च कमी होईल; परंतु ह्या कृत्यास मुळीं लक्षावधि रुपये खर्चले पाहिजेत. शिवाय दुसऱ्या सरकारच्या राज्यांत रस्ते वगैरे बांधतां येत नाहीत; व ज्या देशांत रस्ते वगैरे बांधावयाचे ते तेथच्या सरकारानेंच बांधावे, तर त्यास व तेथील लोकांस कलाकौशल्याचें ज्ञान नसतें; व व्यापारादिकांपासून होणाऱ्या नफ्यांचें ज्ञान नसतें. समुद्राच्या कडेस असून जेथें पिकाऊ जमीन पुष्कळ व जेथील लोक कलाकौशल्यांत हुशार, असा देश म्हटला म्हणजे अमेरिका देश आहे. तो देश खेरीज करून दुसऱ्या कोणत्याही देशांत वर सांगितलेले गुण नाहींत. आतां इतर देशांतही हे गुण उत्तरोत्तर वाढतील; परंतु ते चांगले वाढावयास पुष्कळ दिवस पाहिजेत, व ते वाढत असतां त्या गुणांपेक्षां कमी मानानें तेथची प्रजा वाढली पाहिजे, तरच त्या देशांस दुसऱ्या ठिकाणीं धान्य पाठवतां येईल. परंतु असें घडून येणें फार कठीण.

दुसरी गोष्ट अशी, कीं धान्य पुष्कळ होण्यासारखे जे देश आहेत, त्या सर्व देशांतलें धान्य एका देशांत येत असलें, तरी तो पुरावा, उत्पन्नाच्या मानानें खर्च वाढल्यावांचून, फार दिवस वाढावयाचा नाहीं. कारण, परदेशांत धान्य पाठवण्याचें सामर्थ्य ज्यांस आहे, असे देश दोन प्रकारचे होत. एक ज्या देशांत कार्यक्षम संग्रहवासना उत्कट आहे, तसले देश; व ज्या देशांत ती वासना उत्कट नाहीं, तसले देश. अमेरिकेंतील युनैतेद स्तेत्स देश, व न्यू हालंड इत्यादि ज्या देशांत कार्यक्षम संग्रहवासना उत्कट आहे, व जेथें ती असल्यामुळें भांडवल वाढतें, व त्यामुळें धान्यादि उपजीविकेचे पदार्थ पुष्कळ पुष्कळ होतात, ते देश. परंतु तेथें प्रजावृद्धि ही फारच विलक्षण त्वरेनें होत आहे. ह्यास्तव त्या देशांस आपल्या वर्धमान प्रजेचे निर्वाहास, व दुसऱ्या देशांस पाठवावयास, पुरेसें धान्य उत्पन्न करावयाचें म्हटलें, म्हणजे त्यांस उत्तरोत्तर दूरदूरच्या जमिनींची, किंवा निकृष्ट प्रतीच्या जमिनींची लागवड करणें, किंवा कमी उत्पन्नाकरतां जुन्या जमिनींवर विशेष मेहनत करणें भाग पडेल; व तसें केलें म्हणजे श्रमाच्या मानानें जमिनीचें उत्पन्न कमी होईल.

आतां ज्या देशांत कार्यक्षम वासना दुर्बल आहे, व ती तशी असल्यामुळें जेथें भांडवल, व कलाकौशल्य, ह्यांची फारशी वृद्धि झाली नाहीं, त्या देशांसही परदेशास धान्य पाठवावयाचें सामर्थ्य असतें, म्हणजे त्यांतल्या विद्यमान लोकांस पुरून उरावयाजोगें धान्य उत्पन्न करावयाजोगी पिकाऊ जमीन तेथें पुष्कळ असते. तसल्या देशांत धान्याची किंमत कमी असते, ह्याचें कारण इतकेंच, कीं

ती वाढण्याजोगी भांडवलाची वृद्धि व तन्मूलक प्रजावृद्धि हीं तेथें झालीं नसतात. ह्या प्रकारचे देश म्हटले म्हणजे हिंदुस्तान, रशिया, पोलंद, हंगारी, वगैरे होत. ह्या देशांत कार्यक्षम संग्रहवासना दुर्बल, कलाकौशल्याचें ज्ञान अल्प, लोकांत श्रम करण्याचें औत्सुक्य कमी, भांडवल थोडें, व त्याची वृद्धीही कमी. असल्या देशांतून परदेशांत धान्य जाऊं लागून तेथें त्याचा खप वाढला असतां, त्या खपापुरतें धान्याचें उत्पन्न वाढवण्याजोगी सामग्री तेथें लौकर वाढत नाहीं. धान्याचा व्यापार वाढून त्यांत विशेष नफा होऊं लागल्यानें इतर व्यापारातलें भांडवल शेतकींत येईल, असें म्हणावें, तर इतर व्यापारही तसल्या अडाणी देशांत थोडे असतात; मग त्यांतलें भांडवल कोठून येणार? त्या देशांत दुसऱ्या पदार्थांचा व्यापार असला तर ते पदार्थ परदेशांतून स्वस्त मिळाल्यास लोक ते करण्याचें सोडून ज्यांत नफा विशेष असा शेतकीचा व्यापार ते करतील. परंतु त्या लोकांस बहुतकरून परदेशांतून येण्याजोग्या पदार्थांच्या उपभोगाची सवय नसते. आतां परदेशांत खप होऊं लागल्यानें धान्यास तेजी येऊन तें विशेष उत्पन्न करण्याविषयीं त्यांस उत्तेजन आलें, तरी तें पुष्कळ उत्पन्न करण्यास त्यांपाशीं भांडवल नसतें. ते लोक बहुतकरून अज्ञान असतात. त्यांस कार्यक्षम संग्रहवासना फार कमी असते. तसेंच त्यांस दूरदृष्टि कमी असल्यामुळें, मोठा जरी पुढें लाभ असला, तरी त्याकरतां अल्पसुद्धां प्रकृतोपभोग त्यांस सोडवत नाहीं. मग थोड्या भावी लाभाकरतां प्रकृत सुखाचा त्याग त्यांपासून होणें कोठून? व इतक्या अडचणींचें निवारण होऊन कांहीं भांडवल वाढलें, तर लोकांच्या अज्ञानामुळें, व अविचारीपणामुळें, प्रजावृद्धि त्याहीपेक्षां अधिक मानानें होते. आतां जे इंग्लंडादि देश चांगले विद्याचारसंपन्न आहेत, व जेथें भांडवल पुष्कळ आहे, परंतु पिकाऊ जमिनी थोड्या आहेत, तेथील लोकांनीं आपलें भांडवल भिकारी देशांतल्या लोकांस द्यावें, किंवा आपणच तें घेऊन तेथें जाऊन राहावें, तर त्या गोष्टीस अनेक दुर्धर अडचणी असतात. प्रथम, आपला स्वदेश व लोक सोडावे लागतात. तसेंही करून परदेशांतल्या रीतीभाती, कायदे, भाषा, धर्म, हवा, पाणी वगैरे सर्व गोष्टी निराळ्या असल्यापासून पराकाष्ठेची अडचण होते; व कांहीं ठिकाणीं मालमत्तेचें संरक्षण कमी असतें.

ह्या प्रकारें विचार करून पाहातां, असें स्पष्ट दिसतें, कीं सुधारणेच्यापेक्षां प्रजेच्या संख्येची वृद्धि झाली असतां श्रमाचें एकंदर उत्पादकत्व कमी होत जाण्याचें भय, ज्या लोकांस आपल्या देशांतल्या धान्यावरच निर्वाह करावा लागतो, त्यांसच बाळगावें लागतें, असें नाहीं; तर ज्या लोकांस जेथें कोठें धान्य स्वस्तें मिळेल, तेथून तें आणण्याची मोकळिक असते, त्या लोकांसही हें भय परिणामीं आहेच आहे. धान्य परदेशांतून आणण्याची मोकळीक असल्यापासून नफा इतकाच होतो (व हा नफा क्षुल्लक नव्हे, तर मोठा आहे), कीं श्रमाचें उत्पादकत्व आज कमी व्हावयाचें, तें, कांहीं काळानें होऊं लागतें. तस्मात् देशांत परदेशांतून धान्यादि आणण्याची मोकळीक असो किंवा नसो; श्रमाचें उत्पादकत्व कमी होऊं नये असें जर कोणत्याही देशांतल्या लोकांच्या मनांत आहे, तर त्यांस प्रजातिवृद्धीचा प्रतिबंध होण्याचें योग्य उपाय योजण्याची आवश्यकता आहे.

ज्या देशांत भांडवल पुष्कळ असतें, परंतु चांगल्या जमिनीच्या कमताईमुळें उत्तरोत्तर वाढणाऱ्या प्रजेस धान्य उत्पन्न करण्यास उत्पन्नाच्या मानानें अधिक अधिक श्रम लागूं लागतो; आणि तेणेंकरून एकंदर श्रमाचें उत्पादकत्व कमी होऊं लागतें, तसल्या देशांस तें संकट निवारण करण्यास परदेशांतलें स्वस्त धान्य आणणें जसा एक उपाय आहे, तसा दुसरा एक उपाय आहे. तो उपाय हा, कीं दुसऱ्या चांगल्या जमिनीच्या देशांत वसाहात करण्याकरतां लोक पाठवणें. ह्या उपायाचें अवलंबन केल्यापासून जें फल होतें तेंही शेतकीच्या कामांत झालेल्या सुधारणेप्रमाणेंच आहे. कारण स्वदेशांतच चांगली पिकाऊ जमीन सांपडून तिची लागवड केली असतां जसें उत्पन्न वाढून कमी उत्पन्नाकरतां विशेष श्रम करण्याची आवश्यकता नाहींशी होते, तशी परदेशांतल्या चांगल्या जमिनीची लागवड केल्यानेंही ती आवश्यकता

नाहींशी होते. ह्यास्तव वसाहात करण्याजोग्या चांगल्या पिकाऊ पड जमिनी जवळपास असणें हें देशांतली संपत्ति वाढण्यास मोठें साधन होय. अमेरिका खंडांत युनैतेद् स्तेत्स देशांत प्रकृत काळीं इतक्या त्वरेनें प्रजावृद्धि होत असतांही मांडवलाची वृद्धिही फार जलद होत आहे; व श्रमाचें उत्पादकत्वही कमी होत नाहीं; ह्याचें एक मुख्य कारण हें आहे, कीं त्या देशांत चांगल्या पिकाऊ जमिनी जवळपास पुष्कळ आहेत. ह्याकरतां लोक फारसे झाले म्हणजे कांहीं लोक आपलें मांडवल घेऊन जवळपासच्या पड जमिनींची लागवड करून तेथें वसाहात करतात; ह्यास्तव त्यांच्या श्रमाचें उत्पादकत्व कमी होत नाहीं; व त्या खंडांत वस्ती वर्षोंवर्ष वाढत चाल्ली आहे. परंतु परदेशांत जाऊन वस्ती करण्याच्या कामास लोक धारिष्टाचे, व उद्योगी पाहिजेत; व त्यांचे ठायीं एकाच ठिकाणीं राहून राहून त्या ठिकाणीं कितीही दुःख झालें तरी डोकें खुपसून तेथेंच हाल भोगीत बसण्याजोगी त्या स्थळाची अप्रयोजक गोडी नसली पाहिजे. हे गुण नसले तर परदेशीं वसाहात करण्याचें काम घडतें, नाहीं तर घडत नाहीं. आपल्या ह्या देशांत मावळांत, व रत्नागिरी वगैरे कोकणांतील जिल्ह्यांत, जें इतकें हल्ली दरिद्र आहे, त्याचें मुख्य कारण असें आहे, कीं त्या खडकाळ प्रदेशांतल्या जमिनीच्या उत्पादक शक्तीपेक्षां तेथें वस्ती फार आहे. तर त्या ठिकाणचे लोक जेथें चांगली पडजमीन पुष्कळ, व जेथें वस्ती थोडी अशा खानदेश वगैरे जिल्ह्यांत जाऊन वसाहात करून राहिले, तर हल्ली जी त्यांस यत्किंचित् भिकारी वऱ्या व नागली ह्यांकरतां उरस्फोड मेहनत करावी लागते, तीपेक्षां कमी मेहनतीनें तेथें त्यांस आतांपेक्षां पुष्कळ व चांगलें धान्य उत्पन्न होईल. परंतु ही गोष्ट होणें फार कठीण. कारण, ते मावळी व कोंकणी कुणबी मूर्ख, त्यांस परदेशांत जाऊन वसाहात करण्याजोगें धारिष्ट व अक्कल हीं कमी. ह्यास्तव ते तसल्या खडकाळ प्रांतांत उपाशीं मरतील; परंतु आपल्या वाडवडलांची जागा सोडून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचे नाहींत. असो.

ह्याप्रमाणें परदेशीं वसाहत करण्याचा एक उपाय आहे, जेणेंकरून श्रमाची उत्पादकत्वशक्ति कमी न होतां देशास प्रजा वाढूं देतां येईल खरी, परंतु हा उपाय सर्व देशांस साध्य असतो असें नाहीं; व ज्यांस साध्य असतो, त्या त्या सर्वांस सारख्या मानानें साध्य असत नाहीं; आणि ज्यांस तो उत्तम प्रकारें साध्य आहे, त्यांसही तो तसा अनंत काळ राहावयाचा नाहीं. तस्मात् हा उपाय साध्य असो, किंवा नसो, प्रजावृद्धि कांहीं मर्यादेनें न ठेवल्यास परिणामीं देशाचें उत्पादकत्व कमी होऊन प्रजेच्या अतिवृद्धीपासून होणारे अनर्थ तेथें होऊं लागतील, ह्यांत संशय नाहीं. आतां भेद इतकाच कीं वसाहती करण्याजोगे देश ज्या देशांच्या ताबेंत नसतात, त्यांस प्रजावृद्धीचें नियमन लौकर करावें लागतें व ज्या देशांत ती सोय असते, त्यांस ती आवश्यकता उशिरानें येते.

---

# परिशिष्टे

परिशिष्ट : १

# लेखकांविषयी माहिती

## रामकृष्ण विश्वनाथ

या ग्रंथकाराच्या चरित्राची काही माहिती मिळू शकली नाही, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. यांच्या आडनांवाबद्दलही खात्रीलायक काही सांगता येत नाही. त्यांचे नांव कानविंदे असावे असा अंदाज करता येण्यासारखी माहिती आहे, पण ती पुराव्यासारखी नाही. त्यांच्या ग्रंथावरून जी माहिती मिळते ती एकत्र करून त्यांची एक काल्पनिक मूर्ती डोळ्यासमोर आणता येईल. तसा प्रयत्न येथे केला आहे.

१८४३ साली लिहिलेले त्यांचे पुस्तक पाहता, त्या वेळी त्यांचे वय पंचवीसपेक्षां कमी नसावे. मुंबईच्या कापूस-निर्यातीच्या व्यापारी उलाढालींची त्यांना तोंपर्यंत पुष्कळ माहिती झालेली दिसते. मुंबईस आणि गुजरातेत त्या वेळी कापडाची गिरणी काढली गेली नव्हती, पण पॉंडेचरीला एक तशी गिरणी चालत होती अशी माहिती ते देतात. २१ जानेवारी १८४१ रोजी, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सचे ॲक्टिंग सेक्रेटरी टी. जे. ए. स्कॉट यांनी कंपनी सरकारचे चीफ सेक्रेटरी एल. आर. रीड यांना एक पत्र[1] पाठविले होते. त्या पत्राचा उल्लेख तळटीपेत रामकृष्ण यांनी केला आहे. कापूस-निर्यातीसंबंधीचे ज्ञान व कापडधंद्याविषयीची तांत्रिक माहिती त्यांना बरीच होती, असे वरील पुराव्यांवरून व आणखी काही उल्लेखांवरून म्हणता येईल.

निलगिरी पर्वतातील सोन्याच्या खाणींच्या शोधासाठी रामकृष्ण स्वतः तिकडील जंगलांतून फिरले, असा त्यांनी उल्लेख केला आहे. सोन्याच्या खाणमातीतून सोने वेगळे करण्याच्या पद्धती, काच करण्याची रासायनिक प्रक्रिया, अशा गोष्टींचा संदर्भ त्यांच्या पुस्तकात येऊन जातो. त्यावरून आधुनिक उद्योगधंदे काढण्यासाठी लागणारी जिज्ञासू व धाडसी प्रवृत्ती त्यांच्यात दिसते. शेअर भांडवल गोळा करून कंपनी काढावी व उद्योगधंदे सुरू करावेत, असा उपदेश ते देशबांधवांना करतात. त्या काळात, पारशी, यहुदी वगैरे भारतीय लोक इंग्रज व्यापाऱ्यांच्या व कारखानदारांच्या अनुकरणाने भांडवलदारी व्यवसायांत पाऊल टाकीत होते. त्याच वेळी रामकृष्णदेखील त्याच प्रयत्नात स्वतः होते व इतरांना त्या प्रयत्नांकडे वळविण्याची धडपड करीत होते.

रामकृष्ण यांनी इंग्रजी भाषेचे ज्ञान चांगले मिळविलेले दिसते. गिबन, बर्क प्रभृतींचे ग्रंथ त्यांनी वाचले होते असे उताऱ्यांवरून स्पष्ट दिसते. तसेच, त्यांनी इतिहासाचे वाचन बरेच खोलवर जाऊन केलेले असावे. भारतासंबंधीची ऐतिहासिक माहिती त्यांना कोणत्या ग्रंथांतून झाली, हे संशोधून पाहावे लागेल. पण, आर्थिक माहितीबरोबरच त्यांनी समकालीन राजकीय घडामोडींकडे बारकाईने पाहिलेले

१. तळटीपेत नुसता १८४१ च्या पत्राचा उल्लेख आहे. चेम्बरच्या १८४१ सालच्या अहवालात ते पत्र समग्र छापले आहे. त्यावरून वरील तपशील आम्ही घेतला आहे. चेम्बरचे सध्याचे व्हाइस चेअरमन बोमन यांनी चेम्बरच्या ग्रंथालयाचा उपयोग करण्याची परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

दिसते. निंबोरी व सातारा येथील संस्थानिकांना हिकमती करून बुडविण्याचा प्रयत्न इंग्रज अधिकाऱ्यांनी त्या वेळी चालविलेला होता, त्याबद्दल त्यांनी बरेच तपशिलात लिहिले आहे.

आर्थिक व राजकीय दृष्टीने भारतावर आलेल्या नव्या संकटाची जाणीव त्यांना होती. यंत्रोद्योगाच्या मार्गाने आपली अर्थव्यवस्था सुधारून आपण साऱ्या आशियाखंडाच्या बाजारपेठेसाठी स्पर्धा करू शकू, पण त्यासाठी उद्योगप्रियता, सामाजिक सुधारणा व राजकीय स्वतंत्रता यांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन १८४३ मध्ये त्यांनी केले आहे. यावरून देशाभिमान व दूरदृष्टी असलेला हा एक निर्भय विचारवंत होता, असे म्हणता येईल.

त्यांचा हा एकच ग्रंथ उपलब्ध आहे. त्या ग्रंथाचे वाचन बरेच झाले असावे असे अनुमान करता येते, कारण 'ज्ञानप्रसारक'च्या अंकांतून त्यांच्या ग्रंथनामाचे अनुकरण असणारे लेख इतर लेखकांनी नंतरच्या काळात लिहिलेले आढळतात. आश्चर्याची गोष्ट मात्र अशी आहे की १८४९ मध्ये ग्रंथ लिहिणारे लोकहितवादी किंवा नंतरचे लेखक रामकृष्णांच्या ग्रंथाचा उल्लेख करीत नाहीत.

## गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी)

[१८ फेब्रु. १८२३ – ९ ऑक्टो. १८९२]

यांचे मूळ आडनाव सिद्धये होते. गोपाळरावांचे वडील हरिपंत पेशवाईत सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते व त्यांना दहा हजार रुपयांचा सरंजाम होता. त्यांच्या मृत्यूनंतर (१८३६) हा सरंजाम इंग्रज सरकारने जप्त केला.

गोपाळरावांचे प्राथमिक शिक्षण पुण्याच्या सरकारी शाळेत झाले असावे. १८४१ पासून तीन वर्षे त्यांनी सरकारी इंग्रजी शाळेत शिक्षण घेतले. १८४४ ते १८७९ पर्यंत त्यांनी न्यायखात्यात वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी केली. 'सेशन्स जज' या हुद्यापर्यंत ते चढले. १८७९ साली त्यांनी पेन्शन घेतले व ते पुण्यास स्थायिक झाले. १८८४ मध्ये रतलाम संस्थानच्या दिवाणगिरीचे काम त्यांनी पत्करले व ते १८८५ पर्यंत केले. पुढील सात वर्षांत पत्नी, तीन मुलगे व दोन मुली यांचे मृत्यू होऊन त्यांचा काल दुःखात गेला, व १८९२ मध्ये त्यांचा अंत झाला.

गोपाळरावांच्या ठिकाणी दृढ आस्तिक्यबुद्धी व हिंदू धर्मपरंपरेबद्दल अभिमान होता. इतर धर्मांबद्दलही त्यांच्या मनात आदर होता. मूर्तिपूजा ते स्वतः करीत असत. पण, असे असूनही, जातिसंस्थेमुळे रूढ झालेली विषमता व दंभ, आणि स्त्रियांची दुःस्थिती अशा बाबतीत त्यांची मते सुधारकी होती. पुनर्विवाहाला ते अनुकूल होते व त्यामुळे त्यांना बहिष्कार व त्यातून होणारा छळ सहन करावा लागला. भागवत पंथाच्या संतांना त्यांच्या समत्वबुद्धीमुळे व परोपकारी वृत्तीमुळे जो छळ सोसावा लागला, तसाच आधुनिक काळातल्या सुधारकांनाही सोसावा लागला, धर्मसुधारणेचा प्रयत्न त्या काळी सर्व भारतात झालेला दिसतो. अशा सुधारणेसाठी गोपाळरावांनीही प्रयत्न केले आणि प्रार्थनासमाज, आर्यसमाज व थिऑसॉफिकल सोसायटी या संस्थांच्या कार्यात त्यांनी पुढाकार घेतला.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यामुळे भारताला पारतंत्र्याची दुःखे भोगावी लागत आहेत, आपल्या देशातील कारागिरीचा नाश होत आहे व शेतकरी अन्नान्न होत आहे याची गोपाळरावांना जाणीव होती. स्वदेशी वस्तू वापरण्याचा निश्चय आपण केला पाहिजे, असे त्यांनी १८४९ मध्ये सांगितले व आपल्या देशात पार्लमेंटरी पद्धतीचे स्वराज्य स्थापन झाले पाहिजे, असेही त्यांनी प्रतिपादन केले. त्यांचा देशाभिमान व स्वधर्माभिमानी वृत्ती प्रखर होती, पण तरी इंग्रजी विद्येचा व आधुनिक

तंत्रज्ञानाचा स्वीकार करूनच भारताला आपले स्वातंत्र्य मिळविता येईल व जनतेला सुखाचे दिवस येतील अशी भूमिका त्यांनी घेतलेली आढळते. जुन्या संस्कृत ग्रंथांतून मिळणारी विद्या अपुरी आहे, व ती फक्त ब्राह्मणांनाच घेता येते, म्हणून अशा विद्येचा पुरस्कार न करता त्यांनी आधुनिक विद्येच्या प्रसारासाठी सतत प्रयत्न केले. मुंबईस 'इंदुप्रकाश', पुण्यास 'ज्ञानप्रकाश' अशी वृत्तपत्रे काढण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तुकारामाच्या गाथेसारखे जुने मराठी ग्रंथ प्रसिद्ध होण्यास मदत केली. अहमदाबादला असताना 'हितेच्छु' हे गुजराती साप्ताहिकही त्यांनी सुरू केले. ठिकठिकाणी ग्रंथालये आणि व्याख्यानमाला सुरू करून ज्ञानप्रसाराचे कार्य त्यांनी चालविले. 'मराठी उत्तेजक मंडळी' ही संस्था १८७८ मध्ये माधवराव रानडे आणि गोपाळराव यांनी काढली व तिच्या कार्यात कृष्णशास्त्री चिपळूणकर प्रभृती विद्वानांना सामील करून घेतले. याच साली, या दोघांनी मराठी लेखकांचे एक संमेलन ११ मे रोजी भरविले. मराठी साहित्यिकांचे हे पहिले संमेलन होय.

गोपाळराव यांनी १८८२ च्या ऑक्टोबरपासून 'लोकहितवादी' हे मासिक सुरू केले, जून १८८५ पर्यंतचे त्याचे अंक उपलब्ध आहेत. पुढे ते बंद झाले असावे. एप्रिल १८८३ पासून याच नावाचे त्रैमासिक त्यांनी चालविले व त्याचे एकंदर नऊ अंक निघाले.

त्यांच्या धार्मिक व परोपकारी वृत्तीचा वर उल्लेख आलेला आहेच. या वृत्तीमुळे, १८४८ पासून सतत मृत्यूपर्यंत ते गरिबांना मोफत औषधोपचार करीत असत. प्रवासातही औषधांचा व मलमपट्ट्यांचा साठा ते जवळ बाळगीत. रस्त्यात दुखणेकरी भेटला की त्याला औषध देत किंवा घरचा पत्ता लिहिलेली चिठ्ठी देऊन घरी बोलवीत. महारोग्यांचीही मलमपट्टी ते करीत.

## भाषाशैली :

त्यांच्या सरळ व परोपकारी वृत्तीप्रमाणेच त्यांची लेखनशैली अतिशय साधी, स्पष्ट व वाचणाराला सुबोध अशी होती. 'शतपत्रे' या त्यांच्या प्रसिद्ध निबंधसंग्रहामध्ये व 'लक्ष्मीज्ञान' यासारख्या शास्त्रीय ग्रंथामध्येही त्यांची शैली सारखीच सुबोध आहे. संस्कृत शब्दांचा वापर व मोठमोठ्या ग्रंथकारांची वचने देण्याची पद्धती त्यांच्या लेखनात आढळत नाही. प्रौढ व अलंकारिक शैलीचा मोह त्यांनी टाळलेला दिसतो, कारण केवळ विद्वानांतच नव्हे तर सामान्य लोकांत ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि विद्येची गोडी वाढावी अशी त्यांची तळमळ होती. आधीच्या पिढीचे हरि केशवजींच्या सारखे लेखकही सुबोध मराठी लिहिण्याचा कटाक्षाने यत्न करीत होते खरे, पण मराठी गद्यशैली नव्याने घडविली जात असल्याने तिच्यामध्ये इंग्रजी धाटणीच्या वाक्यरचनेचा प्रभाव जाणवतो, आणि त्यांची शैली त्यामुळे अवघडलेली वाटते. बापू छत्रे यांच्यासारखे त्यावेळचे एखादेच लेखक प्रसन्न मराठी शैलीत लिहू शकत होते. १८२० ते ४८ या कालखंडात, या नव्या मराठी गद्यशैलीतला नवखेपणा जाऊन तिच्यात सुबोधपणा व सहजपणा आलेला आढळतो व गोपाळरावांच्या शैलीत हे गुण उत्तम तऱ्हेने आढळतात. १८२० पासून पुढच्या अर्धशतकात गद्यशैलीचा असा स्वाभाविक विकास होत गेला. १८७० नंतर मात्र, संस्कृतप्रचुर, अलंकारिक व क्लिष्ट अशा मराठी गद्यशैलीचा वाढता प्रभाव दिसू लागतो. विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकरप्रभृती लेखकांनी रूढ केलेल्या या शैलीच्या तुलनेने गोपाळरावांची शैली ओबडधोबड मानण्याकडे प्रवृत्ती होते खरी, परंतु गोपाळराव प्रभृतींची साधी शैलीच विचारांचे व भावनांचे प्रकटन जास्त प्रभावी व प्रत्यक्ष रीतीने करणारी होती, असे मानावे लागेल. भाषेच्या विकासामध्ये कोणतीच एक शैली परिपूर्ण नसते ही गोष्ट खरीच. परंतु, शैलींच्या तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्टीने मराठी गद्यशैलीमध्ये झालेल्या या फरकाकडे लक्ष देता गोपाळराव यांची शैली हा महत्त्वाचा टप्पा ठरेल.

### गोपाळरावांची ग्रंथरचना :

त्यांची समग्र ग्रंथरचना येथे देणे कठीण आहे इतकी ती मोठी आहे. (जिज्ञासूंना अ. का. प्रियोळकर यांच्या 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' या ग्रंथाच्या पृष्ठ ३८ ते ४६ यांवर ती पाहता येईल.) येथे त्यांच्या अर्थशास्त्रीय ग्रंथांचीच तेवढी नोंद केली आहे. यातील 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ येथे पुनर्मुद्रित केलेला आहे.

त्या ग्रंथाचे कर्तृत्व गोपाळराव यांचेच आहे का नाही, याबद्दल निश्चित होकारार्थी विधान न करता गं. बा. सरदार यांनी म्हटले आहे की या ग्रंथाचा कर्ता गोपाळराव 'असण्याचा संभव आहे.' ('अर्वाचीन गद्याची पूर्वपीठिका', दुसरी आवृत्ति १९७६, पृष्ठ २१६)

या बाबतीत सरदार यांनी आपल्या अंदाजाला पोषक असा पुरावा दिला आहे, तो म्हणजे या ग्रंथाच्या 'प्रस्तावनेच्या शेवटी लोकहितवादींचे नाव आढळते.' 'कामदार लोकांशी संभाषण' या ग्रंथाचा कर्ता, असे 'टोपण नाव' ग्रंथावर आहे. तेव्हा 'कामदार लोकांशी संभाषण' या ग्रंथाच्या कर्त्याचे नाव शोधावयास हवे. दुर्दैवाने, या ग्रंथाची प्रथमावृत्ती उपलब्ध नाही. दुसरीवरही ग्रंथकर्त्याचे नाव नाही. अ. का. प्रियोळकर यांनी म्हटल्याप्रमाणे गोपाळरावांच्या सर्वच पुस्तकांवर त्यांचे नाव आढळत नाही, तर हे ना ते टोपणनाव आढळते, किंवा मागील ग्रंथांची नावे देऊन त्यांचा कर्ता असे वर्णन आढळते.

अशा परिस्थितीत, 'लक्ष्मीज्ञान' या ग्रंथातील भाषेवरून कर्तृत्व ठरविण्याचा प्रयत्न करणे भाग आहे. या ग्रंथाची भाषा 'शतपत्रां'तील भाषेशी शैलीच्या दृष्टीने जुळती आहे व गोपाळरावांच्या शैलीची वैशिष्ट्ये येथे पुरेशी आढळतात. आणखी एक गोष्ट येथे नमूद करण्यासारखी वाटते. 'प्रभाकर' पत्रामधील गोपाळरावांनी लिहिलेल्या पत्ररूप निबंधांपैकी क्रमांक ५७ चा 'हिंदु लोकांचा व्यापार' हा निबंध २२ एप्रिल १८४९ रोजी प्रसिद्ध झालेला आहे. यात त्यांनी स्वदेशीचा 'कट' (म्हणजे राज्यकर्त्याविरुद्ध सामुदायिक निश्चय) लोकांनी करावा असे प्रतिपादन केले आहे व म्हटले आहे की 'म्हणजे तुम्हास लक्ष्मी अनुकूल होईल.' (प्रियोळकर, किता, पृष्ठ १४५). याच वर्षी (१८४९ मध्ये) लिहिलेल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथाला 'लक्ष्मीज्ञान' हे नाव त्यांनी योजिले असणे संभवनीय वाटते.

मराठी ग्रंथसूचीचे कर्ते शं. ग. दाते यांनी हा ग्रंथ गोपाळराव यांचाच आहे असे मानून त्याची नोंद केलेली आहे.

### अर्थशास्त्रीय विषयांवरील महत्त्वाचे ग्रंथ :

(१) लक्ष्मीज्ञान (२) हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे : लोकहितवादी, इंदुप्रकाश, मुंबई, १८७६ (३) ग्रामरचना, त्यांतील व्यवस्था आणि त्यांची हल्लीची स्थिति : 'लोकहितवादी' मासिकातून मूळ प्रसिद्धी, श्री शिवाजी, पुणे, १८८३ (४) 'निबंधसंग्रह', संपादक प्रियोळकर, या ग्रंथातील पुढील निबंध : 'हिंदु लोकांची उद्योग करण्याची आवश्यकता', पृष्ठ ११०; 'हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयींची समजूत' पृष्ठ १२९; 'हिंदु लोकांचा व्यापार', पृष्ठ १४३, 'उद्योगप्रशंसा', पृष्ठ १७०; 'संपत्ती म्हणजे काय ?', पृष्ठ ४०२; 'हिंदुस्थानची जमीन' पृष्ठ ४२४.

## हरी केशवजी

[१८०४–१८५८, ११ जुलै]

हरि केशवजी यांचे वडील केशवजी गोपाळजी (१७६७-१८५४) मुंबईमध्ये इमारती बांधण्याचे काम करीत असत. यांचे मामा त्रिंबकजी गिरगावात मिशनरी लोकांनी घातलेल्या इंग्रजी शाळेचे

मुख्य शिक्षक होते. या मामांनी व आजे गोपाळजी यांनी हरी केशवजी यांचे प्राथमिक शिक्षण केले. कांहीं शिक्षण रेव्ह. रॉबर्ट मनी (मृत्यू १८३५) यांच्या इंग्रजी शाळेत झाले.

इंग्रजी भाषेचे ज्ञान त्यांनी रेव्ह. केनी यांच्या मदतीने वाढविले. तसेच, बाबा व्यास या प्रसिद्ध शास्त्र्यांकडून त्यांनी संस्कृत भाषेचे ज्ञान मिळविले.

कॅप्टन जर्व्हिस (१७९४-१८५१) यांच्या देखरेखीखाली चाललेल्या मुंबईतील इंजिनियरिंग शाळेत मुख्य कारकून म्हणून १८२९पर्यंत त्यांनी नोकरी केली. सन १८२९-१८३४ पर्यंत ठाणे अदालत कोर्टात मुख्य कारकून व मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून त्यांनी काम केले. पुढे मुंबईतील सदर दिवाणी अदालत कोर्टात (हल्लीचे हायकोर्ट अपिलेट साइड) चीफ ट्रॅन्स्लेटर म्हणून काम केले.

मुंबईमध्ये २१ ऑगस्ट १८२२ रोजी, 'बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक अॅण्ड स्कूल सोसायटी' स्थापन झाली. हिलाच 'मुंबईची हैंद शाळा शाळापुस्तक मंडळी' हे नाव होते. या संस्थेचे नाव १८२७ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असे बदलण्यात आले. (या संस्थेने मराठी शालेय पुस्तके छापून तयार करण्यासाठी १८२६ ते १८३० पर्यंत २ लक्ष रुपये खर्च केले.) १८४१ मध्ये पुन्हा पुनर्घटना झाली व तिचे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' मध्ये रूपांतर झाले. सन १८५५मध्ये ह्या बोर्डाचे काम बंद करून शिक्षणविषयक सर्व व्यवस्था डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली. पहिले डायरेक्टर हॉवर्ड होते. १८४७ (१८ ऑक्टोबर) मध्ये मेजर कॅण्डी यांची मराठी ट्रॅन्स्लेटर व रेफरी म्हणून नेमणूक झाली, हॉवर्ड व कॅंडी यांनी पुढील काळात पाठ्य-पुस्तकांची दिशा ठरविली.

हरि केशवजी यांच्या चरित्रात पृष्ठ १८ वर म्हटले आहे की एज्युकेशन सोसायटीचे ग्रंथ प्रसिद्ध करणाऱ्या समितीत १८३१ साली त्यांना नेमले, आणि तेव्हापासून १८५१ पर्यंत ते समितीचे सभासद होते. 'त्या सालानंतर पुढे त्या संस्थेचे काम सरकारने आपल्या हाती घेतले.' परंतु वरील माहितीवरून असे वाटते की, १८३१ ते १८४० ते 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या' व १८४१-१८५१ ते 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'च्या ग्रंथप्रकाशन समितीचे सभासद असावेत.

सन १८४८ (१३ जून) मध्ये 'स्टुडंटस लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी' मुंबईत स्थापन झाली. या सोसायटीची 'मराठी ज्ञानप्रसारक सभा' ही शाखा होती. या शाखेचे हरि केशवजी हे १८५२ मध्ये उपाध्यक्ष होते. तिच्यातर्फे 'मराठी ज्ञानप्रसारक' हे मासिक एप्रिल १८५० पासून चालत होते. या मासिकात हरि केशवजी यांचे अनेक लेख आहेत.

'नेटिव्ह पुअर असायलम' या १८३० मध्ये स्थापन झालेल्या, निराश्रितांना मदत करणाऱ्या संस्थेचे हरि केशवजी हे १८३५ ते १८४५ जॉइंट सेक्रेटरी होते.

हरि केशवजी हे 'सोमवंशी क्षत्रिय पाठारे' या ज्ञातीत जन्मले. त्यांचे आडनाव पुरव होते, परंतु 'पाठारे' हे ज्ञातिनावच त्यांचे आडनाव म्हणून पुष्कळदा आढळते. आडनाव न देण्याचा त्या काळी रिवाज होता, त्यामुळे पुरव हे नाव अप्रसिद्ध राहिले असून त्यांचा उल्लेख 'हरि केशवजी' एवढाच बहुधा होतो. पाठारे ज्ञातीमध्ये पुनर्विवाह इत्यादि सुधारणाच्या बाबतीत पुढाकार घेणाऱ्यांमध्ये हरि केशवजी असत. त्यांनी व इतर मंडळींनी सन १८२७ मध्ये ज्ञातीची परिषद् मालाड येथे घेतली व सुधारणेचे काही नियम संमत केले.

हरि केशवजी यांचा मिशनरी लोकांशी तरुणपणी संबंध आला व ते ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित होऊ लागले. पण त्यांचे आजे गोपाळजी यांनी त्यांची शामराजतात्या केसकर या विद्वान सत्पुरुषाशी गाठ घालून दिली. त्यानंतर हरि केशवजी यांची हिंदू धर्मावर दृढ श्रद्धा बसली. त्यांच्या धर्मविषयक हस्तलेखातील काही उतारे त्यांच्या चरित्रात दिले आहेत, त्यावरून असे दिसते की मिशनरी लोकांच्या हिंदुधर्मावरील टीकेचा सारांश मनात घेऊन 'केवळ ईश्वराराधनरूप धर्म जीवाने आचरावा' असे

ते मानीत होते. गीता, ज्ञानेश्वरी इत्यादि संस्कृत व मराठी धर्मग्रंथाचा ते नित्य पाठ करीत असत.

### भाषाशैली :

संस्कृत, मराठी व इंग्रजी या तीन भाषांची हरि केशवजी यांना चांगली ओळख होती असे त्यांच्या ग्रंथांतील भाषेवरून कळून येते. इंग्रजी व मराठी भाषांमध्ये लिहिण्याचा सराव त्यांना तरुण वयापासून होता व भाषांतराचे काम करू लागल्यापासून पारिभाषिक शब्दांसाठी त्यांचे संस्कृतचे ज्ञान त्यांना उपयोगी पडत गेले. वयाच्या २९ व्या वर्षापर्यंत अशा रीतीने भाषांचे ज्ञान दृढ झालेले असताना त्यांनी 'कॉन्व्हर्सेशन्स ऑन नॅचरल फिलॉसफी' ह्या पुस्तकाच्या भाषांतराचे काम १८३३ मध्ये हाती घेतले, ते पुस्तक १८३७ मध्ये प्रसिद्ध झाले. या भाषांतराची भाषा सोपी व निसर्गशास्त्रीय विवेचनाला आवश्यक तेवढी प्रौढ आहे, आणि पारिभाषिक शब्दही साक्षेपाने योजिलेले आहेत. मूळ इंग्रजी ग्रंथात, मिल्टनची एक सृष्टिवर्णनपर कविता ग्रंथकाराने उद्धृत केली आहे. तिचे रूपांतर हरि केशवजींनी आर्यावृत्तात चांगले केलेले आढळते.

मराठी गद्याची नव्याने घडण होण्याचा तो काळ होता. त्या काळचे मराठी गद्य इंग्रजी वाक्यरचनेच्या प्रभावाने पुष्कळसे कृत्रिम व बेढब होते. बापू छत्रे (१७८८-१८३४) यांच्यासारखा मराठी वळणाने समर्थपणे लिहू शकणारा लेखक एखादाच होता. अशा वेळीं मराठीत पद्यरचना करू पाहाणारा हरी केशवजी यांच्यासारख्या लेखक निसर्गशास्त्रीय ग्रंथांची भाषांतरे करण्यास पुढे आला, हा फार चांगला योग म्हणावा लागेल. भाषेवरील प्रेम व प्रभुत्व आणि निसर्गशास्त्रांचे ज्ञान मराठीतून लोकांना देण्याची प्रबळ इच्छा हरि केशवजी यांच्यामध्ये दिसतात. म्हणूनच त्यांची भाषांतरे लोकांना आवडली व त्यांचा मुंबईत चांगला खप झाला असे आढळून येते. निसर्गशास्त्रीय ग्रंथाव्यतिरिक्त बुन्यानच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या ग्रंथाचे 'यात्रिक क्रमण' हे भाषांतर आणि 'देशव्यवहारव्यवस्था' हा अर्थशास्त्रावरील भाषांतरवजा ग्रंथ अशी रचनाही हरि केशवजी यांनी केली. याही विषयांवर लेखन करताना मराठी गद्याच्या घडणीकडे व पारिभाषिक शब्दांच्या योग्य योजनेकडे त्यांनी सतत लक्ष पुरविलेले आढळून येते.

हरि केशवजी यांचे लेखन एकमेकांपासून विलग असलेल्या विविध क्षेत्रांत आहे व त्याचे परिमाणही मोठे आहे. हे सर्वच लिखाण इंग्रजी ग्रंथांच्या भाषांतरांच्या रूपाने आहे, हे खरे. परंतु येथे थोडा खुलासा करावयास हवा. त्यांची भाषांतरे ही मूळ ग्रंथांना घट्ट धरून केलेली व दोन भाषांतल्या अंतरापेक्षा जास्त अंतर पडू न देता केलेली प्रमाण भाषांतरे नाहीत, तर मूळ ग्रंथातील विवेचनाचे सूत्र तेवढे सांभाळून केलेली भाषांतरे आहेत. प्रमाण भाषांतराच्या लेखकाचा उद्देश मूळ ग्रंथाला फक्त मराठीत कसोशीने आणण्याचा असावा लागतो. पण हरि केशवजी व त्या काळातले इतर भाषांतरकार ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने मूळ ग्रंथाचा आधार घेत घेत मराठी वाचकांना विषय समजावून सांगत होते. मिलच्या व मिसेस मार्सेटच्या ग्रंथांचा आधार घेत घेत रचलेला 'देशव्यवहारव्यवस्था' हा ग्रंथ हरि केशवजींनी संवादरूपाने लिहिला आहे. असे करताना मूळ मांडणीचे सूत्र सांभाळणेच फक्त शक्य होते. यात भाषांतरकाराला आपल्या भाषेची व थोडीफार विवेचनाचीही स्वतःची शैली घडवीत जावी लागते. हे स्वातंत्र्यही आहे व जबाबदारीही आहे. या गोष्टी हरि केशवजी यांनी चांगल्या तऱ्हेने सांभाळल्या आहेत, ही गोष्ट महत्त्वाची व त्यांच्या गौरवाची आहे.

### हरि केशवजींची ग्रंथरचना :

(१) यात्रिकक्रमण (Pilgrim's Progress by Bunyan); (२) नीतिग्रंथ ('Chamber's Moral Class Book'); (३) देशव्यवहारव्यवस्था (Mrs. Marcet's

Conversations and 'Political Economy' by J. S. Mill) (४) 'शास्त्रीय ज्ञान-दर्शन', (हा ग्रंथ 'Guide to Scientific Knowledge' या ग्रंथाचे भाषांतर म्हणून सखाराम रामचंद्र दीक्षित आणि विष्णु अमृतराव यांनी तयार केला. तो हरि केशवजी व कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनी तपासला व मग तो प्रसिद्ध झाला.)

### हरि केशवजी यांच्यासंबंधी संदर्भ :

(१) 'हरि केशवजी ह्यांचे चरित्र : रामचंद्र हरि (मुलगा), प्रकाशक रामचंद्र हरि, ८ डांबर गल्ली, मुंबई; मुद्रक निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९११, उपोद्घात विनायक कोंडदेव ओक, पृष्ठे १–६, पृष्ठे १–५४.

(२) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ४ (१८००–१८७४)' : महाराष्ट्र साहित्य परिषद, संपादक रा. श्री. जोग, १९६५, पृष्ठे १०८-११४

'शिक्षालाभ निबंध' या ग्रंथाचे कर्तृत्व हरि केशवजी यांच्याकडे दिलेले आढळते. तसेच, १ ते ३ या ग्रंथांची निश्चित नावे, पृष्ठसंख्या, आकार व उपोद्घात, प्रस्तावना वगैरे बद्दलची माहिती वरील संदर्भातून मिळत नाही.

'शिल्पविद्या या विषयाचे निबंध' (William Bell's Mechanics)

## कृष्णशास्त्री चिपळूणकर

[१८२४–२० मे १८७८]

कृष्णशास्त्री यांचा जन्म पुणे येथे १८२४ मध्ये झाला. त्यांचे वडील हरिपंत दरमहा चार रुपयांवर कारकून होते. कृष्णशास्त्रींचे प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांना वेदाध्ययनासाठी एका पाठशाळेत घातले. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांना विश्रामबागवाड्यातील संस्कृत पाठशाळेत प्रवेश मिळाला. येथे मोरशास्त्री साठे या प्रसिद्ध नैय्यायिकाच्या हाताखाली त्यांना न्यायदर्शन, अलंकारशास्त्र, धर्मशास्त्र, इत्यादि पारंपरिक शास्त्रांचा अभ्यास केला.

विश्रामबागेतील संस्कृत पाठशाळा ६ ऑक्टोबर १८२१ साली एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेने स्थापन झाली व पहिली काही वर्षे फक्त ब्राह्मणांसाठी पारंपारिक शास्त्रांचे अध्यापन तेथे होत राहिले. परंतु आधुनिक ज्ञानाबद्दलची आस्था झपाट्याने वाढण्याचा तो काळ होता व इंग्रजी भाषेकडेही शिकणारांचा ओढा होता. यात ज्ञानार्जनाबरोबरच नोकरी मिळण्याचे आकर्षणही प्रभावी होते. या एकंदर परिस्थिती-मुळे मुंबईप्रमाणेच पुण्यासही इंग्रजी शिक्षणाच्या सोयी वाढू लागल्या व विद्यार्थीही तिकडे वळू लागले. सन १८३२ मध्ये पुण्यास एक इंग्रजी शाळा सरकारने काढली. या शाळेत मुले धाडली तर ती नास्तिक किंवा खिस्ती होतील असे भय वाटून ब्राह्मणवर्गाचे पालक मुलांना तेथे पाठविण्यास कचरत होते. यामुळे संस्कृत पाठशाळेतच इंग्रजी शिकविण्याचे वर्ग काढण्याची कल्पना निघाली. पाठशाळेचे प्रमुख मोरशास्त्री साठे हे अशा बदलाला अनुकूल असणारे सुधारक दृष्टीचे शास्त्री होते, आणि लोकहितवादीं-सारखे तरुण पारंपरिक विद्येपेक्षा इंग्रजी शिक्षणाला महत्त्व मिळावे म्हणून प्रयत्न करीत होते.

सन १८३७ मध्ये, संस्कृत पाठशाळेचे 'मुखत्यार' म्हणून मोरशास्त्री साठे आणि 'सुपरिं-टेन्डट' म्हणून मेजर थॉमस कँडी अशा नेमणुका झाल्या. कँडी यांची नेमणूक नवी होती व तिचे पुढील घटनांच्या दृष्टीने फार महत्त्व होते. पाठशाळेच्या इमारतीत येण्यासही प्रथम कँडींना परवानगी नव्हती. परंतु हा सोवळेपणा लवकरच नाहीसा झाला आणि याला साठे व कँडी या दोघांची उदार

वागणूक व ज्ञानाबद्दल आस्था कारण झालेली दिसते. १८४२ मध्ये पाठशाळेतच इंग्रजी भाषेचा वर्ग उघडण्यात आला व स्वतः साठेच या वर्गांत विद्यार्थी म्हणून बसले. आपल्या तरुण विद्यार्थ्यांना त्यांनी इंग्रजी वर्गांत यावयास सांगितले. यांतच कृष्णशास्त्री होते. अशा रीतीने वयाच्या अठराव्या वर्षापासून कृष्णशास्त्रींचा इंग्रजी भाषेचा व त्याचबरोबर अर्थशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि आधुनिक शास्त्रांचा अभ्यास सुरू झाला. अर्थशास्त्र हा विषय त्यांच्या विशेष आवडीचा होता, असे नमूद केलेले आढळते. हेन्री ग्रीन या अभ्यासू अध्यापकांच्या हाताखाली ह्यूम, मिल प्रभृति ग्रंथकारांच्या वाङ्मयाचा त्यांनी खोल अभ्यास केला. कँडी यांचे मराठी भाषेविषयीचे प्रेम व मराठीतून आधुनिक ज्ञानप्रसार करण्याविषयीची तळमळ यांचाही इष्ट परिणाम कृष्णशास्त्रींच्या मनावर झालेला दिसतो.

सन १८४१ ते १८५२पर्यंत मोरशास्त्री साठे हे पाठशाळेचे मुखत्यार होते, १८५२ साली त्यांनी पाठशाळा सोडली व सुरत येथे ते मुन्सफ म्हणून काम पाहू लागले. जून १८५१ मध्येच पाठशाळेचे रूपांतर होऊन तिला पूना कॉलेज हे नवे नाव मिळाले होते. संस्कृत पारंपारिक शास्त्रांच्या अध्यापनाचे काम आता थांबले होते. जगन्नाथ शंकरशेठ (१८०३-१८६५), बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६), आणि दादोबा पांडुरंग (१८१४-१८८२) यांच्या प्रयत्नांनी आधुनिक शिक्षणाचा पाया मुंबईस आधीच दृढ झालेला होता व १८५२ पासून पुण्यासही तेच शिक्षण मिळू लागले. सन १८५२ पर्यंत कृष्णशास्त्री यांचे शिक्षण पुरे झाले होते. संस्कृत, इंग्रजी व मराठी या तीन भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले होते व पारंपारिक शास्त्रे व आधुनिक शास्त्रे यांचा त्यांनी अभ्यास केलेला होता. मराठीतून ग्रंथनिर्मिती करण्याचे नवीन काम करण्यास त्यांच्यासारखा विद्वान योग्य आहे असे पाहून सरकारने त्यांची 'ट्रॅन्स्लेशन एक्झिबिटर' या जागेवर नेमणूक केली. सन १८५२ मध्येच त्यांनी 'साक्रेटिसचे चरित्र' हा ग्रंथ लिहिला व तत्त्वज्ञानाच्या गहन प्रश्नांची मांडणी विशदपणे करण्यास मराठी भाषा समर्थ होऊ शकते हे दाखवून दिले. यानंतर त्यांनी 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' हा स्फुट निबंधसंग्रह लिहिला व मग 'अर्थशास्त्र-परिभाषा' ह्या ग्रंथाची रचना केली.

### भाषाशैली :

'अर्थशास्त्र-परिभाषा' या ग्रंथामध्ये जॉन स्टुअर्ट मिल (१८०६-१८७३) यांच्या ग्रंथाचे शब्दशः भाषांतर नाही, पण पुष्कळसे अनुसरण आहे. मराठी भाषेला इंग्रजीचे फार सलग भाषांतर केले तर जो बेडौलपणा येतो, तो त्या काळच्या मराठी गद्यलेखनात खूपच आढळतो. पण तसा प्रकार कृष्णशास्त्री यांच्या ग्रंथात क्वचित आढळतो. उलट, कित्येक जागी कळत नकळत संस्कृत भाषेचा प्रभाव पडल्यामुळे येणाऱ्या शब्दांचा व रचनेचा बोजडपणा जाणवतो. नैय्यायिकांच्या प्रतिपादनशैलीमध्ये वारंवार येणारे काही प्रयोगही अधूनमधून डोकावतात. कृष्णशास्त्री व लोकहितवादी हे अगदी समवयस्क आणि दोघेही पुण्यासच मुख्यतः शिकले व राहिले. परंतु दोघांच्या लेखनशैली भिन्न आहेत. ही तुलना कृष्णशास्त्रींच्या शैलीची वैशिष्ट्ये व दिशा समजण्यासाठी उपयोगी पडणारी आहे. सामान्य लोकांमध्ये नव्या ज्ञानाची आवड व प्रसार व्हावा या दृष्टीने त्यांना उपदेश करण्यासाठी सोपी व सरळ बोलभाषा लोकहितवादींनी वापरली ते योग्यच होते. परंतु कृष्णशास्त्रींना तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र अशा नव्या विषयांची मराठी भाषेत मांडणी करावयाची होती व केवळ बोलभाषेवर भिस्त टाकून चालण्यासारखे नव्हते. म्हणून त्यांनी विषयानुसार संस्कृतचा आधार घेऊन प्रतिपादन केले ते आवश्यकच होते.

त्यांच्या एकंदर भाषाशैलीकडे पाहिले तर असेही स्पष्ट दिसते की केवळ गरज म्हणून ते संस्कृत शब्द वापरीत किंवा जुन्या शास्त्रपरंपरेची परिभाषा आणीत, परंतु सर्वसाधारणपणे बोलभाषेच्या

जवळ राहाण्याचेच धोरण ठेवीत. मराठीला संस्कृतच्या जवळ नेऊन 'प्रौढ' व अलंकारिक बनविण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. पुढे सन १८७५ नंतर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर प्रभृतींच्या भाषेमध्ये संस्कृत शब्दांचा, सुभाषितांचा व क्लिष्ट वाक्यप्रयोगांचा वापर होऊ लागला व प्रौढ ग्रांथिक भाषा ही बोलभाषेपासून दुरावत गेली, ही दिशा कृष्णशास्त्रींच्या शैलीमुळे लागली नसून त्यांची शैली अव्हेरून ही नवी दिशा ग्रांथिक भाषेला लावली गेली असे म्हणावे लागेल.[1]

कृष्णशास्त्री यांनी मराठीमध्ये पुष्कळसे कार्य भाषांतराचे केले. निसर्गविज्ञान आणि अर्थशास्त्र इत्यादि शास्त्रांमध्ये इंग्रजीतून मिळणारे ज्ञान इकडच्या त्या वेळच्या ज्ञानाच्या मानाने इतके प्रगल्भ होते की त्या शास्त्रांमध्ये स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यापेक्षा इंग्रजी प्रमाण ग्रंथांची भाषांतरे करणेच निकडीचे व महत्त्वाचे होते. मराठी भाषेच्या विकासाचा प्रश्न प्रत्यक्ष प्रायोगिक रीतीनेच सोडविण्याचे हे काम कृष्णशास्त्री करीत होते. हे करतांना त्यांचे लक्ष मराठी भाषेच्या व्याकरणाकडे गेले व मग भाषाशास्त्राकडे गेले.

या विषयावर त्यांनी स्वतंत्र आणि मौलिक विचार केला. त्यांच्या 'मराठी व्याकरणावरील निबंध' ह्या ग्रंथात त्यांची स्वतंत्र आणि वैज्ञानिक दृष्टी दिसून येते. "व्याकरणकर्ता ज्या भाषेचे व्याकरण लिहीत असेल त्या भाषेची पूर्वस्थिती काय होती व तीत उत्तरोत्तर कसा कसा फेरफार पडत गेला या गोष्टीकडे त्या व्याकरणकर्त्याने लक्ष्य पोचविले पाहिजे. विषय प्रतिपादन करण्याच्या रीतीस ऐतिहासिक रीति म्हणावे"[2] असे ते म्हणतात.

ऐतिहासिक रीतीचा असा स्पष्ट आणि जाणीवपूर्वक अवलंब त्यांनी आपल्या प्रस्तुत निबंधांतून केलेला आढळतो. संस्कृत किंवा इंग्रजी भाषांच्या व्याकरणांचा आधार घेऊन रचलेली पूर्वीची व्याकरणे कशी सदोष आहेत हे त्यांनी दाखविले असून मराठीचे स्वतंत्र व्याकरण रचावयास हवे असे प्रतिपादन केले आहे. मराठी प्रमाण भाषेची गरज सांगताना प्रमाण भाषेव्यतिरिक्त लोकांच्या तोंडी असलेल्या बोली हे "इतर सारे भाषाप्रकार सर्वथैव अडाणीपणाचे व अशुद्ध असे आमचे मत नाही" असे ते आवर्जून सांगतात. (कित्ता. पृष्ठ २६). सारांश, कृष्णशास्त्री यांचा व्याकरणावरील ग्रंथ हा त्यांच्या काळातच नव्हे तर आजही मौलिक ठरेल अशी ती स्वतंत्र रचना आहे.

कृष्णशास्त्री यांच्या भाषाशैलीत सोपेपणा व सामर्थ्य यांचे जे मिश्रण आढळते, त्याचे कारण त्यांची मराठी भाषेविषयी आस्था व प्रेम होय. शिवाय त्यांचे मन रसिक होते, त्यामुळे शब्दांच्या सूक्ष्म छटा व विविध उपयोजनेतील लालित्य त्यांना सहज उमगत असे. त्यांनी 'पद्यरत्नावली' हा कविता-संग्रह रचला; त्याच्या इंग्रजी प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की, "मुख्यतः संस्कृत काव्याच्या आधाराने या कविता रचल्या असल्या तरी त्यांना स्वतंत्र मराठी रचना म्हणता येईल."[3]

### सार्वजनिक कार्य :

कृष्णशास्त्रींच्या ग्रंथलेखनाच्या कार्याबरोबरच त्यांचे समकालीन सार्वजनिक जीवनातही सतत कार्य चालू होते. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत त्यांची मते सुधारक पक्षासारखी होती. त्यांच्या

१. हॉवर्ड हे इंग्रज अधिकारी शिक्षणखात्याचे प्रमुख म्हणून या वेळी काम करीत होते. मराठीच्या विकासणाऱ्या गद्यशैलीला स्वतःचे नैसर्गिक वळण मिळावे आणि संस्कृतच्या व इंग्रजीच्या प्रभावाने ती मारावू नये, असे त्यांचे मत होते. इंग्रजीच्या विकासाला जॉन्सनच्या प्रौढ शैलीपेक्षा स्विफ्टची सोपी पण जिवंत शैली उपयोगी पडली असे ते म्हणतात. त्यांच्या या मताशी कृष्णशास्त्रींचे मत जुळणारे असावे, असे वाटते. ('आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती.' डॉ. कृ. भि. कुलकर्णी, १९५६, पृष्ठे ६१-६४, पाहा.)

२. 'मराठी व्याकरणावरील निबंध', संपादक : रामचंद्र भिकाजी जोशी, चित्रशाळा, पुणे, १८९३, पृष्ठ १३.

३. 'पद्यरत्नावली', चित्रशाळा, पुणे, १८९३; इंग्रजी प्रस्तावना.

वेळचे सुधारक हे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला खंबीरपणे तोंड देत होते व हिंदू धर्मावरील टीकेचा प्रतिकार करीत होते. परंतु, त्यांचा स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान रूढींचे समर्थन करून लोकांची आराधना करणाऱ्या वृत्तीचा नव्हता. विधवा-विवाहाचा प्रश्न, धर्मांतरितांना परत हिंदू करून घेण्याचा प्रश्न, ब्राह्मणाखेरीज इतर जातींना बरोबरीने आधुनिक ज्ञान घेण्याचा हक्क, इत्यादी बाबतींत कृष्णशास्त्री हे सुधारक मताचे होते. परंतु, त्या वेळच्या इतर सुधारकांप्रमाणे ते समाजाला जागृत करण्यासाठी हिरीरीने कार्यप्रवृत्त झालेले मात्र दिसत नाहीत. ते अशा चळवळीला पाठिंबा देताना तेवढे दिसतात.

दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी व रिव्हायझर म्हणून सन १८५१ पासून त्यांनी काम केले. तसेच पुणे येथील ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून १८६५ पासून काम केले. १८६१ ते १८७५-पर्यंत ते 'शालापत्रक' या नियतकालिकाचे संपादक होते. 'ज्ञानप्रकाश' या प्रसिद्ध दैनिकाची स्थापना करणारांमध्ये ते होते. आणि 'सार्वजनिक सभे'ची स्थापना २ एप्रिल १८७० मध्ये झाली ती त्यांच्या प्रेरणेने झाली. अशा अनेक संस्थांच्या द्वारे त्यांनी आधुनिक कल्पना व ज्ञान यांच्या प्रसाराचे कार्य केले.

सन १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठ स्थापन होऊन त्यातून शिकून बाहेर पडलेल्या विद्वानांच्या पिढीने समाजजागृतीचे हे कार्य चालू ठेवले. त्या पिढीच्या आधीच्या पिढीतील विद्वानांत कृष्णशास्त्री हे चतुरस्र बुद्धीचे व उदार वृत्तीचे ज्ञानोपासक होते, असे त्यांच्या कार्यावरून म्हणता येते. समकालीनांनी त्यांना म्हणूनच अग्रपूजेचा मान दिलेला आढळतो.

त्यांची धर्मविषयक मते स्वधर्माभिमानी होती. काशीहून नीळकंठशास्त्री गोरे नावाचे ख्रिस्ती झालेले शास्त्री वादविवादासाठी पुण्यास आले असता त्यांना कृष्णशास्त्री यांनी वादात पराभूत केले, आणि मिशनऱ्यांच्या प्रचाराला तोंड देण्यासाठी काही मित्रांच्या साहाय्याने 'विचारलहरी' हे पाक्षिक जून १८५२पासून चालविले. धर्माचा अभिमान ठेवूनही ते स्वतः अज्ञेयवादी झाले होते. 'राम' 'कृष्ण' या देवतांना ते मानीत नव्हते. ते पुरते नास्तिकही नव्हते, पण आस्तिकही नव्हते, असे दिसते. त्यांच्या विचारांची ही अवस्था न्यायवैशेषिक दर्शनांच्या पूर्वप्रभावामुळे आणि नंतर ह्यूम, मिलप्रभृती ग्रंथकारांच्या मतांमुळे झालेली असणे अगदी साहजिक आहे. त्यांचे खासगी जीवन आणि वर्तन त्या काळच्या रूढीप्रमाणे होते. रानडे, टिळक, आगरकर, फुले प्रभृती नंतरच्या पिढीतील पुढारी वर्तनातील साधेपणाला व शुद्धतेला अत्यंत महत्त्व देत होते, पण ही शुद्धता आधीच्या पिढीतील सुधारकांच्या किंवा सनातन्यांच्या वर्तनात आढळत नव्हती.

### कृष्णशास्त्री यांच्याविषयीचे संदर्भ ग्रंथ :

(१) 'चार चरित्रात्मक लेख' : हरि महादेव पंडित, नाडकर्णी आणि मंडळी, मुंबई, जुलै १९०८, पृष्ठे १-१५. यातील कृष्णशास्त्रींवरील मृत्युलेख मुळात 'विविधज्ञानविस्तारा'त, (वर्ष १०, १८७८, पृष्ठ १६१), प्रसिद्ध झाला; (२) 'कृष्णशास्त्री' : निनांवी, 'बालबोध', जुलै १८७८; (३) 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती' : कृ. मि. कुलकर्णी, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९५६; (४) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' : खंड चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९६५; (५) 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' : संपादक अ. का. प्रियोळकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७; (६) 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, (१८००-१८०४)' : गं. बा. सरदार, मॉडर्न बुक डेपो, आवृत्ती २ री, १९५६.

## मार्सेट, मिसेस जेन

[१७६९ – १८५८]

लंडनमध्ये स्थाइक होऊन राहिलेल्या ए. एफ. हाल्डिमंड ह्या स्विस व्यापारी गृहस्थाची जेन ही एकुलती एक मुलगी. तिने १७९९ मध्ये डॉ. मार्सेट या इंग्रज डॉक्टरशी लग्न केले. तरुण मुलांसाठी, विशेषतः शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी, अनेक विषयांवर या लेखिकेने पुस्तके लिहिली व ती ब्रिटन व अमेरिका या देशांत अतिशय लोकप्रिय झाली. 'रसायनशास्त्रावरील संवाद' हे मुलींसाठी लिहिलेले पुस्तक १८०६ मध्ये छापले गेले व १८५३ पर्यंत त्याच्या सोळा आवृत्त्या निघाल्या. नुसत्या अमेरिकेत त्याच्या १,६०,००० प्रती खपल्या. या पुस्तकाचे हरि केशवजी यांनी १८३७ मध्ये मराठीत भाषांतर केले.

मार्सेट यांनी पदार्थविज्ञानावर आणि अर्थशास्त्रावर अशीच संवादरूप पुस्तके लिहिली व ती लोकप्रिय झाली. अर्थशास्त्रावरील त्यांचे पुस्तक वाचून लॉर्ड मेकॉले यांनी या पुस्तकाची फार प्रशंसा केली, व जॉ. बाप्टिस्ट या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने या लेखिकेचा गौरव केला. मेकॉले यांच्या शिफारसीमुळे ह्या पुस्तकाची माहिती हिंदुस्थानात होऊन त्याचे मराठीत रूपांतर करण्याची कल्पना हरि केशवजी यांना सुचली असावी.

वनस्पतिशास्त्र, ऋतुचक्राची माहिती, वेगवेगळ्या राज्यपद्धतींची माहिती, इंग्लंडच्या इतिहासाची माहिती, व्याकरण, अशा अनेक विषयांवर या लेखिकेची पुस्तके आहेत. अगदी लहान मुलांसाठी गोष्टींची पुस्तकेही तिने लिहिली आहेत. ज्ञानप्रसाराचे हे कार्य अविरतपणे करणारी ही लेखिका वयाच्या ८९ वर्षी मृत्यू पावली.[१]

**मुख्य ग्रंथरचना :**

[पुढले आकडे हरि केशवजी यांच्या मराठी भाषांतराच्या वर्षाचे]

१. कॉन्व्हर्सेशनस् ऑन केमिस्ट्री १८०६ ......... १८३७
२. ,, ,, पोलिटिकल एकॉनमी, १८१६ ......... १८५४
३. ,, ,, नॅचरल फिलॉसफी, १८१९ ......... १८३३
४. ,, ,, व्हेजिटेबल फिजिऑलजी, १८२९
५. ,, ,, हिस्टरी ऑफ इंग्लंड फॉर चिल्ड्रन, १८४२

लेखिकेच्या अर्थशास्त्रावरील ज्या ग्रंथाच्या आधारे हरि केशवजींनी ग्रंथ लिहिला, त्याची अनुक्रमणिका खाली दिली आहे :

Conversations on Political Economy (By Mrs. Jane Marcet)
London, 1816. ix, 464 pp. (BM : 713.b.23)


| | | Pages |
|---|---|---|
| I | Introduction .. .. .. | 1- 16 |
| II | ,, .. .. .. | 17- 28 |
| III | On Property .. .. .. | 29- 46 |


१. लेखिकेबद्दलची ही माहिती 'डिक्शनरी ऑफ नॅशनल बायॉग्रफी' खंड १२, पृष्ठे १००७ ते १००८ यांवरून घेतली आहे. याबद्दल त्या ग्रंथाच्या संपादकांचे आम्ही ऋणी आहोत. ही माहिती व सोबतची अनुक्रमणिका ब्रिटिश कौन्सिलच्या लंडन येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल यांनी आम्हाला उपलब्ध करून दिली याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. या बाबतीत कौन्सिलचे मुंबई येथील ग्रंथपाल श्री डी. के. देवनळी यांनी आम्हाला मदत करून ही माहिती मिळवून दिली याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

| | | |
|---|---|---|
| IV | On Property .. .. .. | 47- 61 |
| V | On the Division of Labour .. .. .. | 62- 81 |
| VI | On Capital .. .. .. | 82- 99 |
| VII | ,, ,, .. .. .. | 100-113 |
| VIII | On Wages and Population .. .. .. | 114-134 |
| IX | ,, ,, ,, ,, .. .. .. | 135-150 |
| X | On the Condition of the Poor .. .. .. | 152-171 |
| XI | On Revenue .. .. .. | 172-188 |
| XII | On Revenue derived from property in land .. | 189-212 |
| XIII | On Revenue derived from the cultivation of Land .. | 213-244 |
| XIV | On the Revenue of those who do not employ their capital themselves .. .. .. | 245-268 |
| XV | On Value and Price .. .. .. | 269-292 |
| XVI | On Money .. .. .. | 293-317 |
| XVII | ,, ,, .. .. .. | 318-341 |
| XVIII | On Commerce .. .. ... | 342-361 |
| XIX | On Foreign Trade .. .. .. | 362-382 |
| XX | ,, ,, ,, .. .. .. | 382-396 |
| XXI | ,, ,, ,, .. .. .. | 397-418 |
| XXII | (i.e. XXII) On Expenditure .. .. .. | 419-449 |

## क्लिफ्ट, होरेस विल्यम

श्री. गोपाळ हरि देशमुख यांनी 'लक्ष्मीज्ञान' ग्रंथ क्लिफ्ट यांच्या ग्रंथाच्या आधारे लिहिल्याचे म्हटले आहे. क्लिफ्ट यांच्यासंबंधी व त्यांच्या ग्रंथांसंबंधी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला व एवढीच माहिती मिळाली की त्यांचे नाव होरेस विल्यम क्लिफ्ट असून त्यांनी 'एलेमेंटस ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ लिहिला आहे. या बाबतीत मुंबईच्या ब्रिटिश कौन्सिलच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. देवनळी यांनी मदत केली व लंडन येथील कौन्सिलच्या ग्रंथपालांनी खालील माहिती आम्हाला पुरविली.

क्लिफ्ट यांचे 'एलेमेंटस ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हे पुस्तक पाठ्यपुस्तक म्हणून लिहिलेले आहे. ते पुस्तक कलकत्याच्या बॅप्टिस्ट मिशन प्रेसमध्ये १८३५ साली छापले गेले व ठॅकर आणि कंपनी व टी. ओस्टेल यांच्यामार्फत ते विकले जात होते. पुस्तकाची पृष्ठे २६८ आहेत व प्रस्तावनेच्या खाली, 'कलकत्ता, १८ डिसेंबर, १८३४' अशी स्थळ व तारीख यांची माहिती दिलेली आहे.

या पुस्तकाची १८४६ साली दुसरी आवृत्ती निघाली असावी. तिची पृष्ठे ६ + २२१ होती, अशी माहिती लंडन बिब्लिऑग्रफी ऑफ सोशल साएन्सेस या संदर्भग्रंथातून मिळाली. लोकहितवादींनी क्लिफ्टच्या १८३४ च्या ग्रंथाचा आधार घेतला की १८४६ मधील आवृत्तीचा घेतला, ते कळत नाही. त्यांनी या बाबतीत काहीच उल्लेख केलेला नाही.

ब्रिटिश कौन्सिलच्या ग्रंथपालांनी ब्रिटिश म्यूझियम (लंडन) येथील १८३५ च्या ग्रंथाची अनुक्रमणिका उतरवून घेऊन आम्हाला श्री. देवनळी यांच्यामार्फत पाठविली, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

ही अनुक्रमणिका खाली दिली आहे:

*Elements of Political Economy*: Designed as a Manual for education. By Horace William Clift, Calcutta. Printed at the Baptist Mission Press. Sold by Messrs. Thacker & Co., and by T. Ostell, 1835, xii, 268 pp. (BM: 8207, b. 16.)

(Preface dated, Calcutta, December 18, 1834.)


| | | Pages |
|---|---|---|
| | Introduction .. .. .. .. .. .. | 1– 12 |

PART I: PRODUCTION

| CHAP. | | |
|---|---|---|
| I. | Causes which augment the efficiency of labour .. | 13– 15 |
| II. | The influence of knowledge on the wealth-creating arts .. .. .. .. .. .. .. | 16– 37 |
| III. | Natural causes for the progress of mankind in knowledge .. .. .. .. .. .. | 38– 54 |
| IV. | Divisions of labour: its effects; its causes; its limits .. .. .. .. .. .. .. | 55– 80 |
| V. | Exchange .. .. .. .. .. .. | 81– 99 |
| VI. | Money .. .. .. .. .. .. .. | 101–115 |
| VII. | The accumulation of capital: its effects: and its origin .. .. .. .. .. .. .. | 116–138 |
| VIII. | Security of property .. .. .. .. .. | 139–157 |

PART II: DISTRIBUTION

| | | |
|---|---|---|
| I. | Value; price; demand and supply: cost of production .. .. .. .. .. .. | 159–178 |
| II. | The natural laws which create and govern rent .. | 179–192 |
| III. | Wages; and the principal laws which govern them | 193–252 |
| IV. | The principal laws which regulate the profits of capital .. .. .. .. .. .. .. | 253–268 |


## मिल, जॉन स्टुअर्ट

[१८०६ – १८७३]

अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र आणि राज्यशास्त्र या शास्त्रांतील एक तज्ज्ञ म्हणून ब्रिटनमध्ये व भारतातही मिल यांना मोठे स्थान आहे. महाराष्ट्रातील सुधारकांनी मिल व हर्बर्ट स्पेन्सर (१८२०-१९०३) या दोघांच्या विचारांपासून स्फूर्ती घेतली. मिल यांच्या अर्थशास्त्रावरील मुख्य ग्रंथाचा आधार घेऊन प्रस्तुत संग्रहातील दोन ग्रंथ लिहिले गेले आहेत.

मिल यांचे वडील जेम्स मिल (१७७३-१८३६) हे स्वतः तत्त्वज्ञ आणि इतिहासज्ञ होते. 'हिस्टरी ऑफ इंडिया' हा सहा खंडांचा ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. बेन्थॅम (१७४८–१८३२) कोलरिज (१७७२-१८३४), रिकार्डो (१७७३-१८२३) प्रभृती विद्वानांशी त्यांचा गाढ परिचय होता. त्यांनी जॉन स्टुअर्ट मिल यांच्या शिक्षणासाठी परिश्रम घेऊन अगदी लहानपणापासून त्यांना भाषांचे व अनेक शास्त्रांचे शिक्षण दिले.

जॉन स्टुअर्ट मिल यांनी आपल्या तीव्र बुद्धिमत्तेमुळे फारच अल्प वयात लॅटिन, ग्रीक इत्यादि भाषांवर प्रभुत्व मिळविले व त्या भाषांतील वाङ्मयाचे परिशीलन केले. रसायनशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांचा त्यांनी अभ्यास केला. वयाच्या तेराव्या वर्षी ॲडाम स्मिथ व रिकार्डो यांचे अर्थशास्त्रावरील ग्रंथ त्यांनी वाचले.

त्यांनी १८५१ मध्ये हॅरिएट टेलर या बुद्धिमान विधवा स्त्रीशी लग्न केले. टेलर यांच्या प्रगतिशील विचारांचा परिणाम मिल यांच्या मतांवर झालेला आहे. विशेषतः स्त्रियांच्या दास्यविमोचनाबाबत आयर्लंड व हिंदुस्थान येथील प्रजेला हक्क देण्याबाबत मिल यांचा उदारमतवादी दृष्टिकोन दृढ होण्यास टेलर यांच्या विचारांमुळे मदत झाली.

मिल यांच्या आधीच्या काळात बेन्थॅम, जेम्स मिल व रिकार्डो यांची 'युटिलिटेरियन' विचारसरणी प्रभावी होती. व्यक्तीने जास्तीत जास्त सुख मिळविण्याची धडपड केल्यास, त्यामुळे समाजातील संपन्नता वाढेल व मानवी संस्कृतीचा विकास आपोआप होत जाईल, अशी ही विचारसरणी आहे. तिला 'सुखवादी', 'भोगवादी' व 'जडवादी' विचारसरणी मानून तिच्यावर आपल्याकडील विद्वानांनी प्रखर टीकाही केलेली आहे. स्वतः मिल यांची विचारसरणी सुखवादी किंवा भोगवादी नव्हती. त्यांच्या काळी फ्रेंच समाजवादी व कम्युनिस्ट विचारांचा उदय युरोपात झालेला होता. या विचारांतील ग्राह्य भाग मिल यांनी अंगीकारला होता. सामाजिक न्याय व समता व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रत्येक राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाचे तत्त्व त्यांनी पुरस्कारलेले आढळते. व्यक्ती व समाज यांच्या स्वातंत्र्याचा व सुखाचा प्रश्न निसर्गशास्त्रातील गणिती पद्धतीने नियम सांगून सुटणारा नाही, असे त्यांनी मानलेले आढळते. केवळ तर्काने मानवी जीवनाचे नियमन होत नसून न्यायबुद्धी व बंधुभाव अशा आंतरिक भावनांना आवाहन केले पाहिजे असे ते मानीत. त्यांची भूमिका म्हणूनच 'उदारमतवादी' होती व यामुळेच महाराष्ट्रातील सुधारकांनी त्यांना गुरुस्थानी मानले, असे म्हणता येईल.

त्यांनी १८४४ मध्ये 'एसेज ऑन सम अनसेटल्ड क्वेश्चन्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातील विवेचनावर रिकार्डो यांच्या काटेकोर तार्किक अर्थशास्त्रीय प्रमेयांचा प्रभाव आहे. पण, १८४८ मध्ये त्यांनी 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी' हा ग्रंथ स्वतंत्रपणे लिहिला. त्यात 'उत्पादन' या विषयाचे विवेचन रिकार्डोंच्या अनुसंधानाने केलेले आहे, पण 'विभाजन' या विषयावरील विवेचन स्वतःच्या वेगळ्या भूमिकेवरून केलेले आहे. या ग्रंथाच्या १८४९ च्या दुसऱ्या आवृत्तीत व १८५२ च्या तिसऱ्या आवृत्तीत त्यांनी काही महत्त्वाच्या सुधारणा केलेल्या आढळतात. हरि केशवजी यांनी १८५४ मध्ये, व कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी १८५५ मध्ये मिल यांच्या या ग्रंथाची कोणती आवृत्ती उपयोगात आणली असावी, हे सांगता येणे कठीण आहे. ती १८५२ ची तिसरी आवृत्ती असण्याची शक्यता आहे, एवढेच आज म्हणता येईल.

मिल यांचे वैवाहिक जीवन फार अल्प होते, कारण १८५८ मध्ये हॅरियट यांचा मृत्यू झाला. त्यांच्या प्रगतिशील विचारांचा प्रभाव मात्र मिल यांच्या विचारांवर सतत राहिला. १८६२ मध्ये गुलामगिरीच्या विरुद्ध उत्तर अमेरिकेने जो प्रखर लढा दिला त्याला मिल यांनी पाठिंबा दिला. तसेच १८६७ मध्ये, कुळांच्या जमिनीवरील हक्कांसाठी आयर्लंडमध्ये चळवळ झाली तिचे मिल यांनी

समर्थन केले. वयाच्या सतराव्या वर्षी 'इंडिया ऑफिस'मध्ये मिल यांची कारकून म्हणून नेमणूक झाली, १८३६ ते १८५६ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनी व हिंदी राजेरजवाडे यांच्यातील संबंधाबद्दलचे कामकाज ते पहात होते, आणि १८५६ ते १८५८ ही दोन वर्षे ते या संस्थेचे प्रमुख होते. ते स्वतः कधी भारतात आले नाहीत. परंतु येथील प्रजेच्या हितासाठी व न्याय्य हक्कांसाठी ते नेहमी जागरूक असत.

त्यांनी १८६१मध्ये लिहिलेले पण १८६९ मध्ये प्रसिद्ध झालेले 'सबजेक्शन ऑफ वीमेन' हे पुस्तक, आणि १८५९ साली प्रसिद्ध झालेले 'ऑन लिबर्टी' हे पुस्तक, यांनी ब्रिटनमध्ये व भारतातही विचारस्वातंत्र्याच्या चळवळीला फार मोठा हातभार लावला.

## मिल यांची प्रमुख ग्रंथरचना :

### प्रमुख ग्रंथ :

(१) "ए सिस्टिम ऑफ लॉजिक", खंड २, १८४३; (२) "एसेज ऑन सम अनसेटल्ड क्वेश्चन्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी", १८४४; (३) 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी', खंड २, १८४८; (४) 'ऑन लिबर्टी', १८५९; (५) 'कन्सिडरेशन ऑफ रिप्रेझेन्टेटिव्ह गव्हर्न्मेंट', १८६१; (६) 'युटिलिटेरिॲनिझम', १८६३; (७) 'सब्जेक्शन ऑफ वुमेन', १८६९ (१८६१ मध्ये लिहिलेले); (८) 'थ्री एसेज ऑन रिलिजन', १८७४.

### मिल यांच्या ग्रंथाच्या आधारे रचलेले मराठीतील ग्रंथ :

(१) 'स्वातंत्र्य': फडके नारायण लक्ष्मण, आर्यभूषण, पुणे, १८९२; 'ऑन लिबर्टी'च्या आधारे. (२) 'स्त्रियांची परवशता': कानिटकर, गोविंद वासुदेव, तत्त्वविवेचक, मुंबई १९०२, 'सब्जेक्शन ऑफ वुमेन' या ग्रंथाचे भाषांतर. (३) व (४) प्रस्तुत संग्रहातील हरि केशवजी व कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे ग्रंथ, 'प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनमी'च्या आधारे.

परिशिष्ट : २

# अपरिचित आणि पारिभाषिक शब्दांचे अर्थ*

## मराठी – इंग्रजी

[कंसांतील आकडे पृष्ठांचे आहेत.]

अदलाबदल – exchange (६२)
अद्रव्यमयी पुंजी – non-money capital (१५४)
अधिकरणें – instruments (२५२)
अनन्यथासिद्ध – self-proved (३४६)
अनुत्पादक उपभोग्य संपत्ति – unproductive consumable wealth (२९७)
अनुत्पादक नाश – unproductive destruction (२८३)
अनुत्पादक व्यय – unproductive expenditure (२८४)
अनुत्पादक श्रम – unproductive labour (२८०)
अनुपपत्ति – deprivation (१६१)
अनुभवसहित ज्ञान – empirical knowledge (९८)
अनुवाद – repetition (३३३)
अबादानी – prosperity (३)
अमदानी – supply (६३)
अर्थशास्त्र – Economics (२६५)
अर्थशास्त्रकार – economist (२८०)
अर्धली – rent, half the produce given as (२०३)
अर्बुद – ten crores (३६)
अलाभकारी खर्च – unprofitable expenditure (२५४)
अलाभकारी मजूर – unprofitable labourer (२१४)
अलाभकारी रोजमुरा – unprofitable wages (२२१)
अवधि – limit (३३९)
अविनाशी भांडवल – fixed or constant capital (३०१)
अक्षय – fully (३३२); permanent (३६७)
आंगमोल – intrinsic value (१७४)
आंगिक पुंजी – abilities as capital (१५५)
आगोटी – beginning of the rainy season (२८६)
आपधाकला – bewildered (१३)
आवटणें; आवण लावणें – replanting (३१८)
इंजनरी – engineering (३६९)
उतरलेलें – cited (३६३)
उत्तेजकें – incentives (३३७)

---

* (१) अनुस्वारयुक्त शब्द प्रथम देण्यात आले आहेत.
(२) कंसामध्ये फक्त एकच पृष्ठसंख्या देण्यात आली आहे. इतर पृष्ठसंख्या शब्दसूचीवरून मिळतील.

उत्पन्न – income; product (२०७)
उत्पादक उपभोग्य संपत्ति – productive consumable wealth (२९७)
उत्पादक कारण – productive factor (९८)
उत्पादकता – productivity (३४७)
उत्पादक नाश – productive destruction (२८३)
उत्पादक मजूर – productive labourer (२९७)
उत्पादक व्यय – productive expenditure (२८४)
उत्पादक शक्ति – productivity (३४६)
उत्पादक श्रम – productive labour (२८०)
उत्पादक श्रमकर्ता – productive labourer (३५२)
उत्पादक संपत्ति – productive wealth (२९६)
उत्पादक साधनें – means of production (२९२)
उद्यमी – entrepreneur (२३३)
उपजीवन (१६१); उपजीविका (१०)– livelihood
उपपादन – exposition (३३३)
उपभोग – consumption (१३१)
उपभोग्य संपत्ति – consumable wealth (२९६)
उपयोगरूप मोल – use-value (१७४)
उफाटा – vigour (३५९)
उरणा वस्त्रें – woolen clothes (२३१)
ऊर्जा (जनावरांची) – animal husbandry (३६८)
एकथोक – wholesale (२३०)
एकसत्ताक राज्य – autocracy (९१)
ऐवज मजुरा – concession in export duty (२४०)
ओंबवलेलीं (घरें) – thatched (३५८)
ओज करणें – to take care (३४५)
ओसीक – fallow (१९९)
कंपीक – moderately fertile (२०३)
कच्चें उत्पन्न – gross product (३०७)
कड – metal (small pieces of stone) (२०६)
कबूलाती चिठ्या – bank-notes (२२७)
कमताई – scarcity (३३३)
कमती – shortage (१९२)
कमाण – spring (१८०)
कर – tax (३२)
कवलें – a kind of fruit (?) (३०९)
कळा – machine (३४०)
कळी – a part of the backside of the *Angarakha* (३२७)
कागदाचा पैका – paper money (२२७)
कागदाचें नाणें – paper currency (२२७)
कागदाचा रुपया – paper rupee (२२६)
काप – camp (१५)
काफ्री – Negro (१४०)
कामगार – employee (३७३)
कामदार – servant; officer (२७)
कारखाना – enterpise (industrial) (८)
कारागीर – artisan (६५)
किंमत – price (६१)
कुंद – embroidary (on the corner of the *Angarakha*) (३२७)
कुणबावा – a cultivated farm (३१९)
कूळ – tenant (३४३)
कृतिसिद्धपदार्थ – manufactured goods (९७)
कृत्रिम – deception (३३४)
कोरणी – carving tool (३११)

कौल – contract (६५)
क्रयविक्रय – purchase and sale (५४)
खत (९६); खतपत्र (३१६) – document
खप – demand (७)
खर्पड – drought (३४९)
खांच – deficit (३३२)
खानेसुमारी – census (३५१)
खेडणें – to cultivate (१९७)
खेरीज – apart (३४२)
गरादींत – behind bars (३२)
गल्ला – food grains (८५)
गहाण – mortgage (२१२)
गादी – monopoly (५१)
गोपचार – grazing land (of the community) (१६४)
घरखटले (९५); घरगुती खटले (८) – domestic affairs
घरट – husking mill (wooden) (२२२)
चढाचढी – competition (२४९)
चरम – maximum (३६४)
चाहूर – hundred and twenty *Bighas* (३०३)
चिटी – note (५६)
चोरावी – theft (३७१)
चौकसनीस – supervisor (१११)
छापी कागद – stamp-paper (६४)(?)
छीट – printed cloth (२४२)
जांतणी – grinding stones (१००)
जामदार – treasury officer (९)
जिनगी – assets (२१०)
जित्रब – standing crop (२०७)
झोल – pleatings of the *Angarakha* (३२७)
डांक – service (३३५)
डोंगरगर्क – land under mountains (१९९)
दसाळ – spendthrift (२५५)
तंगचाई – shortage (११६)
तगाई – *taccavi* (३२२)
तिखें – steel (४०)
तिजाई – rent, one-third of produce given as (२०३)
तेजी – high price level (६३)
दंग – pounding machine (३२५)
दर – rate (३३२)
दरमाहा – monthly wages (३३६)
दर्यागर्क – land under sea (१९९)
दास्तान – stock in hand (१३८)
दिंड – cloth-bale (२५४)
दिक्कत – hesitation (३१५)
दूम – second grade of land (१९२)
देणगी – debts (३४)
देशप्रकरण – civil administration (९)
देशव्यवहारव्यवस्था – political economy (८३)
देशसंपत्ति – national wealth (३३१)
देशसंस्था – civil Society (१५५)
द्रव्यमयी पुंजी – money capital (१५४)
द्रव्योत्पत्ति – producion of raw material (३७०)
धडवतीचीं वस्त्रें – clothes for daily use (२१६)
धडूत कांबळण – clothes and bedding (३२१)
धन – wealth (२६७)
धननाश – destruction of wealth (२८३)
धनोत्पत्ति – production of wealth (२७१)
धनोत्पादक खर्च – productive expenditure (२७७)
धनोत्पादक श्रम – productive labour (२७७)

धारा – land revenue (६३)
धारेकरी – tenant, paying revenue to the state besides rent to landlord (१८८)
धौताळपणा – generosity (३३७)
नदीगर्क – land under river (१९९)
नशायत – punishment (२८)
नांदणूक – well-being (२४३)
नाकवा – boatswain
नाकीर्द – uncultivable (१६४)
नाणे – currency (२१६)
नाण्याचा भाव – valuation of currency (२५१)
निर्के(वर्के) उत्पन्न – net produce (३४४)
निरख – rate (८५)
निर्बाध प्रमाण – incontrovertible proof (३३१)
नीतिरूप पुंजी – ethical qualities as Capital (१५४)
नोटी – notes (८४)
नोर – shipping freight charges (३८)
पट्टी – revenue (land) (३७१)
पडसाळा – shed (१९९)
परदेशव्यापार – foreign trade (२३७)
पाह – market price (१९३)
पारखणावळ – charges for testing (३८)
पिकलाड (११५); पिकलें (२००) – harvest
पुंजी – capital (८९)
पुंजीदार – capitalist (१३३)
पुरावा – supply (३७७)
पुरोद्य – supply (१०८)
पुर्जे – documents (५६)
पैका – money (७)
पैक्याचें मोल – value of money (२२६)
पैदास्त – production (१३३)
पोस्ती – indolent (८३)
प्रकृतिसिद्ध पदार्थ – natural goods (९७)
प्रजातिवृद्धि – over-population (३५०)
प्रजावृद्धि – increase in population (३४८)
प्रजासंख्या – population (३७६)
प्रजोत्पादनशक्ति – reproductivity (३४८)
प्रतिबंधकें – prohibiting factors (३२२)
प्रसक्त – consequential (३६३)
फरा – a maund (१९५)
फांटीं – fuel-wood (२३३)
फिरती पुंजी (१३९); फिरतें मांडवल (१४५) – circulating capital
बखर – chronicle; history (१०)
बढती – progress (७)
बाधकें – adverse factors (३२६)
बाह्यदेशव्यापार – foreign trade (२३७)
बेरोजगार – unemployed (३०५)
बेरोजगारी – unemployment (२९९)
भरणा – stock (२५५)
भरती – supply (८९)
भरभर – prosperity (७८)
भलावणपत्र – letter of credit (५६)
भांडवल – capital (४९)
भांडवलवाला – capitalist (२७५)
मांडवलाची उत्पादकत्वशक्ति – productiviy of capital (३७५)
मुकाड – barren (१९२)
मंडळी – joint stock company (७)
मंडावणी – extra payment for a demand bill of exchange (२५०)

मंदी – low price level (६३)
मक्ता; मख्ता – monopoly (७)
मजुरी – wages (९)
मजूर, (१२१), मजूरकर (१०); मजूरवार (६७) – labourer (९६)
मज्जनघंटिका – diving bell (१००)
मांडवी – warehouse in a port (८४)
माट (जमीन) – unfertile (११९)
माद्रपाट – coarse cloth (१७४)
माफी मजुरा – concession in export duty (२४०)
मालमोबदला – barter (२४८)
मुजरत – specially (२३१)
मुदल; मुद्दल – capital (३००)
मुद्दल पुंजी – original capital (२११)
मुसुंब – Mozambique (२४२)
मोबदला – exchange (५५)
मोबदला मोल – exchange value (१७३)
मोल – value (८९)
मोल्दार – valuable (२५५)
मोल्य – Value (६१)
योजणूक – application (१७६)
रक्तस्राव – bloodshed (१६)
रमारमी – equalizatoin (३०५)
राज्यनीति – principles governing political life (६)
राज्यरीति – a way of political life (३)
राज्यव्यवस्था – political economy (९)
राज्यव्यवस्थाकर्ते – political scientists (२४३)
रेळ – affluence (१४४)
रोकड पुंजी – cash capital (२२८)
रोखे – shares (३३४)
रोजंदारी – daily employment (३१४)
रोजगार – employment (१०)
रोजमुरा – daily wages (८९)
रोजिनदार – daily labourer (१२१)
लाभकारी खर्च – profitable expenditure (२५४)
लाभकारी मजूर – profitable labourer (२१४)
लाभकारी रोजमुरा – profitable wages (२२१)
लुकसान – unfit (३५८)
लोकवृद्धि – increase in population (६६)
लोकसत्ताक राज्य – democratic State (९१)
वजपा – compensation (३३३)
वरकड – moreover (१०१)
वरवा – side-crop (३५९)
वहनश्रम (२७७) वाहक श्रम (३६९) labour required for transport
विलण – instrument (३०१)
विनाशी मांडवल – variable capital (३०१)
विनिमय – exchange (३००)
विनिमयार्ह पदार्थ – commodity (२६९)
व्यय – expenditure (१३१)
व्यवहारव्यवस्थाकर्ता – political economist (२४३)
शण – jute (२३८)
शिल्प – industry (३४१)
शिल्पकर्म – manufacture (१७९)
शिल्पकृत पदार्थ – manufactured goods (३४२)
शिल्पविद्या – knowledge of manufacturing (८६)
शिल्पव्यापार – process of manufacture (९९)
शिल्पी लोक – persons engaged in manufacture (१४२)

शेतखपे – farm-labourers (१३४)
श्रम – labour (४)
श्रमकर्ता – labourer (३२४)
श्रमविभाग – division of labour (३००)
श्रमवृद्धि – increase in labour (३६६)
श्रमसंयोग – co-operation in labour (३१८)
श्रमाची उत्पादकता (३००); श्रमाची उत्पादकत्वशक्ति (३५३); श्रमाचें उत्पादकत्व (३०५) – productivity of labour
संग्रहवासना – saving propensity (३७३)
संचित फल – accumulated product (३५२)
संपत्तिव्यवस्था – political economy (१८३)
संपत्तिव्यवस्था जाणते – political economists (१८२)
संपत्तिव्यवस्थाशास्त्र – political economy (१८०)
संपत्तिशास्त्र – political economy (११०)
संपदा – wealth (७)
संभवद्युक्तिक – feasible (३७०)
संभूय समुत्थान – joint stock company (३३४)
संस्था – configuration (३६१)
सफरी – sea-farer (९४)
सर्कत – partnership (३६१)
सल्ला – truce (१५)
सवंगाई – cheapness (२२१)
सांत – epidemic (३५०)
सांबंधिक मोल – relative value (१७४)
सांसिद्धिक उत्पादकशक्ति – natural productivity (३७२)
सांसिद्धिक धर्म – natural properties (१००)
सांसिद्धिक पदार्थ – natural products (३०२)
साकी – creditworthiness (३४०)
साठे मारून ठेवणें – hoarding, cornering (८५)
साधकबाधकें – favourable and adverse factors (३४१)
साधकें – favourable factors (३२६)
सापका (जिवासी) – danger to life (१०१)
सामानाधिकरण्य – universality (३३३)
सारा – land revenue (८९)
साल – annual emolument (३३९)
सिद्धपदार्थविज्ञान – natural sciences (८८)
सीबंदी – guard (१११)
सीम – third grade (of land) (१९२)
सुंभा – stone-breaking hammer (३१२)
सुधारणूक – reform (१०२)
सृष्टपदार्थ – natural things (२७१)
स्थापना – establishment (१७१)
स्थिर पुंजी (१३९); स्थिर मांडवल (१४५) – fixed capital
स्वतंत्रता – freedom (७)
स्वदेशव्यापार – internal trade (२३७)
हितकर्त्या मंडळ्या (१६७); हितकारी मंडळ्या (१६८) – welfare societies
हेलमार्डे – porterage (१९१)
हेळणा – neglect (५)
होका – compass (१७९)

# परिशिष्ट : ३

## पारिभाषिक शब्द

### इंग्रजी-मराठी

[कंसांतील आकडे पृष्ठांचे आहेत.]

Abilities as capital – आंगिक पुंजी (१५५)
Accumulated product – संचित फल (३५२)
Adverse factors – बाधकें (३२६)
Affluence – रेळ (१४४)
Animal husbandry – जनावरांची ऊर्जा (३६८)
Annual emolument – साल (३३९)
Application – योजणूक (१७६)
Artisan – कारागीर (६५)
Assets – जिनगी (२१०)
Autocracy – एकसत्ताक राज्य (९१)
Bank-notes – कबूलाती चिट्या (२२७)
Barter – मालमोबदला (२४८)
Capital – भांडवल (४९); पुंजी (८९); मुद्दल (३००)
Capitalist – पुंजीदार (१३३); भांडवलवाला (२७५)
Cash capital – रोकड पुंजी (२२८)
Census – खानेसुमारी (३५१)
Charges for testing – पारखणावळ (३८)
Cheapness – स्वंगाई (२२१)
Circulating capital – फिरती पुंजी (१३९); फिरतें भांडवल (१४५)
Civil administration – देशप्रकरण (९)
Civil society – देशसंस्था (१५५)
Commodity – विनिमयार्ह पदार्थ (२६९)
Compass – होका (१७९)
Compensation – वजपा (३३३)
Competition – चढाचढी (२४९)
Concession in export duty – माफी मजुरा; ऐवज मजुरा (२४०)
Configuration – संस्था (३६१)
Consequential – प्रसक्त (३६३)
Constant capital – (पाहा 'Fixed capital')
Consumable wealth – उपभोग्य संपत्ति (२९६)
Consumption – उपभोग (१३१)
Contract – कौल (६५)
Co-operation in labour – श्रमसंयोग (३१८)
Cornering – सार्टे मारुन ठेवणें (८५)
Creditworthiness – साकी (३४०)
Cultivated farm – कुणबावा (३१९)
Currency – नाणें (२१६)
Daily employment – रोजंदारी (३१४)
Daily labourer – रोजिनदार (१११)

Daily wages – रोजमुरा (८९)
Debts – देणगी (३४)
Deficit – खांच (३३२)
Demand – खप (७)
Democratic state – लोकसत्ताक राज्य (९१)
Deprivation – अनुपपत्ति (१६१)
Destruction of wealth – धननाश (२८३)
Diving bell – मज्जनघंटिका (१००)
Division of labour – श्रमविभाग (३००)
Documents – पुर्जे (५६); खतें (९६); खतपत्रें (३१६)
Domestic affairs – घरगुती खटले (८); घरखटले (९५)
Economics – अर्थशास्त्र (२६५) (पाहा: 'Political Economist')
Economist – अर्थशास्त्रकार (२८०) (पाहा: 'Political Economist')
Empirical knowledge – अनुभवसहित ज्ञान (९८)
Employee – कामगार (३७३)
Employment – रोजगार (१०)
Engineering – इंजनरी (३६९)
Enterprise (industrial) – कारखाना (८)
Entrepreneur – उद्मी (१३३)
Equalization – रमारमी (३०५)
Establishment – स्थापना (१७१)
Ethical qualities as capital – नीतिरूप पुंजी (१५४)
Exchange – मोबदला (५५); अदलाबदल (६२); विनिमय (३००)
Exchange value – मोबदला मोल (१७३)
Expenditure – व्यय (१३१)
Exposition – उपपादन (३३३)
Extra payment (for a demand-bill of exchange) – मंडावणी (२५०)
Farm-labourers – शेतखपे (१३४)
Favourble and adverse factors – साधकबाधकें (३४१)
Favourable factors – साधकें (३२६)
Feasible – संभवदुक्तिक (३७०)
Fixed capital – स्थिरपुंजी (१३९); स्थिर भांडवल (१४५); अविनाशी भांडवल (३०१)
Food-grains – गल्ला (८५)
Foreign trade – परदेशव्यापार; बाह्यदेश-व्यापार (२३७)
Grazing land (of the community) – गोपचार (१६४)
Gross product – कच्चें उत्पन्न (३०७)
Guard – सीबंदी (१११)
Harvest – पिकलाव (११५); पिकलें (२००)
High Price level – तेजी (६३)
Hoarding – साटें मारून ठेवणें (८५)
Incentives – उत्तेजकें (३३७)
Income – उत्पन्न (२०७)
Incontrovertible proof – निर्बाध प्रमाण (३३१)
Increase in labour – श्रमवृद्धि (३६६)
Increase in population – लोकवृद्धि (६६), प्रजावृद्धि (३४८)
Industry – शिल्प (३४१)
Instrument – अधिकरण (२५२); विलण (३०१)
Internal trade – स्वदेश व्यापार (२३७)
Intrinsic value – आंगमोल (१७४)
Joint stock company – मंडळी (७); संभूय समुत्थान (३३४)

Knowledge of manufacturing – शिल्पविद्या (८९)
Labour – श्रम (४)
Labourer – मजूरकर (१०); मजूरदार (६७); मजूर (१२१); श्रमकर्ता (३२८)
Labour required for transport – वहनश्रम (२७७); वाहक श्रम (३६९)
Land revenue – धारा (६३); सारा (८९)
Land under mountains – डोंगरगर्क (१९९)
Land under river – नदीगर्क (१९९)
Land under sea – दर्यागर्क (१९९)
Letter of credit – मलावणपत्र (५६)
Limit – अवधि (३३९)
Livelihood – उपजीविका (१०); उपजीवन (१६१)
Low price level – मंदी (६३)
Machine – कळा (३४०)
Manufacture – शिल्प (१७९)
Manufactured goods – कृतिसिद्ध पदार्थ (९७); शिल्पकृत पदार्थ (३४२)
Market price – पाड (१९३)
Maximum – चरम (३६४)
Means of production – उत्पादक साधनें (२९२)
Moderately fertile – कंपीक (२०३)
Money – पैका (७)
Money capital – द्रव्यमयी पुंजी (१५४)
Monopoly – मक्ता; मख्ता (७); गादी (५९)
Monthly wages – दरमाहा (३३६)
Mortgage – गहाण (२१२)
National wealth – देशसंपत्ति (२३१)
Natural goods – प्रकृतिसिद्ध पदार्थ (९७)
Natural productivity – सांसिद्धिक उत्पादकशक्ति (३७२)
Natural products – सांसिद्धिक पदार्थ (३०९)
Natural properties – सांसिद्धिक धर्म (१००)
Natural sciences – सिद्धपदार्थविज्ञान (८८)
Natural things – सृष्टपदार्थ (२७१)
Net produce – निर्के(र्के) उत्पन्न (३४४)
Non-money capital – अद्रव्यमयी पुंजी (१५४)
Note – चिटी (५६); नोट (८४)
Original capital – मुद्दल पुंजी (२१२)
Overpopulation – प्रजातिवृद्धि (३५०)
Paper currency – कागदाचें नाणें (२२७)
Paper money – कागदाचा पैका (२२७)
Paper rupee – कागदाचा रुपया (२२६)
Partnerhip – सर्कत (३६१)
Persons engaged in manufacture – शिल्पी; लोक (१४२)
Political economy – राज्यव्यवस्था (९); देशव्यवहारव्यवस्था (८३); संपत्तिशास्त्र (११०); संपत्तिव्यवस्थाशास्त्र (१८०); संपत्तिव्यवस्था (१८३) (see 'Economist')
Political economist – संपत्तिव्यवस्था-जाणता (१८२) व्यवहार व्यवस्थाकर्ता (२४२) (see 'Economist')
Political scientist – राज्यव्यवस्थाकर्ता (२४३)
Population – प्रजासंख्या (३७६)
Porterage – हेलभाडें (१९१)
Price – किंमत (६१)
Principles governing political life – राज्यनीति (६)
Process of manufacture – शिल्प-व्यापार (९९)

**Product** – उत्पन्न (३३७)
**Production** – पैदास्त (१३३)
**Production of raw material** – द्रव्योत्पत्ति (३७०)
**Production of wealth** – धनोत्पत्ति (२७१)
**Productive consumable wealth** – उत्पादक उपभोग्य संपत्ति (२९७)
**Productive destruction** – उत्पादक नाश (१८३)
**Productive expenditure** – धनोत्पादक खर्च (२७७); उत्पादक व्यय (२८४)
**Productive factor** – उत्पादक कारण (९८)
**Productive labour** – धनोत्पादक श्रम (२७७); उत्पादक श्रम (२८०)
**Productive labourer** – उत्पादक मजूर (१९७); उत्पादक श्रमकर्ता (३५२)
**Productive wealth** – उत्पादक संपत्ति (२९६)
**Productivity** – उत्पादक शक्ति (३४६); उत्पादकता (३४७)
**Productivity of capital** – भांडवलाची उत्पादकत्वशक्ति (३७५)
**Productivity of labour** – श्रमाची उत्पादकता (३००); श्रमाचें उत्पादकत्व (३०५); श्रमाची उत्पादकत्वशक्ति (३५३)
**Profitable expenditure** – लाभकारी खर्च (२५४)
**Profitable labourer** – लाभकारी मजूर (२१४)
**Profitable wages** – लाभकारी रोजमुरा (२२१)
**Progress** – बढती (७)
**Prohibiting factors** – प्रतिबंधकें (३२२)
**Prosperity** – अबादानी (३); भरभर (७८)
**Purchase and sale** – क्रयविक्रय (५४)
**Rate** – निरख (८५); दर (३३२)
**Reform** – सुधारणूक (१०२)
**Relative value** – सांबंधिक मोल (१७४)
**Repetition** – अनुवाद (३३३)
**Reproductivity** – प्रजोत्पादनशक्ति (३४८)
**Revenue (land)** – पट्टी (३७१) (पाहा : '**Land revenue**')
**Saving propensity** – संग्रहवासना (३७३)
**Scarcity** – कमताई (३३३)
**Second grade (of land)** – दूम (१९२)
**Self-proved** – अनन्यथासिद्ध (३४६)
**Servanto, fficer** – कामदार (२७)
**Service** – डांक (३३५)
**Shares** – रोखे (३३४)
**Shipping freight charges** – नोर (३८)
**Shortage** – कमती (१९२); तंगचाई (११६)
**Side-crop** – बरवा (३२९)
**Spring** – कमाण (१८०)
**Stamp-paper (?)** – छापी कागद (६४)
**Steel** – तिखें (४०)
**Stock** – भरणा (२५५)
**Stock in hand** – दास्तान (१३८)
**Supervisor** – चौकसनीस (१११)
**Supply** – अमदानी (६३); भरती (८९); पुरोटा (२००); पुरावा (३७७)
*Taccavi* – तगाई (३२२)
**Tax** – कर (३२)
**Tenant** – कूळ (१८८)
**Tenant (paying revenue to state besides rent to landlord)** – धारेकरी (१८८)

Third grade (of land) – सीम (१९२)
Treasury officer – जामदार (९)
Truce – सल्ला (१५)
Unemployed – बेरोजगार (३०५)
Unemployment – बेरोजगारी (२९९)
Universality – सामानाधिकरण्य (३३३)
Unproductive consumable wealth – अनुत्पादक उपभोग्य संपत्ति (२९७)
Unproductive destruction – अनुत्पादक नाश (२८३)
Unproductive expenditure – अनुत्पादक व्यय (२८४)
Unproductive labour – अनुत्पादक श्रम (२८०)
Unprofitable expenditure – अलाभकारी खर्च (२५४)
Unprofitable labourer – अलाभकारी मजूर (२१४)
Unprofitable wages – अलाभकारी रोजमुरा (२२१)
Use value – उपयोगरूप मोल (१७४)
Valuable – मोलदार (२५५)
Valuation of currency – नाण्याचा भाव (२५१)
value – मोल्य (६१); मोल (८९)
Value of money – पैक्याचें मोल (२२६)
Variable capital – विनाशी भांडवल (३०१)
Wages – मजुरी (९)
Warehouse in port – मांडवी (८४)
Way of political life – राज्यरीति (३)
Wealth – संपदा (७); धन (२६७)
Welfare societies – हितकर्त्या मंडळ्या (१६७); हितकारी मंडळ्या (१६८)
Wholesale – एकथोक (१३०)

# सूची


अदलाबदल ६२
अद्रव्यमयी पुंजी १५४,१५५
अनुत्पादक उपभोग्य संपत्ति २९७
अनुत्पादक नाश २८३
अनुत्पादक व्यय २८४, २८९-२९६
अनुत्पादक श्रम २८०-२८३, २८७
अनुत्पादक संपत्ति २९७
अनुभवसहित ज्ञान ९८-१०१,१०८,१०९
अमदानी ६१, ६३
अमेरिका ३७, ४७, ६२, ९२, ९५, १०७, १२५, १४०, १५६, १५७, १६२, १६५, १८१, १८४, १९०, १९९, २११, २१७, २२३, २२६, २३९, २४१, २४६, २५२, ३२८, ३४८, ३५४-३५७, ३६६, ३६७,३७८-३८०
अर्थशास्त्र २६५-२६७, २७७, २८२, २८५, २९०, २९४, ३०८, ३१०, ३४६, ३६४, ३६५.
अर्थशास्त्रकार २८०, २८५, २९०, २९१, ३१८
अलाभकारी खर्च २५४
अलाभकारी मजूर २१४, २१५, २२१.
अलाभकारी रोजमुरा २२१,
अविनाशी भांडवल ३०१-३०७, ३३२
आंगमोल १७४-१७७, २१९, २४१
आंगिक पुंजी १५४, १५५
आडम स्मिथ (आदम स्मिथ) ९, ८५, ८९, १११, १२३, २२३, ३२३-३२७, ३३८
आफ्रिका ११३, १४७, १५५, ३०८
आर्कराइट, सर रिच्यार्ड १००, १४१, १४३, ३०४
इंग्रज (इंग्रेज) ९२, १००, ११२, २३५, २३६, २९०, ३११, ३१६
इंग्लंड (इंग्लांड) ७, २२, ३५, ३६, ४०, ५१, ८६, ८९, ९५, १००, ११५, १२२, १२४, १३९, १४१, १४३, १४७, १५२-१६९, १७८-१८४, १९४, १९८, २०५, २२३, २२६, २२७, २३१, २३२, २३५-२५१, २५७, २५८, २६५, २८४, ३०५, ३०८-३२२, ३३०, ३३४, ३३५, ३४०, ३४२, ३४५, ३५०, ३५१, ३६१, ३६२, ३६६-३७९.
इंग्लिश २२,२३,१५३,
इंग्लिश इस्टइंडिया कंपनी ३१
इंजनरी ३६९
इंडियन (रेडइंडियन) ३१९, ३५६-३५९.
इंडिया १३, १४,
इटाली (इताली) ११७, १२७, २५०, २५१, ३०९, ३११, ३४३
इस्त इंदियन ४१
ईश्वरसत्ता ९९
ईस्ट इंडिया कंपनी ३३
उत्पन्न २०७, ३६४, ३६५, ३६८
उत्पन्नवृद्धि ३६४, ३६७
उत्पादक उपभोग्य संपत्ति २९७
उत्पादक कारण ९८-१०१
उत्पादकता ३४७
उत्पादक नाश २८३
उत्पादक मजूर २९७
उत्पादक व्यय २८४, २९४, २९६
उत्पादक शक्ति ३४६

उत्पादक श्रम २८०-२८७, २९०, ३१४, ३२२, ३२३, ३३३, ३७४
उत्पादक श्रमकर्ते ३५२
उत्पादक संपत्ति २९६, २९७
उत्पादक साधन २९२
उदमी २३३, २७८, २८६, २८९
उपजीवन; उपजीविका १०, १६१-१६६, २८७, २९२, ३०५, ३०९, ३१४, ३३०, ३३४, ३४४-३५१, ३६९, ३७०, ३७७
उपभोग १३१
उपभोग्य संपत्ति २९६
उपयोगरूप मोल १७४
एकशोक २३०, २३३, २३४
एकसत्ताक राज्य ९१
एशिया १४, ११०, २३५, ३१६, ३३४, ३४१, ३५८, ३६२.
ऐर्लंड; ऐर्लंद; ऐर्लांड १४७, १५३, १५५, ३७४
ऐवज मजुरा २४०
औरंगजेब २०-२२
कंपनी ३३४, ३३५
कंपनी सरकार ९, २२-२७, ३५
कर्बे उत्पन्न ३०७, ३४५
कबूलाती चिठ्या २२७
कमती १९२
कमेटीदार ३३८
कर ३२, २९१, ३१६
कर्नाटक १६, २३, २५, २३७
कलकत्ता ८, २२, ३०, ३५, २३७, २४४, ३३४
कागदाचा पैका २२७, २४८,
कागदाचें नाणें २२७, २२८
कागदाचे रुपये २२६
कामगार ३७३, ३७५
कामदार २७, ३६,
कारखाने ८
कारागीर ६५, ३२१-३३४, ३६१
किंमत ६१, ६२, ८९, १७३, १७६, १८९, १९२, २१९, २२०, २२५, २४५, २७५, ३६५-३७०, ३७८
कूळ ३४३, ३४४
कृत्रिसिद्ध पदार्थ ९७
कोंकण ११६, २०६, २४०, २४५, ३८०
कोठरी २४
कौल ६५
क्रयविक्रय ५४-५६, २९५, ३००, ३१०
क्लैव २३
खतपत्र ३१६
खतें ९६
खप ७-१०, ३२, ३७, ६१-६३, ८९, १४१, १४४, १५२, १७५, १७६, १८१, १९७-१९९, २१६, २२०-२२५, २२९-२३९, २४५, २४६, २५५, २९७-३००, ३०५, ३२१-३३२, ३३९, ३४०
खानदेश २०, ११५, ३८०
खानेसुमारी ३५१
गहाण, गाहाण २०९, २१२
गाथा ५९, ६१
गिबन ३
गिऱ्हाईक ३२१, ३३२, ३६६
गुजराथ १४, १८, ३७, २४४
गोपचार; गोपचार करणें २३१, २४६
गोवा ३०, २०६
ग्रीक ७०, ९३, २१२, २१७, ३११
चिटी ५६, ८४, २१३, २४८, २६८, २८५
चिनई, चिनी ११, ३८, ९८, ११०, ३५८
चिनापटम ११
चीन १७, ३६, ३७, ४०, १५५, २११, २३७-२४२, ३११, ३५८-३६०
चेंबर आफ कामर्स ३७
छापी कागद ६४
जंबुद्वीप २०६, २४४
जकात ५९, ६४, ८४, ८५, २००, २४०
जमिनीची उत्पादकशक्ति ३७०
जमीनदार ३४३, ३५३, ३६६

जर्मनी १६६, २५१
जामीनकी २०९
जिंनगी २१०
टपाल ५४
टामस मुअर स्टामफोर्ड ८
टामस रो (सर) १९
टार्टार १०८
टिपू सुलतान २६, ३९, २४४, २५८
ठोक दर ३४२
तगाई ३२२
तार्तारी १२, ३११
तेजी ६३
त्रावणकोर ९,१०, २६
दर ३३२
देत्री साहेब (सर) ५१
देशव्यवहारव्यवस्था ८३
देशसंपत्ति २३१, २३२, २४१
देशाभिमान ७
द्रव्यमयी पुंजी १५४, १५८
द्रव्योत्पत्ति ३७०
धन २६७-२७०, २७२, २७८-२८५, २८८, २८९-२९४, २९९, ३१३
धनको २१०
धननाश २८३
धनोत्पत्ति २७१-२७४, २८०
धनोत्पादक खर्च २७७
धनोत्पादक श्रम २७७, २७९, २८१
धर्मादाय १६७-१७१
धाकजी दादाजी ९
धारा ६३-६८, ८९, १७२, १८१, १८७, १८८, १९२, २००, २०१, २८७
नफा ३२२, ३५३-३६३, ३६६, ३६७, ३७३, ३७५
नागपटम ११,२२
नाणें २१६-२१८, २२३-२२९, २६८, २८५
नाण्याचा भाव २५१, २५२
निर्के(र्के) उत्पन्न ३४४, ३४५, ३५२, ३५३
निरख ८५
नीतिरूप पुंजी १५४, १५५
नेटिव ९,१०, ३१-४२, ३६०
नोटी ८४, २१३, २२२, २२७, २२८
नोर ३८, २१८, २३९-२४१, २४६, २४९
पट्टी ३७१
परदेशव्यापार २३७-२४०
पार्लमेंट २५-२७, ३४, ५२, ३१६
पुंजी ८९, १३२-१६६, १७०-१७३, १७८, १८१-१९२, १९६-२१५, २१८, २२७-२३०, २३३, २३४, २३८-२४६, २५३-२६०
पुंजीदार १३३-१४०, १४२, १४५, १४७-१५१, १८२, १९६, २०५, २०८, २०९, २१४
पुर्णे २६, ११६, २२७, २३७, २४०, २४९
पुरावा ३७७, ३७८
पुरोटा २००
पेंढारी ११६
पेढी १६८, २३५, २३८
पेशवे २६, ३०, ११६, २४४, ३१६
पैका ७, ३२, ८९, ९६, २०७, २१६, २२०-२२२, २५९, ३६७
पैवेकरी १८३
पैक्याचें मोल २२६
पैदास्त १३३, १३६
पोर्तुगाल ३०, २२३, २३९, २५२
पोर्तुगीज १९, २२, १११, २४४
पोलिटिकाल इकानमि ९,४३
प्रकृतिसिद्ध पदार्थ ९७, २४७
प्रजातिवृद्धि ३५०, ३७५, ३७९
प्रजावृद्धि ३४८-३५१, ३५४, ३७४-३८०
प्रजासंख्या ३७६
प्रजोत्पादनशक्ति ३४८
प्रतिबंधकें ३२८, ३४७-३५१, ३७६
प्रॉतस्तन्त ३४९
प्लिनि ११

फरासिस ५३
फिनिशिया ४, ८४, ११०
फिरंगी १००,२४४
फिरती पुंजी १३९-१४५, २०९
फिरतें भांडवल १४५
फुटकळ २३०, २३३, २४२
फ्रान्स २२,३०,११७,१२७,१६६,१६९, २४२, २४३, २५१, ३४५, ३५१, ३७५
फ्रेंच २२, २३, ११८, २४३
बंगाल १६, २४
बर्क ३३
बलुतेदार ३२२
बहार (बिहार) १६, २४
बाजारभाव १७६
बाधकें ३२६
बाह्यदेशव्यापार २३७
बेरोजगार—री २०९, ३०५, ३३३
बेर्नीयर २२
बोनापार्ट २४३
ब्यांकनोटी २२७, २२८, २४८
ब्राह्मण ३१६
ब्रिटन ११५
भट ६८, ६९
भरणा २५५
भरती ८९, १७५, १७६, १९३, २००, २०६, २२०, २२४-२३२, २४५, २४६.
भांडवल ४९, ५७-५९, ६३, ६८, ८९, ९६, ९९, १३२, १४५, १५०-१५३, १५६, १७६, १७८, २६८, २७६, २८५-३०८, ३१५, ३१७, ३२२, ३२८-३४७, ३५१-३५३, ३६०-३६८, ३७३-३८०
भांडवलदार; भांडवलवाला २७५, २७६, २८५-२८८, २९२-३००, ३०२, ३०६, ३३२-३४४, ३५३, ३६६, ३६७, ३७३
भांडवलाची उत्पादकत्वशक्ति ३७५
भाडें ८९, १८८-२०५, २१०, २११, २१४, २२१, २३३, २४१, २५२, २७३, ३०३, ३७५
मंडळी ७, ३८, १६७, ३३४-३३९
मंडावगी २५०-२५२
मंदी ६३, २९८
मकला, मक्का; मल्ला ७, ६१, ११७, १९९, २०२, २०४, २९९
मक्केवाला ३३९
मजूर; मजूरकर; मजूरदार १०, ६७, १२१, १२२, १३४-१४०, १४५-१५०, १५८, १७२, १९७, २०५, २३३, २५९, २९७, ३०७, ३३२, ३५३
मजुरी; मजूरी ९, १०, ६३-६८, १३३-१४४, १५२, १५८, ३३३, ३५३, ३६१, ३७४
मनरो, सर टामस ११७
मन्चस्टर ७०
मलबार ४०, २०६, २४४
मांडवी ८४
माफी मजुरा २४०
मारवाड २०६, ३०८
मालथस १६२, २०१, ३४७, ३५४
मालमत्ता ३०५, ३१५, ३१६, ३१४, ३६१, ३७२, ३७९
मालमोबदला २४८
माहाराष्ट्र २०
मिल, मिल्, मिल्ल ११७, १७५,२६५, ३४१
मिळकत २८९, २९१, २९२, २९८, २९९
मुंबई ८, २१, २९, ३५, ८४, ९६, १२४, १२८, २२७, २३७-२४०, २४४, २४८, २४९, ३३०, ३३४
मुंबई ब्यांक २२७
मुद्दल ३००
मुद्दलपुंजी २१२
मेकालि ३६
मोंगल १६, २४, २४४, ३११
मोबदला ५५, ५६, ९६, ९७, ११९-१२१, १२९, ३००
मोबदला मोल १७३,१७४,२१८,२१९, २२६, २४१

मोल ८९, १७३-१७९, १८८, १९७, २१८-२२४, २३१, २५४, २७४, ३७०
मोलदार २५५
मोल्य ६१, ६२
मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन २३५
म्हैसूर ९, १६, २६
युनैटेड स्टेट्स १२५, १५७, ३७८, ३८०
युरप, युरोप ७, २३, ४७, १०४, १०५, १११, १५७, १६६, २२३, २३५, २५२, ३०९, ३४८-३६६.
युरोपियन १०, ४१, १००, ३५७, ३६०
योजणूक १७६, १८२
रसिया, रुसिया, रूस १४०, १९९, २३८, ३०८, ३०९, ३७४, ३७९.
राज्यनीति ६, ११५
राज्यव्यवस्था ९, ९३
राज्यव्यवस्थाकर्ते २४३
रिकार्डो १८३, १९७, २०१
रिणको २१०
रे ३२८, ३५४
रोकड पुंजी २२८
रोखे ३३४
रोजंदारी ३१४
रोजगार १०, २२, ५२, ६६, २२१, २३३, २९७-३०५, ३०२, ३४०, ३५४, ३६१, ३७३
रोजदार ३३९
रोजमुरा ८९,१३१-१६२, १८१, १९६-२०१, २११, २१४, २१९, २३३, २४६, २५६, २५७, ३३६-३४२
रोजिनदार १२१, १२२
रोम ४, १४, ७०, १०५, २११
रोमन ९३, २१२, २१७, २२६, २५८, ३११, ३५५
रोमन कायलिक ३५७
लांकन शैर १४३, १५५
लाभकारी खर्च २५४
लाभकारी मजूर २१४, २१५
लाभकारी रोजमुरा २२१
लोकवृद्धि ६६, ३१०, ३६४-३७०, ३७४, ३७६
लोकसंख्या ८९, १५६-१६२, १९२, ३६९, ३७५-३७७
लोकसत्ताक राज्य ९१
लोकसत्तात्मक राज्य ५०
वलंदेज १११
वहनश्रम २७७, २७८, ३६५
वाट्स १००, १४३
वारन हास्टिंग २५
वाल्नि ३
वाहकश्रम ३६९
विनाशी भांडवल ३०१-३०७, ३३२
विनिमय ३००, ३२२
विनिमयार्ह पदार्थ २६९, २८०
विमा ३८, २३९, २४०, २४६, २४९, ३३५
विम्याची दुकाने ३३८
विम्याच्या मंडळ्या ३३५
वेठबिगार १४०
वेतन ६५, २०८, २१०, ३७५
वेष्ट इंडिया १४०
वोल्नी ८४,१०८,११३ (पाहा: 'वाल्नि')
व्यय १३१, १३२
व्याजबट्टा ८९
शिल्प ३४१, ३६९
शिल्पकर्म १७९, १८४, १८९, २२५
शिल्पकृत पदार्थ ३४२, ३७७
शिल्पविद्या ८६
शिल्पव्यापार ९९
शिल्पी लोक १४२, १८९, ३७०
शिवाजी २०, २१
श्रम ४, ७-१०, ९९, १७५, २०८, २३३, २३४, २६८, २७१-२८५, २९१-३००, ३०४, ३०८-३७९
श्रमकर्ता ३२८, ३३०, ३३९, ३५२, ३५३, ३७१

श्रमविभाग ३००, ३०८-३३२, ३४०, ३४१
श्रमवृद्धि ३६६
श्रमसंयोग ३१८-३२२, ३२८-३३०, ३४१, ३४४, ३७६
श्रमाची उत्पादकता ३००, ३१८, ३२१, ३२४, ३४०, ३७२, ३७६
श्रमाची उत्पादकत्वशक्ति ३५३, ३७५-३८०
श्रमाचें उत्पादकत्व ३०५, ३२२, ३२४, ३२७-३३१, ३५१, ३७०, ३७१, ३७४-३८०
संग्रहवासना ३१३-३७९
संचितफल ३५२
संपत्तिव्यवस्था १८३, १९७
संपत्तिव्यवस्था-जाणते १८२
संपत्तिव्यवस्थाशास्त्र १८०
संपत्तिशास्त्र ११०
संपदा ७
संभूय समुत्थान ३३४, ३३५
सवंगाई २२१
सांबंधिक मोल १७४
सांसिद्धिक उत्पादकशक्ति ३७२
सांसिद्धिक धर्म १००
सांसिद्धिक पदार्थ ३०२, ३०८, ३४६
साधकबाधकें ३३८, ३४१
साधकें ३२६, ३४२
सारा ८९, १३६, १७७, १९२, २००, ३४३, ३४४, ३६६, ३६७, ३७४, ३७५
साली २४
सिद्धपदार्थविज्ञान ८८
सिनियर १५४, १५५
सिरिया ६०, ९२, ११३-११५, १५५
सुधारणु(णू)क १०२, १०६, १३०, १३१, ३६७
सृष्ट पदार्थ २७१, २७३, २८५
से १४४
स्थिर पुंजी १३९-१४५, २०९
स्थिर भांडवल १४५
स्वतंत्रता ७
स्पेन १५७, १६६, १७५, २२३, २४५, २५१, २५२, ३०९, ३७४
स्वदेश ८६
स्वदेशव्यापार २३७, २३८
हमी २०९
हिंदु १०, ११०
हिंदुस्थान ५-१०, ३०९, ३३५, ३५४, ३६०, ३६६, ३७९
हुंडी २४८–२५२

# शुद्धिपत्र

[ ठळक अक्षरातील शब्द मुळातच अशुद्ध छापले गेले आहेत. ]

| पृष्ठ | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ११ | ३८ | वाटेल | वाढेल |
| २२ | १० | इंग्रज | इंग्रेज |
| ,, | २३ | कल्ता | कलकत्ता |
| ,, | ३५ | हिंग्रेज | इंग्रेज |
| २३ | १५ | शाही | शाहाजी |
| २४ | ५ | क्षप | पक्ष |
| ,, | ३७ | पुरवाना | पुरवावा |
| २७ | ३७ | नावाचा | गांवाचा |
| २९ | २४ | आता | असता |
| ३० | १५ | निरापरागी | निरपरावी |
| ,, | २० | गुगवान | गुणवान |
| ,, | २८ | कान्या | कोन्या |
| ३२ | १२ | इंग्लियांची | इंग्लिश्यांची |
| ,, | ३२ | फियाद | फिर्याद |
| ३३ | २० | काबुचे | काबुलचे |
| ,, | २२ | हिंदुस्तानचं | हिंदुस्तानचे |
| ३४ | १६ | होते | होतो |
| ३५ | १ | एकढा | एवढा |
| ,, | २ | एर्ये | एथें |
| ३६ | ३८ | नीन | चीन |
| ३७ | २३ | हाय | हाच |
| ३९ | ३७ | जो | जा |
| ,, | ३६ | रुपयांचाम क्ता | रुपयांचा मक्ता |
| ,, | ३७ | वळस | वेळेस |
| ४० | १५ | विशाच्यांस | पिशाच्यांस |
| ,, | २८ | उत्प | उत्पन्न |
| ४१ | ५ | पिकण्याजागी | पिकण्याजोगी |
| ,, | ११ | अरें ? | बरें ? |

| पृष्ठ | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ,, | ३१ | परिणाक | परिणाम |
| ४७ | ९ | उजड | उजेड |
| ,, | २२ | उद्योगशिवाय | उद्योगाशिवाय |
| ५२ | ४ | असत् | असत् (?) |
| ,, | ९ | सुतारपणात | सुतारपणा |
| ५५ | १ | वास्तवप दार्थाचा | वास्तव पदार्थाचा |
| ५९ | २७ | मनुष्याची | मनुष्याचा |
| ६१ | २७ | ह्या | ह्यांतीं |
| ,, | ३१ | येक तेल | एक हजार शेर तेल |
| ६४ | २१ | वसुलावरा | वसुलावर |
| ६५ | ६ | वेतंन | वेतन |
| ८१ | १० | रिति | रीति |
| ८२ | ५ | नांण्याबद्दल | नाण्याबद्दल |
| ९० | २० | ऐक | ऐक. |
| ९५ | ११ | मोकार | मोकाट |
| ९८ | २ | अनुभवहित | अनुभवसहित |
| १०० | २९ | पोर्तुगीस | पोर्तुगीस |
| १०१ | ३० | संपति | संपत्ति |
| ११३ | २, १७ | बोलनी | वोलनी |
| ११४ | २८ | टेऊं | येऊं |
| १२६ | ३० | उमय | उभय |
| १३४ | १७ | पुन | पुनः |
| १३५ | ३४ | रूपांनीं | तीर्थरूपांनीं |
| १४० | २१ | लाणी | लावणी |
| १४१ | १ | कामांतून टाकावें | कामांतून काढून टाकावें |
| १४८ | ६ | पिकलार | पिकलाढ |
| १५५ | ४ | देश संस्था | देशसंस्था |
| ,, | २५ | मिसर | मिसर |
| १५८ | ३७ | मिकेस | भिकेस |
| १६० | २१ | चिरकोळ | चिरकाळ |
| १६९ | ९ | धर्मदाय | धर्मादाय |
| १७४ | ६ | संबंधिक | सांबंधिक |
| १७५ | २ | एकदा | एकादा |
| १७९ | १८ | प्रकृतीव | प्रकृतीच |
| १८५ | २८ | वांटर्णी | वांटणी |
| ,, | १ | एकून | एकूण |

| पृष्ठ | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १८६ | ३ | एकुन | एकूण |
| १९६ | १ | एकुन | एकूण |
| १९७ | ३१ | घेऊंन | घेऊन |
| २११ | १३ | अरगस्टस | अगस्टस |
| २३१ | २० | ठिकान | ठिकाण |
| २३४ | १४ | अडचण पडावी | अडचण न पडावी |
| २३६ | २५ | ठेविले नाहीत ? | ठेविले आहेत ? |
| २४१ | ११ | मुल्दावर | मुदलावर |
| २४२ | ३ | असेता | असेना |
| २४८ | १५ | एयील | एथील |
| २५३ | २८ | उत्पन्नाच | उत्पन्नाचे |
| २८४ | ६ | अनुउत्पादक | अनुत्पादक |
| २८७ | ५ | ,, | ,, |
| २९५ | २० | उनुत्पादक | अनुत्पादक |
| ३०३ | ३१ | (पृ० सं०) २०३ | ३०३ |
| ३०६ | १ | मी | ती |
| ३२१ | ९ | त्याच्या | त्यांच्या |
| ३३२ | ९ | एकदा | एकादा |
| ,, | २३ | पाहिल्यापेक्षा | पहिल्यापेक्षा |
| ३३८ | १२ | वाढत | वाव्त |
| ३४२ | १६ | मोठाली, | मोठालीं |
| ३५० | २२ | मुलें असतात | मुलें कमी असतात |
| ३६५ | १४ | करणें | कारणें |
| ,, | १६ | मानाचें | मानानें |

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

## मराठी प्रकाशने

१. **पुणें जिल्ह्यांतील फळांची पैदास व विक्री**
लेखक : ध. रा. गाडगीळ व वा. रा. गाडगीळ, १९३६ (आवृत्ती संपली आहे.)

२. **महाराष्ट्रांतील मोटार वाहतूक**
लेखक : ध. रा. गाडगीळ व ल. वि. गोगटे, १९३६ (आवृत्ती संपली आहे.)

३. **आर्थिक घडामोडी (१९३०–१९५०)**
लेखक : ध. रा. गाडगीळ व नी. वि. सोवनी, १९५१,
आकार ९" × ५¾", पानें २८७ किंमत रु. ८·००

४ **पंचवार्षिक योजनेचें समीक्षण** – लेखक : ध. रा. गाडगीळ,
१९५१, आकार ९" × ५¾", पानें ३१ किंमत रु. ०·५०

५ **महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना**
लेखक : वि. म. दांडेकर व म. भा. जगताप, १९५७
आकार ९" × ५¾", पानें १०२ किंमत रु. २·५०

६ **महाराष्ट्र कृषिजीवन : सांख्यिकीय दर्शन**
१९६१, आकार ९" × ११½" पानें ११२ किंमत रु. १५·००

७ **पुणे शहरातील महाजन व नगरशेठ**
लेखक : ध. रा. गाडगीळ, १९६२
आकार ५" × ७½" पाने १९ किंमत रु. १·००

८. **नागाव : आर्थिक व सामाजिक जीवन (१७६०–१८४०)**
लेखक : शां. वि. आवळसकर, १९६२
आकार १०" × ६¾", पानें १५२ किंमत रु. १०·००

९. **महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायती राज्य : परिसंवाद**
१९६३, आकार ९" × ५¾", पानें २८७ किंमत रु. ६·००

१०. **व्यापारासंबंधी व्याख्यानें**
लेखक : मा. गो. रानडे, पुनर्मुद्रण-प्रस्तावना : नी. वि. सोवनी,
आकार ९" × ५¾", पानें ९० किंमत रु. २·५०

११. **सहा ग्रामीण विभागांची जनसांख्यिकीय पाहणी**
लेखक : कुमुदिनी दांडेकर, १९६४
आकार १०" × ६¾", पानें १४६ किंमत रु. ६·००

१२. **सहकारी लोकराज्य** – लेखक : ध. रा. गाडगीळ, १९६७
आकार ९" × ५¾", पानें ८५ किंमत रु. ३·००

१३. **पानशेत प्रलय** – लेखक : सुलभा ब्रह्मे, प्रकाश गोळे
आकार १०" × ६¾", पानें ११६ किंमत रु. ६·००

या संग्रहात चार जुनी मराठी पुस्तके पुनर्मुद्रित केली आहेत. ती १८४३ ते १८५५ या काळातील दुर्मिळ पुस्तके असून अर्थशास्त्र हा त्यांचा विषय आहे. निसर्गविज्ञान आणि मानवविज्ञान या दोन्ही ज्ञानशाखांतले अद्ययावत ज्ञान मराठी भाषेतून लोकांना देण्यासाठी त्या वेळी विद्वान लोक किती कसोशीने व तळमळीने प्रयत्न करीत होते त्याचे प्रत्यंतर या संग्रहामुळे येऊ शकेल.

शंभर वर्षांपूर्वी, आपल्या सुशिक्षितांचे अर्थशास्त्रीय विचार कसे होते, त्यांना राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा यांची निकड कशी वाटत होती आणि मराठी भाषेची घडण नव्या दृष्टीने ते कशी करीत होते याची कल्पना या संग्रहाच्या अभ्यासाने येईल. स्वदेशी वस्तूंचा वापर, यंत्रोद्योगाची आवश्यकता, लोकसंख्येचे नियोजन अशा विविध विषयांवर त्या काळीही विचार झालेला आहे व त्या दृष्टीने अभ्यासकांना या संग्रहाचे मोल वाटेल.